त्रिशत-सांवत्सरिक-शिव-स्मारक ग्रंथावली शके १८५१

अनुक्रम १

[होळकरसरकार-पुस्तकमाला, पुस्तक २४ वें.]

शिवकालीन-पत्र-सार-संग्रह

(शके १४८८ ते शके १६०४)

खंड १-२ एकत्र

शके १८५१] श्रीशिवचरित्रकार्यालय [इ. १९३०
पुणें

प्रकाशकः-रायगड-स्मारकमंडळ आणि भारत-इतिहाससंशोधक मंडळ
यांच्या सहकार्यानें चाललेल्या श्रीशिवचरित्रकार्यालयातर्फे कार्यालयाचे
चिटणीस नरसिंह चिंतामण केळकर व दत्तात्रय विष्णु आपटे,
३१२ सदाशिव पुणें नं. २.

त्रिशत-सांवत्सरिक-शिव-स्मारक-ग्रंथावली

अनुक्रम	पुस्तकाचें नांव	पृष्ठें अजमासें	किंमत रु. आ.
१	शिव-कालीन-पत्र-सारसंग्रह खंड १ व २	पृष्ठें ७३६+१६	७-०
२	शिवाजी-निबंधावली		
	खंड १-शिवकालविषयक निबंध	५००	३-८
	खंड २-शिवाजीचरित्रविषयक निबंध	३५०	३-८
३	शिव-चरित्र-साहित्य (अस्सल पत्रें) खंड १	१४०	१-८
	खंड २	३००	४-०
	खंड ३	३००	३-०
४	Foreign Biographies of Shivaji by Dr. Sen.	४९२+५७	१०-०
५	शिव-चरित्र-चित्र-संग्रह. श्रीमंत बाळासाहेब पंतप्रतिनिधि (संस्थान औंध) विरचित, प्रत्येकीं दहा चित्रें असे तीन खंड.		५-०
६	Shivaji the Great by Dr. Balkrishna	पृष्ठें ६०० चित्रें १००	१०-०

मुद्रक—सीताराम वासुदेव फडणीस, बी. ए.
'आर्यसंस्कृति-मुद्रणालय',
चिमणबाग, टिळक रोड, पुणें.

प्रस्तावना

१. प्रस्तुत ग्रंथामध्यें शिवकालीन अस्सल पत्रांच्या सारांशांचा संग्रह केला आहे. अभ्यासाच्या सोईसाठीं शक १६०२ ही शिवकालाची अंतिम मर्यादा ठरवून तेथपर्यंतचीं उपलब्ध झालेलीं शिवाजीसंबंधीं मराठी, इंग्रजी, पोर्तुगीज, डच, कानडी, फारसी व संस्कृत ह्या ७ भाषांतील अस्सल पत्रें व समकालीन उल्लेख यांचा समावेश केला आहे. आदिम मर्यादा तितकी निश्चित न ठरवितां, विशेषतः मराठी पत्रांच्या बाबतींत, ती बरीच ढिली ठेविली आहे. उपलब्ध असलेल्या जुन्यांत जुन्या सर्व शिवचरित्रोपयोगी पत्रांना या ग्रंथांत स्थान देण्याचें ठरविल्यामुळें जरी शक १४८८ तील लेखाला अग्रमान मिळाला आहे तथापि तो यदृच्छाप्राप्त आहे, सहेतुक नाहीं, हें अभ्यासकांच्या सहज ध्यानांत येईल.

२. भारत इतिहास संशोधक मंडळांतील ग्रंथसंग्रह, इंडिया ऑफिस (लंडन) व हेग मधून मंडळानें पुष्कळ खर्च करून आणविलेले शिवकालीन पत्रांचे उतारे यांचा याग्रंथासाठीं मुख्यतः उपयोग केला आहे. याखेरीज प्रो. पिसुर्लेकर यांचा पोर्तुगीज ग्रंथ, 'फरामीन सलातीन' आदिकरून फारशी ग्रंथ, एपिग्राफिया कर्नाटिका सारखे संशोधनात्मक ग्रंथ, अशासारख्या ग्रंथांचाहि उपयोग झाला आहे हें पत्रांच्या माथ्यावरील संदर्भनिर्देश पाहून सहज लक्षांत येण्यासारखें आहे. या ग्रंथांतून निवडलेले असे एकंदर २३४० उतारे यांत संग्रहित झाले असून ते ज्या ग्रंथांतून घेतले आहेत त्यांची विल्हेवारी एकत्र दिली आहे त्यावरून या ग्रंथाच्या व्याप्तीची कांहीं कल्पना येईल.

३. शिवकालीन वाङ्मय, म्हणजे शिवचरित्रोपयोगी विश्वसनीय वाङ्मय, अत्यंत अल्प आहे अशीच सामान्यतः संशोधकांची समजूत होती व अजूनहि आहे. फार कशाला, प्रस्तुत ग्रंथ हातांत घेतांना येथील मंडळींचीहि तशीच समजूत होती. परंतु आरंभीं थोडी अस्पष्ट असलेली कल्पना, प्रत्यक्ष काम जसजसें हातांतून जाऊं लागलें त्याप्रमाणें, अधिक स्पष्ट होत गेली. आणि शेवटीं कल्पनेच्याबाहेर असा हा ग्रंथ वाढून सातशेंपर्यंत वाढत गेलेली पृष्ठसंख्या, पूर्वीं कल्पिलेल्या एका खंडाऐवजीं, तेवढ्याच पृष्ठांच्या दोन खंडांत विभागावी लागत आहे. मात्र शिवचरित्रविषयक विविध प्रसंगांवर या संग्रहामुळें जो कांहीं प्रकाश पडेल त्या योगानें अज्ञात स्थानें स्पष्ट दिसूं लागून अभ्यासकांची जिज्ञासा अधिकच वाढणार यांत शंका नाहीं. तेव्हां इतकीं साधनें एकत्र करूनहि अजून पुष्कळ

साधनें मिळालीं पाहिजेत अशी कै. राजवाडे यांनीं अगदीं पहिल्यानें मारलेली हांक अजूनहि तशीच दूरवर पोंचविली पाहिजे असाच ग्रह या ग्रंथाच्या अभ्यासानें झाल्यास नवल नाहीं.

४. हा ग्रंथ अनेकांच्या परिश्रमांचें फळ आहे हें आभारपूर्वक सांगणें अवश्य आहे. श्री. रंगनाथ दत्तात्रय चाडेकर, एम्. ए., यांनीं अल्पावधींत जुन्या डच भाषेचा अभ्यास करून त्या भाषेंतील उताऱ्यांचें सार तयार केलें. पोर्तुगीज उताऱ्यांचा सारांश प्रो. पिसुर्लेंकर यांनीं पाठविला. इंग्रजी उताऱ्यांचा सारांश श्री. दिनकर विनायक काळे, एम्. ए. यांनीं काढला, मराठी पत्रांचा सारांश काढण्याचें काम श्री. शंकर नारायण जोशी व श्री. गणेश हरी खरे या उभयतांनीं केलें आणि फारसी पत्रांचा मतलब प्रो. भगवद्दयाल वर्मा यांनीं दिला.

५. हीं सर्व पत्रें कालानुक्रमानें लाविलीं असल्यामुळें, कोणत्याहि एका प्रसंगाबद्दलचे उल्लेख एकत्र सांपडणें शक्य झालें नसलें तरी, ह्या व्यवस्थेंतहि एकप्रकारची सोय झाली आहे हें कोणाचेहि ध्यानांत येईल. कोणत्याहि भाषेंतील सर्व प्रसंगांवरचे उल्लेख, आणि तेहि इतिहासासारख्या विषयांतील, सुसूत्र लावण्याची एकच पद्धति म्हटली म्हणजे कालानुक्रमानें केलेली विल्हेवारी हीच होय ह्याबद्दल दुमत होण्याचें कारण नाहीं. शिवाय या लेखसंग्रहाला विषय-सूचीहि जोडली असल्यामुळें मुख्य व्यवस्थेवरून कालाचें, व सूचीवरून व्यक्ति व स्थलांचें दिग्दर्शन झाल्यानें, कोणताहि ऐतिहासिक प्रसंग अभ्यासकांना हस्तगत होण्यास हें साधन योग्य झालें आहे असेंच सर्वांचें मत होईल अशी आशा आहे.

६. एवढ्या अवाढव्य आणि त्वरेनें संपवाव्या लागलेल्या प्रयत्नामध्यें कांहीं कालविपर्यास, अनुक्ति, पुनरुक्ति, सारांश-विच्छेद किंवा अन्य कांहीं दोष झाले असण्याचा संभव आहे. भूल करणाऱ्या प्रसंगांचा निर्देश शक्य तोंपर्यंत शुद्धिपत्रांत केलाच आहे. इतर चुका कोणाच्या नजरेस आल्यास त्या त्यांनीं कृपा करून कळवाव्या.

७ ग्रंथाचे देणगीदार व आगाऊ ग्राहक यांचीं नांवें ग्रंथामध्यें छापलीं आहेत तीं त्यांचें जाहीर रीतीनें आभार-प्रदर्शन करण्याकरितांच आहेत. पण त्या बरोबरच या ग्रंथाला पूर्वसाहाय्य प्रत्यक्ष ग्राहकांकडून किती कमी झालें आहे ह्याचीहि कल्पना अशा उपकर्त्यांच्या अल्पसंख्येवरून दिसून येईल. अशा परिस्थितींत रायगड-स्मारक मंडळाच्या सभासदांनीं ह्या शिवचरित्र-कार्याकरितां

प्रस्तावना

अडीच हजारांची देणगी मंजूर केली नसती तर छपाईपर्यंतच्या कामाची आंखणी व उभारणी करणेंच अशक्य झालें असतें. पूर्वतयारी झाल्यावरहि छापणें व प्रकाशन ह्या गोष्टीदेखील पुष्कळ खर्चाच्याच आहेत. त्यांपैकीं प्रस्तुत ग्रंथाच्या प्रथम खंडाला बरीच मोठी देणगी देऊन इंदूरच्या **'महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक मंडळानें'** कांहीं भार हलका केला त्याबद्दल त्यांचे जाहीर आभार मानले पाहिजेत. त्यांच्या मदतीचें निदर्शक म्हणूनच हें पुस्तक **'होळकर सरकार पुस्तक माले'** मध्यें समाविष्ट केलें आहे.

८. ह्याशिवाय डॉ. **सुरेंद्रनाथ सेन** (कलकत्ता), श्री. स. म. **दिवेकर** (कल्याण), श्री. स. **तात्यासाहेब मेहेंदळे**, प्रो. **द. वा. पोतदार**, श्री. **कृ. वि. आठल्ये** (शिपोशी) व **फादर हेरास** (सेंट् झेविअर कॉलेज) ह्यांनीं आपल्या खासगी संग्रहांचा ह्या ग्रंथाचे कामीं निस्वार्थ बुद्धीनें उपयोग करूं दिला ही त्यांची मदत केवळ अमूल्य आहे. इंग्लंडमधून इंग्रजी व हॉलंडमधून डच साधनें मिळविण्याच्या कामीं बॅ. **ब. ग. परांजपे** ह्यांनीं आपलेपणानें केलेले परिश्रम अत्यंत उपकारक झाले आहेत. आर्यसंस्कृति-मुद्रणालयाचे विद्वान् चालक डॉ. **वा. गो. परांजपे** आणि त्यांचे सुबुद्ध खिळारी यांच्या उत्साहानें व आस्थेमुळें ह्या ग्रंथाच्या मुद्रणाचें काम इतकें निर्दोष झालें म्हणून आम्हांला त्याकरितां फारशी जिकीर करावी लागली नाहीं हें सांगणें अवश्य आहे. अशा तऱ्हेनें नानाविध प्रकारांनीं, आपआपल्या परी, प्रत्येकानें ह्या राष्ट्रीय ग्रंथप्रकाशनाला उत्तम साहाय्य दिल्याबद्दल ह्या सर्वांचे आम्ही अत्यंत आभारी आहों. ह्याशिवायहि कित्येकांचा हातभार कित्येक महत्त्वाचे गोष्टींमध्यें ह्या कामीं लागला आहे. परंतु ह्या ग्रंथाची निर्दोष-पूर्ती हेंच त्यांचें समाधान असल्यामुळें लौकिक दृष्ट्या त्यांचे आभार मानणें आम्हांला व त्यांनाहि प्रशस्त वाटत नाहीं.

९. हें पुस्तक व त्रिशत सांवत्सरिक शिवस्मारक ग्रंथावलींतील इतर पुस्तकें यांची योजना करून ती पार पाडणें व एकंदरींत श्री शिवचरित्रकार्यालयाच्या नानाविध कार्यांचा व्याप संभाळणें या कामीं नवीन श्री समर्थ विद्यालयाचे श्री. **दिनकर विनायक काळे** व भा. इ. सं. मंडळांतील श्री. **शंकर नारायण जोशी** (वाईकर) यांचें अत्यंत साहाय्य झालें हें आभारपूर्वक नमूद केलें पाहिजे. या दोन सहकाऱ्यांची जोड दिल्याबद्दल वरील उभय संस्थांचें शिवचरित्र-कार्यालय अत्यंत आभारी आहे.

पुणें
शिवाजी-जयन्ती १८५१

नरसिंह चिंतामण केळकर
दत्तात्रय विष्णु आपटे

शिव-कालीन-पत्र-सार-संग्रहांत
उपयोगांत आणिलेल्या संक्षेपांचा खुलासा

१ एकूण ७१८ पृष्ठांमध्यें, या संग्रहांत सत्याहत्तर पुस्तकांचा म्हणजे १८३ खंडांचा (सुमारें पस्तीस हजार पृष्ठें) उपयोग करून २३४० लेखांक सारांशरूपानें दिले आहेत. कित्येक लेखांकांत दुबार संदर्भ दर्शविला आहे. एकदोन लेख नजरचुकीनें दुबार छापले गेले आहेत. मिळून सुमारें २५०० उतारे यांत आले आहेत. इतका मजकूर थोडक्यांत आणतांना व त्याबद्दल संदर्भ दर्शवितांना अर्थातच अनेक संक्षेपांचा उपयोग करावा लागला. हे सर्व संक्षेप शिवकालाचा किंवा मराठी इतिहासाचा अभ्यास करणाऱ्यांना म्हणजे यांत उल्लेखिलेल्या पुस्तकांशीं व त्यांतील मजकुरांशीं परिचित असलेल्यांना सहज समजण्यासारखे आहेत. यांतील कित्येक तर कोणालाहि अनायासानेंच उलगडतील इतके साधे आहेत. तथापि ते एकत्र करतांना सर्वांना मान्य होण्यासारखा विवेक करण्याची अशक्यता लक्षांत घेऊन येथें ते सर्वच छापण्याचें ठरविलें आहे.

२ विशेष अडचण संदर्भसरणींतील ग्रंथनामांची भासावयाची. त्यांचीहि त्रोटक यादी दिली आहे.

३ संदर्भ सरणीची सामान्य योजना सहज लक्षांत येण्यासारखी आहे. लेखांकाच्या उजव्या बाजूला शक, मिती व सन, तारीख यांचा निर्देश ठरवितां आला तितका संपूर्ण दिला असून डाव्या बाजूला मूळ ग्रंथांतील संदर्भ दिला आहे. त्यांपैकीं वरच्या ओळींत बहुधा स्थल म्हणजे ग्रंथनाम, लेखांक किंवा पृष्ठांक, व दुसऱ्या ओळींत मुळांत असलेला मितिनिर्देश (ज्याच्यावरून उजवीकडील मिती किंवा तारीख काढिली तो) दिला आहे. मूळ मितिनिर्देश शकांत किंवा इसवी सनांतच असल्यास तेथें तो संपूर्ण देऊन द्विरुक्ति करण्याऐवजीं तेथें केवळ श. व इ. लिहूनच काम भागविलें आहे. मध्यभागीं लेखांकाचे खालीं कांहीं वर्णन देण्याचा प्रयत्न केला आहे.

४ मितींचें गणित अर्थात् 'खरे जंत्री' वरून केलें आहे. डच व पोर्तु० कागदांत इ. स. ची न्यू स्टाईल वापरलेली असते. तेथें मूळ तारखेंत दहा दिवस वजा करून चालू (ओल्ड स्टाईल) तारीख मांडली आहे हें उघड दिसून येईल.

५ ह्या संग्रहांत केवळ उपलब्ध साधनांतील पत्रांचा व उल्लेखांचा समावेश करण्याचेंच ध्येय पुढें ठेविल्यामुळें त्यांतील प्रत्येक उल्लेखाबद्दल विचिकित्सा करून संपादनाचें महत्त्वाचें काम करण्यास सवड झालेली नाहीं. आज आधार म्हणून मानलीं जाणारीं सर्वच साधनें यांत घेतलीं आहेत. कित्येक तर अन्यांच्या माहितगारीवरूनच घेतलीं आहेत. सर यदुनाथ सरकार यांनीं मूळ फारशीवरून इंग्रजींत भाषांतरें केलीं आहेत किंवा श्री. रियासतकार सरदेसाई यांनीं आपल्या रियासतींत रॉ. ए. सोसायटींतील फारशी हस्तलिखितांचीं भाषांतरें दिलीं आहेत; तीं या लेखकांच्या पुस्तकांतून उद्धृत करून घेतलीं आहेत. तात्पर्य, अभ्यासकाला सर्वच पत्रें एकत्र उपलब्ध व्हावीत असा प्रयत्न करून त्याच्यावर कोणताहि विशिष्ट मताचा भार घालण्याची इच्छा

धरलेली नाहीं. या साधनांची छाननी करण्याचें काम झालें पाहिजे यांत शंका नाहीं. परंतु अशा तऱ्हेचें संकलन त्याचे आधीं झालें पाहिजे होतें तें येथें केलें आहे.

१. ग्रंथनामेतर संक्षेपांची स्पष्टता

अ. = अदिलशहा; अधिक महिना.
अखं. ल. = अखंडित लक्ष्मी अलंकृत.
अजर. = अज रस्तखाना म्ह. कचेरींतून
अधिका. = अधिकारी
अष्टाधि. = अष्टाधिकारी
अक्टो. = अक्टोबर
आश्वी. = आश्वीन
आषा. = आषाढ
इ. = इत्यादि; इसवीसन
इा = इस्तकबिल (पासून)
ई. इं. कं. = ईस्ट इंडिया कंपनी
ओ. स्टा. = ओल्ड स्टाईल
क., का = कसबे; कर्यात
कॅ. = कॅप्टन
का. = कार्तीक
कार., कारकू. = कारकून
खा = खान; खास
खुा, खुर्द. = खुर्दखत
खं. = खंड
ग., गव्ह. = गव्हर्नर
मा. = मार्गशीर्ष
गु. भ. प. = गुरुभक्तिपरायण
गो. = गोसावी
गोवळ. = गोवळकोंडें
घ. = माघ
चिट. = चिटणीस
चिर. = चिरंजीव
चै. = चैत्र
चौ. = चौकोनी
चौगु. = चौगुले
छ = चंद्र; (मुसलमानी तारीख)
ज. = जनरल
जखर. = जमादिलाखर
जवल. = जमादिलावल
जहा. = जहागिरदार
जाने. = जानेवारी
जु. = जुलूस
ज्ये. = ज्येष्ठ
ड. = डबीर
डिसें. = डिसेंबर
ता; ता. = तपे; तर्फ; तागायत; तालीक (नकल) ताहा (-कडे)
तागा. = तागायत
ती. स्व. = तीर्थस्वरूप
दा = दस्तखत; दसखत
दि. दिा = दिवाण; दिमत
दे॥ = देखील
दे॥क = देशलेखक
दे॥ख; देश; देमु. = देशमूख
दे॥री = देशाधिकारी
दे. कु.; दे॥र्णी = देशकुलकर्णी
देपा; दे॥डे = देशपांडे
धर्माधि. = धर्माधिकारी
न., ना. = नकल; नजीक; नख्त; नाक, नाईक
नि॥ = निसबत
नोव्हें., नोवें. = नोवेंबर
न्यू. = न्यू स्टाईल
पा. पर. = परगणे; परवानगी; पाटील; पांठबिले; पातशाही
परो. = परोपकार मूर्ति

पॅ. = पॅगोडा (होन; ५ गिल्डर्स)
पाऊ. = पाऊलोक (पायदळ)
पौ. = पौष
पृ. = पृष्ठ
पे. = पेशवे
पैा = पैवस्ती (पोंचल्याची तारीख)
पोर्तु. = पोर्तुगीज
प्रो = प्रगणे; प्रांत; प्रमाणें
प्रति.; प्रतिप.; प्रतिपच्चंद्र० = 'प्रतिपच्चंद्रलेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता। शाहसूनोः शिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते' शिवाजी राजे यांची मुद्रा
प्रेसि. = प्रेसिडेन्ट
फ. = फसली सन
फा. = फाल्गून महिना
फार; फा. = फारसी
फेब्रु. = फेब्रुवारी
बा = बदल; बेशमी (नांवाचा); बरहुकूम (हुकमाप्रमाणें)
बाखुा = बरहुकूम खुर्दखत
बजा = बजानीब (प्रति, कडे)
बाद. = बादशहा
बिा = बितपशील (तपशिलाप्रमाणें)
बुा = बुद्रुक (जुनें)
बो = बेश्म (नांवानें)
भाद्र. = भाद्रपद
भाषां. = भाषांतर
भ्र. = भ्रतार
म. म. = ममलकत मदारि
म. श. म. = मलिक शर्क मलिक अंबर
म; माा = मलिक, (१४५९?)
म. = मराठी; महाराज
मज. माा; माार = मजकूर
म. ह. = मशहुरल हजरती
मज्मू. = मज्मूदार, मुजुमूदार
मति = 'श्री शिव नरपति हर्षनिधान सामराज मतिमत्प्रधान' (शिवाजीराजांच्या पेशव्यांची मुद्रा.)
मर्या = मर्यादेयं विराजते
मह. = महजर
महा. = महाजन
मार्ग. = मार्गशीर्ष
मि. = मिस्तर
मिा = मिनहू
मु. = मुद्रा
मुा = मुकाम; मुद्दत (पुराणा, जुना)
मुता = मुतालीक
मोक. = मोकदम
मोका. = मोकासेदार
मोर्त. = मोर्तब (पत्राच्या शेवटीं समाप्तीच्या खुणेची मुद्रा)
मोहर = मोहरम
मौा = मौजे
यो = येकूण
राा = रवाना
रखर = रबिलाखर
रम, रमजा = रमजान
रवल = रबिलावल
रा. राा = राजश्री; राहणार
रु. = रुस्तुमजमा
रुा = रुके, रुपयें
रेसि. = रेसिडेंट
लिा = लिहिले
ले. = लेखांक

व. वा = वद्य पक्ष
वा. = वाटोळा
वि. विजा. = विजापूर
वि. काय. = विठल कायदेऊ
वे., वेद. = वेदमूर्ति
वै. वैशा. = वैशाख
श. = शके
शि. = शिक्का
शिला. = शिलालेख
शिव. = 'शिव नरपती हर्षनिधान । महादेव मतिमत्प्रधान' (शिवाजीराजांच्या पेशव्यांची मुद्रा)
शु. शुा = शुद्ध
श्राव, श्रा. = श्रावण
श्रीशिव = 'श्रीशिव चरणी तत्पर त्र्यंबक-सुत मोरेश्वर.' मोरो त्रिमल पिंगळे यांची मुद्रा.
श्वी. = आश्वीन
षा. = आषाढ
सा. सर. = सरकार
स. नो. = सरनोबत
स. सब. = सर सबनिवीस
सप्टें. = सप्टेंबर
सरदे. = सरदेसाई
सो = साहेब
साम; सामरा. = 'श्रीशिवनरपती हर्षनिदान सामराज मतिमत्प्रधान'
साल गुा = साल गुदस्ता
सी. = सीमा (पत्राच्या अखेरीस समाप्ती-दर्शक असलेली मुद्रा.)
सु. = सुहूर
सु. प्रे. = सुरत प्रेसिडेंट
सुर. = सुरनीस
सो = सेकीन (राहणार)
सेटि. = सेटिये
सुा = सुद्धां
सं. = संमत
ह. = हजार
हवा. = हवालदार
हि. = हिजरी सन
हुा = हुजती
हुदे. = हुदेदार
हुमा. = हुमायून(दयाळू)
हे. = हेन्द्री
हे. के. = हेन्द्री केन्द्री.

२. ग्रंथ-संदर्भ-संक्षेप

श्री. वि. वि.—श्री सांप्रदायिक विविध विषय, (श. १८३९), सत्कार्योत्तेजक सभा धुळें.

श्री. सं.—श्री संप्रदायाचीं कागदपत्रें, (श. १८३७) स. सभा, धुळें.

* अब. हमीद—अबदुल हमीदचा पादशाहनामा, हा व इतर कांहीं ग्रंथांचे संदर्भ

* साधनग्रंथेतर अशा ग्रंथांवरून घेतलेले संदर्भ.

सर यदुनाथ सरकार ह्यांच्या ग्रंथांवरून मांडले असून अशा ठिकाणीं सर सरकार यांच्या इंग्रजी पुस्तकाचा जोड आधार दिला आहे.

आठल्ये सं.---श्री. कृ. वि. आठल्ये, बी. ए. (शिपोशी) ह्या व्यासंगी गृहस्थाचा खासगी संग्रह.

* आदब. औ.--आदब-इ-अलमगिरी, औरंगजेबाचीं पत्रें (अब. हमीद पहा.)

§ ऑर्म---*Orme Mss*, Historical fragments चा कर्ता रॉबर्ट ऑर्म यानें अनेक ठिकाणचे उतारे संग्रहित केले ते इंडिया ऑफिसमध्यें ठेविले आहेत. त्यानें नकलून घेतलेल्या कित्येक कागदांच्या अस्सल प्रती आज उपलब्ध नसल्यामुळें ह्या संग्रहाचें महत्व विशेष आहे.

इ. ऐ.---**इतिहास आणि ऐतिहासिक**, मासिक पुस्तक, स. स. धुळें, अथवा **शि. घ., खंड २१.**

इ. डॉ.---*History of India as told by its Own historians*, by Elliot and Dawson, Trubner & Co, London.

इ. वृ.—भारत इ. सं. मंडळांचीं **इतिवृत्तें**, पुढील आंकडा इतिवृत्ताच्या शकाचा आहे.

इ. सं.---**इतिहास संग्रह**, मासिक, संपादक रा. ब. पारसनीस.

जु. गोष्टी—इ. सं. मधील **जुन्या गोष्टी** हें प्रकरण.

इंडियन अँटिकेरी---*Indian Antiquary*, a journal of Oriental Research, London.

इं. फॅ.—English Factories in India, by Sir William Foster. Vols. 1-13.

एपि. इंडोमॉस्लेमिका – Epigraphia Indomoslemica (1907-08).

एपि. कर्ना. – Epigraphia Karnatika, part X(1905), edited by Mr. Rice.

§ओ. कॉ.-*Original Correspondence*, letters received from India. ई. इं. कंपनी व हिंदुस्तानांतील वखारी यांमधील पत्रव्यवहार.

§ओरि. रिस.–Orientalische Reise-beschreibung, व्हॉल्कार्ड इव्हर्सेन यानें प्रत्यक्ष पाहून लिहिलेली सुरतेच्या लुटीची हकीकत या ग्रंथांत आहे.

का. प्र. इ. साधनें – **कायस्थप्रभूंच्या इतिहासाचीं साधनें.**

कोर्ट मिनिटस् – A calendar of the Court Minutes etc. of the East India Company, 1668-70 ; by E. B. Sains-

§ अशा खुणा केलेले हस्तलिखितांचे संग्रह लंडन येथील इंडिया ऑफिसमधील व हेग येथील असून, भा. इ. सं. मंडळ, पुणें या संस्थेनें पुष्कळ खर्च करून त्यांतील शिवचरित्रोपयोगी भागाच्या टाइपरिटन् किंवा हस्तलिखित नकला आणविल्या आहेत.

bury, with Intro. and notes by Sir W. Foster, C. I. E., Clarendon Press, 1929.

कों. इ. सा.—**कोंकणच्या इतिहासाचीं साधनें**, श्री. वा. अ. बांबर्डेकर यांनीं 'आद्यगौड ब्राह्मण' त्रैमासिकांत प्रसिद्ध केलेलें प्रकरण.

खं.—**मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें**, श्री. वि. का. राजवाडे, खंड ८, १५, १६, १७, १८, २० व २१.

गो. इ. सा.—**गोमांतकाच्या इतिहासाचीं साधनें**, इ. सं. मासिकांत श्री. गोवे प्रांतीय सरज्योतिषी यांनीं प्रसिद्ध केलेलें प्रकरण (श. १८३५–३६.)

चिट.—**चिटणीस घराण्याची संक्षिप्त माहिती व सनदा पत्रें** (इ. १९१५) श्री. बालकृष्ण सखाराम कुळकर्णी.

§ डच रेकर्डस—*Dutch Records*, Letters from the East Series.

डॅन—*The Portuguese in India by Danverse* (London 1884) Vol. II.

† डाग रजिस्टर—बटेव्हियाच्या डच अधिकाऱ्यांनीं पूर्वेकडील कारभाराची रोजनिशी वजा ठेविलेली नोंद, (इ. १६३६–१६८१) डचमधून जरुरीपुरतें भाषांतर करवून घेतलें आहे.

डायरी—*Fort St. George Diary.*

§ डेलन—'*A Voyage to the East Indies*' by Mr. M. D. Dellon.

जर्नल बॉम्बे. रॉ. ए. सो.—Journal of the Bombay Branch of the Royal Asiatic Society (1917).

त्रै., त्रै. व.—भा. इ. सं. मंडळाचें **त्रैमासिक**, पुढील अंक वर्षाचा आहे.

दि.—**दिवेकर संग्रह**, श्री. स. म. दिवेकर ह्यांनीं संकलित केलेला इंग्रजी पत्रव्यवहार.

नागरी प्रचारिणी—**नागरी प्रचारिणी** सभेचें त्रैमासिक.

§ निकोलस—*Voyages de Nicolas de Graaf aux Indes Orientales.*

§ प. रे. ऑ. मॅन्यु. सी. ओ.—Pnblic Records Office Mss. C. O.

† पिसुर्लेकर—प्रो. पिसुर्लेकर (गोवा) ह्यांचा संग्रह, अप्रसिद्ध पोर्तु. कागद.

† पिसुर्ले. शिवा.—प्रो. पिसुर्लेकर ह्यांचें '**शिवाजी**' हें पोर्तुगीज पुस्तक.

पेट्रो डी. व्हे. प्र. वृ.—**पेट्रो डीला व्हेल** ह्या इटालिअन गृहस्थाचें प्रवासवृत्त (इ. १६२४.)

प्रभात, दिल्ली प०—**प्रभात** मासिकांत छापलेला 'दिल्लीपतीशीं झालेला शिवाजी महाराजांचा पत्रव्यवहार.' यांमध्यें छापतांना झालेला मितीचा घोटाळा मंडळाच्या संग्रहांतील अस्सल फर्मानांच्या नकलांवरून शुद्ध केला आहे.

† इंग्रजीशिवाय अन्य पर-भाषेंतून थेट मूळावरून भाषांतर करून घेतलेले उतारे.

† फरा. सलातीन—फरामीन उस सलातीन = सुलतानांचीं फर्मानें (इ. १९२६), बशीरउद्दीन अहमद देहलवी, दिल्ली. यांत सुमारें २०० अस्सल फर्मानें व कांहींचीं छाया-चित्रें आहेत.

§ फॅ. रे.—Factory Records, ई. इं. कंपनीच्या वखारींचें कारभार विषयक दप्तर व पत्रव्यवहार. यांत सभांचे अहवाल ' कन्सल्टेशन ' म्हणून दिले आहेत. हीं फोर्टसेंट जॉर्ज, मच्छलीपट्टण, मुंबई, राजापूर, सुरत, आणि धरणगांव अशा स्थलवार गटांनीं उल्लेखिलीं आहेत. संकीर्ण म्हणूनहि यांचा एक गट आहे. ह्यांतील प्रकाशितांचा उल्लेख इं. फॅ. असा देऊन अप्रकाशितांनाच फॅ. रे. म्हणून दर्शविलें आहे.

फॉरेस्ट होम—Selectious from the Letters, Despatches and other State papers, preserved in the Bombay Secretariat, Home Series, Edited by G. W. Forrest (Bombay 1887).

§ फिंच. मॅन्यु.—Report on *Finch Mss.*

फ्रायर—A new account of East India and Persia by Dr. John Fryer ed. Sir Wm Crooke (Hak. Soc.).

बिजा. आर्कि.—Bijapur and its Architectural remains by Henry Cousens, (Bombay 1916). यातून कांहीं फर्मानें व थडग्यांवरील स्मारकलेख घेतले आहेत.

* ब्रि. म्यू. फार. हस्त.—British Musem, Persian Mss. (Modern Review).

भाटे सज्जनगड—सज्जनगड व समर्थ रामदास, श्री. गो. चि. भाटे (१९१८).

* भांडार. कॉमे. व्हॉ.—' Bhandarkar Commemoration Volume ' यांतील सर य० सरकारच्या लेखावरून जयसिंगाच्या पत्रांचें भाषांतर करून घेतलें आहे.

मठ. शिला.—मठगांवचा शिलालेख, (श. १८४७, मुंबई.) रा. सा. वा. अ. बांबर्डेकर.

§ मास्टर पेपर्स व डायरी—सुरतेच्या लुटीच्या वेळीं सुरतेचें रक्षण करणारा मास्टर याचे कागदपत्र.

* मॉ. रि.—*Modern Review* इंग्रजी मासिक; यांतील सर यदुनाथ सरकार यांचे लेखांवरून कांहीं फारसी पत्रांचीं भाषांतरें केलीं आहेत.

मो.—विजापूरच्या आदिलशाही घराण्याचा इतिहास—प्रो. बाळाजी प्रभाकर मोडक, कोल्हापूर.

रत्नाकर---**रत्नाकर मासिक पुणें**. (इ. १९२७).

राम.---**रामदास आणि रामदासी**, मासिक धुळें. अनुक्रमांक अंकांचा आहे.

रिया., म. रि.---'**मराठी रियासत**', श्री. गो. स. सरदेसाई रियासतकार. यामध्यें कांहीं पत्रें स्वतंत्रपणें प्रसिद्ध झालीं असून कांहीं मॉडर्न रिव्ह्यूवरून व लंडन रॉ. ए. सोसायटींतील फारसी संग्रहांतून त्यांनीं घेतलीं आहेत. तसा जोड-संदर्भ दिला आहे.

रु. ३ - **मराठी दप्तर-रुमाल ३** (इ. १९२८), श्री. लक्ष्मण विनायक भावे ठाणें

* लं. रॉ. ए. सो. फारसी—London Royal Asiatic Society, Persian Mss., रियासतकारांनीं दिलेलीं भाषांतरें.

§ लेटर बुक—*East India Company's Letter Books.*

व., वत. पत्रें---**वतनपत्रें** (इ. १९०९ पुणें), संपादक रा.ब.वाड व श्री.पारसनीस.

शि. घ.---**शिवकालीन घराणीं**. (इ. ऐ., खं. २१)

शि. प्र., प्रदीप---**शिवचरित्रप्रदीप** (श. १८४७ पुणें), संपादक श्री. द. वि. आपटे व श्री. स. म. दिवेकर.

स.---**सनदापत्रें**---(इ. १९१३), संपादक—श्री. पुरुषोत्तम विश्राम मावजी व रा. ब. द. ब. पारसनीस.

सर.—**सरदेसाई घराण्याचा इतिहास**, भा.२,श्री.गो.स.सरदेसाई, (कोल्हापूर.)

सर. औ.—'History of Aurangzeb' by Prof. Jadunath Sarkar.

सर. मंदीर—**सरस्वतीमंदिर**, मासिक.

सा.—**शिवचरित्रसाहित्य** खं. १ व २ (पुणें श. १८४८ व १८५१) भा. इ. सं. मंडळ, स्वीयमाला.

साधन चिकित्सा—ले. वासुदेव सिताराम बेंद्रे, (इ. १९२८) भा. इ. सं. मं. पुरस्कृत ग्रंथमाला, अनु. ७.

सां. इ. सा.—**सावंतवाडी संस्थानचा इतिहास**, (इ. १९११), श्री. वि. पु. पिंगूळकर, पुस्तकाचें परिशिष्ट.

सं.—भा. इ. सं. मंडळाचीं **संमेलनवृत्तें**, अंक वृत्तांच्या अनुक्रमाचा आहे.

से.—डॉ. सुरेन्द्रनाथसेन यांनीं विलायतेंतून स्वतः पाहून नकलून आणलेला संग्रह. त्याचें पुस्तक मंडळसंग्रहांत ठेविलें आहे.

* सेन-गोवा—A preliminary Report on the Historical Records at Goa, by Dr. S. N. Sen, (1925, Calcutta Uni. Press.)

से. रे. कॅट—Catalogue of the Secretariat Records, Bombay, 1630-1780 (Bby 1887).

* हाफ्त अंजुमान—जयसिंगाचीं पत्रें, सर यदु. सरकारांच्या लेखांवरून.

हि (हे) रास सं.—सेंट झेविअर कॉलेजचे विद्वान प्रोफेसर फादर हिरास यांच्या संग्रहांतील अप्रकाशित कागद.

हिस्टॉ-मिसेलनी—*Historical Miscellany*, (1928 Poona), B. I. S. Mandala Sweeya Mala No. 31.

हि. रे. क.—Indian Historical Records Commission, Proceedings of meetings. अनुक्रमांक अहवालाचा आहे.

§ हेग संग्रह—Archives of the East India (Dutch) Company, letters and papers received from India, year 1661 Colonial archive No. 1123). हेगहून आणविलेले मूळ डच उतारे.

शुद्धिपत्र

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
८	२	घोनस्केड	दरौज रुके ८
९	२१	हक मालोजी	हक मारहम मालोजी
२०	२१	सा. ले. १४	सा. ले. १३
२३	१२	तिचा	तिसा
२५	१८	सु.	हि.
४२	२३	फारशी शिलालेख	उल्लेख
५९	२	इं. फॅ. भा. २	इं. फॅ. भा. ३
,,	२०	वा।	वा
६२	१४	वि. पृ. १७५	विजा. आर्कि. पृ. १७५
६७	२०	९३	१३
७०	१६	ले.	पृ.
८४	८	येथें	थल
९०	१	१५५३	१५५८
९१	१	१५५२	१५५८
२०४	२२	पर.	मौजे

शुद्धिपत्र

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
१०६	११	श. १५६५	श. १५४६
,,	१२	इ. स. १६४३	इ. १६२४
११०	२१	सा. ले. २३९	सा. ले. २३९ पृ. २४०
१२३	२५	सुपे खुष	सुपे खुर्द
१२४	४	मान	समान
,,	१३	मार्गशीर्ष	कार्तीक
,,	१४	नावेंबर ३०	आक्टोबर ३१
१३२	१९	(६१६)	(६१६=४८५ अ)
१३४	५	पदाजी	दादाजी
१५९	३	एप्रील ३	एप्रील २३
,,	३	फेब्रु. १४	फेब्रु. २४
१६३	२५	मार्च २७	फेब्र. २७
१७२	७	ले.	ले. ७
,,	१९	इं. फॅ. १२	इं. फॅ. १०
१७४	१२	कार्तीक शु. ४	कार्तीक व. १२
,,	१३	आक्टो. ९	नोबेंबर १
१७६	३३	पुष्कळ	कांहीं
१७९	९	येथें आल्यावर	गलबतें येथें आल्यावर
,,	१३	राजापुराहून पन्हाळयाकडे	पन्हाळयाकडे
१८७	५	१५	१२
१८८	२८	खा(शा)मीर	शहामीर
१९४	१५	थोड्याच दिवसांत	थोड्याच वेळांत.
२२७	९	वी ओळ अशी वाचणें—	आटायडे नांवाचा पोर्तु० च्या अधिकारी उत्तरेकडे नेमला गेला तेव्हां त्याच्या हातीं दिलेल्या हुकूम—
२३४	११	जुलै	जून
२५७	२	त्यानें	त्यानें उध्वस्त
२६७	१५	जकाती अशाबद्दल	ह्या दोन शब्दांमध्यें १६ व्या ओळींतील इंग्रजी मज. घेणें.
,,	१६	coauting	counting
२७८	३०	भा.	भा. ३ अं. २

३१८	९	इं. फॅ. २२	इं. फॅ. १२
पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
३५२	९	सु. ११७०	सु. १०७०
३५९	३१	सा. १८	खं. १८
४५८	३०	१०-०२५	१०००
४६४	१५	मुंबई-सुरत	सुरत-मुंबई
५१२	९	सं. पृ.	सं. २ पृ.
,,	१०	स. सं.	श्री. सं.
५५३	११	१६७६	१६७४
५८१	२७	शिवाजीकडे	शिवाजीनें
६०७	७	श्री. वि.	वि. वि.
६८८	२२	भा. १८८	भा. १०८
७१३	१३	१६७६	१६७४

श्री

शिवकालीन-पत्र-सार-संग्रह

सा. ले. १७७ } (१) { श. १४८८ कार्तिक व. ११
सु. ९६७ रखर २५ } खुर्दखत फा. मु. व मज. { इ. १५६६ नोव्हें. १०

अजर. महाल हुजरती मिया स्याहा बुऱ्हानसाहेब बा। सनद मोकरम खास
ता। हुदेदारानी व मोकदमानी का। वोतूर सा। जुनर बिदानद
बा। **केशव चइतन महानभाव** यासि इनाम बा। रोखा बाबा बंदे बितेरीख २५ रबिलाखर बिनाम बिरसो पंडित व कृस्णाजी केशव चइतन मानभाव तुला येक चावर इनाम दिला. मठानजीक मसाहाती करून बाबा महसुलेसी दुबाला कीजे.

सा. ले. १७८ } (२) { श. १५०१ वैशाख वद्य ३
सु. ९८० रवल १६ } खुर्दखत फा. मु. व मज. { इ. १५७९ मे १३

अज महाल खर्च खासा हुजरती दिवाण आला
ता। महमद मियाजी ठाणदार व हुदेदारानि व मोकदमानि को वोतूर सा। जुनर
मालुम दानद नरसिहभट बिन विस्वनाथभट व केशवभट बिन नरसिहभट विद्यार्थी केशव चैतन्य मानभाव यास ता। सन सबा (श. १४९८) चालिले आहे तैसे एक चावर जमीन इनाम चालविणे.

कों. इ. सा. ले. ८० } (३) { श. १५०४
सु. ९८३ } यादी { इ. १५८२

तेरीज वोंबल (?) तैनाती (प्रा। कुडाळचे देसाई, मतकरी इ. च्या नेमणुकाविषयीं.

कों. इ. सा. } (४) { श. १५०६
ले. ८१ } यादी { इ. १५८४ (?)

तपे पेडणे महाल गांव असामी ३० व त्या गांवांतील लोक आणि देव यांची यादी.

सा. ले. १७९ } (५) { श. १५११ मार्ग. शु. १५
सु. ९९० सफर १२ } खुर्दखत फा. मु. व मज. { इ. १५८९ डिसें. ११

अजर. जमालखान

बजानेबू हुदेदारानी व मोकदमानी को उतोर सा जुन्नर

नरसिहभट बिन विश्वनाथभट आणि केशवभट बिन नरसिहभट विद्यार्थी केशव चैतन्य मानभाऊ यांची इनाम जमीन चावर १ ता सन तिसा (श. १५१०) यांकडे होती. **सन तिसामधें सेख फरीदखान रुस्तुमखानास मुकासा जाला होता. त्याची हुजती घेणें तव लष्कर गैबती नगरासी आलें तव त्याचा मुकासा बरतर्फ होऊन साहेबास मुकासा जाहाला** खुर्दखत होये. तरी त्यांची जमीन त्यांजकडे चालविणे. रुस्तुमखान याचे खुर्द खताचा उजूर न कीजे.

गो. इ. सा. ले. २५ } (६) { श. १५११ पौष व. २
सु. ९९० रवल १५ हि. ९९८ } फर्मान { इ. १५९० जाने. १२

फर्मान हुमा०

बजा० खान अजम बहादरखान नायब नौबत व कारकून मामले गोवा

नारायण जोसी यास सरजोईसीची मिरास ७५ होन, दरमहा २ होन मुशाहिरा, गावगन्नाच्या वसुलातून १२ होन व जकातीतून १०१ होन देण्याचा रिवाज आहे. तरी ते देत जावे. परवानगी दिलावरखान वजीर (फर्मानाचें भाषांतर)

खं. १५ ले. ३६६ } (७) { श. १५१४ मार्ग. शु. ९
सु. ९९३ रवल ७ } खुर्दखत फा. मु. व मज. { इ. १५९२ डिसें. २

अजर. फराहादखान— कारकुनानी व देशमुखानी प्रा पुणे

रामेस्वरभट बिन नारायणभट धर्माधिकरणी सो आरवी-मुद्गल यास दर मौजे वडगाऊ जमीन पोलीन रुके १२ दे़ा कुलबाब इनाम आहे. ता खा दस्तुरखा चालिले आहे **हली परगणे मजकूर साहेबास मुकासा अर्जानी जाला** खुर्दखत होये. तर रामेस्वरभट यास सदरहू इनाम तसरुफाती करुनू दुमाला कीजे.

नै. व. ७ पृ. ४९ } (८) { श. १५१४
सु. ९९३ } खुर्दखत फा. मु. व मज. { इ. १५९२

अज दिवाण

बजानेबु कारकुनान परगणे पुना व हुदेदारान व मौजे राजुरी परगणे मजकूर जमीन चावर २ देखील कडबा बा अमानत दर बाबत अंत जोसी बिन गोविंद

जोसी यांजपासी (हुजती) होती ते गुम जाली तरी जमीन चावर २ सन ता इहिदे तिसैन (श. १५१२) चालत असेली तेणेप्रमाणें चालविणें.

कौं. इ. सा. ८२ } फ. १००४ } (९) कौलनामा { श. १५१६ { इ. १५९५

मलिक अलीशान मलिकशरीफ उलूमुल्कगाझी तळकोंकण बाळंभट हरभट बिन लखंभट मौजे मारखोल पा। कुडाळ देसाई पा। मजकूर याचे अर्जाचा विचार करून कुलकर्णगिरीची मिरास त्याला

दिली आहे.

ष. सं. पृ. ८८ } सु. ९९७ } (१०) खुर्दखत प्रारंभीं २ फा. मु. व सीमा { श. १५१८ { इ. १५९६

अजर. राजेश्री **मालोजी राजे**

हुदेदारानी व मोकदमानी कसबे पेडीगाऊ

आकोबा गोसावी बिन गोदोबा गोसावी बडवे पुजारी श्रीविठलदेऊ का। मा। मालूम केले जे 'आपणांस हक इनाम बदल सदकोबाची जमीन चावर १० प्रज बाबाजी चिखलठाणा नामाजी चिखलठाणा दो। हक ता। सन सीत चालिले आहे. **सन सीतामधें चणगोजी** (निंबाळकर) याचा पुंडावामधे आपल्या कदीम हुजती गेले आहेती साहेबी इनाम चालवावेया खुर्दखत होये.' चालिले असेली प्रमाणें चालवीजे.

खं. १५ ले. ३६७ } सु. ९९८ जवल २५ } (११) खुर्दखत फा. वा. सीमा { श. १५१९ मार्ग. व. ११ { इ. १५९७ डिसें. २४

अज. रा. **बाबाजी भोसले**

कारकून व मोकदम कसबे पेडगौऊ पा। पाडेपडेगौऊ.

दरवज इनाम बदल धर्मादाऊ रामेस्त्ररभट बिन नारायणभट, चिंतामनीभट बिन बाळंभट सो। आरवी मुदगल......जमीन चावर १। देखील हक दिधले असे.

इ. वृ. ३४ पृ. ६ } सं. १६५६ } (१२) { श. १५२१ ज्येष्ठ शु. १३ { इ. १५९९ मे २७

श्रीमहावीखम वालेर (बुधावर) दुरंगबाजी अकलकुवा हा गाव इनाम दिला आहे.

ष. सं. पृ. ९० }
मु. १००० जवल २१ }

(१३)
खुर्दखत फा. मु.

{ श. १५२१ मार्ग. व. ७
{ इ. १५९९ नोवें. २९

अज. रा. परसोजी राजे—— हुदेदारानी कसबे पेडगौ

देवस्थाने विठोजी व नरसीह जे असतील तेथील दीपवाते व विठोजीचा भक्त अकोवा गोसावी त्याची अडसेरी चालवीजे व दीपवातीस तेल दरोज ८८४ (टाक) देत जाईजे.

त्रै. व. ५ पृ. २३ }
सु. १००० }

(१४)
शिलालेख

{ श. १५२१
{ इ. १५९९

दरजमाने हजरती बुन्हन निजमस्या वाट साळवड डावि व नाचणगाउ

सा. ले. ३४० }
सु. १००१ }

(१५)
निवाडपत्र व आज्ञापत्र मराठी मु.

{ श. १५२२
{ इ. १६००

कान्होजी राजे प्रभानवलीकर

रा. दामोदर, राघो व पनो पाध्ये गोलवलीकर को संगमेश्वर

तुम्ही आम्हापासी विदित केले, आपले वतन ज्योतीष व धर्माधिरण व देशोपाध्येपण अस्टाधिकार अज मौजे देवघर तपे तुजारपूर तहद मौजे देवघर मामले हमजाबाद व मौजे सिरबाव चालिले. यामध्ये का संगमेश्वर येथील ज्योतीष व ग्रामोपाध्येपण सरदेशमुखाचे घर खेरीजकरून जोशी का मजकूर यांचे चालत असे. वे. विस्वनाथभट व हरीभट व वासुदेवभट राजपुरोहीत यानी शृंगारपुरी व तर्फ संगमेश्वर येथें कारकून चाकरमाने यांचेथे आमचे उपाध्यायपणाचे मानाविसी जोरावारीनें कलह आरंभिला आहे.... अशास आपण राजे धर्मपरायेण असता वृत्तीलोप होतो हा धर्म नव्हे. (जमलेले भले, शिष्ट व खोत मंडळींचीं नांवें) यांपासी हकीकत मनास आणतां व तुम्हाजवळील सत्येस्वर, विद्यानगरचे रामराजे याचे ताम्रपटें, कागदपत्र, विजापुरचें फर्मान व आमचे वडील याचीं खुर्दखतें पाहतां वतन तुमचे चालत आलें आहे. देवरुखे बोलिले जे आमच्या घरीं आनुष्ठान करून अन्यत्र भोजनास जातात; घरीं स्वयंपाक करून भोजन करीत नाहीत; याकरता आम्ही खेदी. परंतु ते प्रमाण नाहीं. वतन गोलवलकर उपाध्ये याचे खरे चालत आलें आहे. तरी वंशपरंपरा उपभोग करुन सुखे असिजे.

खं. २० ले. ६४ }
श. }

(१६)
मान्यता पत्र

{ श. १५२२ आषाढ शु॥ ९
{ इ. १६०१ जून २८

नरशिभट्टास (चिव्राव) नरा + + टी लेहून दिले की आमचा बाप एकनाथभटे तुमचा बाप रंगभट यास पसरणीच्या इनामपैकीं बिघे १५ दिल्हे आहे. ते आपणहि दिल्हे.

खं. १५ ले. ४३० } (१७) { श. १५२३ मार्ग. शु॥ १३
श. } महजर { इ. १६०१ नोवें. २७

मुद्गलभट पुंडे व समस्त ब्राह्मणी समापत्र केलें जे ब्रह्मीयाचे उत्पन इतके बहुताचे. याउपरी आम्ही ब्रह्मी म्हटिले हे सदरहू सकलहि आपले. याउपरी सभा केली. यांचया माथियावरी देवाचा पाला घालुनू घालू नये तैस्या आणा घालुनू पुसिलेया उपरी ते बोलिले जे सकल कर्म ब्रह्मीयाची.

खं. १८ ले. २ अ. } (१८) { श. १५२४ आषा. शु. ३
सु. १००३ मोहर २ } खुर्द खत { इ. १६०२ जून १२

अजर. हैबतखान — कारकुनानि पाा पुण्हे

बोा तानाजी राम देसकुलकर्णी पाा मार (यांस) जमीन एक चावर दरसवाद मौजे परवती दो हक दिल्हे आहे.

स. पृ. ९ ले. ४ } (१९) { श. १५२६ ज्येष्ठ शु. १०
सु. १००५ मोहर ८ } खुर्दखत { इ. १६०४ मे. २७

अजर. मलिकशर्क मलिक अंबर

कारकूनानि व मुतालिकानि मोकाशी व मोकदम को ओतूर प्रो पुणें

(ले. ५ प्रमाणें नरसिंहभट चैतन्य इ.) यांचा इनाम को मजकुरी चालिला आहे. हर्ली को मार साहेबास अर्जानी जाले. खुर्दखत होये. तरी चालवीजे.

सावं. पृ. ३४ } (२०) { श. १५२६ आषाढ शु. १०
श. } फा. मु. { इ. १६०४ जून २६

मलिक सरीफन मलिक गाजी

तारा देवीचे देउली बैसिलो श्रीमतु तथा ग्रामे मलिले ग्रामपुरुस बिा (ह्यापुढें नांवें २० असून त्याखालीं कानडी-मराठी सह्या आहेत).

खं. २० ले. २२५ } (२१) { श. १५२६ श्रावण व.५
सु. १००५ रवल १९ } खुर्दखत फा. ४ मु. व मज. { इ. १६०४ आगष्ट ५

अज दिवाण पाा पुणें—— मोकदम

मल्हारभट बिन कृष्णभट भगत मोरया मोकाम मोरेस्वर यांस मोरेस्वर येथें जमीन इनाम चावर नीम होती. हाली खुर्दखत घेवे तरी पुंडा करितां मागील भोगवटा गेले. तरी दुंबाला कीजे.

खं. २० ले. ६५ } (२२) { श. १५२६ श्रावणव १३
सु. १००५ रबिवल २७ } खुर्दखत फा. वा. { इ. १६०४ आगष्ट १३

अजर. हैबतखान — आतामलिक नैब गैदार व कारकू. पा वाई

नीम चावर जमीन दर सवाद मौजे मालगाऊ बदल इनाम बो अबदुल चस्म-कोर (यास) दिल्हे असे दुंबाला कीजे.

खं. २० ले. २२६ } (२३) { श. १५२६ श्रावण व. ३०
सु. १००५ रबल २९ } खुर्दखत फा मु. { इ. १६०४ आगष्ट २५

अजर हैबतखान—— कारकुन पा पुणें

इनाम जमीन चावर ·॥· मल्हारभट बिन कृष्णभट यांस पूर्वीपासून आहे ती चालविणें.

सा. ले. २८७ } (२४) { श. १५२७ श्रावण शु. १
सु. १००६ सफर २९ } खुर्दखत फा. ८ मु. व सी. { इ. १६०५ जुलै ७

अजर. मलिक शर्के मलिक अंबर

कारकून मामले गुलशनाबाद (नाशीक)

बालंभट बिन महादभट जोसी साकिन को नाशीक. आपणासी को मारीं तेल, सबजी, हरदाफे मीठ इनाम आहे. कागद गूम जाले. **हाली परगणे मजकूर साहेबासी अर्जानी जाले** खुर्दखत होय. दिल्हे असे.

स. पृ. १० ले. ५ } (२५) { श. १५२७ कार्तिक शु. १२
सु. १००६ जखर १० } खुर्दखत { इ. १६०५ आक्टो. १३

अजर. मलिक शर्के मलिक अंबर

कारकुन, देशख, हुद्देदार, मोकासी को पेडगाऊ पा पांडेपेडगाऊ.

अकोबा बिन गोदाबा गोसावी बडवे पुजारी श्रीविठ्ठल को मजकूर यास इनाम चावर १ का मारी वजिरानी चालविले आहे **हाली परगणे मार साहेबासी अर्जानी जाले**· खुर्दखत होये. चालवीजे

खं. १५ ले. ३६८ } (२६) { श. १५२८ श्रावण शु. ४
सु. १००७ रखर २ } खुर्दखत फा. मु. सी. व मज. { इ. १६०६ जुलै २८

(?)— कारकून मामले अहमदाबाद व बाजेमहाल संमत जाफराबाद

मालोजी व विठोजी सरगुन्हो यासी गुन्होथलयास मुकासा दिधले असे. थल बा॥ मजरे गौडगौ कसबे महमदापुरु.

खं. १५ ले. ३६९ } (२७) } श. १५२८ श्रावण शु. ४
सु. १००७ रखर २ } खुर्दखत फा. शि. मर्यादा } इ. १६०६ जुलै २८

(?)— कारकून दौलताबाद

मालोजी व विठोजी भोसले सरगुन्होयाती यास मौजे कोरले परगणे खांडाले मुकासा दिघले असे.

खं. १५ ले. ३७० } (२८) { श. १५२८ श्रावण शु. ४
सु. १००७ रखर २ } खुर्दखत फा. मु. सी. व मज { इ. १६०६ जुलै २८

(?)— कारकून समत दौलताबाद परगणे कनरड

मालोजी व विठोजी भोसले सरगुन्होयाती यास दरबज मुकासा परगणे कनरड दो किले व मुकासा नफती व जातगौ व वाकडी दिला असे.

खं. १५ ले. ३७१ } (२९) { श. १५२८ श्रावण वद्य ३
सु. १००७ रखर १५ } खुर्दखत शि. ८ कोनी { इ. १६०६ आगष्ट १०

मलिकशर्क मलिकअंबर

कारकून महालोमहालीचे

मालोजी व विठोजी भोसले यास एळूर, देऱ्हाडी, व कन्नरड हे तीन परगणे दो जातेगाव आणि लासूर आधारसूल, पोरले पिंपळवाडी, गोडगौ हीं गांवें बाबा महसुलेसी दुबाला कीजे

इ. ऐ. ले. ३६२ } (३०) { श. १५२८ भाद्र. शु. ५
सु. १००७ जवल ४ } खुर्दखत-फा. मुद्रा व सी. { इ. १६०६ आगष्ट २८

अजर. मलिकसर्क मलिकअंबर

कारकुनानी व देशमुखानी व हुदेदारानी व मोकाशाचे मुतालीक पा संगमनेर

शिवदासभट व कालेस्वरभट बिन कृस्णभट सो नेवासे मालुम केले 'आपणास जमीन दोन चावर इनाम आहे. बा हुा चांदबिबी व वजिरानी. मोगलाचे फितरतीमधे कागद गूम जाले. खुर्दखत होये.' चालवीजे.

खं. २० ले. २५४ } (३१) { श. १५२८ पौष व. १
सु. १००७ रम १५ } खुर्दखत फा. सी. { स. १६०७ जाने. ४

अजर. खास

हुदेदार व खोत व मोक० को पुणतांबे पा संगमनेर बावी

बो माणिक जोसी बिन रतन जोसी सा कसबे मार. मालुम केले जे 'आपणासी

कसबे मारचे जकातीपैकी घोनस्केड ६ इनाम बुऱ्हानस्या व वजीर व मुकासाई यांचे फर्मानाप्रमाणे ता सीत अलफ चालिले आहे. **ते (फर्माने) मोगलाचे फितवेयामध्ये गूम जाले.** त्यापैकी ममलकत मलिकअंबर भोगवटा आहे.' तरी पूर्वीप्रो इनाम चालवणें.

आठल्ये संग्रह २ सु. १००७ [२](?) रम २८	(३२) अस्पष्ट मुद्रा[१]	श. १५२८ पौष व. ३० इ. १६०७ जाने. १७

अज दिवाण ठाणे पा। आटपाडी — मोकदमानी मौजे पिंपरी खुद पा। मजकूर. मौजे मार वरी बाकी रु॥ ३० तीस ते पेसजी वराता दिल्हा होत्या त्यास ते मना करून हाली देसमूख देसपाडे यास देविले आहेती आदा करून पावलेंचे कबज घेणे (ते)णेप्रा मजरा आस जाणीजे रा छ २८ रमजान सदरहू **छेत्रपती रु॥ १५** व लिगापा ढोल्या १० व खड ना। ३ व हरी राम २ येकून तीस मना केले आस जाणा (अस्पष्ट सीमा)

त्रै. व. २ पृ. १३१ सु. १००७ सवाल १२	(३३) हुकूमनामा फा. मुद्रा ५ व मज.	श. १५२८ माघ शु. १४ इ. १६०७ जाने. ३१

अज दिवाण खास

कारकून व देसाई, अधिकारी मामले मूर्तजाबाद ऊर्फ चेऊल.

कोळी दादर व कोळी चुनालू यानी मालूम केले. 'आपणियासी वेठबेगारी माफ करुनू तीबदल कीरे सीरभारी मख्ता घेत असेती. आणि बेगारीचे तसबीस देताती. याकरितां जरीबा [खराब] जाला आहे. **यावरी फिरंगीयाची फितरती जाली.** येणेकरतां जरीबा मुसलम खराब जाले. कीरे सीरभारी दिधली न वचे. तरी आपणासी माफ करणे. वेठबेगार चालवीत जाऊ.' यावर हुकूम कीरे सीरभारीचा मक्ता घेत जाणे. 'रहीसाची वानगी आपणावरी नाहीं. रहीस तसबीस देऊन वानगी घेतो घेऊ नेदणे.' 'कोळी आपणामधे झगडा करितात. त्यासी ताजीलनाल माफ करणें.' 'निपुत्रिक व सीनलकी व वऱ्हाडटका व बोखाटका आपणासी माफ आहे.' यावर हुकूम पूर्वीप्रो चालवणे. 'अष्टागराचे कोळी खुटे दरियामध्ये दारे खात नसती सिरजोरी करून खाताती. आपणासी काही देत नाही आपली खुटे ताकीद करुनू दुमाला करणे. अगर दर खुटास लारी पाच देववणे.' तरी मागणीप्रमाणें देणें. 'चेउलीचे लोकास इतपटे पानी कौलू आहे. कीं, सी साला उगवणी करणें.' तरी कौलूप्रमाणें चालवणें.

---

१ यांत 'मालोजी' असें असल्याचें श्री. आठल्ये म्हणतात.

२ पत्राचें अक्षर शिवकालीन नसून पेशवेकालीन आहे असें वाटतें. सनाचा आंकडा चुकला असावा.

खं. २० ले. २५५ } (३४) { श. १५२८ फाल्गुन वा ८
सु. १००७ जिल्काद २२ } खुर्दखत मु. व मज. सी. { इ. १६०७ मार्च ११

अजर. खास

कारकू० हुद्देदार मोकदम वगैरे (ले. ३१ प्रों)

(ले. ३१ प्रमाणें) जे 'आपणियास इनाम जमीन बिघे १५ ता हजरती बुऱ्हान निजामस्याहा व वजीर चालत आहे. **यावरी मजकुरास मोगल आले ते वख्ती (कागद) गूम जाले.** नवीन फर्मान पाहिजे.' तरी पूर्वीप्रमाणें चालविणें.

स. पृ. १०९ } (३५) { श. १५२८ (?)
(?) } उल्लेख { इ. १६०६

शंकरभारती गोदड वास्तव्य शिंगणापूर याणी स्वामी (शाहूम.) सन्निध येऊन निवेदन केले जे '**पूर्वी रा. मालोजी राजे भोसले याणी शिंगणापुरीं तळें बांधिले ते समयी** तळ्याचे पाळीसमीप आपल्या वडिलास मठास जागा दिल्ही. आणि प्रतिदिवशी पाच अतीतांचा उलफा सालिना होन पा ५ मोईन करून दिली.'

खं. १५ ले. ३७२ } (३६) { श. १५२९ श्रावण शु. ८
सु. १००८ रखर ७ } खुर्दखत फा. मुद्रा व मर्यादा { इ. १६०७ जुलै २२

अज० मलिकाने मलिक अंबर मुखलिसान

कारकून पांडियापेडगाऊ व हुद्देदार (मोकाशाचे) व मोक. कसबे चांभारगोंदे पर० मज०

दामोरभट बिन नारायणभट (व) रामेस्वरभट बिन नारायणभट सो आरवी मुद्गल मालूम केले जे, 'आपणासी इनाम जमीन चावर १० दो हक **मालोजी व विठोजी भोसले** (यांचे हुजतीप्रमाणें) चालिले आहे. साहेबाचे खुर्दखत होये.' तरी पूर्वीप्रमाणें चालविणें.

ष. सं. पृ. ९५ } (३७) { श. १५२९ श्रावण शु. ८
सु. १००८ रखर ७ } खुर्दखत फा. मु. २ व मर्यादा { इ. १६०७ जुलै २२

मलिक सर्क मलिक अंबर

कारकून सं. जुन्नेर व मोकाशाचे हुद्देदार व मोक. मौजे आर्वी.

दामोदरभट फर्जंद नारायेणभट (व) गोविंदभट व अलंभट बिरादर, मालूम केले; 'आपणासी इनाम धर्मादाऊ जमीन चावर १ दर सवाद मौजे मार दो हक बरहुकम हुजती खास व वजिरानी व मोकासाई चालू आहे. साहेबाचे खुर्दखत होये.' तरी चालवीजे.

बै. व. २ पृ. १५६ } (३८) { श. १५२९
सु. १००८ } खुर्दखत फा. मु. व मज. { इ. १६०७

अजर. खास

कारकूनें व दोख जुन्नर हुदेदार, मोकाशाचे मुता. व मोक. को ओतुर.

कासीभट बिन केशवभट यानी मालूम केले, 'आपणासी जमीन चावर १ बाा हुजती बुऱ्हान निजामस्या व बहादुर निजामस्याहा ताा सन सबा अलफ चालिले आहे. हुजती मरहामत होये.' तरी त्याप्रमाणें चालविणे.

खं. १८ ले. ३ } (३९) { श. १५३० श्रावण शु. ३
सु. १००९ रखर १ } महजर { इ. १६०८ जुलै ५

अग्रवादी तान पाटील बिन अचल पाटील पश्चमवादी जाव पाा बिन बाद पाा वणपुरी प्राा पुर्णे. दिव्य करून निवाडा झाला.

खं. २० ले. ५१ } (४०) { श. १५३० आश्विन शु. ६
सु. १००९ रजब ५ } महजर { इ. १६०८ आक्टोबर ५

मोकदमी सावळगांवची कोंडजी कमाजीनें साऊजी अटोले यांस खुषखरेदी दिली.

स. पृ. ११ ले. ६ } (४१) { श. १५३० कार्तिक व. ११
सु. १००९ } निवाडपत्र–महजर { इ. १६०८ नोवें. २३

मौजे घाटण तपे करकंब व मौजे भोसर तपे उंबरगाव या गांवांतील सिवेचा तंटा. ऐरणदिव्य झालें आहे.

खं १५ ले. २७३ } (४२) { श. १५३० पौष शु. ७
सु. १००९ सवाल ५ } इनामपत्र मुद्रा व सीमा { इ. १६०९ जाने. २

लखमोजी राजे सो

हुदे० व मोक० मौ बार्डेगौ. पाा पांडियापेडगौ.

दामोदरभट व रामेस्त्ररभट सेाा आर्वी यास बदल धर्मदाऊ चावर १ इनाम दिधला असे.

स. पृ. १३ ले. ७ } (४३) { श. १५३०
सु. १००९ } खुर्दखत { इ. १६०८

अजर० मलिकसर्क मलिक अंबर —— कारकून सर. जुन्नर

मंगो नरसिंह, चिटणीस सर. मार, मालूम केले 'आपली चिटणविसी मिरासी आहे. मोगलाईचे फिरतीकरतां परागंदा जालो. सर. मारचे ठाणे साहेबाकडे आले तेपासून चाकरी करीत असो. तैनात आदा होत नाहीं. तरी आदा करणें.' करीत जाणें.

इ. वृ. १८३५ } (४४) { श. १५३०
पृ. २७१ } शिलालेख { इ. १६०८

लवथलेश्वर देवालय बांधणीचा उल्लेख-जेजुरी

खं. १५ ले. ४३१ } (४५) { श. १५३१ आषाढ शु. ६
सु. १०१० रबर ४ } खुर्दखत फा. मु. २ व मर्यादा { इ. १६०९ जून २७

अजर. मलिक सर्के मलिक अंबर

कारकून व हुदे. मोकाशाचे व मोक. का चाकण व कडूस

मुरारीभट बिन गंगाधरभट ब्रह्मे मालूम केले 'आपणास इनाम कसबे चाकण व कडूस येथील जमीन, जकात, पेंडी बा हुजती वजीर व खान दिलावरखान चालत आहे.' त्याप्रमाणें चालवणें.

सा. ले. ९ } (४६) { श. १५३२ श्रावण व. १३
सु. १०११ जवल २६ } महजर { इ. १६१० आगष्ट ६

अग्रवादी-विसाजी बिन नारोबा मसवडा (जोशी) भोगवली

पश्चिमवादी-नागोजी बिन कोंडभट पटवर्धन भोगवली.

कुलकर्णपणाबदल तंटा- अग्रवादीची तकरीर अर्शी- आपलिया वडिलाची मिरासी (कुलकर्ण) आपण खात होतो. **वणगोजी निंबालकर पुंड परगणे मजकूर मोकासा खात होते. त्यावरी नामजादी जालिया ते फितरतीमधे दोख** मोकाशी गाव सोडून गेले. आपण गेलो. मागे पटवर्धन कुलकर्ण चालवूं लागला. तरी मौ मारचे कुलकर्ण आपले मिरासी. पश्चमवादीची तकरीर कीं, कुलकर्ण मिरासी आपली, मसवडा आपलिया वडिलाचा ठेवणाईत. पुढें दिव्य होऊन अग्रवादी खरा निवाला.

सा. ले. ६ } (४७) { श. १५३२ भाद्रपद व. २
सु. १०११ जखर १५ } कौलनामा { इ. १६१० आगष्ट २५

आपाजी मल्हारजी दोख व तुकाईजी दोर्खाण व मोक. पा शिरवल

विठल कायदेऊ देसकुलकर्णी पा मार

सेत नजीक + + खालील विठोबाची मिरासी आहे. विठोबा कटकास गेला. मागे कीर्दीबदल गोमाजी हमाल त्याचे हवाला केले होते. आता ते (विठोबा) गांवास आले आहेती. आपणच (आपले सेत) करीन म्हणताती. यावर अर्डी इ. मोकदम लोक म्हणाले, आता पेरणीचा हगाम आला आहे पेरणी करून देणे. सन इसनेचे पीक घेउनु **दिवाळीपासून तुमचे सेत तुम्ही करणे.** विठोबे कबूल करून निरोप दिल्हा.

खं २० ले. २२४ } (४८) { श. १५३२ मार्ग. शु. ७
सु. १०११ रम ६ } खुर्दखत फा. मु. { इ. १६१० नोवें. १२

अजदिवाण पाा पुणें—— मोकदम मौ मोरगौऊ पाा माार

मल्हारीभट बिन कृस्णभट भगत मोरया. 'आपणासी जमीन चावर नीम इनाम आहे. ती चालविणे.' तरी चालविणें.

खं. २० ले. ६६ } (४९) { श. १५३२ पौष शु. ११
सु. १०११ सवाल १० } हुजती फा. चौ. मु. व मज. { इ. १६१० डिसें. १६

अजदिवाण पाा वांई—— मोक. व रया मौ येंकद

अकण्णा बिन दामोदरभट जुनारदार सो वांई यास जमीन नीम चावर दो हक दिली आहे. दुबाला कीजे.

खं. १५ ले. ६ } (५०) { श. १५३२ माघ शु. १०
श. } न. महजर–स्थल प्रतिष्ठान = पैठण { इ. १६११ जाने. १४

अग्रवादी — नरसोजी कुमाजी जगदळे दोख तपे मसूर पाटील को मसूर.

पश्चमवादी–बापाजी बिन याकूबजी मुसलमान

तकरीर — आपला आजा बाबाजी व चुलता विठोजी वतनावरी होते. को मसूर येथें पीर जलालुद्दीन आहे. याचा किताब 'मुसलमानांचा पीर आणि हिंदूंचा वीर' तेथें उजवे बाजूस हिंदूंनीं व डावे बाजूस मुसलमानांनीं खैरात करून मिळकत सारखी वाटून घेऊन अतीत अभ्यागत व फकीरफकराना यांस खर्च करावी. ही पद्धत तपाचे मुसलमानानीं मुजावरास बळ देऊन मोडली. त्यावर आजानें ताकीद दिली असता आजा व चुलता यास मुजावरानें मारलें. आजीनें आपला बाप कुमाजी माहेरी नेऊन वाढविले. पुढें आपल्या बापानें मुजावरास मारून सूड घेतला. बापाजी मुसलमान याचा बाप याकूब हा रयतीस पैके लावून गैरइंगामी वसूल करू लागला. आपल्या बापानें त्यास ताकीद केली. तेव्हां बोलाबोली होऊन कऱ्हाडीचा नायब यानें आपल्या बापास धरून नेले. आपले घरदार लुटलें. दोखी व पटेलगी अमानत करून तिचे कमावीस याकुबाचे हवाली केली. यावरी पटेलगी दुमाला करून घेतली. बाप मरून गेला. आपण **जगद्गुरु पातशापासीं गेलो.** त्यानें अंबर-

तकरीर — आपले बडे पूर्वज सावगिरी करीत होते. आपला बाप याकूबजी कर्ज मागे. म्हणून त्यास मसुराहून हाकलून दिलें. व मसूरचे पीर जादे यास कुमाजीनें जिवें मारिले. पुढें त्यास कऱ्हाडकर अबदुलहुसेन नायब यानें कुमाजीस धरून नेले. जमान देऊन कुमाजी पळून गेला. आपल्या बापानें अफलादीचे खून जाले म्हणून अमानत असलेली पटेलगी सोडविली. आपले देणे रास्तीक व खुनहि रास्तीक आहे. हिंदु अगर मुसलमान

खानाकरवी निवाडा केला कीं, खंडाचे पैसे ४॥ हो० होन न म्हणतां देऊन पटेलगी सोडवावी. त्यावर हुजूरच्या लोकांनीं आपणावरी जुलूम केला. मग कन्हाडास दिव्य होऊन खोटा जाला. त्यावरी बापाजी बोलला. आपणास कबूल नाहीं. दूर स्थल द्यावें. म्हणून येथें आलों.

धर्मता निर्वाह करावा म्हणून हे स्थल मागून मुसलमान घेतले.

याउपरी धर्माधिकारी यांनीं कागदपत्र पाहून पटेलगी जगदळे याची असें सांगितलें. बापाजी बोलला, पीर जलालद्दीन हा पहिले हिंदू होता त्याचेच आपण होतो. जगदळे यानीं मुजावर तिघे का मारिले. आपला एक खून द्यावा. आणि आपले देणे द्यावे. यावरी धर्माधिकारी बोलले. जगदळे याचे निरपराधी दोन खून केले. **एका एका खुनास आकरा आकरा खून द्यावे. जगदळे तीन(च) खून घेतले.** पुढें कागदपत्र पाहतां जगदळेच खरा. जगदळे यास बापाजीनें कष्टी केले वतनास विक्षेप केला असा तूं गुन्हेगार. **तुज देहान्त प्रायश्चित्त द्यावे. परंतु, मुसलमानाची पातशाही आणि तूहि मुसलमान याकरिता क्षमा जाली.**

ऐ. व. ६ पृ. ६७ सु. १०११	(५१) महजर फा. सी.	श. १५३२ इ. १६१०

गोपालभट बिन विठलभट पुजारी सप्तशृंगी येणे लखमण रावताजवळून केल्हाईची तकसीम पैकी रुके ६ होन १२० स विकत घेतली. यावर भोपे गुरवांनीं कांहीं पैके देऊन रावतापासून ती गहाण म्हणून लिहून आणले. म्हणून तंटा. पुढें कागद पत्र गोही सडी पाहतां गोपालभट खरा जाहला. त्याचा महजर किले मोरेरी (मुल्हेरी) च्या प्रतापशहापाशीं जाला.

सा. ले. ९३ सु. १०११ न.	(५२) महजर न.	श. १५३२ इ. १६१०

केडगाव व पारगाव पा पुणे यांतील शिवेचा तंटा. कडेगांवकराकडे कोड असलेल जोगी होता. म्हणून कडेगांवकरास दिव्य करूं दिलें नाहीं. पारगांवकरांनीं दिव्य करून ते खोटे जाले. पण पारगांवकरांनीं तो निवाडा मानिला नाहीं. म्हणून किले कोंढाण्याचे हवालदार मीर अजम मीर सैद इसीफ नायब गैबती ह्यांनीं येऊन हदमहदूद घालून **निकालाची अमलबजावणी केली.**

खं. १५ ले. ३७७ सु. १०१२ रम २३	(५३) खुर्दखत फा. मु.	श. १५३३ कार्तिक व. १० इ. १६११ नोव्हेंबर १९

अजर. हैबतखान ——— कारकून व देसाई को मालेवाडी

बिठोजी भोसले यास पेठ सिंगणापूरची मोकदमी दिली. दुंबाला कीजे

खं. १५ ले. ३७८ } (५४) { श. १५३३ मार्ग. व. १३
सु. १०१२ सवाल २५ } खुर्दखत फा. मु. दोन { इ. १६११ डिसें. २१

अज दिवाण ———— चौगुले, कुलकर्णी इ. समस्त सिंगणापूरकर

मोकदम पूर्वे **कदीम + + विठोजी भोसला** आहे त्याचा फरजद बरहुकूम फर्मान हुमायून + + दुंबाला कीजे.

खं. १५ ले. ३७५-७६ } (५५) { श. १५३३
हि. १०२० } खुर्दखत फा. मु. { इ. १६११

हैबतखान याने विठोजी भोसले यास शिखरशिंगणापूरची मोकदमी दिली. (पत्र फारसी)

खं. १५ ले. ३७९ } (५६) { श. १५३४ श्रावण शु. ३
सु. १०१३ जखर १ } खुर्दखत फा. मु. व मज. सी. { इ. १६१२ जुलै २०

अजर० मलिक शर्क म. अंबर

कारकुन, दोख पा संगमनेर व मुजेरी व प्रजा को वावी.

पेशजी बाउजी बिन + मोकदम होता. तेणें राघोजी ठोंबरा यासी मारा करून मारिला; तेरा खून केले व परांगदा जाला. त्यावरी हुजरून गर्दन मारिली. **हाली को मारची मोकद्मी संभाजी बिन विठोजी भोसले यासी मिरासी करून दिधली असे.** चालविणें.

खं. १५ ले. ३८० } (५७) { श. १५३४ श्रावण व. २
सु. १०१३ जखर १५ } खुर्दखत फा. ३ मु { इ. १६१२ आगष्ट ३

✓ अजर० हैबतखान — आतामलिक नायब गैबत व कारकून पा वाई

मौजे बोरीखल व मौजे किण्हई येथील दीड चावर जमीन गोपीनाथभट बिन रामेस्वरभट जुनारदार यास पूर्वीपासून इनाम आहे. चालवणें

सा. ले. ९४ } (५८) { श. १५३४ मार्ग. शु. ५
श. } { इ. १६१२ नोवें. १७

मल्हारजी आपाजी निगडे मोकदम मौजे किकवी पा पुणें

सोमाजी बिन गोमाजी राऊत वस्ती वगजवडी

तुम्हास मौ मारी सेत **पाळ म्हणून कुणबाव्याचे मिरास करून दिल्हे कारण, तुम्ही पांढरीच्या कामास आलां आहां.**

कों. इ. सा. ले. ८३. पृ. ९६ — (५९) — श. १५३४ इ. १६१२

माजी हवालदार मिर्जा यानीं १३७१ होन दिले ते जमा केले. बाकीचा वसूल जाला नाहीं. मुदत २५ वर्षांची केली पाहिजे. बाबाजी देसाई यास किल्यांत बंदोबस्तात ठेवलें आहे.

ऐ. व १ (अं २१३) पृ ३४ सु. १०१४ जखर २० — (६०) खुर्दखत फा. मु. ३ — श. १५३५ श्रावण वद्य ६ इ. १६१३ जुलै २८

अजर० हैबतखान कारकून पा पुणा

सेत पाचूद मौजे वेहरवडे पा मार (येथील) गणो गबाजी तबीब सो बेहेरवडे यास इनाम वंशपरंपरेनें आहे. तरी ते त्याजकडे व वंशजाकडे चालविणें.

सा. ले. ७ सु. १०१४ रम १ — (६१) कौलनामा न. — श. १५३५ कार्तिक शुद्ध २ इ. १६१३ आक्टो. ५

अजर० हैबतखान — विठ्ठल कांरदेऊ कुलकर्णी पा शिरूवल

तुझे मिरासीवरी दरीवक्त रुद्राजी दामोधर लंबा उभा राहिला. तुझे व त्याचे बरहक मुनसिफी खातिरेसी आणता व हमशाही महाल पुणे, पा वाई, का सासवड व गुंजण-मावळ (यांच्या) गोही (पाहता) रुद्रो मजकूर खोटा. तरी तुझे मिरासी तू चाळऊनु सुखे असिजे.

खं. १५ ले. ३८५ सु. १०१४ सवाल २० — (६२) उल्लेख — श. १५३५ मार्ग. वद्य ६ इ. १६१३ नोव्हें. २३

यांत नारायणभट बिन दामोदरभट व प्रभाकरभट बिन रामेस्वरभट सो आरवी मुद्गल (सांगतात कीं) आपणास इनाम चावर येक दो हक बा हुजती विठोजी राजे भोसले अर्बा असर व अलफ छ २० माहे सवालू आहे.

सा. ले. २८८ श. — (६३) कबूल कतबा — श. १५३५ माघ वद्य १३ इ. १६१४ जाने. २७

सोनभट बिन हेम जोसी मुळे मौजे पासुरली मामले गुलशनाबाद (नाशिक)

फुलाई भ्र. गंगाजी सोनभट जोशी...

तू आपली सून, तुझा भ्रतार निवर्तला; तू कासीयात्रेहुनु आलियावरी आपणासी अन्नवस्त्र मागो लागलीस. आपण नेदूच. यावरी ठाणियाशी कारकुनी व बहुती नेम केला जे प्रतिवरुसी तुज नख्त लुगडियाकारणे प्रताप चवल व गला मण बारा देणे.

सा. ले. २१ }
सु. १०१४ }
(६४)
{ श. १५३५
{ इ. १६१३

रामाजी विठल देशर्णी व गणो रुद्र लंबे पा शिरवल यांचे देशर्णीच्या वतनाविषयी तंटा – दरीवरुत हैबतखान धाकुटा याचे कारकीर्दीस लस्कर मोकाम खडकी नजीक दौलताबाद दरसाल सन आरबा असर अलफ यासी लंबे पैदा होऊन उभे राहिले...यावरी पा मजकूर खान मशारनुलेचे बजावर्द होऊन अमानत होऊन मलिक अजम ममलकत मदारीचे हवालदार काजी हुसेन व कारकून महालासी आले. त्यापासी निवाडा होऊन फर्मान व खुर्दखत घेऊन महालासी विठल कायदेऊ येत होता तव पा मार मुकासा सैद आमजदन मुलकासी सादर जाहला. यावरी पा मार बजावर्द होऊन हजरती शाहा आलमपन्हा येदलशाह त्यासी सुलोखाली मुलूख दिल्हा. हजरतीन पा मार मुला महमदासी मुकासा सादर केला. त्याचे कारकून आगानुरा व रायेराऊ माहालासी आले. यावरी लंबे मार मुला साहेबाचे खुर्दखत घेऊन आले. माहाली आगानुरा व रायाराऊ होते त्यापासी देशक वगैरे तमाम बोलावून निवाडा केला. लंबे खोटे केले. यावर विठल काइदेऊ देसकुलकर्ण चालवीत असत त्यास सन १०२२ मधे जिवे मारले. इत्यादि.

प. सं. पृ. ८७ }
सु. १०१५ रजब १५ }
(६५)
खुर्दखत फा. मु. व सी.
{ श. १५३६ श्रावण व. २
{ इ. १६१४ आगष्ट ११

अज माहाल मा साहेब

कारकून व मोक० को पेडगौ पा पांडियापेडगौ

गोपाल विठल यासी जमीन चावर नीम ·।।· को मजकूर पैकीं इनाम दिली आहे. तरी ती त्याकडे चालविणें.

स. सं. पृ. १९७ }
सु. १०१५ साबान १० }
(६६)
फा. मु. खुर्दखत
{ श. १५३६ भाद्र. शु. १२
{ इ. १६१४ सप्टें. ५

(?)———— देसाई व देसक मामले तालिये

बालकंपंत वलद नरसीपंत कुलकरनी मामले तलेया (यांनीं) भिकाजी बिन आत्माजी व सिवाजी बिन आत्माजी परभू पालकर यास वतन कुलकरन कों पांचसें दिल्हे सारे वतन याप्रमाणें खत तिसा समानीन व तिसामया मधे केलें. वगैरे.

खं. २० ले. ६७ }
सु. १०१५ जिल्हेज ४ }
(६७)
खुर्दखत फा. शि. मु.
{ श. १५३६ पौष शुद्ध ६
{ इ. १६१४ डिसें. २६

अजर० हैबतखान——अता मलिक नायब गैबत व कारकून पा वाई

जमीन नीम चावर ·।।· दर सवाद मौजे पसरणीं स्थल वाकडेवाडी हरिभट बिन विरणुभट देऊरकर सेकीन पसर्णी यांस पूर्वीपासून इनाम आहे. तरी ती चालविणें.

सा. ले. १४६ }
सु. १०१५ मोहर ७ }

(६८)
मान्यतापत्र

{ श. १५३६ माघ शु. ४
{ इ. १६१५ जाने. २७

महादो लखमदेऊ देसकुल० पा सुपे

माहादावा गोसावी देवाचे पेसवे मौजे मोरगौ

आपला इनाम मौजे सिगापूर पा मा देह येक पैकी जो इनाम आहे तरी तो माहाराजे सुखे आपले सेवक ठेउनु खाणें.

स. पृ. १४ ले. ८ }
सु. १०१६ रम १५ }

(६९)
खुर्दखत

{ श. १५३७ आश्वीन व. ३
{ इ. १६१५ सप्टें. २८

अजर० संभाजी राजे मोहिते———कारकु० देशमूख मौ उडतरे पा कराड

कमल नयन गोसावी यासी इनाम जमीन चावर ·।· कुलबाब कुलकानू व गला देविले असे. दुमाले करणें.

खं. १५ ले. ६५ }
सु. १०१६ रम २५ }

(७०)
खुर्दखत

{ श. १५३७ आश्विन वद्य ११
{ इ. १६१५ आक्टो. ८

अजर० हिरोजी राजे मोहिते — कारकु० व देशमु० इडमिडे पा कऱ्हाड

कमलनयन गोसावी यासि इनाम जमीन चावर ·।· कुलबाब देविले असे. चालविणे.

खं. १५ ले. ६६ }
सु. १०१६ सवाल २९ }

(७१)
मिसली मु. न.

{ श. १५३७ मार्गशीर्ष शु. १
{ इ १६१५ नोवें. ११

अजदि० प्रा कऱ्हाड ——— हुदे० व मोकद० उडतरे

२५ रमजानच्या सनदेप्रमाणें कमळनयन गोसावी यास मौ उडतरे येथील जमिन अवल चावर ·।· इनाम देाा हक देविले असे दुंबाला कीजे.

खं. १५ ले. ३८१ }
सु. १०१६ श. }

(७२)
संमतीपत्र

{ श.१५३७ फाल्गुन शुद्ध ४
{ इ. १६१६ फेब्रु. ११

दसोजी बिन विठोजी भोसले

जानोजी बिन कनकोजी वेवगे मोकदम व चौगुले मौ कविठे पा पुणें

तुमचा बाप कनकोजी चौगुलकी खात होता व मोकदमीबदल रामोजी सिपोरकरासी भांडत होता; कीं, तू आपल्या वडिलाचा जेवणाईत, तुझी मोकदमी नव्हे. याबद्दल रामोजीनें कनकोजी वगैरेस मारिले. तू धाकटा होतास. तुझी पाठी राखे ऐसा कोणी नव्हता. तेव्हां पाठीराखणाबद्दल आम्हास आपली चौगुली निमी दो बाब दिधले आहे आम्ही ती खाऊन तुझी पाठी राखणें. (वादांतील) मोकदमी आमचे हातास आलियावर तुवा आपुली चौगुलकी समुदी खाणें.

खं २० ले. १७४ }
श. }

(७३)
यादी न.

{ श. १५३७
{ इ. १६१५

हक व लाजिम निजामशाही कारकीर्दीतील काजी शरा शरीफ हकीम व धर्माधिकरणी

सा. ले. १०
सु. १०१६ रवल २३ श.

(७४)
महजर

{ श. १५३८ चैत्र व. ९
{ इ. १६१६ मार्च ३१

(हैबतखानाचे उपस्थितींत)

रुद्राजी दामोदर व बाबाजी भूपालराऊ लंबे यांनीं झोंडाई लावून विठल काय-देऊ देसकुलकर्णी पा सिरवळ यांस आप्तिष्टासह वाईंत नेऊन मारा करविले. तेव्हा वाईचे देशमूख वगैरेनीं हैबतखानाकडे अर्दास गुदरली. हक मुनसिबी व गोही खातिरेसी आणतां विठल काइदेऊ खरा निघाला.

स. पृ. १४ ले. ९
सु. १०१७ सवाल २९

(७५)
हुजतीपत्र

{ श. १५३८ आश्विन व ३०
{ इ. १६१६ आक्टोबर ३०

अजर० महालदारखान

कारकून व देशमुख मामले जाफराबाद हुदेदार मुतालिक मोकाशी मोकदमान व रयान मौजे धारणगोवीर पा जाफराबाद

बाबा हाजी बुऱ्हाण मालूम केले कीं, आपण मकेस जाऊन आलो. आपला इनाम चावर १ धारणगोवीर येथें दोा बाबा बद्दल मशीद चाकरी आहे. आणि निफाडचे पथक जकातीचे कमावीस करतात त्यांस लगर देणें. तसेंच पांढरकरापासून पेठ मजकुरी दरसाल ३ होन सारा घेताती तो जमा देणें. तरी वरीलप्रमाणें चालविणें.

खंड १६ ले. ५ व २ पृ. ११
सु. १०१७ जिल्हेज ११

(७६)
महजर

{ श. १५३८ मार्ग. शु.१३
{ इ. १६१६ डिसें. १०

बाजी नाईक मरळ देशमूख तर्फ कानदखोरे याचा देशमुखीसंबंधानें हा महजर.

खं. २१ ले. ५५
सु. १०१७ जिल्हेज २५

(७७)
उल्लेख-फर्मान

{ श. १५३८ मार्ग. व. ११
{ इ. १६१६ डिसें. २४

हजरत सिलेमानी

आपदेभट बिन कृष्णभट मौजे कोणेगाऊ दरसवाद जमीन चावर ।। इनाम सदकाबदल दिली असे.

त्रै. व. २ पृ. ३६ }
सु. १०१७ }

(७८)
उल्लेख

{ श. १५३८
{ इ. १६१६

हैबतखान पा पुणे याणे मोरोबा गोसावी यास हुजती दिधली आहे.

खं. २० ले. २२७ श.	(७९) वृत्तिपत्र	श. १५३९ वैशाख शुद्ध ५ इ. १६१७ एप्रील २९

राघोजी राऊतराव (ढमाले) देशमूख पौड. समस्त अधिकारी व प्रजा को पौड.
माहादाजी गोसावी मोरगौ पा पुणा.

स्वामीस पुरातनपासून चालिले प्रमाणें नक्त रुके दर गावास २४ व भात मण ८॥ प्रतिवर्षी चाललें आहे. तें आपल्या माणसाकरवी घेऊन जाणें.

खं. १६ ले. ६ सु. १०१८ जिल्काद २१	(८०) कौलनामा	श. १५३९ कार्तिक वद्य ८ इ. १६१७ नोव्हें. १०

अज दि० मामले सं. तळकोकण बाजी याकूद
कानोजी झुंझारराऊ (मरळ) अधिकारी तपे कानदखोरे मामले रायरी

रवळोजी मरळ याने सांगितल्यावरून तू समज कीं तू बेसक येईजे. तुमची दौलतखोई व सर्फराजी होईल. **पेसजी कारकीर्द येदिलसाही जो गुन्हा केला असेल** तो माफ असे.

खं. १५ ले. ३८३ सु. १०१८ सफर २४	(८१) खुर्दखत फा.मु. व सी.	श. १५३९ माघ वद्य १० इ. १६१८ फेब्रु. १०

अजर. आगौ अजम आगौ मुमरास
हुदेदार व मोकदम, देऊळगाव पा पुणे

✓ दामोदरभट व रामेस्वरभट बिन नारायणभट सा आरवी यांनीं मालुम केलें कीं "आपणास सेत कदीम खासा मिरासी दोरी १। आहे. **हैबतखानानें चालविले होते. हली साहेबास मुकासा अर्जानी जाला.** तरी चालविजे.' चालविणे.

खं. १५ ले. ३८४ सु. १०१८ रवल ३	(८२) खुर्दखत फा. मु. व सी.	श. १५३९ फाल्गुन शु. ४ इ. १६१८ फेब्रु. १८

अजर. सर्जाराऊ राजे
हुदेदार व मोकदम मौजे वडिगाव का पाटस पा पुणें

✓ रामेस्वरभट बिन नारायणभट सा आर्वीमुद्रूल मालुम केले जे 'आपणास इनाम जमीन चावर रुके ०। दर सवाद मौजे वडिगौ ना पेडिगौ आहे. **हाली साहेबास मुकासा अर्जानी जाला आहे.** खुर्दखत सरंजाम होये' तरी चालविणें.

खं. २० ले. २१७ }
सु. १०१७ श. }

(८३)
उल्लेख

{ श. १५३९
{ इ. १६१७

(महजर) रखमाजी पंताची कारकीर्द. पंढरपूरचा मोकासदार.

ग्रै. व. २ पृ. ५७,५८ }
सु. १०१८ }

(८४)
उल्लेख

{ श. १५३९
{ इ. १६१७

मोरोबा गोसावी याचे इनाम चालविण्याबद्दल याकुददखान याची हुजती.

स. पृ. १५ ले.१० }
सु.१०१८ }

(८५)
खुर्दखत

{ श. १५३९
{ इ. १६१७

अजर. खास ——— कारकून व देशमूख पुणें

काजी मुंतजीब बिन काजी फतहूला व काजी महमद बिन काजी हुसेन यानी मालुम केले जे **'पूर्वी हरयेक परगणा एकेक काजी; सुलतान फेरोजशाहा बहामनी यानें दोनदोन केले.** त्या ता आपले वडिलास काजीपणा दिला. **कुलात जो कोणी विद्यावंत त्यासच काजीची मिरासी लाभे.** ऐसियास इस्माइल बिन दुलाबावन यास नवे काजीपणा दिधला असे. त्याला फर्मान देणे. या काजीजवळचे फर्मान **फिरंगोजीचे फितरातीमधीं गहाळ जाले** आहेत.' देणें.

ग्रै. व. २ पृ. ५८ ले. २ }
सु. १०१८ }

(८६)
उल्लेख

{ श. १५३९
{ इ. १६१७

याकुदखान—— मोरोबा गोसावी

कुंभारवळण पा सुपे येथील जमीन चावर १ इनाम हक वंगैरेंसह दिलें आहे.

सा. ले. १४ पृ. २४ }
सु. १०१९ जखर २५ }

(८७)
पोटपत्र

{ श. १५४० ज्येष्ठ वा १२
{ इ. १६१८ जून ९

अजर. म. मलीक अंबर

कारकून दोख व मोकदम व रया पा शिरवल

विठल काइदेऊ देसकुलकर्णी व लंबे देसकुलकर्ण्याबद्दल भांडत हुजूर आले. हुजरून खुर्दखते ४ पाठविले होते. पैकीं पा पुणें, सासवड सुपे यांजकडून सडी आलिया कीं, विठल काइदेऊ पिढीया तीन देसकुलकर्ण करतो. लंबे यानें कधीं केलें नाहीं. व खेडेबाराचा महजर कीं, विठल काइदेऊ तीन पिढीया खातो परि मिरासी लंब्याची होये लंबे दूरी केले.

खं १६ ले. ७ सु. १०१९ रजब २२	(८८) कौलनामा ता.	श. १५४० आषाढ व. ८ इ. १६१८ जुलै ५

अजर. रा. पतंगराऊ

कान्होजी जुंझारराऊ देशख तपे कानदखोरे मामले राइरी

तुम्हा मालुम केले जे 'खान हैबतखान आदिलशाही तेही तर्फ मजकूर घाला घालून लुटिले व काबीज केले. मग कौल देऊन वसाहाती करूं लागले. त्यावरी सालगुा हजरती साहेबास ते तरफ मुकासा अर्जानी जाला. हजरती साहेबी अवघीं खोरीं आगा बाजी याकूत हवालदार समत तलकोकण याचे हवाला केली. त्यानें आपलें खुर्दखत लेहोनू दिधलें. यावरी सवेंच साहेबांची कावजाती आली. कारकुनासी खुर्दखत व सेरीकरास कौल मन्हामत केला पाहिजे. ए तरफेस इनामती म्हणौनु म्हणताात. आपले देसाकडे इनामती व इसाबती म्हणौनु म्हणताती. सदरहू खाऊनु लाठी बल घेउनु तपा तमाम मामूर करणे.

खं. १६ ले. ८ सु. १०१९ सवाल ५	(८९) ताकीदपत्र	श. १५४० आश्विन शु. ६ इ. १६१८ सप्टेंबर १५

अजर. रा. पतंगराऊ

कृष्णाजी गोविंद हवालदार व कारकून तपे कानदखोरे मामले रायरी.

जुंझारराऊ देशख यांनी अर्दास पाठविली की आपले इनामतीबद्दल सिरणी टके १७०० साहेबास कबूल जाले सालमारी तपेची इजारत आहे. दोहोची उगवणी करतो. कारकून आपले इनामतीची कसाविस करून घेताती. आपणास कांहीं देत नाहीं. तरी आपण काय खावे. आपण अर्ज करतो तो मनास आणीत नाहीत. हुर्मती राखत नाहींत. तरी सर्व बरोबर करावे. सालगुापैकी ६६०॥≈॥ जमा नाहींत, हा कैसा अमल आहे ते लिहिणें.

त्रै. २ पृ. ५८ ले. २ सु. १०१९ सवाल २०	(९०) उल्लेख	श. १५४० आश्विन व. ७ इ. १६१८ सप्टें. ३०

मलिक अंबर याचा एकंदर इनामदारांना रोखा कीं मोरोबा गोसावी यांची इनामती त्यांचे दुमाला करणें.

खं. १५ ले. ३८५ सु. १०१९ सवाल २०	(९१) उल्लेख	श. १५४० आश्विन व॥ ७ इ. १६१८ सप्टेंबर ३०

मलिक अंबरचा एकंदर इनामदारास रोखा कीं ज्यांचीं त्यांचीं इनामें चालविणें (हा उल्लेख बऱ्याच पत्रांतून आहे.)

खं. १५ ले. ४०० (९२) श. १५४० आश्विन व. १४
सु. १०१९ सफर २७ खुर्देखत फा. २ मुद्रा ष. इ. १६१८ आक्टोबर. ७

अज दिवाण, रख्तखाना खास

कारकून दोख पा पांडियापेडिगौ व मोकाशी व मोकाशाचे हुद्देदार व मोकदम मौजे जलालपुर

दामोदरभट व रामेस्वरभट सा आर्वी मुद्गल मालुम केले की 'आपणासी इनाम जमीन चावर १ दर मौजे जलालपूर दो हक **बाा हुजती मालोजी व विठोजी भोसले** असर अलफ (श. १५३१) आहे. दरी बाब रोखा मलिक अंबर आहे. फर्मान होये. तरी चालविणे.

खं. १५ ले. ४०१ (९३) श. १५४० आश्विन व. १४
सु. १०१९ सफर २७ हि. खुर्देखत फा. ४ मुद्रा. इ. १६१८ आक्टो. ७

अज दिवाण र. खास

कारकून दोख परगणे पुणें व मोकाशी आणि त्याचे हुद्देदार व मोकदम मौजे वडिगौ, कर्याती पाटस

रामेस्वरभट मौ आर्वीमुद्गल मालूम केले जे आपणासी इनाम जमीन रुके १२ दर मौजे वडिगाऊ बाा हुजती हैबतखान हहिदे असर अलफ (श. १५३२) आहे. रोखा मलिक अं. याचा तिसा असर अलफ (श. १५४०) २० सवालचा आहे. फर्मान होये. चालविजे.

खं. १५ ले. ४०२ (९४) श. १५४० आश्वीन व. १४
सु. १०१९ सफर २७ हि. खुर्देखत फा. ४ मुद्रा. इ. १६१८ आक्टो. ७

अजदिवाण र. खास

कारकून देशमूख पाा पुणे व मोकाशी, मोकाशाचे हुद्देदार व मोक. मोजे देउळगौं कर्याती पाटस

दामोदरभट व रामेस्वरभट मालूम केले जे आपणियासी इनाम जमीन खुद खासा दोरी सवा, दर मौजे देउळगाऊ बाा **हुजती हैबतखान** सलास अलफ आहे **रोखा मलिक अं. आहे.** फर्मान होये. रुके ७ देवविले. चालवीजे.

खं. १५ ले. ३८५ (९५) श. १५४० कार्तिक व. ३
सु. १०१९ जिल्काद १७ फर्मान फा. मु. व सी. इ. १६१८ आक्टो. २६

अज दिवाण र. खास

कारकून व दोख सरकार दौलताबाद व मोकाशी व हुद्दे. व मोक. मौजे चांभारवाडी पाा येळूर

नारायणभट बिन दामोदरभट व प्रभाकरभट बिन रामेस्वरभट सा आर्वीमुद्गल मालुम केले 'आपणास इनाम जमीन चावर यक मौजे चांभारवाडी येथें बा हुजती **विठोजी राजे भोसले** (छ २० सवाल अबा असर अलफ १५२५ श.) आहे. चालविली पाहिजे.' चालवणें.

खं. २० ले. २२८ सु. १०१९ जिल्काद २३	(९६) खुर्दखत फा. मज. मुद्रा ४	श. १५४० कार्तीक व.१० इ. १६१८ नोवें. १

अज. दिवाण र. खास

कारकून दोख पा पुणें मोकाशी, मोकाशाचे हुद्दे. व मोक. मौजे मोरगौऊ

गणेशभट बिन मल्हारीभट भगवते माल्हम केले. 'आपला वालीद भगत मोरया यासी इनाम जमीन चावर नीम दर मौजे मोरेस्वर आहे. हुजती **खान हैबतखान** खमस अलफची फर्मान करून देणे म्हणून रोखा म. म. **अंबर तिचा** असर ११ जिल्काद (१५४० कार्तिक शु. १२ ता. २०।१०।१६१८) चा रोखा आहे.' तरी चालविजे.

खं. १५ ले. ३८६ ब.	(९७) मान्यतापत्र	श. १५४० मार्ग शु. १० इ. १६१८ नोव्हे. १७

मोक. बलुते. समस्त-मो आरवी —— रामेस्वरभट गोसावी

देवाचिया फुलझाडाकारणे तुमचिया घरामागे नजीक गावकुंप जमीन खडसर, पडी बिघे २० ही भोये श्रीमुद्गलार्पण दिधले. ह्या जमिनीचा महसूल अथवा नक्त बाब ता ठाणे व ता दहाये काही येत नाही. सुखे कीर्दी करवेल ते करुनु सुखे घेणे.

सा. ले. ११ सु. १०१९ जिल्हेज १६	(९८) महजर	श. १५४० मार्ग. व. ३ इ. १६१८ नोव्हे. २४

अग्रवादी–नागोजी बिन कोंडभट पटवर्धन जोसीकुलकर्णी, भोगवली.

पश्चमवादी- रामाजी विस्वनाथ म्हसवडा- जोसी कुल. भोगवली.

(काहीं हकीकत सांगितल्यानंतर)

अग्रवादी म्हणतो– आपला आजा दादोबा पटवर्धन याचे कुलकर्ण मिरासी याने रामाजी विस्वनाथ याचा आजा कुलकर्ण चालवावया ठेविला होता.	पश्चमवादी म्हणतो– कुलकर्ण आपल्या आजियाची मिरासी. आपला आजा दादोबा याचा ठेवणाईत नव्हे.

नंतर दिव्य होऊन अग्रवादी खरा ठरला.

सा. ले. ३३६ सुं. १०१९ जिल्हेज १७	(९९) फा. सी.	श. १५४० मार्ग. व. ४ इ. १६१८ नोवें. २५

अजर. मलिकसर्के म. अंबर —— कारकून तपे रोहिडा

कान्होजी ना जेधे यानी मालूम केले जे, मौजे कारी हा गाऊ आम्हाकडे पेशजी-

पासून चालत आहे. आमचे तर्फेचे इसम लोक यानी आमच्या वडिलाचे व आमचे उपयोगी पडून तपे मारीची दोखी मिळवूनु दिल्ही. याबद्दल इशम लोकासी श्रीराइरेश्वरं देवाजवळ क्रिया हिंदूधर्मोची होउनु तपे माराची देशमुखीपैकी निमे हक तुम्हास देऊ असा करार जाला. निमे वतन घावे तरी वतनाचा बखेडा होतो. म्हणोन सारे लोकास जमा करोन त्यांची समजूत काढली कीं, सारे लोकास कारी हा गाव आमचे इसाफतीचा देतो. ते वेळीं अम्ही ठराविले जे आम्ही येक घर बाधुनु मौ मारी राहू. कारण, आमचे जिऊ हसम लोकानी पेसजी वाचविले तसे पुढेहि वाचिले पाहिजेत. आमची चाकरी हसम लोकानी सिरस्तेप्रो तरवारेची करुनू अम्हास संबाळावे. आम्ही सेते करणार नाहीं. करूं तरी सेफत असे. जदीद अलामदार कायम करणे वा बेहडा कायम राखणे ही मालकी हासमांची. आम्हाकडे मालकी चाकरी घेण्याची. याप्रो व अमचे देसमुखीचा हकलाजिमा यकंदर यक कारी मारचा इसाफती अमलासुा दिल्हा. नरस प्रभु फरजंद दाद प्रभु देस व गांव कुलकर्णी यास आमचे वडिलासी व आम्ही बलालजी प्रभु हे लढाईचे प्रसंगात ठार जाले ते वेळचे देणे ५॥ टके ते द्यावे. याप्रो अमचे तर्फेनी दरोबस्त सदरहू गाऊ इषम लोकाकडे आहे.

खं. १८ ले. ४ } (१००) { श. १५४० मार्ग. व. १२
श. सु. } महजर { इ. १६१८ डिसें. ३

कसबे सुपे आणि मौजे वढाणे पा पुणे ह्या दोहो गांवांस सिवेचा करकसा होता. दोही गांवचे लोक जमले. सुपेकरीं श. १४४६ मधील महजर दाखविला. पण तो रुजू न पडे. कारण, जे वख्ती दिवे होते ते वख्ती हरदो महालीचे कारकून, देशमुख, देशक, जवार, व कोनेकुटे मेळऊन दिवाण होते, तेथें महजर. त्यांचीं नांवें निशाणें करितातो. ए कागदी तैसा अमल नाहीं. पुढें उभय गांवचे मोकदम गोत, सांगतील ती सीव मानून त्यांनीं तंटा मिटविला.

सा. ले. ३३७ } (१०१) { श. १५४० पौष शु. २
सु. १०१९ मोहर १ } खुर्दखत सी. { इ. १६१८ डिसें. १९

ले. ९९ प्रमाणें मजकूर असून शिवाय हाशम लोकांची जमीन वाटणी आहे.

खं. १५ ले. ३८७ } (१०२) { श. १५४० पौष शु. १०
सु. १०१९ मोहर ८ } खुर्दखत मु. सी. { इ. १६१८ डिसें. १६

अजर. राा कृष्णाजीराजे —— हुद्देदार व मोकदम मौजे वडिगौ पाा पुणे

रामेश्वरभट साा आर्वीमुद्दल मालुम केले की, आपणास इनाम जमीन वाहृतिकास चावर रुके ।-१२ देाा हक बाा भोगवटे वजिरानी चालिले आहे. **हाली मो मार साहेबास मुकासा अर्जानी जाला असे.** खुर्दखत होये. तरी चालविणे.

ऐ. व. २ पृ. ५६ } (१०३) { श. १५४० फाल्गुन शु. ८
मु. १०१९ रवल ६ } फर्मान फा. २ मु. व सी. { इ. १६१९ फेब्रु. ११

अज दिवाण खास

कारकून व दोख पा पुणे मोकाशी व मोकाशाचे हुद्देदार व मोकदम मौजे चिंचोली पा पुणें

मोरोबा जुनारदार मालूम केले की, आपणासी इनाम बदल खिजमती देवस्थान मोरदेऊ जमीन चावर १ व नख्त दरोज रुके बारा मौजे चिंचोली येथें दा हक **बाहुजती हैबतखान** सबा अशर अलफ आहे व तिसा अशर अलफचा २० सवालचा मलिक अंबरचा रोखा आहे. तरी फर्मान देणें. दिलें.

सा. ले. २४९ } (१०४) { श. १५४० फाल्गुन शु. ९
सु. १०१९ रवल ७ } खुर्दखत { इ. १६१९ फेब्रु. १२

अजर. मलिक अंबर — कारकून तपे रोहिडा

कान्होजी जेधे याणे मालूम केले की जे पोसजी फर्जंद आर्जोजी **कोंढाळकर हा आमचे उपयोगी फार लढाईचे प्रसंगी आला** सबब पोसजीकडे इनाम दो हक चालत आले तसे चालविणें. तरी चालवीजे.

खं. २० ले. ६ } (१०५) { श. १५४१ वैशाख शु. ३
सु. १०२९ (१०१९) रम. १ } फा. मु. व सी. { इ. १६१९ एप्रिल ७

अजर. म. श. म. अंबर —— कारकून व दोख पा सुपे.

शरफ अली हेजीब याकूतखान मालूम केले महादो लखमदेऊ देसकुलकर्णी पा सुपे याच्या बडियानें (बापानें ?) यारेदी ठेविला होता. त्यानें सळासिरी करून यासी हकलाजिमा नेदी. मग बाप यानें दस्तुरखानास मालूम करून यारेदी यास सजा देऊन बाहेर घालविला. हाली यारेदीचा फरजंद कोतोबा खानाचे बंदगीस उभा राहिला. मुनसफी करितां कोतोबा खोटा जाला. दस्तुरखानाचें खुर्दखत पाहून महजर करून देण्याची आज्ञा केली.

इं. फॅ. भा. १ } (१०६) { १५४१ वैशाख
पृ. ८९ इ. } { १६१९ एप्रिल

बैरामखानाचा मुलगा-दक्षिण्यांवर मोहीम करणाऱ्या मोंगली सैन्याचा मुख्य सेनापती.- बऱ्हाणपूरचे आसपास होता ?

ऐ. व. २ पृ. ५८ }		(१०७)		{ श. १५४१ ज्येष्ठ शु. ३
सु. १०२० जखर १ }		हुजतीपत्र-उल्लेख		{ इ. १६१९ मे ६

मोरोबा गोसावी मालुम केले जे आपणियासी इनाम जमीन चावर १ का सुपे बा। हुजती याकुदखान चालू आहे.

खं. १५ ले. ४३२ }		(१०८)		{ श. १५४१ ज्येष्ठ वद्य ५
श. }		कबूल कतबा न.		{ इ. १६१९ मे २३

बरवाई बिन विठ पाठक सो कल्हेट
मुरारीभट ब्रह्मे सा चाकण.
बापाची वृत्ती जोसीपण कल्हेट येथील अष्टाधिकारपूर्वक राक्षस संवच्छरीं (श. १५३७) दिथली. कागद आतां लेहून दिधला. लेकरीं खाणें.

खं. १५ ले. ३३० }		(१०९)		{ श. १५४१ आषाढ शु. ३
सु. १०२० रजब १ }		फा. मु. व सी.		{ इ. १६१९ जून ४

अज दिवाण ठाणे तपे रोहिडा
दोख व मोक. सेटे महा. व रया व बाजे खुम व बलुते तपे भोर.
तर्फ मा।र गावगना नवी लावणी जाल्यास झाडामागे घ्यावयाचा हक.

सा. ले. १३ }		(११०)		{ श. १५४१ श्रावण शु. ११
सु. १०२० रम ९ }		उल्लेख		{ इ. १६१९ आगस्ट १०

अजर. म. अजम अमजदल मुलुक (ममलकत मदारी).
कार० दोख सेटे. मोक. वगैरे पा। शिरवल
विठल काइदेऊ देसकुलकर्णी उभा राहिला जे, 'आपले दोणें पा। मारीचे मिरासी आहे. हालीं दुसरा करतो. आपणास देववणें.' दिलें.

ऐ. व. २ पृ. ५८ }		(१११)		{ श. १५४१ श्रावण शु॥ १२
सु. १०२० रम १० }		उल्लेख		{ इ. १६१९ आगष्ट ११

मोरोबा गोसावी यांचें को सुपे इनाम चालविण्याबद्दल मलिक अंबर याचा रोखा.

ऐ. व. २ पृ. ५७ ले. २ }		(११२)		{ श. १५४१ आश्विन शु॥ ८
सु. १०२० जिल्काद ७ हि. }		फा. मु. सी. व मज.		{ इ. १६१९ आक्टो. ६

अज दिवाण र. खास.
कारकून देसमूख पा. सुपे व मुकासेदार, व त्याचे हुदेदार व मोकदम मौ कुंभारवळण पा। मजकूर.

मोरोबा गोसावी यास कुंभारवळणची जमीन १ चावर हक्कासह इनाम आहे तीं चालविणें. याकुदखान व मलिक अंबर यांचींहि हुजती व रोखा (श. १५३९ व १५४०) आहे. तरी चालविणें. (हा ले. दुबार झाला)

त्रै. व. २ पृ. ५७ } (११३) { श. १५४१ आश्विन शु॥ ९.
सु. १०२० जिल्काद ७ } फा. मु. व सीमा { इ. १६१९ आक्टो. ७

अजर. खास (इब्राहिम इब्न अफजलखान फा. मुद्रा)

कारकून व देशमुख पाा सुपे मोकाशी व त्याचे हुदे. व मोक. मौ कुंभारवळण पाा माार.

मोरोबा गोसावी यास कुंभारवळण येथील जमीन चावर १ बाा हुजती याकुद-खान सु. १०१८ (श. १५३९) व रोखा म. अंबर (सु. १०१९ सवाल २०) दिधली आहे. चालविणें.

इ. वृ. ३४ पृ. ७ } (११४) { श. १५४१ कार्तीक व॥ १०
सं. १६७६ } मु. { इ. १६१९ नोव्हें. २०

जसवंताचे वडील व चिरंजीव विष्णुदास यांच्या नांवची पुये गाव दिल्याची सनद.

खं. १६ ले. ९ } (११५) { श. १५४२ श्रावण शु. ९.
१०२१ रम ७ } खुर्दखत { इ. १६२० जुलै २७

(?) —— विठल गणपती हवाले ताा कानदखोरे

ताा मज० चे देशमुखानें सांगितल्यावरून आज्ञा करितों कीं, तर्फ मज. देश-मुखाचा हलकाजिमा व इसाफती देशमुखाचे दुंबाला केलें असे. देणें.

खं. १५ ले. ४३३ } (११६) { श. १५४२ भाद्र. शु.११
श. } सलोखा पत्र { स. १६२० आगष्ट २८

वासुदेवभट ब्रह्मे —— मुरारीभट ब्रह्मे सौ चाकण

आपणामध्ये पुस्तकांचा कलहो होता तो निवडला. अर्थाअर्थी संबंध नाहीं.

खं. १५ ले. ७ } (११७) { श. १५४२ भाद्र. व.१
सु. १०२१ सवाल १४ } कौलनामा फा. सी. { इ. १६२० सप्टें. २

अज. दि. तपे मसूर —— नरसोजी जगदाळे दोाख व पटेल कसबे मज.

बापाजी मुसलमान हिमातीच्या बळें क. मसूरच्या पटेलगीस दखल झाला. यावर कुल हक जवारीचे गोहीसाक्षीनसी बापाजी दूर केला. तपे मज. देशमुख व क. मज. पटेलगी जगदळे याची त्याचे दुमाला केली असे पाा जैदी महालदार.(प्रारंभीं जगदळे याचा शिका ?)

वै. व. २ पृ. १६१ } (११८) { १५४२ कार्तिक शु. १
सु. १०२१ जिल्काद २९ ? } फर्मान फा. मु. व सी. { १६२० आक्टो. १६

अज दि. र. खास —— कारकून व मोका. का उंबरे

मुला मजन बिन मुला समन माळूम केले 'आपणास इनाम जमीन चावर १ बदल खिजमती मसीद का मंगळूर येथील सा लेहा होती ते सीव कसबे उबरे या खाली गेलें. बाजे मशिदीचे खिजमतीस रोजगार नाही भोगवटी व तसरुफाती उठली. तरी चावर एक व रोजमुरा दरोज रुा देवविणे.) बाा रोखा छ २८ जिलकादी पाा अफजलखां

सा. ले. १०७ } (११९) { श. १५४२ मार्ग. शुद्ध ६
सु. १०२१ जवल. ४ हि. } फर्मान व फा. मु. न. { इ. १६२० नोव्हें. २०

अज दिवाण र. खास

कारकून देशमुख पाा. पुणें, मोकाशी, मोकाशांचे हुदे. मोकदम बाजे कर्याती पाा पुणें.

हुजती मलजी
हुजती रणनवरा } श. १५३९;
हुजती जाधराऊ

हुजती मुधुजी नाईक { श. १५४०
रोखा मलिक अंबर { श. १५४२

ह्या ५ पत्रांप्रमाणें रामकृष्ण भट व विष्णुभट बिन महादभट ठकार गोसावी यांस लेखांतील घोरपडी सुसैत, रोटी, नानगाव या गावांची जमीन इनाम दिली आहे. त्यांजकडे चालविणें.

इं. फॅ. मा. १ पृ. २१० } (१२०) { श. १५४२ मार्ग. शु. ११
इ. } कन्सल्टेशन–सुरत { इ. १६२० नोव्हें. २५

आग्र्याहून लमाणाचीं पत्रें आली. लमाण बऱ्हाणपुराहून येणार. परंतु **बऱ्हाणपूरला दक्षिण्यांचा वेढा पडला** असून आसपासचा मुलूख त्यांचे ताब्यांत आहे. लाहोरहून बादशाही सैन्य दक्षिण्यांचे पारिपत्याकरितां निघालें आहे. तेव्हां लमाणाला मांडूला थांबण्यास सांगावें. आवासच्या डोंगरांतून येऊं नये. कारण तेथेंहि एकदा काफिला लुटला गेला आहे.

इं. फॅ. मा. १ पृ. २१० } (१२१) { श. १५४२ मार्ग. शुद्ध १५
इ. } सुरत–सभा { इ, १६२० नोव्हें. २९

दक्षिण्यांबद्दल इंग्रजांचें प्रतिकूल मत. खानखानान हा मलिक अंबराविरुद्ध मोंगली सेनापती

आपल्या कंपनीचा माल दक्षिण्यांचे तळावरून नेणें अधिक सुरक्षित. कारण तेथील राजा समर्थ असून भरपाई करण्याबद्दल त्याला भाग पाडतां येईल. कारण चौलपासून त्याचीं स्वतःचीं एकदोन गलबतें तरी व्यापारानिमित्त निघत असतात ... बऱ्हाणपूरला वेढा घालणाऱ्या दक्षिणी सेनापतीचा परवाना घ्यावा. परंतु तसें करतांना मोंगलांपासून धोका उद्भवूं नये म्हणून खानखानानलाहि कळवावें.

इं. फॅ. भा १ पृ. २१० } (१२२) { श. १५४२ पौष वद्य ६
इ. } सुरत – कन्सल्टेशन { इ. १६२१ जाने. ३

बऱ्हाणपुराहून हेनेसचें पत्र – मलिक अंबरच्या परवान्याशिवाय लमाण जाऊं शकत नाहीं. जमत नसेल. आवासच्या देशांतून जाण्याकरितां परवाना मिळवावा.

सा. ले. १३ } (१२३) { श. १५४२ माघ शु॥ १२
सु. १०२१ जवल ११ } महजर { इ. स. १६२१ जाने. २५

अग्रवादी – विठल काईदेऊ देसकु. परग. शिरवळ देसकु. आपली मिरासी. लंबे बडे हैबतखान यांचे फर्जंद हैबतखान यांचे कारकीर्दीस श. १५३५ पासून पैदा होऊनु कुसूर व हरकती करिताती. हाली परगणे मज. साहेबास अर्जाने जाला आहे. लंबा यास बोलावून फर्माविले पाहिजे. आपली मिरासी. रवा करीन.

पश्चमवादी – रुद्राजी दादो व दादाजी भूपालराऊ व रंगोजी भूपालराऊ लंबे. गणो रुद्र यानें सांगितलें कीं, पर. मज. देसकु. आपली मिरासी. आपले वडिली विठल काईदेऊ याचा आजा उखोवा ठेविला होता. त्यावरी आपले वडील व्यापार करावयासी गेले. ते तागाईत आपले कुलकर्ण विठल काइदेऊ कुलकर्णी खातो.

सिरवळ, वाई, सासवड, पुणा, गुजण मावळ या महालीचे देशमुख देसक वगैरे मंडळींनीं गोही दिधली कीं, विठल काइदेऊ कदीम मिरासी लंबे गैरमिरासी. तेव्हां महजर, कौल, लुगडी याप्रमाणें देऊन माहाली कुळकर्ण चालवूं लागलों. यावरी सीत असर अलफमध्यें (श.१५३७) हैबतखानाची धरणी पाठवून आपणासी (लेकेंरेंबाळे व दोस्तसुद्धां) धरून वाईस नेऊन कोटांत राखिले. रोज मार करीत व पैके मागत. मग वाईचे देशमूख वगैरेंनीं आपले बाबे हैबतखानास अर्दास लिहिली कीं विठल काईदेऊ व लंबे याची मुनसफी केली पाहिजे. येथें मुनसफी होऊन आपण मिरासी कुलकर्ण चालवूं लागलो. यैसियामध्यें सन १०१८ (श. १५३९) मध्यें मुलुख सुलो खालें हजरती साहेबास (रायाराऊ साहेब) दिधला. दादी केली पाहिजे. यावरी (उपस्थितांपैकीं) काजी बोलिले. ममलकत मदारी साहेब विसा वर्षांचा मोगोटा मोडीत नाहींत. हुजूर जाऊन निवाडा करणें. मग आपण फत्तेनगरास (दौलताबाद) गेलों. मदारी साहेबानी वादीस हुजुर बोलावुनु हमजाई महालीचे देशमुख यांच्या सह्या आणिल्या. व मुनसफी केली कीं विठल काई-

देऊ लंबेपेक्षां खरा मिरासी होये. आपण आपला मुलगा परगणे मजकुरी पाठविला. लंबे याने ठाणेदार याचे आगे हरकती केली. त्यावरून मुलगा फत्तेनगरास आला. व मदारी साहेबांकडून पुन्हा खुर्दखत घेतले. पुढे हर दोजण आगा अजम साहेबाकडे गेले. त्यानीं चौकशी केली. त्यांत लंबा कोणी देखिला नाहीं ठरले. पुढें हाजीर मजालसी बोलिले "कोणापासी कागद कैसे आहेत." लंबा कागद न दाखवीच. विठल काइदेऊ याने सर्व कागद दाखविले. मुनसिफी मनास आणतां विठल काइदेऊ मिरासी खरा; लंबे खोटे; तुवा कुलकर्ण खाऊन सुखे असिजे.

इ. फॅ. भा. १ पृ. २३१ } (१२४) { १५४२ माघ वद्य १२
इ. } सुरत—सभा { १६२१ फेब्रु. ८

कालरात्रीं मांडूचें पत्र आलें-**मलिकंबरचें शिक्याचे** लेखी फर्मान सर्व सैन्यांतून व मुलखांतून सुरक्षितपणाबद्दलचें मिळालें. मोंगलांच्या मुलखावरील स्वारीचा दक्षिण्यांचा मुख्य सेनापति **याकुतखान** याच्या शिक्याचा दुसरा परवानाही मिळाला. त्यानें मुलखांतून सुरक्षित घालविण्याकरितां आपलें २ लोक बरोबर दिले.

सा. ले. ८ } (१२५) { श. १५४२
सु. १०२१ } कौलनामा ता. { इ. १६२०

आप्पाजी मल्हारजी व तुकाई देशमुख प. शिरवल
विठल काईदेऊ देसकु. पा सिरवल

हैबतखानाचे कारकीर्दीस पैकियाच्या बलें लंबे दर मुकाम लस्कर खडकी तुझे देसकु. चे मिरासीवरी उभे राहिले होते. हैबतखाने लंबे यासी दुरी केले. त्यावरी तुम्ही फर्मान व मलिक अजमाच्या किताबती घेऊन आलेसी. त्यावरी तमाम देसक व मिरासी मेळवून बोलिले की, मिरासी विठल काईदेऊ याची. लंबे गैर मिरासी. तरी कुळकर्ण तूं चालवणें.

त्रै. व. २ पृ. ५८ ले. ३ } (१२६) { १५४३ चैत्र शु. ४
सु. १०२१ जवल ४ } फर्मान फा. सी. { १६२१ मार्च १७

अजर दिवाण र. खास

कारकून देसमुख पा सुपे मोकाशी व मोकाशाचे हुदेदार व मोक. कसबे सुपे.

मोरावा गोसावी याच्या सांगण्याप्रमाणें, बा हुजती याकूदखान सु. १०२० जखर १ व रोखा मलिक अंबर (२९ जिल्हेज १०२१), मोरावा गोसावी यास इनाम १ चावर जमीन तेल वगैरे पूर्वीप्रमाणें चालवीत जाणें.

खं. १५ ले. ३८८ } (१२७) { श. १५४३ चैत्र शु. १३
सु. १०२१ जवल १२ } खुर्दखत फा. मु. व सो. { इ. १६२१ मार्च २५

अजर. रा. संभाजी राजे —— कारकून पा। पांडियापेडगौं

✓ रामेश्वरभट व चिंतामणभट उपाध्ये यासी मुकासा मौजे जातेगौ दो बाा खुर्दखत रा. थोरले राजे (विठोजी राजे) दिधले आहे. तरी चालविणे.

खं. २० ले. ६९ } (१२८) { श. १५४३ वैशाख वद्य ५
श. } { इ. १६२१ एप्रिल ३०

रामा चित्राव —— नारायण व रंगोबा व गोपिनाथ चित्राव वाई

मौजे नवी किन्ही व बोरखळ यामध्यें गोपिनाथाचा अर्ध व तिघाचा अर्ध. यामध्यें २० वर्षे अमच्या पुत्रास व अम्हास संबंध नाहीं. त्याउपरि आपला विभाग नूतन साधिला असे.

सा. ले. ११४ } (१२९) { श. १५४३ आषाढ व. २
सु. १०२२ साबान १४ } खुर्दखत फा. मु. व सी. { स. १६२१ जून २४

रायाराऊ —— देसमुख व कारकून पा। पुणा

महादेभट पुरंदरे अग्नहोत्री मालुम केले "आपणास बदल धर्मादाऊ इनाम जकाती पा। मा। पैकी रु. ३ आहे. मोगवटे गुम जाले. मलिक अजम सिदी याकूद याही खातिरेसी आणून रुके चालते केले. आपण खुा मऱ्हामत केलें पाहिजे." तरी चालविणें.

स. पृ. १०१ ले. १ } (१३०) { श. १५४३ आश्विन शु. २
सु. १०२२ जिल्काद १ } खुर्दखत { इ. १६२१ सप्टें. ७

अजर. रा. येकोजी राजे — कार. मोक. को जिंती पा। पांडियापेडगांव

कानभट बिन राम पाठक का। मा।र मालुम केले जे, 'आपणांस चावर १ दो नख्त व बाबा बदल धर्मादाऊ अजरामऱ्हामती केला असे. खुर्दखत राजश्री आहे. चालवीजे.

इं. फॅ. मा. १ पृ. २६७ } (१३१) { श. १५४३ आश्विन शु. ३
इ. } आग्रा — सुरत { स. १६२१ सप्टें. ८

मनसूरखान दक्षिण्यांकडून फुटून बऱ्हाणपुरला शहाजाद्याकडे आला. त्याचा मोठ्या सन्मानानें सत्कार केला.

स. पृ. ४१ } (१३२) { श. १५४३ आश्विन व. ७
श. } महजर { इ. १६२१ सप्टें. २७

रामाजी बिन बापोजी मोकदम व कानोजी बिन धावजी विरतीकर मो। माळ-

शिरस पाा सुपे यास मौ टेकवडी व मो पिसर्वे प्रा पुणें शिवेचा कर्कशा ७१८ वर्षे होता. कारकीर्द निजामशहा मलिक मदार महमद यापाशीं दो गावचे चौगलीयानी रवा काढिला दोघेहि खोटे जाले. मग माळशिरकराशी शाबाजी अली महालदार राव मलिक यांनीं जमीन दो ठाई वाटून दिल्ही. **यावरी साहेबास (रायाराव) मुकासा अर्जानी जाला.** साहेबीं शिस्त दिली जे शिवेची माती आणून श्रीवटेश्वर (सासवड) ऐरणी दिव्य घेणें. काना बिन धोंडी वृत्तिकार मौजे माळशिरस दिव्यीं उतरला.

इ. वृ. ३४ पृ. ७ सं. १६७८	(१३३) मुद्रा	श. १५४३ कार्तिक शु. १ इ. १६२१ आक्टोबर. ६

दिवान महाराजाधिराज महाराणा श्रीदुरंगबाजी यानी विस्णदास यास मो पाणीबारा कृपापूर्वक देाा कुलबाब दिले.

सा. ले. १४ सु. १०२२ जिल्हेज ५	(१३४) खुर्दखत	श. १५४३ कार्तिक शु. ७ इ. १६२१ आक्टोबर १२

रायाराव——— जनाब, ठाणदार, कारकून देाास पाा शिरवल

पाा मारच्या देाार्णाचा मुशाहिरा जो काही कारकीर्द हैबतखान चालिले तेणेप्रमाणे कुलकर्णी यास ताकीद करून देवविणे.

सा. ले. १५ सु. १०२२ मोहर २३	(१३५) मिसेली फा. मु. व सी.	श. १५४३ मार्ग. व. १० इ. १६२१ नोवें. २८

शिरवळ पााचे ठाणेदार व वरिष्ठ अधिकारी रायाराऊ ?

तुकाई व तान्हाजी निगडा देाास पाा शिरवल

विठल कायेदेऊ देाार्णी याचे बाबे लिहिले तरी तुम्हापासून व तुमचे वंशीं ब्राह्मणहत्या सात पिढिया जाली नाहीं पुढेहि घडेना ये बाबे आमचा खातिरजमा आहे. धायुगडे याचे ये बाबे गुमान धरावे तरी त्यामधे सात पिढिया मैत्री आहे. त्यापासून ऐसा अमल घडेना. तुम्ही बिठोबावरी जैसी कृपा करीत होते तैसीच रामाजी विठलावरी करीत जाणे.

सा. ले. १७ सु. १०२२ मोहर २४	(१३६) खुर्दखत फा. २ मु. व सी.	श. १५४३ मार्ग. व. १० इ. १६२१ नोवें. २९

रायाराव पााशिरवल ——— ठाणदार व कारकून पाा शिरवल

रामाजी वि. देशकुार्णी मालूम केले जे, 'हली आपला बाप विठल कायदेऊ यासी आकसकोसीस करून गुमसुदपणें मारा करून जिवे मारिले. आपला बाप देाार्ण चालवीत असतां हरयेक खरीदीफरोख्त जिन्नसाची जकाती माफ असे. हली तसी माफी असावी.' माफ केली असे.

त्रै. व. ४ पृ. ४८ } (१३७=११४ अ) { श. १५४२ ज्येष्ठ शु.१२
सु. १०२१ रजब १० } { इ. १६२० जून १

(?) ———— मोकाशाचे कारकून व देशमूख

उमारामे मालूम केले, आपला वालीद देसपांडेपण करीत होता. तो मयत जालियावरी ता इसरीन आपण करितो. दरम्यान कान्होजी करकसा करून चालवितो. साहेबी दुन्हाही दिधली. कान्होजी पळोन गेला. वालिदे उमारामे जैसे चालिले तेण्हेप्रमाणें चालविजे.

इं. फॅ. भा. १ } (१३८) { १५४३ आश्विन व. ६
पृ. २७५ इ. } बटेव्हिया संयुक्त रक्षण-मंडळाची सभा { १६२१ सप्टें. २६

इंग्रज व **डच** उभयतांनीं मिळून एक आरमार तयार करून मलबार किनाऱ्यावरील **पोर्तुगीजांचा** व्यापार जबरदस्तीनें हस्तगत करण्याचा बेत केला आहे. त्यास तेथून झामोरीनची मदत मिळाली तर पहावें. शिवाय व्यापाराकडेही लक्ष ठेवून इराणचें आखात व मोझांबीक इकडेही जाऊन यावें इ. ठरलें.

इं. फॅ. भा. १ } (१३९) { १५४३ आश्विन व. ३०
पृ. २८७ इ. } रॉबर्ट जेफ्रीज (चौलरोड)--ई. इं. कं. { १६२१ आक्टो. ५

नुकत्याच आपल्या कंपनीचे बाबतींत घडलेल्या एका विलक्षण अपघाताची बातमी सुरतेच्या कौन्सिलला मिळाली. लाहोर व आग्र्याहून माल घेऊन येणारा एक काफिला रॉबर्ट हचिसन याचे नेतृत्वाखालीं येत होता. **दख्खनच्या एका राजाचा संरक्षक मलीक अंबर** (Protector to one of the kings of Decany) यानें मोंगलांच्या मुलखावर स्वारी केली असल्यामुळें मलीक अंबरचा कौल घेणें भाग पडलें. तो घेतला असतांनाही विश्वासघातानें हचिसनचा काफिला लुटला गेला....दाभोळ, चौल आदिकरून बंदरें मलीकाच्या पक्षाचीं आहेत; त्यांवर सूड उगवावा असा बेत करून आम्हीं गलबतें पाठविलीं. परंतु तो बेत फसला. ...दाभोळमध्यें आम्हांला बऱ्या रीतीनें वागविलें व **आदिलशाही** सुभेदार **मलीक याकूत** यानें रसद व देणग्या पुष्कळ दिल्या. ...चौलला आम्ही २८ सप्टेंबरला आलों. केरिजच्या सांगण्यावरून **मलिकंबरानें** नुकसान भरपाई करण्याबद्दल पत्रानें अभिवचन दिलें असें समजतें.

इं. फॅ. भा. १ } (१४०) { १५४३ कार्तिक शु. ६
पृ. २९६ इ. } देवगड (चौलजवळ)--सुरत. { १६२१ आक्टो. १०

आग्र्याकडील काफिला लुटल्याबद्दल रदबदली करण्याकरितां जाणारे इंग्रज लिहितात: इंग्रजांनीं एक गलबत पकडल्यामुळें **मलिकंबरला** वठणीवर आणणें थोडेंसें अधिक सुलभ होईल. सिद्दी अंबर, सिद्दी याकूत व सिद्दी रैहन हे सिद्दी सुरूर याला चांगलें वागवावें असें सुचवितात.

इं. फॅ. भा. १ } (१४१) { १५४३ कार्तिक व.५
पृ. ३१५--१७इ. } मलीक अंबरकडील वकीली { १६२१ आक्टो. २५

मलीकंबरानें दौलताबादजवळील नोकीरीच्या तळावर पोर्तुगीज दुभाष्यामार्फत बोलणें केलें. गलबत पकडलें तेंच ध्यावें व काफिल्याची भरपाई मागूं नये. एका हातानें गलबत पकडतात आणि दुसरीकडे लमाणाबद्दल नुकसानीची भरपाई मागतात; तर इंग्रजांना कांहीं न्याय आणि सदसद्विवेकबुद्धि आहे कीं नाहीं ?' ......विजापूरच्या इब्राहिम इदलशाहाचा-**मलिकंबरला** तळ्यांत बुडवून मारण्याचा-बेत (फसला.) मलिकानें वजीराची मानखंडना करून कैदेंत टाकलें. ......नजराण्याचे गालिचे सुलतान व मलिक अंबर यांच्यांत वाटून घेतले.......**मोंगल हे इंग्रजांचे दोस्त** असून दक्षिण्यांचे शत्रु आहेत.

इं. फॅ. भा. १ } (१४२) { १५४३ कार्तिक व. ५
पृ. ३१७ इ. } जेफ्रेज--सुरत { १६२१ आक्टो. २५

आग्रयाकडील लमाणांच्या लुटीची जबाबदारी **मन्सूरखान** (नांवाचा सरदार) खडकीहून मोंगलांकडे फुटून मिळाला त्याचेवर घालितात.

इं. फॅ. भा. १ } (१४३) { १५४३ कार्तिक व. १०
पृ. ३१८ इ. } { १६२१ आक्टो. ३०

मलीकाच्या वजीरांपैकीं एकजण (जाधवराव) त्याला सोडून पळाला.

इं. फॅ. भा. १ } (१४४) { १५४३ मार्ग. शु. ३
पृ. ३१८--३२३ इ. } बऱ्हाणपूर--सुरत { १६२१ नोव्हें. ६

शहाजाद्याच्या दरबारांत मुख्य सल्लागार **अफजलखान** व खोजा अबदला इसन; **रुस्तुमखान** गुजराथचा सुभेदार व **इसाकबेग** सुरतेचा (बंदरचा) सुभेदार व्हावयाचा आहे.

इं. फॅ. भा. १ } (१४५) { १५४३ मार्ग. शु. ४
पृ. ३२३--३२८ इ. } सुरत--कंपनी { १६२१ नोवें. ७

[३२४] आग्ऱ्याच्या काफिल्याचा सूड उगविण्याकरितां आम्हीं दाभोळ व चौल येथील गलबतें पकडणार आहोंत हें ऐकून **मलिकंबर** सलोख्याचें बोलणें बोलूं लागला म्हणून जेफ्रेज त्याच्याकडे गेला. [३२५] डच लोक सुरतेंत राहून दाभोळ, दीव, चौल उध्वस्त करण्याची कारवाई करितात. [३२८] **मलिकंबराकडून** रॉबर्ट जेफ्रेज अपयश घेऊनच परत आला.

ई. फॅ. भा. १ } (१४६) { १५४३ मार्ग. शु.१४
पृ. ३३२ इ. } बऱ्हाणपूर-सुरत { १६२१ नोव्हें. १८

......इकडील बातमी अशी—शहाजादा इकडेच आणखी दीड वर्ष रहाणार आहे. दक्षिण्यांचा **एक मोठा सेनापती जदूराय हा त्यांचे पक्षांतून फुटून शहाजाद्याला जाऊन मिळाला** असून त्याचा मोठा सन्मान करण्यांत आला आहे. विजापूरच्या राजाला फर्मान गेलें आहे कीं 'शहाजाद्याच्या तुलेच्या वेळीं (५।१।१६२२) खंडणी पाठवावी व बादशाही वकील व सैनिक यांचे हातीं हिऱ्यांची खाण द्यावी. नाकबूल केल्यास युद्धास तयार व्हावें.' बऱ्हाणपूर जवळ दक्षिण्यांचा मोठा तळच पडला आहे. **खानखानान आणि मलिकंबर या उभयतांनीं मिळून दख्खनचे सुलतान आणि सर्व मुलूख विश्वासघातानें जहांगीरचे हवालीं केला असा प्रवाद आहे.** इराणचा राजा कंदाहारपर्यंत चालून आला आहे.

सा. ले. १६ } (१४७) { श. १५४३ मार्ग. व. ११
सु. १०२२ मोहर २४ } खुर्दखत { इ. १६२१ नोव्हें. २९

रायाराऊ पा। शिरवल —— जनाब, ठाणेदार व कार. पा। शिरवल

रामाजी विठल यास पा। मा॥च्या देशांचा मुशाहिरा व हक चालिले असेल तेणेप्रो चालविजे.

सा. ले. १८ } (१४८) { श. १५४३ मार्ग. व. ११
सु. १०२२ मोहर २४ } { इ. १६२१ नोव्हें. २९

पा। शिरवळचे वरिष्ठ अधिकारी —— आपाजी मल्हारजी देशख पा। शिरवल

वऱ्हाड (लग्न) करून येणें. पुढें ले. १३५ प्रो.

त्रै. व. ४ पृ. ४७ } (१४९) { श. १५४३ माघ शु. १३
सु. १०२२ रवल १२ } महजर फा. मज. व मु. { इ. १६२२ जाने. १५

उमाराम व कान्होजी त्रिमल देसपांडियेपदाबदल भांडताती—

अग्रवादी–उमाराम आपला वालीद. रामाजी देशपांडियेपण करीत असतां भाऊ मारला गेला. यावरी रामाजीनें देसपाडेपन आपनासी दिधले, यावरी रामाजी मयत जाला ते वख्ती कारकीर्दी, **मोगल मुकासा मिर्झा खां (जाकडे होती).** ते पासून कारकीर्दी मोगल वा कारकीर्दी हजरती साहेबु चालत आहे. दरम्यान कान्होजीनें हिमातीनें चालविलें. त्या मागती मुलूख साहेबासी अर्जानी जाला. **मालोजी राजे व मोगल (तर्फेचा) बीरसिंग देऊ** यांचीं खुर्दखतें आहेत.

पश्चिमवादी कान्होजी त्रिमल– आपला +डील आपल्या वडिलाचा लेकु......

म्हणोन देसपांडेपण आपण चालवितों. रामाजी मेलियावर उमाजीस देसपांडेपण दिधलें. वगैरे......

खुर्देखतें व न्याय मनासी आणितां देसपांडेपण उमाजीचें उमाजीस दिधलें आहे.

खं. १५ ले. ३८९ } (१५०) { श. १५४३ माघ व. १०
सु. १०२२ रवल २४ } मिसेली फा. मु. व सी. { इ. १६२२ जाने. २६

अज दिवाण पाा पुणा—— हुदे., मोक., रया, मो वडिगौ पाा पेडगौ.

(रायाराऊ सो) यांचा हुकूम कीं "रामेस्वरभट साा आर्वीमुद्गल यास इनाम जमीन वाहातीकास रुके १२ मौजे वडिगाऊ येथील, हैबतखान व मलिक अजम ह्यांचें कारकीर्दीपासून चालिले आहे. हाली विलायती साहेबास अर्जोनी जाली आहे." तरी चालविणें."

सा. ले. १९ } (१५१) { श. १५४३ फाा व. ३
सु. ? रखर १६ } महजर { इ. १६२२ फे. १८

(सद्याच फक्त असल्यामुळें सारांश दिला नाहीं.)

इं. फॅ. भा. १ } (१५२) { १५४३ फाल्गुन व. ३
पृ. ३१७ टीप १ इ. } { १६२२ फेब्रु. १८

गोवा गवर्नर—किंग फिलिफ.

'इब्राहिम अदिलशहाचे मनांत मलिकंबर बद्दल गैरविश्वास आहे' [लिस्बन ट्रॅन्स्क्रिप्ट.]

इं. फॅ. भा. २ } (१५३) { श. १५४३ फाा व. १२
पृ. ४९ इ. } मच्छलीपटण—सुरत { इ. १६२२ फे. २६

'आम्हीं ऐकतों कीं तुमच्याकडे पुष्कळ सुंदर घोडे आहेत. पूर्वीं मागणी केल्यावेळीं दख्खनमध्यें युद्धें चालू होतीं तीं आतां संपलीं आहेत. तरी एक घोडा पाठवा.'

सा. ले. २२ } (१५४) { श. १५४३
सु. १०२२ } उल्लेख { इ. १६२१

या लेखांकांत "सन इसने कारणे हाऊजी बिन साऊजी कामिथा राऊ आजमापासी (रायाराऊ) फिर्यादी जाले" असा उल्लेख आहे.

खं. १५ ले. ३९० } (१५५) { श. १५४३
सु. १०२२ } कबूलकतबा { इ. १६२१

भुज व सोन मेहतरी व तेली कसबे वावी

कुमाजी पाटील; अजहती विठोजी राजे भोसले मोकदम कस. वावी पा॥. संगमनेर माजी मोकदम बाउजी आपणापासुनु घानबुडी खात होता; त्याप्रमाणें तुम्ही घेणें.

सा. ले. ३२१ } (१५६) { श. १५४३
सु. १०२२ } { स. १६२१

कामगार अजगाव पा॥ कुडाल यास. भानजी देसाई याजकडे बाग चालवा.

त्रै. व. ४ पृ. ४९ } (१५७) { श. १५४३
सु. १०२२ } { इ. १६२१

रा. मालोजी राजे —— कारकून व दोख पा॥ खेडले.

उमाराम देसपाडियाने मालुम केले जे 'आपले कुलकर्ण; दरम्यान कान्होजी हरकती करितो.' तरी कुलकर्ण याचे दुमाला कीजे.

सा. ले. १८८ } (१५८) { श. १५४४ चैत्र शु. ६
सु. १०२३ जवल ५ } कौलनामा फा. मु. { इ. १६२२ मार्च ८

अज दिवाण पा॥ सिरवल— रामाजी विठल देसकुलगर्णी.

तुमचे मिरासी सेत कसब्यांत आहे. बिठल कायदेव कटकास गेल्यावर मागे ते सेत हाउजी अर्डा प्रज दिवाणीच्या महसुलाबदल कीर्दी करून उगवणी करीत होते. सन इहिदेस विठ. काय. गावास गाला. तेव्हां हाउजी बोलला 'आज पेरणीचा हंगाम आहे. अवंदा आपणास पेरूं देणें. दिवाळीपासून तुमचे सेत तुम्ही करणे.' त्याबरी विठल कायदेवास मारले. मग तुकाई देसमुखीण इनें तुमच्या तर्फे विनंती केल्यावरून हा कौल दिला आहे.

स. पृ. ६२ ले. ४५ } (१५९) { श. १५४४ चैत्र व. १
सु. १०२२ जवल १५ } पोटपत्र { इ. १६२२ मार्च १८

अजर. अंबरखान

महादो त्रिमल हवाल० महंमद अलिखान हुदेदार मौ. चिमणगांव

देवजी लक्ष्मण व चिंतो लक्ष्मण कुळकर्णी व ज्योतिषी मालूम केले जे "मौजे मज. कुलकर्ण व ज्योतिष मिरास आपली, रामाजी नागनाथ सोनवडे उम्राणीकर लायनी गरगशा करूं लागले. त्यावर हरदोजण मायणीस बडेखान साहेबाचे बंदगीस जात होते. वाटेंत म्हणाले फिर्याद न जाणे. बलुते मिरासदार सांगतील तसें करूं. बलुत्यानीं मिरास देवजी व चिंतो यांची असें लिहून दिले. रामाजी नाकबूल गेला. त्यावर परस्थळ कोल्हे येथें रवा केला. आपण खरे जालो" तरी ज्योतिष कुलकर्ण वरील इसमांकडून घेणें.

खं. २० ले. ४ } (१६०) { श. १५४४ वैशाख शु. ५
श. } { इ. १६२२ एप्रिल ६

सिदोजी व अंतोजी गोलडा — बाबदेभट जोसी धर्माधिकारणी का। सुपे

आपण दुकळाकरिता तुटलों. खावयासी नाहीं' आपला जीउ राखीला पाहिजे म्हणउनु तुम्हास आपला घरवाडा विकत दीधला असे. तुम्हापासून घेतले होन अडीच, व गला जोंरी, पासोडी अर्धे जुनी इ. आपला वौसीचा उभा राहिला त्यास गाली असे.

इं. फॅ. भा. २ } (१६१) { श. १५४४ अ. आषाढ व. ७
पृ. ९४ इ. } आग्रा-सुरत { इ. १६२२ जून २०

'आग्रा येथील दोन्ही सुभेदारांची मनसब प्रत्येकीं एक हजार घोड्यांनीं कमी केली आहे. याचें कारण, धोलपूर येथील जहागिरीबद्दल सुलतान शहारिअर व खुर्रम यांचा वाद चालू असतां त्यांत त्यांनीं शहारिअरला खुर्रमविरुद्ध मदत केली नाहीं.'

स. पृ.३९ ले. ३९ } (१६२) { श. १५४४ आषाढ व. १४
सु. १०२३ रम २७ } महजर { इ. १६२२ जुलै २७

ले (१३२) प्रमाणें शिवेच्या वादाचा मजकूर. शरीफ अल्ली हेजीब याकुबखान याचा उल्लेख आहे.

इं. फॅ. भा. २ } (१६३) { श. १५४४ श्रावण व. ६
पृ. ११२ इ. } बऱ्हाणपूर-सुरतफॅक्टरी { इ. १६२२ ऑग. १७

'खुर्रम अजमीरकडे जात असतां जहांगीरनें त्याला बंदी केली. तो बऱ्हाणपूरला परत येईल अशी वदंता आहे. आपला लहान मुलगा व दाराबखान (खानखानाचा दुसरा मुलगा) वगैरे सरदार यांना तो ठठ्ठाचे संरक्षणार्थ पाठविणार...खानखाना सल्ला घेण्याकरितां मांडूला जाणार आहे. तेथें इराण्यांना मदत केल्याबद्दल आणि ठठ्ठाला माणसें दारुगोळा आमच्या गलबतांतून (इंग्रजांच्या) पाठविल्याबद्दल आमच्यावर वहीम घेण्यांत येईल. तर तो आम्हीं नाकबूल करूं.

खं. २० ले. ६८ } (१६४) { श. १५४४ भाद्र. शुद्ध ७
सु. १०२३ जिलका ५ } खुर्दखत { इ. १६२२ सप्टें. १

अजर. हैबतखान —— आतामली नायब गैबत व कार. पर. वाई

सुदामसेटी बिन सोनसेटी पाटणे पर. मज. यांस पूर्वीपासून वाई येथें जमीन, इतर कांहीं गोष्टी इनाम आहेत त्या चालविणें.

सा. ले. २८९ }
सु. १०२३ जिल्काद १९ }
(१६५)
खुर्दखत ता.
{ श. १५४४ भाद्रपद व. ५
{ इ. १६२२ सप्टें. १५

अजर. म. श. म. अंबर ——— कार. व दोख मामले गुलसनाबाद (नाशिक).

भट जुनारदार को नासीक मालुम केले जे 'आपण गोदातीरी स्नानसंध्या करुनु साहेबासी द्वा देउनु असतो. आपणास सिहस्त पटी दर सिहस्ती माफ आहे.' हाली सिहस्त येउनु गुदरला ते माफीचे खुर्दखत हाली पाहिजे. तरी पटी माफ असे.

खं. १५ ले. ३९१ }
सु. १०२३ मोहर ७ }
(१६६)
खुर्दखत मु. व सी.
{ श. १५४४ कार्तिक शु. ९
{ इ. १६२२ नोवें. १

अजर. आबा सिद्दी अबदुल नबी व सिद्दी महमद

हुदे. व मोकदम मौजे वडगऊ ता पेडगांऊ का पाटस पा पुणें

✓ रामेश्वरभट नारायणभट सो आरवीमुद्गल मालूम केले जे 'आपणासी इनाम जमीन चावर वाहतिकास देखील मळय रुके ·। बारा दर सवाद मौ मार आहे. **हाली साहेबास सालमाराकारणे मुकासा अर्जानी जाला** आहे. खत होये.' तरी दुमाला कीजे.

सा. ले. ११५ }
सु. १०२३ मोहर १० }
(१६७)
खुर्दखत मु. व सी.
{ श. १५४४ कार्तिक शु. १२
{ इ. १६२२ नोव्हें. ४

अजर० मुधोजी नाईक

कारकून पा पुणें व मोकाशाचे हुद्दे० मोक० मौजे पिपलेसौदागर

महादेभट बिन मुद्गलभट पुरंधरे सेकीन पुणें मालूम केले, "आपणास चावर १ इनाम दिधलिया तुम्हांस आशीर्वाद देऊन असो." तरी त्यास १ चावर जमीन कसबे मजकुरीं दिली आहे. त्याचे ताब्यांत देणें.

सा. ले. ११७ }
सु. १०२३ मोहर १० }
(१६८)
उल्लेख
{ श. १५४४ कार्तिक शु. १२
{ इ. १६२२ नोवें. ४

मुधोजी नाईक —— महादभट बिन मुद्गलभट पुरंदरे सो पुणें.

पिंपळे सौदागर येथें एक चावर गजशरायणी कुलबाब दिला असे.

खं. १५ ले. ३९२ }
सु. १०२३ मोहर २९ }
(१६९)
खुर्दखत मु. व सी.
{ श. १५४४ मार्ग. शु. १
{ इ. १६२२ नोव्हें. २३

अजर० रा. संभाजीराजे—— कारकून दोख, पा पांडियापेडगाव तरफ करडे.

✓ मुद्गल व कृस्णभट बिन बाबदेऊभट सो चाकण. यास बदल धर्मादाऊ इनाम

बदल दान सूर्यग्रहण जमीन काळाकीर्दी चावर एक मौ बेलवडी दो नख्तयाती व बाबा कुल दिधले असे. जमीन मोजून हदमाहदूद घालून प्रज नेमून हुजूर खबर लिहिणें. चालवीत जाइजे.

खं. १५ ले. ३९३ } (१७०) { श. १५४४ मार्ग. व १३
सु. १०२३ सफर २६ } मिसेली मु. व सी. { इ. १६२२ डिसेंबर २०

अज दिवाण ठाणे देहाये पा पांडियापेडगौ व तरफ कडेई समत मार
हुदे. मोक. मौ बेलवडी
(ले. १६९ प्रमाणें सर्व मजकूर.)

इं. फॅ. भा. २ } (१७१) { श. १५४४ पौष शु. ५
पृ. १७२ इ. } अहमदाबाद–सुरत { इ. १६२२ डिसें. २६

शहाजादा शहाजहान याचें बंड सुरू झालें किंवा होणार असा सर्वांचाच समज आहे. कित्येक ठिकाणीं सुरवातहि झाली. तेव्हां आग्र्यापर्यंतचा रस्ता धोक्याचा आहे. राजाचा तळ लाहोरकडे फार लांबीवर आहे.

इं. फॅ. भा. २ } (१७२) { श. १५४४ पौष. शु. ७
पृ. १७६ इ. } भडोच–सुरत { इ. १६२२ डिसें. २९

येथील गव्हर्नरला **खुर्रमचें पत्र**– 'अहमदाबादचा राजा पंचहजारी केला व त्याला आमचेकरितां आग्र्याच्यां संरक्षणार्थ पाठविलें.' रुस्तुमखान पंचहजारी केला. तसेंच इतरांना कांहीं दिलें. बरेच जण आग्रा व अजमीर रोखें रस्ते रोखून धरण्यास पाठविले. पेलवान सफीदला काढून टाकून त्याची जागीर घेतली. गुजराथेंतील इतर बादशहाच्या पक्षाचे लोकांनाहि व गुजराथचे सरदारांना असेच लुबाडले. काय होईल तें परमेश्वर जाणे.

सा. ले. ११७ } (१७३) { श. १५४४ पौष व. १
सु. १०२३ रवल १५ } उल्लेख { इ. १६२३ जाने. ७

खान सरकसखान —— महादभट बिन मुद्गलभट पुरंदरे सो पुणें.
मौ पर्वतीमध्यें नख्त व दो बाबी चावर १ गजशरायिनी दिले असे.

इं. फॅ. भा. २ } (१७४) { श. १५४४ माघ शु. ६
पृ. १८८ इ. } अहमदाबाद–सुरत { इ. १६२३ जाने. २६

इकडे बातमी अशी आहे कीं, शहाजहानचा खजिना (cassanna) अहमदाबादला पुनः परत आला. युद्धाची सामुग्री शहाजादा शहाजहान याच्याकडे पाठवून देण्याबद्दल हुकूम आहे. महमद हुसेन शहाजाद्याच्या वतीनें खंबायतचा सुभेदार झाला. बंडाची उभारणी अनेक ठिकाणीं व्हावयाची असून शहाजहान लवकरच येथून जाईल.

इं. फॅ. मा. २ } (१७५) { श. १५४४ माघ व. ६
पृ. १९६-९७ इ. } आग्रा-सुरत { इ. १६२३ फेब्रु. १०

हल्लीं बातमी अनिष्ट आहे. **शहाजादा (खुर्रम)** फत्तेपूरसिक्रीस आला असून त्यानें आपलें सैन्य (१६००० घोडे) आग्न्यावर रवाना केलें. त्यांनीं मोठी लूट केली. जहांगीर खात्रीनें आग्न्याला येईल. असफखान लालाबीरसिंगाचे हातांत कैदी आहे.

खं. १५ ले. ३९४ } (१७६) { श. १५४४ माघ व. ३०
सु. १०२३ रखर २८ } खुर्दखत मु. { इ. १६२३ फे. १९

अजर. रा. संभाजीराजे सो
कारकून देहाये पा पांडियेपेडगौ तरफ करडे.
(ले. १६९ प्रमाणें) प्रज बाबाजी मुलाणा हा नेमून दिधला. इनाम दुबाला कीजे.

खं. १५ ले. ३९५ } (१७७) { श. १५४४ फा शु. ८
श. सु. १०२३ जवल ७ } वाटप व पावती पत्र मु. व सी. { इ. १६२३ फेब्रु. २७

✓ रा. खेलोजी राजे, मंबाजी राजे, नागोजी राजे, परसोजी राजे, त्रिंबकजी राजे, ककाजी राजे ——रामेशभट व चिंतामणीभट गोसावी

तुम्हापासी रा. ताबाई आवाने ठेवणे ठेविले होते नख्त २१०० होन व सोने १०८ तोळे. हे तुम्ही आमचे आम्हासी खडकीस आणौनु दिधले. पैकीं मालबा रायाचा वाटा मालबासी देउनु वाटे सा होन १८०० व तोळे ९० सोने आमचे आम्हासी पावले.

सं. ६ पृ. ९२ } (१७८) { श. १५४४ फाल्गुन शु.८
सु. १०२३ जवल ७ } कबूल कतबा फा. मु. व सी. { इ. १६२३ फेब्रु. २७

/ रा. **मालोजी राजे** (शहाजीचा चुलतभाऊ) रामेशभट व चिंतामणीभट गोसावी. तुमचेपाशी रा. ताबाई आवानें ठेवणें ठेविलें होतें. २१०० होन व १०८ तोळे सोने. ते तुम्ही अवघिया भावाचा वाटा दिधला. पैकीं आमची तकसेमेस दिधले होन ३०० सोने तोळ १५ ते पावले.

खं. १५ ले. ३९६ } (१७९) { श. १५४४ फा व. १३
सु. १०२३ जवल २६ } मिसेली मु. व सी. { इ. १६२३ मार्च १८

नरसो दामोदर हवालदार व कारकून देहाय पा पांडियापेडगौ.
हुदे. मौजे बेलवडी ता कर्डी

✓ मुद्गलभट कृष्णभट सो पुणे यांचे बेलवडी येथील इनाम जमीनीस प्रज नेमून दिधला त्याच्या मंजुरीचें पत्र.

इं. फॅ. भा. २
पृ. २१४--१५
इ.

(१८०)

श. १५४४ फाल्गुन-
१५४५ चैत्र शु. १२
इ. १६२३ मार्च--ए. २

गोव्याबंदर, कॅपटन् मायकेलग्रीन------ सुरत प्रेसिडेंट.

इब्राहिम अदिलशहाकडून येथें अनेक पत्रें आलीं कीं 'इंग्रज व आपण यांमध्यें कायमचा तह व्हावा. मुख्य हेतु उभयतांनीं मिळून पोर्तुगीजांना गोवें वगैरे मुलखांतून हाकून लावावें. गोव्याला इंग्रजांनीं वेढा घातला आहे तो आणखी जारीनें चालवावा.' मुत्सद्दी पाठवून बोलणें केल्यास पोर्तुगीजांची जमिनीचे बाजूनें रसद मारण्याची हमी तो घेतो. इतका बंदोबस्त करावयाचा म्हणतो कीं, अल्पावधींत गोवें इंग्रजांचे हातीं यावें. आतां पावसाळा नजीक आला आहे व गोवेंकरांचीं गलबतें सज्ज आहेत. इ. सांगून आम्हीं तो तहाचा प्रकार कालावधीवर टाकीत आहों.

सा. ले. ३२२
सु. १०२३

(१८१)
फा. मज.

श. १५४४

गणेसा देसाई परगणे कुडाल यानीं मालूम केले कीं, भानजीचे देसाईगिरी व बागइ आपले दिमत केले आहे. दिवाणपैके + + तरी बाग तुम्ही व ते कांहीं करावी.

सा. ले. ३३३ कों. इ. सा. ८४
सु. १०२३

(१८२)
फा. मु.

श. १५४४
इ. १६२२

विठ शेणवी नाडकर्णी पा कुडाल यास फर्मान कीं,

तुमच्या विनंतिवरून भानजी प्रभू, बाये प्रभू यास मुकरर केलें आहे. वसुलातीचा तालुक यांच्याशीं आहे.

जर्नल बॉ. रॉ. ए. सो. १९१७
पृ. १४२३ हि. १०३२

(१८३)
फारशी शिलालेख

श. १५४४
इ. १६२२--२३

शहाजहान आपली जिंदगी व परिवार अशीरगडचे किल्लेदाराचे स्वाधीन करून पूर्वेकडे गेला. सुलतान पर्वीझ याचेशीं किल्लेदारानें दोन वर्षें लढाई दिली. [पहा १५८९ फाल्गुन शु. ६-शिलालेख].

नै. व. ४ पृ. ४९
सं. १६७९

(१८४)

श. १५४४
इ. १६२२

महाराजा बीरसिंगदेऊ ---- कान्होजी त्रिमल

बाखबरदार रही जो. देसपांडिये का काम तूही सूठो थो सो दया. है.

पे. डे. व्हॅ. पृ. ७२ } इ. } (१८५) { श. १५४५ चैत्र शु. २ { इ. १६२३ एप्रिल १

चौल हा गांव व तेथील एक टेकडी पोर्तुगीजांच्या ताब्यांत आहे. त्यावर त्यांनीं किल्ला बांधला आहे. पूर्वी तो निजामशहाचा होता, परंतु त्याचें पोर्तुगीजाशीं युद्ध सुरू झालें तेव्हां त्यानीं ही टेकडी काबीज केली. यामुळें आतां चौल गांव सुरक्षित झाला आहे. सभोंवारचा मुलूख मात्र निजामशहाचा आहे. (श. १५४५ चैत्र शु. १४) एप्रील ४ तारखेस चौल बंदरांतून निघून दंडाराजपुरी बंदराच्या जवळून गेलों. हें एवढेंच बंदर निजामशहाच्या ताब्यांत आहे. तेथून पुढें गेल्यावर निजामशाहाची हद्द संपून आदिलशाही लागली.

एप्रील ५ (पृष्ठ ७७) आम्ही तिसरे प्रहरीं **दाभोळ** शहराजवळून गेलों; तें आदिलशाही राज्यांतलें आहे.

इं. फॅ. भा. २ } पृ. २१८ इ. } (१८६) अहमदाबाद–सुरत { श. १५४५ चैत्र शु. १५ { इ. १६२३ एप्रिल ५

काल अनेकांचीं पत्रें आलीं. त्यावरून **बादशहाचें लष्कर व शहाजादा (शहाजहान) यांचेंमध्यें युद्ध** बिलूचपूरला होऊन उभयतांकडील ५००० लोक मेले. विक्रमजित अहमदाबादचा राजा व रुस्तुमखान व त्याचा मुलगा इत्यादि कामास आले. शहाजहानला माघार खावी लागली. अबदलाखान व राजा सूरसिंग यांनीं त्याचा पाठलाग केला. जहांगीर खुद्द आग्र्याकडे गेला. येथें बातमी येईल त्याप्रमाणें राजपुत्राचा खजिना लुटून ताब्यांत घेण्यास मिर्झा मुकीम टपून बसला आहे.

खं. २० ले. ७० } श. } (१८७) खंडपत्र { श. १५४५ चैत्र वद्य ७ { इ. १६२३ एप्रिल ११

रामेश्वर, नारायण, व रंगभट चित्राव —— गोपिनाथभट रुद्रभट चित्राव

✓ तुमचे वा आमचे वाडे दोनी ते वांटून घेतले... जमीन बोरीखल व कणई येथील पाउणा चावर. स्थावराचे विभाग जाहाले. जंगम तरी वडिलानी वांटून दिल्हे होते.

इं. फॅ. भा. २ } पृ. २२२ इ. } (१८८) आग्रा--सुरत { श. १५४५ चैत्र व. ११ { इ. १६२३ एप्रिल १६

जहांगीर अजमीरचे पिराला जात आहे. पिराची आज्ञा होईल त्याप्रमाणे खुर्रमचा बंदोबस्त करणार. हल्लीं युद्ध बंद आहे. परंतु शहाजहान व बादशहा जवळजवळच आहेत. बादशहा फत्तेपूर शिक्रीला व शहाजहान १५ कोसाच्या अंतरावर हिंदान येथें आहे.

इं. फॅ. भा. २ }
पृ. २२९ इ. }

(१८९)

मच्छलीपटण--सुरत

{ श. १५४५ वैशाख शु. १०
{ इ. १६२३ एप्रिल २९

आमची विक्री इतकी कमी होण्याचें मुख्य कारण **बादशहा व शहाजादा** यांची लढाई चालू आहे. फेब्रुवारी १८ चे सुमारास आमचे लोकांनीं दाभोळ जाळलें व २ गलबतें पकडलीं अशी बातमी आली आहे.

सा. ले. २० }
सु. १०२३ रजब ११ }

(१९०)

{ श. १५४५ वैशाख शु. १२
{ इ. १६२३ मे १

रामाजी विठल दोर्णी म्हणतो, आपला बाप विठल काइदेऊ आपली मिरासी चालवीत होता. त्यासी आकसकोसीस करून जिवे मारिला. यावरी आपण रायाराऊ पाशी बोलिलो जे आपण जनोबदार आहे. आपणासी दोर्णाचा हक पुरत नाही. आपणासी काही इनाम मन्हामती केला पाहिजे. यावर तीही आपणासी इनाम चावर येक रास दो बाब दिला आहे. यैसियास पाा मजकूर साहेबास मुकासा अर्जानी जाला. ताजिया खुर्दखताचा उजूर करिताती. तरी हुजती रायाराऊ प्रमाणे चालवीजे.

सा. ले. २१ }
सु. १०२३ रजब २५ }

(१९१)

महजर

{ श. १५४५ वैशाख व. १२
{ इ. १६२३ मे १५

रामाजी विठल काइदेऊ दोर्णी पाार शिरवल व भूपालराऊ व गणोरुद्र लंबे यांचा दोर्णाविषयीं तंटा. त्यांत सु. १०१४ व १०२२ (श. १५३५ व १५४३) मध्यें झालेल्या ह्याच दोघांमधील दोर्णाबद्दलच्या महजरांचा उल्लेख आहे. शेवटीं; लंबे मजकुरापासी मालुमातीची खुर्दखतें होतीं तीं फाडिलीं. लंबे माार खोटे केले. रामाजीस देसकुलकर्ण दिलें.

इं. फॅ भा. २ }
पृ. २३६ इ. }

(१९२)

अहमदाबाद-सुरत

{ श. १५४५ ज्येष्ठ शु. ६
{ इ. १६२३ मे. २५

काल रात्रीं सफीखानकडे २ फर्मानें आलीं. सुलतान बुलाखी, खुश्रूचा मुलगा येणार आहे. बादशहा येणार अशासारखी तयारी चालू आहे. येथें दरबार येऊन देशांत सुबत्ता होईल अशी लोकांना आशा वाटते. **सुलतान पर्वीज** ८० ह. सैन्यासह खुर्रमचा झपाट्यानें पाठलाग करीत आहे. तो आतां मांडूपासून २० मैलांवर आला आहे. बादशहा आतां अजमीरकडे आहे.

इं. फॅ. भा. २ }
पृ. २३७ इ. }

(१९३)

सलाड-सुरत फॅक्टरी

{ श. १५४५ ज्येष्ठ शु. ९
{ इ. १६२३ मे २८

बादशाही सैन्य गुजराथेंत येऊन त्यानें शहाजहानाला गुजराथेंतून (अहमदाबादेंतून) काढून लाविलें.

इं. फॅ. भा. २ } (१९४) { श. १५४५ ज्येष्ठ व. १०।१२।१४
पृ. २३९-४० इ. } अहमदाबाद-सुरत फॅक्टरी { इ. १६२३ जून १२।१४।१६

अहमदाबादला जहांगीरचें सैन्य जमून शहाजहानचे लोकांशीं त्याची घनघोर लढाई झाली. शहाजहानचे बाजूनें अबदल्लाखान लढला. त्याचा पराजय झाला. परंतु जाधवराय ४००० फौज व रसद घेऊन मांडूहून कुमकेस आला. (या वेळीं जाधवराय शहाजहानला मिळाला होता.)

खं. २० ले. ७६ } (१९५) { श. १५४५ ज्येष्ठ व. १२
सु. १०२३ साबान २५ हि. } फर्मान { इ. १६२३ जून १४

[बादशहा अदिलशहा] ----- याकूतखान हवालदार व कारकून हिसार जावली

नीम चावर जमीन दर मौजे वझरडा किले जावली नारायणभट बिन गोपीनाथ भट चिताराव यास दरवक्ष इनाम चालू आहे. तरी ती पूर्वीप्रमाणें चालूं ठेवणें.

खं. १६ ले. १० } (१९६) { श १५४५ आश्वीन व. १०
सु. १०२४ जिल्हेज २४ } मिसेली { इ १६२३ आक्टोबर ९

अज जानीब मा। अंबर

सिद्दी अंबर अबदुल वाहद हवालदार व साबाजी नारायण सबनिवीस किले कोंढाणा.

कान्होजी झुंझारराऊ दोख ता। कानदखोरे मुा। वजारतमाब पतंगराऊ राजे तो नफर साहेबाचा आहे. त्याचा हकलाजिमा राऊ अजमाचे कारकून तहसील करून नेताती. तरी हुजरून मस्यारुनइलेचें हेजिबास फर्माविले असे.

इं. फॅ. भा. २ } (१९७) { श. १५४५ कार्तिक शु.५
पृ. २८३ इ. } गलबतावरील कन्सल्टेशन { इ. १६२३ आक्टो. १८

मलिकंबराशीं बोलण्याचे मुद्दे:–काफिला अचानक दक्षिणी सैन्यानें लुटला. त्याबद्दल बादशहाकडे मागणी करावी कारण, (१) बादशहाच्या स्वतःच्या मुलुखांत लूट झाली; (२) शहाजादा खुर्रम यानें, अपराध्यांचे विरुद्ध तक्रार करून न्याय मागितला असतां, मुख्य गुन्हेगारांना संरक्षण दिलें. (३) या गुन्हेगारांचे मालमत्तेवर छापा घालून आम्ही आमची भरपाई करून घ्यावी तर त्यांचे मालाला गलबतांतून सुरक्षित नेण्याआणण्याचें मोंगली सरकारच मनावर घेत आहे. (४) शेवटचा मुद्दा असा कीं, मलिकंबराच्या कौलामुळें आमचा काफिला अशा तऱ्हेनें त्याच्याचकडून लुटला गेला तो **मलिकंबर आतां जहांगीरचा ताबेदार झाला आहे.** (is become a subject unto Jahangeer Paudshah). म्हणून बादशहाला लुटीचा फायदा मिळाला असलाच पाहिजे. त्यांतून त्यानें आमची (महमूदी १३६०६९.) नुकसानभरपाई करावी.

इं. फॅ. भा. २ } (१९८) { श. १५४५ कार्तिक शु. ५
पृ. २८२ इ. } { इ. १६२३ आक्टो. १८

मोखाहून अबदुल मलिक या नांवाच्या मलिकंबराच्या गुलामानें मालकाची इस्टेट गुप्त रीतीनें गलबतांतून हिंदुस्थानांत पाठविली.

इं. फॅ. भा. २ } (१९९) { श. १५४५ कार्तिक व. ३०
पृ. ३१३ इ. } मच्छलीपटण–सुरत { इ. १६२३ नोव्हें. १२

शहाजहान ह्या राज्याचे (गोवळकोंड्याचे) हद्दींत सुमारें १२ आक्टोबरला शिरला. त्यानें कोणालाही त्रास न देतांना १५।२० दिवसांत बंगालकडे जाण्याचें कबूल केलें. तो नोव्हें. ५ ला मच्छलीपटणला आला.

इं. फॅ. भा. २ } (२००) { श. १५४५ मार्ग.शु. १
पृ. ३१९ इ. } सुरत–प्रेसिडेंट रास्टेल { इ. १६२३ नोव्हें. १३

खुर्रमची बातमी दिवसेंदिवस अधिक कायम होत आहे. जहांगीरचें शरीर सुजलें असून तो बेशुद्ध असतो. खुर्रम व पर्वीज यांच्या भेटी होऊन एकी झाली. बापाच्या मृत्यूनंतर खुर्रमनें बादशहा व्हावें व पर्वीजनें वजीर व्हावें असें मान्य झालें. बाप जिवंत असे तोंपर्यंत संकटाचा इशारा खुर्रमला पर्वीजनें देण्याचें कबूल केलें. खुर्रमचें २५००० सैन्य आहे. त्यानें एका राजाच्या विधवेशीं लग्न केलें आहे. कांहीं मदत देण्याचें अभिवचन देऊन मलिक अंबरानें आपली काळी मुलगी त्याच्या गळ्यांत बांधली आहे. हें खरें असेल तर खुर्रमला आपण नजराणा केला पाहिजे. कारण त्याचें महत्त्व आतां पुनः वाढेल.

सा. ले. २९८ } (२०१) { श. १५४५ मार्ग. व. ६
सु. १०२४ सफर २० } उल्लेख फा. मु. नकल { इ. १६२३ डिसें. ३

हुजरून——— कारकून को नाशीक

गणेश प्रभु व हारवाजी प्रभु व कृष्णाजी देव धर्मातकारणी यांचे धर्मातकरण व मुलेपण इत्यादि हक्क पूर्वीप्रमाणें चालविणें.

सा. ले. ११७ } (२०२) { श. १५४५ फा व. १
सु. १०२४ जवल १५ } उल्लेख { इ. १६२४ फेब्रु २५

सरकसखान——— महादभट बिन मुद्गलभट पुरंधरे सो पुणें
मौजे पिंपरी येथील जमीन चावर १ इनाम दिली आहे.

शि. प्र. पृ. ९०	(२०३)	श. १५४५ फाल्गुन व. ११
सु. १०२४ जवल २५	खुर्दखत	इ. १६२४ मार्च ५

अजर. यानतराऊ —— कारकुन तपे वालवा

देसक व मोकदम तपे मज० इलतमेसी केले. सिद्धेस्वर मोकाम सिरगाऊ याचे अभिसेखाबदल सभूभट बिन लक्ष्मिधरभट सेकिन सिरगाऊ यास धर्मादाऊ देणे गाव-गना होतु सात.

खं. १५ ले. ३९७	(२०४)	श. १५४५ फाल्गुन व. १२
सु. १०२४ जवल २६	खुर्दखत फा. मु. व सी.	इ. १६२४ मार्च ६

अजर. **विठोजी राजे** —— कारकु. पर. सिरवळ

रामेस्वरभट व चिंतामणिभट मालूम केले "आपणास संकल्पाची वरात जकाती पर. मज. वरी दिधली आहे. हनोज (अद्यापि) आदा केली नाहीं." तरी बा वरात आदा कीजे.

आठल्ये सं.	(२०५)	श. १५४५
सु. १०२४	फा. मु. व सी.	इ. १६२३-२४

अजरख्तखाने राजश्री विठोजीराजे— बजानब कारकुनानी प्रगणे सिरवळ बिदानद रामेश्वरभट व चितामणी भट उपाध्ये हुजूर मालूम केलें जे आपणास संकच्या (?) दिवाणी जकाती पा मावरी दिधले आहे हनोज आदा केली नाहीं तरी संकच्या वरातेस दिरिंग लावणें काय दुरुस्त आहे ? आतां ह्या वरात आदा कीजे.

शि. प्र. पृ. ९३	(२०६)	श. १५४६ वैशाख व १२
सु. १०२४ रजब २६	मिसली	इ. १६२४ मे ४

अज दिवाण तपे वालवे— हुदेदार व मोकदम कसबे वाळवे.

मौजे शिरगावच्या श्रीसिद्धेश्वरदेवास अभिषेक व्हावा म्हणून तपे मारच्या देसक व मोकदम यांनीं सांगितलें कीं, संभट बिन लक्ष्मीधरभट जपे यास पाऊ चावर जमीन मौजे मारपैकीं द्यावी. तरी दिली असे.

खं. १६ ले. ११	(२०७)	श. १५४६ वैशाख व. ३०
सु. १०२४ रजब २९		इ. १६२४ मे ७

अज दिवाण मामले राएर व बारामावळे हवाले इभराईमखान हवा. व कार. मामले मज० ——— कान्होजी झुंझारराऊ देसमू. तपे कानदखोरे

कान्होजी मालूम केलें "**साहेबास माहाल अर्जानी जाला आहे**. साहेबी मसलतींबदल आपणियासी लोक फर्माविले. आपले इनामाचे खुर्दखत होए." तरी इनामती वगैरे दुमाला केली असे.

सा. ले. १९८; रु. ३ ले. २२ } सु. १०२५ जिल्काद १० } (२०८) खुर्दखत मुद्रा { श. १५४६ भाद्रपद शु. ११ { इ. १६२४ आगस्ट १४

अजर० मलिक सर्क मलिक अंबर ——— देसमुख भोर तपे रोहिडा

बहिरो गणपती लाइनी फिर्यादी लिहिताती "देसमुख ठाणियास येऊन दिवाणकाम चालवीत नाहींत. कमीन एक दो रोजा येऊन दिवाणकाम चालवितो," तरी बहिरो गणपतीस लिहिलें आहे.

सा. ले. १९९ रु. ३ ले. २३ } सु. १०२५ जिल्काद १० } (२०९) फा. मुद्रा { श, १५४६ भाद्र. शु. ११ { इ. १६२४ आगस्ट १४

अजर० मलिक सर्क मलिक अंबर ——— बहिरो गणपत मजमूदार तपे रोहिडा.

देशमुखाची अर्दास कीं "गावगना हिंडोन सचणी करा म्हटिले ते न होती. ठाणा कुणबी आल्यास मोकल द्यावे. विलायती गस्ती करून लावणी करीत नाहीं" तरी उगाच कैफतीच लिहितोस. कीर्दी करवीत नाहीस. येणे अमले तुझी पैरवी नाहीं. कीर्दी उगवणी करविजे.

सा. ले. २०० रु. ३ ले. २० } सु. १०२५ जिल्हेज २ } (२१०) मु. ८ कोनी { श. १५४६ आश्विन शु. ३ { स. १६२४ सप्टेंबर ५

अजर० मलिक सर्क मलिक अंबर ——— देशमूख तर्फ भोर तपे रोहिडा

बहिरो गणपती मजुमदार याजवली खुा दोनी होती. (१) यको नारायण ठाणदार व तिमाजी नरसीह मजमूदार दुरी करून बहिरो गणपती मजमूदार पाठविला आहे. (२) मजमूदारास तैनाती दरमाहे होन १२ आदा करणे. माजी मजमूदारास तैनात होन ६ असेत. बहिरो गणपती लाईनी फिर्यादी लिहितो; लावणी करीत नाही. ठाणा बसून राहतो. याविषयी बहिरो गणपतीस अलाहिदा लिहिलें आहे.

सा. ले. २३७ } सु. १०२५ जिल्हेज २ } (२११) ताकीदपत्र फा. मु. सी. { श. १५४६ आश्विन शु. ३ { इ. १६२४ सप्टं. ५

अजर. मलिक शर्क मलिक अंबर——कृष्णाजी बांदल देशमूख.

तर्फ भोर व रोहिडा येथून १२ साबानचा अर्ज आला तो २३ सवालला पोचला. त्यांत असा मजकूर आहे कीं 'राइरेश्वरच्या डोंगराच्या एका बाजूस भोरचा मुलूख व व दुसऱ्या बाजूस हिरडसमावळचा मुलूख आहे. असें असून कृष्णाजी बांदल हा सर्व पठाराची जमीन आपली असें म्हणून जमातीच्या बळें भूमी आपल्या तप्याखालीं घालतो.' तरी नीरा नदीच्या थडीच्या सिवेचे निवाडा जाला असोन उगाच करकसा करतोस याबद्दल तुला ताकीद करणें योग्य आहे. नवी जिकीर न कीजे.

खं. १५ ले. ४३४ } (२१२) { श. १५४६ आश्विन शु. ७
श. } इनामपत्र न. { इ. १६२४ सप्टें. ९

देशमूख, शेटे, महाजन, देशकु० मेहतरे चौधरा समस्त लोक चाकण

मुरारभट बिन गंगाधरभट ब्रह्मे

"सदरहू संवत्सराकारणे पाऊस मुलखा गेला. लोक परागंदा होऊ लागले. अवघे मिळून तुम्हासी बोलिले; रोजा १०।१२ मध्यें **पाऊस पडेल कीं न पडेल?**" उत्तर दिधले; "दिवसा दहामध्यें **पर्जन्य पडेल" उदंड पडिला**. याकरितां तुम्हा वरसासन धर्मादाव टके २५ दिधले असेती.

त्रै. व. १ अं २।३ पृ. ३५ } (२१३) { श. १५४६ कार्तिक शु. ८
सु. १०२५ मोहर ६ } खुर्दखत फा. मु. व सी. { इ. १६२४ आक्टो. ९

अजर० मलिक सर्के मलिक अंबर —— कारकून व देशमूख पर० पुणा

गणो गबाजी तबीब सो पुणे मालुम केले; "आपणास इनाम जमीन बाग, कुरण, आंबे पेड मौजे वेऱ्होडे देहू, देणें हैबतखान आहे. तरी पूर्वीप्रमाणें चालविणें." चालवीजे.

खं. १५ ले. ३३१ } (२१४) { श. १५४६ कार्तिक शु. १४
सु. १०२५ मोहर १२ } खुर्दखत फा. मु. व सी. { स. १६२४ आक्टो. १५

अजर० मलिक शर्के मलिक अंबर —— कारकून तपे राहिडा

हेजिब तर्फ मज० मालूम केले "तर्फ मजकुरीच्या देसमुखास व देसाईयास इजाफती वगैरे जो आहे तो चालविण्याबदल खुर्दखत होये." तरी इनाम वगैरे पूर्वीप्रमाणें चालविणें.

सा. ले. २०१ } (२१५) { श. १५४६ कार्तिक व. ८
सु. १०२५ मोहर २१ } { स. १६२४ आक्टो. २४

अजर० म. शर्के म. अंबर—— देसमूख तर्फ भोर तपे रोहिडा

'अर्दास कीं माहाली कारकून आपल्या पोटस्ताबदल कमीनाची लाइणी फिर्यादी लिहिताती.' तरी पेसजी जाब सादर असे.

सा. ले. २३८ } (२१६) { श. १५४६ कार्तिक व. ९
सु. १०२५ मोहर २२ } अर्जाचें उत्तर–फा. मु. सी. { इ. १६२४ आक्टो. २५

अजर. मलिक सर्के मलिक अंबर.—कान्होजी देसमूख तर्फ भोर तपे रोहिडा.

तुमचा २९ जिल्हेजचा अर्ज १५ मोहरमला पोचला. राइरेश्वरचा डोंगर, भोर, हिरडस मावळ, व वाई यांच्या विलायती दरम्यान आहे. एका बाजूस कारी, वडतेंबी व

कोरले या गांवांची व दुसऱ्या बाजूस हिरडस मावळामधील दोन चार गांव यांची सीव डोंगरास लागली आहे. असे असोन **कृष्णाजी बांदल** देशमूख तपे हिरडस मावळ यानें सत्ती लावली आहे कीं 'समुर्दा पाठारीची भोई आपलिया तपियाखालीं आहे;' आणि कुणब्यांना सेत करूं देत नाहीं. तरी राइरी व रोहिडें येथील हवालदारांना (कृष्णाजी बांदलास बोलावून निवाडा करण्याबद्दल) हुकूम पाठवावा. वगैरे तुम्ही लिहिले. तरी कारकुनांना भेटा.

पेद्रो. डी व्हे. प्र. ब्रु. पृ. २२१ इ. (२१७) श. १५४६ कार्तिक व. ३० इ. १६२४ आक्टोबर ३१

गोव्यास अशी बातमी आली आहे कीं, आदिलशहाविरुद्ध बऱ्याच दिवसापासून मलिकंबरानें जें युद्ध चालविलें होतें त्यांत शेवटीं त्याचा जय होऊन त्यानें आदिलशाही सैन्याचा सेनापती मुल्ला महमद यास कैद केलें. हा सेनापती आदिलशहाच्या फार मर्जींतला होता; आणि त्याचें मलीकाशीं वांकडें होतें. तें इतकें कीं त्यानें मलिकास विष घालण्याचा देखील प्रयत्न केला होता; यामुळें मुल्ला महमदावर सूड घेण्याचा मलिकाचा मुख्य हेतु होता. यामुळें तो हातीं सापडतांच, असें म्हणतात कीं, त्याची लष्करांतून धिंड काढून लोकांना जाहीर रीतीनें कळविलें कीं, "चालू युद्धाच्या व आदिलशाही आणि निजामशाही यांत उद्भवलेल्या विरोधाच्या मुळाशीं हा दुष्ट मुल्ला महमद आहे; हा नसता तर या दोन राज्यांत मैत्री राहिली असती; याकरितां सार्वजनिक शांततेचा बिघाड करणाऱ्या या दुष्टास आदिलशाहींतून व जगांतून नाहींसा करण्यासाठीं देहांतशासन देण्यांत येत आहे." यावरून आदिलशहाशीं विरोध करण्याचा आपला मुख्य हेतु नसून मुल्ला महमदानें केलेल्या उपद्व्यापाबद्दल शासन करावयाचें आपल्या मनांत आहे असें मलिकंबर भासवूं पहातो. पण आदिलशहाचे याबद्दल काय विचार आहेत तें कळलें नाहीं. या युद्धांत मोगलांनीं आदिलशहाची बाजू उचलून धरून त्याला २० हजार घोडेस्वार पुरविले होते असें म्हणतात. पण तें कांहींहि असलें तरी आदिलशाहाचा नेहेमीं पाडाव होतो आणि कधीं कधीं तर त्याच्यावर मोठेंच संकट ओढवतें. मलिकंबर हा शूर सेनापती असून तो थेट विजापूर शहराच्या वेशीपर्यंत चालून आला होता; आणि आदिलशहा आपल्या राजधानींत वेढला गेला होता. थोडया महिन्यापूर्वी आदिलशहानें आपल्या एका पट्टराणीला ठार मारलें; कारण ती मलिकंबरास बातमी पुरवीत असे आणि तिनेंच हें युद्ध घडवून आणलें. हल्लींचा आदिलशहा स्वभावानें व नाकर्तेपणानें लोकांना अप्रिय झाला असून त्याला पदच्युत करून त्याच्या मुलाला गादीवर बसवावें असें तिच्या मनांत होतें; आणि हा कट उघडकीस आला तेव्हां तो राजपुत्रहि मारला जाण्याचा संभव होता. याखेरीज अशीहि बातमी आली कीं, गोव्याच्या सरहद्दीवर असलेल्या समुद्र किनाऱ्यावरच्या आदिलशाही प्रांतावरच्या सुभेदारास आदिलशहानें कैद केलें. या सुभेदारानें पोर्तुगीजांची अनेक

वेळां कुरापत काढली होती. आणि तो आतां कैद झाला यावरून आदिलशहाच्या मनांत पोर्तुगीजांशीं स्नेहसंबंध ठेवावयाचा आहे असें दिसतें. जुन्या सुभेदाराच्या जागीं खोजा रिझा (Choiza Riza)याची नेमणूक झाली आहे; हा इराणी पूर्वी दाभोळ येथें सुभेदार होता. आतां देखील त्याला दरबारांत अधिक काम असल्यामुळें तो आपल्या एखाद्या हस्तकास येथें पाठवील आणि तो पोर्तुगीजांचा स्नेही असल्यामुळें यांचे संबंध गोडीगुलाबीचे राहातील.

सा. ले. २०२ } (२१८) } श. १५४६ पौष शु. ६
सु. १०२५ रवल ४ } मुद्रा } इ. १६२४ डिसें. ५

अजर० मलिक सर्क मलिक अंबर— कान्होजी देसमुख तरफ भोर तपे राहिडा

अर्दास केली तेथे मजमून कीं 'तर्फ मजकुरी उगवणी होते; सेरीकर कीर्दीकरितां तकसीराती केली नाहीं. पेस्तर सादिलवार बंदगीस रवाना करीत जाऊं.' तरी कीर्दीबाबे तकसीर न कीजे. ज्याजती नफराई कीजे.

पे. डी. व्हे. प्र. } (२१९) } श. १५४६?
पृ. २०९-१० इ. } } इ. १६२४?

मोगल बादशहानें आपल्या दरबारांत असलेल्या इंग्रजांची कत्तल केली व सुरतेस असलेल्यांना कैद केलें अशी बातमी आली आहे...बादशहाच्या मुलाविषयीं असें म्हणतात कीं, सुलतान खुर्रम याचा दोन वेळां पराभव झाला यामुळें त्याला कुतुबशहाच्या राज्यांत आश्रयास जावें लागलें; बाप त्याचा पाठलाग करण्याचें बंद करून परत राजधानीकडे गेला. यामुळें मुलास आतां स्वस्थता मिळेल. कुतुबशहानेंहि मोगली बादशहाच्या भीतीनें शहाजाद्यास मदत केली नाहीं, आणि त्याला राज्यांतून घालवूनहि दिलें नाहीं; त्याच्या खर्चास तिकडील थोडासा मुलूख लाऊन दिला आहे असें म्हणतात.

सा. ले. १८९ } (२२०) } श. १५४६
सु. १०२५ } तालीक फा. } इ. १६२४

अज दिवाण ठाणे सिरवल— मोकदम, सेटे व महाजन.

आपाजी देसमूख पा सिरवळ यास इनाम कुलबाब दिले असे खुर्दखत २५ सौवाल रोजीं रवाना झालें तें २७ जिल्कादला पोचलें. त्याप्रमाणें देशमुखास बाग व १ आंबा ताब्यांत द्यावा.

सा. ले. २९० } (२२१) } श. १५४७ ज्येष्ठ शु. २
सु. १०२६ रमजा १ } महजर } इ. १६२५ मे २८

नाशीक येथील धर्माधिकरण व सुंदरनारायणाची पूजा गोविंद प्रभूची होती. त्याच्या मागें त्याची बायको व मुलगी याना कर्ज झालें म्हणून घर विकलें व आतां अन्न-

वस्त्र मिळत नाहीं म्हणून बालप्रभूचें १ खंडी गल्ला व २ होन यात्रे व पुजेची तकशीम घ्यावी असा ठाण्याच्या लोकांनीं निर्णय केला.

खं. १५ ले. ३९८ } (२२२) { श. १५४७ श्रावण शु. ४
सु. १०२६ जिल्काद. ३ } खुर्दखत मु. व सी. { इ. १६२५ जुलै २८

अजर. मेहरबान **स्याहाजी** राजे **सरलष्कर** दामदौलतहू कारकून परगणे **पुणे** यास.

रामेश्वरभट बिन नारायणभट जुनारदार सो आरवी यास मौजे वडगौ नजीक पेडगौ कर्याती पाटस पा पुणे यास इनाम जमीन कास रुके ।· दो मलै (प्रज माहाद पाटील ठोंबरा) देखील नख्तयाती व कुलबाब चालते. हाली कारकून ताजा खुर्दखताचा उजूर करतात तो न करणें. हाली **सिस्त** कर्यातीवर जाली आहे. ते मुद्दां तमाम दिलें आहे.

खं.१५ ले.३९९ } (२२३) { श. १५४७ श्रावण शु. ४
सु. १०२६ जिल्काद३ } मिसेली खुर्दखत मु. व सी. { इ. १६२५ जुलै २८

अजदिवाण ठाणे का पाटस पा पुणे
मोकदमानि मौ वडिगौऊ नजीक पेडगौऊ

रामेस्वरभट बिन नारायणभट जुनारदार सो आरवी, हुजूर येऊन मालूम केले जे 'आपणास इनाम जमीन कास रुके ।· देखील मळै दर सवाद मौ मार दो बाब चालत असे. खुा होये' हाली सिस्ती कर्याती मजकुरावरी जाली असे. ते पेस्तर होईल ते तमाम दिधले असे. इनामदार मारावरी जे तकसीम एईल ते दुमाले करणे. जमीन दुमाले करणे.

स. पृ. १६ ले. ११ } (२२४) { श. १५४७ भाद्र. व. १२
सु. १०१६ जिल्हेज २५ } खुर्दखत { इ. १६२५ सप्टें. १८

अजर० मलिक अंबर —— कारकून व देसमूख मामले सोलापूर

चाकरपणा चांदखतीब यास मुशाहिरा इनाम होते ते **हली महाल साहेबास कबजे जहाली** म्हणून इनाम चालविण्याची आज्ञा केली असे.

सा. ले. २२ } (२२५) { श. १५४७ मार्ग. व. ३०
सु. १०२६ रवल २९ } महजर { इ. १६२५ डिसें. १९

मौजे निबोडी पा पुणा. साबाजी अनंत, महमदजी सरनोबत, निलकठराऊ नाईकवाडी किले पुरंदर इ. मंडळी उपस्थित आहेत. राघोजी बिन पील पाटेल सेडकर मोक. मौ चांबिली व हाऊजी बिन साऊजी कमिथा हर दोजणामध्ये मौजे मारचे मोकदमीबद्दलचे करकसा होता. **सन इहिदे कारणे पा मार मुला महमदास देताती.**

अखेरसाली पा मा मुला महमदास मुकासा दिधला. महालासी रायाराऊ आले. यावरी पा शिरवल साहेबासी अर्जानी जाले. **यावरी साहाजी भोसला येदीलशाही थासि गोसमाल देवयाबा साहेब नामजादी घेउनु आले. शाहाजीस गोसमाल देउनु गनिमास सालपा घाटी कोंडिला.** (यानंतर उभयतांत निमे मोकदमीची वांटणी होऊन तंटा मिटल्याची हकीकती आहे.

शि. घ. ले. ३७१ व सा. ले. २३	(२२६)	श. १५४७ पौष व. ७
सु. १०२६ रखर २१	फर्मान–भाषांतर	इ. १६२६ जाने. १०

[इब्राहिम अदिलशहा] ——— कारकून किले पनाळा

शाहाजी भोसले सरलष्कर यानी अर्जदास्त केला की 'कर्यात तळबीडची देसगत व किले पन्हाळ्याचे हक समजी (संभाजी) व धारोजी मोहिते यास द्यावी. हाली ही देसगत ओसाड आहे.' त्यावरून पातशहानी **भोसले सरलष्कर** व मोहिते यांचा अर्ज खातिरेस आणून देसगत मोहित्यास बहाल केली.

खं. १६ ले. १२	(२२७)	श. १५४७ माघ व. ३
सु. १०२६ जवल १७	खुर्दखत ता।	इ. १६२६ फेब्रु. ४

अजर. मलिक शर्क मलिक अंबर— कारकुनानि मामले राईर व बारा मावळे.

हेजीब जुंझार मरळ देशमूख ता। कानदखोरे मामले मा।र यानें सांगितलें कीं, 'आपणास इसाबती देह २ व इनामती सेत २ व विस्वा. इ. भोगवटा हैबतखानादि वजिरांच्या कारकीर्दीपासून चालतो. हाली **आपण सावाजीपंताबराबरी जमेत लोक से ३०० चाकरी करतो. आपला बाप कान्होजी जुंजारराऊ मसलतीमध्ये खर्चला.** तरी साहेबीं नजर एनायती फर्माउनू ताजे खुर्दखत होए.' मागणीप्रमाणें खुर्दखत दिलें आहे.

शि. प्र. पृ. ९०	(२२८)	श. १५४७ फा। व. ४
सु. १०२६ जखर १८	मिसेली	इ. १६२६ मार्च ७

अज दिवाण तपे वालवे

हुदेदारानी वा मोकदमानी कसबा तपे वालवे

सदभट बिन लक्ष्मिधर म्हणतात कीं, आपणासी सिदेस्वराच्या अभिसेकाबद्दल वगैरे इनाम आहे. त्याच्या भोगवट्याचे कागद ताहवेली करतां गेले. खुर्दखत पाहिजे. तरी मिसेली दिले आहे.

कों. इ. सं. ले. ८५ } (२२९) { श.१५४८ वैशाख शु. ६
सु. १०२७ साबान ४ } फा. मु. { इ. १६२६ एप्रील २१

देसाई व नाडकर्णी पा कुडाल यास

तुम्ही बाब सेणवी चेदवणकारबराबरी अरिजा लिहिले आणि सांगून पाठविले त्यावरून भूषण जाहाले व ते तर्फेस स्वारी फर्मावता तुमचे दुःख (दूर होईल) तुम्हीं दिवाण (चे काम) चालविणें.

स. पृ. १७ } (२३०) { श. १५४८ वैशाख शु. ७
श. व सु. साबान ५ } महजर करकंब-भोस { इ. १६२६ एप्रील २२

मावजी व केरोजी यांचे मोकदमीबद्दल भांडण होतें. त्यास गुरसाल या स्थळीं मावजीची मोकदमी असा निवाडा झाला. तो केरोजीला मान्य झाला नाहीं. तेव्हां शिराधडाच्या चिठ्या म्हसोबापुढें टाकून निर्णय करण्याचें ठरलें. तेव्हां शिराची चिठी मावजीच्या हातीं आली. त्यावरून मावजीनें मोकदमी करावी आणि केरोजीनें निमे बापरोटी मात्र खावी व नुकसान आल्यास दोघानीं वांटून घ्यावें असें ठरलें.

खं. २१ ले. ५५ } (२३१) { श. १५४८ वैशाख व. ३
सु. १०२७ साबान १७ } मिसेली. फा. मु. व सी. मज. { इ. १६२६ मे ४

अज दिवाण पा करहाड

मोकदमानी वा रैयानी मौ कोणगाऊ पा मार

आपदेभट बिन कृस्णभट जुनारदार यास मौ मार येथील जमीन चावर ॥ सदकाबदल इनाम आहे ते चालवावे.

खं. १५ ले. ३१२ } (२३२) { श. १५४८ आश्विन शु. १
सु. १०२७ जिल्हेज २९ } फा. मु. मज. व सी. { इ. १६२६ सप्टें. ११

तर्फ रोहिड्याचे देसमुखास हुकूम की, **आगा हैदर मसलतीकरतां पाठविले आहेत** त्याचे मदतीस जाणें.

रु. ३ ले. २ } (२३३) { श. १५४८ कार्तिक शु. २
सु. १०२७ सफर १ } उल्लेख { इ. १६२६ आक्टो. १२

सैद सादत सैद हुसेनु मुकासाईयानी मौजे आकुलवडी पा पुणें

मोरोबा गोसावी चिंचवड

गोरजाई नजीक हउद पैकी मण ॥ (१०) दर सवाद मौजे मार दो नख्तयाती कुलबाब महसुलेसी दिधलें आहे.

इं. फॅ. भा. ३ }
पृ. १५१ इ. }

(२३४)
सुरत-कंपनी

{ श. १५४८ मार्ग. व. ६
{ इ. १६२६ नोव्हें. २९

बंड करून अनेकदां अपयशें पावून बादशाही सैन्याला पाठ दाखवून खुर्रम बंगाल्यांत पळाला. तिकडून मच्छलिपट्टणच्या मार्गानें तो दख्खनमध्यें उतरला. तेथें **मलिकंबराच्या आसऱ्यानें संचार करून** त्यानें शेवटीं आपला श्वशुर असफखान याच्या मार्फतीनें बापाशीं शरणागतीचें बोलणें लावलें.

इं. फॅ. भा. ३ }
पृ. १५३ इ. }

(२३५)
सुरत-कंपनी

{ श. १५४८ मार्ग. व. ६
{ इ. १६२६ नोव्हें. २९

बऱ्हाणपूरला **पर्वीझला विषप्रयोग** झाला. शिवाय तेथील सैन्याधिकारी **खान जहान (लोदी)** हा खुर्रमचा दोस्त असल्यामुळें त्याची चढती कमान आहे.

इं. फॅ. भा. ३ }
पृ. १६१ इ. }

(२३६)
सुरत-कंपनी

{ श. १५४८ पौष शु. ६
{ इ. १६२६ डिसें. १४

ताजाकलम—खुर्रम अचानक सुरतेपासून २० कोसांवर आल्यामुळें सर्वांची गाळण उडून ६।७ दिवस कामें थांबवून राहिलीं. परंतु नजीक न येतां तो **शांतपणें दख्खनकडे त्याच्या ठिकाणीं गेला** (rendezvous). यामुळें बादशहाची पुनः खुषमर्जी होईल अशी बोलवा आहे.

खं. २० ले. ७२ }
सु. १०२७ रखर १२ }

(२३७)
फा. दोन मुद्रा. तालीक

{ श. १५४८ पौष शु. १३
{ इ. १६२६ डिसें. २१

अज दिवाण हिसार जाउली

मोकदमानी मौजे ओझर्डे मुा हिसार मजकूर

नारायणमट बिन गोपिनाथभट चित्राव सो को मजकूर यासी इनाम जमीन चावर ·।। सालगुाप्रमाणें चालवीजे.

इं. फॅ. भा. ३ }
पृ. १७६ इ. }

(२३८)
सुरत-लाहोर

{ श. १५४८ फाल्गुन शु. १
{ इ. १६२७ फेब्रु. ६

बादशहाकडून मिळालेल्या जकातीच्या सवलतीबद्दलच्या फर्मानाचा उपयोग होत नाहीं...भाडोर येथें (नंदुरबार व थैतामध्यें) दख्खनचा सुलतान निजामशाहा याचेकडून **बंड करून आलेल्या जाधवरावाच्या नोकरांना** ३५७॥ रुपये द्यावे लागले.

कों. इ. सा. ले. ८५
सु. १०२७

(२३९)

श. १५४८
इ. १६२६

(?)——— देसायानी व नाडकर्णियानी पाा कुडाल

तुम्ही आरिजा लिहिले. यावरून भूषण जाले... (अपूर्ण)

कों. इ. सा. ले. ८६
सु. १०२७

(२४०)

श. १५४८
इ. १६२६

मीर आझम आक्रम मीर हसन व हवालदार महालान तळकोकण

रा. बाबाजी प्रभु देसाई परगणे कुडाळ यानी हुजूर जाहीर केले कीं, मो सोनेरे-बुद्रुक येथें मिरासी जमीन भोगवट्यास आहे.... (अपूर्ण)

कों. इ. सा. ले. ८७
सु. १०२७

(२४१)

श. १५४८
इ. १६२६

(?)---- कामगार गांवकरान मौजे सोनवडेबुा पाा कुडाळ

देहे माचे मोकासाई कळविलें कीं, जमीन बाबत देसाईगिरी देहमजकूर बाबत होती. ती श्रेष्ठ फर्मानावरून दुंबाला करून दिली आहे.

सा. ले. ३२३
सु. १०२७

(२४२)

श. १५४८
इ. १६२६

मीर आजम आक्रम मीर हसन व महालदार महल्लात तळकोकण

बाबाजी प्रभु देसाई पाा कुडाळ. मौ सोनोरा बुद्रुक येथील नमसी जिराईत जमीन चालू आहे. मोकासदार याने गैरवाका खबर जाहीर केली व जमीन आपले ताब्यांत घेतली. तरी हवालदार यांचे लिहिण्याप्रो विचार व्हावा.

सा. ले. ३२४
सु. १०२७

(२४३)

श. १५४८
इ. १६२६

बाबाजी देसाई पाा कुडाल यानीं जाणावें कीं, मौ सोनोरा बुा येथील मोकासदाराचा मुलगा म्हणतो जिराईत जमीन पडीक आहे; गुरें येऊन त्रास होतो.

इ. वृ. १८३४ पृ. १३९
फ. १०२७

(२४४)
खरीदीखत

श. १५४९ वैशाख शु. १
इ. १६२७ एप्रील ६

तिमाजी व कृष्णाजी; बाप=बायदेऊ देसपांडे पाटवदे विसाजीराम

तरफ पाटवदें देसपाडेपण मिरासी आपली सालमजकुरी परगणीयांत + + पडला. राहूजी गोपीनाथ मबनवीस दौलताबादेस जाऊन पर० मज० १००००० होन नफराई

करून आला. सुरुखान याचा फर्मान आणला. सुरुखानानें देसमुखास व आपणस कैद केले. हमीदखानास फर्माविले कीं होन तहसील करणें. पाऊण लाख तहसील झाली. पाव लाख राहिली. देशमुखास व आपणास रोज मार करीत. हुजूरचा हुकूम कीं, देसमु० देसपां० घेऊन येणें. तेथें सुटका होणें मुस्कील. काल्या कोटांत सडून मरावें. तुम्ही बहिणीचे पुत्र. तुम्हास वतन दिल्हे. तुम्ही होन १२५०० रोख दिधले. आपला भाऊ व बहीण तुम्हापासी ठेविली. हे सही.

स. पु. १७ ले. १२ }
श. व सु. }

(२४५)
महजर

{ श. १५४९ वैशाख शु. ६ +
{ इ. १६२७ एप्रिल ११

मावजी पाटील मोकदम व केरोजी पाटील तपे ? हे मोकदमीबद्दल भांडत असतां शेवटीं शिराधडाच्या चिठ्या टाकून शिराची चिठी उचलणारा मावजी, पाटिलकीस अधिकारी झाला.

रु. ३ ले. ३ }
सु. १०२७ साबान ९ }

(२४६)
उल्लेख

{ श. १५४९ वैशाख शु. १०
{ इ. १६२७ एप्रिल १५

शरकसखान मुकासाई मौजे पिंपरी पा पुणें—

मोरोबा गोसावी सो मो चिंचवड

मौ मार मध्यें जमीन चावर ·॥· गजशराइनी सेत मोरजाबुल टिके येकून कदीम रकम खंडी २० पैकी सोडी सालाबाद ·।· बाकी हाली रकम खंडी १॥। दो॥ बाब व महसुलेसी असे.

शि. घ. ले. ५५ }
सु. १०२७ साबान १७ }

(२४७)
फा. मु. मज. व सी.

{ श. १५४९ वैशाख व. ३
{ इ. १६२७ एप्रिल २३

अज दिवाण पा॥ करहाड—मोकदम, रयत मौ कोणेगाऊ पा मजकूर

आपदेमट कृष्णभट जुनारदार यास मौ कोपर्डे व कोणेगाऊ येथें जमीन ·॥।· चावर हकासुद्धां दिली आहे. पूर्वींची सिलेमानाची सनद श. १५३८ मार्ग. व. ११ ची (सु. १०२७ जिल्हेज २५) जाहे.

सा. ले. ३२५ }
सु. १०२७रम. ३ }

(२४८)
फा. मजकूर

{ श. १५४९ ज्येष्ठ शु. ४
{ इ. १६२७ मे ८

गावकारानी मो सोननडे पा॥ कुडाळ

फर्जंद सैदसे व मटी मोकासाई मो मा॥ अर्ज केले जे मौ मारी देसायाचें एक सेत नमसी अमानत करून ३० साल भोगवटा होता.

+ मुळांत सु. १०२८ व १०३७ असून श. १५५९ क्षय असें दिलें आहे. ह्याचा मेळ पाहतां श १५४८ ला क्षय संवत्सर येतो. म्हणजे संवत् व संवत्सरें दोन्ही गत धरून ही मिती दिली आहे.

कों. इ. सा. ले. ८८ व सा. ले.३२६ } (२४९) { श. १५४९ ज्येष्ठ शु. ७
सु. १०२७ रमजान ६ } फा. मु. मज. व सी. { इ. १६२७ मे ११

देसायानि वा काग सेणगी नाडकर्णी पाा कुडाल

तुम्ही अर्ज लिहिले जे बाबाजी देसाई याचे नमसी मो सोनवडेमध्यें आहे. त्यासी मोकासी घडीघडी येऊन फिर्याद होतो. कीं, नमसी पेसजी अनामत करून मोकासा याचे दुमाला केले. आपण तीस साल कमावीस करतो. आतां पेस्तर हवाल खातिरेस आणून जाणिजे.

खं. २० ले. ५१ (१०) } (२५०) { श. १५४९ अ. श्रावण शु. ७
सु. १०२८ जिल्काद ६ } { इ. १६२७ जुलै ९

फरहादखान निजामशाही

महादे लखमदेऊ यास उत्पन्नाबद्दल (?) परवाना.

खं. २० ले. ५१ (४) } (२५१) { श. १५४९ श्रावण शु. ७
सु. १०२८ जिल्हेज ६ } महजर { इ. १६२७ आगष्ट ८

अभंगराव नाईकवाडी उखो यास मौजे रिस्यामध्यें मिरासी सेत असल्याबद्दलचा. त्यावर आगा हसन हवालदार याचे दसखत आहे व महादेव लखमदेऊ देसकुलकर्णी म्हणून एक नांव आहे.

खं. २० ले. ५ } (२५२) { श. १५४९ श्रावण
सु. १०२८ जिल्हेज } फा. मु. व सी. { इ. १६२७ आगष्ट

अज रस्तखाने फरादखान——महादो लखमदेऊ देसकुलकर्णी पाा सुपा

अर्दास पोचली. पटीचा झाडा सिताबीने होए. पेस्तर साल मजकूर नख्ताची चाली लागे ऐसे करणे. सालगुा लागवण जाले होते. आजि पडी मुतलख होणे त्यास कौल देउनु लागवण करवितो. गैर हंगाम आहे. जे काही दौलतखाही कराल तैसा नतीजा आहडेल.

व. पृ. २२ } (२५३) { श. १५४९ आश्विन शु. १३
श. } दानपत्र { इ. १६२७ आक्टो. १२

रंगो व गणेश त्र्यंबक गिधवे

लुखोबा व विसाजी परशराम पानशी कुलकर्णी व ज्योतिषी मौ दिवे का सासवड व सोनोरी तर्फ कऱ्हेपठार परगणे पुणे.

रंगभट राख्ये यांनीं गिधवे मंडळी यास काशीस सांगितलें कीं, तुमची वृत्ती पानशी तीन पिढ्या बळेंच खातात. तेव्हां **'वृत्तीसाठीं संन्यासग्रहण सोडून वृत्तिस रक्षण करावें'** असा बोध केला. त्यावर गिधव्यानीं इकडे येऊन शोध करतां कळलें कीं आपल्या वडिलानीं ही वृत्ती दान दिल्ही आहे. मग त्यास यांनींहि मान्यता दिल्ही.

इं. फॅ. मा. २ } (२५४) { १५४९ आश्विन व.३ नंतर
पृ. ३१६ टीप १ इ. (?) } मच्छलीपट्टण-बटेव्हिया { १६२७ आक्टो. १७ नंतर

डचांचे वतीनें नजराणा घेऊन गोवळकोंडयास जाणाऱ्या डचांच्या वकिलास वाटेंत खुर्रम भेटला. त्याचेजवळ १४००० घोडे, १५००० हत्ती, २५०० उंटें व ३६००० पायदळ होतें. खुर्रमचे आगमनामुळें लोक भिऊन पळाले. डचांचीही तीच अवस्था झाली. व त्यांनीं गलबतांत माल भरला. नोवें. ८ ला डच गव्हर्नरला स्थानिक अधिकाऱ्याकडून बोलावणें आलें. डचांनीं एक प्रतिनिधि पाठविला. नगररक्षणार्थ मदत करण्याबद्दल स्थानिक अधिकाऱ्यांनीं त्याला विचारलें. त्याबद्दल विचार करण्याकरितां डचांची सभा झाली. इतक्यांत गोवळकोंडयाहून सुलतानाचेंच बोलावणें आलें. थोडी नाखुशी दाखवितांच डच गव्हर्नरला मारहाण करून कैद करून नेण्यांत आलें. डच लोक व त्यांचेशीं व्यवहार करणारे एतद्देशीय व्यापारी यांचाही छळ झाला. खुर्रमकडे याबद्दल तक्रार करण्यांत आली. त्यानेंही यथोचित आश्वासन दिलें. व त्याच्याकडे गेलेल्या डच प्रतिनिधीला चांगलें वागविलें. लेव्नरला (प्रतिनिधी) त्यानें बंगाल्यांत आपल्याबरोबर बोलाविलें. बरोबर आल्यास सुरतेचा किल्ला डचांना मिळवून देण्याचें त्यानें अभिवचन दिलें. परंतु गव्हर्नर येथें नसल्यामुळें आपण कांहीं करूं शकत नाहीं असें त्यानें सांगितलें. [हेग ट्रॅन्सस्क्रिप्ट्स]

खं. २० ले. २०६ } (२५५) { श. १५४९ आश्विन व. ८
सु. १०२८ सफर २० } खुर्दखत फा. मु. व सी. { इ. १६२७ आक्टो. २१

अज रख्तखाने रा. तिपाजी राजे

कारकून व देसमूख ता। करकंब वा। हुदेदार व मोकदम मौजे गुलसरे ता। मा।

गोपाळभट बिन कोनेरीभट व विठलभट बिन हरिभट राहणार क्षेत्र पंढरपूर यास मौ। गुळसरे येथील जमीन २ चावर चालत आहे. तैसी देखील बाबा व महसूल चालविणें.

इं. फॅ. मा. ३ } (२५६) { श. १५४९ पौष शु. १
पृ. १९१ इ. } भडोच-सुरत. { इ. १६२८ जाने. १

खुर्रमचे मनांत **खानजहानचे** जहागिरीला काडीचाही त्रास देण्याची इच्छा नाहीं ... **खानजहानही** बऱ्हाणपूर इत्यादि स्वतःची जहागीर स्वाधीन करून आपण खुद्दही खुर्रमचे ताब्यांत जाण्यास तयार आहे.

इं. फॅ. मा. ३ } (२५७) { श. १५४९ पौष शु. ८
पृ. १९२-९३ } भडोच--सुरत { इ १६२८ जाने. ४

दाभोळचा इदलशहा सुलतान नुकताच वारला. त्याचा प्रबळ शेजारी निजामशहा आतां तें सहज घेऊं शकेल. (कारण) दोन वर्षांपूर्वी (त्याचा नुकताच मेलेला) सेनापती मलिकंबर यानें छापा घालून तें घेतलें होतें. परंतु ते अदलाबदलींत परत दिलें गेलें.

खं. १६ ले. १३ } (२५८) { श. १५४९ पौष शु. ९
सु. १०२८ जवल ८ } तालिक { इ. १६२८ जाने. ५

अजर. सिदी अजम सिदी याकूद ----- कारकून, देसमूख ता कानदखोरे बाबाजी झुंझारराऊ देसमूख ता मार यांस तपेमार पैकी इसाबती व विस्वा व हक आहे. त्याप्रमाणें चालविणें. इत्यादि.

सा. ले. २०३ } (२५९) { श. १५४९ पौष व. ५
सु. १०२८ जवल १८ } फर्मान फा. मु. मज. व सी. { इ. १६२८ जाने. १५

अज दिवाण र. खास -- कारकून, मोकाशाचे तर्फेचे कारकून तपे रोहिडा हेजीब कान्होजी देशमूख तर्फ भोर तपे मजकूर यानीं मालूम केलें कीं, देशमुखास इसाबती मो आबोडे इ. उत्पन्न आहे व मलिक अंबरचे खुर्दखत श. १५३० चें असून श. १५४८ कारणेहि रोखा हुजरून सादर आहे. तरी चालविणें.

इं. फॅ. भा. ३ } (२६०) { श. १५४९ माघ व. ८
पृ. १९७ इ. } आग्रा--सुरत { इ. १६२८ फेब्रु. १७

शहाजहाननें महाबतखानाचा वडील मुलगा मोठ्या लष्करासह मांडू, बऱ्हाणपूर, माळवा या प्रांतांत पाठविला आहे. हा मुलूख शहाजहाननें महाबतखानास वंशपरंपरा दिला आहे. परंतु ही नेमणूक खानजहानचे (बंदोबस्ता)करितां झाली आहे यांत संशय नाहीं.

इं. फॅ. भा. ३ } (२६१) { श. १५४९ माघ व. १२
पृ. २४३ इ. } स्वारींतील गलबत--सुरत { इ १६२८ फेब्रु. २१

दंडाला मलिकंबर हबशीनें नवा गव्हर्नर नेमिला होता. त्यामुळें दुसरा बंड करून किल्ल्यावर पळाला.

खं. २० ले. २३० } (२६२) { श. १५४९ फा शु. १४
सु. १०२८ रजब १२ } खुर्दखत फा. मु. व सी. { इ. १६२८ मार्च ८

वजारतपन्हा सुज्याअत दस्तगाह मा हा राजश्री **स्याहाजीराजे सरलस्कर** कारकुनानी हाल व इस्तकबाल व देसमुखानी पा पुणें व हुदेदारानी अजहती मुकासाई व मोकदमानी मो मोरेस्वर पा मार.

गणेशभट बिन मल्हारीभट भगत मोरया यानीं सांगितले इनाम जमीन चावर ·॥· दर सवाद मो मार बा फर्मान बसिके अलमपन्हा हजरती निजामस्याहा व भोगवटे वजिरानी कारकीर्दी दर कारकीर्दी ता सन सबा चालिले आहे. **हाली साहेब ए तर्फेसो एऊनु पा मार कबज केले** माहाली साहेबाचे कारकून ताज्या खुर्दखताचा उजूर करितात तरी इनाम चालविण्याबद्दल खुर्दखत दिलें.

शि. घ. ले. ३६३ सु. १०२८ रजब १९	(२६३) फर्मान फा. मु. व मज. सी.	श. १५४९ फाल्गु व. ५ इ. १६२८ मार्च १५

अज दिवाण रस्त खास

कारकून व देशमूख पा निवासे व मुकासाई, हुद्देदार मोकदम मौ बेल पिंपलगाऊ पा मा.

दादो माणको यास बा खैर इनाम चावर १ मौ मारमैकी मा अंबरच्या श. १५४६ चैत्र शु. २ (११-३-१६२४) ह्या मितीच्या पत्राप्रमाणें चालला आहे. सु. १०२७ पर्यंत जैसे चालिले असेल तेणेप्रो चालवीजे. बा दादनी अबदल सा

सा. ले. २३० ?	(२६४) तलब[1] मु.	श. १५४९ माघ फा. इ. १६२८ फेब्रु. मार्च

हबसखान हवालदार समत तलकोकण-----कान्होजी जेधे देसमूख तपे रोहिडा.

हजरती साहेबाची आतां व मागेंहि दाभोलचे मसलतीविषयीं आज्ञा झाली. म्हणून आम्ही स्वार जालों. आम्हामध्यें व दाभोलमध्यें तीन चार कोसांचें अंतर आहे. दाभोलचें काम बहुत असान आहे. तुम्हासारखे जाती असलियानें फतेच असे. तरी जमेतिनसी सिताब आले पाहिजे. याबदल तमाजी पाठविले आहेती.

सा. ले. २२८ (?)	(२६५) तलब[1] (फा. मु. व सी.)	श. १५४९ माघफाल्गुन इ. १६२८ फेब्रु. मार्च

हबसखान हवालदार तळकोंकण--कान्होजी जेधे व खोपडे अधिकारी पा रोहिडा.

मसलतीचे बाबे पेसजी तुम्हास रोखा पाठविला होता. आम्ही महाडास आलो सिताब दाभोलेस जाऊ. किताबती देखतांच स्वार होऊन येइजे. घडीचा देर न कीजे.

सा. ले. २२९ (?) रम १३	(२६६) तलब[1] फा. सी.	श. १५४९ माघ फाल्गुन इ. १६६८ फेब्रु. मार्च

हबसखान हवाल० तळकोकण--- कान्होजी रोहिडेकर

मसलतीचे बाबे तुम्हास हुजरून २ फर्मान व आमची ताकीद असे कागद पाठविले. तुम्ही दिवाण नफर होऊनु मसलतीस हयगय केलिया कैसी सर्फराजी होईल. हाली ताजा फर्मान आला आहे. त्याप्रमाणें तुम्ही इब्राहीमखानाबरोबर स्वार होऊन येइजे.

---

१ इं. फॅ. भाग ३ पृ. २४३ व २५२ मध्यें मलिक अंबरचे हाताखालील हबसखान व सिद्दी अंबर यांमधील दंडाराजपुरीच्या आसपास झालेल्या लढ्याची हकीकत आली आहे. ह्या हकीकतीच्या धोरणानें ह्या ४ लेखांकांचा अंदाजी काल ठरविला आहे.

सा. ले. २३१ (?) | (२६७) | श. १५४९ माघ फा | इ. १६२८ फेब्रु. मार्च

हबसखान हवालदार सा तलकोंकण— कान्होजीराजे जेधे

तुमचे बाबे येकोजी कृष्ण लिहिले ते सर्व कळून आनंद झाला. तुम्ही दौलतखा आहां. दाभोलचे मसलती चालू आहे. तों तुम्ही येऊन मदत कराल हे काय अगाध आहे? परंतु तुमची आम्ही ८ रोजावेरी (विन्हेरा) वाट पाहिली. असो. आतां आमची किताबती पावतांच आम्हास मिळावें. आमचे म्हणणें होतें कीं, मिर्जा अबदुल फतेंखा इभरामखान हे जमेती घेऊन येतात तोवर दाभोल कबज करावे. तरी कृष्णाजी राजे व तुम्ही घडीचा देर न करतां जमेतीनसीं येणें. येकोजी कृष्ण बोलता सर्व कळेल.

(ले. २३० ची टीप पहा.)

इं. फॅ. भा. ३ पृ. २५२ इ. | (२६८) | श. १५४९ फा. व. ६ | इ. १६२८ मार्च १६

रिचर्ड प्रिडिझ यानें लिहिलेली हकीकत

निजामशाहीतर्फे हबसखान अजूनही सिदी अंबरच्या दंडाराजपुरीस वेढा घालून बसला आहे.

त्रै. व. ८ पृ. १२२वि.पृ.१७५ हि. १०३७ | (२६९) थडग्यावरील शिलालेख. | श. १५४९ | इ. १६२७

बिजापूर येथील इब्राहिम रोझ्यावरील लेखांतील उल्लेख.

'बूद व गुलशन फिरदौस जाय इब्राहिम' (याचा अब्जद पद्धतीनें हि. १०३७ येतो.)

सं. २ पृ. ६९ श. | (२७०) खरीदीखत | श. १५५० चैत्र शु. १ | इ. १६२८ मार्च २६

सिदी समना सिदी माहमद मुकासदार माजी तपे पौंस.

पीलभट भैरा मौजे गोळपुं तपे पाऊस

तुम्हापासून लाहारी १७५ घेऊन वेतेरेनजीकची आपली बाग, नारळ, माड असलेली दिली. इस्ताव्याचा पटा व कोल दिवाण होईल त्याप्रमाणें झडती देणें.

सा. ले. २५० सु. १०२८ साबान १५ | (२७१) कौलनामा फा. मु. २ न. | श. १५५० चैत्र व. २ | इ. १६२८ एप्रिल १०

अज दिवाण मामले बेदरपे (?) मुा मुस्तफाबाद

हैबतराव व बालाजी देसाई तपे गुंजणमावळ

तुमचे बाबे रायाराव यानीं सांगितलें. तरी तुम्ही आपले घोडे राउत हासम घेऊन हुजूर येईजे. तुमची सर्फराजी असे. रोजमुऱ्याचेहि बरवे करूं. कौल असे.

सा. ले. ११६ } (२७२) { श. १५५० वैशाख व. ९
सु. १०२८ रम २३ } खुर्दखत फा. मु. व सी. { इ. १६२८ मे १७

अज दिवाण पा। पुणा — मोकदमानी देहाये पा। मजकूर

महादेवभट बिन मुदूगलभट पुरंधरे यास सरकसखान व मुधोजी नाईक यांनीं दिल्याप्रमाणें पिंपरी, पर्वती वगैरे ३ गांवीं ३ चावर जमीन इनाम आहे. तें चालविणें.

खं. २० ले. ५१ (१२) } (२७३) { श. १५५० आषाढ शु. ७
सु. १०२९ जिल्काद ५ } खुर्दखत { इ. १६२८ जून २७

मलिक अंबर—— कारकून व देसाई

कोंता व पिसर मेंगो कोतो यांच्यांतील वादाबद्दल महजर करून देणें. नकल बमोहर काजी मखदूमशाह.

नै. व. १ अं. २ पृ. ३५ ले. ३ } (२७४) { श. १५५० श्रावण शु. ५
सु. १०२९ जिल्हेज ३ } खुर्दखत फा. मु. व सी. { इ. १६२८ जुलै २५

अज रखत. **रा. शाहाजीराजे**— कारकून व देशमूख पा। पुणें

गणो गबाजी तबीब सो का मा यानीं मालूम केले जे, 'आपणास इनाम आहे. त्याची खु। हैबतखानाची सन सबा अशर व अर्बा अशर व खमस अशर आहेत. तिसा अशर अलफ ता। सालगु। चालत असे. **हाली पा। मा। साहेबास मुकासा अर्जानी जाले आहे.** तरी खुर्दा होये.' दिले असे.

खं. १५ ले. ४०४ } (२७५) { श. १५५० श्रावण शु. १४
सु. १०२९ जिल्हेज १२ } खुर्दखत फा. मु. व सी. { इ. १६२८ आगष्ट ३

✓ अजर. **रा. शाहाजीराजे**—कारकून व देशमूख पा। पुणें व का। पाटस

रामेश्वरभट बिन नारायणभट सो मौ आरवी मुद्गल. याने मालूम केले जे, 'आपणास इनाम जमीन रुके १२ वडगाव ना। पेडगांवमध्यें आहे. प्रज महादपाटील ठोंबरा आहे. बा। फर्मान बसिके खास व भोगवटे वजिरानी चालिले आहे. **हाली पा। मा। साहेबास मुकासा अर्जानी जाला.** खुर्दखत होये. तरी ता। सन समान अशरीन अलफ प्रमाणे चालवावे.

खं. १६ ले. १४ } (२७६) { श. १५५० श्रावण व. ३०
सु. १०२९ जिल्हेज २८ } तालीक { इ. १६२८ आगष्ट १९

अजर. खुदावंदखान————कारकून तर्फ कानदखोरे

तरफ मारच्या देशमुखास पात्रे व धानेबु (दिले).

सा. ले. ११७ }
सु. १०२९ जिल्हेज २९ }

(२७७)
फा. मु. व सी.

{ श. १५५० भाद्र. शु. १
{ इ. १६२८ आगष्ट २०

अजर. रा **शाहाजीराजे**— कारकून व देशमूख पाा पुणें

माहादभट बिन मुद्गलभट पुरंदरे यांनीं मालुम केले जे, सरकसखान (ले. १७३) व मुधोजी नाईक (ले. १६८) यांचीं खुर्दखतें आहेत. **हालीं पाामाार साहेबास मुकासा अर्जानी जाला.** म्हणून हें खुर्दखत ३ चावर जमीन चालविण्याबद्दल दिले असे.

स. पृ. १०२ ले. ४ }
सु. १०२९ जिल्हेज २९ }

(२७८)

{ श. १५५० भाद्र. शु. १
{ इ. १६२८ आगष्ट २०

अजर. **रा. शाहाजी राजे**——— कारकून व देशमूख प्रांत पुणे.

महादभट बिन मुद्गलभट पुरंदरे सो पुणे मालुम केले. जे. (अपूर्ण)

रु. ३ ले. २ पृ. २२ }
सु. १०२९ मोहर ७ }

(२७९)
खुर्दखत फा. मु.

{ श. १५५० भाद्र. शु. ८
{ इ. १६२८ आगष्ट २७

अजर. **रा. शाहाजी राजे**—कारकून देसमूख पाा पुणे.

मोरोबा गोसावी सो चिंचवड पाा माा हुजूर येउनु मालूम केले जे, आपणास इनाम सैद सादत सैन हुसेनु मुकासाईयानीं मौ आकलवडी पाा मार बाा खुा सु. १०२७ सफर १ (श. १५४८ कार्तिक शु. २ ता. १२।१०।१६२६) दाहा मण आहे. ते कुलबाब महसुलेसी दिधले. **हाली पाा माा साहेबास मुकासा अर्जानी जाला.** ताा सन समान इशरीन अलफ चालिले आहे. तरी त्याप्रमाणें चालविणें. चालवीजे.

खं. १५ ले. ४०३ }
सु. १०२९ मोहर ८ }

(२८०)
खुर्दखत फा. मु. व सी.

{ श. १५५० भाद्र. शु. ९
{ इ. १६२८ आगष्ट २८

अजर. रा. कृष्णाजी राजे भोसलेसाहेब——हुदेदारानां मौ वडिगाऊ पाा पुणा.

रामेश्वरभट बिन नारायणभट मौ आरवी मुदगल यासी इनाम चाव्र कास रुके ·। दो नख्तयाती व कुलबाब दुमाला केले असे. उचापती जाली असेल ते फिराऊनि देणें. पायपोसी सुा.

खं. १५ ले. ४०५ }
सु. १०२९ मोहर १२ }

(२८१)
खुर्दखत फा. मु. व सी.

{ श. १५५०भाद्रपद शु. १३
{ इ. १६२८ सप्टेंबर १

अज दिवाण ठाणे काा पाटस पाा पुणें

हुदेदारानी अजहती मुकासाई व मोकदम मौ वडिगौ काा माा

रामेश्वरभट बिन नारायणभट यांस (ले. २८० प्रमाणें सर्व मजकूर).

खं. २० ले. २३१) (२८२) { श. १५५० भाद्र. व. ११
सु. १०२९ मोहर २४) खुर्दखत फा. अष्टकोनी मु. { इ. १६२८ सप्टें. १३

अज रख्त. **रा. शहाजी राजे** ---- कारकून व देसमूख पा पुणे

गणेशभट बिन मल्हारभट भगत मोरया यानी मालूम केले जे 'आपला वालीद मल्हारीभट बिन कृस्णभट यासी इनाम चावर नीम दर सवाद मोरेश्वर होता. **पा मा साहेबांस मुकासा अर्जानी जाला आहे** खुर्दा पाहिजे.' ता सन समान इशरीन अलफ तसरुफाती चालिले असेल तेणेप्रमाणे चालविजे.

कों. इ. सा. ले. ८९) (२८३) { श. १५५० आश्विन शु. ९
सु. १०२९ सफर ७) फर्मान-भाषांतर फा. मु. { इ. १६२८ सप्टें. २६

(विजापूर पादशहा महमदशहा)

हिदायतुला मजलसी हवालदार व कारकून पा कुडाळ

रा. बाबाजी प्रभु सरदेसाई पा मा बाबत महसुलाची रकम १००० होन तनखा महाले रातीब चालू आहे. परंतु वसूल नाहीं. मधकारी, देसाई व त्याचे संबंधी यांस कैद करून रकम पाठवावी. या कामीं ताकीद जाणावी.

खं. २० ले. ७३) (२८४) { श. १५५० आश्विन व. १२
सु. १०२९ सफर २५) फा. मज. व सी. मु. { इ. १६२८ आक्टो. १४

अज रख्त. **रणदुला फरहादखां** -- कारकून व देसाई पा वांई

हरिभट बिन विष्णुभट देउरकर सो का मा यानी मालूम केलें जे, 'आपणास इनाम जमीन चावर नीम मौ पसर्णी दीा नख्तयाती व बाब असे. **हाली पा मा साहेबास मुकासा अर्जानी जाला** तरी खुर्दखत होय.' तरी ते दिले असें. पा ह्वा रा रामाजीपंडित.

रु. ३ ले. १) (२८५) { श. १५५० मार्ग व. ४
सु. १०२९ रखर १७) ताकीदपत्र फा. मु. { इ. १६२८ डिसें. ४

अज रख्त **रा. शहाजीराजे** ---- कारकून पा पुणें

मोरोबा गोसावी याचे मुतालिकानें सांगितलें कीं, 'गोसावी मा इनाम गांवगना आहे. ये बाबे साहेबांची खुर्दखतें असेत. आणि गांवगना मुकासायांचे हुद्देदार रंजीस करतात. दुमाले करीत नाहींत.' तरी इनामें चालविणें. इनामतीसी मुकासायांची निसबती नाहीं. त्यास इनामती खेरीज मुकासे दिले असेत. चालवीजे.

सा. ले. २९१) (२८६) { श. १५५० माघ व. २
श.) मृत्युपत्र { इ. १६२९ जाने. ३०

फुलाई लेकी गोविंदप्रभु जुनारदार धर्माधिकरणी नाशिक

सध्यां आपण खात असलेली धर्माधिकारीपणाची वीस टक्याची मोईन आपल्या मागें लेकीनें खावी.

सा. ले. २२८ पृ. २२४ }
रु. ३ ले. १३ (?) }
(२८७)
सी.
{ श. १५५१
{ इ. १६२९

मध्वाजी कृष्ण हवाल. पर. वाई—— रा. कानोजी नाईक देसमुख तर्प रोहिडे

आपले मुतालिक देऊन चिखलगावासी तोरण बांधविले बहुत बरवें केलें; तुम्ही हलालखोर असोन, खर्चाचे बहुत (निकड) असे. तरी हजरती खानसाहेबी देह ४ दिल्हे असेती. आतां उजूर न करणें.

खं. २० ले. ७४, ७५ }
श. }
(२८८)
वांटणीपत्र
{ श. १५५१ चैत्र शु. २
{ इ. १६२९ मार्च १७

वांई येथील चित्रावबंधू चवघे यांची जमीनीची वांटणी.

खं. १५ ले. ४३५ }
श. }
(२८९)
{ श. १५५१ चैत्र शु. २
{ इ. १६२९ मार्च १७

तिमाजी पुरुषोत्तम—— मुऱ्हारीभट व वासुदेवभट गोसावी ब्रह्मे सा। को चाकण

पुराणिकाच्या वाड्याच्या निमोऱ्याच्या उत्तरभागेकडील भूमि समस्त ब्रह्मियाचि म्हणौन पूर्वी गदाधर इ. ब्रह्मे यांनीं घरें करून राहावयास दिली. हली कृष्णाजी नीलकंठराऊ ब्रह्मे म्हणतात, भूमि अमची, आपणास द्या. त्यावरी त्यास तसे लिहून दिलें. नंतर तुम्ही अर्धविभागी म्हणून तुम्हीहि मागतां नाहींतरी वेव्हार सांगा म्हणता. तरी तुम्हांसहि लेहून दिल्ही.

शि. घ. ले. ३७२ }
सु. १०२९ साबान ३० }
(२९०)
फा. मु. व सी.
{ श. १५५१ चैत्र
{ इ. १६२९ मार्च

अजर. रा. साटे राऊ राजे साटे सो—कारकून मोक. रया का तळबीड किले पनाला

साबाजी मोहिते धारोजी मोहिते देसाई यास का मारपैकी ६ गांवची जमीन ब्रह्मेकी नीम दिली असे. दुबाला करणें.

खं. २० ले. ६ }
सु. १०२० रम १ }
(२९१)
खुर्दखत फा. मु.
{ श. १५५१ वैशाख शु. २
{ इ. १६२९ एप्रील १५

मलिक सो मलिक अंबर———कारकून व देसमूख पा। सुपे

याकुदखान याचे हेजीब शरफ अली याने मालूम केले जे 'महादो लखमदेऊ देस-

कुर्णी पा मा याच्या बडियाने ठेविलेला यारदी सळासिरी करू लागला म्हणून दस्तुर-खानाकडून बाहेर घालविला. नंतर त्याचा मुलगा कोंतोबा हाही भांडू लागला तोहि खोटा केला' व खुर्दखत मागितलें. तरी तें दिलें असे.

खं. १५ ले. ४०६ } (२९२) { श. १५५१ आश्विन शु. ६
सु. १०३० सफर ४ } खुर्दखत फा. २ मु. व सी. { इ. १६२९ सप्टें. १२

अजर. सलाबतखान सो—कारकून व देसमूख मोकदम पा पांडियेपेडगौ

रामेश्वरभट व दामोदरभट बिन नारायणभट सो आरवी मुद्गल यानी मालूम केले जे 'आपणास इनाम जमीन चावर १ को चांभारगोंदे पा मार दो हक आहे. खुर्दखत विठोजी भोसले बा फर्मान बसिकेखास सन १०१९ ता सालगु॥ १०२९ चालिले. हाली ता मा साहेबास मुकासा अर्जानी जाला. खुर्दखत होये.' तरी भोगवटा पाहून दुबाला करण्याबद्दल खुर्दा दिले आहे.

खं. १५ ले. ४०७ } (२९३) { श. १५५१ आश्विन शु.६
सु. १०३० सफर ४ } खुर्दखत { इ. १६२९ सप्टें. १२

अजर. सलाबतखान सो—कारकून व देसमूख ता चांभारगोंदे पा पांडियापेडगौ.

दामोदरभट व रामेश्वरभट बिन नारायणभट सो आरवी मुद्गल यांनीं सांगितलें कीं, आपणास इनाम जमीन चावर १ मौ जलालपूर ता मा देखील नख्तयाती व बाबा बा खुम्र मालोजी व विठोजी भोसले बा फर्मान आहे (पुढें ले.२९२ प्रमाणें.)

खं. १५ ले. ३३७ } (२९४) { श. १५५१ आश्विन शु.१४
सु. १०३० सफर १३ } एखलासी पत्र फा. मु. व सी. { इ. १६२९ सप्टें. २१

वेदाजी अनंत—कान्होजी नाईक देसाई ता भोर ता रोहिडा

तुम्ही येउनु आमची भेटी घेतली हजरती साहेबासी एख्तरी धरिली. आजीपासून तुमची आमची एखलासी जाली. हरएकविसी परस्परांचे कामांत आपण अंतर पडो न देणें. भरंवसा असे. कार्यप्रयोजन लिहीत जाणें. सरंजाम होत जाईल.

खं. १५ ले. ४०८ } (२९५) { श. १५५१ आश्विन व. १
सु. १०३० सफर १५ } खुर्दखत मु. व सी. { इ. १६२९ सप्टंबर २३

अज माहाल—खोत ता जुनर व बाजे महाल

त्रिंबकभट बिन नीळकंठभट सो त्रिंबक यास धर्मादायबद्दल कसबे नारायणगाऊ रुके ।. चाललें आहे. तैसे चालवावें.

खं. १५ ले. ४०९ } (२९६) { श. १५५१ कार्तिक शु. ३
मु. १०३० रवल २ } खुर्दखत फा. मु. व सी. { इ. १६२९ आक्टो. ९

अज दिवाण ठाणे ता चांभारगोंदे पा पांडियापेडगौ

हुदेदार व मोकदम मौजे जलालपूर पा मा

दामोदरभट व रामेस्वरभट बिन नारायणभट सो आरवी मुद्गल यास (ले. २९३ प्रमाणें) चावर १ चालवीजे.

खं. १५ ले. ४१० } (२९७) { श. १५५१ कार्तिक शु. ४
मु. १०३० रवल ३ } खुर्दखत फा. मु. सी. { इ. १६२९ आक्टो. १०

अज दिवाण ता चांभारगोंदे पा पांडियापेडगौऊ

हुदेदार व मोकदम का चांभारगोंदे (मजकूर ले. २९२ प्रमाणें.)

खं. १६ ले. १५ } (२९८) { श. १५५१ कार्तिक शु. १३
मु. १०३० रवल १२ } { इ. १६२९ आक्टो. १९

अजर. खुदावदखान——बाबाजी झुंझारराऊ देसमूख ता कानदखोरे

अर्दासवरून कळलें कीं, किलेकरी ता मास तोसीस लाविली आहे, गाऊ मारिताती व मौजे सणवडीची गुरे वळुनु नेली आहेती. तरी बअमल दिवाणचे बंदगीस मालूम करून फर्मान लिहविला आहे; सिके बिले लाविला आहे. तोवरी **सिद्दी अंबर अबदूरसाहेब हवालदार किले कोंढाणा** त्यास किताबती पाठविली आहे जे, त्यास घेउनु सरंजाम करून घेणें.

खं. १५ ले. ९ } (२९९) { श. १५५१ कार्तिक शु. १५
मु. १०३६ रवल १५ } कौलनामा फा. सी. { इ. १६२९ आक्टो. २२

अजर. रा. आंबाजी राजे घाटिगे

कारकूनानी, पटेल व मोकदमानी व रयानी का मसूर ता मार पा कऱ्हाड.

अर्जदास्त पावली, म्हाकोजी घाटिगे याजकडूनहि खबर कळली. तूं (तानाजी जगदळे देसमूख ?) दिवाण न्याहाईम व हलालखोर आहेस. बेशक येउनु लावणी उगवणी करणें. कौलू असे. देसगतीचे सालाबादप्रमाणें चालेल.

खं. १६ ले. १६ } (३००) { श. १५५१ पौष व. ६
मु. १०३० जवल १९ } { इ. १६२९ डिसें. २५

अजर. खुदावदखान——बाबाजी झुंझारराऊ देसमूख ता कानदखोरे

सिद्दी अजमास किताबती पाठविल्याचे अर्दासांत लिहिल्याचें कळलें. व कोळवडी येथील दंग्याची वार्ता कळली. **एदिलशाही लोकी** एउनु पा शिरवळ कबज केलें आहे.

कोठी बलकटी केली आहे. त्यापासी घोडी २००० एउनु बैसले आहेती. सिदी अंबरास किताबती पेसजी पाठविली होती. पेस्तर तुम्ही आपले तरफेन कुसूर हो न देणे. एदिलशाही लोकांचे बाबे लिहिले. तरी तेहि सिकस्ती खादली. हाली आपले तरफेची नामजादी विजापुर पावेतोवरी गेली आहे.

खं. १५ ले. ४११ } (३०१) { श. १५५१ पौष व. १०
सु. १०३० जवल २३ } खुर्दखत मु॰ व सी. { इ. १६२९ डिसें. २९

अजर.-----हुद्देदार मौजे खानवटे पा पुणा

✓ रामेश्वर व चिंतामणभट यांस जिराती जमीन १ चावर देखील हक आहे ती चालविणें.

स. पृ. १०१ ले. २ } (३०२) { श. १५५१ पौष व. १२
सु. १०३० जवल २५ } खुर्दखत { इ. १६२९ डिसें. ३१

अजर. रा. शाहाजी राजे

कारकून व मोकदम को जिंती परगणे पांडियापेडगांव.

कान बिन राम पाठक मुल्या को मा यानी सांगितलें कीं, 'आपणास जमीन चावर १ इनाम आहे. प्रज तुकोजी माल पाटील काकडा मुंजेरी दे हक राजश्री थोरले राजे (येकोजी ?) दिधला आहे. तेणेप्रमाणें ता सु. १०२९ चालत आलियावरी **साल मारी को मजकूर साहेबांस मोकासा अर्जानी जाला.** खुर्दखत होये.' चालवीजे.

खं. १५ ले. ४१२ } (३०३) { श. १५५१ माघ व. ५
सु. १०३० जखर १८ } खुर्दखत { इ. १६३० जाने. २३

अजर. रा. रुद्राजीराम

✓ हुदेदार व मोकदम मौ जलालपूर ता चांभारगोंदे पा पांडियापेडगौ.

दामोधरभट व रामेश्वरभट बिन नारायणभट सो आरवी मुद्गल यास जमीन चावर १ मौ मारची हक देखील आहे. तरी दुमाले कीजे.

शि. प्र. पृ. ९१ ले. ७ } (३०४) { श. १५५१ फा शु. १३
सु. १०३० रजब १२ } खुर्दखत { इ. १६३० फेब्रु. १५

अजर. सवाई बहादुरजी राजे——— कारकून देसमूख तपे वालवे

सदभट बिन लक्ष्मण सो वालवे यास सिरगावच्या श्रीसिद्धेश्वर देवाबदल इनाम पाव चावर दिलेलें आहे ते चालविणें.

सा. ले. ३२७ } (३०५) { श. १५५१
सु. १०३० } { इ. १६२९-३०

दिवाण परगणा कुडाल-- कामगारान मौ ? शाहाइदायतुल्ला मजलसी.

सा. ले. २२६ }
? }

(३०६)

{ श. १५५१
{ इ. १६२९

रणदुलाखान ----- कान्होजी जेधे ता। रोहिडा व भोर

तुमचे बाबे बजाजी नाईक याचे हेजिबी सांगितलें कीं, कौल जालिया तुम्हा मुलाकतीस यावयाची वारता धरता. तरी शक आदेशा न धरतां येणें; जो मुदा असेल तो पेश करणें. सरंजामी करूं.

सा. ले. २२७ }
(?) }

(३०७)

कौलनामा फा. सी.

{ श. १५५१
{ इ. १६२९--३०

रणदुल्लाखान ---- कान्होजी जेधे

अर्दास पोचली, नागोजी पंडिती जबानी सांगितले. वेदाजी पंडिती तुमची शिफारस केली. तरी आम्हांस येकीन माळुमच आहे; ते तरफेस **कोंढाणेकरी हरकती माडिली आहे. तरी तुम्ही ये वख्ती गडास वेढा घालून कैद करणे. रोटीवरी सदकचा हात करून हाली तुम्हास पाठविला आहे. गड हजरतीचे तरफेस हाये ते करणे.** पेसजी जो गुन्हा केला तो माफ केला आहे. ये बाबे आमचा कौलु आहे. (खं. १५ ले. ३६७ खं. १६ ले. १५. पहा.)

इं. फॅ. भा. ४ }
पृ. २२ इ. }

(३०८)

शहाजहानची दख्खनवरील स्वारी

{ श. १५५२ वैशाख शु. ११
{ इ. १६३० एप्रिल १३

स्वाली मरीन-कंपनी.

देशांत शांतता आहे. शहाजहान बऱ्हाणपुरला आला असून दख्खन्यांच्या वर स्वारी करूं इच्छितो.

[भा. ४ पृ. ३३] बादशहा बऱ्हाणपुरला आहे. दमणला लागूनच असलेल्या मुल्हेर व अहमदनगर येथील राज्यांवर तो स्वारी करील असें म्हणतात. जरी वार्षिक खंडणी देतात तरी ते पूर्णपणें कह्यांत नसल्यामुळें मागणीप्रमाणें किल्ले देतील असें दिसत नाहीं. ह्यांना जिंकून बहुधा तो दमण किंवा वसई ह्या पोर्तुगीज ठाण्यांवर जाईल. दमण घेण्यासाठीं खरें म्हटलें तर आरमार पाहिजे......**परंतु दख्खनवरच स्वारी होईल हें अधिक संभवनीय दिसतें.** पावसाळ्यानंतर नक्की धोरण समजून येईल.

मठ. शि. ले. ३ }
श. सवाल ११ }

(३०९)

निवाडपत्र फा. सी. व मु.

{ श. १५५२ ज्येष्ठ शु. १३
{ इ. १६३० मे १४

मौ. नेरूर येथील उपाध्ये यास वृति करितां गावी वेव्हार होऊन कुडाळी फिर्याद गेले. हकीकत मनास आणून निवाडा केला.

सा. ले. २०४
सु. १०३० जिल्काद १२ (३१०) फा. वा. मु. व मज. श. १५५२ अ. आषाढ शु. १५
इ. १६३० जून १४

?—— देसाई तपे रोहिडा

तपे मजकूर बाबत कोबाजी खडाड दर वज्ञ इस्तकामती मोकदम व इमसाल गंगाजी माकुलबाब मरहमत दिले असे. दुबाला कीजे.

खं. २० ले. २५६
सु. ? सफर १५ (३११) खुर्दखत श. १५५२(?) भाद्र. व. २
इ. १६३० सप्टें. १३

अज दिवाण र. खास

कारकून पाा संगमनेर वात्री व मुकासे व हुदेदार व मोकदम व महाजन कसबे पुणतांबे पाा मार.

रामभट बिन नरसिंह्भट धर्माधिकरणी साा कसबे माार यास इनाम चावर १ देखील नखतयाती व हक चांदबिबीच्या श. १५१८ तील हुजतीप्रमाणें आहे तें चालविणें.

सा. ले. २४
सु. १०३१ सफर २० (३१२) कौलुनामा मु. श. १५५२ भाद्र. व. ७
इ. १६३० सप्टें. १८

माा ह्या जायेणा लिगरस हवालदार महालानिहाये व किले सुभानमंगळ

रा. आपाजी मल्हारजी दोख व रामाजी विठल दोर्णी किले माार यार्नी सांगितलें कीं, 'आपले वाडे मिरासीचे कोटानजीक होते ते मोडले.' तरी तुम्हां चौघा भावासी जागा करून दिल्हा. समुदिया कसाबियाची घरठाण याची रदबदल जाली आहे. राजश्री पंत हवालदारचा कौलु दिल्हा आहे.

खं. १५ ले. ४१३
सु. १०३१ रवल ११ (३१३) महजर फा. मु. व मज. श. १५५२ आश्विन शु. १३
इ. १६३० आक्टो. ८

रामजी बिन राजजी व गोंदजी मोक. मौ निरगडे किले माार

संभाजी तानदेऊ.

आफ्त व फितरती जाली, घरबूड हों लागली; मग आपण तुम्हासी निमी मोकदमी चावर ३१ होन ४५ धारण करून त्रिकली. ती खाऊन सुखे असिजे.

खं. १५ ले. ८
सु. १०३१ रवल १५ (३१४) फा. मु. श. १५५२ आश्विन व. १
इ. १६३० आक्टो. १२

अजर. रा. अंबाजी राजे घाटगे——कारकून व मोकदम ताा मसूर

तानाजी जगदळे देसमूख ताा माा पटेल यार्नी शहापूरच्या इनामाबद्दल येऊन सांगितलें कीं, 'मौजे शहापूर हा आपला दोखीचा इनाम आहे. तो माहालीच्या कारकुनानी

अमानत केला. दुमाले करविणें.' तरी २०० हरकी घेऊन गांव दुबाला करणें. रा। गोपाळ पंडित. आवर्दे आबाजी कृष्ण. अफराद ठाणे.

खं. २० ले. १७६ } (३१५) { श. १५५२ कार्तिक शु. १५
श. } उल्लेख { इ. १६३० नोव्हें. ९

ग्रामस्त का। वाई—— कडत जोसी को। मा।र

ग्रहणकाळीं लेहून दिलें कीं, प्रतिवर्षी पासोडी एक व गहू व पाडव्यास कुडव देऊं.

इं. फॅ. भा. ४ } (३१६) { श. १५५२ कार्तिक व. १
पृ. ९० इ. } सुरत कौन्सिलच्या सूचना- { इ. १६३० नोवें. १०

बादशाही [मोंगली] (व असफखानाचें) लष्कर दख्खनच्या मोहिमेंत गुंतलें आहे.

सा. ले. २५९ } (३१७) { श. १५५२ मार्ग. शु. ७
सु. १०३१ जवल ५ } फा. मु. { इ. १६३० नोवें. ३०

?— कारकून व देसमूख पा। कडेवलीत

खेलोजी भोसले याची मोकदमी ४ गांवें आहे. ती पेशजीप्रमाणें हाली दुमाला कीजे.

इं फॅ. भा. ४ } (३१८) { श. १५५२ पौष शु. ७
पृ. १०९ इ. } सुरत-मच्छलीपट्टण { इ. १६३० डिसें. ३

बादशाहाचें दख्खनमधील युद्ध अद्याप चालूच आहे. खान जहान (लोदी)—वर त्याला एक अल्पसा जयही मिळाला आहे.

खं. १६ ले. १७ } (३१९) { श. १५५२ पौष शु. ११
सु.१०३१ जखर १० } { इ. १६३१ जाने. ४

अजर. खुदावंदखान——जुंझारराऊ देसमूख ता। कानदखोरे

अर्दास पावली. किलेकरी तपेमार काबीज केले ते पथिले हुकुमे नाहीं. तरी किलेकरी यास बाहेर घालुनु महालांची उगवणी करून रसद पाठविणे. किलेकरी जोरी करितील तरी तुवा लोक मेळउनु संगिनाती करुनु सर्तीसी जाब देणे.

खं. २० ले. २३२ } (३२०) { श. १५५२
सु. १०३१ } { इ. १६३०-३१

अजर. बाजी...नाईक——कारकून व देसमूख ता। करेपठार पा। पुणे.

गणेशभट बिन मल्हारीभट सा मोरेश्वर यास जमीन इनाम आहे. स्वामीस मुकासा अर्जानी जाला. इ...

खं. १५ ले. ३२८ (?) } (३२१) { श. १५५२ इ. १६३०-३१

सुधोजी वणगोजी नाईक निंबाळकर—— कान्होजी जेधे नाईक

हजरत साहेबी आम्हास मदती खान दिलावरखान व भोसले व बाजे वजीर असे बजारत पनाह मदती येताती. गनीमहि स्वार होऊन पैलींकडे चालिले. तरी तुम्ही मदतीसी कृष्णाजी राजे तुम्ही आम्हास मेळउनु घेणें.

सं. २ पृ. ७५ सु. १०३१ } (३२२) वाटप (राजापूर) { श. १५५२ इ. १६३०-३१

कसबे मीठ गव्हाण मामः मुस्तफाबाद येथील देसाई यांच्या दोन वाटण्या जाल्या. दरएक वाटणींत २ तकसीमा. दरएक वर्षी एकानें दिवाण काम करावें.

सा. ले. १२७ सु. १०३१ } (३२३) { श. १५५२ इ. १६३०-३१

अज दि० ———— ता मोक० मौ आवेते व वाडिवळे

बोपाजी गणपती तबीब यास दरमहा ४ होन तनखा आहे. वख्तसीर आदा होत नाहीं. तो रंजीस येतो. तरी त्याचा व पाटलाचा पगार वख्तसीर आदा करणे.

इ. डॉ. ७ पृ. १४२ हि. १०४० } (३२४) { श. १५५२-५३ इ. १६३० जुलै-१६३१

शहाजहान दख्खनमध्यें गेला व खान खानान महमदखान यानें दौलताबादचा किल्ला घेतला.

स. पृ. ५३ ले. ४२ सु. १०३१ रम ५ } (३२५) वृत्तिपत्र-उल्लेख { श. १५५३ चैत्र शु. ६ इ. १६३१ मार्च २९

रा. बाइजी आवा व चाफाजी देसाई पा खटाव

तुकोजी वेंकोजी बरगे मोक. मौ हुसेनपूर पा मा

मौ मार गांव खानसाहेबी आपणास मिरास दिल्हा. कीर्द न होतां मजरा पडल्यामुळें हुजूर नेऊन दुसाला रकम बेरजेचा तगादा करून कीर्द करण्यास रजा फर्माविली. आपणाकडून ते न झाल्यामुळें पाटिलकी कुलहक तुम्हांस विकली. वृत्ती चालविणें.

कों. इ. ले. १२७ }　　(३२६)　　{ श. १५५३ चैत्र शु. ७
शु. १०३१ रम ६ }　　सल्लक पत्र मु.　　{ इ. १६३१ मार्च ३०

मौजे बांबर्डे येथील गावकरी

रा. गोरख सामंत परुळेकर शरीकदार प्रांत कुडाळ

तुम्हास कटबाण करून देणें म्हणून दिवाणाची आज्ञा. त्यावरून श्री वेताळचे देवळी सर्व ग्रामस्त बसोन नेम केला. चतुःसीमा मधील जमीन पूर्वीप्रमाणें पुढा अनुभवणें. ठिकाणापैकीं श्रीदेव यास लारी १० दरसाल देणें.

स. पृ. ५४ ले. ४२ }　　(३२७)　　{ श. १५५३ चैत्र शु. १२
सु. १०३१ रम १० }　　कौलनामा-उल्लेख　　{ इ. १६३१ एप्रिल ३

रा. बाइजी आवा व चाफाजी देसाई पा। खटाव

तुकोजी व वेंकोजी बरगे पाटील मोकदम मौ। हुसेनपूर. दिवाणें मौजे मारचे दुसाला रकम ५५० माथा ठेविले. त्यास तुम्हापासून हे होन घेऊन मौ। मारचें वतन दिल्हें.

इं. फॅ. भा. ४ }　　(३२८)　　{ श. १५५३ ज्येष्ठ व. ७
पृ. १५९-६० इ. }　　दख्खनची एकी.　　{ इ. १६३१ जून १०

सुरत येथील प्रेसिडेंट रास्टेल—— इराणांतील इंग्रजी वखारवाले

दख्खनमधील युद्ध रेंगाळत चालूच आहे. खानजहान लोदी स्वदेशाकडे पळून जात असतां बादशहाच्या सैन्यानें अडविल्यामुळें झालेल्या युद्धांत मोठ्या जवानमर्दीनें लढून शेवटीं गतप्राण झाला. कांहीं झालें तरी दख्खनचा नाद बादशहा सोडणार नाहीं. आपसांत झगडत असलेले **दख्खनचे तीनहि राजे आतां मोंगली सत्तेशीं एकजुटीनें लढत आहेत.**

इ. वृ. ३८ पृ. ५१ }　　(३२९)　　{ श. १५५३ आषाढ शु. ५
श. }　　{ इ. १६३१ जून २४

होनाजी निबरे...पेठ अबरापूर——दोदोवा चादगावकर

दुकालात घर, व भूमी १९ होन, जोरी पाइली ६ (दर पायलीस होन १) येकूण २५ होनास विकली.

खं. १५ ले. ४१४ }　　(३३०)　　{ श. १५५३ आषाढ शु॥ ७
श. }　　{ इ. १६३१ जून २६

गोंदजी बिन माहादजी मोकादम मौ। निरगुडे किल्ले फतेमंगल
संभाजी तानदेऊ

आपण दुकळाकरितां भोईस पडलों. याकरितां मौ मारची निमेपैकीं तकसीम निमे होन २२॥ स विकली असे. सुखें खाणें.

खं. १५ ले. ३२७ (?) जिल्हेज ९ (३३१) म. मु. व सी. श. १५५३ आषाढ शु. १२ इ. १६३१ जून ३०

मुधोजी वणगोजी नाईक—— कान्होजी राजे जेधे देशमूख ता। रोहिडा.

आम्हास हजरत अलम पन्हासाहेब रोहिडतर्फेस नामजाद करितातीं. याकरितां तुम्ही जवळ असला म्हणजे हजरतीस अर्ज करून इसावती व हकलाजिमा व इनाम बाब तुमचे दुबाला करवू व आपणाबराबरी नामजादी घेऊं. (इ. सं. निंबाळकर ह.)

खं. १८ ले. १० श. (३३२) उल्लेख श. १५५३ आषाढ व. १ इ. १६३१ जुलै ४

वाल बिन दाद पाटील लोणकर मोक० मुंढवे—— ता। हवेली पा। पुणें

रामाजी होनदेऊ होनप देशपांडे प्रा। पुणे

मौ मारची मोकदमी आपली मिरास. संचणी उगवर्णाबदल निमी मोकदमी लाहूजी लोणकरास वडिलीं दिली. यावर दुकोळ पडला. **इदिलशाही नामजादी पुणा यऊनु बसली. पुणे लुटून जाळून तलक केले. कोट पाडिला.** मग निमी मोकदमी तुम्हास १०४॥ होनास दिल्ही असे.

खं. १५ ले. ४१५ मु. १०३२ जिल्हेज १६ (३३३) खुर्दखत फा. मु. सी. श. १५५३ आषाढ व. २ इ. १६३१ जुलै ७

अजर. **रा. शाहाजी राजे**

कारकून व देसमूख पा। पांडियापेडगाऊ व हुदेदार व मोकदम व रयां को चांभारगोंदे. पा। मा।.

रामेश्वरभट व दामोदरभट बिन नारायणभट सो। आरवी मुद्दल यानीं सांगितले कीं 'आपणास जमीन चावर १ को चांभारगोंदे दे। नरुतयाती व हक आहे.' चालवीजे.

खं. १५ ले. ४१६ मु. १०३२ जिल्हेज १६ (३३४) खुर्दखत फा. मु. व सी. श. १५५३ आषाढ व. ४ इ. १६३१ जुलै ७

अज रूत. **रा. शाहाजी राजे**

कारकून व देसमूख पा। पांडियापेडगौऊ व हुदे. व मोकद. मौ जलालपूर पा। मा। दामोदरभट इ. 'आपणास जमीन चावर १ मौ भारीं आहे.' चालवीजे.

सीं. ले. २५१ मु. १०३२ मोहर ४ (३३५) नकल श. १५५३ श्रावण शु. ६ इ. १६३१ जुलै २४

फतेखान

हवाजी हैबतराऊ व बाबाजी व वालाजी नाईक देसमूख ता। गुंजनमावल पा। मुरंबदेऊ

अर्दास पोचली. किले कोंढाणा खाले राहोनु गनिमासी लढाई करावया लोकांचे हकाची सरंजामी कीजे. सरफराजी होईल.

इं फॅ. भा ४ } (३३६) { श. १५५३ भाद्र. व. ८
पृ. १६५ इ. } सुरत–बॅंटम { इ. १६३१ सप्टें. ८

दख्खनमधील युद्ध तहकूब झालें आहे. तहाबद्दल वाटाघाट चालू आहे. तथापि उभय पक्षाचीं सैन्यें जय्यत तयारींतच आहेत. बादशहा बऱ्हाणपुरासच आहे.

शि. प्र. पृ. ९२ ले. ९ } (३३७) { श. १५५३ कार्तिक व १२
सु. १०३२ रखर २५ } खुर्दखत { इ. १६३१ नोवें. १०

महाराज राजाधिराज मुरारीपंडितसाहेब—— ठाणेदार तपे वालवे.

सभुभट बिन लक्ष्मीधरभट यास अभिसेक सिद्धेश्वरबद्दल पाव चावर जमीन मौ शिरगांव येथील आहे. ती चालविणें.

शि. प्र. पृ. ९२ } (३३८) { श. १५५३ कार्तिक व.१२
सु. १०३२ रखर २५ } उल्लेख { इ. १६३१ नवं. १०

माहाराज राजाधिराज श्रीमुरारीपंडित—सभुभट बिन लक्ष्मीधरभट जपे सो वाळवे जमीन चावर ·।· को मजकुरी सिद्धेश्वरच्या अभिसेकाबद्दल इनाम दिली आहे.

शि. प्र. पृ. ९२ ले. ८ } (३३९) { श. १५५३ मार्ग. व. १
सु. १०३२ जवल १५ } खुर्दखत फा. मु. व सी. { इ. १६३१ नवं. २९

अज दिवाण तपे वालवे—— हुदेदार व मोकदम कसबे तपे मार

सभुभट बिन लक्ष्मीधरभट सो को वालवे यास अभिसेक वगैरेबद्दल इनाम चावर ·।· कसबे वांगी आहे. चालवीजे.

शि. प्र. पृ. ९२ ले. ९ } (३४०) { श. १५५३ मार्ग. व.३०
सु. १०३२ जवल २९ } { इ. १६३१ डिसें. १३

अज दिवाण तपे वालवे—— हुदेदार मोकदम ता मार

(सभु)भट बिन लक्ष(मीधरभट) [जपे] यांस गांवगना सादिलवारपैकी होनु ७ धर्मादाऊ करून दिलियाप्रमाणें चालवावें.

खं. २० ले. २६९ } (३४१) { श. १५५३ पौष व. ४
सु. १०३२ जखर १८ } फा. मु. व सी. { इ. १६३२ जाने. १

अजर. खुदायेवंदखान अजम सैफखान— कारकून व देसमूख मामले मूर्तजाबाद.

मुतालीक हुसेन यानीं सांगितलें कीं, 'तपे झिराडी व तपे ब्राह्मणगाऊ पैकीं मौ गौडी व वढरहू ह्या गांवीं दरोज लारी २ आहे, **हाली साहेबास मुकासा अर्जानी जाला आहे.** व कारकून पटीची उचापती केली आहे.' तरी तसे न करतां नांदगाऊ (तपे झिराडीपैकीं) येथून रोजमुरा देणें.

इ. ऐ. शि. च. ले. ३७३ } (३४२) { श. १५५३ फा. शु. १५
सु. १०३२ साबान १४ } वा. मु. व फा. सी. { इ. १६३२ फेब्रु. २५

अज दिवाण ठाणा पा कन्हाड व कर्यात तळबीड—हुदेदार व मोकदम मौजे देह ६

दिपाजी धारोजी राजे मोहिते देसमूख कर्याती मा यास राबणूक बेगारीबद्दल इनाम आहे तें सहा गांवीं दोन दोन महिन्याप्रमाणें चालविणें.

हि. रे. क. ९ } (३४३) { श. १५५३
पृ. १० } { इ. १६३१

मोंगलांचा सेनापती असफखान यानें विजापुरास वेढा घातला तेव्हां गोव्याच्या व्हाइसरायानें मोंगलांना मदत न करितां गुप्तपणें विजापुरकरांना दारूगोळा इत्यादि पोंचवून मदत केली. याचें कारण असें कीं **सर्व दख्खनच्या सत्तांची एकजूट असावी असें पोर्तुगीजांना वाटत होतें.**

सा. ले. २९२,२९३ } (३४४) { श. १५५४ चैत्र शु. ९, १०
श. } फा. मज. व मु. { इ. १६३२ मार्च २०, २१

अंतभट, रंगभट, बापूभट चंद्रात्रे कसबे नाशीक——हरबाजी व सोन प्रभु

आपली मुळेपणाची खेडी ३ हीं होन १४ (१५) स विकली. कारण दुष्काळांत आपण निर्द्रव्य जालो.

हि. रे. क. ९ } (३४५) { श. १५५४ चैत्र शु. १३
पृ. १०९ } { इ. १६३२ मार्च २४

गोव्यांतील कौन्सिलांत असें ठरलें कीं—निजामशहा व मोगल यांनीं जूट करून विजापुरास वेढा घातल्याची बातमी आली आहे. तेव्हां गोवेकरांनीं विजापुरकरांशीं असलेलें वितुष्ट विसरून त्यांच्या मदतीस जावें व पोर्तुगीजांच्या बादशहानें **विजापूरचें राज्य बुडूं न देण्याविषयीं हुकूम पाठविला आहे तो** विजापुरकरांना (माहितीकरितां) कळवावा. [न्यू स्टाईल एप्रिल ३]

इ. वृ. १८३७ पृ. २३७ } (३४६) { श. १५५४ ज्येष्ठ शु. १०
श. } निवाडपत्र { इ. १६३२ मे १९

गोत— मोकदम बारामतीनजीक मौ कडफळ

अग्रवादी कृष्णाजी व पश्चिमवादी महिमाजी मौ गोवे संमत निंब. ह्यांत वतनाचा तंटा. दो ठाई उत्पन्न करून निवाडा केला.

खं. १५ ले. ६७ } (३४७) { श. १५५४ भाद्र. व. ९
सु. १०३३ सफर २२ } खुर्दखत फा. मज. { इ. १६३२ आगष्ट २९

अजर. रणदुला फरादखान—— कारकून व देसमूख पा। वांई

निंब येथील सदानंदाचे मठास चावर १ जमीन इनाम कमळनयन गोसावी यांचे नांवें आहे. चालवीजे.

खं. २० ले. ७७ } (३४८) { श. १५५४ आश्विन व. ३
सु. १०३३ रवल १६ } खुर्दखत फा.२ मु. व मज. { इ. १६३२ सप्टंबर २१

अजर. दिवाण पा। वांई

मोकदम मौ बोरखल समत निंब पा। मा।

गोपीनाथभट रामेश्वरभट (चित्राव) तबीब यास सु. १०२९ रवल ९ चे खुर्दखतावरून १॥ चावर जमीन बोरखल १ व किण्हई ॥ येथें आहे. ती सु. १०३२ जखर २३ पर्यंत चालत आहे. हलीं चालवीजे.

स. पृ. १०२ ले. ५ } (३४९) { श. १५५४ आश्विन व. ३
सु. १०३३ रवल १६ } खुर्दखत { इ. १६३२ सप्टंबर २१

अजर रा. शहाजीराजे

कारकून व देसमूख मामले गुलशनाबाद हुदेदार व मोकदम को नाशिक मामले मा।

मिरा सैद सादीच्या मुतालिकानें सांगितलें कीं, 'नाशिकच्या मशिदीकरितां तेल व रोजमुरा बाग ह्याकरतां उत्पन्न मलिकंबराच्या फर्मानाप्रमाणें चालत आहे. तें चालवणें.' चालवीजे.

खं. २० ले. ७८ } (३५०) { श. १५५४ कार्तिक व. ३
सु. १०३३ रखर १६ } फा. मज. मु. व सी. { इ. १६३२ आक्टो. २१

अजर. रणदुला फरादखान—— कारकून देसमूख पा। वांई

बाजी बिन सुदाम सेटी पाटणी पा। मा। यानें सांगितलें कीं, 'आपणास चावर १ इनाम आहे ते चालते. पण मोहीम खर्च व बेलेकटी दुमाला नाहीं. ते चालू करावी.' तरी ती दिधली असे. चालवीजे. पा। हु। कार. महिमाजी. रुजू दफ्तर खास. लि। कडूस नजीक भिवरा.

शि. प्र. पृ. १३ } (३५१) { श. १५५४ माघ व. १३
सु. १०३३ रजब २६ } मिसली { इ. १६३३ जाने. २७

अजदिवाण ता वालवे— हुदेदार व मोकदम कसबे वालवे. तपे पार

मौजे सिरगांवच्या श्रीसिद्धेश्वरास अभिषेकाबदल इनाम जमीन चावर पाव चालत होता. तसा संमट लक्ष्मीधरभट याजकडे, देखील हक चालविणें.

कों. इ. सा. ले. १० } (३५२) { श. १५५४ फाल्गुन शु. २
सु. १०३३ साबान १ } फा. भाषांतर मु. { इ. १६३३ जाने. ३१

हवालदार——— देसाई व देसकुलकर्णी परगणे कुडाळ

हुजरून माहालासी पाठविले आहे त्याजकडून कामें जाहीर होतील. पण तुम्ही बंदीखानें ठेवलेल्याची यादी गुन्ह्यासह कां पाठविली नाहीं, वसूल तपशिल पाठविला नाहीं, तुम्ही इमानदारांनें वागतां तर तुमचे घेतले तर परत दिले असते. आतां सर्व हकीकत फर्जंदी कसोशीनें पाठवावी. आमची दुस्मनी दुसरेचे दुस्मनीसारखी नव्हे. आमचे हवालदारींत विलायती मामूर व आबादानी असावें. इ.

खं. १५ ले. ३२६ } (३५३) { श. १५५४
(?) } { इ. १६३२

भालेराव हवालदार व नरसिंगराव नाईक केळंजा—कान्होजी नाईक देशमूख ता भोर

वेलंगीचे कौलाचें लिहिलें तरी कौल दिल्हा असे. जैसे किले केळंजा मुकासा देह आहुती. तैसे वेलंग असे. वेहाली व माडी वाटून गोपाजी व पोसजी यापासी दिल्हा असे.

शि. प्र. पृ० १४ ले. ११ } (३५४) { श. १५५४
सु. १०३३ } मिसली { इ. १६३२-३३

अज दिवाण तपे वालवे——हुदेदार व मोकदम देहाये तापे वाळवे.

तुकोजी सिदा हवाई व खंडोजी घोरपडा देसाई व देसकुकर्णी तपे मा यानीं सांगितल्यावरून संमट लक्ष्मीधरभट शिरगांवकर यांस श्रीसिद्धेश्वरदेवाकरतां सादिलवार होन ६॥~ पूर्वीप्रमाणें चालविणें.

बिजापूर आर्कि. पृ. ७६ } (३५५) { श. १५५४,५५
हि. १०४३ } मशिदीवरील शिलालेख { इ. १६३३

ताज सुलताना, इब्राहिम दुसरा याची राणी, त्याच्यानंतर सात वर्षांनीं मेली.

सा. ले. २३६ } (?) } (३५६) कौल फा. मु. सी. { श. १५५४ { इ. १६३२-३३

मलिक शाह——— कान्होजी नाईक देसमुख

तुम्ही लिहिले "स्वारा से दोनी देउनु व पटी मोकासे देउनु म्हणौनु कौल पाठविणे (म्हणजे) येतो." ठीक केले; कुल जमेतीसी येऊन मसलतीस शरीक होणे. ये वख्ती आलिया दौलतखाही जाहीर होईल. पेसजीची कुल तकसीर माफ असे. बेमुलाहिजा होऊन येणें.

सा. ले. २३५ } पौ २६ रमजान } (३५७) कौलपत्र फा. मु. { श. { इ. १६३२-३३

जायेणा पंडित——— कानोजी जेधे देसाई

तुम्ही लिहिले कीं "आपण यख्त्यार होऊन भेटीस येणार कौल व आत्मिक पाठवणे." तरी हजरत साहेबाचे कौल पूर्वींच पाठविले होते. अताही असे. तुम्हाविसी दुसरे विचारे नाहीं. तुमचे दिलासेबदल आमचे माहीतींचें विठो पंडित विस्णोपंत पाठविले आहेत. आलिया खानसाहेबाची भेटी होऊन सरफराज होईल. तुम्हा विखी गंगाजी राजे व अंबाजी घोरपडे बहूत सांगितलें आहे.

खं. १५ ले. ३२५ } ? } (३५८) मराठी मु. व सी. { श. { इ.

साबाजी मुधोजी नाईक——— कान्होजी राजे जेधे देशमूख रोहिडा

तुम्हीं पंताजीपंत हेजीब पाठविले. तरी तुमचे कामाचें आम्हास स्मरण आहे. ते तरफेहून आम्ही माहानगरास आलों. आम्ही खस्त खानसाहेबास मालूम करून सरंजाम करूनु देवऊं.

खंड २१ ले. ५६ } सु. १०३३ सवाल ७ } (३५९) ताकीदपत्र मु. २ { श. १५५५ अ. वैशाख शु. ८ { इ. १६३३ एप्रिल ७

अजर.—नरसोजी हणगोजी, अंबाजी घादजी व धारराऊ, सिवजी भापतराऊ, कृष्णाजी रामजी, साउजी नाईकवाडी पा कन्हाड गिजेरे

हुदे० मोक. मौ कोणगाऊ

अंतीभट बिन आपदेभट गिजरे यास ·॥· चाव्र जमीन इनाम चालविणें.

शि. प्र. पृ. ९५ ले. १२ } सु. १०३४ जिल्हेज २८ } (३६०) मिसेली फा. मु. { श. १५५५ ज्येष्ठ वद्य ३० { इ. १६३३ जून २६

कारकून तर्फ वालवे———गोदाजी कृष्ण हवा० व कार०

संभभट बिन लक्ष्मणभट यास सिद्धेश्वराचे पुजेबद्दल खैरात दिली आहे.

शि. प्र. ९५ ले. १३ } (३६१) { श. १५५५ आषाढ शु. १
सु. १०३४ जिल्हेज २९ } मिसेली { इ. १६३३ जून २७

अज दि. तपे वालवा——— खोत तपे वालवा

२८ जिल्हेजच्या खुर्देखताप्रमाणें संभभट बिन लक्ष्मणभट पुजारी सिद्धेश्वर यास रुके ३॥ दरसाल आदा करीत जाणें.

खं. २० ले. १८६ } (३६२) { श. १५५५ आषाढ शु. १२
सु. १०३४ मोहर ११ } महजर कोल्हापूर (कपिलेश्वर) { इ. १६३३ जुलै ८

धर्माधिकारी व जोइसी कुल. पळूस माधव लिंगणभट एकोडीकर व कलंभट माहेकर

विष्णु पाठके आपल्या मूळ पुरुषांस कन्यादानसमयीं दिल्हेया आहेती वृत्ती ५; ज्योतिष मौ. बायवडे व उचगांव व का कोल्हापूर येथील ज्योतिष, ग्रामउपाधिक व धर्माधिकरण. धर्माधिकारिणी पदम्नाभीभट आपला मूळपुरुष अच्युतभट याच्या सासऱ्यानें आपलें धर्माधिकरण कन्येस दिधले. तधींपासून आपण खातो. मागें वेवाद सांगितला, त्यावरी जोइसीची साक्ष आहे. जोइसी पांच वृत्ती आपल्या म्हणतात तरी ५ वृत्ति हली पाच जण खातात. पण असल पत्र नसल्यानें वृत्तीपत्राची नकल दाखविली. असल हरवले. त्यावरी धर्माधिकरणास जोईसी यांस संबंध नाहीं ऐसे निवडिलें. तरी का कोल्हापूरचे वतन पद्मनाभीनें खावें.

स. पृ. १८ ले. १३ } (३६३) { श. १५५५ भाद्रपद व. ३०
वृ. ३४ पृ. २६८ श. } दानपत्र { इ. १६३३ सप्टें. २३

मुरार जगदे——— सोळा ब्राह्मण मौजे नागरगांव (तुळापूर)

धर्मावतारो राजाधिराजः महाराजः राजश्रीः पंडितः मुरारिः जगदेकप्रभुः सार्वभौमप्रतिनिधिः रविग्रहस्पर्शकाले गजदानमश्वदानं गोशतदानं च कृत्वा सुवर्णरजतादिचतुर्विंशतिसंख्याकानि तुलामहादानानि कृत्वा ३०० वराहपरिमितभूमिकमग्रहारसंज्ञकं कृत्वा २१६ वराहपरिमितभूमिकं पृथगपास्य १८ भागान् कृत्वा भागद्वयं दीपदानाभिषेकनैवेद्यार्थमुपकल्प्य । सोनभट देवगिरस्त १ नरसिंहभट अग्निहोत्री २ त्रिंबकभट नांदुरकर ३ त्रिंबकभट सुदामे ४ त्रिंबकभट खेडकर ५ भानभट तळेगांवकर ६ महादेवभट पुरंदरे ७ त्रिंबकभट पुराणिक ८ पुरुषोत्तमभट वैष्णव ९ भानभट वैष्णव १० गोपतिभट ढेरे ११ अपदेवभट चित्राव १२ बाल पाठक नाशिककर १३ रंगनाथभट ग्रामज्योतिषी १४ सोमनाथभट ग्रामज्योतिषी १५ पुंडालिक हरिदास पंढरपूरकर १६ एवं षोडशब्राह्मणेभ्यो दत्वा कालिदासकविश्रेष्ठेभ्यो, वररुचये, विमलभट पुरोहिताय, रायारायाय, हलेगौडाय गृहनिर्मित्रे च दत्तवान् ।

खं. १५ ले. ४१७ }
श. }
(३६४)
पावती
{ श. १५५५ आश्विन शु. १०
{ स. १६३३ आक्टो० २

संभाजी तानदेऊ—— जिवाजी बिन खेलोजी भोसले

मौजे निर्गुडे येथील मोकदमी काजालेयापासून विकत घेतली यावरी तुमचा इलाखा मोकदमीस होता हा आपणास दखल नव्हता. तुमचा इलाखा मुनसिफीकरितां साच जाला. आपले पैके आपणास दिधले. सदरहू मोकदमी तुम्हास दिधली असे. (एमाजी व मगाजी देसमुख किल्ले फतेमंगळ या हुजूर.)

खं. १५ ले. ४१८ }
सु. १०३४ व श. }
(३६५)
महजर
{ श- १५५५ आश्विन शु. १२
{ इ. १६३३ आक्टो० ४

एमाजी व मगाजी देसमूख व रखमाजी कान्हो देसकुळकर्णी
जिवाजी बिन खेलोजी भोसले.

एमाजी देसमूख सुजोन मरो लागला. त्याणें निमे मोकदमी उणे चावर ५, तुम्हास विकत दिधली व संभाजी तानदेऊ यानें घेतली होती ती तुम्हास दिधली.

खं. १५ ले. ४१९ }
श. व सु. १०४४ }
(३६६)
विक्रयपत्र
{ श. १५५५ आश्विन शु. १२
{ इ. १६३३ आक्टो० ४

एमाजी बिन धाकोजी काजले--- जिवाजी बिन खेलोजी भोसले.

मौजे निरगुडची मोकदमी आपली मिरासी. पैकीं निमे मोकदमी व ५ चावर संभाजी तानदेऊ यास दिली; ती त्याच्यानें होईना म्हणून त्यानें तुम्हास विकली; व आपण मोई पडलों सुजो लागलों म्हणून बाकीची तुम्हास विकिली.

खं. १५ ले- ४२० }
सु. १०३४ रखर १२ }
(३६७)
खुर्दखत मु. व सी.
{ श. १५५५ आश्विन शु. १४
{ इ. १६३३ आक्टो. ६

अजर० त्रिंबक बलाळ — हुदे० व मोक० वडिगौऊ नजीक देऊळगौऊ पा पुणे

रामेश्वरभट राहणारा आरवी, मालूम केले "आपणास जमीन कास रुके ·।- बारा आरवी येथील दो हक्क चालत आहे. खुर्दखत होये." तरी पूर्वीप्रमाणें चालविणें.

खं. १५ ले. ४२१ }
सु. १०३४ रखर १४ }
(३६८)
खुर्दखत मु. व सी.
{ श. १५५५ आश्विन व० १
{ इ. १६३३ आक्टो० ८

अजर० त्रिंबक पंडित — हुदे० मोक० वडिगौ ना देउळगौ. कर्या. पाटस

रामेश्वरभट बिन नारायणभट सेाा आरवी मुद्गल मालूम केले वगैरे वरील पत्रांतील मजकूर व सालगुदस्ता जे दस्त असेल ते (दिवाण अंबर) पैकीं (कोठींतून) देणें.

सा. ले. २०५ } (३६९) { श. १५५५ मार्ग. शु. ११
सु. १०३४ जखर ९ } फर्मान. फा. मु. मज. व सी. { इ. १६३३ डिसें. १

अजर० खास----कार० व देसमु० तपे रोहिडा

कान्होजी जोधा देसमूख तर्फ भोर यास कारी तपे रोहिडा इनाम. हें चालविणें.

सा. ले. ९५ } (३७०) { श. १५५५ मार्ग० व० १
श. (?) } कबूलकतबा { इ. १६३३ डिसें० ६

जाऊ बिन हर पाटील घुला मोक० महमदवाडी पा। पुणे

हाजीर मजालस स्थल मायेवाडी ता। कऱ्हेपठार

बापू बिन देऊ पाटील आपला भाऊ दुकाळ पडिला म्हणून पांढरी टाकून गेले. यावर वडील मेले. आम्ही वाचलों. सुकाल जाला. यावरी रा० दादाजी कोंडदेऊ सुभेदार दिवाण जाले. याणी मुलुक लाविला. देसमु० देसकु० यांस ताकीद केली कीं गाव लावणें. आपणास कौल देऊन गाव लाविला. येकदोनी वेळा तुज आणावयास आलो. तू बोलिलास "मागे जैसे चालिलेस तैसेच चालसील व गोतास लेहोन देसील तर येईन" म्हणून गोतास लिहून दिलें कीं, चुलत्याच्या व बापाच्या तकसीमेपैकी निमी तुज दिली. वडील मान आपला. धाकटा मान तुझा.

सा. ले. ९६ } (३७१) { श. १५५५ मार्ग. व १
श. (?) } महजर (मायेवाडी) { इ. १६३३ डिसें. ६

जाउजी बिन हरजी व बापूजी बिन खेउजी घुले पाटील मौ महमदवाडी पर० पुणें यामधील भांडण. तें त्यांनीं आपसांत मिटविलें. "दादाजी कोंडदेऊ सुभेदार येऊन गांवाची गांव लाविला."

शि. प्र. पृ. ९५ ले. १४ } (३७२) { श. १५५५ मार्ग. व. ३
सु. १०३४ जखर १६ } मिसेली फा. मु. { इ. १६३३ डिसें. ८

अज दि. तपे वालवे—— हुदे. व मोक. कस. वालवे तपे मज.

खुर्दा जवल १ सादर कीं बो संभूभट बिन लक्ष्मीधरभट सो वाळवे मालूम केले कीं 'आपणास वाळवे येथें ·।· चावर जमीन इनाम शिरगाव येथील सिद्धेस्वराचे अभिसे-खाबदल बा। खुा। **मुरारी पंडित** चालिले आहे. हाली महाल साहेबास मुकासा अर्जानी जाला आहे खुर्दा होये.' तरी चालविजे.

खं. २० ले. ७९ } (३७३) { श. १५५५ माघ शु. ११
सु. १०३४ साबान ९ } खुर्दखत फा. मु. मज व सी. { इ. १६३४ जाने. २९

अजर. **रणदुला फरादखान**—— कारकून परा। वाई

रंगभट बिन गोपीनाथभट चित्राऊ सो। वाई मालूम केलें "आपणास बा। धर्मा-

दाऊ, देसमूख व देसक येही होन १० दिधले आहेती. खुर्दा होये." तरी पूर्वीप्रमाणें चालविणें.

खं. २० ले. ८० }
सु. १०३४ साबान ९ }
(३७४)
खुर्दखत फा. मु. मज व सी.
{ श. १५५५ माघ शु. ११
{ इ. १६३४ जाने. २९

अजर. **रणदुला फराहादखान**---- कारकुन पा वाई

रंगभट बिन गोपीनाथभट चित्राव सो वाई माल्रूम केले जे 'आपला मामा हरिभट बिन विष्णुभट देऊरकर यास पसरणी खालील वाकेवाडी येथें नीम चावर जमीन इनाम आहे. तो निपुत्रीक आपण त्याचा भाणजा. मरतेवख्ती आपणासी इनाम दान दिला. आपण तो इनाम खात आहों. खुर्दा होये.' तरी पूर्वीप्रमाणें चालविजे.

स. पृ. १०३ ले. ६ }
सु. १०३४ }
(३७५)
खुर्दखत
{ श. १५५५
{ इ. १६३३-३४

अजर. **शहाजी राजे**—कार. देशमूख हुदे. मोक. मामले गुलशनाबाद (नाशीक)

तुकाजी बिन कोंडो पंडित सो नाशीक मालूम केले "आपणास इनाम जमीन व बाग व तले दर कसबे नाशिक व गोवर्धन आहे. खास फर्मान व मलिकंबर खुर्दखताप्रमाणें चालत आहे. हल्ली मामले मज. साहेबास **मोकासा अर्जानी** जाहला. खुर्दखत होये" तरी वरील इनाम पूर्वीप्रमाणें चालविणें.

खं. २० ले. २५७ }
सु. १०३४ }
(३७६)
खुर्दखत मु. (?) व सी.
{ श. १५५५
{ इ. १६३३-३४

अजर. **स्याहाजी राजे**---हुदेदार व मोकदम को पुणतांबे पा संगमनेर.

त्रिंबक जोसी फर्जंद माणिक जोसी को पुणतांबे यांनीं माल्लुम केले, "आपल्या बापाच्या नांवें जमीन बिघे १५ जकाती रुके ६ बा फर्मान खास व खुर्दखत मलिकंबर चालू आहे. ती चालविणें." तरी वरीलप्रमाणें इनाम चालविणें.

विजापूर आर्किटेक्चर }
पृ. ७५ हि. १०४३ }
(३७७)
थडग्यावरील फारशी लेख
{ श. १५५५
{ इ. १६३३-३४

विजापूर येथील इब्राहिम रोज्यावरील लेखांत

'ताज सुलतान अहल्-इ-जनत्' हा शब्दसंकेत दिला आहे. त्यावरून ताज सुलतानचें मृत्यु वर्ष हि. १०४३ येतें. (ही ताज महंमद अ० ची आई).

शि. प्र. पृ. ९६ ले. १५ }
सु. १०३४ जिल्काद २५ }
(३७८)
मिसेली फा. मु. २
{ श. १५५६ वैशाख व. ११
{ इ. १६३४ मे १३

अज दि. तपे वालवे—— लखमरस तिमाजी खाते जकाती

संबभट बिन लक्षुमणभट सिद्धेस्वरचे पुजारी यास रोजीना रुके ३ देविले.

खं. १६ ले. १८ } (३७९) { श. १५५६ कार्तिक व. १२
सु. १०३५ जवल २५ } मिसेली { इ. १६३४ नोव्हें. ७

अजर. **सिद्दी अंबर हवालदार** किले **कोंढाणा**— कारकु. तपे कानदखोरे बाबाजी कान्होजी जुंझारराऊ देसमुख यासी मौजे विहीर, अत्रोळी, उंबरपेठ. येथील इसाफती इनाम दिधला असे.

खं. १५ ले. ६८ व स. पृ. २० } (३८०) { श. १५५६ मार्ग. शु. २
सु. १०३५ जवल ३० } खुर्दखत मु. सी. { इ. १६३४ नोवें. १२

अजर. **खेलोजी राजे**—— कारकून देसमुख पा़ आकळकोट

हिंगळागीर गोसावी सो नींब यासी बदल धर्मादाऊ व भंडारा माहाळी दरगाबासी मला मण १ व नख्त टका १ इनाम आहे तें चालविणें.

सं. २ पृ. ७० ले. ३ } (३८१) { श. १५५६ माघ व. ३
श. साबान १६ } उपार्जनपट फा. मु. { इ. १६३५ जाने. २६

समस्त ग्रामवासी कसबे पावस—- विस्वनाथ व जोग व कृष्ण फर्जंद सोम जोसी तुम्ही तपे पावसचे जोतिसी सेवा मिरासी करीत आहा. तुम्हांस वृत्ती नाहीं तरी तुम्ही कसो मजकुरी घर, सेत व बाग करून रहावे. जागा दिली आहे.

खं. १५ ले. ६९ } (३८२) { श. १५५६ फाल्गुन शु. १४
सु. १०३५ रम १२ } खुर्दखत { इ. १६३५ फेब्रु. २०

अजर. **खेलोजी राजे**————कार. व देसमुख पा़ सुपे

कमलनयन व हिंगलागीर गोसावी नींब यासी मौजे मुजेवाडी परा़ सुपे हा गांव इनाम.

खं. २० पृ. २३९ } (३८३) { श. १५५६
श. } मध्वाजी कृष्ण पंडित याचे वेलचा महजर { स. १६३४–३५

अग्रवादी–नाग जोसी बिन गण जोसी आपला विभाग दिल्हा. रवा काढीन.

पश्चिमवादी–कडतजोसी बिन रंगजोसी वृत्तीसमंधे दिवाणांत होन पडिले आहेत. याचा विभाग नागजोसी याणे दिल्हा नाहीं. याजमुळें विभागास खलेल पडिली होती.

रवा करणेचें राहून कडतजोसी याणें नागजोसी यास विभाग दिल्हा.

सा. ले. २५
(?)

(३८४)

श. १५५६
इ. १६३४-३५

मल्हारजी आपाजी देसमु. पर. सिरवल—रा. रामाजी विठल देसकु. पर. सिरवळ

जायेणा लिगरस याचे वेळीं माझा बाप वारला. कोणी विषप्रलय जाला म्हणून तुमचें नांव घेऊं लागले. तुम्ही पारवीस (पैरवीस) उभे राहिले. तरी हा अमल तुमचेपासून जाला नाही. तुम्ही कोणाच्या बोलावरी नव जावे.

सा. ले. ४९
पृ. ७०

(३८५)
उल्लेख—वाटप

श. १५५७ चैत्र व. ६
इ. १६३५ मार्च २९

गोदजी, गोमाजी, एसोजी, पिलाजी, एमाजी, पाटील पाचपुते मोकदम मौ. मवाळी पर. सिरवल———— आबाजी पाचपुता

तू मौ आनेवाडी येथे सेत करून होतास. तेथे आम्ही येऊन गला पडलो. मिरासी सोडून दुसरे ठिकाणीं भावानें नांदावे हा धर्म नव्हे. म्हणून तुझी सहावी तक्सीम तूस दिल्ही.

खं. १५ ले. ७०
सु. १०३६ सफर ३

(३८६)
मिसेली फा. मज.

श. १५५७ श्रावण शु. ४
इ. १६३५ जुलै ८

अज दिवाण पो वांई——— मोकदम मौजे गोवे सं. नींब पर० वांई

खुर्दखत रा ४ मोहरम आले. त्यात मजकूर "गोविंदगिरी मुरीद कमलनयन गोसावी याणीं मालूम केलें कीं 'आपुले इनामत मळे मौजे गोवे यांस धरण कलवायत (कालवा, पाट) असे. त्याबदल खुर्दखत होय. तरी कालवा पाणी चालविजे" रजेबरहुकूम करणें.

खं. १५ ले. ७१
सु. १०३६ रवल १५

(३८७)
खुर्दखत

श. १५५७ अधिक माद्र. व. १
इ. १६३५ आगष्ट १९

अज्र. **जगदेराऊ मुधोजी** नाईक--कार. व मोक. मौजे निगडी किले सातारे कमलनयन मानमात्र सो नींब यास बदल धर्मादाऊ जमीन बिघे १६ आहे.

शि. च. ले. ३७४
सु. १०३६ (?) जखर १७

(३८८)

श. १५५७ कार्तिक व. ५
इ. १६३५ नोवें. १८

(?)————महमदखान गुमास्ते देशमुख कर्यात तळबीड

तुम्हाकडून तीन सालाचा इनाम तिजाईचा वसूल येणें आहे. पैकी ६० रु. वरात दिली आहे. पैकी २० रु. तूर्त देणें. बाकी मुदतींत द्यावे.

सा. ले. २०६ } (३८९) { श. १५५७ माघ शु. ८
सु. १०३६ रम ६ } खुर्दखत फा. मु. मज व सी. { इ. १६३६ फेब्रु. ४

अजर. **रणदुला फरादखान**——— कारकून व देसमूख पर. वाई

कान्होजी जेधा मोक. मोजे वेलंग पर. वाई मालुम केलें "सन १०३४ (श. १५५५) मध्यें **वेदजी आनद** हवालदार धोमेसी आले होते. आपण भेटी घेतली. आपणासी इनाम जमीन चावर १ दिधलिया गाव कीर्दी करीन. त्यावर कारकुनी जमीन १ चावर दो। हक दिधला. खुर्दखत होये." तरी चालविजे.

खं. २० ले. २३४ } (३९०) { श. १५५७ माघ व. ११
सु. १०३६ रम. २४ } मिसेली फा. मु. मज. व सी. { इ. १६३६ फेब्रु. २२

अज दि. मामले दौलतमंगल——— मोक. व रया. मायवडी तर्फ करेपठार

गणोबा गोसावी सो मोरेश्वर यांस (मौ. मज. इनाम ·॥· चावर आहे. चालविणे.)

शि. प्र. पृ. ९७ ले. १८ } (३९१) { श. १५५७ फाल्गुन शु. ३
सु. १०३६ सवाल २ } मिसेली फा. २ मु. व सी. { इ. १६३६ फेब्रु. २९

अज दि. तपे वाळवे——— मोक. देहाये तपे मज.

संबभट लक्ष्मीधरभट सो वाळवे यास बदल अभिसेख श्रीसिद्धेस्वरदेऊ मोकाम सिरगाऊ होन ६॥= असे. 'हाली तपे मज. साहेबास **मुकासा अर्जानी** जाहला असे. ते चालवावे.

सा. ले. २०७ } (३९२) { श. १५५७ फाल्गुन शु. ७
सु. १०३६ सौवाल ५ } खुर्दखत फा. मु. व सी. { इ. १६३६ मार्च ३

अजर. गंगाजी नाईक——— कार. तपे रोहिरे

कान्होजी नाईक याणे मालूम केलें जे "तपे रोहिडे **साहेबास मुकासा अर्जानी** जाला. तपेचे देसमुखास इनाम थोडा आहे. दिवाण हलालखोरीकरितां तकसीर करीत नाहीं. तरी नाटंबी गाव इनाम केला पाहिजे" तरी इनाम दिल्हा असे. चालविणें.

डागरजिस्टर १६३६ } (३९३) { श. १५५७ फाल्गुन व. १
पृ. ५० } { इ. १६३६ मार्च १२

दख्खन प्रांत आपल्या अमलाखालीं आणण्याच्या इराद्यानें मोंगल बादशहा आपलें सैन्य घेऊन बऱ्हाणपूरच्या रोखानें निघाला आहे.

सा. ले. १४७ } (३९४) { श. १५५७
सु. १०३६ } मिसेली फा. मज. मु. व सी. { इ. १६३५-३६

अज दि. मामले **दौलतमंगल**

मोक. व रया. मौजे मायेवाडी कर्या जेजुरी. (अपूर्ण)

सा. ले. २०८
सु. १०३६

(३९५)
खुर्दखत

श. १५५७
इ. १६३५-३६

(?)— कार. व देशमूख पर. वाई

कानूजी जेधा मुकाम बेलंग माळूम नमूद के वैद (अनंत) हवालदार इनाम जमीन १ चावर दर सना अर्बा अजन्हाये मरहमत नमूदा अस्त. बसिके फर्मान साहेब सलामत मौजे मजकूरा मामूरी कीर्द खाह नमूद मीबायदके आं इनामरा जारी दारंद.

सा. ले. ३२८
सु. १०३६

(३९६)
समुदपटा फा. मज व मु.

श. १५५७
इ. १६३५-३६

हुदे. मतकरी व गावकरी मौजे खानोली

भानजीप्रभु बिन बाबाजीप्रभू; मलेप्रभू बिन गणेशप्रभू"

देवजी बिन विठल पंडित मौ. मज. यानी आत्मसाकडी कारणे तुमासी जमीन, झाडे वगैरे विक्रेय दिले असे. आम्ही क्रियेवर पालू.

सा. इ. सा. पृ. २५ ले. २८
सु. १०३६

(३९७)
कौलनामा

श. १५५७
इ. १६३५-३६

खेम सावंत सरदेसाई पर. कुडाळ

अंत शेणवी बिन नार शेणवी यार्दी, नाडकर्णी व चिटणीस. पर. मज.

तू मिरासी चिटणवीस. तुजे आजा चिटणीशी चालवीत असतां, तुजे बाप नार शेणवी यास हरकारगी मिरास केली. तुमचे मुशाहिराबद्दल गावगन्ना पटिया होते ते तमाम दुबले होऊन गेले. व मुधो पंडित व मुरारी पंडित यानीं अकसकरितां तनखा असल घातले नाहीं. तुम्ही बिन मुशाहिरा चाकरी करित. तरी आम्ही संतोष पाऊन तुम्हास पूर्वीची मिरास व मुशाहिरा सालीना ३६ होन मुकरर केला.

मोड. पृ. १६५
पा. ना. व फि. सि. पृ. ५४

(३९८)
फारशीचें भाषांतर

श. १५५६
इ. १६३६

शहाजहानाचें महमद आदिलशाहास पत्र.

ईश्वरानें आम्हांस पृथ्वीचे बादशहा केले. तेव्हां विजापूर, गोवळकोंडे, भागानगर, लंका, पडलंका येथें आमच्या नांवानें शिक्का व खुदबा सुरु करणें आम्हांस प्राप्त झालें. तुम्ही आपणास बादशहा म्हणविता; पण आतां आमच्या सेवेची दोरी गळ्यांत अडकवून आमच्या नावानें शिक्का सुरू करावा. नाहींतर बाज पक्ष्याचे हातून तुमचें मांस काढून घारीस टाकून लूट करवूं. आपण ससासारख्या भ्रांतीच्या झोपेंत आहां. आपल्याकडे मकरमतखान अमीर यास पाठविलें आहे.

मोड पृ. १६६ }
फि. सि. ५५ }
(३९९)
फारसीचें भाषांतर
{ श. १५५७
{ इ. १६३६

महंमद आदिलशहा---- शहाजहान

कोणाचा गर्व व अभिमान ईश्वर चालूं देत नाहीं. आम्हीहि पुरातन असून आम्हां कडेहि ईश्वरानेंच अधिकार दिला आहे. तुम्ही कितीहि आढयता मिरविली तरी नवीन आहा. दुसऱ्याचें अकल्याण इच्छिण्यांत आपलाच घात होतो. खंडणी आजपर्यंत दिली तेवढी यापुढें देऊ.

शि. प्र. ९६, ले. १६ }
?
(४००)
{ श. १५५७
{ इ. १६३५-३६

संभट बिन लक्ष्मणभट यास वडिली नागठाणे तपे वाळवे येथील नागेश देवाचे स्रावणमास अभिषेकाबदल खुर्दखत दिले आहे. त्यांचें हाते अभिषेक करणे. दाइजास समंध नाहीं.

शि. प्र. ९७ ले. १७ }
?
(४०१)
{ श. १५५७
{ इ. १६३५-३६

?—हरि राम

भट गोसावी व वालवेकर यास अर्धा होनु मालेवाडी मधे देविले असे ते देणें.

त्रै. व. ७ पृ. ५० ले. १ }
सु. १०३६ जिल्काद १५ }
(४०२)
मिसेली फा. मु. मज. व सी.
{ श. १५५८ चैत्र व. २
{ इ. १६३६ एप्रिल १२

अज दि. मामले दौलत मंगळ—

हुदे. व मोक. व रया. मौजे नायेगाऊ देऊ तर्फ करेपठार

नायेगाऊ देऊ येथें गोपालसीद देवस्थान आहे. त्यास रुके ६ जमीन इनाम. आहे तें चालविणें.

त्रै. व. ७ पृ. ५० ले. ३ }
सु. १०३६ जिल्काद १५ }
(४०३)
मिसेली फा. मु. मज. व सी.
{ श. १५५८ चैत्र व. २
{ इ. १६३६ एप्रिल १२

अज दि. मामले दौलतमंगळ

हुदे. मोक. व रया. मौ. राजूरी तर्फ करेपठार

कोंड बिन गोविंद जोइसी सो राजुरी मालूम केलें जे "आपणासी मो राजुरी येथें इनाम चावर २ बरहु. फर्मान निजामशहा व खुर्दा हैबतखान व मिसेली रायाराऊ माजी हवालदार चालत आहे. फर्मान देण्या रजा फर्मावणें." तरी पूर्वीप्रमाणें चालविणें.

इं. फॅ. भा. ५ }
पृ. २०९ इ. }
(४०४)
सुरत-कंपनी
{ श. १५५८ वैशाख शु. ४
{ इ. १६३६ एप्रिल २८

दख्खनमधील लढायांमुळें पोलाद महाग झालें आहे.

[पृ. २१६-२१७] बादशहा अद्यापि दौलताबादला आहे. पावसाळ्याकरितां अहमदाबाद अगर मांडू येथें जाईल.

खं. २० ले. २३३ }
सु. १०३६ जिल्हेज ४ }
(४०५)
मिसेली फा. मु मज. सी.
{ श. १५५८ वैशाख शु. ६
{ इ. १६३६ एप्रील ३०

अज दि. मामले दौलतमंगळ ———— हुदेदार मोरगाऊ तर्फ करेपठार गणेश बिन मल्हारीभट भगत मोरया यास जमीन चावर ·।· इनाम आहे ती चालविणें.

सा. ले. १४८ }
सु. १०३६ जिल्हेज ७ }
(४०६)
मिसेली फा. मु. मज. सी.
{ श. १५५८ वैशाख शु. ९
{ इ. १६३६ मे ३

अज दि. मामले दौलतमंगळ——मोक. व रया. मौजे मायेवाडी कर्या. जेजूरी गणोबा गोसावी मोरगाऊ यांसी इनाम चालविणें.

सर. औरंगजेब १ पृ. ३८ }
अब. हमी. १६८-७३ }
(४०७)
{ श. १५५८ वैशाख शु. १२
{ इ. १६३६ मे ६

शहाजहान व महमद अदिलशहा यांचा तह.

(१) विजापूरच्या आदिलशहानें दिल्लीपतीचें मांडलिकत्व मान्य करावें.

(२) निजामशाही राज्याचा मुलूख बादशहा आणि आदिलशहा यांनीं वांटून घ्यावा. आदिलशहानें बादशाही मुलखाची मर्यादा ओलांडूं नये व नवीन तहानें हस्तगत झालेल्या मुलुखाचा ताबा बादशहाला बिनतक्रार करूं द्यावा.

(३) विजापूरच्या सुलतानाच्या मूळच्या मुलुखाला निजामशाहीपैकीं खालील मुलूख नव्यानें जोडण्यांत यावा:- पश्चिमेकडे, भीमा व सीना या दोन नद्यांमधील, सोलापूर व परिंडा ह्या किल्ल्यांसह, सोलापूर व वांगणी महाल; ईशान्येकडील भालकी व चिडगुपा हे परगणे; निजामशाही कोंकण; आणि पुणें व चाकण हे दोन परगणे. ह्या सर्व मुलूख मिळून दरसाल २० लक्ष होन किंवा ८० लाख रुपये वसुलाचे ५० परगणे होतात. राहिलेला निजामशाहीचा मुलूख निर्विवादपणें मोंगलांच्या राज्याला जोडावा.

(४) आदिलशहानें तहाकरितां म्हणून २० लक्ष रुपये रोख किंवा जिन्सांचे रूपानें द्यावे. (वार्षिक खंडणी ठरविली नाहीं.)

(५) गोवळकोंड्याचें राज्य हें बादशाही संरक्षणाखालील असें समजून त्याच्याशीं विजापूरकरांनीं सलोख्यानें व 'वडील भावाप्रमाणें' वागून हद्दीबद्दल किंवा मूल्यवान नजराणे देण्याबद्दल तसदी देऊं नये. मांजरानदी ही उभयतांचे राज्यांमधील सरहद्द मानावी.

(६) परस्परांनीं एकमेकांचे नोकरांस वळवूं नये किंवा पळून गेलेल्यास थारा देऊं नये. शहाजहाननें आपण स्वतः व आपले पुत्र यांच्या वतीनें विजापुरकरांचे नोकरांना बादशाही नोकरींत न घेण्याची हमी घेतली.

(७) शहाजी भोसल्यानें निजामशाही वंशांतील एका मुलाला पुढें करून जुन्नर त्रिंबक इत्यादि किल्ले अजूनही आपल्या हातांत ठेविले होते, ते तो शहाजहानचे हवालीं करीपर्यंत त्याला विजापूरकरांनीं आपल्या नोकरींत ठेवूं नये. तसें करण्याचें त्यानें नाकारल्यास त्याला विजापुरचे मुलखांत आश्रय किंबहुना प्रवेशही मिळूं नये.

इं. फॅ. ५ पृ. २६० इ.	(४०८) दाभोळ–सुरत	श. १५५८ वैशाख व. ९ इ. १६३६ मे १९

विजापूरकडून पत्रें आलीं त्यांवरून **विजापुरकरांचा व मोगलांचा तह** होऊन मोगली सैन्य परत जाऊं लागल्याचें कळतें.

डागराजिस्टर १६३६ पृ. ११४	(४०९)	श. १५५८ वैशाख व. १४ इ. १६३६ मे २३

बादशहा मोठें सैन्य घेऊन आग्र्याहून दौलताबादेस येऊन राहिला आहे. त्याचा उद्देश काय आहे याबद्दल खात्रीलायक बातमी नाहीं. तथापि गोवळकोंडा व विजापूर हीं राज्यें मुळींच युद्ध करावें न लागतां त्याच्या ताब्यांत येऊन, तेथें त्याचे प्रतिनिधि (सुभेदार) नेमले जाऊन, पहिल्या राजांना त्यानें वर्षासनें करून देऊन जाग्यावर बसविल्याची बातमी आहे.

खं. १५ ले. ७२ सु. १०३७ सफर ५	(४१०) खुर्दखत मु. सी.	श. १५५८ आषाढ शु. ७ इ. १६३६ जून २९

अजर. सोमाजी दिनकरराऊ राजे काकडे — कार. व मौ देगाऊ किले सातारा कमलनयन गोसावी यास इनाम बिघे १० व एक आंबा चालवीजे.

सा. ले. ३४१ सु. १०३७ रखर ११	(४११) महजर फा. मु. २८ व सी.	श. १५५८ भाद्र. शु. १२ इ. १६३६ सप्टें. २

अंतो बिन दामोदर व नारो बिन अनंत **पाध्ये गोलवलीकर** यानीं मजालसीस मालूम केले जे, मौजे देवघर मामले हमजाबादे तें देवधर किले खेळणापर्यंत धर्माधिकरण व जोसीगिरी आपली पिढि दरपिढी चालत असे. कृष्ण जोसी संगमेस्वरकर यांनीं मिरासीस खलेल केली. ताम्रपटें फर्माने आहेत. ताम्रपट कागद पाहतां पाध्ये खरे. जोसी मजकुरासी निसबत नसे. (प्रभोल किंवा प्रमानवळी)

रु. ३ ले. ८ }
हि. १०४६ रखर २७ }
(४१२)
{ श. १५५८ भाद्र. व. १४
{ इ. १६३६ सप्टें. १८

खानजानाचे अर्जावरून परगणे जळगावचे देशमुखीचे काम गंगाजी देशमूख याजकडून दूर करून **परसोजी** [बिन विठाजी भोसले] यास बादशाहकडून देण्याचें ठरविलें.

डागरजिस्टर १६३६ }
पृ. २५० }
(४१३)
{ श. १५५८ आश्विन शु. १०
{ इ. १६३६ सप्टें. ९

मोंगल (बादशहा) अद्यापि दौलताबादेस राहिला असून, विजापूर जिंकण्याकरितां दोन्ही बाजूंनीं दोन सैन्यें व आपला कनिष्ठ पुत्र दक्षिणचा सुभेदार नेमिला आहे त्याचे बरोबर देश ताब्यांत घेण्याकरितां तिसरें, अशीं तीन सैन्यें त्यानें पाठविलीं आहेत. गोवळकोंड्याचा राजा मोठा नजराणा देऊन आपखुषीनें शरण येऊन आपल्याच मुलखांत राहिला आहे. विजापूरच्या राजानेंही खंडणीचें बोलणें लाविलें असतां शहाजहान योग्य तडजोडीस तयार न झाल्यामुळें व त्यानें विजापूरचा वकील आपल्याकडे अडकवून ठेविल्यामुळें विजापूरच्या लोकांनीही मोठें सैन्य जमा करून मोंगलांवर हल्ला केला. त्यांत मोंगलांचें सैन्य पळून गेलें, त्यांचे बरेच योद्धे मारले गेले आणि ६, ७ प्रमुख मोंगल सरदार कैद करून विजापुरास नेण्यांत आले.

डागरजिस्टर १६३६ }
पृ. २७३ }
(४१४)
{ श. १५५८ कार्तिक शु. ३
{ इ. १६३६ आक्टो. ११

पोर्तुगीजांनीं वसई व चौल येथील किल्यांत व आसपासच्या गांवांत सुमारें ८०० शिपाई मोंगलांच्या भीतीस्तव आणवून ठेविले आहेत.

मोंगल बादशहा अजूनही दौलताबादला असून विजापूरच्या राजानें त्याला ५० लाख रुपयांचें सोनें व हिरे द्यावे असा करार झाल्याची दाट वदंता आहे.

खं. १५ ले. ७३ }
सु. १०३७ साबान २१ }
(४१५)
मिसेली फा. मु. मज. सी.
{ श. १५५८ पौष व. ८
{ इ. १६३७ जाने. ८

अज दि. किले सातारा———— हुदे. मोक. मौजे देगाऊ

"कमलनयन गोसावी मौ. नींब यास सोमाजी दिनकरराऊ काकडा मौ. मज. याणीं इनाम जमीन बिघे १० दिली. चालविणें."

खं. १५ ले. ७४ }
सु. १०३७ रम ९ }
(४१६)
ताकीद फा. मु. मज. सी.
{ श. १५५८ माघ शु. ११
{ इ. १६३७ जाने. २६

अज. दि. पर. वाई—— मोक. मौजे गोवे.

"कमलनयनाचे बागेतील झाडें तोडिलीं, नींबमध्यें सदानंदाचे मठी आणून देणें. फरार जाहालेल्या संगीन जाईल.

खं. २० ले. २३५ } (४१७) { श. १५५८ फाल्गुन शु. ११
सु. १०३७ सौवाल ९ } खुर्दखत फा. मु. { इ. १६३७ मार्च २५

अजर. राजश्री **स्याहाजी राजे**---- कार. व देसमूख पर. पुणे

गणेशभट बिन मलारीभट मोरया माल्रूम केले जे "आपणास इनाम जमीन चावर ......चालू आहे. **हाली पर० मज० साहेबास मुकासा अर्जानी जाला आहे.** खुर्दखत होये." तरी चालविणें.

खं. १५ ले. ७५, ७६ } (४१८) { श. १५५८
सु. १०३७ } खुर्दखत फा. मु. सी. { इ. १६३६-३७

अजर. **खेलोजी** राजे---- कार. व देसमूख पर. सुपे व बारामती

कमलनयन व हिंगलागीर गोसावी यास इनाम मौ. सुजेवाडी बरहु. खुर्दा रा. मुअज्जम चालू आहे. तरी इनाम चालविणें.

खं. २० पृ. २४० आरंभ } (४१९) { श. १५५८
सु. १०३७ } कौल. { इ. १६३६-३७

कडत बिन रंगजोसी व नाग बिन गण जोसी यांचा जोतिषाचा निवाडा. (खं.२० ल. १७६ मध्यें या लेखाचा उल्लेख आहे.)

रु. ३ ले. ३ } (४२०) { श. १५५८
सु. १०३७ } खुर्दखत फारसी मु. व सी. { इ. १६३६-३७

अज रस्तखाने राजश्री स्याहाजी राजे दामदौलत हू बजानेब कारकुनानी हाल व इस्तकबाल व देसमुखानी पा। पुणे बिदानद सु॥ सबा सलासीन अलफ रा। मोरोबा गोसावी सो। मौजे चिंचवड पा। मा। हुजूर मालूम केले जे आपणास इनाम अजरा मऱ्हामती देणें शरकसखान मुकासाई मौजे पिंपरी ना। राहाटणी [ले. २४६]......दिधले. तेणेप्रमाणें ता। सन समान तसरुफाती जालियावर सन तिसा इसरीन मधे पा। मजकूर साहेबास मुकासा अर्जानी जाला होता. तै वख्तीहि खु॥ छ ७ मोहरम [ले. २७९] मऱ्हामती केलें यावरून चालिलें आहे. यावरी आफत फितरतीकरितां विलायती खराब जाला. मौजे मजकुरहि खराब पडिले......सदरहु सेत कीर्दी करावया जाता **चोराचा उपद्रौ** होतो. बैल व सेतकरी याची पाघुरणे नेताती तरी. साहेबी सदरहु सेतीचा मुबादला गावानजीक सेत दिधले पा।हिजे. तरी यास सेत......मुबादला गारपाटीपैकीं पाटी १ यो। खडी १०=॥ व गाढवलोळी पैकी मण -॥=॥ दिधले असे......सदरहु सेतास हदमहदुद घालून देणे. मोर्तब (फारसीवाटोळा शिक्का).

खं. २० ले. ७ } (४२१) { श. १५५८
? } { इ. १६३६-३७

कृष्णभट बिन हिरण्यभट व रुद्रभट बिन रघुनाथभट चावरे याचे इमानाचा तपशील व निरनिराळ्या अधिकाऱ्यांच्या कारकीर्दी दिल्या आहेत.

खं. १५ ले. ४३६ } (४२२) { श. १५५९ चैत्र शु. १
सु. १०३७ सवाल २९ } खुर्दखत फा. मु. सी. { इ. १६३७ मार्च १७

अजर. **दिलावरखान**——— कार. पर. चाकण

कृष्णभट बिन मुरारीभट ब्रह्मे पर. चाकण यास बदल धर्मादाऊ सालिना टके २५ बरहु. पत्र समस्त गावकरी कस. चाकण (खं. १५ ले. ४३४) इनाम आहे. ते कारकीर्दी बडे खानसाहेबू व अमानत व वजिरानी तागा. सीत (श. १५५७) चालू आहे. 'साल मजकुराकारणे **माहाल साहेबास मुकासा** अर्जानी जाला. खुर्द. होये' तरी पूर्वीप्रमाणें चालविणें.

खं. २० ले. ५१ (३) } (४२३) { श. १५५९ वैशाख व. १४
सु. १०३७ जिल्हेज २७ } महजर { इ. १६३७ मे १३

रावोजी अठोले यास मौ. सांगवी येथील मोकदमीचे तकसीमेचा महजर दर अमल सिदी सरूर हवालदार व शंकराजी गोविंद मजमूदार

शि. प्र. ९८ ले. १९ } (४२४) { श. १५५९ श्रावण शु. ८
सु. १०३८ रवल ६ } मिसेली फा. मु. ३ व सी. { इ. १६३७ जुलै १९

अज दि. तपे वालवे——— हुदे. व मोक. मौ. फणदी तपे मज.

संबभट बिन लक्ष्मीधरभट यासी मौ. मज. पंधरा बिघे जमीन चालत असे. सन सबा श. १५५८ मध्यें होनु १। घेतले ते परतोन देणें.

त्रै. व. २ पृ. ५० } (४२५) { श. १५५९ आश्विन शु. ७
हि. १०४७ जवल ६ } फर्मान-मोगली { इ. १६३७ सप्टें. १५

अबदुल मुजफर महमदशहाजहां सहाबुद्दीन--पर. वाशीम व सर. माहूर हे प्रांत उदाजीराम यांजकडे तनखा जहागीर म्हणून होते. त्यांचे मरणानंतर ती जहागीर त्याचे मुलाकडे चालू ठेविली आहे.

खं. १५ ले. ३३३ } (४२६) { श. १५५९ आश्विन शु.७
सु.१०३८ जवल ६ } फर्मान { इ. १६३७ सप्टें. १५

अज बदरगाह बादशाह——— कार. किले रोहिडा

कान्होजी जेधा देसाई तरफ भोर मशकत कराव्या तकसीर केली नाही, पुंडासी दफे केले. त्यावरून मौजे चिखलगाऊ कान्होजी यास इनाम देविले असे. दुबाला करणे.

शि. प्र. पृ. ९७ } टीप (४२७) मिसेली फा. मु. व सी. { श. १५५९ पौष शु. २ इ. १६३७ डिसें. ८

अज दि. तपे वालवे---- मोक. तपे मज.

संबभट बिन लक्ष्मीधरभट यास बदल अभिसेख सिद्धेश्वर मौ. सिरगाऊ होन ६॥≈ सादिलवार आहे. 'साल मजकुरा तपे मज. साहेबास मुकासा अर्जानी जाला आहे.'

खं. १५ ले. ७७ } सु. १०३८ साबान ५ (४२८) खुर्दखत फा. मु. सी. { श. १५५९ पौष शु. ६ इ. १६३७ डिसें. १२

अजर. कृष्णाजी राजे---- कारकून कर्यातो बालाघाट

मधुकीर गोसावी सो अंबाडे यास इनाम बिघे ४॥ मौजे अंबोडे येथें आहे. कारकीर्दी धाउजी नाइकवाडी साले वीस चालिले. त्याचा कागद गळबळेयात गेला. त्यावरी मौ मा प्राणजी साठे यास मुकासा जाला. तेही खुर्दा दिधले. हाली धाउजी व साठे याचे कागद मानीत नाहींत. तरी पूर्वीप्रमाणें चालविणें.

सा. ले. २०९ } सु. १०३८ साबान १४ (४२९) खुर्दखत फा. मु. { श. १५५९ पौष शु. १५ इ. १६३७ डिसें. २१

अजर. गगाजी नाईक---- कारकून तर्फ मोर तपे रोहिरे

कान्होजी जेधे यास मौजे चिखलगाऊ तपे रोहिर इनाम असे तो चालविणें.

इं. फॅ. ६ पृ. ४१ } इ. (४३०) गॉम्ब्रून-कंपनी { श. १५५९ माघ शु. ८ इ. १६३८ जाने. १३

ता.२७ आक्टोबरचे सुमारास डचांनीं ११ गलबतें गोवा बंदरांत ठेऊन दिलीं. बरसातींत बंदराची चकडबंदी करून नंतर अदिलशहाच्या साहाय्यानें गोव्यावर हल्ला करावा असें त्यांनीं योजलें होतें. परंतु तें अशक्य दिसतें. मोंगल बादशहाचा मुलगा (औरंगजेब) एवढें मोठें सैन्य घेऊन दौलताबादेस असेतोंपर्यंत अदिलशाहा आपलें राज्य सोडून बाहेर पडण्यास तयार होणार नाहीं.

खं. १७ ले. ४ } ? (४३१) {

मूळ पुरुष रुद्राजी नाईक हे मुरुमदेउ ता गुंजनमावळ येथील देशमुखी करीत होते. यावर हजरती अलमपन्हा साहेबी [=निजामशाहा] हा मुलूख एदिलशाही हैबत खान यास दिला. तेव्हां खानाचा नामजादी मीर यानें किल्ल्यास वेढा दिला. त्यावर बाजी हैबतरावानें मलिकंबराच्या हुकुमावरून किला आदिलशाही नामजादाच्या स्वाधीन केला. त्यानंतर रुद्राजी म्हातारा झाल्यामुळें त्यानें मीरला सांगून देशमुखीचा शिक्का बाजीच्या स्वाधीन

केला. पुढें मलिकाचा मुलूख परत मलिकास मिळाला; व त्यानें राउतरावास गुंजणखोऱ्याचा मोकासा दिला. तेव्हां बाबाजीनें मलिकंबरापुढें जाऊन तक्रार केली कीं, 'माझा बाप बाजी हैबतरावानें मारला व तो १० वर्षें देशमुखी खातो.' ही बातमी ऐकून बाजी हुजूर गेला. इकडे बाबाजीनें राउतरावास लाच देऊन बाजीच्या घरच्या बायका मंडळीस त्रास दिला. हें वर्तमान मलिकास कळलें. तेव्हां त्यानें राऊतरावाचा हेजीब रुद्राजीपंत याजकडून पत्र लिहून राऊतास ताकीद करविली व बाबाजीस आणविलें आणि दोघांचें म्हणणें ऐकून 'बाजीची देसमुखी' असा निर्णय दिला; पण बाबाजीचा मुलगा हबाजी एकवर्ष दरबारांत राहिला व नागोजी भास्कराकडून देशमुखीचे एक खुर्दखत त्यानें घेतलें. तेव्हां बाजी पुनः हुजुर गेला. इकडे बारा मावळे सरकारांतून मुल्ला नबीब यास दिली व त्याचा सुभेदार रायाराऊ [श. १५४३] मुलखाला आला. पुढें नीलकंठराव व रायाराव यांचा तंटा लागून गडास वेढा पडला. तेव्हां मलिकानें बाजीच्या हवाली देसमुखी केली. नंतर रायारावास मलिकंबरानें काढून हवालदार काजी सेक साला यास पाठविलें. त्यानें बाबाजी व कान्होजी यांना हुजूर पाठविलें. मलिकंबरानें चौकशी केली तेव्हां खंडो कृष्ण व नागोजी भास्कर यांनीं आपल्या नांवें खुर्दखतें दिलीं आहेत असें आढळलें; त्यावर त्यानें या कारकुनांना मार देऊन व बाबाजीस कैदेंत टाकून बाजीस देशमुखी दिली. पुढें मलिकंबरानें सोलापुरास वेढा घातला होता तेथें मेला. त्यावर पादशाहीमध्यें खलेल जाला. त्यानंतर बाबाजी हा कृष्णाजी बांदलाकडे जाऊन पुंडावे करूं लागला. इकडे (तकरीर लिहिणाऱ्याचा बाप) कान्होजी हैबतराव यानें निजामशाही दरबारांत जाऊन शके १५४१ व श. १५५५ मध्यें मलिकंबरानें दिलेल्या खुर्दखताप्रमाणें पुढेंहि देशमुखी चालविण्याविषयीं फर्मान आणलें व देशमुखी करूं लागतो. यावर कृष्णाजी बांदल बाबाजी नाइकास म्हणाले कीं, तुमच्यामुळें दिवाण आम्हांस ताकीद करतील याकरितां तुम्ही येथून जा. असें म्हणून बाबाजीला घालविलें. पुढें निजामशहाला मोगलानीं नेलें. त्यावर बाबाजी कोकणांत जाऊन दंगा करूं लागलों.

खं. १७ ले. ७ सु. १०३८ रमजान २०	(४३२) महजर	श. १५५९ माघ व. ७ इ. १६३८ जाने. २६

(दादाजी कोंडदेऊ सुभेदार किले कोंढाणा व देसमु. देसक. यांच्या विद्यमानें)

बाहूजी बिन कान्होजी हैबतराऊ, व हबाजी बिन बाबाजी हैबतराऊ, बाळाजी बिन रुद्राजी हे गुंजणमावलचे देशमुखीबदल भांडत होते. यावरी साहेबी व गोत मिलोनु येणेंप्रमाणें निवाडा केला.

बाहूजी बिन कान्होजी	हबाजी बिन बाबाजी हैबतराऊ	बालाजी बिन रुद्राजी
१ तकसीम वडीलपणाची वाटियाची } गाव निमे	१ तकसीम	१ तकसीम

मानपान बापूजीने प्रथम; नंतर हावाजीने व त्याउपरी बालाजी रुद्राजी याणें खावा.

खं. १५ ले. ७८ } (४३३) { श. १५५९ फाल्गुन व. ६
सु. १०३८ सवाल १९ } मिसेली फा. मु. सी. { इ. १६३८ फेब्रु. २४

अज. दि. ठाणे कर्यातबालाघाट---- मोकं. मौ. आंबोडे कर्या. मज.

साबान ५ चे खुर्दा सादर जाले. तेथे रजा (ले. ४२८) त्याप्रमाणें चालवणें.

त्रै. व. ६ पृ. ७० } (४३४) { श. १५५९.
सु. १०३८ } महजर सी. (किले अहिवंत) { इ. १६३७-३८

गोपाळभट पुजारी व भोपे पुजारी सप्तशृंग यांचा पुजारीपणाबद्दल गरगशा लागला होता. गोपालभटापासी निवाडियाचे कागद आहेती. भोपे पुजारे यापासी येकजरा नाहीं. भोपे मुनसिफीस हाजीर न व्हातीच. लायनी हरकती करिताती. गोपालभटाचे पूजेचे तकसीम दुबाला केली असे.

खं. २० ले. ८१ } (४३५) { श. १५६० चैत्र वा श्रावण शु. ८
सं. बहुधान्य मंग. शु. ८ } वाटपपत्र { इ. १६३८ मार्च १३ किंवा ऑग. ७

रामेश्वर व नारायण व रंगभट व अउजी चिताव यांमधील वाटणी.

सा. ले. २६ } (४३६) { श. १५६० ज्येष्ठ व. १२
सु. १०३९ मोहर. २५ } फा. मु. सी. { इ. १६३८ मे ३०

कोंढीतचा मोकदम बाबाजी नेलेकर याच्या हातून गांवाची लावणी होईना; यामुळें जनाजी खैरे व रुद्राजी जाधव परिंचेकर यांना मोकदमीचा वाटा देऊं करून त्यानें काम चालविल्यामुळें उत्पन्न झालेल्या तंट्याचा निकाल. (महजर--को खेडबारे दादाजी कोंडदेव सुभे. व देसमूख व देसक महालानिहाये.)

खं. २० ले. ८२ } (४३७) { श. १५६० अधि. श्रावण शु. ७
सु. १०३९ रवल ५ } मिसेली फा. मु. व सी. { इ. १६३८ जुलै ७

अज दि. पर. वाई---- मोक. व रया मौ. पसरणी पर. मज.

नारायण गोपीनाथ चित्राऊ यास ·।। चावर पूर्वीप्रमाणें इनाम चालवणें.

खं. १५ ले. ७९ } (४३८) { श. १५६० श्रावण व. ७
सु. १०३९ रखर २० } खुर्दखत फा. मु. मज. सी. { इ. १६३८ आगष्ट २१

अजर. रणदुलाखान---- कार. व देसमूख पर. वाई

कमलनयनगीर यानें समाधी घेतेवेळीं मठ व इनाम जोगिंद्रगिरीच्या स्वाधीन केलें आहे. तेव्हां हिंगुलगिरीचा इनामाशीं संबंध नाहीं. परवानगी खान अफजलखान.

खं. २० ले. ५१ (७) } (४३९) { श. १५६० भाद्र. शु. ९
सु. १०३९ जवल ७ } महजर { इ. १६३८ सप्टें. ६

खंडेराऊ पेशवे जेजोरी यांस मौ. काळवीरें येथील मोकदमीच्या तक्सीमेबदल, म धो मायदेऊ सरहवाल. व गोविंद मुद्गल नायब ठाणेदार यांचे अमलांत दिलेला महजर.

खं. २० ले. २०७ } (४४०) { श. १५६० भाद्र. शु.१५
सु. १०३९ जवल १४ } विज्ञापना सी. { इ. १६३८ सप्टेंबर १३

समस्त गावकरी श्री शंभुमहादेव व पेठ सिंगणापूर---- मद्दारा. रा. कृष्णाजी

महाराजांनीं सिंगणापुरास ताटे, थिटे, आराधे मोक. व बडवे क्षेत्र पंढरपूर यांस वेव्हार समंधे पाठविले. थिटे, आराधे मोक. हे आले. बडवे आले नाहींत. मग थिटे... यासी स्थळपत्र लिहून दिल्हे. महाराजे जैसा नेमू केला असेल तसें वर्तावें.

सा. ले. २१० } (४४१) { श. १५६० भाद्र. व. २
सु. १०३९ जवल १६ } मिसेली फा. मु. मज. सी. { इ. १६३८ सप्टें. १५

अज दि. किले रोहिडा---- मोक. मौजे चिखलगाऊ

कान्होजी जेधा तपे रोहिडा यास इजाफती दुमाला केले असे.

सा. ले. २११ } (४४२) { श. १५६० भाद्र. व. ५
सु. १०३९ जवल १९ } मिसेली फा. मु. मज. सी. { इ. १६३८ सप्टें. १८

अज दि. किले रोहिडा---- मोक- व रया. तपे भोर

कान्होजी जेधा दो तपे रोहिडा यास पटीपछोडी व हकलवाजिमा दुबाला केला असे.

स. पृ. २० ले. १५ } (४४३) { श. १५६० आश्विन शु. ११
सु. १०३९ जखर १० } खुर्दखत { इ. १६३८ आक्टो. ८

अजर. कोबजी (यादोजी ?) राजे खराडे---- कार. व देसाई मामले बागलकोट

तिमण विठल पुरोहीत यास मौ. किरसूर येथे कुडो १ ची जमीन व दररोज रुके बारा इनाम दिल्हे आहे तें चालविणें.

खं. १६ ले. १९ } (४४४) { श. १५६० मार्ग. शु. ५
सु. १०३९ साबान ४ } कतबा { इ. १६३८ नोव्हें. ३०

अजर. बाबाजी झुंझारराऊ देशमूख तर्फ कानदखोरे----रुद्राजी त्रिमल कुलकर्णी

गोजोबा, बाजी आणि रुद्राजी यांमधील कुणकर्णाच्या भांडणाचा निकाल.

हिरासंग्रह } (४४५) { श. १५६० मार्ग. शु. ५
इ. } { इ. १६३८ नोवें. ३०

गोवा व्हाइसराय — वीरभद्रनाईक इक्केरी

आमचे व तुमचे वकील विजापुरास आहेत. तुमचे वकिलास मदत करण्याविषयीं आम्ही आमच्या वकिलास लिहिलें आहे.

सा. ले. ३२९ } (४४६) { श. १५६० पौष शु. ५
श. } विक्रयपत्र { इ. १६३८ डिसें. ३०

ग्राम पुरुष सोमधाडिया वगैरे व कानविंदे कुलकर्णी

मुला इस्माईल बिन मुला अली खादिम मौ. नेरूर पर. कुडाळ

पेसजी हरदे प्रभू राजिवडेकरासी उपार्जनाबदल भाट दिले. ती जमीन प्रभु मजकूर मयेत जाल्यावर नाकीर्दी पडिली. प्रभु मजकुराचे फर्जंदानी तुम्हास दिधलें.

इं. फॅ. ६ पृ. १२४ } (४४७) { श. १५६० पौष व. ७
इ. } स्वाली--कंपनी { इ. १६३९ जाने. १५

औरंगजेब दौलताबादेच्या आसपास जवळ जवळ तीन वर्षे आहे. परंतु या मुदतींत पोर्तुगीजांकडून कांहींच नजराणा न मिळाल्यामुळें त्यानें मुरादला दमणवर पाठविलें; व समुद्राकडून बंदोबस्त करण्याकरितां इंग्रजांशीं व डचांशीं बोलणें लाविलें आहे.

सा. ले. २१२ } (४४८) { श. १५६० माघ व. ४
सु. १०३९ सवाल १७ } मिसेली फा. मज. व सी. { इ. १६३९ फेब्रु. ११

अज दि. किले रोहिडा — मोक व रैया. मौ. चिखलगौक तर्फ भोर

(ले. ४२६ च्या) फर्मानाप्रमाणें चालणें.

खं. १८ ले. ६ } (४४९) { श. १५६० माघ व. ७
सु. १०३९ रवल २० } वाटप–ठाणें सासवड येथें { इ. १६३९ फेब्रु. १४

मौजे कोढीत येथील जमीन रुके १४ दो ठायी वाटून एकतर्फे सूर्याजी बिन दाद पाटील बुधा यास व दुसरी सूर्याजी बिन माहाद पाटील जरंडा यास दिली.

शि. प्र. पृ. ८७ ले. १,२ } (४५०) { श. १५६०
सु. १०३९ } जमाखर्च { इ. १६३८–३९

हिसेबू दिंडी व पालकी **पंढरपूर यात्रा.**

सा. ले. १९६ } (४५१) { श. १५६०
? } { इ. १६३८-३९

अर्जी मिर्जा महमद मुकीम करोडी पा पारनेर — सेख. व कार. पा सिरवळ

विठोजी व बापूजी याचे बाबे लिहिली तरी विठोजी येथें हजर आहे. तो बोलिला कीं, गोतामध्ये निवाडा केला त्या माफिक चालों देत नाहींत. तरी गोते चुकविलें असेल तेणें प्रमाणें चालविणें.

खं. १५ ले. ८० } (४५२) { श. १५६१ वैशाख शु. १३
सु. १०३९ मोहर ११ } मिसेली फा. मु. मज. सी. { इ. १६३९ मे ५

अज़ दि. पर. वाई — मोक. मौ. गोवे पर. मज.

हिंगुलागिरीचे कालवे फोडूं देऊं नये.

खं. २० ले. ९ } (४५३) { श. १५६१ ज्येष्ठ
सु. १०४० } खुर्देखत (नकल) { इ. १६३९ मे, जून

अजर. **शाहाजी** राजे---- कार. व देसमूख कर्यात बारामती.

धर्मोजी काटे देसमूख यास (बारामती २, रुई १ व मलेद १ असे) चावर ४ इनाम दिले आहेत.

शि. प्र. ८८ ले.३ } (४५४) { श. १५६१ आषाढ शु. ५
सु. १०४० श. } जमाखर्च { इ. १६३९ जून २५

पंढरपुरी दिंडी बाबत ९ होन खर्च झाला त्याचा तपशील.

सा. ले. २१३ } (४५५) { श. १५६१ भाद्र. शु. ७
सु. १०४० जवल ५ } मिसेली फा. मु. मज. सी. { इ. १६३९ आगष्ट २५

अज दि. किले रोहिडा

मोक. रया. व बलुतेयानी देहाये आंबोडे, कारी, चिखलगाऊ, नाटंबी.

निजामशाही व आदिलशाही फर्मानाप्रमाणें कान्होजी जेधा याजकडे आंबोडे गांव इनाम चालू ठेवणें.

खं. १८ ले. ७ } (४५६) { श. १५६१ भाद्र. शु. ८
सु. १०४० जवल ६ श. } महजर { इ. १६३९ आगष्ट २६

(**दादाजी कोंडदेऊ** यांच्या उपस्थितींत)

मालजी, मिलोजी, सिउजी, हिरोजी भोइटे यांमध्यें रावेत पर. पुणें येथील मोकदमीचें भांडण लागलें असतां सिऊजीस वडिलपणामुळें मोकदमी मिळाली.

जे. व. ७ पृ. ३९ } (४५७) { श. १५६१ आश्विन शु. १२
सु. १०४० जखर १० } पावती अष्टकोनी सी. { इ. १६३९ सप्टें. २८

दादाजी कोंडदेव सुभेदार — हुदेदार मौ. परिंचे पा पुणे

रतनोजी व परिंचकर यांमधील भांडणाचा निकाल गोतानें केला. त्याप्रमाणें परिंचेकराचे २२ होन देण्याची ऐपत रतनोजीस नसल्यामुळें आमच्या (=दादाजीच्या) सांगण्यावरून कृष्णाजीनें ते दिले.

स. ले. १८ पृ. २३ } (४५८) { श. १५६१ आश्विन व. ६
हि. १०४९ जखर २० } फर्मान { इ. १६३९ आक्टो. ८

अलि अदिलशहा — राघो पंडित

झुंझारराव घाटगे याकडे पूर्वीप्रमाणें पा माण व का मलवडी येथील देशमुखी चालविणें. ते पादशाही मसलत सिद्धीस नेत असतात. उपद्रव न देणें.

इं. फॅ. ६ पृ. २२८ } (४५९) { श. १५६१ माघ शु. १५
इ. } ख्याली–कंपनी { इ. १६४० जाने. २८

शहाजहाननें विजापुरकरांना नरम केल्यामुळें व औरंगजेबाचा तळही दंडाराजपुरीजवळच पडल्यामुळें आपल्यावर हल्ला होण्याच्या भीतीनें दंडाराजपुरी शहराचा अधिकारी स्वसंरक्षणाचा उपाय करील व त्यांत आपला फायदा होईलसें वाटतें.

कों. इ. सा. ले. १३ } (४६०) { श. १५६१
सु. १०४० } कौलनामा { स. १६३९–४०

देसाई, इनामदार, मौ. पाटवडाचे प्रा कुडाळ--गोदेबाळ नायक ठाकूर मौ. पाटवडाचे

रामाजी व बाबाजी नायकानी आपली सर्व बाग तुमास दिली. तरी धारा देऊन लावणी करीत जाणें.

विजा. आर्कि. पृ. १३१।१३२ } (४६१) { श. १५६१--६२
शहाजहान जुलूस १२ } { इ. १६३९--४०

औरंगजेब (औरंगाबाद)———— **अदिलखान**

आमच्या तुळेच्या वेळीं महमद रेझाचे हातीं आलेला अभिनंदनपर संदेश व नजराणा मिळाला. आपणास जी कांहीं मदत पाहिजे असेल ती देत जाऊं.

खं. २० ले. ८४ } (४६२) { श. १५६२ ज्येष्ठ व. ३
सु. १०४१ सफर १५ } दानपत्र मु. { इ. १६४० मे २७

कासी रंगनाथ खोत जकाती पर. वाई — रंगभट चित्राव सो कसबे वांई

तुमचे देवाचे नंदादीपास तेल दिलें आहे.

खं. २० ले. ८३
श.

(४६३)

श. १५६२ आषाढ शु. ७
इ. १६४० जून १०

धाटंभट-आउजी चित्राव यास, आमचे येकसरामधील १५ बिघे इनाम तूं भक्षून राहणें.

स. पृ. ७९ ले. ५३
हि. १०५० जु. १४ साबान २

(४६४)

श. १५६२ मार्ग. शु. ३
इ. १६४० नोव्हें. ६

?——— हकीम, अमलदार, जहागीरदार व करोडी गुलशनाबाद

शहाजहां बादशहा याच्या फर्मानाप्रमाणें पर० गुलशनाबाद येथील काजीपणा व मोहतसीबीचे चाकरीबदल सैदमहंमद सैदसुलतान यांस जमीन २५० बिघे, रुपये ३०, रोजीना ४ टके वगैरे दिले आहेत.

खं. २० ले. ८५
श.

(४६५)

श. १५६२ माघ शु. १०
इ. १६४१ जाने. ११

रंगभट चित्राव——— त्र्यंबक, वांई

तुझा बाप नारायणभट व मी यांमध्यें जमिनीबद्दल भांडण आहे. माझ्या जमिनीचे कागद मजकडे दे. नाहींतर बनेल तो इलाज करीन.

त्रै. व. २ पृ. ७७ हि. १०५०
सु. १०४० सवाल १५

(४६६)
फर्मान फा. मुं. व मज.

श. १५६२ माघ व. ३
इ. १६४१ जाने. १७

बादशहाकडून— हुदे. कार. पर. जमखिंडी मामले तोरगल

विरूपाक्ष लिंगरस देसकु० यांस पूर्वी कंकणवाडी व आतां होनूर हे गांव इनाम दिले आहेत.

विजा. आर्कि. पृ. ९६
हि. १०५०

(४६७)
उल्लेख

श. १५६२
इ. १६४०-४१

'अबदुलबारी मुहम्मद मुस्तफाखान लारी यानें हि. १०२० त 'महंमद सराई', बांधली.

इं. फॅ. भा. ६
पृ. ५इ.

(४६८)

श. १५६२
इ. १६४०

इक्केरीहून राजधानी बेदनुरास हालविण्याची संस्थानिकाची वाटाघाट.

सा. ले. १२८
सु. १०४१

(४६९)
खुर्दखत फा. मु. मज. सी.

श. १५६२
इ. १६४०

अजर. खान अजम मोहमदखान काजी सैद— कार. ता नानेमावल लोहगड

हाली तपे मज. साहेबास मोकासा मिळाला आहे. बोपाजी गणपती तबीब यांकडे गोमुत्री (सर्व), वोडवस्ले (पाव) नागरगांव (अर्धे) हीं गावें पूर्वीप्रमाणें इनाम चालविणें.

शा. ले. २९४ फ. १५५१ } (४७०) { श. १५६३ आश्विन शु. १५
सु. १०४२ रजब १२ } महजर स्थळ (नाशीक) { इ. १६४१ आक्टो. ८

सोनप्रभू व गणशुक्ल यांमध्यें प्रायश्चिताबद्दल भांडण होतें. साक्षीपुराव्यांत निष्पन्न झालें कीं, सोनप्रभू व त्याची स्त्री यांनीं मागेच प्रायश्चित्त घेतल्यामुळें तीं पंक्तिपावन आहेत.

इं. फॅ. ७ पृ. २२ } (४७१) { श. १५६३ कार्तिक शु. १३
इ. } { इ. १६४१ नोवें. ५

एक लाख होन देऊन पोर्तुगीजांनीं विजापुरकरांशीं संरक्षक व विरोधक असा तह केल्यामुळें डचांना वेंगुर्ला आदिकरून स्वतःच्या मुलखांतील बंदरांतून अदिलशहानें काढून लाविलें.

मठ. शिला. ले. ४ } (४७२) { श. १५६३
? } { इ. १६४१–४२

भानजी प्रभु सर०——— ?

आमचा उदय होऊन आला तेव्हां स्वामीचे चरण दृष्टीस पडले. सुदीन होईल तेव्हां स्वामी मनोरथ पूर्ण करितील.

खं. १५ ले. २६६ } (४७३) { श. १५६४ ज्येष्ठ शु. ७
सु. १०४३ रवल ५ } तलब न. फा. मु. व सी. { इ. १६४२ मे २५

?— दादाजी नरस प्रभू देशपांडे व गावकु० तपे रोहिडखोरे

तुह्मे खोरीतील गाव रोहिरेश्वरचे श्रीस **सिवाजी राजे** याणी दिल्हा. देवाचे पुजेस वेंका व नावरटा कोळी ठेविला त्यास हाली तुम्ही सिवा जगम ठेविला. तरी तू (व) देसमुख जाब देणेस येणें.

खं. १८ ले. ८ } (४७४) { श. १५६४ ज्येष्ठ शु. १०
सु. १०४३ रवल ९ } महजर नकल { इ. १६४२ मे २९

बाजी बाबाजी व पुताई (चुलती) यामध्यें मोकदमीचे भांडण लागलें असतां असें ठरलें कीं, प्रथमचा मानपान वगैरे व निमे मोकदमी बाजीकडे व नंतरचा मान वगैरे व निमे मोकदमी कृष्णाजीकडे (पुताईचा दत्तक मुलगा) चालावी.

शा. ले. २१४ } (४७५) { श. १५६४ व ६५ ज्ये. शु. ११
सु. १०४३ रवल १० } उल्लेख { इ. १६४२ मे ३० (–४३ मे १९)

बादशाहाकडून——कान्होजी जेधा देसमूख

कान्होजी जेधा यास मौजे चिखलगांव, हें गांव पूर्वीपासून इनाम आहे. कल्याण

भिवंडी येथील काजी हुसेन याच्या मुलीनें (ताजे बिबी) गैरवाका समजावून चिखल गांव स्वतःस इनाम करून घेतलें. तरी हें गांव कान्होजीकडेच चालविणें.

सा. ले. २१४ } (४७६) { श. १५६४-६५ ज्ये. शु. १०
सु. १०४३ रवल १० } मिसेली फा. मु. मज. सी. { इ. १६४२ मे ३० (-४३ मे १९)

अज दि. किले रोहिडा—— मोक० व रयां मौ० चिखलगांव तर्फ भोर

मागील ले. ४७५ तील फर्मानाप्रमाणें करणें.

सा. ले. २७ } (४७७) { श. १५६४किंवा६५ज्ये. शु.१४,१३
सु. १०४३ रवल १२ } महजर { इ. १६४२ जून १ (-४३ मे २१)

वाल्हे बिन येका व काऊ बिन साऊ कुंभार हे पुण्याचे मेहतरकीबद्दल भांडत होते. निकाल झाला कीं, वाल्हे यानें निमे वतन व वडिलकीचा मान, आणि काऊ यानें निमे वतन खावें. कस० खेड कुंभाराची घरे दोन. एक कोया कुंभार व दुसरे मेहतरकी करीत असतां कोया मेला. यावरी सवेच कस० मज० मुरारपंताचे तसदीकरितां खराब पडले.

खं. १८ ले. ९ } (४७८) { श. १५६४ ज्येष्ठ व. ७
सु. १०४३ रवल २० } महजर (खेडेबारें) { इ. १६४२ जून ९

मोकदमीचे सर्व मानपान आधीं मिराजी व मागून अमनानें घ्यावें. मोकदमीचे उत्पन्न निमें निमे करून खावें. (दादाजी कोंडदेऊ याच्या उपस्थितींतील हा महजर.)

सा. ले. १३८ } (४७९) { श. १५६४ आषाढ व. १
सु. १०४३ रखर १५ } खुर्दखत मु. मराठी व फा. सी. { इ. १६४२ जुलै ३

अजर. नीलकंठराऊ राजे——— हुदे. व मोक. कस. जेजुरी पर. पुणा.

खंडो मुरारीभक्त श्री मल्हारि यांची जेजुरी येथील जमीन पूर्वीप्रमाणें त्याजकडे चालविणें. हाली पर. मज. साहेबास अर्जानी जाले आहे.

सा. ले. २६७ } (४८०) { श. १५६४ श्रावण व. ४
सु. १०४२ जवल १७ हि. १०५२ } { इ. १६४२ आगष्ट ४

बादशहा— अमलदार व देसाई पर. वाई

विश्वनाथ कुलक. याचा बोरगाव व टंकळे येथील इनाम पूर्वीप्रमाणें चालविणें.

गो. इ. सा. ले. २६ } (४८१) { श. १५६५ चैत्र शु. १३
हि. १०५३ मोहरम१२ सु.१०४३ } फर्मान { इ. १६४३ मार्च २३

फर्मान हुमायून——— सयद इब्राहिम हवाल. व कार. मामले गोवा

नारायण जोसी यांस पूर्वीप्रमाणें उत्पन्न देत जाणें. (लेखांक ६ पहा.)

शि. च. ले. ३६८ }
सु. १०४३ सफर ३ }
(४८२)
कतबा
{ श. १५६५ वैशाख शु. ४
{ इ. १६४३ एप्रिल १२

अमाजी व इबराहीम व माहमद सेटिये कसबे कराड—— अंतो विठल कुलकरणी तुम्हापासून १० होन घेतले. मुदतींत नेदू तरी दुणीप्रमाणें देऊं.

सा. ले. २१५ हि. १०५३ }
सु. १०४३ रवल १५ }
(४८३)
मिसेली फा. मु. मज. व सी.
{ श. १५६५ ज्येष्ट व. १
{ इ. १६४३ मे २४

अज दि. किले रोहिडा—— मोक. चिखलगाऊ तर्फ भोर

मागील (४७५) फर्मानाप्रमाणें वागणें.

राम. अंक ६५ ले. ३ }
सु. १०४४ रवल २१ }
(४८४)
वर्षासन–ता
{ श. १५६५ ज्येष्ट व. ८
{ इ. १६४३ मे ३०

त्रिंबकजी राजे—— माहादेवभट सेडगे सो येलूर.

तुम्हास श. १५६५ पासून येरुळ येथील (श्रीघुसमेश्वराचा) अभिसेक सांगितला आहे.

राम. अं. ६५ ले. ४ }
सु. १०४४ जवल १७ }
(४८५)
वर्षासन–ता
{ श. १५६५ श्रावण व. ४
{ इ. १६४३ जुलै १७

संभाजी [भोसले]—— माहादभट तिमणभट येलूरकर.

या वर्षापासून तुम्हास श्री [घुस्रणेश्वर]चा अभिषेख सांगितला आहे. सालीना मोईन १७ होन पातशाही.

शि. प्र. पृ. ९८ ले. २० }
सु. १०४४ जिल्काद ५ }
(४८६)
मिसेली फा. मु. मज. सी.
{ श. १५६५ माघ शु. ७
{ इ. १६४४ जाने. ६

अज दि. ठाणे वालवे—— हुदे. व मोक. कस. वाळवे

१ जिल्कादी आलेल्या खुर्दाप्रमाणें (·।·) चावर जमीन शंभुभट बिन लक्ष्मीधरभट यांकडे चालविणें.

खं. २० ले. ५३ }
सु. १०४४ }
(४८७)
महजर
{ श. १५६५
{ इ. १६४३–४४

तिमाजी व रामाजी यांचे गाव–व देस–कुळकर्णाबद्दल भांडण होतें. त्यावर निवाडा झाला कीं, मानपान आधीं रामाजीचा, नंतर तिमाजीचा. वरकड निमे उत्पन्न रामाजीचें; निमें तिमाजीचें.

द्वि. सं. पृ. २६५ } (४८८) { श. १५६५
कविता } शिलालेख (रहिमतपूर) कबर { इ. १६४३-४४

या शिलालेखांत **रणदुल्लाचा** मृत्यु १०५३ हि.मध्यें झाला असें वर्णिलें आहे.

ख, पृ. ८९ ले. ६४ } (४८९) { श. १५६५
} उल्लेख { इ. १६४३-४४

रणदुलाखानाची कबर का। रहिमतपूर प्रा। वांई येथें आहे.

खं. २० ले. ४९ } (४९०) { श. १५६५ ?
? } { इ. १६४३

बाबदेउ लक्ष्मीधर व चंद्रभट अंतभट याचे जमिनीचा व पत्रांचा तपशील.

खं. १५ ले. ३६३ } (४९१) { श. १५६५ ?
? } { इ. १६४३

जेधे व बांदल यांचे सिव व नदी याबद्दल जुंझ झालें त्याचा करीणा.

सा. ले. १०६ } (४९२) { श. १५६५ ?
? } उल्लेख { इ. १६४३

भाऊबंधकीबद्दलचें भांडण असून 'कारकीर्दी मुरारजगदेराऊ रायाराऊ दौलतमंगली' होते. चिंगिसखान व नीलकंठराऊ यांपासी मारेकरी घातले; वगैरे उल्लेख आहे.

सा. ले. ११८ } (४९३) { श. १५६६ अ. चैत्र शु. १
सु. १०४४ जिल्हेज २९ } खुर्दखत फा. मु. व सी. { इ. १६४४ फेब्रु. २८

अजर. **शाहाजी राजे**--- कार. व देसमु. पर. पुणे.

महादभट पुरंदरे से. पुणें यांची मौ. पिंपरी व पिंपले सौदागर येथील इनाम जमीन पूर्वीप्रमाणें त्यांजकडे चालविणें.

खं. १५ ले. ८१ } (४९४) { श. १५६६ चैत्र व. १० (११)
स. } { इ. १६४४ एप्रील २२

निंब येथील मानभाव हिंगलगिरी सामावले. दसनाम यांनी त्याचे शिष्य गोविंदगिरी यासी गादीवरी बसविलें.

त्रै. व. ३ अं. १ पृ. १५ } (४९५) { श. १५६६ ज्येष्ठ शु. ७
सु. १०४५ रखर ५ } फर्मान फा. मु. मज. सी. { इ. १६४४ जून १

रुस्तुमे जमा--- कारकु. देसमु. व अधिका. मामले मुर्तुजाबाद ऊर्फ चेऊल

जमायत मोमिन कस. चेऊल व पर. ठाणे यांस सारा, बेगार वगैरे सर्व निजामशा व मलिकंबर यांचे वेळेपासून माफ असे. फक्त क्षेत्री १८ व मोमीन १८ लाहारी देत असे. तरी तें पूर्वीप्रमाणें चालविणें.

खं. २० ले. २०८ } (४९६) { श. १५६६ कार्तिक शु. १५
सु. १०४५ रम १३ } खुर्दखत फा. मु. व सी. { इ. १६४४ नोवें. ४

अजर. इतबारन्मुलुख—— कारकु. व देसमु. तर्फ महु

नरसिंह नारायण सो पंढरपूर याची देगाव येथें इनाम जमीन आहे. हे दुकालाकरितां कासीस गेले होते. आतां परतले आहेत. तरी इनाम चौकशी करून चालविणें.

सा. ले. ११९ } (४९७) { श. १५६६ कार्तिक व. १०
सु. १०४५ रम २२ } खुर्दखत फा. मु. व सी. { इ. १६४४ नोव्हें. १३

अजर० त्रिंबकजी राजे— कारकून व देशमुख पर० पुणें

महादेभट पुरंदरे सो पुणें याचा–वजीर (म. अंबर) व शहाजीराजे यांचे पत्राप्रो पर्वती, पिंपरी, पिंपळेसौदागर येथील–इनाम चालविणें.

राम. अं. ६५ ले. ५ } (४९८) { श. १५६६ मार्ग. व. ९
सु. १०४५ सौवाल २२ } वर्षासन — ताा { इ. १६४४ डिसें. १२

शाहाजी राजे—— माहादभट तिमणभट सो येलूर

तुमचे बाप तिमणभट बिन दामोधरभट यास श्री (घृस्णेश्वर) देवाचा अभिशेक **मातुश्री उमाई आवा** साहेबी दिधला होता. बाा सनद छ १९ माहे रविलाखर सन सलासीन व अलफ [श. १५५१ मार्ग व.५] त्यावरून चालत आलें आहे. तेणेंप्रमाणें तुम्ही अभिषेक करीत जाणे. सालिना होनु १७. आमचे वौसीचे अभिशेक तुम्हीच करीत जाणें.

खं. १५ ले. ८२ } (४९९) { श. १५६६
सु. १०४५ } मिसेली म. मु. { इ. १६४४–४५

दत्ताजी नाईक देसा० पर० वांई—— मोक० मौ० निंब

जोगींद्रगीर गोसावी यानें खुर्द० आणले कीं मठ व इनाम आपले दुमाले करणें. मिसेलीही आहे. तरी तसें करणें.

खं. २० ले. २३६ } (५००) { श. १५६६
सु. १०४५ } { इ. १६४४–४५

अजर० यशवंतराऊ राजे—— कारकून पर० पुणें

गणेश मल्हार यांची जमीन ॥·चावर यांजकडे पूर्वीप्रमाणें चालवीत जाणें.

खं. १५ ले. ८३
सु. १०४५

(५०१)
म. मु.

श. १५६६
इ. १६४४-४५

दत्ताजी नाईक देसाई——　　सदानंद गोसावी मु. निंब

तुमचे निंब व गोवे येथील इनामावरील पेसकसी माफ केली आहे.

नै. व. ६ पृ. ७२ ले. ३
सु. १०४५ श.

(५०२)
मु.

श. १५६६
इ. १६४४-४५

दत्ताजी राजे——　　गणेशभट दीक्षित सो वणी

श्री सप्तशृंगीचा जपपूजा आवर्तन करीत जाणें. एकंदर वरुषासन १५८ देत जाऊं.

खं. १५ ले. २६७
सु. १०४५ सफर ११

(५०३)
न. फा. मु. सी.

श. १५६७ चैत्र शु. १३
इ. १६४५ मार्च ३०

इजत आसार दादाजी नरस प्रभु देशपांडे कुलकर्णी ता। रोहिडखोरे व वेलवंडखोरे यासी वजारतमाब **सिवाजी राजे फरजंद शाहाजी राजे** याणें शहासी बेमानगी करून तुझे खोरियांत रोहिरेश्वराचे डोंगराचे अस्यानें पुंडावेयानें मावळे वगैरे लोक जमाव केला आणि तेथून जाऊन पेशजी किल्यावरील ठाणें उठवून आपण किल्यांत सिरला. हाली राजगड किला नांव करून बळकावला व तोही वेलवंड खोऱ्यालगत, त्यास लोकांचा वगैरे जमाव तूं सामील असून फिसात करून रसीद राजे मजकूरनिल्हेस देतोस व ठाणे सिरवली आमिनासी रुजू रहात नाहींस व जमाव बितरजुमा करीत नाहींस व तनखाही हरदू तपियाचा दिवाणात देत नाहींस; मगरूरीचे जबाब ठाणगे व नाईकवाडी यासी देतोस हे जाहिरात आले. त्यास हे नामाकूल गोष्ट, तुझे जमेदारीचे इजतीस आहे. तरी ठाणे मजकुरी आमिनासी रुजू राहणें आणि तनखा साह करोन देणे. हे न जालियास खुदावंत शाहा तुजला विजापुरी नेऊन गरदन मारतील व जमेदारी हककानू चालणार नाहीं. हे मनी समजणें आणि याउपरी दिवाणात रुजू राहणें.

खं. १५ ले. २६८
सु. १०४५ सफर२९

(५०४)
न. व मु. सी.

श. १५६७ वैशाख शु. १
इ. १६४५ एप्रिल १७

सिवाजी राजे

रा० दादाजी नरसप्रभु देशपांडे व कुल० ता। रोहिरखोरे व वेलवंडखोरे यासी

तुम्हास मेहेरबान वजिराचा विजापुराहून हुकूम आला तो ठाणे सिरवलाहून अमिनानी तुम्हाकडे पाठविला. त्याजवरून तुमचे बाप नरसीबावा हवालदिल जाले वगैरे कितेक बहुतेक लिहिले. त्यास शहासी बेमानगिरी तुम्ही व आम्ही करीत नाहीं. श्री रोहिरेश्वर तुमचे खोरियातलि आदिकुलदेव तुमचा डोंगरमाथा पठारावर शेंद्रीलगत स्वयंभू आहे. त्याणी आम्हास यश दिले व पुढे तो सर्व मनोरथ **हिंदवी स्वराज्य करून पुर-**

विणार आहे. त्यांस बावास इवाल होऊ नये. खामखा सांगावा आणि तुम्ही तो कागद घेऊन सिताब हुजूर येणें. राजश्री श्रीदादापंताचे विद्यमाने बावाचे व तुमचे व आमचे श्रीपासी इमान जाले ते कायम वज्रप्राय आहे; त्यांत अंतर आम्ही व आमचे वंशज लेकराचे लेकरी वतन वगैरे चालविण्याविसी कमतर करणार नाहीं. हें राज्य व्हावें हें श्रींचे मनांत फार आहे याप्रमाणें बावाचे मनाची खातरी करून तुम्ही येणें. बहुत काय लिहिणे.

खं. १५ ले. ८४ }
सु. १०४६ रखर१५ } खुर्द० फा. मु. व मज. सी. (५०५) { श. १५६७--६८ ज्ये. व. १, २ { इ. १६४५ (-४६) मे ३१, २१

अजर० रुस्तुम जमा————कार० व देसमु० पर० वाई

कमलनयनगिरीस नींब येथें इनाम बडेखान (रणदुल्लाखान) चे पत्राप्रमाणें होता. त्याचे पश्चात् इनाम जोगिंद्र व गोविंदगिरी याकडे चालविणें.

खं. १५ ले. २६९ }
सु. १०४६ रखर १५ } न. फा. मु. सी. (५०६) { श. १५६७--६८ ज्येष्ठ व. १, २ { इ. १६४५ (-४६) मे ३१, २१

किल्ले रोहिडा दादाजी नरसप्रभु देशकु० व गाऊकु० रोहिड व वेलवंडखोरे

छ ११ सफरचा खुदावंत शाहगाजी हुकमत पन्हा याचे हुकुमानें मेहेरबां वजिराचा हाकाम तुमचे नावें आला. त्यात मजमून अजरस्तखाने मेहेरबां सिवाजी राजे यासि पुंडावास तुम्ही मिळताव होऊन रोहिरेश्वराचे पाहाडी तुमचे खोरियात हाजार बारासे जमाव तुम्ही लोकी केला. ये बाबे राजे मारनिल्हे याणी तुम्हांस खत पा। त्यात इमान भाक जाल्याचा फिसाती मतलब छ २९ सफर कलमी केला आहे. हे खबर बांदल देशमुख व खोपडे व जेधे देशमुखी ठाणे सिरवली जाहीर केली. हे कळून फरारी जालास. हरदू सेरीची विलायत वैराण जाली. मोकदमे हाली हुजूरचे मेहेरबानगीवरून कौलनामा फर्मोविला असे. तरी तुम्ही रयान व पटवारी व बाजे वतनदार याजला कचेबचेनसी आपले मकानी हरदु तपियात येऊन हजर होणे; आणि दोही खोरीची विलायतची संचणी आबादानी करून दिवाण देणे व तुमची जमीदारी हककानू इनामती इसाफतीसी हक बमोजिब घेणें. दरबार हरएक मतलब तकसीर केली ती तुम्हास मुबाहक याचे हुकुमावरून जाली असे. दरबाब हरगिज दिवाणातून इजा होणार नाहीं.

खं. १६ ले. २० }
सु. १०४६ जिल्काद २ } (५०७) { श. १५६७ पौष शु. २ { इ. १६४५ डिसें. ११

अज दि. दादाजी कोंडदेऊ सुभेदार कोंडाणा

बाबाजी झुंझारराऊ देशमूख तर्फ कानदखोरे

तुझे अंतुरली येथील इनाम सरदेशमुखीस दिल्हे. त्याबदल तुला दापोडा येथें इनाम देण्याविषयीं लिहिलें आहे.

राम. अं. ६५ ले. ६ } (५०८) { श. १५६७ माघ शु. ११
सु. १०४६ जिल्हेज १० } अभिषेक-वृत्ती ता। { इ. १६४६ जाने. १७

अजर. **शाहाजी** राजे—— महादभट तिमणभट सेडगे येलूर

श्री[घृशणेश्वर]चा अभिषेक वैकुंठवासी राजश्री **मालोजी** राजे व **विठोजी** राजे येही आपल्या वडिलास वृत्ती करून दिधली होती. तेणेंप्रमाणे आपले पिते तिमणभट व त्याचे धाकटेभाऊ विठलभट यानी अभिषेक चालविला. तिमणभट वर्तमान आहेत. विठलभट निवर्तले; त्याचे पुत्र रघुनाथभट म्हणतात कीं अभिषेकाशीं तुमचा संबंध नाहीं. (अपूर्ण).

इं. फॅ. ८ } (५०९) { श. १५६७ माघ शु. १५
पृ. २५ इ. } { इ. १६४६ जाने. २१

फोर्ट सेंट जार्ज (मद्रास)—— सुरत येथील कौन्सिल.

विजयनगरचा राजा व डच यांमधील युद्ध चालू आहे. गेल्या आगष्टच्या १२ तारखेस पुलिकतच्या वेढ्यास सुरवात झाली, तेव्हांपासून या राजाला विजापुरच्या बादशहाशीं व (तंजावर, मदुरा आणि जिंजी येथील) तीन जबरदस्त नायकांशीं लढावें लागत आहे. यामुळें त्याला पुलकाटच्या वेढ्यास ४ हजारांपेक्षां अधिक सैन्य पाठवितां आलें नाहींत. आणि आतां तर गोवळकोंडयाच्या शहानें आपला सेनापती मीरजुमला सैन्यानिशीं या राजाविरुद्ध पाठविला आहे. यामुळें त्यास प्रतिबंध करण्यासाठीं राजा सैन्यानिशी चालून गेला आहे.

सा. ले. २३९ रु. ३ ले. ११ } (५१०) { श. १५६७ माघ कृ. ७
सु. १०४६ जिल्हेज २० } खुर्दखत 'प्रतिपच्चंद्र' मु. { इ. १६४६ जाने. २८

अजरख्तखाने राजेश्री **शिवाजी राजे** दामदौलत ज्यानिब कारकुनानि हाल व इस्तकबाल देसमुखानि व देसकुलकर्णियानि **तर्फ खेडेबारे** बिदानद के सुहुर सन सीत अर्बैन अलफ बावाजी बिन भिकाजी गुजर मोकदम **मौजे रांजे तर्फ मार** हा मौजे मजकूरची मोकदमी करीत असतां याजपासून कांहीं बदअमल आला. हे हकीकत हुजूर साहेबासी विदित जाली. त्यावरून बहुकमी तलब करून साहेबी हुजूर आणून वाजपुस करिता खरे जाले. याजकरितां बावाजी मा। याची वतनी मोकदमी हुजूर अमानत केली. बावाजीचे हातपाय तोडून दूर केला. ते वख्ती सोनजी बिन बना (जा) जी गुजर **किले पुरंधर** हे जनात गोत म्हणून देऊन अर्ज केला जे आपले हाती देणें. बराये अर्ज खाति-

रेस आणून बाबाजी मा याचे माथा गुन्हेगारी होन पा तीनसे करार केले ते सोनजी मा याने देऊन बाबाजीस हाती घेतले. याचे पोटी संतान नाहीं. हे कुळीचे गुजर; म्हणून साहेबी मेहेरबान होऊन मौजे रांजे ता माची मोकदमी सोनजी बिन बजाजी गुजर याचे दुमाला करून याजपासून दिवाणांत सेरणी होन पा दोनसे करार करून घेऊन मोकदमी यास दिधली असे. यास कोणी मुजहीम न होणे. असल पत्र फिरावून भोगवटियास देणें. उजूर न करणें. मोर्तब सुद. रुजु सुरु निवीस.

इं. फॅ. ८ पृ. २६ }
इ. } (५११) { श. १५६७ फाल्गुन शु. ५
{ इ. १६४६ फेब्रु. १०

फोर्टसेंट जार्ज (मद्रास)---- सुरत कौन्सिल व अध्यक्ष

या मुलखांत सध्यां युद्धें व दंगेधोपे चालू आहेत. कारण येथील राजाचें (**विजयानगरकर**) मांडलीक तीन नायकांशीं यादवी युद्ध सुरू असून त्याच्यावर एका बाजूनें **विजापुरकर** व दुसऱ्या बाजूनें **गोवळकोंडेकर** यांनीं हल्ला चढविला आहे. गोवळकोंड्याचा सेनापती मीरजुमला यानें या राजाचे तीन किल्ले घेतले आहेत त्यांपैकीं एक (उदयगिरी ?) या राज्यांतला अभेद्य किल्ला समजला जात असे. या किल्ल्याच्या संरक्षणार्थ राजानें मोले या सेनापतीची रवानगी केली होती. पण मीरजुमल्याशीं सलोखा करून तो सैन्यानिशीं किल्ल्यांतून बाहेर पडला.

हेरास सं. }
इ. } (५१२) { श. १५६७
{ इ. १६४५

गोवळकोंडा व श्रीरंग यांचेमध्यें युद्ध सुरू झालें. मदुराच्या तिरुमल नायकानें विजापूरच्या सैन्यास बोलाविलें.

सा. ले. ८२ }
सु. १०४६ सफर २५ } (५१३) पोटपत्र { श. १५६८ चैत्र व. १२
{ इ. १६४६ एप्रिल २

दादाजी कोंडदेव---- विठल गिरमाजी हवालदार शिरवल.

रामाजी विठल देशकुलकर्णी शिरवल हा पुण्यास येऊन **सौ. मातुश्री जिजाआऊसाहेब** यांच्या समक्ष बोलला कीं, आपला व तिमाजी पुरुषोत्तम यांच्या वतनाचा निवाडा गोत देऊन करावा. त्यावरून हें पत्र तुम्हास लिहिलें आहे. तरी परगण्याचे दोख, पाटील व वतनदार यांचे माथा घालून निवाडा गोतन्यायें करणें शिवापूरचे मुकामीं वाटणीचा महजर करून दिला आहे त्यावर जाऊं नये.

सा. ले. १५० }
श. } (५१४) { श. १५६८ ज्येष्ठ शु. ५
{ इ. १६४६ मे ९

शंकराजी मल्हार कोरटकर ———— महादाजी गोसावी

आपले भांबोरे वगैरे ७ गाव (कुळकर्ण व ज्योतिष) तुम्हास दिधले.

सा. ले. २९६ श. } (५१५) { श. १५६८ ज्येष्ठ व. ५
सु. १०४६ फ. १०५६ } कबूल कतबा फा. मु. मज व सी { इ. १६४६ मे २४

शिवभट क्षेमकल्याणी } कस. नाशीक
दततदेव, सोनप्रभू, महादप्रभू, हरदेऊ }

मी व दततदेव वगैरेमध्यें नाशीक येथलि मुलेपणाबद्दल मांडाभांडी जाली. निवाड्यांत लमाचे सर्व हक्क दततदेव वगैरेस दिले.

सा. ले. २९७ श. } (५१६) { श. १५६८ ज्येष्ठ व. ५
फ. १०५६ सु. १०४७ } न. महजर फा. मु. व मज. { इ. १६४६ मे २४

दत्तदेउ, सोनप्रभू, माहादप्रभू, हरदेऊ व सिउभट क्षेमकल्याणी यांमध्यें नाशीक येथील मुलेपणाबद्दल वाद लागला असतां निकाल झाला कीं मुलेपण दत्तदेव वगैरेंचें.

इ. वृ. ३८ पृ. ६ } (५१७) { श. १५६८ आषाढ शु. १५
सु. १०४७ जवल १४ } विनंति-पत्र फा. मु. सी. { इ. १६४६ जून १८

गोमाजी नरसिंह व रामाजी कृष्ण हवाले बावधान-रा. रा. चंदरराऊ राजे गोसावी.

पिलाजी मालोजी देसाई याने बावधनची वाडी मारिली. दोन कुणबी धरले. वस्तभाव, जमान व कतबे घेतले. कुणब्यास तगादा होतो. तरी वस्तभाव वगैरे देविली पाहिजे व तगादा तोडिला पाहिजे.

खं. २० ले. १० } (५१८) { श. १५६८ अधिक श्रावण
सु. १०४७ जखर } ता. खुर्दखत { इ. १६४६ जुलै

अजर. रा. **शिवाजी राजे** हुदे.--व मोक. मो लोणी बारकर्डियाची **पा सुपे.**

बिदानदकी मोरेस्वर गोसावी मोरेस्वर हुजूर एऊन इतिमास केली जे आपणास इनाम बा फर्मान हुमायून व बा खुर्दखत वजीरानि दर सवाद मौजे मजकुरी चावर गज शारायनी १ प्रज एसू भोगवटा व तसरुफाती चालली आहे. ए बाबे पेशजी आपण हुजूर एऊन अर्ज केला की भोगवटि याची खुर्दखते आपणापासून फितरतीमध्यें गेली आहेती. **साल गुा सन सीता कारणे मौजे मजकूर साहेबास अर्जानी जाला** म्हणून हुदेदार ताजिया खुर्दखताचा उजूर करितातेि. म्हणून अर्ज केलियावर हुजरून दुमाले खुर्दखत सादर झाले ते मौजे मजकुरास घेऊन गेलो. माहालीचे हुदेदार उजूर करितातेी की खुर्दखत लिहिले आहे की भोगवटे व तसरुफाती चालिली असेल तेणे प्रमाणे दुमाले करणे; यावरून भोगवटियाची खुर्दखते पाहिजेत म्हणून उजूर करितातेि. तरी दरींबाब याजबदल पेशजी अर्ज केला आहे की भोगवटियाची **खुर्दखते फितरतीमध्ये आपणापासून गेली** आहेत ए बाबे हाली मौजे मजकूरचे मोकदमी अर्जदास्त लिहिली आहे. एसियास नजर एनायत फर्माऊनु हुदेदार उजूर न करीत ऐसे दुमाले खुर्दखत देविले पाहिजे म्हणून मालूम केले. तरी मोरेस्वर गोसावी यास इनाम चालविणें.

सं. २० ले. ११ } (५१९) { श. १५६८ आश्विन शु. ३
सु. १०४७ रम १ } मिसेली फा. मु. म. सी. { इ. १६४६ आक्टो. १

अज दि. पर. सुपे—— देसमु. पर. सुपे व मोक. मौ. आंबी

मंगळमूर्ती गोसावी याचा मौ. आंबी येथे जमीन चावर व ५ होन नख्त इनाम आहे. तो कासीस जात आहे व इनाम वायदे लक्ष्मीधर जोसी यास दिला आहे. तरी वरील इनाम जोसी याजकडे चालविणें.

सं. ४ पृ. ६८ } (५२०) { श. १५६८ कार्तिक शु. २
सु. १०४७ सवाल १ } खुर्दखत म. मु. सी. { इ. १६४६ आक्टो. ३०

अजर. राजश्री **सीवाजी राजे** — कारकुनानि **पा॥ इंदापूर**; बो॥ संभाजी भोसले देसमुख पा॥ मजकूर हुजूर एउनु मालूम केले जे आपणासि इनाम बा॥ मोकदमी मिरासी कसबे मजकूर जमीन चावर जिराती ४॥। पाउणे पाच दर सवाद कसबे मजकूर बा॥ थल निमजगा अज चावर पाचपैकी बा॥ फर्मान बा॥ सिके खास देखील नख्तयाती ता॥ ठाणे ता॥ देहाये व बाजे पटिया व महसूल व उट व कडबा व बाजे बाबा व वेठ बेगारी फर्मासी कुलबाब कुलकानू रवा आहे. सालाबाद भोगवटे तसरुफाती चालत आले आहे. **हाली साहेबासी मुकासा अर्जानी जाला आहे**. संभाजी भोसले देसमूख पा॥ मा॥ यासि इनाम बा॥ मोकदमी......सालाबाद चालिले असेली तेणेप्रमाणे दिधले आहे दुमाले कीजे औलाद अफलाद चालविजे दरहरसाल... फिराऊन दीजे मोर्तब सूद (मोर्तब)

सं. ४ पृ. ७० } (५२१) { श. १५६८ कार्तिक शु. २
सु. १०४७ सवाल १ } खुर्दखत म. मु. व सी. { इ. १६४६ आक्टो. ३०

अजर. राजश्री **सीवाजी राजे**—— कार. व मोक. देहाये पा॥ इंदापूर. बा॥ संभाजी भोसले देसमुख पा॥ मजकूर जमीन चावर २२८१५ ता॥ जिराती चावर २२८ बागाईत चावर ८१५ मौजे निरवांगी, आथरुणे, कोरटी, मदनवाडी, अकोले, अवणी, गोतौडी, वडकुटे खुर्द, सटफळेगंडे, बाबुलगौ, सादलगौ, कलब, सेलगौ, निरगुड, रुई, कोळठण, मोडगौ, काठी, वडकुटे बु॥, सणसर, खोरवची, डावीज प्रत्येकी चावर १८ सदरहू-प्रमाणें अजराह मन्हामती इनाम दिधले असे. देखील नख्तयाती ता॥ ठाणे व ता॥ देहाये व बाजे पटिया व महसूल व ऊट व कडबा व बाजे बाबा व वेठीबेगारी व फर्मासी कुलबाब कुलकानू दुमाले कीजे. औलादअफलाद...दरहरसाल...तालीक घेऊनु...दीजे. मोर्तब सुद

सा. ले. २६० } (५२२) { श. १५६८ कार्तिक शु. २
सु. १०४७ सवाल १ } खुर्दखत म मु, व. सी. { इ. १६४६ ऑक्टो ३०

अजर... **सिवाजी राजे** ——कारकुनी **पा॥ इंदापूर**...बदल इनाम बो॥ **संभाजी भोसले देशमूख पा॥ मजकूर** अजराह मन्हामती मुकासा मौजे

बोरी पा मा देहे १ देखील नख्तयाती......दिधले असे. दुमाले कीजे. औलाद अफलाद...दरहरसाल...तालीक...मोर्तब सूद (मर्यादे यं इ०)

इं. फॅ. ८ पृ० ७९ } (५२३) { श. १५६८ पौष व. ३०
इ. } स्वाली-कंपनी { इ. १६४७ जाने. २५

रायबाग प्रांतांतील जकातींचा मक्ता **मुस्ताफाखानाला** मिळाला आहे.

खं. २० ले. ८६ } (५२४) { श. १५६८ फाल्गुन व. ११
सु. १०४७ सफर२४ } खुर्दखत फा. मज. व सी. { इ. १६४७ मार्च २२

अज सर० फैज आसार आली हजरत — चांदोराम हवा० कार० देसमु० पर० वांई गोपीनाथ रामेश्वर तबीब यास बोरखल व किण्ही येथें इनाम जमीन आहे. हाली पर० मज० आली हजरत साहेबासी **मोकासा अर्जानी जाहाले.** तरी तो इनाम चालविणें.

सा. ले. १५१ } (५२५) { श. १५६८
सु. १०४७ } फा. मु. { इ.१६४६-४७

सिंदी अंबर हवालदार पर० पुणें————हुदे० व मोक. मौ० मोरगाऊ गणेश बिन मल्हारी भगत मोरया मालूम केले "आपणास इनाम" (अपूर्ण).

सं. २ पृ. ७२ } (५२६) { श. १५६८
सु. १०४७ } कौल. फा. मु. सी. { इ. १६४६-४७

अजर० हुसेन अलीखान मोका० कस० पावस— विश्वनाथ जोसी कसबे पावस तुझा आगरवाडा कसबे मज० आहे. त्यासी जोइसी म्हणोन तकसीम माफ असे. पूर्वीप्रमाणें तुझे हक चालवूं.

हेरास सं. } (५२७) { श. १५६८
इ. ? } { इ. १६४६

मदुऱ्याच्या नायकानें गोंवळकोंड्याचें सैन्य बोलाविलें. या वेळीं विजापुरकरांशीं युद्ध सुरू नव्हतें.

इं. फॅ. ८ पृ. १२७ } (५२८) { श. १५६९ वैशाख शु. १०
इ. } अहमदाबाद-सुरत { इ. १६४७ मे ४

शाइस्तेखानाचा जुलूस-शाइस्तेखान (गुजराथचा सुभेदार) निरपराध्यांवर जुलूम व गरिबांची नागवण करितो. दरोडेखोरांना आश्रय मिळतो अशा सबबीवर शहरें ओस पाडतो.

सा. ले. १२०; स. पृ. १११ }
सु. १०४८ जखर २६ }
(५२९)
खुा म. मु. व सी.
{ श. १५६९ आषाढ व. १२
{ इ. १६४७ जुलै १९

अजर० रा० **सिवाजी राजे**————कार० व देशमु० पर० पुणे

माहादेव मुद्गल पुरंदरे याचा, मलिक अंबर व महाराज साहेब (शहाजी) यांच्या पत्राप्रमाणें पर्वती, पिंपरी, पिंपळेसौदागर या गांवीं इनाम चालू आहे. हाली **दादाजी कोंडदेव** यास देवाज्ञा झाली म्हणून कारकून ताजा खुर्दखताचे उजूर करितात असें समजतें. तरी तसें न करितां पुरंदरे याचा इनाम त्याजकडे पूर्वीप्रमाणें चालविणें.

स. पृ. २१ ले. १६ }
सु. १०४८ श. }
(५३०)
इनामपत्र
{ श. १५६९ भाद्र. शु. ५
{ इ. १६४७ आगष्ट २४

देसाई, देशपांडे, कृष्णापा———— भावीमट सिंहासनाधीश्वर चिक शांत देवरु

साल गुदस्त आमचे प्रांत दंडाराजपूर सिद्दी अंबर यास दिले. त्याजकडून **सिद्दी-साद** मुलुखाचे हवालदारीस आला. तुमचे गुरु हिरेसांत स्वामी यांस कपटानें धरून जिंदगी घेऊन मारहाण करितां मेले. सिद्दीसादानें मठ तुमचे हवालीं केला. मठाची डाग-डुजी करीत असतां प्रांत राजपुरी आदम सो यास मोकरर जाहला. त्यांनीं ठिकठिकाणचे गुरु व पाटील आणवून लावणी वगैरेचा वाद तोडून पूर्वीचे वतन ठराव करून दिल्हे.

खं. २० ले. ८७ }
सु. १०४८ रम५ }
(५३१)
कौलनामा फा. मु. मज. सी.
{ श. १५६९ आश्विन शु. ६
{ इ. १६४७ सप्टें० २४

अज० दि० पर० वाई——विठोजी सुदामजी पाटणा पर० मज०

विठोजी व सिवाजी पाटणा यांमध्यें पाटणेपणाचें भांडण लागले असतां निवाडा केला कीं, विठोजीच्या दोन तकसीमा व सिवाजीची एक. तरी त्याप्रमाणें वागणें.

शि. प्र. पृ. ९९ }
सु.१०४८रम १५ }
(५३२)
ताकीदपत्र फा. मु.
{ श. १५६९ आश्विन व. १
{ इ. १६४७ आक्टो. ४

गोविंद नरसिंह बाा देसमूख तपे वालवा—मोक० मौ० नागठाणे (वाळवे), उपाधे यास अभिषेक बाा १ होन दरसालप्रााो आदा करणें.

सा. ले. २८ }
सु. १०४८ रम २६ }
(५३३)
{ श. १५६९ आश्विन व. १२
{ इ. १६४७ आक्टो. १५

?————मोक० मौ० परवती पर० पुणें

विनायकभट ठकारसोां पुणें यास ११ गावांची ज्योतिष कुळकर्णाची मिरास आहे. ९ गांवें मुतालिक ठेऊन करतो. २ गांवें पुण्याचा देसकु० हरकत करून स्वतः करतो. दोहोंपैकीं १ गांव त्याचे हवाला जाले. दुसरें होत नाहीं. तरी दुसरें परवती त्याचे हवाला करणें.

खं. २० ले. २३७ } (५३४) { श. १५६९ आश्विन व. १२
सु. १०४८ रम २६ } खुर्दखत मु. व सी. 'प्रतिपचंद्र' { इ. १६४७ आक्टो. १५

अजर. रा. **सिवाजी राजे**— कार. ता कडेपठार पा पुणे......

दरीविले गणेशभट बिन मल्हारीभट भगत मोरया हुजूर......जे आपणास इनाम जमीन चावर निमे ·॥· दरसवाद मौजे मोरगौ ता मा देखील नख्तयाती व महसूल बा फर्मान हुमायूनु व खुर्दखत वजीरानि कारकीर्दी दर कारकीर्दी व बा खुर्दखत माहाराज साहेबु व सनद सुभा ता सालगुदस्ता सन सबा चालिले आहे. साल मा कारणे **दादाजी कोंडदेऊ सुभेदार** यासी देवाज्ञा जाली. म्हणउनु माहाली कारकूनु ताज्या खुर्दखताचा उजूर करिताति. दरींबाब सरंजाम होए मालूम जाले. गणेशभट बिन मलारीभट भगवत मोरया यासि इनाम जमीन......कारकीर्दी दरकारकीर्दी चालिले असेल तेणेप्रमाणे मनासि आणउनु दुमाले करणे. दरहरसाल...............तालीक............मोर्तब सुदु

सा. ले. ३० } (५३५) { श. १५६९ आश्विन व. १२
सु. १०४८ रम. २६ } { इ. १६४७ आक्टो. १५

सिवाजी राजे——— सिदी अंबर हवाल. व कार. पर. पुणें

हातरोख्याप्रमाणें (ले. ५३३) वागणें.

सा. ले. १७ } (५३६) { श. १५६९ कार्तिक शु. ७
सु. १०४८ श. } { इ. १६४७ आक्टो. १८

सेटे, माहाजन व समस्त कसबे लोहगाऊ—— विष्णु सोनार

तूं म्हणो लागलास "कस. मज. घर बांधावयास भोई नाहीं. देणे." तरी दिधली आहे.

सा. ले. २९ } (५३७) { श. १५६९ कार्तिक व. ५
सु. १०४८ सवाल १९ } चिठी फा. मु. व सी. { इ. १६४७ नोवें. ७

अज दि. पर. पुणा—— हुदे. व मोक. व रया मौ. परवती

हातरोखा छ २६ रम. प्रमाणे अमल करणें. (ले. ५३३ पहा.)

खं. १५ ले. ८५ } (५३८) { श. १५६९ पौष शु. ७
सु. १०४८ जिल्काद २९ } खुर्दखत मु. व सी. { इ. १६४७ डिसें. १६

अजर. सिदी अजम सिदी मुझार——— कार. सा निंब पर. वाई

गोविंदगीर मुरीद कमलनयन गोसावी याचा निंबमधील इनाम पूर्वीप्रमाणें चालविणें.

ब्रि. म्यू. फार. इस्त ६६०० पृ. २९ } (५३९) { श. १५६९ (?) पौष शु. ७ नंतर इ. १६४७ डिसें. २३

अबदुल्ला कुतुबशहा (गोवळकोंडे)

हाजी नसीरा (कुतुबाचा विजापूरदरबारांतला वकील)

शहाजी भोसल्याकडून आम्हांस ६ जिल्हेज (२३ डिसें. १६४७) रोजीं "मला तुमच्या आश्रयाखालीं घ्या' अशा अर्थाचें पत्र आलें आहे. पण शहाजीची या वेळची व या पूर्वीचीही अनेक वेळची बिनंति आम्ही अमान्य केली व अदिलशहाच्या नोकरींत रहा असें त्याला कळविलें आहे. (मॉ. ४६ पृ. १२)

सा. ले. १२१ सु. १०४८ जिल्हेज २० } (५४०) खुर्दखत म. मु. व सी. { श. १५६९ पौष व. ७ इ. १६४८ जाने. ६

अजर. रा. **सिवाजी राजे** ----- कार. व देसमु. पर. पुणें

माहादभट मुद्गल पुरंदरे यांस महाराजसाहेबांचे खुर्दखताप्रमाणें परवती येथें इनाम चालू आहे. दरम्यान ते वाराणसीस गेले होते याकरितां सेत नाकीर्दी पडिले. हाली ते परत आले व कीर्दी जाले आहे. तरी त्यांचे सेत त्यांचे दुमाला करणें.

सा. ले. २९८ फ. १०५७ सु. १०४८ } (५४१) कतबा न. फा. मु. सी. { श. १५६९ इ. १६४७-४८

सोनप्रभू, दत्तदेव, गणेश प्रभू व त्रिंबकदेव लिहून दिधला ऐसाः---चिंतामणी शुक्ल जुनारदार हा हवालदार त्रिंबक जाऊन फिर्यादी जाला "कारकीर्दी **मलिक अंबर** गंगा अर्ध्य व गायमुख अमानत व जमा जाले. हाली धर्माधिकारणी कमाविस करतातां. तहकीक केले पाहिजे. तेव्हा माहाली कारकुनी आपणास बाजपुसी केली. तरी गंगाअर्ध्य व गायमुख हे आपला मिरासी. कारकीर्दी मलिक अंबर अमानत व जमा केलें. आपण वजीराचे बंदगीस उभे राहून महालास **ताजेखान** याजकडे खुर्दखत आणिले. त्याप्रमाणें आपले दुमाला केले. त्याउपरि गेला सिंहस्त निमे कमावीस **स्याहू भोसला** व **निमे अमल पातस्याही दिधले**. तरी मिरासी आपली आहे.

खं. २० ले. १७० व १७१ ? } (५४२ = ४८० अ) { श. १५६४? इ. १६४२?

सन समानामधें नरसीहभट टोल यानें हुजूर मालूम केलें कीं, इनाम तजेगिरीनें करून घेतलीं आहेत ते अमानत करणें. त्यावरून कारकुनानीं इनामतीचा महसूल अनामत केला. त्यावर आपण हुजूर येऊन अर्ज करावे तरी **साहेब मोहीमसीर होते**. यावयासी फुरसती नव्हेचि. पा वांई साहेबास मुकासा अर्जानी जाहल्यापासून १० सालें जाली, कांहीं इस्कील नाहीं. नरसीहभटामधे व आपणामधे महजबाबदल भांडण आहे

त्याबरअकसे साहेबापासी लायणी गैरयात बोलला. आम्ही आपलाल्या महजबे खुदाय तालाची बंदगी करून साहेबास द्वा देत असतो. मालूम जाले. चालवीजे पा हुजूर खाने अजम **अफजलखान.**

सर. मंदीर }
सु. १०४८ } (५४३) { श. १५६९
{ इ. १६४७-४८

तेरीज रकमाला-कारकीर्द महाराज **छत्रपती** सीवाजी राजे तो हवेली तलब किले सरसगड येथील सुमारें १३ गांवच्या जमाबंदी प्रकरणीचा तक्ता.

खं. २० ले. ५५ }
सु. १०४९ रजब २२ } (५४४) { श. १५७० श्रावण व. ९
{ इ. १६४८ आगष्ट २

इदलशाही कारकीर्दीत मिया रहीम महमद किलेदार ठाणे शिरवल यानें मौ न्हावी व खंडाळे येथें मसाहाती करून वाजंट जमीन बाद करण्याबद्दल मोकदमाच्या नांवें कौल दिला.

सा. ले. ३१ }
सु. १०४९ साबान १५ } (५४५) इनामपत्र प्रतिप. मु. व म. { श. १५७० भाद्र. व. २
{ इ. १६४८ आगष्ट २५

अजर. रा. **सिवाजीराजे** --बजा. कार. व देशमु. पा पुणें.

विनायक रामकृष्ण ठकार यास मौजे सूस कर्याती मावळ पा पुणें हा गांव कुलबाब खेरीज ठाणे इनाम दिला असे. मोर्त. (मर्या.) रुजुसुरु.

इं. फॅ. ८ पृ. २१५ }
इ. } (५४६) मद्रास-इंग्लंड { श. १५७० आश्विन व. २
{ इ. १६४८ सप्टें २३

ह्या मुलखाची अवस्था अत्यंत बिकट होत चालली आहे. **गोवळकोंडेकर व विजापूरकर** यांचीं सैन्यें परस्परांपासून २ दिवसांच्या मुकामावर राहून देश उध्वस्त करीत आहेत. एकमेकांचा पाडाव करण्याकरितां त्यांच्यांत चुरस असली तरी या भिकार आणि यादवीनें भरलेल्या देशाचे एकसारखे लचकेच तुटत आहेत. विजापुरी सैन्याबरोबर तर ८००० लुटारू नेहमीं सज्ज असतात. त्यांना पगार नसून ते आपली उपजीविका लुटीवरच करतात. सर्व मुलूख त्यामुळें ओसाड पडत आहे. विशेषेंकरून टेवेनापट्टण, पोर्टोनोव्हो व पॉंडेचरी यांची फारच दुर्दशा आहे. शेवटचीं दोन बहुतेक रसातळास गेलीं आहेत. टेवेनापट्टण मात्र लांच नजर वगैरे देऊन थोडेसें जीव धरून राहिलें आहे.

इं. फॅ ८ }
पृ. २५१ इ. } (५४७) { श. १५७० पौष व. १२
{ इ. १६४९ जाने. ३१

स्वाली मरीन---- ?

राजापूर बंदर **मुस्तफा**खानाकडे होतें. तो मरण पावल्यामुळें त्याची जहागीर

(आदिलशहा) राजाच्या ताब्यांत आली; या गडबडींत राजापूरचा सुभेदार **महमद कासम** यानें जबरदस्तीनें इंग्रजी व्यापाऱ्यांची वखार उघडून तेथील कापड राजाकडे नेलें. याबद्दल आमचा दलाल वेणिदास यास पाठवून व दरबारांतील वजनदार उमराव इख-लासखान यास पत्र लिहून आम्हीं आदिलशहाकडे दाद मागितली आहे. वेणिदासानें **बेगम**च्या कानावर आमचा मजकूर घातला आहे.

हेराससंग्रह इ.	(५४८) पोर्तुगीज	श. १५७० इ. १६४८

विजापूरकर, (गोवळकोंडेकर व विजयानगरकर यांविरुद्ध) तिरुमलाची बाजू उचलून १७ हजार सैन्यानिशी युद्धांत सामील झाले. विजापूरचे सैन्यानें **जिंजी** घेतली. **खान-खानान** या हबशी सेनापतीची नेमणूक विजापूरचे सैन्यावर (मुस्तफाखानाचे मृत्यूनंतर) झाली.

हेराससंग्रह इ.	(५४९) पोर्तुगीज	श. १५७० इ. १६४८

खानखानाला परत बोलाविलें तेव्हां **श्रीरंगानें** आपलें साम्राज्य दृढ करण्याचा प्रयत्न केला.

प्रभात ले. १ हि. १०५९ जुलूस २२ रवल १०	(५५०) फर्मान	श. १५७१ चैत्र शु. ११ इ. १६४९ मार्च १४

मुरादबक्ष—**शिवाजी भोसले.**

तुम्ही खातरजमेचें पत्र आल्यानंतर हुजूर येतो म्हणून लिहिलें. ऐसियास वकील अगोदर पाठवणें म्हणजे खातरजमेचें पत्र पंजासहित पाठविण्यांत येईल. [तुगरा मुरादबक्षाचा; निशाण अबदुल लतीफ याचें] [दिल्लीपतीचा पत्रव्यवहार]

खं. १५ ले. ४३७ सु. १०५० जखर ६	(५५१) खुर्दखत प्रतिप. मु. व सी.	श. १५७१ अ. आषाढ शु. ७ इ. १६४९ जून ७

अजर **सिवाजीराजे**—कार. व देश. प्रा चाकण

मुरारिभट ब्रह्मे सो॥ चाकण याचे नांवे इनाम व रोजमुरा व तेल चाकण व इंदोरी येथें चालत आहे. **हाली पर० चाकण साहेबा अर्जानी जाला** आहे. सन **तिसा तागायत** तश्रफाती व भोगवटा चालिला असे तेणेप्रमाणें कृष्णभट बिन मुरारिभट ब्रह्मे यास चालविणें. मर्या. रुजुसुरु. सुरुसूद.

खं. २० ले. ८८ विरोधी संव.	(५५२) मान्यतापत्र	श. १५७१ अ. आषाढ व. ५ इ. १६४९ जून १८ ?

अकोजी व येकोजी (वाई चित्राव)— — अऊभट व शंकरभट

पसरणीच्या इनामाच्या भांडणाबाबत अहमदखान सांगतील तेथें निर्णयासाठीं जाऊं.

ख. २० ले. ८९ } (५५३) { श. १५७१ अ. आषाढ व. ५
सु. १०५० जखर१८ } दुमाला पत्र फा.मज. व मु.सी. { इ. १६४९ जून १९

अजर. **अफझलखान** महमदशाही——कार० व देशमुख पर० वाई

पर० वाई साहेबास **मोकासा** मिळाला. रंगभट चित्राव मेला त्याचे १० होन (धर्मादायाचे) मुलगा नरसिंह यास चालवावें.

ख. २० ले. ९० } (५५४) { श. १५७१ अ. आषाढ व.७
सु. १०५० जखर २० } खुर्दखत फा. मु. मज. सी. { इ. १६४९ जून २१

अजर. **अफजलखान** महमदशाही—— कार. व देस. पर. वाई

आमण क्षीरसागर यास येकंबे येथें इनाम आहे. तो चालविणें. **हाली मुकासा अर्जानी जाला.**

ख. २० ले. २४१ } (५५५) { श. १५७१ आषा. शु. ३
सु. १०५० रजब १ } खुर्दखत प्रतिप. मुद्रा. सी { इ. १६४९ जुलै २

अजर. **सिवाजी राजे**—— कारकून व देशमुख पा **पुणे**.

माहादाजी गोसावी सो मोरेश्वर याचा इनाम पूर्वीप्रमाणें चालविणें.........

सा. ले. १५२ } (५५६) { श. १५७१ आषा. व. ८
सु. १०५० रजब २० } { इ. १६४९ जुलै २१

अजर. **सिवाजी** राजे—— कार. देशमु. व देशपां. प्रा **सुपे**

हाली पर. **सुपे साहेबास मुकासा अर्जानी** जाला आहे. गणो तिमाजीनें माहादाजी गोसावी यास दिलेले सुपे येथील इनाम माहादाजीकडे चालविणें...पा हुजूर

सा. ले. २३२ व रु.३ ले. १४ } (५५७) { श. १५७१ आषाढ शु.
(ख. १५ ले. ३३८) } तलब फा. सी. { इ. १६४९ जुलै

अफजलखान महमदशाही—— कानोजी जेधा

चंद्रराऊ कदीम मयत जालियावरि गैरी लोकी पैस करून बलकाविले आहे. याबदल त्यावरी नामजादी केली आहे. यैसियास तुम्ही दौलतखाह. तुम्ही हशम लोक मेलउनु आपले तर्फेनें सुरू करणें. मुलाहिजा न करणे. याच कामावरून तुमची सरफराजी आहे. कागद पावताच सुरू करून खबर लिहिणें.

ख. १५ ले. ३३८ } (५५८) { श. १५७१ आषाढ व. ९
पै. छ २४ रजब } 'प्रतिपच्चंद्र' मु. व सी. { इ. १६४९ जुलै २३

राजश्री **सिवाजी** राजे ——कान्होजी जेधे तपे भोर किले रोहिडा.

तुम्ही पत्रिका लिहिली की **खान अलीशान** खान अजम येही लिहिले आहे कीं जावली वरी सुरू केले आहे, तुम्ही आपले जमेतीसी सिताब येणे. तरी तुमचा व त्यांचा पहिलेपासून घरोबा आहे, गेले तरी पाहिजे. आमा खासा अगर पुत्र पाठवायाचे जाले तरी त्याचा बोलभाक बरवे रीती घेउनु मग जाणे. दगा होये ऐसे न करणे. एक भले माणूस दरम्यान देउनू मग जाणे. तुमचे नजेरेसी पडत असिले की खासाच जावे जरी तुमचे मन बार देत नसिले तरी कौल बौल घेउनु पुत्राबराबरी लोक देउनु पाठविजे. हरयेक बहाणा करुनु तुम्ही राहणे. दोन्ही गोस्टी तुम्हास लिहिल्या आहेती. यात तुम्ही स्याहाणे असा बहुत लिहिणे नलगे (खं. १५ ले. ३३४, ३३५; सा. ले. २३२ वरून काल अनुमानिला आहे.

सा. ले. १५३ } (५५९) { श. १५७१ आषाढ व. १४
सु. १०५० रजब २७ } फा. मु. सी. { इ. १६४९ जुलै २८

अज दि. पर. पुणा—— मोक. व रया. मौ. मोरगाऊ

माहादाजी गोसावी याचा इनाम पूर्वीप्रो चालू ठेवणें.

ख. १५ ले. ३३४ } (५६०) { श. १५७१ श्रावण शु. १
सु. १०५०(खं. १५ ले. ३३८) } कौल फा. मु. मज. सी. { इ. १६४९ जुलै ३०

अजर. **अफजलखान** महमदशाही—— कान्होजी जेधा

तुमचे बाबे तिमाजी व त्रिंबक पंडित यांनीं लिहिलें. तरी जे जमायत असेल ते घेऊन येणें. ५० घोडियाचे सरबारगी तुम्हासी दिधले असे. सरंजाम देऊं. पाईचे खलक आणाल त्यांस चाकर ठेऊ व अडिसरी देऊ. शक अंदेशा न करणें.

खं. १५ ले. ३३६ } (५६१) { श. १५७१ श्रावण शु. ४
? रजब ३ } तलब फा. मु. सी. { इ. १६४९ आगस्ट २

त्रिंबक कान्हो हवालदार—— कान्होजी नाईक देसमुख

खान अजम साहेबाचा कौल पाठविला असे. तरी जमेत घेऊन सिताब येणें. येथे खर्चाचे सरंजामी होईल. आम्ही तायघाटाहून स्वार होऊन गेलो.

सा. ले. ३२ } (५६२) { श. १५७१ श्रावण शु. १३
सु. १०५० व श. } परवाना { इ. १६४९ आगस्ट १०

मल्हारजी आपाजी येसवंतराऊ देसमु. पर. सिरवल— अनाजी नामाजी

अनाजींनें सांगितलें कीं "आपण रामाजी विठल देसकु. पर. सिरवल यासी शरीरसमंध केला. तेव्हा विजापूर सोडून शिरवळात रामाजीच्या जागेत घर बांधून राहिलो होतो. शहाजी राजे धरिले. त्याचा लेक सिवाजी पुरंधरी बैसोनु

दिवाण नामजादीसी झगडो लागले. सर सुभेदार फत्त्याखान तिही शिरवलास फाजीलशाहा व आशाफशा पाठविले. तिही कोट पर. मज. बळाविला. त्यावरी पुरंधरीहून सिवाजी राजे धाविनले. झगडा जाला. ते वख्ती आपले घर जळालें." त्यावरून त्यास मध्यभागी घर बांधण्यास जागा दिली.

प्रभात– दिल्लीपत्र. ले. २ } (५६३) { श. १५७१ श्रावण व. २
हि. १०५९ जुलूस २३ साबान १५ } फर्मान { इ. १६४९ आगस्ट १४

मुरादबक्ष—— **शिवाजी** भोसले.

तुमचे वडिलांच्या गोष्टी मनास न आणितां तुम्हां सर्वांवर संतोष आहे. तुम्ही हुजूर यावें म्हणजे पांच हजारी मनसब व बहुत इनाम तुम्हास मिळेल व तुमचे भावापैकीं जे समागमें येतील त्यास नोकरी देतां येईल यास्तव खातरजमेनें यावें. हें पंजाचें निशाण जाहालें आहे. [तुगरा शाहाजहानचा मुरादबक्षाचा. निशाण मुनशी अबदुल लतीफ.]

सा. ले. २३४ } (५६४) { श. १५७१ भाद्र.शु.११ नंतर
(खं. १५ ले. २३४-२३८) } स्मरणचिठी फा. मु. सी. { इ. १६४९ सप्टें.

अफजलखान महमदशाही—— कान्होजी जेधा देशमुख

तुमचे हेजिब जोहर खोरियाची मिसेली घेऊन गेले. हनोज तुम्ही जोहर काबीज केले नाहीं. आम्हीही चांद जालियावरी वाईस येतो. तुम्ही सिताब जोहर काबीज करून **हणमतरायास** उठाविणें.

खं. १५ ले. ३३५ } (५६५) { श. १५७१ भाद्र. शु. १२
सु. १०५० रम ९ } मिसेली फा. मु. मज. सी. { इ. १६४९ सप्टें. ७

अजर. **अफजलखान** महमदशाही— कार. पर. वाई

जोहरखोरे **हणमतराऊ** काबीज आहेत. हाली कान्होजी जेधे यास दिधले आहे. ते खासा काबीज करतील. त्यास मुकासा दिला आहे.

त्रै. व. २ पृ. ६० } (५६६) { श. १५७१ भाद्रपद शु. १२
सु. १०४९ हि.१०५९ रम ९ } फर्मान फा. मु. सी. { इ. १६४९ सप्टें. ७

बादशहा (विजापूरचा)—— अमलदार, देसाई पर० पुणें

मोरोबा गोसावी यांजकडील इनाम निजामशाही फर्मान व **महाराज फर्जंद शाहाजी** भोसले यांचे खुर्दखत यांत लिहिल्याप्रमाणें चालू ठेवणें.

सा. ले. २३३ (खं. १५ ले. ३३४-३३५) — (५६७) कौल फा. मु. सी. — श. १५७१ भाद्रपद ब. ७ इ. १६४९ सप्टें. १८

अफजलखान माहामदशाही—कान्होजी जेधा

तुम्ही अरिजा पाठविला. तुमचे हेजीब आबाजीपंत येही मालूम केलें कीं "**हणमंतराये** काबीज केलें, तें आपणास दिधलिया काबिज करून देईन; व जाऊ-लीची मसलत करीन. तेथील दोनिसे लोकाची नाइकी देविली पाहिजे. वेलग आपले पाटिलकीचा गाव; त्या गांवीचे लोक चाकरीस ठेवीन." येसियास जोहरची मिसेली पाठविली आहे. तेच जागा खासा राहणें. जाउलीची नाईकी दोशा लोकाची तुम्हास देऊ. वेलंगचे बाबे वाईचे लोक चाकर ठेऊ. गुन्हा माफ आहे.

स. १०४ सु. १०५० सवाल १० — (५६८) खुर्द खत — श. १५७१ आश्विन शु. १२ इ. १६४९ आक्टो. ७

अजर० महा० रा० **शहाजी राजे**—कार० व० देशमुख पर० राणेबेनूर मुल्ला हुसेन याचा १ चावर इनाम चालविणें.

खं. २० ले. २४३ सु. १०५० सवाल १२ — (५६९) खुर्दखत म. मु. व सी. — श. १५७१ आश्विन शु. १४ इ. १६४९ आक्टो. ९

अजर. **सिवाजी** राजे — कार. व दशेमू. पा पुणें

माहादाजी गोसावी मोरेश्वर इनामदार (ले. ५५५ प्रमाणें)

खं. २० ले. २४२ सु. १०५० सवाल १२ — (५७०) खुर्दखत म. मु. व सी. — श. १५७१ आश्विन शु. १४ इ. १६४९ आक्टो. ९

अजर रा. **सिवाजी** राजे — कार. व देसमू. पा पुणे.

माहादाजी गोसावी याचा मौ. मोरगाव येथील इनाम हकासुद्धा पूर्वीप्रमाणें चालविणें.

सा. ले. ४१ पृ. ७०-६१ श. व सु. १०५० — (५७१) पोटपत्र — श. १५७१ आश्वीन व. ५ इ. १६४९ आक्टो. १५

सुपे सुपची मोकदमी काटकर यांची [श. १५५१] दुकाळात त्यांनीं त्यातील निमी गोदगावडा धनगर यास दिली नंतर **संभाजीराजे** मोकासदार जाले. काटकरांनीं गरिबी-मुळें आपल्या तक्सीमेपैकीं निमी निळकंठराव यास विकली. गोदवाड्याच्या हातूनही उगवणी होईना म्हणून तो पळाला. तेव्हां त्याचे जामीन शामराज काटे यांनीं त्याची मोकदमी चालविली. पुढें अतसखानास मुकासा मिळाला व गोदगावड्यानें आपली मोकदमी सोडविली. नंतर सर्जोराव सुपेकर मोकशाचे काम करूं लागले. त्यावर २ वर्षांनीं कोंढाण्यावर नामजादी आली. त्यावेळीं गावाची लूट व जाळपोळ झाली. नंतर राजेश्री

राजे साहेबी गाऊं कबजा केला. नंतर याचा मुकासा माहाराज माहादाजी राजे यांस मिळाला. त्यांनीं सुपे खुाचा मुकासा निळकंठराव यास दिला. शेटटीं सुपे खुार्चीं मोकदमी निळकंठराव काटकर व गोदगावडा यांनीं मान वांटून घेतली.

शि. प्र. पृ. १०० ले. २३ } (५७२) { श. १५७१ कार्तिक व. १
सु. १०५० जिल्काद १५ } खुर्दखत फा. मु. सी. { इ. १६४९ नोवें. १०

रा. खंडोजी राजे घोरपडे — रा. नारो रुद्र हवाले तपे वालवे

संभभट उपाध्ये यांस नागनाथाचे अभिषेखाबदल १ होन पूर्वीप्रमाणें चालविणें.

सा. ले. ४१ पृ. ६० } (५७३) { श. १५७१ मार्ग. शु. १
श. व सु. १०५० } महजर { इ. १६४९ नोवें. २४

माहादाजी निळकंठराव काटकर व गोदगावडा यामध्यें सुपे खुाच्या मोकदमीची सारखी वाटणी केली आहे. (पहा. ले. ५७१)

खं. ८ व प्रभात ले. ३ } (५७४) { श. १५७१ मार्ग. शु. ७
हि. १०५९ जिल्हेज ५ } फारसीचें भाषांतर { इ. १६४९ नोव्हें. ३०

मुरादबक्ष———— शाहाजी भोसले

तुमचे पुत्र **शिवाजी** यांणीं अर्जदास्त हुजूर येण्याविशीं पाठविली ती पावली. पेशजीच्या गोष्टी मनांत न आणितां तुमची मोकळीक करण्याविषयीं लिहिलें आहे. त्यास हाली आम्ही दिल्लीकडे जात आहों. परंतु तुम्हास खुष खबर देतो कीं, तुम्ही सर्व प्रकारें खातरजमा ठेवावी. आम्ही हुजूर पावलियावरी तुमचे मजकुराविषयीं अर्ज करून बंदोबस्त करून देऊं. तुम्ही आपला एक वकील इतबारी पाठवून धावा. त्यासमागमें फर्मान पंजाचे पाठविण्यांत येईल. तुमचे चिरंजीव **संभाजी** वगैरे सरकारकृपेस पात्र होऊन पेसजीप्रों मनसबा व नूतन सर्फराज पावतील. इकडील स्नेहांत व लक्षांत वागणें हें आपलें सर्व मनोरथ पूर्ण करून घेण्यास कारण आहे. म्हणोन तसे वागोन खातरजमा ठेवावी. तुम्हाकरितां पोषाख पाठविला हा घेऊन आपणावर पूर्ण लोभ आहे असें मनांत आणावें.

खं. ८ प्रभात ले. ४ } (५७५) { श. १५७१ मार्ग शु. ७
हि. १०५९ जिल्हेज५ } फारशीचें भाषांतर. { इ. १६४९ नोव्हें. ३०

मुरादबक्ष—— **शिवाजी** भोसले

तुमचे पत्र राघोपंत याजबराबर पाठविलें तें पावलें. जुन्नर व अहमदनगर येथील देशमुखीविषयीं लिहिलें त्यास आम्ही हुजूर गेल्यानंतर हा मजकोर घडोन येईल. खातरजमा ठेवावी. आपणाकडील एक वकील पाठवून धावा. मजकूर समजून घेऊन अमलांत येईल. वकीलास जो मजकूर विचारूं त्याचें उत्तर धावें. म्हणजे काम होण्यास दिरंग लागणार नाहीं. जाणोन उद्योग करावा व लोभ पूर्ण जाणावा.

स. पृ. ११२ ले. २
सु. १०५० जिल्हेज १०
(५७६)
खुदर्खत
श. १५७१ मार्ग. शु. १२
इ. १६४९ डिसें. ५

अजर० **सिवाजी** राजे—कार० व देशमुख प्रा पुणें
नारायण त्रिमल दीक्षित यांस बाणेरे हें गांव इक्तासह इनाम आहे.

खं. २० ले. २०९
सु. १०५० जिल्हेज १२
(५७७)
खुर्दखत (फा. मु. सी.)
श. १५७१ मार्ग. शु. १४
इ. १६४९ डिसें. ७

अजर० शर्जा **मलिक रेहान**—कार० व देशमु. मौ. करकंब
नरसीह नारायण याचा गुळसरे येथील इनाम चौकशी करून त्याकडे चालविणें.

शि. प्र. पृ. १०० ले.२४
सु. १०५० जिल्हेज १३
(५७८)
खुर्दखत फा. मु. म. मज सी.
श. १५७१ मार्ग. शु. १५
इ. १६४९ डिसें. ८

?—कार० व देसमुख तपे वालवा. (ले. ४८६ प्रमाणें)

खं. २० ले. १२
सु. १०५० मोहर १०
(५७९)
खुर्दखत. फा. सी.
श. १५७१ पौष शु. ११
इ. १६५० जाने. ३

अजर. माहा. रा. **शाहाजी राजे**——— कार. पर. सुपें
क. सुपे येथील चांभाराकडून वहिवाटीप्रमाणें पायपोसाच्या रूपानें सारा घ्यावा व सुपे व बारामती येथील सरमेहेतरीबद्दल दोन वर्षांत ७५ होन घ्यावे. परवा. हैदरशा

खं. २० ले. २४०
सु. १०५० मोहर २३ ?
(५८०)
उल्लेख.
श. १५७१ पौष. व. ९
इ. १६५० जाने. १६

माहादाजी गोसावी (मोरेश्वर) याचा इनाम चालविणें परवा० अजम हैदरशा.

शि. प्र. पृ. १०१ ले. २५
सु. १०५० सफर १३
(५८१)
श. १५७१ माघ शु. १४
इ. १६५० फेब्रु. ५

नारायण रुद्र हवाले देसमुखी तपे वालवे— बाऊजी रैया पालक कस. मज.
नागनाथाचे अभिसेखाबदल संभट उपाध्ये यास १ होन व ८॥ देणें.

खं. १५ ले. ८८
सु. १०५० सफर २३
(५८२)
हुजती. फा. मु. मज. सी.
श. १५७१ माघ व. १०
इ. १६५० फेब्रु. १५

अज दि. पर. वाई—— मोक. मौ. गोवे
मौ. गोवे येथे कालवा पाणियाचा धरला आहे. त्यास आठ रोजास सारोन पाणी घेणें.

सा. ले. ३३
सु. १०५० रवल ६ } (५८३) कौलनामा फा. मु. व सी. { श. १५७१ फाल्गुन शु. ७ इ. १६५० फेब्रु. २७

अज दि. ठाणे पर. सिरवल--- आली बिन ममाजी दिवटा चाकर ठाणे पर. मार तुझा (दिवट्याचा) वडील ब्राह्मण ओलीस मांदत होता. त्यानें ती जागा **मुला महामदाच्या** कारकीर्दीस टाकली. पुढें **जायणापंताचे** वेळेस ही जागा देसकुलकर्ण्यास दिली. त्यानंतर त्यांच्या यारिदियास (= मुतालिकास) ती जागा दिली. **त्यावर गलबला जाला.** तेव्हां तोहि जागा सोडून गेला. ती जागा आनंदरावास मिरास करून दिली. यासाठीं तुला (दिवट्यास) दुसरी जागा दिली.

खं. २० ले. २३९
श. ? संव. व हि. १०५९ } (५८४) { श. १५७१ इ. १६४९

मुद्गल रुद्र देसकुल. पांडेपेडगौ वगैरे--- महादेव मल्हार.

तुम्ही माझी वृत्ति मला मिळवून दिली याबद्दल पांच परगण्यांतील माझे देसकुलकर्ण व चिटणिशीची यारिदी तुम्हास दिली.

स. पृ. १०५ ले. ८
सु. १०५० } (५८५) { श. १५७१ इ. १६४९

अजर. **शिवाजी** राजे--- कार. व देशमु. प्रो पुणें.

मारेश्वर गोसावी याचे पणदरे येथील इनाम चालविणें. **हाली पणदरे माहाराजास मुकासा** मिळाला.

सा. ले. २९९
? फ. १०५९ } (५८६) फा. मु. सी. { श. १५७१ इ. १६४९

बिहुजूर हाकीम शरा व ठाणे गुलशनाबाद (नाशीक) सोनप्रभु व दतदेऊ हा नाशिकचा धर्माधिकरणी व मुळे जोसी आहे. जान सुल्क यानें भालेराव सोनाराच्या मुलीच्या लग्नाचे वेळीं हरकत केली ती खोटी ठरली.

स. पृ. १०७ ले. १०
(सा. ले. ४१) ? } (५८७) उल्लेख { श. १५७१ इ. १६४९

परवाना बमोहर राजेश्री **मंबाजी राजे भोसले** उमराव--- बनाम महादो लखमदेव. हरि विष्णु बतारीख दुमालपत्र वतन देसकुलकर्ण (सुपे) वाद. बहिरो नारायण खोटा केला.

कों. इ. सा. ले. १२८ } (५८८) { श. १५७२ चैत्र शु. १०
श. } विक्रय पट { इ. १६५० एप्रिल १

बाय सुत बाब सेणवी--अंतसुत पितांबर सेणवी

मौ. बामर्डे येथील कुळकर्णाच्या खरेदी विक्रीचा व्यवहार.

खं. १५ ले. ८७ } (५८९) { श. १५७२ वैशाख व. १३
सु. १०५० जवल २६ } खुर्दखत फा. मु. मज.सी. { इ. १६५० मे १८

अजर. अफझलखान महमदशाही --- कार. व देसमु. पर. वाई

गोवे सा निंब कालव्याचे पाणी गोविंदगीर मुरीद कमलनयन याच्या मळ्यास दोन दिवस न देतां पूर्वी प्रो देत जावे.

सा. ले. ३४ } (५९०) { श. १५७२ भाद्र. शु. १३
सु. १०५१ रम. ११ } फा. मु. सी. { इ. १६५० आगष्ट २९

देऊ व बाल सालवी यामध्यें दिवाणीच्या मानपानाबद्दल भांडण आहे. अग्रवाघानें रवा व पश्चिमवाघाने साउली करावी; असें ठरलें.

सा. ले. ३५ } (५९१) { श. १५७२ भाद्र. शु. १३
सु. १०५१ रम. ११ } तक्रीर फा. मु. सी. { इ. १६५० आगष्ट २९

तक्रीर करणार देऊ सालवी कुंभार मेहतरा पर. सिरवळ

दिवाणातील मानपान आधी आपला मागून बाल सालवी याचा. रवा करीन.

सा. ले. ३६ } (५९२) { श. १५७२ भाद्र. शु. १३
सु. १०५१ रम ११ } जमान कतबा फा. मु. सी. { इ. १६५० आगष्ट २९

दाद व माल बिन पील म्हत माहाले हाजाम कस. सिरवल

दिवाण ठाणे पर. सिरवल

बाल सालवी याजबदल आपण जमान असो.

खं. २० ले. ९१ } (५९३) { श. १५७२ कार्तीक शु. ७
सु. १०५१ जिल्काद ५ } मिसेली फा. मु. मज. सी. { इ. १६५० आक्टो. २१

दि. पर. वाई--- मोक. मौ. पसरणी पर. मज.

नारायण गोपिनाथ चित्राव याचा पसरणी येथें ·।।· चावर इनाम चालविणें.

खं. १५ ले. ८६ } (५९४) { श. १५७२ कार्तीक व. ३
सु. १०५१ जिल्काद १६ } मिसेली फा. मज.सी. { इ. १६५० नोवें. १

अज. दि. पर. वाई--- मोक. मौ. निंब व गोवे

९ रवलचे खुर्द. सादर जाले. त्याप्रमाणें गोविंदगिरीचा इनाम त्याचे दुंबाला करणें.

सा. ले. १२२ } (५९५) { श. १५७२ मार्ग. शु. १
सु. १०५१ जिल्काद २९ } खुर्देखत फा. मु. { इ. १६५० नोवें. १४

अजर. मा. रा. **शाहाजी** राजे—— कार. देसमु. पा पुणें

माहाद बिन मुद्गलभट पुरंदरे सो पुणें यांचे कुल इनाम अमानत न करतां अर्धे यांचे हवाला करणें.

रु. ३ ले. ४ } (५९६) { श. १५७२ मार्ग. शु. ९
सु. १०५१ जिल्हेज ७ } खुर्देखत { इ. १६५० नोवें. २१

महा. रा. **शाहाजी राजे**—— कार. देशमु. पर पुणें.

मोरोबा गोसावी (चिंचवड) याचा इनाम सालगुदस्तपर्यंत चालत असतां या साली इस्कील झाली आहे. अहमद बिन काजी सैद यानेही असेंच सांगितलें. तरी इनाम चालू ठेवणें. **परवा**. शाहअजम हैदरशाहा.

इं. फॅ. मा. ९ } (५९७) { श. १५७२ माघ शु. १४
पृ. १२-१३ इ. } मद्रास-कंपनी { इ. १६५१ जाने. १७

मीरजुमलाच सर्व राज्याची व्यवस्था पहातो. राजाला भीत नाहींत इतके लोक त्यास भितात. तो राजाला दरसाल २०,००,००० पॅ. वसूल करून देतो. त्यानें सर्व कर्नाटक जिंकलें आहे. हाच देश आपल्याला सर्व कापड व नाना तऱ्हेचे जिन्नस पुरवितो. हिंदू नाईकांकडूनच वगैरे ४० लाख पॅ. वसूल होतो. त्याच्याजवळ अनेक घोडे हत्ती वगैरे असून गलबतें घेऊन तो व्यापार स्वदेशांत परदेशांतही करतो. तो इंग्रजांशीं दोस्ती कायमची करूं इच्छितो. कारण डचांबद्दल त्याचें मन बिटलें आहे.

सा. ले. १५४ } (५९८) { श. १५७२ माघ व. ४
सु. १०५१ सफर १८ } म. सी. { इ. १६५१ जाने. ३०

?— कार. तपे मोरेश्वर वगैरे

देसमु. व देसकु. व खोतपाटील यांनीं, माहादोबा गोसावी यांस पौड तर्फेच्या गावांमधून दरगांवास नक्त रुके २४ देण्याचें ठरले आहे ते द्यावे.

खं. १७ ले. ३ } (५९९) { श. १५७२ माघ व. १३
हि. १०६१ सफर २७ } कौलनामा (फा. मज. व सी. { इ. १६५१ फेब्रु. ८

अज **रणदुलाखान** — बापूजी हैबतराऊ देसमु. तपे गुंजन मावळ

२० स्वाराची जमेती घेऊन चाकरी करू ऐसी उमेद धरितां, बापूजी पंडित हेजिब पाठविले आहेती. तरी घर तुमचे आहे. अलबता येणें. आलियावरी लायख सरंजाम होईल.

सा. ले. १५५, १८० }
सु. १०५१ रवल ८ }

(६००)
'प्रतिप' व मर्या.

{ श. १५७२ फाल्गु. शु. १०
{ इ. १६५१ फेब्रु. १९

अजर. **सिवाजी राजे** — कारकुनानि ता हाये उर्फ पौड

रा **माहादाजी गोसावी** वस्ती मोरगौ पा पुणा यास ता माचे देसमूख व खोत पाटील येही सालाबाद **सादिलवारी खर्चे पैकी** दर गावास रुके चोवीस व भात अदमण देत आहेती. दरम्याने दोनी साले इसकील करून देत नाही. तरी सालाबाद-प्रमाणें देत जाणें (मर्यादेयं इ.)

राम. अं. ६५ ले. ७ }
सु. १०५१ रवल? २६ }

(६०१)
वर्षासन– ता

{ श. १५७२ फाल्गु. व. १३
{ इ. १६५१ मार्च ९

अजर. **संबाजी** राजे——कार. का पावस पा पुणे.

रघुनाथ विठल व महादेव तिमणभट सो येलूर यास श्रीघृष्णेश्वरच्या अभिषेका-बद्दल ६ होन वर्षासन दिलें.

सा. ले. १९० }
सु. १०५१ }

(६०२)
राजीनामा

{ श. १५७२
{ इ. १६५०

वाघोजी — सिदोराम तरफदार, व माहादाजी राम देसकु. पा सिरवल.

सिरवळच्या जमिनीच्या दोन तर्फा; पैकी नागोजीची तरफ मोठी व आपली लहान जाली. गोतानें बराबर दो तरफा करण्याचा निकाल दिला त्यास आपण राजी आहों.

खं १५ ले. ८९ }
सु. १०५१ }

(६०३)
कर्ज-कतबा

{ श. १५७२
{ इ. १६५०

भिमाजी कदम मौ. निंब — एसाजी कोकाट मौ. निंब

तुम्हापासून ८ मण गहू घेतले ते १६ मण घालू. मुदत शिमगा.

खं. १७ ले.९ }
सु. १०५१ व श. }

(६०४)
श्री

{ श. १५७२
{ इ. १६५०

अजर. **शिवाजी राजे**———कारकुनानि... ता गुंजनमावल...

बापूजी हैबतराव व हाबाजी हैबतराव व बाळाजी नाईक सिलिंबकर देशमुख ता मा हे **गलबल्यामध्ये आपले जमेतीनसी साहेबाचे मसलतेस येऊन एकतारी केली.** त्यावरून देशमुखावर मेहेरबान होऊन आजरा मऱ्हामती **इनाम** मौजे चिचले बुा देहे १ एक दिले ....

पिसु. शिवा. }
पृ. ५ टीप १ }　(६०५)　उल्लेख　{ श. १५७२ { इ. १६५०

गोवेकर गव्हर्नरच्या एका पत्रावरून कळतें कीं सन १६५० मध्यें **अफजलखानास** 'वरच्या' चोलची जहागीर होती.

खं. २० ले. १३ {
सु. १०५१ रखर ६ {　(६०६)　खुर्दखत फा. मु. सी.　} श. १५७३ चैत्र शु. ७ } इ. १६५१ मार्च १८

माहा० रा० **शहाजी राजे** ——— कार० व. देस० पर० सुपे.

लक्ष्मीधरभट बिन जाऊभट यास सुपे येथील इनाम. व रोजमुरा बरहु० फर्मान व खुर्दखते वजीर चालू आहे. तरी या साली अमानत केलेला इनाम चालू ठेवणें.

सा. ले. १५६ }
सु. १०५१ जवल ७ }　(६०७)　{ श. १५७३ वैशाख शु. ८ { इ. १६५१ एप्रिल १८

माहा. रा. **शहाजीराजे** —— कार० व देसमु० व देसपा. पर० सुपे.

गणो तिमाजी जनूबदार (मोरगाऊ) यानें काशीस जाते समयीं माहादाजी गोसावी यास आपले इनाम दिले. **ह्याली पर० मज० साहेबास मुकासा मिळाला आहे**. तरी तें इनाम चालविणें.

खं. १८ ले. १० {
श. सु. १०५१ {　(६०८)　महजर　} श. १५७३ वैशाख व. १ } इ. १६५१ एप्रील २६

गोविंद राम देशकुळकर्णी पर० पुणे

कृष्णाजी बिन सताजी पाटील मो० मौजे मुंढवे.

तुमचा भाऊ बाल बिन दाद पाटील हा मुंढवे येथील मोकदमी करीत असतां कहत **दुकोळ** पडल्यामुळें त्यानें निमे मोकदमी आपला बाप रामाजी यास **दिल्ही**.

शि. ब. ले. ३७५ }
सु. १०५२ साबान १७ }　(६०९)　महजर फा. मु.　{ श. १५७३ श्रावण व. ४ { इ. १६५१ जुल २६

संबाजीराजे मोहिते कस. तळबीड——　दिपाजी धारोजीराजे मोहिते

धारोजीराजे मोहिते यानी कसबे तळबीडची देसमुखी व मोकदमी व हक वाटून दिल्हे; व राहिलेले हक मजालिसीनें वाटून दिले तसे खाऊ.

शि. च. प्र. पृ. ९९ ले. २२ }
सु. १०५२ रम २ }　(६१०)　{ श. १५७३ भाद्र. शु. ३ { इ. १६५१ आगष्ट ९

प्रतापराऊ हवाले देसमुखी तपे वालेव —　मोक. मो. नागठाणे.

संबभट यास बदल अभिसेख स्रावणमास १ होन देविले.

सा. ले. ३७) (६११) { श. १५७३ पौष शु. २
सु. १०५२ जिल्हेज ३०) झाडा गैर महसूल { इ. १६५१ डिसें. ४

हा हिशेब सिरवळ परगण्यांतील दोन गांवांचा इा अव्वल साल ता। ३० जिल्हेजचा आहे. त्यांत जकातीची खोती जानोजी पानसन्यास सेकली; आवटी यानें कोंढाण्याच्या हवालदारासमोर तुपाचे माप करून रयतेपासून हक्क म्हणून तूप घेऊन जात होता. तेव्हां रयतेनें गवगवा केला इ. उल्लेख आहे.

त्रै. व. ७ पृ. १०६) (६१२) { श. १५७३
सु. १०५२) महजर { इ. १६५१–५२

साबाजी बिन बाजी कृष्णाजी येशवंतराऊ पासलकर व धर्माजी बिन बालाजी नाईक पासलकर } यामध्यें मोसे खोऱ्याच्या देसमुखीचा तंटा.

साहेबी हाजीर मज्यालसी गोत बैसऊन निवाडा केला; साबाजी येशवंतराऊ याचे घर वडील, नागर निशाण वगैरे मान साबाजीचा. धर्माजीचे घर धाकटे, यास बरकडी बापभाऊ जैसे समजाविले आहेती तैसीच याची समजावीस. वडीलपणाचे मान वगैरेस धर्माजीचा संबंध नाहीं.

सं. ६ पृ. १३५) (६१३) { श. १५७३
सु. १०५२) कौलनामा फा. मु. सी. { इ. १६५१–५२

दिवाण तपे बंदर माहामदाबाद व बंदर तपे संगमेश्वर—
वीटसेटी बिन दादसेटी व हरसेटी बिन गनसेटी सोनार टकसाळी बंदर मजकूर.
बंदर मजकुरी **टकसाळी**ची उमेद धरिता तरी कौल दिला आहे. पण नेमलेले हासील देत जाणे. **लाहाऱ्या** व **खुर्दा** पाडीत जाणे.

त्रै. व. १ अं. २१३ पृ. ३७) (६१४) { श. १५७३
सु. १०५२) खुर्दखत फा. मु. सी. { इ. १६५१–५२

अजर. **जिजाबाई** साहेब—— हुदे. व मोक. मौ. वेहरवडे पर. पुणें.

गणो गबाजी तबीब कस. पुणे यास वेहरवडे येथें जमीन इनाम (प्रज पदमाजी होनप) खुद्दाचे फर्मान वजीर **महाराज** व **सिउबा** (जिल्हेज ७) यांच्या खुर्दखताप्रमाणें चालू आहे. सालमजकुरी इनाम अमानत करण्याबद्दल **चिर. रा. राजे** यांचे पत्र आलें. तरीहि इनाम अमानत न करिता पूर्वीप्रमाणे चालू ठेवणे. चिर. रा. **सिउबाचे** खुर्दखताचा उजूर न करणें.

सं. ३ पृ. १६७ } (६१५) { श. १५७३
मु. १०५२ } 'प्रतिपच्चंद्र.' व 'सामराजमति.' मु. व सी. { इ. १६५१-५२

ई कौलनामा अजर. **सिवाजी** राजे—माल पाटील व बाजी पाटील व अदिकारी तपे बीरवाडी ......दादे कौलनामा ऐसा जे, बीरवाडी खालील देह **चंद्रराऊ** खात होते. तेथील अदिकारपण आपलें आहे. यैस्यास चंदररायामधें व आपणामधें बरेपणा नाहीं म्हणौउनु सदरहू गांवीचें अदिकारपण चंदरराऊ खात असेती, त्यांसी जरी आपण कुसूर करावा तरी ते सबल आपण कमजोर; याकरितां आपण गै करीत गेलो. हाली सदरहू गांव चंदररायें किले कांगोरी खाले दिधले आहेती. हे खबर आपण आइकोन साहेबांचे सेवेसी आलों आहो. तरी आपण मिरासीदार नफर आहो. साहेबीं आपणास हाती धरुनु आपला अदिकारपण आपणास देउनु मिरासीवरी बैसविले पाहिजे. म्हणौउनु मालूम केले. बराये मालुमाती खातिरेस आणौनु साहेब तुम्हांवरी मेहेरबान होउनु सदरहू गांवाचें अदिकारपण तुमची मिरासी तुम्हास दिधली असे. तुम्ही अदिकारपण खाउनु अदिकारपणाची चाकरी करणे. हकलाजिमा व गांवखंडी व किरकोली हक निा बलुते व बाजे हक खाउनु लेंकराचे लेंकरी खाणें व जे वख्तीं मसलतीचें काम पडेल ते वख्ती तुम्ही दाहा लोक बराबरी घेऊनु साहेबापासीं येत जाणे. जोंवरी मसलतीचें काम असेल तोंवरी दाहां लोकांनसी चाकरी करुनु दरोज रोजमुरा दरनफरें हके ८६ प्रमाणे साहेबांपासुनु घेत जाणे. मसलती जालियावरी साहेबाची रजा घेउनु गांवांस जात जाणे. ये बाबे कौल असे.

डॅन्. २ पृ. २८५-२८६ } (६१६) { श. १५६५ पौष
इ. } { इ. १६४३ डिसें.

गोव्याचा गव्हर्नर———— पोर्तु. बादशहा.

आदिलशहा व मलबार किनाऱ्यावरचे राजे यांच्याशीं **पोर्तुगीजांचें** संबंध **शांततेचे** आहेत.

इं. फॅ. ९ } (६१७) { श. १५७३ माघ शु. १४
पृ. ९९ इ. } फोर्ट सेंटजॉर्ज-कंपनी { इ. १६५२ जाने. १४

विजापूर व गोवळकोंडे यांचें युद्ध चालू झालें आहे. हें जर्जर झालेलें राष्ट्र या दोघांनीं वांटून घेऊन आतां आपसांत भांडण चालविलें आहे. गरीब बिचारे हिंदूलोक, या यादवींत या उभयतांचा परस्पर युद्धांत नाश होऊन **आपण पारतंत्र्यांतून केव्हां मोकळे होतों** याची वाट पहात आहेत. बरेच दिवस युद्ध चालून आतां विजापूरचे सैन्यानें नबाब **मिरजुम्लाला** गोवळकोंड्याच्या डोंगरांत कोंडून टाकलें आहे.

इं. फॅ. ९ पृ. १०४ } इ. } (६१८) स्वालीमरीन--कंपनी { श. १५७३ माघ शु. १४ { इ. १६५२ जाने. १४

[इ. १६५१ आक्टो. १६ चे सुमारास] दंडाराजपुरीच्या लोकांनीं, वेढा घालण्यास आलेल्या विजापुरकरांचे सैन्यास प्रतिकार करण्याची तयारी चालविली होती.

इं. फॅ. भा. ९ } पृ. १११ इ. } (६१९) फोर्टसेंट जॉर्ज--कंपनी { श. १५७३ फाल्गुन शु. १३ { इ. १६५२ फेब्रु. १२

गोंवळकोंड्यावर विजापुरकरांनीं अकस्मात हल्ला केला. त्यानंतर गोवळकोंडेकरानें ६ लाख होन खंडणी भरल्यामुळें त्याचा मुलूख मुक्त होऊन तह झाला आहे. **विजापूरचा सुलतान** गेलीं कित्येक वर्षे **आजारी** होता. गेले दोन महिने **तो मेल्याचीच बातमी** होती. आतां त्याची तब्यत सुधारली आहे.

इं. फॅ. भा. ९ } प्रस्ता. पृ.२४--२५ इ. } (६२०) उल्लेख { श. १५७३ { इ. १६५१

या वर्षी कर्नाटकावर मुसलमानी शाह्यांच्या स्वाऱ्या होत राहून शिवाय अंतस्थ यादवी-चेंही बंड मोडलें नव्हतें. **जिंजी** किल्याखालील सर्व प्रांत व **लेगनापट्टणच्या** आसपासचा किनाऱ्यावरील मुलूख विजापूरकरांनीं घेऊन **मलयाला** तेथील सुभेदार नेमिलें होतें. **डच्चांनीं** याचा फायदा घेऊन (१६५१ ऑग.) त्या मुलखांतील व्यापाराच्या सवलती मिळविल्या [हेग् स्ट्रॅन्सक्रिप्ट्स सेरीज १ भा. १७ नं. ५३२; भा. १८ नं. ५३९]. **कर्नाटकचा** दुर्दैवी राजा विजापुरकरांशीं युद्ध करणाऱ्या **म्हैसूरच्या** नायकाच्या आश्रयानें राहिला होता. [सदर भा. १७ नं. ५१८] गोवळकोंड्याच्या सैन्याचा सेनापती **मीरजुम्ला** उत्तरेकडील भागांत आपलें बळ वाढवीत होता.

सं. १५ ले २७२ { सु. १०५३ रम १ { (६२१) फार. मु. व सी. } श. १५७४ श्राव. शु. २ } इ. १६५२ जुलै २७

अजर. नरसो धोंडदेउजी हवालदार रोहिडा--- मोकदम करंजिये.

मोकदमांना वांचविण्यासाठीं गोंदनाक महार यानें जीव धोक्यांत घातला व तो दिवाणाकडून मारला गेला. यासाठीं त्याचा मुलगा अर्जनाक यास तरालाचें वतन करून दिलें.

शि. प्र. पृ. १०१ ले. २६ { सु. १०५३ जिल्काद १ { (६२२) कौलनामा { श. १५७४ आश्विन शु. ३ { इ. १६५२ सप्टें. २५

पाटील, कुलकर्णी, चौगुला व मोकदम मौ. जाखले किले **पन्हाला**

समण बिन लक्ष्मण मोकास का वाळवे

मोकाशी काटे यानी दिलेल्या धर्मादाऊ 'पाहर'चा गला घेऊन आम्हाशी आशी-र्वाद देऊन सुखे राहणे. कोणी आड येईल त्यास **गाइत्रीची** आण असे.

खं. १५ ले. ३०७ }
सु. १०५३ जिल्काद २५ }

(६२३)
महजर

{ श. १५७४ आश्विन व. १२
{ इ. १६५२ आक्टो. १९

दादाजी नरसप्रभू देशकु. व गावकु.
बाबाजी सिवदेऊ सोनटके कारकून निसबत पदाजी } यांमध्यें तंटा.

बाबाजी सिवदेव यानें उत्रोलीच्या देशकुळकर्णाकरितां खोटेपणानें खोपडे याजपासून निमे देशमुखी घेतली. उत्रोलीचें देशकुळकर्ण आपले म्हणून महजरावर खोटाईनें बिकलम घालून गरगसा मांडला. यामुळें नरसप्रभू यानीं **सिवाजीराजे** व हमशाही देशमुख यांजकडे फिर्याद केली. त्यावरून चौकशी करितां बाबाजी खोटा ठरला.

खं. २० ले. ५१ (२) }
सु. १०५३ जिल्हेज ३ }

(६२४)
महजर-उल्लेख

{ श. १५७४ कार्तिक शु. ४
{ इ. १६५२ आक्टो. २६

संभाजी मोहिते सरहवाल. (सुपे) व दादाजी रुक्मांगद मुजुम. याचे वेळचा महजर. बाळाजी पाटील मौ. लाटे व कान्होळी यास करून दिल्हा. बाबदेभट, रामचंद्रभट धर्माधिकारणी, विठल महादेऊ त्रिंबक गोमदेऊ याचे दसखत आहे.

खं. २० ले. ९४ }
सु. १०५३ जिल्हेज २० }

(६२५)
खुर्दखत--उल्लेख

{ श. १५७४ कार्तिक व.७
{ इ. १६५२ नोवें. १२

पेशजी पर. वाईमधील कुल इनामें अमानत केली होती. ती आतां ज्याची त्यास दुमाला करणें.

खं. १५ ले. २७३ }
सु. १०५३ मोहर ३ }

(६२६)
यजितपत्र--नकल

{ श. १५७४ मार्ग. शु. ५
{ इ. १६५२ नोव्हें. २५

श्रीमंत राजश्री **सिवाजी राजे** महाराज साहेबाचे सेवेसी

दा बा यजितपत्र बाबाजी सिवदेव सोनटके गुमास्ते दिमत दादाजी नरसप्रभु देशकुलकर्णी व गावकुळकर्णी ता उत्रोली व ता भोर ता रोहिडखोरे हुजूर केदारजी बीन नरसोजी व खंडोजी बिन धर्माजी खोपडे देसमुख ता उत्रोली याचा महजर गोत वगैरे माहाराजाचे समोर हाजर मजालसींत जाला. कथला तुटून निमे निमे वतन उभयेतानी खावे असे जाले. त्यात मी लबाडी करून आपले बिकलम लिहिले. **मी चाकर, वतनदार नव्हे.** हा गुन्हा मजकडून जाला. या उपरी असी लबाडी केल्यास दिवाणाचा गुन्हेगार व गोताचा खोटा. छ ३ मोहरम हे लेहून दिल्हे सही हस्तक्षर खुद गोही इ.इ.इ.

(याप्रमाणें कागद हुजूर लिहून दिल्हा त्याची नकल पुढें कामा येईल सबब दादोपंत दिमत सरकार याणे दिल्हे सन मार).

खं. १५ ले. २७० }
सु. १०५३ मोहर १९ }
(६२७)
खुर्दखत न.
{ श. १५७४ मार्ग. व. ६
{ इ. १६५२ डिसें. ११

अजर. **सिवाजी राजे** — कार. सरदेश. देशकु. मोक. ता॥ मोसेखोरे.

बो **शामराज नीलकंठ** करंजकर (शामराज नीलकंठ रांजेकर ?) सेकिन हिवरे-नागेश याने हुजूर मालूम केले कीं, मुसेखोऱ्यांतील ६ गांवांचे गांवकुलकर्ण रंगो त्रिमल वाकडा चालवीत होता. यावरी हावाई ब्राह्मणी रांडकी इच्याशीं त्यानें सिंदळकीचा अंमल केला. ते खबर दिवाणांत जालियावरी रंगोबा पळून जावलीस **चंद्ररायाच्या** आश्रयानें राहिला. यावरी देवकरणीनें तेथेंच मयत जाला. तो निपुत्रिक होता त्याचे बुडाले. तेव्हां गांवच्या मोकदमानीं व साबाजी यशवंतराव देशमूख व देशकुलकर्णी यानीं **शामराज नील**कंठ यास गांवकुलकर्ण देऊ केलें. त्यास ५० होन सेरणी घेऊन दिवाणी मान्यता देण्यांत यावी; व महजर करून द्यावा.

इं. फॅ. मा. ९ }
पृ. १४६ इ. }
(६२८)
{ श. १५७४ मार्ग. व. ७
{ इ. १६५२ डिसें. १२

सुरत — गलबताच्या कप्तानाला सूचना

विजापुरकरांचा किनारा गोवा ते चौलपर्यंत आहे. यांमधील बंदरचीं गलबतें धरावीं व सुरतेला पाठवावीं.

सा. ले. ४९ पृ. ७१ }
श. }
(६२९)
उल्लेख
{ श. १५७४ मार्ग. व. १४
{ इ. १६५२ डिसें. १९

गोदपाटील वगैरे पाचपुते मोक. भावाली पर. सिरवळ — आबाजी पाचपुते

तुज ओझरडे येथें जाऊन पाटिलकीचे सहावी तकसीम देऊन आणिलें. यावरी घराचा कुसूर झाला म्हणून गाव टाकोन पळोन गेलास. तरी पूर्वीप्रमाणें लिहून दिधलें.

खं. १५ ले. २७१ }
सु. १०५३ सफर १५ }
(६३०)
महजर किले रोहिडा सी.
{ श. १५७४ पौष व. ३
{ इ. १६५३ जाने. ६

उत्रोलीचे पाटील व सिरले यांच्या तंट्याच्या निकालासाठीं दिव्य करण्यांत आलें. त्यावरून पाटील यांची मोकदमी खरी ठरली.

स. ११२ }
श. }
(६३१)
'प्रतिपच्चंद्र' मु.
{ श. १५७४ फाल्गुन शु. १
{ इ. १६५३ फेब्रु. १८

वेदमूर्ती गोपाळभट बिन श्रीधरभट, वास्तव्य श्रीमहाबळेश्वर

विद्यार्थी **शिवाजी राजे** दंडवत. [प्रधानाची मु.] विनंति उपरी स्वामी भले थोर अनुष्ठाते सूर्य — उपासनी पद्महस्ती; ऐसे जाणोन आपण मातुश्री **जिजा**-

आई आउसाहेब वेदमूर्ती **प्रभाकरभट** उपाध्ये यांच्या विद्यमानें स्वामीपासून मंत्र उपदेश संपादिला. स्वामी आपले गुरु. स्वामीस आपण आपले अभ्योदयार्थ सूर्यप्रीत्यर्थ अनुष्ठान सांगितलें. प्रतिवर्षी वर्षासन द्यावयाची मोईन केली असे. बितपशील वर्षासन पैकीं गल्ला नवशेरी. सूर्यप्रीत्यर्थ अनुष्ठान प्रतीवर्षी करावें त्यास नक्त होन १००

याप्रमाणें होन पाछाई एकशें व गल्ला नवशेरी बारुळे मापे खंडी आठ वजन टकबंदी सवा आठरा मण व आरक्त वस्त्रें दोनी व पीतांबर एक शाल एक व आसन एक याप्रमाणें वर्षासन व पूजा सामुग्री मोईन दानपत्रें करून दिल्ही असे. स्वामींनीं **आमचे अभ्योदयार्थ सूर्यप्रीत्यर्थ** प्रतिवर्षी **अनुष्ठान** उत्तरोत्तर करावे व मंत्रउपदेशही स्वामींचे वंशपरंपरेने आमचे वंशपरंपरेस करावा. आपण संकल्पपूर्वक प्रतिवर्षी वर्षासन दानपत्र करून स्वामीस दिल्हें. हें आपले वंशपरंपरेने उत्तरोत्तर चालवावयास अन्यथा करूं तरी श्री **महादेव साक्ष.** स्वामीनी निरंतर देवापाशी आमचे कल्याण इच्छावें. लेखनालंकार मोर्तब.

खं. २० ले. ९२ } (६३२) { श. १५७४ फाल्गुन शु. ४
सु. १०५३ रखर २ } खुर्दखत फा. मु मज. सी. { इ. १६५३ फेब्रु. २१

अजर. **अफजलखान** महमदशाही ——कार. व देशमु. पर. वांई

नरसिंह रंगभट चित्राव (वाई) यास **रणदुलाखानानें** होन १० दिले आहेत. ते शहाजादा अलमियाच्या कारकीर्दीत चालत होते. तरी चालवीत जाणें.

खं. २१ ले. ५७ } (६३३) { श. १५७५ चैत्र शु. ३
सु. १०५३ जवल १ } खुर्दखत फा. मु. मज. सी. { इ. १६५३ मार्च २१

?—— कारकून पर. कऱ्हाड

हाली साहेब्रास मोकासा अर्जानी जाला. अंतभट सो कऱ्हाड यास कोणेगाव येथें ·॥· चावर जमीन इनाम चालविणें.

खं. २० ले. ९३ } (६३४) { श. १५७५ चैत्र शु. ४
सु. १०५३ जवल २ } खुर्दखत फा. मु. मज. सी. { इ. १६५३ मार्च २२

अजर. **अफजलखान** महमदशाही—— कारकू. व देसमु. पर. वाई.

नरसिंह रंगनाथ चित्राव यास त्यांच्या बापापासून मौजे पसरणी येथे नीम चावर जमीन चालते ती चालविणें.

खं. २० ले. ९४ } (६३५) { श. १५७५ चैत्र शु. ४
सु. १०५३ जवल २ } खुर्दखत उल्लेख { इ. १६५३ मार्च २२

गोपिनाथ रामेश्वर तबीब याची मौ. बोरखळ व किन्ही येथील १॥ चावर जमीन चालविणें.

शि. प्र. ९७ टीप } (६३६) { श. १५७५ चैत्र शु. ९
श. } मिसेली { इ. १६५३ मार्च २७

दिवाण तपे वालवे—— मोक. देहाय तपे मज.

संबैभट यास बदल अभिषेख सिद्धेश्वर मौ. शिरगांव, होन ६॥= आदा करणें.

स. पृ. २१ हि.१०६३ } (६३७) { श. १५७५ वैशाख शु. ४
सु. १०५३ जखर ३ } { इ, १६५३ एप्रिल २१

बादशाह विजापूर—-- मामलेदार व देशमूख पर. सुपे.

मोरया गोसावी (चिंचवड) यांस निजामशा, मलिकंबर, व **शाहाजी** राजे याचे पत्रावरून इनाम चालू आहे. कागद हरवले आहेत. तरी त्यांचा इनाम चालू ठेवणें.

इ. वृ. १८३५ } (६३८) { श. १५७५ वैशाख शु. ११
पृ. २१० श. } शिलालेख { इ. १६५३ एप्रील २८

(देवरूख येथील रामाच्या देवळांतील मारुतीच्या देवळावर.)

कृष्ण साने यानें गोपिनाथाचें लिंग, त्रिपूर वृंदावन, प्राकार, दगडी रस्ता, तळें, पार, बांधले खर्च १०० होन. लेख कोरला १५८१ मध्यें. बांधणी १५७५ मध्यें.

गो. इ. सा. ले. २ } (६३९) { श. १५७५–७६ ज्येष्ठ शु. १३
सु. १०५४ रजब ११ } फर्मान उल्लेख { इ. १६५३ मे २९ (–५४मे१८)

महमद आदिलशाहा (विजापूर)— मामले गोवा.

मलिक रेहान यानें जोशास आगराचा वसूल इनाम दिला आहे तो चालविणें.

सा. ले. ८७ } (६४०) { श. १५७५–७६ ज्येष्ठ व. २
सु. १०५४ रजब १६ } समाधानपत्र { इ. १६५३ जून ३(–५४ मे २३)

माहाराज **रा. शाहाजी राजे**

रा. रा. निलोपंत तथा शंकराजी पंडित व विसाजीपंत तथा त्रिंबक पंडित.

निळकंळरायास देवाज्ञा जाहली म्हणौनु **चिरंजीवे** [शिवाजी] लिहिलें. तरी बहुत अनुचित जाहले श्रीच्या करणीस कांहीं चालत नाहीं. तुम्ही विवेकी आहा. आपले समाधान असो देणें. चिरंजीवे तुमच्या सरंजामीचे बाबे लिहिले. तरी तुमच्या कंठाली व लुगडी पाठविली आहेत ते घेणें. राजश्री राऊ गोसावी जैसे काही चालत होते तेच रीतीनें तुम्ही वर्तणे. तेणेकरून तुमचे ऊर्जित आहे. कोण्हे विशई चिंता न करणे. राजश्री भटगोसावी व रघुनाथ बहुता रीती तुमचे विशई सांगितले. तरी तुम्ही सूज्ञें, कोण्हेविशई तुम्हापासून अंतर पडणार नाहीं. आपले समाधान असो दीजे.

सा. ले. १३९ } (६४१) { श. १५७५ आषा. व. १४
सु. १०५४ साबान २७ } कौलनामा प्रतिचंद्र सु. व सी. { इ. १६५३ जुलै १३

अजर. रा. **सिवाजी** राजे—गुरव पुजारा श्री मार्तंड भैरव जेजुरी

गुरवातील मिरासीचा गरगसा होता. त्याचा निवाडा मातुश्री (**जिजाबाई**) साहेबी करून सलासा कारणे कौल दिधला आहे. तेणेप्रमाणें साहेबाचाहि कौलु असे. पा हुजूर रा येसाजी सर खवास. (मर्या.)

स. पृ. ११३ } (६४२) { श. १५७५ श्राव. शु. ३
सु. १०५४ रम १ } वर्षासन नक्कल { इ. १६५३ जुलै १७

सिवाजी राजे बिन शाहाजी भोसले—सिद्धेश्वरभट ब्रह्मे उपाध्ये (चाकण).

स्वामीच्या अनुष्ठानबळें राज्यास अधिकारी जालों व सकळ मनोरथ चिंतिलें पावलो. अनुभव आला. स्वामीस वर्षासन होन पादशाही १०० केले असेत.

खं. १५ ले. ४३८ } (६४३) { श. १५७५ श्राव. व. ३
सु. १०५४ रम१६ } प्रतिप. व सामरा. { इ. १६५३ आग. १

अजर० **सिवाजी राजे**—कारकून व देसमुख पा चाकण.

मुरारीभट याच्या नावे चाकण व इंदोरी येथें इनाम चालू होते. साल गुा चालत आले आहे. हाली साल मजकुराकारणें माहाली कारकून ताजे खुर्दखताचा उजूर करतात असे कळले. तरी क्रुस्णभट बिन मुरारीभट ब्रह्मे यास इनाम चालविणें.

गो. इ. सा. ले. २ } (६४४) { श. १५७५ श्रावण व. १४
सु. १०५४ रम २७ } मिसेली फा. मज. { इ. १६५३ आगष्ट १२

दिवाण मामले गोवा—हुदे व गावकर मौ० केरी तपे अंतरूज

११ रजबचे फर्मानाप्रमाणें नारायण कृष्ण जोसी मौ० केरी यांस इनाम.

(ले. ६३९ पहा.)

खं. १५ ले. ४३९ } (६४५) { श. १५७५ आश्वि शु. २
सु. १०५४ सवाल ३० } तालीक { इ. १६५३ सप्टें. १३

अजर० **सिवाजी** राजे—कारकून पा चाकण...बाबदेभट ब्रह्मे व त्रिंबकभट राजगुर का मा यास **आचार्यांच्या** वृत्तीचें भांडण होतें...हरदोजण हुजूर आले. त्रिंबकभट राजगुर एथे दिव्य केले तो खोटा जाला. त्याचा भाऊ भोजभट राजगुर एथे होता. तो एथून पळाला आहे. तरी भोजभटास दस्त करून हुजूर पाठवणे व त्रिंबकभटाची व भोजभटाची माणसे का मजकुरी आहेती त्यास मोकळ देणे. त्यांचे कुल वस्तभाव जे जे असेली ते कैद करून जाबिता हुजूर पाठविणे. या कामाबद्दल राणु कमा माहालदार पाठविला असे यास मसाला टके ७॥ साडेसात रास आदा करणें.

खं. २० ले. २७० } (६४६) { श. १५७५ कार्तिक शु. २
मु. १०५४ जिल्हेज १ } कर्ज–कतबा { इ. १६५३ आक्टो. १३

अजर. सेख अली सेख अबदुल मौ. आगसी तपे अठागर मामले **पाछाबाद ऊर्फ चेऊल**

वाल्जी हरिदास खोत मौ. तहूक मामले चेऊल आम्ही तुम्हा पासोन कर्ज घेतले ते मुदतीत देऊ. भायनाक भंडारी तुम्हास दिधला असे.

इ. सं. ज्ञ. गोष्टी ११ भा. २ } (६४७) { श. १५७५ कार्तिक व. ७
सु. १०५४ जिल्हेज १५ } { इ. १६५३ आक्टो. २७

विसाजी, सोन व एकोजी प्रभू देशकु. तर्फ मुठे खोरे

महा. रा. **शामराज** पंडित **पेशवे**.

स्वामीस तर्फ मजकूरचे सात गाव कुळकर्ण दिले. त्याबदल वाघोजी खोपडे या बरोबर २५० होन दिले ते पावले.

एपि. कर्ना. १० } (६४८) { श. १५७५ कार्तिक व. ११
पृ. १३२ ले. १५४ संव. } शिलालेख (मुळबागळ) { इ. १६५३ नोव्हें ५

विजय संवत्सरी श्रीमत् रा. रा. **संभाजी राजे महाराज** यांचा कुमार कन्हरायाजी पंडित यांनीं दान केले.

सा. ले. ४० } (६४९) { श. १५७५ कार्तिक व. ३०
सु. १०५४ जिल्हेज २९ } फा. मु. { इ. १६५३ नोवें. १०

माहाराज राजेश्री **शाहाजी राजे** – कार. व देसमु. पर. पुणे.

चऱ्होली येथील बाजार बहुत दिवस मोडला. तेव्हा रामसेटी सेटिया यास पेठ मामूर करण्यास सांगितले. त्याने पुणे येथून विनायकभट ठकार यास बिडवैपण देतो म्हणून आणिले. तेव्हां विनायकभट रामसेटियास म्हणो लागला जे 'तुवा आपणा बिडवैपण देतोस तरी तू काही **मुकासी** नव्हेस. जैसे बोलतोस तैसेच **माहाराज साहेबाचे** (=शहाजीचे) खुर्दखत करून देणे व महाली महजर करून देणे.' त्यावर हे खुर्दखत दिले. दरम्यान रेणकोजी देवकर यास बिडवैपण दिले होते तरी आतां विनायकभट ठकार याजकडून बिडवैपण घेत जाणे.

सा. ले. ४२ } (६५०) { श. १५७५ कार्तिक व ३०
सु. १०५४ जिल्हेज २९ } कौलनामा फा. मु. { इ. १६५३ नोवें. १०

अजर. माहा. रा. **शाहाजी राजे** – विनायक भट ठकार

मौजे चऱ्होली येथील नव्या पेठेचे बिडवैपण तुम्हास दिले आहे.

सा. ले. ३८ } (६५१) { श. १५७५ मार्ग. शु. ८
श. } { इ. १६५३ नोवें. १८

कोंडाजी व विठल लुखदेऊ देसकु. पर. सिरवल — माहादाजी राम देसकु. पर. मज.

आपण भांडत होतो. तुमचे आमचे कर्ज कतबे सोमाजीचे गुजारतीने होते. रामाजीपंती मरते समयी तुमचे आमचे लिगाड तोडिले. कागद ज्याचे त्यास दिले व गोडी केली. उभयतानी आपले सत्य स्मरून चालावे.

खं. १५ ले. ९० } (६५२) { श. १५७५ मार्ग. शु. १३
सु. १०५४ मोहर १२ } मिसेली फा. मु. मज. सी. { इ. १६५३ नोवें. २२

दिवाण किले चंदन---- मोक. गावगना पर. कुडाल

जोगींद्र गोसावी मौ. निंब यास भंडाऱ्याबद्दल गावगना जे चालले असेल ते देवविणें.

खं. १५ ले. ९१ } (६५३) { श. १५७५ मार्ग. शु. १४
सु. १०५४ मोहर १२ } मिसेली फा. मु. मज. सी. { इ. १६५३ नोवें. २३

अज. दिवाण किले चंदन---- मोक. व रया. गावगना पर. कुडाळ

जोगींद्र चेला कमलनयन यास गावगना भंडाऱ्याबद्दल चालत असेल ते चालविणें.

खं. २० ले.९४ } (६५४) { श. १५७५ पौष शु.८
सु. १०५४ सफर ६ } मिसेली फा. मु. मज. सी. { इ. १६५३ डिसें. १७

दिवाण पर. वाई------मोक. बोरखल, किण्हई.

गोपिनाथ रामेश्वर तबीब सो वाई यास १॥ चावर जमीन इनाम चालविणें.

स. पृ. १०७ ले. १० } (६५५) { श. १५७५ माघ व. २
सु. १०५४ रवल १४ } उल्लेख { इ. १६५४ जाने. २४

खुर्दखत बमोहर थोरले महाराज **शहाजी राजे भोसले** बनाम विठल महादेव. (सुपे बारामती)

सा. ले. १२९ } (६५६) { श. १५७५ माघ व. ९
सु. १०५४ रवल २२ } { इ. १६५४ फेब्रु. १

सिदी अंबर बगदाद हवाल० व कार० पा पुणें—हुदे० व मोक० पा पुणें

विनाजी नागोजी तबीब याचा पुणें येथील इनाम साल गुाप्रों चालविणें.

सा. ले १०५ } (६५७) { श. १५७५ ?
पृ. १४१ } उल्लेख { इ. १६५३

श्रीमंत **सिवाजी महाराज** शिवापुरास येऊन बाग आमराई लावावयाकरितां धरणाचे काम लाविलें.

हि. रे. क. ८ } (६५८) { श. १५७५ माघ फा.
पृ. १३२ } { इ. १६५४ जाने. फेब्रु.

महमद आदिलशहा—— पोर्तुगीज गव्हर्नर

" पाद्रि आंतोन्यो बोतेल्यो व (फोंड्याचा सुभेदार) **मलिक याकूत** यांनीं तुमची हकीकत कळविली. शिवापा नायकास महालदार याजबरोबर आम्हीं हुकूम पाठविला आहे. त्यावरून तो होनावरचा वेढा उठवील. तुम्ही पाद्री गोसालो यास इकडे पाठवावें. तो येण्यापूर्वी शिवापानें वेढा न उठविला तर त्याला शिक्षा करूं.

शि. प्र. १०२ } (६५९) { श.
? } { इ.

बापूजी—— मोक. व विठलपंत कुळ. मौ. पुणदी
संभट याचा इनाम त्याचे दुंबाला करणे.

खं. २० ले. ९६ } (६६०) { श. १५७५
सु. १०५४ } खुर्दखत उल्लेख { इ. १६५३-५४

नरसीह रंगभट चित्राव याची मौ. पसरणी येथील जमीन इनाम चालविणें.

शि. प्र. पृ. १०२ ले. २७ } (६६१) { श. १५७५
सु. १०५४ } फा. मु. सी. { इ. १६५३-५४

?—— हुदे. व मोक. मौ. भालवाडी
आमचे ठाणे बाबेपैकी वेद. संभट वालवेकर यास होन ।॥। देविले.

श्रै. २·३-३८ } (६६२) { श. १५७५
सु. १०५४ } खुर्दखत प्रति. व साम. सी. { इ. १६५३-५४

अजर. **सिवाजी राजे——** कार. मोक. मौ. वेहरवडे पा। पुणे.

(गणो) गबाजी तबीब सो पुणे यासी इनाम. बा। फर्मान बसिके खास व भोगवटे कारकीर्दी दर कारकीर्दी व खुर्दखत **माहाराज** साहेब प्रमाणे ता। सालगुदस्ता चालत आलें आहे. हाली सालमजकुरा कारणे मौजे मजकुरीचे हुदेदार ताजे खुर्द. मागतात. तरी चालविणें.

इं. फॅ. भा. ९ } (६६३) { श. १५७५-७६
प्रस्ता. पृ. ३३-३४ } उल्लेख { इ. १६५३-५४

कर्नाटकांतील युद्धें पूर्ववत चालू राहिलीं. डच रेकर्ड्सवरून असें दिसतें कीं, **विजापुरी** सेनापतीनें पेनुकोंडा हा महत्त्वाचा किल्ला (इ. १६५३ मार्च) घेऊन जिंजीकडे जात असतां वाटेंत गोवळकोंडेकरांच्या मुलखांतून जाण्याची परवानगी मागितली ती

मीरजुम्लानें दिली नाहींच. उलट विजापूरचे वाढत्या सत्तेला आळा घालण्या-करितां म्हैसूरच्या नायकाला त्यांच्या विरुद्ध वळवून आणखी कर्नाटकच्या राजाशीं बोलणें करण्यास सुरवात केली. मीरजुमल्याच्या वचनांवर विसंबून कर्नाटकचा राजा वेलोरला आला आणि त्यानें विजापूरकरांना हांकून लावण्याच्या उमेदीनें मोठें सैन्य उभारलें. [हेग ट्रॅन्स्क्रिप्ट्स सेरीज १ भाग १९ नं. ५५० (१)] इ. १६५४ नोवें. १७ च्या बटेव्हियाच्या पत्रांत याचा वृत्तांत दिला आहे तो असा : विजापूरचे सेनापतीनें दीर्घकाल वेढा देऊन वेलोर घेतलें आणि राजाशीं तह केला त्यांत चंद्रगिरी आणि इतर कांहीं मुलखाचा वसूल त्याच्याकडे ठेविला. [सदर नं. ५५१] उभय युध्यमान शास्त्रांशीं स्नेहानें रहाण्याचा प्रयत्न डच लोक करीत होते. परंतु कांहीं पासांची भानगड होऊन आणि मीरजुमल्याचें एक गलबत डचांनीं पकडल्यामुळें **मीरजुमला व डच** यांचें वैमनस्य आलें. पण पुढें दिलसफाई झाली [हेग्. ट्रॅ. १–१८–५५०]. विजापूरच्या जिंजीवरील नवीन सुभेदारानें व खुद्द सुलतानानेंहि मलयानें (तेगनापट्टण वगैरे बंदरी मुलखाचा सुभेदार) पूर्वी दिलेले डचांचे सर्व हक्क व अधिकार आतां तो कामावरून दूर झाल्यावरहि चालविले. [सदर नं. ५५१, ५५६–५७]. सेप्टेंबर १६५४ मध्यें कर्नाटकांतील राजकारणांत आणखी विचित्रच पालट झाला. गोवळकोंड्याचा राजा अबदुल कुतुबशहा याला आपला सेवक **मीरजुमला** याच्या वाढत्या सामर्थ्याचा हेवा वाटावयास लागून त्यांच्यांत उघड विरोधाला सुरवात झाली. कर्नाटकांत नव्या जिंकलेल्या मुलखाचें राज्य स्वतंत्रपणें करण्याचा इरादा असल्याचा मीरजुमल्यावर त्याच्या राजाकडून आरोप केला गेल्यामुळें विजापूरचे सुलतानाची त्यानें मदत मागितली. परंतु शेवटीं दख्खनचा सुभेदार **औरंगजेब** संधी करितां टपूनच बसला होता त्याच्या कक्षेंत तो सांपडला. मीरजुमला औरंगजेबाचा नोकर होणार या विचारानें कुतुबशहा घाबरून त्यानें मीरजुमल्याला पुनः आपल्याकडे वळविण्याची खटपट केली. परंतु शेवटीं मीरजुमल्याच्या मुलाच्या हट्टी वर्तनामुळें त्याच्या कुटुंबाला गोवळकोंड्यांत कैद करण्यांत आले (१६५५ अखेर). त्यामुळें तो औरंगजेबाकडे कायमचा गेला आणि त्यायोगानें गोवळकोंड्याच्या राज्याला मोठा धक्का बसला.

(६६४)

शै. व. ६ पृ. ७२ ले. ४ सु. १०५४ श.	श. १५७६ चैत्र व. १० इ. १६५४ एप्रिल २

रा. **त्रिंबकजी राजे भोसले**— गणेश बिन विठ्ठल दिक्षीत सो वणी. तुम्ही आमचे सप्तशृंगीचे परंपरागत तीर्थपुरोहित आहा.

(६६५)

इं. फॅ. ९ सु. २६१ इ.	श. १५७६ चैत्र व. १२ इ. १६५४ एप्रिल ४

ब्राह्मणानें मद्रासकडील वादाचे वेळीं सांगितलेली हकीकत:—

पुलिकतहून लक्ष्मण नायकाला घेऊन विजापूरचें सैन्य या

भार्गानें गेले. त्यावेळीं शेषाद्रीनें प्रतिनिधीची भेट घेऊन पोर्टोनोव्हेच्या खंडाबद्दल बोलणें केलें त्यावर १०० होन (पॅगोडाच) खर्च पडले.

खं. १५ ले. ९२ } (६६६) { श. १५७६ चैत्र व. १२
सु. १०५४ जवल २५ } खुर्दखत फा. मु. सी. { इ. १६५४ एप्रिल ४

अजर. रा. संभाजी राजे—— बजा. कार. बालाघाट किले पनाला

मधुकरगिरी गोसावी याचा मठ व इनाम जमीन मौ. आंबोडे येथें आहे. तीस इनामपटी न घेणे. पा। हुजूर रा। गोविंद महादेऊ मुजुमदार रुजु सुरु सुरु सूद.

हि. रे. क. ८ } (६६७) { श. १५७६ चैत्र व. १३
पृ. १३३–१३४ } { इ. १६५४ एप्रिल ५

पोर्तुगीजांनीं फा. मार्टिन यास बरोबर नजराणा देऊन विजापुरास पाठविलें. पण मार्टिन हा सरकारी वकील म्हणून पाठविला नसून आदिलशहानें बोलावल्यावरून पाहुणा या नात्यानें गेला. त्यानें आदिलशहाशीं बिन सरकारी रीतीनें कांहीं गुप्त गोष्टी बोलाव्या असें त्याला सांगण्यांत आलें होते. मार्टिन यानें यावेळीं १२ हजार अशरफी किमतीचा नजराणा नेला होता.

हि. रे. क. ८ } (६६८) { श. १५७६ चैत्र व. १४
पृ. १३४–७ } { इ. १६५४ एप्रिल ६

पोर्तु. नीं विजापूरकडे मार्टिन यास पाठविलें तेव्हां त्याला सांगितलेल्या कामाची कलमबंदी.

प्रथम इकडील पद्धतीनें नजराणा द्यावा. कानडा प्रांतातले ३ किल्ले उध्वस्त झाले. होनावरच्या वेढ्याला जूनमध्यें २ वर्षें होतील. तेव्हां इक्केरीच्या शिवापा नायकाला विजा.नीं फर्मान पाठविलें हे उपकार झाले. शिवापानें न ऐकल्यास वि.चें मन वळवून युद्धास प्रवृत्त करावें; कारण शिवापानें म्हैसूरकरांची मदत मागितली आहे. बार्सेलोर कंबोली आणि मंगलोर हे आम्हांस परत मिळावे म्हणून बोलणें लावावें. पण त्यासाठीं पैसा कबूल करू नये. कारण आतां आमचा खजिना रिकामा झाला आहे. मार्टिन होनावरास जाऊन आला आहे; तेव्हां तुम्हास सर्व माहिती आहेच. तेव्हां शिवापानें विजा.शी बोलणें लावलें असण्याचा संभव आहे. तरी विजा. मध्यस्ती करीत असल्यास पहावें. विजा. चा स्नेह आम्हांस पाहिजे. त्यानीं आमचे शत्रु डच यांना आपल्या मुलखांतून घालवावें. फोंड्याचे हवालदार शहासाहेब अगर गरिबो(?) याचे पक्षपाती असल्यानें आमच्याशी कुरापती काढतात असा अनुभव आहे. आमच्या मतें फत्तेखान, शहाजी व मलिक याकुत हे तिघे बादशहाशीं निष्ठेनें वागतात व दरबारांत त्यांचें चांगलें वजनहि आहे. त्यांना आम्हीं नजराणे पाठवीत आहों. ते आमची

बाजू धरतील. **मलिक याकुत** हा तर आमचा स्नेहीच आहे. तरी त्याला कांहीं बक्षीस देऊं करावें. **मुस्तफाखान हा पोर्तु.** चा शत्रु होता. त्याचा जावई शहासाहेब याचेहि धोरण तेंच आहे. तरी त्याला एक कपडा नजर करावा. **खवासखानासहि** जरूर पडल्यास नजराणा देऊ.

इ. सं. जु. ऐ. गो. भा. ३ } (६६९) { श. १५७६ वैशाख व. २
हि. १०६४ जखर १५ पृ.१० } फर्मान { इ. १६५४ एप्रील २३

बादशहा **औरंगजेब**—अबदुलहसन

जुनीं देवालयें पाडावयाचीं नाहींत व नवीन बांधूं द्यावयाची नाहींत. ब्राह्मणास किंवा इतर हिंदू रहिवाशास त्रास देऊं नये व त्यांच्या धर्मास हरकत करूं नये. त्यांच्या वृत्तीचा त्यांस शांततेनें उपभोग घेऊं द्यावा.

गो. इ. सा. ले. २७ } (६७०) { श. १५७६ वैशाख व. १२
सु. १०५४ जखर २५ हि.१०६४ } फर्मान { इ. १६५४ मे ३

विजापुरचा **महंमदआदिल**–शाजलाल दीन महमद हवाल. व कार० मामले गोवा भट बिन विठल जोसी, धर्माधिकरणी सोगा कवले मामले अंतरूज यास जी जमीन ब्रह्मपुरी, महुकई वगैरे गावीं आहे ती चालविणें.

खं. २० ले. ९५ } (६७१) { श. १५७६ श्रावण व. १
सु. १०५५ रम १५ } मिसेली फा. मु. मज. सी. { इ. १६५४ जुलै २०

अज० दि० पर० वाई—ता. हुदे. व मोक० मौ. ओझरडे
नारायण गोपीनाथभट चित्राव याचें इनाम चालविणें.

हेरास सं. } (६७२) { श. १५७६ श्रावण
इ. } पोर्तुगीज { इ. १६५४ ऑगष्ट

विजापूरच्या सैन्यानें **श्रीरंगाकडून वेलूर** घेतलें. त्यानंतर श्रीरंग इकेरीकडे गेला.

सा. ले. ८८ } (६७३) { श. १५७६ अ. भाद्र. शु. ७
सु. १०५५ सवाल ६ } { इ. १६५४ आगष्ट ९

४ रा. **सिवाजीराजे**—रा. रा. **नीलकंठराऊ**

दंडवत उपरि तुम्ही राजेश्री **बाबाजी नाइका** बरावरी पत्र पाठविले ते व कित्येक मुखवचने नाईक माइले तिही सविस्तर सांगितले व नाईक बोलिले कीं आम्ही त्यांसी तह केला आहे कीं जैसे काही राऊ गोसावी साहेबासी वर्तत होते तैसेच हेहि

साहेबांसी वर्तेतील व साहेब जैसे राजेश्री राऊगोसावी याचे चालवीत होते तैसेच याचेहि चालवावे. तरी जे काही राजेश्री बाबाजी नाइकी तुम्हासी निश्चय केला तोच आमचा निश्चय असे. जैसे कांहीं राऊगोसावी आम्हासी वर्तत होते तैसेच तुम्हीहि आम्हासी वर्तत जाणें व आम्ही जैसे काही राजेश्री राऊगोसावी याचे चालवीत होतो तैसेच तुमचेहि चालऊन. एविशई आम्हास श्रीची व राजेश्री **महाराज साहेबाच्या** पायाची व **सौभाग्यवती मातुश्री साहेबांच्या** पायांची आण असे; व येविशई श्रीचा दवणा पाठविला असे तो घेणे व जोंपर्यंत तुम्ही आम्हासी इमानें वर्तोल तोंपर्यंत आम्हीहि तुम्हासी इमानें वर्तोन. **तुम्हापासोन इमानात अंतर पडलिया आमचाहि इमान नाहीं.**

खं. २० ले ५१ (१) } (६७४) { श. १५७६ अ. माद्र. शु. १२
श. सु. १०५५ सवाल ११ } महजर–उल्लेख { इ. १६५४ आगष्ट १४

दर अमल संभाजी मोहिते व हवाल० दादाजी रुमांगद मुज्मू० कनकोजी धाकोजी व सुभानजी व महादजी यांस प्रत्येकी निमे मोकदमी मौ. सिरठाणेंची असे.

हि. रे. क. ८ } (६७५) { श. १५७६ अ. माद्र.
पृ. १३७–३८ इ. } { इ. १६५४ आग.

विजापूरचें सैन्य **गोव्यावर चालून** आलें. पोर्तुगीज सैन्य कानडा, वसई-कडे गेलें होते. बार्देशांतील लोकांनीं विजा० ना बोलावलें होतें. वि० चे चार हजार स्वार अबदुल हकीम व मुल्लाखान यांच्या हाताखालीं होते ते चालून आलें. किल्ला दोन दिवस लढला. पण शेवटीं शरण गेला. अदिलशाही सैन्यानें गोव्यावर हल्ला केला त्या दिवशीं (२।८।१६५४ सूर्यग्रहण होतें. डॅनव्हर्स भा. २ पृ. ३०८)

हि. रे. क. ८ } (६७६) { श. १५७६ अ. माद्र.
पृ. १३९ इ. } { इ. १६५४ आग.

पोर्तु०तर्फेचा **मार्टिन** विजा०स पोचला. त्याच्या मध्यस्थीनें दोघांतील युद्ध थांबावें असें ठरलें. मह०आदिलशहानें पत्र पाठवून असें कळविलें कीं "आपल्यांतील स्नेहाची वृद्धी व्हावी असें आमच्या मनांत आहे. आम्ही अबदुल हकीम यास मुसाखानामार्फत हें कळविलें आहे. अबदुल हकीम यानें आम्हांस थापा मारून भलतेंच सांगितलें आहे. **मार्टिन** तुम्हांस येथील वस्तुस्थिती सांगेल.

इं. फॅ. भा. ९ } (६७७) { श. १५७६ माद्र. व. २
पृ. २९० इ. } फोर्ट सेंटजॉर्ज–कंपनी { इ. १६५४ सप्टेंबर १८

विजापूरकर आणि **गोवळकोंडेकर** यांनीं दोन्ही बाजूंनीं हल्ला करून **गेलीं** दहा

वर्षे सतत या देशाला कष्टप्रद अवस्था आणून ठेविली आहे. आतां स्थिरस्थावर होण्याची कांहीं आशा वाटूं लागली होती. तोंच मीरजुम्ल्यानें बंड उभारल्यामुळें तो आणि त्याचा स्वामी गोवळकोंडेकर यांच्यांत बेबनाव होण्याची आपत्ति येऊन कोसळली आहे. आपण जिंकलेला मुलूख आपल्याच ताब्यांत ठेवावा अशी मीरजुम्ल्याला महत्त्वाकांक्षा उत्पन्न झाली असावी असा तर्क आहे. तसें झालें तर तो आपल्या सुलतानाएवढाच राजा होऊन त्याच्या राज्याचा वसूलहि जवळजवळ तितकाच होईल.

एपि. कर्ना. १० पृ. ६८ ले. १९३ जय संव. दक्षिणी } (६७८) मल्लसमुद्र शिला. { श. १५७६ आश्विन व. ५ इ. १६५४ आक्टो. २०

श्रीमत् राजाधिराज रा. रा. संबोजीराज महाराज यांच्या प्रतिनिधीनें ४९ कण्डुग भात जमीन तलाव बांधण्यास दिली. मौ. मुदुवाडी ता. कोलार.

हि. रे. क.८ पृ. १४० इ. } (६७९) { श. १५७६ आश्विन इ. १६५४ आक्टो.

विजा. नीं पोर्तु. कडे मार्टिन व मलिक याकूत यांस पाठविलें; व पुष्कळ दिवस चालत आलेला दोन्ही राज्यांतील स्नेह कांहीं मूर्ख लोकांच्या गैरसमजानें नाहींसा होऊं नये अशी कळकळीची इच्छा प्रकट केली.

सा. ले. ४३ सु. १०५५ मोहर ११ } (६८०) कौल फा. सी. { श. १५७६ कार्तिक शु. १२ इ. १६५४ नोव्हें. ११

?——— मल्हारजी येसवंतराऊ देसमुख व माहादो राम देसकु. व सेटिये व महाजन व बकाल व मोकदम व रयेत व बाजे खुम पर. सिरवल.

शिवाजी खडेराऊ मजमूदार आणिला म्हणौन दिलगीर न होणे. त्याचे बाबे हुजूर लिहिले आहे. तुमचे धनी आम्ही असे. कोणे बाबे शक अंदेशा न करितां बहादुरखानाचे रजा असोन उसुलास व कीर्दी मामुरीस तकसीर न करणे.

इं. फॅ. भा. ९ पृ. २९८ इ. } (६८१) सुरत–कंपनीचे चालक. { श. १५७६ कार्तिक व. १० इ. १६५४ नोव्हें. २३

पोर्तुगीज आणि दख्खनचा सुलतान (विजापूरकर) यांचें युद्ध चालू आहे. [विजापूरकरांनीं गोव्याला वेढा घातला जुलै–आगष्ट १६५४] यामुळें पोर्तुगीजांच्या मुलखांत जाणें येणें अशक्य झालें आहे.

हि. रे. क. ८ पृ. १४१ इ. } (६८२) { श. १५७६ मार्ग. इ. १६५४ डिसें.

विजा० महंमद आदिलशहानें पोर्तुगीज गव्हर्नर यास पाठविलेलें पत्र: “मलिक

याकूत यानें गव्ह०च्या स्नेहभावाविषयीं लिहिलें आहे. तर मित्रत्वाचा तह घडवून आणावा. रुमा (Rumaas) पाठविले आहेत ते घ्यावे. इतर हकीकत मार्टिन सांगेल."

रु. ३ ले. ५ पृ. २४ सु. १०५५ रवल १७	(६८३) खुर्दखत फा. व सी.	श. १५७६ पौष व. ५ इ. १६५५ जाने. १६

अजर. माहा. रा. शाहाजी राजे———बजा० कार० पर० पुणें

मोरोबा गोसावी सो चिंचवड याचेविशी रघुनाथ भट खेडकर यांनीं सांगितले कीं, "गोसावी याचे इनाम फर्मान, वजीर व महाराज यांची खुर्दखते याप्रमाणे चालत असता, त्यावर कनकगीरपटी नवी बाब जाले ते घालून पैकियाची तहसलि लाविली आहे. व आणखी नव्या पव्या जाल्या आहेत त्याही घेऊ म्हणताती. तरी ये बाबे तसवीस न लागे व केली उचापती फिराऊन देती ऐसा हुकूम केला पाहिजे." तरी त्याचे इसमाचे वाटेस एक जरा न जाणे. परवा. अजम जैनाखान पीर जादे.

हि. रे. क. ८ पृ. १४२ इ.	(६८४)	श. १५७६ माघ व. १४ इ. १६५५ फेब्रु. २५

पोर्तु. व विजा. यांच्यांत सलोख्याचा तह झाला. त्याचें वर्णनः हा समारंभ गोव्यास गव्ह. च्या वाड्यांत झाला. मलिक याकुत व मार्टिन हे विजा. तर्फे व गोव्याचा कप्तान व सभ्य लोक आणि कृष्ण शेणवी व राय शेणवी कोठारी पोर्तु. तर्फे होते. शपथविधी झाल्यावर गव्ह. म्हणाला अराजनिष्ठ दरबाऱ्यांच्या सांगण्यावरून विजा. नीं पोर्तु. शीं युद्ध पुकारलें होतें; पण हा अन्याय लक्ष्यांत घेतांच आदि. नें युद्ध थांबविलें; आणि सलोखा करण्यासाठीं वकील पाठविले. तें पत्र असें (पत्र वाचण्यांत आले). तेव्हां कौन्सिल ऑफ स्टेटनें पूर्वीचे तह कायम करण्याचें ठरविलें. ते तह एप्रिल ३ (न्यू. स्टा.) १६३३; आणि इ. १५७६; जाने. २१ (न्यू. स्टा.)इ. १५८२ रोजीं करण्यांत आले होते. मलिक याकुत व मार्टिन्स यांनीं पूर्वीचा सलोखा कायम ठेवणाऱ्या नव्या तहावर विजा. तर्फे सही करण्याची तयारी व्यक्त केली. मार्टिन म्हणाला मीं पोर्तु. राजाचा प्रजाजन आहे. पण मला महं. आदि. नें वकील नेमले म्हणून माझ्या व मलिक याकुता-तर्फे मी सही करतों.

सां. इ. ले. २९ सु. १०५५ जवल १	(६८५) कौलनामा	श. १५७६ फाल्गुन शु. २ इ. १६५५ फेब्रु. २८

श्रीमंत लखम सावंत देसाई पर० कुडाळ—सेटिये वो महाजन वो बकाला. तुमची तक्रार समजली. तुमची मोईन व दिवाण बाब आमी आपले निसबत करून घेऊन आमचे निसबतीनें रामजी फर्जंद पितांबरधारी चिटणवीस यास ठेविले असे. तरी सेणवी मजकुराचे वतीनें हरएक कारबार चालवणें.

शि. प्र. पृ. १०२ } (६८६) { श. १५७६ फाल्गुन शु. ७
ले. २८ ? } खुर्दखत फा. मु. मज. { इ. १६५५ मार्च ४

अज० ?—कार. देसमूख तपे वालवे.

शंभुभट यास मौ. सिरगाऊ येथील ।॥- चावर जमीन जिनत कमानीचे खुर्दखताप्रमाणें चालत आहे. हाली तपे मजकूर साहेबास मुकासा अर्जानी जाला आहे. तरी इनाम चालविणें.

सर. ले. ४२ हि. १०६५ } (६८७) { श. १५७६ फाल्गुन व. २
सु. १०५५ जवाल १५ } फर्मान { इ. १६५५ मार्च १४

विजापूरचा बादशहा—

मुजफुराबाद शेख अली हवाल. मुस्तफाबाद सयदनूरउल्ला सर हवाल. केशव राघो महालुंगकर याचे सरदेश. देशमुख इनामें चालविणें.

फरा. सला. पृ. २०८ } (६८८) { श. १५७६ फाल्गुन वद्य ८
सु. १०५५ हि. १०६५ जवल २१ } फर्मान { इ, १६५५ मार्च २०

महमद आदिलशाह—हवालदार मुद्गल कोटाळ, नौली. अफजलखान, महमदशाही यानें उडचपा नायक याच्या राजनिष्ठेविषयीं आश्वास कळविलें; त्यावरून त्याच्यावर बादशाही कृपा केली आहे. त्यास वरील गांव दिले आहेत. तरी त्याच्या आज्ञेंत राहावे. शुजाअत व इजत दस्तगाह अमदये दौलतखाहाब व फाकीश........ रुकनुद्दौलत महाराज फर्जंद शहाजी भोसला आणि इतर लोक जे नायकाविरुद्ध होते त्यानींहि नायकास मदत केली पाहिजे.

सा. ले. ३८८ } (६८९) { श. १५७६
सु. १०५५ } खुर्दखत फा. मु. व सी. { इ. १६५४-५५

अजर. मलिक याकुत तपे पेडणें मामले गोवा—— कार. व देसा.

कोंड बिन विठल नायक सरदे. याचे हक्क याचे दुमाला करणे.

शि. च. ले. ३७६ } (६९०) { श. १५७६
सु. १०५५ } खुर्दखत फा. मु. सी. { इ. १६५४

अज दि० ठाणे गावगना ता पाली— हुदे. मोक. कस. तळबीड

छ ८ साबानचे खुर्दखतांत रजा की, धारोजी राजे मोहिते यास इनाम कस. मज. येथे सेत दिल्हे असे तरी दुबाले करणें.

शि. सा. ले. ४४ }
(सा. ले. ४३) }

(६९१)
पत्र-खासगत

{ श. १५७६
{ इ. १६५४

लिबाजी खडेराऊ——— माहादाजीपंत गोसावी

घरी वेथेनें उपद्रव केला आहे. पुरधरी सिवाजी वैद प्रामाणिक आहे. तरी त्याचें समाधान करून येथें पाठविलें पाहिजे.

इ. व. ३८ पृ. १४ }
श. व सं. }

(६९२)
नकल

{ श. १५७७ चैत्र शु. १
{ इ. १६५५ मार्च २८

चांदजी कान्होजी भूपतराय देसमु. पर. कडेवलित, पाडियापेडगाऊ व मोकदम कस. माडो, पेठ कातराबाद.——— गुडाजी बिन नरसींह कुळ० व देसकु० अहमदनगर. देसमुखी वतन आपले. परंतु आपणास भोगवटा किती मुदतींत नाहीं. तलाश करावा तरी नातवान. तुम्हास देसमुखीची तकसीम दोनी हिसे मिरास करून दिधली. एक तकसीम माझी. तुमी देसमुखीचा तलाश करून अमल चालता करणें. पहिला मान तुमचा. मागाहून माझा. खर्चवेच वाटणीप्रमाणें घेऊं. वगैरे.

हि. रे. क. ८ }
पृ. १४३ इ. }

(६९३)

{ श. १५७७ वैशाख
{ इ. १६५५ मे

विजा. च्या महंमद आदिलशहानें पोर्तु. शी केलेल्या तहनाम्यास मान्यता दिली. ही बातमी समजतांच पोर्तु. गव्ह. नें हिऱ्याची एक आंगठी नजराण्या दाखल पाठविली.

खं. २० ले. ९७ }
सु. १०५६ सवाल २५ }

(६९४)
खुर्दखत उल्लेख

{ श. १५७७ श्रावण व. १२
{ इ. १६५५ आगष्ट १८

आमण दामोधर क्षीरसागर याचे येकंबे येथील इनाम, बादशाही फर्मान व मोकाशी याचें खुर्दखताप्रमाणें चालवीत जाणें. (ले. ५५४ पहा)

हि. रे. क. ८ }
पृ. १४३-४ इ. }

(६९५)

{ श. १५७७ श्रावण वा १४
{ इ. १६५५ ऑागष्ट २०

विजापू. च्या महं. आदि. चें पोर्तु. गव्हर्नर ब्रूनब्रास यास पत्र. "तळकोकणांतील अलीकडे हस्तगत केलेले किल्ले व ठाणीं रुस्तुमजमाच्या सेनाधिपत्याखालीं दिले आहेत व ते राखण्याचें काम मलिक याकुत याजकडे सोंपविलें आहे. आतां या दोघांना अंकोला, मंजा, कारवार वगैरे कडील नाईकवाड्यांच्या बंदोबस्तासाठीं पाठविलें आहे. त्यांना तुम्ही सर्व प्रकारें मदत करावी. मलिक हुकूम देईल ते आमचे, असें समजून तुम्ही पाळावे.

स. पृ. २४ ले. १९ हि. १०६५ } (६९६) { श. १५७७ भाद्र. शु. ४
सु. १०५३ जिल्काद ३ } फर्मान न. भाषा. { इ. १६५५ आगष्ट २५

बादशाह **विजापूर**—————मामलेदार व देसमुख पर० पुणे

शेख अबदुला बिन शेख मिया चाकर दरगा शेखसला होदिन साहेब.

वरील गृहस्थास दरग्याचे चाकरीबदल १ चाहूर जमीन **निजामशा** व बादशहा याचीं फर्मानें व वजिराचे खुर्द. रावत व महाराज चिरंजीव **शहाजी** भोसले यांच्या खुर्दखताप्रमाणें चालू आहे. तरी ह्याचा इनाम त्याजकडे चालू ठेवणें.

हि. रे. क. ८ } (६९७) { श. १५७७ भाद्र. शु. ५
पृ. १४३ इ. } { इ. १६५५ आगष्ट २६

ज्या गव्ह. नें विजा. शीं तह केला त्या गव्ह. स सार्जेदास नांवाच्या नव्या गव्ह.नें कैद करून पोर्तुगालकडे पाठविलें. नंतर नव्या व्हाइसरायाकडे **मलिक** याकुतानें वकिली-साठीं गोव्यांत येण्याची परवानगी मागितली. त्याप्रमाणें परवानगी दिल्यावर विजा. च्या बादशहाचें पत्र त्यानें दिलें तें जुन्या गव्ह. च्या नांवें होतें. यामुळें त्याला नवें आणवावें लागलें व नंतर तें देण्यात आलें.

सा. ले. ३५२ } (६९८) { श. १५७७ आश्विन शु. ५
सु. १०५६ जिल्हेज ३ } कर्ज-कतबा { इ. १६५५ सप्टें. २४

बसपा बिन बिसलणा तेली का अथणी---सिवया बिन लिंगया मुचंडी.

आपणापासून आम्ही कर्ज घेतले ते कळांतरे देऊ. दर माहे दर होन येकसी होन ८।। कळंतर देऊ.

हि. रे. क. ८ } (६९९) { श. १५७७ मार्ग. शु. २
पृ. १४४ इ. } { इ. १६५५ दिसें. ५

विजा. तर्फे **मलिक याकुत** गोव्यास गेला. पण त्याचे व गव्ह० (सार्जादस)चें जमलें नाहीं. त्यांच्यांत बोलाचाली होऊन मलिकाला जावें लागलें. त्याला फोंड्याचा हवालदार नेमलें होतें. तेथेंहि त्यानें चुका केल्या. यामुळें त्याला अधिकारभ्रष्ट व्हावें लागलें. ही हकीकत नव्या गव्ह.नें पोर्तु. च्या राजास लिहिली व "मी येथें या वेळीं आलों नसतों तर विजा.च्या मनांत आमच्यापासून खंडणी घेण्याचा विचार होता असें दिसतें. पण आतां **मोंगलाशी** त्यांची बोलाचाली सुरू आहे." वगैरे त्यानें लिहिलें आहे.

त्रै. व. ७ पृ. १११ ले. २ } (७००) { श. १५७७ मार्ग. शु. ८
सु. १०५६ ? सफर ७ } कौलनामा { इ. १६५५ नोवें. २६

अजर० रा० **शिवाजी** राजे--साबाजी येसवंतराऊ **पासलकर** देस. मुसेखोरे.

तुम्ही यावे + + व रामाजी व नागोजी व बाबाजी बिरादर बाजी येशवंतराव हुजूर येऊन अर्ज केला जे पेशजी बाजी येशवंतराऊ + लानी नवलोजी पासलकर यामधे तपे मजकुरी वडीलपणाच्या नावनिशाणाबदल गरगसा होता. निवाडा जाहला नाहीं. तोंच मयेत जाला. देशमुखीचा निवाडा + म्हणून वडीलपणाबदल तुलोजी फर्जंद साबाजी येशवंत + + जी फर्जंद कृष्णाजी मजकूर व आपण चौघे भाऊ धर्माजी बालाजी नवलोजी तो देसमुखी खात होता. त्यास वडील + + नावानिशाणाबदल मांडत. साहेबानें बंदगी रा हु (जूर) उभे राहिलों. यावरि साहेबी हुजूर हजीर मज्यालसी बा + (जी साबाजी दे) समुख (स) गत बसवून धर्माजी बालाजीची व महाली मुनसबी मनास आणली.

सा. ले. १४० } (७०१) { श. १५७७ मार्ग. व. ५
मु. १०५६ सफर १८ } खुर्दखत फा. मु. व सी. { इ. १६५५ डिसें. ७

अजर० माहा० रा० **शाहाजी राजे**———कार० व देसमु० पर० सुपे

थोरल्या **दुकालामधे** रखमाजी व अंताजी उंडा कुलकर्णी मौ. कोल्हाले बुा पर० मज० येही तिमाजी खेडराऊ मु. जेजुरी यास कुलकर्ण जोतिस देखील वृती देऊन २० होन घेतले. यावर तिमाजी वृती चालवीत असतां विसाजी उंडा फर्जंद रखमाजी याने बलात्कारें वृती लिहून घेतली, कागदहि घेतले. तरी मौ० मज० चे कुलकर्ण व जोतीस अमानत करून दोघास गोतात पाठवून देणें. निवाडा होईल तेणेंप्रमाणें दुमाले करणें.

फरामीन सलातीन ११ } (७०२) { श. १५७७ पौष शु. ९
हि. १०६६ रवल ८ } शिक्का इब्राहिम आदिलशहा जगद्गुरु { इ. १६५५ डिसें. २७

विजापूर बादशाहा—— उडच नायक **कनकगिरी**

अफजलखान महमदशाही यास नायब नेमून पाठविलें आहे; तुम्ही काळजी करूं नये; नबाबाच्या शब्दावर विश्वास ठेवून जलद इकडे यावें: म्हणजे तुम्हास विजारत (वजीरी) देण्यांत येईल. पोषाख पाठविला आहे.

इं. फॅ. १० } (७०३) { श. १५७७ माघ व. ७
पृ. ६२–६३ इ. } आग्रा–सुरत { इ. १६५६ फेब्रु. ६

गोवळकोंड्याचा सेनापती **मीरजुमला** यानें **राम**राजाचा विस्तृत मुलूख जिंकल्यानंतर, आतां आपल्या सुलतानाविरुद्ध बंड करून शहाजहानकरितां गोंवळकोंड्याचें राज्य मिळवून देण्याचें त्यानें कबूल केल्यामुळें **गोवळकोंडा** व **विजापूर** या राज्यांवर बादशहा मोठें सैन्य पाठवून त्याला मदत करील अशी वदंता आहे.

सा. ले. १३० } (७०४) { श. १५७७
सु. १०५६ } मिसेली म. मु. व सी. { इ. १६५५

अज दि० प्रा चाकण— ता। मोक. मौ. वेहरवडे

गणो गबाजी तबीब याचा वेहरवडे येथील इनाम चालविणें.

मठ शि. ले. ५ } (७०५) { श. १५७७ ?
? श्रावण ११ } { इ. १६५५

भानजी प्रभू सरदे. प्रा कुडाळ — समस्त ब्राह्मणवृंद, वालावल.

आमचे वडील दादाजी प्रभू यानीं नारायणभट उपाधे याचेकडे पंचायतन देऊन त्यास इनाम करून दिल्हें. हाली कांहीं अडखल दिसून आला. तर मर्यादे प्रमाणें चालविणें.

मठ शि. ६ } (७०६) { श.
{ इ.

भानजी प्रा सरदे०—— भाने व विठे प्रभू समस्त व ग्रामस्त मौ. वालावल

नारायणभट उपाधे यांचेकडे शाळिग्राम देऊन श्रीचे देवालयी श्रावगी करणेसाठीं इनाम दिला. हाली प्रतिवाद पडिला तरी पूर्वींप्रमाणें इनाम चालविणें.

खं. २० ले. २९८ } (७०७) { श.
? } उल्लेख—चंद्रराव { इ.

वडील **रामोजी वाडकर** हा चंदररायासी टोगाईनें राहात होता याबद्दल त्यास **जिवे चंदररायानी चिखलीस मारिला**. याउपरि त्याचा लेक लुमाजी हाही पलसोसी येथें चंदररायाचे स्वारीस सांपडला व मारिला.

रु. ३ ले. २१ } (७०८) { श. १५७७
सु. १०५६ } कौलनामा म. मु. { इ. १६५५

अजर० रा. **सिवाजी** राजे —— हैबतराऊ देशमूख ता। गुंजणमावळ.

तुमचे बाबे हुजूर खबर मालूम जाली जे, कित्येक वडिया लोकांनीं तुमचे **पाठी शक घातला आहे**; की तुमची **देशमुखी आम्ही घेऊ**, तुम्हास वाईट करू, ऐसा शक घातला आहे व दळवी याचें कर्ज आहे त्यास तुम्ही जमान आहा जमानती झाडे लावून आम्हास कष्टी करू, ऐसा शक तुमचे पोटी बैसविला आहे व कितेक तुमचिया घरोबियामध्यें एक प्रकार वर्तणूक जाली आहे असे कितेक लोक बोलतातो. तरी येही गोष्टीच्या निमित्या येऊन कष्टी करितील, ऐसा शक बसविला आहे. या तिही गोष्टीकरितां व कितेक गोष्टी करिता तुम्ही शकजादे आहा. **डावा डौल** होता **तरी तुम्हास साहेब घरच्या लेकरासारिखे जाणिती** आणि तुमचे फार हेहि गोष्टीचे वाईट

करावे ऐसे मनावर कधीं धरणार नाहींत; हे तुम्हास बितिम कळले असावे. कोणेहि गोष्टीचा शक न धरणें. तुमचे हजार गुन्हे माफ आहेती. तुम्हासी आम्ही कांहींहि वाईट वर्तणूक करूं तरी आम्हास **महादेवाची आण** असे व **आईसाहेबांची आण** असे. कोणेहि गोष्टीची चिंता न करणें. अवांतरहि लोक मेळसविले असेल ते भेटविणे. **आमच्या इमानावरी आपली मान ठेउनु आम्हापासी येणे.** कोणे गोष्टी चिंता न करणे. मोर्तब

फरा. सला २१२ } (७०९) { श. १५७८ चैत्र शु.६
सु. १०५६ व हि. १०६६ जखर ४ } { इ. १६५६ मार्च २१

विजापूरचा बादशहा ——→ आमिलान व देसायान हिसार **कनकगिरी**
आम्ही हा किल्ला उडच नायकास पूर्वीप्रमाणें दिला आहे.तरी त्याच्या हुकमतींत वागावें.

श्री. वि. वि. ३४ पृ. २०९ } (७१०) { श. १५७८ श्रावण
? (सौवाल) } **'आम्ही तों रजपूत'** { इ. १६५६ जुलै

खान आलीशान फेरोजी निशान खाने अजम अकरम ममलकत मदार दयाम यकबालहू व इजलालहूा अमारत व अदालत पन्हाह शुजाअत व शहामत दस्तगाह अजमत व शौकत इतिहाद यकबाळ व इजलाल हमराह आलीशान रफिअल कदर खुलद-मकान उमदेह वजराये जमा कुद व उमराय नसरत निशान—

अजी बदिलमाहिद **महाराज शहाजी राजे**——

सलाम बादज सलाम महबत अंजाम महवळमुराम आंकी पा। कनकगीर पेश अजी दरगाह बदगीस पेश केली. त्याचा मुबादला आपल्यास मन्हामत जाला. यावरी पा। अंनागोदीहि पेश केली (पाचा) महिना जाला. हनोज मुबादलियाचा सरजाम जाला नाहीं. जमेयतीचाहि दिलास जाला पाहिजे. कुंदगोलकार मनेवारे आपले जागी व **तामगौड** तर्फेस तसवीस देउनु फसाद केली आहे. त्यास गोशमाल द्यावयाबदल हजरत जाहपन्हा साहेबी आपल्यास रजा दिल्ही. ते तर्फेस मैसूरकराचीहि सरहद्द नजदीक आहे. वगैरे संगीनात मुराई दफे होउनु पातशाही नामोश राहत नाही. आजी बास्ते हजार दीढ हजार जाजती कामाचे लोक ठेविले आहेती वगैरे जागीर लोकाची समजावीस होत नाहीं. तरी दर बंदगीस अर्ज करुनु अनेगोदीच्या मुबादलियाचा सरजाम केला पाहिजे. यास येवज ये तर्फेस कर्यात अकोलोज व तपे टेंभुरणी व भतग्राम अगर पेडणे हे कदीम मुलकात देविले पाहिजे. अगर कदीम मुलकात सदरहू देणे नसेल तरी मामले पादशाहबादखाले सरजाम केला पाहिजे. अगर मामले पादशाहबादे खाले जागा नसेल तरी पा। वडेरूया मामले मजकुराखाले चजाउरकरास दिधले आहे ते तन्ही मुबादलियास दिधले पाहिजे. आपण हरामखोर मजेवार चजाऊरकरास गोशमाल देऊनु सोडउनु घेउनु हराम-खोर मनेवारास दिधल्यात काय फायदा. कुल मनेवाराचे हेजीब **मीरजुमला** बराबरी

गेले आहेती व पा मुसलकल आपली जागीर पेशजी भिस्त रोजी **रुस्तुमजमा** बराबरी **माहोलीहून** हुजूर आलो ते वख्ती चौ लाखाची जागीर दिधली. त्यामध्यें मुसलकलचा फर्मान आपले नावे दिधला यावरी [शिक्यांतील अक्षरें—शहाजी बिन मालोजी राजे] दुसरे वख्ती मरहुमी खाने अजम **असद्खानाचे** गुजारतीनें **लक्ष्मेश्वरचे** वख्ती मोकरर आली. तेही वख्ती व तिसरीयानेंहि मरहुमी खा **अहमद्खान** याचे वख्ती मोकरर फर्मान दिधले. तेही वख्ती मुसलकलचा फर्मान आपलेच नावे आहे. येसे तीन वख्त आपले नावे फर्मान पा माचे आपले नावे आहेती. या फर्मानाच्या नकला पातशाही दफतरी असतील त्या काहाडून पाहिल्या पाहिजेत. आपले भाई व फर्जंद याचे दिलासियाबा क + + + + विले व फर्मान त्याचे नावे करुनु दिधले तरी ते काय मसमुबाली हरकसीने गलथ हुजूर मा + + करणारी करुनु मुसलकलचा मुबादला पंधरा खेडी कर्याती **कारवे** आपली जागीर **त्रिंबकजीस** द्यावयाची काय निसबत धरीते. हजरत साहेबाचा तरी कौल करारदाद आपल्यास आहे की तुमचे जागीरपैकीं एक चावर कसीदगी करणें नाहीं. जरूर येक वख्त पादशाही कामाबा कांहीं कसीदगी केले तरी अवल सवाईन मुबादला देउनु बादज कसीद करावे. आमा अकातुकाचे बोले करुनु आपले जागिरति नाहक गैर हिसाबी पादशाह खलेल करावितातो. तरी **आपण रजपूत लोक** अजी तलग **पेशजीहि दोघा चौ पादशाहीत खिदमत केली**. अमा गैरहिसाबी जाजती सोसुनु कमइजतीन व गैरमेहेरवानीन पेशजीहि खिदमत केली नाही. व पुढेहि न करूं. उमेदीने आपण आजी दीढ वर्ष जाजती सोसिली; ते याच दमा की, थोरले हजरत साहेबाचे नवाजीस व हजरत साहेबीहि जहाबक्षी केली आहे व वख्तहि एकवजाचा समजोनु आपण सबूरी करुनु तहमूल करावयास तकसीर केली नाहीं. पेस्तर हजरत साहेबास आपली दरकार असेल तरी हिसाबी आपला सरजाम सदरहु केला पाहिजे. आणि दरकार नसेल तरी खुषनुदीनें रजा दिधली पाहिजे. आपल्यास असलादपुन्याई मामल्याचीहि हवस काही राहिली नाही. एखादे आपले हिंदूचे तीर्थी बसौनु हक तालाची बदगी करुनु हजरत साहेबास द्वा देउनु फर्जंदभाई आहे. तियापासुनु खिदमत घेतली पाहिजे. अगर त्याहि पासुनु खिदमत घेणे नसेल तरी त्यासहि रजा द्यावी. बाजे भाईबंद. जेथे आपली पोटे भरितातो तेथें हेहि भरितील. अमा नाहक आपल्यास बदनाम केले न पाहिजे. दरीबाब हजरत बदगीस हाली अर्जदास्त पाठविली आहे तरी बडेभाइनेंहि हजरत बदगीस अर्ज करुनु सदरहुप्रमाणे अनागोदीच्या मुबादलियाचा सरजाम व पंधरा खेडियाचा ताजा फर्मान आपल्याच नावे देविला पाहिजे. अगर आपल्यास खुषनुदीन रजा दिधली पाहिजे व पा कनकगीर व अनागोदीहि दरगाह बदगीस पेश केली. येक कपली खेडे दिढा दो हजाराचे तेथे आपण राहिलो होतो. तेव्हडे आपल्यास असो दिधले पाहिजे तेथे बाग आपण केले हवासीर जागा आहे तरी दरगाह बदगीस अर्ज करुनु मोकरर करुनु

देणे म्हणौनु मतुरलदौलत सावतराऊ यास लिहिले होते. सावतराऊ माईलेने अर्ज केला. अमा हजरत साहेबी हुकूम फर्माविला कीं अनेगोदच्या मेहतानास कपली पाहिजे सोडून देणे म्हणौनु राऊ माईलेने लिहिले. यावरी आपल्यास रहावयास जागाहि नव्हती व तामगौडतर्फेहूनहि ताजी खबर आली कीं कुंदगोलकरास आपले लोकानी सिकस्त दिधली होती. अमा तो मागती सवारौनु कोटास येउनु दिलगोव्याची फिकीर करितो मदत न व्हता जागा राहणार नाही. अजीवास्ता हजरतसाहेबीहि पेशजीच रजा दिधली होती म्हणौनु छ४ माहे सौवाली कपली साहेबाचे लोकाचे व कदनवेलीकराचे लोकाचे हवाले करुनु आपण स्वार झालो. येक मजली आलियावरी आनेगोदीकार व हलालखोर हे दूर गलथ मालूम करणाराचे बोले करुनु आले आहेती. तेहि पादशाही लोकावरी हिंसा करुनु कपली त्याजपासुनु घेतली हे खबर आपण कपलीस आलियावरी पाहारा रात्री आपल्यास आली होती. ते पेशजीच लिहिली आहे. पेस्तर सिदी अजम सिदी संबूल आलियावरी अनागोदीस व कपलीस व बाजे विलायतीस दखल होऊ देतील कीं ने दितील हेहि पेस्तर रोशन होईल. सेभरा वर्षाचे मुठमर्द त्यास गोशमाल देउनु दफे केले होते ते जागे पाद-शाही बंदियापासुनु घेउनु मुठमर्द हरामखोरास जेही देविले असतील त्यास याचा जबाब पुसिला पाहिजे. साहेब अजी सबा जमजम स्वार होउनु येतील म्हणौनु सबुरी करुनु दीढ महिना राह साहेबाचे यावयाचे पाहिली अमा साहेबाचे यावयास मातल जाले मग आपण पादशाहाचे रजेवरुनु स्वार होउनु बलदारी नजदीक आलो. पुढेहि मजली दर मजली ताम-गौडतर्फेस जात आहो. तरी आपण (पेशजी) लिहिले आहे त्याप्रमाणे मनेवारास फर्मान व साहेबी आपले कागद पाठविले पाहिजेत. कपलेत मुतलख चारा नव्हता; घोडी जाया जाली व पुढेहि राहिल्यानें होतील तामगौडतर्फेस चारा घास जाला आहे; या दमा ते तर्फेस जाउनु मुराई मनेवारास गोशमाल देउनु दोनी महा–[कागद संपला म्हणून येथून पुढील मजकूर समासांत लिहिलेला आहे व अस्सल पत्रांतील हा समासाचा भाग बराच फाटला आहे.] लांची मजबूद करूनु खडे + + मसलहतेस रहावे अगर ते मसलहतेचे काम फिरऊन आधी करारबादप्रमाणे तयारी फर्मावितील मजबूत आहो + + + पुरा मागे + + भाई + कळून + + लकी येह + + कपिले मसू + + .

खं. २० ले. ९६ } (७११) { श. १५७८ आश्विन ब. ११
सु. १०५७ जिल्हेज २५ } मिसेली फा. सु. मज. व सी. { इ. १६५६ आक्टो. ४

अज दि. पर. वाई— ता. मोक. मौ. पसरणी पर. मज.

नरसीह रंगभट चित्राव यास पसरणी येथील ॥ चावर जमीन इनाम चालविणें.

सा. ले. ४५ } (७१२) { श. १५७८ कार्तिक शु. ११
सु. १०५७ मोहर ९ } { इ. १६५६ आक्टो. १८

अजर. अफजलखान महमदशाही— मल्हारजी देशमू. व महादाजी देसकु. पर. सिरवल.

आमचे **मोकासा** जाहल्या तागाईत आमचे तरफेने जरा तसवीस होत नसता मामूरी होत नाहीं. यावरून अजब मालूम होते. **देसमुखीचा काइदा** की विलायती तमाम जमीन कीर्दी करावे तरी येक तसू ना पडीत करवीजे. दिवाणीचे पैसे दिवाणासी नेदिता नुकसान केलिया खेरती कैसे होईल.

खं. २० ले. ९७
सु. १०५७ मोहर १९ } मिसेली फा. मु. मज. व सी.　　(७१३)　　{ श. १५७८ कार्तिक व. ५
{ इ. १६५६ आक्टो. २८

अज० दि० पर० वांई—　　मोक. मौ. एकंब समत कोरेगाऊ पर. वांई

अमण दामोदरभट क्षीरसागर यांचा एकंबे येथील ½ चावर इनाम जमीन चालू ठेवणें. (ले. ५५४ पहा)

सा. ले. ३५३
सु. १०५७ मोहर २०　　(७१४)　　{ श. १५७८ कार्तिक व. ६
{ इ. १६५६ आक्टो. २९

अबदुल अली. हवाल. का अथणी—　　फौजदार **क्षेत्र कासी**

लिंगायतः-पूर्वीपासून, जंगमाचे देव खेळत असतां जैनाची निंदा करीत होते कारण मजबी तैसे चालिलें असे. ब्रह्मसभेत निवाडा होईल तो मान्य करूं.

जैनः-जंगमाचा देव खेळत असता आमचा देव व गुरु व जैन लोक यास शिव्या देत असे. ते करिता कुसूर. ब्रह्मसभा सांगेल तेप्रमाणे असो.

यैसे कलह आहे. हरदो खुमासी पाठविले आहे. ब्रह्मसभा निर्णय करील तो पाठविणे.

इं. फॅ. १० पृ. ७३
इ.　　(७१५)
आग्रा—सुरतः　　{ श. १५७८ मार्ग. व. १४
{ इ. १६५६ डिसें. ४

शहाजहान बादशहाची कंदाहारवरील स्वारी रद्द होऊन, आतां दख्खनचा **महमद अदिलशहा** सुलतान वारला असल्यामुळें त्या भागावर स्वारी करण्याकरितां, **मीर** जुमल्याच्या बरोबर देण्यासाठीं मोठें सैन्य उभारलें जात आहे.

त्रै. व. ८ पृ. १०३
श. व संव.　　(७१६)　　{ श. १५७८ माघ शु. १३
{ इ. १६५७ जाने. १८

मुधाजी बापूजी अत्रे जोसी कुळकर्णी कोढीत पर. पुणें.

बालाजी हरी मेंडजोगी कुळक. मौ. वडगांऊ नेपरज.

मौ. कोढीत बु. येथील जोतीस व कुळकर्ण आपली मिरासी. ती सोनाजीपंत आपले गोत्रज खात होते. तो गंगथडीस लेकीकडे जाऊन राहिले व सांगून पाठविले तुमची मिरासी तुम्ही खाणें. यावरी विठोबा आमचा पुतन्या चालवीत होता. कस. सासवड रामाजी देसकु. आपले माणूस ठेऊन चालवू लागला. तरी मौ. कोढीतचे जोतीस कुळकर्ण तुम्ही सोडवून खाणें. जोतिस आम्ही खाऊ. हरकती करील त्यासी आपण निवारू.

स. पृ. ११४ ले. ५ } (७१७) { श. १५७८
सु. १०५७ } मुद्रा. { इ. १६५६

अजर **सिवाजी** राजे——कारकून व देसमूख ता। हवेली प्रा। पुणे
बो। काजी इभराइम व काजी शरीफ बिन काजी आबदुल्ला बिन काजी महमद बिन काजी चिमन हकीम शरा प्रांत मा। हुजूर......प्रां। मा। कजा व नेबकजा खतीब आपली मिरासी आपले वडिलांचे नावें बा। फर्मान **निजाम**शहा व खु॥ **मलिक** अंबर व खु॥ वजिरानी कारकीर्दी दरकारकीर्दी चालत आहे. येणेप्रमाणें होते. यावरी खतीबाचे टके तीनशें तीस यांचा भोगवटा मुरारपंताचे कारकीर्दीपासून तुटला आहे......मेहेरबान होऊन खु॥ देविले पाहिजे......यांवर मेहेरबान होऊन यांचा रोजमुरा कजा व नेबकजा व प्यादगी टके तीनशें साडेसात यास जागा जकात को मजकूर देविले असते ... भोगवटा व तसरुफाती मनास आणून ता। सालगु॥ प्रमाणें चालविणें. पा। हु॥ रा। **पंताजी गोपिनाथ चिटणीस**...मोर्तब असे.

खं. १५ ले. ४४० } (७१८) { श. १५७८
सु. १०५७ } खुर्द. 'प्रति. व 'मति' मु. { इ. १६५६

अजर. **सिवाजी** कारकुनानि पा। चाकण कृष्णभट बिन मुरारी...आपणास इनाम व रोजमुरा व तेल दरोज सतका चालत आहे. ऐसियासी ता। मजकूरचा मोहसबा हुजूर होता. सुरनिसींहून निजा याणी बंदी कलम काहाडिले आहे की भट मजकुरास बा। तेल वजन ८८॥ एकूण रुके ८२ प्रमाणें खर्च घातला आहे. पैकी मजुरा८१॥ देऊनु निजा दरोज अडका ८॥ अडकाप्रमाणें बेती(री)ज काहाडिली आहे म्हणउनु माहालीचे कारकून निज्याचे पैके आपणास मागताति व इनामास हि खुर्दखताचा उजूर करिताति तरी **माहराज धर्मपरायण पुण्यउद्धि** आहेती (गहाळ...)

खं. ८ ले. १ } (७१९) { श. १५७८ (अखेर)
? } { इ. १६५७(आरंभ)

दियानतराऊ— रा. रा. **निळोपंत** गोसावी.
मौ. उझार्डे किले वंदन हा गांव चालत असता सांप्रत **नूर**खानास चालू झाला. यावर हुजरून माहालाचे देह माहालास मोकरर केले असे. तरी नुरखानाचे दुंबाले मौ. मज. न करणें. विनाजी कोनेरीपंत सांगतील त्या सा।रिखे केले पाहिजे. त्याचे मदतीस अंतर पडो न देणे. [दियानतराव बंदे अली आदिलशहा, हीं फारसीं अक्षरें शिक्यांत आहेत.]

खं. ८ ले. २ } (७२०) { श.
? } फा. मु. सी. { इ.

दियानतराऊ-- अखं. लक्ष्मी. प्रो. रा. रा. **निळोपंत** गोसावी

मौ. उझार्डे किले वंदन हा गाव पूर्वीपासून किल्लेखाली आहे. सांप्रत चंद्ररायाचे जाऊलीखालील म्हणोन गोसावियाचे (शिवाजीच्या) लोकांनीं कबज केला आहे. तरी मौ मज. चंद्रराये दिले नाहीं व जाउलीखाले नव्हते. तरी तो गांव सोडवून किल्लेखाली चाले ऐसे केले पाहिजे. विनाजी कोनेरीपंत हेजीब यास मदत करणें.

खं. १५ ले. ९३ } (७२१) { श. १५७९ चैत्र व. १
सु. १०५७ जखर १४ } मिसेली फा. मु. सी. { इ. १६५७ मार्च २०

अज. ?———— रा. वेंकाजी नरसीह हुदे. व मोक. मौ. निंब

मौ. मज. लग्न-मुहूर्तास जंगमानें गोविंदगिरी मठ सदानंद यास टाकून एकव्यानें जाऊन पानमान घेऊं नये.

खं. १७ ले. १० } (७२२) { श. १५७९ चैत्र व. २
सु. १०५७ जखर १५ } महजर पुणे देशमुखी तंटा { इ. १६५७ मार्च २१

हाजीर मजालसीः— रा. सिवाजी राजे, सामराज नीळकंठ (पे.) वासुदेव बाळकृष्ण (मुज.), सोनाजी विस्वनाथ (ड.), माहादाजी सामराज (सुर.), माणकोजी दाहातोंडे (स. नौ.), रघुनाथ बल्लाळ (स. सब.), नूरबेग (स. नौ. पाऊलोक) सामराज पद्मनाभी (सब. पाऊ.) देशमु. देशकु. वगैरे.

तंट्याचे स्वरूप (ले. ४३२) प्रमाणेंच असून दादाजी कोंडदेवांचा निवाडा फिरविला आहे.

हबाजी वडिले घरी दिधला आहे म्हणौन वडील, बाजी रुद्राजीचा लेक म्हणौनु वडील. ऐसी दोघास वडिलपणाची निसबती व करकसाहि तीन पिढिया लागला आहे. याबद्दल तह दिधला की, वडिलपणाची तकसीम दोघास बराबरी. वडिलपणाचे गाऊ दोघास बराबरी. बाकी हबाजी, बापूजी, बालाजी यास प्रत्येकी एक तकसीम एणे प्रमाणे निवाडा केला आहे.

सा. ले. ३०० } (७२३) { श. १५७९ चैत्र व. ७
श. जखर २० } फा. मु. व मज. { इ. १६५७ मार्च २६

द्वारका अवरत कृष्ण बिन मुरप्रभू धर्माधिकरणी कस. नासीक

सोन बिन कोंड प्रभु धर्माधिकरणी कस. नासीक.

मी आपली तकसीम रु. १५ स तुम्हास दिधली आहे.

खं. ८ ले. ५ जुलूस ३१ } (७२४) { श. १५७९ वैशाख व. ६
हि. १०६७ रजब १८ } फारशीचें भाषांतर { इ. १६५७ एप्रिल ३

औरंगजेब———— शिवाजी भोसले

तुमची अर्जदास्त इकडील पंज्याचे निशाणाचे फर्मान पोंचल्यानंतर चिठ्ठी पावली. हरएक विषयीं जें सांगणें तें तुम्हांकडील **वकील सोनाजी** यांजपाशीं सांगितले. त्यांणीं तुम्हांसी बोलोन खातरजमा केलीच असेल-**सांप्रत जे किल्ले व मुलूख विजापुरकरांकडील तुमचे हातीं होते ते पेशजीप्रमाणें होऊन तुमचे मनोगताअन्वयें बंदर दाभोळ व त्याजखालील मुलूख तुम्हांस दिल्हा असे.** ऐशियास इकडील दौलतीची किफायत मदत जी करणे असेल तिचा समय हाच आहे, जाणोन करण्यांत आणावें, आणि हुजूर भेटीस यावें. याखेरीज जे मतलब तुमचे मनांत असतील ते घडोन येतील. **हाली तुमचे वकील यास परत जाण्याची जलदी होती**, सबब निरोप दिल्हा आहे. त्यांचे जबानीं इकडील लक्ष दिसोन दिवस तुमचा उत्कर्षाचा करण्याचा वगैरे सर्व ध्यानांत येईल. याकरितां इकडील दौलतीचे लहान मोठ्या कामाकाजाची वर्तूज आपले ऊर्जिताचे कारण समजून करीत जावी व वारंवार इकडील कृपेचें इच्छित असावें. सांप्रत ईश्वरकृपा व आमचे दैवशालित्व व फौजेचें शेरपणा यांनीं इकडील वाईट इच्छिणार नाहींसे झाले. दिवसानुदिवस इकडे जय येत चालला. तो असा कीं, किल्ला **बेदर** हा मोठा मजबूत, आजपावेतो त्यास कोणीच सर केला नव्हता व कोणाचे मनांत कल्पना देखील सर करावयाची येत नव्हती, तो एकंदर दक्षण व कर्नाटक देशचा दरवाजा तो एक दिवसांत हस्तगत जाला. इतरांसी वर्षाचीं वर्षेंही वश जाला नाहीं. ईश्वराचें सर्व कृत्य. इकडील प्रतापशूरांचे शौर्यामुळे तुम्हीं येविषयींचा संतोष मानून, वरचेवर जसे आमचे जय होतील तसे त्या संतोषाचे वर्तमानावर कान ठेवीत जाणें, आणि आमचा लोभ पूर्ण आहे असें मानीत जाणें.

इं. फॅ. १० } (७२५) { श. १५७९ आषाढ शु.१२
पृ. १३५-१३६ इ. } फोर्ट सेंट जार्ज-सुरत { इ. १६५७ जून १३

मीरजुम्ल्यानें गुलबर्गा घेतला एवढी गोष्ट सोडून, त्याच्या दख्खनमधील हालचालींची तुमची माहिती बरोबर आहे. आतां तो कल्याणी या दुर्गम ठिकाणाला वेढा घालून बसला आहे. तेथें उभय पक्षांत भयंकर युद्धें होत असून वेढयाचा निकाल त्वरित होण्याचा संभव नाहीं. आणि त्यामुळें या भागांत (कर्नाटकांत) असलेल्या त्याच्या सैन्याला त्याची मदत होत नाहीं. नुकतेंच इकडील हिंदूंनीं (कर्नाटकचा राजा श्रीरंग याचे लोक) त्याचे (कर्नाटकांतील) सैन्याचा असा कोंडमारा केला कीं त्यांना फार दिवस टिकाव धरता आला नसता; परंतु वृद्ध सेनापती **तोप कृष्णाप्पा** (मीरजुम्ल्याचा कर्नाटकांतील सेनापती. इं. फॅ. १० पृ. १७४-१७५) ह्यानें राजाचें बरेंच मोठें घोडदळ लूट करून

निर्धास्तपणें परत येत असतांना, दबा धरून बसून उधळून लावल्यामुळें तो प्रसंग वांचला. ह्या घोडदळापैकीं शंभरहि मृत्यु पावले नाहींत. परंतु अचानक हल्यामुळें भेदरून जाऊन ते पळून गेले. यामुळें राजा आणि त्याचा सेनापती **शान(म)जी** ह्यांचेजवळ घोडदळ व पायदळ मिळून फक्त १००० लोक राहिले. हे उभयतां दोन दिवस मागें राहून नंतर **जिंजी**च्या सरहद्दीवरील **अरणी** या मजबूत किल्ल्याकडे गेले. तेथें ते **विजापूर**करांच्या मदतीनें सैन्यभरती करीत असून पूर्वीपेक्षां अधिक जमावानिशीं रणक्षेत्रांत पुनः उतरणार आहेत. मध्यंतरीं **तोपकृष्ण**हि आपल्या सैन्याचें बळ वाढवून राजाचें सर्व सैन्य एकत्र होण्याचे आधीं, पूर्वीप्रमाणेंच डाव टाकतां येतो कीं काय हें पहात त्यांच्या पाठीमागून जात आहे. वर सांगितलेला छापा जेथें अचानक घातला गेला. तें ठिकाण येथून ४० मैलांवर आहे.

स. पृ. ११४ ले. ६ }		(७२६)		{ श. १५७९ श्रावण शु. १५
सु. १०५८ जिल्काद १२ }		{ इ. १६५७ आगष्ट १३

अजर. **सिवाजी राजे** ——कारकून व देशमूख तपे खेडेबारें

इनामदार ता। मा हुजूर ... जे आपणास तपे मजकुरी इनाम हिंदू मुसलमान जमीन चावर व रोजमुरे व रोषनाई आहे. यांस **साहेबाचे कारकून माहालास आले** आहेत ते साहेबांचे खुर्दखताचा उजूर करतात. साहेबीं मेहेरबान होऊन खुर्दखत दोविले पाहिजे म्हणून......तपे मजकुरीं इनामदार हिंदू व मुसलमान यांसी ता। मारीं जमीन चावर व रोजमुरे रोषनाई जे असेल ते जैसे कांहीं सालगुा चालिले असेल तेणेप्रो सालमारींहि चालविणे उजूर न करणें. राजश्री बनाजीपंत तुम्ही तालीक लिहून घेऊन. इत्यादि.

इं. फॅ. भा. १० }		(७२७)		{ श. १५७९ श्रावण व॥ १०
पृ. ११८-१९ इ. }		विजापुरकर-मोंगल-तह.		{ इ. १६५७ आगस्ट २४

आग्रा-सुरतः **मोंगलांचा व विजापुरकरांचा तह झाला** असें बोलतात.

सर. औरंगजेब १ }		(७२८)		{ श. १५७९ श्रावण
पृ. २७८ इ. }		{ इ. १६५७ ऑगस्ट.

विजापूरकर व दिल्लीकर (शहाजहान) यांमधील तहः

१ आदिलशहानें १ कोटी रुपये खंडणी द्यावी.

२ बेदर, कल्याण, परिंडा हे किल्ले आणि त्याखालील सर्व मुलूख व निजामशाही कोंकणांतील सर्व किल्ले आणि वांगी परगणा आदिलशहानें मोंगलांस द्यावे. [आदाब, ११२ ब. जुलै आरंभीं तहाची वाटाघाट चालू झाली].

[ले. ७१० हा श. १५७९ श्रावणनंतरचा असल्यामुळें येथें पाहिजे.]

खं. १५ ले. ९४ } (७२९) { श. १५७९ भाद्र. शु. २
सु. १०५८ जिल्काद २९ } मिसेली फा. मु. व सी. { इ. १६५७ आगष्ट ३०

?— कमलनयनगिरी

तुमचे इनाम मौ. गोवे व नींबमधे आहे. त्यास पैकेचे तगादा न लावण्याबद्दल लिहिले आहे.

खं. १५ ले. ९५ } (७३०) { श. १५७९ भाद्र. व. १०
सु. १०५८ जिल्हेज २३ } खुर्दखत मु. व सी. { इ. १६५७ सप्टें. २२

अजर. अंबाजी राजे घाटे— हुदे. व मोक. मौ. चिंचणेर किले ताथोटे

कमलनयनगिरी (निंब) यास गहू पाच कुडो बदल धर्मादाऊ ठेविले.

खं. १५ ले. ९६ } (७३१) { श. १५७९ आश्वीन शु. ३
सु. १०५८ मोहर २ } मिसेली फा. मु. { इ. १६५७ सप्टें. ३०

अज दि. ठाणा तपे पाली— हुदे. व मोक. मौजे उडतरे

२७ माहे जिल्हेजच्या खुर्दखताप्रमाणें सदानंद (निंब) यासी निंब येथें तीस बिघे जमीन चालू ठेवणें.

म. रि. भा. १ पृ. ४९२ } (७३२) { श. १५७९ कार्तिक शु.१
सु. १०५८ श. } ताकीद पत्र { इ. १६५७ आक्टो. २७

रा. **शिवाजी राजे** सो— ठाणेदार हजरतखान मो वाल्हे प्रां. पुणें.

वाल्हेकर बरवोजी मोकदमी चालवीत असतां बाळ जोशी कुलकर्णी यास त्यानें जिवे मारिल्यावरून शिरवळचा हवा. त्रिंबकराव यानें धांवणी करून बरवोजीस धरून नेलें. यास नागवण खंड होन १२०० केले; व उगवणीबद्दल म्हाकोजी भापकर मोकदम लोणी यास जमीन दिलें. पुढें पैशाच्या अडचणीमुळें बरवोजीनें भापकरास पाटिलकी दिली. म्हाकोजी मेल्यावर मुलगा खंडोजी यासी बरवोजीनें कसूर केला म्हणून दोघांस हुजूर बोलावून ९०० होन खंडोजीस व ३०० बरवोजीस देऊन पाटिलकी विकत घेऊन रा. **महादजी नाईक निंबाळकर आमचे जांवई** यास दिली. तरी त्यास तुम्ही राजी होऊन असणें.

खं. २० ले. १०५ } (७३३) { श. १५७९ कार्तिक व. ८
सु. १०५८ सफर २१ } खुर्दखत फा. मु. मज. व सी. { इ. १६५७ नोवें. १८

अजर. **अफजलखान** महमदशाही— कार. व देस. पर. वांई

नरसीह रंगभट व एकनाथ रामेस्वरभट यांस बोरखल व किण्ही या गावीं एकंदर १॥ चावर जमीन इनाम चालत आहे. हालीं कुल इनामें अनामत करण्याबदल खुर्दखते सुटली आहेत. तरी पण याचें इनाम याकडे चालू ठेवणें. पा हुा **रा शहा** मलिक गोरी

खं. २० ले. ९९ } (७३४) { श. १५७९ कार्तिक व. १०
सु. १०५८ सफर २३ } खुर्दखत फा. मु. मज. सी. { इ. १६५७ नोवें. २०

अजर. **अफजलखान** महमदशाही— कार. व देसमु. पर. वाई

हाली कुल इनामे अमानत करण्याबद्दल खुर्दखते पाठविली आहेत. पण अपदेव विष्णुभट चित्राव याचे खेड व तडवले येथील १ चावर इनाम चालवावें. रा **शाहामलीक गोरी**.

खं. २० ले. ९८ } (७३५) { श. १५७९ कार्तिक व. १०
सु. १०५८ सफर २३ } खुर्दखत फा. मु. मज. सी. { इ. १६५७ नोवें. २०

अजर. **अफजलखान** महमदशाही—कार. देसमूख पर० वाई

नारायणभट चित्राव याचे उझर्डेचें इनाम चालवावें (ले. ७३५ पहा).

सर. औ. भा. १ पृ. २८९ } (७३६) { श. १५७९ कार्तिक
आदब. ? } फारशीचे भाषां० { इ. १६५७ नोवें.

औरंगजेबाचा चिटणीस काबिलखान—**मीरजुमला**: -विजापूरचा सेनापती **खान**महमद [जानमहमद ?] हा विजापूरकरानीं मारविला. हें ऐकून शाहाजादा (औरंगजेब) एवढेंच म्हणाला कीं, 'खान महंमदास त्याचा लबाड मित्र मुल्ला अहमद नाटिया यानें विश्वासघातानें मारलें. मी त्याला वारंवार बजाविलें असून त्यानें घ्यावी तितकी काळजी घेतली नाहीं यामुळें प्रतिपक्षाच्या डावपेचास तो बळी पडला.'

खं. १५ ले. ४४२ } (७३७) { श. १५७९ पोष शु. ४
सु. १०५८ रखर २ } मिसेली फा. सी. { इ. १६५७ डिसें. २८

गोजो बापूजी हुदे. व मोक. मौ. कल्हेर पा चाकण——

चाकण येथील जोतीस कृष्णभट अभ्रे याचे आहे. बानूभटानें हरकती करू नये.

ई. फॅ. १० } (७३८) { श. १५७९ पौष व. ८
पृ. १२३–१२४ इ. } सुरतकौन्सिल–कंपनी { इ. १६५८ जाने. १६

मुरादचा सुरतेवर हल्ला (१६५७) आला त्यावेळीं सुरतेचा इंग्रज गव्हर्नर **रेव्हिंगटन** यानें शाहबाजखानाला मदत करण्याकरितां आपल्या खाजगी तोफा विकल्या. [O. C. २९०५ व डाग रजिस्टर १६६१ पृ. ४११] या तोफांची किंमत वसूल होण्याचे बाबतींत नंतर घोटाळा पडला !

खं. ८ ले. ६ हि. १०६८ } (७३९) { श. १५७९ फाल्गुन शु. २
जखर १ (नंतर रवाना) } { इ. १६५८ फेब्रु. १४

औरंग-शिवाजीः— तुमची अर्जदास्त **कृष्णाजी भास्कर पंडित** यांचे पत्रांसुद्धां **रघुनाथपंत वकील** यांबरोबर पाठवून (दिलेली पाहून) मजकूर ध्यानास आला. यद्यपि **तुमच्या पेशजीच्या गोष्टी विसरावयाजोग्या नाहींत** तथापि तुम्हीं आपले कृतकृत्याचा पश्चाताप केला आणि हा दरबार उपेक्षेचा नाहीं जाणोन, वडिलांचें लक्ष निभ्रांत इकडे आहे असें समजोन, तुमचें कृत्य मनांत आणीत नाहीं; येविषयींचा संतोष मानून, इकडील दौलतीविषयीं कोशिस करीत जावी. आपले वतनी माहाल किल्ले व कोकण देशसुद्धां नगरवाले खेरीज, विजापूरकर आदिलखानाचे इलाख्यांत जे आहेत ते त्यांजकडून मुलूख हस्तगत जाल्यानंतर बंदोबस्त होण्याविषयीं वचन असावें. म्हणजे सोनोपंत यांस हुजूर पाठवितों आणि इकडील लक्षांत वागून सरकारी मुलखाची सरहद्द रक्षण करून कामदाराशीं षरीक होतो; कीं ज्यायोगें बंड वगैरे बखेडे न होवोत; म्हणोन लिहिलें. त्यास, तुम्हीं लिहिल्या अन्वयें वर्तून हा फर्मान पाहतांच आपले मजकुराची अर्जी लेहून पंताबरोबर पाठवून देणें म्हणजे त्याप्रमाणें केलें जाईल. जाणोन लक्षांत वागोन आमचे लोभाची पूर्णता समजावी.

ताजा कलमः— महाराज जसवंतसिंग व कासमखान हे उभयतां इकडील फौज आलीशी समजोन उज्जनीहून सहा कोस पुढें लढाईचे इरायानें आले आहेत. परंतु ईश्वर-कृपेनें इकडील शूर अस्सल लौकिकी सहा सात हजार त्यांजकडील कामास येऊन शेवटीं पळूं लागले. त्यांजकडील खजिना व तोफखाना व हत्ती वगैरे बहुत कारखाने लुटले गेले. ईश्वरें अशा तऱ्हेनें आमची फत्ते करविली. पुढें आणखी नाना प्रकारचें जें सर्वांस संतोष-दायक व शत्रूस पादाक्रांति देणार असें सत्वरच होईल. तुम्हीं याविषयींचा संतोष मानून इकडील लक्षांत राहून कल्याणाचे उमेदवार असावें. रा छ मजकूर.

सर. ले. ४३ } (७४०) { श. १५७९ फाल्गुन शु. ५
सु. १०५८ जखर ४ } फर्मान { इ. १६५८ मार्च २७

विजापूर बादशहा—सयदनूरुल्ला सरहवाल. व खान मख्दुम अफगान हवाल० व कार० मुजफुराबाद.

हवालदाराचे अर्जावरून असें दिसतें कीं, नायकवाडी व इतर लोक फितूर होऊन दिवाणकाम चालू देत नाहींत व इतर वसूलहि होऊ देत नाहींत व रयत परागंदा होऊन मुलूख खराब होतो. तरी फितुरांस शासन करून मुलूख आबादान होय तें करणें.

शि. घ. ले. ५८ } (७४१) { श. १५७९
सु. १०५८ } खुर्दखत फा. मु. सी. { इ. १६५७–५८

अजर० अबदुलाखान **मलिक रेहान**—कार० पर० कऱ्हाड

आपदेऊभट बिन कृष्णभट जुनारदार यास बादशहा, मोकाशी, बडे मलिक-साहेब, मलिक अलिशान वगैरेंच्या पत्राप्रमाणें कोणेगाव येथें नीम चावर जमीन इनाम आहे. हाली पर० मज० साहेबास मुकासा मिळाला आहे. तरी याचे इनाम पूर्वीप्रमाणे याजकडे चालू ठेवावे. रा चिताखान.

शि. प्र. पृ. १०२ ले. २९ } (७४२) { श. १५७९
सु. १०५८ } कबूल कतबा { इ. १६५७-५८

जाया घाटगुडा कस. वालवे—उपाध्ये सिद्धेश्वरः—इनाम ।॰ चावर व होन १॥॰

सर. औ. १ पृ० २८५ टीप. } (७४३) { श. १५७९
आदब ? औ. } { इ. १६५७

१ औरंबजेब——मुल्तफतखान

अहमदनगरची दक्षतेनें व्यवस्था ठेवा. नासिरीखान हिंदुस्थानाकडे गेला म्हणजे रिकामें रान पाहून शिवाजी लुटण्यास सुरुवात करील; यासाठीं तुम्ही आपलें सैन्य जय्यत ठेवा.

२ औरंगजेब——नासिरीखान

शहाजहानाचें बोलावणें येतांच घाईनें आपलें ठाणें सोडून निघून जाऊं नका. नाहींतर शिवाजी चालून येईल.

३ औरंगजेब——मीरजुमला

नासिरीखान निघून गेल्यामुळें तो मुलूख मोकळा पडला आहे; त्याकडे लक्ष द्या; कारण तो son of a dog शिवाजी, संधी साधण्यासाठीं टपून बसला आहे.

सर. औ. १ औ. पृ. ३६७ } (७४४) { श. १५७९-८०
आदब. औ. } { इ. १६५७-५८

औरंगजेब——अली आदिलशहा (विजापूर)

मीरजुमल्याच्या दुष्टाव्याच्या सल्ल्यावरून मी विजापूर व गोवळकोंडा या राज्यावर हल्ला केला. पण आतां तुम्ही आपल्या प्रजेचें संरक्षण करा, व सुखांत नांदा. राजनिष्ठेनें वागून आपलें वचन पाळा. (१) परिंड्याचा किल्ला, कोकण, वांगी महाल हे प्रांत खालसा केले होते ते व कर्नाटकांतील मुलूख, तुमच्याकडे पूर्वीप्रमाणें रहावे; (२) आणि एक कोटी रुपये खंडणी तुम्हीं कबूल केली आहे त्यापैकीं ३० लाख सूट द्यावी, ह्या दोन अटी मी मान्य करतों. तुम्ही मात्र मुलखाचें चांगलें संरक्षण करा; व त्याची व्यवस्था सुधारा. त्या प्रांतांतील कांहीं किल्ले शिवाजीनें बळकावले आहेत तेथून त्याला घालवून द्या. त्याला नोकरींत ठेवण्याची तुमची इच्छा असेल तर त्याला कर्नाटकांत जहागीर

द्या. म्हणजे त्याचा उपसर्ग मोगली मुलखास पोचणार नाहीं....मी हिंदुस्थानाकडे जात आहे; तुम्हास राजनिष्ठा व स्नेह दाखविण्यास ही संधी आहे. माजी आदिलशहानें प्रसंग पडल्यास सैन्य पुरविण्याचें वचन दिलें होतें. तुम्ही निदान १० हजार सैन्य पाठवा. मी तुम्हाला बाणगंगेपर्यंत मुलूख देईन. **शहाजी** किंवा **बहलोलखानाचे मुलगे** अगर तुमचे इतर अधिकारी यांना **माझ्या नोकरींत घेणार नाहीं**. तुम्ही माझ्याशीं निष्ठेनें वागाल तोंपर्यंत तुमच्या मुलखास आमच्या अधिकाऱ्याकडून उपसर्ग पोचणार नाहीं व तुमच्यावर हिंदुस्थानाकडून स्वारी आल्यास आम्ही तुमच्या मुलखाचें संरक्षण करू.

सा. लें. ३०१ } श. (७४५) { श. १५८० चैत्र शु. ७ इ. १६५८ मार्च ३१

त्र्यंबकभट वगैरे प्रभु धर्माधिकारी—— मोरेश्वरभट प्रभु नाशीक

महाद प्रभु मृत्यु पावला; त्याची स्त्री गंगाई हिनें गोविंद प्रभूस आपले तकसीमेचे सर्व बक्षीस देऊन सहगमन केले. पुढें गोविंद व इतर प्रभु यानीं वृत्तीची वांटणी करून घेतली.

खं. २० ले. १०४ } सु. १०५८ रजब १२ (७४६) खुर्दखत फा. मु. मज. व सी. { श. १५८० चैत्र शु. १४ इ. १६५८ एप्रिल ६

अजर. **अफजलखान** महमदशाही—— कार. व देसमु. पर. वाई

हाली सर्व इनामें अमानत करण्याबद्दल खुर्दखत दिलें आहे तरी गिरमाजी त्रिंबक याचे वाईचे १ चावर इनाम चालवावें.

पिसुर्लें. शिवाजी पृ. ४ } इ. १६५८ मे १५ (न्यू) (७४७) { श. १५८० वैशाख शु. १३ इ. १६५८ मे ५

गोव्याचा गव्हर्नर—— पोर्तुगालचा बादशाहा.

आदिलशाही सरदार **शहाजी** (हाहि आदिलशहाच्या हुकमतींत नाहींच) याचा बंडखोर पुत्र **शिवाजी** यानें उत्तरेकडील मुलखास उपद्रव दिला आहे. यामुळें मला ८० शिपाई **चौल** येथें हिवाळ्यांत ठाणें देऊन राहण्यासाठीं पाठवावे लागले.

पिसुर्लें. शिवाजी पृ. १२–१३ } इ. न्यू. १६५८ मे १५ (७४८) { श. १५८० वैशाख शु. १३ इ. १६५८ मे ५

गोव्याचा गव्हर्नर—— पोर्तुगालचा बादशहा

मोठा सरदार रणदुल्लाखान याचा **मुलगा रुस्तुमझमा** हा कोकणचा मुख्य सरदार नेमला गेला असून तो कोंकणांत आला आहे. त्याचा इकडे येण्याचा उद्देश **लखम**

सावंत यास जिंकणें हा आहे. लखम सावंतानें त्याचे १५०० च्या वर लोक मारले. पण रुस्तुमनें त्याच्याकडून एक किल्ला (रांगणा) परत घेतला.

फरा. सला. पृ. ५७ हि. १०६८ } रम ४ जुलूस १ } (७४९) फर्मान { श. १५८० ज्येष्ठ शु. ५ { इ. १६५८ मे २७

औरंगजेब—— पेड नायकास

तुमचे अपराध क्षमा केले आहेत; व नुसरताबादेची सरदेशमुखी तुम्हास दिली आहे.

शि. प्र. पृ. १०३।३२ } सु. १०५९ रम ७ } (७५०) खुर्दखत फा. मु. मज. व सी. { श. १५८०-८१ ज्येष्ठ शु. ८ { इ. १६५८ मे ३०(-५९मे १९)

अजर. **सरनोबत**——कार. व देसक तपे **वाळवे.** साहेबास **मोकासा** जाला (ले. २०३ पहा).

इं. फॅ. १० } पृ. १७६ इ. } (७५१) फोर्ट सेंटजॉर्ज-बँटम { श. १५८० भाद्र. शु. ११ { इ. १६५८ आग. २८

आमच्या सभोंवतीं युद्धाचा खणखणाट चालू असला तरी आम्ही शांततेंत आहों. येथून १० मैलांवरील पुलोमोलीच्या किल्ल्यांतील लोक बंड करून **गोवळकोंड्याला** मिळाल्या-मुळें तोपकृष्णाच्या सैन्यानें त्याला वेढा घातला आहे. **गोवळकोंड्याची** फौज या मार्गानें येत असल्यामुळें त्यांच्या आशेवर ते आतांपर्यंत टिकाव धरून राहिले आहेत. अशा तऱ्हेनें या देशांत सर्वत्र व्यापार व दळणवळण यांस प्रतिकूल परिस्थिति उत्पन्न झाली आहे.

फरा. सला. २२० हि. १०६९ } सु. १०५८ मोहर १२ } (७५२) फर्मान { श. १५८० आश्वीन शु. १४ { इ. १६५८ सप्टं. ३०

अली अदिलशाहा——**अफजलखान** महमदशाही सरहवालदार व सयद दाऊद हवालदार

मामुलात (= कर वसूल करण्याचा हक्क) काजी अबदुल हसन यास दिली आहे.

सं. ४ पृ. ७९ } सु. १०५९ मोहर १३ } (७५३) न. सी. { श. १५८० आश्वीन शु. १५ { इ. १६५८ ऑक्टो. १

रा. **शिवाजी** राजे—कृष्णाजी भास्कर देशाधिकारी बारा मावळ. मौजे कल-बोली ता। पौन मावळ व मौजे रावळ ता। पौडखोरे या हरदो गांवांचा सिवेचा कथला लागला म्हणोन आज्ञापत्रावरून तुम्ही मौजे मारास जाऊन कथळा मनास आणिला. त्यासि आरजोजि ढमाला हा म्हणो लागला कीं आपण दिव्य करून. त्यावरून सर्व देशक मेळऊन दिव्याचा तह दिल्हा. इतिकियामध्यें दुसरे दिवशीं आरजोजि ढमाला देश ++

ता पौडखोरे [गैरहजर] जाला. सबब नरहरी दिवाकर देशकुलकर्णी पौनमावळ व हावजी पा मौजे कलबोली ता मार-याणी हुजूर पुरंधरचे मुकामी येऊ(न) विदित केले. **त्यावर साहेब करणाटक प्राती मसलतीस गेले.** त्या प्रांतीहून आलियावर जो निवाडा करणे तो करतील. तोंपरियंत हरदो गावामध्यें **टकियाचे कासेची जमीन आहे** ते आमानत आसो देणे. मोर्तब सूद.

सा. ले. ९८ } (७५४) { श. १५८० आश्विन व. २
सु. १०५९ मोहर १५ } निवाडा पत्र-सुपे खुर्द { इ. १६५८ आक्टो. ३

बिहुजूर **रामाजी** हवालदार माहालानिहाय व पदो नारायण **सभासद** नामजाद किल्ले **कोंडाणा.**

अग्रवादी--लुमाजी बोतरे मोक. मौ. पारगांव माळा तर्फ पाटस प्रांत पुणें. **राजे साहेब** यापासी सांगितले जे, कोंडाजी ताकवणे याने आपले सहा खून केले; मोकदमीसी करकर करितात; गावाला राहावत नाहीं. त्यावरून **माहाराज राजेश्री राजे** यानी देशमूख, देशपांडे व हवालदार गोत वगैरेस निवाडा करण्यास सांगितले. करीणा मनात आणिता लुमाजीचे कोंडाजीनें सहा खून केले व लुमाजीने कोंडाजीचे २ खून केले. कोंडाजीनें पदर पसरला म्हणून लुमाजीने खून माफ केले. निवाडा केला कीं कोंडाजीनें आपली निमे पाटिलकी लुमाजीस द्यावी व लुमाजी वडील असल्यानें वडिलपणा त्यानें करावा.

खं. १५ ले. ४४१ } (७५५) { श. १५८० कार्तिक व. १०
सु. १०५९ सफर २४ } मिसेली म. मु. सी. { इ. १६५८ नोवें. १०

अज. दि. ठाणे पर० चाकण—ता मोक. कस. चाकण.

कृष्ण बिन मुरारीभट ब्रह्मे याचें कसबे चाकण येथील इनाम चालू ठेवणें.

खं. २० ले. १०० } (७५६) { श. १५८० मार्ग. शु. ८
सु. १०५९ रबल ६ } खुर्दखत फा. मु. मज. व सी. { इ. १६५८ नोवें. २२

अजर. **अफजलखान** महमदशाही—ता कार. व देसमूख पर० वाई.

हाली कुल इनामे अमानत करण्याविषयीं फर्माविलें आहे. तरी नरसिंहभट बिन रंगभट व एकनाथभट बिन रामेश्वरभट याची मौ. बोरखल व किण्ही येथें एकंदर १॥ चावर जमीन चालविणें. रा मुला अली.

खं. २० ले. १०१ } (७५७) { श. १५८० मार्ग. शु. ९
सु. १०५९ रबल ७ } खुर्दखत फा. मु. मज. व सी. { इ. १६५८ नोवें. २३

अजर. **अफजलखान** महमदशाही—— . कार. व देशमू. पर वाई

हाली कुल इनामें अमानत करण्याबद्दल फर्माविले आहे. तरी गिरमाजी त्रिंबक याचे इनाम चालू ठेवणें. रा मुला अली.

खं. २० ले. १०२ } (७५८) { श. १५८० मार्ग. शु. ९
सु. १०५९ रवल ७ } खुर्दखत फा. मु. मज. व सी. { इ. १६५८ नोवें. २३

अजर. **अफजलखान** महमदशाही—— कार. व देशमु. पर. वाई

हाली कुल इनामें अमानत करण्याची खुर्दखतें सुटली आहेत; तरी नारायणभट चित्राव याचे मुन्हे येथील इनाम चालविणें.

खं. २० ले. १०३ } (७५९) { श. १५८० मार्ग. शु. ९
सु. १०५९ रवल ७ } खुर्दखत फा. मु. मज. व सी. { इ. १६५८ नोवें. २३

अजर. **अफजलखान** महमदशाही—— कार. व देस. पर. वाई

हाली कुल इनामें अमानत करण्याचें फर्मान आहे: तरी आऊभट चित्राव याचे इनाम चालू ठेवावें.

सं. ७ पृ. ५९ } (७६०) { श. १५८० मार्ग. शु. १५
सु. १०५९ रवल १३ } खुर्दखत उल्लेख { इ. १६५८ नोवें. २९

दिवाण ठाणे पर. पुणे यानीं **चिंचवडच्या गोसाव्यास** ५० हजार गवत काढून द्यावे.

शि. घ. ले. २७७ } (७६१) { श. १५८० मार्ग. व. २
सु. १०५९ रवल १५ } मिसेली फा. मु. व सी. { इ. १६५८ डिसें. १

अज. दि. ठाणा तर्फ पाली—— ता। हुदे. व मोक. तळबीड, कोळवीर

फर्मान व खुर्दखत याप्रमाणें देसाई व **मोहिते** यांचे हक व इनाम चालविणें.

सा. ले. ३५५ } (७६२) { श. १५८० मार्ग. व. ४
सु. १०५९ रवल १७ } तकरीर, जबखंडीचे मारुतीचें देऊळ { इ. १६५८ डिसें. ३

अथणीचे सिदणाभूपति देसाई, कुळकर्णी व नागौड पाटेल व चौधरी व महाजन व बारा बलुते यानी लिहून दिल्ही तकरीर ऐसी जे —

आपले लिंगाईताचे जंगम देवरू वा जैना खुमाचे लोक निवाडाबद्दल **कासीसी** गेले होते. जंगम देवरू **जयापत्र** घेऊन आले असे. लहानथोर समोरा जाऊन बोलाऊन आणावे. म्हणून दिवाणलोक, आम्ही व गोत बोलाऊन आणले. जैन कांहीं बोलिले नाहीं. यावरी ५ महिनेसी जैन गुरु व लोक आपण जयपत्र घेऊन आले आहे. समोरा जावे. म्हणून बोलले. ते वरुती लिंगाईत बोलिले, जैन लोक **गलतपत्र** आणिले. बोलाऊन आणाविया निसबत नाहीं. पण जैन लोकाने सागोन पाठविलेवरी आम्ही, दिवाण व समस्त जाऊन बोलाऊन आणिले.

सा. ले. ३५६ सु. १०५९ रखर १५	(७६३) महजर	श. १५८० पौष व. १ इ. १६५८ डिसें. ३०

कसबे अथणी व पर. जबखिडींचे लोकास बोलावून आणून जैन व लिंगायत यांचे **गुरु** कोण रवेसीने येत असेत वगैरे पुसता सांगितले कीं, लिंगाइताचे गुरु आलिया समोरा जाऊन मिरवीत आणीत असे. जैनाचे गुरु आलिया मिरवीत आणीत नाहीं. आपआपले बस्तीमधें राहताती. फर्मान व खुर्दखतेहि अशीच आहेत. तरी निवाडा केला कीं लिंगाइताचे गुरु मिरवीत यावे व जैनाचे गुरु मिरवीत येऊं नये.

फरा. सला. पृ. ५९ हि. १०६९ जखर १५	(७६४) फर्मान अस्सल	श. १५८० फाल्गुन व. १ इ. १६५९ फेब्रु. २७

औरंगजेब——— अबुल हसन

आमचा हेतु असा आहे कीं, लहान थोर सर्व प्रजेची व्यवस्था करावी आणि आमच्या धर्माप्रमाणें असें ठरलें आहे कीं **देवळाचा नाश करूं नये व नवीं देवळें बांधण्यास परवानगी देऊं नये.** तेव्हां या न्यायाच्या काळांत असें ऐकण्यांत आले कीं, बनारस व त्याच्या आसपास राहणाऱ्या हिंदूंना कांहीं लोक त्रास देत आहेत; व सदना (= प्राचीन) ब्राह्मण यांना अडथळा होत आहे व फार प्राचीन सधांत (सिद्धांत?) थांबविण्याचा विचार आहे; पण असें होऊं नये. हिंदूंना स्वस्थपणें राहता यावें.

सां. इ. सा. ले. ७ सु. १०५९ श.	(७६५) तहनामा	श. १५८० फाल्गुन व. ७ इ. १६५९ मार्च ५

तहनामा राजश्री **खेमसावंत** व **लखम** सावंत सरदेसाई बहादूर प्रांत **कुडाळ** यांजकडील **पितांबर शेणवई** कारभारी येऊन ठराव करून दिला.

प्रांत मजकूरचे महाल वगैरे चालत आहेत. आकार होईल त्याचा ऐवज दरसाल निमे हुजूर पावता करावा. निमा आकार राहील त्यांत तीन हजार लोक पायदळ, हेटकरी ठेवावे आणि ज्यावेळेस हुजूर चाकरीस बोलाविले जातील तेव्हा तीन हजार लोकानिशी सेवा करावी. खासा जातीनें येण्याचें प्रयोजन पडेल तेव्हां बोलावणे होईल तेव्हा यावे.

किले फोंडा प्रांत तालुका घेऊन हुजूर ठेविला त्यास हरएक प्रसंगास कुमक राखीत जावी. बिदनूर वगैरे संस्थानच्या खंडण्या घेण्यास स्वारी होईल त्याच्या कुमकेस जात असावे.

स्वराज्य साधनाच्या ठायीं वकिलापाशी मध्यें राहून तुरुक लोकांचे साधान करावे.

प्रांतांतील जमाबंदीच्या चौकशीस हुजुरून लोक राहातील ते ठेऊन त्यांच्या नेमणुकीबद्दल हुजूर अमलप्रमाणें पावते करावे.

प्रांत मजकूरची देसकत वतने व बहादूर किताबत अजरामरामत चालेल. त्यांतील किल्ले कोट व ठाणी तुमच्या स्वाधीन केली आहेत. तेथें दास्तान करून जतन करावी. तेथे हुजूरचे कारकून व लोक येतील ते ठेवावे.

शके १५८० विलंबी नाम संवत्सरे फाल्गुन वद्य ७ मी एकूण ५ कलमी करार करून तहनामा दिला असे. मोर्तब

रामदास अं. ६२ ले. १ } (७६६) { श. १५८० फाल्गुन व. १३
सु. १०५९ जखर २६ } खुा फा. मु. व सी. { इ. १६५९ मार्च १०

अजर. याकुतखान—— कारकुनानी ता मसूर.

कासीभट जुनारदार सेकिन पाटण यास इनाम बिघे २० बा भोगवटा माजी मुकासाई शाहाजीराजे चालिले आहे. हाली साहेबास मुकासा अर्जानी जाला. इनाम दुमाले करणे.

खं. २० ले. १७६ } (७६७) { श. १५८०
पृ. २४० श. } उल्लेख { इ. १६५८–५९

रंग जोसी—— बाप जोसी चित्राव वाई.

मध्वाजी पंताचे वेळच्या महजराप्रमाणें मुन्हे व वाईचे ज्योतिष चालवावे.

सा. ले. ३५४ } (७६८) { श. १५८०
सु. १०५९ } फा. मु. { इ. १६५८–५९

माहामेरु पार्वती देसाईणी व गदिगी आपा सिदणनंदीराऊ देसाई पर. जबखडी लेहून दिधले इत्यादि (अपूर्ण).

खं. २० ले. १४ } (७६९) { श.
? } बाजारभाव व भाडें { इ.

सुप्याहून अहमदनगरास जोडीच्या बैलास भाडे ·॥= होनु. व दर बैलास प्रताप अर्धा; दौलताबादेस याकूदखान ? जोडीच्या बैलास होन १।; कसाबाच्या येथील मांसाचे व कातडी रंगविण्याचे दर.

इं. फॅ. १० } (७७०) { श. १५८० ?
पृ. १७४–१७५ इ. } चेंबरचा वृत्तांत { इ. १६५८

कर्नाटकांतील कारभार मीर जुमल्यानें तुपाके कृष्णाप्पा याच्या हातीं दिला आहे.

हॅन् २ पृ. ३२४ इ.	(७७१) उल्लेख	श. १५८० इ. १६५९

इ. स. १६५९ मध्यें आदिलशहानें पोर्तुगीज प्रांतावर हल्ला केला; पण मडगाव जवळ त्यांचा पोर्तुगीजांनीं पराभव केल्यामुळें त्यांना परतावें लागलें.

शि. प्र. पृ. १०४ ले. ३३ सु. १०५९ शाबान १२	(७७२) मिसेली	श. १५८१ वैशाख शु. १४ इ. १६५९ एप्रील २५

अज दि. वाळवे—हुदे, व मोक. पुणदी (ले. २०३ मधील) संभटाचें इनाम.

त्रै. ७ पृ. ४४ सु. १०५९ रम १	(७७३) व्यवस्थापत्र म. मु. व सी.	श. १५८१ ज्येष्ठ शु. २ इ. १६५९ मे १३

माा अनाम बाज प्रभू प्रति राजेश्री सिवाजी राजे. जास जा कासलोड गड हिरडस मावळामध्यें आहे तो गड ऊस पडला होता. याचे नाव मोहनगड ठेउनु किला वसवावा येैसा तह करुनु किल्यास मसुरल अनाम पिलाजी भोसले यासि किले मज-कूरचा हवाला देऊन पाठविले असेत; व माइले बराबर किलाचे संगनाती बदल लोक २५ पाठविले असेत. तरी तुम्ही माइलेस व पंचविसा लोकास बराबर देउनु मोहनगड गडावरी मशारनिलेस + + व पंचविसा लोकास किल्यावरी ठेवणे; आणि किलाच्या हवालदारास घ(र) व लोकास अळंगा मजबूद करुनु देणे. घर व अळंगा करुनु घाल त्या पावसानें अजार न पावे यैसा करुनु देणे. नाहीं तरी सजवंज (दिखाऊ) करुनि घाल? आणि किल्यावर लोक राहातील त्या अजार न पावे येैसे हवालदारास घर व लोकास अळंगा व येक भाखल (बखळ) मुस्तीद करुनु देणे. तुम्ही सदरहू प्रमाणे काम विलेवार लाउनु घाल म्हणउनु साहेबास भरवसा आहे याबदल तुम्हास लिहिले असे. तरी सदरहू लिहिलेप्रमाणे किला मजबूद करुनु देणे. मग तुम्ही किल्याखाले उतरणे. मोर्तबसुद (मर्यादेयं) (सामराज-मुद्रा)

साधन चि. पृ. २८७-८८ सु. १०५९–६० हि. १०६९ सवाल ५	(७७४) फर्मान फारसी भाषांतर	श. १५८१ आषाढ शु.६ इ. १६५९ जून १६

अलीअदिलशहा—— कान्होजी जेधे

शिवाजीनें अविचारानें व अज्ञानानें निजामशाही कोंकणांतील मुसलमानांना त्रास देऊन लूट करून पातशाही मुलखांतील कित्येक किल्ले हस्तगत केले आहेत. यास्तव त्याचे पराभवार्थ...अफजलखान महमदशाही यांस तिकडील सुभेदारी देऊन नेमून पाठविले आहेत. तरी खान माचे रजामंदींत व ताबेदारींत राहून...

शिवाजीचा पराभव करून निर्मूळ फडशा करावा. शिवाजीचे निसबतीचे लोकास आश्रय न देतां ठार मारून या दौलतीचें कल्याण इच्छिणें. खानाच्या सांगण्यावरून ...तुमची योग्यता वाढविली जाईल. त्याचे सांगण्याप्रमाणें वागावें. तसें न केल्यास परिणाम चांगला होणार नाहीं. हें जाणोन या सरकारी आज्ञेप्रो चालावें तेरीख...... हुजूरची परवानगी झाली असे.

खं. ८. ले. ५ सं. ४.७७ हि. १०६९ जुलुस १ जिल्काद ४ } (७७५) फर्मान { श. १५८१ श्रावण शु. ६ इ. १६५९ जुलै १४

औरंगजेब———शिवाजी

ईश्वरें छ **२४ रमजान रोज रविवार** (इ.१६५९ जून ५) या दिवशीं आम्हांस सिंहासनाधीश्वर केलें. तुमची अर्जदास्त अशा संतोषसमयांत पावून मजकूर ध्यानांत आला. ऐशियास तुम्ही इकडील लक्षांत वागतच आहांत. त्या अन्वयें वागून खैरखाही करीत जाणे. हाली दक्षिणेकडील सुभ्याचे कामावर उमदे-तुलमुल्क अमीरुल उमराव म्हणोन याची योजना करून तेथील सर्व लोकांचा बंदोबस्त सांगितला आहे. तरी **तुम्हींहि त्याचें सलेंत वागून** वारंवार कोशीस करून जसें **पूर्वीचें बोलणें** त्याप्रमाणें अमलांत आणावें. शत्रु हस्तगत जाले. ते लवकरच शिक्षाहि पावतील. तुम्ही इकडील लोभ आपणावर पूर्ण आहे असें जाणून असावें. तुम्हांकरितां येथून **पोषाख** पाठविला आहे हा घ्यावा.

इं. फॅ. १२ पृ. २०८–२०९ हि. १०६९ जिल्काद १४ } (७७६) { श. १५८१ श्रावण व. १ इ. १६५९ जुलै २४

कारवारचा सुभेदार **आघा मुर्शीद** यानें अली अदिलशहाचे वतीनें रँडॉल्फटेलर व फिलिप गिफर्ड (कारवार) यांना दिलेल्या व्यापारी सवलतीः— १ इंग्रजांना व्यापाराकरितां मुक्तद्वार ठेवण्यांत आलें (free trade); २ खजिन्याशिवाय इतर इंग्रजांच्या आयात मालावर शेंकडा १½ टक्के याप्रमाणें जकात घेण्यांत यावी; ३ कर्जवसुलीच्या बाबतींत सुभेदारानें मदत करावी; ४ इंग्रजांनीं आपल्या स्वतःच्या नोकरांचें बाबतींत स्वतःच न्याय द्यावा. इ. इ.

शि. प्र. पृ. १७८ इ. १६५९ ऑगष्ट १६ न्यू स्टाइल } (७७७) { श.१५८१ श्रावण वा १४ इ.१६५९ ऑगष्ट ६

गोव्याचा व्हाइसरॉय————पोर्तुगालचा बादशहा.

शिवाजी नामक शहाजीच्या एका मुलानें वसई व चौलकडील प्रदेश काबीज केला असून तो बलिष्ठ झाला आहे. त्यानें कांहीं **लढाऊ गलबतेंहि** भिंवडी, कल्याण

व पनवेल या वसई तालुक्याचे बंदरांमध्यें बांधिलीं आहेत. त्यामुळें आम्हांस खबरदारीनें राहणें भाग झालें आहे. हीं गलबतें समुद्रांत फिरकूं न द्यावीं म्हणून (पोर्तुगीज) कॅप्टनला अम्हीं आज्ञा केली आहे कीं, त्यानें सदर गलबतें बंदरांतून बाहेर येऊंच देऊं नयेत.

सा. ले. १५७ } (७७८) { श. १५८१ भाद्र. शु. १
सु. १०६० जिल्काद २९ } खुर्दखत. { इ. १६५९ आग. ८

अजर० रा. खेलोजी राजे——देशमूख व देशपांडे पर० सुपे.

बाजी याकूदखानाच्या वेळेपासून चालत आलेले सुपे येथील इनाम गणो तिमाजीनें मोरेश्वरच्या गोसाव्यास दिलें आहे तें चालू ठेवणें.

खं. २० ले. १०६ } (७७९) { श. १५८१ भाद्र. व. ४
सु. १०६० जिल्हेज १६ } खुर्दखत फा. मु. व सी. { इ. १६५९ आगष्ट २५.

अजर. मिया अजम मिया दरवेश महमद——कार. हिसार जाउली.

मोकासा अर्जानी जाला. नारायणभट चित्रावाचें इनाम (ले. २३७) चालवा.

शि. प्र. पृ. ८३ } (७८०) { श. १५८१ आश्विन शु. १
सु. १०६० जिल्हेज २९ } खुर्दखत फा. मु. { इ. १६५९ सप्टें. ७

अजर० अफजलखान महमदशाही—— कार. पर. तेरदल.

परगणे तेरदलचे विलायतीस सिवजी तसवीस देतो. त्यास क्रिष्ण गौडा देसाई बहुत मशागत करून गनिमास वेरा केले त्यावरून देसाई मजकुरास इनाम वगैरे दिले. रा शामलीक गोरी.

इं. फॅ. १० } (७८१) { श. १५८१ आश्विन शु. ७
पृ. २६३ इ. } { इ. १६५९ सप्टें. १३

कमीटीज ऑफ दि न्यू जनरल स्टॉक—— फोर्ट सेंट जॉर्ज.

मीरजुमल्याच्या हातून तख्त-संपादनांत कांहीं अंश मिळविण्याच्या महत्त्वाकांक्षेनें गोवळकोंड्याच्या सुलतानाशीं संगनमत करण्याचा गुन्हा घडल्यामुळें औरंगजेबानें त्याला कैद केलें. [जाने. १६५८. पहा औरंगजेब भा. १ पृ. ३११]

त्रै. व. ७ पृ. १०४ } (७८२) { श. १५८१ आश्विन व. १०
सु. १०६० मोहर २२ } कौलनामा फा. मु. { इ. १६५९ सप्टें. ३०

अज सर सुभे अफजलखान महमदशाही——

शिवाजी फर्जंद कान्होजी जेधा देसाई तर्फ भोर. कृष्णाजी पंडित हवालदार

व अमाजी आनंदराऊ किल्ले रोहिडा येही तुमचे बाबे मालूम केले. **तुमचा बाप व बिरादर दाहावीस वरिसे शिवाजी भोसलेचे चाकरी करिताती.** तुम्ही या बातेचा उजूर व यक अंदेशा न करितां येणें. आलेवरी सरफराजी होईल.

सा. ले. ३४३ } (७८३) { श. १५८१ आश्विन
श. } हुज्जति फा. मु. { इ. १६५९ सप्टे.आक्टो.

केशव नाईक सरदेसाई मामले मुस्तफाबाद व मुजफराबाद व देसाई तर्फ संगमेश्वर-नारो बिन अंतो व केसो बिन नारो पाध्ये धर्माधि. व जोति. व अष्टाधि. गुणवली **(गोळवली)**

तुम्ही सांगितलें कीं आपली मिरासी १४७५ वर्षे चालिली असे. **ताम्रपटे** आहेती. कागद जळाल्यामुळें नवीन आणलेले कागद पाहिले. तुम्हासच मोकरर केले.

शि. च. ले. १ सु. १०६० } (७८४) { श. १५८१ कार्तिक शु. ४
हि. १०७० सफर २५ } फर्मान { इ. १६५९ आक्टो. ९

अली आदिलशहा—**अफजलखान** सरह. व अबदुलकादिर सरवरखा मुजफराबाद. केसो व रंगो सरदेसाई यांचा वंशपरंपरेचा इनाम अबदुल नबी फक्रुदीन पटीदार यास दिला आहे तो परत त्यांचा त्यास द्यावा.

इं. फॅ. भा. १० } (७८५) { श. १५८१ कार्तिक व. ७
पृ. २३९ इ. } रायबाग–कोल्हापूर { इ. १६५९ आक्टो. २७

विजापूरच्या राज्यांत अव्यवस्था माजली आहे; परंतु रुस्तुमजमानें २५ घोडेस्वार आमच्या मदतीस पाठविले आहेत.

शि. प्र. पृ. १०४ ले. ३४ } (७८६) { श. १५८१ कार्तिक व. ११
सु. १०६० सफर २४ } खुर्दखत उल्लेख { इ. १६५९ आक्टो. ३१

(ले. २०३ मधील) वाळव्याच्या संभुभटास खुर्दा पा हुजूर रा मा हजरत मेलगिरी पंडित.

शि. सा. ले. ३५७ } (७८७) { श. १५८१ मार्ग. शु. ५
सु. १०६० रवल ४ } कौल फा. मु. मज. सी. { इ. १६५९ नोव्हें. ९

?————बजा. समस्त माहानाड पेठ कस. अथणी मामले महमदपूर.

तुम्ही अरिजा लिहिले की, 'पेठ मजकुरासी नवा ठाणेदार येत आहे तरी आपणासी तकवा होईना.' कांहीं नाहीं ते गोष्टीवरून बेतकवा होवे काये माना आहे. कांहीं अंदेशा न करितां उदीम वेव्हार करून सुखे असिजे.

इं. फॅ. १० }
इ. पृ. २५१ }

(७८८)

राजापूर–सुरत

{ श. १५८१ मार्ग. व. १
{ इ. १६५९ नोव्हें. १९

(पन्हाळ्याचे बाजूला धामधूम झाली त्यामध्यें सुरतेला पडून राहिलेली सामुग्री खपण्याची संधी आली. एक तोफ व कांहीं ग्रेनेडो सुरतेहून राजापुरास पाठविण्यांत आले.)

तुम्हीं शिफारस केलेला गोलंदाज बर्गेस अगदींच अडाणी आहे. म्हणून आम्हीं दुसरा घेतला आहे. त्याचा दरसालचा पगार ३० पौंड आहे. लवकरच **रुस्तुमजमा** त्याला आपल्याकडे घेईल; आणि यापेक्षांहि अधिक पगार देईल.

इं. फॅ. भा. १० }
पृ. २४६ इ. }

(७८९)

राजापूर– सुरत.

{ श. १५८१ मार्ग. व. १
{ इ. १६५९ नोव्हें. १९

रुस्तुमजमाकडून आम्हांला अशी सवलत मिळाली आहे कीं कंपनीचा माल कारवारला भरला गेला तरी त्यावरील जकात राजापूरला भरावी.

कारवारचा सुभेदार रुस्तुमजमाचाच हस्तक आहे. त्याला तो प्रांत त्याच्या खर्चाकरितां दिलेला आहे. [३१ ऑक्टोबरचें पत्र.]

इं. फॅ. भा. १० }
पृ. २५१ इ. }

(७९०)

राजापूर–सुरत.

{ श. १५८१ पौष शु. ६
{ इ. १६५९ डिसें. ९.

मोठा रजपूत **शिवाजी** हा राणीचा महाशत्रू असून त्यानें कोल्हापूर पासून ६ कोसावरील मोठा किल्ला **पन्हाळा** घेतला. विजापुरास ही बातमी गेल्यावर राजा व राणी खास चकित होतील. शिवाजीला यश यावें अशीच आमची इच्छा आहे; कारण **शिवाजी** व **रुस्तुमजमा** यांची **दोस्ती** आहे.

इं. फॅ. भा. १० }
पृ. २४७ इ. }

(७९१)

{ श. १५८१ पौष शु. ७
{ इ. १६५९ डिसें. १०

राजापूर हेन्री रेव्हिंगटन् व रॅडॉल्फ टेलर–कंपनी.

आमचे व **पोर्तुगीजांचेहि** शत्रु **डच** लोक यांनीं पोर्तुगीजांची या किनाऱ्यावर सर्वत्र दुर्दशा उडविली आहे. आम्हीं तपास केला, त्यावरून असें कळतें कीं, **वेंगुर्ल्याच्या डचांनीं** दख्खनचे राणीला मोठा लांच भरून गोव्यावर सैन्य पाठविलें होतें. तिच्याकडे आतां गोवेकरांनीं वकीलहि पाठविला आहे. एक लक्षांचा नजराणा दिल्यामुळें यावर्षी तरी ती सैन्य पाठविणार नाहीं असें गोव्याचा वकील रायबागवरून जातांना आम्हाला म्हणाला. परंतु डचांनीं पुनः नजराणा भरून हा सलोखा उलटला. १००० घोडदळ विजापुराहून गोव्यावर निघालें ! आदिलशहाच्या एका भावानें ख्रिश्चन होऊन पोर्तुगीज राजाला दिलेल्या बार्देश व **साष्टी** या मुलखाबद्दल दरसालच्या खंडणीचा वाद उकरून हें सैन्य रवाना

केलेलें आहे. परंतु हलाखीमुळें गोवेकर ही मोठी रकम देऊं शकत नाहींत. तेव्हां इंग्रज व डच यांच्यांत युद्ध उपस्थित होणें अगर पोर्तुगालकडून पैसा येणें यापैकीं कांहींच न घडेल तर तीन वर्षांपेक्षां अधिक टिकाव त्यांना धरतां येणार नाहीं. गोव्याचे अधिकारी लोकप्रिय नाहींत. शिष्ट लोक देश सोडून बाहेरच पडत आहेत. थोडी खटपट केल्यास पोर्तुगीजांच्या मुलखांत आपलें बोट शिरकेल असें वाटतें. युरोपांत खटपट करून पहावी मुसलमानांच्या सैन्याचा गोवेकरांनीं पराजय केला आहे. डचांजवळहि पुष्कळसें सैन्य नाहीं. परंतु लवकरच जमा करून त्यांनीं विजापुरकरांशीं संगनमत केल्यास ते गोवें घेऊं शकतील.

परंतु **रुस्तुमजमानें** मनांत आणल्यास व पोर्तुगीज लोक त्याचेशीं सढळ हातानें वागतील, तर डचांना मुसलमानांची कुमक मिळणार नाहीं. मग पोर्तुजांनीं गोवें सोडून तेथें आम्हीं प्रवेश केला तर आपलें काम होईल. **रुस्तुमजमा इंग्रजांचा दोस्त** असल्या-मुळें त्याचे स्वतःचे सांगण्यावरून समजतें कीं, बडी साहेबीण त्याला शत्रु समजते. आणि म्हणून पूर्वीप्रमाणें ती त्याला गोव्याच्या स्वारीवर पाठवीत नाहीं.

हल्लींचा अदिलशहा बडे साहेबिणीच्या मृत नवऱ्याचा लेकवळा असतांनाहि त्यालाच राज्य मिळावें अशी तिची इच्छा आहे. परंतु कित्येक उमराव यामुळेंच त्याचेपुढें नम्र होण्यास नाखूष असून दरबारला जात नाहींत. **रुस्तुमजमा, बहलोलखान, शहाजी व शिवाजी हे ते होत. शिवाजी** उत्तरेचे बाजूला ससैन्य वावरत असून **चौल-पासून दाभोळपर्यंत** सर्व किनाऱ्याचा **स्वामी** झाला आहे.

शिवाजीवर या सालीं राणीनें १०००० घोडदळ व पायदळ देऊन **'अबदुल्ला खानाला'** पाठविलें. एवढ्या सैन्यानें शिवाजीशीं टक्कर देणें अशक्य, असें जाणून तिनें शत्रूशीं **मित्रत्वाचा बहाणा** करण्यास सांगितलें. त्याप्रमाणेंच तो वागला. शिवाजीला बातमी मिळाली म्हणून म्हणा, किंवा संशय आल्यामुळें म्हणा, त्यानेंहि स्नेहाचा आविर्भाव आणून आपल्या आईला ओलीस पाठवून आपल्याबद्दल विश्वास उत्पन्न केला. इतकें झाल्यावर अफजलखान पुढें आला. दोन्ही सैन्यें थोड्या अंतरावर राहिलीं. व हे दोघे थोड्या लोकांनिशीं एकमेकांना भेटून आलिंगन देण्याकरितां मिळाले. कांहीं वेळ उघडपणें बोलणें होऊन गुप्तपणें बोलणें होण्याची वेळ आली. शिवाजीनें आपल्या (हृदयाजवळ) अंगरख्यांत लपवून ठेवलेला खंजीर काढून अफजलखानाच्या छातींत खुपसला. त्यानें इशारत देतांच रजपूत, हिंदू आदिकरून लोकांचें बनलेलें त्याचें सैन्य मुसल-मानांवर तुटून पडलें. तीन हजार शत्रु पडले व इतर पळाले. शत्रूंचा पाठलाग करीत असतांनाच शिवाजीनें **पन्हाळा हस्तगत केला.** आम्हीं राहतों त्या कोल्हापुरापासून पन्हाळा आठ मैल आहे. पन्हाळा ही नाक्याची जागा असून अदिलशाही राजाचें महत्त्वाचें आश्रयस्थान होतें. त्यानें बंदरी व आंतील शहरेंहि काबीज झालीं. यामुळें पुष्कळ

बंदरांचे सुभेदार राजापूरला पळून येत आहेत. राजापूर **रुस्तुमजमाचे अधिकारांत आहे** आणि **रुस्तुमजमा शिवाजीचा स्नेही** असल्यामुळें राजापूरला शांतता आहे. **रुस्तुमजमा शिवाजीकडे** येत असून थोड्याच दिवसांत दोघे एकत्र होतील ! तसें झालें म्हणजे त्याचे गतसालच्या मागणीप्रमाणें आमच्याजवळील सर्व दारूगोळा पाठवूं. शिवाजीलाहि थोडा दारूगोळा पुरविण्याबद्दल त्यानें सांगितलें होतें. शिवाजीचे मनांत **दंडाराजपूर घ्यावयाचें आहे**. शहर आधींच त्याच्या ताब्यांत आलें आहे. तेव्हां या सधन किल्ल्यावर यशस्वी हल्ला करण्याकरितां आम्हीं आपलीं गलबतें नेऊन समुद्रांतून वेढा घातला तर तेथील संपत्तीपैकीं कांहीं व किल्ला बहुतेक तो आमच्या हवालीं करील ! आम्हीं हें सर्व शिजवून तयार ठेवतों.

एका महिन्यांत ही दंगल शांत होईल असें वाटतें. कारण **शि**वाजीचा बाप **शहाजी** दक्षिणेकडे आहे; तो १७००० सैन्य घेऊन आठ दिवसांत येईल अशी अपेक्षा आहे. तो राजधानी (विजापूर) वर चालून जाईल आणि तेथील सैन्य अपुरें असल्यामुळें **हें राज्य बुडेल.** आणि असें झालें तर रुस्तुमजमानें दिलेलीं वचनें–टांकसाळ, सोन्यावरील जकातींत सवलत, दंडाराजापूर किल्ला इंग्रजांना मिळवून देणें, हीं सर्व खरीं होण्यास वेळ लागणार नाहीं. आम्हांला अधिकार व साधनें आणि सुरतेला चांगला अध्यक्ष पाहिजे.

पिसुर्लें. शिवाजी. पृ. ४ इ. डिसें. २८ न्यू.	(७९२) गोवे गव्ह.–पोर्तु. बादशहा	श. १५८१ पौष शु. १५ इ. १६५९ डिसें. १८

आदिलशाही राज्यांत कित्येक सरदारांनीं बंडें उभारलीं आहेत. त्यांपैकीं एक **शिवाजी** नांवाचा असून तो बलिष्ठ झाला आहे व आदिलशाही मुलूख ताब्यांत घेण्याचें काम झपाट्यानें करीत आहे. असेंच जर चालत गेलें तर तो लवकरच विजापूरचें राज्य आपल्या ताब्यांत घेईल. **या शिवाजीला औरंगजेबाचा पाठिंबा आहे.**

इं. फॅ. भा. १० पृ. २१४ इ.	(७९३) सुरत–कंपनी	श. १५८१ माघ शु. ९ इ. १६६० जाने. १०

दंडाराजपुरींत बदमाष चांचे लोक राहतात व वाटेंत सांपडेल त्याला लुटण्याकरितां ते गलबतें बाळगतात. तेव्हां त्यांचा नाश करणें योग्यच आहे.

शि. प्र. पृ. १०५(३५) सु. १०६० जवल ८	(७९४) हातरोखा	श. १५८१ माघ शु. १० इ. १६६० जाने. ११

अज. दि. रा. दादाजी अनंत नामजाद महालानिहाय— ता मोक० वालवे.

५ जमादिलावलच्या खुर्दखताप्रमाणें वाळव्याच्या ब्राह्मणाचें इनाम चालवा.

फॅ. रे. राजापूर } (७९५) { श. १५८१ माघ शु. १५
पृ. १०३ इ. } { इ. १६६० जानेवारी १४

राजापूर, रोव्हिंगूटन इत्यादि वखारवाले-राजापूर मर्चटचा कॅप्टनः-आम्हीं जैतापुराहून आल्यापासून, आतां **शिवाजीचें सैन्य राजापुरांत** आहे. त्याच्या सेनापतीच्या मनांत काय आहे हें कांहींच समजलें नाहीं. आल्याच्या दुसऱ्या दिवशीं सकाळीं आपण होऊन आम्ही भेटीला गेलों तेव्हां 'आज संध्याकाळपर्यंत येऊं नये' असें त्यानें सांगितलें. आम्हीं दुसऱ्या दिवशीं सकाळीं जाण्याची इच्छा दर्शविली.

रत्नाकर १९२७ } (७९६) { श. १५८१
पृ. ६२३ ? } उल्लेख { इ. १६५९

अफजलखान यानें शिवाजीचे मसलतीवर येतांना बजाजी नायकास दस्त केलें व हत्तीच्या पायाखालीं मारणार तों नाइकजी राजे पांढरे यांच्या मध्यस्थीनें ६०००० होन घेऊन मोकळे केले. (श. १५९७ मार्ग. शु. ११ या मितीचा लेख पहा.)

सा. ले. ४६ } (७९७) { श. १५८१
सु. १०६० } समापत्र { इ. १६५९

माहादाजी राम व यादव केदार व विठल लुखदेव देसकु. पर. सिरवल यांचें

गलबलियाचा (प्रसंग) आहे. पादशाही सैन्य दुतर्फा आहे. (?) राजयास **शिवाजीस** सलियाखालीं आपला देश दिल्हियानें बरे वाईट होईल तें तिघांचें.

खं. १७ ले. ११ } (७९८) { श. १५८१
सु. १०६० } कौलनामा फा. मज. व सी. { इ. १६५९

अज सरसुभे **अफजलखान** महमदशाही

ताा विठोजी हैबतराऊ देसमु. तर्फ गुंजनमाऊल. तुमचे बाबे कृष्णाजी भास्कर येही बहूत तारीफ केली त्यावरून खातिरेसी आले. तुम्ही लोक कामाचे नामोसी. हा वख्त कामाचा. जरा अंदेशा न करितां जाउले जवळी देखील आपले लोक येऊन फर्मावतील तेबरहु. मसलहतेस सुशरीक होणे. मुजरा व सरफराजी होईल.

सा. ले. ४७ } (७९९) { श. १५८१
श. } भविष्य { इ. १६५९

पंढरपूर, तुळापूर, कोलापूर, रत्नलनाथ येथील मूर्ती फोडिली. विजापुरांत आलिपातशाय असतां अफलखान वजिरानें हें केलें. मार्गेशीर पंचमीस **शिवाजी** भोसला यानें महापापी अफजलखान मारिला. मार्गशीर वदि ७ शनिवारीं पनाळे घेतले. सिंहस्त बृहस्पती आला होता. पौष शु. १४ वाळव्यास शिवाजीच्या लोकांनीं तोरण बांधले.

इं. फॅ. १० } (८००) { श. १५८१ फा शु. ४
पृ. ३५४ इ. } { इ. १६६० फेब्रु. ४

राजापूर, (हेन्री रेव्हिंगटन, रँडॉल्फ् टेलर इ.)——सुरत

शिवाजीच्या सैन्याच्या हालचाली आमचेपासून जवळच होत असल्यामुळें आम्हांला त्या समजात. त्याला सारखें यशच येत असून किनाऱ्यावरील अनेक बंदरें त्याच्या ताब्यांत गेलीं आहेत. त्यांपैकींच **दाभोळ** हें एक असून तेथील सुभेदार (**महमूद शरीफ**)-त्या बंदरांत अफजलखानाचीं तीन गलबतें होतीं तीं बरोबर घेऊन—राजापुरास आला. येथें आल्यावर **अफजलखानाचा मुलगा फाजलखान** यानें आपलें सैन्य, या प्रांतावरील अधिकारी **रुस्तुमजमा** याच्या सैन्यांत मिळवून ते दोघे पन्हाळ्यावर असलेल्या **शिवाजीचे** सैन्यावर चालून गेले. त्यांनीं अफजलखानाच्या गलबतांवरील माल ताब्यांत घेण्याबद्दल राजापुरचा सुभेदार **अबदुल करीम** यास कळविलें. (हें सुभेदारानें स्वतःच सांगितलें.) **राजापुराहून** पन्हाळ्याकडे जातांना वाटेंतच उभय सैन्याच्या गांठी पडल्या. त्यांत **फाजलखान** अघाडीस होता. त्याच्या सैन्याचा धुव्वा उडाला; पुष्कळ लोक पडले, व नंतर त्याचा पाठलाग झाला. **रुस्तुमजमाचें** फार नुकसान न होतां तो हुकेरीवर मागें सरला. ही बातमी राजापुरास येऊन पोंचतांच येथील सुभेदाराची गाळण उडून तो आमचा हिशेब पुरा केल्याशिवाय पळून जाण्याचे तयारीस लागला. परंतु, त्याचा अधिकारी **रुस्तुमजमा** आमच्या माहितीप्रमाणें **शिवाजीचा दोस्त** असल्यामुळें खुद्द त्याचेकडून कळेपर्यंत तसें करूं नये, असें आम्हीं सांगण्याचा प्रयत्न केला. **'बडेसाहेबीण आणि रुस्तुमजमा यांचें रहस्य नाहीं**. फाजलखानाच्या बरोबर तो लढला ही गोष्ट केवळ वरवर धोरणाची होती. कारण, आतां **शिवाजी** त्याच्या अंगावरून विजापुरावर जात आहे तेव्हां त्याला काडीचाहि विरोध तो करीत नाहीं.'... ....इ. गोष्टी सांगण्याचा त्याच्यावर परिणाम झाला नाहीं.........आणि तो रात्रींच **दाभोळच्या** जहाजांवरून **जैतापूरला** गेला. लगेच आम्हीं आमचें गलबत पाठवून त्याला अडविला आणि आमच्या गलबतावर बोलाविला; निघून जाण्याचें कारण न सांगतां त्यानें १२००० होनांचा माल देऊन राहिलेलें देणें नंतर देण्याचें ठरविलें. **परंतु** इतक्यांत **राजापुरला** ५१६ शें व **जैतापुरला** २ शें अशीं **शिवाजीचीं** माणसें अफजलखानाचीं गलबतें ताब्यांत घेण्यास आलीं आणि तीं घेण्याचे कामीं आमची मदत मागूं लागलीं. तें आम्हीं नाकारलें. 'आम्हीं हिशेब पुरा करण्याकरितां आलों आहोंत; तें काम झाल्यावर तुम्हीं वाटेल तें करा.' असें सांगितल्यामुळें शिवाजीचे लोकांना राग आला. पण सुभेदारांना धीर वाटून त्यांनीं दोन तीन जहाजें आमचे ताब्यांत देण्याचें बोलणें लावलें. परंतु आमच्या राहिलेल्या रकमेची फेड होईपर्यंत फक्त एकच आम्हीं ताब्यांत घेतलें व तें इंग्रजांचें आहे, असा लेख शिवाजीच्या लोकांना दाखविण्याकरितां तयार केला. सुभेदाराच्या लोकांना इंग्रजांनीं वेंगुर्ल्याला पोंचवावें हें त्यांचें मागणें इंग्रजांना कबूल करतां येईना. कारण, शिवाजीला

त्याचा जाब द्यावा लागला असता. राहिलेलीं दोन गलबतें घेऊन त्यांनीं सुरत किंवा दुसऱ्या कोणत्या तरी मोंगली बंदरांत जावें ही आमची सूचना त्यांना अमलांत आणतां येईना. कारण गलबतावरील लोकांनीं शिवाजीचे नांवानें बंड करून गलबत ताब्यांत ठेविलें. या आपत्तीमुळें एक भाडयाचें जहाज करून रेव्हिंग्टनचें शिफारसपत्र घेऊन तो सुभेदार वेंगुर्ल्याला गेला आणि तेथें डचांच्या रक्षणाखालीं आहे.

हेनरी रेव्हिंग्टन किनाऱ्यावर उतरला; आणि शिवाजीच्या माणसांना झालेल्या व्यवहाराची माहिती देऊन 'आपण व्यापारी असल्यामुळें कोणतीहि बाजू घेणें इष्ट नाहीं' वगैरे सांगून राजापूरला गेला... ... ...

गलबत परदेशांत व्यापाराकरितां पाठविण्यास आमचेजवळ पैसा नाहीं; इत्यादि विचार करून आम्हीं राजापूरला परत आलों. तों (शिवाजीच्या) सेनापतीला आमच्याशीं बोलणें करावयाचें आहे असें समजलें. सकाळीं रँडॉल्फ टेलर गेला. सुभेदाराबद्दल विचारणा झाली. तो निघून गेल्याचें नक्की सांगण्यांत आलें. मोंगली गलबतें ताब्यांत घेण्याचें आम्हीं साफ नाकारलें. मग आमचे ताब्यांतील गलबत आणि माल त्यानें मागितला. मालाचे पैसे देण्याचें त्यानें वचन दिल्यावरून आम्हीं फक्त माल देण्यास कबूल झालों. परंतु त्या बाबतींत नक्की लिखाण व्हावयाचें राहिलें. पुढें दंडाराजपूरचा किल्ला, खजिना इत्यादि घेण्यांत शिवाजीला इंग्रजांनीं मदत करण्याबदल बोलणें निघालें. तेथून आम्हीं जैतापुरास गेलों. शिवाजीचे नांवानें बंड करणाऱ्या गलबतांच्या लोकांनाहि शिवाजीचे लोक आपल्या बायकापोरांची अब्रु घेतील अशी भीती वाटून, फिरून एकमत करून मराठयांच्या डोळ्यादेखत दोन्ही किनाऱ्यांवरील मराठयांच्या बंदुकांच्या माऱ्याच्या पलीकडे जाऊन त्यांनीं नांगर टाकिला. मराठयांनीं चिडून जैतापुरांतील आमचे दलालांना पकडलें. त्यांना सोडलें नाहींतर तोफा डागण्याची आम्हीं दहशत घालतांच दलालाला पुढें घालून ते एका टेकडीकडून पळाले. थोडा पाठलाग करून आम्हीं गिफर्ड आणि एक कप्तान, दलालाला परत पाठवा म्हणून सांगण्यास पाठविला. तों त्यांनीं गिफर्डलाहि गिरफदार करून कप्तानाचे हातीं 'पुढें येऊं नका' असा इशारा दिला. आणि रात्रीं २०० शिपाई घेऊन ते खारेपाटणाकडे गेले. तेथून गिफर्डचें पत्र आलें आहे. गलबतें आणि माल मराठयांचे हवालीं केल्याशिवाय ते कैदी सोडण्यास तयार नाहींत. याबद्दल तुम्हीं आपलें मत द्यावें.......आमचे लोक कैदी झाले तरी हरकत नाहीं. ते त्यांना फारतर किती दिवस ठेवतील ? शिवाजीकडून आम्हीं सुटकेचें पत्र आणून लावी पर्यंत ! शिवाजी इतका मोठा आणि उदार आहे कीं असल्या अन्यायाच्या सबबीवर हे कैदी ठेवणार नाहीं...अन्यायानें मराठ्यांचें मागणें मान्य केलें तर आपल्या राष्ट्राचें नांव बदूदू होईल...पत्र घेऊन जाणारे शिपायांना भितात...परंतु हा धीटपणानें रस्ता काढील ! महिन्याचे आंत इकडील दंगल कमी होईल.'

[हें पत्र १० दिवसांत पुनः राजापूरलाच परत आलें. आणि त्याला आणखी पुरवणी लिहून तें १५ फेब्रुवारीला पुनः रवाना झालें.]

इं. फॅ. १० }
पृ. ३५८ इ. }
(८०१)
{ श. १५८१ फा. शु. १३
{ इ. १६६० फेब्रु. १२

राजापूर, हेन्री रेव्हिंगटन्——**शिवाजी हिंदुसेनाधिपती**

दंडाराजपूरप्रकरणीं आपल्याकरितां इंग्रजांनीं किती दोस्तीचें वचन दिलें आहे हें दोरोजी व इतर अधिकाऱ्यांनीं कळविलेंच असेल. तुमचे लोकांकडून आम्हांला किती त्रास झाला आहे हें सांगतां पुरवत नाहीं. परंतु कृपा करून इतकेंच लक्षांत घ्यावें कीं (राजापूर बंदरांत असलेलीं गलबतें मराठ्यांच्या ताब्यांत देऊन) आमचे मित्रांचें शत्रुत्व आम्हीं पत्करलें नाहीं एवढ्याकरितां एक दलाल आणि एक इंग्रज ह्यांनीं २५ दिवसपर्यंत कैदेंत ठेविले ! दलाल सोडून दिला. परंतु इंग्रजाला खारेपाटणांत अडकवून ठेविला आहे ! आम्हांला यानें खेद होत असून इतर व्यापाऱ्यांना सर्वत्र दहशत बसून व्यापाराला धक्का बसला आहे. आपण हुकूम पाठवून आमचा माल व मनुष्य परत घाल अशाबद्दल खात्री असल्यामुळें धीर धरून आहोंत.

फॅ. रे. राजापूर }
पृ. १०८ इ. }
(८०२)
{ श. १५८१ फा. शु. १३
{ इ. १६६० फेब्रु. १३

राजापूर (रेव्हिंगटन्)——**फाजलखान** अबदलखान.

हें पत्र हातीं येण्यापूर्वींच दाभोळचा सुभेदार महमद शेरीफ यानें सर्व हकीकत कळविलीच असेल. त्यांतून हें तुमचें हातीं पडेल अशी खात्री नाहीं म्हणून थोडक्यांत लिहितों. हातीं पडेल तर कृपा करून विश्वास धरा कीं, आम्हीं तुमचे दोस्त आहोंत. आम्हीं असें ऐकिलें आहे कीं, आमचा दोस्त रुस्तमजमा व तुम्ही सैन्यें एकत्र करून शत्रूवर गेलां. म्हणून दाभोळचे सुभेदाराचे म्हणण्याप्रमाणें आम्हीं वागलों. शिवाय तुमच्या सारख्या दोस्तांशीं लढणें आणि तुमचीं गलबतें शत्रूच्या हवालीं करणें हें आमच्या धर्माच्या विरुद्ध होतें. परंतु असें वागल्यामुळेंच **शिवाजीच्या** लोकांनीं आमचा एक माणूस दलालासह जुलमानें कैद करून नेला आहे. परंतु आतां आमचा कांहीं उपाय नाहीं. कारण तुम्हीं मोठ्या कामांत गुंतलां आहां. तथापि लवकरच शांतता होऊन तुमच्या देशाचें बरें होईल अशी आशा करून आहोंत.

फॅ. रे. राजापूर }
पृ. १०८ इ. }
(८०३)
{ श. १५८१ फा शु. १३
{ इ. १६६० फेब्रु. १३

राजापूर, हे. रेव्हिं.—— **रुस्तुमजमा**

इंग्रजांच्यामुळें राजापूरला व्हावयाचा लाभ तुमच्या उत्तेजनामुळें होऊं लागलाच

आहे. परंतु दुर्दैवानें मध्यंतरीच्या धामधुमीमुळें इतक्यांतच अडथळा झाला आहे. आपला माहालदार येऊन आपलाच अधिकार चालू राहिल्याचें कळून आनंद झाला. आम्हीं राजापूर सोडून जाणार नाहीं असा आमचा निश्चय आहे. तुमचा सुभेदार अबदुल करीम सोडून गेला हें वाईट झालें. त्यानें झालेल्या गोष्टी तुम्हांला कळविल्याच असतील. त्यामुळें आपल्याला समाधानच वाटलें असेल. इतरांनाहि असमाधान वाटण्यासारखें त्यांत कांहीं नाहीं. तुम्ही आमच्या दोस्तीबद्दल खात्री ठेवावी; आणि आम्हांला तुमचे नोकर असें समजून आमचा एक कैदी खारेपाटण किल्यांत ठेविला आहे तसें होऊं देऊं नये. फाजलखानाचीं गलबतें आणि तुमच्या हिशेबाच्या भरपाई करितां दिलेला ११७१३/४ हो.चा माल आम्ही शिवाजीचे लोकांच्या ताब्यांत देण्यास तयार झालों नाहीं. एवढेंच कायतें कारण झालें. याबद्दल **शिवाजी आम्हांला त्रास द्यावा, असें कधींच सांगणार नाहीं,** अशी आमची खात्री असल्यामुळें त्याला आम्हीं लिहिलें आहे. तुम्हींहि आपला एक मनुष्य हें पत्र घेऊन त्याचेकडे पाठवावा अशी विनंति आहे. दुसरें पत्र फाजलखानाकरितां पाठविलें आहे. तुम्हीं वाचून पाहून जरूर वाटल्यास त्याचेकडे पाठवावें. कारण तुमचे दोस्त ते सर्व आमचे दोस्त असें आम्हीं समजतों. इतरांचे आधीं आम्हांला कामकाज लिहावें कारण तुमची आमची दोस्ती आहे. इ०.

इं. फॅ. १० पृ. ३५८ इ.	(८०४) राजापूर-सुरत	श. १५८१ फा शु. १४ इ. १६६० फेब्रु. १५

४ फेब्रु. चे पत्रास ताजा कलमः— **गिफर्ड** समवेत गिरफदार झालेल्या आमच्या दलालानें **रुस्तुमजमा** व **शिवाजी** यांस पत्र पाठविलें. रु. जमाचा अधिकारी व शिवाजीचा एक अधिकारी असें येऊन त्यांनीं राजापुरांत कांहीं घेतलें असेल तें व कैदी सोडून देण्याचा हुकूम दिला. यामुळें दलाल परत आला. परंतु खंडणीच्या आशेनें एका लबाड ब्राह्मणानें **गिफर्डला** खारेपाटण किल्यावरच ठेविलें आहे. पुनः आम्हीं उभयतांना लिहिलें आहे. **कारण ते खात्रीनें दोस्तच आहेत.** तेव्हां या लबाडाला बक्षिसी मिळेल असें वाटतें. **कैदी घेऊन जाणारा सेनापती दोरोजी** याला अपराधाबद्दल असेंचें प्रायश्चित्त मिळालें !

फॅ. रे. राजापूर पृ. ११३ इ.	(८०५) राजापूर-सुरत	श. १५८१ फा व.४ इ. १६६० फेब्रु. २०

मि. **गिफर्डला** कैद होऊन एक महिना झाला...**रुस्तुमजमाचा** नोकर राजापूरच्या जकातनाक्यांत येऊन बसतो. **शिवाजीनें** शिपायांनीं नेलेल्या सर्व वस्तु परत देण्याबद्दल हुकूम केला...

इं. फॅ. १० } (८०६) { श. १५८१ फा। व. ७
पृ. ३५९ इ. } राजापूर-सुरत { इ. १६६० फेब्रु. २३

खारेपाटण किल्यांत गिफर्डला आम्ही खाणें व पाणी पुरवीत होतों. मागचे पत्रानंतर गिफर्डनें पत्र पाठविलें. त्यावरून खारेपाटणच्या हवालदाराच्या मनांत त्याला तेथून काढून सातवळी किंवा खेळणा किल्यावर पाठविण्याचें आहे असें कळलें. त्यांचा रस्ता कळल्यामुळें ३० शिपायांनिशी जाऊन गिफर्डला सोडवून आणलें. त्याचे रक्षणाकरितां २५ शिपाई बरोबर होते.

सा. ले. ३४२ } (८०७) { श. १५८१
श. } कौल नकल म. मु. व सी. { इ. १६५९-६०

सूर्याजी राजे प्रभानवलीकर— केसो नारो व नारो आतो पाध्ये. धर्मा. ज्योति. व अष्टा. तर्फ संगमेस्वर वगैरे

तुमची मिरासी पिढी दर पिढी चालत आहे. बादशाही फर्मान व ठाणाची मिसेली याप्रमाणें तुम्हास मिरासीचा कौल दिल्हा असे.

खं. २१ ले. ५९ } (८०८) { श. १५८१
सु. १०६० } मिसेली फा. मु. व सी. { इ. १६५९

अज दि. पर. कऱ्हाड——ता मोक. मौ. कोपर्डे खुर्द
नरहरिभट गिजरे यास फर्मानाप्रमाणें इनाम चालू ठेवणें.

सं. ३ पृ. १३९ } (८०९) {
} बेचनपत्रक {

रंगभट बिन जगमैत्र पिरंगूटकर मौ. पिरंगूट तर्फ मुठेखोरे——रा. बालाजी हरी मेंडजोगी.

मौ. पिरंगूटचें कुळकर्ण आपली मिरासी, तें तुम्हांस विकिले. [कुळकर्णाचे हक लवाजिमे यांची गणना यांत आहे].

पिसुर्ले. शिवाजी पृ. ५ } (८१०) { श. १५८२ चैत्र शु. ११
इ. न्यू. } गोर्वे गव्ह.—पोर्तु. बादशहा. { इ. १६६० मार्च १२

सरदार शहाजीचा पुत्र शिवाजी हा सध्यां विजापूरजवळ असून विजापुरकरांच्या सरदारांशीं त्याचें युद्ध चालू आहे. त्यांत त्यानें कांहीं सरदारांचा पराभव केला असून त्यांचे बरेच शिपाई व घोडे ठार केले. चौलपासून गोव्यापर्यंत सर्व मुलूख शिवाजीच्या ताब्यांत आहे. त्यानें ह्या मुलुखांतील पुष्कळ शहरें व समुद्रकांठचीं बंदरें काबीज केलीं आहेत; तशीच बरीच संपत्तिहि मिळविली आहे. विजापूरचा आदिलशहा हा

त्याच्याविरुद्ध लढाईची तयारी करीत आहे. पण ती पूर्ण होईल कीं नाहीं यात्रिषयीं शंका आहे. कारण एकतर त्याच्या राज्याची अव्यवस्था व दुसरें, शिवाजीनें त्याचे हुषार व वजनदार सेनापति सर्व मारले आहेत. हल्लींचा विजापूरचा राजा हा दासीपुत्र आहे व त्यामुळें शिवाजी विजापूरच्या तक्तावर दुसरा एक राजपुत्र बसविणार आहे; अशाबद्दलची एक अफवा येथें उठली आहे.

इं. फॅ. १० }
पृ. ३६४ इ. }
(८११)
राजापूर–सुरत
{ श. १५८२ चैत्र व. ३
{ इ. १६६० मार्च १९

रुस्तुमजमा शिवाजीचा स्नेही असल्यामुळें त्याचें मूळचें **राजापूर** शहर अद्याप त्याचेकडेच आहे. शिवाय **शिवाजीनें** त्याला आणखी दोनतीन शहरें दिलीं आहेत. या सर्वांवर अबदुल करीम पुनः सुभेदार म्हणून आला आहे. त्याचेबरोबर १०० शिपाई आले...........[कांहीं देण्याघेण्याचे बाबतींत स्थानिक व्यापाऱ्यांशीं बिनसल्यामुळें त्यानें इंग्रजांचें गलबत ताब्यांत घेतलें व इतरहि त्रास दिला] ---आम्हीं रुस्तुमजमाला लिहिलें आहे. परंतु शिवाजी आणि तो मिळाले आहेत. मोठ्या गोष्टींचा विचार करीत असतांना असल्या क्षुल्लक गोष्टींकडे लक्ष कोठून लागणार? शिवाय **शिवाजीचे** ३।४ हजार लोक **सर्व किनाराभर फिरत आहेत** हें आम्हीं पाहतों. शहरें घेणें हा उद्देश नसून केवळ सैन्याचे पोषणाकरितां हें सैन्य पैसा जमवितें! रुस्तुमजमाहि असेंच करील असा संभव आहे...रुस्तुमजमानें न भिण्याबद्दल पत्रें लिहिलीं आहेत. परंतु सुभेदारानें त्याला पैसा दिल्यास 'तूं हा कसा मिळविलास' अशी चौकशी कोणींच करणार नाहीं!......कंपनीचा **दारुगोळा रुस्तुमजमाला** विकला तर कंपनीला पुष्कळच नफा होईल. परंतु **राजा**पूरच्या जकातींतून तो किंमत देणार. तसा माल त्याला विकावा काय?...पत्रांच्या अदलाबदली होतात...एकदां रुस्तुमजमाचें आमच्याकडे आलेलें पत्र शिवाजीच्या शिपायानें पकडून नेलें...त्याला त्याबद्दल शिक्षा झाली.

हेगसंग्रह }
डचपत्रव्यवहार }
(८१२)
{ श. १५८२ वैशाख
{ इ. १६६० एप्रील

वेंगुर्ला येथील डच वाकनीस-गव्हर्नर जन.: ज्या **शहाजीनें** इ. १६५७ मध्यें सद्रंपट्टण येथील (डच) कंपनीचें ठिकाण जबरदस्तीनें ताब्यांत घेतलें व कंपनीच्या नोकरांना कैदेंत ठेवलें; त्या वयोवृद्ध शहाजीचा मुलगा **शिवाजी याला** विजापूरचा माजी सुलतान **महमद** आदिलशहा यानें आपल्या हयातींत **नोकरींत घेतलें होतें.** गेलीं १०।१२ वर्षें त्यानें राजसत्तेविरुद्ध बंडाळी चालविली आहे; त्यांतच त्यानें **चौल** वसईच्या बाजूचा मुलूख ताब्यांत घेतला. तेव्हां त्या ठिकाणीं त्याला पुष्कळसे अनुयायी मिळाले. यामुळें त्याला रणांगणांत जबरदस्त सैन्य आणणें शक्य झालें. तेव्हांपासून त्यानें

कित्येक महत्वाचे किल्ले घेऊन व्यापाराच्या पेठया लुटल्या. हा त्याचा क्रम अद्याप चालूंच आहे. अली आदिलशहाला हा प्रकार असह्य वाटून त्यानें सेनापती अबदुलखान याला मोठ्या सैन्यानिशी त्याच्यावर पाठविलें. 'या शिवाजीला शस्त्राच्या जोरावर तरी नाहींसा करा किंवा गोड शब्द व सलोख्याचीं अघळपघळ अभिवचनें देऊन तरी त्याचा जीव घ्या' असा स्पष्ट हुकूम बादशहानें दिला व तो खानाला (शिवाजीला?) दरबारांतील एका अत्यंत वजनदार गृहस्थामार्फत कळ(वि)ला. इकडे आपलें डोकें मारण्यासाठींच या खानाची रवानगी झाली असली पाहिजे व त्याच्या शब्दावर विश्वास ठेवणें योग्य नाहीं, हें शिवाजीनें पक्केपणीं ओळखलें होतें. खानाशीं मोठ्या सैन्यानिशी सामना देण्याचें शिवाजीनें योजलेंच होतें; पण थोडी चकमक उडाल्यानंतर पळाल्याचा देखावा शिवाजीनें दाखविला. त्यानें आपल्या सैन्यांत अशी अफवा पसरली कीं 'अफजलखानानें शत्रूविरुद्ध कितीतरी वेळां मोठमोठे विजय मिळविले आहेत; तेव्हां त्याच्यापुढें आमचा निभाव लागणार नाहीं आणि मी तर अगदीं भिऊन गेलों आहे.' ही बातमी पसरत पसरत अबदुलखानाच्या कानावर गेली व मुसलमानी पद्धतीप्रमाणें तो फुशारकी मारूं लागला. या अफवाप्रमाणें आपण खरोखरच भ्यालों हा समज दृढ करण्यासाठीं शिवाजीनें आपली आई* व दासी यांना खानाकडे पाठविलें. त्यांनीं अशी विनवणी केली कीं, आमच्या मुलास तुम्हीं वाईट रीतीनें वागवूं नये किंवा भीती दाखवूं नये. कारण तो घाबरून गोंधळला म्हणजे काय करावें आणि काय न करावें असें त्याला होऊन जाईल; त्याच्यावर तुम्ही मेहेरनजर करा. म्हणजे विजापूरकरांचे जे २३ किल्ले शिवाजीनें घेतले आहेत ते तो तुम्हांला देऊन टाकील; तो आपल्याकडे फक्त ४ किल्ले ठेऊन घेईल आणि आपलें उत्पन्न आहे त्यावर सुखासमाधानानें राहील. हें ऐकून अफजलखानानें शपथ घेऊन सांगितलें कीं 'मी शिवाजीस यत्किंचित् इजा पोचविणार नाहीं; उलट विजापूरच्या बादशहाची मर्जी त्याच्यावर होईल असें करतों.' हें वर्तमान समजल्यावर शिवाजीनें तावडतोब पत्र पाठवून कळविलें कीं "माझ्या मनाचें पूर्ण समाधान झालें. आतां माझी विनंति अशी आहे कीं, आपण जावलीस यावें; म्हणजे चार लोकांनिशी मी भेटीस येऊन नम्रपणें किल्या अर्पण करीन." याप्रमाणें सर्व गोष्टी पदरांत पाडून घेण्यासाठीं अबदुलखानानें तेथें जाण्याचें ठरविलें. इतक्या सरळपणानें बंडखोर व लबाड अशा शिवाजीच्या भेटीस खानानें जाऊं नये, अशा अर्थाचा सल्ला तिघांनीं दिला. पण त्याचा उपयोग झाला नाहीं. हे उभे सुळके, खडे डोंगर आणि दुर्गम वाटा यांमधून निबिड अरण्यांत तो बोलावतो त्या अर्थी यांत कांहीं तरी दगाबाजी असली पाहिजे, असें या सल्लागारांनीं सुचविलें; पण खानानें त्यांना कडक

* यावरून शिवकालीन परकीय लोकांना मराठ्यांच्या अंतर्गत व्यवहारासंबंधींच्या बातम्या किती विपर्यस्त व चुकीच्या स्वरूपांत पोंचत व त्यांना त्या खऱ्या वाटत हें लक्षांत येण्याजोगें आहे.

रीतीनें शिक्षा केल्या. एकाचें नाक कापलें, दुसऱ्याला जिवंत पुरलें आणि तिसऱ्याला असें उत्तर दिलें कीं, **'मी रुस्तुमजमाप्रमाणें मोठ्या कुळांत जन्म पावलों नसलों** तरी मी शूरांच्या पद्धतीनें चालणारा आहे.' नंतर तो निवडक ७ हजार घोडेस्वार घेऊन ठरल्या ठिकाणीं गेला. शिवाजीच्या प्रमुख लोकांनीं त्याला एका नवीन उभारलेल्या व उत्तम प्रकारें शृंगारलेल्या सदरेंत नेलें; या समोर दुसरी एक सदर शिवाजीसाठीं अशीच शृंगारलेली होती. इकडे त्या थकल्याभागल्या घोडेस्वारांकडे शिवाजीनें पुष्कळसें शिजविलेलें अन्न पाठविलें; तेव्हां खालीं उतरून घोडेस्वारांनीं जेवणास प्रारंभ केला. शिवाजीनें अंगांत चिलखत घातलें होतें; आपला हेतु तडीस नेण्याच्या उद्योगास तो ताबडतोब लागला. त्यानें अशी विनंति केली कीं 'मी सेनापतीला किल्ल्या अर्पण करणार; आणि आजपर्यंत केलेल्या अपराधाबद्दल माफी मागण्यासाठीं मी पाया पडणार.' नाहीं, होय, करीत खानानें या गोष्टीस परवानगी दिली. तेव्हां त्या बंडखोरानें एका गुप्त हत्याराच्या योगानें खानाच्या पोटावर असा मारा केला कीं, त्याचा कोथळा बाहेर पडला. यानंतर तो ताबडतोब पळून गेला. त्याचा पाठलाग करण्यांत आला पण कांहीं उपयोग झाला नाहीं. जावळीच्या किल्ल्यांत जाऊन त्यानें आपला बचाव केला. इकडे खानाच्या लोकांनीं त्याला पालखींत घातला; पण शिवाजीच्या एका सैनिकानें अशा रीतीनें मारा केला कीं खान गतप्राण झाला. विजयदर्शक तोफेची इषारत देतांच शिवाजीच्या ६ हजार पायदळानें व २ हजार घोडदळानें (हें सैन्य वर सांगितलेल्या जागीं झाडींत छपवून ठेवलें होतें.) बाहेर पडून खानाचें बरेंच सैन्य कापून काढलें; त्या वेळीं जे पळून गेले तेवढेच काय ते वांचले. या पळून जाणाऱ्यांत खानाचा वडील मुलगा होता; पण त्याचे २ भाऊ, रुस्तुमजमाचा एक भाऊ या शिवाय आणखी कांहीं प्रतिष्ठित लोक पाडाव सापडले त्यांना कैद करण्यांत आले. या लोकांची प्रथम अप्रतिष्ठा झाली; पण आतां त्यांना योग्य रीतीनें वागविण्यांत येत आहे. यानंतर विजापूरच्या सैन्याचा नाश करावा आणि इषारा देऊन देखील पळून जाणार नाहींत त्यांच्यावर गोळीबार करावा असा शिवाजीनें हुकूम सोडला. त्यावेळीं बरेच लोक कापून काढण्यांत आले. अबदुलखानाचा खून पाडल्यानंतर शिवाजीनें विसावा न घेतां जे अनेक किल्ले लबाडीच्या मार्गानें ताब्यांत घेतले त्यांतच दुर्गम असा **पन्हाळा** किल्ला होता. शिवाय विजापूरकरांच्या राज्यांतल्या अनेक व्यापाराच्या पेठा त्यानें घेऊन थेट विजापूरच्या आसपास तो थोड्याच वेळांत पोहचला. नंतर विजापुरापासून दोन तीन दिवसाच्या मजलीवर असलेल्या **रायबाग** नांवाच्या पेठेच्या गांवीं तो आला. त्या गांवांतील प्रमुख लोकांशीं गुप्तपणें पत्रव्यवहार झाला होता. बडी साहेबिणीनें जर पाटगांवाहून ताबडतोब एका दिवसाच्या मजलीवर असलेल्या या ठिकाणाकडे चांगली सैन्याची तुकडी पाठविली असती तर शिवाजीला आपला बेत सिद्धीस नेता आला नसता. या सर्व प्रकारामुळें विजापुरास एकच गोंधळ माजून राहिला आहे. विजापूरच्या राजानें रुस्तुमजमा यास ताबडतोब मोठ्या सैन्यानिशी "जाऊन या बंड-

खोरास थांबविण्याविषयीं व त्याच्यावर हल्ला चढविण्याचे पराकाष्ठेचे प्रयत्न करण्याविषयीं हुकूम दिला होता. इकडे रुस्तु. च्या सैन्याचा चोंहोकडून कोंडमारा झाला होता. हें ओळखून शिवाजीनें त्याच्यावर तडाखा मारून यश मिळविलें. या चकमकींत रुस्तुमजमाचे १५ हत्ती, १००० घोडे व पायदळ खर्ची पडले; व त्याला आपल्या जहागिरीच्या ठिकाणाकडे परत जावें लागले. यानंतर त्या बंडखोरास दुसऱ्यांदा जय मिळाल्यामुळें स्फुरण चढलें व तो सैन्यानिशीं विजापूरच्या वाटेनें निघाला व दोन अडीच मजली गेल्यावर वाटेंतलीं बरींच गांवें त्याला विरोध न होतांच हस्तगत करतां आलीं. मिरजेचा किल्ला मात्र त्याला ताब्यांत घेतां आला नाहीं, कारण तेथील लोक शौर्यानें लढले; यामुळें शिवाजीला तेथें वेढा द्यावा लागला. इकडे विजापूरच्या राजानें पराकाष्ठेचे प्रयत्न करून १६ ते २० हजार घोडेस्वार व ३५ ते ४० हजार पायदळ जमविलें व हें सैन्य शिद्दी जोहाराच्या हाताखालीं देण्यांत आलें; आणि तिसऱ्यांदा युद्धाचा प्रसंग आणिला. हें जेव्हां शिवाजीला समजलें तेव्हां त्यानें वेढा उठवून पन्हाळ्याच्या रोखानें चालण्यास सुरवात केली; व चोंहीकडे पांगलेलीं सैन्यें एकत्र जमविण्याचा उद्योग आरंभिला; यावेळीं त्याचें सैन्य विजापूरच्या सैन्याइतकें बळवान आहे असा समज होता. नंतर ज्या ठिकाणांचें संरक्षण करतां येण्याजोगें नव्हतें ते गांव शिवाजीनें सोडून दिले व ते रुस्तुमजमानें ताब्यांत घेतले. यावरून असें स्पष्ट दिसतें कीं ४० हजार होन घेऊन रुस्तुमजमा अंतस्थ रीतीनें शिवाजीला सामील आहे. यामुळें रुस्तुमजमा जरी वरपांगी बादशहाचा नोकर व मित्र म्हणवितो तरी त्याच्यावर बादशहाचा बिलकुल विश्वास नाहीं. हा रुस्तुमजमा हुकेरीलगत राहिला; अशा करतां कीं, तीन वाटांच्या संगमावर राहून वेळ पडेल त्याप्रमाणें युद्धाच्या बदलत्या परिस्थितीचा फायदा घेतां यावा. वर सांगितलेल्या सैन्यांचीं अद्याप तोंडास तोंडें भिडलीं नाहींत. तथापि शिवाजी हा पक्का लबाड असल्यामुळें तो वाटेल ते उपाय योजून शिद्दीजोहार व त्याच्याबरोबर आलेले नामांकित सरदार यांना पैसे देऊन अगर इतर फायद्याचें अभिवचन देऊन वश करून घेईल असें आम्हांला निश्चितपणें वाटतें, कारण ही वेळ निभावली म्हणजे विजापूरचा बादशहा पुनः या उद्योगांत पडणार नाहीं हें शिवाजी जाणतो. शिवाजी हटत आश्रयार्थ ज्या किल्यांत गेला होता त्या पन्हाळा किल्यानजीक सिद्दीजोहार येऊन पोचला. इकडे शिवाजीनें दुसऱ्या रस्त्यानें ४१५ हजार घोडेस्वार विजापुराकडे पाठविले. त्या सैन्यानें अचानकपणें विजापूरनजीकच्या शहापुरावर रात्रीं हल्ला केला व तें ताब्यांत घेतलें; आणि यथेच्छ लुटलें. यामुळें दरबारांत विलक्षण धांदल उडाली. पण त्यांना असें समजलें कीं, शत्रूचें सैन्य फारसें मोठें नाहीं. तेव्हां वेंगुर्ल्याचा जहागीरदार खवासखान याच्या हाताखालीं राजधानींत शिल्लक असलेले ५ हजार घोडेस्वारांचें पथक बादशहानें शिवाजीच्या घोडदळाशीं लढण्याकरितां पाठविलें. या सैन्यानें अशा रीतीनें हल्ला चढविला कीं, यांत कोणाची सरशी होईल हें ठरविणें कठिण होतें. पण बादशाही सैन्यानें इतका जोर केला

कीं शेवटीं शिवाजीच्या लोकांना बरीच हानी पत्करून सहा मैल हटावें लागलें. विजापूरवरील या अचानक हल्ल्याचें वर्तमान कळल्यामुळें अली आदिलशहाच्या सुरक्षिततेसाठीं तो सेनापती ४।५ हजार घोडेस्वारानिशीं विजापुरास परत आला आहे.

यानंतर थोड्याच दिवसांनीं असें समजलें कीं, शिद्दीजोहारानें ४०० पायदळ, कांहीं घोडेस्वार व पांच पालख्या राजापुरास पाठविल्या व विजापूरच्या राजास इंग्रजांनीं मदत केली पाहिजे असें बोलणें लावलें. त्यावेळीं इंग्रजांकडे तेथें दोन तोफा होत्या त्या त्यांना आपल्या इच्छेविरुद्ध सिद्दीजोहाराच्या ताब्यांत धाव्या लागल्या. मात्र प्रत्यक्ष किती इंग्रज इसम शिद्दीजोहाराकडे मदतीस गेले हें तेवढें समजलें नाहीं.

येथवर वर्णन केलेल्या बंडाळींत देसाई लखम सावंत याचीहि कामगिरी जमेस धरण्याजोगी आहे...... खवासखानानें वेंगुर्ल्यांकडे काजी (Chasi) अबदुला नांवाचा पाठविला तो १४ फेब्रुवारीस (फाल्गुन शु. ४) दाखल झाला. इकडे शिवाजीच्या लोकांनीं कोकण प्रांतांत शिरून दाभोळ ते कुडाळपर्यंत मजल मारली. तेव्हां देसाई लखम सावंत यानें बांदा व वेंगुर्ला या भागाचें संरक्षण करण्याचा निश्चय केला. या कामीं संभोवारचे बरेच देसाई त्याला सामील झाले व ४ हजार सैन्यानिशीं तो फेब्रुवारीच्या प्रारंभीं कुडाळास आला. पण शिवाजीचे लोक तेथें येतांच लखम सावंतास त्याच्या सोबत्यांनीं सोडलें व तो परत सैन्यानिशीं वाडीस गेला. तेव्हां शिवाजीच्या लोकांनीं कुडाळचा किल्ला ताब्यांत घेतला. त्यानंतर लखम सावंतानें पुन: सभोवारच्या देसायांना जमवून मार्चच्या १७-१८ तारखेस कुडाळावर रात्रीं हल्ला केला; पण शिवाजीच्या लोकांनीं दाद दिली नाहीं; मात्र आपल्या जवळची दारू संपली हें लक्षांत घेऊन शिवाजीचे लोक सकाळीं कुडाळांतून मारामारी करीत बाहेर पडले व पळून गेले. यामुळें लखम सावंत गर्वानें फुगून गेला आहे व आपलें नांव आदिलशाही दरबारांत गाजेल असें त्याला वाटतें.

लखम सावंताप्रमाणें आचऱ्याच्या राजानें देखील शिवाजीशीं शत्रुत्व जाहीर करून तिकडील बंदरांतून शिवाजीच्या लोकांना घालवून दिलें आहे. या सुमारास रुस्तुमजमाची स्वारी तेथें येऊन पोचली; आणि त्यानें विजापूर दरबाराकडे लिहून पाठविलें कीं शिवाजीच्या सैन्यावर जो नुकताच जय मिळविला तो माझ्या हुकमानें व माझ्या सहायानें मिळविण्यांत आला. पुढें रुस्तु. नें कुडाल व फोंडा हे किल्ले ताब्यांत घेतले व (Chamier) खा(शा)मीर यास सुभेदार नेमून त्याजकडे लखम सावंताशीं लढण्याचें काम सोंपविलें आहे. यामुळें कोंकणांत पुनः धांदल उडाली आहे. रुस्तु. व शामीर हे पोर्तुगीजांशीं स्नेहभावानें वागणारे आहेत. यामुळें त्यांची आमच्यावर (डचांवर) वक्रदृष्टी होण्याचा संभव आहे.

इं. फॅ. १० }
पृ. ३७०,३७१ इ. } (८१३) { श. १५८२ वैशाख शु. ६
{ इ. १६६० एप्रिल ५

राजापूर—हेन्री रेव्हिंगटन (पन्हाळ्याचे मार्गावर):—[सिद्दीजोहारकडून तोफ व दारूगोळा पुरविण्याबद्दल अनुकूल उत्तर आल्यावर रे०हिं०२ एप्रिलला रायपाटण, अणस्कुरा मार्गानें पन्हाळ्याकडे निघाला होता]...माहालदार सुभेदाराला सुलतानाचा हुकूम घेऊन आला आहे कीं, **सिद्दीजोहरकडे** तोफ व दारूगोळा (तो सांगेल त्या ठिकाणीं) सुरक्षित पोंचविण्यासाठीं इंग्रजांना मदत करावी......पण त्याचा कांहीं उपयोग नाहीं. वाहतुकीची तजवीज आपणच केली पाहिजे... ...**रुस्तुम**जमाला दिलेली एक तोफ व ४ गोळ्यांची पावती मागितली पण सुभेदार टाळाटाळी करितो....काल रुस्तुमजमाचीं माणसें सुभेदाराकडे आलीं. तुम्हीं प्रथम सिद्दीजोहारला लिहिलेल्या पत्राची नकल त्यांनीं सुभेदाराला आणून दिली...रुस्तुमजमाला कबूल केलें असतांना दारूगोळा सिद्दीजोहरला दिल्यामुळें रु.जमाला वैषम्य वाटलें आहे. आणि आपल्या सर्व बंदरांतून इंग्रजांना काढून लावून डचांना भरण्याचा त्याचा विचार आहे. त्याकरितां त्यानें वेंगुर्ल्याला वस्त्रें पाठविलीं अशी बातमी आहे. पण ही एक गप्पच आहे....**सुलतानाला शिवाजीवर जय मिळाला** हें वांचून बरें वाटलें. पुढील पत्रांत पक्की बातमी लिहावी.

इं. फॅ. १० }
पृ. ३६८-६९ इ. } (८१४) सुरत—कंपनी { श. १५८२ वैशाख शु. ७
{ इ. १६६० एप्रिल ६

दख्खनमधील प्रबळ हिंदु **शिवाजी** यानें गेल्या जानेवारींत दख्खनचे सुलतानाविरुद्ध (विजापूर) सैन्य उभारून **राजापूर** आदिकरून पुष्कळ शहरें घेतलीं.

इं. फॅ. १० }
पृ. ३७२ इ. } (८१५) राजापूर (टेलर इ.)—सुरत { श. १५८२ वैशाख व. १
{ इ. १६६० एप्रि. १६

विजापूरचा सेनापती **सिद्दीजोहर** पन्हाळ्यासमोर १५००० सैन्यानिशीं (वेढा घालून) आहे. कंपनीचा दारूगोळा खपविण्याकरितां पत्रव्यवहार केल्यामुळें नमुना पहाण्याकरितां सिद्दीचीं माणसें येऊन गेलीं. १ तोफ व ५० गोळे घेऊन रेव्हिंगटन मिंचॅम, गिफर्ड व वेलजी यांसह गेला. कोल्हापूरापासून पन्हाळ्याचा तळ ८।१० मैल असून तेथपर्यंत मोठ्या सन्मानानें रेव्हिंगटनला नेण्यांत आलें. माल पसंत पडल्यास आणखी मागणी येईल....

इं. फॅ. १० }
पृ. ३७३ इ. } (८१६) राजापूर वखारवाले—रेव्हिंगटन (पन्हाळा) { श. १५८२ वैशाख व. २
{ इ. १६६० एप्रिल १७

तुमचें १३ चें पत्र काल मिळालें. विजापूरला गेलेला इसम दारूगोळा विकत

घेण्याबद्दल हुकूम घेऊन आलाच असेल. ... ... तुम्हीं स्फोटक शेल उडविली ती पाहून सेनापती खूष झाला. उत्तम झालें. **रुस्तुमजमा इतकेच** त्याचे भाऊ **अपराधी** असतांना त्यांना छावणींत इतकें स्वातंत्र्य मिळतें याचें आश्चर्य वाटतें. आपल्या लिहिण्यावरून असें दिसतें कीं, या बिकट परिस्थितींत अपराधाबद्दल शासन करून अडचणी उपस्थित करावयाला सेनापति तयार नसावा. ...**फाजलखानाची** व तुमची भेट झाली....**विजापुराहून शिवाजीचें सैन्य परतल्याची बातमी आली आहे** ती ऐकून आम्हांस आनंद झाला पाहिजे. कारण यामुळें किल्ला त्याचे हातून घेण्याची आशा अधिक वाढली आहे. एकदांचा हा दंगा शमला पाहिजे. पन्हाळ्याबद्दलचें आपलें मत आणि वेढा यशस्वी होण्याचें चिन्ह आहे काय हें कळवावें.

इं. फॅ. १० } (८१७) { श. १५८२ वैशाख व. ९
पृ. ३७४-७५ इ. } राजापूर वखारवाले-रेव्हिंगटन (पन्हाळा) { इ. १६६० एप्रिल २३

तुमचीं पत्रें १९ व २० चीं काल रात्रीं पावलीं. अर्जदास्त पावली. परंतु **(शिवाजी) राजाचे लोक** पूर्वी कळविलें त्यावेळीं गेले ते पुनः आलेले नाहींत. तसा आपत्तीचा प्रसंग पुनः येईल त्यावेळीं उपयोग करूं. **रुस्तुमजमानें** तुम्हांला **राजापुराला परत आल्याबरोबर हुकेरीला** बोलाविलें आहे. त्याचा हेतू समजत नाहीं. तथापि आमचेबद्दल गैरसमज दूर होण्याकरितां म्हणून तरी त्याची भेट होणें इष्ट वाटतें. दारूगोळ्याचा करार छान झाला. परंतु राणीची संमति आणून तो पक्का केला पाहिजे. मग कारभारांत कांहींही बदल झाला तरी हरकत पडणार नाहीं. नाहींतर सेनापती (जोहरचा) कोणी शत्रू लबाडीनें असें म्हणेल कीं, **राणीनें शिक्का करून दिलेले कोरे डौलांचा** यानें दुरुपयोग केला. किंवा शिवाजीकडे कारभार गेल्यासहि **शिवाजी शत्रू** या नात्यानें असें प्रमाण पुढें करील.

इं. फॅ. १० } (८१८) { श. १५८२ वैशाख व. १४
पृ. ३७६ इ. } { इ. १६६० एप्रि. २८

राजापूर वखारवाले———रेव्हिंगटन.

राजापूरहून सुरतेला जाणाऱ्या गलबताला, **दंडाराजापुरीच्या शिद्यानें त्रास** देऊं नये म्हणून **इंग्रजांची चिठी** पाहिजे अशी एक व्यापारी रदबदली करितो. तरी मसुदा करून पाठवावा सह्या करूं....कांहीं बातमी नाहीं. रु. जमाचे लोक स्तब्ध आहेत. अशी बोलवा आहे कीं, **सिद्दीजोहरनें खारेपाटण, [1]सांवळ** इ. शहरें घेण्याकरितां लोक पाठविले आहेत. तुम्हांला खरें समजलेंच असेल.

---

१. राजापूरचे ईशान्येस ८ मैल (-फॉस्टर).

इं. फॅ. १०
पृ. ३७६ इ.

(८१९)

श. १५८२ अधिक ज्येष्ठ शु. १
इ. १६६० एप्रिल ३०

राजापूर वखारवाले---रेव्हिंग्टन (पन्हाळा) — ब्राह्मण सुभेदाराची व आमची भेट झाली नाहीं...आम्हीं निघून येण्याचे पूर्वी त्याला भेटून पहातों......राणीच्या कारकुनानें काम जलद करण्याचें वचन दिलें व तो भेटीला आला या चांगल्या गोष्टी झाल्या. ...हा ब्राह्मण मोठा इसम आहे. .... डच लोक पोर्तुगीजांच्या विरुद्ध दरबारांत खटपट करण्याकरितां त्याला दरसाल १००० पौंड देतात ! ... तो ब्राह्मण म्हणून हात दाखविण्यास चुकणार नाहीं !

शि. सा. ले. १४३
सु. १०६० रम. १४ हि १०७०

(८२०)
फर्मान (भाषांतर)

श. १५८२ अ. ज्येष्ठ शु.१५
इ. १६६० मे १४

अली आदिलशाहा———— आमील व देसाई (कोल्हापूर)

परगण्याचा देशकुलकर्णी याचा निर्वंश झाला असें खोटें सांगून अंबरकारानें कुलकर्णाची मिरास करून घेतली होती ती रद्द केली आहे.

इं. फॅ. १०
पृ. ३७७ इ.

(८२१)

श. १५८२ ज्येष्ठ शु. २
इ. १६६० मे ३०

कोल्हापूर (रेव्हिं० टेलर, गारवे)—— राजापूरः- तुमचें १९ मेचें पत्र पावलें. रुस्तुमजमाच्या माहालदारांना दारूगोळा दिला नाहीं हें चांगलें केलें. **सिद्दीजोहरसाठीं म्हणून घेऊन त्याला तो पोंचवूं नये, अशाकरितां** त्यांची ती युक्ति होती ! ...इंग्रज त्याच्या नोकरांच्या वागणुकीला विटून गेले आहेत; याचें रुस्तुजमाला फार वाईट वाटत आहे. आपले दोन भाऊ व जांवई यांचेकडून रेव्हिं. चें मन वळविण्याचा प्रयत्न तो करीत आहे. परंतु महत्त्वाच्या गोष्टींची घडामोड चालू असतांना याच्यावर विश्वास कसा ठेवावा हा प्रश्नच आहे. तसें नसतें तर सिद्दी जोहरचें नांव सांगून गोळे घेऊन जाण्याचा बहाणा त्यानें कां करावा ? शिवाय रेव्हिं. नें राजापूरला परत जावें अशी त्याची इच्छा दिसते. या वेळीं तर सर्व व्यापारी देशांत जात असतात !

इं. फॅ. १०
पृ. ३७७ इ.

(८२२)
कोल्हापूर–फोर्ट सेंट जॉर्ज

श. १५८२ ज्येष्ठ शु. ७
इ. १६६० जून ५

पन्हाळ्याला पक्का वेढा पडला असून त्यांत राणीचा महाशत्रु शिवाजी पांच सहा हजार लोकांसह **अडकून पडला आहे**. राणीचा सेनापति सलाबतखान यानें गोळे घेण्याचें वचन दिलें आहे. ह्या गोळ्यांनींच वेढ्यांत अडकलेल्यांना पुष्कळ त्रास होईल.

(इं. ऑफिस) डच रेकर्डस
हिंदुस्तानचीं पत्रें
इ. १६६०-६१ भा. २४
नं. DCLXIV

(८२३)

श. १५८२ ज्येष्ठ शु. १२
इ. १६६० जून १०

[हिंदी किनाऱ्यावरील कामगिरी (२७ जुलै १६५९ ते १० जून १६६० पर्यंत) बाबत कमँडर ॲड्रिअन रूठस यानें गव्हर्नर जनरल व कौन्सिल यांना सादर केलेला अहवाल.]

विजापूरचे राज्यांत परिस्थिति थोडी सुधारली आहे. बंडखोर शिवाजीनें आपलें सैन्य राजधानीचे नजीक व वेंगुर्ल्यांजवळ (३ तासाचे मुक्कामावर) आणिलें होतें. परंतु कुडाळच्या देसायानें त्याला हाकलून लाविलें आणि विजापुरकांच्या व गोवळकोंडेकरांच्या संयुक्त सैन्यानें भयंकर रक्तपात करून त्याचा पराजय केला. आतां शांतता आहे.

इं. फॅ. १०
पृ. ३७९ इ.

(८२४)
कोल्हापूर-सुरत

श. १५८२ ज्येष्ठ व. ३
इ. १६६० जून १५

शिवाजीच्या बंडामुळें अद्याप सर्वत्र अस्वस्थता आहे.

इं. फॅ. १०
पृ. ३८० इ.

(८२५)
सुरत-कोल्हापूर

श. १५८२ आषाढ व. ४
इ. १६६० जुलै १६

रेव्हिंगटन आपल्या मालकीचा दारूगोळा खपावा म्हणून झटतो. कंपनीच्या मालाची काळजीच घेत नाहीं.

हेगसंग्रह डचपत्रव्यवहार
इ. न्यू.

(८२६)
वेंगुर्ले-डच गव्ह. जनरल

श. १५८२ आषाढ व. ६
इ. १६६० जुलै १७

आम्ही मागलें पत्र रवाना केल्यानंतर विजापूरकरांच्या सैन्यानें पाठलाग केल्यामुळें शिवाजी (८ हजार शिपाई व ६० घोडेस्वार घेऊन) पन्हाळ्याच्या बळकट किल्ल्यांत शिरला; आणि बाकीचें सैन्य त्यानें जिंकलेल्या ठाण्यांच्या बंदोबस्तासाठीं ठिकठिकाणीं रवाना केलें. पावसाळा जवळ आल्यामुळें शिद्दी जोहाराला वेढा फार दिवस चालवितां येणार नाहीं असा शिवाजीचा अंदाज होता. पण हा त्याचा अंदाज चुकीचा ठरला; कारण सिद्दी जोहारानें बऱ्याच सैन्यानिशीं पावसाळ्यांत देखील वेढा चालू ठेवण्याचें ठरविलें व पावसाळी छपरेंहि बांधविलीं. किल्ल्यांत तंबाकू, मीठ वगैरे जिनसांचा तुटवडा असून पुष्कळ पैसा भरून अल्लि आदिलशाहाकडून माफी मिळविण्याची शिवाजी खटपट करीत आहे अशी लोकवार्ता आहे. तथापि अशी माफी देण्याचें नाकारण्यांत आलें. याकरितां थोडया लोकानिशीं किल्ल्यांतून निघून जावें असें शिवाजीनें योजलें; पण आंतल्या पठाणांनीं (शिपायांनीं ?) त्याला अडवून धरलें व शेवटचा मनुष्य जिवंत आहे तोंवर तुम्ही

येथें राहिलें पाहिजे असा आग्रह धरला. यामुळें त्यांची आपसांत पुष्कळ बाचाबाची झाली. या सर्व गोष्टी लक्षांत घेतां या बंडखोराला विजापूरकरांच्या हस्तगत व्हावें लागेल असा समज आहे. इकडे **शिवाजीच्या** कांहीं धावत्या सैन्यानें विजापुरापर्यंत धुंमड केली; व **शिद्दी** जोहाराला आपल्या सैन्यांतील कांहीं भाग दुसरीकडे पाठविण्याची आवश्यकता भासावी म्हणजे त्याच्या सैन्याची पांगापांग व्हावी याप्रीत्यर्थ देखील कांहीं प्रयत्न झाले; पण ते व्यर्थ गेले.

खं. २० ले. १०७ सु. १०६१ जिल्काद २०	(८२७) खुर्दखत फा. मज. व सी.	श. १५८२ आषाढ व. ८ इ. १६६० जुलै १९

?—बजानेब कारकून वाई:—माजी मोकाशी व **मरहूम अफजलखान** यांचीं खुर्दखतें आहेत. त्याप्रमाणें नारायणभट चित्राव याचें उझरडे, पसर्णी व एकसंबे येथील इनाम चालवावें.

इं. फॅ. १० पृ. ३८१ इ.	(८२८) सुरत-राजापूर वखारवाले	श. १५८२ श्रावण शु. ६ इ. १६६० ऑगष्ट २

रुस्तुमजमाला दारूगोळा विकत देण्याचें काय कारण होतें ? तो केवळ ताबेदार होता. सर्व देशांत अंदाधुंदी माजून अनेकांची स्पर्धा असल्यानें कोणाला शेवटीं यश येईल ही गोष्ट अनिश्चितच होती. हिंदू असो किंवा मुसलमान असो कोणावरच विश्वास ठेवणें आम्हांस योग्य वाटलें नाहीं. याकरितां दुसरी एकादी संधी येईल त्याची वाट पहात राहिलों. रु. जमा तुमचा दोस्त असला तरी राणीनें त्याचा केव्हांच पराजय केला असता. त्यांचें जमत नाहीं हें उघड आहे.

स. ले. २१ पृ. २५ सु. १०६१ जिल्हेज २५	(८२९) खुर्दखत	श. १५८२ श्रावण व. ११ इ. १६६० आगस्ट २२

अजर. झुंजारराऊ—बजा. कार. व देशमु. तर्फ कारवें प्रांत कऱ्हाड

धारोजी राजे **मोहिते** यांच्या खुर्द. वरून चालू असलेली इडामिडे येथील जमीन कमलनयन गोसावी (निंब) याजकडे चालविणें.

शि. सा. ले. २१७-२१८ सु. १०६१ श.	(८३०) वाटणीपत्र	श. १५८२ भाद्र. शु. १० इ. १६६० सप्टें. ४

कान्होजी जेधे यानें आपल्या समोर मुलांना वाटण्या करून दिल्या. **बाजी सर्जाराऊ** येसाई नायकिणीस दिला. पुढें येसाईस संभाजी मुलगा झाला. तेव्हां बाजी सर्जाराऊ यानें नेमाप्रमाणें संभाजीस वाटणी दिली व संभाजीनें बाजी सर्जारावाचे पाठीशीं असावें असें ठरविलें.

हेग ट्रॅन्साक्रिप्टस् इ.न्यू.
बी. फोलिओ भा. २६

(८३१)

श. १५८२ भाद्र. शु. ११
इ. १६६० सप्टें. ५

डच वाकनीस वेंगुर्ले———— गव्ह. हेग ?

गेल्या म्हणजे आगष्ट महिन्याच्या १४ व्या तारखेस (=ओ. स्टा. आगष्ट ४ श्रावण शु. ८) कृष्णा वै या व्यापाऱ्याकडे पन्हाळ्याखालील सैन्यांतून पत्र आलें आहे. त्यांत लिहिलें आहे कीं, "बंडखोर **शिवाजीनें** आपला **गंगाधर** नांवाचा एक **वकील** विजापुरी सेनापति **सलाबत याजकडे पाठविला** असून मागणी केली आहे कीं, आपण केलेले सर्व मोठे गुन्हे जर माफ होतील व सलाबतखान कोणत्याहि संकटापासून वडीलपणें आपलें संरक्षण करील तर आपण जातीनें सलाबतखानास भेटूं व आपली सर्व मालमत्ता बादशहाच्या नांवानें त्याच्या स्वाधीन करूं. त्याच पत्रीं आणखी असेंहि लिहिलें आहे कीं, दुसऱ्या दिवशीं रात्रीं चंद्र दिसत नसतां (When the moon was dark), मुसळधार पाऊस व वादळ सुरूं असतां वरील बंडखोर (**शिवाजी**) आपल्या बरोबर १००० शिपाई, १५ उमदे घोडे, २ पालख्या व कांहीं खजिना घेऊन पळाला. ही बातमी थोड्याच दिवसांत विजापूरच्या सैन्यांत पसरली. त्याबरोबर उद्विग्न झालेल्या **सलाबतखानानें** ताबडतोब २००० स्वार व १००० पायदळ त्याला **गांठण्यासाठीं पाठविले**. हेराकडून ही बातमी ज्या वेळीं **शिवाजीस** समजली तेव्हां तो एकदम **खेळणा** (Helna) नांवाच्या आपल्या एका किल्ल्यांत गेला; व त्यानें आपल्या जवळचे लोक रस्त्यावरील दाट झाडींत ठेविलें व पाठलाग करणाऱ्या शत्रूस त्या रस्त्यानें येऊं न देण्याविषयीं त्यांना आज्ञा केली. एवढेंच नव्हे तर शक्य असल्यास तोंड देऊन पराभूत करण्यासहि सांगितलें. त्यांनीं **शिवाजीच्या** हुकुमाप्रमाणें शत्रूवर शौर्यानें जोराचा हल्ला चढविला. आपली विशेष हानी होऊं न देतां त्यांनीं शत्रुसैन्याच्या बऱ्याच मोठ्या भागाचा निःपात केला. कांहींस कैद केलें व बाकीच्यांस पळावयास लाविलें आणि धैर्यानें त्यांचा पाठलागहि केला. नंतर सलाबतखानाचे कांहीं लोकांनीं आपल्या ताब्यांतील दुसऱ्या एका मार्गानें जाऊन लढाई केली, जय मिळविला व कांहीं लूटहि मिळविली. यामुळें बंडखोरानें पळ काढिला. याच वेळी **शिवाजीनें** आपल्या सैन्याचे दोन भाग केले व स्वतःच्या बचावाकरितां एका पालखींत **शिवाजी** नांवाच्या आपल्या **एका न्हाव्यास बसवून** ती पालखी नेहमींच्या लवाजम्यासुद्धां नेहमींच्या रस्त्यानें पाठविली व स्वतः दुसऱ्या पालखींत बसून दुसऱ्या जास्त अवघड रस्त्यानें निघाला. शत्रूनें पहिली पालखी चांदण्यांत सहज पकडली व गोटांत आणली. यामुळें सर्व राज्यांत '**शिवाजीस सलाबतानें** कैद केल्याची' बातमी पसरली व बादशहाच्या बाजूकडील लोकांस अत्यानंद झाला. पण ज्या वेळीं **शिवाजीचा** कावा लक्षांत आला त्या वेळीं सर्वांचा आनंद नाहींसा झाला. एवढ्या अवधींत बंडखोर **शिवाजी पुरणदुर्ग** (पुरंदर ?) नांवाच्या आपल्या अत्यंत बळ-

कट किल्ल्याच्या आश्रयास गेला व तेथून त्यानें निरनिराळ्या किल्ल्यांवर विशेषतः पन्हाळ्यास शिपाई व सामुग्री पाठविली. प्रत्येक गोष्ट त्याच्या मनाप्रमाणें होत आहे. थोडक्याच दिवसांनंतर अशी बातमी आली कीं **रुस्तुजमा हा शिवाजी व विजापूरदरबार यांमध्यें सल्ला घडवून आणण्याची खटपट करीत** असून त्यास इतकें यश आलें कीं, बादशाह (वृद्ध राणीसह) तहासाठीं विजापुराहून **मिरजेच्या** किल्ल्यास आला आहे. लोकवार्ता अशी आहे कीं, रुस्तुमजमा यास **सेनापतीची पदवी** देण्यांत आली. तो बादशहाचा वकील शहासाहेब यासह हुकेरीहून सैन्याकडे जाण्यास निघाला आहे व तेथून तो मिरजेस दरबारीं भेटण्यास जाणार आहे. संधी येतांच आम्ही तुम्हांस यापुढें होईल तें कळवूं.

सा. ले. २६८ } (८३२) { श. १५८२ भाद्र व. ८
सु. १०६१ मोहर २० } खुर्दखत फा. मु. व सी. { इ. १६६० सप्टें. १६

अजर. खंडोजी राजे व बाजी राजे, व हंसाजी राजे, व कृष्णाजी राजे घोरपडे बजा. कार. व देसाई पर. सिरवळ.

लिंगोजी बापूजी देसकु. यास मौ. नायगाऊ येथें एक चावर जमीन इनाम चालवावी. (शिक्काः—हंसाजी बाजी नाईक घोरपडे आदिलशाही.)

खं. २० ले. १०८ } (८३३) { श. १५८२ आश्विन व.२
सु. १०६१ सफर १५ } खुर्दखत फा. मु. मज. व सी. { इ. १६६० आक्टो. १०

?—बजा. कार. व देसमु. पर. वाईः—पूर्वींचे मोकाशी व मरहूम अफजलखान यांच्या खुर्द.प्रमाणें अमणभट क्षीरसागर यास एकंबे येथील इनाम जमीन चालू ठेवावी. हल्लीं पर. मोकासा मिळाला.

खं. १५ ले. ९७ } (८३४) { श. १५८२ आश्विन व. १४
सु. १०६१ सफर२७ } खुर्दखत सी. { इ. १६६० आक्टो. २२

अजर. अंबाजी राजे घोरपडे—हुदे. व मोक. मौ. चिंचणेर किले ताथोडे कमलनयनगिरी सदानंद मठ निंब यास धर्मादाऊ गल्ला चालू ठेवणें.

फरा. सला. पृ. २२४ सु. १०६१ } (८३५) { श. १५८२ आश्वीन व. ३०
सफर २८ हि. १०७१ } फर्मान { इ. १६६० आक्टो.२३

बादशाहा-बजानीब देसाई परगणे तावरगिरीः—शरजाखान यानें नबाब अबदुल रहीम बहलूलखान याचा मुलूख घेतला आहे. तरी तुम्ही नबाबाच्या मुतालिकांना मदत करावी आणि बंडखोरांचें शासन करावें.

इं.ऑफिस डच रेकर्डस हिंदुस्थानचीं पत्रें १६५९-६० भा. २३ नं. DCLI इ. न्यू. } (८३६) { श. १५८२ मार्ग. शु. १५ इ. १६६० डिसें. ६

गव्हर्नर जनरल ॲन्ड कौन्सिल—डच ई. इं. कंपनीचे चालक.

गेल्या वर्षी विजापुरांत पुष्कळ धामधूम झाली. राणीच्या खराब कारभारामुळें आणि जुलमामुळें तिची प्रजा बंड करून उठली. त्यांपैकीं एक बंडखोर **शिवाजी** इतका यशस्वी झाला आहे कीं, अनेक किल्ले व शहरें त्याच्या ताब्यांत गेलीं आणि त्याचें सैन्य विजापूरच्या आसमंताला येऊन भिडलें. तेथून त्याला परतावें लागलें असें ऐकितों.

खं. ८ ले. ११ सु. १०६१ रखर २४ } (८३७) सरंजामी वट हुकूम { श. १५८२ मार्ग. व. ११ इ. १६६० डिसें. १८

पुणें व **इंदापूर** व **चाकण सुपें बारामती** ऐसे इनाम हिंदू व मुसलमान यांसी आहेत. **त्यास पेसजी आपणास (शिवाजीस) मुकासा असतां अफजलखाना** आधीं जेणेंप्रमाणें तसलमती ज्यास जें पावत असेल त्यास तेणेंप्रमाणें देणें. ऐसा तह केला असे. मोर्तब सूद (मर्यादेयं इ.)

स. २ पृ. ७८ सु. १०६१ जखर ७ } (८३८) खुर्दखत न. फा. सु. व सी. { श. १५८२ माघ शु. ९ इ, १६६१ जाने. २८

अजर. सैद सादात सैद अशफ हवाल. को मीठ गव्हाण—ता भानजी हरी हुदे. व देसा. व कुळ. व खोत गावडे:——कृष्ण व नार बिन गोविंद माहाजनी यांस तश्रीफेबदल मिठागर इनाम दिलें आहे.

डाग राजिस्टर १६६१ पृ. ४१-४२ फेब्रु. १७ इ. न्यू. } (८३९) { श. १५८२ माघ व. ३ इ. १६६१ फे. ७

·अशी बातमी आली आहे कीं **मदुरा** व **तंजावर** येथील नायक व **लिंगम** नायक यांनीं विजापूरचे बंडखोर सरदार **शहाजी** व **अंतोजी** पंतलू यांच्याशीं (परचक्राविरुद्ध परस्परांनीं परस्परांस साहाय्य करावें असा) तह केला. यामुळें तंजावरचा नायक आतां अधिकच आग्रह धरूं शकेल. आणखीहि अशी बातमी आहे कीं उपरिनिर्दिष्ट शहाजीचा मुलगा **बंडखोर शिवाजी** (याच्याबदल गेल्या वर्षांच्या वेंगुर्ल्याच्या वृत्तांतांत पुष्कळच लिहिलेलें आहे) यानें विजापूरच्या आसमंतात सेनापती **मुल्ला महमद** व दोन सरदार **बाबुलखान** (बहलोलखान) आणि **अजापा नायक** यांचा पराजय करून निदान २००० घोडेस्वार कैद केले............**शहाजीच्या** लोकांनीं इ. स. १६६० डिसें. २५ (ओल्ड स्टा. डिसें. १५) रोजीं **तेगनापट्टनला** वेढा घातला. त्यामुळें कंपनीचा व्यापार बसला.

शि. प्र. पृ. ८४ ले. २ } (८४०) { श. १५८२ माघ व. ७
सु. १०६१ जखर २१ } खुर्दखत फा. मु. व सी. { इ. १६६१ फेब्रु. ११

अजर. **फाजिल अफलखान** महमदशाही–ता कृष्णगौडा देसाई पर. तेरदल

दलपतराऊ सर हवाल. व मुगी गौडा यांनीं लिहिलें कीं सालगुदस्ता **सिवाजीची** फितरत होउनु घोडा राऊत तहद रायेबाग व अडगल पावेतों काबीज केलें. मौ. हरौगरा पावेतों घोडा राऊत **जाधवराऊ** आले. त्यास घोडा राऊत हसम मोबलग खर्च करून कर्जेदार होऊन पर. मज, काबीज होऊ नेदीता लडाई केली. याबदल मुगलखोड इनाम तुझे घर व जिणजितरब लुटिले गेले. याबद्दल मुगलखोडची नायकी दिली. साल मजा विलायती पीक नसता लष्कर पायमल्ली झाली. गनिमाचे गलबलेकरितां विलायत खराब जाली. तरीहि तू कौर्दी केलीस याबदल गावगना दर चावरी दोन होन दिल्हे असेती. साल गुदस्त **सिवाजीचे** फितरतीकरितां नाडगिरास तकवा दिल्हा की तुम्ही आम्ही मिलोन गनिमास मारू. याबदल नाडगिरास दर गावी पात्र चावर पडी पैकी दिल्हा आहे.

सा. ले. ४८ } (८४१) { श. १५८२
? } { इ. १६६०–६१

गोरखोजी दिनकरराऊ काकडे सुभे.—मल्हारजी देसाई पा सिरवल

अतोजी निगडा यानें भानजी कुळ. मौ. निंबूत व गुळचे यांसि **भुताकरितां जीवें मारिला**. आतां आतोजी व आम्हास **दावा लागला** आहे. **सूड व बीताहि घेऊं.**

शि. च. ले. ३७८ } (८४२) { श. १५८२
सु. १०६१ } मिसेली फा. मु. मज. सी. { इ. १६६०–६१

?——ब्रजा. कार. कसबे वांगीः–कस. मज. चे देसमुखी संकराजी राजे व नेतोजी राजे व दिपाजी राजे मोहिते यांची असे.

कों. इ. सा. ले. ९२ } (८४३) { श. १५८२-८३
? } उल्लेख { इ. १६६०-६१

सिवाजीनें प्रभावलीकर **हरजीराजे** व **सूर्याजी** यासी मारून चालविले. श्रीगारपुराहून ते लखम सावंता...सी आले सन इहिदेमधे. जागा चराठियेस करून होते इसनेमधे. इतबार सुभा करून आला तो यक मास होता. तोहि विजापुरी गेला, नांदला नाहीं. देसायांची त्याची भेट जाहली.

. फॅ. ११ } (८४४) { श. १५८३ चैत्र शु. ७
इं. १८ इ. } कमेटी--सुरत. { इ. १६६१ मार्च २७

सुरत, राजापूर, कारवार, व केलवेला येथील वखारी चालू ठेवाव्या. ...दंडा-राजपूर अगर किनाऱ्याची एकादी जागा घेण्याबद्दल कितपत यश आलें तें कळवावें.

डाग रजिस्टर १६६१ } (८४५) { श. १५८३ वैशाख शु. २
पृ. ९६-९७ एप्रिल ३० इ. न्यू. } { इ. १६६१ एप्रिल २०

विजापूरच्या राज्यांतील **यादवीमुळें झालेली हानि** (जखमा) अद्यापि भरून आलेली नाहीं. पन्हाळ्याविरुद्ध मोठें सैन्य घेऊन **विजापूरचा सुलतान** आला. त्यानें महाबंडखोर **शिवाजीशीं सलोखा केला आहे.** परंतु **जोहर सलाबत-खानानें बंड** उभारून आपण विजापूरचे हस्तक नसून **मोंगलाचे सरदार** आहों असें जाहीर केलें आहे ! या **जोहरला वेंगुर्ला** आदिकरून विजापूरच्या राज्यांतील सर्व सधन प्रांत बहाल करून व बहुतेक सैन्य बरोबर देऊन, सुलतानानें **कानडाच्या वें-(क)टापा नायकाशीं** युद्ध करण्यासाठीं किंवा जमल्यास मोठी खंडणी बसूल करण्या-साठीं पाठविलें होतें. (कानडयाकडे जात असतांना) वाटेंत त्याचा विचार बदलला व तो विजापुरापासून १४ मैलांवर रक्सी-तंगडीकडे माघारी आला (आणि तेथें त्यानें वरीलप्रमाणें बंड उभारलें). विजापूरचें सर्व झेंडे व निशाणें नष्ट करून त्यानें त्यांचे-बदली मोंगली तऱ्हेचीं तयार करविलीं.

वेंगुर्ल्यांचा हवालदार बदलून त्यानें **मिर्झा** फत्ते मलक या नांवाचा नवीन हवालदार पाठविला. तो **वेंगुर्ल्याला** ५ नोवेंबरला(ओल्ड) येऊन पोंचला. परंतु एक-क्षणांत पळून जाण्याची त्यानें तयारी ठेविली होती. कारण **सलाबतखानाच्या** या **बदल**लेल्या धोरणामुळें फिरून **खवासखानाला** हा गांव (वेंगुर्ला) बहाल होण्याचा संभव होता. जानेवारी महिन्यांत विजापूर सोडून इराणांत जावयाचें असल्यामुळें आपल्याकरितां एक गलबत तयार ठेवावें म्हणून आमच्याकडे **बड्या साहेबिणीनें** कळविलें होतें. परंतु सेनापती रेठेस यानें ती गोष्ट नाकारली. आणि **राणीनें** ही मागणी तितकी मनापासून केलीच नव्हती असें नंतर समजलें.

डाग रजिस्टर १६६१ } (८४६) { श. १५८३ वैशाख व. २
पृ. १२६-१२७ मे १६ इ. न्यू. } { इ. १६६१ मे ६

मदुरा व तंजावरचे नायक आणि विजापूरचे सरदार **शहाजी** व अंतोजी पंतोले आणि **लिंगमनायक** यांनीं संरक्षक आणि आक्रमक (offensive) असा उभयविध तह केला आहे; ही गोष्ट थोडी काळजी करण्यासारखी आहे; आणि त्याचमुळें **मच्छलीपट्टणला** जाण्याचें गव्हर्नरानें टाळलें. पण त्यानंतर लगेच हा तह मोडला असून **शहाजीवर**

हल्ला करण्याचें, नायकांनीं आपसांत गुप्तपणें ठरविलें असेंहि गव्हर्नरास कळलें. मध्यंतरीं **तंजावरच्या राज्यांत अव्यवस्था माजली**.......**ड्रेन्स** लोकांपासून ते खंडणी घेणार... **तेगनापट्टणलाहि** त्रास देणार...बंदोबस्त चालू आहे. गव्ह. पिटचे पत्रावरून दुसरें असें कळतें कीं, पत्र बंद करण्याचें पूर्वी थोडे दिवस **शहाजीचे लोकांनीं** कर्नूलचे लोकांपासून १७०० पार्डोची (झेराफिन्) लूट नेली......**तेगनापट्टणशीं** युद्ध होऊन ४ फेब्रुवारीला (न्यू.) किल्ला **शहाजीच्या** हवालीं झाला. तेव्हां आतां **तेगनापट्टण** व **कंपनीची कचेरी हीं शहाजीचे ताब्यांत गेलीं आहेत**. त्यामुळें काळजी उत्पन्न झाली आहे.... [१३ झेराफिन् = १० रुपये. इं. फॅ. भा. १३ पृ. ५२ टीप]

खं २० ले. २४५ } (८४७) { श. १५८३ ज्येष्ठ व. १
सु. १०६२ सवाल १५ } खुर्दखत (फा. मु. सिदी हिलाल { इ. १६६१ जून ३
याची व सी.)

अजर० सिदी अजम **सिदी हिलाल**—— कार. व देसमु. पर. सुपे.

गणो तिमाजी जुनारदार हे काशीस जातेवेळीं माहादाजी गोसावी सो मोरेश्वर यास आपला वांटा देऊन गेले. तरी तो त्यांजकडे चालविणें. रा गणेश पंडित.

ऑ. मॅ. भा. १५५ पृ. १–२१ } (८४८) { श. १५८३ ज्येष्ठ व. ८
इं. फॅ. ११ पृ. ५–११ इ. } { इ. १६६१ जून १०

(रेव्हिंगटन, टेलर्स, गिफर्ड) सोनगड–सुरत

तुमचें २ मेचें पत्र सोनगडावर ८ जूनला पोंचलें...या पूर्वी **वांसोट्या**हून आमचें पत्र पाठविलें होतें....आमच्या सूचनेप्रमाणें आमच्या सुटकेची खटपट करावी:—

गेल्या वर्षीं **दंडाराजपूर किल्ला** घेण्याबद्दल खुद्द **शिवाजी**जवळ बोलणें झालें तें त्याचा नोकर **दौरोजी** याचे मध्यस्थीनेंच झालें. **शिद्दी**कडून तो किल्ला घेतां आला असता तर आसपासचा सर्व मुलूख **शिवाजीला** मिळाल्यामुळें **शिवाजी**कडून द्रव्य किंवा बंदरें वाटेल तशीं मिळालीं असतीं. आम्ही कैदेंत असतांना राजापूरचा त्याचा ब्राह्मण **मीठबंदर** आमचे स्वाधीन करण्याचें बोलला. आम्हांला पकडून ठेवून लुटल्यामुळें आतां आम्हांला बंदराची इच्छा नसल्याचें आम्हीं सांगितलें; आणि 'आमचें स्वातंत्र्य आम्हांला मिळाल्याशिवाय आम्ही काय बोलावें?' असें म्हटलें. त्यावर त्यानें आमच्या सुटकेची खंडणी नेमून आम्हांला वासोट्यावर पाठविलें. आतां या अत्याचाराचें कारण काय सांगणार? याच तऱ्हेनें तो बनिये, मूर्स, इराणी, अरबी लोक यांना लुबाडून कोंडून पैशाकरितां मारही देतो! येथें परदेशस्थ गलबतांवरून धरून आणलेले शूर इराणी व अरबी लोक आमच्यापेक्षां तीव्रतर कष्ट सहन करीत आहेत. आमचेकडून **दंडाराजपूरी**चे बाबतींत त्याला मदत पाहिजे आहे आणि त्याबद्दल आम्ही कांहींतरी करावें या करितांच

तर हें खंडणीचें ठुमणें आहे. त्या (शिवाजी) शीं म्हणून खालीलप्रमाणें बोलणें करावें–

(१) राजापुरास धरलेले कैदी सोडून नेलेली लुटीची भरपाई करावी. निदान कैदी सोडावे.

(२) दंडाराजपुरी येथें इंग्रजांचीं गलबतें लागतील त्यांचा खर्च शिवाजीनें द्यावा. खर्चाबद्दल शिवाजीनें चौकशी न केली तर प्रसंग येईल त्याप्रमाणें तो देऊं करील त्याहून थोडा अधिक मागून त्याला नकार देतां येईल! शिवाजीनें विचारलेंच तर चार गलबतांपैकीं प्रत्येकाबद्दल १०००० होन खर्चाचे सांगावे. हें ठरल्यावर सर्व रकम एकदम आगाऊच मागितली म्हणजे हेंहि बोलणें ढांसळण्यास वेळ लागणार नाहीं!

(३) सोईचें बंदर कंपनीला देऊन आपलें सामान व मजूर लावून इंग्रजांना तेथें किल्ला बांधूं द्यावा.

(४) त्या बंदराचें अर्धें उत्पन्न इंग्रजांना मिळून शिवाय त्यांचा आयात व निर्यात माल करमुक्त यावा जावा.

(५) रुप्याचें नाणें पाडण्याकरितां बंदरांत एक टांकसाळ काढूं द्यावी. आणि मलबाऱ्यांना हाताशीं धरूं नये. (राजापूरला असतांना 'आपण मलबारी असून आपल्या हाताखालीं मलबारी असणारच' असें शिवाजी म्हणे!) ही अट अवश्य घालावी.

(६) सोरा बिनहरकत खरेदी करण्यास परवानगी असावी.

(७) बंदरांत वखारीकरितां एक इमारत द्यावी.

या तपशिलासह गौरवून पत्र लिहून रेव्हिंग्टन व इतरांबद्दल सामोपचाराच्या गोष्टी लिहून रदबदली करावी...तो कैदी सोडायला तयार नसेल तर आमच्याकडून काडी-चीहि मदत होणार नाहीं......राजापूर सोडल्यानंतर शिवाजीला आम्हीं पाहिलें नाहीं. इतक्यांत शिवाजीनें पाठविल्यावरून रावजीपंडीत आमची जबानी घेण्याकरितां येणार आहे......आज आमच्या समोर एका मुसलमानाला फटके मारण्यांत आले. ... तेव्हां त्या ब्राह्मणाच्या कानावर जाण्याकरितां आम्हीं असें बोललों कीं, आमची सुटका न होईल तर औरंगजेबाचें सैन्य सुरतेहून दख्खनमध्यें आणण्यास आम्हीं मदत करूं. राणीच्या स्नेहाखातर आम्हीं आजपर्यंत असें केलें नसलें तरी आतां राणीला पदच्युत केल्यामुळें ती गेली आहे. आणि त्यामुळें त्याचा वचपा काढणें आम्हांला कठीण नाहीं! ह्या बोलण्यानें मात्र त्याला दहशत बसेल. हें बोलणें शाहिस्तेखानाशीं केलें तर शिवाजीचा नाश होण्यास वेळ लागणार नाहीं. शाहिस्तेखान पर्वताच्या पलीकडे येथून ७ गांव (४० कोस) अंतरावर आहे. त्याला **मुख्य अडचण पर्वताखालीं कसें यावें हीच** आहे. परंतु ह्याबाबत आम्हीं कळवीपर्यंत कांहीं करूं नये....शिवाजी पैशांबद्दल लिहील तेव्हां

आम्हां कैद्यांस सोडण्याबद्दल १००० होनापेक्षां अधिक खंडणी कबूल करूं नका...आम्हीं अधिक कबूल केलें असें कोणीं सांगितलें तरी विश्वास ठेवूं नका...**दंडाराजपुरीबद्दल** बोलणें करणें माझ्यावर सोंपवा.

आम्हीं **दारूगोळा** दंडाराजपुरीच्या सिद्दीला दिला नाहीं, परंतु विजापूरचा सेनापती **शिद्दी जोहरला** दिला. जोहरच्या ताब्यांत खारेपाटण व बेटहि असून तो आतां स्वतःच्या देशाकडे गेला आहे. आमच्या जासुदाला वाटेंत **रुस्तुमजमा** भेटला होता. तो म्हणाला कीं 'राजापूर सोडून जाण्याबद्दल त्यानें मला तीन पत्रें पाठविलीं !' यावरून शिवाजीचा बेत त्याला माहीत होता असें दिसतें. पण तो अगदीं खोटें बोलतो... आमचा एक पहारेकरी शिवाजीकडे गेला आहे.

आमच्या सुटकेची तजवीज प्रथम करा...**चौलचा** पोर्तुगीज अधिकारी साहाय्य देण्यास तयार नाहीं...छळामुळें एका व्यापाऱ्याला खेळण्यास मृत्यू आला...

आतां राणी परदेशीं गेल्यामुळें (घालवून दिल्यामुळें) पुष्कळ उमराव या प्रांतांत लुटालूट करितात. लेकवळा सुलतान नांवापुरता आहे. कारण दुसरा कोणता बसवावा हें सुचत नाहीं. **दरवेझ नांवाचा वारस होता त्याला शाहिस्तेखानानें शिवाजीच्या एका किल्ल्यांतून आपल्या ताब्यांत घेतला आहे.**

आग्र्याहून सैन्य येत आहे असें आम्ही ऐकतों. शिवाजी तोंड देण्याची तयारी करीत आहे. नुकतेंच **दळवी राजा (?) आणि शृंगारपूरचा राजा अशा दोघांचा मोड करून शिवाजीनें** आपल्या ताब्यांतील मुलूख वाढवून चांगला बंदोबस्त केला आहे. या योगानें दंडाराजपूर किल्ल्यापासून तों खारेपाटणपर्यंत सर्व **किनाऱ्यावर त्याचा ताबा झाला आहे.** लवकर गोव्याला त्याची हद्द भिडून प्रत्यक्ष गोव्यालाहि धोका येणार आहे....

राजापूरच्या लुटींत कंपनीचें व आमचे मिळून १२००० पॅगोडाचें नुकसान झालें आहे.

ब्राह्मणानें आम्हांला पैशाबद्दल विचारलें...आम्हीं साफ नाकारलें. तेव्हां शिवाजीकरितां तुम्ही काय करितां म्हणून त्यानें विचारल्यावर आम्ही दंडाराजपुरीबद्दल बोललों....इंग्रजांना त्यानें दाभोळ देऊं केलें....दंडाराजपुरी घेण्यास इंग्रजांनीं मदत केली तरी **शेवटचा हल्ला शिवाजीनेंच करावा** म्हणजे इंग्रज किल्ला आपणच घेतील, ही भीति बाळगण्याचें कारण नाहीं....दंडाराजपुरी घेण्याबद्दल **औरंगजेब** इंग्रजांना तीन लाख रुपये देण्यास तयार आहे, असें रेव्हिंगटननें सांगितलें. २ दिवसांनीं **शिवाजी महाडला आला.** दोन दिवस राहून तेथील कैद्यांना त्यानें रावजी पंडिताच्या स्वाधीन केलें आहे. आतां **तो कल्याण भिवंडीकडे आहे.** नुकतेंच मोंगलांनीं कल्याण भिवंडी घेतली

आहे. ह्या पावसाळ्यांत शिवाजी ती परत घेणार. नंतर त्याची आमची गांठ पडेल....**उमरावांमध्येंच दुही आहे. विजापूर लुटलें जाईल असें वाटतें....शिवाजीचा एकच हतू** असेल तर तो दंडाराजपूर घेण्याचा. त्याबद्दल उत्सुकतेनें बोलावें. कंपनीला तें आवडलें नाहीं तर मागाहून बोलणें फिरवावें....बरें किल्ला स्वतःकरतां घ्यावयाचा म्हटलें तरी माणसें (शिपाई) लागतील. तीं शिवाजीशिवाय दुसरा कोण पुरवील ? **वकिलानें पत्र शिवाजीच्या स्वतःच्या हातांत द्यावें. हे ब्राह्मण त्यांना वाटेल तो मजकूर त्या पत्राकडून वदवितात.**

सा. ले. १५८ } (८४९) { श. १५८३ ज्येष्ठ व. १०
सु. १०६२ सवाल २३ } मिसेली फा. मु. व सी. { इ. १६६१ जून ११

अज दि० पर० सुपे—— ता मोक० का सुपे

गणो तिमाजी (ले. ८३७ पहा.)

खं. २० ले. १०९ } (८५०) { श. १५८३ ज्येष्ठ व. १२
सु. १०६२ सवाल २५ } कौलनामा फा. मज. { इ. १६६१ जून १३

अज दि० पर० वाई—— ता अंतोजी बिन शंकराजी **लष्करी चाकर.**

पेसजी **गनिमानी कोट बलकाविला होता** त्यावर **सिद्दी जोहार** काबिजाती आले. सर गुन्हो वगैरे बरोबर तूहि त्यांना भेटलास. तुझे मशाकत पाहून तुला २ चावर जमीन इनाम दिल्ही. तलग मध्वाजी कृष्ण हवालदार माजी पर. मज. यास बुऱ्हाणखान गोरी यानें दस्त करून कोट बलकाविला. त्यावर पर. मज. हजरती साहेबाचे खासखेलीस मऱ्हामत जाहाले. बुऱ्हानखान कोट सोडून गेला. तुला जमीनीशिवाय गला व इतर हक दिल्हे. सेरणी दिल्ही नाहींस ती २५ होन घेतली. आतां मिरासी खाऊन सुखें असणें.

शि. प्र. पृ. १०५ ले. ३६ } (८५१) { श. १५८३ आषाढ शु. ३
सु. १०६२ जिल्काद १ } मिसेली फा. मु. व सी. { इ. १६६१ जून १९

?——ता सिलार नायक व मोक. मौ. नागठाणे तर्प वाल्वे

चौंडेस्वरीचे पडिले देऊळ संभट बांधीत आहे. पाटलानीं अडथळा करूं नये.

डाग रजिस्टर इ. १६६१ } (८५२) { श. १५८३ आषाढ शु. १४
पृ. २१५-२१६ जुलै ११ इ.न्यू. } { इ. १६६१ जुलै १

इंग्रजांच्या विषयीं रेसिडेंट (वेंगुर्ल्याचा) असें लिहितो कीं, गेल्या पत्रापासून त्यांनीं विजापूरचे राज्यांत कांहीं खरेदी न करितां आयात केलेला माल मुख्यत्वेंकरून रोखीनें

विकला. त्यांच्याजवळ पुष्कळसें कापड होतें त्याची विक्री न करितां त्यांनीं तें कर्जफेडी-करितां दिलें. **शिवाजीचें** बंड मोडण्याकरितां **विजापूरच्या सुलतानाला त्यांनीं युद्धोपयोगी दारूगोळा पुरविला.** त्याची किंमत अजून त्यांना मिळाली नाहीं. मात्र त्या कृत्याबद्दल **शिवाजीकडून** त्यांना फार त्रास सहन करावा लागला. **राणी** मक्केच्या यात्रेकरितां निघून जातांच **शिवाजीनें** पुन: डोकें वर काढिलें. आणि इंग्रजांनीं केलेल्या नुकसानीचें उट्टें काढण्याकरितां **मार्चच्या मध्याचे सुमारास** [श. १५८२ फाल्गुन वद्य पक्ष.] राजापुरावर १००० घोडदळ व ३००० पायदळ पाठविलें. ह्या सैन्यानें, शहराजवळ आल्यावर, तेथील रिवाजाप्रमाणें शहरांतील प्रमुख मंडळींना बोलावून आणून शहरांत प्रवेश केला व तेथील नागरिकांना तोशीस न देण्याचें वचन दिलें. ते भोळे लोक मनांत संशय न आणतां भेटीस आले. आपणहि ह्या स्वागतांत सामिल व्हावें म्हणून रेसि० रेव्हिंगटन व दोन तीन इंग्रज ह्यांच्याबरोबर गेले. लगेच त्या सर्वांना पकडून त्यांचा छळ करून जिंदगी जप्त करण्यांत आली. रेव्हिंगटन व त्याचे बरोबरचे लोकांना शिवाजीच्या एका किल्ल्यावर (**सोडनगड-कुलाबा**) ठेविलें. राजापुरांतील इंग्रजांनाहि कैद झाली व त्यांतील एक छळानें मृत्यु पावला. त्यांच्या वखारीची सर्वस्वीं नागवणूक करून पुरून ठेवलेला खजिना पहाण्याकरितां सर्व ठिकाणीं **जमीनहि** कुदळीनें **खणून** टाकिली. इराण व **मस्कतचे** व्यापारी आपला माल घेऊन दरसाल राजापूरला विक्री करण्याकरितां येतात व काम होतांच परत जातात त्यांचीहि लूट झाली. कोणा एका राजानें व कांहीं लोकांनीं विरोध करण्याची तयारी केली होती. परंतु झाल्या लुटीनें तृप्त झालेले **शिवाजीचे** लोक त्याच्या आधींच निघून गेले.

शि. घ. ले. ६१ सु. १०६२ जिल्काद २५	(८५३) खुर्दखत	श. १५८३ आषाढ व. १२ इ. १६६१ जुलै १३

?—कार. व देस. पा कऱ्हाड

आपदेव कृष्णभट गिजरे यांचा कोणेगाव येथील इनाम अबदुला खान वगैरेंच्या खुर्दखताप्रमाणें चालविणें.

डाग रजिस्टर १६६१ पृ. ४४७-४८ न्यू. डिसेंबर ५	(८५४) उल्लेख	श. १५८३ श्रावण शु. ३ इ. १६६१ जुलै २९(१९)

वेंगुर्ल्याचें पत्र——

बंडखोर शिवाजी विजापूरचे मुलखावर पुन: स्वारी करण्याचा बेत करीत आहे. आणि लखम सावंत, मिळून जाऊन, पोर्तुगीजांनीं प्रसंग पडल्यास त्यांनीं आपल्याला बिनहरकत आश्रय द्यावा म्हणून त्यांचेशीं स्नेहाचें बोलणें लावीत आहे. याकरितां

गोव्याहून **कोठारी** या नांवाचा ब्राह्मण लखम सावंताकडे येऊन त्याच्याकडून पत्र व वकील बरोबर घेऊन परतला आहे. **विजापुरांत** यादवी वाढत असून परिस्थिति अशीच चालू राहिली तर **विजापुराचा** नाश जवळ आला आहे असें म्हटलें पाहिजे. रेव्हिंग्टन व त्याचे जोडीदार अजूनहि सोनगडावर (महाडचे वायव्येस ३ मैल) **शिवाजीचे** कैदेंत आहेत. सलाबतखानानें त्यांच्या सुटकेचें बोलणें करण्याकरितां आपला एक वकील पाठविला; आणि खुद्द तो स्वतः मोठें सैन्य घेऊन बहलोलखानावर स्वारी करीत आहे. ...६ जुलैला इंग्रजांचें मोठें गलबत इराणांतून गोव्याचे बंदरांत आलें. [जुलै २९ पहा इं. फॅ. ११ पृ. ५]

खं. २० ले. १११ सु. १०६२ जिल्हेज ७	(८५५) खुर्दखत फा. मु. व सी.	श. १५८३ श्रावण शु. ८ इ. १६६१ जुलै २४

अजर. **शर्जाखान** सो——— कार. व देसमु. पर. वाई

हाली पर. चा **मोकासा** साहेबास मिळाला. नरसीभट चित्राव याचें **इनाम** चालावें (ले. ७३३ प्रमाणें).

खं. २० ले. ११० सु. १०६२ जिल्हेज १०	(८५६) खुर्दखत फा. मु. व सी.	श. १५८३ श्रावण शु. ११ इ. १६६१ जुलै २७

अजर. **शर्जाखान** सो—— कार. व देश. पर. वांई

साहेबास **मोकासा** मिळाला. नरसीहभट चित्राव याचे पसरणी इनाम चालावें.

शि. च. ले. २ व सर. ले. ४६ सु. १०६२ जिल्हेज १७	(८५७) मिसेली	श. १५८३ श्रावण व. ३ इ. १६६१ आगष्ट ३

पिलाजी नीलकंठराव सुभेदार नामजाद

हवाल. कार. देश. दशपां. मोक. सेटि. माहा. रया. महालानिहाय मामले **प्रभावली**

रंगो बिन केसो नाईक यांनीं **राजगड** मुकामी साहेबास सांगितलें कीं, देशमुखीचे वतन आपले आपणाकडे चालत आहे. **हाली तलकोकण साहेबास अर्जान** जाहले. यावरी कौला प्रमाणे आपण खिजमतीस हजर राहिलो. दिवाणातून सारी वतनें अमानत जाहाली. साहेबी माम. मज. २००० लाहारी देण्याची सनद दिली पण कांहीं पावलें नाहीं. यामुले सेवक हैरान आहे. साहेबी लारी २००० व मौ. कोलवेची इनामत दिल्ही. सनदहि दिल्ही. तरी वरीलप्रमाणें सरदेसाई यास देत जाणे.

स. पृ. २५ ले. २० हि. १०७१ } (८५८) { श. १५८३ श्रावण व.८
सु. १०६१ जिल्हेज २१ } फर्मान { इ. १६६१ आगष्ट ७

अल्ली आदिलशहा—— हवाल. व कार. मामले महमदपूर

श्री शंकर भारती जगद्गुरु यास मौ. येपनहाल, उकळी मामले मज. येथें शृंगेरी व कुडगी मठाकरितां चालू ठेवणें.

सा. ले. ४९ } (८५९) { श. १५८३ आश्विन व. १०
सु. १०६२ व श. } महजर { इ. १६६१ आक्टोबर ७

गोंदजी बिन जाउजी मोकदम पाचपुता मौजे भवाली (शिरवळ) यानें **दुष्काळांत** पाटीलकीची सहावी तकसीम सोमाजी आबाजी पाचपुता यास दिली. नंतर माहादाजी वडजोजी रणदिवे यानें राजश्री **राजे पालकर सरनोबत सुभेदार** याजपुढें 'भवालीची पटेलगी आपली मिरासी' अशी तक्रार केली. चौकशीअंती पाचपुत्यांची पाटीलकी असें ठरलें. (ले. ३८५ व ले. ६२९) पूर्वीचे कागद पाहून हा महजर करून दिला.

डाग रजिस्टर १६६१ } (८६०) { श. १५८३ आश्वीन व.११
पृ. ३२०-३२१ आक्टो. १८ न्यू. } कर्नाटकांत—शहाजी { इ. १६६१ आक्टोबर ८

तंजावरचा नायक राजधानींत थोडे दिवस राहून **मदुरा** येथील नायकाच्या आश्रयानें पुनः **त्रिचनापल्ली**च्या किल्ल्यांत गेला. तेथें या दोघांचा परस्पर तह झाला. जूनच्या अखेरीस **लिंगमनायक** ४० हजार पायदळ व २००० घोडेस्वार घेऊन पोर्टोनोव्होपासून २ मैलांवर सिलेंब्रोनला आला. तेथें राहून **शहाजी** प्रत्यहीं **तंजावरच्या** मुलखांत लूट करी. हत्यार उचलण्यापूर्वी शहाजीशीं बोलणें करण्याचा **नायकानें** प्रयत्न केला. परंतु किनाऱ्याबद्दलचा त्याचा आग्रह पाहून त्याला त्यानें वरदेशांत रेटीत नेलें. अखेरीला **शहाजी** त्याच्या बिकट किल्यांत जाऊन बसला. जिंजीचा **अंबरखान** किंवा **त्याचा कारभारी अंतोजी पोंटेले** यांनीं अरणी किल्ला, शहाजीला त्यांतून काढून लाविल्यांविल्यावर मदुरा नायकाला देण्याचें कबूल केलें आहे. तसें झालें म्हणजे विजापुरी मुसलमानांना जिंजी प्रांतांतून हांकून लावणें सोपें होईल. शहाजीचा पाठलाग चालू असल्यामुळें तेगनापट्टणचे किल्याकडे लिंगम नायकाला लक्ष देणें झालें नाहीं. **तेगनापट्टण** अद्यापि शहाजीचेंच ताब्यांत आहे...ते घेण्याबद्दल प्रयत्न...रावळ कृष्णापानायक शहाजीला मिळाला परंतु लगेच निघून गेला...शहाजी अंतर्देशांत पळाल्यामुळें **तेगनापटण**कडे व्यापारास तेजी आली. परंतु अंतर्देशांत मंदावला....शहाजीनें एका गलबतावरील माल पकडला......**गोवळकोंडेकरांनीं** ४० लाख होन (पॅगोडा) खंडणीचे भरले, आतां तरी **मोंगलांशीं** त्यांचा बेबनाव संपला किंवा नाहीं हें समजत नाहीं. लाहोर व बऱ्हाणपूरचे रस्ते अजून व्यापाराकरितां सुरक्षित झाले नाहींत.

इं. फॅ. ११ } (८६१) { श. १५८३ कार्तिक शु. ६
पृ. ५० इ. } मद्रास–सुरत { इ. १६६१ आक्टो. १९

तुम्हांला सुरतेचे सुभेदारानें वेढिलें....एक गोष्ट सहन केली तर पुढें तो अधिक धीट होईल! इकडे **शहाजीकडून** आम्हांला तसाच त्रास पोंचतो. शहाजी, हा **विजापूरचा सेनापती (शिवाजी)** ज्यानें रेव्हिंगटनला अटक केली, त्याचा बाप. शहाजी गेल्या जुलैमध्यें **पोर्टोनोव्होला** लूट करून गेला....कंपनीचे नोकरांचें त्यांत ३० हजार पार्डो (पॅगोडा=होन)चें नुकसान झालें....कंपनीचें देणें देतां येणार नाहीं. करितां समुद्रांतील गलबतांवर सूड उगवून घेतला पाहिजे. शहाजीचे ताब्यांत आतां पोर्टोनोव्हो आहे. (तेव्हां तेथील गलबतांचें नुकसान केलें पाहिजे.)

इं. फॅ. ११ } (८६२) { श. १५८३ कार्तिक शु. १३
पृ. १६ इ. } सुरत कंसल्टेशन { इ. १६६१ आक्टो. २५

कंपनीनें **दंडाराजपुरी किल्ला** घेण्याबद्दलचा हुकूम दिला. पण सैन्य व गलबतें पुरेशीं नसल्यामुळें हें तूर्त अशक्य असें ठरलें.

डाग रजिस्टर १६६१ } (८६३) { श. १५८३ मार्ग. शु.९
पृ. ४०५-४०६ न्यू. } { इ. १६६१ नोव्हें. २०

गोंवळकोंड्याकडून खंडणी मिळाली नाहीं म्हणून **मोंगल** लढाईचा बेत करीत आहे. **गोंवळकोंडे**करहि सैन्य वाढवून क्रिल्ला लढविण्याची तयारी करीत आहेत....पूर्वी ही खंडणी रुपयांत भरली जाई. परंतु आतां मोगल जुने होन मागतात. कारण नवीन होन हलके झाले आहेत (१२८ नवे=१०० जुने होन)...सेनापती **लिंगम**नायक याच्या अपेक्षेप्रमाणें **शहाजी**विरुद्ध त्याला यश आलें नाहीं....तेगनापट्टमचा वेढा त्याला सोडावा लागला; आणि **सप्टेंबर २ रोजीं शहा**जी व **लिंगम** नायक यांच्यांत **सलोखा** झाला. त्या वेळीं, शहाजीच्या ताब्यांत पूर्वीप्रमाणें पोर्टोनोव्हो व तेगनापट्टन रहावीं आणि त्यानें तंजावर व मदुरा यांच्या मुलखांस उपद्रव देऊं नये; व ५० हजार रायल तंजावर नायकाकडून घेऊन त्याच्या मुलास सोडून द्यावें, असें ठरलें. हा तह नायकांना नापसंत वाटल्यामुळें त्यांनीं **लिंगमनायकाला त्रिचनापल्लीच्या** किल्यावर कैद करून ठेवून **शहाजीशीं** युद्ध चालू ठेवण्याचा बेत केला. पण पुढें उभय नायकांनींहि तहाला मान्यता देऊन तंजावरचा नायक व लिंगम नायक यांच्यांत विवाहसंबंधांनीं परस्पर सोयरीक जमविण्यांत आली....ठरल्याप्रमाणें ५० हजार रायल तंजावरच्या नायकाच्या मुलाच्या सुटकेकरितां पाठवावयाचे. इतक्यांत **शहाजीनें** यापुढें वाट पहाण्यास सवड नाहीं म्हणून तह मोडला व फिरून लढाई सुरू झाली......थोड्याच वेळांत (२५

सप्टेंबरपूर्वी) फिरून तह झाला आहे. आम्हीं (डच लोक) तटस्थ राहिल्याबद्दल शहाजीनें समाधान व्यक्त केलें.

इं. फॅ. ११ } (८६४) { श. १५८३ मार्ग. व. ३
पृ. ५१ } मद्रास–कंपनी. { इ. १६६१ नोवें. २८

पोर्टोनोव्होचे बंदरांत गलबतें येण्याची कांहीं जरूर नाहीं. कारण **अदिलशाही सेनापती शहाजी** यानें शहराचा पुरा नाश केला असून व्यापाऱ्यांचेंहि नुकसान झालें आहे.

मीरजुमलाचें जहाज पकडण्यांत आमचा हात नाहीं.... **मद्रासवर** शिबंदी अगदीं थोडी आहे. या वेळीं बेसावध राहून चालणार नाहीं. आसपास **१०० मैलांचे टापूंत निदान पांच सहा सैन्यें** वावरत आहेत !

इं. फॅ. ११ } (८६५) { श. १५८३ मार्ग व. ११
पृ. ११ इ. } सुरत–कंपनी { इ. १६६१ डिसें. ७

शिवाजीनें रेव्हिंग्टन व आणखी सात इंग्रजांना सहा **महिनेपर्यंत** अटकेंत ठेविलें. ...मोठा दंड मागितला. अनेक विनंतिपत्रांना त्यानें दाद दिली नाहीं. शेवटीं रेव्हिंग्टन आजारी पडल्यामुळें–बरें होतांच परत जाण्याचा करार करून–१७ ऑक्टो. ला येथें येऊन पोंचला....देश सर्व धामधुमींत आहे. एका बाजूला, हा बंडखोर व दुसऱ्या बाजूला सुलतान आणि कित्येक नाखुष झालेले सरदार हे देशाचे वाभाडे काढीत आहेत. काय होईल हें परमेश्वर जाणे !

शि. घ. ले ६० } (८६६) { श. १५८३ पौष शु. १२
सु. १०६२ जवल ९ } खुर्दखत फा. मु. व सी. { इ. १६६१ डिसें. २२

अजर० **जाधवराऊ राजे**— बजा. कार. पर. कन्हाड

पर. साहेबास अर्जानी जाला. आपदे कृष्ण जुनारदार कोणेगाव याचें इनाम चालू ठेवावें.

इं. फॅ. ११ } (८६७) { श. १५८३ माघ शु. १
पृ. ३० इ. } सुरत–कंपनी. { इ. १६६२ जाने. ११

राजापूरला कांहीं व्यापार नाहीं. सर्व देश रणक्षेत्र (रक्तक्षेत्र) झाला आहे. दख्खनचा (अदिलशाही) सुलतान **औरंगजेबाशीं**, आणि दख्खनमधील उमराव बंडें करून स्वतःच्या सुलतानाशीं, एकमेकाशीं आणि औरंगजेबाशीं अशी ही लढत घुमत असतां त्याची झळ येथेंहि लवकरच लागेल अशी भीति वाटूं लागली आहे.

खं. १५ ले. ९८ सु. १०६२ जखर १	(८६८) फा. मु. व सी.	श. १५८३ माघ शु. २ इ. १६६२ जाने. १२

अजर. शर्जाखान— बजा. कार. व देश. पर. वाई

कमलनयन गोसावी यास मौ. इडमिडे येथें, तीस बिघे जमीन पूर्वीच्या (धारोजी राजे मोहिते वगैरे च्या) खुर्दखताप्रमाणें चालत आहे. हाली मौ. मज. **सरबजखान पणी** यासी साहेबी **मुकासा दिधला** आहे. व **साहेबास मुकासा नवा** मिळाला **आहे.** तरी वरील जमीन कमलनयन याजकडे चालविणें.

शि. घ. ले. ३७९ सु. १०६२ जखर २	(८६९) महजर	श. १५८३ माघ शु. ४ इ. १६६२ जाने १३

नेताजी व दीपाजी **राजे मोहिते** देसाई अग्रवादी

हरीफराऊ व हंबीरराऊ व शंकराजी राजे देसाई पश्चिमवादी. संबाजी व धारोजी या बंधूंनीं का। तळबीड व वांगी येथील जोड वृत्ती चालविली. पुढें दोघासी देवाज्ञा जाली. शंकराजी व नेताजी भांडो लागले. गोताने दोन तक्सीमा शंकरराजानें व एक तकसीम दीपाजी व नेताजी राजांनीं खावी. वडीलपणाचा मान आधीं शंकराजीचा व मागून दीपाजी व नेताजी यांचा असें ठरविलें.

राम. अं. ६५-६६ ले. ८ सु. १०६२ व फ. जखर ९	(८७०) तालीक	श. १५८३ माघ शु. ११ इ. १६६२ जाने. २०

बाबाजीराजे भोसले——   महादेव, तिमण, रघुनाथ, विठल सेडगे

तुम्हास (श्री घृशणेश्वर) देवाचा अभिषेख व पूजाबद्दल वर्षासन सालिना १२ रुपये दिले. रुजु बक्षी.

सा. ले. ३४४ सु. १०६२ जखर १०	(८७१) सामराजमुद्रा मर्या.	श. १५८३ माघ वा। १२ इ. १६६२ जाने. २१

शिवाजीराजे————   **पिलाजी नीळकंठराउ** सुभेदार

नामजाद मामले प्रभावली वेदमूर्ती नारो पाध्ये बिन अंतो पाध्ये व केसो पाध्ये बिन राघो पाध्ये व केसो पाध्ये बिन विठल पाध्ये गोळवलीकर साकिन कसबे संगमेश्वर याणी श्रींगारपुरीच्या मुकामी येऊन अर्ज केला जे, आपले मिरास वतन कदीम धर्माधिकरण व जोतिष व देशोपाध्यपण अष्टाधिकार अज मौजे देवघर ता। तुजारपूर मामले मजकूर व ता। संगमेस्वर व ता। कोंडिवरा मामले मार तह्द मौजे देवघर मामले **हमजाबाद** मुजाफत बदर मैमुन मुस्तफाबाद ऊर्फ दाभोल व कसबे संगमेस्वरी धर्माधिकरण व देशमुखाचे घरी जोतिष पुरातन पिढी दर पिढी भोगोटा चालत आला आहे. वतनाचे ताम्रपट कारकीर्दी राजा सत्येस्वर व तुरकांचे कारकीर्दीचीं पत्रें असेत. **हाली**

माहाराजास तलकोकण अर्जानी जाहाले. आपणासी ताजा सनद पाहिजे व सदरहूप्रमाणें पत्रें दाखविलीं. ये बाबे केसव नायेक सरदेसाई व आवजी नाइवा मोकदम व कुक सेट सेटिया व गणोबा किबल व नारोबा करकरा व सोनबा नायवाड माहाजन याणी अर्ज केला जे सदरहूप्रो वतन उपाध्ये मार याचें पुरातन चालिलें असे व हाली भोगोटा असे. पेस्तर चालविणार साहेब धनी आहेत. हा इलतिमास खातिरेसी आणून सदरहूप्रमाणें वतन उपाध्ये मजकूर यासी मोकरर करून हें पत्र तुम्हासी सादर केलें असे. तरी वतन चालविणें.

इं. फॅ. मा. ११ } (८७२) { श. १५८३ फाल्गून शु. १४
पृ. ९९ इ. } { इ. १६६२ फेब्रु. २१

दुसऱ्या चार्लसचें हिंदुस्थानातील गुन्ह्यांबद्दल आज्ञापत्र

ईस्ट इं. कंपनीनें आमच्याकडे तक्रार केली कीं, कित्येक इंग्रज सदर कंपनीशीं कोणत्याहि प्रकारचा संबंध नसतांना, हिंदी गलबतें चालवितात, तेथील लोकांना गलबतें बांधावयास आणि चालवावयास शिकवितात, आणि इंग्रज राष्ट्राचें नुकसान होईल अशा तऱ्हेनें व्यापार करितात....त्यांस धरून इंग्लंडांत पाठवून द्यावें.

इं. फॅ. ११ } (८७३) { श. १५८३ फाल्गुन व. ४
पृ. ७६ इ. } सुरत-कंपनी. (सुरत सुभेदाराचा जुलूम) { इ. १६६२ फेब्रु. २७

सुभेदाराच्या कारभारामुळें रकमेची टंचाई फार भासते. बादशहाला भरण्याचा सर्व पैसा सुभेदारानें आपल्या हातीं घेतला आहे. पूर्वी व्यापारी आपला माल सराफाच्या मध्यस्थीनें अधिक किंमत देईल त्याला विकीत. परंतु आतां आपण सांगूं ती किंमत आणि म्हणूं तें वजन असें म्हणून सुभेदार (चांदी वगैरे) घेतो. यामुळें व्यापारी हवालदिल झाले आहेत. पावसाळ्यामध्यें पैसा मिळविण्याचें मुख्य ठिकाण म्हणजे इराण. परंतु अद्यापपर्यंत येथून एकहि गलबत इराणाकरितां भरून निघालें नाहीं. सुभेदाराच्या जुलमाबद्दल--आम्हीं, डच, इराणी लोक या-सर्वांचीच तक्रार आहे. असा एक आठवडा जात नाहीं कीं ज्यांत तो कोणाला कांहीं उपद्रव करीत नाहीं. डचांचें तांबें तो बादशाही टांकसाळीकरितांच अडकवून ठेवतो. इराण्यांची निष्कारण खोटी करून दुप्पट जकात वसूल केली जाते. सुभेदाराचें असें स्वैर वर्तन आणि बेगुमानपणा चालू असतांना येथें व्यापार करणें शक्य नाहीं.

इं. फॅ. ११ } (८७४) { श. १५८३ फाल्गुन व. ३०
पृ. ८७ इ. } { इ. १६६२ मार्च १०

प्रे. ॲण्ड्रुज--रायगडवरील असंतुष्ट कैदी.

तुमचीं २८ डिसेंबर, १६ जानेवारी आणि ३ मार्च (?)चीं (सुटकेबद्दल उत्सुकता

दाखविणारीं) पत्रें पोंचलीं....लबाड **शिवाजीला** पत्रें पाठविण्यास (तो उत्तरच देत नाहीं!) आम्हांला वेळ नाहीं ...तुम्हीं काढलेली हुंडी ताबडतोब भरली आहे... आपल्याला कैद का प्राप्त झाली हें तुम्ही चांगलें जाणतां. कंपनीच्या मालाचें रक्षण केलें म्हणून ही कैद प्राप्त झाली नसून **पन्हाळयाच्या वेढ्यांत जाऊन इंग्रजांचा बावटा फडकावून गोळे उडविल्याबद्दलचें** हें प्रायश्चित्त आहे. **शिवाजी** नसता आणि दुसरा कोणी असता तरी ज्याला म्हणून असल्या अत्याचाराबद्दल सूड उगविण्याचें सामर्थ्य आहे तो तसाच वागला असता. व्यापाऱ्यांनीं दारूगोळ्यासारखा माल विकावयाचा नसतो किंवा शत्रु-सैन्यावर उडवावयाचा नसतो. परदेशांत असे उपद्व्याप केल्यास मग त्याचें फळ भोगावें लागतें. तुमच्या कैदेचें हेंच खरें कारण आहे. रेव्हिंग्टनला स्वतःला शिवाजीची दारूगोळा न विकण्याबद्दलची आज्ञा माहीत होतीच....

इंडिअन अँटिक्केरी भा. ५० } (१९२१)पृ. ३१५ इ. }　　(८७५) उल्लेख　　{ श. १५८३ { इ. १६६१

[इस्कालिअटचें भावास सुरतेबद्दलचें पत्र, इ. १६६४ जानेवारी २८ चें.]

"विजापूरचे सुलतानाला न जुमानतां **शिवाजीनें राजापूर** घेतलें, व लुटलें; **इंग्रजांच्या वखारींतील जमिनी खणून संपत्ती नेली** आणि तेथील इंग्रज व्यापाऱ्यांना ८ महिने कैद करून ठेविलें."

इं. फॅ. ११ } पृ. २७ इ. }　　(८७६) सुरत—कंपनी.　　{ श. १५८३ { इ. १६६१

(सुरतेशिवाय) आपल्याला स्वतःची अगदीं स्वतंत्र अशी जागा पाहिजे. या लोकांशीं खुला व्यापार चालू झाल्यापासून हे लोक **आम्हांला बायकांसारखे दुर्बल समजून वाटेल त्या** प्रसंगानें आमचा अपमान करितात.

इं. फॅ. ११ पृ. १८ } ओ. कॉ.२८९७ इ. }　　(८७७) गलबताला सूचना　　{ श. १५८३ { इ. १६६१

कोचीन ते स्वाली पर्यंत वाटेंत सांपडतील तीं विजापुरी बंदरांतील गलबतें, म्हणजे **संजान ते गोव्या** पर्यंतचीं, राजापूर वखारवाल्यांच्या कैदेच्या प्रतिकारार्थ म्हणून पकडावीं.

राम. अं. ६५-६६ ले. ९ } सु. १०६२ व हि. १०७२ }　　(८७८)　　{ श. १५८३ { इ. १६६१

अजर. **सिद्दी बिलाल**-- महादेव तिमण व रघुनाथ विठल सेडगे.

खेलोजी व **जिवाजी** राजे अभिषेकाबद्दल येलूरास सालाबाद देत आले आहेत, त्याप्रमाणें वर्षासन १२ रुपये देविलें आहे. पाा रा हुजूर रा गणेश

सा. ले. १०३ } (८७९) { श. १५८३?
? } करिना { इ. १६६१

दादाजी कोंडदेऊ याचा मुलखास कौल देणें, शाईस्तेखानाचें पुण्यास आगमन, शास्ताखाना गेल्यानंतर मोगलाचें व शिवाजी महाराजांच्या फौजांचें भांडण काकडखानास पुण्याचा मोकासा, वगैरे गोष्टींचा उल्लेख आहे. (साळुंबरे येथील पाटील.)

सा. ले. ३९ } (८८०) { श. १५८३?
? } अर्जदास्त { इ. १६६१

सेरीकर मोकदम मौ० खेडबुा— दिवाण पा। सिरवळ

राहुजीपंत तरफ दामाजीपंत कारभार माहादाजीपंत देसकु. हे लावणीसंचणी करणें म्हणून गावास पाठविले. तो मोगलाचा गलबला जाला. त्याने कुलाचे पेव वस्तभाव नेलिया. त्यावरी व हाली मोगल येताती म्हणउनु वार्ता आइकिली. कुलास तकवा मिघेना. वस्ता, गुरे गेली याकरितां कुलें गेली. येकदोघे मेलउनु लावनी करू साहेबी कौल दिला पाहिजे. व आम्ही जो देऊ तो चालविला पाहिजे.

इं. फॅ. भा. ११ } (८८१) { श. १५८३ फा– ८४ चैत्र
पृ. १२८ इ. } { इ. १६६२ मार्च सुमार.

इंग्लंडचा राजा— सर अॅब्राहम शिपमन (मुंबई बेट प्रथम ताब्यांत घेण्याकरितां नेमलेला अधिकारी) यास सूचना.

आमच्या राज्याला हें बेट जोडून इतक्या खर्चांत पडण्याचें मुख्य कारण असें आहे कीं, त्या योगानें आमच्या प्रजेला हिंदुस्थानांत अधिक स्वतंत्रपणें आणि किफायतीनें व्यापार करतां यावा, आणि त्या भागांतील आमच्या ताब्यांतला मुलूख वाढावा आणि सामान्यतः आमचे राजपदाचा मान वाढून आमच्या प्रजेचा उदीम धंदा आणि वैभव वाढावें......

शि. प. ले. ३८० व ३८१ } (८८२) { श.१५८४ चैत्र शु. ६
सु. १०६२ साबान ४ } मिसेली फा. मु. व सी. { इ. १६६२ मार्च १५

अज दि. ठाणा देहाय तर्फ पाली पर. कन्हाड—

ता। हुदे व मोक. व मौजे कोलवीर (व मुड):— १५ होन देण्याचा हुकूम.

इं. फॅ. ११ } (८८३) { श. १५८४ चैत्र शु. १०
पृ. ९७ इ. } लंडन ई. इं. कंपनी–सुरत कौन्सिल. { इ. १६६२ मार्च १९

हीं गलबतें पोंचत तोंपर्यंत दंडाराजापूर कंपनीच्या ताब्यांत आलें असेल तर

सोईप्रमाणें सुरत सोडून देऊन वखार इंदाला आणून वसवावी. आणि तेथें हातार्शी असतील तेवढ्या इंग्रजांचे साहाय्यानें बंदोबस्त करावा आणि इकडे कळवावें.

इं. फॅ. ११ } (८८४) { श. १५८४ चैत्र व. ३
पृ. ७२ इ. } 'रॉयल वेलकम' गलबताला हुकूम { इ. १६६२ मार्च २७

सर्व मलबारी किंवा दख्खनी सांपडतील त्यांना कैद करावें. गलबतें जाळावीं. आणि माणसांना किनाऱ्यावर सोडून द्यावें.

राम. अं. ६२ ले. ३ पृ. १२ } (८८५) { श. १५८४ चैत्र व. ११
सु. १०६२ साबान २५ } खुर्दखत फा. मु. व सी. { इ. १६६२ एप्रील ५

अजर. नाइकजीराजे खराडे—— कारकून व देशमूख तपे मसूर

कासीभट बिन अनंतभट सेकिन पाटण यास २० बिघे जमीन बरहुकूम भोगवटे कारकीर्दी वजीरानी ता। शाहाजीराजे भोसले चालत आले असे. हाली साहेबास मुकासा अर्जानी जाला...तरी दुमाले कीजे.

इं. फॅ. ११ } (८८६) { श. १५८४ वैशाख शु.२
पृ. ८० इ. } सुरत-कंपनी { इ. १६६२ एप्रील १०

राजापूरला मिरीं मिळत नाहीं आणि इंग्रज कैद्यांचीहि सुटका झाली नाहीं. आतां शिवाजीचीं मक्केहून येणारीं गलबतें पकडून कैद्यांची सुटका आणि लुटीची भरपाई करून घेऊं. शिवाजीला कैद्यांच्या सुटकेच्या मजकुराचीं पुष्कळ पत्रें पाठविलीं परंतु तो उत्तरच देत नाही. यापुढें आदिलशाही सुलतानाला पत्रें पाठविणार आहोंत. त्या योगानें कदाचित् अधिक यश येईल.

शि. च. ले. ३ व सर. ले. ४७ } (८८७) { श. १५८४ वैशाख शु. १३
सु. १०६२ रम १२ } 'सामराज' मुद्रा व सी. { इ. १६६२ एप्रील २१

सिवाजीराजे-- पिलाजी नीलकंठराव सुभेदार नामजाद मामले प्रभावली सालगु॥ तल कोंकण मुलकाची कबजादत बदल खासा स्वारी तल कोंकणात होउनु मुलक कबज जाहाला. ते वक्तीं शृंगारपूरकर सुर्वे व कोंकणांतील पातशाई अमलदार याणी बेमानी केली ते नतीजा पोहचोन उधलोन गेले. मुलकांतील रयतीस सरंजामाबदल वतनदार व रयत यांस सरकारांतून कौल सादर जाहालेवर केसो नायक बिन राघो नाईक मावलंगकर व सारे वतनदार मामले मजकूर सरकारी खिजमतीस हाजीर जाहाले. साल मजकुरीं रंगो नाईक मावलंगकर सरदेसाई मामले मा॥ याणी किले राजगडच्या मुकामी हुजूर येऊन अर्ज केला जे, आपले सरदेशमुखीचें वतन मामले मा॥ व मामले दाभोल पिढी दर पिढी मातकदम इस्तकबिल

थासून ता सालगुदस्तापावेतों चालत आले. हाली तल कोकण साहेबांस अर्जांनी जालेवर साहेबीं सेवकावर मेहेरबान होऊन कौल सादर केले. यावर आ + + वतनाचे बाबे खिजमतीस हाजीर जाहालो. हाली दिवाणातून सारी वतने **अमानत** जाली. आपले कबिजा हक व लवाजिमा व इनामती अमानत जाल्या. आपण तों साहेबाचे खिजमतीस एकसान असो. साहेबीं मेहेरबान होऊन सेवकाची वतनावर स्थापना केलिया व कुटुंबास अंन देऊन उस्तवारी केलिया उमेद धरून एकसान चाकरी करूं; व ये बाबे तुम्हीं इलतिमास लिहिली. बा इलतिमास खातरेस आणून व **रयत मामुरीवर** नदर देऊन बेकदीम वतनदार याबद्दल नायक मा यांस दोनी मामले मा **सरदेशमुखी** वशपरंपरेनें करार करून नाईक मा यांस मामले प्रभावलीचे जमाबंदीवर पटी पसोडी हक लारी २००० दोन हजार रयत निसबत करार केली असे. तरी तुम्ही मा मा जमाबंदीवर रयत निसबत सदरहू लारी २००० दोन हजारची **सीस्त** दरसाल नाईक मा देवीत जाणे. दरसाल ताजा सनदेचा उजूर न धरणे. **मामले दाभोलची** पटीपछोडी हक याची सीस्त होणे. त्यास मा माचे अमलदार व वतंदार हुजूर आणविले आहेत ते आलेयावर होईल....

इं. फॅ. ११ पृ. ८८ }
इ. }
(८८८)
सुरत–रँडॉल्फ टेलर, कैदी (रायरी)
{ श. १५८४ ज्येष्ठ शु. १०
{ इ. १६६२ मे १७

शिवाजी किंवा **विजापूरचा** राजा कोठें आहे तें कळलें असतें तर तुमच्या सुटकेकरितां पत्रें लिहिलीं असतीं....इराणाहून आमचीं गलबतें आलीं म्हणजे एक वेंगुर्ल्याजवळ आणि दुसरें खारेपाटणजवळ ठेवून (शत्रूंचीं) मक्का व इराणहून येणारीं गलबतें पकडण्याची तजवीज करूं. आणि **दख्खनी सांपडेल त्यास मोकळें सोडणार नाहीं**. आमच्या पत्रांनीं जें काम होत नाहीं तें ह्या मार्गानें होतें काय पाहूं. **वृद्ध राणी इतक्यांतच परत येणार आहे** असें समजतें. नशिबानें ती आमचे हातीं लागली तर सुलतानाकडून तुमच्या सुटकेबद्दल खटपट होईल. तिच्या येण्याबद्दल किंवा महत्त्वाचीं गलबतें व माणसें यावयाचीं असलीं तर त्यांबद्दल कळेल ती माहिती कळवा. म्हणजे (पकडण्यास) ठीक पडेल. इतक्या लांब शत्रूच्या मुलखांत बोलणें करण्याकरितां मनुष्य तरी कसा पाठवावा? विजापूरच्या सुलतानाकडे निराळ्या मार्गानें आम्हीं पत्र पाठवीत आहोंत.

शि. प्र. पृ. १०७ }
सु. १०६३ जिल्काद १० }
(८८९)
मिसेली फा. मु. व सी.
{ श. १५८४ आषाढ शु. ११
{ इ. १६६२ जून १७

अज दि. तपे वालवे—— ता हुदे. व मोक. कसबे वालवे.

मेलगिरी पंडिताचे इनामात सिद्धेश्वराचा इनाम जात आहे. त्या मोबदला सिद्धेश्वरास दुसरा इनाम दिला आहे.

को. इ. सा. ले. ११ } (८९०) { श. १५८४
? } टिपण { इ. १६६२

[श. १५८२] माघ मासी **बडे साहेबीण मक्केस** जाण्यासी वेंगुर्लेस आली. इसने अखेर व अवल सलासमधे [श. १५८४ ज्येष्ठ] मक्केहून बडे० वेंगुर्ल्यास आली. आंबोली पावेतो घालविली.

सा. ले. २१९ } (८९१) { श. १५८४ आषाढ वा ६
सु. १०६३ जिल्काद २० } 'महादेव' मुद्रा व सी. { इ. १६६२ जून २७

शिवाजीराजे——— सर्जाराऊ जेधे देशमूख ता। भोर व ता। रोहिडखोरे बखैर पाठविली. लिा जे लोकी फुटून हुजूर येत आहेत तरी साहेबी हुजूर चाकर ठेविले न पाहिजेत म्हणउनु लिहिले. तरी तुमचे लोक हुजूर येतील त्यास साहेब ठेवणार नाहींत. तुमचे तुम्हापासी फिराउनु पाठवितील.

खं. १५ ले. ९९ } (८९२) { श. १५८४ श्रावण शु. १०
सु. १०६३ जिल्हेज ९ } मिसेली फा. मु. व सी. { इ. १६६२ जुलै १४

अज दि. ठाणा तपे तारगाऊ——— ता। हुदे. व मोक. मौ. निगडी कमलनयन याजकडे निगडी येथील जमीन बिघे १५ खुर्दखताप्रमाणें चालविणें.

इं. फॅ. ११ पृ. ८८ } (८९३) { श. १५८४ श्रावण व. १
इ. } सुरत कंसल्टेशन { इ. १६६२ जुलै २१

आतां (टेलर वगैरेंना) कैद होऊन १७ महिने झाले; आणि मोठा दंड भरल्याशिवाय सुटकेची आशा दिसत नाहीं...दुसरे उपाय थकल्यामुळें...होपवेल बोटीनें **राजापूर व खारेपाटणची बाजू** आणि रॉयल वेलकमनें **वेंगुर्ले, दाभोळ इ० बंदरें** पहावीं. २० सेप्टेंबरपर्यंत असा पहारा करावा. **राणी** पहिल्या (वेंगुर्ले) बंदरांत उतरेल असा अंदाज आहे. सांपडली तर **तिला सन्मानानें वागवावें.**

फॅ. रे. सुरत भा. ८५ } (८९४) { श. १५८४ श्रावण व. १
पृ. ३८३ इ. } सुरत-कप्तानांना हुकूम { इ. १६६२ जुलै २१

'कोणीहि दक्षिणी इसम, दख्खनचा सुलतान, **शिवाजी**, आणि देशांतील कोणीहि व्यापारी यांचें गलबत असेल तें धरावें. **दख्खनची राणीहि धरावी.** या वर्षी ती मक्केहून परत फिरली असें नक्की कळलें आहे. **वेंगुर्ल्याहून** निघाली असल्यामुळें

तेथेंच बहुधा परत येईल. मोठी इतबारी असामी जाणून सन्मानानें वागवावें. परंतु सुटून जाऊं देऊं नये.'

खं. १५ ले. २७५ } (८९५) { श. १५८४ श्रावण व. ६
सु. १०६३ जिल्हेज २० } 'महादेव' मु. व सी. { इ. १६६२ जुलै २६

रा. सिवाजीराजे——— रा. बाजी सर्जाराऊ जेधे देशमुख ताा भोर

तुम्ही बखैर पाठविली. लिहिले जे, आपण माणसे जाउलीकडे नेईन. तरी निंबाजीस कागद दिधला पाहिजे म्हणउनु लिाा तरी दाटून माणसे जाउलीकडे काशास नेऊ पाहतां. जैसी आहेत तैसी असो देणे व दताजी कंकास कौल पाठविणे म्हणउनु लिाा तरी कौल पाठविला असे. तरी त्यास देणे आणि त्यासी हुजूर पाठविणें.

शि. घ. ले. ३८२ } (८९६) { श. १५८४ श्रावण व. ७
सु. १०६३ जिल्हेज २१ } { इ. १६६२ जुलै २७

मोहिते पटेल कस. तळबीड——— नेतोजीराजे मोहिते पटेल कस. मज.

निवाड्याप्रमाणें तुम्हास जमीन हक देत आहों.

खं. १५ ले. १०० } (८९७) { श. १५८४ श्रावण व. १४
सु. १०६३ जिल्हेज २७ } खुर्दखत फा. मु. व सी. { इ. १६६२ आगष्ट २

अजर. रा. रायाजी राजे घोरपडे—ताा हुदे. व मो. मौ. एरोले पर. कऱ्हाड कमलनयन गोसावी याची ५ बिघे जमीन दुमाला करणें.

राम. अं. ६५ ले. १० } (८९८) { श. १५८४ भाद्र. शु. ३
सु. १०६३ मोहर १ } फा. मु. व सी. { इ. १६६२ आगष्ट ६

झुझारराऊ राजे घाटगे—महादभट सो वेळूर घुस्मेश्वर यासी अभिषेकाबद्दल सालिना १२ होन व सिवालयतीर्थीच्या तीर्थोपाध्येपण दिल्हे असे.

गो. इ. सा. ले. ३ } (८९९) { श. १५८४भाद्र.शु.१५
सु. १०६३ मोहर १४ } फर्मान–उल्लेख { इ. १६६२ आगष्ट १९

विजापूर बादशहा–बजा. हवाल. व कार. मामले गोवा.

नारायण जोशी व विठल जोसी यांस दरसाल ९ व १८ होन पूर्वीप्रमाणें देत जाणें.

इं. फॅ. भा. ११ } (९००) { श. १५८४ भाद्र. शु.१५
पृ. ९०–९१ इ. } सुरत–रायरींचे कैदी { इ. १६६२ आगष्ट १९

सुलतानाला देण्याकरितां राजापूरच्या एका व्यापाऱ्याकडे दिलेलें पत्र त्यानें पोंच-

चून त्याचा तोंडी जबाब आणला आहे कीं, **शिवाजीला** आपल्याकडून लिहून कांहीं फायदा नाहीं. **सुलतानाचें सैन्य शिवाजीवर जात आहे.** त्याचे हातून शक्य तितक्या लवकर कैद्यांची सुटका घडवून आणण्याचा त्याचा विचार आहे. लवकरच सुलतानाचें पत्र येईल....आम्हींहि कोणाला तरी समुद्रावर किंवा किनाऱ्यावर पकडून आमचें उद्दिष्ट साध्य करूं.

खं. १५ ले. २७५ } (९०१) { श. १५८४ आश्वीन शु. ११
सु. १०६३ सफर १० } 'महादेव' मु. व सी. { इ. १६६२ सप्टें. १८

सिवाजी राजे— जेधे

तुम्हास रजा फुरसदगी दिधली. ऐसियासि फुरसदगी देउनु बहुत रोज जाले आणि तुम्ही आले नाहींत. तरी हाली रोखा पावताच हुजूर येणे. घोडी गावी ठेउनी तुम्हीच हुजूर येणे.

इं. फॅ. भा. ११ } (९०२) { श. १५८४ आश्वीन व. ८
पृ. १९६ इ. } कंपनी–सुरत { इ. १६६२ सप्टें. २५

इंग्लंड व हॉलंड या दोन राष्ट्रांत तह झाला आहे. तीन महिन्यांत उभय राष्ट्रांकडून मान्य केला जाईल. (तहाची तारीख १६६२ सेप्टेंबर ४).

इं. फॅ. भा. ११ } (९०३) { श. १५८४ आश्वीन व. १०
पृ. १०६ इ. } मुंबई (ऑंजिअर)–सुरत (प्रेसिडेंट) { इ. १६६२ सेप्टेंबर २६

मॅथ्यू नोल टेलरचें (रायगडावरील कैदी) पत्र मार्लबरोला येऊन आला. **'विजापूरची राणी (बडी साहेबीण) चौलांत गुप्तपणें रहात आहे.** तिला ताब्यांत घेऊन आपली सुटका करावी' असें त्यांत लिहिलें होतें.

[ओ. कॉ. २९४१]– आपलें **राजापूरला जाणें** या वर्षी तहकूब झालें असें आम्हीं गृहीत धरतों. आपण सुरतेलाच असाल.

खं. १५ ले. ३३९ } (९०४) { श. १५८४ आश्वीन व. ११
सु. १०६३ सफर २३ } 'महादेव' मु. व सी. { इ. १६६२ सेप्टें. २७

रा. **सिवाजी राजे—बाजी सर्जाराऊ** देसमुख ता। भोर ता। रोहिडखोरे

अर्दास छ १५ सफर रा। छ १८ मिा। पहुचोन हकीकत मालूम जाली. लि॥ की साहेबाची रजा सादर जाली की दोघे भाऊ चाकरीस हुजूर येणे. यावरी दोघे भाऊ स्वार होउनु येत होतो. यावरी घरामध्यें दुखापती जाली आहे, याबदल खोळंबेला असो. म्हणौन लिहिले. तरी वेथा हाली बरी जाली असेल. या उपरी स्वार होउनु येणे. बहुत दिवस राहिलियावरी सबनीस जागा धरितील. येणेकरून तुमचा काय सरफा आहे. यावरी सत्वर

स्वार होउनु येणे. व लि।। की आपलिया माणसास जावली राहावयासी देणे....तरी तुमचेहि राहाण्याचा जागा बराज आहे. जावलीस माणसे न पाठवणे. तुमचेच तरफेस कुबल जागा असेल तेथें ठेवणें व लि।। कीं बालाजी गुजर गोविंदराऊ आटगांवकर याकडे होता; हाली साहेबाची चाकरी करावयासी उमेद धरितो म्हणौन लि।। तरी त्याची आम्हास चाकरीची गरज नाहीं.

खं. १५ ले. २७६ }
सु.१०६३ रवल २० } (९०५) 'महादेव' मु. व सी. { श. १५८४ कार्तीक व. ७
{ इ. १६६२ ऑक्टो. २३

रा. सिवाजी राजे—सर्जाराऊ जेधे देसमूख ता। रोहिरखोरे

तपियात धावणीस येताती म्हणौन जासुदानी समाचार आणिला आहे. तरी तुम्हास रोखा अहडताच तुम्ही तमाम आपले तपियांत गावचा गाव ताकिदी करून माणसे लेकरेबाळे समत (समेत) तमाम रयेती लोकांस घांटाखाले बांका जागा असेल तेथे पाठवणे. जेथे गनिमाचा आजार पहुचेना ऐशा जागियासि ख्रासि पाठविणे. ये कामास हैगै न करणे-रोखा अहडताच सहरहू लिहिलेप्रमाणे अमल करणे-ऐसियासि तुम्हापासून अंतर पडलियावरी मोगल जे बांद धरून नेतील **त्याचे पाप तुमचे माथा बैसेल.** ऐसे समजोन गावचा गाव हिंडोनु रातीचा दिवस करून लोकाची माणसे घाटाखाले जागा असेल तेथे पाठवणे. या कामास एक घडीचा दिरंग न करणे तुम्ही आपले जागा हुषार असणें गाबगनाहि सडेकडील सेतपोत जतन करावया जे असतील त्यासहि तुम्ही सांगणे की, डोंगरवर असिरा कुबल जागा आसरे ऐस त्यासि सागणे व गनीम दुरून नजरेस पडताच **त्याचे धावणीची वाट चुकवुनु पलोन जाणे.** तुम्ही आपले जागा हुषार असणे.

त्रै.॥व. २ पृ. ६३ सु. १०६३ }
हि. १०७३ रखर ३ } (९०६) { श. १५८४ मार्ग. शु. ४
{ इ. १६६२ नोव्हे. ५

?—जहागीरदाराचे गुमास्ते, देसमुख, देसपांडे, मोकं. शेटे महा. व रया पा। पुणे.

मोरोबा गोसावी सो। चिंचवड यांस हरजागा जो इनाम आहे तो त्यांचेकडे चालू ठेवणें.

इं. फॅ. मा. ११ }
पृ. १०७ इ. } (९०७) { श. १५८४ मार्ग. शु. १४
{ इ. १६६२ नोवें. १४

सुरत (ऑक्झिडेन्.)—रायरी किल्ल्यावरील कैदी.

वेणीदास एका ब्राह्मणाचे मार्फतीनें शिवाजीच्या ब्राह्मणाचें मन वळवीत आहे... आम्हीहि सुरतेचे गव्हर्नर इत्यादींना नजराणे देतांना तुमच्याबद्दल जोराची मागणी करूं.

येथून ते शिवाजीचें पारिपत्य करण्याकरितां गेलेल्या शाइस्तेखानाला लिहितील आणि तुमची मुक्तता होईल. शिवाजीवर त्याचा फारच दाब पडत आहे असें म्हणतात.

इं. फॅ. मा. ११ }
पृ. १०९ इ. }
(९०८)
डच व इंग्रज
{ श. १५८४ मार्ग. व. ३०
{ इ. १६६२ नोव्हें. ३०

सुरत—आलेपो, इंग्लिश कॉन्सल.

डच कोचीनला जमिनीवरून व समुद्रावरून वेढा घालून बसले आहेत. तें ते लवकरच घेतील...आमचेशीं त्यांचा उद्दामपणा चालूच आहे. त्यांनीं आमचें एक गलबत धरून सात दिवस अडकवून ठेविल्यामुळें नुकसान झालें....

इं. फॅ. मा. ११ }
पृ. १०८ इ. }
(९०९)
{ श. १५८४ पौष व. ४
{ इ. १६६२ डिसें. २०

रँडॉल्फ टेलर—सुरत.

आमचे स्थितींत कांहीं फरक नाहीं. किल्ल्याचा हवालदार परत आला म्हणजे त्याचेशीं कांहीं (डोई दंडाबद्दल) नक्की ठरवितां येईल...चौलहून हरजीला राजापुरास पाठवून त्या प्रांताचा अधिकारी रावजी पंडित याचें मन वळवून त्याचेकडून शिवाजीला आमच्या सुटकेबद्दल लिहविण्याची खटपट करणार आहोंत. त्या लुच्चानें हें मनावर घेतलें तर आमचें काम होईल,

हि. रे. क. ९ }
पृ. ११० इ. }
(९१०)
पोर्तुगीज गव्हर्नर————शिवाजी
{ श. १५८४ पौष
{ इ. १६६२ डिसें.

तुमचा विश्वासू मनुष्य पाठवा. त्याच्यामार्फत दोनहि संस्थानांच्या हिताच्या दृष्टीनें महत्वाच्या गोष्टी कळवावयाच्या आहेत.

भै. व. ६ पृ. ७३ ले.६ }
श. सु. १०६३ जवळ २१ }
(९११)
म. मु. व सी. अस्पष्ट
{ श. १५८४ पौष व. ९
{ इ. १६६२ डिसें. २३

जाधवराऊ राजे———— सकलतीर्थस्व. वेद. गणेश दीक्षित

आपले श्री सप्तशृंगीचे तीर्थपुरोहितपण तुम्हास दिधले असे.

इं. फॅ. मा. ११ }
पृ. १४४ इ. }
(९१२)
मि. गॅरी—लंडन
{ श. १५८४ माघ शु. १४
{ इ. १६६३ जाने. १२

मुंबई व आसपासच्या लोकांनीं सुरतेला जाऊन इंग्रजांना बोलावून आणण्यासाठीं एक ब्राह्मण पाठविला. मुंबईवर हल्ला करण्याकरितां शिपमन आपल्याबरोबर

येईल तर आपण १००० गोळे पुरवूं असें तो म्हणाला. आपल्यावरील सत्ताधीश पोर्तुगीजांनीं आपल्याला अमर्याद त्रास दिला असें त्याचें म्हणणें आहे.

खं. १५ ले. १०१ } सु. १०६३ जखर २० }	(९१३) मिसेली फा. सी.	{ श. १५८४ माघ व. ७ { इ. १६६३ जाने. २०

अज. दि. ठाणे तपे देगांव किले सातारा — ता। हुदे. व मोक. मौ. अनेवाडी पर. कुडाळ:— कमलनयन गोसावी यासी २ बिघे जमीन इनाम हवाला करणें.

खं. १५ ले. १०२ } सु. १०६३ जखर २२ }	(९१४) मिसेली फा. मु. व सी.	{ श. १५८४ माघ व. ९ { इ. १६६३ जाने. २२

अज. दि. किले चंदन— ता। मोक. व राया. कसबे कुडाल:— नोगींद्र गोसावी यांचें भात देणें.

इं. फॅ. भा. ११ } पृ. २३९ इ. }	(९१५) कारवार-सुरत	{ श. १५८४ माघ व. १४ { इ. १६६३ जाने. २८

कानडयाचा राजा व विजापूरचा (दख्खन) राजा यांच्या मध्यें वैर चालू असल्यामुळें इकडील मुलखांत व्यापारी लमाणांचें जाणें येणें धोक्याचें झालें आहे. [इकेरी उर्फ बेदनूरचा नायक 'भद्राप्पा नाईक' असून सरकार म्हणतात तसा शिवाप्पा नव्हे. इं. फॅ. मधील खुलासा चुकला आहे. पहा डागरजिस्टर १६६३ पृ. २१६ ता. ११ जूनचा उल्लेख. व शिवचरित्रप्रदीप पृ. १७९ टीप २.]

फॅ. रे. सुरत भा. २ } पृ. १३२-१३४ इ. }	(९१६)	{ श. १५८४ फा। शु. ६ { इ. १६६३ फेब्रु. ३

कॉन्व्हर्टिन गलबताचा कॅपटन टिंकर यास आज्ञा.

काल २ तारखेचा हुकूम दिल्यानंतर असें कळलें कीं, **शिवाजी नांवाचा एक बंडखोर** दोन मोठीं गलबतें मक्केकडे रवाना करण्याच्या तयारींत आहे. समुद्रांत वादळ झाल्यामुळें बऱ्याच किंमतीचा माल त्याचे किनाऱ्याला लागला, तो त्यानें त्या गलबतांत भरला आहे. तेव्हां आपले कैदी शिवाजीचे ताब्यांत आहेत त्यांना सोडविण्याकरितां आणि शक्यतर राजापुरच्या लुटीची अंशतः भरपाई होईल ती करण्याकरितां राजापूर बंदरांत जाऊन तीं गलबतें धरावीं. गलबतें भरावयाची जागा राजापूरपासून दोन मैलांवर **जैतापुरास** आहे. तेव्हां शक्य तितकी त्वरा करून होडयांतून माणसें पाठवून अचानकपणें हल्ला करून गलबतें घेऊन यावीं. परंतु ताब्यांत आलेल्या मालाची अफरातफर होऊं देऊं नये. गलबतें हातीं नच आलीं तरीहि या हालचालीमुळें भीती पावून ते आपल्याशीं तह करण्यास तयार होतील व कैद्यांची सुटका होईल. आपले शिपाई मालाची लूट, चोरी करणार

नाहींतच; तशी खात्री वाटत नसेल तर हा उद्योग न केलेला पुरवला. कारण पुनः तसे होईल तेव्हां झालेली नुकसानी कंपनीला भरून द्यावी लागेल.

इं. फॅ. भा. ११ पु. २३०-२३२ इ. | (९१७) रँडॉल्फ टेलर-सुरत | श. १५८४ फा शु. ९ इ. १६६३ फेब्रु. ६

रावजी पंडिताच्या हुकमाप्रमाणें १७ जानेवारीला आमची **रायरीहून** सुटका झाली व ता.२९ ला आम्हीं **राजापुरास** येऊन पोंचलों...रावजी पंडीत, ४ दिवसांनीं खारेपाटणहून परत आल्यावर त्याच्या सांगण्यावरून आमच्या बेड्या तोडण्यांत आल्या व नंतर त्यानें आम्हांला भेटीस बोलाविलें. त्या वेळीं प्रेसिडेंटशीं केलेला पत्रव्यवहार, व त्याच्यावर प्रेसिडेंटचें आलेलें उत्तर वगैरे त्यानें आम्हांला सांगितलीं. पत्रांवरून शिवाजी व इंग्रज यांचा सलोखा होण्याची त्याला आशा वाटली. असा सलोखा होणें त्याला इष्ट वाटत असल्यामुळें बोलणें करण्याकरितां म्हणून आम्हांला त्यानें बोलाविलें. या तऱ्हेचें बोलणें स्वच्छपणें व्हावयाचें तर प्रथम आम्हीं बंधमुक्त झालें पाहिजे असें सांगितल्यामुळें त्यानें पुष्कळ लोक होते त्यांच्या समक्ष मुक्त केल्याचें सांगितलें. त्यानंतर 'आपल्यासारख्या खालच्या दर्जाच्या लोकांना प्रेसिडेंटच्या परवानगीशिवाय स्वतंत्रपणें बोलणें करतां येत नाहीं; पण पूर्वींचा अनुभव विचारांत घेतला तर राजापूरच्या लुटीबद्दल नुकसानीची भरपाई झाल्याशिवाय आपले अधिकारी बोलणेंच करणार नाहींत' असें आम्हीं सांगितलें. यावर त्यानें असें सांगितलें कीं 'झाल्या गोष्टी विसराव्या. यापुढें एका काडीचीहि तोशीस आम्हीं लागूं देणार नाहीं.' झाल्या गोष्टींचीं त्यानें सर्व व्यापाऱ्यांच्या समक्ष कारणेंहि सांगितलीं. परंतु अँड्र्यूजनें आमच्या विरुद्ध कंपनीकडे लिहिलें त्यांपैकीं कांहींच कारण सांगितलें नाहीं. तो म्हणाला कीं 'त्यावेळीं **शिवाजीचें व विजापुरकरांचें युद्ध चालू होतें** यामुळें विजापूरचा मुलूख म्हणून राजापूरला उपद्रव दिला गेला. शिवाय, त्यावेळीं **दोन प्रबळ सत्तांशीं झगडा करावयाचा होता** आणि **औरंगशहानें शिवाजीचा** बराच मुलूख उध्वस्त केला होता. या कारणांनीं **शिवाजीला (द्रव्याची) फार गरज होती.** आतां शिवाजीला तशी तीव्र गरज नाहीं आणि कदाचित् गरज लागली तरी असला प्रकार पुनः होणार नाहीं अशाबद्दल तो शपथ देईल इ०'. अशा मजकुराचें शिक्क्यानिशीं खुद्द शिवाजीचें, ज्याच्यावर **चंदनाचा (गंधाचा) त्याच्या हाताचा छाप वठविला होता,** असें आलेलें पत्र त्यानें आम्हांला दाखविलें. [Shewing us a writing from his master with his own chop (छाप = सील) and others accustomary to it, as also the print of the Rajah's hand on the top of the paper, done with sandall]. यावर आम्हीं म्हटलें कीं 'तुम्हीं सांगितलेल्या गोष्टींवर विश्वास

ठेवून बहुधा आमचे अधिकारी आतां शिवाजीच्या ताब्यांत गेलेल्या (राजापूर) बंदरांत पुनः व्यापार चालू करतील. परंतु पूर्वीच्या नुकसानीची भरपाई आधीं झाली पाहिजे.' अशी भरपाई करून देण्यानें शिवाजीचा तोटा होणार नाहीं असेंहि आम्हीं सांगितलें...दरबारांत सर्व व्यापारी आणि बडे अधिकारी जमले होते. तेथून परत जाण्यापूर्वी, इंग्रज व शिवाजी यांच्यांत कांहीं तह ठरेपर्यंत, रावजी पंडिताला कळविल्याशिवाय आम्हीं राजापूर सोडून जाणार नाहीं, अशी त्यानें आमच्याकडून शपथ घेवविली. शिवाय या सलोख्याच्या बाबतींत आपण आपल्या बाजूनें शक्य तो प्रयत्न करूं अशीं आम्हीं वचनें दिलीं. हा स्नेह घडून आल्यास पूर्वीप्रमाणेंच सर्व प्रकारच्या व महत्त्वाच्या सवलती मिळतील असेंहि अभिवचन त्यानें दिलें......आतां योग्य प्रकारच्या सूचना व पूर्ण अधिकार देऊन कोणाला तरी हा सलोख्याचा तह करण्यासाठीं पाठवावें. वेलजी किंवा तो नसेल तर अन्य कोणीं यावा. त्याचे सुरक्षिततेबद्दल हमी येथील मंडळीनें दिली आहे...त्वरा करणें जरूर आहे. आतांच मक्केकडे गलबतें निघण्याचा समय असल्यामुळें ह्या तहानें आपल्याला पुष्कळ अनुकूल कलमें मिळण्याचा संभव आहे (!) एकदां मित्रत्वाचा तह झाला म्हणजे मग शिवाजीच्या सर्व बंदरांत निर्भयपणें व्यापार करतां येईल. कारण, **राजापूर आदिकरून जो मुलूख** शिवाजीनें (युद्धांत) घेतला आहे **त्याचा** उपभोग **शिवाजीनें** घ्यावा; असा **अदिलशहानें शिवाजीला फर्मान दिला आहे.** फारतर अधिक बंदोबस्ताकरितां खुद्द अदिलशहाचें दुसरें फर्मान त्याच्या सर्व मुलखापुरतें घेऊन ठेवावें म्हणजे झालें. शिवाय आधीं कल्पना नाहीं असा एकादा प्रसंग मागाहून उद्भवल्यास आपल्याला कांहींतरी उपाय करतां येईलच. कारण, **हा सर्व मुलूख अजूनहि विजापुरच्या राज्यांत असून शिवाजी त्याच्या प्रजाजनांत मोडतो......** स्वतःच्या फायद्याकरितां तरी **शिवाजी** आपला शब्द मोडणार नाहीं. कारण, एकदां त्यानें फसविल्यास पुन: कोणीहि त्याच्यावर विश्वास ठेवणार नाहीं किंवा त्याच्या अमलाखालीं रहाणार नाहीं. दंडाराजपुरी घेण्यासाठीं आपण **शिवाजीला** मदत केली तर आपल्याला वाटेल तशी सोइस्कर बंदरी जागा **शिवाजी** आपल्याला देईल...आपण सुचविल्यास त्याबद्दल रावजी पंडिताशीं बोलून पाहूं...येथून मक्केला दोन गलबतें, राजाच्याच मालकीचीं निघणार आहेत. कदाचित् एकादा व्यापारी त्यांपैकीं एक गलबत मालासह खरेदी करील. परंतु हीं गलबतें पकडण्याचा विचार केला तर आपल्या तहाबद्दल उत्सुकतेला प्रत्युत्तर मिळालें नाहीं म्हणून शिवाजी क्रुद्ध होऊन जावयाचा...वेलजीला पाठवावयाचें झाल्यास स्वतंत्र गलबत करून पाठवावा; व त्याचेबरोबर गुप्तपणें रावजी पंडिताकरितां चांगला नजराणा पाठवावा.

इं. फॅ. भा. ११ } (९१८) { श. १५८४ फाल्गुन व. ६
पृ. २३३-३४ } राजापूर-सुरत { इ. १६६३ फेब्रु. १८

कॉन्व्हर्टिन गलबत ९ तारखेला जैतापुरास आलें...रँडॉल्फ टेलर व फिलिफ

गिफर्ड त्यावर गेले; आणि **शिवाजीचीं** २ गलबतें पकडण्याबद्दल कॅप्टनला दिलेला हुकूम अमलांत आणिल्यास रावजी पंडिताशीं चालू केलेल्या बोलण्यास व्यत्यय येईल म्हणून त्यांनीं सांगितल्यावरून कॅप्टननें तो हुकूम अमलांत आणिला नाहीं. कारण...... **शिवाजीचा** मुलख किनाऱ्याचे बाजूनें अधिक वाढण्याचा संभव असल्यानें हीं गलबतें पकडून त्याचेशीं वैर संपादण्यांत फायदा नाहीं. कारवारच्या वखारीची सुरक्षितताहि त्या योगानें बिघडेल. रुस्तुमजमा हाच कारवारचा अधिकारी आहे. राजापूरप्रमाणेंच शिवाजीला तेंहि शहर तो लबाडीनें लुटूं देऊन पुनः नामानिराळा राहील !......कॅा० गलबताबरोबर वेलजी गेलाच होता. त्याची व रावजी पंडिताची मुलाखत होऊन पूर्वी कळविल्याप्रमाणेंच आमच्याशीं झालें तसेंच बोलणें झालें....मध्यंतरीं हीं गलबतें मक्केला निघून जातील. त्यांची सुरक्षितता आमच्या मर्जीवर अवलंबून आहे अशी त्यांची भावना राहिल्यास अनुकूल तह त्वरेनें होऊं शकेल. परंतु तीं गलबतें परत येतांना त्यांचेवर पाळत राखिली पाहिजे. तीं राजापूरलाच परत येतील असें नाहीं. खारेपाटण, साटवली, दाभोळ, किंवा केळशीलाहि जातील तर लक्ष ठेविलें पाहिजे....कॉ. गलबत १३ तारखेला दक्षिणेकडे निघून गेलें....त्यानंतर रावजी पंडिताशीं बोलणें झालें त्यावरून बंदरच्या जकातींची इंग्रज व मराठे यांमध्यें निमेनिम वाटणी करून इंग्रजांनीं आपल्या नुकसानीची भरपाई करून घ्यावी असा रोख दिसतो. हें म्हणणें आमचे मुख्याला कबूल होणार नाहीं; आणि त्यामुळें त्यांचेकडून कांहीं आगळीक झाल्यास आम्हीं जामीन नाहीं असेंहि आम्हीं सांगून टाकिलें आहे....दाभोळहून ३ व आचऱ्याहून १ अशीं गलबतें इराण व मस्कतकडे जावयाचीं आहेत. त्यांपैकीं एकादें आम्हाला मिळालें तर बरें होईल. रावजीचें बोलणें अनुकूल पडलें नाहीं आणि समुद्रावर कांहीं विरुद्ध करण्याची पाळी आलीच तर ती बातमी येथें येण्यापूर्वीच आम्हांस निघून जाण्यास ठीक पडेल....राजापूरच्या योगानें २३।२४ हजार होनांची लूट, त्याचें व्याज, २ माणसें दगावलीं त्या बद्दल कांहीं आणि आमची २ वर्षे कैद इतकें नुकसानें झालें.

फॅ. रे. सुरत भा. १०३ पृ. २५१ इ.	(९१९) कारवार–सुरत.	श. १५८४ फा। व. ३० इ. १६६३ फेब्रु. २७

येतांना तेथील फॅक्टर्सच्या म्हणण्याप्रमाणें तहकूब केलेल्या आपल्या हुकमाची **अमल बजावणी करण्याकरितां** कॅप्टन टिंकर यानें राजापूरला जाऊन मिळतील तेवढे फॅक्टर्स बरोबर घेऊन सुरतेला परत जावें असा हुकूम आम्हीं त्याला दिला आहे. सोंधे व येल्लापूरचे राजांनीं विजापूरचे राजाच्या मदतीनें आपला मुलूख पुनः ताब्यांत घेतल्यामुळें हुबळीपर्यंत मार्ग आतां सुरक्षित झाला आहे.

खं. १५ ले. १०३ सु. १०६३	(९२०) फा. मु.व सी.	श. १५८४ इ. १६६२-३

कमलनयन गोसावी याची बरदास्त चालविणें.

जै. व. ६ पृ. ७३ ले. ५ }
सु. १०६३ }
(९२१)
फा. मु.
{ श. १५८५
{ इ. १६६२-६३

सावित्रीबाई तीर्थस्वरूप गणेश दीक्षित बिन विठ्ठल दीक्षित (अपूर्ण)

डाग रजिस्टर १६६३ }
पृ. १०९ इ. न्यू. }
(९२२)
{ श. १५८५ अ. चैत्र व. ७
{ इ. १६६३ मार्च २१

विजापूरचें सैन्यासह कोलेरून नदी उतरून तंजावरांत प्रवेश करण्याकरितां बाबुलखान (बहलुलखान) तयार होऊन राहिला आहे. २००० घोडेस्वार अघाडीवर गेले त्यांना बरी लूट मिळाली; परंतु नदीच्या पलीकडेच लिंगमनायकानें त्यांना थोपवून धरलें. आतां **लिंगमनायक तंजावरचा सेनापति** झाला आहे. मदुरानायक स्वतःचें रक्षण चांगलें करीत आहे. परंतु आपल्या जोडीदाराबद्दल कांहींच फिकीर करीत नाहीं. यानंतर ६।७ महिने तेगनापट्टमचा व्यापार साफ बुडाला. वेढा चालू असतांना व्यापारी बाहेर पडून ठिकठिकाणीं विजापुरकरांच्या भीतीनें गुप्तपणें राहिले.

इं. फॅ. मा. ११ }
पृ. २३४-२३५ इ. }
(९२३)
राजापूर (फिलिप गिफर्ड)-सुरत.
{ श. १५८५ चैत्र. शु. १
{ इ. १६६३ मार्च ३०

तुमचें २४ फे. चें पत्र १८ मार्चला मिळालें. रावजीचीं वगैरे पत्रें दिलीं. त्यांमुळें त्यांना समाधान झाल्यासारखें दिसलें...कैद्यांना वाटेल तेथें व तेव्हां जाण्यायेण्याची मुभा **रावजीपंडितानें** दिली. तहाचा एकदां निकाल करण्याकरितां पूर्ण अधिकार देऊन एकादा बनिया पाठवावा, अशी रावजीची सूचना आहे...**रावजीपंडित चिपळूणला** गेला आहे. **रायगडला** जाऊन **शिवाजीला** भेटून येईल असें म्हणतात....इकडील महत्त्वाची बातमी अशी आहे कीं **१२००० घोडेस्वारांचें मोंगली** सैन्य **वरच्या चौलला** पावसाळ्यांत छावणी करण्याकरितां घरें बांधण्याच्या उद्योगांत आहे. आणखी सात हजार घोडदळ **रहिमतपूरला** आहे. **नेताजी** मोंगलांचे मुलखांत लुटालूट करण्यास गेला होता. त्याचा पाठलाग करून तें नुकतेंच परतलें आहे. ह्या सैन्यानें त्याचा इतक्या जोरानें पाठलाग केला कीं त्याला रोजीं ४५ ते ५० मैलांची दौड करावी लागली. त्याला लूट थोडी सांपडली पण त्रास पुष्कळच पडला. नेताजीचा पाठलाग करीत हे लोक विजापुरापासून अगदीं पंधरा मैलांवर पोंचले. विजापूरच्या राजाराणीला भय वाटून १०० घोडेस्वार घेऊन तीं बंकापूरला पळाली. **रुस्तुमजमानें मोंगलांना भेटून आपल्या स्वतःपुरता तह केला.** काय होईल तें नकळे. परंतु **मोंगल विजापूरचा सर्व मुलूख घेतील** असें वाटतें. मला कोठेंहि जाण्यास प्रतिबंध होईल असें वाटत नाहीं. परंतु एकदम सरळ लिहिण्यापेक्षां माल खरेदी करण्याकरितां कोल्हापूरला पाठवीत आहोंत असें रावजीला कळविणें बरें.

इं. फॅ. भा. ११ } (९२४) { श. १५८५ चैत्र शु. ५
पृ. २६८-२६९ इ. } मच्छलीपट्टण-सुरत. { इ. १६६३ एप्रील २

मच्छलीपट्टणमध्यें राहणें धोक्याचें आहे. गोवळकोंड्यांतील मोठे लोकांची आपसांत भांडणें चालू असून कित्येकजणांचा प्राणघात झाल्याची बातमी आहे. अशा बेबंदशाहींत राहण्याचा धीर कोणीं करावा?

खं. ८ ले. १२ } (९२५) { श. १५८५ चैत्र शु. ६
सु. १०६३ रम ४ } सी. { इ. १६६३ एप्रिल ३

रा. शिवाजी राजे——मोरो त्रिमळ पेशवे व राजश्री निळो सोनदेऊ मुजुमदार उपरि साहेबी कोंकणांत नामदार खानावरी जाण्याचा तह केला होता. ऐसियासी हालीं किले सिंहगडाहून समाचार आला आहे कीं गडावरी कांहीं फितवा जाला आहे. याबदल तूर्त कोकणांत जाण्याचा तह राहिला. तरी तुम्ही लष्करी लोकानसी व खासखेली हशमानसीं कागद देखतांच स्वार होऊन किल्ले सिंहगडास जाणे. आणि किल्लियावरच हुशार खबरदार असणें. फितवा कोण कोण लोकीं केला होता हें खबर घेऊन हुजूर लेहून पाठविणें; मा। तान्हाजी नाईक व कोंडाजी नाईक व + + + + हडे व कमळोजी नाईक व दरेकर व रुमाजी अहिरा व गोंदजी पांढरा हे बरोबरी घेऊन सिंहगडास जाऊन सिंहगडीं अलगो अलगानीं बहुत खबरदार असणें. जे लोक किल्लियावरी भेदांत असतील ते हे आपल्या बरोबरील लोक अलगेस ठेवणें. पा। हुजूर

इं. फॅ. भा. ११ } (९२६) { श. १५८५ चैत्र शु. ९
पृ. २३४ इ. } सुरत (प्रेसि० व कौन्सिल)-कंपनी { इ. १६६३ एप्रील ६

आम्हीं ठरविल्याप्रमाणें कॉन्व्हर्टिन गलबत राजापुरास गेलें आणि तेथून तांबड्या समुद्राकडे जाण्याकरितां निघालेल्या दोन गलबतांना त्यानें अडकाविलें. त्यामुळें शहरचा सुभेदार आणि इतर लोक टेलरला घेऊन त्या गलबताचे कॅप्टनशीं रदबदली करण्याकरितां आले. टेलरच्या रदबदलीमुळें तीं गलबतें सोडून देण्यांत आलीं. आणि परत फिरतांना रँडॉल्फ टेलर आणि रिचर्ड टेलर या दोघांना घेण्यांत आलें. गिफर्ड आणि फॅरन राजापुरासच राहिले. परंतु त्यांना स्वतंत्र घर करण्यास परवानगी मिळाली आहे. त्यांनाहि आणविले पाहिजे......... [पृ. २३९-४०] डच लोकांना काननूर एकहि गोळी वाजविल्याशिवाय मिळालें. आतां सर्व मलबार किनाऱ्यावर त्यांचें वर्चस्व होऊन आमचे व्यापाराला ते मनाई करूं लागले आहेत. आजपर्यंत कारवार हें ठिकाण आम्हांला राहिलें होतें. पण तेथेंहि वखार घालण्याची परवानगी त्यांनीं मागितली आहे असें समजतें. शिवाय २० मैलांवर खालीं भटकलला त्यांची वसाहत आहेच.

फॅ. रे. सुरत भा. १०० पृ. २७२ } (९२७) { श. १५८५ चै. शु. ११
इं. फॅ. भा. ११ पृ. २३५-३६ इ. } { इ. १६६३ एप्रील ८

राजापूर (गिफर्ड)—— सुरत

विजापूरचा राजा, राणी व सर्व सरदार **बंकापूरला** गेले; हें वर्तमान अगदीं खरें आहे. बहलोलखान आणि राजा यांचें फार वांकडें असल्यामुळें बहलोलखानाच्या आईनें त्यांना बंकापुरांत प्रवेश करूं देण्याचें नाकारलें. रुस्तुमजमाची आणि मोंगलांची भेट झाली. परंतु अटी काय ठरल्या हें अजून कानावर आलें नाहीं. ह्या भेटीनंतर त्यानें **नेताजीचा पाठलाग न करण्याबद्दल मोंगलांचें मन वळविलें.** 'पुढील प्रदेश अपरिचित सैन्याच्या हालचालींना धोक्याचा आहे यासाठीं आपणच नेताजीचा पाठलाग करतों' असें कपटानें मोंगलांना सांगून नेताजीला पळून जाण्यास त्यानें सवड दिली. या चकमकींत नेताजीचे ३०० घोडे पडले आणि त्याला स्वतःला जखमा झाल्या. रुस्तुम. राजापुरास इंग्रजांकरितां घर बांधीत होता त्याचें सामान आतां फुकट कुजत आहे... **रावजी अद्यापि परत आला नाहीं.**

इं. फॅ. भा. ११ } (९२८) { श. १५८५ चैत्र शु. १४
पृ. २७० इ. } मद्रास कौन्सिल-सुरत { इ. १६६३ एप्रील ११

हेन्री गॅरीचें गोव्याहून पत्र आलें. त्यावरून समजतें कीं, **कोचीन घेण्यांत यश आल्यामुळें डच लोक गर्वानें फुगून जाऊन** असें जाहीरपणानें बोलूं लागले आहेत कीं, 'आपण तेथें मुख्य सांठा आणि मोठें बंदर करणार !' (तेथून पुढें सिलोन-वर स्वारी करण्याचा त्यांचा इरादा आहे.) तेथें आपल्या लोकांची मोठी वसाहत कर-ण्याच्या इराद्यानें त्यांनीं १८००० बायकांना प्रजावाढीकरितां लावून दिलें आहे ! आम्ही कँडीच्या राजाला याबद्दल कळवून सावध करूं.

डागरजिस्टर १६६३ } (९२९ = ९२३ अ) { श. १५८५ चैत्र शु. ४
पृ. १४ इ. एप्रील ११ न्यू. } { इ. १६६३ एप्रील १

नागापट्टणच्या रेसिडेंटनें पाठविलेल्या ११ फेब्रुवारीचे पत्रांतील मजकूर—

तंजावरच्या नायकानें विजापूरच्या सेनापतीशीं तह केला आहे. तंजावरच्या नायकानें तीन लक्ष पार्डो द्यावे आणि **शहाजीच्या** अरणी व बंगलोर या किल्यांवर सैन्य पाठवून हल्ला चढवावा अशा अटी ठरल्या.

इं. फॅ. भाग ११ } (९३०) { श. १५८५ चैत्र शु. १५
पृ. २३६ इ. } राजापूर-गिफर्ड-सुरत { इ. १६६३ एप्रील १२

रावजी पंडित परत आला आहे. आल्याबरोबर मला बोलावून, 'तहाचीं कलमें ठरविण्याकरितां कोणातरी इसमाला त्वरित पाठवून द्या' म्हणून तुम्हांला मीं लिहावें

असें त्यानें मला सांगितलें. **काल राजानें रावजीला स्वतः लिहिलेलें पत्र आलें** [A letter from the Rajah, *written by himself* to Raoji]. त्यांत शिवाजी ४०० निवडक लोकांसह जातीनें **शाइस्तेखानाच्या** तळावर गेला त्याची हकीकत आहे. कांहीं बहाणा करून तो सलाम करण्यासाठीं म्हणून शाइस्तेखानाच्या तंबूंत गेला. आणि लगेच पहारा साफ मारून, शाइस्तेखानाचा वडील मुलगा, त्याचा जांवई, त्याच्या १२ बिब्या, ४० मोठे दरकदार, मोंगलांचा सेनापति, इतक्यांचे प्राण हरण करून खुद्द शाइस्तेखानाला आपल्या स्वतःच्या हातानें जखम करून (त्याला तो मेला असें वाटलें होतें. परंतु नंतर तो जिवंत आहे असें त्यानें ऐकलें.) त्याच्या आणखी ६ बायका, आणि दोन मुलगे, **शिवाजीनें** ठार केले. या सगळ्या भानगडींत त्याचे फक्त ६ सैनिक मेले आणि ४० जखमी झाले! १० हजार घोडेस्वारांचा अधिपति राजा **जसवंतसिंग** समीप असून पाठलाग न करितां स्तब्ध राहिला. यावरून त्याचें यांत अंग होतें असें सगळ्यांना वाटतें. शिवाजी मात्र ' आपल्याला **परमेश्वरानें हें कृत्य करण्याचा संदेश दिला**' असें आपल्या लोकांना सांगतो.

खं. १५ ले. १०४ व ले. १०५ } (९३१) { श. १५८५ चैत्र व. २–३
सु. १०६३ रमजान १५ व १६ } मिसेली फा. सी. { इ. १६६३ एप्रील १४–१५

सिताबखान नाइकवाडी किल्ले सतारा—हुदे. व मोक. वरिये
जोगिंद्रगिरी गोसावी (निंब) याचे इनामास इस्कील न करणें

हि. रे. क. ९ } (९३२) { श. १५८५ चैत्र व. ४
पृ. ११० इ.न्यू. } { इ. १६६३ एप्रील १६

पोर्तुगीज गव्हे.—**शिवाजी**

तुमचें पत्र आल्यामुळें पत्रव्यवहारास मोकळीक झाली. मी आतां एक वजनदार गृहस्थ उत्तरेस पाठवितों. त्याला तुमच्या व आमच्या संस्थानांत शक्य ते अविरोधी असे संबंध घडवून आणण्याचा अधिकार दिला आहे. पण हें बोलणें गुप्त राहिलें पाहिजे. **तुमच्याविरुद्ध** कोणत्याहि गोष्टीस त्यानें **संमती देऊं नये** असें आम्हीं त्यास सांगितलें आहे.

इं. फॅ. भा. ११ } (९३३) { श. १५८५ चैत्र व. ५
पृ. २४७-४८, २५० इ. } पोरकद–सुरत { इ. १६६३ एप्रिल १७

डचांनीं **क्विलन** व **काननूर** घेऊन त्यांचा बंदोबस्त केला....येथील राजाशींहि त्यांनीं करार केला आहे. त्या अन्वयें या भागांत त्यांचेशिवाय दुसऱ्या कोणींच खरेदीविक्री करूं नये असें ठरलें........डचांनीं हा सर्वच किनारा आपल्या ताब्यांत घेतला. त्यांच्या परवान्याशिवाय कित्येक जिनसांचा व्यापार करण्यास त्यांनीं मनाई केली आहे....मल-

व्यापारी लोक अद्यापि त्यांच्याबद्दल संतुष्ट आहेत. कारण ते अंध आणि बुद्धिहीन आहेत. "आपल्यामध्यें या डचांचा हात शिरकूं देण्यानें आपल्यावर केवढी गुलामगिरीची आपत्ति आपण ओढवून घेतली आहे" हें त्यांचे लक्षांत येत नाहीं. हे डच लोक लवकरच त्यांच्या खुद्द अन्नावर जकात बसवितील **आणि डच भाषेशिवाय दुसरी कोणतीहि भाषा बोलूं देणार नाहींत !**

हि. रे. क. ९ पृ. १११ इ. न्यू. (९३४) श. १५८५ चैत्र व. १३ इ. १६६३ एप्रील २५

पोर्तुगीजांचा वकील **शाइस्तेखानाकडे** गेला तेव्हां त्याच्या हातीं दिलेल्या तालिमनाम्यांत हा मजकूर आहे. 'मजकडे थोड्या दिवसांपूर्वी राजा **शिवाजीचें** पत्र आलें होतें; त्यांत "तुम्हीं मोंगलाकडे अन्नसामुग्री जाऊं देत नाहीं तोंपर्यंत मी पोर्तुगीज मुलखास व किल्ल्यांस त्रास देणार नाहीं" असें म्हटलें आहे. त्याप्रमाणें तुम्हीं व्यवस्था करावी.'

फॅ. रे. सुरत भा. १०३ पृ. २७२ इ. (९३५) राजापूर (गिफर्ड)–सुरत श. १५८५ वैशाख शु. ९ इ. १६६३ मे ५

शाइस्तेखानाचे मृत्यूची बातमी खोटी आहे.... **रुस्तुमजमाचा** एक विश्वासू नोकर **शाइस्तेखानाच्याच** छावणीकडून आला आहे. तो आपण शाहिस्तेखानाला पाहिलें असें सांगतो. मात्र त्याला जखम जबर झाली आहे.... **विजापूरचा राजा** बंकापुराहून परत विजापूरला गेला. येण्यापूर्वीं तेथील स्नेप (शिवपा) नायकाचा पराजय करून खंडणीचे एकदम ४० हजार होन (पॅगोडा) देण्याचा त्याच्याकडून करार करून घेतला आहे. टेलर येथें न आला तर आपल्याला चैन पडणार नाहीं असें **रावजी पंडित** म्हणतो. त्याला तुम्ही पाठविणार कीं नाहीं याबद्दल तो वरचेवर विचारतो. **खालीं गोव्याकडे जाण्याकरितां शिवाजी या मार्गानें येणार आहे अशी वदंता आहे.** परंतु ह्या पावसाळ्यांत तो येणार नाहीं असें वाटतें.

पिसुर्लें. शिवाजी पृ. ७ इ. १६६३ जून २ (न्यू.) (९३६) गोव्याचा व्हाइस.–शिवाजी श. १५८५ वैशाख व. ११ इ. १६६३ मे २३

आपण **वेंगुर्ल्यास** येऊन पोहोंचलां अशी बातमी नुकतीच येथें गोव्यांत येऊन पोहोंचली. आपलें मोंगलावरील विजयाबद्दल अभिनंदन करण्याकरितां येथून **रामाजी शेणवी कोठारी** यांस मुद्दाम मी पाठवीत आहे. त्याच रामाजी शेणव्यास आपल्याबरोबर दुसऱ्या गोष्टीबद्दल तह करण्यास अधिकार देऊन पाठवीत आहे. आपल्याकडून लवकर उत्तराबद्दल वाट पाहात आहोंत. आपण जर तह केलात तर तो तह दोघांच्याहि फायद्याचा होणार आहे.

इं. फॅ. भा. ११ }
पृ. २३६–२३७ इ. }

(९३७)
कोल्हापूर, गिफर्ड-सुरत

{ श. १५८५ वैशाख व. १२
{ इ. १६६३ मे २४

तुमचें २३ एप्रील चें पत्र १२ मे ला पावलें. आपल्या आज्ञेप्रमाणें **कोल्हापुरास** जाण्याकरितां १६ ला निघून मी १९ ला पोंचलों. कोणीहि विरोध केला नाहीं. कारण **रावजी (शिवाजी) राजाबरोबर कुडाळ, वेंगुर्लें या बाजूकडे गेला होता.** आपणांकडून किंवा आपल्या शिपायांकडून त्रास दिला जाणार नाहीं; अशा तऱ्हेचे कौल सर्वांनाच शिवाजी देत आहे. अद्यापपर्यंत त्यानें हें वचन पाळलें आहे. परंतु परत येतांना काय करील याचा नियम नाहीं. त्याचे मनांत वेंगुर्ल्याच्या पुढें जावयाचें आहे किंवा कसें हाहि प्रश्नच आहे. वेंगुर्ल्याचे डच लोकांनीं कोचीनहून पुष्कळ द्रव्य आणिलें आहे असें त्यानें ऐकलेंच आहे. डचांना अद्यापपर्यंत त्यानें कोणताहि उपद्रव दिला नसून वखार त्यांच्याच हातीं आहे.

स्नेप (शिवापा) नाइकाची खंडणी ७ लाख होन ठरली......**शाइस्तेखान-प्रकरणीं** मृत्यूची संख्या– एक मुलगा मेला, दोन जखमी झाले, ६ बायका मरण पावल्या, ८ ना जखमा झाल्या आणि शाहिस्तेखानाच्या परिवारांपैकीं आणखी ४० लोक मृत्यु पावले. ह्या प्रसंगीं शिवाजीनेंच मुख्य कामगिरी केली. ४०० लोकांनिशीं तंबूंत शिरून मारतां आले तेवढ्या लोकांना मारून तो जसवंतसिंगाच्या अंगावरून बाहेर पडला. जसवंतसिंगानें त्याला विरोध मुळींच केला नाहीं. त्यावरून **जसवंतसिंगाच्या सांगण्यावरूनच त्यानें हें केलें** असें लोक बोलतात.

येथ राहण्यांत धोका असल्यामुळें गोव्याकडेच आम्ही जात आहोंत. कोणाला संशय येऊं नये म्हणून 'गेल्या वर्षी शिवाजीनें पकडलेल्या मुसलमानांपैकीं आम्ही आहोंत' असें सांगत व मुसलमानी पोशाख करून जात आहोंत. स्वसंरक्षणाकरितां चार शिपाईहि बरोबर घेतले आहेत. कारण मध्यंतरींच्या मुलखांतील सांगें-डिचोलीपर्यंतचे सुभेदार शिवाजीचे भीतीनें पळून गेल्यामुळें सर्वत्र अंदाधुंदी माजली आहे....आम्हांला खर्चाकरितां पैसा पाठवावा आणि आम्ही सुरतेला कोणत्या मार्गानें यावें तें कळवावें.

इं. फॅ. भा. ११ }
पृ. २३८ इ. }

(९३८)
सुरत–मद्रास.

{ श. १५८५ वैशाख व. १४
{ इ. १६६३ मे २५

शाहिस्तेखानाच्या सैन्याचा समोंवार तळ पडला असतां शिवाजी स्वतः ४०० लोकांनिशीं खानाच्या तंबूंत शिरला व तेथें त्यानें ५० मानकरी ठार केले, खानाला जखमी केले; १२ बायका मारल्या आणि ६ जखमी झाल्या, वडील मुलगा आणि जांवई यांना ठार करून आणखी दोन मुलगे जखमी केले; खानाची मुलगी नेली आणि पुष्कळ खजिनाहि त्याचे हातीं आला. शिवाजीचे माणसांपैकीं फक्त ६ मृत्यु पावले आणि ४०

जखमी झाले. जसवंतसिंगाचे १० हजार घोडेस्वार कांहींहि विरोध न करितां फक्त पहात उभे राहिले. शाहिस्तेखानाचा कांटा आपल्या मार्गांतून काढला जावा असें जसवंतसिंगाच्या मनांत होतें असें म्हणतात. आणि प्रसंगीं तें सिद्धीसहि गेलें असतें. परंतु खानावरील संकटाची कल्पना आल्यामुळें खानाच्या मुलानें एखाद्या सामान्य शिपायाप्रमाणें खानाला उद्देशून म्हटलें, ' हे शिपाया, आपला जीव बचावण्याचें सोडून तूं तो धोक्यांत कां घालीत आहेस. हे लोक शोधीत आहेत ते तुला मारण्याकरितां शोधीत नसून शाहिस्तेखानालाच पहात आहेत.' या शब्दांमुळें बोलणारा इसमच खान आहे असें समजून खऱ्या खानाला सोडून ते त्याच्या मुलावर तुटून पडले. आणि खान निसटला.

डाग रजिस्टर १६६३ } (९३९) { श. १५८५ ज्येष्ठ व. १
पृ. ३०५ इ. जून २१ न्यू. } { इ. १६६३ जून ११

सरदार शाइस्ताखान आणि राजा जीसनसिंग (जसवंतसिंग) हे बंडखोर शिवाजीशीं युद्ध करण्याच्या तयारीनें राहिलेले आहेत. याशिवाय सर्वत्र शांतता आहे. मात्र कांहीं रस्त्यावर चळवळ्या राजांचा त्रास होतो.

डाग रजिस्टर १६६३ } (९४०) { श. १५८५ ज्येष्ठ व. १
पृ. ३१५-१६ इ. जून २१ न्यू. } { इ. १६६३ जून ११

विजापूरचे राज्यांतील यादवी अद्यापि बंद झाली नाहीं. **वेंगुर्ल्याचा रक्षक लखम सावंत** हा किनाऱ्यालगतचे प्रदेशाचा राजा आहे. त्यानें पोर्तुगीजांच्या कांहीं खेड्यांत जाळपोळ केली. **शिवाजीहि** खालीं उतरणार अशी वदंता असल्यामुळें रेसिडेंटनें एका व्यापाऱ्याच्या गलबतावर कंपनीचा माल आणवून तें गलबत बंदरांत तयारीनें ठेवण्याची तजवीज केली आहे. लखम सावंतानें त्या व्यापाऱ्यांना शिवाजीविरुद्ध बाजू स्वीकारण्याबद्दल सांगितलें. परंतु आमचेमुळें ते तटस्थ रहातील. कमांडर व्हर्सप्रीट आपलीं जहाजें घेऊन आल्यामुळें भीति कांहींशी कमी झाली आहे.

मध्यंतरीं **शिवाजीनें** एक लबाडीचा डाव टाकला. व्हर्सप्रीट आला हें कळतांच त्यानें एक लाघवी पत्र एका हेराबरोबर वेंगुर्ल्यास पाठविलें. 'आपल्या मनांत **वेंगुर्लें स्वतःच्या अमलाखालीं घेण्याचें आहे**. त्याबद्दल रेसिडेंटचें म्हणणें काय पडतें? आपल्याबद्दल भीति वाटून रेसिडेंटनें मालाच्या सुरक्षितपणाबद्दल खटपट चालविली आहे. त्यास 'तशी भीति बाळगूं नये. कारण आपल्या मनांत कोणत्याहि तऱ्हेनें वैरभाव नाहीं' [पृ. ३१६]. अशा मजकुराचें पत्र पाठविण्यांत आम्हीं बेसावध रहावें एवढाच शिवाजीचा हेतु असल्यामुळें त्याच्याहि सदिच्छेबद्दल आभार मानून 'आम्हीं व्यापारी असल्यामुळें युद्धाचे बाबतींत सल्ला देतां येत नाहीं' असें उत्तर हेराचे हातीं पाठविलें.

इकडे **लखम सावंतानें** शिवाजीपासून मुलखाचें रक्षण करण्याकरितां म्हणून

दोन हजार होन आणि २४०० पौंड दारूगोळ्याची आमच्याकडे मागणी केली. परंतु त्याला फक्त ६०० पौंड दारूगोळा देण्यांत आला. ही मदत मिळाल्यावर त्यानें आम्हांला वेंगुर्ल्यांतून हाकून लावण्याकरितां **गोवेकरांशीं बोलणें लावलें.** विजापुरांतील एका अधिकाऱ्याचें (आमच्या) सरदाराला पत्र आलें. त्यावरून गोवेकर (सावंताला) अनुकूल असल्याचें कळतें. **लखम सावंत** इतरत्र उद्योगांत असल्यामुळें या बाबतींत पुढें कांहीं झालें नाहीं'.

वृद्ध राणी **मक्केच्या** यात्रेहून परत आली. ती वेंगुर्ल्याला २० ऑगष्ट १६६२ (न्यू. स्टा. ९ सप्टें. १६६२) रोजीं पोंचली. वाटेंत चांच्यांकडून तिला उपद्रव झाला. याबद्दल सविस्तर हकीकत आम्हीं सुरतेविषयीं लिहितांना कळविली आहे. राणीचा शरीररक्षक हकीम समशा ४ गलबतें बरोबर घेऊन राणीला आणण्याकरितां १६६२ च्या मार्चांत निघून गेला होता, त्यानें रेसिडेंटला असें सांगितलें कीं, 'हे चांचे इंग्रज किंवा फ्रेंच लोक असावेत. त्यांनीं वरील रक्षक गलबतांपैकीं २ लुटलीं. तिसऱ्यामध्यें स्वतः समशा होता त्याचा खडकापर्यंत पाठलाग केला. कोंडिवारच्या (?) इंग्रजांचा आम्हीं पास घेतला असूनहि त्याचा उपयोग झाला नाहीं. इंग्रजांशीं किंवा डचांशीं आम्हांला कांहींच कर्तव्य नाहीं असें ते चांचे म्हणाले...... पुढें **मक्केच्या** सुभेदारानें कांहीं व्यत्यय आणिल्यामुळें राणीला एडनपर्यंत खुष्कीचाच प्रवास करावा लागला. आणि तेथून ती राहिलेल्या तिच्या गलबतांतून आली.... १६६१ पासून आपण (=हॉलंडमधील प्रेसिडेंट) पाठविलेला नजराणा व पत्र वेंगुर्ल्याला राहिलें होतें. त्याचें फारशीमध्यें भाषांतर करून तें पत्र व नजराणा राणीला सादर करण्यांत आला... त्यावर विनोदानें कांहीं बोलून वेंगुर्ल्याचा व्यापार उत्तरोत्तर वाढावा म्हणून वेंगुर्लें किंवा बंदर हें नांव बदलून त्याला इतउत्तर **शहाबंदर** म्हणावें असें तिनें फर्माविलें. ती डचांच्या बँटम नांवाच्या जहाजांतून गेली होती. परंतु भाड्याबद्दल कांहींच बोलणें झालें नाहीं.... राणी (न्यू स्टा. ११ सेप्टेंबर) १ सेप्टेंबरला दरबाराकडे निघून गेली.... पोंचल्याचेंहि पत्र आलें ... नंतर आम्हीं, मक्केच्या सुभेदाराचें व तिचें वांकडें आलें त्याबद्दल, मध्यस्थी करावी असेंहि तिनें लिहिलें. विजापूरचा राजा आपल्या आईला (=उपरिनिर्दिष्ट वृद्ध राणीला) घेऊन मोठ्या सैन्यासह **भद्राप्पा नाइकाकडून कांहीं खंडणी उकळण्याकरितां** म्हणून कानड्यावर स्वारी करण्याच्या तयारींत आहे. [पहा मागील अनुक्रम ९१५]

पोर्तुगीजांचा नवीन व्हाइसरॉय गोव्याला ३ डिसेंबर १६६२ (न्यू. स्टा. १३ डिसें.) ला येऊन पोंचला असून त्यानें सर्वत्र बंदोबस्त करण्यास सुरवात केली आहे. पूर्वींच्या व्हाइसरॉयानें सर्व अनास्था केल्यामुळें कोचीन हातचें गेलें, असें तेथील लोकांचें म्हणणें आहे. काननूर डचांनीं घेतल्यानें त्यांच्या तोंडचें पाणी पळालें आहे. मोझांबीकची परिस्थिति समाधानकारक नाहीं. मोंबासाचे रहिवाशांचा त्यांना खूप त्रास होत असतो.

परंतु आतां तह घडून आल्यामुळें व सैन्याच्या तयारीचा कांहींच उपयोग नसल्यामुळें आम्ही विशेष लिहीत नाहीं.

[पृ. ३२०] **कानड्याचा** राजा आणि **मलाप्पा** मालू यांनीं गव्हर्नरजनरलला पत्रें पाठविलीं आहेत. ४८ हजार पौंड दारू आणि ३ तोफा राजानें मागितल्या असून मलाप्पा मालूनें त्याबद्दल शिफारस केली आहे. पत्रांचीं भाषांतरें खालीं दिलीं आहेत....

' राजा **भद्राप्पा नायक केळदीचा राजा**-जॉन मेटसुयकर, बटेव्हियाचा व्हाइसरॉय.

आमचा व तुमचा स्नेह आहे. त्याच्या दृढतेकरितां, आम्हांला गरज असल्यामुळें २००० सैन्य किंवा ४८ ह. पौंड दारू गोळा आणि ३६ पौंडी किंवा थोड्या मोठ्या अशा तीन तोफा पाठवाव्या-**आमचे प्रधान मलाप्पा मालू**-किंमतीची भरपाई करतील. सोबत मलाप्पा मालूचें पत्र आहे त्यावरून समजेल. '

मलाप्पा मालूचें १६६३ एप्रील १० चें (न्यू. स्टा. एप्रील २०) पत्र [याच बाबतींत शिफारसवजा]:—' स्नेहाची दृढता होईल. राजाला फारच जरूर आहे. तुम्हांला ही गोष्ट सहज करितां येईल. या प्रांतांतील कंपनीचें काम असेल तें आम्ही करूं ' वगैरे.

इं. फॅ. भा. ११ पृ. २४१ इ.	**(९४१)** कारवार-सुरत.	श. १५८५ ज्येष्ठ व. ५ इ. १६६३ जून १५

कांहीं दिवसापूर्वी **शिवाजी इकडे बांद्यापर्यंत आला** आणि सुमारें मिर्जी (मिरजन) पर्यंतचा इकडील प्रदेश काबीज करण्याचा त्याचा विचार होता असें समजलें . परंतु **मोंगलांकडून जोराचा शह बसल्यामुळें या बाजूचें** सैन्य त्यानें काढून नेलें असावें असें दिसतें. पावसाळा संपल्यावर तो फिरून इकडे वळेल किंवा कसें हें निश्चित सांगतां येत नाही. परंतु लोकांना मात्र तशी भीति वाटत आहे.

खं. १५ ले. १०६ सु. १०६४ जिल्काद १९	**(९४२)** खुर्दखत फा. व सी.	श. १५८५ ज्येष्ठ व. ६ इ. १६६३ जून १६

अजर. अंबाजी राजे घाटे—ताा हुदे. व मोक. मौ. निगडी किले सातारा.

जोगिंद्रगिरी यास निगडी येथें १५ बिघे जमीन इनाम असून संन्याशासाठीं अन्नछत्र चालतें. तरी त्यास कोणीहि हरकत करूं नये.

इं. फॅ. भा. ११ पृ. २४१ इ.	**(९४३)**	श. १५८५ ज्येष्ठ वद्य १२ इ. १६६३ जून २२

गोवा (गिफर्ड, फेरंड)————सुरत.

रावजी पंडिताकडून अद्यापि उत्तर आलें नाहीं. **वेंगुर्ल्याला** २००० सैन्य ठेवून

शिवाजी तेथून **परत फिरला** एवढीच शिवाजीबद्दलची बातमी आहे. शास्ताखान नक्की जिवंत असून त्यानें **शिवाजीचे** पुष्कळ लोक मारल्यामुळें शिवाजी एकाएकीं परत गेला.

डाग रजिस्टर इ. १६६३ पृ. ४५५ इ. जुलै १३ न्यू. | (९४४) मच्छलीपट्टणचें पत्र. | श. १५८५ आषाढ शु. ९ इ. १६६३ जुलै ३

सुरत (१३ जून) व **मच्छलीपट्टण** (१३ जुलै) या दोनहि ठिकाणांहून अशी बातमी आली कीं, आमची **वेंगुर्ल्याची** रहाती इमारत (वखार) बंडखोर **शिवाजीनें लुटली** आणि लोक पळून गेले.

इं. फॅ. मा. ११ पृ. २५३ इ. | (९४५) कायाल–सुरत. | श. १५८५ आषाढ शु. १० इ. १६६३ जुलै ४

पत्र पाठविण्याचे इतर मार्ग बंद झाल्यामुळें हें पत्र मद्रासकडून पाठविलें आहे. आतांपर्यंत **विजापूरचा आदिलशहा आणि मदुरेचा नायक यांचेमध्यें युद्धें** चालू असल्यामुळें हा मार्ग बंद होता.

इ. फॅ. मा. ११ पृ. २४२–३ इ. | (९४६) गोवा (गिफर्ड)–सुरत. | श. १५८५ आषाढ वद्य ११ इ. १६६३ जुलै २०

फोंड्याचा सुभेदार व कुडाळचे देसाई यांनीं आपलीं व लहानसान राजांचीं सैन्यें एकत्र करून, **शिवाजीला राजापूर व खारेपाटण यांतून काढून लावावें** असें आदिलशहानें फर्माविल्याचें आम्हांला कळलें आहे. **राजापूर** व **खारेपाटण** हीं दोनहि शहरें आतां आदिलशहानें **महमदखानाला** (खानखाना उर्फ इखलासखानाचा वडील मुलगा) दिलीं आहेत. त्यामुळें तीं आपल्या ताब्यांत घेण्याकरितां त्यानेंहि आपल्या सैन्यास विजापुराहून चाल करून येण्यास कळविलें आहे. आदिलशहानें **दाभोळ व चिपळूण, अफजलखानचा मुलगा फाजलखान** याला दिलीं आहेत. फाजलखानावर आदिलशहाची चांगली कृपा आहे. शिवाजीलाहि 'बऱ्या बोलानें हीं शहरें सोडून द्यावीं नाहीं तर प्रायश्चित्त भोगावें' असें त्यानें लिहिलें आहे.

मोंगल महाडला आला आहे आणि **शिवाजी जावलीवर** आहे असें बोलतात. परंतु मोंगलांची बातमी आम्हांला खरी वाटत नाहीं. मोंगलांनीं **नेताजीचा वध** केल्याचीहि बातमी कितपत खरी आहे याची शंकाच आहे.... **रुस्तुमजमा** सांगितलेल्या कामगिरीवरून हुकेरीला आला असतां, तें त्याचेंच शहर असून, विजापूरच्या राजाच्या हुकमानें त्याला प्रवेश मिळाला नाहीं ! (हें सर्व सांगणारा) जासूद बंकापुराहून निघण्यापूर्वीं, **बहलोलखान आणि शहाजी यांना बेड्या घातलेल्या**

आपण आपल्या डोळ्यांनीं पाहिल्या असें सांगतो. शहाजीच्या बेड्या दोन दिवसांनीं काढल्या गेल्या. आतां तो सुलतानाजवळ राहिला असून त्याची अद्यापि नेमणूक झाली नाहीं. बहलोलखानाच्या आईनें सुलतानाला बंकापुरांत येऊं दिलें नाहीं त्याबद्दल बहलोलखानानें माफी मागावी म्हणून आदिलशहानें शहाजीला त्याचेकडे पाठविलें होतें. आतां बहलोलखानाला माफी मागण्याशिवाय गत्यंतर नव्हतें. कारण कर्नाटकांत सर्वत्र विजय प्राप्त झाल्यामुळें विजापूरचे राज्यांत शांतता नांदत होती. शेवटीं शहाजीचे सांगण्याप्रमाणें बहलोलखान सुलतानाकडे येण्यास तयार झाला. पण शहाजीनें आपल्याबरोबर आलें पाहिजे अशी त्यानें अट घातली. त्याप्रमाणें दोघेजण बरोबर गेले असतां सुलतानानें दोघांनाहि पकडलें.

सदरप्रमाणेंच त्यानें सिद्दी जोहारचा जांवई **सिद्दी मसाउद**, व जोहरचा वडील मुलगा यांनाहि बोलाविलें आहे. **'आपल्या बापाला मारणाऱ्यावर** आम्हांला विश्वास ठेवतां येत नाहीं' असा त्यांनीं उलट जबाब दिला. त्यास 'यापुढें गैरविश्वास करण्याचें कारण नाहीं. तुमच्या बापाच्या मृत्यूला कारणीभूत झालेल्या **बहलोलखानाला** नुकताच **कैद** केला आहे. असें आदिलशहानें कळविलें.

डागरजिस्टर १६६३ पृ. ३६५ इ. जुलै ३१ न्यू.	(९४७)	श. १५८५ आषाढ व. १२ इ. १६६३ जुलै २१

गव्हर्नर पिटचें गोव्याचा मुख्याधिकारी यास पत्र (२३ मार्च १६६२ चें) आलें. त्यांतील मजकूरः—३ लक्ष पार्डो तंजावरच्या नायकाकडून घेण्याचा करार ज्याच्याशीं झाला तो विजापूरचा सेनापती (पहा ले. ११ एप्रील १६६३) मृत्यु पावला; आणि त्याचा मुलगा सेनापती झाला; मदुरेच्या नायकानें ६ लक्ष द्यावे व तंजावरच्या नायकानें ३ लक्ष पार्डो द्यावे असे एकूण ९ लक्ष पार्डो, विजापूरच्या सेनापतीला मिळावयाचे होते; तेगनापट्टण आणि जिंजी येथील किल्लेदारांमध्यें वैमनस्य उत्पन्न झालें असून जिंजीहून २०० घोडेस्वार आणि ४०० पायदळ निघून त्यांनीं तेगनापट्टण लुटलें. परंतु डच कंपनीची वखार व कंपनीशीं व्यापार करणाऱ्या व्यापाऱ्यांचीं घरें सुरक्षित राहिलीं आहेत.

वरील नायकांनीं ठरल्याप्रमाणें रकमा देण्यांत दिरंगाई चालविली आहे असें पाहून विजापुरी सेनापतीनें उलट फिरून शहाजीशीं संगनमत केलें आहे. तेगनापट्टण, पोर्टोनोव्हो इत्यादि स्थलें शहाजीला देऊन दोघांनीं मिळून उभय नायकांचें, विशेषतः मदुरेच्या नायकाचें पारिपत्य करावें असें ठरलें आहे. यामुळें नायकांशीं झालेला पूर्वीचा करार मोडला आहे. मदुरा-नायकाचा बिकट आणि महत्त्वाचा किल्ला जो त्रिचनापल्ली त्याच्यावर प्रथम हल्ला झाला. मदुरा नायकानें धैर्यानें प्रतिकार केला. परंतु तंजावर नायक स्तब्ध राहिला. एवढेंच नव्हे तर त्यानें मधून मधून विजापुरी सैन्याला ४०।५० हजार पार्डोचा खुराक चारला ! मध्यंतरीं तेगनापट्टणच्या डच रेसिडेंटला स्वतःचे रक्षणाची जय्यत तयारी करण्याचा हुकूम मिळाल्यामुळें मूल्यवान वस्तूंच्या सुरक्षिततेची व्यवस्था त्यानें केली.

पिसुर्लें. शिवाजी पृ. ७ } (९४८) { श. १५८५ आषाढ व. १४
१६६३ आगष्ट २ न्यू. } { इ. १६६३ जुलै २३

गोव्याचा व्हाइसरॉय——— रावजी सोमनाथ पंडीत

आपल्याकडील पत्र आतां मिळालें. त्यावरून कुडाळ प्रांताच्या सुभेदारीवर शिवाजी राजांच्याकडून आपली नेमणूक झाली असें कळतें. शिवाजी राजे कुडाळ बंदरीं येऊन पोहोंचल्याबद्दल येथें बातमी कळतांच रामजी शेणवी कोठारी यांस नजराणा देऊन त्यांच्याकडे मी पाठविलें. परंतु शिवाजीराजे उत्तरेकडे जाण्यास निघाल्यामुळें तो तसाच परत आला आहे.

[शिवाजीनें नेमलेला पहिला कुडाळचा सुभेदार रावजी सोमनाथ पंडित हा असून त्यानें, आपण सुभेदार नेमला गेल्याचे पोर्तुगीज गव्हर्नरास जुलै अखेर कळविलें होतें. वरील पत्र त्या पत्राचें उत्तर होय.]

गो. इ. सा. ले. ३ } (९४९) { श. १५८५ श्रावण व. १
सु. १०६४ ? } मिसेली फा. मज. { इ. १६६३ आगष्ट ९ ?

अज. दि. मामले गोवा—ता गावकरानी मो. केरी तपे अंतरूज माम. मज.

सु. १०६३ मोहरम १४ चा फर्मान आला आहे. त्याप्रमाणें नारायण जोसी यांस याचे २७ होन आदा करीत जाणें.

लेटर बुक भा. ३ } (९५०) { श. १५८५ श्रावण व. २
पृ २९२ इ. } कंपनी सुरत, प्रेसिडेंट { इ. १६६३ आगष्ट १०

शिवाजीनें गिफर्ड टेलर प्रभृति लोकांना कैद करून ठेविले आहे. त्यांची सुटका होण्याचा मार्ग तुम्हीं कांहीं काढलाच असेल. नसेल तर तुम्हीं त्या बाबतींत विशेष लक्ष घालावें अशी आमची शिफारस आहे.

गो. इ. सा. ले. ४ जु. ४० } (९५१) { श. १५८५ श्रावण व. ६
सु. १०६४ मोहरम २० } मिसेली फा. मज. सी. { इ. १६६३ आगष्ट १४

?——— अमलदार मौ. केरी तपे अंतरूज मामले गोवा

नारायण कृष्ण जोसी याचे २७ होन चालविणें.

इं. फॅ. भा. ११ } (९५२) { श. १५८५ भाद्रपद शु. ३
पृ. २४५-४६इ. } कारवार-सुरत. { इ. १६६३ आगष्ट २५

कारवारच्या सुभेदाराच्या त्रासदायक वागणुकीची हकीकत परस्पर कानावर जाऊन आणि आम्हींहि केलेल्या तक्रारी ऐकून विजापूरचा आदिलशहा व रुस्तुमजमा यांनीं फर्मानें

वगैरे काढून सर्व तक्रारी दूर केल्या; अपराधी सुभेदारांना शासन केलें व आम्हांलाहि आश्वासनें दिलीं. न्याय्य जकाती घेण्याबद्दल रुस्तुमजमानें कारवार, शिवेश्वर, व कुडेरा येथलि सुभेदारांना निरनिराळे हुकूम पाठविले. तेव्हां या गोष्टींचा विचार करून हुबळीला जाऊन राहिलों होतों तेथून निघून रुस्तुमजमाच्या अधिकाऱ्याबरोबर परत कारवारला आलों.

खं. २० ले. ११२ } (९५३) { श. १५८५ भाद्र. शु. १२
सु. १०६४ सफर ११ } मिसेली. { इ. १६६३ सप्टें. ४

अज. दि. पर. वाई——ता मोक. देहाय पर. वाई.

नारायण गोपीनाथभट चित्राव यांस पसरणी, एकसर, उझरडे, या गांवांत जमीन इनाम चालत असल्याबद्दल सु. १०६२ जिल्हेज १४ चें खुर्दखत आहे. तरी ती चालविणें.

स. पृ. ११५ } (९५४) { श. १५८५ आश्वीन शु. २
श. रवल १ } महजर { इ. १६६३ सप्टें. २३

पार येथें नेताजी पालकर सरनोबत सुभेदार याचे विद्यमानें

अग्रवादी:—साउजी बिन सूर्याजी मोहिते { मु. तळबीड—
पश्चिम वादी:—नेताजी बिन राणोजी मोहिते { चे मोकदम

तळबीडच्या मोकदमी बाबत तंटा चालू असतां गोतसभेनें निवाडा केला कीं, प्रत्येकानें बरोबरीच्या मानपानासह निमी मोकदमी घ्यावी. साउजीस देशमुखी मात्र नाहीं.

शि. च. ले. ३८३ } (९५५) { श. १५८५ आश्वीन शु. २
सु. १०६४ रवल १ } फा. मु. व सी. { इ. १६६३ सप्टें. २३

नेताजी पालकर सरनोबत—समस्त गोत हमशाई देहाय व लहान थोर बलुते वगैरे कसबे तळबीड.

साउजी व नेतोजी मोहिते मोकदमीच्या निवाड्याबद्दल आमचेकडे आले. दोघास निमेनीम वाटून दिल्हे आहे. बराबरी निमे करून वाटून देणें. साउजीस देशमुखीची मात्र निसबती नाहीं.

शि. च. ले. ३८४ } (९५६) { श. १५८५ आश्वीन शु. ६
सु. १०६४ रवल ५ } कौल फा. मु. व सी. { इ. १६६३ सप्टें. २७

नेतोजी पालकर सरनोबत——नेतोजी मोहिते कसबे तळबीड.

मौजे येलफल येथें तुम्ही आपले कबिलेनसी रहात आहां तरी सुखें राहणें. आमचे तर्फेनें येक जरा तसवीस लागणार नाहीं.

डागरजिस्टर १६६३ पृ. ४९२ इ. आक्टो १० न्यू. (९५७) श. १५८५ आश्वीन शु.९ इ. १६६३ सप्टें. ३०

(५ व १२ जूनच्या) सुरतेच्या पत्राला उत्तर——

"कोचीनशीं संबंध चांगले राखावे; कारण, पूर्वीप्रमाणें आतां पोर्तुगीजांवर विश्वास ठेवतां येत नाहीं. व वेंगुर्ल्याचे वखारीसभोंवतालची मातीची भिंत दगडी करण्याचें काम तूर्त पुढें टाकावें. शिवाय...लीरडाम गलबतावर ३० पोर्तुगीज कैदी आहेत. ते वेंगुर्ल्याला उतरवून मुक्त करावे." असा हुकूम वेंगुर्ल्यास पाठविणें.

शिवाजी व कानडा प्रांत यांचे उल्लेख आहेत. **भद्राप्पा नायकानें** तोफा व दारुगोळा मागितला होता; परंतु त्याबद्दल सोडवणूक करून घेतल्याचें यांत नमूद आहे. [मार्गे पहा. अनुक्रमांक ९४०]

इं. फॅ. भा. ११ पृ. २५७ इ. (९५८) शिवाजीवर इंग्रजांचा राग श. १५८५ आश्वीन व. ३ इ. १६६३ आक्टोबर ९

स्वाली मरीन— रँडॉल्फ टेलरला गलबताचा मुख्य नेमतांना दिलेल्या सूचना.

पुरेसें सैन्य आणि पाहिजे तितका वेळ आम्हांला न मिळाल्यामुळेंच शिवाजीचें पारिपत्य करण्याचें (तुमच्या सुटकेनंतर) इतके दिवस राहून गेलें आहे. परंतु थोडा वेळ आम्ही थांबलों याचा अर्थ आम्हीं त्याचा अपराध माफ केला असें होत नाहीं. हातीं साधनें येतांच **त्याचा सूड उगविण्याचा आम्हीं पक्का निश्चय केला आहे.** आजपर्यंत मात्र त्या कामाकरितां लागणारें मनुष्यबळ आणि गलबतें हाताशीं नसल्यामुळें आम्ही कांहीं करूं शकलों नाहीं. पण धीर धरा !

[फॅ. रे. सुरत भा. २ पृ. १६४] गेल्या वर्षीं मोंगली सैन्यानें सेनापतीला पेंचांत धरल्यामुळें शिवाजीला परत फिरावें लागलें. नाहीं तर **तो कारवारला खास गेला असता.**

डागरजिस्टर १६६३ पृ. ५४३-५ इ. नोव्हें. १४ न्यू. (९५९) श. १५८५ कार्तिक शु. १४ इ. १६६३ नोव्हें. ४

महाबंडखोर **शिवाजी** ह्या मुलखांतील सर्व अस्वस्थतेच्या मुळाशीं आहे.४००० घोडदळ आणि १०,००० पायदळ घेऊन तो २३ मे रोजीं **कुडाळ**प्रांतीं आला. यामुळें वेंगुर्ल्याचे लोक भिऊन पळाले. **लखम सावंताचा** उल्लेख अगोदर आलाच आहे. त्यानें कंपनीच्या वखारीकडे एक ब्राह्मण पाठवून शिवाजी आल्याचें कळविलें. आमचे सर्व लोक, गव्हर्नर आणि वेंगुर्ल्याचे सर्व व्यापारी यांनीं वखारींत फक्त दोन तीन डच लोक संरक्षणाकरितां ठेऊन सावंत रहातो त्या ठिकाणीं (वाडीला) येऊन रहावें असेंहि त्यानें कळविलें. हा आत्मघाताचा मार्ग आहे हें ओळखून रेसिडेंटनें ही गोष्ट नाकबूल केली.

कारण रेसिडेन्सीवर हल्ला करण्याचा लखम सावंताचा बेत आहे अशी कुणकुण आधींच लागली होती. याकरितां असा हल्ला झाल्यास तो परतविण्याची त्यांनीं जय्यत तयारी करून ठेविली.

यानंतर विजापुरच्या सुलतानानें आपल्यावर मेहेरबान होऊन कुडाळप्रांत बहाल केला आणि आपण त्या प्रांताचा ताबा घेण्याकरितां आलों याबद्दल खुद्द शिवाजीकडून पत्रें आलीं. आपलें स्वागत करण्याकरितां डचांनीं प्रतिनिधि पाठवावा असेंहि त्यानें सुचविलें. रेसिडेंटनें हें पत्र सुभेदार व व्यापारी यांना दाखविलें. हेतु हा कीं पळापळी थांबावी. मध्यंतरीं शहर रक्षणाची योग्य खबरदारी घेऊन शिवाजीकडे अभिनंदनपत्र व नजराणा पाठविण्याचें त्यानें ठरविलें. पंडित व नेतोजी यांनाहीं पत्रें पाठविण्यांत आलीं. शिवाजीच्या व पंडिताच्या पत्रास उत्तर व नेलेला नजराणा परत घेऊन बाबा रमे (शेणवी) आला. " विजापूरच्या राणीला, आपल्या मुलखांतून शिवाजी नजराणे घेतो याचें वैषम्य वाटूं नये म्हणून शिवाजी तो स्वीकारीत नाहीं. " असें पंडितानें लिहिलें होतें. शिवाजीजवळ पुष्कळ विकाऊ कापड व माल पडून राहिला असल्यामुळें त्याला कांहीं रकमेची जरूर आहे असाहि निरोप तो घेऊन आला. यावर नजराणा हलक्या किंमतीचा पाठविला गेला अशी शंका येऊन रेसिडेंटनें २०० पॅगोडा (आबाशाही) पर्यंत (वाढवून) पाठविला तेव्हां तो शिवाजीनें घेतला. त्यानंतर ८ जूनला बालाजी, शिवाजीचा हेर, वेंगुर्ल्यांतील व्यापाऱ्यांकरितां परवाना पत्रें घेऊन आला. अगदीं पहिलीं पत्रें यानेंच आणिलीं होतीं. अशा तऱ्हेनें बोलावण्यामध्यें पैसे उकळण्याचाच त्याचा उद्देश असेल असें समजून व्यापाऱ्यांनीं जाण्याचें नाकारलें. बालाजी धमकी देऊन आग्रह करूं लागला. आमचे लोकांनीं मध्यस्थी करून त्याचें मन वळविण्याचा प्रयत्न केला. त्यांचेंहि तो ऐकेना. निर्लज्जपणें तो आग्रह धरून बसला. पंडिताच्या चिटणीसाचें पत्र त्यानें बाबाजी सेणव्याला आणिलें होतें. त्याला तो म्हणूं लागला "पुनः तुम्ही केव्हां तरी तिकडे यालच कीं नाहीं ! " इतक्या निकरावर प्रकरण आल्यामुळें खुद्द पंडिताचें पत्र येईपर्यंत बाबाजीला पाठवूं नये असें रेसिडेंटनें ठरविलें. बाळाजीच्या तोंडी निरोपावर व्यापाऱ्यांनीं पैसा देऊं नये असेंहि त्यानें व्यापाऱ्यांना पढविलें. बाळाजी अशा तऱ्हेनें खट्टू होऊन कुडाळला परत गेला.

त्यावर पंडितानें पत्र (बाबाजी सेणव्याला बोलावणें) आलें. आणि शिवाजी व पंडित यांच्या लबाडीच्या व स्वार्थी वागणुकीबद्दलची हकीकत कित्येकांकडून सांगण्यांत आल्यामुळें हें आमंत्रण रेसिडेंटनें नाकारलें असतें; परंतु रागरंग कसा काय आहे तें पहाण्याकरितां अखेरीस जाण्याचें ठरलें.

बालाजी कुडाळहून परत आला होता त्याला वाटेंत बाबाजी शेणवी भेटला. बाबाजीला मागें परतण्याबद्दल तो सांगूं लागला. परंतु बाबाजी तसाच पुढें जाऊन पंडिताला

भेटला व त्याचेकडून दोस्तीचीं पत्रें घेऊन आला. खरेदीचा बाजार भरभराटीस यावा यासाठीं डचांनीं मदत करावी असें त्यानें लिहिलें. बटेव्हियाचे अधिकाऱ्यांच्या नांवाचा उल्लेख करून रेसिडेंटनेंहि (स्नेहाचीं) उलट पत्रें लिहिलीं. मध्यंतरीं बाळाजीनेंहि व्यापारी वर्गावर जबर खंडणीचे आंकडे लादले. परंतु व्यापाराचे परवाने नवे करण्याबद्दल सांगतांच तो अडला. पंडिताच्या संमतीनेंच बाळाजीनें असें केलें असें सहजच वाटतें. पंडित मात्र आपल्या कानावर हात ठेवितो. इकडील मोठ्या लोकांची ही चालच आहे कीं आपल्या हस्तकांकडून निर्लज्जपणें जुलूम करावा; व उघडकीस येतांच आपण अज्ञानाचा बहाणा करावा!

ह्या (कुडाळ) प्रांतीं सुव्यवस्था करून **शिवाजी** आपल्या मुलखांत गेला. तेथून मोंगली सेनापति **शाइस्तेखान** याच्यावर त्यानें विश्वासघातानें छापा घातला. त्याचे दोन मुलगे व जनान्यापैकीं कित्येक बायका प्राणास मुकल्या. राजापूरच्या उत्तरेकडील प्रजाजन त्यानें लुटले.

एका व्यापाऱ्याच्या सांगण्यावरून असें समजतें कीं, **शिवाजीनें** वेंगुर्ल्याला वेढा घातल्याचें ऐकून (हें खरें नव्हतेंच) गोव्याच्या पोर्तुगीजांना आनंद झाला. मोठे नजराणे करून **शिवाजीनें** डचांना वेंगुर्ल्यांतून हाकून लावावें असें त्यांनीं बोलणें लाविलें व १५००० होनांचें आमिष दाखविलें. परंतु डचांचें शौर्य व त्यांचेपासून होणारा फायदा यांकडे लक्ष देऊन **शिवाजीनें** डचांचीच बाजू घेतली. तेव्हां गोव्याच्या व्हाइसरॉयला भय उत्पन्न होऊन त्यानें गोव्याच्या सरहद्दीवर सैन्य पाठविलें. परंतु विजापूरच्या वकिलाचें आश्वासनपत्र आलें व **शिवाजीनेंहि** गौरवाचें पत्र लिहिलें; त्यांवरून त्याला धीर येऊन **रामाजी** कोठारीबरोबर दोस्तीचें पत्र व ४३००० असरफींचा नजराणा त्यानें **शिवाजीकडे** पाठविला. परंतु **शिवाजी** निघून गेल्याचें वाटेंतच कळून कोठारी परत फिरला. स्वराज्यरक्षणाकरितां **गोवा व दंडाराजपुरी डचांच्या मदतीनें जिंकण्याची शिवाजीची तयारी आहे** अशी वदंता आहे. शिवाय बनिये व्यापारी काशीबा व संतुबा शेणवी यांना दूर करून कंपनीची खरेदी करणारा व्यापारी आपणच व्हावें असेंहि तो ठरवीत आहे. [रामोजी शेणवी कोठारी 'शिवाजीनें मोंगलांविरुद्ध मिळविलेल्या जयाबद्दल अभिनंदन करण्यासाठीं पाठविला. श्री. पिसुर्लेकर शि. च. प्र. पृ. १७८-१७९]

कुडाळचा ताबा विजापुरकरांनीं आपल्याला दिला असें पत्र शिवाजीनें रेसिडेंटला पाठविलें होतें. परंतु सुलतानानें तसा हुकूम दिला नसून बातमी अशी आहे कीं, फोंड्याला असणारा सुभेदार **लुणबेग (त्रिंबक) काळो** यानें लखम सावंत, केशव नाईक, राम सेणवी आणि चंदाराणा या चार देसायांच्या साहाय्यानें शिवाजीला कुडाळांतून घालवून लावावें असा विजापूरच्या राजाचा हुकूम आहे. या सर्वांना **शिवाजीविरुद्ध** उठावण्याचें

काम पोर्तुगीजांनीं केलें. (नाहींतर) सरसुभेदार आणि देसाई यांचें एकमत होण्यासारखें परस्परांत बरें नव्हतें.

लखम सावंत वाडींतून ६०० शिपायांनिशीं बाहेर पडून बालाघाटाच्या पायथ्याशीं जंगलांत राहतो. विजापूरचा सुलतान बंकापूरला आहे. त्रिंबक काळोला अपयश आल्यास सुलतान शिवाजीवर दुसरें मोठें सैन्य पाठवील. बडी साहेबिणी (म्हातारी राणी)चें रेसिडेंटास आलेल्या पत्राचें शब्दशः भाषांतर करून दिलें आहे.

हकीम समशा वेंगुर्ल्याचा अधिकारी झाला आहे. परंतु तो चिक्कू, संशयी व उद्दाम असून त्यानें वेंगुर्ल्याला दारुड्या...पशू सुभेदार नेमिला आहे. तो स्वतःचें अपराध छपविण्याकरितां आपल्या प्रजेविरुद्ध तक्रारी करितो. यामुळें सर्वत्र असंतोष माजला आहे कोंडेवारचा (कारवार?) सरसुभेदार व महमदखान हे रेसिडेंटशीं चांगलें वागतात. रयत लोक प्रत्यहीं वरघाटाकडे पुष्कळ माल पाठवितात व शिवाजीहि तो बिनहरकत जाऊं देतो म्हणून रेसिडेंट खूप माल पाठवितो........ पंडितानें आमच्या एका माणसाला व्यापाऱ्यांचे बरोबर जाऊं द्यावें अशा तऱ्हेचा परवाना मागविला आहे.

[पृ. ५४७] **शिवाजीनें कैद केलेले तीन इंग्रज** एकदांचे पंडितानें **मुक्त केले** आहेत. त्यांना कांहीं दिवस राजापुरांत ठेविलें होतें. परंतु सुरतेहून पत्रें आल्यावर ते युक्तीनें गोव्याला निसटून गेले आहेत. आणि त्यांनीं तेथून राजापूरच्या आपल्या नुकसानीबद्दल धमक्या देऊन सक्तीचा तगादा लाविला आहे. गेल्या पावसाळ्यांत अंजदिवला उतरलेल्या इंग्रजांपैकीं दोनशें मृत्युमुखीं पडले आणि बाकीचे बहुतेक आजारी आहेत. इंग्रजांनीं **अंजदीव** ताब्यांत घेतलें तेव्हां नवा सुभेदार महमदखान यानें त्यांना विरोध केला नाहीं म्हणून, कारवारचा मुख्य रुस्तुमजमा यानें त्याला कैद केलें आहे.

सा. ले. १५९, १६० सु. १०६४ रखर १४	(९६०) मिसली न.	श. १५८५ कार्तिक शु. १५ इ. १६६३ नोव्हें. ५

अज दि. पर. सुपे--ता. मोक. व माहा. सेटिये का सुपे.

छ ७ रखरच्या खुर्दखतांत हाली **मोकासा** अर्जानी जाला व महादजी गोसाव्यास गणो तिमाजीचे इनाम द्यावें असें लिहिलें आहे त्याप्रमाणें करणें.

इं. फॅ. भा. ११ पृ. २६० इ.	(९६१)	श. १५८५ कार्तिक शु. १५ इ. १६६३ नोवें. ५

कारवार, रँडॉल्फ लेटर (लायल मर्चंट गलबत)-- सुरत

राजापूरला आल्यावर एका बनियाला **रावजी पंडिताकडे** पाठविलें होतें. दुसऱ्या दिवशीं त्याच्या बरोबर रावजीचे दोन हस्तक बोलणें करण्यासाठीं आले. राजापूरच्या नुकसान-भरपाईबद्दल निमे रकम रोख देऊन राहिलेली जकातींतून वळती करून

घेण्याबद्दलचें पूर्वीचें बोलणें आतां फिरवून, सर्वच रकम जकातींतून वसूल करण्याबद्दल ते बोलूं लागले तेव्हां मीं त्यांना झिडकारलें. सहानुभूतीचे अभावीं राजापूरला माल वगैरे न ठेवितां पुढच्या मुक्कामाकडे निघालों. **शिवाजीच्या भीतीमुळें वेंगुर्लें ओस पडल्याचें** कळल्यामुळें तेथें न जातां गोव्यासच गेलों. **कर्नाटकांतील युद्ध चालूच आहे**. खुद्द आदिलशहा जातीनें हजर आहे.

इं. फॅ. भा. ११ } (९६२) { श. १५८५ कार्तिक व. १०
पृ. २०५ इ. } सुरत-कंपनी. { इ. १६६३ नोवें. १४

तुमच्या इकडील व्यापाराला कोणत्याहि प्रकारें अडथळा होणार नाहीं किंवा तुमच्या मालमत्तेला धक्का पोंचणार नाहीं. याचें कारण असें आहे कीं, सुरतेच्या बंदरांत एतद्देशीय लोकांचीं असंख्य गलबतें असतात; जर आमच्यावर कोणत्याहि प्रकारचा अत्याचार झाला तर त्याचा मोबदला त्वरित देशी लोकांच्या गलबतावर घेतां येईल हें ते जाणतात आणि म्हणून दबूनच असतात.

डाग रजिस्टर १६६३ } (९६३) { श. १५८५ कार्तिक वद्य १३
पृ. ५७८ इ. नोवें. २७ न्यू. } { इ. १६६३ नोवें. १७

वेंगुर्ल्यांत राहणाऱ्या एका व्यापाऱ्यानें १४ ऑगष्ट रोजीं गोव्याचे मुख्याधिकाऱ्याला पत्र लिहिलें आहे; त्यावरून असें समजतें कीं, **लखम सावंतापासून** वेंगुर्ल्याला उपसर्ग पोंचूं नये म्हणून **शिवाजीनें** कांहीं शिपाई (बंदोबस्ताकरितां) वेंगुर्ल्याच्या सुभेदाराकडे पाठविले आहेत.

ऑर्म मॅन्युस्क्रिप्टस } (९६४) { श. १५८५ मार्गशीर्ष शु. ५
भा. २६३ पृ. २३ इ. } { इ. १६६३ नोवें. २४

लॉयल मर्चंट गलबतावरील टिपणवही.

ओनर रोड (होनावरची खाडी)- या देशाचा राजा आणि विजापूरचा सुलतान यांच्यामध्यें तह झाल्याची बातमी कानावर आली आहे. सुमारें ६।७ हजार पौंड खंडणी देण्याचें या राजानें कबूल केलें आहे.

डाग रजिस्टर १६६३ } (९६५) { श. १५८५ मार्ग. शु. १४
पृ. ६८१ इ. डिसें. १३ न्यू. } { इ. १६६३ डिसें. ३

आमचा (डचांचा) व पोर्तुगीजांचा तह झाला हें ऐकून गोव्याला सर्वत्र आनंदी-आनंद झाला आहे......१० लढाऊ गलबतांचें आरमार तयार करून वसईकडे (जानेवारीच्या) पहिल्या दिवशीं पाठविण्याची तयारी गोव्यास चालली आहे. **शिवाजीशीं**

लढणारें मोंगली सैन्य वसईचे आसपास असून तें पोर्तुगीजांना उपद्रव देतें. त्याच्या बंदोबस्ताकरितां ही तजवीज आहे.

ऑर्म. मॅन्यु. भा. २६३ } (९६६) { श. १५८५ पौष वा ३ ते वा १४
पृ. २३-२४ इ. } { इ. १६६४ जानेवारी ५ ते १७

'लॉयल मर्चंट' गलबताचें टिपण पुस्तक.

शिवाजी सुरतेला आल्याची बातमी.

स्वाली होल, ५ जाने.— शिवाजी सुरतेहून १०।१२ मैलांवर आल्याची बातमी सायंकाळीं ३ वाजतां प्रेसिडेंटनें कळविली. त्याचे मागणीप्रमाणें १० हत्यारबंद लोक कंपनीच्या मालाच्या रक्षणाकरितां सुरतेस पाठविले.

६ जानेवारी.–दोनप्रहरीं अडीच वाजतां 'सुरतेंतील माल व माणसें हीं धोक्यांत आहेत. तेथें फक्त १० माणसें ठेवून बाकीचे सर्व लोक पाठवा' अशी प्रेसिडेंटची चिठी आली. परंतु ...फक्त ४२ शिपाई पाठविले. **त्या रात्रीं शिवाजी शहरांत शिरला आणि जाळपोळ व लुटालुटीला सुरवात झाली.** इंग्रजांच्या वखारींत सुमारें १५० इंग्रज व ६० शिपाई रक्षणाच्या तयारीनें राहिले. सुरतेचा भित्रा सुभेदार शहरांतील वीस हजार माणसांना असहाय स्थितींत सोडून किल्ल्यांत पळून गेला ! इंग्रजांप्रमाणें **डच**हि तयारीनें राहिले. इंग्रजांच्या वखारीजवळ ते लोक येतांच इंग्रजांनीं बाहेर पडून **शि॰**चे ३ शिपाई व १ घोडा ठार केला....या उदाहरणानें आर्मीनिअन्स वगैरे परदेशी लोकहि ठासून ठिकाणीं राहिले. परंतु मनुष्यबळ अपुरें पडल्यामुळें कोणालाच चालून जातां आलें नाहीं. व शिवाजीची लूट अप्रतिहत चालू राहिली. सोनें, रुपें, मोतीं, हिरे इत्यादि मूल्यवान् जिनसांशिवाय त्यानें इतर क्षुद्र वस्तूंकडे ढुंकूनहि पाहिलें नाहीं !

१० जानेवारी.–या दिवशीं रात्रीं तो निघून गेला. पण तत्पूर्वी शहराचे दोन तीन भाग पार जाळून टाकून त्यानें कित्येक माणसांचे हात तोडून व डोकीं मारून बळी घेतले. त्यानें एक इंग्रज अँथनी स्मिथ, याला ३ दिवस कैदेंत ठेविलें व ३५० रु. दंड घेऊन सोडून दिलें. त्याचेंहि डोकें मारलें गेलें असतें. परंतु **शिवाजीचा खून करण्याचा एकाचा बेत फसला** म्हणून थोडक्यांत वांचलें. एका मुसलमानानें शिवाजीला भोसकून मारण्याकरितां हात उगारला होता तो वरचेवरच काटला गेला. परंतु त्याच्या धडकीनें शिवाजी खालीं पडून रक्तबंबाळ झालेला पाहून, त्याला वार वर्मी लागला अशा समजुतीनें, सर्व कैद्यांना मारण्याचें ठरविण्यांत आलें; त्या मुसलमानाचा तत्काल शिरच्छेद करण्यांत आला; आणि शिवाजी सुरक्षित असल्याचें दिसून आलें. लवकरच शिवाजीनें कैद्यांची कत्तल थांबविली ! रात्रौ त्याच्यावर चालून येणाऱ्या शत्रुसैन्याची बातमी लागल्यामुळें व पुरेशी लूट मिळाली असल्यामुळें, सर्वांचे तळतळाट घेऊन

शिवाजीची स्वारी निघाली. **१५ लक्षांची लूट त्यानें बरोबर नेली**. यापूर्वींच्या कित्येक वर्षांत **सुरतेची या वर्षासारखी भरभराट** झालेली नव्हती.

१७ जानेवारी.– बादशाही सैन्य शहरांत आलें. सुभेदाराची हेटाळणी करून लोकांनीं प्रेसिडेंटची फार वाहवा केली. सुभेदाराला शेणमार केला म्हणून त्याच्या मुलानें एका निरपराधी बनियाला बाण मारून त्याचा प्राण घेतला......

सुरतेच्या लोकांना शिवाजी पुनः येईल अशा अवईमुळें भीती वाटत असून ते एका क्षणांत शहर सोडून जातां यावें अशा तयारींत आहेत. इंग्रज व डच धीरानें आहेत. डच स्वतः बाहेर पडण्यास धजले नाहींत. त्यांनीं आपले नोकर लोक बाहेर पाठविले. त्यांपैकीं दोन शिपाई मारले गेले..........

डाग रजिस्टर १६६४ पृ. १७ }
इ. जाने. १५ न्यू. }

(९६७)

{ श. १५८५ पौष वा ३
{ इ. १६६४ जाने. ५

औरंगजेब काश्मीरकडून लाहोरास परत आला असून बंडखोर शिवाजीचा एकदांच कायमचा नायनाट करण्याचें त्यानें मनांत आणिलें आहे.

इंडियन अँटिक्वेरी भा. ५१ }
पृ. १ ते ६ इ. }

(९६८)
डचांचा वृत्तांत

{ श. १५८५ पौष व. ३-८
{ इ. १६६४ जानेवारी ५–१०

शिवाजीनें सुरत लुटल्याचा वृत्तांत– (डच डायरेक्टर आणि कौन्सिल यांनीं लिहिलेली रोजनिशी) **५ जानेवारी (मंगळवार)**:– गणदेवीला कोणी एक मोठा सेनापती आल्याची खबर सुभेदार **इनायत-खानाकडे** आल्याचें आम्हांला सकाळीं नऊ वाजतां कळलें. 'तो गणदेवीला काल रात्रीं एकाएकीं आला. तो आपलें नांव सांगत नसून "आपण बादशाही सरदार आहों व अमदाबादेकडे जात आहोंत" एवढेंच सांगतो. त्याच्याबरोबर घोडदळ व पायदळ मिळून आठ ते दहा हजार सैन्य असून त्याच्याच लोकांचे तोंडून कांहीं थोडें ऐकावयास मिळालें त्यावरून तो शिवाजी असावा.' इत्यादि हकीकत कानावर आली. प्रथम आम्हीं तिकडे लक्षच दिलें नाहीं. परंतु लवकरच आपआपलें होतें नव्हतें तेवढें गोळा करून सर्वत्र पळापळी सुरू झालेली दिसली.

इंग्रज प्रेसिडेंटानें स्वालीला जाण्याबद्दल सुभेदाराची परवानगी मागितली होती. परंतु ती मिळाली नाहीं. कारण, सुभेदाराला राग येऊन 'इंग्रज आणि डचच जर शहर सोडून गेले तर मग शहरांत राहील तरी कोण ?' असें तो म्हणाला. वगैरे हकीकत डायरे-

क्टरच्या कानीं आली....डायरेक्टरनें आत्मरक्षणाचा उद्योग चालविला. बायकामुलांना गलबतावर पाठविण्याबद्दल परवानगी विचारावयास त्यानें मनुष्य पाठविला. परंतु सुभेदार घरीं नव्हता. शहरासभोंवती रक्षक ठेवून, पूल पाडणें, निरनिराळ्या ठिकाणीं तोफा ठेवणें वगैरे नगररक्षणाच्या उद्योगाला तो लागला होता. इंग्रजांच्या वखारींतहि डायरेक्टर जाऊन आला. तेथेंहि बंदोबस्ताची खटपट चालू होती.

सुभेदाराकडे पाठविलेल्या निरोपाचें नकारार्थी उत्तर आलें. शिवाय इंग्रज व डच यांनीं नगररक्षणार्थ मदत करावी असेंहि त्यानें सुचविलें....आमच्या वखारीचे रक्षणाकरितां आम्हीं धनुष्यबाण, तरवारी व भाले हीं हत्यारें घेतलेले ८० तद्देशीय व ४० युरोपियन असे लोक जमा केले.

दिवस वर आला तसा शत्रू जवळजवळ आला. व पळणाऱ्यांची संख्या वाढली.... काळोख पडण्यापूर्वी डचांच्या बायकामुलांना त्यांनीं गलबतांवर पाठविलें.

६ जानेवारी (बुधवार)—अगदीं सकाळीं सुरतेपासून **शिवाजी** ४½ डच मैलांवर औडेना गांवीं आल्याचें कळलें. ' आपण बादशाही सरदार आहों व मोहोबतखानाचे बोलावण्यावरून पट्टणचें बंड मोडण्यास जात असतांना वाटेंत आपल्याला उशीर झाला' अशी **शिवाजी** बतावणी करीत असल्यामुळें, सुभेदारानें एक हस्तक पाठवून ' येथील लोक भीतीनें पळून जाऊं लागले आहेत; तरी तुम्ही अधिक जवळ येऊं नये' असा निरोप पाठविला. या निरोपानें चिडून जाऊन **शिवाजीनें** त्या हस्तकालाच कैद केलें. डचांनीं बातमी आणण्याकरितां दोन माणसें पाठविलीं त्यांनाच त्यानें धरून ठेविलें. पण संध्याकाळीं सोडून दिलें. त्यांनीं अशी बातमी आणली कीं, तो **शिवाजीच** आहे. त्यांपैकीं एकानें त्याला राजापुरास पाहिलें असल्यामुळें आतां ओळखलें.

वखारीचा बंदोबस्त ७ वाजल्यापासूनच करण्यांत आला. कंपनीचा माल बाहेर विणकरी व रंगारी यांच्याकडे होता तो वखारींत आणून टाकविला. सुमारें १० वाजतां मैदानावरून किल्ल्याजवळून इंग्रज प्रेसिडेंटनें २०० इंग्रज व इतर शिपाई यांची मिरवणूक काढली. व ' **शिवाजी** आलाच तर आपण त्याच्यावर हल्ला करण्यास तयार आहोंत ' असें सांगितलें. डच डायरेक्टरनें ' आपण मरेपर्यंत स्वसंरक्षण करूं; हल्ला आला नाहीं तर इतर भानगडींत मात्र पडणार नाहीं' असें सांगितलें. इतक्यांत शत्रू जवळ आल्याची बातमी आली. **मध्यान्हाच्या सुमारास** (इंग्रज प्रेसिडेंट गेल्यावर) ती बातमी खरी असल्याचें प्रत्यंतर आलें. व गलबतांना खालीकडे निघून जाण्याबद्दल इषारा देण्यांत आला.

वखारीचे दरवाजे बंद केले नाहींत तोंच शहराच्या मध्यभागीं ज्वाला निघालेल्या दिसल्या. जकातघर लुटणाऱ्यांना पुष्कळ लूट सांपडली. सुभेदार आणि मुख्य व्यापारी धीरानें

तोंड देण्याचें सोडून किल्ल्यांतच जाऊन बसले होते. थोडेसे मुसलमान शिपाई नोकरीला ठेऊन त्यांच्याकडून सहज (शहराचें) संरक्षण करतां आलें असतें; तें न करितां सर्व शहर त्यांनीं लुटारूंच्या हवालीं केलें ! आणि कोणींच विरोध न केल्यामुळें धीट झालेले लुटारू लोक किल्ल्यापर्यंत गेले. तथापि त्यांच्यावर तोफा डागण्यांत आल्या नाहींत ! रात्रीच्या पहिल्या प्रहरांत जाळपोळ जोरांत चालू होती. वखारीच्या सभोंवतीं एकमेकांना हाका मारून घरें फोडतांना (मराठ्यांचा) आवाज ऐकूं येतच होता. परंतु जाळ विशेष वाढल्याचें भासत नव्हतें.

७ जानेवारी गुरुवार—सुरतेंत राहणारा निकोलस कॅलोस्ट्रा या नांवाचा एक ग्रीक व्यापारी होता. त्याच्याबरोबर एक घोडेस्वार देऊन शिवाजीनें त्याला आमच्याकडे बोलणें करण्याकरितां म्हणून पाठविला. त्याला वखारींत घेतल्यावर तो पोर्तुगीज भाषेंत सांगूं लागला:—मला माझ्या घरांतून ओढून काढून तुम्हांला व इंग्रजांना असा निरोप सांगण्याकरितां पाठविलें आहे. कीं, शहासुजा आतां शिवाजीबरोबर रहात असून त्यानें शिवाजीला सुरत शहर दिलें आहे. शिवाजीला सैन्याच्या खर्चाकरितां पैसा पाहिजे आहे. तर तुम्हीं कांहीं रकम द्यावी. न दिल्यास तो सर्व शहर जाळून टाकील ! शहासुजा तीन वर्षांपूर्वीच आराकानमध्यें वारला हें सर्वांनाच माहीत होतें. अर्थात् हा सर्व नुसता बहाणा होता.

डायरेक्टरनें उलट निरोप पाठविला कीं, 'आम्हीं व्यापारी लोक; आपला पैसा जवळ ठेवीत नाहीं. चालत असेल तर कांहीं कापड व मसाल्याचा नजराणा पाठवूं. वेंगुर्ल्याच्या वखारीला तुम्हीं त्रास न देतां अद्यापपर्यंत स्नेहानें वागविलें आहे तसेंच येथेंहि चालवावें. तुमच्या माहितीशिवाय कोणी आम्हांला त्रास देऊं पाहील तर त्याच्याविरुद्ध बंदोबस्तासाठीं आम्ही हुषारीनें आहोंत.'

मध्यान्हाचें जेवण संपतें न संपतें तों संकटाची हूल उठली. दरवाजांतील दोन तोफांना लुटारू भिऊन परत गेले. उत्तर व पूर्व भागांत सुमारें एक वाजतां वणवा पसरला. वखार भस्मसात् होणार इतक्यांत अकस्मात् वारा फिरून आम्हीं बचावलों.

तेवढ्यांत इंग्रज प्रेसिडेंटशीं पत्रव्यवहार करून एकमेकांची खबर दिली. इंग्रज प्रेसिडेंटनें दोन तीनदां बाहेर पडून चढाई केली व त्यांत शत्रूचे २ शिपाई व एक घोडा ठार होऊन दोन शिपाई कैद झाल्याचें कळलें. आगीचे भीतीस्तव छप्पर ओढून काढून हल्ला आलाच तर सावधगिरीकरितां दरवाजाच्या आंतल्या बाजूस माल लावून आम्हीं आडोसा केला.

…… …राजाच्या वाकेनवीसानें किल्ल्यांतूनच डचांच्या शेजारच्या आपल्या घरांतला माल राखण्याबद्दल डचांना लिहिलें; तें त्यांनीं नाकारलें.… …शिवाजीचीं गलबतें नदींत शिरून तिकडूनहि व्यापारी गलबतांवर हल्ला करणार असल्याची बातमी आली होती. पण

ती निराधार ठरली...मीक व्यापारी शिवाजीचें उत्तर घेऊन अजून आला नव्हता म्हणून काळजी वाटत होती. रात्रीच्या प्रथम प्रहरीं वखारी सभोंवतीं आगीचा, बंदुकांचा व ढोलग्याच्या आवाजाचा धुमाकूळ चालू होता. त्यांतच आर्तांच्या आरोळ्या आणि जखम्यांचें कण्हणें चालू होतें.

८ जानेवारी– सकाळीं ६ वाजतां संकटाची हूल उठली. परंतु पुनः ती खोटी ठरली. आमचें जेवण चालू होतें. इतक्यांतच किल्लेदारानें दारूगोळा पाठवून देतों असा निरोप पाठविला. पण जाळ कमी होऊन दंगलहि ओसरत चालली होती. लुटारूंची टोळी निघून जाण्याच्या तयारींत होती असें वाटलें. शिवाजी सुरतेबाहेर दोन कोसांवर उतरला होता. फक्त त्याचाच एक शामिआना होता. इतर सर्व अधिकारी उघड्यावरच रहात. शिवाजीनें लूट बंद करण्याबद्दल हुकूम काढला अशीहि वदंता आहे. त्याच्या सर्व छावणीभर लूट वाहून नेणारे मजूर आणि बैल यांची गर्दी आहे. प्रत्येक घोडेस्वाराजवळ एक रिकामा घोडा आहे. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे **शिवाजीची ही अगदीं तात्पुरती छावणी आहे.**

मध्यें थोडासा पत्रव्यवहार होऊन इंग्रजांकडून अशी सूचना आली कीं 'आम्हीं व इंग्रज एकविचारानें काय करावयाचें तें करूं' असा डचांनीं शिवाजीस जबाब द्यावा. परंतु तसें बांधून घेणें आम्हांला बरें वाटलें नाहीं म्हणून आम्हीं उत्तर पाठविलें नाहीं. असेंहि कळलें कीं, अँटॉनी स्मिथला शिवाजीकडे कैद करून नेलें होतें. परंतु त्याच्या गरीबीच्या पोशाखावरून तो कोणी सामान्य नोकर आहे असें वाटून त्याला त्यानें थोडा दंड घेऊन सोडून दिलें. व त्याचे बरोबरच इंग्रजांना निरोप पाठविला कीं 'कांहीं द्रव्य दिलें नाहीं तर आम्हीं तुमचेवर हल्ला करूं.' कांहीं फ्रेंच पाद्री इंग्रजांच्या वखारीच्या आश्रयास आले आहेत. त्यांचे पैकीं एक शिवाजीबरोबर होता. इंग्रजांचे व आमचे उत्तरामुळें शिवाजी फार रागावला असल्याचें त्यानें सांगितलें.

मीक वकील आमच्याकडे परत येत असतांना मराठ्यांनीं त्याला जखमी केल्यामुळें तो आसऱ्याकरितां इंग्रजांच्या वखारींत गेला आणि म्हणून तो आमच्याकडे येऊं शकला नाहीं. आमचा एक हेर शहरांत फिरून आला. त्यानें लुटीची हालहवाल सांगितली. पांच सहा जणांच्या टोळ्या करून लुटणें, घरें पाडणें हें मराठ्यांचें काम चालू होतें. मोठीं घरें सर्व पार नाश पावलीं. हेर शहराच्या बाहेर शिवाजीच्या छावणीपर्यंत गेला होता. शिवाजीच्या डोक्यावर बिनकनातीचें फक्त एक पाल होतें. लोक लूट घेऊन एकसारखे त्याच्यापुढें ओतीत होते. सोनें, रुपें बाजूला काढून ठेवून बाकीचें जवळ उभें रहाणाऱ्यांना तो लगेच वांटून टाकीत असे. छावणी हालणार किंवा कसें हें समजण्यास कांहीं मार्ग नव्हता. कारण एकसारखी दाटीच होती. स्मशानभूमीपासून शहाबेगमच्या बागेपर्यंत

मराठा छावणी पसरली असून एकहि तंबू दिसत नव्हता.... पुनः संध्याकाळीं लुटारूंची हालचाल व जाळपोळ जोरांत चालू झाल्याचें दिसलें.

९ जानेवारी (शनिवार)– रात्रभर ढोल्यांत तेल घालून पहारा केला. कोतवालाचा भाऊ ४० लोकांनिशीं किल्यांतून बाहेर आला. इंग्रजांनीं त्याच्या बरोबर कांहीं लोक पाठविले तसे आम्हींहि पाठवावे असें त्यानें सुचविलें. परंतु आमच्याजवळ अधिक लोक नाहींत असें सांगून आम्हीं फक्त स्वसंरक्षण करीत राहिलों.

११ वाजण्याचे सुमारास बैलापारचा (?) राजा व भडोचचा सुभेदार कुमक घेऊन येत आहेत अशी बातमी आली. सभोंवार आगीचा कल्लोळ चालू असल्यामुळें आतां आमची वखार वाचत नाहीं असें वाटून आम्हीं गलबतावर जाण्याचा विचार चालविला. ...आतां हिशेबाचीं पुस्तकें व इतर कागद घेऊन निघणार तों पुनः वारा फिरला आणि वखार बचावली. धुरामुळें आमचें निशाण दिसेना म्हणून इंग्रजांनीं चौकशीकरितां मनुष्य पाठविला होता.

१० जानेवारी (रविवार)–सकाळीं शिवाजी निघून गेल्याची बातमी आली. व सगळीकडून तिच्या खरेपणाबद्दल भरपूर पुरावा येऊं लागला.... तसेंच सुरतेच्या मदती करितां निघालेल्या सैन्यांच्याहि बातम्या आल्या. परंतु आतां फार उशीर झाला होता.

११ जानेवारी (सोमवार)– शिवाजी खरोखरच गेला होता ! आपआपल्या ठिकाणांतून बाहेर आलेल्या लोकांना आपल्या इस्टेटीचा नाश झालेला सर्वत्र दिसला. मोठ्या शहराचा अर्धा भाग अग्नीचे भक्ष्यस्थानीं पडला होता. इंग्लिश व डच फॅक्टरी व नवी सराई (यांत आर्मिनिअन व तुर्की व्यापारी रहात होते.) यांच्याशिवाय आणखीं दहा घरांनीं देखील स्वरक्षणाचा प्रयत्न करून लुटींतून आपली मालमत्ता वांचविली नाहीं !

हाजी जासबेग[१](?) किंवा वीरजी व्होरा अशा सारख्या मोठ्या व्यापाऱ्यांनीं ३।४ हजार रुपये खर्च करून कांहीं शिपाई ठेविले असते तर त्यांची सर्व मालमत्ता सुरक्षित राहिली असती.... इथिओपिआचा वकील दिल्लीला जात असतांना वाटेंत जुन्या सराईंत उतरला होता. त्याला शिवाजीकडे कैद करून नेलें होतें. परंतु बादशहाला **द्यावयाचा नजराणा** शिवाजीला दिल्यानंतर त्याला सोडून दिलें. त्याच्याजवळ दुसरी मूल्यवान चीज कांहीं नव्हतीच. [हेग स्टॅन्स्क्रिप्ट्स् –सेरीज १ भा.२७. नं. ७१९]

---

१ झाहिदबेग.

ओरि. रीस. पृ. १६७ } (९६९) { श. १५८५ पौष (व. ३-८)
इ. न्यू. स्टाईल } [1]डचांचा वृत्तांत. { इ. १६६४ जाने. (५-१०)

व्हॉल्कार्ड इव्हर्सनचा वृत्तांत (प्रत्यक्ष पाहून लिहिलेला)

५ जानेवारीला सकाळीं ९ वाजतां २ मैलांवर रहाणाऱ्या एका शिपायानें सुभेदार इनायतखानाला शिवाजी चाल करून येत असल्याची वर्दी दिली. तीवर प्रथम कोणाचा विश्वासच बसेना. सुभेदारानें घाबरून पूल वगैरे पाडले. पण रक्षणाकरितां तोफा कोठेंच नव्हत्या. डच व इंग्रजाकडे त्यानें मदत मागितली याचें आम्हांला आश्चर्य वाटलें. दुसऱ्या दिवशीं दीड मैलावर युटेना (उटना) येथें शिवाजीचें सैन्य आल्यावर 'शिवाजीनें पुढें येऊं नये; भीतीनें लोक पळून जात आहेत व हें बादशहाला आवडणार नाहीं.' म्हणून सुभेदारानें सांगून पाठविलें...डच लोकांनीं दोन नोकर पाठविले. त्यांचीं हत्यारें काढून घेऊन शिवाजीनें त्यांना सायंकाळीं सोडून दिलें....मध्यान्हाला जाळ सुरू झाला....लुटारू लोक टोळ्यांनीं फिरूं लागले......जकातघर प्रथम लुटलें....... त्यांचा प्रतिकार सहज रीतीनें करितां आला असता.

सुभेदार आपलें १००० घोडदळ घेऊन किल्ल्याकडे गेला. आणि त्यानें तोफांच्या रक्षणाखालीं घोडे खडे केले. सर्व सरकारी अधिकारी मागोमाग गेले.......कोणीच प्रतिकार करण्यास राहिलें नाहीं यामुळें विस्तव व लूट बेफाम फैलावली. शत्रू इतका धीट झाला कीं मराठे थेट किल्ल्याचे तटाखालीं येऊन त्यांनीं घोडे जवळ जाऊन पाहिले. किल्ल्यांतील लोक आपलें शौर्य तटामागून प्रदर्शित करण्याच्या इराद्यानें रात्रभर तोफा डागीत होते. परंतु त्यानें शत्रूच्या पेक्षां शहरांतील घरांनाच अधिक धोका पोंचला....या रात्रीं (६ जाने.) आग थोडी कमी झाली तरी दुसऱ्या दिवशीं (७ जाने.) वाढली आणि अनेक ठिकाणीं पसरली.

--ग्रीक व्यापाऱ्याची वकीली...'बादशहाचा सर्वांत धाकटा भाऊ शहासुजा यानें आपल्याला सुरत शहर दिलें' असें शिवाजीचें सांगणें होतें. ...द्रव्याबद्दल डचांनीं नकार दिला. लूट व जाळपोळ चालू राहिली. सोडोम (सैदन)किंवा ट्रॉयसारखी स्थिति दिसली.

८ जाने.- न्यायकचेरीच्या चिटणिसानें आपली पेटी डच वखारींत ठेवण्याबद्दलचें किल्ल्यांतून पत्र पाठविलें; परंतु डचांनीं नकार दिला. सकाळीं निराधार झालेले लोक भटकतांना दिसले. जाळ चेतवण्याची मराठ्यांनीं युक्ती अशी काढली कीं तेल्यांच्या दुकानांतून तेल घेऊन तें भिंतीवर, दारांवर व खिडक्यांवर ओतून व तेलाच्या बाटल्या जमिनीवर उभ्या ठेवून ते त्यांना आग लावून देत. दोन श्रीमंत व्यापारी आपलीं घरें व माल सोडून किल्ल्यांत गेले. वीरजी व्होराचें अत्यंत भव्य मंदीर भस्मसात् झालें. त्यांतच सोनें, मोहरा, मोतीं, हिरे वगैरेंनीं भरलेलीं ६ पिपेंहि नाश पावलीं. दोन दिवसांपूर्वीं शिवाजीनें

१ यांतील बहुतेक हकीकत ले. ९६८ शीं जुळती असल्यामुळें पुनरुक्ति फार होऊं नये म्हणून तपशील गाळला आहे. व तेथें ... अशी खूण केली आहे.

वीरजी व्होरा व दुसरा एक व्यापारी अशा दोघांना आपल्या ताब्यांत देण्याबद्दल सुभेदाराकडे कळविलें होतें. सर्व शहराबद्दल दंड म्हणून ह्या दोघांचा ताबा घेण्यास तो राजी होता.

दुसरे दोन बनिया व्यापारी गोंधळ वाढलेला पाहून आपली संपत्ती घेऊन नदीपलीकडे जाणार होते. त्यांना सुभेदारानें परवानगी न दिल्यामुळें त्यांचीं सुमारें ३० सोन्याचीं पिंपें शिवाजीला मिळालीं. त्या दोनप्रहरीं...शिवाजी दोन मुकाम दूर जाऊन राहिला.

शिवाजीची हालहवाल समजून घेण्याकरितां एक शिपाई फकीराचा वेष घेऊन डचांना सांगून गेला होता. तो कोणालाहि संशय न येतां फिरून आला. शिवाजी तंबूंत बसला नसून एका झाडाला एक कापड टांगून सूर्य किरणांपासून त्याच्याकरितां आडोसा तयार केला होता. त्याच्यापुढें त्याच्या लोकांनीं आणलेली लूट पाहून तीपैकीं कांहीं स्वतःकरितां ठेवून बाकीची तो वांटून टाकी....

एक आठवड्यापूर्वी एक इथिओपिअन वकील बादशहाकडे जाण्याकरितां येऊन राहिला होता. बादशाहाकडून त्याच्या स्वागताबद्दल वगैरे हुकूम यावयाचे होते. त्याला किल्ल्यांत न घेतल्यामुळें तो शिवाजीच्या हातांत सांपडला.

...शिवाजी मोठी लूट घेऊन गेला. जातांना तो असें म्हणाला कीं "औरंगजेबाच्या सुरतेची 'सुरत' घेण्याचा माझा पुष्कळ दिवसांचा इरादा होता तो आतां सफळ झाला." [Orientalische Reise-beschreibung p. 167]

डागरजिस्टर १६६४ पृ. १९६ इ. न्यू. स्टा.	(९७०) डचांचा वृत्तांत	श. १५८५ पौष व. ३ इ. १६६४ जानेवारी ५

५ जानेवारीला[1] शिवाजी गणदेवीला आल्याचें कळलें. गणदेवी सुरतेपासून १५ कोस आहे..............इंग्रज प्रेसिडेंटजवळ माणसांचा आधार असल्यामुळें शहरांतून फिरण्याचें त्यानें धाडस केलें. ३०० इंग्रज खलाशांच्या मदतीनें शिवाजीला विरोध करण्याच्या इराद्यानें तो आमचे वखारीकडेहि आला होता.......आमच्या वखारीवर तोफा असल्यामुळें लूट करणारे लोक समोरून फिरकूंहि शकले नाहींत.......आमची वखार जळणार होती. परंतु गोळीच्या टप्प्यापलीकडेच वाऱ्यानें आगीची दिशा बदलली !...... शिवाजी आपल्या सैन्यासह दोन कोसांवर तळ देऊन राहिला होता.......८ तारखेला सुभेदारानें चाळीस घोडेस्वार लूट करणाऱ्यांवर चाल करून जाण्याकरितां पाठविले. कारण लुटारू स्तब्ध असून आगहि बहुतेक शमली होती. डच डायरेक्टरनेंहि या हल्ल्यांत सामील व्हावें असें सुभेदाराचें म्हणणें होतें. डायरेक्टरनें तसें करणें नाकारलें. त्याचे मतानें 'हल्ला

---

१ यांतील बहुतेक वृत्तांत ले. ९६८ प्रमाणें असल्यामुळें नवीन असलेले उल्लेखच दिले आहेत.

थांबला नसून दुसऱ्या दिवशीं शिवाजी अधिक जोराची कारवाई करणार होता. ' आणि खरोखर तसेंच घडलें. ९ तारखेला सकाळीं शहरांत निरनिराळ्या ९-१० ठिकाणीं आगी लागलेल्या दिसल्या.........या लुटारूंच्या पुढें मुसलमानांचा नामर्दपणा उघडकीस आला. लुटारू आम्हांला मात्र भीत होते. आमच्या तोफांच्या टप्यांतील गल्लींत ते शिरलेच नाहींत.......

१० तारखेला धुमाकूळ कमी झाला. आग कमी झाली व विझली. कारण शिवाजी तळ उठवून रात्रींच निघून गेला होता....शिवाजीनें मागें ४।५ शें लोकांची फौज पिछाडीचे रक्षणाकरितां ठेविली होती. त्यांनीं एकदांच येऊन लवकरच काढता पाय घेतला.... शिवाजीनें हाजी ' सि[१]असनाईक ' व विरजी व्होरा यांना ताब्यांत घेण्याचा उपाय केला.... कित्येक खरेदीदारांना शिवाजीनें कैद करून नेल्यामुळें डच कंपनीचें नुकसान सुमारें २० हजार रुपयांपर्यंत होईल. [डाग रजिस्टर १५ मे न्यू. मधील उल्लेख.]

इं. फॅ. भा. ११ पृ. २९८ इ.	(९७१) सुरत कन्सल्टेशन	श. १५८५ पौष व. ४ इ. १६६४ जानेवारी ६

पांचव्या तारखेस शिवाजी गणदेवीला आल्याबद्दल बातमी आली....शहरांतील लोक आपलीं घरें सोडून, बायकामुलें व कांहीं बरोबर घेतां येईल तेवढें घेऊन थोडे थोडे जमून शहर सोडून पळूं लागले होते. अशा वेळीं सभा झाली.

...कांहीं खरेदी दिलेला, आणि कंपनीकरितांच रंगविलेला माल सुरक्षिततेकरितां म्हणून कंपनीचे वखारींत ठेवण्यांत यावा; संरक्षणार्थ बंदोबस्त करण्यांत यावा इत्यादि ठरलें.

पिसुर्लें. शिवा. पृ. ९ इ.	(९७२) पोर्तुगीज दप्तरांतील उल्लेख	श. १५८५ इ. १६६४

गोव्याचा व्हाइसराय—पोर्तुगालचा राजा.

कोणासहि कळूं न देतां ८।१० हजार सैन्यासह शिवाजी सुरतेस पोचला. त्याला चोरतां आलें तितकें द्रव्य चोरून **आधीं आणवून ठेवलेल्या जहाजांतून माल चढवून तो** जलदीनें परतला व सुखानें स्वराज्यांत परत आला; आणि प्रसंग पडल्यास संरक्षणार्थ आमच्या प्रदेशाचा उपयोग करून घेण्यासाठीं आमच्या मुलखाजवळ येऊन पोचला. [हा उल्लेख न्यू. स्टा. इ. १६६६ जाने. २८ पत्रांतील आहे.]

फॅ. रे. सुरत भा. ८६ पृ. २ इ.	(९७३) इराण—सुरत	श. १५८५ माघ शु. ४ इ. १६६४ जाने. २२

शिवाजीनें सुरत लुटून नेलेले जिन्नस होन, माल, मोती, हिरे मिळून सुमारें एक **कोटीचे** होतील...पुनः पुनः शिवाजीच्या हल्ल्याच्या बातम्या उठतात तसे अधि-

[१] झाहिद बेग; सावकारीचें द्योतक ' नाईक ' हें पद लावून 'झाहिद नाईक' असें नांव बनविलेलें दिसतें.

कच लोक पळून जातात व सुरक्षिततेकरितां आपल्या वस्तु किल्ल्याच्या खंदकांत टाकतात किंवा गलबतांत भरतात. लोकांचे हात तोडून व डोकीं मारून शिवाजीनें दाखविलेल्या निर्दयपणामुळें त्याची लोकांना इतकी दहशत बसली आहे कीं बादशहानें रक्षणाकरितां सैन्य न पाठविल्यास लोक मुकाट्यानें शहर सोडून जातील.

प. रे. आ. मॅन्यु. सी. ओ. ७७।९ क्रम २४ | (९७४) सुरत, हेन्री गॅरी-मार्लबरो. | श. १५८५ माघ शु. ७ इ. १६६४ जाने. २५

दख्खनच्या (विजापूरच्या) राजाविरुद्ध बंड करणारा शिवाजी (त्याच्या आगमनाची बातमी येते न येते तोंच) येऊन ६ तारखेला दाखल झाला. त्यानें ३००० चे वर घरें जाळलीं व लूट नेली....आमच्याकडून त्यानें खंडणी मागितली. परंतु आम्ही ती न देतां आमचेजवळ मनुष्यबळ असल्यामुळें त्याचे लोकांवर दोन तीनदां चालून घेऊन कांहीं लोक मारले. यामुळें आमचे शेजारचा भाग सुरक्षित राहून औरंगजेबापर्यंत आमची वाहवा झाली. उलट सुभेदाराच्या नामर्दपणाबद्दल तक्रारी गेल्या. डच लोक बाहेर पडले नाहींत परंतु त्यांनीं आपल्या वखारीचें चांगलें रक्षण केलें. या दुष्टानें (शिवाजी) बुधवार सकाळपासून शनिवारीं सायंकाळीं ४ वाजेपर्यंत, पुरे ४ दिवस हें शहर लुटलें. जे कोणीं मागितल्याप्रमाणें धन देऊं शकले नाहींत त्यांचे हात तोडणें, अशासारखीं निर्दयपणाचीं कृत्यें या मुदतींत त्यानें पुष्कळ केलीं. अँथनी स्मिथ (एक प्रमुख फॅक्टर) त्याच्या कैदेंत सांपडला होता (परंतु चमत्कारानेंच सुटला). त्यानें एका सकाळच्या वेळांत २६ हात व कित्येक डोकीं कापलेलीं पाहिलीं.

इं. फॅ. भा. ११ पृ. २९८-३०३ इ. | (९७५) सुरत-कंपनी. | श. १५८५ माघ शु. १० इ. १६६४ जाने. २८

६ जानेवारीला शिवाजी जवळ आल्याची बातमी आली....सुभेदार व इतर सर्व लोक पळून गेले. आमच्या आसपासचे थोडे लोक काय ते राहिले....आम्हीं, प्रेसिडेंटला सर्वांत पुढें घालून किल्ल्यासमोरून सर्व शहरभर मिरवणूक काढली. शत्रूची चाहूल लागतांच किल्ल्यांत शिरण्याच्या तयारीनें सुभेदार किल्ल्याजवळ उभा होता. आम्हीं वखारींत परत येऊन पोंचलों इतक्यांत शिवाजी शहरच्या वेशी बाहेर आलाच. 'हाजी सैद बेग, वीरजी व्होरा व हाजी कासम या तीन **व्यापाऱ्यांनीं** जातीनें **आपल्यासमोर येऊन खंडणीचा ठराव करावा**. नाहीं तर शहरावर आग व तरवार चालवूं' म्हणून शिवाजीनें सुभेदाराला सांगून पाठविलें. उत्तर न मिळाल्यामुळें ता. ५ च्या रात्रीं [इतर सर्व ता. ६ म्हणतात.] किल्ल्यासमोर ठाकून राहून त्यानें केवळ आंतील माणसांना भेडसावण्याकरितां व आंतून बाहेर कोणी फिरकूं नये म्हणून किल्ल्यावर गोळी चालू केली व शहरांत अग्निप्रलय व लूटहि सुरू केली. मध्यंतरीं अँटनी स्मिथ खालीहून परत येत

असतां त्याला कैद करून शिवाजीपुढें नेण्यांत आलें; आणि २०० रु. दंड घेऊन दुसऱ्या दिवशीं आम्हांला धमकी देण्याकरितां पाठविण्यांत आलें. आम्हीं दाद देत नाहीं असें पाहून त्यानें मित्रत्वाचें बोलणें काढलें. परंतु 'एका इंग्रजाला अडकवून ठेवणें, आमच्या तबेल्यांतून घोडा घेऊन जाणें, आणि जकातघरापुढील इंग्रजांचा माल लुटणें या गोष्टी शत्रुत्वाच्या द्योतक असल्यामुळें यापुढें तुम्हांवर विश्वास न ठेवितां पुनः बोलणें करण्यास येईल त्या जासूदाला आपण ठार करूं' असें प्रेसिडेंटनें उलट कळविलें. आम्हीं त्याला स्वामित्वाचा मान द्यावा असेंहि त्यानें या वेळीं सुचविलें होतें. न दिला तर तो आमची वखार जमीनदोस्त करील हें जाणूनच आम्हीं वखारीच्या संरक्षणामध्यें सर्वजण प्राण वेंचू असें निर्वाणीचें कळविलें. मध्यंतरीं शेजारचें होर्जीसैदचें घर फोडून मराठ्यांनीं ताब्यांत घेतलें. पुढें कदाचित् आमच्यावर गर्दी झाली असती परंतु आम्हीं त्यांना माघार घेण्यास भाग पाडलें. त्यामुळें चिडून शिवाजी स्मिथचें डोकें मारण्यास तयार झाला. स्मिथकडून त्यानें दहशतीचें पत्र लिहविलें. त्यालाहि आम्हीं भीक घातली नाहीं. स्मिथला त्यानें परवलीवर पुनः आमचेकडे व डचांकडे पाठविलें. परंतु त्याची फिकीर न करितां आम्हीं स्मिथला ठेवून घेऊन त्याला उलट 'तुझ्यावर आमचा विश्वास नाहीं' असा जबाब पाठविला....त्यापुढें कोणीच आमचेकडे आलें नाहीं....११ व्या तारखेला त्यानें शहराला आगीचा वेढाच घातला [हें संकट ९ तारखेला आलें असें डचांचें वृत्तांतांत आहे.]. त्यामध्यें डचांची वखार जळण्याचें थोडक्यांत बचावलें! आमच्या दहशतीमुळें सभोंवारचा सुमार पाव मैलाचा प्रदेश शाबूत राहिल्यामुळें त्याबद्दल लोकांना फार कृतज्ञता वाटते. १२ व्या तारखेला आपल्यावर सैन्यें चालून येत असल्याची बातमी हेरांकडून समजल्यामुळें शिवाजी आल्या वाटेनें परत फिरला. [डचांचे म्हणण्याप्रमाणें ही १० तारखेची गोष्ट आहे.] शिवाजीनें फारच निर्दयता प्रगट केली-एका दिसांत २६ हात कापलेले स्मिथनें पाहिले. स्वतःच्या सुटकेकरितां ज्याला म्हणून द्रव्य देतां आलें नाहीं त्याचा हात किंवा डोकें कापलें जाई. प्रथम लुटावें, आणखी कांहीं घरदार वाचविण्याकरितां म्हणून मागावें आणि पुनः शेवटीं घरादाराची राखरांगोळी करावीच असा निर्दयतेचा क्रम होता. आमचे शौर्याबद्दल आमची सर्वत्र वाहवा होत असून बादशहानें आम्हांला कांहीं बक्षीस द्यावें असेंच सर्व बोलतात. कुमकेला आलेल्या सेनापतीनें घोडा, पोषाख व तरवार प्रेसिडेंटला देऊं केली; परंतु 'आपण व्यापारी, आपल्याला व्यापारी सवलती पाहिजेत' असें म्हणून प्रेसिडेंटनें जकातीची माफी मिळावी म्हणून केलेली सूचना व तसा अर्ज सर्वांनीं शिफारस करून बादशहाकडे रवाना केला आहे. एकंदरींत आमचें नुकसान १००० पौंडापेक्षां अधिक झालें नाहीं. **शिवाजीच्या पुनरागमनाची हूल उठली** म्हणजे पहिल्या लुटीमुळें भ्यालेले लोक अधिकच भेदरून पळूं लागतात. अहमदाबादेहून मोहबतखान आला आहे. त्याला सुरतेबद्दल फार वाइट वाटलें. आमचेबद्दल शिफारस तो करील असें वाटतें. [याहि सारांशांत फक्त मागें न आलेला मजकूर दिला आहे.]

इं. फॅ. भा. ११ पृ. २०८ इ. | (९७६) सुरत-कंपनी | श. १५८५ माघ शु. १० इ. १६६४ जाने. २८

शिवाजीच्या कैद्यांपैकीं हयात राहिलेले रँडॉल्फ टेलर, रिचर्ड टेलर, गिफर्ड आणि फॅरँड यांची सुटका झाली आहे. **राजापूर आणि देशांतील इतर पेठा बंडखोराच्या (शिवाजी) ताब्यांत** जाऊन सर्वत्र अंदाधुंदी पसरली असल्यामुळें तूर्त तिकडील व्यापार सोडून दिला आहे.

इंडिअन अँटिक्वेरी भा. ५० (१९२१) पृ. ३१२-३२१ | (९७७) इस्कालिअटचा वृत्तांत. | श. १५८५ माघ शु. १० इ. १६६४ जाने. २८

इस्कालिअट— इस्कालिअटचा भाऊ.

५ जानेवारीला, मंगळवारीं सकाळीं १० वाजतां शिवाजी आल्याची शहरांत हूल उठली. [शिवाजी हा राजा किंवा मुख्य सुभेदार होता. असे लोक राजा हें नांव न घेतांच तरवारीच्या जोरावर आपआपल्या प्रांतांत शिरजोर होतात.] सर्व बाजूंनीं लोक पळूं लागले. श्रीमंत लोकांनीं सुभेदाराला लांच देऊन किल्ल्यांत आश्रय मिळविला. लोक मर्द असते तर शहराचें रक्षण त्यांना सहज करतां आलें असतें.

त्याच दिवशीं शिवाजी दहा कोसांवर (= १० इंग्लिश मैल) आल्याची बातमी येतांच भ्याड सुभेदारानें खंडणीचा कांहीं करार करण्याकरितां आपला गुमास्ता पाठविला. त्याला कैद करून शिवाजी तसाच पुढें आला हें पाहून सुभेदारानें किल्ल्यांत प्रवेश मिळवून शहर सोडून दिलें.

...अलीकडे मोंगली सरदार कुतुबखानानें (?) शिवाजीचा मजबूत किल्ला घेतला आहे; त्याला तो सोडणें भाग पडावें म्हणून शिवाजी अशा तऱ्हेनें गुजराथवर आला असावा.

शिवाजी गावांबाहेरील पाव मैलांवरच्या एका बागेजवळ बुधवार ता. ६ रोजीं सकाळीं ११ वाजतां येऊन पोंचतांच व सैन्याची तंबू ठोकण्याची गडबड सुरू झाली होती. इतक्यांत शहरचे शेवटशेवटचे रस्त्यांतून आग लावून देण्याकरितां शिवाजीनें कांहीं घोडेस्वार पाठविले. लवकरच शहरांत धुराचे दोन स्तंभ दिसूं लागले. रात्रंदिवस आग लावण्याचें काम चालू राहून गुरुवार शुक्रवार शनिवार या प्रत्येक दिवशीं नवीन ठिकाणीं आगी लागून क्रमानें आमच्या बाजूला आग सरकूं लागली. सर्व रस्ते ओस पडले. आम्ही व डच लोक आपल्या वखारींत व कांहीं तुर्की व आर्मीनिअन व्यापारी आमचे शेजारचे सराईत असे नेट धरून राहिलों होतों. आम्हीं व डच यांमध्यें सुमारें १ इं. मैलाचें अंतर असल्यामुळें परस्पर साहाय्याची शक्यता नव्हती. माणसें व तोफा मागवून व शिशाच्या गोळ्या वगैरे तयार करवून आम्हीं आपला बंदोबस्त केला. व सभोंवारच्या बंदोबस्तासाठीं एका बाजूचें हिंदूंचें देऊळ व दुसऱ्या बाजूची मुसलमानांची मशीद ताब्यांत घेऊन त्यांत असलेल्या लोकांनीं दुसऱ्या कोठें जागा पहावी म्हणून त्यांना काढून लाविलें.

अँटनी स्मिथला शिवाजीच्या लोकांनीं पकडून नेलें होतें त्याचें पत्र आलें त्यांत त्यानें शिवाजीचें बोलणें लिहिलेलें होतें. शिवाजी त्याला म्हणाला 'आपला इंग्रज किंवा इतर व्यापाऱ्यांचें व्यक्तिशः नुकसान करण्याचा इरादा नसून फक्त औरंगजेबानें आपल्या मुलखावर स्वाऱ्या करून आपले संबंधीं लोकांना मारलें. याकरितां **औरंगजेबाचा सूड उगविण्याचा आहे**. इंग्रज व डचांनीं कांहीं द्रव्य दिलें तर आपण त्यांच्या वखारींना तसदी देणार नाहीं. नाहींतर शक्य तेवढा त्रास देईन.' पुढें स्मिथनें परत जाण्याची परवानगी मागितली ती त्याला न देतां इतर व्यापारी वगैरे छळले जात होते तिकडे त्याला नेऊन त्यालाहि बांधून ठेवण्यांत आलें.

वरील निरोपाचें पत्र घेऊन येणाऱ्या जासुदाबरोबर 'शिवाजीनें आपल्यास त्रास दिला नाहीं तर आपणहि फक्त संरक्षण करून राहूं' असें प्रेसिडेंटनें सांगून पाठविलें. गुरुवार दोनप्रहरीं २ वाजेपर्यंत कांहीं न होऊन त्या वेळीं मात्र शेजारचे घराला आग लावून आमची वखार धोक्यांत आणण्यासाठीं मराठे जमा झालेले दिसले. त्यांच्यावर आम्हीं दोन टोळ्या पाठवून त्यांना पळवून लाविलें. बुधवार गुरुवारीं वरील प्रकार घडे-पर्यंत हाजीसैद बेगचें घर फोडून त्यांनीं लुटलें. पुढें ते घाईनें घाबरून पळाले. शुक्रवारीं सकाळीं हाजीसैद बेगच्या परवानगीनें त्याच्या राहिलेल्या वखारी आम्हीं ताब्यांत घेऊन नाकेबंदी केली. शुक्रवारीं संध्याकाळीं स्मिथबरोबर 'इंग्रजांनीं आपल्याला ३ लाख रुपये द्यावे किंवा हाजीबेगची वखार तरी लुटूं द्यावी नाहींतर आपण प्रत्येक माणूस ठार करून वखार खणून काढूं त्याला तयार व्हावें' असा निरोप शिवाजीनें पाठविला. प्रेसिडेंटनेंहि स्मिथला ठेवून घेऊन शिवाजीच्या धमकीला न मोजतां प्रत्युत्तर दिलें.

स्मिथनें शिवाजीबद्दल पुष्कळ माहिती दिली. 'शिवाजीचे लोक सांगतात त्यावरून ते १० हजार आहेत. दोन राजे येऊन मिळाल्यामुळें सैन्य पुष्कळच मोठें झालें असावें यांत संशय नाहीं. त्यांचे घोडे चांगलेच होते (हें आम्हींहि प्रत्यक्ष पाहिलें होतें.) द्रव्यांच्या राशी पडल्या होत्या त्यावरून २०।२५ लाखांची तरी लूट शिवाजीला मिळाली असावी. शुक्रवारीं सकाळीं प्रत्येकजण दोन दोन पिशव्या घेतलेले असे ३००० हमाल आले होते. त्या पिशव्यांपैकीं कांहीं पिशव्या तरी केवळ मोहरांनीं भरलेल्या होत्या. २८ शेर मोठें मोतीं होते. हिरे, माणकें पुष्कळच होतीं (४० शेर = ३७ पौंड वजनी). वीरजी व्होरा ८० लाखांचा मालक म्हणून नांवाजला होता त्याच्याच घरांत एवढें त्यांना मिळालें. पैशाकरितां फटके, धमक्या, शिरच्छेद, हस्तछेद असे अनेक निर्दयपणाचे प्रकार तो करतो. आपण होऊन प्रामाणिकपणें सांगावयास जाणाऱ्या एका व्यापाऱ्याजवळ पैसा नव्हता म्हणून त्याचा हात मोडून शिवाय त्याचें कापड जाळून त्यानें त्याला हांकवून दिलें.

गुरुवारीं सकाळीं सुभेदाराकडून तडजोडीचें बोलणें करण्यास आलेल्या तरुण माण-

साला शिवाजी बोलला कीं 'ह्या अटी मान्य करायला आम्हीं बायका आहोंत असें सुभेदाराला वाटतें कीं काय ?' त्यावर 'आम्हींपण बायका नाहीं; हें घे' असें उलट बोलून तो तरुण शिवाजीच्या अंगावर खंजीर घेऊन धांवला. त्याच्या खंजीराचा हात वरच्यावर दुसऱ्यानें छाटला असतांहि तो त्या भरांत शिवाजीच्या अंगावर आदळून दोघेहि कोलमडून पडले व शिवाजीच्या अंगावर दिसणाऱ्या त्या खुनी माणसाच्या रक्तामुळें शिवाजी मेला अशी एकच हाकाटी होऊन सर्व कैद्यांचीं डोकीं मारावीं अशी हूल उठून कांहीं थोडे कैदी प्राणाला मुकलेच. पण तितक्यांत शिवाजीनें आपल्यास सोडवून घेतलें व दुसऱ्यानें त्या खुन्याचें डोकेंहि फोडलें. तेव्हां शिवाजीनें कत्तल थांबविण्याचा हुकूम दिला व कैद्यांना समोर आणून उभे केले आणि मर्जीप्रमाणें हात, पाय, डोकें तोडण्यास हुकूम देण्याचा सपाटा चालविला. जेव्हां स्मिथची पाळी आली व त्याचा उजवा हात कापण्याची तयारीहि झाली तेव्हां तो हिंदींत मोठ्यानें ओरडला 'त्यापेक्षां माझें डोकेंच उडवा !' शिवाजीनें ते मान्य करून त्याची टोपीहि डोक्यावरून काढून ठेविली गेली. पण शिवाजीला काय वाटलें कोणास ठाऊक त्यानें एकाएकीं कत्तल थांबविली व स्मिथ वांचला. तोंपर्यंत ४ डोकीं व २४ हात कापले गेले होते. त्यापुढें वर लिहिल्याप्रमाणें स्मिथ वखारींत पाठवण्यांत आला.

नंतर इथिओपिअन वकीलाला शिवाजीनें धमकीचा निरोप देऊन इंग्रजाकडे पाठविलें. 'एक प्रहर आधींच यावें, आम्ही तयारच आहोंत' असें प्रत्युत्तर दिल्यानंतर शिवाजीकडून कोणींच आलें नाहीं. गुरुवार शुक्रवार रात्रीं आगीनें भयंकर हलकल्लोळ उडविला. शुक्रवारींच वीरजी व्होराचें घर लुटून, जाळून, पार खणून टाकलें. आग डचांच्या वखारीकडे वाढत चालली. आगीच्या उजेडानें रात्रीं दिवसासारखें व धुरानें दिवसाला रात्रींसारखें दिसे. रविवारीं सकाळीं १० वाजतां शिवाजी निघून रात्रीं ६ कोसांवर राहून पुढच्या दुपारीं भडोच (नर्मदा) नदी ओलांडून गेला.

शिवाजीनें खजीना गलबतांतून रवाना केला अशी बातमी असल्यामुळें प्रेसिडेंटनें त्याचा पाठलाग करण्यास सांगितलें आहे.

हात तोडण्याची तऱ्हा अशी होती—मनुष्याचे हात पाय बांधून त्याला उपडें निजवून एका चाकूनें मनगटासभोंवतीं हाड दिसेपर्यंत खांच करून खूण होतांच झटक्यानें पंजा मोडून मग त्याला जोरानें पळायला लावीत; व श्रमानें व रक्तप्रवाहानें ग्लानी येऊन तो पडला म्हणजे त्याला मुक्त करण्यांत येई.

फॅ. रे. सुरत भा. ८६ पृ. ५० इ.	(९७८) सुरत—कारवार.	श. १५८५ माघ व. ९ इ. १६६४ फेब्रु. १०

सुरतेच्या लुटीची थोडक्यांत हकीकत (यांत शिवाजीचें सैन्य ६।७ हजार होतें

असें लिहिलें आहे) देऊन पुढें ' आमच्याप्रमाणेंच त्यानें (शिवाजीनें) तुम्हांला अचानक दगा देऊं नये म्हणून सर्वत्र हेर ठेवून जागरूक रहा. गेल्याच वर्षी **शिवाजी स्वतः** किंवा त्याचा एखादा सरदार तुमच्या बाजूला यावयाचा; परंतु (मोंगल) बादशहाचें सैन्य त्याचा पाठलाग करीत होतें म्हणून चुकलें. तरी कांहीं अनिष्ट होऊं नये याकरितां शिल्लक असलेला माल सुरक्षित ठेवावा.

इं. फॅ. ११ पृ. ३०३-०५ इ.	(९७९) सुरत—फोर्टसेंट जॉर्ज.	श. १५८५ माघ व. ३० इ. १६६४ फेब्रु. १६

६ तारखेला पहिली भय-सूचना आली व ७ तारखेला शिवाजी सुरतेंत कत्तल व अग्निप्रलय करूं लागला. वीरजी व्होरा व हाजी झाहिद बेग वगैरेंची लूट त्यानें केली व घरांना आगी लाविल्या. शिवाजीनें आम्हांला बरेच निरोप पाठविले. प्रथम, 'इतक्या लांब येतांना आपल्या सैन्याला पुष्कळ खर्च लागला. त्याकरितां मोठी देणगी द्या' असें त्यानें कळविल्यावर आणखी माणसें आणवून आम्हीं वखारीचा पक्का बंदोबस्त केला......१३ तारखेला तो परत गेला....अँटनी स्मिथकडून शिवाजीनें प्रथम ३ लक्ष रु. खंडणी मागितली. परंतु स्मिथच्या ओळखीच्या एका आर्मीनिअननें शिवाजीला फसवून स्मिथ एक सामान्य मनुष्य असल्याचें सांगितल्यामुळें शिवाजीनें त्याला ३०० रुपये घेऊन सोडून दिलें. [यांतील इतर तपशील जाने. २८ च्या पत्राप्रमाणें आहे. पहा लें. ९७५]

इं. फॅ. ११ पृ. ३४३ इ.	(९८०) कारवार—सुरत.	श. १५८५ माघ वा ३० इ. १६६४ फेब्रु. १६

थोड्या दिवसांपूर्वी **शिवाजीनें 'मोंगलांशीं आपली लढाई चालू असून** त्याकरितां द्रव्य पाहिजे आहे तरी तुम्हीं पाठवावें' असें गोव्याच्या व्हाइसरॉयाला वकिलाच्या मार्फत सांगून पाठविलें; त्यामुळें व्हाइसरॉयाला राग येऊन त्यानें त्या वकिलाला ३१४ दिवस कैदेंत ठेवून नंतर लोकांनीं विनंति केल्यामुळें सोडून दिलें. या अपमानाबद्दल शिवाजी गोव्याला वेढा घालील असें बोलतात. **वेढ्याच्या भीतीनें गोवेकरहि तयारी करीत आहेत** असें समजतें. **आमच्या भागाकडेहि तो येईल** अशी वदंता असल्यामुळें मालाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीनें आम्हीं काय करावें तें सुचवावें. राणीला बसरा मार्गानें बगदाद जवळील एका धर्मक्षेत्राला जाण्याचा पास द्यावा म्हणून येथील सुभेदार गेले ५।६ दिवस पाठीस लागला आहे. 'सुलतानाचें फर्मान दाखविल्यावर पास देऊं' असें सांगून तूर्त चालढकल केली आहे.

(होनावर) होनोर इत्यादि किनाऱ्यावरील पूर्वी त्यांच्या ताब्यांत असणारीं ठिकाणें पोर्तुगीजांच्या हवालीं करण्याचें बोलणें करण्याकरितां कानड्याच्या राजानें **मलाप्पा मालो** या नांवाचा वकील गोव्याचे व्हाइसरॉयाकडे पाठविला. अजून तो आपल्या

राजाकडे परत गेला नाहीं. यामुळें त्यानें काय ठरविलें हें सांगतां येत नाहीं. [गोव्याच्या १ एप्रिलच्या पत्रांत होनावर, बसरूर व मंगळूर या तीन किल्ल्यांचा उल्लेख केलेला आहे. पहा इं. फॅ. ११ पृ. ३४२.]

त्रै. व. २ पृ. १६० }
जु. ६ हि. १०७४ साबान ७ } (९८१) फर्मान फा. मु. व सी. { श. १५८५ फाल्गुन शु. ९ { इ. १६६४ फेब्रु. २५

मुअज्जम बिन महमद आलमगीर ——?

उंबरे येथील मशीदीची चाकरी करण्याबद्दल अबदुला काजी यास दरमहा रु. ६ पगार नेमला आहे.

रिसायत भा. १ पृ. २९४ }
मॉ. रि. } (९८२) { श. १५८५ { इ. १६६३

शिवाजी (हस्ते नीलप्रभु)—मोगल अधिकारी.

आज तीन वर्षें बादशहाचे मोठमोठे सुल्लागार व योद्धे आमचा प्रदेश काबीज करण्यासाठीं चालून येत आहेत, हें तुम्हा सर्वांस माहीत आहेच. बादशहा हुकूम फर्मावितात 'शिवाजीचे किल्ले व मुलूख काबीज करा.' तुम्ही जबाब पाठवितां 'आम्ही लौकरच काबीज करितों.' **आमच्या ह्या कठिण प्रदेशांत नुसता कल्पनेचा घोडा सुद्धां नाचविणें कठिण** आहे. मग तो प्रदेश काबीज करण्याची गोष्ट कशाला! भलत्याच खोट्या बातम्या बादशहाकडे लिहून पाठविण्यास तुम्हांला लाज कशी वाटत नाहीं! कल्याणी व बेदरचे किल्ले उघड्या मैदानांत होते ते तुम्ही काबीज केले. आमचा प्रदेश अवघड व डोंगराळ आहे. नदीनाले उतरून जाण्यास वाट नाहीं. अत्यंत मजबूत असे साठ किल्ले आज माझे तयार आहेत. पैकीं कांहीं समुद्र किनाऱ्यालगत आहेत. बिचारा **अफजलखान** जावलीवर फौज घेऊन आला आणि नाहक मृत्युमुखीं पडला, हा सर्व प्रकार आपल्या बादशहास कां कळवीत नाहीं! अमीरूलउमराव **शाएस्तेखान** आमच्या या गगनचुंबित डोंगरांत व पातालास पोंचणाऱ्या खोऱ्यांत तीन वर्षें सारखा खपत होता. 'शिवाजीचा पाडाव करून लौकरच त्याला काबीज करतों' असें बादशहाकडे लिहून लिहून थकला. ह्या खोडसाळ वर्तनाचा परिणाम त्याला भोंवला. तो परिणाम सूर्यासारखा स्वच्छ सर्वांच्या डोळ्यासमोर आहे. **आपल्या भूमीचें संरक्षण करणें माझें कर्तव्य आहे** आणि तुम्ही बादशहाकडे कितीहि खोट्या बातम्या लिहून पाठविल्या तरी मी आपलें कर्तव्य बजावण्यास कधीं चुकणार नाहीं.

फॅ. रे. सुरत भा. ८६ }
पृ. ६४ इ. } (९८३) सुरत—बॅंटम { श. १५८६ चैत्र शु. १ { इ. १६६४ मार्च १९

......(आमचे गलबतावरून इतर मदत झाली त्याबरोबरच) कांहीं पितळी तोफा आणून दरवाजावर व इतर ठिकाणीं माऱ्याच्या सोईनें बसवून दिल्या होत्या......

शहराचा बराच भाग त्यानें केला होता. **केवळ पैसा उकळण्याखेरीज बाद्-शहावर सूड उगविण्याचाहि त्याचा उद्देश होता.**

खं. २० ले. २१७ } (९८४=९५७ अ) { श. १५८५ आश्विन व. २
सु. १०६४ रवल १५ श. } पोट पत्रें { इ. १६६३ आक्टो. ८

अग्रवादी कोनेरी विश्वनाथ ताटे व बहिरो रत्नाकर थिटे क्षेत्र पंढरपूर, यानीं अमदानगर येथील सभ्य स्मार्त महाजन महाप्रश्नीक या विद्यमाने केली तकरीर ऐसी जे:- आपल्या पूर्वजाकडे पंढरपूरचें ज्योतीष व कुलकर्ण मिरासी चालत असतां ४० वर्षांपूर्वी रखमाजी अनंत याचा मोकासा चालू असतां आराध्यानीं ताटे व थिटे यांबरोबर आपण तिसरा, असा तंटा मांडला. त्या वेळीं उदरव्यवसायास्तव आमचीं माणसें गांव सोडून गेलीं होतीं; यामुळें आराध्याच्या वकिलातीनें सरकारांत आमची दाद लागूं दिली नाहीं. पुढें दुष्काळांत माणसास माणूस खाऊं लागले; अशा स्थितींत १०।१२ वर्षे ज्योतीष वृत्ति अमानत झाली. बरवा काळ जाहल्या उपरी आपले बापभाऊ गांवावर आले व पंढरीपंत मोकासेदार असतां त्यांनीं आपली वृत्ति खादली. पुढें आराध्ये यांनीं हक पुकारा करून वृत्ति अमानत करविली. नंतर त्याचा मुकासा बरतर्फ होऊन जसवंतराऊ यास मुकासा जाला. त्यानें आंबेजोगाई हें स्थळ निवाड्यास नेमलें. पण आराध्ये आले नाहींत. त्यांनीं निवाडा करावा तंव **अफजलखानाची तसवीस क्षेत्रास लागली**. मोकासाई करनाटकास पाठविला. त्याकरतां निवाडा झाला नाहीं. हल्लीं मोकासाइ यांनीं त्रिपुरदासास पाठविलें. त्यानीं निवाड्यासाठीं आम्हास अमदानगरास पाठविलें आहे.

पश्चमवादी- गोविंद नरसिंह आराध्ये याची तकरीर पूर्वीं राहीच्या बोरगावास पिलंभट ताटे यानें दिव्य केले तेव्हां तो खोटा ठरला; आणि नागण आराध्या जयपत्र घेऊन गावास आला. नंतर सांगोल्याच्या देशमुखाजवळ ताटे थिटे श. १४६४ पराभव मध्यें निर्णय करून घेत होते तो आराध्यानें कबूल केलें. तेव्हां, ताटे थिटे यांनीं आराध्यास घाय करून लुटलें. पुढें सेख जैइदी नेबगैबत वकील करून ताट्यांनीं नागण आराध्यास धरून नेऊन खानाचा कागदहि करून घेतला. त्यावरी नागण आराध्ये मेला. पुढें ५ वर्षांनीं ताटे व थिटे यांनीं कासेगांवीं तिमणा आराध्ये यास धरून नेऊन जुलमें नागविलें. ऐशी करकर होत असतां रखमाजी पंताचे कारकीर्दीस [श. १५२८ पिंगलमध्यें] तिमणा आराध्ये, कृष्णभट ताटे व थिटे यांनीं आपसांत समजोन मानपान वांटून घेतले व ते पंढरीपंताचे कारकीर्दीपर्यंत चालले. पंढरीपंताचे वेळेस माझी मिरासी ताटे खाऊं लागले व मन्मथ संवत्सरीं [श. १५७७] पंढरीपंतांनीं मिरासी अमानत केली. दुर्मुख [श.१५७८] फाल्गुनमासीं महिपतरायास मोकासा जाला. ५ महिन्यांनीं बहिरोबा थिटा यानें कृष्णभट

आराध्याच्या घरीं दरोडा घातला. त्यावरी जौगाईचे आंबे मायथळ करून भातागळीस निर्णयाकरतां गेलों. पण ताटे व थिटे निघून गेले. म्हणून तेथल्या लोकांनीं पत्र देऊन आराध्यास पंढरपुरास पाठविलें. पण थिटे हे विठल आराध्यास मारून रात्रीं बाळंतबाईस घेऊन पळून गेले. (अपूर्ण)

त्रै. व. २ पृ. १६० } (९८५) { श. १५८६ चैत्र शु. ३
जु. ७ रम १ } फर्मान फा. मु. व सी. { इ. १६६४ मार्च २०

१—— मुत्सद्दी मौ. जुन्नेरः— नवलाख उंबरे येथील मशिदीचा काजी अबदुला यास दरमहा ६ रु. देत जाणें.

खं. २० ले. १५ } (९८६) { श. १५८६ चैत्र शु. ७
श. } कर्जखत { इ. १६६४ मार्च २४

गोपाल बाबाजी—— एसाजीपंत आत्रेः– २२० रु. घेतले आहे. दर माहे दर सदे रु. १० पहिल्या महिन्यास, दर म. दर स. रु. ५ पुढला महिना. पैके नरसिंहपंतापासून घेऊन दिधले.

इं. फॅ. ११ } (९८७) { श. १५८६ चैत्र व. ४
पृ. ३११ इ. } सुरत–कंपनी { इ. १६६४ एप्रील ४

सुरतेच्या लुटीबद्दल औरंगजेबानें फार खंत बाळगून शिवाजीवर सूड घेण्याचा निश्चय केला आहे. आमचे अर्जाचा व आमच्या बहादुरकीबद्दलच्या शिफारसींचा मोठ्या उदारपणानें विचार करून एक वर्षभर इंग्रजांना व इतर सर्वच व्यापाऱ्यांना सर्व जकाती माफ करण्याचे हुकूम त्यानें लिहिले आहेत. पुढेंहि ½ जकात दरसाल माफ व्हावी असें कायमचें फर्मान मिळेल, अशी बरेचजण आशा देत आहेत. [बंगालला लिहिलेल्या ३० एप्रीलच्या पत्रांत 'आपल्या शहरांतील व्यापाऱ्यांना उत्तेजन मिळावें व झाल्या नुकसानीची कांहींशी भरपाई व्हावी म्हणून एक वर्षाच्या जकाती औरंगजेबानें माफ केल्या आहेत' असें लिहिलें आहे.]

इं. फॅ. ११ } (९८८) { श. १५८६ वैशाख शु. ३
पृ. ३४३ इ. } कारवार–सुरत { इ. १६६४ एप्रील १८

विजापूरचा आदिलशहा व बेदनूरचा राजा यांचा तह होऊन बेदनूर (राजधानीचें शहर) राजाच्या हवालीं करण्यांत आलें. परंतु तो राजा मेल्यानंतर त्याच्या दरबारांतील ब्राम्हणांनीं त्याच्या मुलाचा वध करून एक नवाच वारस उभा केल्यामुळें संतापून जाऊन आदिलशहानें बेदनूरच्या राज्यावर उत्तरेकडून बहलोलखान व खुद्द बेदनूरवर ६००० घोडेस्वारांनिशीं सय्यद इलियास सर्जाखान यांस पाठविलें आहे.

रुस्तुमजमा या मार्गानें भटकलवर जाणार असल्याची बातमी आल्यामुळें त्याच्या स्वागताची तयारी या शहरांत सुरू आहे. होनावराशिवाय सर्व (ठिकाणें) पोर्तुगीजांचे हवाली करण्याच्या अटीवर पोर्तुगीज लोक व कानड्याचा राजा यांच्यांत तह झाला आहे. परंतु मलाप्पा मालो अद्याप गोव्याहून परत आला नसल्यानें नक्की कांहीं सांगतां येत नाहीं.

खं. १५ ले. १८७ }
सु. १०६४ सवाल १४ } (९८९) { श. १५८६ वैशाख व. १
{ इ. १६६४ मे १

नरसो रामाजी देसकु. किले पनाळा— मोक. मौ. अंब:डे का बालाघाट.

आमच्या मोक. मज.च्या हकापैकीं दोन होन कमलनयन गोसावी यांस भंडारा व नंदादीप यासाठीं दिले आहेत.

डाग रजिस्टर १६६४ पृ. १६३ व }
पृ. १७४ मे १२ न्यू. } (९९०) { श. १५८६ वैशाख व. २
{ इ. १६६४ मे २

कोलाटरी राज्य हें, कॅननोरच्या किल्ल्याच्या उत्तरेस व दक्षिणेस सुमारें ७ मैल पसरलेली अशी जमीनीचे अंगानें रुंदावलेली एक पट्टी असून, झामोरीनच्या राज्याला कॉंजाली गावाशीं जोडतें. **शिवाप्पा नायकाच्या** राज्याला त्याची हद्द निरिचिरेन येथें लागते .[पृ. १७४]

शिवाजीच्या लुटीची बातमी सुरतेहून कॉरोमांडेल किनाऱ्याला पोंचली आहे. जलमार्गानें कारोमांडेलचा सुरतेशीं विशेष संबंध नाहीं. परंतु जमिनीवरून गोवळकोंड्याच्या मार्फतीनें चांगलें दळणवळण चालतें. [पृ. १६३]

डाग रजिस्टर १६६४ }
पृ. १९५ मे १५ न्यू. } (९९१) { श. १५८६ वैशाख व. ५
{ इ. १६६४ मे ५

शिवाजीवर चालून गेलेल्या **शाएस्तेखानाचा** पराजय होऊन खुद्द त्याच्याच **प्राणावर बेतलें होतें**. पण थोडक्यांत बचावलें. **आदिलशहा मोंगलांचा मांडलिक झाला आहे**. शिवाजीचा यशःक्रम पूर्ववत् चालू असून त्यानें अचानक सुरतेवर हल्ला करून जाळपोळ व लुटालूट केली. अजूनपर्यंत थोडथोडी हकीकत कळली होती; आतां सविस्तर लिहितों:— [पुढचा वृत्तांत सारांशानें दिला आहे; पहा. ले. ९६८ व ९७०]

इं. फॅ. ११ }
पृ. ३४४-४५ इ. } (९९२) कारवार-सुरत. { श. १५८६ वैशाख व. १४
{ इ. १६६४ मे १४

४००० घोडदळ व पायदळ एवढें सैन्य आदिलशहानें शिवाजीवर

पाठविलें आहे. तें गोव्यापासून दोन दिवसांच्या प्रवासावर असलेल्या कडोली गांवापर्यंत आलें असून 'आपण अदिलशहाच्या हुकमानें चौलपर्यंतचा शिवाजीचा सर्व मुलूख घेण्याकरितां आलों आहोंत' असें ते लोक म्हणतात.

इति. ३५ }
पृ. २९४ }

(९९३)

श्येनवीजाति-धर्मनिर्णय. उल्लेख

अयं **शिवाजी राजा** राज्यं प्रशासत् स्वजनपदान् दिदृक्षया कदाचित् अटन्, सह्य-प्रदेशवासिनः श्येनवीति प्रसिद्धान् नानाविधानि उपायनानि आदाय राजदिदृक्षया समागतान् एतान् कौंकणान् दृष्ट्वा राजनिकटवासिनः सभ्यान् पंडितान् एतद्देशीयभूधर्माधिकारिणश्च 'एषां को धर्मः कीदृगाचरः' इति समपृच्छत्। तत्र सभायां स्थिताः पंडिताः। **गागा**भट्टस्त्वनूचानो निगमागमवित्तमः॥ सभायां शुशुभे राज्ञः सुधर्मायां यथा गुरुः ॥१॥ **दीक्षितः** शितिकंठश्च **रघुनाथो** बुधाधिपः। कवींद्रः **परमानंदो महादेवश्च** पंडितः। **प्रभाकर उपाध्याय**स्तथा **श्रीरंग**शास्त्रिणः। **नृसिंह**शास्त्रिणश्चाथ भट्ट**विश्वंभरो**ऽपि च। **अयाचितमहादेवः** पंडिताग्र्यो विनायकः। **सोमनाथो जगन्नाथो** भट्ट**विष्णु**स्तथैव च॥ भूगोपालाभिधोऽ**नंतो**पाध्यायः पंडिताग्रणीः। **शेषो**पाख्य**महा**देवः काशीस्थाः पंडिता अमी॥ कृष्णागोदावरीनिष्ठाश्च बहवो बुधाः॥ स्थिता नृपसभे तत्र तथैतद्देशवासिनः। धर्माधिकारिणोत्यर्थं धर्मशास्त्रार्थकोविदः।

राजापुरप्रांते तु धर्माधिकारिणो गुर्जरोपनायकः शिष्टा विद्यंते। एते धर्माधिकारिणः, अष्टाधिकारिणश्च, गळवल्लीकरोऽनंतः उपाध्यायश्च, सर्वेऽप्येते अन्ये च बहवः पंडिताः समागतः समाजं कृत्वा विविधान् ग्रंथान् आलोक्य परंपरागतश्च एषां धर्मावलोक्य **गागा**भट्टप्रभृतयः निर्णयं कृत्वा राज्ञे न्यवेदयिषुः। तत्रत्यं सारमादाय किंचिदत्रापि लिख्यते।

इं. फॅ. ११ }
पृ. ३१२ इ. }

(९९४)

सुरत-मद्रास

{ श. १५८६ ज्येष्ठ शु. ४
{ इ. १६६४ मे १९

बादशहाचा दिवाण **जाफरखान** याजकडून खुद्द बादशाही जबानीचें पत्र (हसब अल-हुकम) आलें. त्यावरून सुरतेची हकीकत वाचून बादशहाला अत्यंत समाधान होऊन तो म्हणाला 'माझ्या शत्रूशीं दोन हात करितील असे (इंग्रजी व्यापाऱ्यांसारखे) लोक माझ्या देशांत आहेत ही भूषणाची गोष्ट आहे.' ह्या वर्षाची संपूर्ण जकातीची सवलत संपल्यावर तो आम्हांला (इंग्रजांना) अर्ध्या जकातीची सूट कायमची देणार आहे. [निमे जकातीच्या सुटीचा उच्चार फिरून २६ नोवें. १६६४ च्या व २ जाने. १६६५ च्या पत्रांत असला तरी हा गैरसमज होता. केवळ (आयात) मालावर शेंकडा २½ चे ऐवजीं २ प्रमाणें जकात देण्याबद्दलचा १४ मार्च १६६४ चा बादशाही हुकूम ह्या बाबतींत निःसं-

दिग्ध आहे. हीहि सवलत अल्पकाल म्हणजे इ. स. १६७९ पर्यंतच कशीबशी टिकली. पहा. इं. फॅ. ११ पृ. ३१४-३१५]

सं. २० ले. ११३ } (९९५) { श. १५८६ आषाढ शु. २
श. } कबूल-कतबा { इ. १६६४ जून १५

नारायणभट चित्राव वाई नरशीभट व शंकर

तुमचे आमचे दोन वाडे ब्रह्मसभेने ती ठायो वाटून दिल्हे. त्यानंतर आपण अदलाबदल केली आहे. तुमचा जागा घेऊन सुखें असणें.

इं. फॅ. ११ } (९९६) { श. १५८६ आषाढ शु. १३
पृ. ३४५ इ. } { इ. १६६४ जून २६

सुरत-कारवार (१४ मेच्या पत्रास उत्तर)

विलक्षण धाडसी असा दरोडेखोर म्हणून शिवाजीची इतकी ख्याती झाली आहे कीं, लोकांनीं **'त्याचें शरीर हवामय असून त्याला पंखहि आहेत'** असें उठविलें आहे. एऱ्हवीं तो एकाच वेळीं अनेक ठिकाणीं प्रगट होतो ह्या बातम्या शक्य तरी कशा होतात ? आज तो एका ठिकाणीं आहे असें खात्रीलायक समजावें, तर एकदोन दिवसांत तो दुसऱ्याच ठिकाणीं आहे असें कळतें. तर लगेच दूर दूर असलेल्या पांचसहा ठिकाणीं एकामागून एक अशा तऱ्हेनें अप्रतिहतपणें लुटालूट व जाळपोळ करतांना तो आढळतो ! यामुळें त्याचें नांव सर्वतोमुखी झालें असून त्याला भीमाचें (हर्क्युलिस) सामर्थ्य आहे असें लोक मानतात. सुमारें ६० एक गलबतें (कांहीं नवीं बांधून व सज्ज करून) घेऊन तो ह्या बंदरावर (सुरतेवर) अचानक हल्ला करून इराण व बसरा इकडून परत येणारीं गलबतें लुटणार आहे अशी हूल उठल्यामुळें आमचे तोंडचें पाणी पळालें आहे ! कित्येक लोकांच्या मतें शिवाजी एवढी तयारी करून खंबायत नदींतून जाऊन सुरतेप्रमाणेंच अहमदाबादची जाळ-पोळ व लूट करणार आहे ! तो गोव्याला वेढा देईल हें आम्हांला मुळींच संभवनीय वाटत नाहीं. एकादा सक्त वेढा चालवीत बसण्याचें त्याच्या मनांतहि नाहीं. कारण, त्यांत त्याला कांहीं लाभ होणार नाहीं. बिनतटबंदीचीं नगरें धावतांपळतांना जाळून लुटावीं; असा अनायासें मिळणारा लाभ त्याला नेहमीं पाहिजे असतो. तुमच्या येथपर्यंतहि तो येणार नाहीं. कारण पावसाळ्यांत घोडा किंवा मनुष्य यांना तिकडील प्रवास सुखाचा होणार नाहीं; आणि दुसरें असें कीं, विजापूरच्या शहानें त्याच्यावर सैन्य पाठविलें तर त्याला रिकामा वेळ फावणार नाहीं. तथापि आपण सुरक्षित आहों या विश्वासावर विसंबू नका. शिवाजीच्या पाळतीवर असा; आणि वेळ येतांच सुरक्षित ठिकाणीं जातां येईल अशा तयारीनें रहा. हाच आमचा सल्ला आहे. हुबळी हें ठिकाण आम्हांला सुरक्षित वाटतें. तरी कंपनीची सर्व माळमत्ता तिकडे नेण्याची तजवीज करा.

डाग रजिस्टर १६६४ पृ. २७७ जुलै ११ न्यू. (९९७) श. १५८६ आषाढ व. ३ इ. १६६४ जुलै १

नागापट्टणकडून असें समजतें कीं, **सुरतेची** लूट झाल्याचें उदाहरण घडल्यापासून **शिवाजी**चें सैन्य असेल त्या त्या ठिकाणीं विश्वासू गुप्त हेर नेहमीं ठेवण्याची व्यवस्था केली जाणार आहे.

सावं. इ. जु. ले. ८ सु. १०६४ मोहर ५ हि. १०७५ (९९८) फर्मान मु. श. १५८६ श्रावण शु. ७ इ. १६६४ जुलै १९

अली अदिलशहा — अमलदार व देसाई पर० कुडाळ

अजीजखान सरनोबत यानी विदित केलें कीं, "**लखम सावंत सरदेसाई** पर. मज. हे फौजेसुद्धां बराबर येऊन मेहनत फार करून **शिवाजीच्या फौजेबरोबर लढाई करून** पर. मज. मध्यें बादशाही दौलत रुजू केली. त्याजवरून मेहेरबान होऊन जास्ती बक्षीस मौ. मालवण पर. मज. निसबत अब्दुल कादीथ सरदेसाई यांस सर्व हकासुद्धां दिला आहे. वंशपरंपरेने चालवणें. फर्मान हजर० बाद० महमदशहा विजापूर.

इं. फॅ. ११ पृ. ३४६३. कारवार-सुरत (१० जूनचे पत्रास उत्तर) (९९९) श. १५८६ श्रावण शु. ११ इ. १६६४ जुलै २३

रुस्तुमजमा विजापुरास असून आतांपर्यंत आदिलशहाची त्याच्यावर बरी मर्जी आहे. कारवारचा सुभेदार **म**हमदखान आणि अंकोला, शिवेश्वर, कडेरा वगैरे ठिकाणचे त्याचे दोस्त सुभेदार हे सर्व कामावरून दूर केले आहेत. पैकीं महमदखानानें आपल्या धन्याला (रुस्तुमजमा) सोडून, आदिलशहाचे पदरीं सैनापत्य पत्करलें. **शिवाजी**वर स्वारी करण्याकरितां कुडाळला येऊन राहिलेल्या ४००० घोडेस्वारांचा सेनापती **अजीज-खान** [मृत्यु १० जून, पहा ले. १०११] याला **शिवाजी**नें विषप्रयोग केल्यामुळें, **रुस्तुमजमा** आतां त्याचे जागीं नेमला गेला आहे. नवीन सुभेदारांची संख्या तीन असून एक रुस्तुमजमाचा मुलगा हा सर्व किल्यांचा सुभेदार आणि इतर दोघे वरील शहरांचे सुभेदार नेमिले गेले आहेत. नोकरीचा तीन वर्षांचा करार करून त्या मुदतींत या शहरांचा व्यापार वाढविण्याचें त्यांनीं रुस्तुमजमाला अभिवचन दिलें आहे. व्यापारी लोकांत परिचय असल्यामुळें त्यांना यश येईल असें वाटतें... **सैद इलियास सर्जाखान** कानडाच्या राजाच्या पाठीस लागला असून **जेरा** आदिकरून त्याचे तीनचार मोठे व मजबूत किल्ले त्यानें जिंकून घेतले असून बेदनूरपासून तीन दिवसांच्या प्रवासाच्या अंतरावरील आणखी तीन किल्ले मलबारी नायरांनीं घेतले आहेत. गोव्याला

असतांना ताप आल्यामुळें **मलिक मुल्ला मेला** [मृत्यु ३ जुलै-डागरजि० १६६४ पृ. ५७२]. आणि कानड्याच्या राजाशीं आज कांहीं बोलणें करावें आणि उद्यां त्याचा सर्वच मुलख गमवावा असें होऊं नये म्हणून पोर्तुगीजांनीं कोणत्याहि प्रकारचें बोलणें निश्चित ठरविलें नाहीं. मलिकमुल्ला मेला नसता तर दुसऱ्या कोणत्याहि कारणानें झालेलें बोलणें मोडूं नये इतका पक्केपणा त्यानें त्याला आणून ठेविला होता.

डच रे. (इं. ऑ.), हिंदु. पत्रें. भा. २७ नं. ७११ इ. आगस्ट ५ न्यू. } (१०००) { श. १५८६ श्रावण शु. १३ इ. १६६४ जुलै २५

हिंदुस्थानांतील गवर्नर जनरल– डच ई. इं. कं. चे डायरेक्टर्स.

बंडखोर (out-law) शिवाजीनें ५ तारखेला सुरत लुटलें व जाळपोळ केली...... औरंगजेबानें सुरतेला तट बांधण्याची आज्ञा केली असून डच व इंग्रज यांसह सर्व व्यापाऱ्यांना एक वर्ष जकाती माफ केल्या आहेत. ही सूट या वर्षाच्या मार्च ६ पासून अमलांत यावयाची आहे. यामुळें या आपत्तीचें योगानें कंपनीला फायदाच होणार आहे !

सावं. इ. जु. ले. ९ सु. १०६४ मोहर १५ हि. १०७५ } (१००१) फर्मान { श. १५८६ श्रावण व. १ इ. १६६४ जुलै २९

आदिलशहा— अमलदार व देसाई पर० कुडाळ

पितांबर शेणवी निसबत **लखम सावंत** सरदे० पर० मज० अर्जी केली कीं "सरदे० हे बरोबर चांगली फौज घेऊन **अजीजखान सरनोबत** सुभे० तळ-कोंकण यांजबरोबर हुजूरच्या चाकरींत असून त्यांनीं मुलुखांत लावणी व आबादानी केली. याजकरितां पर मज०ची नाडगौडगी (१० गावांची) कृपा करून बक्षीस द्यावी. तरी दिली आहे. चालवीत जाणे. फर्मान अलीअदलशा बिन महमदशहा बाद० विजापूर.

डागरजिस्टर १६६४ पृ. ३२१ ऑग. १३ न्यू. } (१००२) { श. १५८६ श्रावण व. ६ इ. १६६४ आगस्ट ३

शिवाजीजवळ गलबतांची संख्या भरपूर असल्यामुळें तो सहज रात्रीं छापा घालून गलबत घेईल म्हणून जमिनीपेक्षां पाण्यावरच त्याचें भय अधिक बाळगिलें पाहिजे. त्यांतून वखारींतून माल हालवितांना तर लुटीचें भय फारच आहे. केवळ शिवाजीच नव्हे; तर गरीब असल्यामुळें **लखम सावंतहि**, असला डल्ला मारण्यास कमी करणार नाहीं. बरें शिवाजी इतका विध्वंसक असूनहि आजपर्यंत मुख्यत्वेंकरून **बडे साहेबिणीला** खूष करण्याची वरवरची तरी त्याची इच्छा असल्यामुळें, शिवाजीनें वेंगुर्ल्याला धक्का लाविला नाहीं. आतांपर्यंत हा लुटारू आणि त्याचें कुडाळ प्रांतावरील अधिकारी

यांनीं आम्हांला मित्रत्वानेंच वागविलें आहे. **सरसुभेदार रावजी सोमनाथ पंडीत** यानें सौत व्हिलिएट नांवाच्या व्यापाऱ्याला अनेक वेळां आग्रहानें आपल्या भेटीस बोलाविल्यामुळें तो नोवें. २२ तारखेला कुडाळला जाऊन त्याला भेटला. राजापुराला सुमुहूर्तावर सौतनें येऊन रहावें असा आग्रह करून त्याबद्दल त्यानें बटेव्हियाच्या मंडळालाहि लिहून कळवावें; असें त्याच्याकडून रावजी पंडितानें कबूल करून घेतलें. शिवाजीकरितां एक **उंच घोडा** मिळवावा ह्याहि त्याच्या मागणीला, कोणत्याहि तऱ्हेनें आडपडदा न ठेवतां, मार्गांतील वाहतुकीच्या वगैरे अनेक प्रकारच्या अडचणी सांगितल्यावर त्याची तब्यत गेली. तरी देखील 'इंग्रजांनीं पुन: राजापुराला येऊन राहण्याबद्दल त्यांच्याकडे रदबदली व मध्यस्थी करावी' असेंहि त्यानें सांगितलें. इंग्रजांच्या मतें रावजी हा बडा बदमाष असल्यामुळें त्यांनीं प्रसंगोचित सबबी सांगून या विनंतीला नकार दिला आहे.—'कुडाळावर वारंवार स्वाऱ्या झाल्यामुळें त्याची बहुत पायमल्ली झाली आहे' इ.—इंग्रज कंपनीकडून कांहीं माल आपण विकत घेतों, पाठवून द्यावा, ह्याहि रावजीच्या विनंतीला इंग्रजांनीं वाटाण्याच्या अक्षता लाविल्या. पूर्वीं लखम सावंताकडून घेऊन इनाम म्हणून दिलेलीं कित्येक खेडीं **शिवाजीनें सावंताला आतां परत दिलीं आहेत** (?). **शा**हिस्तेखानाला परत बोलावून औरंगजेबानें आपला मुलगा **सुलतान शहा** याला **शिवाजीवर** पाठविलें आहे. मक्केला पाठविलेल्या दोन लहान गलबतांचे व्यापारावर फारच फायदा झाल्यामुळें आतां रावजी आणखी ८।९ गलबतें मक्का, काँगो मस्कत, इराण यांकडे पाठविण्यासाठीं तयार करीत आहे. परंतु त्याला परवाने मिळणार नाहींत [पृ. ३२३]. आदिलशहानें कानड्यावर स्वारी करून त्याला बराच जेरीस आणिला. परंतु खंडणी वसूल करणें (दरोडा घालणें) हाच त्याचा मुख्य उद्देश असल्यामुळें नायकानें १५ लाख पॅगोडा (पॅगोडा = ५ गिल्डर्स) खंडणी दिल्यास आपण मुलूख सोडून देतों असा तह करून तो जानेवारींत विजापुरास परत गेला आहे. त्या प्रांतांत **शिवाजीला मोठा मान असून लोक त्याच्यावर प्रेम करितात**. यावर्षीं पिकें चांगलीं आहेत. तथापि वेंगुर्ले आणि कानडा येथें तांदूळ महाग विकतो. कानड्यांतल्या लढाया, मलाप्पा मालूचा कायम मक्ता, शिद्दीच्या व सुरतेकडील मुलखांतला दुष्काळ आणि शिवाजीच्या सैन्यामुळें होणारा दैनिक खप यांमुळें असें होतें. त्यांतच बडे साहेबिणीच्या प्रवासाची तयारी म्हणून तांदूळ जमा करणें चालू आहे त्याचीहि भर पडली आहे. गोवा प्रांतांत दरवर्षीं चौल, मुंबई, बसई या भागांतून त्यांना लागतो तितका तांदूळ लोक भरतात. परंतु मोंगलांनीं तो भाग सर्वत्र उजाड करून टाकल्यामुळें त्यांनाहि येथूनच तांदूळ घेतला पाहिजे. [पृ. ३२४]. वर उल्लेखिलेल्या १० गलबतांच्या आरमारानें शिवाजीवर चालून येणाऱ्या मोंगलांचे सैन्यास थोपवून धरण्याकरितां आणि त्याला सतावून सोडण्याकरितां शेवटीं २३ आक्टोबर रोजीं वसईला शिवाजीचा पराजय करून, पोर्तुगीजांना भयमुक्त केल्यामुळें हे

आरमार लगेच परत फिरलें. शांततेमुळें व्यापाराला पुनः बरे दिवस येत आहेत. निरनिराळ्या प्रदेशांकडे जाण्याकरितां एकामागून एक अकरा गलबतें सुटलीं आहेत.

इं. फॅ. ११ } (१००३) { श. १५८६ श्रावण व. १२
पृ. ३४७ इ. } कारवार-सुरत (२६ जूनचे पत्रास उत्तर) { इ. १६६४ आगस्ट ८

शिवाजीची इतका दहशत बसली आहे, हें वाचून खेद होतो; आणखी कित्येक दिवस ही परिस्थिती अशीच रहाणार ! कारण त्याच्यावर पाठविलेलें **औरंगजेब चें सैन्य आतां परतलें** असल्यानें त्याला सर्वत्र स्वैरसंचार करावयाला मोकळीक झाली आहे. अहमदनगर त्यानें लुटल्याची खात्रीलायक बातमी असून **शि.** ची स्वारी दौलताबादेकडे खास झुकणार असें म्हणतात. परंतु आम्हांला तसें भिण्याचें कारण नाहीं. कारण **रुस्तुमजमा, फाझलखान** आणि **सादतखान** शिवाजीवरच चालून येत आहेत. गोव्याहून **कानडयाच्या** राजाच्या बंदरांना वेढा घालण्याकरितां आरमार पाठविलें जात आहे अशी बातमी आहे. विजापुराहूनहि त्या राजाचे पारिपत्याकरितां सैन्य जात आहे. तेव्हां त्या भागांत खरेदी होणें अशक्य आहे. [**इ. १६६४ ऑगस्ट ११ चें कंपनीचें पत्र सुरतेला** आलें. त्यांत शिवाजीचे लुटीचे वेळीं मालमत्ता सुरक्षित ठेवल्याबद्दल आपल्या नोकरांची वाहवा केली आहे].

खं. २० ले. ११४ } (१००४) { श. १५८६ भाद्र. व. २
सु. १०६५ सफर १६ } मिसेली फा. मु. मज. सी. { इ. १६६४ आगष्ट २८

अज. दि. पर. वांई—— ता मोक. देहाय

नारायणभट गोपीनाथभट यांस पसरणी, मुऱ्हे व बोझर्डे येथील इनाम जमीन चालविणें.

इं. फॅ. ११ } (१००५) { श. १५८६ भाद्र. व. २
पृ. ३४७ इ. } गिफर्ड, हुबळी--सुरत. { इ. १६६४ आगष्ट २८

कानड्याच्या राजावर सर्जाखान जोरानें हल्ला करीत आहे दिवाळीच्या सुमारास मोठी स्वारी काढण्याकरितां आदिलशहा, आपल्या सरदार लोकांच्या सैन्याशिवाय, आणखी १२००० घोडदळाची भरती करीत आहे. **रुस्तुमजमा** कुडाळपर्यंत आला असून लवकरच कारवारला भेट देईल असें वाटतें.

इं. फॅ. ११ } (१००६) { श. १५८६ भाद्र. व. ८
पृ. ३९६-९७ इ. } सुरत-हुगळी { इ. १६६४ सप्टें. ३

तुमचा नबाब **शास्ताखान** आणि त्याची लोभी स्वार्थी वृत्ति आमच्या चांगली परिचयाची आहे. त्याचें हें वर्तन नवीन नसून त्याची अशीच हीन परंपरा आहे. ज्या

युद्धांत त्या प्रबळ बंडखोरा (शिवाजी)नें त्याला कायमचा डाग लाविला आणि मग तेथून त्याची मानखंडनेनें हकालपट्टी झाली त्या दख्खनच्या युद्धांत त्याच्या सैन्याबरोबरच्या बाजाराचा कायम मक्ता (monopoly) त्यानें आपल्या स्वतःकडेच ठेविला होता !

खं. २० ले. ११५ } (१००७) { श. १५८६ आश्वीन शु. १
सु. १०६५ सफर २९ } मिसेली मु. व सी. { इ. १६६४ सप्टें. १०

अज दि. पर वाई —— ता॥ मोक. मौ. बोरखल व किण्ही.

नरसीभट व एकनाथभट यांस इनाम जमीन चालविणें.

खं. २० ले. २४४ } (१००८) { श. १५८६ आश्वीन शु. २
सु. १०६५ सफर ३० } खुर्दखत मु. { इ. १६६४ सप्टें. ११

अजर. माणकोजी बल्लाळ——— ता॥ कार. व देसमू. व देसपां. पर. सुपे.

माहादाजी गोसावी सो मोरेस्वर यांस जो इनाम मोरेस्वरास आहे तो चालू ठेवणें.

[माणकोजी बल्लाळ बंदह् पातशाह् अवरंगजेब, अलमगीर, अशी शिक्यांतील अक्षरें आहेत.]

डाग रजिस्टर १६६४ } (१००९) { श. १५८६ आश्वीन शु. ४
पृ. ३७१ सप्टें. २३ न्यू. } { इ. १६६४ सप्टें. १३

शिवाजीवर जातीनें जाण्याच्या उद्देशानें **मोगल बादशहा** दरबारचा सर्व परिवार बरोबर घेऊन दिल्ली व शहाजहानाबाद येथेंच राहून, दख्खनकडे **शिवाजीचा** नाश करण्याकरितां, प्रत्यहीं सैन्यावर सैन्यें पाठवीत आहे.

[पृ. ३७२] **शिवाजीवर** चालून येणाऱ्या मोंगली सैन्यापासून संरक्षण करण्याकरितां पोर्तुगीजांनीं उत्तरेकडील आपलीं ठाणीं तटबंदीचीं केलीं आहेत.

[पृ. ३७४] गलबतांत जागा न मिळाल्यामुळें डचांचा माल आक्टोबरपर्यंत हिंदुस्थानांतच पडून राहणार. त्याला शिवाजी आणि इतर दरोडेखोरांपासून भय आहे.

डाग रजिस्टर १६६४ } (१०१०) { श. १५८६ आश्वीन व. ११
पृ. ४२३ ऑक्टो १५ न्यू. } { इ. १६६४ ऑक्टो. ५

सुरतेच्या नव्या सुभेदारानें ता. २८ ऑग. रोजीं डचांच्या डायरेक्टरास (मुख्याधिकाऱ्यास) बोलावून आणलें आणि मक्केहून परत येणाऱ्या बादशाही गलबतांना सलामी देण्याकरितां व **शिवाजी मोंगलांविरुद्ध आरमारी हल्ला करण्याची तयारी करीत आहे** त्याच्यापासून त्यांचें संरक्षण करण्याकरितां, डचांनीं व इंग्रजांनीं प्रत्येकीं एक याप्रमाणें दोन गलबतें १० सेप्टेंबर रोजीं द्यावीं; अशाबद्दलचें बादशाही फर्मान आलें असल्याचें कळविलें. या उद्योगांत होणाऱ्या नुकसानीची

भरपाई रोखीनें अगर जकातीच्या व्यवहारांत सवलती देऊन केली जाईल असें सांगितल्यावर इंग्रजांनीं कबूलीखत लिहून दिल्यामुळें डचांना दुसरा मार्गच राहिला नाहीं. आणि त्यांनीं सुरत व भडोच या बंदरांत आयात व निर्यात मालावर जकातीची संपूर्ण सूट मिळण्याच्या अटीवर कबूली दिली. मुसलमानांकडून रोखीची भरपाई होणें कठीण वाटल्यामुळें त्यापेक्षां जकातीच्या सवलती घेणें डायरेक्टरला अधिक सोईचें वाटलें. ...शिवाजीनें आजपर्यंत समुद्रावरील कांहींच (धाडस) अंगावर घेतलेलें नव्हतें; यामुळें डायरेक्टरच्या मतें, आतांची ही केवळ पोकळ हूल असावी. ह्या भानगडींत पडल्यानें **शिवाजीचा** आपल्यावर राग होईल खरा; परंतु त्यानेंहि आमचें बरेंच नुकसान केलें आहे. शिवाय [अशी मदत न दिल्यास] औरंगजेबाचे गलबतांना कांहीं जबर अपाय झाल्यास त्याचा परिणाम आमचेहि व्यापारावर झाल्याशिवाय रहाणार नाहीं. यापुढें झालेल्या बोलण्यांत, एक वर्षपर्यंत संपूर्ण जकातीच्या सवलती सर्वांनाच देण्याबद्दलचा व त्यानंतर **दर शेंकडा ½ टक्का प्रमाणें डच व इंग्रज यांना कायमची** सूट देण्याबद्दलचा फर्मानाचा तेवढा भाग त्या सुभेदारानें दाखविला [पृ. ४२४]. **शिवाजीच्या** हल्ल्यामुळें किंवा आदा न केलेल्या जकाती अशाबद्दल १११३४:१२ फ्लॉरेन्स (गिल्डर्स) इतकें (डच ई. इं. or brought on the coauting 'unpaid customs'] कंपनीचें नुकसान झालें आहे. यांचा हिशेब एक वर्षाच्या जकातीच्या सवलतीच्या वेळीं करून घ्यावयाचा आहे.

डाग रजिस्टर १६६४ पृ. ४४८-४९, ऑक्टोबर १९ न्यू.	(१०११)	श. १५८६ आश्विन व. ३० इ. १६६४ आक्टो. ९

८ मे रोजीं **अजीजखान (आदिलशाही)** याचें सैन्य बालाघाटांतून उतरून **सुभेदार रावजी पंडित** याचेवर चालून आल्यामुळें रावजी पंडित **राजापुरावर** माघारी जाऊन तेथें स्वसंरक्षण करीत राहिला आहे. देसाई **लखम सावंत** व **अजीजखान** यांची भेट झाली. त्यांत कुडाळवर स्वारी करण्याचें ठरून तें काम सावंतांनीं एकट्यानेंच करावें व वेळ पडल्यास अजीजखानानें साहाय्यार्थ जावें असें ठरलें. आपला शब्द आणि शौर्य यांचा कस लागणार आहे हें ध्यानांत ठेवून लखम सावंत इतक्या शौर्यानें लढला कीं, थोडक्याच वेळांत तेथील लोक शरण आले. आपलीं हत्यारें व नेतां येतील तेवढ्या वस्तु बरोबर घेऊन लोकांनीं बाहेर पडावें व लखम सावंताचें व शिवाजीचें तीव्र वैर असल्यामुळें त्याचे लोकांच्या लुटीपासून रक्षण करण्यासाठीं अजीजखानाच्या २०० घोडेस्वारांनीं कुडाळच्या लोकांनी खारेपाटणच्या सरहद्दीवर नेऊन सुरक्षित पोंचवावें; अशा अटींवर मराठ्यांनीं अजीजखानाशीं तह केला. वेढा चालू असतांना लखम सावंतानें आमच्याकडून (डचांकडून) दारूगोळा मागितला. परंतु आम्हीं देण्याचें नाकारलें. त्यावेळीं त्यानें खूप धमक्या दिल्या पण आतां तो दोस्त झाला आहे ! सेनापती अजीजखान व वेंगुर्ल्याचा सरसुभेदार बिकाशी पंडित हे कांहीं दिवसांनीं वेंगुर्ल्यास आले. वेंगुर्ल्याबद्दल

त्यांना आदर वाटला. **अजीजखान १० जून. ला** मृत्यु पावल्यामुळें त्याचे जागीं **रुस्तुमजमाची निवड झाली आहे.** [पहा ले. ९९९] तळकोंकण प्रांताबद्दल आदिलशहाला हकीकत सांगण्याकरितां बिकाशी पंडित १ ऑगष्टला विजापुरीं निघून गेला आहे. तो परत आल्यावर त्याचे सांगण्याप्रमाणें बंडखोर शिवाजीशीं युद्ध करण्याचें पुढील धोरण आंखावयाचें असल्यामुळें रुस्तुमजमा हुकेरीला जाऊन तेथें त्याची वाट पहात राहील. पाटगांवच्या रस्त्यावर, बालाघाटावरील प्रतापगढी (प्रतापगड) नांवाचा डोंगरी किल्ला प्रथम घेऊन नंतर क्रमानें खारेपाटण व राजापूर घ्यावें असा मुख्य हल्ल्याचा कार्यक्रम आहे.

वरवर मोठा गाजावाजा करून औरंगजेब व त्याचा वकील याला खूष करण्याकरितां अदिलशहानें हें युद्ध चालू केलें आहे असें डच रेसिडेंटचें मत आहे. अलीकडे, 'तुम्हीं शिवाजीवर हल्ला करण्याकरितां सैन्य उभारलें तर तुम्हांला द्यावी लागते ती ३० हजार होनांची खंडणी माफ करितों; नाहींतर तुमच्या मुलखावर स्वारी करितों' असें निर्वाणीचें बोलणें औरंगजेबानें वारंवार केल्यामुळें कांहीं तरी करण्यापलीकडे **या स्वारींत आदिलशहाचें खरें मन नाहीं** असें दिसतें. अजीजखान तटस्थ राहून लखम सावंत कुडाळला कसून वेढा देत असतांना आंतील लोकांनीं अनेक वेळां बाहेर पडून छापे घातले. परंतु एकहि वेळीं अदिलशाही सैन्याला तोशीस लागू दिली नाहीं. लखम सावंताची थोडी दैना झाल्याचें दिसतांच कुमकेकरितां म्हणून जें विजापुरी सैन्य जाई तें एकहि गोळी न मारतां परत येई ! अदिलशहाचें सैन्य तटाखालीं आल्यास त्यांच्यावर बंदुकी न रोखतां सावंताचे लोकांनीं डोकें वर काढतांच त्यांच्यावर भयंकर सरबत्ती होई ! प्रतापगडच्या लोकांनीं पाटगांवच्या लोकांना कितीहि त्रास दिला तरी सुलतानाचे लोक त्यांच्याकडे कानाडोळाच करीत ! !

शिवाजीनें आदिलशहाकडे ३० हजार होन, २ हत्ती, ८० सुंदर घोडे इत्यादि अनेक नजराणे पाठवून युद्धांत आपल्यावर मेहेरनजर ठेवावी, आणि दरसाल आपल्याकडून ३० हजार होन खंडणी घेऊन मोंगलांचा स्नेह तोडावा इत्यादि मनधरणीचें बोलणें लाविलें आहे. **उभयतांचा गुप्त तह झाला असावा** असेंहि म्हणतात. औरंगजेबाला हल्लींच्याप्रमाणें एकसारखें फसवीत राहणें जमलें नाहीं तर **आदिलशहा** शिवाजीवर हत्यार धरण्यापेक्षां औरंगजेबाशींच बिघाड करील असें कित्येकांचें म्हणणें आहे.

शिवाजी मोठ्या परिश्रमानें किनाऱ्यावर ५० गलबतांचें आरमार तयार करवीत आहे. ऑगस्टअखेर तें समुद्रावर सफर करील. शिवाजीचा उद्देश काय आहे हें समजत नाहीं. सुरतेच्या लोकांच्या मतें मक्केकडे जाणाऱ्या मोंगली गलबतांवर तो हल्ला करील. परंतु हें संभवनीय दिसत नाहीं. रावजी पंडित व बिकाशी पंडित या उभय सुभेदारांनीं स्नेह व मदत यांची खात्री देणारीं पत्रें आम्हांला लिहिल्यामुळें वेंगुर्ल्याबद्दल धास्ती वाटत नाहीं.

[पृ. ४५१] सुरतेच्या गव्हर्नरानें लिहिलेल्या पत्रांत मोंगली गलबतांचें रक्षण फ्रेंच यांच्यापासून करावयाचें होतें असें लिहिलें; ती चूक असून शिवाजी तयार करवीत असलेल्या यांचे गलबतांबद्दल तो बंदोबस्त करावयाचा आहे, अशी आतां दुरुस्ती जरूर आहे. मात्र आजपर्यंत किनाऱ्यावर उपद्रव झाल्याची बातमी आलेली नाहीं. **विजापुरकर व गोवळकोंडेकर यांनीं शिवाजीला आधार दिल्यामुळें** सुरतेच्या नुकसानीची भरपाई त्यांचेकडून मोंगल करून घेणार आहे, अशी गोवळकोंड्याहून बातमी आली आहे. हें अमान्य असल्याचें या उभय सुलतानांनीं जाहीर केलें असून विजापुरांत तर मोंगलांच्या वकिलाला धक्के मारून हांकून लाविण्यांत आलें. शिवाजीच्या हल्ल्याच्या भीतीमुळें पुलीकतला तट बांधण्याचा आग्रह गव्हर्नरनें धरला आहे.

डाग रजिस्टर १६६४ } (१०१२) { श. १५८६ कार्तीक शु. २
पृ. ४६१ ऑक्टो. २१ न्यू. } { इ. १६६४ आक्टो. ११

मोंगलांकडून रक्षणाकरतां मागितलेलें गलबत देण्यांत आलें. शिवाजीचे हल्ल्यामुळें खजीना गोंवळकोंड्यास पाठविण्याच्या बेतांत फरक करून तो समुद्रावरून पाठविण्याचें ठरलें.

इं. फॅ. ११ } (१०१३) { श. १५८६ कार्तीक शु. ७
पृ. ३४८ इ. } कारवार–सुरत { इ. १६६४ ऑक्टो. १६

तीन चार दिवसांपूर्वी कानड्याचे राजाकडून बार्सिलोर, मंगळूर इत्यादि ठाणीं घेण्याकरितां पोर्तुगीजांचें आरमार खालीं निघून गेलें आहे. कराराप्रमाणें हातीं यावयाचीं ठिकाणें प्रथम ताब्यांत घेतल्याशिवाय तहनामा पुरा करणार नाहींत असें म्हणतात. [गोव्याहून २४ ऑक्टोबरचे पत्रांत 'राजा हीं ठाणीं देण्याचें नाकारतो' असा मजकूर आहे].

खं. १५ ले. १०८ व १०९ } (१०१४) { श. १५८६ कार्तीक व. १
सु. १०६५ रखर १५ } मिसेली मु. व म. { इ. १६६४ आक्टो. २५

अज. दि. पर. वाई——— ता मोक. मौ. निंब

सदानंद गोसाव्याचे मठानजीक कुंभार नवी जिकीर करून माती खणताती. तसें तरी त्यांस तसें करूं न देणें.

इं. फॅ. ११ } (१०१५) { श. १५८६ कार्तीक व. ५
पृ. ३४८ इ. } कारवार (टेलर)–सुरत. { इ. १६६४ ऑक्टो. २९

शिवाजीनें नुकतेंच वेंगुर्ले जाळून जमीनदोस्त केलें; आणि त्या बाजूनें त्याच्यावर आलेल्या विजापुरी सैन्याला परतवून लाविलें, अशी आज बातमी आली. या यशामुळें तो खालीं येतो कीं काय हें समजत नाहीं...पोर्तुगीजांचें आरमार, बार्सिलोर वगैरे ठाणीं

घेण्याकरितां गेलें होतें. त्याच्या ताब्यांत होनावर शिवाय इतर सर्व बंदरें देण्यांत आलीं आहेत. [पृ. ३४९-भटकलहून टेलरनेंच ८ नोवें. ला पत्र लिहिलें त्यांत, 'डच लोक कानड्याचा राजा लहान असेपर्यंत पोर्तुगीजांनीं त्याचीं ठिकाणें घेऊं नयेत, तो वयांत आल्यावर कोणाला देईल त्यानें तीं घ्यावीं; अशा कांहीं प्रमाणांनीं पोर्तुगीजांना ठिकाणें मिळण्याला विरोध करीत आहेत' असा मजकूर आहे].

पिसुर्लें. शिवाजी पृ. १२ } (१०१६) { श. १५८६ मार्ग. शु. ४
टीप ५ इ. न्यू. } पोर्तुगीज { इ. १६६४ नोव्हें. ११

गोव्याचा व्हाइसराय-पेडणेकर देसाई केशव नाईक व केशव प्रभु.

आपणाकडून आलेलें पत्र पाहिलें; आणि त्यानंतर **शिवाजी व खवासखान** यांच्यामध्यें झालेल्या युद्धाची बातमी ऐकली.

शि. प्र. पृ. १९५ } (१०१७) { श. १५८६ मार्ग. शु. ५
जुलूस ७ जवल ४ } फर्मान-फा. मु. १ { इ. १६६४ नोव्हें. १३

?——— देशाधि. व लेखक, देशमु. व देशपां. पर० पुणें

पर. मज. पैकी ४ गावीं योगक्षेमाकारितां भाऊभट राजभट अग्निहोत्री रा. कसबे पुणे याकडे चालत आहे. तरी पूर्वींच्या सनदेप्रमाणें यांस उत्पन्न मिळत जावें.

१ मुद्रा— मिर्जा राजा, जयसिंग, बंदाबाद, शाहा, आलमगीर.

खं. १५ ले. ११० } (१०१८) { इ. १५८६ मार्ग. व. ३
सु. १०६५ जवल १७ } मिसेली मु. व म. { इ. १६६४ नोव्हें. २६

अज दि. ठाणें तारगाऊ ——— ता हुदे. व मोक. मौजे निगडी किले साताराा

कमलनयन गोसावी याचे मौ० मज० येथें १५ होन इनाम आहे. ते त्यास आदा करीत जाणे.

इं. फॅ. ११ } (१०१९) { श. १५८६ मार्गशीर्ष व. ३
पृ. ३१२-१३ व ३५८ } सुरत-कंपनी { इ. १६६४ नोवें. २६

सुरत शहर आणि आसपासचा प्रांत यांच्या **वसुलाची चौथाई** बादशहा आपल्याला बिनहरकत देणार नाहीं तर आपण सुरतेवर पुन: येऊं; अशी **शिवाजी** वारंवार धमकी देत असल्यामुळें, त्याबद्दल प्रत्यहीं आम्हांला व शहरांतील लोकांना भीती वाटत असते. दख्खनमध्यें सर्वत्र यादवी बोकाळल्यामुळें **शिवाजीचें** सामर्थ्य प्रत्यहीं वाढत आहे. त्यानें **भटकलच्या बाजूला** ४ गलबतें पाठविलीं असून तो जमीनीवरून त्वरेनें

घोडदळासमवेत जाऊन त्यांना मिळणार होता. तो अत्यंत चपल असून कष्ट सहन करतां यावे म्हणून विलक्षण परिश्रम करतो. त्याचे मुख्य मदतनीसहि तसेच तयार असल्यामुळें तो अतर्क्य त्वरेनें आपल्या हालचाली करूं शकतो. परंतु, मध्यंतरीं **आदिलशाही सैन्यानें त्याला गांठून** त्याचा पराजय करून त्याला किल्ल्याचा आश्रय करण्यास लावून तेथें वेढून टाकिल्याची बातमी आली. [ही बातमी खरी नव्हती. पुढें १६६५ जाने. २ चें पत्र पहा.] परमेश्वर करो आणि ही खरी ठरो. कारण, **शिवाजी** आपले बेत दुसऱ्या कोणावर विश्वास न ठेवतां, आपल्याच डोक्यांत ठेवीत असल्यामुळें, तो गेला नाहीं तर त्याचे शिवाय कांहींच करतां येणार नाहीं; आणि त्याचे आरमाराची खेप फुकट होईल! भटकल आदिकरून प्रांत जिंकून घेण्याचा **शिवाजीचा** विचार होता असें म्हणतात. लूट सांपडेल तेथें विजापूरच्या मुलखांतहि **शिवाजी** अप्रतिहत संचार करून लुटतो आणि विजापूरकर त्याला जडथळा करीत नाहींत; त्या अर्थी त्या उभयतांचें संगनमत आहे असें समजून **हिंदुस्थानचे बादशहानें विजापुरावर मोठें सैन्य पाठविलें आहे.**

राजापूर अद्यापि **शिवाजीचेच** ताब्यांत आहे. कांहीं महिन्यांपूर्वी, **शिवाजीच्या** ताब्यांतील राजापूर, दाभोळ, चौल इत्यादि १२।१४ शहरें घेण्याकरितां व खुद्द **शिवाजीवरहि** पाठविण्याकरितां आदिलशाहींत सैन्याची उभारणी झाल्याचें लोक बोलत; परंतु अद्यापि तसें कांहींच घडलें नसून हीं सर्व शहरें त्याचेच अमलाखालीं चालत आहेत; आणि त्याला कोणीं विरोध न करील तर लवकरच तो सर्व समुद्रकिनारा जिंकून घेईल.......**शिवाजीचीं** गलबतें अगदीं भिकार असून एकादें चांगलें गलबत तसल्या १०० गलबतांचा धुव्वा उडवून देईल ! ....**शिवाजीचे** मनांत आमचा शेवटचा घांस करावा, असें असल्याचें समजून आम्हीं निकरानें आमचें रक्षण केलें....... असो. अशा तऱ्हेनें **शिवाजीच्याच** गोष्टी सांगून आम्हीं तुम्हांला त्रास दिला (असें वाटेल); परंतु इकडे सर्व देशभर आणि प्रत्येक राजदरबारीं **तोच सर्वांच्या संभाषणाचा विषय** होऊन राहिला आहे.

पिसुर्लें. शिवाजी टीप ५ पृ. १२ इ. न्यू.	(१०२०) पोर्तुगीज	श. १५८६ मार्ग. व. ११ इ. १६६४ डिसें. ३

आदिलशहाचा वकील—पोर्तुगीज व्हाइसराय:- **शिवाजी** व **खवासखान** यांच्यामध्यें झालेल्या युद्धांत **खवासखान** विजयी झाला.

इं. फॅ. ११ पृ. ३५० इ.	(१०२१) गोवा (पेटिट, टेलर)–सुरत.	श. १५८६ मार्ग. व. ३ इ. १६६४ डिसें. ५

कारवारच्या वखारवाल्यांना वाटत असलेली भीती आतां कमी झाली आहे. कारण

शिवाजी फोंडा किल्याकडे परतला किंवा तेथें येऊन थांबला असून त्याच्या ह्या सफरीचें हेंच उद्दिष्ट होतें असें दिसतें....डचांना पोर्तुगीजांच्या हातीं बार्सिलोर इत्यादि ठिकाणें जातात याचें वाईट वाटत असल्याचें उघड दिसतें. कांहीं इलाज चालत नाहीं असें पाहून त्यांनीं मंगळूरवर त्वरेनें जाऊन आपलें निशाण चढविलें. परंतु तें लोकांनीं लगेच उतरवून फाडून टाकलें.

इं. फॅ. ११ }
पृ. ३५० इ. } (१०२२) { श. १५८६ मार्ग व. १४
{ इ. १६६४ डिसें. ६

गोवा (हेन्री गॅरी)—सुरत.

काल वेंगुर्ल्याचा मुख्याधिकारी व दुसरा एकजण एका मोठ्या होडींत माल घालून तो गोव्याला सुरक्षित ठिकाणीं ठेवण्याकरितां म्हणून घेऊन येतांना आढळला. हल्लीं शिवाजी विजापुरकरांच्या मुलखांत जाळपोळ व कत्तल करीत आहे; त्यापासून बचाव होण्याकरितां आणखीहि माल वेंगुर्ल्याहून ते आणून ठेवणार आहेत. शिवाजीबरोबर ८००० घोडदळ व १० हजार पायदळ आहे अशी विश्वसनीय बातमी आहे. त्यांतील सर्वच शिपाई ठेंगू आणि लहान बांध्याचे आहेत.

डाग रजिस्टर १६६४ }
पृ. ५६६, डिसें. १७ न्यू. } (१०२३) { श. १५८६ मार्ग. व. ३०
{ इ. १६६४ डिसें. ७

कुडाळचा किल्ला आणि युद्धखात्याचा ताबा फत्तेखानाकडून घेण्याकरितां आपल्या मुलाला पुढें पाठवून रुस्तुमजमा मागाहून आला. फत्तेखानानें तें मान्य केलें नाहीं. पुढें विजापुराहूनहि फत्तेखानानें कुडाळ सोडूं नये असा हुकूम आल्यामुळें रुस्तुमजमा परत निघून गेला. यामुळें प्रतापगढीवरील शिवाजीचे लोकांना आतां दरोडे घालण्यास चांगली संधी आली आहे. २३ सेप्टेंबरला रुस्तुमजमा अचानक वेंगुर्ल्याला आल्यावेळीं तेथील डच रेसिडेंट व मुसलमान सुभेदार त्याच्या स्वागतार्थ गेले असतां 'शिवाजीशीं तुमचा स्नेह आहे काय ?' असें त्यानें रेसिडेंटला विचारलें. 'शिवाजीच काय परंतु देशांतील सर्वच राजांशीं' असें त्यानें उत्तर दिलें. 'मग तुम्ही शिवाजीला शत्रूसारखें समजून त्याला आपल्या वखारींत घेत नाहीं तें कां ?' असें त्यानें विचारिल्यावर 'शिवाजीला बंद केले नसून त्याच्या हुकमाविरुद्ध आमच्या वखारीजवळ येणाऱ्या त्याच्या शिपायांना आम्ही बंदी केली. परवानगीशिवाय येणाऱ्या लोकांपासून स्वसंरक्षण करण्याचा अधिकार प्रत्येकाला आहेच.' असें रेसिडेंटनें उत्तर दिलें. नंतर त्याला रजा देण्यांत आली.

विजापूरचा सुलतान शिवाजीवर सैन्य न पाठवितां केवळ गोष्टी सांगतों असें पाहून, शिवाजीची हद्द सोडून देऊन मोगली सैन्यानें विजापुरापासून १॥ दिवसाच्या मकाणावरील सोलापुरास वेढा घालून तें घेतलें. शिवाजीवर पुरेसें प्रबळ सैन्य अजूनहि

आदिलशहानें पाठविलें तर **औरंगजेब** त्याच्याशीं तह करण्यास तयार आहे. अशा तऱ्हेनें मोगली सैन्य फुटून गेलें ही संधी साधून, आपण १० वर्षांत २२ लाख होन देण्याच्या अटीवर मोंगलांशीं तह केला आहे, असें शिवाजीनें प्रसिद्ध केलें. त्यानें ५० हजार पायदळ व १० हजार घोडदळ इतकें सैन्य ठेविलें तें पावसांत गुप्तपणें ठेवून शिवाय खारेपाटण व राजापूर या बंदरांत ४० त्वरित गतीचीं गलबतें त्यानें सज्ज केलीं. आणखी ६० गलबतें त्यानें नव्यानें बांधविलीं. कोठेंतरी मोठा डल्ला मारण्याचा त्याचा विचार आहे. **वेंगुर्ल्यांचे** जवळपासच्या एकाद्या बंदरावर त्याचा रोंख असावा असें बोलतात. इणें खेड्याजवळ त्यानें मजबूत किल्ला बांधला असून अद्यापि प्रतापगढीहि त्याचेच हातांत आहे. त्यामुळें लोकांना भय दाखवून तो स्वतःचा खुशाल फायदा करून घेतो. आणि जरी विजापुरचें बरेंच मोठें सैन्य **कुडाळास** असलें तथापि त्या प्रांतांतून शिवाजीला हांकून लावण्याइतकें सामर्थ्य त्या सैन्याचे अंगांत नाहीं.

इं. फॅ. ११ } (१०२४) { श. १५८६ पौष शु. ७
पृ. ३५१ इ. } गोवा (टेलर व पेटिट)–सुरत. { इ. १६६४ डिसें. १४

वेंगुर्ल्यांच्या डच अधिकाऱ्यानें वरवर तरी **शिवाजीपासून** सुरक्षित ठेवण्याचें कारण दाखवून मसालेहि गोव्याला आणिले आहेत. **शिवाजीच्या** धामधुमीमुळें आमच्या गलबतावरील कांहींच माल खपला नाहीं. **शिवाजीनें** हुबळी व इतर बरींच सधन शहरें लुटून बरेच प्रमुख व्यापाऱ्यांना कैद केल्याची खात्रीलायक बातमी आली. त्यामुळें कारवारच्या बाजूचे बाजार तसेच मंदीचे असणार. तो पुढें कोठें जाणार हें नक्की समजलें नसलें तथापि आमचे कारवारचे दोस्त **शिवाजी** संनिध येतांच माल हालविण्याची तयारी करीत आहेत.... १७ दिवसांपूर्वी दिसलेल्या धूमकेतूचे परिणाम काय होतात याबद्दल कित्येकांचीं मनें चूर होऊन गेलीं आहेत.... आम्हीं कारवारला असतांना आमचें गलबत **राजापुरास नेऊन लाविल्यास** तेथें कांहीं विक्री नक्की होईल असें **रावजी पंडिताचें पत्र** आलें.

डॅन्. २ } (१०२५) { श. १५८६ पौष शु. ८
पृ. ३४५ डिसें. २६ न्यू. } { इ. १६६४ डिसें. १६

गोव्याचा गव्हर्नर—मुंबईचा इंग्रज गव्हर्नर.

तुमच्या पत्राचीं उत्तरें दिलीं नाहींत. याचें कारण पत्रांत केलेल्या मागणीस अनुसरून कृती करणें हेंच उत्तम उत्तर असें मला वाटलें. आतां उद्यां आम्ही एक इसम नेमतों तो जाऊन मुंबई तुमच्या ताब्यांत देईल. आपले लोक कोणत्या जहाजांतून जात आहेत हें आम्हांस समजलें पाहिजे; कारण या कामांत **शिवाजीच्या** आरमाराचा संबंध येत असल्यामुळें, इंग्रजांचा त्याच्याशीं सलोखा नसल्यास या जहाजांतून जाणाऱ्या लोकांच्या सुरक्षिततेची मला काळजी घेतली पाहिजे.

स. २६ ले. २२ } (१०२६) { श. १५८६ पौष व. ४
हि. १०७५ जखर १७ जुलूस ७ } फर्मान { इ. १६६४ डिसें. २६

जसवंतसिंग बहादूर—देशाधिकारी पर० पुणें

पर० मज० ची खतीबी व निमेकाजीपणा काजी सिलेमान यास मुक्रर होती. तो मेल्यावर महमद कासीम व महमद अवलाद सिलेमान यांस वरील गोष्टी मुक्रर केल्या. आहेत. शिवाय मोर्तब व तवलियत यांचेंहि वतन दिलें आहे. तें चालविणें.

इं. फॅ. ११ } (१०२७) { श. १५८६ पौष व. ४
पृ. २३९ इ. } { इ. १६६४ डिसें. २६

गोव्याचा व्हाइसरॉय—पोर्तुगीज राजा (लिस्बन)

राजे साहेबांचा हुकूम बजावण्याकरितांच म्हणून मी इंग्रजांच्या ताब्यांत मुंबई देत आहें. परंतु यापासून शेजारचे पोर्तुगीजांना भयंकर त्रास होणार असून **ज्या दिवशीं मुंबई बेटांत इंग्रजाचें बस्तान बसेल त्या दिवशीं हिंदुस्थानाला आपण मुकलों असें समजावें.**

इं. फॅ. ११ } (१०२८) { श. १५८६ पौष व. ११
पृ. ३५९ इ. } सुरत-कंपनी { इ. १६६५ जाने. २

शिवाजीला चुकविण्याकरितां कासिदांना फार मोठा वळसा घ्यावा लागल्यामुळें आपलीं पत्रें आम्हांला उशिरां पोंचलीं. शिवाजी आणि त्याचे टेहळ्ये सर्व देशभर जाळपोळ, कत्तल आणि लूट करीत फिरतात. परवांच त्यानें **वेंगुर्लें** आणि जवळचें दुसरें एक शहर लुटून अपार लूट नेली. यावरून मागच्या पत्रांत त्याला पायबंद बसल्याचें लिहिलें तें खरें नव्हतें हें आपल्याला समजेल. अशा अनेक बातम्या येतात; त्यांत खरी कोणती मानावयाची हें समजतच नाहीं. परंतु आतांची बातमी...खरी आहे. [या पत्रानें ले. १०१९ मधील कोंडमान्याची बातमी रद्द होते.]

इं. फॅ. १२ } (१०२९) { श. १५८६ पौष व. ३०
पृ. ७५-७६ इ. } कारवार-सुरत. { इ. १६६५ जाने. ६

हुबळीची लूट-**शिवाजीनें** ३०० घोडेस्वार पाठविले, शहर लुटलें व कांहीं कैदीहि नेले; अशा रीतीनें **हुबळीची** लुटल्यासारखीच दैना झाली आहे. आलेल्या **स्वारांमध्यें कांहीं रुस्तुमजमाचे होते** असें म्हणतात. रुस्तुमजमा व शिवाजी, उभयतां मिळून, **हल्लींच्या सुलतानाला पदच्युत करून दुसराच गादीवर बसवितील** असा लोकांचा समज आहे. येथील मालाच्या सुरक्षिततेकरितां व महमद खानाकडून येणें आहे तें बिनधोक वसूल व्हावें म्हणून त्याला (रुस्तुमजमाला) कांहीं नजराणा देणें जरूर आहे असें वाटतें...शिवाजी हुबळीस आला त्यावेळीं सुदैवानें इंग्रजांचें फारसें कांहीं तेथें नव्हतें. फक्त ११८५ होन रोख होते...

खं. २० ले. ११६ } (१०३०) { श. १५८६ माघ व. २
सु. १०६५ रजब १६ } खुर्दखत मु. व सी. { इ. १६६५ जाने. २३

अजर. शर्जाखान—बजा. कार. पर. वाई

गिरमाजी त्रिंबक यास वाई येथे १ चावर जमीन वजिराच्या खुर्दखतानुसार चालिली आहे. हाली पर. मजं.**साहेबास अर्जानी जाला आहे** तरी गिरमाजीचे इनाम पूर्वींप्रमाणें चालविणें.

डाग रजिस्टर. पृ. २२८ } (१०३१) { श. १५८६ माघ व. ६
इ. फेब्रु. ५ न्यू. } . { इ. १६६५ जाने. २६

सुरत येथील पोर्तुगीज बातमीदार—(गोवा ?)

गेल्या वर्षीं दुष्काळामुळें व्यापाराचे बेत जागच्या जागीं राहिले. त्यांतच शिवाजीनें येऊन सर्व शहर लुटलें व व्यापार मंदावला. तो गेल्यापासून व्यापाऱ्यांचा आग्रह असा आहे कीं, खरेदीचा करारनामा तिकीट लाऊन व्हावा; कारण सर्वत्र दुर्भिक्ष झालें आहे. **लवंगाचा भाव** मणाला १५० रुपये असा सुरत शहरांत आहे.

इं. फॅ. १२ } (१०३२) { श. १५८६ माघ व. ८
पृ. ७६ इ. } कारवार-सुरत { इ. १६६५ जाने. २८

राजा जयसिंग ३० हजार घोडदळानिशीं बऱ्हाणपुरापर्यंत आला असून त्याचे बरोबर फक्त ३ हजार सैन्यालाच शहरांत प्रवेश मिळाला. आदिलशहापासून ७० लाख होन खंडणी वसूल करण्याकरितां तो आला आहे असें म्हणतात. विजापूर दरबारकडून काय उत्तर मिळेल हें समजत नाहीं. शिवाजीचा भाऊ आणि सय्यद **इलियास सर्जाखान** तेथेंच (विजापुरीं) असून **बहलोलखान** येण्याची (आदिलशहा वगैरे) वाट पहात आहेत. शिवाजी, रुस्तुमजमा व **खवासखान** अशा तिघांचीं तीन आदिलशाही सैन्यें मोंगलांवर जावयाचीं आहेत असें बोलतात त्यांत तथ्य आहे असें वाटत नाहीं. शिवाजी **गोकर्णाकडे** जाईल अशी अटकळ आहे. त्या बाजूचा रुस्तुमजमाचा मुलूख तो लुटणार नाहीं हें खरें असलें तथापि त्याच्यावर विश्वास न ठेवतां आम्हीं स्ववित्ताचें रक्षण करावें हें बरें. यावेळा आतां ८ दिवसहि राहिले नाहींत. तोंपर्यंत तो न आल्यास या वर्षीं तरी ददात मिटली असें समजण्यास हरकत नाहीं.

खं. १५ ले. १११ } (१०३३) { श. १५८६ फाल्गुन शु. ४
सु. १०६५ साबान ३ } मिसेली मु. व म. { इ. १६६५ फेब्रुवारी ९

वीरो राम सुभेदार तर्फ जाउली— कार. पर. कुडाळ

सदानंद गोसावी यास रयतेकडून दरगावास एक मण गला इनाम आहे. तरी सालाबादप्रमाणें देत जाणें.

खं. १५ ले. ११२ } (१०३४) { श. १५८६ फा. शु. ५
सु. १०६५ साबान ४ } ताकीद मु. (परसोजी महाडी) व म. { इ. १६६५ फेब्रु. १०

अज सुभा रा. परसोजी राजे महाडीक सुभेदार नामजाद महालाहाय

ताा मोक. मौ. निगडी कि. सातारा

मौ. मज. सदानंदाचा इनाम आहे. त्यास पैसे लाविले आहेत; तरी त्यास एक-जरियाची तसवीस न देणें.

इं. फॅ. १२ } (१०३५) { श. १५८६ फाल्गून व. १२
पृ. ४७ इ. } कुक-लॉर्ड आर्लिंगटन् { इ. १६६५ मार्च ३

मोंगलांच्या मुलखांत किनाऱ्याच्या प्रदेशांत ठाण्याच्या पलीकडे **कल्याण** आणि **भिवंडी** अशीं दोन बंदरें असून दख्खन, गोवळकोंडा व कॉरोमांडेल किनारा या ठिकाणीं उत्पन्न होणारा व तयार झालेला सर्व प्रकारचा माल येथें आणविल्यास मुंबईला तो सुरतेपेक्षां शेंकडा १५ ते २० टक्यांनीं स्वस्त पडेल.

इं. फॅ. भा. ११ } (१०३६) { श. १५८६ फाल्गुन व. ३०
पृ. १४४ इ. } { इ. १६६५ मार्च ६

सरजॉर्ज ऑक्झेंडेन—लॉर्ड आर्लिंगटन

ॲब्राहम शिपमन प्रथम मुंबईला आल्यावेळीं, जेव्हां व्हाइसरॉय मुंबई बेट इंग्रजांच्या ताब्यांत देत नाहीं असें ठरलें, तेव्हां तेथील रहिवाशांनीं मुंबई व साष्टी येथील सर्वांच्या वतीनें एक ब्राह्मण पाठविला. त्याचे मार्फत त्यांनीं कळविलें कीं, मुंबईला इंग्रज येतील तर आपण **पोर्तुगीजांची हरकत न जुमानतां** बेट स्वाधीन करूं. एकहि मनुष्य दगावूं देणार नाहीं. या मदतीकरितां फक्त **तेथील रहिवासी स्वतंत्र रहावे एवढेंच त्यांनीं मागितलें.** त्यांना जाच आहे तो मुख्यत्वेंकरून पोर्तुगीजांच्या जुलमाचा. एकाद्या कुटुंबांतील कर्ता पुरुष मेला कीं मागें राहिलेल्या मुलांबाळांना सक्तीनें ते जेसुइट शाळांत डांबून टाकून परत आपल्या माणसांत जाऊं देत नाहींत ! ही **गुलामगिरी** त्यांना **फार असह्य होत्ये.** [मुंबई बेट पोर्तुगीज लोकांनीं इंग्रजांच्या ताब्यांत ता. ८ फेब्रु. १६६५ रोजीं दिलें. इं. फॅ. १२ पृ. ३९–४०]

त्रै. व. ६ ले. ७ } (१०३७) { श. १५८६
पृ. ७३ सु. १०६५ } दानपत्र फा. सी. { इ. १६६४–६५

रा. त्रिंबकजी राजे–तीर्थस्व. रा. गणेश विठल दिक्षीत सो। वणीः–श्री (सप्तशृंगी) चे पूजाअभिषेकाबद्दल तुम्हास १४ रु. वरुषासन केले आहे. धर्मकृत्य सांग करीत जाणे.

हि. रे. क. ९ } (१०३८) { श. १५८६
पृ. १११ इ. } { इ. १६६४

शिवाजीनें सुरतेवर हल्ला केला तेव्हां वसई येथील पोर्तुगीजांनीं त्याच्या हालचालीकडे कानाडोळा केला असावा. कारण, ही अफवा मोगलाकडे जाऊन त्यांचा सेनापती लोधीखान यानें पोर्तुगीजांच्या प्रदेशावर हल्ला करून कांहीं लोक धरून नेले व लूट केली.

भाटेकृत सज्जनगड. } (१०३९ = ६८१ अ) { श. १५७६ मार्ग व. ५
पृ. १०८ श. } { इ. १६५४ डिसें. १८

दिवाकर गोसावी मु. चाकण—बहिरंभट.

तुम्ही पत्र पाठविले ते वाचोन लेखनार्थ अवगत झाले. तुम्ही आम्हास येण्याविषयीं लिहिलें तर **श्रीसमर्थ दहा संवत्सरपर्यंत कोठें न जातां** सर्व ग्रंथास आरंभ केला. आणि सांगितले कीं, श्रीकडील हरयेकविशी बोभाट येऊ नये म्हणून आम्हा सांगितले. आणि सर्व मंडळीस आज्ञा की, तुम्ही श्रीचे उत्सवाची (भिक्षा) करून आमचे स्वाधीन करावी. म्हणून सर्वांस सांगितलेल्याप्रमाणे सर्व मंडळी निघोन गेली; आणि आपण व कल्याण गोा व चिमणाबाई अका व अनंत कवी यास बराबर घेऊन एकांत स्थानी **शिवथरचे घळींत** जाऊन बसले. तुम्ही श्री महाबलेश्वरचे देवालयाचे काम चांगले रीतीनें करवावे. भास्कर गोा आले म्हणजे मी येक दिवसाचे अवकाशे येतो....हे आसीर्वाद.

भाटेकृत सज्जनगड } (१०४० = ७६३ अ) { श. १५८० फाल्गु. शु. २
पृ. १०९ श. } { इ. १६५८ फेब्रु. १३

भास्कर गोसावी--श्रीगुरुभक्तपरायण मोक्षश्रिया विराजित दिवाकर गोसावी.

श्रीचे उछाहा होनु पनास भिक्षेस मिळाले ते भानजी गोसावी बराबर पाठविले, पावतील. शिवाजी राजे यांच्याकडे भिक्षेस गेलो त्यानी + + रिले तुम्ही **कोठील कोण कोणा ठिकाणीं असता**. त्यावरून आम्ही बोललो की, आम्ही रामदासी; श्रीसमर्थांचे शिष्य चाफळास हों. मग ते बोलले की ते **कोठे राहतात व मूळ गाव कोण**. त्याजवरून मी सांगितले की, गंगातीरीचे जांबचे राहणो. प्रस्तुत चाफळास मठ करून श्रीदेवाची स्थापना करून उत्साव महोत्सव चालू करून आम्हा सर्वांस आज्ञा की, तुम्ही भिक्षा करून उत्साह करीत जावा. सांगितल्यावरून अम्ही हिंडत आहो. असे बोलता राजेश्रींनी दत्ताजीपंत वाकेनिवीस यास **प्रतिवर्षीं श्रीउत्साहास दोनशे होनु** देत जाणे म्हणून पत्र पाठविले ते हो+ +स येतील हे विनंती.

सां. इ. सा. } (१०४१) { श. १५८६
ले. ६ ? } शिवाजी- { इ. १६६४-६५

वडिलांचे शेवेसी शिवाजी राजे याणी चरणावरी मस्तक ठेवून विज्ञापना ऐसी जे, **बाजी घोरपडे** मुधोळकर याणी स्वधर्मसाधणता सोडून यवन दुष्ट तुरुक हाचे कार्यास अनुकूल होऊन दगाबाजीचे हुनरे करून विज्यापुरास येणें घडलें. तेथें गुजरला प्रकार निर्वाणचा तो तुम्ही समजलाच आहां. तोहि प्रसंग श्री तुमचा मनोरथ सिद्धीस नेणें व स्वधर्म राज्यवृद्धि करणें म्हणोन पार पडला. सांप्रत पुन्हां दुर्बुद्धि धरून **खवासखान** विजापुराहून फौजेसुद्धां रवाना जाहले. त्याची इरोळी **बाजी** याणी व **लखम** सावंत व **खेम सावंत** याणीं प्रतिज्ञापूर्वक जत(न) करून सेनासमवेत निघाले. ते तिकडे येत आहेत. तुम्हास श्री सांब व अंबे यश देणार पूर्ण आहे. ये समयीं त्याचे वेढे घ्यावे. आण आमचे मनोदय सेवटास नेणार तुम्ही सुपुत्र निर्माण आहां. म्हणोन आज्ञा केली. त्यास बाजी घोरपडे पुढें **मुधोळास** घरीं कांहीं जमेतीनसी आले; हें कळतांच फौजेनसी आम्ही तेच क्षणी स्वार केली. त्यांचा प्रांत लुटून तळपट जान करून ठाणियास जेरदस्तींत आणिले. हें जाणोन त्यांणीं सर्व जमेतीनसी लढाईस निघाले. युद्ध तारफेचें जहालें. **बाजी मारिले** व कितेक खासे लोक पडले. या प्रकारें तो प्रसंग करून लुटून फस्त केले. मत्ता बहूत लागली. पुन्हां आपलेसे करून मुधोळ पंचमहाल आपलासा करून स्थापिले. यानंतर खवासखान पुढें आला पाहून त्याजवर चाल केली. ते मारीत लुटीत गर्दी केली. खटा होऊन पळू लागले; ते विजापुरास पावविले. यानंतर सावंताचा निशाच करावा म्हणोन त्या प्रांतांत शिरलों. तेहि येऊन पावले मुलूख तळपट करीत चाललों. ठाणी किले तमाम घेतले. सावंत दमोन गेले. गोमंतकराचा आश्रय निघोन फोंड्याचा किल्ला भांडूं लागला. त्यास सुरुंग लावून बुरूज उडवून बळानें घेतला. याप्रमाणें एकंदर तें संवस्थान घेतलें. यानंतर फिरंगी याजवर शह देऊन त्याचा प्रांत मारीत चाललों. त्यांणीं तह करून तोफा नजराणा पाठविला. सावंत यास तेथे दम न निघे. टोपीकार यास धार न पडे. त्याजवरून पितांबर शेणवी कारभारी वकील पाठविले. आपण सावंत भोसले कुळीचे, आपले पुत्र आहों, सर्फराज करून देसगतीच्या वतनाची सेवा घेऊन प्रांताचा ठराव निमे ऐवज फौजेनशी चाकरी करितों; त्यास निमे ऐवज व निमे ऐवज सरकारांत वसूल घ्यावा ऐसे करून घेतलें. त्याप्रमाणें **स्वामीचें** पुण्यप्रतापें करून आज्ञेप्रमाणें घडून आलें. तें कळावें म्हणोन लिा हे विज्ञापना. मोर्तब.

नागरी प्रचारिणी भा. } (१०४२) { श. १५८७
श. १८४५ } शिवाजी—जयसिंग { इ. १६६५

हे श्रेष्ठ सरदारा, तुझ्यामुळें रजपुतांची मान उन्नत आहे. तुझ्यामुळें बाबरवंशाची राज्यलक्ष्मी अधिक प्रबल झाली असून तुझें सहाय तिला मिळत आहे. हे प्रबल व प्रौढ

जयशहा ! 'सेवाचा' (शिवाजीचा) प्रणाम व आशिर्वाद स्वीकार. परमेश्वरानें तुझें रक्षण करून तुला धर्माचा व न्यायाचा मार्ग दाखवावा. मीं असें ऐकिलें आहे कीं, मजवर हल्ला करण्यासाठीं व 'दख्खण' जिंकण्यासाठीं तूं आला आहेस. हिंदूंचें हृदय व नेत्र यांच्या रक्तानें तूं जगांत यशस्वी होऊं पहात आहेस. पण तुझ्या हें लक्षांत आलें नाहीं कीं, यानें तुझ्या तोंडास काळोखी फासली जात आहे. कारण, या कृत्यानें देशावर व धर्मावर आपत्ती ओढवली आहे. जर तूं क्षणमात्र अंतर्मुख होऊन आपल्या हाताकडे व झग्याकडे विवेक-दृष्टीनें पाहशील तर हा रंग कोणाच्या रक्ताचा आहे व या रंगाचा रंग इहपरलोकीं काय होणार हें तुला समजेल. जर तूं आपणहून दक्षिणदेश जिंकण्यास आला असतास तर माझें शीर व डोळे तुझ्या रस्त्यावर बिछान्याप्रमाणें पसरले असते; मी तुझ्या घोड्या-बरोबर मोठी सेना घेऊन आलों असतों आणि देशाच्या एका टोकापासून दुसऱ्या टोंका-पर्यंतची भूमि तुला जिंकून दिली असती. पण तूं सज्जनांना फसविणाऱ्या औरंगजेबाच्या थापास भुलून इकडे आला आहेस. तेव्हां या वेळीं तुझ्याशीं कोणता डाव खेळावा हें मला समजेनासें झालें आहे. जर तुला सामील व्हावें, तर त्यांत मर्दपणा नाहीं; कारण मर्दलोक प्रसंगाची सेवा करीत नाहींत. सिंह कधीं भित्रेपणा दाखवीत नाहीं. बरें, जर मी तरवार व कुऱ्हाड यांचा उपयोग केला तर दोनहि बाजूंनीं हिंदूंचींच हानी होणार. मोठ्या दुःखाची गोष्ट ही आहे कीं, मुसलमानांचें रक्त पिण्याखेरीज इतर कामासाठीं माझ्या तरवारीस म्यानांतून बाहेर पडावें लागेल ! जर या लढाईसाठीं स्वतः तुर्क आला असता तर आम्हां वीरपुरुषांना घरबसल्या शिकार लाधल्याप्रमाणें झालें असतें. पण जेव्हां अफजलखान व शाइस्ताखां यांच्या हातून काम झेपत नाहीं असें दिसलें तेव्हां तुला आम्हांशीं युद्ध करण्याकरितां नेमलें आहे. कारण स्वतः औरंगजेब आमचा मारा सोस-ण्यास समर्थ नाहीं. हिंदूलोकांत कोणी बलशाली राहूं नये आणि सिंहांनीं आपसांत लढून घायाळ व श्रांत व्हावें आणि गिधाडांना जंगलाचें स्वामित्व प्राप्त व्हावें, अशी औरंग-जेबाची इच्छा आहे. ही गूढ नीती तुझ्या ध्यानांत येत नाहीं. यावरून त्याच्या जादूनें तुला भूल पाडली आहे असें प्रत्ययास येतें. तूं जगांत बरे वाईट पुष्कळ प्रसंग पाहिले असशील; बागेंत तूं फुलें व कंटक या दोहींचाहि संचय केला असशील; पण आम्हां लोकांशीं युद्ध करून हिंदूंचें शीर धुळीस मिळविण्याचें काम मात्र तूं करूं नये. प्रौढ वयांत अल्लडपणा न करतां सादीच्या या वचनाचें स्मरण कर. "सर्वच ठिकाणीं घोडा फेकतां येत नाहीं. कधीं कधीं ढाल फेंकून पळून जाणें योग्य असतें." व्याघ्र, मृगादि प्राण्यांवर व्याघ्रता करतो; पण सिंहाबरोबर गृहयुद्ध करण्यास प्रवृत्त होत नाहीं. जर तुझ्या तीक्ष्ण तरवारींत पाणी असेल व घोड्यांत दम असेल तर **हिंदू-धर्माच्या शत्रूंवर हल्ला करून इसलामाचें जड मूळ खोदून टाक**. जर या देशाचें राज्य दारा शिकोह यांस मिळालें असतें तर आम्हां लोकांवर त्यांनीं कृपा, अनुग्रह केला असता. पण तूं जसवंत-

सिंहास[1] दगा दिलास व उच्चनीच यांची पारख तुला करतां आली नाहीं. आजवर किर-कोळ शत्रूंशीं गांठ पडल्यामुळें तुझा दम कायम राहिला आहे. परंतु तूं आतां सिंहाशीं युद्ध करण्याची धिटाई करून आला आहेस. एवढ्या धावपळीनें तुला काय मिळत आहे! तूं मृगजळाच्या मागें धावत आहेस. एखाद्यानें फार परिश्रम करून एखादी सुंदरी हस्तगत करावी आणि ती आपल्या शत्रूच्या स्वाधीन करावी, अशा तुच्छ व्यक्तीसारखा तूं आहेस! तूं या नीचाच्या कृपेचा काय अभिमान धरतोस? जुझारसिंहाच्या कामाचा परिणाम काय तुझ्या लक्षांत नाहीं[2] ?

कुमार छत्रसाल[3] यांजवर तो कशा प्रकारची आपत्ती आणूं पहात होता, हें तूं जाणतोस. या खेरीज इतर हिंदुलोकांवर या दुष्टाच्या हातानें काय काय अनर्थ आले आहेत हेंहि तुला माहीत आहे. इष्ट हेतु साधण्यासाठीं तो बापाचा व भावांचा खून पाडण्यास भीत नाहीं. राजभक्तीची सबब सांगत असशील तर तूं शहाजहानशीं कसें वर्तन केलेस यांचें स्मरण कर. जर विधात्यानें तुला अकलेचा अंश दिला असेल व मर्द-पणाची चाड असेल तर तूं आपल्या जन्मभूमीच्या संतापांत आपली तरवार तापीव व अत्याचाराच्या दुःखानें पडणाऱ्या आसवांनीं तिला पाणी दे. हा प्रसंग आम्हीं लोकांनीं आपसांत लढण्याचा नाहीं. कारण, हिंदुलोकांवर या वेळीं मोठें कठिण कार्य येऊन पडलें आहे. आमचीं पोरेंबाळें, देश, धन, देव व पवित्र देवपूजक या सर्वांवर त्याच्यामुळें पराकाष्ठेचें दुःख कोसळलें आहे; आणि हाच क्रम आणखी कांहीं दिवस चालेल तर आम्हां हिंदुलोकांचें चिन्ह देखील पृथ्वीवर राहणार नाहीं! **मूठभर मुसलमानांनीं आमच्या एवढ्या देशावर प्रभुत्व गाजवावें ही मोठ्या आश्चर्याची गोष्ट आहे. पण हें प्रभुत्व त्यांच्या पराक्रमाचें फळ नव्हे.** जर तुला अकलेचे

---

१ शहाजहानचा सर्वांत वडील मुलगा दारा शिकोह हा अकबराप्रमाणें हिंदुमुसल-मानांना समतेनें वागवावें या मताचा होता. जेव्हां त्याचा श्यामगडच्या लढाईंत पराभव झाला तेव्हां तो सिंध प्रांतांतून जसवंतसिंहाच्या संमतीनें अजमीरास आला. परंतु जय-सिंहानें पत्र पाठवून जसवंतसिंगाचें मन कलुषित केल्यामुळें दारास अजमीर येथें सहाय मिळूं शकलें नाहीं व औरंगजेबानें शेवटीं त्याचा पराभव केला.

२ ओडशाचा राजा जुझारसिंह बुंदेला यानें जहांगीर व शहाजहान यांची इतकी एकनिष्ठपणें सेवा केली होती कीं त्याला 'राजा' ही पदवी व चार हजारांची मनसब मिळाली. परंतु औरंगजेबानें पुढें त्यास क्षुल्लक कारणावरून पदच्युत केलें व जुझार-सिंहास जंगलांत वणवण करीत फिरावें लागलें!

३ छत्रसालाचा बाप चंपतराय यानें औरंगजेबास पुष्कळ सहाय दिलें होतें. परंतु पुढें किरकोळ कारणावरून वैमनस्य येऊन चंपतरायास आत्महत्या करावी लागली. नंतर छत्रसालानें शिवाजीची मदत मागितली.

डोळे असतील तर पहा. आम्हा बरोबर तो कशा गोड गोष्टी बोलतो; व चेहऱ्यावर कसकसे रंग आणितो; आमच्या पायांत आमचीच बेडी अडकावतो व आमच्याच तरवारीनें आमचीं शिरें कशीं कापतो तें लक्षांत घ्या. **आम्ही लोकांनीं या वेळीं हिंदू, हिंदुस्थान व हिंदूधर्म यांच्या संरक्षणार्थ फार जोराचे प्रयत्न केले पाहिजेत.** तरवारीस पाणी देऊन (जशास तसें या न्यायानें) **तुर्कांचा जबाब तुर्कीतच दिला पाहिजे.** जर तूं मारवाडचा राजा **जस**वंतसिंग व मेवाडचा राणा **राज**सिंह यांच्याशीं ऐक्य करशील तर फार मोठें काम होईल अशी आशा आहे. चोंहीं-कडून उठावणी करून तुम्हीं या सर्पाचें डोकें दगडांनीं ठेंचून टाका; म्हणजे कांहीं काळ-पर्यंत तरी त्याला दक्षिण प्रांतांत आपलें जाळें पसरतां येणार नाहीं. तेवढ्यांत 'मी व माझे भालेबहाद्दर वीर विजापूर व गोवळकोंडा येथील दोनहि बादशहांना जिंकतो. मेघा-सारखी गर्जना करणाऱ्या सैन्यानिशीं मुसलमानांवर तरवारीचा पाऊस पाडीन आणि **सर्व दक्षिण देशांच्या पटावरून इस्लामाचें नांव किंवा चिन्ह धुवून टाकीन.** त्या नंतर कार्यदक्ष वीर व भाला चालविणारे घोडेस्वार यांना बरोबर घेऊन प्रचंड लाटा व कोलाहल माजविणाऱ्या नदीप्रमाणें दक्षिण देशांतील पहाडांतून बाहेर पडून मैदानांत येईन; आणि अत्यंत जलदीनें तुम्हा लोकांच्या सेवेस हजर होईन; व तुम्हांस हिशेब विचारीन. चोंहीकडून भयंकर युद्ध उपस्थित करून रणांगणांत दंगल माजवून आम्ही लोक आमच्या सेनेच्या लाटा दिल्ली येथलि त्याच्या जर्जर झालेल्या घरांत पोहचवूं. म्हणजे त्याच्या नांवाचें **औरंग**हि (राजसिंहासन) राहणार नाहीं व **जेब** (शोभा)हि राहणार नाहीं. तसेच त्याची तरवार राहणार नाहीं व कपटाचें जाळेंहि राहणार नाहीं. **शुद्ध रक्तानें भरलेली नदी वाहवून आम्ही आमच्या पितरांच्या आत्म्याचें तर्पण करूं.** हें काम कांहीं फार कठीण नाहीं. फक्त **हृदय व डोळे आणि हात यांची आवश्यकता आहे.** दोन अंतःकरणें एक होतील तर पहाड तोडतां येईल व मोठ्या सैन्याच्या समूहाच्या ठिकऱ्या उडवितां येतील. या विषयासंबंधीं मला तुझ्याशीं फार बोलणें चालणें करावयाचें आहे; तें पत्रीं लिहिणें सयुक्तिक नव्हे. तूं म्हणशील तर मी समक्ष तुझ्या भेटीस येईन; माझा बेत तुला कळवीन. तरवारीची शपथ, घोड्याची शपथ, देशाची शपथ व धर्माची शपथ घेऊन मी सांगतों कीं, असें करण्यानें तुझ्यावर आपत्ती येणार नाहीं. **अफ**जलखानाचा शेवट कसा झाला हें लक्षांत आणून तूं शंकित होऊं नको. त्यानें बाराशे लढवय्ये हबशी माझा घात करण्यासाठीं ठेवले होते. त्याच्यावर मी प्रथमच हात चालविला नसता तर या वेळीं हें पत्र तुला कोणी लिहिलें असतें ? मला तुझ्यापासून अशी भीति नाहीं. कारण, तुझ्या माझ्यांत कांहीं शत्रुत्व नाहीं. जर मला माझें उत्तर अनुकूल आलें तर रात्रीं मी एकटा तुझ्या भेटीस येईन. **शाइस्तेखानाच्या खिशांतून मीं जें पत्र काढून घेतलें आहे तें गुप्त पत्र मी तुला दाखवीन.** तुझ्या डोळ्यावर संशयाचें पाणी शिंपडून तुझी सुखनिद्रा नाहींशी करीन. तुझ्या स्वप्नाचा

खरा खरा फलादेश करून नंतर तुझा जबाब घेईन. जर या पत्राचें उत्तर माझ्या मना-जोगें न येईल तर मी आणि माझी तीक्ष्ण तरवार आहे व तुझी सेना आहे. उद्यां सूर्य आपलें मुख संध्याकालांत लपवील तेव्हां माझा अर्धचंद्र (तरवार) म्यानांतून बाहेर पडेल. बस्स. कल्याण असो.

इं. फॅ. १२ पृ. ३, ४, १० इ.	(१०४३) सुरत—कंपनी	श. १५८७ चैत्र शु. ६ इ. १६६४ मार्च १२

शिवाजीनें हुबळी लुटल्यामुळें मिऱ्यांचा व्यापार बसला आहे. दख्खनचा सुलतान कुलवान् अगर शूरहि नाहीं; शिवाय तो शिवाजीला आपल्या मुलखांत कांडीचाहि विरोध न करितां स्वैरपणें लूट करूं देतो; त्यांत याचाहि हिसा असला पाहिजे असा तर्क करण्यास लोकांना फावावें अशा त्याच्या ह्या अस्वाभाविक वर्तनामुळें त्याला कोणीच मानीत नाहीं. व्यापारी वर्ग स्वसंरक्षणाकरितां इतस्ततः पळत सुटल्यामुळें सर्वत्र अंदाधुंदी माजून व्यापार नष्टच झाला आहे.... शिवाजीची सत्ता व सामर्थ्य वाढत असून सर्वांना त्याचें भय वाटतें. सुरतेच्या पाठोपाठ अनेक ठिकाणीं त्यानें लुटालूट केली असून आज त्याच्या ताब्यांत कांहीं नाहीं तरी ८।९ महत्त्वाचीं बंदरें आलीं आहेत. या प्रत्येक बंदरांतून इराण, बसरा, मक्का या बाजूला त्याचीं निदान २।३ गलबतें व्यापारानिमित्त बाहेर पडतात. ही एक आपल्याला चांगली संधी असून १५० टनांचीं दोनचार गलबतें समुद्रावर सोडल्यास त्यांकरवीं यांना पकडून आमच्या हक्कांची भरपाई करून घेतां येईल. याचा विचार केला पाहिजे.

इं. फॅ. १२ पृ. ७७-७९ इ.	(१०४४) कारवार (मास्टर)—सुरत प्रेसिडेंट.	श. १५८७ चैत्र शु. ८ इ. १६६५ मार्च १४

फेब्रुवारीच्या आरंभीं ८५ लहान व ३ मोठीं गलबतें घेऊन शिवाजी मालवणांतून बाहेर पडला, तो गोव्यावरून कांहींहि विरोध झाल्याशिवाय **बार्सिलोरपर्यंत** जाऊन, तें बंदर लुटून, **गोकर्णाला** परत आला. तेथें तीर्थयात्रा संपादून ४००० पायदळासह तो अंकोल्याला गेला. तेथून सर्व आरमार पाठवून देऊन, जमिनीवरून स्वदेशांत जातांना वाटेंत लागणाऱ्या नद्या तरून जाण्यापुरतीं १२ छोटीं तरांडीं त्यानें राखून ठेविलीं. **२२ फेब्रुवारीला तो कारवारला** आला; परंतु हेरांकडून आधींच बातमी कळल्यामुळें आम्हांला सावध होऊन एका गलबतावर माल भरून सुरक्षित राहतां आलें. शिवाजीचें मोठें आरमार आदल्या दिवशींच निघून गेलें होतें. आणि तशीच जरूर वाटल्यास गलबत हाकारून आम्हांला वाटेल त्या बंदरांत नेऊन सोडण्याचें त्या गलबतवाल्या मस्कतच्या इसमानें आम्हांला वचन दिलें होतें. आम्हीं गलबतावर चढलों, त्याच रात्रीं बहलोल-खानाचा दुय्यम शेरखान तेथें आला. त्याला शिवाजीबद्दल आधीं खबर नव्हती. तो

बहलोलखानाच्या आईला मक्केला जाण्यासाठीं रुस्तुमजमाचें एकादें गलबत भाड्यानें ठरवून देण्याकरितां आला होता. त्यानें खाडीचें रक्षण करण्याची कामगिरी आम्हांला सांगून थोड्या वेळांत जमली तितकी आत्मरक्षणाची तजवीज केली; व शिवाजीला आपल्या येण्याची बातमी देऊन शहरांतून न जाण्याबद्दल ताकीद पाठविली. शेरखानाचें धन्याशीं असलेलें वजन व बहलोलखानाची त्या प्रांतांतील जबरदस्ती लक्षांत घेऊन नाइलाजानें शिवाजीनें त्याचें सांगणें मान्य करून तो शहरांत न जातां खाडीच्या मुखाशींच येऊन उतरला. आमचें गलबत व कोंगदेशचें एक गलबत अशीं दोन गलबतें त्याला विरोध करण्याच्या तयारीनें खाडींत नांगरून पडलीं आहेत, ही बातमी समजतांच शिवाजीनें 'आपण शहर सोडून देऊन सूड घेण्यास मुभा करून द्यावी. नाहीं तर हीं गलबतें आमचे स्वाधीन करावीं.' असा शेरखानास निरोप पाठविला. तो त्यानें आमचेकडे कळविल्यावर आमचे गलबतांत फक्त दारूगोळा आहे असें आम्हीं सांगून पाठविलें. हें ऐकून रागास येऊन, निघून जाण्याचे पूर्वी समाचार घेण्याची गोष्ट तो बोलूं लागला. हें सुभेदाराचे कानावर जातांच त्यानें सर्व व्यापाऱ्यांकडून त्याला नजराणा देववून लावून देण्याचें ठरविलें. त्यांत आम्हांलाहि आमचा वांटा भरणें इष्ट, असा मालमत्तेच्या रक्षणाकरितां विचार करून, जवळ जवळ ११२ पौंड देण्याचें आम्हीं कबूल केलें आहे. ही खंडणी घेऊन 'माझी होळीची शिकार शेरखानानें घालविली' अशी कुरकुर करीतच तो २४ फेब्रुवारीला निघून गेला. बहुधा होळीच्या सुमारला तो अशी लूट करितोच.

हुबळीला देखील शिवाजीचें भय आहे अशीं पत्रें आलीं आहेत. हुबळी किंवा कारवार यांपैकीं कोठेंच सुरक्षितपणा नसून आम्हीं बंकापूरला सरसुभेदार शेरखान याचा कौल घेऊन जाऊन रहाणार आहोंत. कारण (१) शेरखान वचनाला जागतो अशी त्याची कीर्ति आहे; (२) तो पैसे देण्यांत चोख आहे अशीहि त्याची ख्याती आहे; (३) आणि बंकापूर मोठें मजबूत स्थान असून तेथील अधिकारी बहलोलखान हाहि सर्व राज्यांत महाप्रबळ सरदार आहे.

शिवाजी येथून २५ मैलांवर भीमगडला [खानापूरचे नैर्ऋत्येस १६ मैल] आहे. मोंगलावर तो चालून जाईल असें म्हणतात. मोंगल दर दिवशीं विजापुरच्या जवळ जवळ जात असून तेथील शहा फार भेदरून गेला आहे.

सां. इ. सा. ले. १० सु. १०६५ हि. १०७५ रम ९	(१०४५) फर्मान	श. १५८७ चैत्र शु. ११ इ. १६६५ मार्च १७

विजापूर बादशहा—लखम सावंत भोसले सरदे. पो कुडाळ

तुमचा वकील पितांबर शेणवी दयानंदराव मजलिसी याजबरोबर आला. त्याचे अर्जावरून तुम्हास वस्त्रें पाठविलीं आहेत. वतनमिरासहि लवकरच पावाल.

हि. रे. क. ९ } (१०४६) { श. १५८७ चैत्र शु. १४
पृ. ११२ इ. न्यू } पोर्तु. व्हाइ.— वसईचा कप्तान { इ. १६६५ मार्च २०

शिवाजीच्या लोकांना पोर्तुगीज प्रांतांत येऊं देऊं नका; किंवा त्यांना कोणत्याहि सवलती देऊं नका.

पिसुर्लें. शिवाजी } (१०४७) { श. १५८७ चैत्र शु. १५
पृ. १०-११ इ. मार्च ३१ न्यू. } पोर्तुगीज { इ. १६६५ मार्च २१

गोव्याचा व्हाइसराय—राजा जयसिंग

पोर्तुगीजांचे राजे व औरंगजेब यांच्यांतील संबंध शांततेचे व स्नेहाचे आहेत. पण गेल्या वर्षी लोदीखानानें हे संबंध तोडले [ले.१०३८] आमच्या मुलखांतून शिवाजीला केव्हांहि मदत अगर सवलत देण्यांत आली नाहीं. शिवाजीच्या नोकरींत कांहीं पोर्तुगीज लोक आहेत यावरून त्याला माझी संमति आहे असें म्हणतां येणार नाहीं. कारण माझ्या परवानगीवांचून मोंगलांच्या, गोवळकोंड्याच्या, कानड्याच्या आणि आदिलशहाच्या मुलखांत देखील पुष्कळ पोर्तुगीज आहेतच.

इं. फॅ. १२ } (१०४८) { श. १५८७ चैत्र व. २
पृ. ५२ इ. } गॅरी-लॉर्ड आर्लिंग्टन { इ. १६६५ मार्च २२

मुंबई व आंतील बंदरें यांमधील मालाच्या वाहतुकीवर पोर्तुगीजांनीं जकात घेऊं नये असा बंदोबस्त केला पाहिजे. तत्सिध्यर्थ प्रथम त्यांच्या गलबतांना आमच्या आखातांत वावरण्यास बंदी करावी. आमच्यापासून जवळच किनाऱ्यावर शिवाजीच्या ताब्यांत पुष्कळ बंदरें असून आपण तेथें मोकळेपणानें जाऊं शकूं; एवढेंच नव्हे तर शिवाजीला थोडीशी जकात भरली असतां हिंदुस्थान व दख्खन या उभय मार्गांतूनहि लमाणांचे तांडेहि पोर्तुगीज सत्तेच्या कक्षेंत सांपडल्याशिवाय सुखानें येऊन उतरूं शकतील. परंतु त्याच्या लुटारूपणाबद्दलच्या प्रसिद्धीमुळें त्याच्या मुलखांतून मालाची ने आण करण्यास व्यापारी तयार होतील किंवा नाहीं याची शंका आहे. त्यानें एकदां कोणतीहि शपथ घेतल्यावर ती तो धर्मबुद्धीनें पाळील असेंहि कित्येकांचें म्हणणें आहे. औरंगजेबानें त्याच्यावर सुमारें एक लक्ष घोडेस्वार पाठविले आहेत. मोंगलांचा जय होऊन आमचे बेटापासून चौलपर्यंतचा शिवाजीचा मुलूख ते घेऊं शकले तर ह्या बेटाचे दृष्टीनें तें चांगलेंच होईल. तसें झालें तर सर्व प्रकारचा माल वाटेल तितका आमच्याकडे येऊन व्यापार वाढून मुंबई बंदराची भरभराट होईल.

इं. फॅ. १२ } (१०४९) { श. १५८७ चैत्र व. ७
पृ. ७७ इ. } सुरत-कारवार. { इ. १६६५ मार्च २७

गेल्या सर्व पावसाळ्याभर शिवाजीची भीती वाटत होती. ती पुढें नाहींशी

झाली. अजूनपर्यंत आम्हीं भीतीपासून मुक्त आहों. तुमच्या बाजूकडे तो कांहीं करण्याचा संभव आहे तरी खबरदारी घ्यावी. राजा जयसिंग, अनेक उमराव व मोठें सैन्य यांचेसह येत आहे (are on their way). रुस्तुमजमा लुटीची लज्जत चाखूं लागला आहे. लवकरच त्याला ती संवय लागून जाईल ! शिवाजी इतकाच तो विश्वासास अपात्र समजला पाहिजे. कंपनीचें येणें वसूल होण्याची कांहीं आशा दिसत असली तर तुम्हांला वाटेल त्याप्रमाणें रुस्तुमजमाला नजराणा द्यावा....

इं. फॅ. १२ पृ. १२-१३ इ.	(१०५०) सुरत–कंपनी	श. १५८७ चैत्र व. १० इ. १६६५ मार्च ३१

अँटनी स्मिथ इतका धर्मलंड नीच वृत्तीचा इसम या भूतलावर दुसरा असणें शक्य नाहीं...**शिवाजी** येथें आला असतांना तो त्याच्या हातीं सांपडला होता. तेथून सुटून आल्यावर, तुमची वखार, मालमत्ता आणि सर्व नोकर लोक तो विश्वासघातानें त्याच्या हवालीं करणार होता ! शिवाजीकडे पत्र पाठविण्याचें काम ज्याच्याकडे (त्यानें) सोपविलें होतें त्यानें ह्या सर्व गोष्टी कबूल केल्या आहेत. [सदर पृ. १० इत्यादींवर अशाच प्रकारचीं स्मिथच्या गैरविश्वासूपणाचीं आणखीं उदाहरणें दिलेलीं आहेत].

जयसिंग पत्रें ११७ ए मॉ. रि. भा. २ पृ. ४ टीप.	(१०५१) जयसिंग–औरंगजेब.	श. १५८७ चैत्र इ. १६६५ मार्च (!)

प्रथम तळकोंकणच्या मार्गानें आपल्या तळाकडे जावें असा माझा बेत होता. परंतु ह्या प्रांतांत आल्यावर, **विजापूरकरांचें व शिवाजीचें आंतून सख्य आहे** असें समजलें. तळकोंकणचे रस्त्यानें गेलें तर विजापुरकरांचा मुलूख लांब राहून, विजापुरकर आणि शिवाजी एकत्र मिळण्याचा संभव होता. तसें झालें तर सर्व सावधगिरी निरुपयोगी झाली असती. यामुळें सैन्य सासवडलाच ठेवण्याचें ठरविलें. शिवाजीचा पुरंधरगड आणि इतर मुलूख याला हें ठिकाण जवळ असून शिवाय विजापुरकरांच्या मुलखालाहि दूर नाहीं.

पिसुर्ले. शिवाजी. पृ. १५ इ. एप्रि. १६ न्यू.	(१०५२) पोर्तुगीज	श. १५८७ वैशाख शु. १ इ. १६६५ एप्रील ६

पोर्तुगीज व्हाइसराय–**शिवाजी**

पूर्वापार वहिवाटीप्रमाणें गोव्याकडे येणाऱ्या बैलांना तुमचे अधिकारी बंदी करतात; या त्यांच्या गैरवर्तनाविषयीं मीं पूर्वी तुम्हांस लिहिलेंच आहे. यानंतर कानडा प्रांतांतून गोव्याकडे येणारा तांदूळ ताब्यांत घेण्यासाठीं तुमचीं ९ जहाजें मुरगांव बंदराकडे आलीं व परत जाऊं लागलीं; यामुळें आम्हांस कांहीं लढाऊ जहाजें तेथें पाठविणें भाग पडलें;

त्यांनीं तुमचीं जहाजें धरून आणून या बंदरांत ठेवलीं. परंतु तुमच्या स्नेहसंबंधाकडे लक्ष देऊन मीं तीं जहाजें जाळण्याचा हुकूम न सोडतां त्यांना परत जाण्यास मोकळीक दिली.

जयसिंगपत्रें— मॉ. रि. भा. २ पृ. ४ टीप	(१०५३) जयसिंग—औरंगजेब	श. १५८७ इ. १६६५

जावळीचा जुना जमीनदार चंद्रराय आणि त्याचा भाऊ यांना मीं बोलावणें पाठविलें आहे. ... त्यांना पुष्कळ अभिवचनें देऊन पाथेयाचीहि तजवीज केली आहे. अंबाजी, खारकुली (मोरे?) व त्यांचे दोन भाऊ हे सर्व पुरंदरावर शिवाजीनें तोफा ओतण्याकरितां ठेविले असून त्यांना ३००० ची मनसबदारी आहे. त्यांच्याकडेहि माझे दूत गेले आहेत. अफजलखानाच्या मुलाला 'बापाचा सूड उगविण्याकरितां मोंगली नोकरींत ये' असें कळविलें आहे. कदाचित् शिवाजीचे कांहीं जोडीदारहि आमच्याकडे फुटून येतील. आतां या लोकांना मनसबा आणि जहागिरी द्याव्या लागतील. त्याबद्दल तुमचें मत काय आहे ?

जयसिंगपत्रें ११९ बी-१२० बी. मॉ. रि. भा. २ पृ. ५	(१०५४) जयसिंग—औरंगजेब.	श. १५८७ इ. १६६५

सैन्यांतील लोकांचें बरें वाईट करणें सेनापतीच्या हातीं पाहिजे. शाहिस्तेखान सुभेदार झाल्यापासून सैन्याचे पगार, नेमणुका, व बदल्या कारकुनांच्या हातीं गेल्यामुळें शिपायांना युद्धभूमी सोडून त्यांच्याकडे धावावें लागतें. शिपायाची हजेरी व काम सेनापतीला माहीत असावयाचें; परंतु त्याचे हातीं बक्षीस देणें किंवा शिक्षा करणें यापैकीं कांहींच नाहीं ! ...तरी हे सर्व अधिकार, जहागिरी बहाल करण्याचें सुद्धां माझे हातीं असावे.... नेहमीं शहाजाद्याकडे जावें लागतें तें बंद व्हावें. तसें झालें म्हणजे सर्वांची शेंडी माझे हातीं आहे याची जाणीव होईल आणि सर्वजण मनासारखीं कामें करूं लागतील. हें करणें तुम्हांला मान्य नसेल तर हें पत्र गुप्त ठेवावें. नाहींतर माझा आब जाईल.

हि. रे. क. ९ पृ. ११२ इ.ए.१८ न्यू.	(१०५५) पोर्तु. गव्ह.— वसईचा कप्तान.	श. १५८७ वैशाख शु. ३ इ. १६६५ एप्रील ८

मोंगलाचें प्रकरण सध्यां मोठें गुंतागुंतीचें झालें आहे. त्यांत आज जरी संकट नसलें तरी त्याचा बारकाईनें विचार केला पाहिजे. त्यांचा संबंध तुटतां कामा नये किंवा आमच्या मनांत संशय आहे हेंहि दिसूं देऊं नये. आम्हीं शिवाजीला मदत करतों असें त्यांना वाटतें तो संशय घालवावा. पण संशय येऊं न देतां तुम्ही पैसे घेऊन शिवाजीला दारू व अन्न पोचवाल तर बरें. कारण मोंगलानीं शिवाजीचा मुलूख व्यापणें इष्ट नाहीं. पण शिवाजीशीं ठेवावयाचा संबंध फार गुप्त प्रकारचा असावा. तुम्ही शिवाजीसहि असें

कळवा कीं, तुम्हांस आमच्या आश्रयास यावयाचें असेल तर चौलास न येतां गोव्याकडे यावें; यांत सुरक्षितपणा अधिक आहे.

फ्रिंच मॅन्यु. भा. १ पृ. ३६६ इ. (१०५६) श. १५८७ वैशाख शु. १० इ. १६६५ एप्रिल १४

कॉन्सल लॅनॉय (आलेपो)—अर्ल ऑफ विंचिलझिया.

सुरतेच्या प्रेसिडेंटचें पत्र आलें आहे कीं, शिवाजीपासून सुरत सुरक्षित आहे. परंतु मोंगलांच्या मुलखांत तो स्वैर संचार करून कित्येक शहरें लुटीत आहे. बादशहाचें बडें सैन्य त्याच्यावर आलें असतांहि वाटेंत शत्रुविरुद्ध नाकेबंदी करीत करीत तो थेट गोव्यापर्यंत किनाऱ्यानें जाऊन आला. मोंगल विजापुरावर मोठें सैन्य पाठवीत आहे. प्रथम शिवाजीच्या त्रासाला कंटाळून विजापुरकरांनीं हिंदुस्थानचे बादशहाला साहाय्यार्थ बोलाविलें असतां त्यानें शिवाजीपासून आदिलशाही भयमुक्त केल्यामुळें आतां आदिलशहानें मोंगलांच्या बंधनांतून आपली सुटका करून घेऊन उलट शिवाजीला मदत देण्यास सुरवात केली आहे. रणांगणावर प्रत्यक्ष सैन्य न पाठवितां शिवाजीला गुप्त रीतीनें द्रव्य साहाय्य देऊन, शिवाजी म्हणजे मोंगली सत्तेला थोपवून धरणारी सत्ता आहे अशा भावनेनें, शिवाजी आणि मोंगल यांचें युद्ध झुंपवून देण्याची आदिलशहाची कारवाई पाहून मोंगल फिरून विजापूरकरावरच उठला आहे. बादशाही सैन्य न जाणों आपल्यावर घसरेल अशा भीतीनें गोवळकोंडेकरानेंहि सरहद्दीवर सैन्याची मोठ्या प्रमाणावर जमवाजमव केली आहे.

सां. इ. सा. ले. ११ सु. १०६५ हि. १०७५ जिल्काद २० (१०५७) विजा. बाद. फर्मान श. १५८७ ज्येष्ठ व. ७ इ. १६६६५ मे २६

लखम सावंत सरदेसाई परगणे कुडाळ यास.

पितांबर शेणवी तुमचा वकील यानें दियानतराव याचे विद्यमानें येऊन अर्ज केला कीं, तुम्ही पुरातन बादशहाचे चाकर आहां व हरएक सुभेदार होऊन तळ कोंकणांत येतात त्यास मिळून त्याच्या आज्ञेप्रमाणें शिवाजीपाशीं लढतां. पेशजी शिवाजीनें परगणे मजकूर येथें आपला अमल बसवून तुम्हांस परागंदा केलें. आणि सरदेसकतीचें काम कृष्ण सावंत करीत आहे. त्यास कृपा करून आज्ञा व्हावी म्हणून एक महमद इखलासखां वजीर यांस परगणे मजकूर व महालानिहाय येथील सरसुभेदारी श्रीपतराव मजलसी यास कारभार देऊन पाठविले आहेत. त्यास तुमच्या कामाविषयीं सरसुभेदार व मजलसी यांस आज्ञा जाहली आहे. तर तुम्ही कोणे गोष्टीविषयीं दिकत न घेणें. मिरास करार करून दिली असे. सरसुभेदार यांस भेटून परगणे मजकुराचा बंदोबस्त करून चाकरीस हजीर राहणें. तुम्हांवर कृपा होईल आणि तुम्ही आपले लष्कर घेऊन सरसुभेदार यांजकडेस

येणें. दर असामीस रोजमुरा ३ तीन होनु, मजलास होईपर्यंत दरमहा देत जाणेंविषयीं त्यांस ताकीद असे. आज्ञापत्र बरहुकूम चालणें.

श्री. व. ६ पृ. ७४ ले. ८
सु. १०६६ जिल्हेज ६ फसली १०७५ } (१०५८) { श. १५८७ आषाढ शु. ८
इ. १६६५ जून १०

जाधवराऊ राजे गणेश विठ्ठल दीक्षित तीर्थोपाध्ये ससशृंग तुम्ही प्रत्यहीं श्रीस ससशतीचें एक आवर्तन करीत जाणे. तुम्हास प्रतिवर्षी २० रु. देत जाऊं.

स. १४२ ले. ३०
जेधे शका. } (१०५९)
उल्लेख { श. १५८७ आषाढ शु. १०
इ. १६६५ जून १२

महाराज राजश्री थोरले कैलासवासी स्वामींनीं मिरजा राजास भेटले, ते समयी मौ. पांगरे तर्फ नीरथडी प्रांत पुणे येथें १ चावर जमीनीची आपली व मिर्जा राजाचीं पत्रें करून दिलीं.

डाग रजिस्टर
पृ. १४२ जून २२ न्यू. } (१०६०) { श. १५८७ आषाढ. शु.१०
इ. १६६५ जून १२

आमचें मागलें पत्र रवाना झाल्यानंतर शिवाजीनें डचांचा माल लुटला व काशीबा आणि संतुबा शेणवी–यांना पूर्वी शिवाजीनें कौल दिला होता–यांचें जहाज लुटलें, व तो आतां खारेपाटणांत जाऊन बसला आहे. तो लुटीतच जातो; पण अधिक पैसा देऊं केल्यास कौल देऊन आपणास बांधून घेतो. विजापूरच्या बादशहानें लखम सावंत याजकडे वेंगुर्ल्याच्या संरक्षणाचें काम सोंपविलें; पण त्यानें शिवाजीपेक्षां लोकांवर अधिक जबरदस्ती व दांडगाई केली. यामुळें सुरक्षितपणासाठीं डच रेसिडेंटला माल घेऊन गोव्यास जावें असा सल्ला मिळाला व पोर्तु. व्हाइस-नें यासाठीं जागाहि दिली.

डाग रजि. जून २२ न्यू.
पृ. १४१ व पृ. १४३ } (१०६१) { श. १५८७ आषाढ शु. १०
इ. १६६५ जून १२

(पृ. १४१) शिवाजीच्या भीतिमुळें व्यापार मंदावला व सुरक्षितपणा वाटेना म्हणून डच अधिकाऱ्यानें सुरतेहून वेंगुर्ल्याकडे कांहीं माल व खजीना (५ हजार होन) रवाना केला.

(पृ. १४३) डच रेसिडेंटनें वेंगुर्ला येथलि वखारीची जागा मजबूत करण्यासाठीं जास्ती ९ डच व ९ इतर शिपाई नोकरीस ठेविले आहेत. हे शिपाई, कांहीं आरबी व्यापारी, थोडे खिस्ती व कांहीं इतर रहिवाशी इतक्यांना मिळून शिवाजीच्या हल्ल्यास तोंड देतां येईल अशी त्यांची समजूत आहे.

शि. प्र. पृ. १७ } (१०६२) { श. १५८७ आषाढ व. ३
सु. १०६६ जिल्हेज १६ } कबूलकतबा. { इ. १६६५ जून २०

चिलोजी कोपर्डा प्रज कसबे वाळवे—— संभट गोसावी (ले. ३३७ प्रां).

डाग राजि. १६६५ } (१०६३) { श. १५८७ आषाढ व. १२
जुलै ९ न्यू. } { इ. १६६५ जून २९

[पृ. १६५] सुरतेच्या बंदरास आण्यासाठीं इस्पहानहून गंब्रून बंदरांत जाण्यास युरोपियन प्रवासी तयार होते. पण ही बातमी शिवाजीला कळली असती तर तो त्यांना पकडून लूट म्हणून धरून नेऊं शकला असता.

[पृ. १६६] रेसिडेंट लींडर्स (वेंगुर्ले)—बटेव्हिया. शिवाजीचा लूटमारीचा क्रम पूर्ववत् चालू आहे. मागलें पत्र रवाना झाल्यानंतर त्यानें कामडा प्रांतावर हल्ला करून ८० हजार गिल्डरची लूट मिळविली. त्याचप्रमाणें डच कंपनीसाठीं माल खरेदी करावा म्हणून काशीबा व संतुबा शेणवी या वेंगुर्ल्यांच्या प्रसिद्ध व्यापाऱ्यांनीं पाठविलेले ५०० होनहि त्यानें लुटले.

भांडार. कॉमे. व्हॉ. } (१०६४) { श. १५८७ आषाढ
सरकार-पृ. २९५ } जयसिंग—औरंगजेब. { इ. १६६५ जून

मीं एकहि किल्ला सोडण्याचें कबूल केलें नाहीं. बराच वेळ वाद झाल्यानंतर शिवाजीच्या तहाचे बाबतींत खालील कलमें ठरलीं:–(१)त्याचे तेवीस किल्ले आणि त्यांच्या खालचा चार लक्ष होन वार्षिक उत्पन्नाचा मुलूख मोंगलांना मिळावा; व (२) राहिलेले राजगड आदिकरून बारा किल्ले आणि त्यांच्या खालचा एक लक्ष होनांचा मुलूख शिवाजीकडे रहावा. आणि त्याबद्दल त्यानें औरंगजेबाची एकनिष्ठेनें चाकरी करावी. [हफ्त अंजुमान बनारस, ५५ अ, ६६ ब; सरकार पृ. १२८]

रियासत } (१०६५) { श. १५८७ आषाढ
पृ. ३०२ } दिलीरखान—शिवाजी. { इ. १६६५ जून

महालदाराबरोबर तुमचें पत्र आलें तें पावलें. मजकूर कळला. तह करण्याची तुमची इच्छाहि कळून आली. लढण्याच्या पूर्वींच तुम्ही तहाचें बोलणें करतां हें आश्चर्य आहे. अशा बोलण्याकडे लक्ष देणें, हें आमच्यासारख्या बादशाही अधिकाऱ्यास शोभत नाहीं. तुमच्या या डोंगराळ प्रदेशांत शिकार व नाच करण्यासाठीं आम्ही हिंदुस्थानांतून इतके दूर आलों आहों. आमची एवढीच इच्छा आहे कीं, तुम्ही एकदां येऊन आमच्याशीं सामना करावा. तुमच्या मुलखांत आम्ही पाहुणे आलों असतां पुढें येऊन आमचा समाचार घेण्याऐवजीं तुम्ही दूर राहतां हें योग्य नाहीं. तुमचे ते मजबूत किल्ले, गगन-

चुंबित पर्वत आणि पाताळास पोंचविणारीं खोरीं प्रत्यक्ष पाहण्याची आमची इच्छा असतां, तुम्ही तर कोठें दिसत नाहीं आणि वर तहाचें बोलणें लावतां! हा विचार तुम्ही प्रथमच केला असता तर बरें झालें असतें; आतां तरी हा विचार सुचला हें चांगलें झालें.

माडार. कॉमे. व्हॉ. सरकार-पृ. २९६ } (१०६६) जयसिंग-औरंगजेब. { श. १५८७ आषाढ इ. १६६५ जून

शिवाजीनें मोंगलांच्या प्रत्यक्ष नोकरींतून स्वतःची सोडवणूक करून घेऊन संभाजीला पाठविण्याची परवानगी घेतली. जयसिंगाला तो म्हणाला "माझ्या हातून अविचाराचीं आणि गैरनिष्ठेचीं बरींच कृत्यें इतक्यांत झालीं असल्यामुळें मला बादशाहापुढें येण्यास तोंड राहिलें नाहीं. मीं माझ्या मुलाला नोकर व बंदा होण्याकरितां पाठवितों. त्याला पांचहजारी मन्सब व खर्चाकरितां जागीर मिळेल.... मी पापी असल्यानें मनसब घेण्यास किंवा बादशाही नोकरी करण्यास नालायक आहें. परंतु दख्खनमध्यें केव्हांहि काम निघेल तेव्हां माझेवर एकादी कामगिरी सोंपविली तर ती चोख पार पाडीन."...............................आणखी शिवाजीचें बोलणें झालें तें:— "तळकोंकणांतील चार लक्ष होनांचा आणि विजापुरी बालाघाटपैकीं पांच लक्ष होनांचा मुलूख बादशहानें आपल्यास द्यावा. मोंगली सैन्य विजापुरावर चाल करून जात आहे ती कामगिरी झाल्यावर त्या प्रांताचा ताबा माझेकडेच राहील, असें बादशाही फर्मान आपल्या नांवचें मिळावें. असें होत असेल तर आपण बादशहाला १३ वार्षिक हप्त्यांनीं ४० लक्ष होन देण्यास कबूल आहों."......

यावर जयसिंगाचें म्हणणें:— "या करारामुळें तीन प्रकारांनीं फायदा होईल. एक, आपल्याला ४० लाख होन म्हणजे दोन कोट रुपये मिळतील; दुसरा, शिवाजी आणि विजापुरकर यांच्यांत वैमनस्य वाढेल; आणि तिसरा, शिवाजी ह्या डोंगराळ जंगली मुलखांचा ताबा पत्करीत असल्यामुळें विजापुरी लोकांशीं लढून तो मुलूख मोकळा करण्याची बिकट जबाबदारी त्याला पत्करणें भाग आहे. [हफ्त अंजुमान-बनारस ७०, सरकार पृ. १२८-२९]

रियासत पृ. ३०८ मॉ. रि. } (१०६७) शिवाजी—औरंगजेब { श. १५८७ आषाढानंतर इ. १६६५ जून

मी आपला गुन्हेगार व अपराधी आहें; आपणास शरण येऊन जीव व धनदौलत रक्षण करण्याची इच्छा धारण करीत आहें. इतःपर आपली नोकरी इमानानें बजावण्यास मी सदैव तत्पर राहीन; आणि आपला हुकूम पाळण्यांत मोठें भूषण मानीन. बंडाळी करून मी आपल्या सर्वस्वाचा घात कधीं करून घेणार नाहीं. मिर्झा राजा जयसिंग यांनीं सर्व वर्तमान आपणास तपशीलवार कळविलेंच आहे. मला सर्व अपराधांची क्षमा करून

जीवदान द्यावें, एवढेंच या दासाचें आपल्या चरणापाशीं मागणें आहे. बादशाही शिक्का व पंजा यांनीं अलंकृत झालेलें आपलें कृपापूर्ण फर्मान घेऊन दाखल झालें, ही आनंदाची बातमी मिर्झा राजा **जयसिंग** यानीं आम्हांस कळविली. यायोगें बादशाहांनीं मला जीवदान दिलें आहे. बादशहाकडून पोशाख आला, हें मला अत्यंत भूषण वाटत आहे. या पापी दासाचे अपराध क्षमेस पात्र नसतांहि बादशाहांनीं केवळ उदार अंतःकरणानें ही कृपा मजवर केली हें त्यांस मोठें भूषण आहे. फर्मान आल्याप्रमाणें मी आपले हुकूम पाळण्यास सदैव तत्पर राहीन. आतां मिर्झा राजाची रजा घेऊन घरीं जातों; आणि लढाईची तयारी करून फौज घेऊन विजापुरावर जाण्यासाठीं त्याच्या मदतीस येतों. या युद्धांत विशेष पराक्रम दाखवून पूर्वीचा काळिमा धुऊन काढावा अशी आशा बाळगीत आहें; आणि येणेंकरून आपल्या अनंत उपकारांची अल्प तरी फेड माझ्या हातून होईल अशी उमेद आहे.

रियासत पृ. ३०८ | (१०६८) दिलीरखान-शिवाजी | श. १५८७ आषाढानंतर इ. १६६५ जून

तुम्हांस कळविण्यास संतोष वाटतो कीं, आम्हीं विनंति केल्याप्रमाणें तुमच्या राजनिष्ठेचा बादशहांनीं स्वीकार केला आहे. इतकेंच नाहीं तर, सहा हजारांची मनसब, दोन लाख रुपये बक्षीस आणि निशाण व नौबत घेण्याची परवानगी तुमच्या पुत्रास देण्याचा हुकूम सोडला आहे. सबब हें पत्र पावतांच **संभाजीला** ताबडतोब इकडे पाठवून द्यावें. म्हणजे हुकुमाप्रमाणें त्याजला या वस्तू देण्यांत येतील. यासंबंधानें तुमच्या वकिलास बादशाहाचें परभारें पत्र गेलेंच आहे. हा आपला स्नेह व ऐक्यभाव परस्परांनीं कबूल केल्याप्रमाणें जगाच्या निदर्शनास यावा एवढीच इच्छा आहे.

डाग रजि. १६६५ पृ. १७६ इ. जुलै १८ न्यू. | (१०६९) | श. १५८७ अ. श्राव. शु. ६ इ. १६६५ जुलै ८

सुरतेचा सुभेदार **गयासदीनखान** यानें डच कंपनीच्या व्यवस्थापकास असें कळविलें आहे कीं, **शिवाजीची** समुद्रावरील सत्ता नष्ट करण्यासाठीं डचांनीं खटपट करावी. त्यावर डायरेक्टरनें कळविलें कीं, एक तर हें काम कंपनीला झेपण्यासारखें नाहीं; आणि दुसरें असें कीं, हा खर्चाचा प्रश्न आहे. दमणला वेढा दिला त्यांत कंपनीला पुष्कळ खर्च आला, त्यापैकीं १ पैसाहि भरपाई मिळाली नाहीं. तथापि सुरत व भडोच या बंदरांत कायमचा जकातमाफीचा फर्मान मिळत असेल आणि शिवाजीला नष्ट करण्याच्या कामीं लागणारा खर्च भरून मिळत असेल तर मी आमच्या बादशहाला अनुकूल सल्ला देईन. तेव्हां, 'एक महिन्यांत फर्मान आणवितों' असें डायरेक्टरला सुभेदारानें लेखी कळविलें आहे.

डाग रजि. १६६५ } (१०७०) { श. १५८७ श्रावण शु. ८
पृ. २२७ इ. आगस्ट१८ न्यू. } { इ. १६६५ आगष्ट ८

सुरत व इराण येथून आलेल्या पत्रांतील मुद्यांचा विचार करण्यासाठीं डचांची सभा भरून ठराव झाला. त्यांतलें एक कलम असें होतें:—मुसलमानांनीं नुकसान भरपाईचें बोलणें चालू ठेविलें आहे; त्याप्रमाणें त्यांनीं आमची भरपाई केली नाहीं तोंपर्यंत त्यांचा माल नेण्यासाठीं वगैरे आमच्या जहाजांची मदत मुसलमानांना देण्यांत येऊं नये; आणि शिवाजीविरुद्ध मदतीची मागणी करण्यांत आली होती ती (कांहीं सबब सांगून) 'आम्हांस देतां येत नाहीं' असें डिरेक्टरनें सांगितलें हें योग्य झालें.

डाग रजिस्टर १६६५ } (१०७१) { श. १५८७ श्रावण शु. ८
पृ. २२९ इ. आगष्ट १८ न्यू. } { इ. १६६५ आगष्ट ८

गेल्या वर्षीं बटेव्हियाहून सुरतेस आलेल्या मालाचा कांहीं भाग जकातनाक्यावर तपासणीसाठीं अधिकाऱ्यांनीं अडकवून ठेविला होता. इतक्यांत शिवाजी जवळ आल्याची बातमी आली. त्या धांदलींत डच कंपनीच्या डिरेक्टरनें तो सर्व माल नाक्यावरून कंपनीच्या वखारींत आणून ठेविला. थोड्या दिवसानंतर डिरेक्टरनें आमचा माल कोठें आहे अशी चौकशी केली; तेव्हां (नाक्यावरच्या अधिकाऱ्यांनीं) उत्तर पाठविलें कीं "तुमचा माल शिवाजीनें नेला". पण वर सांगितलेल्या कारणामुळें शिवाजीच्या लुटीनें डच कंपनीच्या मालाचें वस्तुतः नुकसान झालें नाहीं व जकातहि भरावी लागली नाहीं! पण कंपनीच्या डिरेक्टरानें आपल्या राजाकडे काय लिहून पाठविलें आहे तें मला माहीत नाहीं. [सुरतेहून ५ जानेवारीला पाठविलेल्या पोर्तुगीज पत्राचे डच भाषांतरावरून हा उतारा घेतला आहे.]

खं. २० ले. ११७ } (१०७२) { श. १५८७ श्रावण शु. ९
सु. १०६६ सफर ७ } मिसेर्ला फा. मु. मज. सी. { इ. १६६५ आगस्ट ९

अज दि० पर० वाई—ता मोक० मौ० खेड वगैरे

आपदे बिरजु चित्राव याचा वरील गावीं असलेला इनाम पूर्वीप्रो चालविणें.

हि. रे. क. ९ } (१०७३) { श. १५८७ श्रावण शु. १२
पृ. ११४ इ. आगष्ट २२ न्यू. } तालिमनामा { इ. १६६५ आगष्ट १२

वसई येथील पाद्र्यास जयसिंगाकडे वकीलीसाठीं जाण्यास पोर्तु. गव्हर्नरानें सांगितलें तेव्हां त्याला दिलेला तालिमनामा. त्यापैकीं एक कलम असें आहे:— 'शिवाजीचें व आमचें युद्ध चालू नव्हतें; यामुळें मला त्याचीं गलबतें अडकवितां येतना. परंतु शिवाजीनें आमच्या देशाकडे येण्याचा बहाणा करून वाहतुकीकरितां गलबतें नेलीं होतीं

तीं सर्व मोगल सेनापतीच्या (जयसिंग) सांगीप्रमाणें मीं परत मागविलीं. तसें केल्यानें किल्यांत रसद पोंचविणें शक्य न झाल्यामुळें, रसद पोंचून शिवाजीचे किल्ले अधिक वेळ लढले असते ते न लढतां, युद्धामध्यें ते एकामागून एक त्वरेनें हस्तगत झाले. परंतु या मित्रत्वाबद्दल उपकार मानण्याऐवजीं उलट जयसिंग तक्रार करितो ! हें बरें काय ?'

इं. फॅ. १२ }
पृ. १९-२० इ. } (१०७४) सुरत कन्सल्टेशन { श. १५८७ श्रावण शु. १४ { इ. १६६५ ऑगस्ट १४

शिवाजीच्या लुटीमुळें कंपनीची गरज भागविणारे व्यापारीच आतां टेकीस आले आहेत. यामुळें येथें व्याजानें रकम मिळणें दुरापास्त झालें आहे. ज्याला त्याला स्वतःचा व्यवहार सावरण्याकरितां पैसा पाहिजे असून परस्परांतील विश्वास साहजिकच उडाला आहे.

खं. १७ ले. १२ }
सु.[1] १०६६ सफर १४ } (१०७५) महजर (देशमुखीची अदलाबदल) { श. १५८७ श्रावण व. १ { इ. १६६५ आगस्ट १६

देशमूख तर्फ वडगांव——— बकाजी येसजी मोक. मौजे वडगाव

मौ. वडगांवचे मोकदमीस कोण्ही मिरासदार नाहीं. तरी बकाजीस आपले खुसीनें मिरासी करून दिधली असे.

इं. फॅ. १२ }
पृ. ८०-८३ इ. } (१०७६) कारवार-सुरत. { श. १५८७ श्रावण व. १० { इ. १६६५ ऑगष्ट २५

आपल्या एका मुलानें घोडदळ उभारावें अशा अटींवर रुस्तुमजमानें आपल्या मुलखाचा खालचा भाग त्याच्या हवालीं केला आहे. त्याला घोडे खरेदी करण्याकरितां पैशाची टंचाई भासल्यामुळें प्रजेकडून खंड आगाऊ वसूल करणें इत्यादि अत्याचार त्यानें चालविले आहेत. शिवाय महमदखानहि मिरजनचें बंड मोडण्याकरितां सैन्य घेऊन येत असल्यामुळें त्याची मागणी टाळण्याकरितां व्यापारी लोकांत पळापळी सुरू झाली आहे. आम्हींहि कोठेंतरी जावें म्हणतों. परंतु हुबळीचे सुभेदारावर गैरवर्तनामुळें सध्यां गैर-मर्जी आहे; बंकापूरचा बहलोलखान मेला असून शेरखानाला अदिलशहानें विष देऊन मारविलें; विजापूरवर मोंगल चालून येत असतांहि तेथील दुही कमी होत नाहीं; इत्यादि विचार करून रुस्तुमजमालाच आम्हीं ३१० होनांचा मोठा नजराणा देण्याचें ठरविलें. त्यानेंहि उलट १२५ होन किमतीचा एक जातिवंत घोडा देऊन शिवाजीनें केलेल्या लुटीच्या भरपाई दाखल १२५ छोटे होन आपल्या जकातींतून आम्हांला देऊन, यापुढें

---

१ यांत कालाचा उल्लेख सु॥ सीत सितैन अलफ सके १५८४ नंदननाम संवछरे असा आहे. सीत सितैनला शके १५८७।८८ येतात, १५८४ येत नाहीं. शिवाय नंदन संवत्सर १५८४ ला नसून १५७४ ला आहे. एकंदरींत पत्राच्या खरेपणाविषयीं शंका आहे.

चतुर्थांश जकातीची सूट कायमची दिली आहे. महमदखानालाहि त्यानें 'तुझा घोडा विकावा लागला तरी चालेल परतु इंग्रजांचें कर्ज दे;' असा कडक संदेश पाठविल्यामुळें तोहि गयावया करूं लागला आहे. आपल्या मुलाला व सर्व लोकांना आम्हांला तोशीस न देण्याबद्दल बजाऊन, आमच्या वखारी बांधून देण्याकरितां त्यानें एक अमलदारहि पाठविला आहे. त्यानें आमच्या हावेरीच्या मुक्कामांत व सर्व प्रांतभर आपल्या **पेशव्याचा मुलगा** बरोबर देऊन, मेजवान्यांची झोड उठवून आमचा उत्तम सत्कार केला……. **बहलोलखानाला** कर्नाटकच्या लढाईवरून बोलावणें गेल्यामुळें तो विजापूरला आला. परंतु ८ दिवसांत आजारी पडून मेला. त्यावेळीं त्याचा मुलगा व पुतण्या स्वतःचे ९।१० हजार घोडेस्वार घेऊन विजापुरांत होते; त्यांचा हेवा वाटून त्यांच्यांत कलागत लावण्याचा आदिलशहाचा प्रयत्न **शेरखानाच्या धोरणामुळें** यशस्वी होईना. तें पाहून **शेरखानावर** विषप्रयोग करण्यांत आला !…पुढचा पोंच न राहून **हे दोघे बहलोलखान** (मुलगा व पुतण्या) **आतां आपसांत** भांडत असतात. आदिलशहाहि त्याचा फायदा घेऊन त्यांचा देश हळू हळू काबीज करीत आहे. परंतु फार धाडस त्याला करतां येत नाहीं. कारण तेहि फार तेजस्वी स्वभावाचे आहेत. सेनापती **सैद इलियास सर्जाखान** याचा त्यांनीं बेमुर्वतपणें एक हत्ती मारला. आमचा **जुना आणि आवडता मित्र शिवाजी** कांहीं संकटांत आहे असें वाटतें. तो मागें रेटला जाऊन **राजापुरापासून** उत्तरस सात गांवावर तळ देऊन राहिला आहे. [त्याचा दक्षिणेकडील सर्व मुलूख] **खवासखानाचा भाऊ इखलासखान** यानें त्याच्यापासून जिंकून घेतला आहे. **शिवाजी** आणि नेताजी राजा जयसिंगाला (Rajah Jeswans) भेटावयास जाऊन त्यांनीं **शिवाजीचा** मुलगा ओलीस म्हणून त्याच्या स्वाधीन केला हें निश्चित आहे. कोणत्या अटीवर हें कांहीं कळलें नाहीं; परंतु **शिवाजीनें २३ किल्ले द्यावयाचे ठरलें** असून ४ किल्ले त्यानें ताब्यांत देऊनहि टाकले आहेत. राजा जयसिंगानें दहा मैल घेराच्या **पुरंदर** ह्या मोठ्या किल्ल्याला सभोंवार वेढा घालून आंतील लोकांना ४।५ दिवसहि टिकाव धरतां येणार नाहीं असा बंदोबस्त केला. पुढें त्यानें नेताजीला व शिवाजीच्या मुलाला आग्र्याकडे रवाना करून **शिवाजीला रजपुती कावा** दाखविला असें कित्येक म्हणतात. परंतु, आपला देश इतक्या गरीबीनें शत्रूच्या हवालीं **शिवाजी** करितो त्या अर्थी कांहीं विशेष घडलें असलेंच पाहिजे. विशेष माहिती काढण्याकरितां त्याच्या **पुण्याच्या** छावणीकडे आम्हीं एक इसम मुद्दाम पाठविला आहे. राजा जयसिंग आतां **विजापुरावर** निघाला असून तेथील राजा कर्नाटकांतील **पेलगुंडा** या किल्ल्यावर पळून जाणार आहे. **मीरजनचा** वेढा चालू असून थोडक्याच वेळांत **मीरजन** पडेल असें वाटतें….

आगष्ट २९. ताजा कलम— वरील पत्र लिहिल्यानंतर नऊ लक्ष होन देण्याचे अटीवर विजापूरकराचा व राजा जयसिंहाचा **तह झाल्याचें** समजलें आहे. हें खरें असेल तर **शिवाजीची** आतां धडगत दिसत नाहीं.

मॉ. रि. भा. २० } (१०७७) { श. १५८७ श्रावण
पृ. १० } जयसिंग—औरंगजेब { इ. १६६५ आगस्ट आरंभ

"बादशहांनीं मला विचारलें कीं, **शिवाजीनें** अशीं कोणतीं वचनें दिलीं, करार केला, किंवा शपथा घेतल्या कीं, ज्या योगानें त्याच्या अविश्वसनीयतेबद्दल विचार न करितां तुम्हीं त्याला जाऊं दिलें ?' ज्या वेळीं मीं शिवाजीला जाऊं दिलें त्या वेळीं, ज्या शपथा मोडून आपण शापित होतों किंवा नरकाचें साधन करितों अशी हिंदूंची भावना आहे, अशाच शपथा **शिवाजीनें** घेतल्या. आमच्या अटी येणेंप्रमाणें ठरल्या. (१) बादशाही कृपेचें द्योतक म्हणून मीं त्याला दिलेले **१२ लहान मोठे किल्ले** आणि एक लाख होन (५ लाख रु.) उत्पन्नाचा मुलूख एवढ्यावर **शिवाजीनें** संतुष्ट राहून बादशाहाची अवज्ञा अगर बादशाही मुलखाची लूट करूं नये. (२) दख्खनच्या सुभ्याच्या अमलांत हुकूम होईल तेव्हां कामगिरीवर हजर व्हावें. (३) पांच हजार स्वारांची मनसब घेऊन **संभाजी** आणि 'दुसरा शिवाजी' म्हणून प्रख्यात असलेला **नेताजी** या उभयतांनीं दख्खनच्या सुभेदाराबरोबर असावें. (४) **तळकोंकणांतील** ४ लाख होन उत्पन्नाचा आणि **विजापुरी बालाघाटांतील** ५ लाखांचा मुलूख जर बादशहानें **शिवाजीला** दिला, आणि विजापुरकरांचा मुलूख जिंकल्यावर ह्या मुलखाचा ताबा बादशाही फर्मानानें कायम **शिवाजीकडे** करून दिला, तर मग दरसाल तीन लाखांच्या हप्त्यानें शिवाजीनें बादशहाला ४० लाखांची खंडणी द्यावी. (५) शिवाजीचे **२३ किल्ले**, आणि **बालाघाट** आणि **निजामशाही तळकोंकण** मिळून चार लाख होनांचा मुलूख शिवाजीकडून घेऊन मोंगली साम्राज्याला जोडण्यांत यावा. [हफ्त अंजु. बनारस हस्त. ६६ ब; ६७ ब.]

मॉ. रि. भा. २० } (१०७८) { श. १५८७ श्रावण—भाद्रपद
पृ. ११ } जयसिंग—औरंगजेब { इ. १६६५ आगस्ट—सप्टेंबर

बादशहांनीं **शिवाजीच्या** मागण्यांबद्दलच्या माझ्या शिफारसींना मान्यता दिली.... तो माझ्या छावणींत २७ सेप्टें. १६६५ रोजीं बादशाही फर्मानाचें स्वागत करण्याकरितां आला. विजापूरच्या स्वारीवर **संभाजीच्या** मनसबीचें सैन्य व अधिक ७००० निवडक पायदळ घेऊन मजबरोबर येण्याचें त्यानें वचन दिलें आहे.......

विजापुरी तळकोंकणांत **आदिलशहाच्या** विरोधामुळें रयतेची पांगापांग झाल्याकारणानें आणि बालाघाटांत स्वारीच्या पूर्वीं **शिवाजीला** मुलूख ताब्यांत घेणें शक्य असलें तरी, स्वारी चालू झाल्याबरोबर रयतेंत गोंधळ माजून लागवड होणार नाहीं यामुळें **शिवाजीला** त्याच्या मुलखांतील शिल्लक ठेवलेला एक लाख होनांचा मुलूख **एवढाच उत्पन्नाचा भाग** रहातो ! म्हणून **निजामशाही** मुलखांतील एक लक्ष होनांचीं खेडीं व महाल आपल्यास मिळावे, अशी **शिवाजीची विनंती** आहे. परंतु चौकशी करतांना

पूर्वीचा आणि आताचा निजामशाही मुलखांतील धारा यांमध्यें पुष्कळच तफावत असल्याचें कळलें. यामुळें खरोखर उत्पन्न काय आहे तें समजण्यासाठीं **शिवाजी**चे १२ किल्ले वगळून राहिलेल्या सर्व निजामशाही मुलखाची एक वर्षपर्यंत बादशाही जमिनीच्या खात्याकडून वहिवाट करून घेऊन, मग त्या हिशेबानें **शिवाजी**ला एक लक्ष होनाचा मुलूख देण्यांत येईल. मध्यंतरीं विजापूरचे युद्धांत बरोबर येणाऱ्या त्याच्या सैन्याच्या खर्चाकरितां रोकड २ लाख रुपये, त्याला त्याच्या जहागिरीचे बदल्यांत देण्याचें मीं कबूल केलें आहे.

शिवाजीनें द्यावयाच्या ४० लाखांच्या खंडणीचा हप्ता नक्की मिळत नसल्यास संभाजीला कांहीं मिळणार नाहीं असें मीं सांगितलें आहे. त्यावर **शिवाजीनें** नम्रपणें असें उत्तर दिलें कीं, 'जरी ठरल्याप्रमाणें मोबदल्यांत मिळावयाची जमीन माझ्या हातीं आलेली नाहीं, आणि जरी तिच्यापासून मिळणाऱ्या उत्पन्नाचा नक्की अंदाज करणें आज जमीन हातीं येण्यापूर्वी अशक्य असलें, तरी माझ्या मुलाच्या मनसबीचें सैन्य मी पुरवीन. मात्र त्या सैन्याच्या पगाराची रकम ही माझ्या खंडणीच्या हप्त्यादाखल समजण्यांत यावी.' **शिवाजी**कडून भावी युद्धांत महत्त्वाची मदत होण्यासारखी असल्यामुळें मीं ह्या त्याच्या सूचनेला संमति दिली. [हाफ्त अंजुमान, बनारस, ७४ ब; -७६ अ]

मॉ. रि. भा. २० पृ. १०-११	(१०७९) जयसिंग—औरंगजेब.	श. १५८७ श्रावण-भाद्र. इ. १६६५ आगष्ट सप्टें.

बादशहाचे लिहिण्यांत "**शिवाजी**ला विजापुरी तळकोंकण दिलें आहे. परंतु विजापुरी बालाघाटाबद्दल कांहींच हुकूम देणार नाहीं.' त्याला सामर्थ्य असेल तर त्यानें आदिलशहापासून तो मुलूख हिसकून घ्यावा." असें आलें. बादशहांनीं असें लिहिणें म्हणजे हुकूम दिल्यासारखेंच असलें तरी आज्ञाधारक **शिवाजी प्रत्यक्ष सनद** मिळाल्याशिवाय कांहीं करण्यास धजणार नाहीं. ह्या महालाचें कमाल उत्पन्न ९ लाख होतें तें यापुढें देशांत शांतता झाली तथापि उतरतच राहणार. **शिवाजी** आपल्या **पुतण्याला विजापुरीं सेवा करण्यास** पाठवीत असेल तर हा मुलूख त्याला देण्याबद्दल विजापुरकरांकडून **शिवाजीकडे** अनुसंधान आलें होतें. परंतु **शिवाजीनें** माझ्या वचनावर आणि बादशहाच्या उदारपणावर विसंबून त्याला नकार दिला आहे. तेव्हां ठरल्याप्रमाणें हप्तेबंदीनें ४० लाख रुपये खंडणी देण्याच्या अटीवर ९ लाख होनांच्या **मुलखाचें फर्मान** शिवाजीला देण्यांत यावें. [हफ्त अंजुमान बनारस, ७० अ व ब.]

बाग रजि. १६६५ पृ. २६५ इ. सप्टें. १४ न्यू.	(१०८०)	श. १५८७ भाद्र. शु. ६ इ. १६६५ सप्टें. ४

वेंगुर्ल्याचा गव्हर्नर— ?:—वेंगुर्ल्यावर (विजापुराकडून) आलेले अधिकारी

शिवाजीच्या दरोडखोरीकडे दुर्लक्ष करतात. याचें कारण त्यानें मिळविलेल्या **लुटींतला भाग त्यांनाहि मिळतो.** शिवाजीमुळें कंपनीस जें नुकसान आलें तें शिवाजीच्या नांवें कीर्दीत लिहिलें पाहिजे. कंपनीला पुरविण्यासाठीं म्हणून हिंदी व्यापाऱ्यांनीं खरेदी केलेला माल शिवाजीनें लुटला, त्याअर्थीं त्यांची भरपाई करून देत नाहीं हें म्हणणें न्यायाचें होणार नाहीं. पण शिवाजीविरुद्ध कडक उपाय योजणें पुरवणार नाहीं; यासाठीं शिवाजीनें कबूल केलेली तटस्थवृत्ती स्वीकारावी.

डाग रजि. १६६५ पृ. २६६ इ. सप्टें. १४ न्यू. (१०८१) श. १५८७ भाद्र. शु. ६ इ. १६६५ सप्टें. ४

वेंगुर्ला येथील डच रेसिडेंट—(बटेव्हिआ ?)

डचांच्या मालास जकात माफ असावी व याबद्दल एक ठरीव रकम विजापूर-दरबारांत भरावी, ही सूचना मान्य करतां येत नाहीं. याचें कारण वेंगुर्ल्यास ही माफी मिळविण्यासाठीं लागणारी रकम फारच वाढणार आहे.

डाग रजि. १६६५ पृ. २६६ इ. सप्टें. १४ न्यू. (१०८२) सुरत-बटेव्हिया. श. १५८७ भाद्र. शु. ६ इ. १६६५ सप्टें. ४

शिवाजीची समुद्रावरील सत्ता नष्ट करण्याच्या सुभेदाराच्या सूचनेस [वेंगुर्ल्याच्या डच] डिरेक्टरानें चांगलें(?) उत्तर पाठविलें आहे.

खं. ८ ले. १४ प्रभात ले. ८ हि. १०७६ जुलूस ८ रबल ५ (१०८३) श. १५८७ भाद्रपद शु. ७ इ. १६६५ सप्टें. ५

औरंगजेब——शिवाजी

शिवाजी राजे याणी बादशाही कृपेचे उमेदवार होऊन जाणावे की, सांप्रत तुमचे पत्र बहुत नरमाईचें राजे **जैसिंग** यांचे भेटीबद्दल कळलें. **कृत्य माफ व्हावें म्हणून घेतले याचें पाहून** गोड ध्यानास आला. या पूर्वी तुमचे मनांतील हाचील सरकार कामगारांनीं समजाविलें होतें कीं, तुम्हीं आपले कृत्यांचा पश्चात्ताप करून, या दौलतीचे आश्रयास येऊन, तीस किल्ले आपणांकडील इकडील कामगारांचे स्वाधीन करून, बारा किल्ले व त्याजखालील मुलूख एक लक्ष होनांचा **निजामशाहीचे किल्ले व मुलूख पैकीं** त्याच प्रकारें आणखी चार लक्ष होनांचा मुलूक **तळ कोंकणांतील विजापुरकरांचे इलाख्याचा** जो हालीं तुम्हाकडे चालू आहे व पांच लक्ष होनांचा मुलुक बालेघाटपैकीं, विजापूरचे इलाख्यापैकीं, येणेप्रमाणें एकंदराचा फर्मान बादशाही मागता व चाळीस लक्ष होन दरसाल तीन लक्षाप्रमाणें पेशकसीबद्दल देऊं म्हणतां. ऐशियास, तुमच्या गोष्टी ज्या

तुम्हीं तूट अंदेशा न पाहतां केल्या त्या माफी जोग्या नाहींत. तथापि राजे जैसिंग यांणीं लिहिल्यावरून तें सर्व माफ करून तुमच्या मनोरथाप्रमाणें बारा किल्ले –(देतों). त्यांचा तपशील खालीं लिहिला आहे–व त्यांच्या खालचा मुलूख देऊन आणखी हुकूम केला आहे कीं; जो मुलूक नऊ लक्ष होनांचा त्यापैकीं चार लक्ष होनांचा तळकोकणपैकीं विजापुरकरांचे इलाख्यापैकीं हालीं तुम्हांकडे चालत आहे तो बंदोबस्ताकरितां इकडील सरकारांत आला. सबब बालेघाटीं पांच लक्षांचा मुलूक, विजापूर आमचे हातीं येईल त्या आधीं तुम्हीं त्यांजकडून घेतल्यास व चांगले फौजेसुद्धां राजे जैसिंग यांस मिळोन बादशाही कामांत याचे मर्जीप्रमाणें कोशीस केल्यास, विजापूर फत्ते झाल्यानंतर, तुम्ही पेशकसीचे ऐवजाचा भरणा केल्यास, तुम्हाकडे बहाल ठेवूं. हालीं आमचे चिरंजीवास पांच हजारी मनसब व पांच हजार स्वार–कीं एकेकाचीं दोन दोन तीन घोडीं असावीं–याप्रमाणें देऊन, तुम्हांकरितां पोषाख पाठवून. [1]**हा फरमान आपले पंजाच्या चिन्हासुद्धां पाठविला आहे**. तरी तुम्हीं इकडील लक्षांत वागोन, बादशाही काम लहानमोठेंसुद्धां करून, हें सर्व आपले ऊर्जिताचीच गोष्ट समजावें. रबिलावल सन ८ जुलूस मुा सन १०७६ हि.

किल्ल्यांचा तपशील राजे जैसिंग यांचे लिहिल्याप्रमाणें:—

१ राजगड	१ तोरणा	१ लिंगमगड
१ घोरप	१ अलवारी	१ महागड
१ घोसाळा	१ तळेगड	१ पाल (गड)
१ उधेदुर्ग	१ रायरी	१ कुंबारी

सा. ले. १६१ मु. १०६६ रवल १५ फ. १०७५	(१०८४) मिसेली	श १५८७ भाद्र. व. १ इ. १६६५ सप्टें. १५

अज दि. सुपे–ता मोक. महा सेटि. खोत वगैरे कस. सुपेः– महा. रा. साहेब यांचे (माणको बल्लाळ) खुर्दखताप्रमाणें गणो तिमाजीनें माहादोबा गोसावी सो मोरेश्वर यांस दिलेलें इनाम त्याकडे चालू ठेवणें.

इ. फॅ. १२ पृ. ८५ इ.	(१०८५) कारवार–सुरत.	श. १५८७ भाद्र. व. ७ इ. १६६५ सप्टें. २१

राजापूरला गेलेला आणि जयसिंहाच्या छावणीकडे गेलेला असे दोन्ही बातमीदार

---

१ हा घेण्याकरितां शिवाजी जैसिंगाचे तळाकडे २७ सप्टेंबरला आला होता (सरकार पृ. ४२१).

परत आले आहेत. छावणीकडील बातमीदाराच्या सांगण्यावरून संभाजी तेथें खात्रीनें असून शिवाजीहि आपले उत्तम किल्ले मोंगलांना देऊन औरंगजेबाच्या भेटीला जाण्याची तयारी करीत आहे. शिवाजीचे घरची मंडळी रायगडला [?] आहेत. राजापुराहून आलेल्या माणसानें महमद इखलासखानानें दाभोळ आणि त्याच्या सभोंवतालचा मुलूख जिंकून घेतल्याची खबर आणिली आहे. राजापूरचा आदिलशाही सुभेदार, आम्हीं राजापूरला यावें असें बोलावणें करीत आहे. डचांनीं तेथें वखार घालण्याबद्दल परवानगी मागितली होती. परंतु इंग्रजांची मर्जी पाहून त्याचा निकाल करण्यांत येईल असें त्यांना उत्तर मिळालें. चौल समोर मोंगलांचें ६००० घोडदळ आहे. विजापुरच्या राजानें मोंगलांशीं तह केला असून खंडणीची रकम घेऊन मुल्ला अहमद आग्र्यास जात आहे. मीरजन अजून टिकाव धरून आहे. परंतु लवकरच पाडाव होईल. रुस्तुमजमाला नेहमीं सुलतान बोलावीत असतो. परंतु त्याचीच जाण्याची छाती होत नाहीं.

सां. इ. सा. ले. १२ सुं. १०६६ रखर११ हि. १०७६	(१०८६) फर्मान	श. १५८७ आश्वीन शु. १३ इ. १६६५ आक्टो. ११

विजापूर बादशहा———हवालदार व कार. पर. कुडाळ.

महमद येखलासखा यानें सांगितलें, लखम सावंताची पर. मज. ची देसकत असतां कृष्ण सावंतानें गैरसमजुतीनें आपल्या नांवें करून घेतली आहे. तरी कृष्ण सावंतास दूर केला आहे. पर. मज. ची देसकती पूर्वीप्रमाणें लखम सावंताकडे चालविणें. कृष्ण सावंत यास लखम सावंताचे हातीं दिल्हे नाहीं व त्याबद्दल लखम सावंतानें देऊं केलेले २५ हजार होन सोडले आहेत.

डाग रजि. १६६५ पृ. ३२२ इ. नोवें. ४ न्यू.	(१०८७)	श. १५८७ आश्वीन व. १२ इ. १६६५ आक्टो. २५

राजा जैसिंग यानें शिवाजीचा एक उत्तम किल्ला घेतला आणि शिवाजी ४।५ हजार घोडेस्वारांनिशीं डोंगरी मुलखांतून कांहीं तरी धाडसाच्या विचारानें बाहेर पडला आहे अशी लोकवार्ता आहे. आमच्या (डचांच्या) मदतीनें शिवाजीचीं जहाजें नष्ट करावीं अशी जी सूचना सुरतेच्या सुभेदारानें केली होती [ले. १०६९] तिचें पुढें कांहीं होईल असें दिसत नाहीं. सुरतेस लहानमोठीं कांहीं जहाजें बांधण्यासाठीं कांहीं इंग्रज कामकरी जाणार आहेत; त्यां जहाजांचा उपयोग शिवाजीविरुद्ध करण्यांत येईल.

भांडार. कॉमे. व्हॉ. सरकार. पृ. २९७	(१०८८) जयसिंग-औरंगजेब.	श. १५८७ आश्वीन इ.१६६५ आक्टोबर (!)

[औरंगजेबाकडून तहाची मान्यता व शिवाजीकरितां कृपेचें पंजाचें फर्मान व

पोशाख आला-सप्टेंबर]. शिवाजी त्या वेळीं आदिलशाही तळकोंकणांत होता. त्याला (फर्मानाची) बातमी कळतांच त्वरेनें २७ सप्टेंबरला तो माझे छावणींत येऊन पोंचला. लगेच ३० तारीख रोजीं माझा मुलगा किरातसिंह आणि जानीखान या दोघांना बरोबर देऊन बादशाही खलित्याला सामोरें जाण्याकरितां त्याला पाठवून दिलें !

खं. २० ले. ११८ } (१०८९) { श. १५८७ कार्तीक व. १
सु. १०६६ जवल १५ } खुर्दखत फा. मु. व सी. { इ. १६६५ नोव्हें. १३

अजर. रायाजी राजे घोरपडे— ता। हुदे व मोक. मौ. येरोळ पर. करहाड.

सदानंद गोसावी याचा येरोळ येथील इनाम त्याचे हवाल करावा.

खं. १५ ले. ११३ } (१०९०) { श. १५८७ कार्तीक व. १
सु. १०६६ जवल १५ } खुर्दखत मु. व सी. { इ. १६६५ नोव्हें. १३

अजर. शर्जाखान— कार. पर. वाई

मोकदम मौ. गोवे हे गोविंदगिरी मुरीद कमळनयन याच्या गोवे येथील मळ्यास पूर्वीप्रमाणें कालव्याचे पाणी मिळूं देत नाहींत. फकिराचे इनामास तसवीस होणे अजब आहे. तरी असें न करणें.

खं. १५ ले. ११२ } (१०९१) { श. १५८७ कार्तीक व. २
सु. १०६६ जवल १६ } { इ. १६६५ नोव्हें. १४

अजर. नरसोजी अंबाजी राजे घोरपडे— ता। हुदे .व मोक. मौ. चिंचणी किले ताथोडा

कमलनयनगिरीचे मठास चिंचणी येथून पाच कुडो गला धर्मादाय देत जाणें.

खं. २० ले. ११९ } (१०९२) { श. १५८७ कार्तीक व. २
सु. १०६६ जवल १६ } खुर्दखत फा. मु. व सी. { इ. १६६५ नोव्हें. १४

अजर. खंडोजी अंबाजी राजे घोरपडे— हुदे. मोक. मौजे निगडी कि. सातारा.

कमलनयन मानभाव यांस निगडी येथें १५ बिघे इनाम दिलें असतां इस्कील करितां. तरी इनामतीचे वाटे न जाणे व सालगुदस्ती घेतलेले पैके फिराऊन दीजे.

डाग रजिस्टर १६६५ } (१०९३) { श. १५८७ कार्तीक व. ८
पृ. ३७२ इ. नोव्हें. ३० न्यू. } { इ. १६६५ नोव्हें. २०

कंपनीचा डिरेक्टर फान आड्रिकन मरण पावला. आणि दरोडेखोर शिवाजी मोगलांना शरण जाऊन त्यांचा सहकारी म्हणून मान्यता पावला; अशी बातमी (His grace Coulster) कूल्स्टरकडे आली; असें सुरतेहून आलेल्या एक बनिया नोकराकडून समजलें.

राम. अं. ६५ ले. ११ } (१०९४) { श. १५८७ कार्तीक व. १२
श. जवळ २५ } धर्मपत्र { इ. १६६५ नाव्हें. २३

सुवाईआवा, खेलोजी, सुमानजी, रेखोजी, व माहादाजी राजे भोसले महादभटबिन तिमणभट सो येलूर श्रीघुश्‍रणेश्वरची पूजा व अभिषेक याबद्दल ४० रुपये.

इं. फॅ. १२ } (१०९५) { श. १५८७ कार्तीक
पृ. २८–२९ इ. } सुरत–कंपनी { इ. १६६५ नोव्हें.

येथील सुभेदार आजपर्यंत आमचे हिशेब पुरे करून देण्याला तयार होत नसला तथापि बादशहा व दिवाण यांच्या वचनाप्रमाणें एक वर्षभर आयात व निर्यात मालावरील जकातींच्या माफीबद्दल आम्हांला शंका वाटत नाहीं. या वर्षभर शेंकडा ३ टक्क्याप्रमाणें सूट मिळेलच. परंतु आम्हांला निमे जकातींची माफी मिळावी असेंच आमचें मागणें आहे.

पिसुर्लें. शिवाजी. } (१०९६) { श. १५८७ मार्ग. शु. १
पृ. १४ इ. डिसें. ७ न्यू. } गोव्याचा व्हाइसराय–पोर्तुगीज राजा { इ. १६६५ नोव्हें. २७

आदिलशहाचा एक सेनापति खवासखान हा दोन हजार घोडेस्वार व पायदळ यांसह आमच्या मुलखाच्या (= गोव्याच्या) शेजारीं असतो; त्याच्या प्रदेशांत शिरून शिवाजीनें त्याच्याशीं सहज युद्ध केलें आणि कोकण सोडून घाटावर चढून जाण्यास त्यास भाग पाडलें. एवढ्या विजयावर संतोष न वाटून शिवाजी आदिलशाही मुलखांत बराच आंत घुसला. **आदिलशहाचे सेनापती शिवाजीशीं** आंतून **सलोख्याचे संबंध ठेवतात** आणि मदत करतात ही गोष्ट सर्वश्रुत आहे. मजकडे आदिलशहा व **शिवाजी** या दोघांनींहि वकील पाठविले आहेत; आणि आपल्या पक्षास मी मिळावें अशी प्रत्येकाची इच्छा आहे. पण कोणत्याहि एका पक्षास सामील होण्यांत पोर्तुगीज सरकारचें हित साधत नाहीं. त्या अर्थी मी दोघांशींहि संबंध न तोडतां मोघम बोलणें केलें.

इं. फॅ. १२ } (१०९७) { श. १५८७ मार्ग. शु. १
पृ. ८६–८७ इ. } कारवार–सुरत { इ. १६६५ नोव्हें. २७

आपली ही वखार चालू राहिली तर रुस्तुमजमा आमच्या विरुद्ध डचांच्या मागण्यांचा विचार करणार नाहीं. कदाचित् आदिलशहाच्या मनांत त्यांना अनुकूल असे विचार आले तरी **रुस्तुमजमावर आजकाल बहाल मर्जी असल्यामुळें त्याचा** आपल्याला खास उपयोग होईल. महमदखान आपल्या सैन्याचा पगार देण्याच्याच अडचणींत असून त्या करितां या गरीब बिचाऱ्या देशाला जादा कर द्यावे लागत आहेत... **मिरजन किल्ला** त्याचे स्वाधीन झाला आहे.... राजा जयसिंगाचे छावणींत मनुष्य पाठवूनहि **शिवाजी**चें काय झालें हें आम्हांला नक्की समजूं शकलें नाहीं ! मोंगला (सेनापती)ला

भेटून त्यानें कित्येक किल्ले आणि आपला मुलगा ताब्यांत दिला याबद्दल शंका नाहीं.... **विजापुरी सेनापती** महमद इखलास हल्लीं ससैन्य **कुडाळला** आहे. **शिवाजीचा** घेतलेला सर्व मुलूख त्याला पुनः सोडावा लागला असून या झटापटींत अनेक महत्त्वाचे अमलदार आणि त्यांचें २००० सैन्य खर्ची पडलें. त्यामुळें **सर्जाखान** महमद इखलासखानाच्या मदतीला चालून येत आहे. रुस्तुमजमा आदिलशहाच्या मर्जीतला होऊन विजापूरला राहिला आहे. पण इतर अनेक चांगल्या दर्जाचे सरदार जाऊन मोंगलाला मिळाले आहेत. आदिलशहा, आपल्या बायकांमाणसांना सुरक्षिततेकरितां इतर किल्यांवर पाठवून, मोंगलाच्या आगमनाची वाट पहात आहे. आपल्या हस्तकांची निष्ठा पक्की करण्यासाठीं हा विजापूरचा सुलतान सर्व सरदारांच्या बायकांना आपल्या ताब्यांत घेत असून नकार देणाऱ्यांना कैद करीत आहे. राजा जयसिंग कदाचित् विजापूरकरांशीं तह करण्यास तयार झाला असता परंतु **दिलीरखान** नांवाच्या त्याच्या बरोबरच्या प्रख्यात आणि फौजबंद सेनापतीनें परत जाण्यापूर्वी विजापुरांतलें पाणी पिण्याची अभेद्य प्रतिज्ञा केली असल्यामुळें त्याचा नाइलाज आहे. ह्या बाजूच्या **शिवाजीच्या** किल्ल्यावरील शिबंदीचे लोक बेलाशक किल्यांतून बाहेर येऊन आसपासचीं लहान लहान शहरें लुटून नेतात. हे लोक एकंदर २००० च्या वर खास नाहींत. (मीरजनचा किल्लेदार) मूर्तजाबेग आतां (किल्ला हातांतून गेल्यावर) २०० लोक बाळगून (लुटीकरितां) बाहेर पडला आहे!

इं. फॅ. १२ } (१०९८) { श. १५८७ मार्ग. व. ४
पृ. ६९ इ. } मुंबई, गॅरी—लॉर्ड आर्लिंग्टन. { इ. १६६५ डिसें. १६

शेजारच्या किनाऱ्याची पट्टी **जयसिंगानें** जिंकून घेतल्यामुळें पूर्वीची दळणवळणाच्या बाबतींतील धोक्याची परिस्थिति नाहींशी होऊन आतां राजकीय दृष्टयाहि सुधारणा झाली आहे. मुंबई बेटाला अद्यापपर्यंत याचा फायदा झाला नाहीं हें खरें आहे. तथापि माझे सल्याप्रमाणें कुकनें जयसिंगाशीं या बाबतींत बोलणें केलें असतें तर आजपर्यंत जयसिंगानें बादशहाकडे शिफारस करून **मुंबईच्या समोर व्यापाराकरितां मोठें बंदर वसवून** इराण, बसरा, मक्का आणि दक्षिण सागरांतील इतर बंदरें यांचेशीं जंगी व्यापार सुरू झाला असता व बालाघाटाजवळील मुलखांतून व्यापारोपयोगी अनेक जिन्नस उपलब्ध होतात त्यांचा फायदा किती तरी घेतां आला असता.

खं. ८ ले. १५ प्रभात दिल्ली. ले. ९ } (१०९९) { श. १५८७ मार्ग. व. १४§
(हि. १०७६ रवल ७ ?) } { इ. १६६५ दिसें. २५

औरंगजेब—शिवाजी

---

§ खं. ८ व प्रभात यांत छापिलेल्या भाषांतराच्या या पत्रांतील अखेरचा कालनिर्देशात्मक भाग चुकीचा आहे. त्या ठिकाणीं जु. ८ जमादिलाखर २७ अशी तारीख पाहिजे, हें मूळ फारशी फर्मानावरून ठरतें.

तुम्ही फौजेसुद्धां बादशाही लष्करांत आहांत, आणि ताथवडा फलटण हे किल्ले विजापुरकरांकडील होते ते घेऊन त्यांची फौज तळकोकण प्रांतीं होती. तेथें रात्रीं पोहोचविली, म्हणोन राजे जैसिंग यांणें लिहिल्यावरून तुमचे शाबासकीस कारण जालें. सबब तुम्हांकरितां उत्तम पोषाख व जडावाची कटयार पाठविली आहे. या लाभाचा संतोष मानून इत:पर या स्वारींत जितके कोशीस कराल तितकें पहिल्यापेक्षां अधिक लोभास कारण होईल.

खं. ८ ले. ९ } (११००) { श. १५८७ मार्ग.
१ जखर } खबर { इ. १६६५ डिसें.

निळो सोनदेऊ व रखमाजी शिवदेऊ— राजश्री साहेब

केसो नारायण सबनीस किल्ले राजगड याची वर्तणूक पहिलेपासून पाहतां, कारभार माकूल नाहीं. ऐसियासी, पहिलेच भलते गोष्टीचे तहकीक करावे तरी कितेक गोष्टीकरितां करिता येत नसे. त्या उपरि, साहेब राजगडीहून मिर्जा राजाचे भेटीस गेलियावर राजगडी हवालदार नाहीं, अगर पद्मावतीस सरनोबत नाहीं. राजगडचा कारभार केसोपंताचे शिरीं आला त्यावरी बारीक नजरेनें पाहतां, राजगडचे तनखापैकीं, लारी ३००० तीन हजार अंबाजीपंताकरन व राघोपंताकरन आलियासी, केसोपंतीं तीन हजार लारीपैकीं लारी १४०० चौदाशें गोविंद राउताचे हवाला केली. आणि उरली लारी १६०० सोळाशें आपल्या हवालगिरापाशीं ठेविली. त्यावरी चालमेली करून या प्यादियापासून त्यापाशीं, त्यापासून आणिका प्यादियापाशीं, ऐसे दोघा चौघाजवळी देती. ऐसे पंधरा रोज चालमेली करून सोळाशे लारीपैकीं सासे लारी तोडविली, आणि हजार लाहारी एका नाईकवाडियापाशीं ठेविलीं. हीं खबर आम्हास कळतांच आम्ही रखमाजीपंतास सांगितलें कीं, तहशीलेस कोण गेले होते ते नाईकवाडियासी बोलावून आणणे. त्यावरी रखमाजीपंतीं कुल नाईकवाडियासी बोलावून कोण तहशिलेस गेले होते वगैरे खबर घेतां दादजी व गुंडा नाईकवाडी यापाशीं हजार लारी ठेवली ते आढळली. चौकशी करितां बहुत चालमेली केली. त्यावरी आम्ही नाईकवाडियासी सांगितलें कीं, हजार लारी तुजपासी आहे ते आमचे बगर रजा खर्च न करणें. ऐसें केलें तो प्यादियापाशीं तहकिकीं केली. हे खबर केसो नारायणास कळली.

ओ. कॉ. मा. २९ } (११०१) { श. १५८७ पौष शु. ३
नं. ३१४२ इ. } { इ. १६६५ डिसें. २९

फिलिप गिफर्ड, कारवार—— रँडॉल्फ टेलर

राजा जयसिंगानें शिवाजीला पकडलें असेंच अनेक ठिकाणीं व पुष्कळ लोकांचें तोंडून ऐकूं येतें. काल वेंगुर्ल्याहून मला पत्र आलें त्यावरून रावजी पंडिताजवळ राजा-

पुरास २००० सैन्य असूनहि, त्यानें कुडाळच्या सुभेदाराकडे (फक्त ५०० घोडदळ आणि १००० पायदळ इतकें थोडेंच सैन्य असतांना) कौलाकरितां मागणी केली आहे; असें समजतें. महमद इखलासखान एक महिन्यापूर्वींच विजापुरास गेला आहे. शिवाजीला गोत्यांत घालण्याकरितां जयसिंहानें युक्ति केली असें म्हणतात. 'आपण विजापुरावर स्वारी करणार असल्यामुळें तुम्हीं सुरतेला आणि भटकलला गेलेलें आपलें चांगलें सैन्य आणावें' असें शिवाजीला सांगितलें. मग त्याप्रमाणें आलेल्या सैन्याची पहाणी करून विजापूरकडे त्यानें ४ मुक्कामपर्यंत कूच केलें आणि एकदम त्या सर्वांना कैद केलें ! अशी बातमी बरेच दिवस आम्हीं ऐकत आहों [ह्याबद्दल विश्वसनीय पुरावा नाहीं]. मोंगली सैन्य विजापुराकडे ५।६ दिवसांच्या मुक्कामापर्यंत आलें असून विजापूरला मोठा धोका आहे. आदिलशहानें वाटेंतील कित्येक शहरें जमीनदोस्त करून २।३ गांवांच्या पट्ट्यांत पाण्यांत विष घातलें आहे. परंतु या सर्वांचा कांहीं उपयोग होईल असें वाटत नाहीं.

इं. फॅ. १२ }
पृ. ३६-३७ इ. }

(११०२)

{ श. १५८७ पौष शु. ३
{ इ. १६६५ डिसें. २९

प्रेसिडेंट ऑक्झिंडेन, सुरत——कॉन्सल, आलेपो.

गेल्या ३१ मार्चेला पत्र पाठविलें होतें त्यांत मोंगलांचें सैन्य दख्खनमध्यें आल्याची बातमी लिहिली होती. तोंपर्यंत युद्धाची कांहींच बातमी नव्हती. त्यानंतर मोंगलांनीं शिवाजीच्या महत्त्वाच्या किल्यांना वेढे घालून दोन किल्ले घेतले, आणि त्याला इतका जेरीस आणला कीं त्यानें तहाचें बोलणें लाविलें; आपले कित्येक महत्त्वाचे किल्ले व मुलगा स्वाधीन केला आणि आतां तो बादशहाच्या भेटीस जाण्याची तयारी करीत असल्याचीहि बातमी आहे. दुसऱ्या बाजूनें आदिलशहानें त्याच्याकडून राजापूर, दाभोळ वगैरे मुलूख परत मिळविला. मोंगलांचें ६००० सैन्य पोर्तुगीजांचें तटबंदी बंदर चौल, त्याच्याजवळ आहे. दख्खनच्या राजानें [आदिलशहानें] ९ लक्ष होन देऊन मोंगलांशीं तह केला असून आग्र्यालाहि खंडणी पाठविण्याची तजवीज तो करीत आहे.

इं. फॅ. १२ }
पृ. ६४ इ. }

(११०३)
सुरत-कंपनी

{ श. १५८७ पौष शु. ६
{ इ. १६६६ जाने. १

तुम्ही एकदम सुरतेहून मुंबईला वखार हालविली [मुंबई १६६५ फेब्रु. ८ ला इंग्रजांचे हातीं दिली. इं. फॅ. १२ पृ. १३९-४०] तर येथून गलबतें भरण्यास मालच मिळणार नाहीं. कारण बादशहाशीं व येथील लोकांशी शत्रुत्व उत्पन्न होऊन येथून किंवा मोंगली मुलखांतून कोठूनहि माल नेण्यास बंदी होईल. आतांच मोंगलांनीं अनेक सैन्यें पाठवून शिवाजीला जर्जर केल्यामुळें मोंगली मुलूख मुंबईच्या दक्षिणेस चौलपर्यंत वाढला आहे. शिवाजीनें ३० च्यावर महत्त्वाचे किल्ले व त्यांखालील मुलूख मोंगली सेनापतीच्या

स्वाधीन करून मोंगलांचीं ५००० स्वारांची मनसबदारी पत्करली आहे. पण **तो आपण स्वतः स्वाधीन झाला नसून** थोडे अत्यंत मजबूत किल्ले स्वतःकरितां शिल्लक ठेवून त्यानें वरील प्रकारचा तह केला आहे असें कळतें. ह्या जयानें विजापुरावर स्वारी करण्याचा मार्ग मोकळा झाल्यामुळें बादशहाला आनंद झाला आहे. वास्तविक विजापूरचें राज्य हें मोंगलांचें मांडलीक असून तें खंडणी देत असे; परंतु पुढें **शिवाजी** प्रबळ झाला. आणि त्याच्या दंग्यामुळें आदिलशहाला कित्येक वर्षें खंडणी देण्याचें टाळतां आलें. आतां शिवाजीच जेर झाल्यामुळें आदिलशहा राहिलेल्या खंडणीची भरपाई करण्यास तयार आहे. पण यांतहि शिवाजीचा आणखी कांहीं डाव असेल असें लोक बोलतात.... मुंबईला प्रथम शाखा-वखार स्थापन करून मुख्य ठिकाण सुरतेलाच ठेवावें. कोणाच्याहि डोळ्यावर न येतां हळूहळू दख्खनचा सर्व व्यापार तिकडेच आकर्षण करावा.

इं. फॅ. १२ } (११०४) { श. १५८७ पौष शु. ६
पृ. ८८ इ. } कारवार (गिफर्ड व चेंबर्लेन)-सुरत { इ. १६६६ जाने. १

शिवाजीला जयसिंगानें पकडलें आहे अशी उडती कळलेली बातमी, आतां विजापुराहून बहलोलखानाचा हस्तक आला आहे त्याच्या सांगण्यावरून, पक्की झाली आहे. ती खरी आहे असें मानण्यास आणखी एक कारण असें आहे कीं, महमद इखलासखान कुडाळ सोडून गेला; त्याला एक महिन्याचेवर दिवस झाले असूनहि, राजापुरास रावजी पंडित २००० सैन्यानिशीं केवळ बसून राहिला आहे. त्यानें या मुदतींत कांहींच केलें नाहीं. शिवाय ५०० स्वार व १००० पायदळ यापेक्षां जास्त सैन्य कुडाळचे सुभेदाराचे ताब्यांत नसतांनाहि त्याचेकडे त्यानें कौल (परवाना) मागविला आहे ! कांहींच तडजोड न होईल तर राजा जयसिंगाविरुद्ध टिकाव धरतां येईल तेवढा धरण्याचा विजापूरकरांचा कृतनिश्चय आहे. या निश्चयानेंच विजापूरच्या आसपासचा ४१५ मैलांतील टापू सर्व उध्वस्त करून व पाण्यांत विष टाकून दिलें आहे. तेथील सर्व व्यापारी घाबरून पळून गेले असून सरदारांनीं आपलीं बायकामुलें दूरच्या किल्यांवर नेऊन ठेविलीं आहेत. इतकें झालें तथापि तहाबद्दलची आशा अद्यापि नष्ट झाली नाहीं.

भांडार. कॉमे. व्हॉ. } (११०५) { श. १५८७ पौष व. १
सरकार-पृ. ३०० } जयसिंग—औरंगजेब. { इ. १६६६ जाने. ११ (?)

माझ्या विनंतीला मान देऊन बादशहानीं (२५ डिसें. रोजीं) शिवाजीला पोशाख आणि हिरेजडीत खंजीर पाठविला. शिवाजी विजापुराला वेढा घालण्यासाठीं मदत करावयास तयार होता. परंतु......मलाच तें शक्य वाटलें नाहीं. शिवाजी म्हणाला पन्हाळ्याची मला बित्तंबातमी असल्यामुळें तिकडे मला पाठविल्यास शिबंदी गैरसावध

असतांना मी तो किल्ला मोंगलांना मिळवून देईन. आणि त्या प्रांतांत नंतर इतका धुमाकूळ घालीन कीं माझे बंदोबस्ताकरितां त्यांना मोठें सैन्य पाठवावें लागेल. [हाफ्त अंजुमान, बनारस, ८४ ब; सरकार पृ. १३६.]

इं. फॅ. १२ | (११०६) | श. १५८७ पौष व. ५
पृ. २०१ इ. | | इ. १६६६ जाने. १५

फिलीप गिफर्ड व सीझर चेंबरलेन, कारवार—सुरत.

मुलखांतील गोंधळामुळें कांहींच विक्री झाली नाहीं. मोंगली सैन्य विजापुरापासून ३ कोसांवर आलें असल्यामुळें शहरांतील सर्व व्यापारी पळून गेले आहेत आणि राजधानीचा एक दरवाजा वगळून बाकीचे सर्व दगडाविटांनीं भरून काढिले आहेत. अद्यापपर्यंत एकच लढाई झाली. तींत आदिलशाहींतील पुष्कळच महत्त्वाचे अमलदार पडले; आणि सुमारें ७०० लोक जखमी झाले. मोंगल येण्यापूर्वींच विजापूरचे सभोंवतालीं ४१५ गांवाच्या पट्ट्यांतील शहरें उध्वस्त करून टाकिलीं होतीं. आतांच भांडेंभर पाण्यास पात्र होन पडूं लागला आहे. रुस्तुमजमाचे समवेत सुलतान बाहेर छावणींत रहात असून ३५,००० स्वार आणि ५००० पायदळ इतकें सैन्य त्याचेबरोबर आहे. सुलतानाच्या मनांतून आपला जनाना दूर ठिकाणीं पाठवावयाचें होतें. परंतु त्या प्रांताचे वजीर त्याला मान्यता देईनात म्हणून त्यांचेशीं लढाई देण्याची तो तयारी करीत आहे....शिवाजीचें काय झालें असावें हें कांहींच समजत नाहीं. घाटाखालील (तळकोंकणांतील) त्याचे लोक स्तब्ध आहेत. वेंगुर्ला आणि कुडाळ येथें आदिलशाही सुभेदार असून राजापूर आणि खारेपाटण येथें शिवाजीचे सुभेदार आहेत. वेंगुर्ल्याला डच व मुसलमान यांचें वैमनस्य आलें असून, सुभेदार डचांचा दलाल आपल्या स्वाधीन करावा असें म्हणतो; तें डच लोक मान्य करीत नाहींत. या भांडणाचें मूळ असें झालें कीं, शिवाजीनें डचांच्या दलालाचें गलबत धरून ठेविलें, तें महमद इखलासखानानें सोडवून स्वतःच घेतलें. पुढें तो (महमद) विजापुरला गेला असें पाहून, डचांनीं तें पुनः हिरावून घेतल्यामुळें सुभेदार चिरडीला जाऊन डचांची खोड मोडण्याचा बेत करीत आहे.

हि. रे. क. ९ | (११०७) | श. १५८७ पौष व. ८
पृ. १११ इ. जाने. २८ न्यू. | गोव्याचा ग.-पोर्तुगीज बाद. | इ. १६६६ जाने. १८

सुरतेच्या हल्ल्यानंतर शिवाजी खुशाल आपल्या राज्यांत परत आला व प्रसंग पडल्यास आमच्या राज्याचा आश्रय करावा या हेतूनें आमच्या प्रदेशाजवळ येऊन पोचला.

एपि. कर्ना. १० } (११०८) { श. १५८७ पौष व. १०
पृ. ७४ ले. २२७ } शिलालेख { इ. १६६६ जाने. २०
श. वसंव. (दक्षिणी) } उत्तुरची वेस, कोलार

शके १५८८ विश्वावसुसंवत्सर पौष व. १० या पुण्यकाळीं श्रीमत् कौशिक गोत्र भोसलानिल शिवाजी (शहाजी ?) राजाचे पुत्र संभाजी राजे यांची कुलस्त्री जैताबाई इनें मावूजीपंतांस उत्तूर (होतूर) गाव अग्रहार दिला.

त्रै. व. ६ पृ. ७४ले. ९ } (११०९) { श. १५८७ माघ व. १
फ. १०७५ श. } फा. मु. { इ. १६६६ फेब्रु. १०

धनाजी धारराऊ राजे-वेदमू० गणेश दीक्षित समशृंग.

आपण अगर आपले वंसीचे लोकांस तुम्ही तीर्थगुरु.

इं. फॅ. १२ } (१११०) } श. १५८७ माघ व. ९
पृ २०२-३ इ. } } इ. १६६६ फेब्रु. १७

सर जॉर्ज ऑक्झिडेन, सुरत—इंग्लिश कान्सल, आलेपो.

आदिलशहानें मोंगलांशीं तह करून खंडणीची रकम पाठविली असें मागें लिहिलें होतें. परंतु खंडणी अमान्य करून मोंगलांनीं आपलें सैन्य विजापुरावर पाठविलें. विजापुरापासून १२ मैलांवर दक्षिणी सैन्याची मोंगली सैन्याशीं गांठ पडून मोंगलांचें १४००० सैन्य व उच्च दर्जाचे अमलदार गारद झाले आणि मोंगली सैन्याला मागें हटावें लागलें. शिवाजीनें विश्वासघात करून सरळ मार्गानें नेऊन मोंगली सैन्य आदिलशाहाचे तोंडीं दिलें आणि त्यामुळें असें झालें; या सबबीवर मोंगलांच्या सेनापतीनें, शिवाजीचे डोक्यावर या अपयशाचें खापर फोडून, त्याला गिरफदार केल्याची बातमी आहे.

त्रै. व. ६ पृ. ७४ ले. १० } (११११) { श. १५८७ माघ व. १३
सु. १०६६ साबान २५ } फा. सी. { इ. १६६६ फेब्रु. २१

रा. हिंदूरावराजे कल्याणकर तळकोकण.

ती. स्व. वेद. रा. गणेश वलद विठल दीक्षित

तुम्ही आमचे व आमचे वंसीचे तीर्थगुरु. प्रतिवरसीं ससरतीचे ७ सत्ते करीत जाणें; १४ रु. प्रतिवरसी देत जाऊ.

भांडार. कॉमे. व्हॉ. } (१११२) { श. १५८७ माघ ?
सरकार-पृ. ३०१ } जयसिंग — औरंगजेब. { इ. १६६६ फेब्रु.(?)

आतां आदिलशाह व कुतुबशाह आमच्या विरुद्ध एक झाले आहेत; तेव्हां कसेंहि करून शिवाजीचें मन आपल्याकडे वळवून घतलें पाहिजे. बादशहाची भेट घेण्याकरितां म्हणून त्याला उत्तरेकडे पाठवून देणें जरूर आहे ! [हाफ्त अंजु, ९४ अ; सर. पृ. १३८]

इं. फॅ. १२ } (१११३) { श. १५८७ फाल्गुन शु. ११
पृ. १६९ इ. } कंपनी--सुरत. { इ. १६६६ मार्च ७

शिवाजी आणि कंपनी यांचे सहानुभूतीचे संबंधः—

शिवाजीनें अनेक ठाणीं घेऊन लुटीचाहि त्याचा क्रम चालू आहे, इत्यादि गोष्टी आम्हांला समजल्या. (परंतु) कांहीं वेळानें त्यांपैकीं कित्येक ठिकाणीं स्थीरस्थावर होऊन व्यापाराबद्दल हि तो व्यवस्था करील हें लक्षांत घेऊन **त्याच्याशीं सामोपचाराचे संबंध ठेवावे; म्हणजे संधि येतांच आपल्याला फायदा करून घेतां येईल.** आज त्याच्या आरमाराचा प्रतिकार करण्याकरितां आम्हांला गलबतें पाठवितां येत नाहींत; हीहि परिस्थिति लक्षांत घेऊन त्याच्या कडून आपल्याला अधिक तोशीस न पोंचेल अशा बेतानेंच आपलें वर्तन ठेवावें.

खं. १५ ले. ११५ } (१११४) { श. १५८७ फाल्गुन व. २
सु. १०६६ रम १५ } मिसली. सी. { इ. १६६६ मार्च १२

?—ताा मोक० मौ० इडमिडे तपे कऱ्हाड

जोगींदर गोसावी यांस इडमिडे येथें ३० बिघे इनाम आहे तें चालविणें.

खं. १५ ले. ११६, ११७ } (१११५) { श. १५८७ फाल्गुन व. २
सु. १०६६ रम. १५ } मिसली सी. { इ. १६६६ मार्च १२

?——मोक० मौ० गोवे व नींब पर. वाई

जोगींदरनाथ गोसावी यांस मौ. गोवे येथील नीम चावर जमीन पूर्वीप्रमाणें चालू ठेवणें.

शि. प्र. पृ. १०९ } (१११६) { श. १५८७ फाल्गुन व. १३
सु. १०६६ रम २६ } जाबिता { इ. १६६६ मार्च २३

हुदे. व मोक. व सेटिये यांच्या सहींचा सरकार कामाच्या जमाखर्चाचा जाबता.

खं. १८ ले. १२ } (१११७) { श. १५८७ फाल्गुन
सु. १०६६ फ. १०७५ } कतबा { इ. १६६६ मार्च

?–मोक. व समस्त रया मौ. मांजिरी साहेबाचे बंदगीस साहेबी साल मजकुराची जमाबंदी फर्माविली. तरी साल गुाा पर० मज० नामजादी बाा साहेब सुमा आले. ते वस्ती रयतीवरी कही होउनु लुटिली, गांव जाळिला यावरी गाव खराब होऊनु प्रजा पोट भरावयासी देसावरी गेलिया. यावरी गनिमाचा तह होउनु भेटला. तव मौजे मज० जागीरदारी आपला तपवास घेउनु खंडिला. ५०० रु. कौल देउनु गावावरि आणिले. आपण जुजवी कीर्दी केली. सालगुदस्त रु० ९०० जमाबंदी. गाव लुटिला, जाळिला,

खराब पडिला. यावरी कौल देउनु गावावरी आणिले आहेती. ८०० रु. सालउमवणी करणें.

शि. प्र. पृ. १०८ सु. १०६६	(१११८)	श. १५८७ इ. १६६५-६६

देश० हवाल० सब० देस० चौगु० माहाज० व मोक० कस० वालत्रे संभट बिन लक्ष्मण भट.

तुम्हास सिद्धेस्वर देवाचा इनाम पाव चावर होता. मेलगिरीपंडिताच्या सालगुदस्ताच्या इनामतीस्तव तो भेरीस पडला. तरी तुम्हास कोपर्डा करीत असलेला पाव चावर दिला आहे.

स. पृ. ११९ ले. १० श.	(१११९) उल्लेख	श. १५८७ इ. १६६५-६६

वेदमूर्ती भैरवनाथ व गोकुळनाथ बिन बालकराम तिवारी, गंगापुत्र वास्तव्य क्षेत्र श्री वाराणसी, यांच्या वडिलांस तीर्थपुरोहितपण महाराज राजश्री थोरेल कैलासवासी स्वामी यार्णी शके १५८७ विश्वावसूनाम संवत्सरी लेहून दिल्हे आहे. तें पत्र मनास आणून हल्लीं महाराजांनीं भोगवटियास पत्र करून दिल्हे पाहिजे म्हणून विनंती केली. यावरून पहिलें पत्र सदरहू संवत्सरीचे होतें तें मनास आणून, त्याप्रमाणें हल्लीं तीर्थपुरोहितपण दिल्हें असे. स्वामींचे वंशीचे जे कोण्ही येतील, क्षेत्रीं राहतील, ते तुम्हांस तीर्थपुरोहितपण देतील. तुम्ही आपले पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें तीर्थपुरोहितपण अनुभवून सुखरूप राहणें. येविशीं त्यांचे नांवें पत्र १.

जयसिंग पत्रें १२९ बी मॉ. रि. भा. २ पृ. ४	(११२०) जयसिंग—औरंगजेब.	श. १५८७ इ. १६६५ ?

आतां पश्चिम किनाऱ्याकडे सर्व काळजी दूर झाल्यामुळें शिवाजीचें दुर्लक्ष झालें आहे. जर गुजराथेंतील गलबतांनीं या वेळेस तिकडे स्वारी केली तर चांगली लूट मिळेल.

इं. फॅ. १२ पृ. १९२ इ.	(११२१) दख्खनचें राजकारण	श. १५८८ चैत्र शु. २ इ. १६६६ मार्च २७

सर विल्यम थॉमसन—लॉर्ड आर्लिंग्टन.

शेजारच्या राजसत्तांची—डचांविरुद्ध लढाईच्या प्रसंगीं—मदत मिळविण्याची आशा करण्यांत अर्थ नाहीं. मोंगली बादशहाच्या प्रजेला समुद्रावर डचांची फार दहशत वाटत असल्यामुळें त्यांची मदत होणें अशक्य वाटतें. कोणत्याहि तऱ्हेनें पोर्तुगीज युद्धांत सामील

झाले तरी त्यांचें नुकसानच होत जाणार. त्यांतून त्यांचें सामर्थ्य अल्प असल्यामुळें त्यांनाहि सोडून दिलें पाहिजे. आम्हीं शिवाजीशीं स्नेह केला तर मोंगल बादशाह आणि बहुतकरून विजापूरकर या उभयतांचा आपल्याशीं बेबनाव होण्याचा संभव आहे. एकंदरींत डचांनीं प्रबळ सैन्य पाठविल्यास बाहेरून कोणाच्याहि मदतीनें मुंबईची वसाहत वांचवितां येईल असें वाटत नाहीं.

स. पृ. २६ ले. २३ व २४ } (११२२) फर्मान { श. १५८८ चैत्र शु. ९
सु. १०६६ सवाल ७ इ. १६६६ एप्रील ३
हि. १०७० (१०७६ ?)

बादशाह विजापूर—देशमू. देशपां. मोक. रयत क. माण मा. महमदपूर

सयद इबलास (इखलास ?) खर्जाखान यांनीं विनंती केली कीं, रताजी वलद नरसिंगराव माने. देशमूख व सरदेशमूख याणी राजा जयसिंग यांचें युद्धांत जीवादारभ्य पराक्रम केला. तरी म्हणून स्वामींनीं ४ गांव त्यांस इनाम द्यावे. तरी माने यांस चार गांव दिले आहेत. परवा. नुरुल्लाखान

खं. ८ ले. १६ व प्रभात— } (११२३) औरंगजेब—शिवाजी { श. १५८८ चैत्र शु. १२
दिल्ली ले. १० हि. १०७६ इ. १६६६ एप्रील ६
जुलूस ९ सवाल १०

तुमचें पत्र मिर्जा राजे जैसिंग याणीं ठरविल्याप्रमाणें इकडील प्रांतीं रवाना जालें तें पावून बहुत संतोष जाला. ऐशियास इकडील लोभ तुम्हांवर पूर्ण आहे म्हणोन अदकार न करितां खातरजमेनें मजल दर मजल निघोन यावें. म्हणजे भेटीअंतीं बहूत सत्कार पावून माघारें जाण्याविषयींचा निरोप दिल्हा जाईल. सांप्रत तुम्हां करितां पोशाख पाठविला आहे तो घ्यावा.

स. ले. ४० पृ. १५२ } (११२४) सनद { श. १५८८ चैत्र शु. १३
सु. १०६६ सवाल ११ इ. १६६६ एप्रील ७

शिवाजीराजे भोसले—गोवर्धन भट व मकरंदभट मथुरावासी. तुम्हास मथुरातीर्थिचे तीर्थगुरुपण लिहून दिधले होते त्यावेळेस आठनव वर्षें जालीं. तुम्ही आले नाहीत. मग आणीक एक ब्राह्मण राजाराम चोभा हा मथुरावासी आला. त्यास आम्ही तीर्थगुरुपण लिहून दिल्हें, म्हणऊन तुम्ही पहिला कागद तुम्हापाशी होता तो घेऊन आलेत. मग राजश्री भट गोसावी बैसोन तह केला कीं, जे अलीकडे लिहिले तें रद्द, पहिले लिहिलें तें खरें, ऐसा तह दिधला. त्यास जरी कांहीं मथुरातीर्थींचें तीर्थ-गुरुपण आमच्या वडिलांनीं आणीक कोणास, तुम्हास आम्ही कागद लिहून दिधला आहे त्याचे आधीं,

लिहून दिधलें असेल तरी तोच तीर्थगुरु. तुम्हासी निसबती नाहीं. जरी तुमच्या कागदाच्या आधीं आमच्या वडिलाचा लिखा अगर आमचा लिखा आणिकापाशीं नसेल तरी तुम्हीच आमचे तीर्थगुरु. राजाराम चोभा याणें न कळत आम्हांपासून कागद लिहून घेतला आहे तो रद्द असे.

इं. फॅ. १२ } (११२५) { श. १५८८ चैत्र व. १०
पृ. १५२ इ. } { इ. १६६६ एप्रील १९

प्रेसि. ऑक्झिंडेन, सुरत-कॉन्सल, आलेपो.

पूर्वी कळविलें त्याशिवाय **दुसरें एकादें युद्ध** मोगल सैन्य व आदिलशहा यांच्यामध्यें **झालेलें** माझ्या ऐकिवांत **नाहीं**. बाकी, एकसारखें झटून काम करणें सैन्यांतील लोकांना आवडतच नाहीं. त्यांच्या पूर्वापार पद्धतीप्रमाणें ते आजहि वागत आहेत: दूर दूर राहून **युद्धाची मुदत ते लांबवीत राहतात.** कारण, जर कां युद्धाचा एकदां सोक्ष मोक्ष झाला तर विजापूर स्वाधीन होऊन मग आपल्याला कोणी विचारणार नाहीं अशी त्यांची भावना आहे.

इं. फॅ. १२ } (११२६) { श. १५८८ चैत्र व. ३०
पृ. २०४-२०६ इ. } **'दख्खनमधील बातमी'** { इ. १६६६ एप्रि. २४

कारवार-सुरत

[पृ. २०३-२०४] फोंड्याच्या वेढ्यामुळें गोव्यामध्यें अन्नाची महर्गता झाली आहे.

[पृ. २०४-२०६] शिवाजीला फिरून कैद केल्याचें मागचे पत्रीं लिहिलें; तें आतां खोटें ठरलें आहे. **विजापूर** शहर दहा दिवसांत मोंगलांना घेऊन देण्याचें **दिलेरखाना**पाशीं कबूल करून वीस हजार स्वारांनिशीं तो अघाडीवर चालून गेला असतां, त्याचा एकुलता एक मुलगा (?) **सर्जाखानाच्या** हातानें मारला जाऊन त्याला मागें हटावें लागलें. यामुळें **दिलेरखान** आपला शिरच्छेद करील या भीतीनें तो मोंगल व विजापुरकरांचें युद्ध चालू असतांना पळून गेला असें आतां समजलें आहे. आपण लिहिलें तें युद्ध हेंच होय असें आम्हांला वाटतें. मोंगलांचे फक्त ३०० लोक मारले गेले.

शिवाजी पन्हाळ्याकडे पळून गेला आणि त्यानें वाटेंतील पुष्कळ **आदिलशाही** शहरें जाळलीं. 'आदिलशहा स्वतः येणार आहे तरी दरवाजे उघडे ठेवा' असा रात्रीं निरोप पाठवून युक्तीनें पन्हाळा किल्ला ताब्यांत घेण्याचा डाव फसल्यामुळें **शिवाजीनें** दुसऱ्या दिवशीं हल्ला केला. परंतु त्यांतहि ५०० लोक मृत्युमुखीं पडून अपयश आल्यामुळें **राजापुरापासून** ५ गांव किंवा ३० मैल लांब असलेल्या **खेळण्याकडे तो गेला. तेथें नेताजीचें आणि त्याचें भांडण झालें** असें म्हणतात. हें भांडण खरोखरच होतें कीं त्यांत आणखी कांहीं गोम आहे हें सांगतां येत नाहीं. परंतु एवढें खरें कीं **नेताजी**

तेथून निघाला तो विजापुरदरबाराकडे जाऊन तेथील शहाला खूष करून त्याचेकडून त्यानें दरसाल तीन लक्ष होनांची नेमणूक व मोगलांच्या सरहद्दीवरील कांहीं मुलूख मिळविला; आणि त्याच्या संरक्षणाकरितां म्हणून तो आदिलशहाच्या हुकमावरून तिकडे गेला आहे. हा मुलूख ताब्यांत आल्याबरोबर त्यानें आपली राजनिष्ठा व्यक्त करण्याकरितां राजा जयसिंगाकडे पत्र लिहून मुलखाच्या रक्षणार्थ म्हणून कांहीं लोकांची मागणी केली. राजा जयसिंगानें लोक पाठविले. परंतु त्यांना नेताजीला पकडून आणण्याचा हुकूम दिला. त्याप्रमाणें त्यांनीं **नेताजीला पकडून** मोंगली छावणींत आणिलें. तेथें त्याचा शिरच्छेद झाला असें कित्येकजण बोलतात. परंतु तो अद्यापि पक्क्या कैदेंत म्हणजे हयात आहे; असेंहि कित्येकांचें म्हणणें आहे. नेताजी सोडून गेल्यावर **शिवाजीनें फोंडा** किल्ल्याला वेढा देण्याकरितां २००० लोक पाठविले. दोन महिने वेढा चालून आणि शिवाजीचे ५०० लोक दगावल्यानंतर, आंतील लोकांनीं आपल्या वस्तू घेऊन जाण्याला परवानगी देण्याच्या अटीवर किल्ला शिवाजीच्या स्वाधीन केला. शिवाजी मोंगलांकडून पळून निघाला हें ऐकून आदिलशहानें त्याच्यावर **सिद्दी मसाउद** (सिद्दी जोहारचा जावई), **सिद्दी जौहरचा** मुलगा आणि **रुस्तुमजमा** अशा तिघांना पाठविलें. त्याच्याबरोबर ५००० स्वार आणि १००० पायदळ होतें. शिवाजी यावेळीं आपल्या देशांत डोंगरावर (बालाघाट) होता. सिद्दी मसाउदला हें कळतांच रुस्तुमजमाला बरोबर घेऊन साधल्यास अचानक हल्ला करण्याकरितां तो निघाला. रुस्तुमजमाची या गोष्टीला मनापासून संमति नव्हतीच; म्हणून जवळ येतांच त्यानें आपले नगारे व तुताऱ्या वाजवून लांबूनच शिवाजीला सावध केलें. तरी देखील सिद्दी मसाउदनें निवडक ६०० स्वारांनिशीं शिवाजीचा इतक्या शिताफीनें पाठलाग केला कीं त्यांत शिवाजीचे ५०० स्वार व १०० शिपाई पडले. पाठलागाहून परत येतांना वाटेंत शिवाजीचीं पत्रें रुस्तुमजमाकडे नेणारा जासूद मसाउदनें पकडून आदिलशहाकडे रवाना करून दिला. त्यावर 'मित्रांच्या रदबदलीमुळें एकवार माफी होत आहे. पण पुढें संभाळून रहा. आतां तूं फोंड्याचा वेढा उठविला पाहिजे. नाहींतर तुला कामावरून दूर केलें जाईल' असा सुलतानाचा रुस्तुमजमाला खलिता आला. या पत्रानें भिऊन जाऊन रुस्तुमजमानें फोंड्याचा वेढा उठविण्याचे प्रयत्नांची कमाल करण्याबद्दल **महमदखानाला** सांगून पाठविलें. महमदखानानें लगेच किल्ल्यापासून दोनतीन मैलांवरील रुस्तुमजमाच्या एका गांवीं मुकाम करून आपण फक्त आपल्या मुलखाची व्यवस्था पहाण्याकरितां आलों आहें असें शिवाजीच्या (वेढा घालणाऱ्या) सेनापतीला कळविलें. शिवाजी व रुस्तुमजमा यांचा स्नेह असल्याचें त्याला माहीत असल्यामुळें महमदखानाबद्दल कोणताहि संशय न येऊन, दुसऱ्या दिवशीं सणानिमित्त खुदबा पढण्याकरितां म्हणून तो एक मैलावर असलेल्या टेकडीवर आपले सर्व मुसलमान लोक घेऊन गेला असतां, ही संधी साधून महमदखानानें ठिकाणावर राहिलेल्या लोकांवर त्वरेनें हल्ला करून प्रार्थनावाले लोक मदतीला येण्यापूर्वींच प्रथम त्यांचा व नंतर प्रार्थनेहून परत

येणाऱ्या लोकांचा असा निरनिराळ्या वेळीं पराजय केला आणि वेढा उठविला. पूर्वी लिहिल्याप्रमाणें हाच दिवस किल्ला शिवाजीच्या स्वाधीन करण्याचा असा ठरलेला होता. वेढ्यांत सांपडलेल्या गरीब लोकांना गेले ३ दिवस पाला खाऊनच आपली उदरपूर्ती करावी लागली होती. महमदखानाला अशी युक्ति लढवून देखील प्रथम दोन तीन वेळ तरी हार खावी लागली. ह्या गोष्टीमुळें **रुस्तुमजमा आणि शिवाजी यांचा दीर्घकालीन स्नेह पार बिघडला** अशीच सर्वत्र समजूत आहे. आतां **रुस्तुमजमानें** शिवाजीपासून फोंडा, कुडाळ, बांडा, संकले (?) आणि डिचोली हीं पांच ठाणीं घेतलीं. तो 'आज येईल' अशी प्रत्येकाची अपेक्षा आहे. पण तो अजून घाटाखालीं उतरला नाहीं. आदिलशहानें **राजापुरापर्यंतचा** मुलूख त्याच्या हवालीं केला असें म्हणतात. तें खरें असलें तर तो लवकरच मोठा मनुष्य होईल. **सिद्दी मसाउद** कोलापूरच्या आजूबाजूच्या मुलुखाचा बंदोबस्त करीत आहे. वीस दिवसांखालीं **सर्जाखानानें** मोंगल छावणीच्या एका भागावर हल्ला केला असतां आपल्या मुलाला पडलेला शत्रूचा वेढा उठवून त्याचा जीव वांचविण्याच्या खटपटींत स्वतः तोच मारला गेला. मोंगलांना तोंड देणारा एवढाच खंदा वीर होता. तो गेल्यामुळें आदिलशहाचें भयंकर नुकसान झालें यांत शंका नाहीं. **औरंगजेबाकडे** मोठे नजराणे घेऊन **शिवाजी** गेला आहे असें ऐकतों तें कितपत खरें आहे कोण जाणें? **फोंड्याचा** वेढा चालू असतांना आमच्यापासून ३० मैलांवर सैन्यांच्या हालचाली चालू असल्यामुळें आम्हांला फार भय वाटत होतें.

खं. २० ले. ११९ पृ. ३००, ३०१ जु. ९ फ. १०७६ जिल्हेज १	(११२७) सरकारी नोकर व जमीदार	श. १५८८ ज्येष्ठ शु. ३ इ. १६६६ मे २६

धरमगदास दिवाण सरकार तळकोकण

मुत्सद्दी, सरदोमू. देसपां. महाज. वगैरे कसबे कल्याण मामले मुरंजन सरकार तळकोकण निजापुन्मुलकी सुभे औरंगाबाद.

त्रिंबक नरस प्रभु औरंगाबादेस जाऊन खिलाफ माळुमात करून वजारतपन्हा **बाजी सफीखान** यांची सनद धरमंगदास दिवान यास घेऊन आला. त्यास, धरमंगदास दिवान यानी **त्रिंबक नरस प्रभु** यास सनद दिल्ही. त्यांत पटवारी अगर कुलकर्णी ऐसें नाहीं. कदम चालत आले आहे तेन्हेप्रमाणे चालवणें, त्यास नविसिंदगिरी व हुदेदारी सरकारातून मुशारा घेऊन दिवानतर्फेनें चाकरी करावी, ऐसें होतें. तें [पेशवांईतील श. १६५२ मधील] पंचाइतांच्या मतें तहकीक जालें कीं त्रिंबक नरस प्रभु नविसींदे व हुदेदार सरकारतर्फेचा नोकर होता. कुलकर्णासी तालुक नाहीं; दिवाणतर्फेचा

चाकर. अजी सबब त्यास ताकीद की दामदीरम सरकारचा तफावत न करणें. जमीदार असता, तर ऐसी सनद हासील न होती. ऐसा पंचाइतांचें मतें निवाडा जाला.

इं. फॅ. १२ } (११२८) { श. १५८८ ज्येष्ठ व. २
पृ. १६१ इ. } सुरत-कारवार. { इ. १६६६ जून ८

या बाजूला इतकीच बातमी आली आहे कीं, **शिवाजी** बादशहापुढें गेल्यावेळीं त्याचें वर्तन बादशहाला पसंत न पडल्यामुळें शिवाजीला कठोरपणानें वागविण्यांत आलें. इतर उमरावांप्रमाणें, मुक्याप्रमाणें हात बांधून दूर अंतरावर आदबीनें (उभें) राहण्याचा अपमान सहन न होऊन त्याचा संताप झाला. असें ऐकल्याबरोबर बादशहानें बढती करण्याचीं वचनें देऊन त्याच्या समाधानाकरितां माणसें पाठविलीं. त्याला काबूलकडे पाठविल्याची बातमी आहे. परंतु त्या प्रांताचा कारभार करण्याचा उमरावी अधिकार त्याला दिला आहे कीं प्रसंग पडेल त्याप्रमाणें दूर करण्याचा बादशहाचा इरादा आहे; हें समजण्यास, आम्हीं दरबारापासून बरेच दूर असल्यामुळें, आम्हांला मार्ग नाहीं.

भांडार. कॉमे. व्हॉ. } (११२९) { श. १५८८ ज्येष्ठ-आषा.
सरकार-पृ. ३०२ } { इ. १६६६ जून-जुलै(?)

मिर्झा राजा जयसिंग याचा गुमास्ता—

" **शिवाजी** भेटीला आला त्यावेळीं दरबारी शिष्टाचाराचें उल्लंघन केल्यामुळें थोडे दिवसपर्यंत बादशहानें त्याला दरबारला येण्याची बंदी केली होती. परंतु नंतर त्याचा सन्मान करून व कृपा दाखवून त्याला परत पाठवावा असा औरंगजेबाचा बेत होता." [हाप्त अंजुमान पृ. २३८ अ., सरकार-पृ. १४७-४८]

भांडार. कॉमे. व्हॉ. } (११३०) { श. १५८८ ज्येष्ठ-श्रावण
सरकार-पृ. ३०२ } जयसिंग—रामसिंह { इ. १६६६ जून-ऑगष्ट (?)

'प्रथम, **शिवाजी**बद्दल जामिनकी व जबाबदारी तुझ्याकडून बादशहानें काढून घेतली होती असें कळलें. त्यावरून, ' तुझा त्यांत कांहीं संबंध नव्हता ' असें जें मीं पत्र पूर्वी पाठविलें होतें त्याचा उपयोग झाला; आणि तुझ्यावरील जबाबदारी संपली; असें मी समजत होतों. परंतु आतांच बादशाही पत्र मिळालें त्यावरून **शिवाजी**ला तुझ्याच ताब्यांत देण्याचा इरादा दिसतो! आजपर्यंत वाट पाहिली तशीच आणखी थोडी पहा. इतक्यांत माझे अर्जाचें उत्तर येईल आणि त्याचे अनुरोधानें **शिवाजी**बद्दल काय विनवावयाचें तें ठरवितां येईल. मीं असा अर्ज केला आहे कीं " एकतर मला दख्खनच्या सैन्याचा संपूर्ण अधिकार सोंपवून द्या आणि भरपूर कुमक पाठवा; किंवा तसें जमत नसेल तर दरबारकडे परत तरी बोलवा." तुला आग्र्याचा फौजदार नेमून पुनः

शिवाजीला तुझ्याच ताब्यांत ठेवण्याचा बादशहाचा विचार आहे असें तूं लिहितोस; त्यावर आपल्याला बादशाही दौरा सोडून कधींच रहावें लागलें नसल्यामुळें यावेळींहि बरोबर घ्यावें असें बादशहाला म्हणावें.

जर बादशहा स्वारीवर निघत असतील, तर शिवाजीला आग्र्यालाच ठेवणें सोईचें पडेल. त्याची समजूत करून त्याला असें आश्वासन दिलें पाहिजे कीं, दरबार दख्खनमध्यें पोंचतांच त्याला तिकडे बोलाविण्यांत येईल. तूं मात्र, नित्याचें धोरण म्हणून बादशहाबरोबरच राहणें इष्ट आहे. नाहींतर तुझे अनुयायी निराश होऊन त्यांची निष्ठा पक्की राहणार नाहीं. [हाप्त अंजुमान १९७ अ.]

भांडार-कॉमे. व्हॉ. } (११३१) { श. १५८८ ज्येष्ठ-श्रावण
सरकार-पृ. ३०२ } जयसिंग—भोजराज कछवा { इ. १६६६ जून—ऑगष्ट ?

शिवाजी आग्र्यास आहे त्या बाबतींत (कुमार रामसिंहाला असें कळवा कीं) बादशाही सत्तेला कोणत्याहि प्रकारचा अपाय न होतां माझ्या व तुझ्या शब्दाची किंमत राहील असें वर्तन ठेवावें. [हाफ्त अंजुमान, पृ. २३४ अ; सरकार पृ. १४८]

भांडार. कॉमे. व्हॉ. } (११३२) { श. १५८८ ज्येष्ठ—श्रावण
सरकार—पृ. ३०३ } जयसिंग—औरंगजेब. { इ. १६६६ जून—ऑगष्ट

" पूर्वी शिवाजीला परत जाऊं द्यावें असें मीं विनविलें होतें. तेव्हां दख्खन-मधील परिस्थिति थोडी निराळी होती. आतां (मोंगलांची परिस्थिति) थोडी बिकट झाली असल्यामुळें शिवाजीला इकडे सोडणें शहाणपणाचें होणार नाहीं. परंतु तेथें ठेवण्यांत सावधगिरी राखिली पाहिजे. नाहींतर त्याचें जीवित व स्वातंत्र्य धोक्यांत आहे अशी कल्पना झाली म्हणजे त्याचे (दक्षिणेंतील) अमलदार निराशेनें आदिलशहाला मिळतील. आणि मग सर्वत्र अंदाधुंदी माजून बखेडा मात्र होईल." [हाप्त अंजुमान—१९४ अ.]

" शिवाजीवर मला खुद्द बादशहांनीं पाठविलें......अगदीं थोड्या वेळांत मला यश प्राप्त झालें. आणि नंतर हजारों युक्त्या करून त्याला आणि त्याच्या मुलाला दोघांनाहि मीं बादशहासमोर पाठवून दिलें. बादशहांना या गोष्टी माहीत आहेत. असें असून दरबारी लोक आतां म्हणतात ' शिवाजी हा असा होता, हें तुला माहीत असतांना त्याला कशाला दरबारला पाठविलें ? '........असें ऐकतों. जेव्हां मीं त्याला पन्हाळ्यावर पाठविलें तेव्हांहि 'जयसिंगानें त्याला आपल्या काबूंतून पळून जाण्यास संधी दिली' अशीहि लोकांनीं टीका केली. आणि आतां त्याला (ताब्यांत आणून देण्याकरितां) बादशाही मुलाखतीला पाठविलें तरीहि ' कशाला पाठविलें ? '

म्हणून म्हणणें आहेच. या प्रकारांनीं एवढेंच झालें कीं, अर्धवट राहिलेलें विजापूरचें प्रकरण मात्र अधिक घोटाळ्यांत पडलें आहे." [हाप्त अंजु. १९४–१९५ अ.]

सा. ले. १६२ } (११३३) { श. १५८८ श्रावण व. २
सु. १०६७ सफर १४ } मिसेली फा. सी० { इ. १६६६ आगस्ट ६

रा० शंकराजी रत्नाकर हवाल० कार० पर० सुपे–रायाजी रत्नाकर हुदे० व मोक० व खोत कसबे सुपेः– १३ मोहरमचें खुर्देखत महादाजी गोसाव्याचे इनाम चालविण्याबद्दल आलें आहे. तरी गणो तिमाजीनें गोसावी यास दिलेलें इनाम चालविणें.

भांडार. कॉमे. व्हॉ. } (११३४) { श. १५८८ श्रावण
सरकार. पृ. ३०४ } जयसिंग– { इ. १६६६ आगस्ट

शिवाजीला दरबारीं पाठविण्याकरितां केलेल्या युक्त्याप्रयुक्त्या व्यर्थ होऊन माझे दैवीं खडतर आपत्ति आली आहे... माझ्या शत्रूंनीं चिथावून दिल्यामुळें, शिवाजीच्या पदरचे ब्राह्मणांनीं, शिवाजीचे सुटकेची सर्व जबाबदारी रामसिंगावर घातली. रामसिंगाचे सांगण्यावरून, आणि रामसिंगाच्या पहाऱ्यांतील ढिलाईमुळें शिवाजीला जातां आलें; अशी त्यांनें समजूत करून दिल्यामुळें रामसिंगाची मनसब व जहागीर काढून घेण्याचें घाटत आहे. माझ्या मनांत असे बेमानीचे विचार आले असतील तर मला मरण येवो ! मीं शिवाजीला नेरीस आणिलें; त्या माझे शब्दांवर विश्वास न ठेवतां शिवाजीचे ब्राह्मण जास्त खरें कां मानावे !

इं. फॅ. १२ } (११३५) { श. १५८८ भाद्र. व. २
पृ. २०६–२०७ इं. } { इ. १६६६ सप्टें. ५

गिफर्ड अँड चँबरलेन, हुबळी—सुरत

रुस्तुमजमाला शिवाजी विरुद्ध सैनापत्य मिळाल्यानंतर त्याच्या नेहमींच्या वहिवाटीप्रमाणेंच शिवाजीशीं संधान ठेवून आणि आपण शत्रूविरुद्ध शक्य ती खटपट करीत आहों, असें आदिलशहाला भासवून, कुडाळच्या हद्दीवरील रांगणा या नांवाचा मजबूत किल्ला अंतस्थपणें त्यानें रावजी पंडिताचे हवालीं केला. ह्यामुळें आदिलशहानें चिडून जाऊन सर्व हस्तकांसह त्याची कत्तल करण्याचा हुकूम दिला. परंतु मित्रांच्या मध्यस्थीमुळें विजापुरास जातीनें जाऊन खुलासा करण्याची संधि त्याला देण्यांत आली आहे. आतां विलक्षण दैवानें त्याला हात न दिला तर तो यांतून सुटणें कठीण आहे.

फोंड्याखालीं रुस्तुमजमाचे २००० सैन्याचे तनख्याची तजवीज करण्यासाठीं साधेल त्या उपायानें पैसा उभारूनहि जेव्हां मागेना तेव्हां रुस्तुमजमाला आमचें स्मरण होऊन त्यानें आपल्या मुलाला सुचविल्यामुळें त्या मुलानें आमचेकडे हजार होनांची

मागणी थोडीशी अधिकाराचे शब्दांत केली. नकार दिल्यास होणाऱ्या जबरदस्तीचा आणि दरबारचे इतराजीमुळें रुस्तुमजमाच्या वाढत्या अविश्वसनीयतेचा विचार करून आम्हीं २३ तारखेला कारवार सोडून ६ दिवसांत **हुबळी** गांठली. येथील देसाई येथेंहि लूट करण्याची भीति दाखवीत आहे.

इं. फॅ. १२ } (११३६) { श. १५८८ आश्वीन शु. ८
पृ. १६१ इ. } सुरत-कंपनी (आफ्रिकन बोटीनें गेलेलें पत्र) { इ. १६६६ सप्टें. २५

शिवाजी, अखेरीला त्याच्यासारख्याच मोठीं वचनें देऊन घात करणाऱ्या बादशहाच्या कचाटींत सांपडला ! खुद्द **शिवाजीकरितां ६००० घोड्यांची मनसब**, आणि **मुलाकरितां ३००० घोड्यांची मनसब** अशीं बढतीचीं मोठीं वचनें आपल्या सेनापतीचे मार्फत देऊन, आणि वरती गत अपराधांची क्षमा करून कृपा करण्याबद्दल लेखी पत्रें पाठवून, बादशहानें वारंवार आमंत्रण केल्यामुळें भाळून गेलेला शिवाजी स्वतःला सुरक्षित समजून बादशहाला कुर्निसात करून राजनिष्ठा व्यक्त करण्याकरितां म्हणून गेला. परंतु दरबारांत गेल्यावर आपल्यापेक्षां कमी दर्जाचे उमरावांचे खालीं उभें केल्यामुळें, बादशहाची पर्वा न करितां तो निधड्या छातीचा वीर संतापून तिरस्कारानें दरबाराचा त्याग करून निघून गेला. बादशहानें त्याच्या समाधानाकरितां अनेक सरदार पाठविले; तरी देखील तो परत येईना, कीं दरबारची निर्भर्त्सना करण्याचें थांबेना. 'आपण युद्धांत जिंकलेले कैदी नाहीं ! तह होऊन भेटीस आलों आहों' असें तो म्हणाला; व बादशहापुढें येण्यास पुनः कधींच तयार झाला नाहीं. बादशहानें नंतर शिवाजीनें बरोबर आणलेल्या सर्व लोकांस रजा देऊन, त्याला फक्त हालचालीची मोकळीक ठेवून त्याच्या घरावर आपल्या लोकांचा इतका कडक पहारा ठेविला कीं बहुतेकांच्या मतानें त्याला स्वदेशाकडे परत जाण्यास किंवा येथून सुटका करून घेण्यास सवड दिली जाणार नाहीं. 'शिवाजीपासून आपली आतां मुक्तता झाली' असेंच सर्वजण समजत होते.

[पृ. १६५] सेंट जॉर्ज बोटीनें गेलेलें पत्रः– **शिवाजी**वर इतका कडक पहारा ठेवूनहि अखेरीला तो आणि त्याचा मुलगा असे दोघे **दोन पेटाऱ्यांत बसून** (conveighed in two baskets) निसटून गेले (got away) अशी खात्रीलायक बातमी नुकतीच आली आहे. त्याचा कोठेंच तपास लागत नाहीं. या बाजूच्या प्रांतांत (शिवाजीच्या सुटकेमुळें) सर्वत्र भीति आणि संशय यांचें साम्राज्य पसरलें आहे.

ओरि. कॉरे. भा. २९ } (११३७) { श. १५८८ आश्वीन व. ३०
नं. ३१९४ इ. } सुरत–कारवार { इ. १६६६ आक्टो. १७

जमिनीवर किंवा समुद्रावरहि तुम्हांआम्हांला आतां जपून राहिलें पाहिजे. कारण मोंगलांच्या दरबारांतून **शिवाजी सुटून आला** हें नक्की आहे. त्याची युक्ति यशस्वी

झाली. आतां तो स्वदेशीं पोंचल्याची बातमी आली आहे. दरबारामध्यें त्याच्या अपेक्षेप्रमाणें स्वागत न झाल्यामुळें संतापून जाऊन **भयंकर सूड उगविण्याची** त्यानें प्रतिज्ञा केली आहे. ४५ हजार स्वारांनिशीं तो सुरतेनजीक आल्याची बातमी आल्यामुळें सर्वत्र अनिश्चितता आणि अंदाधुंदीचें साम्राज्य झालें. आतां ही बातमी कदाचित् खोटी ठरली तथापि शिवाजी मोकळा असे तोंपर्यंत व्यापारी वगैरे लोकांना स्वतःच्या बायका-मुलांच्या रक्षणाच्या काळजीपुढें व्यापाराकडे लक्ष देणें फावणार नाहीं ! तुमचेकडेहि हीच परिस्थिती होईल !

इं. फॅ. २२ }
पृ. २५१ इ. }

(११३८)

रजपूत = हिंदूशिपाई

{ श. १५८८ कार्तिक शु. १०
{ इ. १६६६ आक्टो. २७

फॉक्सक्रॉफ्ट---सुरत

विंटरनें स्वसंरक्षणाकरितां पोर्तुगीज आणि **रजपूतहि** ठेविले होते.

['रजपूत किंवा शिपाई' असा स्पष्ट पर्याय हचिसननें आपल्या वृत्तांतांत दिला आहे. अशाच अर्थानें हा शब्द इं. फॅ. भा. १० पृ. १०५ व भा. ११ पृ. ३६ व ३८५ यांवर वापरला आहे. पहा- इं. फॅ. १२ पृ. २५१ टीप.]

भांडार. कॉमे. व्हॉ. }
सरकार. पृ. ३०५ }

(११३९)

जयसिंग-

{ श. १५८८ कार्तिक व. ४
{ इ. १६६६ नोवें. ५

माझा काल फिरला आहे आणि माझी काळजी सतत वाढत आहे. हे **खोटे विजापूरकर उगाच कालहरण** करीत बसले आहेत. पळपुट्या शिवाजीचीहि कांहीं खबर लागत नाहीं....अनेक वेषांतर केलेले विश्वासू हेर शिवाजीची खबर घेण्याकरितांच पाठविले आहेत. [हाफ्त अंजु. २०० अ].

सं. ७ पृ. ७१ जु. ९ }
हि. १०७७ जवल २८ }

(११४०)

{ श. १५८८ कार्तिक व. ३०
{ इ. १६६६ नोवें. १६

औरंगजेब बादशहा---------सयाजी परसोजी भोसले.

पूर्वीपासून नांदनज हा गांव तुम्हास इनाम आहे. आतां अलमगीरपूर नांवाचा नवा गांव पर. करोडी सर. अहमदनगर सुभे औरंगाबाद हा तुम्हीं वसविला तो तुम्हास इनाम दिला.

इं. फॅ. १२ }
पृ. १७५-७६ }

(११४१)

(अनामी लेखक) सुरत-इंग्लंड.

{ श. १५८८ कार्ति. मार्ग.
{ इ. १६६६ नोवें.

दहा महिन्यांपूर्वी आपलें जामिन सुरक्षित राखण्याच्या अटीवर **शिवाजी राजा जयसिंगाच्या** हवालीं झाला. पण बादशहापुढें जातांच बादशहानें त्याचा घात करण्याचें

ठरविल्याबरोबर राजा जयसिंगानें शिवाजी मेला तर बादशहाच्या समक्ष आपण स्वतःचा प्राणघात करूं; असें शपथेवर सांगितल्यामुळें बादशहानें त्याचा जीव न घेतां जयसिंगाच्या मुलाच्या (रामसिंग) ताब्यांत त्याला कैदी म्हणून दिलें. शिवाजीला बादशहापुढें नम्र होण्यास भाग पाडणें अशक्य असल्यामुळें रामसिंग व त्याचा बाप यांनीं त्याला मित्रत्वानें वागविण्याचें वचन देऊन औरंगजेबाकडे पाठविलें होतें. परंतु जेव्हां बादशाह आपला स्वतःचा शब्द मोडून त्यांच्या वचनाला हरताळ फांसूं लागला तेव्हां ह्या त्याच्या नीचपणामुळें मुलगा आणि बाप (किंवा बापाच्या सहाय्यानें मुलगा) शिवाजीला पळून जाण्याची संधि देण्यास तयार झाले. बादशहाच्या कानावर ही गोष्ट आल्यावर रामसिंग (६००० चा मन्सबदार) ला कामावरून दूर करून व त्याच्या बापाला पुष्कळ सैन्य देऊन शिवाजीला परत घेऊन येण्याकरितां पाठविलें. इतक्यांत इराणच्या शहानें बादशहाच्या मुलखांत स्वारी केल्यामुळें बादशहानें जयसिंगाला परत बोलाविलें. सुरतेला अशी विश्वसनीय खबर कळली कीं, त्यानें येण्याचें नाकारलें. जयसिंगाचें सैन्य बहुतांशीं हिंदूचें बनलेलें असल्यामुळें जयसिंगाच्या शत्रुत्वापासून औरंगजेबाला फारच भय आहे. शिवाजी सुरतेवर येण्याची हूल व पळापळी ...पण जर तो यदाकदाचित् आला तर बसऱ्याहून गलबतें परत येण्याच्या वेळेवर (लुटीची चांगली संधि असते म्हणून,) येईल...विजापुरचा आदिलशहा आणि गोवळकोंडेकर असे उभयतां औरंगजेबाच्या पिछाडीवर हल्ला करणार आहेत अशीहि बातमी आहे.

इं. फॅ. १२ }
पृ. १७१–७२ इ. }

(११४२)
सुरत—कंपनी

{ श. १५८८ मार्ग. शु. ९
{ इ. १६६६ नोव्हें. २४

शिवाजीच्या सुटकेबद्दल खात्रीलायक बातमी आल्यामुळें आतां बादशाही मुलुखावर आणि प्रजेवर भयंकर सूड घेतला जाईल अशी लोक अटकळ करीत आहेत. सुरतेवर शिवाजी येणार अशी हूल उठल्यामुळें सर्वत्र पळापळ सुरू झाली. तो केव्हांहि येवो, येथें एकहि कोणी शहरांत रहाणार नाहीं. त्याचेशीं सलोख्यानें वागण्यास तुम्हीं सुचवितां; पण दरोडेखोरापाशीं कसला स्नेह राखावयाचा? चार पावलें दूर रहावें हेंच चांगलें.

ओ. कॉ. भाग २९ }
नं. ३२०३ इ. }

(११४३)
सुरत, रँडॉल्फ टेलर-जॉन स्टॅन्यन

{ श. १५८८ मार्ग. शु. ९
{ इ. १६६६ नोव्हें. २४

शिवाजी मोंगली दरबारांतून सुटून स्वदेशांत आला आहे अशी बातमी आल्यामुळें सर्व दख्खनभर भीतीचा संचार झाला आहे. शिवाजी अजून बराच दूर आहे तोंच त्याच्या नांवानें कित्येक ठिकाणीं दंगे पडण्यास सुरुवात झाली आहे.

हि. रे. क. ९
पृ. ११४ इ. १५ डिसें. न्यू.

(११४४)

श. १५८८ मार्ग. व. ४
इ. १६६६ दिसे. ५

जयसिंगाचा वकील-गोव्याचा गव्हर्नर:-औरंगजेबाविरुद्ध बंड करणाऱ्या लोकांना पोर्तुगीजांनीं आश्रय देऊं नये. (या कलमाचा रोख शिवाजी विरुद्ध असावा. कारण तो आग्र्याहून सुटल्याची वार्ता आली होती.)

भांडार. कॉमे. व्हॉ.
सरकार-पृ. ३०५-३०६

(११४५)

श. १५८८ मार्ग-पौष.
इ. १६६६ डिसें.

उदयराज (जयसिंगाचा गुमास्ता)—

" शिवाजी (राजगडला) परत आला आहे; परंतु मुलगा बरोबर आला नाहीं म्हणून तो फार काळजींत आहे. **बादशाही सत्तेला शरण जाण्याबद्दल तो उघड बोलत** आहे. परंतु त्याचे मनांत काय आहे हें कोण जाणणार ? शिवाजीचा जावई फलटणकर बजाजीचा मुलगा **महादजी निंबाळकर** पुण्याच्या आसपास धुमाकूळ घालीत असतो. माझा धनी (जयसिंग) यानेंहि त्या बाजूला बंदोबस्ताकरितां त्या प्रांताचे जहागिरदार वगैरे नेमिले आहेत. ते असे:— बाबाजी भोसले वगैरे लोक सुपें येथें; हलालखान इंदापूरचे बाजूला; घलीबखान चांभारगोंधाकडे; हुसनखान, अबदुल रसूल आणखी कांहीं दक्षिणीहि इतरत्र ठेविले आहेत. त्रिंबकजी भोंसले वगैरे लोक रौसिनकडेहि पाठविले आहेत. सर्वांच्या आधीं बाबाजी भोंसले आपल्या जहागिरींत पोंचून त्यानें महादजीवर हल्ला करून त्याचे पुष्कळ लोक मारले; व त्याचा झेंडा, तोडा, १५० घोडे, बाण इत्यादि पकडून तो परत आला. तोडा व झेंडा परक्याच्या हातीं राहूं देऊं नये अशी समजूत असल्यामुळें महादजी शरण आला. परंतु बाबाजीनें त्या वस्तू दिल्या नाहींत. पुढें चार दिवसांनीं त्याला विजापुरकरांची मदत मिळाली व त्यानें बाबाजीवर अचानक छापा घातला. बाबाजी या हल्ल्यांत पडला. दत्ताजी देशमूख पंढरपुरानजीक पडला. महादजीलाहि जखमा झाल्या.........जयसिंग त्याच बाजूला ह्या अपयशाचें परिमार्जन करण्याकरितां जाणार होता. परंतु आपण तिकडे गुंतलों तर विजापूरकर मध्येंच उचल खातील या भीतीस्तव तो बेत त्यानें रद्द केला व तिकडच्या बाजूला ५००० लोकांनिशीं अबदुल हमीदला रवाना केलें. [हाप्त अंजु० २११ ब.]

खं. २० ले. १२०
सु. १०६७ जखर ३०

(११४६)
फा. मु. मज. सी.

श. १५८८ पौष. शु. २
इ. १६६६ डिसें. १७

अजदिवाण पर० वाई-ता मोक० देहाय प० वांई

अऊभट बिन नारायणभट सेकि. वाई यांस पसरणीं, पळसी, तळिये, मुऱ्हे, बोर-

खल या गांवांतून ५ होन तूटपटी सादिलवार येणें आहे. सु. १०६६ सफर १४ ची मिसेली आहे; तरी देत जाणें.

इं. फॅ. १२ } (११४७) { श. १५८८ पौष व० १२
पृ. १७७ इ. } कॉन्झल लेनॉय, आलेपो–सर जॉन फिंच. { इ. १६६७ जाने. १२

विजापूरची **बडेसाहेबीण** मस्कतच्या यात्रेहून परत येतांना बसऱ्याला आली. तेथें तिच्याकडून ९ ह. तोमा किंवा ३० हजार पौंड घेण्यांत आले......**औरंगजेब दिल्ली** राजधानी सोडून, दख्खनच्या लढाईकरितां उभारलेल्या सैन्याकडे जाण्यासाठीं निघाला.

डच रेकॉर्डस्. भा. २८ } (११४८) { श. १५८८ माघ शु. १
नं. ७३४ इ. जाने. २५ न्यू. } डच ग. ज.– डच कंपनी { इ. १६६७ जाने. १५

वेंगुर्ला– सुप्रसिद्ध **शिवाजी** गेल्या मेमध्यें पुष्कळ नजराणे घेऊन **आग्र्यास** गेला होता. परंतु तेथें त्याचें चांगलें स्वागत झालें नाहीं. अगदीं अलीकडील खबर अशी आहे कीं, त्यानें नवीन सैन्याची उभारणी करून **बऱ्हाणपुराजवळ** झालेल्या युद्धांत **बादशाही सैन्याचा पराजय केला** !

खं. १६ ले. २२ } (११४९) { श. १५८८ माघ शु. १०
श. व सु. १०६७ साबान ९ } महजर { इ. १६६७ जाने. २४

जिजाबाईच्या उपस्थितींतः– बाबाजी झुंझारराव देशमूख कानदखोरे व भाऊ मलोजी पतंगराव यांमध्यें वृत्तीचा कथळा होता. मागें गोतानें वृत्ती वाटून दिली होती. याशिवाय नवीन वाटा २५० टके मलोजी यास बाबाजीकडून देवविला.

डच. रेकॉर्डस्. भा. २८ } (११५०) { श. १५८८ फाल्गुन व. ११
नं. ७३७ इ. मार्च २० न्यू. } वेंगुर्ला,—डच कंपनी. { इ. १६६७ मार्च १०

देशांतील परिस्थितीबद्दल सुलतानालाहि अज्ञानांत ठेविलें जातें. नवा सेनापती आतां शिवाजीवर पाठविला आहे. तथापि तो, प्रजेला लुटून पूर्ण नागविल्यावर, फार तर शिवाजीला कांहींसा मागें हटवून पुनः परत जाईल; आणि पूर्ववत् सर्व चालून गारिबांचे कष्ट कांहीं चुकणार नाहींत.

कों. इ. सा. ले. ९३ } (११५१) { श. १५८८
सु. १०६७ } उल्लेख { इ. १६६६

कुडाळ विलायेती **शिवाजी राजे** यांणीं घेतलेवरी विलायेतीचे गांव मिळवून सुभा कुडाळ केला. एकंदर गाव २०१.

भांडार. कॉमे. व्हॉ. } (११५२) { श. १५८८
सरकार. पृ. ३०६-७ } जयसिंग--जाफरखान { इ. १६६६

"विजापूर, गोवळकोंडा आणि शिवाजी या त्रयीच्या विरुद्ध माझें सर्व सामर्थ्य एकवटून मीं प्रयत्न केला आहे व करीतहि राहीन. शिवाजीनें कसें तरी मला एकदां भेटावयास यावें अशा तजविजींत मी आहें. म्हणजे येतां जातांना केव्हां तरी संधी साधून माझे हुशार लोक त्याचा नाश करितील ! हा बादशहाचा बंदा लोकांच्या निंदास्तुतीकडे न पाहतां बादशाही कार्य फत्ते करण्याकरितां कांहींहि करण्यास तयार आहे. बादशहानीं संमति दिली तर त्याच्या कुळाशीं शरीरसंबंध जोडण्याचें म्हणजे माझ्या मुलाला त्याची मुलगी करण्याचें बोलणें लावण्यास मी तयार आहें. त्याचें घराणें आणि जातकुळी माझ्यापेक्षां इतकी हीन आहे कीं, आम्ही त्याचा स्पर्श झालेलें अन्नहि खाणार नाहीं; मग लग्नसंबंधाची गोष्ट कशाला ? त्याची मुलगी पकडून आणली गेली तरी मीं तिला आपल्या जनानखान्यांतहि ठेवणार नाहीं ! पण तो हीन कुळांतला असल्यामुळें हें आमिष गिळून हुकाला अडकेल ! हा बेत फार गुप्त राखला पाहिजे. उत्तर त्वरित पाठवावें." [हाफ्त अंजु. पृ. १३९ अ]

राम. अं ६५ ले. १२ } (११५३) { श. १५८८
? } { इ. १६६६

बलजी संभाजी भोसले-- महादभट सेडगे कसबे येल्लुर
तीर्थपुरोहितपण व अभिषेक ह्यांबद्दल वर्षासन १७ होन दिले.

स. पृ.१४० } (११५४) { श. १५८८
? } उल्लेख { इ. १६६६

जे वख्ती **मिर्जा राजे** जैसिंग येहि **शिवाजी राजे भोसले** यासी सलाह करून तर्फ कर्याती मात्रळ देह २६ त्याचे तसरूफ टाकले ते वख्ती शिरिस्तियामध्यें देह २६ दरोबस्त शिवाजी मरहूम याच्या नांवें लिहिले.

ई. फॅ. १२ } (११५५) { श. १५८९ चैत्र शु. ११
पृ. २६६ इ. } सुरत-कंपनी. { इ. १६६७ मार्च २६

औरंगजेबाचा हिंदूंवर झुलूम : **बनिये लोकांनीं** शेंकडा ५ टक्के जकात खरेदीच्या प्रांतांत देऊन तेथून सुरतेला दाखला आणून दाखवावा असा बादशहानें नियम

केला आहे. कित्येक वेळां तेथील अधिकारी तो दाखला न मानतां पुनः जकात भरण्यास लावितात. शिवाय त्यांना दस्तुरीचा म्हणून पुष्कळच पैसा भरावा लागून त्यांच्या मालाची किंमत भरमसाट वाढते! आम्हांला (इंग्रजांना) सर्व मार्गांतील दस्तुऱ्या माफ असून बंदरांतून माल हालवितांना फक्त शेकडा ३ एवढीच जकात द्यावी लागते.

इं. फॅ. १२ } (११५६) { श. १५८९ चैत्र शु. ११
पृ. २६८-९ इ. } सुरत—कंपनी { इ. १६६७ मार्च २६

शिवाजी पूर्ण सुटून स्वदेशांत येऊन विजापूरच्या राज्यांत जाळपोळ आणि लुटालूट करूं लागल्यामुळें आणि सुरतेला पुनः एकदां येण्याचा त्याचा निश्चय जाहीर असल्यामुळें येथील लोकांना त्याचें भय उत्पन्न होऊन ते सर्वजण देशांतर पळून जाण्याची तयारी करीत आहेत. जमीन आणि समुद्र अशा दोन्ही बाजूंनीं तो हल्ला करणार असून ५०।६० गलबतें त्याकरितां त्यानें सज्ज केलीं आहेत.

शि. प्र. (९) सेन } (११५७) { श. १५८९ वैशाख शु. ६
इ. एप्रील २९ न्यू. } गोवा व्हाईसरॉय-मिर्झाराजा जयसिंग { इ. १६६७ एप्रील १९

'मराठ्यांच्या विरुद्ध मोंगलांशीं गोव्याचें आरमार सहकार्य करील. मात्र युद्धाचा खर्च मोंगलांनीं करावा'. [बिकर ४-पृ. १३१-१३२; पृ. १३४ वर याच मजकुराचें औरंगजेबाचे नांवचें इ. १६६८ मे ८ चें पत्र आहे.]

ॲ. रॉ. ए. फारसी. } (११५८) { श. १५८९ वैशाख शु. ९
रिया. पृ. ३३५ } शिवाजी—औरंगजेब { इ. १६६७ एप्रील २२

हा बंदा गुलाम आपली नोकरी करून हुकूम पाळण्यांत मोठें भूषण मानीत आहे. हिंदुस्थानच्या बादशहाची मोठी फौज मजवर चालून येत आहे. या फौजेशीं टक्कर देण्याचें सामर्थ्य पृथ्वीमध्यें कोणास तरी आहे काय? म्हणून माझी अशी नम्र विनंती आहे कीं, माझा मुलगा संभाजी यास चार हजार स्वारांची मनसब बादशाही फौजेंत मिळावी. मनसब न मिळाली तरी ही फौज घेऊन नेहमीं तो बादशहाची नोकरी करीत राहणार. माझ्या ताब्यांत किल्ले होते ते सर्व मी बादशहाकडे सोंपून दिले आहेतच; आणि अद्यापि जे कांहीं किल्ले माझ्याकडे आहेत ते व माझी सर्व जिंदगी, आपल्या सेवेस अर्पण आहे. [हें पत्र वाचून बादशहानें दिवाणाजवळ दिलें.]

इं. फॅ. १२ पृ. २७३-७४ } (११५९) { श. १५८९ आषाढ शु. १४
जुलूस १० मोहर ११ } फर्मान { इ. १६६७ जून २४

औरंगजेब-सुरतेचे सुभेदार आणि अमलदारः डचांच्या मालावरील जकातीचा

दर शें. ३½ वरून शें. २ वर उतरविला आहे. इंग्रजांनीहि विनंति केल्यावरून त्यांच्या मालावरील **जकात शें. ३ होती ती २ केली**; देशभर कोठेंहि इंग्रजांपासून दस्तुरी घेऊं नये आणि दरोडेखोरांचें पारिपत्य करून चोरीचा माल इंग्रज मालकांचे स्वाधीन करावा, असा ठराव केला.

पिसु. शि. पृ. १६ न्यू. जुलै १५	(११६०) गोवा व्हा.—**शिवाजी राजे.**	श. १५८९ आषाढ व. १० इ. १६६७ जुलै ५

रामोजी शेणवी कोठारी याजकडून असें कळलें होतें कीं "(आग्रा येथील कैदेच्या) संकटांतून सुटून आपण आपल्या राज्यांत सुखरूपपणें पोंचला असून **मनोहरगड** येथें रहात आहां." पोर्तुगालहून इकडे येतांच मीं आपली माहिती मिळविली व मनोहरगड येथें आपण असतांनाच वकील पाठविण्याचें योजिलें होतें. परंतु रामोजीकडून समजलें कीं, त्या किल्यावर जाण्याची वाट फार अडचणीची आहे; व आपण तेथून निघून रायगडावर जाऊन राहणार. यास्तव मनोहरगडावर असतां आपल्याकडे वकील पाठविला नाहीं. पण **आपण रायगडावर** आतां **मुक्काम** केला आहे, असें कळल्यावरून हें अभिनंदनपर पत्र पाठवीत आहे.

गो. इ. सा. ले. २८ सु. १०६८ मोहर २५ हि. १०७८	(११६१) फर्मान	श. १५८९ आषाढ व. १३ इ. १६६७ जुलै ८

विजापूरचा बादशहा—**अजीजखान सरनोबत** व सरहवालदार व **पीरखान** माणिकखान हवाल० व कार० मामेल गोवा:-अनंत बिन फट जोसी यांस सरजोतिषी-बद्दल ७५ होनांची मिरास व दरमहा २ होन मुशाहिरा अंतरुज महालाच्या उत्पन्नापैकीं चालत आले आहेत. ते पूर्वीप्रमाणें चालविणें.

त्रै. व. २ पृ. १६० सु. १० मोहर २७	(११६२) फर्मान फा. मु. व सी.	श. १५८९ आषाढ व. १४ इ. १६६७ जुलै १०

नुसरुल्ला, **ताजबिबी** व **फातबिबी मक्केस** जाणार. सबब उंबरे येथील २५ बिघे जमीन व आंब्यांचीं झाडें अब्दुल गफूर वगैरेस दिलीं आहेत. [त्रैमासिकांत मूळ फर्मान दिलें नसून फक्त सारांश दिला आहे].

खं. १८ ले. १३ फ. १०७७	(११६३) कबुलायत	श. १५८९ इ. १६६७

गुमास्ते सरदेशमूख व देशमूख व देशपांडे पर० पुणें सर. जुन्नर सुबे औरं० (दक्षण).

पर० मज० च्या जमाबंदीच्या २९० गांवांपैकीं तश्रीफ राजश्री **शिवाजी राजे** वजा गावे· तर्फ पुणें २० व तर्फ मावळ ३६=५६ बाकी २३४ गांवांची जमाबंदी २२५८९॥०। रु.– राघो बल्लाळ गुमास्ते सरदेशमूख.

सा. ले. २४० } (११६४) { श. १५८९ श्रावण ब. २
सु. १०६८ सफर १५ } खुर्दखत फा. मु० व सी० { इ. १६६७ जुलै २७

?—कार० व देसमू० पर० कन्हाड—

निलकंठ अमण अग्निहोत्री सो कन्हाड यांस गावगना धर्मादाय जमीन व नख्त जें कांहीं चालत आहे तें देत जाणें. **हाली पर० मज० अमानत** हवाले साहेबासी जाहले आहे.

खं. १८ ले. १४ सु. १०६८ } (११६५) { श. १५८९ श्रावण व.
फ. १०७७ सफर } तुमार { इ. १६६७ आगष्ट

तुमार वासलाती अज ता। गुमास्ते पा। पुणे

बा। **खळोजी भोसले** रु. ५२४॥।≈॥ (नरसिंगराऊ व विठोजी सितोळे; मोरो विश्वनाथ व **बाबाजी राम देशपांडे** पुणे यांच्या शेवटीं सह्या आहेत.)

सा. ले. ५१ } (११६६) { श. १५८९ भाद्र. व. ९
सु. १०६८ रवल २२ } कर्ज कतबा { इ. १६६७ सप्टें. २

गुणाजी अडवल व बापूजी निगडे मौ. अजनूज पर. सिरवल

माहादाजीपंत देसकु. पर. सिरवल.

तुम्हापासून ५१ होन कर्ज घेतले. मुदतीस पैके नेदी तरी कलांतर होनास रुके -॥· देऊ.

खं. २० ले. १२१ } (११६७) { श. १५८९ आश्वीन शु. ८
सु. १०६८ रखर ६ } खुर्दखत फा. मु. व सी. { इ. १६६७ सप्टें. १५

अजर. सैद मखदूम **सर्जाखान**—— कार. व देशमू. पर. वाई.

नरसीहभट व एकनाथभट चित्राव यांस बोरखळ व किण्ही येथें १॥ चावर जमीन हकासुद्धा इनाम चालत आहे. ती चालविणें.

खं. २० ले. १२२ } (११६८) { श. १५८९ आश्वीन शु. ८
सु. १०६८ रखर ६ } खुर्दखत फा. मु. व सी. { इ. १६६७ सप्टें. १५

अजर. सैद मखदूम सर्जाखान— कार. व देशमू. पर. वाई.

नरसीहभट चित्राव यास पसरणी येथें इनाम जमीन नीम चावर व वाई येथे नख्त १० होन हे हकासुद्धां चालविणें.

खं. २० ले. १२३ } (११६९) { श. १५८९ आश्वीन शु. ८
सु. १०६८ रबर ६ } खुर्दखत फा. मु. व सी. { इ. १६६७ सप्टें. १५

अजर. सैद मखदुम **सर्जाखान**— कार. व देशमु. पर. वाई

गिरमाजी त्रिंबक यास वाई येथे १ चावर इनाम जमीन हक्कासुद्धां चालविणें.

डच रेकॅर्डस् भाग २८ } (११७०) { श. १५८९ आश्वीन व. ३
नं. ७३५ इ. आक्टो. ५ न्यू. } डच ग. ज.-डच कंपनी { इ. १६६७ सप्टें. २५

वेंगुर्ला-देशांत यादवीचा धुमाकूळ अद्यापीहि चालू आहे. **सुलतानाचे** सेनापति मनापासून काम न करतां गुप्त रीतीनें **शिवाजीलाच मदत देतात** अशी लोकांची समजूत असून मधच्यामध्यें गरीब प्रजा मात्र उभयपक्षांकडून लुटून नागविली जात असते.

खं. २० ले. ५१ (६) } (११७१) { श. १५८९ आश्वीन
सु. १०६८ फ. १०७७ रबर. } उल्लेख { इ. १६६७ सप्टें. आक्टो.

महजर दर बाबे मोकदमी, मौ. माळशिरस, बो रामाजी व बापोजी यादव दर अमल **अनसोजी घाटगे** फौजदार व सिगमल मनसबदार.

सा. ले. ५२ } (११७२) { श. १५८९ कार्तिक व. ५
सु. १०६८ जवल १९ } फा. सी. { इ. १६६७ आक्टो. २७

कृष्णाजी भास्कर सुमेदार— बहिरजी वाघ हवाल० व कार० रोहिडखोरे नाइकजी जेधा यानें टके ६० घेतले. द्यावयास मातल करीत आहे. तरी ताकीद करणें.

खं. २० ले. १७७ } (११७३) { श. १५८९ कार्तीक व. ६
सु. १०६८ जवल २० } खुर्दखत फा. मु. व सी. { इ. १६६७ आक्टो. २८

अजर० **हैबतराऊ ध्यानतराव** साहेब—हुदे० व मोक० कस० उंबरज.

बहिरोजी बिन अबाजी जाधव यांनीं लढाईमध्यें बहुत खस्त केला, अखेर ठार पडिला. म्हणून अबाजीस रांडरोटीबदल ३० बिघे जमीन इनाम दिली आहे. चालविणें.

इं. फॅ. १२ } (११७४) { श. १५८९ कार्तिक व. १०
पृ. २७५ इ. } ऑंजिअर, स्वाली-रॅंडाल्फ टेलर, सुरत. { इ. १६६७ नोवें. १

(**शिवाजीच्या** बंदरांतील गलबताला पास द्यावा किंवा नाहीं अशा प्रश्नाला उत्तर-) प्रेसिडेंटशीं पासाविषयीं गंभीरपणें चर्चा करून, आम्हीं असें ठरविलें कीं, पाक

दिल्यामुळें आम्ही **दिलजमाई** करण्याला अनुकूल आहोंत, असा भाव दिसण्याचा संभव आहे, हें ह्या वेळीं इष्ट नसल्यामुळें **पास देऊं नये.** परंतु दुसऱ्या कोणापेक्षां तुमचाच संबंध विशेष येत असल्यामुळें, पास देण्यापासून संभवणारे दुष्परिणाम आपण स्वीकारणार असाल, तर तो पास देण्यास तयार आहे. मात्र पास द्यावयाचा तो **दर्या सारंगाला** किंवा शिवाजीचा संबंध असलेल्या कोणालाहि न देतां **सालीम नायकाच्या** नांवानें दिला जाईल. प्रेसिडेंटची आणखी अशी सूचना आहे कीं, **सालीम नायकाला** मित्रत्वानें सांगून त्याच्याकडून **शिवाजीनें** किंवा रावजी पंडितानें आमचीं गलबतें येण्यापूर्वी आमच्याशीं सुविचाराचें, सामोपचाराचें आणि आमचें समाधान होईल अशा तऱ्हेचें बोलणें लावावें, असें त्यांना सांगवावें. तुम्हीं त्यांना असें खात्रीलायक सांगावें कीं आतां तह बहुतेक पुरा झाला असूनहि जर योग्य वेळीं तडजोड करून आमचें समाधान केलें जाणार नाहीं तर शिवाजीकडून इंग्रजांना पोंचलेल्या नुकसानीबद्दल त्याच्या **बंदरांवर** आणि **गलबतांवर** सूड घेण्याच्या मागीला आतां प्रेसिडेंट लागेल. पास द्यावाच असें आपलें मत ठरल्यास मि. ग्रेकडून लिहवून घेऊन सहीकरितां त्वरेनें इकडे पाठवून द्यावा.

पिसु. शिवाजी पृ. २४ } (११७५) { श. १५८९ मार्ग. शु. ४
इ. १९ नोव्हें. न्यू. } पोर्तु० व्हाइस०-**शिवाजीराजे** { इ. १६६७ नोव्हें. ९

पाद्री गोसांलु मार्तीस या मार्फत आपण पाठविलेलें पत्र व तहाचीं कलमें मान्य करून पाठविलीं तीं पोचलीं. पाद्री गोसांलु यास चांगल्या रीतीनें वागविल्याबद्दल व (गोव्यांतून नेलेले) कैदी बंधमुक्त केल्याबद्दल मला फार आनंद झाला.

पिसु. शिवाजी. पृ. १७ } (११७६) { श. १५८९ मार्ग. शु. ८
इ. नोव्हें. २३ न्यू. } पोर्तु० व्हाइस-**शिवाजीराजे.** { इ. १६६७ नोव्हें. १३

मी येथें आल्यापासून आशियाखंडांतील सर्व राजे लोकाशीं सलोख्याचे संबंध ठेवण्याचें ठरविलें आणि आपणाकडे तर सर्वांत प्रथम वकील पाठविला; असें आपले शिपाई आमच्या राज्यांत शिरल्या वेळीं आपणाकडून एक पत्र आलें. त्या खेरीज आपणाकडून पत्र आलें नाहीं.

पिसु. शिवाजी पृ. १८ } (११७७) { श. १५८९ मार्ग. शु. ९
इ. नोव्हें. २४ न्यू. } पोर्तु० व्हाइस-**शिवाजीराजे.** { इ. १६६७ नोव्हें. १४

रामोजी शेणवी कोठारी यास आपणाकडे पाठविला आहे. त्याजपाशीं आपलें म्हणणें कळवावें.

पिसु. शिवाजी पृ. १८ } (११७८) { श. १५८९ मार्ग. शु. १२
इ. २७ नोव्हें. न्यू. } व्हॉइसराय-**शिवाजीराजे**. { इ. १६६७ नोव्हें. १७

रामोजी शेणवी कोठारी यामार्फत पाठविलेलें पत्र पोचलें; त्यावरून आपली सलोख्याची इच्छा असल्याचें समजून आलें. तरी आपला वकील पाठवावा. रामोजी शेणवी यास आपणाकडे पुनः पाठविला आहे. त्याच्याशीं याविषयींचें बोलणें करावें.

खं. १६ ले. २३ } (११७९) { श. १५८९ मार्ग. शु. १४
सु. १०६८ जखर १२ } { इ. १६६७ नोव्हें. १९
हि. फ.१०७७ } कौलनामा.

?-बाबाजी जुंझारराऊ देशमु० तर्फ कानदखोरे

मफर मजकुरानें सांगितलें कीं, "आपण **शिवाजीच्या** दहशती करून पळून साहेबासी आलों आहे. तर गडाखालीं रहावया जागा दिधली पाहिजे." यावर गरीबी-वर नजर देऊन सोनमेटी राहावयास जागा दिधली असे.

शि. पृ. (११) सेन } (११८०) { श. १५८९ मार्ग. व. १
इ. डिसें. १ न्यू. } गोवा व्हॉइसरॉय—**संभाजी**. { इ. १६६७ नोव्हें. २१

आम्ही गोव्यास सुखरूपपणें येऊन पोचलों. [शिष्टाचाराचें पत्र.]

शि. प्र. (२) सेन. ३ } (११८१) { श. १५८९ मार्ग. व. १
इ. डिसें. १ न्यू. } { इ. १६६७ नोव्हें. २१

गोवा व्हॉइसरॉय——**गिरमाजी पंडित**, डिचोलीचा सुभेदार.

शिवाजीचा वकील पितांबर शेणवी गोव्याला वारंवार येईल, त्याला बिनहरकत येऊं देण्याबद्दल परवाना.

खं. २० ले. १२४ } (११८२) { श. १५८९ मार्ग. व. ४
सु. १०६८ जखर १७ } खुर्दखत मु. व सी. { इ. १६६७ नोव्हें. २४

अजर. नरसोजी राजे **घोरपडे** हुदे. व मो. मौक. निगडी कि. सातारा.

जोगींद्रगिरी यास मौ. निगडी येथें १५ बिघे जमीन इनाम आहे ती चालविणें.

पिसु. शिवाजी पृ. १९ व २० } (११८३) { श. १५८९ मार्ग. व. ५
इ. दिसें. ५ न्यू. } पो. व्हा.-**शिवाजीराजे** { इ. १६६७ नोव्हें. २५

आपला **वकील रा. सकोपंत** याजमार्फत तहाचीं कलमें ठरविलीं त्यावर मीं सही केली आहे. या सकोपंताबरोबर रेव्ह. पादी गोसालुं मार्तास यास आपणाकडे पाठ-

विला आहे. रा. सकोपंतानीं आपली कामगिरी मोठ्या शहाणपणानें बजावली.... तहावर आपली सही घेऊन येण्यासाठीं आपणाकडे पाद्री गोसांलु हा वकील पाठविला आहे. त्यावरून माझी सलोख्याची इच्छा आपणास कळेल.

पिसुर्ले. शिवाजी. परिशिष्ट १ डिसें. ६ न्यू.	(११८४) शर्तनामा	श. १५८९ मार्ग. व. ६ इ. १६६७ नोव्हें. २६

शर्तनामा सलाह व दोस्ती राजे अजम **सिवाजी** राजे व कोंदी विजुरई.

विजुरई (= व्हाइसराय) अजमी शर्तनामा पाठविला तेथे मजमून की, कितेक मरतबे राजे अजम **सिवाजी** राजे इजानेबाची वखतब जाहीर करून लिहिले होते जे आपण आपले लोकासहित बारदेशामधे पेसकस बाब जे देसाई तेथे होते म्हणोऊन व आपले नियत यैसे होते जे माहेज सलाह हमेशा चालावे म्हणोऊन. त्यावरि इजानेब खातिरेसी आणून येकरार केले जे कदीम दोस्ती चालिले होते तेणेंच प्रकारी मागुत्यानें दृढ चालावे. याचे तपशील :

हाली राजे अजम **सिवाजी** राजे याही दोस्तीचे रवेशीने त्वरेनें आमच्या पादशाही मुलकातील बारदेशीचे रयत लोक खेलखाना मर्द व औरता व कचेबचे तेरीख १९ माहे नोवेंब्रु सक १६६७ ते रोजी आ राजे अजमाच्या लोकीं जे बंद धरोन नेली आहेत; त्या पासी एक रुका न घेतां सोडून द्यावी व बारदेशाची गुरेढोरे जे काही अढळोन जमा जाहली असतील ते द्यावी म्हणोउन विरजई अजमी तपासिले लिहिले. तरी विजरई अजमाचे लिहिलेप्रमाणें जो बंद धरिला होता तो येक रुका न घेता सोडून पादरी गोशाल याचे हवाला केले असे.

लखम सावंत व केशव नायक देसाई इजानिबाच्या मुलकामधे राहिले आहेती. त्यासी यैसे हुकूम फर्मास जे, इजानेबाच्या पातशाही मुलकामधे असता आ राजे अजमासी लढाई व गरगशा न करावे; आ राजे अजमाच्या मुलाकासी व रयत लोकासी तसवीस व अजार नेदावे; म्हणोऊन यैसेयासी ते इजानेबाचे हुकुमेसी खिलाफ करोन चालतील यैसे इजानेबाची जाहीर होताचि अणी राजे अजम लिहितील तेच वख्ती त्यासी इजानेबाच्या मुलकातून बाहीर घालोन जैसे मार इजानेबाच्या मुलकामधनु अपुले विलायतीमधे वतनासी जावोन आ राजे अजमासी व राजे अजमाच्या रयत लोकांसी लढाई व गरगशा करतील यैसे तहकीक खबर इज्यानेबास रोशन होतांचि मागुति फिरोन येऊन राहावयास ज्यानीबाच्या मुलकात जागा देणार नाहीं. नार सावंत व मल सेणवई इज्यानेबाच्या मुलकात + + असतील तरी त्यासी रा + + + हुकुम फर्माऊन देसायानी मजकूर जवपरयतेर आमच्या पादशाही मुलकात असतील तरी त्यांनीं जंजिरे गोवे यामधे रहावे. सास्टी बारदेसा विलायतीमधे राहो देणार नाहीं म्हणोऊन विजरई अजमी लिहिले. तरी देसाई मजकुरास जंजिरे मजकुरी हालखुद ठेऊन आमच्या मुलकामधे रयतीस अगर हर-

येक बाबे येकजरियाची तसवीस दिधलियाने जंजिरे मजकुरीहून बाहेर घालावे: बालेघाटा होऊन स रे ब स्तु त चे बैल जंजिरे गोव्यासी व विलायती सास्टी बारदेशची येतील त्यासी आं राजे अजमाच्या लोकीं कैद व मना न करावें व तेणेच प्रकारी इजानेबाच्या पातशाही मुलकातील ये तर्फेचे बैल बालेघाटासी व आणिकी तरफेस जातील त्यास लवाजिमा रवेश बरहुकुम घ्यावे अगर माहोम हजरत पादशाः आदिलशाः व आं राजे अजम गरगशाचे सह असेल तरी सौदागरी अमलासी फर्क पडो नेदिता हमेशा चालिले आहे तैसेचि राह गुजरी करोन सौदागरी अमल बेकुसूर चालो धावा म्हणोउन विजरइ अजमी लिहिले. तरी सदरहूप्रमाणे आपण आपले शिरस्तेप्रमाणे जकाती घेऊन चालऊन. माहेद दोस्ती मराहम व दढ होऊन दरियामधे व खुष्कीमधे चालावी यैसेयासी दरम्याने गैरवाका अमल होऊन कुसूर पडेल तरी ते बाबे आ राजे अजम आपले तरफेने विजरई यांसी जाहीर करावे; तेणेचि प्रकारी विजरई यांही आपले तरफेने आं राजे अजमासी रोशन करावे; सरंजामीचे स्वाल जबाब मा हो न जाहालेया वेगले हरयेक तरफेने सल्याचे व दोस्तीचे बंद न तोडावे हे शर्तनामेवरी आं राजे अजमाचे व इज्यानिबाचे निशान व सिके असावे म्हणोऊन विरजई अजमी लिहिले. तरी सदरहू लिहिलेप्रमाणें इजानेबानी कबूल केले असे. राजे अजम **सिवाजी** राजे यांचे मुदा रयेत मसलहतीस कोंदी विरजई यांसी इतिफाक करोन घ्यावयाचे असले तरी ये बाबे येतबारी शख्स पाठऊन रदबदल करून जो माहोन लस्कर इतिफाक होऊन जे तरफेसी बरें दिसोन येईल व फाइदा ज्यानी होत असेल त्याचे सरंजाम देखावे. निविस्ते गोवा तारीख फिरंग ६ माहे डिजेंब्रु सन येक हजार साहासे सतशष्टि म्हणोऊन विजरई अजमी लिहिले. सदरहू लिहिलेप्रमाणे इज्यानबानीं कबूल केले आसे. बतेरीख २५ माहे जमादिलाखर सूर सन समान सितैन अलफ*
(मर्यादे. षट. पाठीमागें प्रतिप. मुद्रा.)

खं. २० ले. २३८ पृ. १०६८ फ १०७७ जखर १९	(११८५)	श. १५८९ मार्ग. व. ६ इ. १६६७ नोव्हें. २६

अज माहाल खालिसा शरीफ—सेखदार व कार. व देस. व देसपां. पर. पुणें.

माहादाजी गोसावी यांचें इनाम त्याजकडे चालविणें. हाली पर. मज. पातशाही **खालिसा** जालें आहे. (मुद्रा—मिर्झा राजा, बंदा, अवरंगजेब अलमगीर.)

---

*हा तहनामा पोर्तुगीजांनीं इ. १६६७ दिसें. ६ रोजीं मान्य केला; ही तारीख न्यू स्टाइलची असल्यामुळें तिचें ओल्ड स्टाइलमधलें रूप नोव्हें. २६ हें मथळ्यांत दिलें आहे. पोर्तुगीजांनीं मान्यतेची तारीख घातल्यानंतर मराठ्यांनीं आपल्या मान्यतेची तारीख २५ जमादिलाखर (म्हणजे मार्ग. व १२=२ दिसेंबर) अशी मांडली आहे.

इं. फॅ. १२ }
पृ. २८६ इ. }
(११८६)
गोव्याहून पाठविलेलें पत्र
{ श. १५८९ मार्ग. व. १०
{ इ. १६६७ नोव्हें. ३०

गोव्याच्या व्हाइसरॉयनें रोमन कॅथोलिक धर्म वगळून इतर धर्मांच्या माणसांना हद्दपारीचा हुकूम काढल्यामुळें अत्यंत क्रुद्ध होऊन **शिवाजीनें** गोव्यानजीक **बारदेश**-च्या सरहद्दीवर स्वारी केली. व तेथील चार पाद्री लोकांनीं स्वधर्मीयांव्यतिरिक्त इतरांचा प्राणनाश करण्याचा सल्ला दिला होता, (हें लक्षांत ठेवून) त्यांनीं स्वत: शिवाजीचा **मराठा (हिंदू) धर्म स्वीकारण्याचें नाकारल्यामुळें** [that refused to turne Moretto's (Marathas) of his owne persuasion] शिवाजीनें त्यांचा शिरच्छेद केला. ह्यामुळें घाबरून जाऊन व्हाइसरॉयानें आपला क्रूर आणि कडक हुकूम परत घेतला! शिवाजीनें आसपासच्या सर्व मुलुखांत जाळपोळ करून १५० लक्ष होनांची लूट नेली.

इ. फॅ. १२ }
पृ. २८६ इ. }
(११८७)
वसईचें पत्र
{ श. १५८९ पौष शु. ६
{ इ. १६६७ डिसें. १०

औरंगजेबानें **मुसलमानांना** जकातींचीं पूर्ण **माफी** दिली असून **हिंदूंवर पूर्ववत्** ठेविल्या आहेत. **ख्रिस्त्यांनीं अर्ध्या** भरावयाच्या आहेत. ह्या त्रासामुळें मुंबईची वस्ती खास अधिक वाढेल. [मुसलमानांना माफी इ. १६६७ मे ९ रोजीं मिळाली—सर. औरं. भाग ३ पृ. ३१३; इ. डॅा. पृ. २९३]

खं. १५ ले. ११८ }
मु. १०६८ रजब २० }
(११८८)
मिसेली मु. व सी.
{ श. १५८९ पौष व. ६
{ इ. १६६७ डिसें. २६

अज दिआण ठाणे पर. कर्‍हाड—ता मोक. मौ. इडमिडे

कमलनयन गोसावी याचे मौ. मज. पाउण चावर जमीन इनाम आहे. तीपैकीं उचापती न करणें.

खं. १५ ले. २७७ }
स. }
(११८९)
नकल
{ श. १५८९ माघ शु. १
{ इ. १६६८ जाने. ४

मोक. पाटील. व कुळ. मौ. पसूर—मोक. पाटील व कुळ. वेलवंडी ता वेलवंडखोरे.

तई आवा ढोर देशमू. यास जीवमान पावेतो मौ. जतपड येथील जमीन च्यार पैसे भानजीबाबा देशपांडे व गांवकु. यांनीं आपले इनामापैकीं दिली. परंतु सई आवास तुमचे सांभाळी केले आहे. तेव्हां जमीन तुम्ही करणें. [सु. १०६९ आपाजी सुभेदार यांनीं महाराजांचे आज्ञेवरून राजगड येथें पंचाइत करून वरील जमीन देशपांड्यास परत द्यावयाची असें ठरविलें.]

कोर्टमिनिट्स इ. १६६८-७० } (११९०) { श. १५८९ माघ शु. ५
पृ. ५ इ. } डचांचे नकाशे { इ. १६६८ जाने. ८

पकडलेल्या मालाच्या कमिशनरनें विकावयास काढलेले **डचांचे हिंदुस्तान विषयक नकाशे** कंपनीच्या उपयोगाचे आहेत किंवा कसे याची चौकशी करून ते केवढ्याला विकत मिळूं शकतील याचा तपास करावा.

खं. २० ले. २१७ } (११९१) { श. १५८९ माघ व. १
सु. १०६८ साबान १५ } उल्लेख { इ. १६६८ जाने. २०

आराधे, ताटे व थिटे यांमध्यें पंढरपूरचे जोतिष, व कुळकर्ण याबद्दल भांडण लागले असतां निकाल झाला कीं उक्त वृत्ती आराधे यांच्या आहेत.

पंढरीपंत तबीब मोकाशी पंढरपूर, **"क्षेत्रास अफजलखानाची तसवीस लागली"** वगैरे उल्लेख आहेत.

इं. फॅ. १२ } (११९२) { श. १५८९ माघ व. ३
पृ. २८१ इ. } सुरत-कंपनी { इ. १६६८ जाने. २२

दख्खनची स्थिति कष्टमय असून, **शिवाजी** सुटून स्वदेशीं परत आल्यामुळें शांततेची सर्व आशा नष्ट झाली आहे. शिवाजी आपला उद्योग इतक्या चतुराईनें चालवितो कीं बादशहाच्या संतापाची त्याच्यापुढें कांहीं मात्रा न चालतां शेवटीं अपमानानें **शिवाजीशीं त्याला नमतें घ्यावें लागलें**! आतां शिवाजीच्या साहाय्यानें विजापुरचा मुलूख पादाक्रांत करण्याच्या आशेनें बादशहा त्या राज्यावर त्वरेनें सैन्य पाठवील असें म्हणतात. ह्या आणि इतर दुहीमुळें दख्खनमधील व्यापार बसला आहे.

[पृ. २८३] थोड्याच दिवसांपूर्वी शिवाजीनें **पोर्तुगीजांना** थोडा हात दाखविला. अनेक घोडेस्वारांचा अमलदार असलेल्या, थोड्या मोठ्या अशा गोव्याजवळील प्रांतांतील एका जमीदाराबरोबर शिवाजीचें कांहीं भांडण निघून शिवाजीशीं टिकाव धरतां न आल्यामुळें, तो जमीनदार बारदेश प्रांतांत अग्वाडाजवळ पोर्तुगीजांच्या आश्रयार्थ गेला.

व्हाइसरॉयकडे अनेक वेळां तक्रार करूनहि जेव्हां तिकडे लक्ष दिलें गेलें नाहीं, तेव्हां शिवाजीनें त्या जमीनदारावर हल्ला करून त्याला जर्जर केल्यामुळें तो आणखी मागें हटला. पुढें शिवाजीनें त्याचा पाठलाग करीत बारदेशांत प्रवेश केला, त्यांतील बराच भाग जाळला, व लूट करून गोव्याच्या व्हाइसरॉयला आणि त्याचे आरमाराला न जुमा-

नता त्यानें १३०० कैदी आपल्याबरोबर नेले. याचा निकाल कसा लागेल तें अजून समजलें नाहीं. परंतु हें भांडण लवकर मिटलें नाहीं तर समुद्रावर आणि जमिनीवर दोनहि ठिकाणीं शिवाजीपुढें **पोर्तु० चा टिकाव लागणार नाहीं.**

[पृ. २८४] या **बादशहाचें धर्मवेड** एकसारखें वाढत असल्यामुळें देशांत सर्वत्र अशांतता माजली आहे. विशेषतः बनिये लोक, हिंदू लोक आणि सामान्यतः मुसलमानेतर धर्मांचे लोक यांचेवर इतका **कठोरपणें जुलूम** होतो कीं त्यामुळें आपसांतील संबंधांत मोठा अडथळा उपस्थित झाला आहे. एकाद्या हिंदूनें घेतलेलें कर्ज बुडवावयाचा सोपा मार्ग म्हणजे सावकार हिंदूनें, महमद व मुसलमानी धर्म यांना शिव्या दिल्याची खोटीच तक्रार काजीकडे करण्याची धमकी द्यावी म्हणजे झालें. कारण अशी तक्रार येतांच, दोनचार खोटे साक्षी घेऊन, लगेच त्याची सुंता करून मुसलमान करण्याची शिक्षा भोगावी लागे. या भीतीनें सावकार बिचारा गप्प बसे. आपला कैवार घेतला जातो अशा खात्रीमुळें मुसलमानांचें भिकार इतकें बेसुमार वाढलें आहे कीं ते बेलाशक बनियांच्या घरांत शिरतात आणि आपल्याला काय पाहिजे तें मिळाल्याशिवाय बाहेर पडत नाहींत. राज्याचा इतर सर्व कारभार सोडून बादशहानें हिंदूंना बाटविण्याचा आणि **देवळें पाडून मशिदी बांधण्याचा** धोशा लाविला आहे. टॉमस रोच नांवाच्या इंग्रजाचर कैद, जाच, धमकी आणि शेवटीं लांच यांचा प्रयोग करूनहि जेव्हां तो धर्मांतराला कबूल होईना तेव्हां मग बादशहानें त्याला सोडून दिलें.

जर्नल ऑ रॉ. ए. सो. १९१७ पृ. १४२-१४३ रमजान ५	(११९३) फारशी शिलालेख	१५८९ फाल्गुन शु. ६ १६६८ फेब्रु. ८

जेव्हां १०३२ हि. (इ. १६२२-२३) यावर्षी, आपली जिंदगी व परिवार, अशीरगडचा (किल्लेदार) राजा गोपाळदास गोर याच्या स्वाधीन करून शहाजहान पूर्वेकडे गेला; तेव्हां त्या राजानें जवळ जवळ दोन वर्षे सुलतान पर्वीझ याच्याशीं अशीरगड लढविला. कांहीं दिवसांनीं शहाजहान तेथून निघून दख्खनकडे परत गेला. त्यामुळें राजा गोपाळदासानें उत्तम सेवा केल्यामुळें, शहाच्या कृपेचें निदर्शक म्हणून त्याला राजा मांधाता हा किताब आणि पांच हजारांची मनसब मिळाली. त्याप्रमाणें राजा मांधाता व त्याचा थोरला मुलगा कुंवर बलराम यांनीं युद्धाची तयारी केली. नंतर हि. १०३६ सालीं (इ. १६२६-२७) हजरत शहाजहान दिल्ली येथें तख्तावर बसला. हि. १०६२ सालीं (इ. १६५२) राजा मांधाताचा पुत्र राजा मनोहरदास किल्लेदारीवर नेमला गेला. तेथपासून सहा वर्षें त्यानें हें काम विश्वासूपणानें केलें. हि. १०६८ (इ. १६५७-५८) सालीं शहा औरंग बादशहा तख्तनशीन झाला. हि. १०७५ सालीं (इ. १६६४-६५) राजा मनोहरदासाच्या किल्लेदारीविषयक विश्वासूपणाच्या आणि नेकीच्या कामगिरीबद्दल खूष

होऊन (औरंगजेबानें) त्याला माहुली इत्यादि अनेक किल्ल्यांची कामगिरी सांगितली. तेव्हां त्या राजाच्या कारकीर्दींत माहुली व पळसगडाचा तट व अंबरखाना यांची डागडुजी आणि भांडारदरंग(दुर्ग)च्या पाखाडीच्या पायऱ्या दुरुस्त करण्याचें काम झालें. जुलूस ११ रमजान ५.

पिसुर्लें. शिवाजी पृ. २५ इ. फेब्रु. २६ न्यू. (११९४) श. १५८९ फाल्गुन शुं. १४ इ. १६६८ फेब्रु. १६

पोर्तुगीज व्हाइसराय----- रायाजी गंगादास सुभेदार

मलई केळनई तरफ **भिवगड उर्फ रायगड** ? आपण पुष्कळ वेळां मला लिहिलें आहे कीं 'गोव्यांतील देसाई शिवाजीच्या राज्यांत दांडगाई करितात.' तरी देसाई **लखम सावंत** व केशव नाईक यांना माझ्या राज्यांतून निघून जाण्यास आज्ञा केली आहे. यामुळें तरी सदर देसायास इकडून मदत मिळते अशी आपली समजूत झाली आहे ती खोटी असल्याचें आपणांस कळेल.

गो. इ. सा. ले. २९ सु. १०६८ रम १७ (११९५) महजर गोवें येथें फा. मु. श. १५८९ फाल्गुन व. ३ इ. १६६८ फेब्रु २०

फट बिन विठल जोसी याची मामले गोवा येथील सरजोतिसी मिरासी असता दुर्गा जोसी याने गैरवाका समजाऊन आपले नावे फर्मान घेऊन आला. यावर फट जोतिसी यानें फर्मान आणले कीं, सरजोतिसी मिरास फट जोसी याची बाकी लोकांचे कागद बातिल.

सा. ले. १६३ सु. १०६८ फ. १०७७ (११९६) मिसेली श. १५८९ इ. १६६७

अज दि० ठाणे सुपे

मोरो नरसिह खोत व मल्हार काकाजी खोत इजारदार सायेर पर० मज०:— हुजरून खुर्दखत आले. महादजी गोसावी यास गणो तिमाजीनें दिलेलें उत्पन्न पूर्वींप्रमाणें त्याकडे चालू ठेवणें.

खुर्दखतांत 'हाली पर० मज० जागीर साहेबास अर्जानी जाहाला आहे' असा उल्लेख आहे.

खं. २० ले. ५५, ५६ ? (११९७) उल्लेख श. १५८९ इ. १६६७

कारकीर्द रा. शिवाजीराजे साहेब राजश्री मोरो त्रिमल प्रधान यानी पा शिरवळची मसाहती करून कीर्दी जमिनीस धारा बाधोन दिल्हा.

खं, १८ ले. ५७ } (११९८) { श. १५८९
सु. १०६८ } कौल उल्लेख { इ. १६६७

नबाब इमाम बिरदीखान किलेदार-गोपाळसेट व चाउजी चौधारी रयत जमा करून पेठची आबादी करणे याविसी.

खं. २० ले. १८ } (११९९) { श. १५८९
सु. १०६८ } तकरीर { इ. १६६७

मल्हार बाबाजी व तिमाजी मल्हार व त्रिंबक गोमदेऊ व रामाजी बाबाजी देसपांडिये पर० सुपे तकीर कर्दे

सामराम काटे व संभाजी काटे देसमु० व मोक० कस. सुपे भांडो लागले. आपणास सफत घालून पुसता याकूदखानाचे वेळी काटे, संबाजीराजे व असतखान यांचे वेळीं कसबेकर त्यावर काटे अशा क्रमानें देसमुखी काम झाले आहे. यावर शाहाजीराजे व सीवाजीराजे जागीरदार जाले ३१४ वर्से मोहर केली आहे.

खं. ८ ले. १७ जु. ११ } (१२००) { श. १५९० चैत्र शु. ७
हि. १०७८ सवाल ५ } { इ. १६६८ मार्च ९

औरंगजेब बादशहा——शिवाजी राजे

आमचा बहुत लोभ तुम्हावर आहे. याजकरितां तुम्हास राजेपणाचा किताब दिला आहे. पेशजी पेक्षां अधिक काम करून दाखवावे म्हणजे सर्व मनोरथ पूर्ण होतील. तुमचे कार्यात्रिषयीं विनंति लिहिली तेहि बंदोबस्त यथास्थित घडोन येईल. खातरजमा ठेवावी.

दि. लेटर बुक भाग ४ } (१२०१) { श. १५९० चैत्र शु. ७
पृ. २२४ इ. } लंडन—सुरत कौन्सिल. { इ. १६६८ मार्च १०

सपत्नीक शिपाई आणि कित्येक कारागीर पाठविले आहेत. त्यांपैकीं अविवाहित स्त्रिया असतील त्यांना शेतकामाशिवाय अन्य काम त्यांच्या मर्जीप्रमाणें व तुमच्या सोईप्रमाणें देऊन एक वर्षपर्यंत योग्य अन्नवस्त्राची तरतूद करावी. त्यांनीं इंग्रजांशींच किंवा प्रॉटेस्टंट असलेल्याच अन्य राष्ट्रीयांशीं विवाह करावा.

इंग्रजलोक आणि अन्यराष्ट्रीय प्रॉटेस्टंट एवढ्यांनाच हत्याराची परवानगी असावी...शिपायांनीं हातकाम करावें. सर्व प्रकारचे व्यापाऱ्यांना रहाण्याकरितां बोलावून आणावे. मोंगल आतां धर्मच्छळ करीत असल्यामुळें तुम्हांला हें सुलभ जाईल. मूळ कराराप्रमाणें बेटांत सर्व धर्मांना मोकळीक ठेवावी.

इं. फॅ. १३ } (१२०२) { श. १५९० चैत्र व. ४
पृ. ४९ इ. } हेन्री गॅरी—लॉर्ड आर्लिंगटन. { इ. १६६८ मार्च २२

बादशहानें मुसलमानांना जकाती माफ करून हिंदूंवर तेवढ्या ठेविल्या असें मीं मागें लिहिलें तें त्यावेळेपुरतें खरें होतें. आतां शहाजहानच्या कारकीर्दीतल्या प्रमाणें जकाती देण्यांत याव्या असा हुकूम काढून त्यानें हिंदू व मुसलमान यांना समान जकाती ठरविल्या आहेत. शिवाजीचा पिच्छा औरंगजेब पुरविणार आहे. आणि पुनः जर शिवाजी त्याच्या हातीं सांपडेल तर त्याची इतक्या सहज सुटका होणार नाहीं.

[इं. फॅ. १२ पृ. २८६ वरील टीप व वसईचें पत्र, ले. ११८७ पाहिलें असतां जकाती बद्दलची ही माहिती विश्वसनीय वाटत नाहीं.]

इं. फॅ. १२ } (१२०३) { श. १५९० चैत्र व. १०
पृ. ३१२ इ. } इं. राजाचें आज्ञापत्र letter patent { इ. १६६८ मार्च २७

मुंबईबेटाचा ताबा ईस्ट इं. कंपनीचे हवालीं करण्यांत आला. व वार्षिक खंडणी १० पौंड मुक्रर केली.

खं. १८ ले २२ } (१२०४) { श. १५९० वैशाख शु. १
पृ. ४५ श. } { इ. १६६८ एप्रील २

आपाजी नामदेऊ लांडे—बाबाजी रामहोनप देसपां. पर. पुणा

आपला बाप तुमच्या कर्यातीं मावळच्या देसकुलकर्णीवर गुमास्ता असतां तुम्हास तुमचा हक लाजिमा देत असे. आपण नजर बदलून हक लाजिमा दिधला नाहीं. त्यावरी सिंहगडीचे उदेभान राठवड किलेदार याणीं कर्यातीचे देसमुख, मोकदम कुळकर्णी व आपणांस बोलाविले. आपण पूर्वीप्रमाणें वागणेस कबूल जालो. बाजद फितूर मुलुक बदस्त सिवाजी राजे भोसले रयती बैरान पेरोशानी परागंदा मुलुक बैरान बेचिराख सबब पातशाही दौड एऊन (अपूर्ण)

इं. फॅ. १२ } (१२०५) { श. १५९० वैशाख शु. १
पृ. २८३ टीप ४ इ. } मुंबई, जोसेफ हिमर्स— { इ. १६६८ एप्रील २

विजापूरच्या आदिलशाहीचा बंडखोर **शिवाजी** (Sabbugee) गोव्यापासून ३ लीग (९ मैल) अंतरावरील **बारदेश** बेटांत ६००० लोकांनिशीं शिरून त्यानें ३ दिवसांत १६ च्यावर खेडीं बेचिराख केलीं. पण गोव्याच्या व्हाईसरॉयनें वकीलामार्फत त्याला विनंती केल्यामुळें आणि **त्याच्या सर्व अटी मान्य केल्यावर** मग तो निघून गेला.

खं. १७ ले. १३ } (१२०६) { श. १५९० वैशाख शु. ३
सु. १०६८ जिल्काद २ } कौलनामा { इ. १६६८ एप्रील ४

रा. जिजाबाईसाहेब– ता। विठोजी हैबतराऊ देशमु. तर्फ गुंजणमावळ

हैबतराऊ व बालाजी नाईक देसमूख. त. मज. यांनीं 'आपण आपल्या जिवाचे दहशतीकरितां तोंडे चुकावून बाहेर गेले आहे. मुतालिकाच्या हाते देसगतीचे काम घेतले पाहिजे. म्हणौन मोरोपंत पेसवे यांजपाशीं लेहून पाठविले. त्यावरून त्यास कौल पाठविला आहे. त्यांचेप्रमाणें तुम्हीहि आपला मुतालीक पाठविणें. त्याच्या हाते देसगतीचे काम घेऊं व तुमचा हक तुमचे दुमाले करूं; खातिरजमा असो देणें; तुम्ही सुखे आपली देसगती चालवणे. आमचे तर्फेनें तुमचे वाईट सर्वथा होणार नाहीं.

सा. ले. २५२ } (१२०७) { श. १५९० वैशाख शु. ४
सु. १०६८ जिल्काद ३ } { इ. १६६८ एप्रील ५

कृष्णाजी भास्कर सुमेदार व कार० माहालानिहाय तर्फ मावल

हैबतराऊ नाईक सिलिबकर देसमु० तपे गुंजणमावळः–वरोबियाचे लिहिले त्यावरोन कलोन आले. आम्हास तुम्ही आवश्यकच आहा. तुमच्या कार्यास आम्हापासून सहसा अंतर पडणार नाहीं. बेशक मुतालीक पाठवून देणें. तुमचें सनसबा प्रमाणें चालवूं. साहेबी बिनंती करून कौल करून देऊ. कीर्दीच्या हंगामांत मुतालीक पाठविणें. (मु. श्री, चरणी तत्पर कि, कर कृष्णाजी भास्कर)

खं. १७ ले. १४ } (१२०८) { श. १५९० वैशाख व. ५
सु. १०६८ जिल्काद १९ } कौलनामा { इ. १६६८ एप्रील २१

अजर. रा. **शिवाजी** राजे साहेब दामदौलतहू.

ता। विठोजी सिलंबकर देसमूख ता। गुंजनमावल

कौलनामा ऐसा जे, तुमचे बाबे मा। गोमाजी नायक एही मालूम केले जे, विठोजी सिलंबकर साहेबांचे कौलाचे उमेदवार आहेती; साहेबी कौल मरहमत केलिया गांवावरी येउन असतील म्हणून मालूम केले. तरी बिनाबरा मालुमात मनास आणून तुम्हास कौल मरहमत केला आहे व तुमचेविसी गोमाजी नायकाचे डोईवरी हात ठेविला आहे. तुम्ही कोणेविसी कांहीं शक न धरितां गांवास येऊन सुखे असणे. कौल असे.

राम. अं. ६२ ले. ३ } (१२०९) { श. १५९० वैशाख व. ७
सु. १०६८ जिल्काद १ } दिवाणपत्र { इ. १६६८ एप्रील २३

अज दिवाण ठाणा मसूर—मोकदम मसूर.

१० जमादिलाखरचें खुर्दखत २१ जिलकादला सादर जाले. त्यांत कासीभट बिन अंतभट जनारदार सेकिन पाटण यास २० बिघे मसूर येथें इनाम जमीन बा। खुर्दखत

कैलासवासी महाराजे साहेब चालत आलें आहे. या इनामास कधी निसारपटी घेतली नाहीं. ती आतां कारकून मागतात. महाराज धर्मपरायण आहेत. तेव्हां निसारपटीची तसवीस लागू नये....पा। हुजूर. रा। मा। बा। राजश्री गंगाजी दादाजी पंडित वेढवे. रजे बरहुकूम इनाम चालवावे.

खं. १५ ले. १७ सु. १०६८ जिल्हेज १	(१२१०) कौल	श. १५९० ज्येष्ठ शु. २ इ. १६६८ मे ३

मोरो त्रिमल—विठोजी हैबतराऊ सिलिंबकर देसमु. तर्फ गुंजनमावळ.

तुम्ही जिवाची दहशत धरून बाहेर पडिला आहां. त्यास मागती कौल जालिया वतनावरि येऊ म्हणौन तुमचे बाबे हवालदार तर्फ मजकूर यानी मालूम केले. तरी तुम्हास रा. साहेबाचा कौल पहिलेच पाठविला आहे. तो पावला असेल. आमचाहि कौल आहे. वरकड मिरासीदाराची विले जाली आहे तेच रवेसीने तुमचीहि विले करू. बेशक भेटीस येणे. येथे आलियावरि रा. साहेबाच्या पायावरी घालुनु तुमचा बरेपणाच होये ऐसे करू. कौल असे.

खं. १५ ले. २७८ सु. १०६८जिल्हेज ८	(१२११) उल्लेख	श. १५९० ज्येष्ठ शु. ९ इ. १६६८ मे १०

राजश्री थोरले केलासवासी याणी चिमणाजी बापूजी यांस पत्र दिल्हे त्यामध्यें मकसूद लिहिला आहे कीं, मो. सखोजी भिकाजी यामध्यें व तुम्ही व बाळाजी बापूजी यामध्यें कसबे खेड व पेठ शिवापूरच्या कुळकर्णाचा मिरासीचा कथला आहे. याबद्दल सखोजी भिकाजी तुम्हास निवाडा करावयाबद्दल एका स्थलास बोलावितात तो तुम्ही जात नाहीं. तेव्हां असे दिसते कीं, तुमच्या बापानें व भावाने साहेबीच्या बले त्यापासून कुलकर्ण झोबून घेऊन खात आहा. परंतु तुमचे कुलकर्ण नव्हे, असे दिसते. तरी हाली सखोपंत व तुम्ही एका थळास जाऊन कुळकर्णाचा निवाडा करणें.

पिसु. शिवाजी पृ. २५ इ. ८ जून न्यू.	(१२१२) पोर्तु. व्हा.-वीरो पंडित सुभे.	श. १५९० ज्येष्ठ व. १३ इ. १६६८ मे २८

सर्व देसायांना पोर्तुगीज प्रांतांतून बाहेर घालविलें आहे.

खं. २० ले. १२५ सु. १०६९ मोहर १	(१२१३) खुर्दखत	श. १५९० अ. आषाढ शु. ३ इ. १६६८ जून २

अजर. सैद मखदूम शर्जाखान—बजा. कार. व देसमु. पर. वाई.

नारायणभट बिन गोपीनाथभट चित्राव यांस पसरणीं, उझर्डे व एकसर या गावी १ चावर ३२ बिघे जमीन पूर्वीपासून चालत आहे ती त्यांजकडे चालू ठेवणें.

फॉरेस्ट. होम. भा. १ } (१२१४) { श. १५९० श्रावण व. ३
पृ. २२२-२२३ इ. } { इ. १६६८ ऑगस्ट १४

रँण्डॉल्फ टेलरची नेमणूक व त्याला दिलेल्या सूचना.

डचांशीं युद्धें करावीं लागलीं त्यामुळें अद्यापपर्यंत **शिवाजीच्या** त्रासापासून आम्ही आमची सुटका करून घेऊं शकलों नाहीं. तेव्हां किनाऱ्यावरील **त्याच्या अनेक बंदरांपैकीं** एकाद्या बंदरचें गलबत तावडींत सांपडल्यास तें पकडण्याचा किंवा त्याचा नाश करण्याचा कसून प्रयत्न करावा. मक्का, एडन, मस्कत, इराण, बसरा इकडून पुष्कळ गलबतें परत येण्याची वेळ हीच असल्यामुळें त्यांपैकीं कांहीं तरी तुम्हांला भेटतीलच.

[पृ. २२३] **राजापूर बंदराकरितां १।२ दिवस** राखून ठेवून, जणूं काय तो आपल्याच कामाकरितां जात असतां तुम्ही नाखुशीनें त्याला सोडलें असा बहाणा करून, **वेलजीला जैतापुराशीं** सोडून द्या. पुढें राजापूरला जातां येईल तसा जाऊं दे. तेथें जाऊन तेथील लोकांचे उद्देश शांततेचे व सलोख्याचे आहेत किंवा कसें, ते तह कोणत्या अटींवर करण्यास तयार आहेत हें अजमावून पाहून मग जरूर वाटल्यास त्यांचा इसम त्यांनीं बोलणें करण्याकरितां आमच्याकडे पाठवावा, असें त्यांना सुचवावें. आम्हांला त्याची जरूर आहे असा त्यांना कोणत्याहि प्रकारें संशय येतां कामा नये. [इं. फॅ. १३ पृ. १०४-१०५]

खं. २० ले. १२६ } (१२१५) { श. १५९० श्रावण व. ८
सु. १०६९ श. } निर्णयपत्र { इ. १६६८ आगस्ट १९

बिहुजूर रा. केसवजी नाईक देसमु. पर. वाई.

नरसीभट आणि नारायणभट व शंकरभट चित्राव यामधें इनामाच्या गरगशा लागला. वडिलांची जमीन होती ती विभाग करून घेतली. त्यावर नरसीभटे अपुले कस्टेकरून वरील सर्व इनामाच्या पव्या माफ करून घेतल्या तरी वरकडांना वाटा मागावयास समंध नाहीं. पटियाचे उतपन नरसिहभटीं खावे.

इं. फॅ. १३ } (१२१६) { श. १५९० श्रावण व. १३
पृ. १२ इ. } सुरत कन्सल्टेशन { इ. १६६८ आगस्ट २५

बँटम गलबताचें अधिकाऱ्यास हुकूमः- इंग्रजांचा पास नसलेलीं गलबतें विशेषतः **सुरत आणि गोवा** या बंदरांचे दरम्यानचे भागांतील पकडतां आल्यास पकडून इकडे घेऊन यावीं. कारण या मर्यादेंतील बरींचशीं बंदरें **आमचा शत्रू शिवाजी** याचीं असून, गेल्या कित्येक वर्षे त्याच्यावर आमचें कर्ज राहिलें असल्यामुळें, त्याची फेड करून घेण्याची संधी आल्यास आम्हांला आनंदच होईल.

खं. २० ले. १६ } (१२१७) { श. १५९० श्रावण
(खं. २० पृ. ४८) } हरि दिनानाथ--पंताजी गोपिनाथ { इ. १६६८ आगस्ट

बहिरो नारायणास बरोबर घेऊन हरी दिनानाथानें येण्याबद्दल व अंबाजीपंतास कागद पावते करण्याबद्दल पंताजी गोपिनाथानें लिहिलें होतें. त्यास हरी दिनानाथानें उत्तर लिहिलें कीं बहिरोपंत व अंबाजीपंत यास बोलावणें पाठविलें आहे. पत्र पोचल्यावर ते शीघ्रच येतील.

इं. फॅ. भा. १३ } (१२१८) { श. १५९० भाद्र. व. २
पृ. १०७ इ. } कारवार (टेलर)-सुरत. { इ. १६६८ सप्टें. १२

वडी साहेबीण मकेला मृत्यु पावली, तिचा परिवार परत आला. त्या विवंचनेंत असल्यामुळें स्वतः सुभेदार आम्हांला सामोरा येऊं शकला नाहीं.

इं. फॅ.१३ } (१२१९) { श. १५९० भाद्र. व. ६
पृ. १०९-११० इ. } कारवार-सुरत { इ. १६६८ सेप्टें. १६

आदिलशहानें [?] वर्षांत [?] लक्ष होन देऊन, **सोलापूर** नांवाचा मजबूत किल्ला व त्या खालील १८० हजार होनांचा मुलुख द्यावा, या अटीवर **औरंगजेब** आणि **विजापूरकर** यांमध्यें तह झाला आहे. **देशांत** सर्वत्र **शांतता** आहे. **शिवाजी राजगडला** स्तब्ध राहिला आहे; आणि यद्यपि **शिवाजी आणि आदिलशहा यांचा तह झालेला नाहीं**, तथापि परस्परांविरुद्ध शत्रुत्वाचें वर्तन त्यांनीं थांबविलेलें आहे.

इं. फॅ. १३ } (१२२०) { श. १५९० आश्वीन शु. ११
पृ. ९५-९६ इ. } मुंबई-सुरत { इ. १६६८ आक्टो. ६

कल्याण भिवंडीचा सुभेदार अबदुल्लाखान आणि दिवाण मिर्झा करीम बेग यांच्याशीं कॅप्टन गॅरीनें स्नेहाचा संबंध ठेविल्यामुळें, त्यांनीं औरंगाबादेस **राजपुत्र सुल० मुआझम** याजकडे, गॅरीला या आखाताचे पलीकडे असलेलें, आणि हिंदुस्तान आणि दख्खन या उभयतां मुलखाशीं चांगल्या रस्त्यांनीं संबंध जोडणारें, **उत्तम बंदर पेण** हें देण्याबद्दल शिफारस केल्याचें कळलें आहे. हें **शिवाजीच्या** अमलाखालीं आहे हें खरें असलें तरी **शिवाजी औरंगजेबाचा ताबेदार झाल्यामुळें** शहाजादा आज्ञा करील त्याप्रमाणें त्याला वागणें भाग आहे.

डच रे. भा. २९ } (१२२१) { श. १५९० आश्वीन शु.१४
नं. ७४० इ. आक्टो. १८न्यू. } डच ग. ज.-डच ई. इं. कं. { इ. १६६८ आक्टो. ८

वेंगुर्लेः— **शिवाजीनें** पुनः **आदिलशहाशीं तह केला** आहे. त्यानें कबूल केलेली ६ लाखांची खंडणी अर्थातच तो गरीब बिचाऱ्या रयतेकडून उकळील !

कित्येक वर्षेपर्यंत पोर्तु.च्या ताब्यांत असलेल्या **बारदेस बेटावर** हल्ला करून त्यानें विनाविरोध कित्येक खेडीं हस्तगत करून घेतलीं आहेत. विजापुरकरांच्या मालकी हक्काची सबब सांगून तो **साष्टी बेटावरहि** ताबा सांगत आहे. पोर्तुगीजांना त्याची फार भीति वाटते. **शिवाजी** किनाऱ्यावरील मुलखाचा **सुभेदार** झाल्यामुळें, शिरस्त्याप्रमाणें डच रेसिडेंटला २५३ होनांचा नजराणा देणें भाग पडलें. **शिवाजी** डच कंपनीला अनुकूल असल्याचें पुष्कळ तऱ्हांनीं दाखवितो. 'पोर्तुगीजांशीं तुमचें युद्ध सुरू झाल्यास तुम्हीं (डच) मला कळविलें असतां पोर्तुगीजांची कायमची हकालपट्टी करण्यास मीं तुम्हांस मदत करीन,' असें त्यानें आम्हांस कळविलें आहे. **पोर्तुगीजांविरुद्ध त्याची ही भावना** अगदीं मनापासूनची दिसते. तिचा आपल्याला फायदा होण्याचा संभव आहे.

सा. ले. २२० सु. १०६९ जवल १३	(१२२२)	श. १५९० आश्वीन व. १ इ. १६६८ आक्टो. १०

मसहुरल हजरत राजश्री **कृष्णाजी** भास्कर सुभेदार व कारकून सुबा ता। मावले प्रति राजश्री **शिवाजी राजे**:— दंडवत सर्जाराऊ जेधे देसमूख ता। भोर ता। रोहिडखोरे हुजूर येउनु आर्जे केला जे, आपला हक व इनाम गाऊ कुल अमानत केलें आहे. आपणास कांहीं पावत नाहीं. याकरितां आपला अवकात चालत नाहीं. बहुत जबून वरुत तंगतुरासी जाहाली आहे. तरी साहेब मेहेरवान होऊन आपला अवकात चालेल आणि साहेबाचे चाकरीस हजर राहो येसें केलें पाहिजे. म्हणून त्यावरून याचे इनाम व हक कुल मनास आणून त्यापैकीं सालमजकुरापासुनु दुबाले केले असे.

सं. ७ पृ. ७२ सु. ११ जवल १६	(१२२३)	श. १५९० आश्वीन व. ४ इ. १६६८ आक्टो. १३

औरंगजेब पादशहा—— मुत्सद्दी पा करोली सर. अहमदनगर.

मजकूर ले. ११४० फर्मानाप्रमाणें.

इं. फॅ. भा. १३ पृ. ७२-७३ इ.	(१२२४) मुंबई—सुरत	श. १५९० आश्वीन व. ११ इ. १६६८ आक्टो. २१

आम्हीं येथील लोकांच्या मुलांना **इंग्रजी शिकविण्या**करितां एक दोन शाळा-मास्तर ठेवावे अशी बेटावरील लोकांकडून मागणी आली आहे. परस्परांत स्नेह वाढावयास व **खिस्ती धर्माचा प्रसार होण्यास** या योगें उत्तम आरंभ होणार आहे. कल्याणचा दिवाण मिर्झा करीम बेग **फांटी** नांवाचें जवळचें बंदर देत आहे. मुअज्झमचें पत्र आल्यावर मगच तें घेण्याचें करावें असा खोजा अलादिनचा सल्ला आहे.

इं. फॅ. १३ } (१२२५) { श. १५९० कार्तीक शु. १
पृ. ११० इ. } कारवार-सुरत { इ. १६६८ आक्टो. २८

आदिलशहानें हा प्रांत एका उमरावाला दिला आहे तरी येथील लोकानांहि आपल्या वखारीबद्दल प्रेम वाटत आहे. परंतु, **शिवाजीचें** सैन्य आणि त्याच्या कुल्या यांना मात्र हे सर्व लोक भीत असतात. **शिवाजी** अलीकडे इकडे येण्याचा संभव नाहीं.

इं. फॅ. १३ } (१२२६) { श. १५९० कार्तीक शु. ५
पृ. ७३-७४ इ. } मुंबई-सुरत { इ. १६६८ ऑक्टो. ३०

वरच्या चौलचा सुभेदार शहाकरितां जी **जकात** वसूल करतो **तिचा एक दशांश घेण्यासाठीं** शिवाजीचा एक अमलदार तेथें असतो त्यानें **गिरिधर** (गर्धर)ला चांगल्या तऱ्हेनें वागवून सोरा, मिरी इत्यादि योग्य दरानें मिळवून देण्याची खटपट केली आणि तेथून १२ मैलांवर अष्टमी येथें **शिवाजी** होता त्याला भेटून जाण्यास सांगितलें. परंतु तसा हुकूम नसल्यामुळें गिरिधर परत आला.

खं. २० ले. १२७ } (१२२७) { श. १५९० कार्तीक शु. १०
स. } { इ. १६६८ नोवें. ३

(ले. १२१५) लेखांतील गरगशाचे बाबत ब्रह्मसभेनें केलेला निर्णय. नर्शी-भटे पटिया व तूप याची माफी साधिली. त्यास दोनी अंश व वरकड समस्तांस एक अंश. मग वरदी बोलिले आपणास मानत नाहीं. मग त्रिवर्गी स्वमुखी नेम केला जे एक अंश नरसीभटास व दोनी अंश त्रिवर्गास घावे. त्याप्रमाणें सभेनें केलें.

इं. फॅ. १३ } (१२२८) { श. १५९० कार्तीक व. ४
पृ. ११३-११४ इ. } कारवार-सुरत. { इ. १६६८ नोवें. १२

गोव्याचा व्हाइसरॉय मेला असून, आतां त्याचे जागीं तीन अधिकारी काम करितात. व्हाइसरॉय मरण्यापूर्वी त्यानें बारकाईनें तपास केला असतां, सर्व शहरांत मिळून शिवाजीचे ४।५ शें लोक छपून राहिलेले आढळले. तेव्हां स्वहस्तानें **शिवाजी**च्या वकिलाच्या दोन तीन थोबाडींत देऊन त्याला आणि या सर्व कैद्यांना त्यानें गोव्यांतून हद्दपार केलें. हें ऐकून शिवाजीनें ८।१० हजार पायदळ आणि १ एक हजार घोडे-स्वारांनिशीं गोव्यावर स्वारी करण्याचें जाहीर केल्यामुळें पोर्तु.नींहि आपल्याकडून कडे-कोट तयारी केली. **शिवाजी राजापूरचे** उत्तरेकडे आहे तो या बाजूला येईल किंवा कसें याबद्दल सुभेदार व व्यापारी लोक यांचेपाशीं तपास करून पहातां, स्वारी करून आदिल-शाहीचा तह मोडण्याचें, किंवा या प्रांताचा जागीरदार **मुस्ताफाखान** (हा आदिल-शहाचा मोठा आवडता असून औरंगाबादेस वकील म्हणून राहिला आहे.) याचेविरुद्ध

जाण्याचें, धाडस **शिवाजी** करील असें कोणालाच वाटत नाहीं....तथापि शिवाजीच्या हालचालींबद्दल बातमी ठेवून आम्ही सावध रहात आहों.

ता. क. या प्रांताच्या मालकाचें नांव पूर्वी शा अबदल हसनखान (commanda) असें होतें. परंतु आदिलशहानें नबाब मुस्तफाखान असा नवा किताब त्यास दिला.

इं. फॅ. भा. १३ पृ. ८७-८८ इ.	(१२२९) मुंबई—सुरत	श. १५९० कार्तिक व. ४ इ. १६६८ नोवें. १२

पेण व मुंबई यांच्यामधील **जलमार्गाची खोली** घेतली. राजापूर येथें **शिवाजीच्या दोन गलबतांची** व कॅप्टन स्मिथची लहानशी चकमक झाली.

इं. फॅ. १३ पृ. ४४ इ.	(१२३०) गॉंम्ब्रून—सुरत	श. १५९० मार्ग. शु. ३ इ. १६६८ नोवें. २६

मस्कतहून ताजी बातमी अशी आली आहे कीं १९ मोठीं आणि ५१६ छोटीं गलबतें मिळून ४००० लोक असलेलें **एक अरबी आरमार** हिंदुस्थानचे किनाऱ्याकडे निघून गेलें. कांहींच्या मतें हें आरमार मुंबईवर जावयाचें आहे. इतरांच्या मतें **शिवाजीला मदत करण्याकरितां** म्हणून तें जात असावें. सिंधचे मार्गानें कॉंगोकडे बातमी आलेली खरी असेल तर तीप्रमाणें **शिवाजीनें पोर्तु०** पासून **चौल घेतलें** असें समजतें.

इं. फॅ. १३ पृ. ११४-१५ इ.	(१२३१) कारवार—सुरत	श. १५९० मार्ग. व. ८ इ. १६६८ डिसें. १६

शिवाजीची भीती आतां राहिली नाहीं. कारण तो परत फिरला आहे. अनेक लहान लहान तुकड्या करून आणि निरनिराळ्या सबबींवर **शिवाजीनें** सुमारें चार-पांचशें लोक **गोव्यांत** घुसडून दिले होते. थोड्याच वेळांत ही संख्या दुप्पट झाली असती. आणि त्या नंतर एका रात्रीं एकदम उठाव केला असता तर कोणताहि एक दरवाजा ताब्यांत घेऊन, पोर्तु०नीं पुरेसें सैन्य रणांगणावर उभें करण्याचे पूर्वींच, **शिवाजीचे** लोक आंत शिरून त्यांनीं **गोवा काबीज केलें असतें** यांत शंका नव्हती. परंतु गोव्यापर्यंत आल्यावर, आपला कट उघडकीस आला; आपले लोक पकडले गेले; आणि पोर्तु० लोकहि सज्ज होऊन राहिले; हें पाहून, मूळचा बेत बदलून, त्या भागांतील आपल्या **किल्ल्यांची शिवाजी पाहणी करूं लागला.** त्यानें या वेळीं कित्येक ठिकाणची शिबंदी बदलून रसद आणि दारूगोळा यांची तरतूद केली. पुढें इकडील सर्व मुलखांत सर्व ठिकाणीं कडेकोट बंदोबस्त झाला असून आपल्याला प्रवेश मिळणें शक्य नाहीं असें पाहून **राजगडला** कांहीं जरूरीचें काम आहे

असा **बहाणा** करून आपलें सैन्य घेऊन तो परत वळला. परत जातांना सैन्याचा तनखा स्वतःचेच सुभेदार व नोकर यांजकडून उकळीत स्वारी गेली. त्याचे येण्याची इतकी दहशत बसली आहे कीं, तो परत गेल्याची बातमी खरी मानावयास कोणींच तयार नाहीं. [से.फॅ.रे. सुरत भा.१०५ पृ. ७८-७९]-पत्राचा पुढील भागः-**फ्रेंचांनीं राजापूरला** वसाहत केली. शिवाजीच्या भेटीला गेल्यावेळीं त्यानें त्यांना वस्त्रें दिलीं व सर्व राज्यांत व्यापार करण्याचें फर्मान दिलें. भेटींत **इंग्रजांच्याबद्दल** 'ते कां येत नाहींत?' वगैरे त्यानें पुष्कळ चौकशी केली. ते आले तर आपण राजापूरच्या नुकसानीबद्दल भरपाई करून देऊं असें तो बोलला. परंतु तद्देशीय व्यापाऱ्यांनीं 'त्यांना रोख पैसा पाहिजे' असें सांगितलें. तेव्हां त्यानें नुसतें डोकें हालविलें. पुढें तो कांहींच बोलला नाहीं. [इं. फॅ. भा. १३ पृ. ११६]

खं. १८ ले. १५ }
सु. १०६९ साबान ३ } (१२३२) { श. १५९० पौष शु. ४
{ इ. १६६८ डिसें. २७

रा. शिवाजी राजे—बाबाजी राम देशपांडे प्रा पुणें.

हुजूर खबर मालूम जाली कीं, मुकुंद कान्हो देशपांडिये प्रा। मजकूर याचे तकसिमेचा कारबार यांसि न देवा आणि अवघा कारबार आपणच करावा असा हेतु आहे. तरी हे कोण गोष्टी? तुम्ही पहिलेपासून सालाबाद हैबतखान व मलिक अंबर व माहाराज साहेबाचे कारकीर्दीस व हालीचे कारकीर्दीस जैसे चालिले तेणेप्रमाणे वर्तनूक करणें. नवे कचाट करून कारबारास खलेल करणे हे गैरमाकुल गोस्टी आहे व नवे कारबार कांहीं चालनार नाहीं. तरी तुम्ही आपले तकसिमेचा कारबार करीत जाणे. मुकुंद कान्होचे तकसिमेचा कारबार मुकुंद कान्हो कारीत जाईल. तुम्ही मुकुंद कान्होच्या **ताच्या** कारबारासि बजबज घालवयासि गरज नाहीं. हे समजोन वर्तनूक करणे. नवे खलेल सर्वथा न करणे. कराल तर ते कांहीं चालणार नाहीं. सालाबादप्रमाणें दुरुस वर्तनूक करणें. नवे खलेल केले म्हणजे साहेबास बोल नाहीं. ऐसे समजोन वर्तणूक करणे.

पिसु. शिवाजी. पृ. २७ } (१२३३) { श. १५९० पौष शु. ६
इ. जाने. ७ न्यू. } पोर्तुगीज गव्हर्नर—पोर्तु. राजा. { इ. १६६८ डिसें. २८

आमच्या कारकीर्दीस प्रारंभ होतांच यंदा **बार्देश व साष्टी हे प्रांत घेण्याची शिवाजीची इच्छा** होती; पण आमचा बंदोबस्त असल्यामुळें त्याला आपला हेतु तडीस नेतां आला नाहीं.

खं. १८ ले. ११ }
सु १०६९ साबान ४ } (१२३४) { श. १५९० पौष शु. ६
{ इ. १६६८ डिसें. २८

राजश्री **जिजाबाई**—बाबाजी रामदेश कु० पर० पुणें.

मुकुंद कान्हो देशकु० याचे तकासिमेस तुम्ही खलेल करतां तरी सालाबादप्रमाणें वागणें. नशते कथले केल्या, चिरंजीव कांहीं कोन्हाचा मुल्हाजा करणार नाहींत. ऐसे समजोन घसघस न करणे. पेस्तर बोभाट आला म्हणजे बोल नाहीं.

इं. फॅ.१२ पृ. १२३ इ. (१२३५) मि. मास्टर—सुरत. श. १५९० पौष शु. ९ इ. १६६८ डिसें. ३१

राजापूरला फ्रेंचांनीं एक दलाल पाठविला होता. परंतु शिवाजीनें त्यांना इंग्रजांचें घर देण्याचें नाकारलें.

वत. पत्रें पृ. १३ सु. १०६९ साबान १२ (१२३६) पोटपत्र श. १५९० पौष शु. १४ इ. १६६९ जाने. ५

" अजरख्तखाने राजश्री **शिवाजी** राजे साहेब दाम दौलतहू बजानेबू मोकदमानी व रयानी समस्त प्रजा मौजे सोनोरी परगणे पुणें, बिदानद गोविंद विश्वनाथ पानशी जेतिषी व कुळकर्णी मौजे मजकूर यासी व रामाजी कृष्ण गांवखंडेराऊ वस्ती कसबे सासवड यासी कुलकर्णाबद्दल भांडण लागलें होतें. याचा निवाडा होऊन महजर झाला ऐसा जे, राजाजी कृष्ण गांवखंडेराऊ हुजूर येऊन मालूम केलें जे, आपले कुलकर्ण मौजे सोनोरी तर्फ कन्हेपठार परगणे पुणें आपली मिरास आहे. यासीं गोविंद पानशी आपणासीं लाईणी कुलकर्णाबद्दल भांडत आहे. तरी साहेबीं गोविंद विश्वनाथ यास हुजूर आणून आपली व त्याची बरहक्क मुनसुफी करून निवाडा केला पाहिजे. म्हणून मालूम केलें. ह्यावरून गोविंद विश्वनाथ यास तलब करून आणून दोघा जणांची हकिकत मनास आणून तकरिरा घेतल्या.

इं. फॅ. १३ पृ. २०९ (ओ. कॉ. ३४०५)इ. (१२३७) मुंबई–कंपनी. श. १५९० माघ शु. ३ इ. १६६९ जाने. २८

अरब आणि **शिवाजी** यांच्याशीं **पोर्तुगीजांचें** आधींच वैर चालू असल्यामुळे, त्यांतच **मोंगलांनीं**हि विरोध करण्याचें निश्चून मनावर घेतल्यास **पोर्तुगीजांची** धडगत नाहीं. **परंतु वादामध्यें व विशेषतः युद्धप्रसंगीं गंभीर विचार करण्याची पौरस्त्यांची पद्धति** लक्षांत घेतल्यास उभयजण (शत्रु) कांहीं विचार करतील असें वाटतें. ओ. कॉ. नं. ३३९९, **१६६९ जाने. १४** चें सुरतेचे प्रेसिडेंटास पत्र:—बादशहाकडून अहादी (जासूद) सर्व **पोर्तुगीजांना सुरतेंतून हांकून लावण्याबद्दल हुकूम** घेऊन आला. शहराच्या रक्षणाकरितां पहारे ठेवले. बादर (बहादर)खान दमणला वेढा घालण्याकरितां, दुसरा एक उमराव **दीव**कडे आणि आणखी २२ सरदार इतर पोर्तुगीज मुलखावर,१ असे पाठविण्यांत आले. औरंगाबादेहून सुलतान मुअझ्झमनें त्यांना मदत करावयाची

आहे. या हुकमाच्या माथेवरून बादशहा राहिलेल्या तिघां ख्रिश्चनांना वगळील असें दिसत नाहीं (And there are a few words in the husbull hukum which seem to threaten the three other Christian nations, to say, the King will care or take order for them allso.). या गोष्टीचा विचार करण्याकरितां बादशाही 'नाखुदा' उमाभाई दरबाराकडे बोलावला असून या वर्षी बादशाही किंवा व्यापाऱ्यांचीं गलबतें समुद्रावर फिरकणार नाहींत.

खं. २० ले. १९९ पृ. ३०२ } (१२३८) { श. १५९० माघ शु. ४
सु. १०६९ रम २ } { इ. १६६९ जाने. २५

मशरूल अनाम राजश्री नारो भिकाजी सुभेदार व कारकून सरदेसमुखी सरकार महालहाय तलकोकण व देशमु० व दोडे कल्याण मामले यास—

प्रती राजश्री शिवाजी राजे त्रिंबकजी नरसप्रभु हुजूर येऊन मालूम केलें कीं कसबे कल्याणचे कुलकर्ण व हुदेदारी आपली मिरास सालाबाद माहात कदम कारकीर्द मलिकंबर बाजे कारकीर्द दर कारकीर्द चालत आलें असे. हाली मोगलाचे कमाविसीमधें देसमूख व देसपांडियानी कसूर करून चालों देत नाहीं, चिटणीस व नाइकवाडी यांचा मुशारा सरकारी पोते खर्च पडत होता तो हाली मिरासदारानीं रयतेनिसबत लावून त्यांचे चालवितात आणि आपणास हुदेदारीचा मुशारा दरमाहे टके १० व कागद बाब दरमाहे टका १ एकून टके ११ होते हें चालवीत नाहीं, तर आपलाहि मुशारा सदरहू रयते-निसबतीनें लावून चालवील व कुलकर्णहि बिला कुसूर चालवीत ऐसे केले पाहिजे. म्हणून मालूम केलें. तर बाजे मिरासदारांच्या मिरासीच्या मिरासी चालवाया आणि यासी कुसूर करावयास काय गरज आहे ? हाली तुम्ही देसमुखदेसपांडियासी ताकीद करून त्रिंबक प्रभु मजकुराचे कुलकर्ण व हुदेदारी सालाबादप्रमाणें हुदेदारीचा मुशारा बाजे मिरासप्रमाणें रयतेनिसबतीनें देत तें करणें, बोभाट येऊं न देणें.

स. पृ. ११९ } (१२३९) { श. १५९० माघ शु. ७
स. } { इ. १६६९ जाने. २८

रा. पिराजीराव राजे घाटगे सर्जेराव वजीर गोसावी यांसः——

म. ह. मातमीदौलत राजमान्य प्रत महाराज शिवछत्रपती. तुम्हांकडील पत्र, सर्व सविस्तर मजकूर राजश्री मल्हारपंत नाडगौडे यांणीं श्रुत केला, तो दिलांत आणून तुम्हांस हजरत पादशहा यांणीं मेहेरबानी होऊन वजिरी, मोर्चेला, चवघडा, वतनदारी, जहागीर कागल परगणा, कर्याती ६ गांव सुमार ६७॥ तुम्हांस इनाम करून दिले बरहुकूम अनुभव केला, वतनदारीचे कागदपत्र ध्यानांत आणोन तुम्हांस राजपत्रें करून दिल्हीं आहेत. शिवाय कलम–

१ तुम्हीं समक्ष भेटीस याल (ते) समई मानमरातब कलम.

१ चादर, खडा, कंठी व शिरपेंच, पोशाख ५ सनगे कलाबुती निरोप समयीं, ताजीम समक्ष बसका बरोबर, घोडे २ [यकूण ६]

१ सदरहू वजनदारी व जहागिरी पूर्ववतप्रमाणें श्रुटीसानक तुमचे वंशपरंपरा भोगवटा करून सुखरूप असावें.

२ एकूण कलमें दोन सदरहूप्रमाणें तुमचे परगणेंत खून, खराबी वगैरे पूर्वीपासून तुम्हीं मुखत्यार. आम्हांकडून कांहीं दरोगा पाहणेंच कारण नाहीं. बहुत काय लिहिणें.

वतन पत्रें. पृ. २३ }
सु. १०६९ फ. १०७८ श. }
(१२४०)
अजीज पत्र
{ श. १५९० माघ व. १
{ इ. १६६९ फेब्रु. ६

रामजी कृष्ण गाव खंडेराऊ सासवड.—गोविंद विश्वनाथ पानशी, सोनोरी.

आपणास तुमचे चुलते लुखो परशराम यांनीं मुतालीक ठेविले असतां बेइमान झालें. हालीं तुम्ही आम्ही भांडत **महाराज** साहेब (शिवाजी) याजवळ आलों. त्यांनीं गोताच्या व पांढरीच्या साक्षी मनास आणतां दोन्ही गांव मौ. सोनोरी व दिये गिघवे यांनीं पानशास दान दिल्हे असें ठरलें. त्या वेळीं जानोजी काळा यानें लटकी साक्ष दिली. त्यावरून महाराज साहेबी दिव्य नेमून दिलें. मौ मोहरी तर्फ गुंजनमावल येथें दिव्य होऊन आम्हीं खोटें ठरलों. खालीं गोहीमध्यें विठल पीलदेव सुभेदार प्रांत मावळ; मुकुंद कान्हो देशपांडे पा। पुणे इत्यादि १२ सह्या आहेत.

स. पृ. १२१ ले. १३ }
सु. १०६९ सवाल ३ }
(१२४१)
सनद
{ श. १५९० फाल्गुन शु. ४
{ इ. १६६९ फेब्रु. २४

मोरो त्रिमल पेशवे—हवाल. कार. देशमु. देश. पर. शिरवळ.

राजश्री साहेबांचे आज्ञापत्र साबान छ ४ चें आलें तेथें आज्ञा जे, बनाम पंताजी गोपिनाथ बोकील भले ब्राह्मणाचे भक्त आहेत. या निमित्त यावरी साहेब मेहेरबान होऊन इनाम जमीन अवल चावर २ मौजे मांढिकी जमीन चावर, मौ. भवाळी जमीन, १ चावर मेहेरबान होऊन दिधली असे.

इं. फॅ. १३ }
पृ. २६९ इ. }
(१२४२)
कारवार–सुरत.
{ श. १५९० फाल्गुन व. २
{ इ. १६६९ मार्च ९

यापुढें इतक्या उशिरां बाहेर पडण्याची **शिवाजी**ची पद्धति नसल्यामुळें यावर्षी आतां त्याची भीती संपली असें दिसतें. पाऊस संपून तो येणार त्याचे आधीं आमचीं गलबतें भरून निघतील यांत शंका नाहीं! **शिवाजीचें महत्त्व** प्रत्येक दिवशीं **कमी होत आहे** असें आम्हीं ऐकतों. तसेंच तुमचेंहि मत आहे हें

वाचून बरें वाटलें....**शिवाजी** राजगडला असून तो स्वतः व देशांत सर्वत्र शांत आहे.

खं. २० ले. २८७ } (१२४३) { श. १५९० फाल्गुन व. ३
पृ. ४१९ श. } उल्लेख निवाडपत्र { इ. १६६९ मार्च १०

रखमाजी, बाबाजी, शिवाजी, गोमाजी बाप बापूजी त्रिंबक विश्वनाथ

मौ. सोनवरीच्या कुळकर्णाचें भांडण रामाजी गावखंडेराऊ यासी लागले होते. दिव्य केले, खरा जाला. वाद सांगता पैसे पडले. आपणास द्यावयास नाहीं. म्हणून सोनवरीचे कुळकर्ण व ज्योतिष तुम्हांस खुषीने दिधले.

खं. १७ ले. १६ } (१२४४) { श. १५९० फाल्गुन व. ८
सु. १०६९ सवाल २२ } { इ. १६६९ मार्च १५

अजर. रा. जिजाबाई साहेब. विठोजी हैबतराऊ सिलंबकर देशमु. तर्फ गुंजनमावल

तुम्ही आपली कन्या गोमाजी नाईकाच्या लेकास दिधली. लग्न सिधी कारणे तुम्हास हुजूर बोलाविले. तुम्हीं सांगितले कीं सांप्रत रोजीचे खावयास नाहीं आणि लग्नसिधी कैसी होईल. त्यावरून तुम्हास होन २५ व ५०० माणसाची जेवणाची सामान दिधले असे. लग्न सिध करणें.

इं. फॅ. १३ } (१२४५) { श. १५९० फा. व. १०
पृ. २१९–२१ इ. } मुंबई–सुरत. { इ. १६६९ मार्च १७

शिवाजीशीं दोन हात करण्याची आमची इच्छा असली तथापि आज आपण तसे समर्थ नाहीं, हें लक्षांत घेऊन शिवाजीनें आपल्या नोकरामार्फत केलेली **३०० रु.ची मागणी** फारशी मोठी नसल्यामुळें आम्हीं ती विश्वास दाखविण्याचें उद्देशानें पुरविली. चुना पाडण्याकरितां लागणारें लाकूड आणि बहुतेक इतर वस्तु त्याच्याच मुलखांतून आम्हांला मिळत असल्यामुळें किनाऱ्यावरील त्याच्या लोकांशीं सलोख्याचे संबंध ठेवणें आम्हांला इष्टच आहे.......आमच्या देखत **मलबाऱ्यांनीं** कित्येक मच्छमार लोकांस धरून नेलें. आमचे पाशीं प्रतिकारक्षम जलयानें नसल्यामुळें आम्हीं त्यांना मदत करूं शकलों नाहीं. **शिवाजी** किंवा दुसऱ्या कोणाशीं युद्ध करण्याकरितां तशा गलबतांची जरूरी आहे.

इं. फॅ. १३ } (१२४६) { श. १५९० फाल्गुन व. १४
पृ. २२२ इ. } मुंबई–सुरत { इ. १६६९ मार्च २०

१८ तारखेला नजीकच्या एसाजी [?] राजानें मला एक खाजगी निरोप पाठविला कीं, 'आपल्या अमलाखालील दर्यातील **पोर्तुगीजांच्या** कांहीं गलबतांवर **शिवाजी** हल्ला

करून तीं घेऊन त्यानंतर साष्टीवरही जाणार आहे.' शिवाजीचें साष्टींतील सान्निध्य आपल्याला इष्ट नसल्यामुळें त्याला शक्य ती मदत देण्याचें मीं कबूल केलें आहे.

सा. ले. ९९ सु. १०६९ फ. १०७८ | (१२४७) महजर | श. १५९०. इ १६६८–६९

भावसिंग राणा रजपुतानें पुणा येथील रयते पासून जमाबंदीच्या ४३८॥≋ रुपयांमधून रु. २६८ घेतले. बाकी १७०॥≋ जागीरदारांनीं घेतले. असे असून रयतेनें तक्रार केली की, आपणासून दुबार पैके घेतले तर तसें झालें नाहीं.

खं. १८ ले. १६ फ. १०७८ | (१२४८) महजर | श. १५९० इ. १६६८–६९

गोंदसेटी हुलवला पेठ शापूर का पुणे व गणसेटि शेटे यामधे घराचे भांडण होते. निकालांत घरठाणे गोंदसेटीचा लेक दुलबा हुलवला त्यास दिधले. गणसेटीस कांहीं निसबती नाहीं.

इं. फॅ.१२ पृ. २८४ टीप १ इ. | (१२४९) आलेपोचें पत्र– | श. १५९० इ. १६६८

बादशहाचें धर्मवेड, अडचणींत पकडून धर्मांतर करणें भाग पाडण्याकरितां त्यानें नेमलेले हस्तक, आणि पुढें नाइलाजानें करावें लागणारें धर्मांतर, हीं हिंदूंना व बनियांना जाचक होत आहेत. स्वर्गामध्यें अशा कृत्यांनीं **महमदाच्या बरोबर मान्यता** मिळेल; असें खूळ त्याच्या मुल्लांनीं त्याच्या डोक्यांत भरून दिलें आहे. त्याच्याइतके जे कर्मठ नाहींत अशा सरदारांनाहि हा **त्याचा जाच सहन करावा लागतो** आणि लवकरच **ते बंड करून उठतील असा** कयास आहे. [रिपोर्ट ऑन फिंच मॅन्यु. पृ. ५०६]

त्रै. व. २ पृ. ६५, ६६ सु. १०६९ फ. १०७८ | (१२५०) | श. १५९० इ. १६६८–६९

?——सरदेश. देश. देशपां. मोक. व रया. सुपे

मोरोबा गोसावी चिंचवड याचा इनाम पूर्वीप्रो चालविणें.

खं. २० ले. १८७ श. | (१२५१) यादी | श. १५९१ चैत्र व. ३ इ. १६६९ एप्रील ९

करवीर क्षेत्री रा गोविंदराव दत्तात्रय यांनीं प्रतिग्रहा प्रताप १ प्रमाणें वाटणी केली. प्रताप दिलेल्या १८५ ब्रह्मवृंदांची यादी.

इं. फॅ. १३ } (१२५२) { श. १५९१ चैत्र व. १२
पृ. २२३ इ. } मुंबई-सुरत. { इ. १६६९ एप्रील १७

शिवाजी राजाला एकदां आम्हीं सवलत दिली म्हणजे आम्हीं आपले हक्क गमावले असें होत नाहीं. त्याचे बाबतींत केलेला हा **त्याच्यापुरताच अपवाद** असून तो सामान्य आधार समजला जावा अशी आमची इच्छा नाहीं. तथापि अपरिहार्य पणें करावी लागणारी गोष्ट करून (जें आम्हीं राखूं शकलों नसतों तेंच देऊन) आम्हीं **फक्त** आमचा **आब राखिला आहे**. त्यानें उद्यां फेडीबद्दल नकार दर्शविला तर आम्हीं त्याच्याकडून **जबरीनें वसूल** हि **करूं शकत नाहीं**. त्यांतून त्याच्या सौमनस्यावर आमचें स्वास्थ्य पुष्कळच अवलंबून आहे. आज आपल्याला पुरेसें लांकूड वगैरे मिळूं शकतें तें एकदां भांडण उकरून काढल्यावर मिळणार नाहीं. वेळ आलीच आणि त्याच्याशीं भांडण करायचेंच म्हटलें तर ह्याच किंवा दुसऱ्या अनेक सबबींवर करतां येईल।

[दि – G. G. C. १ भा. ९ पृ. १०७ (**१६६९ मार्च १७**) या पत्रांत 'मुंबई बंदरांत येणाऱ्या मालावर शेंकडा ३ टक्के जकात घेण्याचा नवीनच नियम करण्यांत आला. परंतु **शिवाजी** जबरदस्त, ही जकात देण्याचें हरप्रयत्न करून टाळणार; हें जाणून, जें हातीं येणारच नाहीं त्यांत उदारपणा दाखवायला कां सोडा; असा विचार करून इंग्रजांनीं शिवाजीला ही जकात बहाल केली.' इत्यादि हकीकत आहे. या गोष्टीचा खुलासा आणि समर्थन या उताऱ्यांत केलें आहे.]

फॅ. रे. सुरत भा. १०५ } (१२५३) { श. १५९१ चैत्र व. १४
पृ. १२१-२२ इ. } कारवार-सुरत. { इ. १६६९ एप्रील १९

मोठें सैन्य घेऊन **शफतीखान** [शाहिस्तेखान] **शिवाजीवर** चालून येत आहे. **दंडाराजपुरीच्या सिद्यानें** त्याच्या कांहीं किल्ल्यांना वेढा दिला आणि त्याच्या बऱ्याच प्रमुख हस्तकांनीं त्याच्याविरुद्ध **कट केल्याच्या** संशयावरून त्यानें कित्येकांना कारागृहांत टाकिलें. व बाकीचे पळाले. ह्या गोष्टी खऱ्या असल्या तर **शिवाजी आतां फार वेळ टिकून राहणें कठीण दिसतें.**

नुकतेंच मोठें वादळ होऊन त्यांत तांदूळाचीं वगैरे **शिवाजीचीं पुष्कळ गलबतें गमाविलीं**. [इं. फॅ. भा. १३ पृ. २६९.]

फॅ. रे. मुंबई } (१२५४) { श. १५९१ वैशाख शु. ८
भा. १ पृ. ७० इ. } सुरत—मुंबई { इ. १६६९ एप्रील २८

तांदूळ, नारळ यांवरील जकातींबाबत, आणि **शिवाजी** व तुमचे संबंध सलोख्याचे राखण्याकरितां, जें तुम्हीं करितां त्याला आमची संमति आहे. कारण त्याला आपण तेवढी रकम बहाल केली नसती तर त्यानें ती परत केली नसती असें तुमच्यासारखेंच आम्हांला वाटतें.

स. पु. १२० ले. १२ }
२ जिल्हेज १५ } (१२५५) { श. १५९१ वैशाख ब. १
{ इ. १६६९ मे ६

रा शिवछत्रपति——— पिराजीराव राजे घाटगे देशमु. जहा. फौज पा। कागल. आपला इनाम आम्ही पूर्वीप्रमाणें चालवूं.

इतिवृ. ३४ पृ. ५६ }
हि. १०८० मोहर ५ } (१२५६) मिरासी पत्र { श. १५९१ ज्येष्ठ शु. ७
{ इ. १६६९ मे २६

समस्त दाहीजन मौ. कवीठे पर. नीवास सर. अहनदनगर त्रिंबक जोसी बिन मोर जोसी कसबे भिंगार

मौ. कवीठे येथील कुळकर्ण तुम्हस ६०१ रुपयास विकत दिधलें असे. पूर्वीचा मिरासदार दुकाळा काळे बुडाला. कोण्ही वारीसदार नव्हता. नरसोजी ताकिया याचे घरवाडी ही मिरासी दिधली असे.

ई. फॅ. १३ }
पृ. २२८ इ. } (१२५७) मुंबई–सुरत { श. १५९१ ज्येष्ठ व. ६
{ इ. १६६९ जून ९

'शिवाजी राजा आपल्या देशांत शिरला आहे. त्यानें पुष्कळ त्रास दिल्यामुळें येथील लोक आश्रयाकरितां मुंबईकडे पळून गेले तर त्यांस मुंबईत प्रवेश मिळावा' असें दंडा राजपूरच्या सिद्दीचें पत्र आलें; त्यास शक्य ती व्यवस्था करण्याचें वचन मी दिलें आहे.

ख. २० ले. १९ }
श. सु. १०७० मोहर २४ } (१२५८) { श. १५९१ ज्येष्ठ व. ११
{ इ. १६६९ जून १४

तिमाजी मल्हार व त्रिंबक गोमदेऊ देसपां० पर० सुपे असकर्णजी साहूकार आम्ही पनास रुपये घेतले त्यास दरमहा व्याज दरशेकडा रु. ६ प्रमाणे.

राम. अं. ६५,६६ ले. १३ }
सु. १०७० सफर ३ } (१२५९) फा. सी. { श. १५९१ आषाढ शु. ४
{ इ. १६६९ जून २२

त्रिंबकजीराजे भोसले–रघुनाथ व यादव भट सेडगे येळूर (श्रीघृष्णेश्वरचे) पूजेस श्रावणमासचे रुपये १५ दिले.

इं. फॅ. १३. }
पृ. २३० इ. } (१२६०) सुरत–मुंबई { श. १५९१ आषाढ शु. ४
{ इ. १६६९ जून २२

आम्हांला स्वतःच्या संरक्षणाकरितांच करण्यासारखें पुष्कळ आहे. अशा वेळीं दुसऱ्यांच्या भांडणांत पडणें बरें नाहीं. त्यांतून कोणाहि त्रयस्थाला आणि विशेषतः आपल्याशीं उघडपणें शत्रुत्व करून ज्यानें आपले काफिले आणि गलबतें लुटलीं आहेत

आणि तिळमात्र भरपाई केली नाहीं; अशाला आपण आश्रय द्यावा अशी मुंबईच्या शिबंदीची परिस्थितिहि नाही. तेव्हां **शिवाजीशीं** वैर करण्याची आपली आज तयारी नाहीं हें समजून त्याला खिजविण्याला कारण होईल असें कांहींहि करूं नका. **मुंबई** आणि **दंडा** या दोन्ही ठाण्यांचा बंदोबस्त करतां येण्याइतकें सैन्य व दारूगोळा आपल्याजवळ असता तर **सिद्दी** आणि **शिवाजी** या उभयतांवरहि चांगला सूड घेण्याची ही संधि होती. परंतु हें बोलणें सोपें आहे तितकेंच करणें कठीण आहे.

सा. ले. २२१ } (१२६१) { श. १५९१ आषाढ व. १
सु. ११७० सफर १५ } { इ. १६६९ जुलै ४

रा. शिवाजी राजे——म. अ. रा. बाजी सर्ज्याराऊ जेधे देसमूख ता भोर ता रोहिडखोरे

तुम्ही अर्दास पाठवून तपसिले लिहिले कीं, आपली भागाची सेते खिवाजी जेधे करितात त्यांत अपणांत कथला होईल म्हणून. तरी त्याचा तुमचा निवाडा होऊन गेला असतां मागुते कथला कराया काये गरज आहे. सेते ही द्याना घरही द्याना म्हणजे हे गोष्टी कैसी चालो पाहते ? इतकिया उपरि सेताविसीं कथला न करणें. जेणेप्रमाणें निवाडा जाला आहे तेणेप्रमाणें सेते ते व तुम्ही तकसीम प्रमाणे करून निसूर असणे कथलियात फाइदा नाही जाणिजे.

इं. फॅ. १२ } (१२६२) { श. १५९१ आषाढ व ३०
पृ. २७०इ. } { इ १६६९ जूलै १७

विजापुरकरांच्या मुलखाला शिवाजीचा मुळींच त्रास होत नसून या बाजूला शांतता आहे.

सा. ले. २६९ } (१२६३) { श. १५९१ श्रावण शु. ५
सु. १०७० रवल ४ } कौलनामा-'प्रति.' मु. { इ. १६६९ जुलै २३

अज रक्तखाने राजश्री **शिवाजीराजे**साहेब दामदौलतहू ता मशहुरल अनाम दताजी बिन केशवजी नाईक पिसाल देसमूख पा वाई.

बिदानदके दादे कौलनामा येसा जे तुमचे मुतालीक केदारजी सुरो येऊन अर्ज केला जे केशवजी नाईक कदीम साहेबाचा दस्तगीर तैसेच त्यामागे हाली दताजी त्यांचा पुत्र साहेबांचे पायाची बहुत उमेद धरितात. येसे असता दताजी केशवजी याचे वारीसदार व गंगाजी व दताजी याची पाटी पा मजकूरचे सुबेदार व कारकून राखतात आणि दताजी केशवजीचे मुतालिकास दस्त करून ठेऊन देशमुखीस कुसूर केला आहे. तरी साहेबी दो गोष्टीने दताजी केशवजीची पलाटी राखिली पाहिजे कीं आपणापासून येक भला माणूस पा मजकूरचे सुबेदारांपासी पाठऊन त्यासी माकूल करावे कीं, गंगाजी व

दताजी यांची पाटी न राखणे. ते पहिलेपासून जे खात आले आहेत तेणेंप्रमाणें खाऊन हालखुद राहती ते करणें आणि दताजी केशवजीची देसमुखी चालत आली आहे तैसी बिलाकुसूर चालविणें. ऐसे जरी न करा तरी दताजी केशवजी दावा करील, विलायेतीस तसदी देईल, मुलुक ओस पडेल, मग आम्हास बोल नाहीं. ऐशा गोष्टी बोलोन दाटदपटे देऊन हेजिबाहेजिबी आपले पारपत्य होये ते केले पाहिजे. जरी या गोष्टी ते नाइकोन, पारपत्य न करीत तरी दताजी केशवजीस साहेबी आपले मुलकात हरयेक जागा राहावया जागा दिल्हा (पाहिजे). म्हणजे दहावीस घोडी करून शर्तीनसी दावा करून पा मा विलातीस आजार देऊन लुटून नागऊन कलेल तो इलाज करून आपले पारपत्य करून घेतील. यैस्या दो गोष्टीनें साहेबी मदत केलिया साहेबाचे सेवेसी पेसकसी होनु पा २००० दोन्ही हजार उसूल चौ साला हरसाला होन पा ५०० प्रमाणें देऊन. तरी येविसी कौल मरहमत जाला पाहिजे म्हणून अर्ज केला. तरी सदरहू अर्ज मनास आणून तुम्हास ये बाबें कौल मरहमत केला असे. तुमचे बाबे पा मजकुरास सुबेदार व कारकुनासी रदबदल करून खटपट कराया भले माणूस हेजीब पाठऊन त्या हातीं सांगोन पाठऊन, कीं दताजी केशवजीचे वारिसदार गंगाजी व दताजी याची पाठी तुम्ही राखता यात फायदा नाहीं. येणेंकरून मुलकास आजार पावेल. तरी यैसे न करणें. जेणेंप्रमाणें पेशजीपासून चालत आले आहेत तेणेप्रमाणें दताजी केशवजीची देसमुखी बिलाकुसूर चालवणें. मुतालिकास कैद केलें जाहे ते सोडून देणें. वस्तभाव घोडी जे घेतले असेल ते परतोन देणे. गंगाजी व दताजी वारिसदार पहिलेपासून जे खात आले आहेत ते खाऊन हालखुद राहेत ते करणे. कुसूर होव नेदणे. यैश्या दाटपटीच्या गोष्टी हेजिबाहातीं करऊन तुमचे पारपत्य होये ते करून. जरी या गोष्टी सुबेदार व कारकून नाइकेत आणि पारपत्य न करीत तरी मग तुम्ही आमचे विलायेतीस हरयेक जागा येउनु सुखे असणे; आणि दहावीस स्वार फावतील तितके करून शर्तीनसी दावादरवडा करून पा मजकूर विलायतीस आजार देवईल तैसा देऊन आपले पारपत्य होऊन ये तें करणें. सदरहू दोन्ही गोष्टीने आम्ही तुमची पाठी राखावी याबदल पेशकसी होनु पादशाही २००० दोनी हजार उसूल च्यार साला इा साल मजकूर सन सबैन पासून हरसाला होन पा ५०० पाचसेंप्रमाणें चौ वर्षांनीं होनु दोनी हजार घावें म्हणून केदारजी सुरो तुमचे मुतालिकानी कतबा लेहून दिल्हा असे. तेणेंप्रमाणें पेसकसीचा उसूल ता जाउलीचे सुबा करणें. येविसी कौल असे. छ ४ रबिलावल. तुमचे वारिसदारास असिरा नसे. ये बाबे कौल आसे. मोर्तब सूद. (मर्यादेयं विराजते) रुजु सुरुनिवीस सुरु सूद

खं. १५ ले. ११९ मु. १०७० रवल २३	(१२६४) ताकीद मु. व सी.	श. १५९१ श्रावण व. १० इ. १६६९ आगष्ट ११

खान अजब सिताब खान सरनाईकवाडी किले सातारा वगैरे— ता बाजी पटेल

मोक० मौजे निगडी किले सातारा:—मौ० मज० सदानंद मठीचे इनाम बिघे ५ आहे. इनामाचा ऐवज जराबजरा मठास पावता करणें.

फॅ. रे. सुरत भा. १०५ पृ. १३६ इ.　　(१२६५) मुंबई–सुरत　　श. १५९१ भाद्र. व. ८ इ. १६६९ सप्टें. ७

काल शिवाजीचें एक गलबत आदनहून, बहुतेक रिकामेंच ह्या बंदरांत आलें आहे. [इं. फॅ. भा. १३ पृ. २३५]

खं. १८ ले. १७ सु. १०७० रखर २५　　(१२६६) कौलनामा. नकल　　श. १५९१ भाद्र. व. १३ इ. १६६९ सप्टें. १२

अज दि. खास

बजा. कडतोजी बिन हिरोजी महाजन व शेटिया मु. पेठ मूर्तजाबाद पर० किले पुरंदर

पूर्वी शाहाजी भोसले परमुलकी एऊन पेठ जाळली. फितरती करितां प्रजा परागंदा होऊन गेलिया येत नाहीं. मुदा आहे कीं पेशजी रायाराव याचे तसविसी करितां मुलुख खराबा जाला. त्यावर आपण कौल देऊन आणिले. कर्ज घेऊन दुकाने केली तो शहाजीचे फितरीत जाली. मागती परागंदा जालो. सा वर्षांचा कौल जाल्यास येतो. यावे. कौल असे.

खं. १५ ले. १२० सु. १०७० जवल २४　　(१२६७) मिसेली मु. व सी.　　श. १५९१ आश्वीन व. ११ इ. १६६९ आक्टो. १०

आज सुभा पर वाई—ता मोक० मौजे निंब

फकीर मठ सदानंद याचे इनामतीस उचापती न करणे व इनाम दुमाला करणे.

फॅ. रे. सुरत भा. १०५ पृ. १५१ इ.　　(१२६८) मुंबई–सुरत.　　श. १५९१ कार्तीक शु. २ इ. १६६९ आक्टो. १६

शिवाजीला दंडाराजापुरी किल्ला हल्ला करून घेतां येत नाहीं. तथापि आंतील लोकांची उपासमार करण्याचा त्याचा विचार असल्यानें सिद्दी टेकीस आला. शिवाजीनें वेढा काढावा असा मोंगलाचा हुकूम तो मानीत नाहीं. तेव्हां शेवटपर्यंत टिकाव धरून, कल्याणजवळ लोदीखानाचे हाताखालीं मोंगलांचें सैन्य आहे त्याचे हवालीं किल्ला करावा असा सिद्दीनें बेत केला.

शिवाजीशीं आतां तह केला तर तो केवळ स्वार्थापायीं आम्हांला गुंतवूं पाहील. तेव्हां त्याच्याशीं बोलणें करणें आज इष्ट नाहीं. म्हणून कांहीं आजच्या फायद्यावर किंवा कांहीं पुढच्या नफ्यावर लक्ष देऊन जरूर पडेल त्याप्रमाणें वागण्याचे इरादानें, दोन तीन गलबतें येथें येऊं शकलीं आणि आपली परवानगी मिळाली तर तीं घेऊन दंडाराजपुरीपुढें जावें असें मनांत येतें. कांहीं नाहींतरी त्या ठिकाणाची माहिती मिळेल.

[से.] चौलचे पोर्तुगीज अधिकाऱ्यानें विश्वास देऊन त्याचें एक गलबत पकडलें. यामुळें सिद्दी आतां त्यांचेवर विश्वास न ठेवितां आमचे मित्रत्वाची इच्छा करीत आहे. यामुळें आपल्याला किफायत असून नकार देण्यांत भित्रेपणा दिसतो. खुद्द शिद्दीच आला तरीहि कांहीं धोका नाहीं अशी आमची समजूत आहे.

[सदर पृ. १५०] याच बाबतींत हेन्री यंगचें खाजगी पत्रः—'मुंबई बेटाची तटबंदी वगैरे पुष्कळ खर्चाचीं कामें करीत बसण्यापेक्षां कांहीं खटपटीनें दंडाराजपूर विकत मिळालें तर बरें. मग शिवाजी आणि मोंगल यांपासून भिण्याचें कांहीं कारण नाहीं.' [इं. फॅ. १३ पृ. २४३–४४]

खं. १५ ले. १२१ } (१२६९) { श. १५९१ कार्तीक शु. ३
पु. १०७० जखर १ } ताकीद मु. व सी. { इ. १६६९ आक्टो. १७

खान जजम सिताबखान सरनाइकवाडी किले सातारा व इतर ता मोक. मौजे निगडी सदानंद मठाचे मौ. निगडी येथील इनामास तोसीस न देणें.

इं. फॅ. १३ } (१२७०) { श. १५९१ कार्तीक व. ४
पृ. २४४–४५ इ. } सुरत–मुंबई { इ. १६६९ नोवें. १

दंडाराजपूरचा सिद्दी किल्ला मोंगलांचे ताब्यांत देणार असेल तर त्यापासून कंपनीचा कांहींच फायदा नाहीं. उलट त्याचे लोक मुंबईस येण्यानें आमचा प्रबळ आणि निधड्या छातीचा शेजारी शिवाजी आमच्यावर चिडून जाईल. तेव्हां जर सिद्दी किल्ला कंपनीला देत असेल तर तसें तुमच्याकडून कळल्यावर त्याला आश्रय देण्याचे बाबतींत कांहीं ठरवूं. तत्पूर्वी कांहींच वचन न देतां त्याला झुलवीत ठेवावा.

इं. फॅ. १३ } (१२७१) { श. १५९१ कार्तीक व. ८
पृ. २४५ इ. } मुंबई–सुरत { इ. १६६९ नोवें. ६

शिवाजी राजानें पोर्तुगीजांचीं कांहीं गलबतें धरून ठेविलीं. त्यांनींहि त्याचें इराणाहून आलेलें एक गलबत पकडलें. येथून जवळच पेण येथें शिवाजीचा पेशवा आला असून शिवाजी तेथेंच आसपास आहे. शिद्दी अजूनहि अडचणींत आहे.

फॅ. रे. सुरत भा. १०५ } (१२७२) { श. १५९१ कार्तीक व. १३
पृ. १८१ इ. } मुंबई कन्सल्टेशन { इ. १६६९ नोवें. ११

'कल्याणचा दिवाण आणि शिवाजी आपलीं गलबतें येथें भरण्याकरितां आमच्या ताब्यांत देणार आहेत. हें आपल्या कंपनी आणि हें बेट यांना भूषणास्पद आहे. पोर्तुगीज व अरब लोक यांपासून त्यांचें रक्षण व्हावें म्हणून प्रत्येक गलबतावर दोनतीन इंग्रज ठेवावे अशी मात्र त्यांची मागणी आहे. ती पुरवावी काय? डच, फ्रेंच,

जर्मन, व इंग्रज यांपैकीं कोणींहि चालतील अशी वस्तुस्थिती असल्यामुळें दोन तीन इंग्रज आणि बाकीचे इतर राष्ट्रांचे लोक घ्यावे असें ठरलें.

खं. १५ ले. १२२ } (१२७३) { श. १५९१ कार्तिक व. १४
सु. १०७० जखर २७ } मिसेली फा. मु. मज. व सी { इ. १६६९ नोवें. १२

अज दि. पर. वाई—ता मोक. मौजे निंब व गोवे

जमादिलाखरचे खुर्दखत आले आहे. कमलनयन गोसावी यांचे वरील गावचे इनामास चौथाईची तोसीस न देणे. माफ आहे.

स. पृ. ७६ ले. ५२ } (१२७४) { श. १५९१ कार्तिक व. ३०
सु. १२ हि. १०८० जखर २८ } फर्मान { इ. १६६९ नोवें. १३

मोंगल बादशाह मुत्सद्दी व कार. पा शेवगाव

पर. शेवगाव मौ. काटे खामगांव येथील एकंदर ५ चाहूर जमीन अबदुलनबी, व आताउल्लाचे वंशज यांकडे काजीपणा वगैरेबद्दल पूर्वीपासून चालत आल्याप्रमाणें चालवीत जाणें.

(दि.) ओ. कॉ. ३३७३ } (१२७५) { श. १५९१ मार्ग. शु. १४
इ. } सुरत—ई. इं. कंपनी. { इ. १६६९ नोवें. २६

राजकर्त्या मुसलमानांकडून त्यांच्या **धर्मवेडा**मुळें बनिया व्यापारी वर्गावर **असह्य जुलूम** होत असतो. आपलीं मंदिरें भ्रष्ट होऊं नयेत किंवा व्यक्तिशः स्वतःला मुसलमानी द्वेषामुळें जाच होऊं नये म्हणून बनिये लोक अपार लांच भरतात. त्याची गोडी लागल्यानें काजी व इतर अमलदार हे लोभामुळें इतक्या वारंवार आणि क्रूरपणानें हिंदूंचा छळ करितात, कीं त्या दुःखभारानें वांकून ह्या प्रांतांतून **पळून जाण्याचा** हिंदूंनीं निश्चय केला. एका इसमानें ५ वर्षांपूर्वी काजीनें खाललेल्या टरबुजाचा एक भाग खाल्ला या सबबीवर त्याला जबरीनें मुसलमान करण्यांत आल्यामुळें त्यानें जीव दिला. यानें बनिया समाजांत खळबळ उडून हा देश सोडून जाण्यापूर्वी त्यांतील पुढाऱ्यांनीं आमच्याकडे येऊन मुंबईत जागा मागितली. आम्हीं त्यांना अहमदाबादेस जाऊन बादशहाकडे गाऱ्हाणें करण्यास सांगितल्यामुळें गेल्या २३।२४ सप्टेंबरला येथून सुमारें **८००० लोक** आपलीं बायकामुलें सुरतेत ठेवून **निघून गेले**. काजीच्या संतापाला न जुमानतां सुभेदारानें त्यांना जाऊं दिलें......बरेच लोक बाहेर गेल्यामुळें सुरतेंत दुकानदारांचा हरताळ पडला आणि लोकांचे हाल झाले. व्यापारी निघून गेल्यापासून येथील व्यापाराला मंदी आहे. या प्रकारानें **सुरतेचा नाश होईल** असें लोक बोलतात.

खं. २० ले. १२८ } (१२७६) { श. १५९१ मार्ग. शु. १४
सु. १०७० रजब १२ } मिसेली– फा. मु. मज. सी. { इ. १६६९ नोवें. २६

अज दि. पर.वाई—मोक. मौजे पसर्णी, एकसर, ओझरडे पर. वाई

जुनारदार (चित्राव) यास १ चावर ३२ बिघे जमीन पूर्वीपासून चालत आहे. तरी आतांहि चालविणें.

खं. २० ले. ५५,५६ } (१२७७) { श. १५९१ मार्ग. व. ९
सु. १०७० रजब २२ } उल्लेख. { इ. १६६९ डिसें. ६

(रकमालपैकी) रा. मोरो त्रिमल प्रधान यांचे खुर्दखत आहे कीं, मौजे माढकी पा। शिरवळ येथें पेठ संभापूर करून वसाहत करण्यास जागा दिल्ही.

(दि) ओ. कॉ. ३३८५ } (१२७८) { श. १५९१ पौष शु. ११
इ. } सुरत–ई. इं. कंपनी { इ. १६६९ डिसें. २३

पुष्कळ दिवस **मुसलमानांच्या धर्मच्छलापासून** रक्षण करण्याच्या विवंचनेंत हिंदू समाज असतांना गेल्या २५ सेप्टेंबरला हिंदू कुटुंबांचे पुढारी आपलीं मुलें-माणसें सुरतेंत ठेवून **भडोचला निघून** गेले; व तेथून त्यांनीं बादशहाकडे गार्‍हाणें मांडलें आहे. त्यांच्या निघून जाण्यानें सर्वत्र मंदी झाली असून आपसांतल्या दुहीमुळें होणारे सर्व दुष्परिणाम झाले आहेत. त्यांतच **अरबी** आणि **पोर्तुगीज** शत्रूंकडून व्यापार्‍यांचीं मोठमोठीं गलबतें पकडलीं गेल्यामुळें आणि बसर्‍याला शांतताभंग झाल्यामुळें व्यापार्‍यांना कल्पनेच्या बाहेर ठोकर बसली आहे. शहर बहुतेक ओसाड झालें आहे. सदर गार्‍हाणें सांगण्याकरितां निघालेले व्यापारी ता. २० डिसेंबर रोजीं समाधानकारक उत्तर मिळाल्यामुळें परत सुरतेंत आले व सर्वांनाच समाधान वाटलें. [इं. फॅ. भा. १३ पृ. २०५]

मि. डेलन } (१२७९) { श. १५९१ पौष. व. १०
पृ. ५५–५७ इ. } उल्लेख { इ. १६७० जाने. ६

मी राजापूर बंदरांत आलों. येथें **इंग्रजांची** एक वखार होती. पण तेथून मराठ्यांनीं त्यांना काढून लाविलें आहे. अलीकडे थोड्या वर्षांपासून येथील उन्हाळ्यापाशीं **फ्रेंचांनीं वखार** स्थापिली आहे.

शिवाजी मोठा प्रबळ राजा असून, सामर्थ्यवान् अशा अनेक शत्रूंना न जुमानतां त्यानें सर्व कारभार इतक्या धोरणानें चालविला आहे कीं, **पोर्तुगीजांचीं** कांहीं थोडीं बंदरें सोडलीं तर **सुरत ते गोवा** ह्यांचे दरम्यानच्या सर्व मुलखांत त्यानें आपलें बस्तान कायमचें बसविलें आहे. सुरत, गोवा येथील लोकांना त्याची अतिशय भीती

वाटते. परंतु युरोपियनांशीं वागतांना तो जरा जपून वागतो असें दिसून आलें आहे. त्याच्या पाठीशीं असलेल्या राज्यकर्त्याकडून आपल्याला जाब विचारला जाईल अशी भीती वाटत असल्यामुळें कदाचित् तो पाश्चात्यांना अनुकूलता दाखवीत असावा. नाहींतर इतर हिंदी लोकांच्या प्रमाणेंच त्याच्याहि वखारी लुटण्यास त्याला कठीण गेलें नसतें.... त्याचे सर्व किल्ले डोंगरावर बांधलेले आहेत. त्याची प्रजा त्याचे सारखीच मूर्तिपूजक असली तथापि **तो सर्व धर्मांना नांदूं देतो.** ह्या भागातील **अत्यंत धोरणी व राजकारणी पुरुष म्हणून** त्याची ख्याती आहे.

खं. १५ ले. १२३ } (१२८०) { श. १५९१ माघ शु. १
शु. १०७० साबान २९ } { इ. १६७० जाने. १२

खान अजम सिताबखान सरनाईकवाडी किल्ले सातारा वगैरे

ता। बालाजी अनंत हुदे. व मोक. मौजे इडमिडे

मौ. इडमिडे येथें सदानंद मठाचे ३० बिघे इनाम आहे. ते पूर्वींप्रमाणें मठाकडे चालविणें.

इं. फॅ. १३ } (१२८१) { श. १५९१ माघ शु. १३
पृ. २५६–७ इ. } मुंबई, गॅरी—लॉर्ड आर्लिंगटन { इ. १६७० जाने. २३

औरंगशहानें धर्मसुधारणेच्या अंध उत्साहानें अनेक **हिंदू देवालयांचा विध्वंस केला** आणि पुष्कळांना मुसलमान होणें भाग पाडलें असून **शिवाजीनें** त्याच्याशीं पुनः युद्ध सुरू केलें आहे. (The archrebel Sevagee is again engaged in arms against Orangsha, who out of a blind zeal for reformation hath demolished many of the Gentues temples and forceth many to turne Musselmins.) **औरंग०**नें शिवाजीचे पुष्कळ किल्ले घेतले असून तो त्याला जेर करीत आहे. **शिवाजीहि** आपल्या बाजूनें कमी तयारी करीत नसून **दख्खन** हेंच **रणक्षेत्र** होईल असा संभव आहे.

लं. रा. ए. फारसी. } (१२८२) { श. १५९१ माघ शु. १४
रिया. पृ. ३३५ } खान दि. अश्रफखान—**औरंगजेब** { इ. १६७० जाने. २४

शिवाजीची फौज **वऱ्हाड प्रांत लुटीत** आहे. बादशाही प्रांतांतून २० लाख रकम त्यानें गोळा केली. औसा येथील किल्लेदार बरखुरदारखान याजकडून लिहून आलें कीं 'शिवाजीची २० हजार फौज या प्रांतांत आली आहे; मराठे सर्व प्रांत लुटून वहूल घेत आहेत. किल्यापासून दोन कोसांवर त्यांचा मुक्काम आहे. मी किल्ल्याची डागडुजी चालविली आहे. माझी सर्व जहागीर शिवाजीनें लुटली. मला निर्वाहालासुद्धां

कांहीं साधन नाहीं. बादशहांनीं पैशाची मदत करावी. यावर बादशहा बोलला कीं, 'असे पुष्कळ लोक मराठ्यांनीं लुटले म्हणून पैसे मागत येतील. आम्ही कितीकांना असें नुकसान भरून द्यावें ?'

लं. रा. ए. फारसी. रिया. पृ. ३३५ | (१२८३) सुरत-औरंगजेब. | श. १५९१ माघ व. २ इ. १६७० जाने. २७

[शिवाजीनें सुरतेहून किती रक्कम नेली तें तपास करून कळवावें असें औरंगजेबानें विचारलें होतें त्याचें उत्तर लिहिण्यांत आलें त्यांतील मजकूर.]

शिवाजीनें सुरतेंतील ५३ लक्षांचा व जवळच्या एका खेड्यांतून १३ लक्षांचा मिळून एकंदर ६६ लक्षांचा ऐवज लुटून नेला.

लं. रा. ए. फारसी रिया. पृ. ३३६ | (१२८४) | श. १५९१ माघ व. ६ इ. १६७० फेब्रु. १

शेख सुलेमान यानें औरंगजेबापुढें असें सांगितलें कीं, 'थोडीशी मदत मिळाल्यास **फिरंगी लोक आरमार** तयार करून **शिवाजीचा समाचार** घेण्यास तयार आहेत असें रेमंड नांवाचा फिरंगी व्यापारी म्हणतो.' यावर या मनुष्याची लायकी काय आहे तें सुरतेस लिहून विचारा असा बादशहानें हुकूम केला.

सा. ले. ३५८ सु. १०७० सवाल १० | (१२८५) कौलनामा फा. मु. व सी. | श. १५९१ फाल्गुन शु.१२ इ. १६७० फेब्रु. २१

ठाणदार व कारकून कसबे पेठ अथणी ता। माहानाड का पेठ मजकूर.

पेठेमध्यें गास्ति आलंग राखत नाहीं म्हणून दरोडा पडतो. तुम्ही बेशक उदीम करणे. दिवाणचे लोकाकडून गस्ती घालवूं.

फॅ. रे. सुरत भा. ३ पृ. १५२ इ. | (१२८६) सुरत-मुंबई | श. १५९१ फाल्गुन व. ९ इ. १६७० मार्च ५

शिवाजीचें मोंगलांशीं युद्ध चालू झाल्यामुळें शिवाजीशीं कंपनीच्या नुकसानभरपाईबद्दल प्रेसिडेंटचें बोलणें चालू होतें तें थोडेसें थांबलें. तुमच्याकडे कांहीं अनुसंधान आल्यास कळवावें. परंतु फार उत्सुकता दाखवूं नये. नाहींतर आमचा आब जाऊन तो दिरंगाई करूं लागेल.

सा. १८ ले. ५७ सु. १०७० | (१२८७) उल्लेख | श. १५९१ इ. १६६९-७०

यांत कडतोजी बिन हिरोजी यास दिलेल्या कौलाचा (सु. १०७०) उल्लेख आहे.

स. पृ. २८ ले. २५ }
मु. १०७० }

(१२८८)
फर्मान

{ श. १५९१
{ इ. १६६९-७०

फर्मान हुमा. बजा. मामलेदार व देसाई मामले बंकापूर.

नबाब हुमायून यांचे वेळी पेठ शहापूर मामले बंकापूर येथील देऊळ मोडून मशीद केली व तेथील खिजमत अबदुल मजीद यास दिली होती. ती त्याकडे चालविणें.

मि. डेलन, पृ. ३७ }
इ. }

(१२८९)
उल्लेख

{ श. १५९१
{ इ. १६६९

सुरतेला पूर्वी तट नव्हता. शिवाजीच्या भीतीमुळें **सुरतेला** पक्का **तट** बांधून नेहमीं पहारा करीत राहणें भाग पडलें आहे.

ऑर्म. भा. १७४ }
पृ. ३५ इ. }

(१२९०)
ऑर्मची नोंद !

{ श. १५९१
{ इ. १६६९

शिवाजीचे लोक लूट करीत **सुरतेच्या तटाशीं** आले आहेत. सुभेदार कर वसूल करीत आहे. तथापि संरक्षणाला पाहिजे त्याच्या अर्ध्यानेंहि त्याचे जवळ फौज नाहीं. **मुरादबेग** मेच्या आरंभाला चाल करून आला. त्यानें कारभार आपल्या हातांत घेऊन, एका महिन्याच्या आंत शिवाजीच्या लुटारूंना झोडपून लावून, सुरतेंत त्यांच्या लोकांच्या गाड्या भरून आणून त्यांना पुरलें ! !

फॅ. रे. सुरत भा. ३ }
पृ. ५३ इ. }

(१२९१)
सुरत कन्सल्टेशन

{ श. १५९२ चैत्र शु. १
{ इ. १६७० मार्च १२

शिवाजीनें अलीकडे [मोंगलांवर] **अनेक जय मिळवून मुलूख जिंकल्यामुळें** सुरतेपासून ६० मैलांपर्यंतच्या टापूंत तो आल्याची बातमी आली; तेव्हां सर्वत्र भीतीनें पळापळी, बंदोबस्त इत्यादि नानाप्रकार **सुरतेमध्यें** दिसले.

फॅ. रे. मुंबई भा. ६ }
पृ. ५, ७ इ. }

(१२९२)
मुंबई-सुरत.

{ श. १५९२ चैत्र शु. १०
{ इ. १६७० मार्च २१

तोफांचे गाडे करण्यासाठीं व [गलबतांकरितां] लागणारें लांकूड आतां **शिवाजी**च्या **ताब्यांत असलेल्या कल्याण-भिंवडी**कडून आपल्याला मिळविलें पाहिजे.

शिवाजी वर देशांत गेला आहे. **माहुलीला** त्याचे सैन्याची पिछेहाट झाली. त्यांत सुमारें १००० लोक पडले. त्याच्या लोकांनीं आमचेपासून जवळच दिसणाऱ्या **कर्नाळा** नांवाच्या डोंगरी किल्ल्याला वेढा घातला आहे. आपल्या समोरून **रक्षणाकरितां** फळ्या आणि चिखल यांच्या **भिंती** बांधीत बांधीत ते तटांशीं जाऊन भिडले आहेत. ह्या फळ्या ते लोक आपल्यासमोर धरतात. थोड्या अवकाशांतच ते हा किल्ला घेतील.

फॅ. रे. मुंबई भा. ६ पृ. ८ इ. | (१२९३) मुंबई-सुरत. | श. १५९२ चैत्र व. ३ इ. १६७० मार्च २९

शिवाजी कोणाचाहि विरोध न होतां **एकसारखा जिंकीत चालला आहे.** त्यानें **मोंगलांपासून पुरंधर** किल्ला घेतल्याची आज बातमी आली. **कर्नाळा** देखील फार दिवस टिकाव धरणार नाहीं. दोन दिवसांपूर्वी शिवाजीच्या कल्याणच्या सुभेदाराकडून दोन हस्तक आमच्याकडून तोफा खरीदण्यासाठीं आले. 'थोडया दिवसांपूर्वी आलेल्या लोकांना अधिक तोफा देत असतां त्या त्यांनीं घेतल्या नाहींत. आतां त्या आम्हीं सुरतेला पाठविल्या. इंग्लंडमधून येणाऱ्या गलबतांतून आल्या तर देऊं' इत्यादि **सलोख्याचीं उत्तरें** आम्हीं त्यांना दिलीं. कल्याणहून इमारती लाकूड आणि शिवाजीनें **पुनः जिंकून घेतलेल्या** मुलखांतून सर्पण यांची आम्हांला जरूर असल्यामुळें असेंच गोडीचें पत्र आम्हीं कल्याणच्या सुभेदाराला लिहिलें. शिवाजी सुरतेकडे गेला नसून आपले डोंगरी किल्ले परत मिळविण्यांत गुंतला आहे असें वाटतें. तथापि तो त्वरेनें हालचाली करीत असल्यामुळें बेसावध राहतां कामा नये !

फॅ. रे. मुंबई भा. ६ पृ. ११ इ. | (१२९४) मुंबई-इराण. | श. १५९२ चैत्र व. ४ इ. १६७० मार्च ३०

शिवाजी पुनः आमचा शेजारी झाला असून त्यानें आमच्या समोरील किनाऱ्यावरचे बरेच किल्ले **मोगलांकडून** परत मिळविले आहेत. औरंगाबादेच्या **शहाजाद्यानें** (मुअज्झम) त्याला (मोंगली मुलखांत) बोलावून आणिलें व तो त्याला खजीना पुरवतो अशी बऱ्याच जणांची समजूत आहे. **सुरतेच्या लोकांना** भीती वाटून, डच, फ्रेंच व इंग्रज यांनींहि जरी शिपाई ठेवून खबरदारी घेतली आहे तथापि **शिवाजी** स्वराज्यापासून इतका लांब न जातां, त्याच्यावर मोगलांचें एकादें सैन्य चालून येईपर्यंतचा मधला वेळ आपले गेलेले किल्ले शक्य तितके परत मिळविण्यांत तो घालविणार असें वाटतें. आणि मोंगली सैन्य आतां पावसाळा संपेपर्यंत येणार नाहीं. शिवाजीच्या हालचालीमुळें शेजारच्या मुलखांत अंदाधुंदी चालली असून जमीनीवरील आमचा व्यापार बंदच पडला आहे. सराफ आणि व्यापारी लोक यांनीं आपली संपत्ती लपवून ठेविल्यामुळें कर्ज मुळींच मिळत नाहीं.

ओ. कॉ. भा. ३१ नं. ३४१५ इ. | (१२९५) सुरत-कंपनी. | श. १५९२ चैत्र व. ४ इ. १६७० मार्च ३०

शहाजादा **मुअज्झम** शिवाजीला उत्तेजन देत असून, **औरंग**ने आपल्या धाकट्या भावाला गादीचा वारस ठरविल्याकारणानें त्याच्या विरुद्ध **बंड** करून **शिवाजीला** तो मिळणार आहे. शिवाजीच्या हालचाली पाहून या मताला दुजोरा मिळतो.

कारण, आतां तो पूर्वीप्रमाणें चोरासारखा वागत नाहीं. तर राजरोसपणें ३० हजार सैन्यानिशीं जाईल तेथें जिंकण्याचा त्याचा क्रम चालू असून शहाजादा मुअज्जम जवळ असतांनाहि त्याला विरोध करीत नाहीं ! शिवाजीनें मुंबई शेजारचीं कल्याण आणि भिवंडी हीं घेतलीं आहेत. तीं त्याच्याकडेच रहातलि तर बरीं. कारण, मुसलमानांच्या शेजारापेक्षां शिवाजीचा शेजार अधिक बरा वाटतो. शिवाजीकडून जेराल्ड आँजीअरकडे मित्रत्वाचे ६ संदेश आले होते. आणि हें युद्ध उपस्थित झालें नसतें तर त्यानें चांगली भरपाई केली असती. शिवाजीच्या ह्या युद्धामुळें सुरतेला मालाचे दर उतरले असून हातीं पैसा नसल्यामुळें आणि त्याच्या भीतीनें पोंवळ्याची विक्री न झाल्यामुळें व्यापारांत मोठी खोट येऊन त्रास वाढला आहे.

फॅ. रे. सुरत भा. ३ पृ. ५५ इ. | (१२९६) सुरत कन्सल्टेशन | श. १५९२ चैत्र व. ५ इ. १६७० मार्च ३१

सर्व राज्यांत अतोनात त्रास उत्पन्न झाला असून रस्ते व घाट बंद झाले आहेत. चोर वा दरोडेखोर आणि देशचे राजे शिवाजीचे नांवाखालीं वाटेल तशी लूट करितात.

फॅ. रे. मुंबई भा. १९ पृ. ४,५,६ इ. | (१२९७) सुरत-मुंबई | श. १५९२ चैत्र व. ७ इ. १६७० एप्रील २

शिवाजी औरंगाबादेकडे गेला असें म्हणतात. परंतु त्याच्या हालचाली विलक्षण असल्यामुळें आमच्या रक्षणाकरितां मागविलेले शिपाई पाठवावेच.

लं. रा. ए. फारसी रिया. पृ. ३३६ | (१२९८) बातमीपत्र | श. १५९२ चैत्र व. १२ इ. १६७० एप्रील ७

शिवाजीनें चांदवड लुटलें; आणि तळकोकणचा फौजदार लुधीखान याचा पराभव केला; ही बातमी ऐकून नांदेडचा फौजदार फत्तेजंगखान पळून गेला. बादशहानें हुकूम केला कीं त्या फौजदाराचा 'जंग' हा किताब काढून टाका.

फॅ. रे. सुरत भा. ३ पृ. ५७ इ. | (१२९९) सुरत-कन्सल्टेशन. | श. १५९२ चैत्र व. १४ इ. १६७० एप्रील ८

आग्रा येथें बादशहाचा हिंदूंवर चांगला जय झाल्यामुळें आणि सुरतेंत वाटणारी शिवाजीबद्दलची भीती कमी झाल्यामुळें पोवळ्याची मागणी आली.

लं. रा. ए. फारसी रिया. पृ. ३३६ | (१३००) बातमीपत्र. | श. १५९२ चैत्र व. १४ इ. १६७० एप्रील ८

पूर्वी अफझलखानाच्या नोकरींत असलेला शिद्दी हिलाल हल्लीं बादशहाच्या

(= औरंगजेबाच्यो) नोकरींत आहे. तपासाअंतीं असें कळतें कीं, हा गृहस्थ येथील दरबाराची कची इकीगत शिवाजीस कळवितो.

ळं. रा. ए. फारसी रिया. पृ. ३३६	(१३०१) बातमीपत्र.	श. १५९२ वैशा. शु. ३ इ. १६७० एप्रील १२

पर्वतराव यानें तयार केलेला **शिवाजीच्या राज्याचा नकाशा** बादशहास दाखविण्यांत आला.

फॅ. रे. मुंबई भा. ६ पृ. १४,१५ इ.	(१३०२) मुंबई–सुरत	श. १५९२ वैशाख शु. १ इ. १६७० एप्रील १३

वसईच्या किल्लेदाराला १०१ खंडी आणि शिवाजीच्या कल्याण व आसपासचा मुलूख यांच्या सुभेदाराला तितकाच काथ्या देऊन स्नेह राखणें भाग पडलें. कारंजा, ट्रॉम्ब, आणि चौल येथील किल्लेदार आणि माहीम बंदरांत येणारीं गलबतें यांना दोरखंडांकरितां मिळून पुष्कळ काथ्या द्यावा लागला,

शिवाजीचा मीठाच्या गलबतांचा तांडा ह्या बंदरांत आला आहे, त्याच्या रक्षणाकरितां २५० टनांचें जहाज आणि कांहीं मचवे बरोबर आहेत. डेप्युटी गव्हर्नरनें पूर्वी एकदां त्यांना सवलतीनें वागवून खुद्द शिवाजीच्या मालकीचीं गलबतें होतीं त्यांचेवर आणि रक्षणाकरितां आलेल्या जहाजांवर **बंदरी कर घेतला नव्हता** आणि आजपर्यंत ते कारंजाहून मीठ आणीत त्या ऐवजीं ट्रॉम्बेहून मीठ नेण्याबद्दल त्यानें त्यास सांगितलें होतें; त्यामुळें शिवाजीच्या आरमारी सेनापतीनें या खेपेला ट्रॉम्बेहून मीठ नेण्याचें ठरविलें. ४०० खंडी मीठ पूर्वी १०० रुपयाला विकलें तेंच आतां ४६ रु. ला दिलें.

रु. ३ ले. १६ सु. १०७० जिल्हेज २	(१३०३)	श. १५९२ वैशाख शु. इ. १६७० एप्रील १३

त्रिंबक भास्कर सुभेदार नामजाद किले पुरंधर प्रति राजश्री **शिवाजीराजे** याचा दंडवत. किले मजकुरास तासकरी सखभट बिन बाबूभट व विश्वनाथ भट बिन माहादेव भट पाठविले आहेती. यास किलेयावरी घेउनु यापासुनु तासाचे काम घेत जाणे. तूर्त किला तास नाहीं. चालवतील तरी चालऊत न चालवितील तरी न चालउत. तासासी गरज नाहीं, हाजीर असोत वा नसोत धर्मार्थच देत जाणे. दरमाहे दाभोळी लारी ३० रास ईा छ १ जिल्हेजापासुनु ऐसी प्रमाणें वजावाट करून किलाचे रवेसीबाबद देत जाणे. तालीक घेऊनु असली तासकरी यास देणे. छ २ जिल्हेज, मोर्तबसूद (वाटोळा शिका). सुरु सूद.

फॅ. रे. मुंबई, भा. १९ } (१३०४) { श. १५९२ वैशाख शु. ५
पृ. ७,९ इ. } सुरत-मुंबई { इ. १६७० एप्रील १४

शिवाजी सुरतेपासून ४० मैलांच्या अलीकडे आल्याची खबर नसताहि **त्याच्या नांवानेंच** पुष्कळ लोक घाबरून जातात. शिवाजीचा **इंग्रजांवर** विशेष **डोळा नाहीं.** तथापि त्याच्या येण्यानें मुलूख उध्वस्त होऊन व्यापार बसेल. कल्याणच्या सुभेदाराशीं **आतां** चांगलें वागून पुनः मुसलमानांचा ताबा झाल्यास **व्यापारी या नात्यानें** त्याच्याशींहि बरें वागण्यास आमची हरकत नाहीं.

फॅ. रे. मुंबई, भा. ६ } (१३०५) { श. १५९२ वैशाख शु. ५
पृ. १३ इ. } मॅथ्यू ग्रे-सार्जंट अॅंडरटन { इ. १६७० एप्रील १४

शिवाजीची हद्द शेजारीं असल्यामुळें आम्हांला फार जपावें लागतें. आमच्या पुष्कळशा वस्तु त्याच्या मुलखांतून येतात, त्याकरितां त्याच्या अमलदाराशीं आम्हीं सलोख्यानें वागत असलों तरी त्यांच्यावर भरंवसा ठेवतां येणार नाहीं. करितां आपले सशस्त्र लोक मुंबई बेटांत येणार आहेत तसे पाठवूं नयेत. कोणत्याहि तऱ्हेनें अचानक हल्ला कोणालाच करतां येऊं नये याकरितां ही खबरदारी घेतली पाहिजे.

फॅ. रे. मुंबई, भा. ६ { (१३०६) { श. १५९२ वैशाख शु. १२
पृ. १८, १९ इ. { मुंबई-सुरत { इ. १६७० एप्रील २१

शिवाजी सुरतेपासून १०० मैलांच्या आंत नसला तरी सुरतेकडे तो येईल हें नक्की समजून बंदोबस्त करणें जरूर आहे. **कल्याणचे लाकडाचे व्यापारी** मुसलमान असून ते **ठाणें** आदिकरून पोर्तुगीज मुलखांत पळून गेल्यामुळें लांकूड खरेदी करतां येत नाहीं. त्या बाजूचे परिस्थितींत एकदम बदल होण्याचा संभव आहे. कारण **जुन्नरला टेकडीवर मोंगलांचें मोठें सैन्य** जमा झालें असून थोड्याच दिवसांत कल्याणभिवंडी इत्यादि कोंकणांतील **शिवाजीच्या मुलखावर स्वारी** होईल. थोडे दिवस वाट पाहून तरी खरेदी करणें अवश्य आहे. पण हा [लांकूड] माल **ठाण्यांतून** आणावयाचा तर **वसईचा** (पोर्तु०) कॅप्टनची परवानगी घेतल्याशिवाय किंवा ठाण्याला भरमसाट दस्तुरी दिल्याशिवाय आणतां येणार नाहीं.

मोंगलांचें सैन्य या बाजूला **कल्याण**कडे आल्यामुळें आणि **शिवाजीचें** सैन्य सांगतात तितकें मोठें नसल्यामुळें, शिवाजीला **माघार** घेणें भाग आहे.

फॅ. रे. सुरत } (१३०७) { श. १५९२ वैशाख शु. १५
भा. ३ पृ ६३ इ. } सुरत कन्सल्टेशन { इ. १६७० एप्रील २५

बादशाही सैन्य शिवाजीवर चालून गेलें. आणि **सुरतेच्या** बंदोबस्ताकरितां

बहादुरखान ५००० सैन्यानिशीं आला; यामुळें **शिवाजीच्या आगमनाची भीति संपली**. तेव्हां मुंबईहून आलेलें सैन्य परत पाठवावें.

फॅ. रे. मुंबई, भा. १९ } (१३०८) { श. १५९२ वैशाख व. ९
पृ. १४, १६ इ. } सुरत-मुंबई { इ. १६७० मे ३

शिवाजी कल्याण भिंवडीचा मालक बनला तर परिस्थिति बरीच बदलून जाईल. .... अहमदाबादचा सुभेदार **बहादुरखान** ५००० फौज घेऊन आला आहे. त्यांतील बरेंच मोठें सैन्य **माहुलीला** कुमक करण्यास जात असून पुढें इतर मोंगली सैन्याला मिळून मग तें **शिवाजीच्या** मुलखावर स्वारी करील. बहादुरखान खासा सुरतेलाच कांहीं दिवस रहाणार आहे.

लं. रा. ए. फारसी } (१३०९) { श. १५९२ वैशाख व. १४
रिया. पृ. ३३६ } बातमीपत्र { इ. १६७० मे ८

अहमदनगर, जुन्नर आणि परिंडा या महालांतील ५१ गांवें **शिवाजीनें** लुटलीं. बादशहानें ही गोष्ट ऐकून घेतली; कांहीं बोलला नाहीं.

फॅ. रे. मुंबई } (१३१०) { श. १५९२ ज्येष्ठ शु. ३
भा. ६ पृ. २३ इ. } मुंबई-सुरत { इ. १६७० मे १२

वसईला पुष्कळ गलबतें बांधण्याचें काम चालू असल्यामुळें तेथें लांकूड फार महाग असून मिळत नाहीं. **कल्याण**कडे चौकशी करावी तर तेथें स्थिरस्थावर झाली नाहीं. **कल्याणचा काजी** तिकडे जाण्याकरितां निघाला त्याला १५ दिवस झाले. परंतु **मोगली सैन्य** जुन्नरहून खालीं आलें नाहीं यामुळें अद्यापि तो बेटावरच आहे.

आपण व्यवस्था केल्याप्रमाणें **बिलिआपट्टण** आणि **कालिकत**हून उत्तम आणि स्वस्त लांकूड पैदा झालें तर आम्हांला आमच्या मिजासखोर शेजाऱ्यांवर विसंबून राहण्याचें कारण पडणार नाहीं. परस्परांच्या सैन्यबळाप्रमाणें **कल्याणभिंवडी** कधीं मोंगलांच्या तर कधीं शिवाजीच्या हातीं जाऊन त्याची **ओढाताण** चालू असल्यामुळें तेथील व्यापाराला स्थिरता येत नाहीं. यामुळें **ठाण्याच्या पासावर** आम्हीं आणूं त्या लांकडाशिवाय इतर जिन्नसांवरील जकात भरण्याचें कारण पडणार नाहीं. **जकात-दाराची मुदत** भरावयास अजून दीड वर्ष अवकाश आहे.

खं. २० ले. २४६ } (१३११) { श. १५९२ ज्येष्ठ व. २
सु. १०७१ मोहर १६ } खुर्दखत म. मु. व सी. { इ. १६७० मे २६

निलो सोनदेऊ—गंगाजी मुद्गल हवाल० व कार० पर० सुपे

पर० सुपे यांत माहादजी गोसाव्याचा जो इनाम आहे तो पूर्वीप्रमाणें चालविणें. साजी आम्हास सुपे मोकासा होता. (मुद्रा–श्री सताप। ति चरण परा। यण नलिकंठ। सानोजी मा। रायण)

खं. २० ले. २६७ }
सु. १०७१ }
(१३१२)
कतवा
{ श. १५९२ ज्येष्ठ
{ इ. १६७० मे, जून

अज. दि. ठाणे पर. मंगलवेढे

राया बिन महाल नाईक मेटकरी पर. मज.

शिवाजीचे धुंदलीखाले मार्ग खोळंबला. पंढरपूर, तुळजापूर व बाजे देवस्थानें उठोन गेली. याकरितां मेटाची हासील बुजून गेला. खोती करवत नाहीं. ३० होन इजारती देऊ.

फॅ. रे. मुंबई, }
मा. ६ पृ. २७ इ. }
(१३१३)
मुंबई–सुरत
{ श. १५९२ आषाढ शु. ४
{ इ. १६७० जून ११

शिवाजी मोंगली फौजेप्रमाणें आळशी रहात नाहीं. कारण तो, सूर्य प्रकाशत असतांनाच गवत वाळवतो असें नसून, (संधी साधणें अशा अर्थाची इंग्रजी म्हण) झोड पावसानें सूर्य आच्छादून गेला असतांहि त्याचें काम चालतें! (पावसांत देखील त्याचा उद्योग थांबत नाहीं). मोंगली फौज पावसाळ्याकरितां टेकडीच्या आश्रयाला निघून गेल्यानंतरसुद्धां **शिवाजीच्या हालचाली** चालूच आहेत. त्याच्या लोकांनीं **लोहगड** आणि **कोज** हे किल्ले परत मिळवून आठ दिवसांच्या आंत **कुर्डूगड** (Kerridrew? कुवारीदुर्ग?) घेऊन नुकताच **माहुलीवर** पुनः हल्ला केला. तेथें किल्याच्या तटावरून दगडांच्या माऱ्याखालीं त्याचे दोनशें लोक सांपडले. फिरून एकदां तो आपल्या लोकांकडून **माहुलीवर** हल्ला चढवील आणि नंतर त्यांना विश्रांति देईल. **भिवंडी**ला आणि **माहुली**च्या पायथ्याशीं दुसरा हल्ला करण्यासाठीं मिळून त्यानें पांच हजार सैन्य जय्यत ठेविलें आहे.

फॅ. रे. मुंबई }
मा. ६ पृ. २८ इ. }
(१३१४)
मुंबई–सुरत
{ श. १५९२ आषाढ व. ६
{ इ. १६७० जून २८

२५ जूनला आलेली बातमी:–**शिवाजीनें** मोंगलांच्या हातून **माहुली** किल्ला घेतला. **कर्नाळ्या**शिवाय इतर डोंगरी किल्ले देखील त्याच्या ताब्यांत आले. माहुलीची बातमी कळतांच कर्नाळाहि त्याचे हातीं दिला जाईल. याच वेळीं **दंडाराजपुरीकडे** शिवाजीचें कांहीं सैन्य गुंतलें आहे. सर्व सैन्य एकवटून **शिवाजी** जातीनेंच हल्ला चढवील तर दंडाहि गमविण्याची पाळी येईल. गलबतें समुद्रांत चालू लागतांच **सिद्दीकडून**

त्याचे कुटुंबरक्षणार्थ अथवा रसदीकरितां मुंबईस बहुधा मागणी येईल. तरी आपली आज्ञा कळवून ठेवावी.

औरंगाबादेहून शहाजाद्याच्या वतीनें दंडाराजपुरीकडे व गोव्याकडे वकील या नात्यानें जाण्याकरितां खोजा अलादिन आला आहे.

फॅ. रे. मुंबई, भा. ६ पृ. ३१ इ. | (१३१५) मुंबई-सुरत | श. १५९२ आषाढ व. १४ इ. १६७० जुलै ५

शिवाजीनें कांहींच मुलूख घेतला नव्हता तेव्हां सुरतेचे लोकांना जर इतकी भीती वाटत होती तर आतां माहुली आदिकरून सर्व किल्ले त्यानें मोंगलांपासून घेतल्यामुळें ती भीती वाढून सुरतेंत पैसा दुर्मिळच झाला असला पाहिजे.

फॅ. रे. सुरत, भा. ३ पृ. ७४ इ. | (१३१६) सुरत कन्सल्टेशन | श. १५९२ आषाढ व. १४ इ. १६७० जुलै ५

देशाची अंदाधुंदीची परिस्थिति आणि औरंगजेब आणि शहाजादा मुअज्जम यांच्यामध्यें भयंकर युद्ध होण्याची साधार वाटणारी भीती, यांमुळें आम्हांला आपलें सर्वस्व नीट सांवरून राहिलें पाहिजे.

फॅ. रे. मुंबई भा. १९ पृ. २७-२८ इ. | (१३१७) सुरत-मुंबई | श. १५९२ श्रावण शु. ३ इ. १६७० जुलै १०

अपराधी भंडारी हे शिवाजीच्या मुलखांतलि असल्यामुळें, आमच्याविरुद्ध शिवाजीच्या कारस्थानांत त्याला उपयोगी पडतील. यास्तव छातीशीं बाळगलेल्या सापाप्रमाणें हे घातक आहेत असें समजून त्यांना कामावरून दूर करावें. पावसाळ्याच्या कुंद हवेंतहि माहुली वगैरे किल्ले घेतल्यानें सुरतेमध्यें शिवाजीच्या नांवाची फारच दहशत* वाटतें. बऱ्हाणपूर, औरंगाबाद, मुल्हेर आणि इतर ठिकाणांहून सुरतेवर हल्ला येणार अशा धोक्याच्या सूचना वारंवार येत आहेत. कित्येक वर्षे दंडाराजपुरीवर त्याचें मन खिळलें असल्यामुळें ती घेण्याचा शिवाजी पुनः प्रयत्न करून यशहि मिळवील. तेव्हां चालू युद्धांतील पक्षांचें बलाबल पाहून, कोणाचीहि बाजू न घेतां तटस्थ राहून, संधि येईल त्याप्रमाणें फायदा करून घेण्यास तयार रहावें, हेंच धोरण सिद्याशीं वागतांना पत्करावें. सिद्यानें दंडाराजपूर इंग्रजांना देण्याचें बोलणें लाविलें तथापि शिवाजी किंवा मोंगल ह्यांच्या दृष्टीनें तें आपल्यास न पचून अंगांत सामर्थ्य नसतांना विनाशक युद्ध आपल्यावर ओढून घेतल्यासारखें होईल, म्हणून तें स्वीकारूं नये. पुनः ताब्यांत घेतल्यावर तें राखणें हें फार खर्चाचें, आणि निकटचा मुलूख स्वतःचे ताब्यात नसल्यानें फार धोक्याचें आहे. शिवाजीच्या हातून तो मुलूख घेण्याकरितां प्रबळ सैन्य खडें ठेवावयास

पाहिजे तेंहि आपल्याजवळ नाहीं. त्यांतून दंडाराजपूर ताब्यांत देतांना सिद्दी अटी घालील त्या आपल्यास पुरविणार नाहींत व कंपनीला पसंत पडणार नाहींत. या करितां सुरत आणि लंडन येथून परवानगी येण्याची सबब सांगून **सिद्दीला** टोलवीत ठेवावें. त्याच्या कुटुंबाचीं माणसें आलीं तर त्यांना एकदम घालवून न देतां मुंबईपेक्षां सुरत किंवा खंबायत **शिवाजी**पासून अधिक सुरक्षित असल्याचा मित्रत्वानें सल्ला द्यावा.

फॅ. रे. मुंबई, भा. ६ पृ. ३३ इ.	(१३१८) मुंबई-सुरत	श. १५९२ श्रावण शु. ४ इ. १६७० जुलै ११

माहुली घेतल्यावर तेथें संरक्षणाकरितां १००० लोक ठेवून **शिवाजीनें** बाकीचें सैन्य काढून नेलें आहे.

सा. ले. ५३ सु. १०७१ रवल १२	(१३१९)	श. १५९२ श्रावण शु. १३ इ. १६७० जुलै २०

माहादाजी गोविंद सुभेदार पर. पुणें-रा. **सिवाजी** राजेः-मा संकराजी निलकंठराऊ हुजूर येऊन मालूम केले जे आपली इनामती मौजे चांबिली ता कऱ्हेपठार पर. मार येथें सेत सिवेचे थल पांढर देऊळ कास टका १ आहे. कारकीर्द दर कारकीर्द चालत आले आहे. माहाराज (शहाजी) साहेबी चालविली आहे. **अफजलखानाच्या राजिका आधी साहेबाचे कारकीर्दीस दुमाले** चालत आले आहे. हाली माइलेस इनामतीस पैके लाविताती येबाबे साहेबी कागद देविला पाहिजे म्हणऊन मालूम केलें. साहेबीहि आपले कारकीर्दीस चालविले आहे तेणेंप्रमाणें दुमाले करणें. पेस्तर फिर्याद येऊ न देणें.

फॅ. रे. मुंबई भा. ६ पृ. ३५, ३६ इ.	(१३२०) मुंबई-सुरत	श. १५९२ श्रावण व. ६ इ. १६७० जुलै २७

" शिवाजीच्या अमलदारांपासून विकत घेऊन वसईच्या कॅप्टननें आम्हांला विकलेलं लांकूड मूळ मुसलमानी प्रजेचें होतें अशी **खोजा** अल्लादिन याची तक्रार आहे. ... **दंडाराजपूरला** आतां **शिवाजीचा** वेढा नाहीं.

ओ. कॉ. भा. ३१ नं. ३४५७ इ.	(१३२१) कारवार-सुरत	श. १५९२ श्रावण व. १२ इ. १६७० ऑग. २

पावसाळा संपल्यावर **मोगल सैन्य** काय करतें तिकडे सर्वांचें लक्ष लागलें आहे. मोगल बादशहानें वकिलामार्फत **आदिलशहाकडे** शिवाजी विरुद्ध १२ हजार घोडदळाची कुमक मागितली. न दिल्यास आपलें सर्व सैन्य विजापुरावर रवाना करण्याची सक्त धमकी दिल्यामुळें, **शिवाजीचा** स्नेह न तोडतां मोगलाला खूष कसें करावें ? अशी इकडे आड आणि तिकडे विहीर याप्रमाणें परिस्थिति होऊन देखाव्याकरितां तरी **आदिलशहाला** शिवाजीविरुद्ध सैन्य पाठवावें लागेल असें वाटतें.

फॅ. रे. मुंबई, भा. १ पृ. ६-७ (द्वि. सं.) इ. | (१३२२) मुंबई कन्सल्टेशन. | श. १५९२ श्रावण व. १३ इ. १६७० ऑगष्ट ३

३० जुलै रोजीं, खोजा अलादीनच्या हातीं, औरंगाबादेहून, **सुलतान मुअज्झमचें** एक निशाण (= पत्र) आणि कल्याणचा माजी व दिवाण हल्लींचा सुलतानाचा दुय्यम बक्षी [पुढचें पत्र पहा] **सैद महमद** याचें दुसरें, अशीं दोन पत्रें आलीं. " **शिवाजीनें** थोड्या दिवसांपूर्वी आपल्या एका किल्याला [कुईगड, कुवारीदुर्ग, Kerridrug ? पुढचें पत्र पहा] वेढा दिला त्याची इंग्रजांनीं कुमक करावी, तेथील लोकांना दारूगोळा पुरवावा, आणि हरएक प्रसंगीं आमचे सैन्याला मदत करावी. पण उलट शिवाजीच्या लोकांना युद्धसामुग्री अगदीं पुरवूं नये " असा वरचढपणाचा मजकूर त्यांत होता. विचाराकरतां तीं पत्रें सुरतेला रवाना करावीं.

फॅ. रे. मुंबई, भा. ६ पृ. ४०-४२ इ. | (१३२३) मुंबई-सुरत | श. १५९२ श्रावण व. ३० इ. १६७० ऑगस्ट ५

[मागील उताऱ्यांत असलेला मजकूर या उताऱ्यांत दिला नाहीं.]

सुलतान मुअज्झमच्या पत्राचें **स्वागत** करण्याकरितां प्रसंगाला योग्य अशा समारंभानें ससैन्य जकात-घराशीं गेलों. **पोर्तुगीज भाषेंत भाषांतर** करून पाहतां तें पत्र प्रेसिडेंटचे नांवाचें असल्याचें कळलें...[त्यांतील मजकूर-] त्यांनीं ज्या किल्याला मदत देण्यास लिहिलें तो **शिवाजीनें** जिंकल्याला बरेच महिने झाले. पत्राचें उत्तर पाठवावें.

खोजा अलादिन **दंडाराजपुरीला** जात आहे. तेथून तो लवकरच परत येईल. त्यावेळीं उत्तराची त्याला अपेक्षा आहे. ...पाऊस कमी पडल्यामुळें दुष्काळ सभोंवार आहे.........

फॅ. रे. सुरत, भा. ३ पृ. ७९ इ. | (१३२४) सुरत कन्सल्टेशन | श. १५९२ भाद्र. शु. १ इ. १६७० ऑगस्ट १६

मुंबईचे ५ ऑगस्टचे पत्राचें उत्तर. पत्राचें उत्तर आम्हीं देणें सोईचें नाहीं. मुंबईकरांनींच संधि पाहून द्यावें. मोठा नजराणा बरोबर पाठविणें जरूर असल्यामुळें उत्तर देणें शक्य तों लांबणीवर टाकावें. खोजाला आपलासा करून घ्यावा. त्याच्या मदतीनें नजराणा देणें टळेल किंवा निदान आपलीं गलबतें येऊन नजराण्यायोग्य जिन्नस हातीं येण्याइतकी फुरसत राहील. शिवाय **शहाजादा औरंगजेब** आणि **शिवाजी** यांच्या युद्धाच्या निकालाची वाटहि पहातां येईल. कारण, कोणतीहि एक बाजू धरणें बरें नाहीं. उत्तर द्यावेंच लागलें तर जपून द्यावें. किल्याला मदत देण्याचे बाबतींत नक्की कांहींच न लिहितां शक्य तितक्या गोड भाषेंत लिहावें.

फॅ. रे. मुंबई. भा. १९ पृ. ४४-४५ इ. | (१३२५) सुरत–मुंबई | श. १५९२ भाद्र. शु. १० इ. १६७० ऑगस्ट १६

[मागील सुरत कन्सलटेशनमध्यें आलेला मजकूर यांत त्रोटक दिला आहे. शहाजाद्याला मिळून **शिवाजीशीं तुम्हीं युद्ध करावें** असाच त्यांच्या पत्राचा मथितार्थ दिसतो. तसें करणें आपल्याला अशक्य असल्यामुळें उत्तर सावधगिरीनेंच द्यावें. मध्यंतरीं खोजा अलाद्दिनला खूष ठेवावें. कारण त्याच्या जातवाल्यांच्या स्वभावानुसार आपल्या धन्याचा फायदा पाहण्याऐवजीं तो स्वतःचाच लाभ इच्छित असावा असें आमचें मत आहे. म्हणून सुलतान **मुअझ्झमकडून** कायम स्वरूपाच्या तो कोणत्या सवलती मिळवून देतो तें पाहून त्याप्रमाणें नजराण्याचें ठरविणें जरूर आहे.

(से.) फॅ. रे. सुरत भा. ३ पृ. ८१ इ. | (१३२६) सुरत कन्सल्टेशन. | श. १५९२ भाद्र. शु. १३ इ. १६७० ऑगस्ट १८

शहाजाद्यानें औरंगजेबाविरुद्ध बंड केल्यामुळें आणि सुरत काबीज करण्याकरितां शहाजाद्याचें सैन्य येत आहे अशी हूल उठल्यामुळें भावी संकटाचा बंदोबस्त करण्याबद्दल विचार झाला. शहाजाद्याच्या **तोफखान्यावर जॉन ट्रॅलर** नांवाचा मुख्याधिकारी आहे. त्याच्याकडून मध्यस्थी करवून कंपनीचे मालमत्तेला हात लावला जाऊं नये अशी तजवीज करवावी.

फॅ. रे. मुंबई भा. ६ पृ. ४७–४९ इ. | (१३२७) मुंबई–सुरत. | श. १५९२ भाद्र. शु. १५ इ. १६७० ऑगस्ट २०

घोड्याकरितां धान्य आणि कांहीं सोरा मागण्याकरितां **दंडा–राजपुरीहून** एक नोकर आला त्याला आम्ही नकार दिला. आणि प्रवासापुरतें धान्य आणि कांहीं औषधें घेऊन तो गेला. **दंडा–राजपुरीला** तांदूळ पुरविण्याची दोन तीन व्यापाऱ्यांची तयारी होती. परंतु युद्धांत गुंतलेल्या कोणत्याहि पक्षाला मदत करणें म्हणजे आपल्यावर शत्रू ओढवून घेण्यासारखें असल्याचें सांगून त्यांना बंदी केली. आपला शेजारी जो **शिवाजी त्याचे गुप्त हेर** या बेटांत सर्वत्र असून त्यांना आपल्या शत्रूला पुरवठा कोठून होतो याचा सुगावा लागल्यास काय अनर्थ ओढवेल हें सांगितल्यावर त्यांनीं माघार घेतली.

कारवारच्या जासूदांच्या सांगण्याप्रमाणें शि०नें कारवारला वेढा दिला नाहीं असें दिसतें. तथापि ५००० लोक तिकडे पाठविले आहेत अशी सिद्दीनें खबर दिली. ' आपण मांहुली वगैरे सर्व किल्ले घेतले असतांना तूं माझ्यासमोर टिकाव कसा धरणार ? किल्ला माझ्या ताब्यांत देशील तर मी तुला सर्व सैन्याचा मुख्य सेनापती करीन' असें **शिवाजीनें सिद्दीला** लिहिलें आहे. 'आपल्याला जोंपर्यंत जमीन आणि पाणी यांपैकीं कोठून तरी रसद मिळत आहे तोंपर्यंत आपण दुर्जय आहोंत' अशा जाणिवेनें सिद्दीहि त्याचा तिरस्कार

करितो. प्रत्यहीं रात्रीं चकमकी होऊन बहुधा पुष्कळ सैनिक दगावतात......मुंबई शेजारीं **औरंगजेब व शिवाजी यांचें युद्ध** चालू आहे. यामुळें व्यापारी येत नाहींत.

फॅ. रे. मुंबई भा. ६ } (१३२८) { श. १५९२ भाद्र. व. १२
पृ. ५७ इ. } मुंबई–सुरत. { इ. १६७० सप्टें. १

औरंगाबादेहून अगदीं गोंधळाची अशी अस्पष्ट खबर येते. खोजा अल्लादीन बेटावर आला आहे. लौकरच उत्तराकरितां सतावूं लागेल. **शिवाजी** जोरावर असून **कल्याण–भिंवडीचे** सर्व मार्ग त्याच्या स्वाधीन असतांना औरंगाबाद ते कल्याण-भिंवडी–मार्गाच्या सवलती औरंगाबादेहून मिळवूनहि कांहीं फायदा होईलसें वाटत नाहीं. शिवाय औरंगजेब व मुअज्झम यांचे परस्पर संबंधांत फरक होण्याचा संभव असेपर्यंत असल्या गोष्टींचा निर्णय लांबणीवर टाकलेला बरा.

खं. ८ ले. १० } (१३२९) { श. १५९२ भाद्रपद
सु. १०७१ रबर } { इ. १६७० आगस्ट-सेप्टें.

राजश्री **निळोपंत मजमूदार** यास वतनीचा कारभार करावयास ठेविलें. माहोली-पासून भीमगड पावेतों व इंदापूर, पुणें, चाकण कदीम वतनीचा कारभार करावा. यासी, पंडित माइलेनें साहेबासी अर्ज केला कीं:- आजी कामाचे दिवस आहेत. वतनीचा कारभार आणिक कोण्हास सांगावा. आपण बराबरी येऊन दाहा लोक कामें करितील तैसी करून देऊन; गड घेणें पडिले तरी घेऊन देऊन; ऐसा अर्ज केला. त्यास साहेबी उत्तर दिधलें कीं; वतनी राहाणें हेंहि काम थोर आहे. वतनी राहाणें. येथें तुम्हां बकशीस इमारती पैके पाववील त्यास दर सदे होन २ दोनीप्रमाणें पावती. ऐसे साहेब बोलिलिया-वरी पंडित माइले बोलिले कीं:—जरी वतनीचेहि काम थोर आहे तरी बहुत बरें. **एकानें सिद्ध संरक्षण करावें. एकानें साध्य करावे. दोन्ही कामे साहेब बराबरीनें मानितात्ती.** तरी आपण वतनीं राहीन. परंतु इमारतीचे पैके पाववून बकशीस घेणार नाहीं. मोरोपंत त्रिंबक व शिवनेर येथें पाठविले आहेत ते गड घेतील व मुलूक घेतील, कामें करितील. साहेब थोर कामास जातात्ती तें काम श्रीचें कृपेनें होऊन येईल. त्यास राजश्री मोरोपंतास मेहेरबानीनें पंचवीस फुलें दिधली तरी आम्हासहि वीस फुलें द्यावीं. ऐसा साहेबीं निश्चय केला पाहिजे. त्यावरी साहेबीं ऐसाच तह दिधला कीं; वतनी राहोन कारभार करावा. इमारतीचे पैके पाववून बकशीस न घ्यावें. राजश्री मोरोपंत काम करितील, गड घेतील, पैके मिळवितील. सुरगिरीचा प्रयत्न करून घेतील. त्यास मेहेरबान होऊन, पेशवे आहेत याकरितां पंचवीस फुलें दिधलीं तरी, तुम्हांस मजमूच्या काइदियाने वतनीचें काम तें काम बराबरी ऐसें समजोन, त्यास द्यावी तेच वख्तीं तुम्हासहि वीस २० फुलें पाठवावी. या हिसेबानें जैसें त्यास पावेल तैसे तुम्हांस

देऊन; ऐसा साहेबी निश्चय करून पंडित माइलेस वतनीचा कारभार करावयास ठेविलें असे. पंडित माइलेनेहि सदरहू प्रमाणें मान्य केलें असे. मोर्तब सूद (मर्यादेयं विराजते)

कित्ता एक. रदबदल राजश्री निळोपंती केली कीं; साहेब वतनी कारभारास ठेवीत आहेत. यास कोण्ही कैसा वर्तेल, कोण्ही कैसा वर्तेल. यास आपणास जे कोणी दखल होईल ते गोष्टीची बाजीपुसी करून. जें दखल न व्हे आणि साहेबास कळेल तें तें आपणास सांगावी. आपण बाजीपुसी करून. परंतु लोक गैरमाकूल आम्हास न कळत वर्तले तरी त्याची बदलामी आपणावरी न ठेवावी. आपण खुतूत गैरमाकूल सहसा वर्तणार नाहीं. कारभारमुळें दाहा लोकासीं बरेंवाईट बोलावें लागत आहे. एकादियाने लटकेच कांहीं सांगितले तरी ते गोष्टीची बरी चौकशी करावी. सांगितलियावरूनच मनांत गैरमेहेरबानी न धरावी. बाजीपुसी करिता नेमस्त खुतूत तमा आढळली. मग जे नामेहेरबानी करणे ते करावी. लोक गैरमाकूल वर्तले तरी जो जैसे करील तो तैसा पावेल. त्याची बदलामी आपणावरी नाहीं. येणेंप्रमाणें साहेबी मान्य केलें असें. मोर्तब सूद (मर्यादेयं विराजते)

कित्ता एक. रदबदल कीं, वतनीचा कारभार साहेबी आपणास सांगितला आहे. यासी, काय गैरमाकूल कारभार होईल त्याची मुनसिफी साहेबीं करावी, किंवा आमची आम्हावरी टाकावी. अनाजी पंताचें सांभाळी न करावी. ऐसे बोलिलियावरी साहेबी मान्य केले असे. मोर्तब सूद (मर्यादेयं विराजते)

कित्ता एक. कलम पंडित माइलेनें अर्ज केला कीं, आपण कारभार करणे तो ऐसा करूं कीं जैसा आपले घरींचा खुतूत कारभार. ज्यानें फाइदा समजोन जे करीत आहेत तैसा करून साहेबीं मेहेरबानी मात्र असो द्यावी. मोर्तब सूद (मर्यादेयं विराजते)

येणेंप्रमाणें सदरहू कलमांचा तह साहेबीं दिधला असे. मोर्तब सूद (मर्यादेयं वि.)

फॅ. रे. मुंबई भा. ६ पृ. ६० इ.	(१३३०) मुंबई-सुरत.	श. १५९२ आश्वीन शु. १ इ. १६७० सप्टें. ५

सर्व रस्ते **शिवाजीनें** बंद केले आहेत....आम्हीं शिशाचीं पिंपें उतरून घेतलीं आहेत. आतां औरंगाबादचा **सुलतान मुअज्झम** हा दंडाराजपुरकराचा मित्र आहे आणि बापाशीं युद्ध करण्याकरितां **शिवाजीशीं संबद्ध झाला** आहे; ही वस्तुस्थिति लक्षांत घेतां, या उभयतांपैकीं कोणीं एकानें हें शिसें खरेदी करण्याकरितां मनुष्य पाठविला तर (जगांत चालतें त्याप्रमाणें) हा एक व्यापारी माल म्हणून विकावयाला आम्हांला **शहाजाद्याचें निशाण** आड येतें किंवा कसें हा प्रश्न आहे. आमच्या दृष्टीनें विकण्याला हरकत कांहींच दिसत नाहीं. शिवाय हें आम्हांला पक्कें माहीत आहे कीं, **शिवाजीला** शिसें किंवा तोफा पाहिजे असतील त्या त्याला **राजापूरच्या फ्रेंच वखारींतून**

खास मिळतील. परंतु आम्हीं मुद्दाम कोणत्याहि भानगडींत न पडतां आपल्या हुकमाचे बाहेर जाणार नाहीं.

खं. १७ ले. ८ (१३३१) श. १५९२ आश्वीन शु. ३
जु. १५ ? जवल २ सु. ? फर्मान इ. १६७० सप्टें. ७

?—विठोजी हैबतराव देसाई किले मुरंबगड यास

सैद अबदुला बिन सैद महमद देसाई किले रोहिडे यानें बादशाही दरबारांत कळविलें कीं 'सिवा मलाउनानें (दुष्टानें ?) निजामशाही मुलूख व बाजे विलायत आपल्या कबज्यांत आणिली आहे; व तो आपला अंमल वाढवीत आहे. तर देसायास कौल मिळाल्यास तो जमाव करून सिवा मलउनानें मुलूख काबीज केला आहे तो पादशाहीच्या कबजेत आणील.' त्यावरून हा कौल दिला आहे. तर जमीयत पैदा करून मलउनानें कबज केलेली विलायत पादशाही दौलतींत आणणें. (सन १५ जुलूस अली आदिलशहाचा असावा.)

फॅ. रे. सुरत (१३३२) श. १५९२ आश्वीन शु. ८
भा. ३ पृ. ८८ इ. सुरत कन्सल्टेशन. इ. १६७० सप्टें. १२

आमच्या हक्कांची माहिती नसलेला नवीन सुभेदार आला आहे. त्याचेशीं बाचाबाची होईल अशी भीती वाटते. शिवाय **इंग्रजांनीं** पूर्ववत् ३½ **टक्के** जकात द्यावी असा मोगली हुकूम फिरल्याची बातमी आहे....त्यामुळें आपत्ति येईल. शिवाय **शिवाजी** कल्याणला मोठें सैन्य उभारून गुजराथवर स्वारी करणार अशी मुंबईहून सूचना आली. तेव्हां **प्रथम सुरत** घेतली जाईल. या दोन्ही कारणांनीं सुरक्षिततेच्या दृष्टीनें सर्व माल खालीला नेऊन भरावा.

राम. अं. ६५-६६ ले. १४ (१३३३) श. १५९२ आश्वीन शु. ११
सु. १०७१ जवल १० फा. मु. व सी. इ. १६७० सप्टें. १५

अजर. त्रिंबकजी राजे भोसले—कारकून पा। आकोट.

वेलूरच्या देवाच्या अभिषेकाबद्दल वर्षासन दोन वर्षाबद्दल १२१॥ रुपये वरातेनें दिले होते. त्यापैकीं बाकी ३६॥= मौजे मोखडे पा। आकोट यावर आदा करणें.

फॅ. रे. सुरत (१३३४) श. १५९२ आश्वीन शु. १२
भा. ३, पृ. ८९ इ. सुरत कन्सल्टेशन इ. १६७० सप्टें. १६

शिवाजीचे हल्ल्याची भीती वाटून सर्व मालाची रोकड करण्यासाठीं सर्व व्यापारी आपला माल स्वस्त भावानें विकावयास तयार झाले आहेत.

(से.) फॅ. रे. सुरत } (१३३५) { श. १५९२ आश्वीन व. ६
भा. ३ पृ. ९० इ. } स्वालीमरीन कन्सल्टेशन { इ. १६७० सप्टें. २४

शिवाजी सुरतेवर येण्याची भीती असल्यामुळें दिवाळी होऊन जाईपर्यंत व्यापारी लोक माल आपल्या ताब्यांत घेऊं इच्छित नाहींत.

डच रेकॉर्डस भा. २९ } (१३३६) { श. १५९२ आश्वीन व. १०
नं. ७६२, आक्टो. ८ न्यू. } वेंगुर्ला डि.-डच गव्ह. जन. { इ. १६७० सप्टें. २८

शिवाजीच्या स्थितींत बदल झाला नाहीं. त्याच्यावर चालून आलेलें **मोगली सैन्य** अकस्मात परत बोलाविलें गेलें. **शिवाजी, आदिलशाहा आणि सुलतान मुअझ्झम** यांचें संगनमत आहे आणि यामुळें कित्येक गोष्टींचा उलगडा होत नाहीं. परंतु ४००० घोडदळ घेऊन कोणी एक **नबाब बहलोलखान** विजापुराहून निघाला एवढें खास. तो 'आपल्या गांवीं विश्रांति घेण्याकरितां जात आहे.' आणि 'शिवाजीवर जात आहे' अशा दोन्ही वदंता आहेत. **शिवाजी** मात्र किनाऱ्यावरील सर्व किल्यांवर रसद आणि दारूगोळ्याचा पुरवठा करीत आहे.

फॅ. रे. सुरत भा. ३ } (१३३७) { श. १५९२ आश्वीन व. १४
पृ. ९४ इ. } स्वालीमरीन कन्सल्टेशन. { इ. १६७० आक्टो. २

शिवाजी सुरतेपासून २० मैलांवर आल्याची बातमी आल्यामुळें सुरतेचें रक्षण कसें करावें ह्याबद्दल विचार झाला.

ओ. कॉ. भा ३१ } (१३३८) { श. १५९२ आश्वीन व. १४
नं. ३४८९ इ. } मुंबई-सुरत { इ. १६७० आक्टो. २

सुलतान मुअझ्झमनें शिवाजी आणि इतर राजांच्या मदतीनें बापाशीं लढण्याकरितां मोठें सैन्य उभारलें. कित्येकांचे मतें तो औरंगजेबावर स्वारी करण्याकरितां निघून आग्र्याजवळ गेला. दुसरे कित्येक असें म्हणतात कीं, **बापानें तह** करून त्याला दख्खमचें राज्य आणि गुजराथ प्रांत दिल्यामुळें तो परत फिरला.

फॅ. रे. सुरत भा. ३ } (१३३९) { श. १५९२ आश्वीन व. ३०
पृ. ९४ इ. } स्वालीमरीन. डायरी. { इ. १६७० आक्टो. ३

'**शिवाजीनें सुरतेंत** शिरून जाळपोळ व लूट केली. कोणीं विरोध केला नाहीं.' अशी बातमी आज आली. आसपासचीं खेडीं आणि तेथें पळून गेलेल्या सावकार लोकांना लुटण्याकरितां नदीच्या बाजूकडे तो ५०० घोडदळ पाठविणार हें ऐकून माल किनाऱ्यावरून गलबतांवर चढविला.

४ तारखेच्या नोंदींत, **शिवाजीनें** सैन्य पाठविलें असें लिहिलें आहे.

(से.) फॅ. रे. सुरत भा. ३ } (१३४०) { श. १५९२ कार्तीक शु. २
पृ. ९४ इ. } सुरत (स्वाली ?) कन्सल्टेशन { इ. १६७० आक्टो. ५

१० आक्टोबरपर्यंत **शिवाजीचें** भय कमी होईल असा अंदाज आहे. तोंपर्यंत मलबार किनाऱ्याकडे जावयाचीं आपलीं गलबतें तयार असलीं तथापि (येथील संरक्षणाचे दृष्टीनें) त्यांना जाऊं देऊं नये.

खं. १५ ले. १२४–२५ } (१३४१) { श. १५९२ कार्तीक शु. ६
सु. १०७१ जखर ५ } तारीद मु. व सी. { इ. १६७० आक्टो. १०

खान सिताबखान सरनाईकवाडी किले सातारा

ता। हुदे. व मौक. मौ. चिंचणेर किले ताथोडा व मौजे वरिये

जोगिंद्रगिरी बावा यास चिंचणारे व वरिये (५ बिघे) येथें सालाबादप्रमाणें मिळणारा गहू पाव कुडो देणें.

(से.) फॅ. रे. सुरत भा. ३ } (१३४२) { श. १५९२ कार्तीक शु. ८
पु. ११७ इ. } स्वाली मरीन कन्सल्टेशन { इ. १६७० आक्टो. १२

शिवाजीचे परत येण्याबद्दल **दुसरी हूल** उठल्यामुळें टांकसाळ बंद झाली, सर्वत्र गोंधळ झाला, व ज्या सराफांनीं सोनें घेतलें होतें त्यांनीं तें परत आणून दिलें. परंतु नंतर तेच पुन: तें घेण्याकरितां आले. तरी त्यांना सवलतीनें वागवावें.

फॅ. रे. सुरत भा. १०५ } (१३४३) { श. १५९२ कार्तीक शु. ११
पृ. ४ इ. } मुंबई–सुरत { इ. १६७० आक्टो. १४

चुना करण्याकरितां लांकडें आणण्यासाठीं होड्या पाठविल्या त्या **शिवाजीचे** खास हुकमावरून त्याच्या लोकांनीं रिकाम्या परत पाठविल्या. आतां आम्हीं आमच्याच बेटांत लांकूड तोडावें कीं शिवाजीच्या मुलखांतून जबरदस्तीनें आणावें ? शिवाजीचीं बेटें दूर दूर असून त्यांच्यावर वस्ती नाहीं. आणि किनाऱ्यापासूनहि तीं थोडीं लांबच असल्यामुळें शिवाजीशीं संबंध तोडून तेथून लांकूड आणणें शक्य आहे.

ओ. कॉ. भा. ३१ } (१३४४) { श. १५९२ कार्तीक शु. ११
नं. ३४९६ इ. } सुरत–कारवार { इ. १६७० आक्टो. १४

मुअझ्झम मोंगलाविरुद्ध शिवाजीला मिळाल्यामुळें, आणि **शिवाजीनें** आसपासच्या मुलखांत जाळपोळ करून मुलूख वैराण केल्यामुळें, या प्रांतांत इतकी अंदाधुंदी माजली आहे कीं कित्येक वर्षें बसलेला व्यापार भरभराटीस येणार नाहीं. पुष्कळ बडे व्यापारी मालमत्तेसह सुरत सोडून जाण्याची गोष्ट बोलतात. सुरक्षितपणाबद्दल त्यांची खात्री झाल्यास ते मुंबईसहि येतील.

फॅ. रे. सुरत भा. ३ पृ. ९६ इ. | (१३४५) स्वाली मरीन कन्सल्टेशन. | श. १५९२ कार्तीक शु. १४ इ. १६७० आक्टो. १७

सुरतेच्या संरक्षणाकरितां मास्टरबरोबर पाठविलेल्या लोकांनीं **तद्देशीय लोकांची मालमत्ता लुटून त्रास देऊं नये** म्हणून त्यांना बक्षिसाची लालूच दाखवून शांत राहण्यास सांगितलें. तेव्हां आतां त्यांना प्रत्येक अधिकाऱ्याला २० रु. व शिपायाला १० रु. याप्रमाणें द्यावे.

(से.) फॅ. रे. सुरत १०५ (२) पृ. ५४–५५ इ. | (१३४६) मुंबई–सुरत | श. १५९२ कार्तीक व. ८ इ. १६७० आक्टोबर २६

[शिवाजीचे सुभेदारानें लांकूड न दिल्यामुळें चुना झाला नाहीं.] परंतु बांधकाम चालू राखिलें आहे.

[**शिवाजीचें** सुरतेवरील दुसरे हल्ल्याचें धाडस वाचून फार वाईट वाटलें. परंतु बाजू बचावली हें बरें झालें. त्यानें येथेंहि **साठ सत्तर गलबतें** कांहीं बंदरांत व कांहीं बंदराचे मुखाशीं दोनतीन दिवस ठेवून आम्हांला भय दाखविलें. 'आपण मिठाच्या खरेदीकरितां आलों' या त्यांच्या म्हणण्यावर आमचा विश्वास बसेना. म्हणून सायंकाळीं ६ पासून सकाळीं ६ पर्यंत त्यांना किनारा सोडण्यास लावून शिवाय आमचेकडून आम्हीं बेटावरील बंदोबस्त अधिक वाढविला.] **मुअज्झम कल्याणला** लवकरच येईल. त्याचें व शिवाजीचें अलीकडे **बिघडलें आहे** असें म्हणतात. शिवाजीविरुद्ध **महाबतखानाला** नेमिलें आहे असेंहि ऐकतों. (चौकटीच्या कंसांतील तेवढाच मजकूर (प) संग्रहामध्यें **ओ. कॉ. भा. ३१ नं. ३५०९** मधील उतारा म्हणून घेतला असून तो **ता. ३ नोवें. १६७० चा** असा दर्शविला आहे.)

फॅ. रे. सुरत भा. ३ पृ. ९८ इ. | (१३४७) स्वाली मरीन कन्सल्टेशन. | श. १५९२ कार्तीक व. १० इ. १६७० ऑक्टो. २८

मुंबईकरांना उत्तरः—शिवाजीनें **लांकूड** आणण्यास **बंदी** केली तरी त्याचे लोकांशीं ताठपणानें न वागतां कल्याण–भिवंडीच्या सुभेदाराला सामोपचाराचें पत्र लिहावें कीं, 'आम्हीं आजपर्यंत तुमचेशीं फटकून वागलों नाहीं. शिवाजी आणि प्रेसिडेंट यांचेमध्यें **राजापूर येथील वखार** उघडण्याबद्दल आणि **कल्याणभिवंडीला** मोठा व्यापार सुरू करण्याबद्दल झालेलें बोलणें, असा विरोध करूं लागलां तर, पुरें करण्याची इच्छा आम्हांला होणार नाहीं. तरी नक्की उत्तर द्यावें.'

[से] मुंबई बेटांतील मुअज्झमचा हस्तक **खोजा अल्लादीन** यानें उभारलेला मुसलमानांचा एक **कट** उघडकीस आल्यामुळें, मुसलमानांची एक यादी करून, त्यांनीं किंवा कोणीहि एकत्र जमूं नये असे कडक नियम केले.

ओ. कॉ. भा. ३१ } (१३४८) { श. १५९२ कार्तिक व. ११
नं. ३५०५ इ. } सुरत (स्वाली)-मुंबई { इ. १६७० ऑक्टो. २९

शिवाजीनें लांकडांबद्दल केलेली बंदी लवकरच उठेल असें वाटतें. म्हणून सामोपचारानें लिहा. 'शिवाजीच्या बंदरांत आपल्याला वखारी घालणें आहे. करितां त्यानें, सुरतेला पूर्वी आला होता तो **अंताजी पंडीत** किंवा दुसरा कोणी राजापूरच्या नुकसानीच्या भरपाईबद्दल बोलणें करण्यास पाठवावा.' असें शिवाजीला कळविण्यास सुचवा.

विस्तव किंवा लूट ह्यांच्या तावडींत सांपडलें नाहीं असें एकहि घर सुरतेंत नसून सुरतेचे लोक त्या गडबडींत आहेत. (आम्हांलाहि अधिक लिहिण्यास सवड नाहीं.)

मास्टर पेपर्स, भा. १ } (१३४९) { श. १५९२ कार्तिक
पृ. १९२ नं. १० इ. } मास्टरची कामगिरी { इ. १६७० ऑक्टो. आरंभ

'**सुरतेची लूट दुसऱ्यानें करण्याकरितां शिवाजी आला.** प्रेसिडेंट व कौन्सिल स्वालीला जाऊन त्यांनीं मजबरोबर ३० लोक दिले. तेवढ्यांचे साहाय्यानें मीं वखारीचें रक्षण केलें; त्या योगें राष्ट्राची मान्यता वाढली, व कंपनीच्या वर्षाच्या जकातीची बचत झाली. मी इंग्लंडांत परत गेल्यावर मला या कामगिरीबद्दल सुवर्णपदक देण्यांत आलें.'

फॅ. रे. सुरत भा. १०५ } (१३५०) { श. १५९२ कार्तिक
पृ. ३८ इ. } [गॉम्ब्रून]—सुरत { इ. १६७० [आक्टोबर]

शिवाजी पुनः तयार होऊन **सुरतेकडे** मोर्चा वळवून सुरतेला त्यानें इतकें भेदरवून सोडलें हें ऐकून खेद होतो. आपल्याबद्दल इतका गाजावाजा होत असतांना तो खात्रीनें हल्ला करणार नाहीं. तर खोट्या हुली उठवून शहरचे **लोक** थोडे **निर्धा-वले** म्हणजे पूर्वीप्रमाणें त्यांना तो अचानक चकवील ! .... आपला माल **मुंबई बेटाकडे** सुरक्षिततेकरितां पाठवा.

डच रेकॉर्ड्स, भा. २९ } (१३५१) { श. १५९२ मार्ग. शु. २
नं. ७६३ नोवें. १४ न्यू. } सुरत. रेसि.—डच कंपनी. { इ. १६७० नोवें. ४

शिवाजीच्या मुलखांत फ्रेंचांनीं एक वखार घातली असल्यामुळें **शिवाजीनें स्वहस्तलेखानें** (by an *autograph letter*) 'आपण सुरतेवर हल्ला करणार आहों. परंतु तुमच्या रक्षणाची काळजी घेतली जाईल असें समजून स्वस्थ रहावें' असें (सुरतेच्या) **फ्रेंचांना** कळविलें होतें. नगरांत आल्यावर शिवाजीच्या शिपायांनीं त्यांच्या वखारीला गराडा दिला, व दंगा माजवला, परंतु इतर कोणताहि त्रास दिला नाहीं. व फ्रेंचां-

नींहि त्यांच्याजवळ भरपूर तयारी असतांना आणि मूल्यवान नजराणे देऊन स्वास्थ्याची हमी मिळविली असतांना देखील कराराविरुद्ध, आपल्या दोन कृष्णवर्णी सेवकांना, मराठ्यांच्या हातून विनाप्रतिकार, आपल्या डोळ्यांदेखत मरूं दिलें !

इंग्रजांच्या गलबतांवर पुष्कळ श्वेतवर्णी सैनिक होते. **शिवाजीच्या** लोकांनीं इंग्रजांच्या वखारीवर हल्ला करून त्यांना टेकीस आणलें होतें. परंतु गलबतांवरून किनाऱ्यावर पाठविलेले ११० लोक व त्यांतलि कर्नल यानें बाजू सांवरली. पुढें शिवाजी निघून जाण्यापूर्वी इंग्रजांची व त्याची आपसांत समजूत निघाली.

काशरचा राजा शिवाजी येण्यापूर्वी थोडा वेळ जुन्या कारावानसराईच्या आश्रयाला आला होता. त्याचा सर्व विश्वास **समोरच्या फ्रेंचांवर** होता. ते मदतीला न आल्यामुळें त्याला सराई सोडून जावी लागून त्याची संपत्ति शिवाजीच्या हातीं लागली; याबद्दल फ्रेंचांना दोष देऊन त्याचा सूड उगविण्यासाठीं **बादशहाकडे** यांच्या गैरविश्वासनीयतेबद्दल त्यानें अर्ज केला आहे.

शिवाजी सुरतेंत येण्यापूर्वीच मालमत्ता आणि बायकामुलें खालीला पाठवून आम्हीं (डच) फक्त ३५ लोक घेऊन वखारींत राहिलों. परंतु शिवाजीनें आम्हांला **(डचांना)** त्रास दिलाच नाहीं. शिवाजीकडून 'तुम्हीं कोणतीहि हालचाल न केल्यास तुम्हांला त्रास होणार नाहीं. तरी तशी खात्री देण्याकरितां इसम पाठवा' असा निरोप आल्यावरून आम्हीं मनुष्य पाठविला. त्याला असें सांगण्यांत आलें कीं 'शहरांतील मुख्य व्यापाऱ्यांकडून द्रव्य उकळण्याचा उत्तम मार्ग कोणता? याचें उत्तर घेऊन उद्यां ये.' इंग्रजांकडून तशाच प्रश्नाचें उत्तर मागविलें होतें. तें त्याच दिवशीं यावयाचें होतें. परंतु दुसऱ्या दिवशीं हा इसम शिवाजीकडे जाणार तोंच **शिवाजी शहर सोडून गेल्याची** बातमी पसरली. आमचे इसमाबरोबर सुरक्षित पोंचविण्याकरितां आलेले शिवाजीचे दोन शिपाई अशा रीतीनें आमच्याकडेच राहिले! शहरांत सोडल्यास, (चिडलेल्या) लोकांनीं त्यांना ठारच केलें असतें! वखारींत ठेविल्यास, सुभेदाराच्या स्वाधीन करावें लागलें असतें. तेव्हां रात्रीं गुप्तपणें आम्हीं त्यांना नगराबाहेर सोडून दिले आणि ते शिवाजीला जाऊन मिळाले.

या निघण्याच्या त्वरेचें कारण समजलें नाहीं. त्याला कोणाचाच विरोध झाला नाहीं व होण्याचा संभव नव्हता. त्यानें **सुरत ६ला सोडली** आणि १३ ला तो २५ मैलांवरील पेठ गांवीं ६००० घोडदळ व १०००० पायदळ घेऊन आला असून पुन: सुरतेवर येणार अशी बातमी आली लगेच सर्वत्र पळापळी होऊन शहर सामसूम झालें. **तुर्क, इंग्रज, फ्रेंच** सर्व पळाले. **डच वखारींत** तोफा व ५२ शिपायांचा बंदोबस्त करून बंदरापासून वखारीपर्यंत मिरवणूक काढली. त्या योगानें भयभीत होऊन पळालेल्या मुसलमानांवर चांगला परिणाम झाला. वारंवार खोट्या हुली उठून लोकांच्या मनोवृत्ति

संशयांत आणि गोंधळलेल्या राहतात. त्यांतून शिवाजी ३५ मैलांवरच तळ देऊन राहिल्यामुळें केव्हांहि ३।४ दिवसांत येऊन पोंचेल ही धास्ती असल्यानें व्यापार कायम बसला.

फॅ. रे. सुरत भा. ३ } (१३५२) { श. १५९२ मार्ग. शु. ३
पृ. १०८ इ, } स्वाली मरीन कन्सल्टेशन. { इ. १६७० नोव्हें. ५

कोशगर (Koshgur Cacer or Tartar King) **चा राजा** मोंगल बादशहाचा नातेवाईक असून त्याचें बादशहावर वजन आहे. त्याला २०० रु. चा नजराणा दिल्यास तो बादशहापाशीं आपल्या उपयोगी पडेल.

मास्टरच्या मतें सुरतेचा गोंधळ अद्याप थांबला नसून तेथें सुभेदार आणि सरकार या उभयतांचा अभाव आहे. तेथें माल पाठवूं नये.

१० नोव्हेंबरच्या सभेंत शिवाजीच्या पुनरागमनाची भीती नाहींशी झाल्यामुळें सोनें सुरतेला पाठवावें असें ठरलें.

ओ. कॉ. भा. ३१ } (१३५३) { श. १५९२ मार्ग. शु. १०
नं. ३४८९ इ. } सुरत स्वाली-इराण { इ. १६७० नोव्हें. १२

[पूर्वी येऊन गेलेली हकीकत येथें त्रोटक दिली आहे.]

ऑक्टोबरच्या पहिल्या तारखेपासून **शिवाजी** १५००० घोडदळ व पदाती घेऊन सुरतेजवळ आल्याची हूल उठली. अनुभवानें स्थानिक लोक भ्याड असल्याचें ठरल्यामुळें, राष्ट्राचें नांव व कंपनीची मालमत्ता राखण्याकरितां **मास्टरच्या** हाताखालीं कांहीं लोक सुरतेस पाठविले. कंपनीचा बहुतेक माल आधींच स्वालीला नेऊन ठेविला होता. मास्टर वखारींत शिरला असेल नसेल तोंच **शिवाजीनें** शहराच्या तटाला वेढा घातला आणि थोड्या **चकमकीनंतर** शहर ताब्यांत घेऊन लूट व जाळपोळ सुरू केली. भ्याड नगररक्षक किल्ल्यावरील तोफांच्या आश्रयाला गेले ! पहिला बहुतेक सबंध दिवस शिवाजीनें इंग्रजांच्या वखारीवर गोळी चालवून कांहीं उपाय चालत नाहीं असें पाहून **जुन्या सराईत** तार्तरीचा राजा होता त्यावर हल्ला केला. तेथील लोकांनीं प्रथम जोराचा प्रतिकार केला परंतु शेजारच्या **फ्रेंचांकडून** त्यांना मदत होण्याऐवजीं उलट शिवाजीलाच दारूगोळा दिला गेल्यामुळें तार्तारांचा नाइलाज होऊन त्यांनीं रात्रीं आपल्या राजाला किल्ल्यांत नेऊन ठेविलें व सराई सोडून दिली. तेथें शिवाजीला पुष्कळ संपत्ति मिळाली. **नव्या सराईतील** तुर्की व इराणी रक्षकांपुढें त्याची डाळ शिजली नाहीं. जुन्या सराईतून इंग्रजांच्या वखारीवर सुरक्षितपणें हल्ला करण्याचा केलेला प्रयत्न तसाच फसल्यावर त्याचे लोकांनीं इंग्रजांशीं बोलणें लावलें. मुंबईला सख्य असून सुरतेंत वैर करणाऱ्या शिवाजीच्या विसंगत वर्तनाबद्दल मास्टर थोडें रागानें बोलल्यावर मराठा सेनापतीच्या सूचनेवरून मास्टरनें जाणता इसम शिवाजीकडे पाठविल्यामुळें शिवाजीनें **इंग्रजांना**

कौल देऊन पुढें त्रास दिला नाहीं. व सभोंवारचे शहराची संथपणें अपार लूट करून मिळालें तेवढें बस आहे असें समजून अर्धें शहर जाळून शिवाजी निघून गेला. या सर्व दिवसांत मोंगलांचें सैन्य जवळ कोठेंच आलें नव्हतें. आज मितीलाहि फक्त ३०० च घोडेस्वार आले आहेत !

शिवाजीनें नगरांत प्रवेश करण्यापूर्वींच फ्रेंचांनीं त्याच्याशीं स्नेह केला याबद्दल त्यांना लोक दोष देत आहेत. **तार्तार राजा** तर फारच संतप्त होऊन सर्व नुकसानीचा दोष त्यांच्यावर घालीत आहे. औरंगजेबाकडे त्याचें वजन असल्यामुळें फ्रेंचांना नुकसान पोंचेल असें म्हणतात. **डच वखार** शहराच्या गरीब भागांत व्यापाऱ्यांच्या घरांच्या मध्यें असल्यानें शत्रूशीं कांहीं चकमक झाल्याशिवाय वांचली. फ्रेंचांनीं तह केला असतां हि त्यांचे सशस्त्र लोक सज्जावर दिसले, त्यांना मराठ्यांनीं गोळ्यांनीं ठार केलें. **भ्याड फ्रेंचांनीं** प्रतिकार न केल्यामुळें त्यांची नाचक्की होत आहे.

सुरतेच्या बंदोबस्ताची अधिक व्यवस्था न होईल तर व्यापारी शहर सोडून जातील आणि सुरत ओसाड पडेल ! या भानगडीमुळें मलबार किनाऱ्याकडे जाणारीं गलबतें उशीरां सुटलीं.

फॅ. रे. सुरत भा. १०५ पृ. ६ इ.	(१३५४) मास्टर—प्रेसिडेंट	श. १५९२ मार्ग. व. १ इ. १६७० नोवें. १७

हें पत्र लिहीत असतांना **शिवाजीची हूल** उठली. दक्षिणेच्या बाजूला धूळ उडाली ती त्याच्या सैन्यामुळेंच अशी समजूत झाली. परंतु तार्तार राजाला औरंग०कडे नेण्याकरितां आलेलें **पेनायतखानाचे** सैन्यामुळें किंवा आपसांत भांडणाऱ्या वणजाऱ्यांच्यामुळें ती धूळ उडाली अशी बातमी आल्यामुळें भीती ओसरली.

पळयांना घेऊन जाणाऱ्या होड्या थांबवून 'कोणीं पळून जाऊं नये' म्हणून दंवडी पिटविली. परंतु उपयोग झाला नाहीं.

आम्हीं झटून रक्षण करूं. **शिवाजीनें** आपण होऊन बोलणें केल्याशिवाय आम्हींहि बोलणार नाहीं.

तार्तार राजा कालच्या हुलीमुळें पाण्यांतून (होडींतून) 'राण्याले'स (?) गेला.

फॅ. रे. सुरत भा. १०५ पृ. ७२ इ.	(१३५५) मुंबई—सुरत	श. १५९२ मार्ग. व. १ इ. १६७० नोवें. १७

आम्हांला अशी खात्रीलायक बातमी आहे कीं, येथून ५१ मैलांवर **नागांवला**, वेढा व हल्ला करण्याला लागणारें सर्व सामान, निदान ४० दिवसांची रसद, खोरीं, टिकावें इत्यादि खणण्याचीं हत्यारें, व एका क्षणाची सूचना देतांच निघावयास तयार असणारे ३००० लोक इत्यादि साधनांनीं जय्यत तयार असलेलें **मोठें आरमार** शिवाजीनें

सज्ज केलें आहे. तो कोठें जाणार हें नक्की माहीत नसल्यामुळें आम्हांला त्याच्या पाळतीवर राहिलें पाहिजे. त्याचा एक ब्राह्मण हस्तक **७।८ जागांचें नांव घेऊन** कांहीं जोखमीची कामगिरी आहे असें सांगतो. तो **मुंबईचेंहि** एक नांव घेतो. तो येथें कांहीं वाटाघे घेऊन जाण्याकरितां आला आहे. तो फक्त २ च तास बेटावर होता.

खं. २० ले. १२९ } (१३५६) { श. १५९२ मार्ग. व. ३
सु. १०७१ रजब १५ } मिसेली मु. मज. व सी. { इ. १६७० नोवें. १९

अज दिवा. पर. वाई— ता मोक. मौ. पसणीं, एकसर, वोझर्डे

नारायणभट बिन गोपिनाथभट चित्राव यांची वरील गांवीं १ चावर ३२ बिघे जमीन पूर्वीप्रमाणें त्यांचकडे चालू ठेवणें. (मु. श्री गिरमाजी गणेश पंडित. वाटोळा शिक्का.)

ओ कॉ. भा. ३१ } (१३५७) { श. १५९२ मार्ग. व. ४
नं. ३५१५ इ. } सुरत (स्वाली)—कंपनी. { इ. १६७० नोवें. २०

[मागील लेखांकांत आलेली हकीकत त्रोटक दिली आहे.]

ऑक्टोबरच्या पहिल्या दुसऱ्या तारखेला शिवाजीची हूल उठली तेव्हां त्याच्या १५००० घोडदळाला व पायदळाला तोंड देण्याला शहरांत पुरते ३०० लोकहि नव्हते! **मुअझ्झमचें** बंड आणि **शिवाजीचा** हल्ला दोन्ही आपत्तींकडे लक्ष देऊन आम्हीं बांधलेला सर्वच माल स्वालीला नेला होता. सुटा माल सुरतेंत होता त्याचा बंदोबस्त करण्याकरितां मास्टरला पाठविलें. मास्टर **२ ऑक्टोबर** रोजीं रात्रीं सुरतेकडे चालत गेला. त्यांना वेळ पडल्यास पळून येतां यावें म्हणून बंदरांत एक गलबत तयार ठेविलें होतें. **३ ऑक्टोबरला** शिवाजीचें सैन्य आलें.......**पहिल्याच दिवशीं** तार्तारांच्या जुन्या सराईवर व इंग्रजांच्या वखारीवर हल्ला झाला.......जुनी सराई सोडून तार्तार लोक गेल्यावर **शिवाजीला** तेथें सोनें, रुपें, मूल्यवान् पदकें, सोन्याचा पलंग वगैरे मिळालें.......तेथून इंग्रजांवर हल्ला; [मास्टरशीं बोलणें......] अखेरीला **किल्ल्यावर हल्ला** करण्याचा **आव** आणून तशी तयारी नसल्यामुळें ते परत फिरले. तहाचें मध्यंतरींचें बोलणें फुकट जाऊन **तिसऱ्या दिवशीं** पुनः शिवाजीचे लोक आले. परंतु मास्टरचा निश्चय पाहून त्यांच्या हवालदारानें मास्टरकडे आपला मनुष्य पाठविला. त्यानें असें सांगितलें कीं 'शिवाजी, तुम्हीं लोक मारल्यामुळें चिडून गेला आहे. तरी हलकासा नजराणा घेऊन तुम्हीं कोणाला तरी पाठवावें.' मास्टरनेंहि मालमत्ता व इतक्यांचें जीवित वाचविण्याला ही थोडी किंमत आहे असें पाहून नजराण्याची तयारी चालविली. आलेला व्यापारी राजापूरचा असल्यामुळें त्यानें इंग्रज राजापूरला पूर्वीप्रमाणें व्यापार कां करीत नाहींत? असें विचारलें. मास्टरनें राजापूरच्या लुटीचें व भरपाईच्या दिरंगाईचें कारण सांगितल्यावर इंग्रजांनीं यावें अशी शिवाजीची फार इच्छा असल्याचें त्यानें सांगितलें. पुढें दोन

माणसें नजराणा घेऊन गेलीं त्यांचें गोडीनें स्वागत करून 'आपण व इंग्रज मित्र आहोंत.' असें तो म्हणाला. आणि त्यांच्या हातांत हात घालून 'माझा हात हाच कौलापेक्षां ज्यास्त आहे' असें त्यानें सांगितलें. हे आपले शब्द खरे करण्याकरितां नोकर वखारींत परत येण्या-पूर्वींच शिवाजी निघून गेल्याचें समजलें. कोणीहि शत्रु जवळ नसतांना केवळ झालें तितकें पुरे असें समजून तो गेला. जातांना मुख्य अधिकारी आणि प्रमुख व्यापाऱ्यांकडे पत्र पाठवून 'दरसाल १२ लाख रुपये न द्याल तर पुनः पुढच्या वर्षीं येऊन राहिलेला शहराचा भाग जाळून टाकीन' असें त्यानें कळविलें. शिवाजी निघून जातांच गरीब लोकांनीं लूट करण्यास सुरवात केली.......खालीलाहि शाबंदर, काजी व मोठे व्यापारी येऊन राहिल्यामुळें शिवाजीची भीती कमी नव्हती. परंतु मोठी भरती असून उतारा-करितां बोटी न मिळाल्यामुळें नदीच्या पलीकडे शिवाजीचें सैन्य येऊं शकलें नाहीं. [विलाय-तेंत पाठवावयाचीं गलबतें शिवाजीच्या या लुटीमुळें वेळेवर पाठवितां आलीं नाहींत असें या पत्रांत व पुढें ता. ६ डिसेंबर (स्वाली कन्सल्टेशन) व १९ डिसेंबर (सुरत-कंपनी) वगैरे प संग्रहांतील पत्रांत उल्लेख आहेत.]

[दि.] अहमदाबादचा सुभेदार महाबतखान ३०० सैन्य घेऊन आला. सुमारें १० हजारांचा नजराणा घेऊन फ्रेंचांच्या राजाकरितां म्हणून महाबतखानानें एक हिरे-जडीत मुठीचा खंजीर व नऊ शिरपाव अशीं 'वस्त्रें' दिलीं. या देशच्या रिवाजाप्रमाणें शिरपाव हे फक्त राजे किंवा मोठे उमराव यांनीं कमी दर्जाच्या लोकांना द्यावयाचे असतात !......[लुटीची हकीकत]...प्रथम शिवाजी निघून गेला हें खरेंच वाटेना. कित्येक वेळां हुली उठल्या. आतां साधारण शांतता आहे.

फॅ. रे. सुरत भा. १०५ पृ. ७८ इ.	(१३५८) मुंबई—सुरत.	श. १५९२ मार्ग. व. ५ इ. १६७० नोवें. २१

मीं पाठविलेल्या हेरानें शिवाजीचे आरमारांत १६० छोटीं गलबतें स्वतः मोजलीं. त्याचा सेनापती वेंटाजी सारंगी (याला सामान्यतः दर्यासारंग म्हणतात) आहे. तो इसम खरा आणि चांगला असल्याचें गेल्या ७।८ वर्षांच्या अनुभवानें माहीत असल्या-मुळें त्याला मित्रत्वाचें पत्र लिहिलें. त्याचीं तीन गलबतें मीठ भरण्याकरितां येथें आलीं आहेत. 'तीं भरण्यास शक्य ती मदत करीन' असें आश्वासन देऊन 'हें आरमार कोठें जाणार' असें विचारलें. 'विश्वासू मनुष्य आल्यास तोंडी सांगेन' असें त्यानें कळविल्या-वरून मोदीच्या मुलाला पाठविलें. त्याच्याकडून शपथ घेववून 'ब्राह्मणांनीं २९ च्या तारखेस सुरतेचा किल्ला शिवाजीच्या हातीं येईल असें भविष्य वर्तविल्यामुळें, तो घेऊन पुढें भडोचकडे जाण्यासाठीं १० हजार घोडदळ, २० हजार पायदळ यांसह शिवाजी तिकडे जात आहे. मा २००० शिपाई घेऊन त्याला समुद्र मार्गानें जाऊन मिळणार' असें

त्यानें सांगितलें. 'क्रिश्चन आडवे न येतील तर शिवाजी त्यांच्या वाटेस जाणार नाहीं, असेंहि तो म्हणाला.

फॅ. रे. सुरत भा. ३ पृ. ११० इ. | (१३५९) स्वाली मरीन कन्सल्टेशन | श. १५९२ मार्ग व. ६ इ. १६७० नोव्हें. २२

देशावरील वखारींतून किनाऱ्यावर पाठवावयाचा माल पूर्वीप्रमाणें अर्ध्या किंमतीचाच विमा न उतरतां **भरकिंमतीचा** विमा उतरून पाठवावा असें ठरलें. कारण सरदारांमध्यें मतभेद आणि दुही असून **रजपुतांकडून** (शिपाई) वारंवार दरोडे पडतात.

फॅ. रे. सुरत भा. ३, पृ. ११२ इ. | (१३६०) स्वाली मरीन कन्सल्टेशन | श. १५९२ मार्ग. व. ८ इ. १६७० नोव्हें. २४

शिवाजीच्या १६० गलबतांच्या आरमाराबद्दलची माहिती मुंबईहून आली. **मुंबईच्या रक्षणाबद्दल** काळजी घेणें योग्य असल्यामुळें २०० मण दारू पाठवून त्यांना जरूर तेवढे सैनिक नवीन ठेविण्यास परवानगी द्यावी. त्यांचे सुरतेला आलेले लोक **सुरतेलाच जरूर** असल्यामुळें पाठवूं नयेत.

फॅ. रे. सुरत भा. १०५ पृ. ८०-८१ इ. | (१३६१) सुरत-स्वाली मरीन | श. १५९२ मार्ग. व. ११ इ. १६७० नोव्हें. २८

शिवाजी एवढें मोठें सैन्य घेऊन समुद्रांतून येईल तर तीनहि **युरपिअन राष्ट्रांनीं** एकी व स्नेहाचा तह करून विरोध करावा. स्वालीकडे त्याला प्रवेश मिळूं देऊं नये. कारण **स्वाली हें सर्वस्वी खिश्चनांचें** आहे; अशी प्रसिद्धि असल्यामुळें तें त्याच्या हातीं जाऊं देण्यानें आपली अब्रू जाईल. जर त्यानें आम्हांला चुकवून प्रवेश केला तर तुम्हीं त्याचे गलबतांवर तेथें बदला घ्यावा. + + + +

जलमार्गानें व खुष्कीनें उभय बाजूंनीं शिवाजी येत आहे अशी दाट बातमी आहे. ...पूर्वीप्रमाणेंच बंदराचें रक्षण करून शत्रूंचा नाश करण्याची कामगिरी सुभेदार आम्हांला सांगेल असें वाटतें.

फॅ. रे. सुरत भा. १०५ पृ. ८६ इ. | (१३६२) मुंबई—सुरत | श. १५९२ मार्ग. व. ११ इ. १६७० नोव्हें. २८

गुरुवारीं सकाळीं शिवाजीचें आरमार **तळ** जवळील **नागांवपासून** उत्तरेकडे निघालें. शुक्रवारीं **मुंबईवरून** व शनिवारीं **माहीमवरून** गेलें. यावरून सामान्य माहितीप्रमाणें **सुरतेलाच** चाललें असें वाटलें. परंतु शनिवारीं सकाळीं ८ वाजतां घुष्कळ वल्हीं असलेलीं २ छोटीं गलबतें, आरमार परत फिरविण्याकरितां गेलीं. **शिवाजी** स्वतः ३ दिवसांचे मुक्कामावर जाऊन **परत फिरला**. कारण काय तें समजलें नाहीं.

फॅ. रे. सुरत भा. ३ } (१३६३) { श. १५९२ मार्ग. व. १२
पृ. १११ इ. } स्वाली मरीन कन्सल्टेशन. { इ. १६७० नोवें २९

शिवाजीच्या जंगी तयारीमुळें **मुंबईला धोका** असल्याबद्दल मुंबईहून पुनः पत्र आल्यामुळें दारूगोळा घेऊन गलबत पाठवावें. **शिवाजीचीं** कांहीं गलबतें **मुंबई बंदरांत नांगरावयाचीं** आहेत अशी बातमी असल्यामुळें आणि मलबारी लोकांनीं मच्छमारी बोटी धरून नेल्या या उर्मटपणाचा बंदोबस्त करणें जरूर असल्यामुळें मुंबईंत व्यवस्था ठेवणें आवश्यक आहे.

फॅ. रे. सुरत भा. १०५ } (१३६४) { श. १५९२ मार्ग. व. १२
पृ. ८१ इ. } सुरत-स्वाली मरीन { इ. १६८० नोवें. २९ (?)

शिवाजीचें सैन्य येत आहे अशी बातमी **फत्तेखानाच्या** एका माणसानें आणिली. तो म्हणतो 'शिवाजी **पेठेहून** येत होता. आतां तो चिखलीला असेल. उद्यां येथें **(सुरतेस)** येईल....

फॅ. रे. सुरत भा. ३ } (१३६५) { श. १५९२ मार्ग. व. १२
पृ. ११३ इ. } स्वाली मरीन कन्सल्टेशन { इ. १६७० नोवें. २९

सुरत दुसऱ्यानें लुटण्याकरितां **शिवाजीनें** जमिनीवर आणि पाण्यावर एवढी मोठी तयारी केल्याची विश्वसनीय बातमी ऐकून स्वाली, होल व मरीन येथील मालमत्तेचें रक्षण करण्याकरितां, **फ्रेंच** व **डच** यांनीं सुचविल्याप्रमाणें त्यांच्या जोडीला एक गलबत **स्वालीचें** प्रवेशद्वार संभाळण्याकरितां पाठवावें व स्वालीला एक भिंत बांधावी. प्रतापशाली सैन्य घेऊन **शिवाजी** सुरतेजवळ आल्याची मास्टरनें बातमी दिली.

फॅ. रे. सुरत भा. १०५ } (१३६६) { श. १५९२ मार्ग. व. १३
पृ. ८१ (द्वि. सं.) इ. } मास्टर (सुरत)-प्रेसिडेंट (स्वाली) { इ. १६७० नोवें, ३०

धोक्याचे वेळीं **शिवाजीपासून** स्वालीचें रक्षण करण्याचे कामीं **डच**, व **इंग्रज** यांची एकी व प्रत्येकानें आपल्या सामर्थ्यानुसार उचलावयाचा भाग. इंग्रज आपल्या वखारींचें तेथेंच राहून रक्षण करितील तर **डचहि** करितील. मास्टरनें डचांना २ तोफा व एक पिस्तुल आणि बाणांचें भाते, धनुर्ष्ये इत्यादि पुरविलीं.

फॅ. रे. सुरत भा. १०५ } (१३६७) { श. १५९२ पौष शु. ४
पृ. ९२ (द्वि. सं.) इ. } मुंबई-सुरत { इ. १६७० डिसें. ६

मुंबईच **शिवाजीचें** उद्दिष्ट असण्याचा संभव लक्षांत घेऊन त्या **व्यापार-शत्रू** (Generall enemy of trade) पासून बचाव होण्याची खबरदारी घेतली. परंतु परत बोलावणें पाठवूनहि त्याचें आरमार परत न आल्यामुळें तो **सुरतेवरच** गेला असें वाटलें.

सा. ले. ३५९ } (१३६८) { श. १५९२ पौष शु. १३
शु. १०७१ साबान ११ } कौलनामा मु. व सी. { इ. १६७० डिसें. १४

दादाजी व मेलगिरी पंडित हवाल० व मुजुम० सिदगौडा भूपति व सिदगौडा लिंगौडा देसाई व पटेल व रामाजी आपाजी देसकु० पेठ अथणी

ता। सेटी व समस्त माहानाड.

तुम्हासी व जैनासी कळसाचे कुसूर आला म्हणून दोघे जणासी कासीसी पाठविले. तुम्हासी जयपत्र आलें कीं, जैनासी कळस करावया संबंध नाहीं. बडे साहेबीणीचेंहि तसेंच पत्र घेऊन आला. असें असतां जैनानी नवी जिकीर केली पण अपराध कबूल केला व पुढें निवाड–पत्राप्रमाणें वागू म्हणून सांगितलें.

फॅ. रे. सुरत भा. १०५ } (१३६९) { श. १५९२ पौष व. १
पृ. ९६ इ. } मुंबई–सुरत { इ. १६७० डिसें. १७

शिवाजी आणि त्याला असा धिंगाणा घालूं देणारा **औरंगजेब** यांचें झालें तरी काय, हें आपल्याकडून समजलें तर पाहिजे आहे. शिवाजीच्या **आरमारा**पैकीं **पोर्तुगीजांनीं** १२ गलबतें पकडलीं. तीं **वसईला** ठेवून इतरांचा ते पाठलाग करीत आहेत. शिवाजी **दमणवरून** गेला तेव्हां त्यानें तेथें बांधलेलें १२००० रु. किंमतीचें मोठें गलबत सुरतेला जात असतांना पकडलें गेलें. यामुळें थोडी चकमक झाली...... आतां शिवाजीचें राहिलेलें आरमार **दाभोळला** आल्याची खात्रीलायक बातमी कळली.

फॅ. रे. सुरत भा. १०५ } (१३७०) { श. १५९२ पौष व. ३
पृ. ९० इ. } मास्टर, सुरत–स्वाली { इ. १६७० डिसें. १९

आजची बातमी अशी आहे कीं, **शिवाजी बऱ्हाणपुरा**वरून गेला. बादशाही खजिन्यांतील ३ लाख रुपये मिळाल्यामुळें **जसवंतसिंगानें** शिवाजीला शहरांत येण्यास बंदी केली म्हणून शिवाजी **कारिंजा**कडे वळला. कारंजा सधन आहे तें त्यानें लुटलें व तेथील सर्व थोर लोकांना धरून नेलें. एक बराच मोठा इसम मात्र स्त्रीवेष करून पळून गेला. जातांना **शिवाजीनें** नंद्राबादचे व आसपासचे सर्वांकडून **वसुलाची चौथाई** आपल्याला भरण्याबद्दल लिहून घेतलें आहे.

फॅ. रे. सुरत भा. १०५ } (१३७१) { श. १५९२ पौष व. ४
पृ. १५० इ. } { इ. १६७० डिसें. २०

मोंगलांच्या दरबारचा गोलंदाज जॉन ट्रॉटर—सुरतेचा प्रेसिडेंट

येथील राजकारणांतील खित्तंबातमी एक बादशहा, दुसरा मुअज्झम आणि तिसरा शिवाजी यांशिवाय कोणालाच नाहीं. परंतु शहाणे शहाणे राजे, व उमराव यांचें असें

मत आहे कीं, मुअझ्झम शिवाय दुसरा कोणी लायक वारस नसल्यामुळें बादशहा त्यालाच गादीवर बसविणार आहे. शहाजादा दिलेरखानावर चालून गेल्यावर आम्ही ब-हाणपुरास आलों. सर्व लष्करला एक महिन्याचा पगार देण्याचा शहाजाद्यानें हुकूम दिला. पण त्याच दिवशीं औरंगाबादेस परत फिरण्याचा बादशाही हुकूम आला तो त्यानें मानिला. त्या वेळीं बादशहाजवळ लष्कर पुरेसें नसल्यामुळें मुअझ्झम परत गेल्याचें पाहून त्याला बरें वाटलें. नाहींतर मुअझ्झम आज हिंदुस्थानचा सिंहासनाधीश झाला असता. भावी वारसा निश्चित झाला तथापि मुअझ्झम राज्यारोहणार्थ उतावीळ झाला आहे. मात्र उघडपणें बंड न करितां शिवाजीशीं युद्ध चालू ठेवून त्याकरितां दक्षिणेकडे सैन्य न्यावें आणि उत्तरेस धाकट्या भावाच्या हातांशीं फार सैन्य राहूं देऊं नये अशी व्यवस्था तो करीत आहे.

६ महिन्यांपूर्वी शिवाजी व मुअझ्झम यांचें परस्पर संबंधांविषयीं आणि राजपुत्रावर उठविलेल्या कुभांडाविषयीं चौकशी करण्याकरितां पाठविलेला खानसामा उभय बाजूंना लावालावी करितो. 'दिलेरखान तुझा शत्रू आहे' असें मुअझ्झमला सांगतो; तर उलटपक्षीं दिलेरखानाला जाऊन सांगतो कीं, 'तूं औरंगाबादेला येशील तर राजपुत्र तुला धरणार आहे.' यामुळें उभयतांत वैमनस्य माजलें आहे. खानसामा आग्र्याला गेल्यावर राजपुत्र आणि दिलेरखान या दोघांच्या पत्रांवरून खानसामाचा नीचपणा उघडकीस आला. बादशहा त्याचा शिरच्छेदच करणार होता. परंतु बड्या बेगमेच्या रदबदलीमुळें शेवटीं त्याला काबूलला पाठविण्यांत आलें.... शिवाजीनें व-हाडचें मुख्य शहर कारंजा लुटलें. तेथून उत्तम कापड, सोनें, रुपें इत्यादि १ कोटीचा माल त्यानें ४००० बैल व गाढवें लादून नेला. इतरत्रहि पुष्कळ लूट केली. सर्वांत जास्त लुट त्यानें राजपुत्राच्या जहागिरींत केली. महाबतखान २० दिवसांत येईल व त्या वेळीं सर्व खरे प्रकार उघडकीस येतील.

खं. १५ ले. १२६ सु. १०७१ साबान २१	(१३७२) मिसेली मु. व सी.	श. १५९२ पौष व. ८ इ. १६७० डिसें. २४

अज. दि. पर. वाई—मोक मौ. निंब व गोवे.

मोहनगिरी मुरीद आनंदगिरी यांस नींब व गोवे येथें १ चावर जमीन इनाम आहे. २७ जखरचे खुर्दखत आहे. तरी ते इनाम चालविणें. (श्री, तिमाजी गणेश पंडित.) (वा. शि.)

फॅ. रे. सुरत भा. १०५ पृ. १०० इ.	(१३७३) सुरत, मास्टर-स्त्राली, प्रेसिडेंट.	श. १५९२ माघ शु. ३ इ. १६७१ जाने. ३

शिवाजी येथें आल्यावेळीं तिन्ही ख्रिश्चन राष्ट्रांनीं शिवाजीशीं संगनमत

केलें होतें कीं काय हा एक शहरांत आणि दरबारांत चर्चेचा विषय होऊन बसला आहे. त्यांपैकीं कोण या दोषास पात्र आहे अशाबद्दल तपास करावा म्हणून बादशहाकडून सुभेदारास हुकूम आला आहे.

ओ. कॉ. भा. ३१ नं. ३५३८ इ.	(१३७४) सुरत (स्वाली)-कंपनी	श. १५९२ माघ शु. ९ इ. १६७१ जाने. ९

शिवाजी व मोंगल सशस्त्र रणांगणांत उतरले असल्यामुळें, व शिवाजीचें मोठें सैन्य जवळपास असल्यामुळें, आमचे येथील (मुंबईची) तटबंदी शक्य तितक्या त्वरेनें केल्यानें केवळ आमच्याच रक्षणाची काळजी दूर होणार आहे असें नसून, किनाऱ्यावरील युद्धाच्या त्रासाला कंटाळून आमच्या आश्रयास येतील त्यांचीहि सोय होणार आहे.

'[दि. व इं. फॅ. भा. १३ पृ. ८५ टीप]–भीमजी पारख या नांवाच्या कंपनीच्या दलालानें कांहीं ब्राह्मणी लिखाण छापण्याकरितां इंग्लंडांतून एक छापणारा बोलावून त्याचा पगार देण्याचें कबूल केलें. (तीन वर्षांनीं ही मागणी पुरविण्यांत आली !)'

सात तारखेला जेराल्ड ऑंजिअर मुंबईला जाण्याकरितां निघाला असतां शहरचा सुभेदार व शहाबंदर या उभयतांनीं मुद्दाम निरोप पाठवून जाऊं नका असें कळविलें. वाकेनवीसाला गतसालीं आम्हीं नजराणा न दिल्यामुळें त्यानें बादशहाला असें सुचविलें कीं, इंग्रजांचें व शिवाजीचें सुरत जाळण्यांत संगनमत होतें; यामुळें शिवाजीचे मुलखाला नजीक असलेल्या मुंबई बेटाकडे जाण्यानें या खोटया बातमीला बळकटी येईल व बादशहा आम्हांला दिलेल्या सवलती काढून घेईल असेंहि त्यांनीं सुचविलें. यामुळें मुंबईला जाण्याचा बेत रहित केला.

शिवाजीचें सैन्य सुरतेपासून ४० मैलांवर आल्याची बातमी आली असून शहरांत भीती पसरली आहे.

ओ. कॉ. भा. ३१ नं. ३५४२ इ.	(१३७५) मुंबई–सुरत.	श. १५९२ माघ शु. १४ इ. १६७१ जाने. १४

प्रेसिडेंट व कौन्सिल मुंबईस येणार होते व त्यानंतर तेथील एकंदर वृत्तांत कंपनीला कळवावयाचा होता. परंतु शिवाजीनें अलीकडे (आक्टो.) सुरतेला त्रास दिल्यामुळें तो बेत रद्द होऊन वचन दिल्याप्रमाणें हकीकत देतां येत नाहीं.

[दि]– सैन्याची हजेरी पाठविली आहे. त्यांत थोडे इंग्रज असून बाकीचे लोक हिंदी शत्रूशीं लढण्यास समर्थ असले तरी युरोपिअनांबरोबर लढतांना त्यांच्यावर विसंबतां येणार नाहीं असें वाटतें.

शि. च. ले. ६२ } (१३७६) { श. १५९२ माघ व. २
सु. १०७१ रम १५ } तगादा फा. मु. व सी. { इ. १६७१ जाने. १७

अज माहाल देसमुख पर० कऱ्हाड व सरदेसमू०— ता मोक० ता मसूर.

गारवडे, आइतवडे वगैरे गावी गिजरे यांस जो धर्मादाऊ इनाम आहे त्याचा पैका पाठविजे. मखुमभाई अफराद पाठविला आहे.

ओ. कॉ. भा. ३१ } (१३७७) { श. १५९२ माघ व. १३
नं. ३५४७ इ. } सुरत-कंपनी { इ. १६७१ जाने. २८

शिवाजीच्या नांवाचा दरारा अद्याप सुरतेंत भासतो. दख्खनमध्यें त्यानें मुलूख उध्वस्त केला असून त्याचें सैन्य वेगानें इतस्ततः अप्रतिहत संचार करीत असतें. त्याची येथें नेहमीं भीती वाटत असल्यामुळें आत्मसंरक्षणार्थ खर्च आणि मेहनत करावी लागते !...परंतु बादशहाचा शिवाजीवर पाठविलेला **सेनापति महाबतखान** मोठें सैन्य घेऊन बऱ्हाणपूरपर्यंत आला असून लवकरच शिवाजीला पायबंद बसेल आणि आपला व्यापार सुरळीत चालेल.

सुरतेला **शिवाजीच्या सैन्याची** भीति पुढेंहि पुष्कळ दिवस वाटत होती. असे उल्लेख (१) ओ. कॉ. भा. ३२ नं. ३५६६; तारीख **१६७१ एप्रील** ७; सुरत-कंपनी (२) फॅ. रे. सुरत भा. १०५ पृ. १७३; **१६७१ जुलै १५**; जेम्स-प्रेसि०

फॅ. रे. सुरत भा. १०५ } (१३७८) { श. १५९२ फाा शु. ८
पृ. ११४ इ. } मुंबई-सुरत. { इ. १६७१ फेब्रु. ६

महाबतखान ४० हजार घोडेस्वार घेऊन औरंगाबादला आला. त्यानें राजा **जसवंतसिंगाला** बऱ्हाणपुराहून परत फिरविलें. तो तिकडे पैसे उभारावे नाहींतर बऱ्हाणपूर लुटावें अशा उद्देशानें गेला होता. त्यानें दाउदखानाचा मुलगा तेथें सुभेदार होता त्याजकडे ५ लाख रु. मागितले. 'औरंगजेबाचा हुकूम आणा व २० लाखहि घेऊन जा ! परंतु त्याशिवाय एक पैसा मिळणार नाहीं' असा जबाब देऊन लगेच त्यानें आपल्या बापाला लिहिलें. **दाऊदखान** जवळच साल्हेरीला होता तो मुलाचे मदतीस निघाला. तेवढ्यांत शिवाजीनें **साल्हेर** घेतला. शिवाजी अजून **राजगडला** परत आलेला नाहीं. दाऊदखान १२००० फौज घेऊन **जुन्नरला** आला. करीम बेग **कल्याणचा** सुभेदार होणार. दिलेरखान व महमद अमीन (मीर जुमल्याचा मुलगा) यावयास निघाले. **मुअझ्झम** अजून **महाबतखानाला** भेटला नाहीं. त्याचा खानावर विश्वास नाहीं. थोड्याच दिवसांत काय तें स्वरूप दिसेल.

लेटर बुक भाग ४ } (१३७९) { श. १५९२ फाा व. ८
पृ. ४२६ इ. } कंपनी-सुरत. { इ. १६७१ फेब्रु. २२

इतर हिंदी राजांप्रमाणेंच **शिवाजीशीं आतां तो प्रबळ झाल्यामुळें**

सलोख्याचे संबंध राखावे. मुंबईचे लोकांनीं स्नेह-संबंध ठेवावा. सुरतेहून पत्र-व्यवहार ठेविल्यास (मोंगलांच्या) शत्रूंशीं संबंध ठेविल्याचा आक्षेप येऊन त्रास होईल! सुरतेला सामर्थ्याच्या बाहेर त्रास होऊं लागेल तर सर्वच मालमत्ता मुंबईला उचलून न्या.

खं. ८ ले. २० } सु. १०७१ (१३८०) { श. १५९२ इ. १६७०

अज र० रा० जिजाआऊ साहेब

ता। नारो त्रिमळ हुदे० व मोक० व रया० मौ० किवाड तर्फ खेडबारे

मौ० किवाड येथे हरी गोविंद यास १ चावर जमीन इनाम आहे. मधे भोगवटा तुटला होता. तरी तो पूर्वीप्रमाणें निळो सोनदेऊ याचे हवाली करून चालविणे.

शि. घ. ले. ६३ } सु. १०७१ (१३८१) खुर्दखत { श. १५९२ इ. १६७०

अजर० सैदतसादात वलद सैदुललतीफ मोकाशी मौ० कोणेगाव पर० कऱ्हाड.

ता। हुदे० व मोक० मौ० कोणेगाव

आपदेव बिन कृष्णभट सेकिन कोणेगाव याची कोणेगाव येथील नीम चावर जमिन पूर्वीप्रमाणें त्यांजकडे चालविणें. हाली साहेबासी मोकासा मिळाला आहे.

को. इ. सा. ले. ९५ } (१३८२) { श. १५९२ ? इ. १६७०

चिटणीस (कुडाळ देशकर ब्राह्मणसरदेसाई) यांची वंशावळ.

सा. ले. ५० ? } (१३८३) {

वेंकाजी बायदेऊ— महादाजीपंत गोसावी

३ वर्षे सात महिने झाले सिवाजी राजया करितां एक महिना रसदे पडला. हवालदारानें धांडोरा पिटिला. बकालपैकीं घाटाखालीं जाईल तो गुन्हेगार तेव्हां महिना पडिला. तो कोण देईल वगैरे मजकूर.

सा. ले. ६१ ? } (१३८४) {

निळो सोनदेऊ— महादाजीपंत स्वामी गोसावी

आपल्या म्हणण्याप्रमाणें आम्ही इतके दिवस येथें होतो. आतां कांहीं कार्यनिमित्य आपल्या गांवास जातो. वगैरे.

निकोलस, पृ. ६१ }
इ. }

(१३८५)

{ श. १५९२
{ इ. १६७०

अमरर्टि(सिं)ग नांवाच्या हिंदु राजाचें बरेंच मोठें सैन्य आसाममधून निघून, **मोंगलांचें सैन्य शिवाजीवर** चालून जाणार होतें, त्याला मिळण्याकरितां दिल्लीआम्याच्या रोखानें चालले होतें।

सा. ले. ३६० }
श. जिल्काद १ }

(१३८६)
क्रयपत्र

{ श. १५९३ चैत्र शु. ३
{ इ. १६७१ मार्च ३

शेखभाई बिन सैदभाई कोरबलें कस. अथणी

सित्राप्पा मुचडी कसबे अथणी

आम्ही आपलें घर तुम्हास दहा होनास विकत दिलें आहे.

राम. अं. ६५ ले. १५ }
सु. १०७१ जिल्काद ९ }

(१३८७)
फा. मु. व सी.

{ श. १५९३ चैत्र शु. १०
{ इ. १६७१ मार्च ११

अजर. त्रिंबकजी राजे [भोसले] — कारकून पा। आकोट

विश्वनाथभट येलूरकर याची साल ग्याची वरात फिरवून लावली. तर असें न करतां थैके देणें.

खं. ८ ले. १९ }
सु. १०७१ जिल्काद १५ }

(१३८८)

{ श. १५९३ चैत्र व. २
{ इ. १६७१ मार्च १७

तह बाबाजी सावंत याणें तरतूद करून, चिंतामणीस व कुणबिणीस दिवाळ कोट पारखा करवून, कोटास दिवाळा व पारखा करवून, देववावा. येणेंप्रमाणें पारखा कोट करून आपणास कोट घेऊन द्या. म्हणजे सरंजाम करून येणेंप्रमाणें चालवावेः--

बाबाजी सावंत यास पाचशा घोडियाचे जितरब द्यावें.

चिंतामणीस दिवाळ व कुणमणीस दिवाळ यास इनाम अर्धा कोटांतील द्यावा व पर्चा गांव चालवावे.

येणेंप्रमाणें चालवावें. ऐसा तह केला असे. मोर्तब सूद. (मर्यादेयं विराजते)

(से.) फॅ. रे. सुरत भा. १०५ }
पृ. १६४ इ. }

(१३८९)
मुंबई-सुरत

{ श. १५९३ अ. वै. ९
{ इ. १६७१ एप्रील ७

डेप्युटी गव्ह. नें पूर्वी सांगितलेल्या २ तोफा एका फ्रेंच माणसाला विकल्या. त्यानें ठाण्याच्या एका व्यापाऱ्याला विकल्या. त्यानें त्या **शिवाजीकडे** पाठविल्या असें आम्हीं ऐकितों. [मुळांत हें पत्र इ. १६७३ मध्यें लागलें असून तें येथें १६७१ पैकीं घ्यावें; असें डॉ. सेन यांचें मत आहे.]

[द्दि. ओ. कॉ. नं. ३५६६]–मोगल बादशहाचा स्वतःचा मुलगा आणि राज्यांतील मोठे उमराव यांचा **शिवाजीच्या बंडाला पाठिंबा** आहे... ... ...

फॅ. रे. सुरत, भा. १०५ } (१३९०) { श. १५९३ अ. वैशा. शु. १०
पृ. १६६ (द्वि. सं.) इ. } मुंबई–सुरत { इ. १६७१ एप्रील ८

एवढें मोठें सैन्य **शिवाजी**विरुद्ध येत आहे, ह्याबदल आम्हांला आनंद वाटतो. **मोहबतखान** नासीक–त्रिंबकपर्यंत आला आणि हातगड (Huturnt ?), साल्हेर इत्यादि ४ किल्ले त्यानें घेतले.

डाग रजि. १६७१ } (१३९१) { श. १५९३ वैशाख शु. ३
पृ. ३१८ इ. मे ११ न्यू. } { इ. १६७१ मे १

दरोडेखोर **शिवाजी** हा सुरतेस यथेच्छ चरत आहे. यामुळें (डच) कंपनीचा व्यापार बंद पडला आहे.

खं. ८ ले. २८ } (१३९२) { श. १५९३ वैशाख शु. १५
सु. १०७४ सफर १२ } श्रीभवानी शंकर { इ. १६७१ मे १३

रा. **शिवाजी** राजे—म. अ. जुमलेदारानी व हवालदारानी व कारकून दिमत पायगो मुकाम मौ. हलवर्ण ता चिपळूण मामले दाभोळ प्रतिः––कसबे चिपळुणी साहेबी लष्कराची विले केली आणि या उपरि घाटावरि कटक जावें ऐसा मान नाहीं. म्हणून ऐव्हां छावणीस रवाना केलें. ऐसियास, चिपळुणी कटकाचा मुकाम होता. याकरितां दाभोळच्या सुबे यांत पावसाळ्याकारणें पागेस साभा व दाणा व वरकड केला होता तो कितेक खर्च होऊन गेला. व चिपळुणा आसपास विलातितील लष्कराची तसवीस व गवताची व वरकड हरएक बाब लागली. त्याकरितां हाल कांहींएक उरला नाहीं. ऐसें असतां, वैशाखाचे वीस दिवस उनाळा, हेहि पागेस अधिक बैठी पडली. परंतु जरूर जाले. त्याकरितां कारकुनाकडून व गडोगडीं गल्ला असेल तो देववून जैसीतैसी पागेची बेगमी केली आहे. त्यास तुम्ही मनास ऐसा दाणा, रातीब, गवत मागाल, असेल तोवरी धुंदी करून चाराल, नाहींसें जालें म्हणजे मग कांहीं पडत्या पावसांत मिळणार नाहीं, उपास पडतील, घोडी मरायास लागतील. म्हणजे घोडीं तुम्हींच मारिलीं ऐसें होईल, व विलातीस तसवीस देऊं लागाल. ऐशास लोक जातील, कोण्ही कुणब्याचे येथील दाणें आणील, कोण्ही भाकर, कोण्ही गवत, कोण्ही फाटे, कोण्ही भाजी, कोण्ही पाले; ऐसे करूं लागलेत म्हणजे जे कुणबी घर धरून जीवमात्र घेऊन राहिले आहेत तेहि जाऊं लागतील. कित्येक उपाशीं मराया लागतील. म्हणजे त्याला ऐसें होईल कीं, मोगल मुलकांत आले त्याहूनहि अधिक तुम्हीं ! ऐसा तळतळाट होईल ! तेव्हां रयतेची व घोडियांची सारी बदनामी तुम्हावरी येईल.

हें तुम्ही बरें जाणून, सिपाही हो अगर पावखलक हो, बहुत यादी धरून वर्तणूक करणें. कोण्ही पागेस अगर मुलखांत गांवोगांव राहिले असाल त्याणीं रयतेस काडीचा आजार द्यावया गरज नाहीं. आपल्या राहिला जागाहून बाहीर पाय घालाया गरज नाहीं. साहेबीं खजान्यांतून वाटणिया पदरीं घातलिया आहेती. ज्याला जें पाहिजे, दाणा हो अगर गुरें-ढोरें वागवीत असाल त्यांस गवत हो, अगर फाटे, भाजीपाले व वरकड विकाया येईल, तें रास घ्यावे, बाजारास जावें, रास विकत आणावें. कोण्हावरी जुलूम अगर ज्याजती अगर कोण्हासी कलागती करावयाची गरज नाहीं. व पागेस सामा केला आहे तो पावसाळा पुरला पाहिजे. ऐसे तजविजीमें दाणा रातीब कारकून देत जातील तेणेंप्रमाणेंच घेत जाणें. कां उपास न पडतां रोजबरोज खायाला सांपडे आणि होतहोत घोडी तवाना होत ऐसें करणें. नसतीच कारकुनासी धसपस कराया, अगर अमकेंच द्या, तमकेंच द्या, ऐसें म्हणाया, धुंदी करून खासदार कोठींत कोठारांत शिरून लुटाया गरज नाहीं. व हालीं उन्हाळ्याला आहे तइसें खलक पागेचे आहेत. खण धरून राहिले असतील व राहतील, कोण्ही आगट्या करितील, कोण्ही भलतेच जागा चुली, रंधनाळा करितील, कोण्ही तंबाकुला आगी घेतील, गवत पडिलें आहे ऐसें अगर वारें लागलें आहे ऐसें मनास ना आणितां म्हणजे अविस्राच एखादा दगा होईल. एका खणास आगी लागली म्हणजे सारे खण जळोन जातील. गवताच्या लव्हाळ्यांस कोणीकडोन तरी विस्तो जाऊन पडला म्हणजे सारें गवत व लहळ्या आहेत तितक्या एकेएक जाळों जातील. तेव्हां मग कांहीं कुणबियांच्या गर्दना मारल्या अगर कारकुनांस ताकीद करावी तैसी केली, तऱ्ही कांहीं खण कराया एक लाकूड मिळणार नाहीं, एक खण होणार नाहीं. हें तों अवघियाला कळतें. या कारणें, बरी ताकीद करून खासे खासे असाल ते हमेसा फिरत जाऊन, रंधनें करितां, आगट्या जाळितां अगर रात्रीस दिवा घरांत असेल, अविसाच उंदीर वात नेईल, ते गोष्टी न हो. आगीचा दगा न हो. खण गवत वाचेल तें करणें. म्हणजे पावसाळा घोडीं वाचलीं. नाहीं तर मग घोडीं बांधावीं न लगेत, खायास घालावें न लगे. पागाच बुडाली. तुम्हीं निसूर जालेत ऐसे होईल. या कारणें तपशिलें तुम्हास लिहिले असे. जितके खासे खासे जुमलेवार, हवालदार, कारकून आहा तितके हा रोखा तपशिलें ऐकणें, आण हुषार राहणें. वरचेवरी रोजचारोज, खबर घेऊन, ताकीद करून, येणेंप्रमाणें वर्तणूक करितां, ज्यापासून अंतर पडेल, ज्याचा गुन्हा होईल, बदनामी ज्यावर येईल, त्यास मराठियांची तो इज्जत वाचणार नाहीं, मग रोजगार कैसा ? खळक समजों-जास्ती केल्यावेगळ सोडणार नाहीं. हें बरें म्हणून वर्तणूक करणें.

स. पू. ८१ हि. १०८२ मोहर १७	(१३९३) फर्मान	श. १५९३ वैशाख व. ४ इ. १६७१ मे १७

बादशहा विजापूर— मुल्ला महंमद शरीफ पर. जाफराबाद उर्फ चांदवड सुभे औरंगाबाद

रोज अर्धा रुपया नख्त व २०० बिघे पड जमीन मुल्ला यांस दिली आहे. ते मशिदीची चाकरी वगैरे करितील तरी चालविणें.

फॅ. रे. सुरत भा. १०५ } (१३९४) { श. १५९३ वैशाख व. १४
पृ. १८० (द्वि. सं.) इ. } कारवार-सुरत { इ. १६७१ मे २७

बऱ्हाणपूरच्या व आसपासच्या व्यापाऱ्यांकडून दरबैलीं एक रुपया घेण्याचा करार करून **शिवाजीनें** त्यांना (दक्षिणेकडे) मोकळे सोडल्यामुळें **हुबळीला** (खरेदीदारांची) गर्दी होऊन चढाओढींत मिऱ्यांचा दर चढला आहे.

फॅ. रे. सुरत भा. १०५ } (१३९५) { श. १५९३ ज्येष्ठ शु. २
पृ. १६८ (द्वि. सं.) इ. } मुंबई-सुरत { इ. १६७१ मे २९

मो(ह)बतखानानें ५ किल्ले घेतले. **मुअज्झमला** फक्त ७०० घोडेस्वारांनिशीं औरंगाबादेस सोडून **जसवंत**सिंगाला घेऊन तो (खालीं) आला. **मोहबतखानाचीं** दंडाराजपुरीच्या **सिद्याला पत्रें** गेलीं. **दिलेरखान** व **बहादरखान** कोठपर्यंत आले हें कळलें नाहीं.

ओ. कॉ. भा. ३२ } (१३९६) { श. १५९३ ज्येष्ठ शु. ५
नं. ३५६७ इ. } सुरत-कंपनी { इ. १६७१ जून १

बादशहानें **बहादरखान** आणि **दिलेरखान** हे दोन उमराव **शिवाजीच्या** मुलुखावर पाठविलें. ते सुरतेस आले. सुरतेशिवाय इकडील **सर्व मुलखाचा कारभार** बादशहानें **दिलेरखानाच्या** हवालीं केला आहे.

खं. १५ ले. १२७ } (१३९७) { श. १५९३ ज्येष्ठ व. १
सु. १०७२ सफर १५ } दुमालापत्र { इ. १६७१ जून १३

फत्तेखान व मिराखान किल्ले सातारा- मोक. मौ. निगडी
निगडी येथील सदानंद मठाचा इनाम त्याचे दुमाला केला असे.

त्रै. व. ६ ले. ११ व १२ } (१३९८) { श. १५९३ ज्येष्ठ व. ५
पृ. ७५ } कबूल-कतबा फा. मु. व सी. { इ. १६७१ जून १६

रा. जानराऊ मंबाजी व रा. नारोजी येसवंतराउ-वे. गणेश भट दीक्षित सो वनी तुम्ही आमचे परंपरागत तीर्थपुरोहित. आम्हीं व आमचे वंशज तुम्हाकडे चालवितील.

लेटर बुक भा. ४ } (१३९९) { श. १५९३ ज्येष्ठ व. १२
पृ. ४६०-६२ इ. } कंपनी-सुरत { इ. १६७१ जून २३

शिवाजी आणि त्याच्या रियासतींतील लोक यांपासून पुढें **त्रास होत रहा-**

णार याचा विचार करून तो टाळण्याकरितांहि **मुंबईला जाणें** कितपत श्रेयस्कर आहे हें ठरवावें. **तद्देशीय लोकांना विकत देण्यासाठींहि** तोफा मुंबईस पाठवूं. देशी गलबतांना याचे आदिकरून शत्रूंशीं युद्ध करण्याचीं साधनें आपण पुरविल्यानें आपली कांहींच हानी नाहीं. ...... **राजापूरची** नुकसानी भरून घेण्याबद्दल तहाचें बोलणें झालें नसल्यास तेथें वखार पुनः स्थापण्याबद्दल बोलणें करावें. त्यामुळें व्यापाराशिवाय इतर दृष्टीनेंहि आपला फायदा होईल. तो (शिवाजी) इतक्या उत्सुकतेनें बोलावीत आहे त्या अर्थी सुरक्षितपणाबद्दल शंका घेण्याचें कारण नाहीं.

त्रै. व. ७ पृ. ४६ }
सु. १०७२ सफर२८ }
(१४००)
{ श. १५९३ ज्येष्ठ व. ३०
{ इ. १६७१ जून २६

तान्हाजी जनार्दन हवालदार व कारकून ता। निरथडी पा। पुणें प्रति राजश्री **शिवाजी राजे**:- परिंचाचे पाटिलकीसी कान्होजी खराडे नसता कथला करून घर तेथें बांधतात. तरी कथला करू न देणे. वैकुंठवासी साहेबाचे व दादाजीपंताचे कारकीर्दीस चालिले आहे ते करार आहे. तेणेप्रमाणे चालवणे. नवा कथला करू न देणे. व परिंच्या कान्होजी खराडे यास घर बाधो न देणे. मोर्तब सुद. (मर्यादेयं विराजते).

फॅ. रे. सुरत भा. १०५ }
पृ. १८४-८६ (द्वि. सं.) इ. }
(१४०१)
मुंबई-सुरत
{ श. १५९३ आषाढ व. १
{ इ. १६७१ जुलै १२

डेप्युटी गव्हर्नरनें पूर्वी पाठविलेल्या पत्राचें **शिवाजी** काय उत्तर देतो तें आल्यावर आपल्याकडे पाठवून, त्यावर आपल्या सूचना येतील तसें करूं. विजापूरचा आदिलशहा, रुस्तुमजमा, तिमाजी या सर्वांचे **कर्जाचा आंकडा** आम्हीं हिशेबांत दाखविला आहे; तो देखील शिवाजीनें द्यावा काय ? राजापूरचे व्यापाऱ्यांकडूनच जेवढें येणें असेल तें देण्याला अर्थात् त्यांना तो भाग पाडील....मुंबई बेटावर चोऱ्या बंद होत नाहींत; चोर इतके धीट झाले आहेत कीं कांहीं दिवसांपूर्वी एक भाड्याची होडी करून **शिवाजीच्या** मुलखांत जाऊन त्यांनीं एका ब्राह्मणाचें घर लुटलें व कानांतील दागिना घेण्याकरितां एका मुलीचे कानच तोडले !

फॅ. रे. सुरत भा. १०५ }
पृ. १७३ (द्वि. सं.) इ. }
(१४०२)
चार्लस जेम्स-सु. प्रे. (स्वाली)
{ श. १५९३ आषाढ व. ४
{ इ. १६७१ जुलै १५

अशी बातमी आली कीं **शिवाजी** ह्या बाजूला ५० मैल सरकला आहे. त्यामुळें शहरांत लोक भेदरून गेले आहेत.

खं. ८ ले. १८ }
सु. १०७२ रबल २७ }
(१४०३)
{ श. १५९३ आषाढ व. १४
{ इ. १६७१ जुलै २४

विठल दत्तो सुभेदार व कारकून ता। जाउली प्रति **शिवाजी राजे** दंडवत:-

प्रतापराऊ सरनोबताकडे हुजरून दहा हजार रुपये ऐवज पाठविला आहे. तरी सदरहूस बोझीस इतबारी नफर १० दहा देणें. मजुरास मजुरी रास देऊन सिताब वरच्यावरी रवाना करणे. मोर्तब सूद

खं. १८ ले. १८
सु. १०७२
(१४०४)
निवाडा
श. १५९३ श्रावण शु. ७
इ. १६७१ आगस्ट २

बिहुजूर मजालसी गोत सासवड वगैरे सहा गांवे. जानोजी व एमाजी यांनीं गोत सांगेल त्याप्रमाणें वागू म्हटल्यावर गोतानें निवाडा केला कीं, मोकदमी जानोजीची. एमाजीची नव्हे.

खं. १८ ले. १८
सु. १०७२ रवल २६
(१४०५)
उल्लेख
श. १५९३ श्रावण शु. ७
इ. १६७१ आगस्ट २

अज दि० ठाणे तर्फ कन्हेपठार—ता मोक० सासवड वगैरे सहा गावः—जानोजी व एमाजी कुंभारकर मोक० मौ० वणपुरी ता पुणे. यामध्यें बापभाउबीचें भांडण आहे. यैसिगास जानोजी साहेबा (शिवाजी) कडे गेला. साहेबी हुकूम केला कीं, दादाजी कोंडदेव व रा. साहेब यांचे कारकीर्दी चालल्याप्रमाणें वर्तणें. तरी गोतमुखें निवाडा करणें.

फॅ. रे. सुरत मा. १०५
पृ. १९४ (द्वि. सं.) इ.
(१४०६)
मुंबई–सुरत.
श. १५९३ श्रावण व. २
इ. १६७१ ऑगस्ट १२

शिवाजीचें पत्र व डे० ग० नें त्याला पाठविलेल्या पत्राची नक्कल यांचें पोर्तुगीज भाषांतर तुमच्याकडे पाठविलें आहे. त्यावरून **आमच्या मित्रत्वाची त्याला किंमत नाहीं** हें तुमच्या नजरेस येईल.

त्रै. व ६ पृ. ७५ले.१३
श.
(१४०७)
कबूल–कतबा फा. मु. व सी.
श. १५९३ भाद्र. शु. ९
इ. १६७१ सप्टें. २

वेंकटराऊ नरसिंगराऊ देसपांडे पर० आवसे— वे. गणेश विठल दिक्षीत वणी आम्ही व आमचे वंशज तुम्हास तीर्थोपाध्याय मानूं.

खं. ८ ले. २४
सु. १०७२ जवल १४
(१४०८)
श. १५९३ भाद्रपद शु. १५
इ. १६७१ सप्टेंबर ८

तुकोराम सुबेदार व कारकून सुभे मामले प्रभावळी प्रती राजश्री **शिवाजी राजे** दंडवत. उपरी सबनीस सुबे मजकूर यावरी बाद + + + + तगारा नाईकवाडी + + बापूजी नलवडा याणें कल्हावती करून तरवारेचा हात टाकिला आणि अखेर आपलेच पोटांत सुरी मारून घेऊन जीव दिल्हा. हे वर्तमान होऊन गेलें. तुम्हीं कांहीं हुजूर

लिहिलें नाहीं. मराठा होऊन ब्राह्मणावरी **तरवार केली,** याचा नतीजा तोच पावला. हालीं बापूजी नलवडा व कोंडाजी चांदरा व संताजी जामदार हरबकसा करून सबनिसास दटावितात कीं + + + + + होतें तेंच तुमचे उपरी उचलो + + + + + —— वर्तमान कळों आलें. तरी ब्राह्मणास + + + + तील त्याची खबर घेणें जरूर आहे. तुम्हीं + + + + घेत नाहींत. इतकियाउपरी त्यास ताकीद करून हालखुद ठेवणें कीं सबनिसाचे वाटे नच जात. जरी कांहीं सबनिसासी कथळा करायावरी ख + + + ल हालखुद माकुलपणें असतील तरी हुजूर लिहिणें. म्हणजे तहकीक आहे कीं सबनीस मायावरी आले होते. याबद्दल साहेब त्यास दस्त करून हुजूर आणवितील आणि खबर घेतील. तुम्हीं ऐसे बेकैद लोकांस होऊं न देणें. हालखुद ठेवून रवेशवार चाकरी घेत जाणें कीं कोण्ही बेढंग न वर्ते. मुलाहिजा न धरणें. मोर्तब सूद.

फॅ. रे. सुरत भा. १०६ पृ. ९ इ.	(१४०९) मुंबई-सुरत.	श. १५९३ भाद्र. व. १ इ. १६७१ सेप्टें. ९

शिवाजीचा वकील येथें येऊन बसला आहे. त्यानें आमची मागणी काय आहे असें विचारल्यावर ३२००० होनांचा **आंकडा** आम्हीं सांगितला. ही रकम मोठी असली तथापि पुढें फायदा झाल्यास त्यांतून फेडतां येईल असें त्यानें सांगितलें. त्याच्या मुलखांतून मुंबईशीं चालणाऱ्या व्यापाराच्या सुरक्षिततेकरितां, आमच्या नजीक परंतु त्याच्या मुलखांत (आम्हांला) वाटेल तेथें (आम्हीं) **किल्ला बांधण्याला** तो मदत करील. परंतु त्याचा **मुख्य हेतु** दंडाराजपुरीविरुद्ध (आमची) मदत मिळविण्याचा आहे. तशी मदत दिल्यास मोगलांना वैषम्य वाटूं नये अशा गुप्तपणानें हें काम कसें करावें हें तोच सुचविणार आहे. इतर सर्व कलमें या एका गोष्टीच्या पुष्ट्यर्थच आहेत.

कांहीं मालाचे बाबतींत **लांच** घेतल्यानें आतां आलेला वकील **शिवाजीच्या** इतराजींत आल्यामुळें, त्याला खूष करण्याकरितां हा तह घडवून आणण्याचें त्यानें ठरविलें आहे. तेव्हां शक्य तितकें आमचे बाजूनेंहि तो ताणण्यास तयार आहे ! मागण्या पाहून व दंडाराजपुरीकरितां आम्हीं मदत करीत नाहीं हें ऐकून, **रामशेणव्याला** आपल्या बरोबर पाठवावें असा त्या वकिलाचा आग्रह आहे. पाठविणें झाल्यास त्याच्याकरितां सूचना पाठवाव्या. एक एंजिनिअर, एक मोठी तोफ (morter peece), गोळे आणि दुसरी एक मोठी तोफ (a great gun) इतकें गुप्तपणें शिवाजीकडे पोंचतें करावें अशी त्याची अपेक्षा आहे. निकाल काय तो त्वरेनें केला पाहिजे नाहींतर एकदां **मोगल दक्षिणेकडे आला** म्हणजे **शिवाजीला** दुसरीकडे लक्ष द्यावें लागेल.

ख. २ ले. ७ सु. १४ जवल १९ सयाजी —— ?	(१४१०) फारशी भाषांतर	श. १५९३ भाद्र. व. ५ इ. १६७१ सप्टें. १३

माणिकचंदाचे पत्रावरून आपणास कळविण्यांत येतें कीं, आष्टी परगण्याचे लोक १०८० हि.ची बाकी वसूल देण्यास कबूल असतां जमीदार वसूल करीत नाहीं. तरी वसूल करून औरंगाबादेस पाठवून द्यावा.

खं. ८ ले. २५ } (१४११) { श. १५९३ भाद्र. व १२
सु. १०७२ जवल २५ } { इ. १६७१ सप्टें. १९

रा. **शिवाजी राजे**— धारराव निंबाळकर सुबेदार यांसी

मा माहादाजी यमाजी यासी सु.........काम फर्मावून पाठविले..........दरबार करीत जाणें........ति सालींना होन पा १०० एकसे रास पादशाही मोकरर केले असेती. इापासून वजा बटाऊ रवेशप्रमाणें करीत जाऊन बाकी बेरीज माहे दर माहे आदा करीत जाणें. यारिदी व कागद बाहे लिहिणिग्रामाफिक व शाही सिरें देत जाणें. बारगीर घोडे व हवालगीर व दिवटीदार निसबत बाजे हजारी सुबाचे मजमदाराचे तहप्रमाणें चालवणें. मानइले हुजूर **चिरंजीव संभाजी राजे** याकडे वाकेनिवीसेचें मुतालिकीस होते. देणें फाजील कांहीं नाहीं. मोर्तबसूद.

ओ. कॉ. भा. ३२ } (१४१२) { श. १५९३ भाद्र. व. १३
नं. ३५७८ इ. } कारवार–सुरत. { इ. १६७१ सप्टें. २०

अनपेक्षितपणें इकडे **रुस्तुमजमाचें बंड** उभें राहिलें आहे. रुस्तुमजमा पूर्वी या बाजूच्या शहरांचा अधिकारी होता. फितुरीनें आदिलशहाचा एक किल्ला त्यानें **शिवाजीचे** हवालीं केल्यामुळें आदिलशहानें त्याचेकडील मुलूख काढला. शिवाजीचा लोभ व स्वदेशांतील सरदारांचा पाठिंबा यांवर भिस्त ठेवून अजूनपर्यंत अनेक मित्रांचे मध्यस्थीनें झाली नाहीं ती गोष्ट—पूर्ववत् मुलूख मिळविणें—आतां तो मनगटाचे जोरावर करूं पहातो. **शिवाजीनें** गुप्तपणें मदत दिल्यामुळें आजपर्यंत रुस्तुमजमानें ३ लक्ष होनांचा मुलूख काबीज केला. व **रायबाग** लुटून कांहीं भाग जाळला. शिवाजीच्या आणि आतांच्या रुस्तुमजमाच्या जाळपोळीमुळें रायबाग फार नाश पावलें. **अथणीचे** वगैरे व्यापारी पळाले. **हुबळीपर्यंतहि** हा उपद्रव पोचेल असें समजून तिकडचेहि लोक पळून जातात. राजानें रुस्तुमजमावर सैन्य पाठविलें. तथापि दरबारांतील त्याचे मित्रांचे कारवाईनें तें अगदीं सावकाश कूच करितें. मध्यंतरीं **सलोख्याची खटपट** चालू आहे. अखेरीला आदिलशहा भिऊन भिडेला बळी पडेल. तसें झालें तर या गोंधळांत लुबाडले गेलेल्या व्यापाऱ्यांना कांहींच भरपाई मिळणार नाहीं! येथील (राजकर्त्यांचा) धर्म किंवा निदान व्यवहार तरी (अशा न्यायाच्या भरपाईला) अनुकूल नाहीं.

(से.) फॅ. रे. सुरत
भा. १०६ पृ. ११ इ.
(१४१३)
मुंबई-सुरत.
श. १५९३ भाद्र. व. १४
इ. १६७१ सप्टें. २१

शिवाजीला मुंबईकरांनीं फार आशा किंवा निराशा दाखविली नाहीं. ३२००० होन मुद्दल व झाल्या मुदतीचें दरमहा दरशेंकडा १ टक्के प्रमाणें व्याज द्यावें असें म्हटल्याबरोबरच तो वकील दचकला. परंतु त्यानें ह्या मागणीची नोंद करून घेतली असून तो ती शिवाजीला दाखवील. शिवाजीकडून अनपेक्षित हुकूम आल्यामुळें तो शिवाजीकडे गेला आहे. १५।२० दिवसांनीं परत येईल.

शि. घ. ले. ६४
सु. १०७२
(१४१४)
मिसेली-सी.
श. १५९३ भाद्र.
इ. १६७१ ऑग. सप्टें.

अज. दि. ठाणा कारवे—मोक. मौ. वाघेरी

रखर १६ ची सनद आली आहे. नरहरिभट बिन अंतभट गिजरे सा॥ कऱ्हाड यांस वाघेरी येथील १५ बिघे जमीन इनाम दिली आहे. ती चालविणें.

खं. ८ ले. २६
सु. १०७२ जवल ३०
(१४१५)
श. १५९३ आश्विन शु. २
इ. १६७१ सप्टें. २४

शिवाजी राजे—रा. तुकोराम सुबेदार व कारकून सुबे मामले प्रभावळी प्रति दंडवत.

मामले दाभोल विलायतीस नारेळ दर सद्दे लारी ४ व रोठा देखील जकात दर खंडीस लारी १२५ सवाशें प्रमाणें विकत आहे. आणि नेवरे व बाजे तुम्हाकडील माहालीं ऐन जिन्नस बटाई दिवाणांत उसूल देताती. व रयत यांसा खरीदी करितात. ऐसें असतां, कमनिर्खें नारेळ सुपारी विकते, ऐसी खबर कळों आली आहे. तरी हा अमल कैसा आहे? ऐन जिनसांची गीर्दवरी कैसी करता? आणि कमनिर्खें कोण विकितात? हें खबर घेणें आणि ताकीद करणें. पेस्तर ऐसे न व्हे. ऐन जिनसाची गीर्दवरी बरी व्हो. आणि जो तह तुम्हाकडे आहे त्या निर्खें विक्री करणें. कमनिर्खें विकिलिया इकडे धका बसतो आणि अलग नुकसान येऊं पहाते. त्याची बदनामी तुम्हांस. ऐसे जाणून, खरी खबर घेऊन, चौकशी व गीर्दवरी करून ऐन जिन्नस तह प्रमाणेंच दिवाणांतून विकीत जाणें.

ओ. कॉ. मा. ३२
नं. ३५८५ इ.
(१४१६)
श. १५९३ आश्विन शु. २
इ. १६७१ सप्टें. २५

स्टीफन उस्टिक याजकरितां (शिवाजीच्या तहाच्या वेळीं पाळावयाच्या) सूचनाः—

पूर्वेकडील देशांतील अत्यंत धोरणी राजा शिवाजी याच्याशीं तुम्हांला तह करावयाचा असल्यामुळें, तुम्हीं काळजी व सावधगिरी ठेवावी म्हणून तुम्हांला खालील नियम घालून देतों.

मित्रत्वाचा देखावा करून तो स्वागत करील त्यावर 'मुंबईहून मी कंपनीच्या वतीनें न्याय्य मागणी करण्यास आलों आहे. ती पुरी केल्यास इंग्रज मित्रत्व राखतील' असें सांगावें. 'झाल्या नुकसानीची भरपाई आणि भावी कालांत तसा अत्याचार न करण्याची हमी' ह्या आपल्या मागण्या आहेत असें सांगावें.

नुकसान भरपाईच्या रकमेचा ३२००० होनांचा आंकडा खुलासेवार सांगावा. तो आढेवेढे घेऊं लागला तर 'इतरांची भरपाई तुम्हीं पुरती करून दिली आहे, आणि आमचीच देत नसाल तर आमचा दर्जा व मित्रत्व यांचें विशेष महत्त्व तुम्हांला वाटत नाहीं असें म्हटलें पाहिजे! सयुक्तिक स्नेहाची त्याला इच्छा व्हावी म्हणून सुरत, कारवार, बिलिआपट्टण, कालिकत ह्या व इतर बंदरांना इंग्रजांच्या व्यापारामुळें झालेला फायदा व राजापूरचा त्याच्या अभावामुळें झालेला तोटा त्याच्या नजरेला आणून द्यावा. कंपनीची संपत्ति, सामर्थ्य, न्याय आणि सचोटी यांचा सर्व ठिकाणीं बोलबाला आहे; असें बोलावें. कंपनीच्या मनांत आलें असतें तर शिवाजीचीं गलबतें व प्रजा यांच्यावर सूड घेण्याचें सामर्थ्य असतांना त्यांनीं तसें केलें नाहीं, यांत दिसून आलेलें शहाणपण आणि नेमस्तपणा यांचें वर्णन करावें. नुकसानभरपाईचा अनुकूल निकाल होईपर्यंत कंपनी राजापूरला फिरून वखार घालणार नाहीं हा निश्चय राम शेणव्यानें स्पष्टपणें सांगावा.

इतकें बोलणें झाल्यावर कांहींतरी निष्पन्न होईल. एवढी मोठी रकम देण्यास तो कुरकूर करील तर तो स्वतः काय देण्यास तयार आहे याचा राम शेणव्यानें खासगी खुलासा काढावा. रोखीनें का जकातींत भागशः सूट देऊन तो भरपाई करूं इच्छितो याचाहि तलास काढावा व त्वरेनें इकडे कळवावें. आमच्याकडे कळविण्याची फार यातायात पडूं नये म्हणून [कोरी जागा] होनांवर तोड करावी असें आम्हीं सुचवितों.

भावी सुरक्षिततेबद्दल त्याचा विचार नक्की विचारावा. भरपाईचा निकाल झाला तरच व झाल्यानंतर सोबत पाठविलेलीं कलमें त्याला दाखवावीं. नाहीं तर दाखवूं नयेत.

दंडाराजपुरीचे बाबतींत सैन्य, तोफा व दारूगोळा यांची मदत कदाचित् तो मागेल. त्यास 'कंपनीची मोठी मालमत्ता आणि व्यापार सर्वच देशांत पसरला असल्यामुळें अशा तऱ्हेनें युद्धांत तुम्हांला मदत करणें अशक्य आहे. तथापि एकदां कायमचा तह झाल्यावर इंग्लंडमधील सर्व कांहीं तुम्हांला मिळेल' असेंहि अभिवचन द्यावें. मात्र नक्की वचन किंवा नकार कोणच्याहि बाबतींत देऊं नये. सामान्यतः मोंगलांना व इतरांना आमच्या व्यापारापासून फायदा होतो तितकाच होईल अशाबद्दल बोलावें.

खं. १५ ले १२८ } (१४१७) { श. १५९३ आश्वीन शु. ६
सु. १०७२ जखर ५ } ताखीद मु. व. सी. { इ. १६७१ सप्टें. २९

अजर. सिताबरखान सरनाईकवाडी किले सातारा-ता हुदे. व मोक. मौ. निगडी. निगडी येथें जोगींद्रगिरी बाबा यांस १५ बिघे इनाम आहे. ते पूर्वीप्रमाणें चालविणें.

फॅ. रे. सुरत भा. ७७ } (१४१८) { श. १५९३ आश्वीन शु. ७
पृ. १ इ. } सुरत (स्वाली)- मुंबई { इ. १६७१ सप्टें. ३०

शिवाजीकडून तह करण्याकरितां वकील आला आहे. त्याला चांगल्या तऱ्हेनें वागवून तह त्वरेनें करण्याकरितां **स्टीफन उस्टिक व राम शेणवी** यांना पाठवावें. राजापूरच्या लुटीची नुकसान-भरपाई व राजापुरला पुनः वखार स्थापण्याबद्दल [मागील सप्टें. २५ च्या अनुक्रमांकाप्रमाणें] बोलणें करावें.... खरें पाहिलें तर **दंडाराजपूर** त्याचे ताब्यांत जाण्यानें आमचे मुंबई बंदरास संकट आहे. बरें आज थेट नकार द्यावा तरी तें आपल्या हिताचें नाहीं. म्हणून त्याला पाहिजेत त्या वस्तु मिळण्याच्या आशेवर त्याला मुग्धांतच ठेवल्यानें बहुधा तो लवकर तह करण्यास तयार होईल. ह्या दोघांना पाठविण्याचा मुख्य उद्देश हाच आहे. शिवाजीकरितां सुंदर नजराणा व उस्टिक याच्या बरोबर कंपनीच्या लौकिकाला साजे असा लवाजमा देण्याची योग्य ती तजवीज करावी.

फॅ. रे. सुरत भा. १०६ } (१४१९) { श. १५९३ आश्वीन व. ६
पृ. २२ इ. } मुंबई-सुरत { इ. १६७१ आक्टो. १३

शिवाजीच्या वकीलानें **राम शेणव्यास** 'मीं ५।६ दिवसांनीं तेथें आल्यानंतर आम्हीं व तुम्हीं बरोबरच शिवाजीकडे जाऊं' असें लिहिल्यामुळें पुनः त्याचेकडून कांहीं कळेपर्यंत उस्टिकचें जाणें लांबणीवर टाकणें जरूर आहे. तितक्या मुदतींत तुमचेकडून नजराण्याला उपयोगी वस्तु येऊं शकतील.

फॅ. रे. सुरत भा. १०६ } (१४२०) { श. १५९३ कार्तीक शु. १
पृ. २५-२७ इ. } मुंबई-सुरत. { इ. १६७१ आक्टो. २३

अजूनपर्यंत उस्टिकला पाठविला नाहीं, त्याला चार कारणें आहेत. (१), त्याची प्रकृति नादुरुस्त आहे; (२), **शिवाजी** कोठें आहे हें समजत नाहीं; (३), **शिवाजीचा** वकील चौलपर्यंत पोंचला आहे असें कळलें; आणि (४) आमचेजवळ शोभेसा नजराणा नाहीं. ही नजराण्याची मुख्य अडचण दूर झाली म्हणजे इतर गोष्टी नडणार नाहींत.

समुद्रावर **शिवाजीची** विशेष **तयारी** चालली आहे असें आम्हांला अद्यापपर्यंत कळलेलें नाहीं. मात्र **दंडावर** एक लहान आरमार गेलें आहे. रणांगणावर त्याचें सैन्य कोठेंच उतरलेलें दिसत नाहीं. तेव्हां त्याच्याबद्दल वाटणारी भीति ही खोटी असून केवळ 'दुधानें जीभ पोळल्यामुळें ताक फुंकून पिण्यासारखी' आहे. आम्हीं त्याच्या तपासांत राहतों.

शिवाजीच्या मदतीनें **रुस्तुमजमानें** रायबाग लुटलें व उघडपणें बंड उभारलें. आमच्या डोळ्यांदेखत दंडाच्या **शिद्दीनें तळें** आदिकरून शिवाजीचीं ठाणीं **जाळलीं**. दोन दिवसांपूर्वी **दाभोळहून** शिवाजीचे आरमाराचा राहिलेला भाग येथें आला. समुद्रावर कोठेंच मोठी तयारी केली नाहीं आणि शिवाजी **रायरी** ह्या मोठ्या किल्ल्यावर आहे असें आरमारी सेनापतीनें सांगितलें.

इ. वृ. १८३८ पृ. १५९ } (१४२१) { श. १५९३ कार्तीक शु. ३
सु. १०७२ रजब १ } नकल { इ. १६७१ आक्टो. २५

अजर रा. **सिवाजीराजे** साहेब दयाम दौलत हू बजानेब कारकून बानाबे दिमत देशमुखानी व देशपांडे व मोकदमानी व रयानी कसबे सासवड कर्यात मजकूर श्री सोपानदेव याची समाधी कसबे मजकुरी सालाबाद आहे. बितपसीलवार

निां जमीन मुंजरी देवा भोवताली थळ भाडळे पैकीं कास मण ०४॥ आहे. ते देवाचे देवास दिल्ही आसे. कुलबाब कुलकानू दुमाला केले असे. दुमाला कर्णे. थळ पौ ०४॥ साडेचार मण बाद देणें. देवाचे देवास चालवणें.

निसबत जकातीवर व बाजारापौ दर रोजीना मोईन सालाबादप्रो चालवणें जोरी नैविद्याकारणें कैली मापी आधोली ०८॥· व तेलाबदल दिवाबतीस वजन टकबंदी ०८॥· आच्छेर

सदरहू देवास दिल्हे आसे. दर हरसाल चालवणें. ताजा खुर्दखताचा उजूर न करणें. हिंदू होऊन इस्कील करील त्यास गाईची आण आसे व मुसलमान होऊन इस्कील करील त्यास सोराची आण आसे. येणेंप्रो चालवणें. तालीक घेऊन आसल पत्र गोसावी रामानंद याजपासी परतोन देणें. परवानगी हुजूर. मोर्तब.

फॅ. रे. सुरत, भा. १०५ } (१४२२) { श. १५९३ कार्तीक शु. ४
पृ. ५५ इ. } मुंबई—सुरत { इ. १६७१ आक्टो. २६

आमच्याकडील अगदीं कच्चीं माणसें आपल्याकडे बदलून घ्यावीं. प्रतिदिवशीं शहाजादा ससैन्य कल्याणला येण्याची अपेक्षा आहे. **शिवाजी**शीं त्याचा बेबनाव झाला अशी समजूत आहे. **शिवाजी**वर जाणाऱ्या सैन्याचें आधिपत्य **मोहबतखानाला** दिलें.

खं. ८ ले. १३ } (१४२३) { श. १५९३ कार्तीक शु. ५
१ रजब ३ } { इ. १६७१ आक्टो. २७

मोरो त्रिमळ व निळो सोनदेऊ जगन्नाथपंत व त्रिंबक वेंकटेश गोसावी.

राजेसाहेब शिवापट्टणी मुकाम किती दिवस करणार. व लोहगडतर्फेनें इमारती पहावयास जाणार, तिकडे जातील किंवा नच जात, रोहेडियाकडून पांडवगड पाहोन

येणार होते ते तिकडे जातील किंवा नच जातील, हें कांहीं वर्तमान लिहिलें नाहीं. तरी सविस्तर वर्तमान लेहून पाठवणें व चिरंजीव राजश्री राजारामाचे........राजश्री साहेबास खबर लिहिली आहे ते श्रुत करून खबर सत्वर पाठवून देणें. बहुत लिहिणें नलगे. झुंडीचें वर्तमान लिहिणें. पा। हुजूर. मो. सू.

फॅ. रे. सुरत भा. १०६ पृ. ३० इ. } (१४२४) कारवार–सुरत { श. १५९३ कार्तिक शु. ८ इ. १६७१ आक्टो. ३१

आदिलशाही सैन्यानें बंडखोरांचा पुरा मोड केला. **मिरजनच्या** बंडखोरांनीं मात्र मिरजनचा किल्ला अजून लढत ठेविला असून तो सुभेदाराच्या ताब्यांत आला नाहीं.

फॅ. रे. संकीर्ण भा. २ पृ. ११८ इ. } (१४२५) स्वाली मरीन कन्सल्टेशन. { श. १५९३ कार्तिक शु. ९ इ. १६७१ नोवें. १

शिवाजीकरितां नजराणाः—शिवाजीशीं तह करण्यांत आल्यावर त्याला खालीलप्रमाणें नजराणा देणें इष्ट आहे.

२ भडक रंगाचे ताके, ५ लांब तलवारी, २ आरसे, १ पायजमा, ६ मूल्यवान व ६ साध्या पामऱ्या.

खं. १५ ले. १२९ सु. १०७२ रजब ८ } (१४२६) खुर्दखत { श. १५९३ कार्तिक शु. ९ इ. १६७१ नोवें. १

विठल दत्तो सुभेदार व कार० सुभा जाउली

रा. गोविंदराऊ नामजाद व कार० मौ० उझर्डे.

निंब येथील मठाचा आपल्या गावीचा इनाम पूर्वीप्रमाणें चालविणें.

खं. २० ले. १३० सु. १०७२ जखर १३ } (१४२७) मिसेली फा. मु. मज. व सी. { श. १५९३ कार्तीक शु. १५ इ. १६७१ नोवें. ६

अज दि० पर० वाई——ता। मोक० मौ० पसर्णी, एकसर, ओझर्डे.

नारायणभट बिन गोपिनाथभट चित्राव यांस वरील गांवीं १ चावर ३२ बिघे जमीन पूर्वीपासून इनाम आहे. ती त्यांजकडे चालविणें.

फॅ. रे. संकीर्ण भा. २ पृ. १५८, १५९ इ. } (१४२८) सुरत–कंपनी. { श. १५९३ कार्तीक व. १ इ. १६७१ नोवें. ७

कारवारच्या बाजूला पोवळ्याच्या विक्रीचें मुख्य ठिकाण **शिवाजीनें** उध्वस्त केलें.

मि. उस्टिक आतां **शिवाजीशीं** तह करण्याच्या कामगिरीवर नेमिला आहे. त्याची आपण शिफारस करावी हें योग्य आहे.

ओ. कॉ. भा. ३२ } (१४२९) { श. १५९३ कार्तीक व. १
नं. ३५१४ इ. } सुरत–कंपनी { इ. १६७१ नोवें. ७

पोवळ्याचे मुख्य बाजार **शिवाजीनें** उध्वस्त केल्यामुळें घाऊक **खरेदी** थांबली. किरकोळीचाच व्यवहार वाढविला पाहिजे. **शिवाजी** राजापुरास पुनः बोलावीत आहे. लवकरच त्याच्याशीं तह होऊन त्याचें कर्ज वगैरे व्यवहारांचा उलगडा होईल.

[दि] शिवाजी सुरतेवर फिरून येणार आहे, या बातमीमुळें सुभेदारानें विशेष अडथळा न केल्यास प्रेसिडेंट मुंबईकडे जाऊं इच्छितो.

फॅ. रे. सुरत भा. ८७ } (१४३०) { श. १५९३ कार्तीक व. १
पृ. ४ इ. } स्वाली–मुंबई. { इ. १६७१ नोवें. ७

शिवाजीकरितां मूल्यवान नजराणा 'लंडन' गलबतांतून पाठविला आहे. त्यापैकीं पसंत करून उस्टिकबरोबर पाठवून द्यावा. आपल्या कामाचा निकाल होईपर्यंत नजराणा देऊं नये....नजराणा घेऊन शिवाजीनें निकाल केला नाहीं; तर कंपनीचा तोटा होऊन कंपनीच्या नांवाला कमीपणा येतो तें निराळेंच......

ओ. कॉ. भा. ३२ } (१४३१) { श. १५९३ कार्तीक व. २
नं. ३५८९ इ. } मुंबई–सुरत { इ. १६७१ नोवें. ८

शिवाजीचा वकील तह करण्यासाठीं आला असून कसेंहि करून, फकीर म्हणून कां होईना, सुरतेला जाण्याला उत्सुक आहे. त्याच्याकडून शिवाजीचें म्हणणें समजून घेऊन त्याच्याच अत्याग्रहावरून हें पत्र घेऊन लेखक **राम शेणवी** यास पाठविला आहे. तह करण्यांत शिवाजीचा **मुख्य हेतु** दंडाराजपूर–प्रकरणीं गुप्त मदत मिळविणें हाच आहे. शिवाजीकरितां ३।४ मोठ्या तोफा देण्याचें तुम्हीं ठरविल्यास त्या **पोर्तुगीजां**-कडून विकत घेवविण्याची शिवाजीची तयारी आहे. तसें झाल्यानें **आमचें नांवच निघणार नाहीं.**

मुंबई बेटासमोरील शिवाजीच्या मुलुखांतील (तो जें देऊं करतो) तें ठिकाण व्यापाराच्या दृष्टीनें फार किफायतशीर होईल, असें **गिरिधर** सांगतो. त्या मार्गानें दख्खनमधील सर्व माल हलक्या जकातीनें मिळेल. एक वर्ष इतर ठिकाणापेक्षां महागाईनें खरेदी करावी लागली तरी लवकरच त्या ठिकाणीं सर्व बाजूनें माल येऊं लागल्यावर नफा राहील. **राम शेणवी** जरूर तो खुलासा करील. त्याला लवकर परत पाठवून द्यावा.

शिवाजीच्या मुलखांतून मिळणाऱ्या **लांकडाची** आपल्याला अत्यंत **जरूर** आहे. हें शिवाजीला समजत असल्यामुळें त्याचीं मिठाचीं गलबतें आम्हीं धरूं किंवा त्याच्याशीं असलेला सलोखा मोडूं, अशी त्याला भीतीच वाटत नाहीं. [फॅ. रे. सुरत, भा. १०६ पृ. ३२–३३ वर हेंच पत्र आलें आहे.]

फॅ. रे. सुरत भा. ८७ पृ. ७–९ इ. (१४३२) सुरत–मुंबई. श. १५९३ मार्ग. शु. ९ इ. १६७१ नोवें. ३०

राम शेणवी ८ तारखेचें पत्र घेऊन आला. त्याचे मार्फत शिवाजीचे तहाबद्दल कळलेली माहिती इतकी संशयित आणि गोत्यांत पाडणारी आहे कीं, शिवाजीशीं तह करावा कीं नाहीं हा प्रश्न आम्हीं विचारांत घेतला. तेव्हां उस्टिक व राम शेणवी ह्यांनीं बोलणें करण्याकरितां जावें; परंतु **राजापूर-प्रकरणीं भरपाई** हा पाया समजून पुढें काय तें बोलावें; असें वाटतें. समुद्रकिनारीं जागा देऊन किल्ला बांधून देण्याचें त्याचें बोलणें म्हणजे केवळ पोकळ आशा दाखविणें आहे. मुंबईच्या इतक्या जवळ दुसरें बंदर उभारलें असतां मुंबईची वाढ होण्याची खुंटेल. किल्ला बांधून नवी वसाहत करणें ही बाब फार खर्चाची ठरून त्यामुळें मालहि महाग होईल. कांहीं कालांतरानें नफा राहील अशी कल्पना केली तथापि त्याच्या बंदराशिवायच इतकीं वर्षें गेलीं तशींच आणखी कित्येक वर्षें आम्हीं राहूं शकूं, असेंच त्याला आज भासविण्याची काळजी घेतली पाहिजे. तुमची दुसरी चूक म्हटली म्हणजे लांकडाबद्दल परस्वाधीनपणाची फार कल्पना घेऊन बसलां आहां ही होय. दुसरीकडे लांकूड सहज मिळेल. तात्पर्य, ह्या सर्व मुलखांत **अत्यंत धोरणी व सुतानें स्वर्गाला जाणाऱ्या लोकांशीं** तुम्हांला प्रसंग पडला आहे. तुमच्याच तोंडून ऐकलेल्या गोष्टींचा ते फायदा घेतात. करितां कोणतीहि गोष्ट सावधगिरीनें बोलण्याची विशेषतः उस्टिकनें खबरदारी घ्यावी.

पूर्वीं शिवाजीचा नजराणा तह होण्यापूर्वी देऊं नये असें लिहिलें होतें. परंतु त्याचा मानी स्वभाव आणि अलीकडे त्याला येत असलेलें यश पाहिलें म्हणजे त्याला आधीं नजराणा न दिला तर आपला अपमान झाला असें त्याला वाटेल; म्हणून उस्टिकनें **नजराणा** आधींच **गेल्याबरोबर द्यावा**. त्या योगानें त्याला आमच्या प्रांजलपणाची व मित्रत्वाची कल्पना येईल. शिवाजी अनुकूल दिसला तर राजापूरच्या भरपाईचा प्रश्न एकदां कायमचा निकालांत काढल्याशिवाय उस्टिकनें तेथून हालूं नये. तसेंच २ टक्के जकात देऊन सर्व देशांत व बंदरांत मोकळेपणानें व्यापार करण्याचा कौल किंवा परवाना मिळवावा. इतर राजांनीं मान्य केलेल्या कलमांप्रमाणें त्याच्याकडूनहि व्यापाराबद्दल कलमें सही करून घ्यावीं. परंतु कांहींच न जमेल तर सलोख्यानें रजा घेऊन परत यावें. तुम्हींहि कांहीं झालें तरी सलोख्याची वागणूक सोडूं नये.

राम शेणव्यानें आणिलेल्या मालाच्या याद्या पाहिल्या. त्यांत सुरतेला लुटलेला माल आहे. त्याचा व्यापार कंपनीनें करूं नये. परंतु शिवाजीजवळ रोख पैसा नसेल तर भरपाईदाखल माल दिला तरी उस्टिकनें तो स्वीकारावा. मात्र किंमती फुगवून लावल्या न जातील याबद्दल जपावें.

खं. ८ ले. २७ } (१४३३) { श. १५९३ मार्ग. व. २
सु. १०७२ साबान १४ } { इ. १६७१ डिसें. ६

रा. **शिवाजी राजे**——नरहरी आनंदराऊ सरसुमेदार ता। कुडाळ प्रति दंडवत साहेबी प्रभावळी पासून तहद कल्याण–भिवंडी पावेतों मिठाचा जबर निरखाचा तह दिल्हा आहे. ऐसीयासी, बारदेशांत मीठ बंदरें आहेत तेथून मीठ खरीद करून उदमी नेत आहेत. ऐसीयासी, हालीं आपणाकडे मिठाचा पाड जबर जाला, हे गोष्टी ऐकोन उदमी खळक कूल बारदेशाकडे जातील. तरी तुम्ही घाटीं जकाती जबर बैसवणें. बारदेशांत मीठ विकतें त्याचा हिसेबें, प्रभावळीकडे संगमेश्वराकडे मीठ विकतें, त्याणें कितेक जबर पडतें, तें मनास आणून त्या अजमासें जकाती जबर बैसवणें; कीं संगमेश्वरीं विकतें आणि घाट पावेतों जे बेरीज पडेल त्या हिशेबें बारदेशीच्या मिठास जकाती घेवणें. संगमेश्वराहून बारदेशींचें मीठ महागच पडे ऐसा जकातीचा तह देणें. जरी जबर जकातीचा तह नेदा, मुलाहिजा कराल, म्हणजे कुल उदमी बारदेशाकडे वोहडेल. आपली कुल बंदरें पडतील. ऐसी गोष्टी आहे. तरी रोखा पावेल तेच घटिकेस कुल घाटीं जकातीं जबर करणें. संगमेश्वराहून बारदेशीच्या मिठास जबर निरख पडे ती गोष्ट करणें. ये गोष्टीचा एक जरा उजूर न करणें. ये गोष्टींत साहेबाचा बहुत फायदा आहे. जरी जबर किंमती केली आहे त्या हिसेबें बारदेशीच्या मिठास जबरच पडे ती गोष्ट करणें, व तुम्हांकडे लहान मीठ आहे त्याचा तह आहे त्याखेरीज हाली जाजती दर मणें टंकसाळी रुके ।॰ बारा रास प्रमाणें तह देणें. मुलाहिजा न करणें. मिठाचा मामला हजराहांबदल कर्द लाख रुपये यावयाचा मामला आहे. तरी लिहिलेप्रमाणें अमल करणें. या कामाबदल पाठविले असती त्यासी मसाला होन नि॥ ४ रामाजी बांदे हरकारा रा॥ होन; नि ॥ ३ संताजी गिरजोजी अपातप होन १ पाठवले असत यांसी मसाला होन नि॥ ४ होन पा॥ कुडाळपैकीं रास आदा करणें पा॥ हुजूर (मर्यादेयं विराजते)

फॅ. रे. सुरत भा. १०६ } (१४३४) { श. १५९३ मार्ग. व. १०
पृ. ५६ इ. } मुंबई–सुरत. { इ. १६७१ डिसेंबर १५

शिवाजीचे तहाबद्दल आपल्या आज्ञेप्रमाणें वागावयाचें. परंतु **शिवाजीचे वकिलानें** येथें ६ हजार रु.चें कापड, तह चालू राखण्याचा बहाणा करून विक्रीकरितां आणिलें. आम्हीं सामोपचारानें न वागल्यास शिवाजी त्याला परत पाठविणार नाहीं असें तो म्हणतो. शिवाय तो म्हणेल त्या किंमतीला आम्हीं कापड घेतलें नाहीं तर ' आपण उस्टिकबरोबर जाणारच नाहीं. ' असाहि रागानें आग्रह धरतो. आपला धनी कोठें गेला हें त्याला माहीत नाहीं, एवढेंच नव्हे तर आम्हांलाहि कांहीं तपास लागत नाहीं. तेव्हां उस्टिकला लवकर पाठवून फायदा नाहीं. 'आम्हीं तुमच्या इच्छेप्रमाणें वकील पाठवीत आहों' असें पूर्वी लिहिलें आहे त्याचें उत्तर आल्याशिवाय त्याला कशाला पाठवा ?

आम्हांला (शिवाजीकडून न मिळाल्यास) सर्पणाची अडचण पडेल असें त्या वकिलानें ध्वनित केलें. त्याबरोबर आम्हीं तें कसें आणि कोठून आणूं तें सडेतोड उत्तर देऊन त्याला सांगितलें. मात्र किनाऱ्यावर बंदराकरितां जागा देतों असें तो बोलला. परंतु त्यावर आम्हीं कांहींच मत दिलें नाहीं. तुमचें लिहून येईल त्याप्रमाणें सांगूं. उस्टिक जाईल तेव्हां त्याचेबरोबर **शिवाजीकरितां चांगला नजराणा** (तुम्हीं लंडन गलबतानें पाठविलेल्या जिन्नसांतून) पाठवून देऊं.

रु. ३ ले. १७ }
सु. १०७२ रम १ }
(१४३५)
{ श. १५९३ पौष शु. २
{ इ. १६७१ डिसें. २३

काटकर मोक. मौ. सुपें खुर्द— रा. शंकराजी नीलकंठराऊ मोक. सुपे खुर्द

मोगलापासून मुलूख साहेबी घेतले. भोवताला मुलूख जाळिला. तुम्ही परागंदा जाला. तीन वरिसे गेलियावर तुम्ही ठाणियास गेलेस आपण तुमची तरफ तुमचे सांभाळी केली. तरी आपला इकलाजिमा घेणें.

फॅ. रे. सुरत भा. ८७ }
पृ. १४ इ. }
(१४३६)
सुरत–मुंबई
{ श. १५९३ पौष शु. १२
{ इ. १६७२ जाने. १

तुमचें गेल्या महिन्याच्या १५ तारखेचें पत्र २७ ला पोंचलें. त्यावरून **शिवाजीचे वकिलानें** आणिलेला ६००० रु. चा माल (कापड, पहा ले. १४३४) तुम्हीं घेणार नाहीं हें कळल्यानें त्याला विशेष खेद झाल्याचें समजलें. तो माल कंपनीनें वापरणें योग्य नसल्यामुळें विकत घेण्याची जबाबदारी आम्हीं घेऊं शकत नाहीं. आणि याकरितां, त्याच्या संतापाला न जुमानितां तुम्हीं तो घेण्याचें नाकारलें हें चांगलें केलें. वकील **उस्टीक** बरोबर जाण्याचें साफ नाकारीत असेल तर त्याला एकट्यालाच जाऊं दे. त्या निमित्तानें तरी **शिवाजी** आपल्या दौऱ्यावरून परतून कोणत्या तरी किल्यावर येऊन राहिल्याचें निश्चित कळेल.

राम. अं. ९८ }
पृ. १३ }
(१४३७) { श. १५९३ पौष व. ६ व माघ शु. १५
उल्लेख { इ. १६७२ जाने. १० व फेब्रु. २

रामराऊ सुभेदार नामजाद माहालानिहाय– कारकून मसूर

बरहुकूम मिसेली **शाहाजी राजे मरहुमी** व **येकोजी** राजे चालत आले आहे.

फॅ. रे. सुरत भा. ८७ }
पृ. १६ इ. }
(१४३८)
सुरत (स्वाली)— मुंबई
{ श. १५९३ पौष व. ९
{ इ. १६७२ जाने. १३

बादशहानें बंदराचे रक्षणाकरितां नव्या सुभेदारा(**घास्तीखान**) बरोबर कांहीं सैन्य पाठविलें आणि **शिवाजी**चें सैन्य इकडे येण्याची कांहीं गडबड नव्हती; यामुळें

आम्हीं या गलबतावर बहुतेक शिपाई रवाना करून फक्त एक तुकडी राखून ठेविली. सर्व संकटांतून पार पडल्याचें दिसूं लागतांच त्यांनाहि पाठवून देऊं. [परंतु थोड्याच दिवसांत शिवाजीचे आगमनाची हूल उठून बंदोबस्त करणें इष्ट वाटलें— पहा सुरत कन्सल्टेशन, फॅ. रे. संकीर्ण, भा. २ पृ. १२१ तारीख १६७२ जाने. २५]

फॅ. रे. सुरत भा. १०६ पृ. ६२ इ. | (१४३९) मुंबई–सुरत | श. १५९३ पौष व. ९ इ. १६७२ जाने. १३

[ऑर्म- भा.११४ पृ. ९] **उस्टीक** सोमवारीं सकाळीं निघेल. शिवाजीच्या वकिलाला त्याच्या मालाच्या तारणावर ४० महिन्यांनीं देण्याच्या मुदतीनें १५०० रु. दिल्यामुळें तो अखेरीला खूष झाला. राम शेणव्यानें 'आपण प्रेसिडेंटजवळ ही गोष्ट बोलतांच प्रेसि०नें मान्यता दिली' असें सांगितल्यामुळें आम्हीं असें केलें.

शिवाजी चौलपासून ४० मैलांचे आंत **महाडास** असून त्याच्यापाशीं त्याच्या राज्यांतील, **कुडाळ, सिंहगड** इत्यादि सर्व लांबच्या ठिकाणांहूनहि सैन्य जमा झालें आहे. त्याचें कारण असें सांगतात कीं, **दिलेरखानानें** त्वरेनें स्वारी करून पुणें-चाकण घेतलें. व तेथें त्यानें ९ वर्षां वरील वयाच्या सर्वांची **कत्तल** केली !! डेप्युटी गव्हर्नरच्या माहितीप्रमाणें **पुणें चाकण** हें महत्त्वाचें ठाणें शिवाजीच्या मुलखाच्या मध्यभागीं एका विस्तृत मैदानांत आहे.

खं. २० ले. १९९ पृ. ३०३ सु. १०७२ | (१४४०) | श. १५९३ पौष इ. १६७१ डिसें.-७२ जाने.

अज. माहाल कल्याण व ता अंबरनाथ—

त्रिंबकजी राजे पाटेल देस.ख आधि. व. देसपां. वगैरे.

पंत पेशवे, मुजुमदार आणि सुभ्याचे खुर्दखत याप्रमाणें उक्त महालाचे कुलकर्ण आपले हवाली केलें आहे.

फॅ. रे. सुरत भा. १०६ पृ. ६५ इ. | (१४४१) मुंबई–सुरत | श. १५९३ माघ शु. १ इ. १६७२ जानेवारी २०

मागच्या पत्रांत **उस्टिक** पुढच्या सोमवारीं (२३ जानेवारी) निघणार असें लिहिलें होतें. परंतु पर्वां **अण्णाजी**कडून पत्र आलें त्यावरून **शिवाजी** सध्या कार्यव्यग्र असून त्याचेकडून पुनः लिहून येईपर्यंत उस्टिकनें जाऊं नये असें दिसतें. झाडून सगळे किल्ल्यांवरील शिबंदी एकत्र करून त्यानें मोठें सैन्य जमा केलें आहे. **दिलेरखानाला** परतावून लावण्याचा तो प्रयत्न करून पहाणार आहे. दिलीरखान, बहादरखान व मोहबतखान यांनीं **पुणें, चाकण** घेतलें; शिवाजीचा सेनापती **कडतोजी** गुजर याचा वध केला[?] व सर्वत्र तरवार व आग चालविली. तेथून त्यांना हुसकून लावण्याचा त्याचा विचार आहे.

दुसरी अशी विश्वसनीय बातमी आहे, कीं, दख्खनकडून फाजल अबदलखान व खवासखान सैन्य घेऊन त्याचेवर येत आहेत. असें असेल तर शिवाजीचे घडे भरले असें म्हटलें पाहिजे. **फाजलखान** उत्तम सेनापती आहे. एवढेंच नव्हे तर तो शिवाजीचा कट्टा दुष्मन आहे! कारण बरेच वर्षांपूर्वी शिवाजीनें त्याच्या बापाला मारलें. [ऑर्म भा. ११४ पृ. १२].

फॅ. रे. सुरत, भा. ८७ पृ. १९ इ. | (१४४२) सुरत–मुंबई | श. १५९३ माघ शु. १० इ. १६७२ जाने. २९

तुमचें १३ तारखेचें पत्र २३ ला पोंचलें. त्यावरून **शिवाजीनें** आपलें सर्व सैन्य एकत्र जमा केलें हें समजलें. ह्या चार दिवसांत त्याचें कांहीं सैन्य **रामनगरला** आल्यामुळें आम्हीं भीतिग्रस्त झालों आहों. तें सैन्य अजून तेथेंच असून हाललें नाहीं. यापुढें कोठें जाणार हेंहि समजलें नाहीं. सुभेदार व सर्व नगरवासी लोक भेदरून गेले आहेत. तो आम्हांला त्रास देणार नाहीं असें जरी आम्हांला वाटत असलें, तथापि आमच्याकडून आम्हीं तयारी ठेविली आहे.

ओ. कॉ. भा. ३२ नं. ३६२४ इ. | (१४४३) सुरत—कंपनी | श. १५९३ माघ व. १ इ. १६७२ फेब्रु. ३

प्रेसिडेंटनें सुभेदाराची परवानगी घेऊन मुंबईस निघण्याची तयारी केली. इतक्यांत १५००० सैन्य घेऊन **शिवाजी जवळ आल्याची बातमी** आली. नव्या सुभेदारानें विशेष खबरदारी घेऊन कोटाचे बाहेरील घरें शत्रूला आश्रयस्थानासारखीं उपयोगी पडत तीं जमीनदोस्त करून शहरांतील पळ्यांनीं बाहेर जाऊं नये म्हणून दरवाज्यांवर पहारे ठेविले. या वेळच्या विशेष परिस्थितींत प्रेसिडेंटनें सुरत सोडल्यास आपल्यास त्याबद्दल जाब देणें कठीण जाईल आणि बादशहालाहि त्याचें वैषम्य वाटेल; असा सुभेदाराकडून सामोपचाराचा निरोप आल्यामुळें व कंपनीच्या मालमत्तेच्या रक्षणाची जबाबदारी जाणून प्रेसिडेंटनें त्याचें म्हणणें मान्य केलें. [दि]– ह्या कारणांनीं गेलीं दोन वर्षे मुंबईला जातां आलें नाहीं. करितां, एकंदरींत विचार करून पहातां, तुम्हीं कारभाराचें मुख्य ठिकाण तुमच्या मालकीच्या मुंबई बेटांत करावें असा आमचा सल्ला आहे.

ऑर्म. भा. ११४ पृ. १४ इ. | (१४४४) मुंबई — सुरत. | श. १५९३ माघ व. ३ इ. १६७२ फेब्रु. ५

तुम्हीं एक ड्रम [युध्दांतील नगारा] व तें वाजविणारा मागितला आहे. परंतु तुम्हांला त्याची जरूर लागेल असें वाटत नाहीं. कारण **शिवाजीला ह्याच बाजूला भरपूर उद्योग आहेत.**

आम्हीं प्रेसिडेंटच्या आगमनाची वाट पहात आहोंत. सुभेदाराची नाखुषी किंवा शिवाजीच्या सैन्याची भीती, यांपैकीं कोणत्याहि कारणाकरितां तो (सुरतेसच) थांबणार नाहीं अशी उमेद आहे.

सा. ले. १३२ } (१४४५) { श. १५९३ माघ व.१०
श. सु. १०७२ } { इ. १६७२ फेब्रु. १३

बालाजी त्रिमल व हरि विश्वनाथ कुळ० व ज्यो. प्रा सिरवळ व वाइ

यमाजी रंगनाथ बोकील

आपली वायदेसची मिरासी बहुत दिवस गेली. त्यापैकीं निमे आपण साधिली. पंताजीपंत यांस नेम केला होता कीं, निमेवृत्ती साधिल्या निमे गाव देऊ. पंताजीपंत नाकबूल गेले. आपण मान्य केले. तरी आपणास येलके गावची अर्धी वृत्ती दिली आहे.

सा. ले. १३३ } (१४४६) { श. १५९३ माघ व १०
श. } मान्यतापत्र { इ. १६७२ फेब्रु. १३

मल्हारजी येशवंतराऊ देशमु० व माहादाजी राम देसकु. पा सिरवळ

यमाजी रंगनाथ बोकील

ले. १४४५ चे पत्रांतील मजकूर आम्हास मान्य आहे.

फॅ. रे. सुरत भा. ८७ } (१४४७) { श. १५९३ माघ व. १२
पृ. २१-२२ इ. } मॅथ्यू ग्रे (स्वाली)-मुंबई { इ. १६७२ फेब्रु. १५

सुरतेहून भीतीची बातमी आल्यामुळें प्रेसिडेंट सुरतेला गेला. स्वराज्यांतच **शिवाजीला** भरपूर व्यवधानें आहेत, असें जरी तुमच्या ५ तारखेच्या पत्रांत लिहिलें आहे; तथापि तो आपले हात दूरवर पसरतांना दिसतो. त्याच्या बरोबर एक आणि शिवाय बादशाही मुलखांत एक, अशीं त्याचीं दोन मोठीं सैन्यें संचार करीत आहेत. **सालेरीला** वेढा घालणाऱ्या **दिलीलखानाच्या** सैन्याचा मोड करून त्या किल्ल्याचा त्यानें चांगला बंदोबस्त केला. दुसऱ्या एका लढाईंत त्यानें **बहलोलखानाला** ठार मारून **सालेरींत** सुमारें ३० मोठे अमलदार कैदेंत ठेविले आहेत. आतां त्यानें **मुल्हेर** घेतलें हें निश्चित असून सुरतेचा मार्ग ताब्यांत असल्यामुळें तो केव्हांहि सुरतेला येऊं शकेल. मध्यरात्रींच तो सुरतेपासून २५ मैलांवर आल्याची बातमी आली. ती खरी असल्याचें दिसतें. कारण पूर्वी व्यापाऱ्यांना दरवाजांतून बाहेर न सोडणारा सुभेदार आतां त्यांना आपलीं बायकामुलें व संपत्ति सुरक्षित ठिकाणीं नेण्यास परवानगी देत आहे.

वरचेवर येणाऱ्या हुलीमुळें प्रेसिडेंट मुंबईला येऊं शकला नाहीं. पावसाळ्यापूर्वी बहुधा येईल.

ऑर्म भा. ११४ } (१४४८) { श. १५९३ माघ व. १३
पृ. १५ इ. } मुंबई-सुरत (गॅरी ?) { इ. १६७२ फेब्रु. १६

इंग्रजांचें एक डॉय (गलबत) शिवाजीच्या **राजापूरच्या** सुभेदारांनीं धरून त्यावरील **स्पॅरी** आदिकरून लोकांना कैद करून ठेविलें. पुढें शिवाजीच्या हुकुमानें त्यांनीं कैदी मुक्त केले व गलबताबद्दल २५० होन दिले. यामुळें पूर्वीचा (हल्ल्याचा) बेत बदलून गलबतांच्या किमती वगैरे ठरविण्याकरितां **राम शेणव्याच्या भावाला** (नारायण शेणवी) सुभेदाराकडे पाठविलें. आणि अँडर्टननें आपल्या बोटी घेऊन पळालेल्या मलबाऱ्यांचा पाठलाग करावा असा त्याला बदलून हुकूम दिला.

फॅ. रे. सुरत भा. १०६ } (१४४९) { श. १५९३ माघ व. १३
पृ. ७० इ. } मुंबई-सुरत. { इ. १६७२ फेब्रु. १६

साल्हेर-मुल्हेरमध्यें ताज्या दमाचें सैन्य व सामुग्री यांची भरती करून **शिवाजी** परत फिरला आहे. त्याच्या बरोबरच्या सैन्याचीच सुरतेला भीती वाटली असेल ! [ऑर्म भा. ११४ पृ. १६]

फॅ. रे. संकीर्ण भा. २ } (१४५०) { श. १५९३ फाल्गुन शु. ४
पृ. १३८ इ. } मुंबई कन्सल्टेशन { इ. १६७२ फेब्रु. २२

शिवाजीनें वकील पाठवून राजापूरच्या नुकसानभरपाईच्या बाबतींत बोलणें करण्यासाठीं आम्हीं वकील पाठवावा अशी इच्छा दर्शविली. पूर्वीच विनंति केल्यावरून 'शिवाजीच्या नजराण्याकडे ७०० रु. खर्च व्हावे व **उस्टिकनें वकील** म्हणून जावें; शिवाजीला खुद्द ६०० रु. चा व अंमलदार, नोकर वगैरेकडे १५० रु. चा नजराणा उस्टिकनें सारासार विचार करून द्यावा; त्याचेबरोबर १० भंडारी, २ युरोपिअन लोक, घोड्यांची एक जोडी आणि पालखीचे भोई, इतका लवाजमा व रोकड २०० रुपये असा सरंजाम द्यावा' असा प्रेसिडेंटचा हुकूम आला. इ०

फॅ. रे. सुरत, भा. ८७ } (१४५१) { श. १५९३ फाल्गुन शु. १३
पृ. २३ इ. } सुरत-मुंबई. { इ. १६७२ मार्च १

उस्टिक शिवाजीकडे जाण्याबद्दल शक्य तितका गुप्तपणा राखावा. राजापूरच्या नुकसान-भरपाईबद्दल व गलबताच्या भरपाईबद्दल फक्त बोलणें करण्यास तो जात आहे एवढेंच उघड जाहीर करावें. नाहींतर बादशाही अमलदारांना संशय येऊन आमचें नुकसान होईल.

ऑर्म भा. ११४ } (१४५२) { श. १५९३ फाल्गुन व. २
पृ. १७ इ. } मुंबई-सुरत. { इ. १६७२ मार्च ५

शिवाजीच्या वकिलाबरोबर उस्टिक उद्यां निघणार. नजराणा व ह्या शिष्टाईचा एकंदर खर्च मिळून सुमारें १००० रुपये येईल.

मलबाऱ्यांचें ७० टनांचें एक भरलेलें गलबत ॲडर्टननें पकडलें. तें राजापूरच्या **बंदरांत धरलें**, या सबबीवर **राजा**पूरच्या सुभेदारानें मागितलें. परंतु त्याची वाटणी केली पाहिजे असें ठरून त्याची (इंग्रजांची) वांटणी देण्याच्या मोबदल्यांत त्यांचें पूर्वी घेतलेलें हॉय (गलबत) व माल देण्यास सुभेदार कबूल झाला. परंतु दुरुस्तीकरितां नेल्यामुळें हॉय खराब होऊन गेलें आणि मालापैकी बराचसा सुभे०नें लांबविला वगैरे कळल्यामुळें, मलबाऱ्यांचें ७० टनी गलबत (सुभेदारास न देतां) घेऊन येण्याचा हुकूम आम्हीं दिला....शिवाजी रायरीला (Recir ?) आहे. 'दिलीरखानाजवळ निदान ६० ह. घोडे असल्यामुळें शिवाजी त्याच्या वाटेस जाऊं शकत नाहीं!' असें शिवाजीचा वकील म्हणतो. हा वकील कालच **कल्याण**हून आला. परंतु **मुल्हेर**बद्दलची निश्चित बातमी कळली नाहीं.

फॅ. रे. सुरत भा. १०६ } (१४५३) { श. १५९३ फाल्गून व. ९
पृ. ७३-७४ इ. } मुंबई-सुरत. { इ. १६७२ मार्च १३

कंपनीच्या नोकरांकरितां व इतरांकरितां घरें बांधावींत हें आपलें म्हणणें कळलें. परंतु **शिवाजीनें** आपल्या मुलखांत बांधकाम जबर रोज देऊन सुरू ठेविल्यामुळें आमचेकडील कामगार त्याचेकडे पळून जातात. **खंदकाचें चालू** असलेलें काम पावसाळ्याच्या आंत पुरें न झाल्यास पडून जाईल. **राम सेणवी** याचीं बाजारांत अकरा बारा सुंदर दुकानें आहेत, शिवाय **मोदीचें**, मोठ्या खोल्या असलेलें कौलारू घर आहे. हीं जरूरीचे वेळीं मिळतील. पावसाळ्यांत पूर्वतयारी करून ठेविल्यास सप्टेंबरमध्यें बांधण्याची तयारी होईल.

शिवाजीचें खडें सैन्य कल्याणचे वर, खालीं, बाजूला, असें नेहमींच असतें. याकरितां पुढची भिंत अगदीं ठेंगू आहे ती चढविली पाहिजे. यशामुळें त्याला उत्तेजन येऊन आमचे किल्ल्यावर त्याचा डोळा राहील....ले. उस्टिक १० तारखेला गेला. शिवाजीकडून आलेला इसम नेहमींच आपण वकिलाचें काम केलें असें म्हणतो; परंतु त्याला देखील उस्टिक झालेल्या नुकसानीची भरपाई मागण्याशिवाय दुसऱ्या कोणत्या कामाकरितां जात आहे हें समजणार नाहीं(!)... वसई व कल्याण-भिवंडी येथें आम्हीं चौकशी करूं. वसई येथें एकादें गलबत [पहा. ऑर्म ११४ पृ. २१] मिळालें किंवा कल्याण भिवंडीला बांधतां आलें तरी आपलें काम झालें! [ऑर्म भा. ११४ पृ. १८-१९].

ओ. कॉ. भा. ३२ } (१४५४) { श. १५९३-९४
नं. ३५९३ इ. } डच गव्ह. जन.—डच ई. इं. कंपनी { इ. १६७१

वार्षिक वृत्तांतातील अवतरण:——

मोंगलांची फौज रणांगणांत उतरल्यामुळें कांहीं अंशीं **शिवाजीचा** त्रास व दंगा थोडा थंडावला आहे. परंतु विश्वास येत नाहीं. याचें कारण असें कीं, तो अत्यंत लबाड असून, दरबारांतील सर्वांत बड्या राजपुत्राशीं त्याचें सूत असल्यामुळें त्यांचे विचार आणि बेत हे सर्व त्याला कळून त्याप्रमाणें तो वागणूक करतो.

इ. वृ. १८३५ पृ. ५५ } (१४५५) { श. १५९३
सु. १०७२ } सनद { इ. १६७१-७२

सिवाजी राजे साहेब दाम दौलतहू × × ×

कारकून... देशमु. व देसपां. व मोक. क. रयामी प्रांत चाकण

श्री ज्ञानदेव याचे इनाम मौजे आलंदी प्रगणे मारी सालाबाद जिा जमीन मुज़री सेत सवा दीडसे कारवे खंडी १।२॥ येक खंडी अडीच मण देवाचे देवास दिधले असे कुलबाब कुलकानु दुमाले केले असे. दुमाला करणे. यासी काडीचा तोसीस न लावणे. खलकरी अगर कोण्ही इस्की न करणे. सदरहू खलबाद + + घेणें. देवाचे देवास चालवणे. साल दर साल चालवीत जाणे ताजा खुर्दखताचा उजूर न करणें. श्री रामानंद गोसावी तपस्वी यापाशी खत देणें.

खंड ८ ले. २१ } (१४५६) { श. १५९३
सु. १०७२ } तह–'प्रतिपच्चंद्र लेखेव.' { इ. १६७१-७२

जाबिता तह. राजश्री साहेबी तह केला कीं:—जो आपला वतन मुलूक आहे त्यापैकीं माहालोमाहालींहून खजाना करावयास पैके आणावे. त्याचा खजानाच करून ठेवावा. जे वख्तीं मोंगलांशीं झगडा सुरू होईल आणि मोगल येऊन गडांस वेढा घालतील, त्याचे मदतीस जरूर; आणिकी करून ऐवज जुडेना तरीच खजानाचे पैके खर्च करावे. नाहीं तरी एऱ्हवीं राज्यभागास सर्वहि खर्च न करावा. ऐसा साहेबीं तह केला असे. आणि खजाना करावयाची मोईन केली होन:—

१,२५००० (पैकीं) मा एक लाख पंचवीस हजार होन रास. २०००० प्रत्येकीं–कुडाळ, राजापूर, कोळें; १५००० दाभोळ, १३००० पुर्णे, १०००, नागोजी गोविंद. ५००० प्रत्येकीं जाउली, कल्याण, भिवंडी, इंदापूर, व कृष्णाजी भास्कर; २००० सुपें, १,२५००० येणेंप्रमाणें एक लाख पंचवीस हजार होन खजाना करावयाचा तह केला असे. मोर्तब सूद. म. वि.

खं. १५ ले. १३० } (१४५७) { श. १५९३
सु. १०७२ } दोषशुद्धि { इ. १६७१-७२

दसनाम मानभावांची निंब येथें सभा जाली. मठांचे कुणबीण बुली हिनें जीव दिला म्हणून मठपती दोषी होते. भंडारा घेऊन मठपतीस मोकळीक केले.

खं. ८ ले. २३ } (१४५८) { श. १५९३
सु. १०७२ } बक्षीसपत्र { इ. १६७१-७२

शिवाजीराजे

साहेब अगराहून निघालेया उपरी चिरं. रा. **संभाजी राजे** यांस राजश्री कृष्णाजी विश्वासराऊ यांचे सांभाळी केलें. माानइले चिरंजीवास सुखरूप किल्ले राजगडास घेऊन आले. माानइलेची मातु:श्री आईजी + बंदिली. मा। काशी त्रिमळ हेहि बरोबरी आलियाबद्दल मेहेरबानीनें बकषीस द्यावयाचा तह मो। पन्नास हजार रुपये रास मा। काशी त्रिमळ २५००० व मातुश्री आईजी २५००० येणेप्रमाणें पाववावे. मो. सू.

खं. ८ ले. २२ } (१४५९) { श. १५९३
सु. १०७२ } तह 'प्रतिपच्चंद्र लेखेव.' { इ. १६७१-७२

जाबिता तह इमारती करणें. सन इसन्नेकारणें इमारती करावयाचा तह केला असें कीं, गबाळ हुन्नरवंद लावून पैका पावत नाहीं. हुन्नरवंद गवगवा करितां काम करीत नाहींत. याबद्दल तह केला कीं, नेमस्तच इमारती करावी—होन. १,७५००० मा। एक लाख पंचाहत्तर हजार होन रास. ५०००० रायगड, ३५००० दि॥ घरें, २०००० तळीं ? प्रत्येकी १००००, गच्ची ५०००; —किल्ले, १५०००; तट १०००० प्रत्येकीं-सिंहगड, सिंधुदुर्ग, विजयदुर्ग, सुवर्णदुर्ग, प्रतापगड, पुरंधर, राजगड. ५००० प्रत्येकीं प्रचंडगड = तोरणा, प्रसिद्धगड, विशाळगड, महिमतगड, सुधागड, लोहगड, सबळगड, श्रीवर्धनगड व मनरंजन. २००० कोरीगड, २००० सारसगड व महिधरगड, १००० मनोहरगड, ७००० किरकोळ. एकूण १,७५०००.

येणेंप्रमाणें एक लाख पंचाहत्तर हजार होन खर्च करणें. मोर्तब सूद. दस्तुर राजश्री पंत म्हणून संग्रह केला. (मर्यादेयं विराजते.)

सा. ले. २५३ } (१४६०) { श. १५९३
सु. १०७२ } कौलनामा { इ. १६७१-७२

अजर. रा. **शिवाजीराजे** साहेब दामदौलतहू — म. अ. हेबतराऊ सिलंबकर देशमूख त॥ गुंजणमावल दादे कौलनामा येसा जे, तुम्हीं पेश अर्जी साहेबासी रुजुवातीनें इमानें चाकरी करीत होतेस साहेबांची मेहेरबानी तुम्हांवरी होती. येसियासि पदाजी यशवंतराऊ सिवतरकर याणे कितायेक बेसंगपणाची वर्तणूक केली याबद्दल साहेबी त्यावरी

निकर करून डोले काढून गडात्री अदबखाना घातले. दादाजींचे लेक तुमच्या घरास गेले म्हणून बहिरा सिवदेव यांणे नादानगी करून तुमच्या घरास दहा वीस प्यादे पाठविले. त्यावरून तुम्ही शक धरून बाहीर गेलेसी. ते आजविरी बाहीर आहा. यैसियासी हाली तुमचे भाऊ संबाजी येउनु मालुम केले कीं, हैबतराव यास साहेबी कौल मरहमत केलिया साहेबांचे पायापासी हाजीर होईल. म्हणून बराये मालमाती खातिरेस आणून तुम्हास कौल मरहमत केला आसे. आजी तागायेत जो काये गुन्हा तुम्हापासुनु जाहला असेली तो तमाम माफ केला असे. तुम्ही कोणे बाबे शक व अंदेशा न करितां खातिरजमा करून बेशक होऊन येणें. साहेबांची भेटी घेणें. तुमच्या जिवास खता होणार नाहीं. ये बाबे श्री (साहेबा)ची व मातुश्री साहेबांची आण असे व श्री-वरील बेल व श्री-खंडाची भाक व रोटी व माल यैसे पाठविले असे ते घेणे. व तुम्ही येथें आलियावरी तुमची देसमुखी पहिलेपासून वडिलपण चालत आलें आहे. तेणेंप्रमाणें व हमसाई दाहा देसमुखाचे वतनाचे तह देउनु तेणेंप्रमाणें तुमचाहि तह करून तुमचे चालउनु. ये बाबे कौल असे.

हि. रे. भा. ११ पृ. ९० फसली !	(१४६१)	श. १५९३ इ. १६७१

औरंग०—अबदुल रसुल उर्फ इसुरजी राणा, दारवा परगण्याचा देशमुख.

उदेपूरच्या घराण्यपैकीं कृष्णाजी व इसुरजी हे दोन भाऊ होते. पैकीं इसुरजी हा वतनाकरितां मुसलमान झाला. तो वतनाचा भाग आपल्याला देत नाहीं अशी कृष्णाजीनें तक्रार केल्यामुळें औरंगजे०नें कृष्णाजीला वाटा द्यावा अशी इसुरजीला आज्ञा केली. (इ. स. १६७३ मध्यें वरील हुकुमान्वयें वाटणी झाल्याचेंहि पत्रक आहे.)

फॅ. रे. सुरत भा. १०६ पृ. ७४ इ.	(१४६२) मुंबई-सुरत.	श. १५९४ चैत्र शु. ८ इ. १६७२ मार्च २६

ॲडर्टननें (मलबाऱ्यांचीं) नारळ व सुपारी हा माल भरलेलीं कांहीं गलबतें पकडलीं व मुंबईला आणिलीं. त्यांवरील माणसें, हत्यारें, आकाररचना इत्यादि स्वरूप पाहिलें म्हणजे तीं **लढाऊ गलबतें** होतीं यांत शंका रहात नाहीं. अशा बोटी एकाद्या दख्खनच्या बंदरांत माल नेऊन घालून मोकळ्या झाल्या कीं मग समुद्रांत बेलाशक **चांचेगिरीचा** मार्ग पत्करीत.... (पकडलेलें एक गलबत बालासोरचें होतें. कानड्याचा राजा यांच्या चांचेगिरिच्या प्राप्तींत भाग घेत असे.) ह्या गलबताचें काय करावें तें कळवावें. तें छान चालतें. व पुढच्या वर्षी इतर गलबतांना फसवावयास आमिषाचें उत्तम साधन decoy) म्हणून उपयोगी पडेल ! [ऑर्म भा. ११४ पृ. १९].

ओ. कॉ. भा. ३३ } (१४६३) { श. १५९४ चैत्र व. ४
नं. ३६३३ इ. } सुरत-कंपनी. { इ. १६७२ एप्रील ६

शिवाजीबद्दल वारंवार हुली उठल्यामुळें आतां त्याची इतकी भीती वाटेनाशी झाली असली; तथापि **व्यापारावर** त्याचा **अनिष्ट परिणाम** झाला. एका किल्ल्याला वेढा देणाऱ्या **मोंगली** सैन्याचा शिवाजीनें पक्का मोड केला. त्याच्या देशांत घुसलेल्या **दोघां सरदारांची** [बहादुरखान व दिलीरखान] मानखंडणा होऊन मोठें नुकसान सोसून त्यांना परत जावें लागलें. त्यानंतर शिवाजीनें आम्हीं (इंग्रज) फ्रेंच व डच लोक, मोठमोठे मुसलमान व हिंदु व्यापारी व बादशहाचे अमलदार या सर्वांना पत्रें लिहून **जबर खंडणी** मागितली आहे. खंडणी देण्याचें नाकारल्यास सर्व सुरतेचा नाश करण्याची त्यानें दहशत घातली. आतां तो रणक्षेत्राचा जणुं स्वामीच झाल्यामुळें वाटेल तेव्हां येऊं शकेल; कारण त्याचा प्रतिकार करण्यास येथें सुरतेला सैन्यच नाहीं.

[दि]-सुभेदारानें उघडपणेंच '**मुंबईच्या** भरमराटीमुळें **सुरतेला धोका** येईल' अशी शंका प्रगट करून प्रेसिडेंटला मुंबईला जाऊं दिलें नाहीं.

फॅ. रे. सुरत भा. १०६ } (१४६४) { श. १५९४ चैत्र व. १३
पृ. ८६ इ. } मुंबई-सुरत { इ. १६७२ एप्रील १५

ले. उस्टिक अद्याप वरच्या **चौलला** आहे. तेथून निघून शिवाजीकडे गेल्याबद्दलच्या पत्राची आम्हीं वाट पहात आहों. त्यानें कसेंहि करून परिणामाकडे लक्ष न देतां **शिवाजीला** भेटावें असें आम्हाला वाटतें. नकार घेऊनहि तो वेळींच परत आला म्हणजे शिवाजीचीं गलबतें मे महिन्यांत मीठ घेऊन येतील तीं आपण पकडलीं तर त्याचें अपरिमित नुकसान करितां येईल. [ऑर्म भा. ११४ पृ. २१]

सा. ले. ८९ } (१४६५) { श. १५९४ वैशाख शु. ४
हि. १०८३ मोहर ३ } शिलालेख फा. गोवळकोंडे { इ. १६७२ एप्रील २१

सुलतान महमदशहा याचा मुलगा सुलतान अब्दुल्ला कुतूबशहा याचा जन्म सन १०२३ सवाल २८ (श. १५३६ कार्तिक व. ३० ता. २१।११।१६१४) व मृत्यू १०८३ मोहरम ३ (श. १५९४ वैशाख शु. ४ ता. २१।४।१६७२) आणि स. १०३५ जमादिलावल १४ (श. १५४७ माघ शु. १५ ता १-२-१६२६) ला गादीवर बसला.

फॅ. रे. सुरत, भा. ८७ } (१४६६) { श. १५९४ वैशाख शु. ६
पृ. ३० इ. } सुरत-मुंबई. { इ. १६७२ एप्रील २२

शिवाजी **हेन्री केन्री** वर किल्ला बांधणार आहे अशी बातमी आहे. प्रेसिडेंट शिवाजीला मदत करील या सबबीवर सुभेदार त्याला जाऊं देत नाहीं ! खरें म्हटलें तर सुरत बंदरापेक्षां आमचेच हितसंबंध तेथें अधिक गुंतलेले आहेत.

खं. १५ ले. १३१
सु. १०७२ मोहर ९
(१४६७)
मिसेली फा. मु० व सी०
श. १५९४ वैशाख शु. १०
इ. १६७२ एप्रील २७

अजर० सिताबखान व मीराखान सरनाईक किले सातारा

हुदे० मोक० व रया मौ० वरिये किल्ले सातारा.

निंब येथील मठास वरिये येथें ५ बिघे जमीन आहे ती पूर्वीप्रमाणें चालू ठेवणें.

फॅ. रे. भा. १०६
पृ. ९४ इ.
(१४६८)
मुंबई–सुरत
श. १५९४ वैशाख शु. १५
इ. १६७२ मे १

सुभेदार उर्मटपणें प्रेसिडेंटला येऊं देत नाहीं हें वाचून खेद होतो. शिवाजी हेन्री केन्रीवर किल्ला बांधूं इच्छितो हें अद्यापि आमच्या कानावर आलें नाहीं. तसा त्याचा प्रयत्न असेल तर आम्हीं त्वरा करून त्याला बंदी केली पाहिजे. [ऑर्म भा. ११४ पृ. २४]

फॅ. रे. सुरत भा. १०६
पृ. १०५ इ.
(१४६९)
मुंबई–सुरत
श. १५९४ वैशाख व. १४
इ. १६७२ मे १५

काल **उस्टिक शिवाजी**कडून **परत** आला. बराच वेळ तिष्ठत राहिल्यावर त्याच्याशीं व त्याच्या ब्राह्मणांशीं फक्त अर्धा तास बोलणें झालें तें निरर्थक झालें. पण अखेरीला नुकसानभरपाईबद्दल ५००० हजार होन देण्यास तो तयार झाला. राजापूरला वखार उघडली तर सर्वप्रकारें सहानुभूती मिळेल एवढें कायतें निष्पन्न झालें.

शिवाजी लगेच १० हजार सैन्य घेऊन गेला. **मोरोपंडितहि** तितकेंच सैन्य घेऊन दुसऱ्या बाजूला गेला. उभयतां पुनः सुरतेला येऊन मिळतील असा अंदाज आहे. ऋतुमान आतां फारच पुढें गेलेलें आहे हें आम्हांला दिसत आहे. परंतु व्यापारी वर्गाला सुभेदारानें नाखुष केल्याकारणानें त्यांनीं जाहीरपणें तक्रार केल्यामुळें दरबारला जाण्याचा त्याला धीर होणार नाहीं. तेव्हां सुभेदार कदाचित् आपण होऊन शिवाजीच्या हवालीं तें शहर करील! [ऑर्म. भा. ११४ पृ. २५]

प. रे. ऑ. हस्त. भा. १२
सी. ओ. ७७, पृ.५३ इ.
(१४७०)
श. १५९४ ज्येष्ठ शु. ४
इ. १६७२ मे २०

फ्रेंच व्हाइसरॉय मॉंशर डेला हे याचें डचांस उत्तरः–**मलबार व कॉरोमांडेल किनारा** आणि इतर ठाणीं तुम्हीं (डचांनीं) आपल्या अधिकारांत दडपून घेतलीं आहेत या कृत्याबद्दल मोगल बादशहा, पोर्तुगीज लोक, शिवाजी, झामोरिन किंवा इतर कोणींहि तुमच्या बाजूनें बोलतील असें वाटत नाहीं.

खं. २० ले. २१० } (१४७१) { श. १५९४।९५ ज्येष्ठ व. २
मु. १०७३ सफर १५ } फा. मु. मज. व सीः { इ. १६७२ जून २ किंवा १६७३ मे २२

१—बजा कार. व देस. तर्फ माहुल

नरसीभट बिन नारायणभट सो पंढरपूर यांस देगाव येथें १ चावर जमीन इनाम आहे. ती पूर्वीप्रमाणें त्यांजकडे चालविणें.

(दि) ओ. कॉ. } (१४७२) { श. १५९४ ज्येष्ठ व. १४
नं. ३६४९ इ. } मुंबई–ई. इं. कंपनी. { इ. १६७२ जून १४

सुरतेचा आणि सर्व हिंदुस्थानचाच व्यापार अंतस्थ गोंधळामुळें पार बुडाला. विशेषतः खुद्द सुरत शहर नष्ट होण्याचीं चिन्हें स्पष्ट दिसूं लागलीं. यामुळें तुमची संपत्ति आणि व्यापार यांच्या रक्षणाकरितां स्वतःचें असें स्वतंत्र बंदर बसविण्याची वेळ आली आहे; असें प्रेसिडेंट व त्याचें सल्लागार मंडळ यांचें मत आहे. शत्रूबद्दल वारंवार हुली उठतात आणि शहरचा **सुभेदार** व **अंमलदार** हे लोभानें नगरवासीयांकडून **द्रव्य उकळतात**. यामुळें तुमचा माल किफायतशीर विकणें किंवा मालमत्ता किनाऱ्यावर नुसती सुरक्षित राखणें हेंहि अवघड झालें आहे. (सुभेदार आदिकरून अंमलदार) सर्वसाधारण अंदाधुंदीचा आणि बादशाही मुलुखांतील बेबंदशाहीचा फायदा घेऊन **बेतालपणें अत्याचार करितात**. जर त्यांना मूल्यवान **नजराण्यांचा** खुराक सतत दिला नाहीं तर प्रत्यहीं आमची मानखंडना करून तुमच्या व्यवहारांत व्यत्यय आणतात. या गोष्टींचा दूरवर विचार केला म्हणजे, ज्या बाबतींत आम्हीं प्रतिकार करण्यास असमर्थ आहोंत त्या संकटापासून दूर राहून, हळूहळू बराचसा व्यापार तुमच्याच स्वतःच्या बेटावर स्थिर करावा—आणि तेथेंच तो ठेवणें योग्य होईल—, असें वाटूं लागतें.

[ऑ. भा. ११४ पृ. ३६]–**शिवाजीशीं** तहाच्या बाबतींत बोलणें करण्याकरितां **उस्टिक** गेला. त्याचा **शिवाजीनें** चांगला सत्कार केला. आमची मागणी व राजापुरास काय मिळालें याबद्दल त्याचा अंदाज यांमध्यें कल्पनेच्या बाहेर तफावत आहे. त्याच्या अलीकडच्या **भव्य यशाच्या** योगानें **जगाच्या** व खुद्द त्याच्या स्वतःच्याहि दृष्टीनें तो **उच्च पदवीला चढला आहे**. तेव्हां तडजोडीकरितां तो किती खालीं उतरेल हा प्रश्नच आहे. तहानें जडणारा संबंध परस्परांना आवश्यक व हितकारी असाच आहे. मात्र नुकसानभरपाईचा आंकडा किती ठरवावा व त्याची भरपाई कोणत्या मार्गानें व्हावी एवढाच प्रश्न अडून राहिला आहे.

(से.)फॅ. रे. सुरत भा. १०६ } (१४७३) { श. १५९४ आषाढ शु. ५
पृ. ११३ इ. } मुंबई (जेराल्ड ऑंजिअर)–कं. { इ. १६७२ जून १९

मोरोपंडिताच्या हाताखालच्या सैन्यानें **पोर्तुगीजांच्या** मुलखास उपद्रव

दिला; इतका कीं वसई (?) चौल व इतर सर्व ठिकाणीं भेदरून पळापळी झाली. सर्व मुलखाच्या वसुलाच्या ¼ [¼?] ची त्यांनीं मागणी केली. न दिल्यास मोरोपंत सर्व देश धुळीला मिळविणार. शिवाजीचें हें भांडण असेंच चालू राहिल्यास मुंबईला बराच फायदा होईल!

फॅ. रे. सुरत भा. ३ } पृ. ४ (द्वि. सं.) इ. } (१४७४) सुरत कन्सल्टेशन { श. १५९४ आषाढ शु. ७ { इ. १६७२ जून २१

मोरोपंडितानें कोळी राजापासून, (सुरतेपासून ४० कोसांच्या आंतील) **जव्हार घेतलें.** आणि त्याचा प्रतिकार करण्यास बादशाही सैन्यहि नव्हतें. यामुळें आधींच भेदरलेले सुरतेचे लोक, या दिवशीं त्यानें **रामनगर** घेऊन अधिक जवळ मजल मारल्यामुळें, अधिकच भयाकुल झाले. रामनगरचा राजा आपलें कुटुंब घेऊन **गणदेवी**-पासून ४ कोसांवर **चिखलीस** पळाला. गणदेवीहून सर्व लोक पळाले. सुरतेचे दरवाजे बंद केले नसते तर येथीलहि व्यापारी पळून गेले असते! सर्वांत अधिक भय वाढविणारी गोष्ट म्हटली म्हणजे सुभेदार व प्रमुख **नगरशेट मिर्झा मोसुम** यांना शिवाजीचें किंवा मोरोपंडिताचें आलेलें पत्र होय. पूर्वींप्रमाणेंच यांत सरकारी जमाबंदीची चौथाई (४ लक्ष रु.) मागितली असून, न दिल्यास पक्की दहशत घातली आहे. हें ऐकून बऱ्याच सुस्थितींतील लोकांनीं आपलीं मुलेंमाणसें सुरक्षित ठिकाणीं **भडोचकडे** वगैरे पाठवून देण्याबद्दल सुभेदाराकडे अर्ज केला. इंग्रजांनींहि आपला बंदोबस्त केला.

फॅ. रे. सुरत भा. ८७ } पृ. ४५ इ. } (१४७५) सुरत-मुंबई { श. १५९४ आषाढ शु. ७ { इ. १६७२ जून २१

११ तारखेला शिवाजी अगदीं जवळ आल्याची हूल उठली. **मोरोपंडिताची** फौज जवळ आली होती. त्यानें ५७ कोसांवरील कोळी राजाचें **जव्हार** घेतलें व तेथें शिबंदी ठेऊन तो परत गेला. येथील सुभेदारानें शिवाजीचा **बंदोबस्त** करण्याच्या सबबीवर **वर्गणी** जमविली. परंतु शिबंदीची काळजी न करितां **स्वतःची तुंबडी भरण्यांत** त्यानें मुळींच कसूर केली नाहीं. **हिंदूंवरच कराचा बोजा पडणार** हें नक्की माहिती असल्यामुळें मुसलमानांनींहि त्वरेनें मान्यता दिली. हिंदूंनीं थोडा वेळ ओढून धरलें. पण सर्वांनीं वर्गणी दिली! बंदोबस्ताची कांहींच तरतूद चालू नसून हिंदू व्यापाऱ्यांची खानेसुमारी (आर्थिक पहाणी) करण्याकरितां अमलदार मात्र नेमिले आहेत!

फॅ. रे. संकीर्ण, भा. २ } पृ. १२९ इ. } (१४७६) मुंबई कन्सल्टेशन { श. १५९४ आषाढ शु. ८ { इ. १६७२ जून २२

शिवाजीनें कोळी राजाचा मुलूख काबीज केला असून मुंबईजवळ घोडबंदर

येण्याचे त्याचे प्रयत्न चालू असल्यामुळें माहीम, शीव(Siam) व मोएहूम (Moehum) यांची त्वरित तटबंदी करावी.

फॅ. रे. सुरत भा. ८७ पृ. ४७-४९ इ.	(१४७७) सुरत-मुंबई.	श. १५९४ आषाढ शु. ११ इ. १६७२ जून २५

२१ तारखेला शिवाजीच्या सैन्याबद्दल अवई उठली. **जव्हारला** १७ लाख रुपयाचा खजीना मिळाल्यावर शिवाजीनें **रामनगर** घेतलें; [इत्यादि हकीकत २१ जूनच्या ले. १४७४ प्रमाणें]...व तो अधिक जवळ आला. त्याच दिवशीं शिवाजीचें चौथाईच्या मागणीबद्दलचें तिसरें पत्र आलें. '**हेंच पत्र शेवटचें** आहे' असेंहि शिवाजीनें लिहिलें. '**तुमच्या बादशहानेंच** माझा देश आणि माझी प्रजा यांच्या रक्षणाकरितां मला **सैन्य ठेवण्यास भाग पाडलें**; त्या सैन्याचा पगार (मला तुमच्याकडूनच घेऊन) दिला पाहिजे ! जर तुम्हीं त्वरेनें पैसा पाठविणार नसाल तर माझ्या करितां एक मोठें घर तयार ठेवा. मी तेथेंच बसून कर व जकाती यांचा जातीनें वसूल करीन ' असें शिवाजीनें कळविलें. कारण, आतां त्याला अडविणारा कोणींच नव्हता ! या पत्रानें भेदरलेले लोकांना मध्यरात्र उलटल्यावर मुलेंमाणसें हालविण्यास सुभेदारानें परवानगी दिली; परन्तु सकाळीं पुनः बदलून दुसऱ्या दिवशीं शिवाजीची मागणी कशी पुरी करावी हें ठरविण्याकरितां सैय्यद महमदाचे घरीं सर्व व्यापाऱ्यांची सभा बोलाविली. व्यापाऱ्यांनीं (आपसांतून) एक लक्ष रुपये व देसाई वर्गानें निर-निराळ्या परगण्यांतील शेतकऱ्यांकडून दोन लक्ष रुपये उभे करावे असें सुभेदारानें सुचविलें. देसायांनीं, गतसालचा सर्व सारा आपण सरकारी खजिन्यांत भरला असून (पुढील वर्षांची) आगाऊ भरपाई करण्याचें आपल्याला त्राण नाहीं असें सांगितलें. व्यापाऱ्यांनाहि लाखाची उभारणी करतां येईना. शेवटीं व्यापाऱ्यांनीं २० ह. व शेत-कऱ्यांनीं ४० ह. द्यावे अशी सुभेदारानें तोड केली. परन्तु स्वतःचीच तुंबडी भरण्याचा हा उद्योग आहे असें ओळखून सर्वांनींच नकार दिला !

२२ तारिखेला शनिवारीं आम्हीं आमचा बंदोबस्त केला. दुसरे दिवशीं सकाळीं दिलीलखान आपल्याला थोपविण्यासाठीं आपल्यावर चालून येत आहे असें कळल्यावरून मोरोपंडित **रामनगर** न घेतांच, परत फिरला असें कळलें. ह्या बातमीनें आणि कालरात्रीपासून सुरू झालेल्या (व आतांहि पडत असलेल्या) पावसामुळें सुरतेंत सर्वांना आनंद होऊन, आम्हांलाहि त्रासांतून सुटका झाल्यासारखें वाटत आहे. परन्तु एकादा पंधरवडा उघडीप पडल्यास पुनः शिवाजी येण्याची भीती उत्पन्न होईल.कारण (मोंगली) सैन्य पावसाळ्या करितां छावणी करून राहिल्यावर **शिवाजीचें** सैन्य दौड करील. आणि फार आधीं बाहेर नच पडलें तर निदान सप्टेंबरमध्यें तें (सुरतेवर) येईल असें मानण्यास हरकत नाहीं.

फॅ. रे. सुरत भाग ८७ } पृ. ५१ इ. (१४७८) कारवार–सुरत { श. १५९४ आषा. शु. १२ इ. १६७२ जून २६

आमच्या नव्या सुभेदारानें **शिवेश्वर** व **कद्रेरा** येथील किल्ल्यांच्या नायकवाडींशीं तह केला. परंतु त्यांच्या असंतोषामुळें हा तह फार वेळ टिकेल असें वाटत नाहीं. **अंकोला** आणि **मिरजन** हे किल्ले फार मजबूत असल्यामुळें मोठें सैन्य आल्याशिवाय ते हस्तगत होणार नाहींत. **शिवाजी इकडे** (कारवारकडे) **येणार आहे** अशी दाट वदंता आहे. तेव्हां तो आल्यास आम्हीं कसें वागावें व त्याच्या शब्दावर भरंवसा कितपत ठेवावा हें कळवावें.

फॅ. रे. सुरत भाग १०६ } पृ. ११५ इ. (१४७९) मुंबई–सुरत. { श. १५९४ आषाढ व. ८ इ. १६७२ जुलै ८

मोरोपंडीत १५००० पर्यंत आपली फौज वाढवून तुमच्या तिकडेच जात आहे. **सुरतेहून** छोट्या गलबतांचें **आरमार शिवाजीवर पाठविलें** जाणार अशी बातमी आल्यामुळें त्याचा प्रतिकार करण्याची ही तयारी आहे. सुरतेबद्दल काळजी वाटते. कारण त्या शहरावर त्याचा डोळा असून तो तें घेतल्याशिवाय किंवा नाश केल्या शिवाय राहणार नाहीं. [ऑर्म भा. ११४ पृ. ४२]

ओ. कॉ. } नं. ३६४९ इ. (१४८०) मुंबई–ई. इं. कंपनी. { श. १५९४ आषाढ व. १२ इ. १६७२ जुलै १२

१५ जूनचें पत्र घेऊन जासूद निघाला त्यावेळीं एका बाजूनें **शिवाजीच्या** व दुसरीकडून **मोंगलांच्या** सैन्यानें रस्ते रोखून धरून इतका बारकाईनें शोध चालविला होता कीं एकहि पत्र सुटून जाणें मुष्किलीचें होतें. परंतु आतां सैन्यें छावणीस गेलीं असल्यामुळें हा त्या पत्राचा उतारा व नवा मजकूर लिहून पत्र पाठविलें आहे.

सर्व **पोर्तुगीज कायदे** रद्द करून आम्हीं इंग्रजी कायदे व न्यायकोर्ट १ ऑगस्ट पासून चालू करणार.

सुरतेच्या आसपासच्या देशांत आजतागायत चालू असलेल्या **शिवाजीच्या** स्वाऱ्यामुळें गोंधळ उत्पन्न झाला आहे. या कारणानें कांहीं काळ तरी तेथील व्यापार बंद करणें भाग आहे.

असल्या भर पावसाळ्यांत देखील **शिवाजी** शेजाऱ्यांना स्वस्थता देत नाहीं. पोर्तुगीजांच्या हद्दीला लागून असलेल्या **जव्हार** (Guar) व **रामनगरच्या** राज्यांवर छापा घालून त्यांच्यापासून व पोर्तुगीजांपासूनहि त्यानें धमकी देऊन खंडणी मागितली. **पोर्तुगीजांची** पूर्वीचीच हलाखीची स्थिति होती. परन्तु आतां ती फारच कष्टाची झाली आहे. (कोळी राजांचीं राज्यें घेतल्यामुळें) त्याला **सुरतेचा थेटचा**

व नजीकचा मार्ग खुला झाला आहे. आणि त्यानें आपलें यशस्वी सैन्य सुरतेवर पाठविलें आहे अशीहि विश्वसनीय बातमी आहे. परन्तु तहाची वाटाघाट चालू असल्यामुळें तो आमच्या वखारीला त्रास देणार नाहीं अशी आशा वाटते.

उत्तम तटबंदी व इतर बंदोबस्त करण्याचे खर्चाचें काम पुरें झाल्यावर, (सर्वत्र अंदाधुंदी चालू असतांना) आपलें बेट शांत व सुरक्षित राखिल्याचा खरा फायदा २ वर्षांनीं तुम्हाला दिसून येईल. आजच आपल्या येथील बिनधोकपणाची प्रसिद्धी होत असून शेजारचाच एक राजा आमचा प्रजाजन होऊन आमच्या रक्षणाखालीं येण्याची इच्छा करीत आहे. परन्तु आमचा प्रबळ शेजारी शिवाजी याला दुखविण्याची आमची इच्छा नसल्याकारणानें आम्हीं सावधपणेंच पाऊल पुढें टाकूं. [ऑर्मे भा.११४ पृ. ३८-४०]

खं. २० ले.५४ सु. १०७३ स.	(१४८१) महजर (न.) वाटणी	श. १५९४ श्रावण शु. १ इ. १६७२ जुलै १५

विठोजी गाखोजी, बापूजी बाजी, बरवाजी आपाजी, लखमाजी आपाजी निगडे. (पर. शिरवळचे देशमूख) हे वृत्तीबद्दल भांडत होते. रा. साहेब बंदगीस हकीकत सांगितली. माहालींचे कारकून व गोत यांनीं तक्सिमा व हक्क यांची वाटणी करून निवाडा केला आहे.

खं. १८ ले. १९ सु. १०७३रखर २	(१४८२) जाबिता	श. १५९४ श्रावण शु. ४ इ. १६७२ जुलै १८

जाबिता मखलासी राघो बल्लाळ अत्रे सुभे. व. कार. सर. जुनर

मौजे चिखली पर. पुणें येथील माऊ माली निस. मोक. याचा व त्रिसाजी बाबजी कुळकर्णी यांचा गावगतीच्या हिसेबाबदलचा तंटा होता. हिसेब करतां होन ५६।। रुपये १२५।। मढू ८।। खंडी व गूळ ४ खंडी विसाजीस द्यावे असें ठरलें.

रु. ३ ले. १० हि. १०८३ रखर ५	(१४८३)	श. १५९४ श्रावण शु. ६ इ. १६७२ जुलै २०

दिलेरखान——— निमाजी गोमाजी

सयाजी भोसल्याचा वकील सांगतो कीं तुम्ही आपल्या शिपायासह चाकरी करूं इच्छितां; तरी भरंवसा धरून आमचेकडे यावे. योग्यतेनुरूप नोकरी देऊं.

फॅ. रे. सुरत भा. ८७ पृ. ५३ इ.	(१४८४) सुरत-मुंबई	श. १५९४ श्रावण शु. ६ इ. १६७२ जुलै २०

शिवाजीमुळें फक्त एकदांच नव्हे तर अनेक वेळां **सुरतकरांना भयाकुल होण्याची** पाळी आली. आतां (चौथाईच्या) पैशांकरितां आलेलें सैन्य परत जात असले

तथापि तें पुनः केव्हां येईल याचा नियम नाहीं. कारण शिवाजीचें पुष्कळच सैन्य बाहेर पडलें आहे. **जाधवरावाच्या** हातून **मोरोपंडितानें नासिकत्रिंबक** घेतलें. त्याच्या ४०० लोकांपैकीं बरेचजण कामास आले व जाधवराव कैद झाला. हा जाधवराव कांहीं अंशीं शिवाजीच्या नात्यांतला असून, त्याच्याकडून फुटून मोंगलांना मिळाला होता.

ओ. कॉ. भा. ३३ } (१४८५) { श. १५९४ श्रावण शु. ७
नं. ३६६१ जुलै ३१ न्यू. } बटेव्हिया- डच ई. इं. कंपनी. { इ. १६७२ जुलै २१

वेंगुर्ल्याच्या आसपास अशांततेमुळें व असुरक्षिततेमुळें व्यापार बंद आहे. विजापूर-दरबारची सर्व खबर ठेवून **शिवाजीनें** सर्व **मुलखांत वर्चस्व** प्राप्त करून घेतलें आहे. **अब्राहम लेफेर** हा एक पत्र व नजराणा घेऊन **राजेरी** (रायरी) शहरास, **शिवाजीला** भेटण्यासाठीं (सलाम करण्यासाठीं) गेला. शिवाजीनें त्याचा चांगला सत्कार केला. परंतु ४५० होनांपेक्षां नजराणा मोठा पाहिजे होता असें दिसलें. आतां त्याची मर्जी आमच्यावर कितपत प्रसन्न आहे हें वेळ आल्यावर समजेल.

श्री. सं. चा. ले. १० } (१४८६) { श. १५९४ श्रावण शु. ८
सु. १०७३ रबर ७ } { इ. १६७२ जुलै २२

शिवाजी राजे——दत्ताजीपंत वाकेनिवीस

चाफळ येथें यात्रा भरते महोत्छाह चालतो. तेथें कटकीचे सिपाही व बाजे लोक देवाची मर्यादा चालवीत नाहींत. यात्रेकरूस तसवीस देताती. दिवाणबले कलागती करताती. तरी तुम्हीं अंगे जातीनें जाऊन तसवीस उपद्रव होऊ नेदणें व रामदास गोसावी यांचाहि परामृश करीत जाणें.

श्री. सं. चा. ले. ११ } (१४८७) { श. १५९४ श्रावण शु. ८
सु. १०७३ रबर ७ } मु. व सी. { इ. १६७२ जुलै २२

रा. **शिवाजी राजे——** गणेश गोजदेऊ सुबे. व कार. ता। कोल.

मजकूर (ले. १४८६ प्रमाणें).

फॅ. रे. सुरत भा. ८७ } (१४८८) { श. १५९४ श्रावण शु. १३
पृ. २८ अ, इ. } कारवार-सुरत { इ. १६७२ जुलै २७

सुभेदारानें तह केल्यापासून येथें शांतता आहेच. माजी सुभेदार **महमदखान यानें** येथील कांहीं ठिकाणच्या नाइकवाडी लोकांच्या बोलावण्यावरून **बंड केलें**. परंतु त्याचा मोड झाला. गेले दहा दिवस किंवा अधिकच, विजापूरचा **आदिलशहा मेल्याची** बातमी आली. परंतु खुद्द विजापुराहून पक्केपणाचें पत्र वगैरे अद्याप आलेलें नाहीं.

फॅ. रे. सुरत, भा. ८७ } (१४८९) { श. १५९४ श्रावण व. १
पृ. ५७ इ. } सुरत–मुंबई { इ. १६७२ जुलै ३०

सुरतेच्या लोकांना **नगरखानाच्या** सैन्याचा फार त्रास होता. तो आतां आपलें सैन्य घेऊन गेला. **शिवाजीच्या भीतीमुळें** तो पि प ळ वा डा मार्गानें (Pipp : Uwarra) गेला.

फॅ. रे. सुरत भा. ८७ } (१४९०) { श. १५९४ श्रावण व. १३
पृ. ५९ इ. } कारवार–सुरत. { इ. १६७२ आगस्ट १०

आदिलशहाचें दुखणें इतकें भयंकर होतें कीं, त्याच्या मरणाच्या **संशयामुळेंच** विजापूरचे दरवाजे व दुकानें ३ दिवसपर्यंत बंद होतीं. इतक्या दूर अंतरावर आम्हांला तो मेला अशीच बातमी कळली! थोडासा शुद्धीवर येतांच त्यानें **खोजा जाफरखान** या आपल्या आवडत्या खोजाला ह्या बाजूचा प्रांत व ९ लक्ष होनांचा मुलूख दिला. गेल्या **कर्नाटकच्या युद्धांत** सेनापती असतांना जाफरखानानें विशेष यश मिळविल्यामुळें त्याची बढती होऊन तो आतां सर्व राज्याचाच कारभार करितो. त्याचा स्वभाव चांगला आहे असें ऐकतों. त्याचें सामर्थ्य मोठें असल्यामुळें बंडाचा मोड होऊन शांतता नांदेल अशी अपेक्षा आहे. त्याचे सुभेदार अद्याप आले नाहींत. लवकरच येतील असें वाटतें.

फॅ. रे. सुरत, भा. ८७ } (१४९१) { श. १५९४ भाद्र. शु. १०
पृ. ६३ अ इ. } सुरत–स्वाली. { इ. १६७२ आगस्ट २२

काल **घोग्याहून** बारा फ्रिगेटसचें आरमार नदींत शिरलें. उमरजी नांवाचा इसम मुख्य अधिकारी आहे व त्याचे बरोबर १००० लष्कर आहे. हे लोक येथें बंदोबस्ताकरितां आले आहेत कीं **शिवाजीवर** चालून जाण्याकरितां **दंडाराजापुरीस** जाणार आहेत हें अजून समजलें नाहीं.

(से) फॅ. रे. सुरत, भा. १०६ } (१४९२) { श. १५९४ भाद्र. शु. १३
पृ. १२६ इ. } फोर्ट सेंट जॉर्ज–सुरत. { इ. १६७२ आगस्ट २६

(ह्या भागांतील शिवाजीचें धोरण निराळें दिसतें.) तो मुलूख लुटण्याऐवजीं जिंकण्याकडे अधिक लक्ष देऊं लागला आहे. (!)

फॅ. रे. सुरत, भा. ३ } (१४९३) { श. १५९४ भाद्र. व. १
पृ. १५ (द्वि. सं.) इ. } सुरत कन्सल्टेशन { इ. १६७२ आगस्ट २९

सुरतेला धोका असल्यामुळें व्यापार मंद व किमती अनिश्चित आहेत. करितां आतां मुंबईला गलबतें येतील तीं सुरतेला न पाठवितां सुरक्षिततेकरितां **माल मुंबईलाच** उतरून घ्यावा.

फॅ. रे. सुरत भा. १०६ } पृ. ११४ (द्वि. सं.) इ. (१४९४) { श. १५९४ आश्वीन शु. १५ इ. १६७२ सप्टें. २६

थॉमस रोच, मोंगलांकडील गोलंदाज, दिल्ली-सुरत.

गेल्या दोन महिन्यांतील दरबारचा **हकीकतवाका** लिहिला आहे. त्यांतील एका परिच्छेदांत असें लिहिलें आहे की 'सुरतेच्या कोणीं खुदा अहमद (Nocquadah Omed नाखुदा अहमद) नांवाच्या माणसानें बादशहाकडे अर्जदास्त पाठविली कीं, "बादशहा १ लक्ष २० हजार रुपये खर्च करण्यास तयार असेल तर **शिवाजी** इतके दिवस **हेन्री केन्रीच्या** किल्ल्याचें बांधकाम करीत आहे त्यांत मी अडथळा उत्पन्न करितों." त्यावर बादशहानें त्याचा सदर रकमेबद्दल जामीन घेऊन त्याला संमति दिली. हा उतारा पाहून याचा उपयोग तुमच्या अर्जदास्तींत करावा असें मला वाटलें. 'शिवाजीला विरोध करणारा बादशाही अंमलदार **दंडाराजपुरीचा** सिद्दी ह्याला साहाय्य करावें म्हणून मी मुंबईला जात असतां सुभेदारानें मला जाऊं दिलें नाहीं' [असें तुमच्या अर्जदास्तींत म्हणण्यास मला कांहींच हरकत दिसत नाहीं].

(से) फॅ. रे. सुरत भा. ८७ } पृ. ८३-८४ इ. (१४९५) स्वाली मरीन- { श. १५९४ आश्वीन व. ५ इ. १६७२ आक्टो. १

सुरतेच्या सुभेदारानें त्याच्या जुलमाविरुद्ध तक्रार करणाऱ्या एका व्यापाऱ्याला ठार केलें व इतरांना धमकी दिली.

फॅ. रे. सुरत भा. १०६ } पृ. १४४-४५ इ. (१४९६) मुंबई-सुरत { श. १५९४ कार्तीक शु. ७ इ. १६७२ ऑक्टो. १८

शिवाजी मोठें सैन्य उभारीत आहे. १६००० सैन्य खडें तयार असून ४ मोठीं घोडदळाचीं पथकें तो आणखी वाढवीत आहे. हीं पथकें मूळचीं मोंगलांकडील असून तीं आतां तिकडून फुटून **सिद्दी हिलाल, जाधवराव** (Gadora) आणखी इतर दोघेजण यांच्या नेतृत्वाखालीं **शिवाजीला** मिळालीं आहेत. आणखीहि पुष्कळ येणार आहेत अशी वंदता आहे. आतां **दिलीरखान एकटा पडला** आहे. त्याच्याशीं युद्ध करण्याचा त्याचा बेत आहे. त्याचा पराजय झाला तर **शिवाजी** केव्हांच **गुजराथचा** मालक बनेल ! **शिवाजीचा** एक हस्तक आतां येथें बेटावर तहाचें बोलणें पुरें करण्याकरितां आलेला असून, सुरतेवर त्यानें हल्ला केलाच तरी तो आमच्या वखारीला त्रास देईल असें वाटत नाहीं. परंतु त्याच्यावर फार विश्वास ठेवूं नये हें चांगलें. [ऑर्म भा. ११४ पृ. ७८].

ओ. कॉ. भा. ३३ } नं. ३६९२ इ. (१४९७) सुरत-कंपनी { श. १५९४ कार्तीक शु. ११ इ. १६७२ ऑक्टो. २२

ऑगस्ट व सप्टेंबर हे दोन महिने खेरीजकरून गेल्या सर्व वर्षभर **शिवाजीच्या**

सैन्याची आम्हांला भीती वाटत होती. शहराचे दरवाजे आणि सर्व रस्ते किलेक महिने बंदच पडले. फारच थोड्या मोठ्या लोकांना आपलीं मुलेंमाणसें शहराबाहेर पाठविण्याची परवानगी मिळाली. आम्हीं कंपनीची मालमत्ता प्रथम स्वालीस व नंतर रानिआळ्याला हालविली.

(से.)फॅ. रे. सुरत भा. ८७ पृ. ८९ इ. | (१४९८) कारवार, फिलिपगिफर्ड–सुरत | श. १५९४ कार्तीक शु. १४ इ. १६७२ ऑक्टो. २५ नंतर

डचांनीं आपलें तांबें या बंदरांत आणण्याचें कारण शिवाजी आणि डच लोक यांच्यामध्यें दलालाच्या संबंधांत (किंवा कमिशनच्या बाबतींत ?) कांहीं वाद आहे.

फॅ. रे. सुरत भा. ३ पृ. २५ (द्वि. सं.) इ. | (१४९९) सुरत आणि शिवाजी | श. १५९४ कार्तीक शु. १५ इ. १६७२ ऑक्टो. २६

सुरत रोजनिशी:–शिवाजीचें मोठें सैन्य रामनगरपर्यंत आलें व बादशाही उमरावांपैकीं चौघे आणि ४ घोडदळाचीं पथकें यांनीं बादशाही चाकरी सोडून शिवाजीची धरली ही बातमी ऐकून लोकांना भय वाटलें.

[सदर १६७२ ऑक्टो. २८]–शिवाजीच्या आगमनाची बातमी पक्की ठरली. शिवाजीचें सैन्य गणेदवीपासून ६ कोसांवर असून इकडच्याच रोखें येत आहे व उद्यां सकाळपर्यंत येऊन पोंचेल अशी बातमी रात्रीं ८ वाजतां आली. इंग्रजांनीं स्वसंरक्षणाचा बंदोबस्त केला.

[फॅ. रे. सुरत, भा. ८७ पृ. ८७ ऑक्टो. ३१] सुरत-मुंबई:–२८ तारखेची हूल दुसरे दिवशीं सकाळीं ओसरली. पुढें आलेली तुकडी नदीचा उतार पाहूनच, शिवाजीचा तळ रामनगरच्या अलीकडे पडला होता त्याला जाऊन मिळाली. आतां शिवाजी त्याच्या मर्जीस वाटेल तेव्हां येईल. अशा धामधुमीच्या काळांत मालांत कोणींच पैसा घालण्यास तयार नाहीं. यामुळें कंपनीचा माल पडून राहिला आहे.

[फॅ. रे. सुरत भा. ३ पृ. २७ द्वि. सं.]– सुरत कंन्सल्टेशनमध्यें २ नोवेंबरपर्यंत शिवाजीच्या भीतीमुळें कंपनीचें कापड घाऊकीनें खपलें नाहीं असें लिहिलें आहे.

हाच प्रतिध्वनि [फॅ. रे. सुरत भा. ३ पृ. ३२] नोवेंबर २० चे पत्रामध्यें आहे. ‘सिरोंज, कारंजा, बऱ्हाणपूर, डमगांव, नंदराबाद व दख्खनमधील इतर शहरें इकडे पाठवावयाचा माल शिवाजीची धामधूम चालू असल्यामुळें कंपनीला थोडा अधिक खर्च आला तरी विमा उतरून पाठविण्यांत येई. ’ असा खुलासा सुरतच्या कौन्सिलनें वाढत्या विमा खर्चाबद्दल इलाख्याची पहाणी करण्याकरितां नेमलेल्या कमीटीला दिला.

फॅ. रे. सुरत भा. १०६ } (१५००) { श. १५९४ कार्तीक व. ६
(द्वि. सं.) पृ. १२ इ. } मुंबई-सुरत. { इ. १६७२ ऑक्टो. ३१

दंडाराजपुरीच्या कुमकेकरितां सुरतेहून आलेलें २० गलबतांचें आरमार मुंबईच्या आखाताच्या बाहेर राहिलें आहे. ह्या बंदरांत (शेजारच्या **शिवाजीच्या मुलखाला उपद्रव** देण्याला सवड मिळावी म्हणून) प्रवेश मिळण्याबद्दल त्यांनीं विनंति केली. परन्तु तशी परवानगी देणें न्याय्य आहे किंवा तें मुत्सद्देगिरीचें होईल असें आम्हांला वाटलें नाहीं. त्यांच्या आगमनाची तुमच्या कडून आगाऊ सूचना असती तर बरें झालें असतें, आम्हीं त्यांच्याकरितां अधिक तयार राहिलों असतों. [ऑर्म भा. ११४ पृ. ८१]

ऑर्म. भा. ११४ } (१५०१) { श. १५९४ कार्तीक व. ३०
पृ. ८४ इ. } मुंबई-सुरत. { इ. १६७२ नोवें. ९

सुरतेहून निघालेल्या आरमाराची **शिवाजीच्या** आरमाराशीं लहानशी चकमक झाली. परन्तु त्यांत सरशी कोणाची झाली हें समजलें नाहीं.

(से.) फॅ. रे. सुरत भा. ८७ } (१५०२) { श. १५९४ मार्ग. शु. ३
पृ. ९१ इ. } सुरत-मुंबई. { इ. १६७२ नोवें.१२

गेल्या भीतीनंतर आतां सर्वत्र शांतता आहे. (**शिवाजीचें** ?) सैन्य पूर्वीच्याच ठिकाणीं आहे. **बहादरखान** (Bander) व **दिलीरखान** नजीकच असून अद्यापि एकहि चकमक झाली नाहीं.

फॅ. रे. सुरत भा. ८७ } (१५०३) { श. १५९४ मार्ग. शु. १४
पृ. ९४ इ. } सुरत-मुंबई. { इ. १६७२ नोवें. २३

मुंबईकरांना लांकूडसामान व सर्पणाची जरूर होती. **पोर्तुगीजांनीं** जबर जकाती घालून पुरवठा करण्यास **अडथळा केल्यामुळें** सुरतेहून भाड्याचें गलबत करून हा माल मुंबईला पाठविण्यांत आला. भाडें २४० रु.

खं. १५ ले. १३२ } (१५०४) { श. १५९४ मार्ग. व. १
सु. १०७३ साबान १४ } { इ. १६७२ नोवें. २५

विठ्ठल दत्तो सुभे० व कार० सुभा जाउली-रा. कार. कसबे हुमगाऊ

हुमगाव येथें रेवागीर गोसाव्याचे इनामाचीं झाडें आहेत तीं त्यांजकडे चालविणें.

फॅ. रे. सुरत भा. १०६ } (१५०५) { श. १५९४ मार्ग. व. ९
पृ. २४ इ. } मुंबई-सुरत. { इ. १६७२ डिसें. २

शिवाजीचीं लहान सहा गलबतें त्याच्याच **संमतीनें** ह्या (मुंबई) बंदरांत

ठेविलीं आहेत. तीं सर्व नवीं असून **कल्याण-भिवंडीला** बांधलेलीं आहेत. येथे आम्हीं असें जाहीर केलें आहे कीं आमच्या नुकसानभरपाईच्या मागणीच्या बदल्यांत आम्हीं तीं पकडलीं आहेत. सुरतेच्या आरमारावर त्या गलबतांनीं हल्ला करूं नये म्हणूनच तीं मुंबईला धरून ठेवलीं आहेत असें आपणहि प्रसिद्धपणें सांगावें. [ऑर्म. भा. ११४पृ.८९]

शि. च. ले. ६५ } सु. १०७३ रम १ } (१५०६) ताकीद-फा. मु. व सौ. { श. १५९४ पौष शु. २ { इ. १६७२ डिसें. ११

अज दि. कर्या. कासेगाऊ किले पनाला-ता मोक. मौ. तांदळे, रेटरे,

नरहरिभट बिन अंतीभट गिजरे मुक्काम कऱ्हाड यांस २ होन दोन्ही गांवांत मिळून धर्मादाय चालत आहेत. तरी ते पूर्वीप्रमाणें चालविणें.

सा. ले. ३०२ } श. } (१५०७) { श. १५९४ पौष शु. ७ { इ. १६७२ डिसें. १६

सखोजी व जैतजी राजे जव्हारकर-वेद. सोनभट धर्माधिकारी.

आम्हीं व आमचे वंशज तुम्हास तीर्थोपाध्ये मानितील.

ओ. कॉ. भा. ३३ } नं. ३७२१ इ. } (१५०८) फोर्टसेंट जॉर्ज-कंपनी. { श. १५९४ पौष शु. ७ { इ. १६७२ डिसें. १६

पश्चिम घांटाच्या बाजूला आणखी ढग गोळा होत आहेत. कर्नाटकचा वृद्ध राजा-ज्याला आपल्या पदरच्या मानकऱ्यांशीं कठोर वागणुकीमुळें राज्याला मुकावें लागलें होतें **तो-मृत्यु** पावल्यामुळें त्याच्या भावाचा मुलगा अधिकारावर आला. **शिवाजीच्या भावाला वारसा मिळावा** (?) अशी दीर्घ कालाची अपेक्षा होती. एका विजापुरी उमरावानें (प्रजेनें) त्याला आपली मुलगी दिली. मैसूर, मदुरा व तंजावर येथील बडे नायक हेंच काय ते पूर्वीच्या राजाचें संपूर्ण अवशेष आहेत. ते, संधि येईल तेव्हां, ह्या गोष्टीला आड येणार नाहींत, असें वाटतें. असें असेल तर संधीकरितां त्यांना फार वाट पहावी लागणर नाहीं. हा प्रांत आणि वरील तीन नायकांचा मुलूख यांच्या मध्येंच विजापूरनें नुकताच जिंकलेला मुलूख असल्यामुळें त्याच्या बंदोबस्ताबद्दल आदिलशहा बरीच काळजी घेतो [हीच एक लहानशी अडचण आहे]. नाहींतर, मोंगलापासूनचें भय, (सर्वत्र पसरलेली) अंदाधुंदी, कारभारामधील दुही आणि अव्यवस्था, आणि सरकारच्या गुन्हेगारांना शिक्षा करण्यास वाटणारें भय हीं (राज्यांत दिसून येणाऱ्या ह्या गोष्टी) विनाशकाल सूचित करणारीं दुश्चिन्हें आहेत. [त्यांचा फायदा घेतां येण्यासारखा आहे.] या प्रांताचा राजप्रतिनिधि, नवा नबाब, हा जन्मतः हिंदू होता व अगदीं लहानपणीं त्याची सुंता झाली. त्यानें सर्व कारभार **हिंदू व ब्राह्मण लोकांच्या हातांत देऊन** पूर्वापार अधिकार उपभोगणाऱ्या इराण्यांना काढून लावलें !

को. रे.मुं. भा. ६ } (१५०९) { श. १५९४ पौष शु. ११
पृ. ५५ इ. } प्रेसि० ऑंजिअर-सुरत { इ. १६७२ डिसें. २०

शिवाजीच्या हालचालीमुळें मालाच्या ने-आणींत घोटाळा होणार आहे हें खरें. शिवाय **डचांशीं** इतक्यांतच **तह** होण्याची आशा असल्यामुळें तह होईपर्यंत किनाऱ्यानें माल पाठवून तो धोक्यांत घालूं नये. तथापि विक्री करतांना मध्यंतरीं कांहीं अपघात झाला तर कंपनी त्याचा गैरफायदा घेईल असें गृहीत धरूं नये. प्रत्येक विक्रीच्या करारांचें असें एक कलम कायम समजावें कीं, 'शिवाजीच्या हल्ल्यापासून मालाचें रक्षण कंपनीनें करावें !'

ओ. कॉ. भा. ३३ } (१५१०) { श. १५९४ पौष शु. १२
नं. ३७२२ इ. } मुंबई-कंपनी { इ. १६७२ डिसें. २१

सोनें, रुपें व तांबें या धातूंचीं नाणीं **सुरतेच्या नाण्यांप्रमाणेंच करण्याचें** आम्हीं ठरविलें आहे. तसें केलें म्हणजे तीं शेजारच्या पोर्तुगीजांच्या देशांत, **शिवाजीच्या मुलखांत** आणि दख्खनमध्येंहि अप्रतिबंध वापरलीं जाऊन बेटावरील व्यापाराला फार सोईचें होईल.

ऑर्म भा. ११४ } (१५११) { श. १५९४ पौष शु. १२
विभाग २ इ. } मुंबई-इंग्लंड { इ. १६७२ डिसें. २१

पृ. २०—मोंगल व शिवाजी यांच्याविरुद्ध **पोर्तुगीजांशीं तह करण्याची** आमची सूचना बरीच अव्यवहार्य वाटण्याचा संभव आहे. जमीनीवर ते आमचें संरक्षण करूं शकतील व पाण्याची बाजू त्यांच्या शत्रूंविरुद्ध आम्हीं संभाळूं शकूं; असे आमचे संबंध परस्परांना पूरक आहेत. यदाकदाचित् मोंगलांनीं किंवा शिवाजीनें त्यांच्यावर हल्ला केलाच तर, तह झाला नसला तरी, आत्मसंरक्षणाकरितां आपण त्यांना मदत केलीच पाहिजे. नाहीं तर पोर्तुगीजांना काढून लावल्यावर लौकरच ते आमचा कोंडमारा व उपासमार करूं शकतील ! आमच्या बेटाची तटबंदी संपूर्ण झाली नसल्यामुळें आपल्याला शिवाजी किंवा मोंगल यांना आपल्या शेजारीं न शिरूं देतां पोर्तुगीजांनाच राखून ठेविलें पाहिजे.

पृ. ३५-उस्टिक शिवाजीशीं तह करण्याकरितां गेला. त्याचें चांगलें गोड भाषेनें स्वागत करून स्वदेशांत इंग्रजांनीं रहावें अशी आपली इच्छा असल्याचें तो बोलला. व एका प्रधानामार्फत पुढचें बोलणें करण्याची त्यानें आज्ञा केली. राजापूरच्या तपशीलाविषयीं तीव्र मतभेद झाला. आमची मागणी १ लक्ष रु० ची होती, तर त्यांपैकीं बऱ्याच रकमांशीं आपला संबंध पोंचत नाहीं असें म्हणून शिवाजीच्या वतीनें २० ह. चाच आंकडा सुचविण्यांत आला. कांहीं व्यक्तींच्या पेट्या, ट्रंका आणि दुकानें यांतील माल कोणीं शिपायांनीं घेतला असल्यास त्याची जबाबदारी तो घेईना. खुद्द शिवाजीच्या

खजिन्यांत जमा झाला आणि त्याच्या हिशेबाला लागला तेवढाच माल तो भरून देण्यास बांधला होता. ५००० होनांच्यावर (२० ह. रु.) शिवाजी कबूल करीना. याच वेळीं शिवाजीची कोळ्यांच्या देशावर स्वारी होत होती. बोलणें करणाऱ्या प्रधानाला तिकडे जावें लागल्यामुळें हें तहाचें प्रकरण तेथेंच थांबून उास्टिक परत आला. यानंतर शिवाजीकडून दोन चार लोक आले. परंतु मोंगलांशीं त्याचें युद्ध चालू आहे; त्याचा कांहीं परिणाम होऊन आपल्याला अधिक फायदेशीर तह करितां येतो कीं काय हें पहाण्यासाठीं आम्ही थांबलों. औरंगजेबानें दंडाराजपुरीच्या शिद्दीला मदत करण्याकरितां ३० गलबतांचें आरमार पाठविलें आहे. त्यानें शिवाजीचीं किनाऱ्यावरील शहरें जाळून लुटून त्याचें पुष्कळ नुकसान केलें आणि ५० च्यावर त्याचीं गलबतें जाळलीं. जमिनीवरून बादशहाचा वडील मुलगा **सुलतान महमूद** (नुकताच कैदेंतून मुक्त होऊन) मोठें सैन्य घेऊन खालीं येण्यास निघाला आहे. आम्हांला फार नाजूक डाव खेळावयाचा आहे. कारण, जर बादशहाचा शत्रु शिवाजी याच्याशीं आमचे शांततेचे संबंध आहेत असें बादशहाला कळलें तर, या प्रांतांत आणि बंगाल्यांतहि आमच्या व्यवहाराला अडथळा येईल. दुसऱ्या बाजूनें विचार केला तर, शिवाजीच्या मुलखावर आमचें अन्न व सर्पण अवलंबून असल्यामुळें, उघडपणें तह तहकूब ठेवणें (परंतु आंतून फायद्याचें बोलणें होईल तितकें करीत रहाणें) याशिवाय अन्य मार्गच नाहीं. ... शिवाजी आपल्याशीं नीट वागतो, म्हणून त्याचीं ६ गलबतें मोंगलांपासून बचावण्याकरितां आम्हीं मुंबई बंदरांत ठेवून घेतलीं आहेत. परंतु त्याबद्दल मोंगलांना आवडेल असेंच जाहीरपणें सांगतों [पहा ले. १५०४]. खाजगी गृहस्थांची राजापुरास झालेली नुकसानी शिवाजीकडून मिळविणें कठीण दिसतें. कारण त्यानें राजापूरच्या व्यापाऱ्यांकडून कंपनीचा माल कोणता व इतरांचा कोणता याबद्दल बारीक माहिती मिळविली असून खाजगी मालाबद्दल जबाबदारी तो साफ नाकारतो. दख्खनमधील लढायांमुळें व्यापार हा शब्दच नाहींसा झाला !

फॅ. रे. मुंबई, भा. १ पृ. ९ इ.	(१५१२) मुंबई कन्सल्टेशन	श. १५९४ पौष शु. १४ इ. १६७२ डिसें. २३

शिवाजीवर जाणाऱ्या मोगली आरमाराचा सेनापती, दंडाराजपुरीचा **सिद्दी संबूल**, ३२ छोटीं गलबतें घेऊन बंदरांत आला. त्याचा सुरतेच्या कामीं आम्हांला बराच उपयोग होईल असें वाटल्यावरून **निकल्सला** सामोरा पाठवून स्वागत व अभिनंदन करावें, रसद पोचवावी आणि पद्धतीप्रमाणें नजराणा द्यावा, हें इष्ट वाटलें.

फॅ. रे. मुंबई, भा. १ पृ. १० इ.	(१५१३) मुंबई कन्सल्टेशन	श. १५९४ पौष व. १२ इ. १६७३ जाने. ४

शिवाजीकडून तहाचे बाबतींत बोलणें करण्याकरितां **पूर्ण अधिकारी वकील** आला. त्याचे आग्रहावरून असें ठरविलें कीं, त्याला बोलावणें पाठवून आज संध्याकाळीं त्याचें म्हणणें ऐकून घ्यावें. स्टीफन उस्टिकनें हा ठराव त्याला कळवावा.

(दि) ओ. कॉ. } नं. ३७३४ इ. } (१५१४) मुंबई, कौन्सिल–ई. इं. कंपनी { श. १५९४ पौष व. १४ { इ. १६७३ जाने. ६

दंडाराजपुरीच्या सिद्याला शिवाजीविरुद्ध कुमक करण्याकरितां आलेल्या सुरत आरमारापैकीं सुमारें ३६ लहान मोठीं गलबतें हल्लीं या बंदरांत नांगरलीं आहेत. इंग्रजांनीं त्यांना मिळून शिवाजीशीं युद्ध करावें म्हणून त्या आरमाराचा सेनापती मोठ्या फायद्याची लालूच दाखवून प्रेसिडेंटला गळ घालतो. शिवाजीचाहि वकील येथें योग्य इतमामानिशीं आला असून, मोंगलांविरुद्ध प्रेसिडेंटची मदत मिळविण्याची खटपट करितो. प्रेसिडेंट उभयतांशींहि निःपक्षपातानें वागतो. [ऑर्म भा. ११४ वि. २ पृ. ७]

ओ. कॉ. नं. ३७४१, मुंबई कौन्सिल–ई. इं कंपनी; ता. ११ जाने. १६७३ च्या पत्रांत हें आरमार ता. २४ डिसेंबरला मुंबईच्या आखातांत येऊन पोंचलें असें लिहिलें आहे.

ओ. कॉ. भा. ३३ } नं. ३६९२ इ. } (१५१५) सुरत स्वाली–कंपनी. { श. १५९४ माघ शु. २ { इ. १६७३ जाने. १०

तुमची मालमत्ता सुरतेहून हालविण्याला येथील लोकांचा विरोध झाला नाहीं. तथापि सर्व वर्षभर शिवाजीचें भय वाटत असे आणि सुरक्षितपणाबद्दल एकसारखी काळजी वाटे. यामुळें माल हालविण्याचा व पहाऱ्यांचा वगैरे खर्च बेसुमार वाढला. (मालानें भरलेलीं) गलबतें निघून आतां एक महिना होऊन गेला. परंतु पुनःहि भय उत्पन्न होईल असा अंदाज आहे. कारण ह्या बंदराचा नाश करण्याचा शिवाजीनें निश्चय केला आहे, असें आम्हांला समजलें. त्यांतून नुकतेंच त्याच्यावर (सुरतेहून) एक आरमार [सिद्दी संबूलचें,] पाठविलें गेलें. त्यानें त्याची कित्येक गलबतें पकडलीं आणि किनाऱ्यावरील शहरें जाळलीं यामुळें तो चिडून गेला.

फॅ. रे. मुंबई भा. १ } पृ. २३ इ. } (१५१६) मुंबई कन्सल्टेशन { श. १५९४ फाल्गुन शु. ७ { इ. १६७३ फेब्रु. १३

गव्हर्नरच्या हुकमावरून चाइल्ड व विलकॉक्स यांनीं शिवाजीकडील वकिलाची मुलाखत गेल्या रविवारीं रात्रीं घेतली. कोणतेंहि बोलणें करण्यापूर्वी गव्हर्नरचें पत्र व नजराणा अर्पण केला पाहिजे असा त्यानें आग्रह धरल्यावरून सोमवार तारीख १० रोजीं तोहि समारंभ झाला. डचांच्या आगमनाबद्दल अत्यावश्यक असा विचार होत असल्यामुळें त्याचेशीं पुढें बोलणें झालें नाहीं. त्यानंतर फिरून त्याच्या आग्रहावरून त्याच्याशीं बोलतांना बऱ्याच वादानंतर राजापूरच्या नुकसानभरपाईबद्दल रोखीनें अगर जकातींतून फेड होण्याच्या करारानें ७००० होनांपर्यंत आंकडा तो बोलला. या गोष्टीचा विचार करून आम्हीं असें ठरविलें कीं, 'आमचें डचांशीं युद्ध चालू आहे ह्या परिस्थि-

-तीचा फायदा घेण्याकरितां तो वकील घाई करितो. करितां ही वेळ तहाला योग्य नाहीं.' त्याप्रमाणें तहाचा प्रश्न तहकूब ठेवून शिवाजीला 'यावेळीं डचांच्या आरमाराचा शिलशिला आहे तो बंद झाल्याबर आम्हीं तह करूं' असें सामोपचाराचें पत्र लिहिण्याचें ठरलें. शिवाजीच्या वकिलाला या बाबतींत दोन खेपा पडल्या व थोडाफार खर्चहि आला; हें ध्यानांत घेऊन त्याची मर्जी प्रसन्न राखण्याकरितां व त्यानें अनुकूल तह घडवून आणण्यास मदत करावी म्हणून त्याला एक छोटासा नजराणा द्यावा असेंहि ठरलें.

फॅ. रे. सुरत भा. १०६ पृ. १०० (द्वि. सं.) इ.	(१५१७) कारवार-कंपनी.	श. १५९४ फाल्गुन शु. ११ इ. १६७३ फेब्रु. १७

डचांनीं शिवाजीच्या रागानें **वेंगुर्ल्याला**, आणि येथील सुभेदाराच्या प्रांतांत त्यांचे कांहीं पैसे बुडाले आणि त्यांचे नोकर मारले गेले म्हणून **कारवारला**, मुळींच माल उतरविला नाहीं. आणि जरी सुभेदारानें, चोर शोधून काढतां आला नाहीं तर, जकातींतून भरपाई करून देण्याबद्दल आपल्याला बांधून घेतलें तरी त्यांचें समाधान झालें नाहीं. आम्हांला एका बाजूनें डचांचें व दुसऱ्या बाजूनें कानडा व सोंदें येथील राजाचें भय आहे. परंतु तहानें पहिल्याचें व विजापूरचें सैन्य आल्यावर दुसऱ्याचें भय कमी होईल. **कानड्याचा राजा** मिरजन घेऊन आपल्या राज्यांत गेला. **सोंद्याच्या** राजाचा सेनापति **गोविंदनायक** अंकोल्याच्या किल्ल्याला वेढा घालून बसला आहे. परंतु (विजापूरचें) सैन्य एकदां आल्यावर तो ढिला पडेल ! या प्रांताचा स्वामी **मुझफरखान** कानडा देशावर स्वारी करण्याकरितां विजापुरांतून निघाला असून वाटेंत **सोंद्यावरहि** हल्ला करण्याचा त्याचा विचार आहे. आपल्या मुलखांतील शहरें घेतल्याबद्दल तो खास त्या दोघांना प्रायश्चित्त देणार ! सोंदेकरांचें त्याच्या सैन्यापुढें कांहींच चालणार नाहीं.

सा. ले. २५४ सु. १०७३ जिल्काद १२	(१५१८) मु. व सी.	श. १५९४ फाल्गुन शु. १४ इ. १६७३ फेब्रु. २०

?.—बजा० कार० ता। गुंजनमावळ.

हैबतराऊ सिलिंबकर देस० हे (सु. १०६८ श. १५८९) शक धरुनु बाहीर पडिले होते, ते कौल घेऊन साहेबास भेटले. साहेब मेहेरबान होऊन याचे देसमुखीचे वतन यास दिले आहे. तरी पूर्वीप्रमाणें वतन चालविणें.

सा. ले. २५५ सु. १०७३ जिल्काद १२	(१५१९) मु. व सी.	श. १५९४ फाल्गुन शु. १४ इ. १६७३ फेब्रु. २०

?—बजा० कार० ता। गुंजनमावळ.

इतर मजकूर सा. ले. २५४ प्रमाणें. जास्त:—बदल बक्षिस तहहयात दरसाल १००० टके खुर्दा द्यावयाची मोईन केली आहे.

सा. ले. २५६ | (१५२०) | श. १५९४ फाल्गुन शु. १४
सु. १०७३ जिल्काद १२ | मु. व सी. | इ. १६७३ फेब्रु. २०

!—बजा० कार० ता गुंजणमावळ.

पहिला मजकूर सा. ले. २५४ प्रमाणें असून जास्त मज०:—यासि खावयासि गला नाहीं. तरी १० ते १५ खंडी पावेतो देणे व शिरस्त्याप्रमाणें त्याच्या दरसालच्या बकशीसातून नख्त कापून घेणें.

खं. ८ ले. ८ ! | (१५२१) | श. इ.

तापीदास——रा. शिवाजी राजे.

मुशादुरोस साहेब सरफराजनामा पाठविल्यामुळें संतोष जाहले. आम्ही बंदर राजापुरीं असतां रा. **निळो सोमनाथपंतांनीं** आम्हासी किफायती बाबे लिहिले. त्याचे तालीक सुरतासी पाठविले; त्याची जबाब आली नाहीं. आतांहि साहेबी लिहिलेचे तालीक सुरतेसी खाना करतो. तेथून रजा होईल त्याप्रमाणें केलें जाईल.

खं. २० ले. २७९ | (१५२२) | श. १५९४
सु. १०७३ | | इ. १६७२-२३

रा. **जिजाआऊ**—विठल दत्तो सुभेदार सुभा जावली

चेपगीर गोसावी याची हुमगाव येथें इनाम झाडें आहेत. तरी ती पूर्वीप्रमाणें त्याजकडे चालवीत जाणें.

(दि) ओ. कॉ. | (१५२३) | श. १५९५ चैत्र. व. ६
नं. ३७६० इ. | मुंबई— ई. इं. कंपनी. | इ. १६७३ मार्च २८

बादशाही आरमाराचा सेनापती **१५ (जानेवारी)** रोजीं किनाऱ्यावर प्रेसिडेंटला येऊन भेटला. इंग्रजांबद्दल बादशाहाचें मन साफ व्हावें आणि सुरतकरांच्या मनांतील मुंबई बेटाबद्दलची अढी कमी व्हावी म्हणून त्याचें मोठ्या थाटानें आम्हीं स्वागत केलें.... **२५ तारखेला** हें आरमार बंदरांतून बाहेर निघून गेलें. त्याच्या मुख्य सेनापतीला येथें झालेल्या स्वागतामुळें फार समाधान झालें.

२० फेब्रुवारीला डचांचीं ७ गलबतें बंदरात किल्याच्या तोफांच्या माऱ्याच्या पलीकडे येऊन राहिलीं. त्यांच्या राहिलेल्या आरमाराची प्रअहीं मार्गप्रतीक्षा करीत होतों. कारण, शिवाजीशीं आमचा वाद आहे. त्याचा फायदा घेऊन, **मुंबई जिंकून** घेण्याच्या कामीं **शिवाजीनें**, ३००० सैन्य डचांना पुरवावें व त्याबद्दल डचांनीं त्याला दंडाराजपूर घेण्यास मदत करावी, असा **रिकलॉफनें** शिवाजीशीं करार केल्याची आम्हांला पक्की बातमी होती.

या बातमीमुळें प्रेसिडेंटला मोठा विचार पडला. आणि विलंब न लावतां **शिवाजीला** या बेतापासून **परावृत्त करण्याकरितां त्यानें पत्र लिहिलें.** त्यांत सिद्दी **व शिवाजी** यांच्यामध्यें किफायतशीर तह करण्याचें वचन देऊन डच शेजाराला येणें हें कितीं धोक्याचें आहे हें सांगितलें. शिवाजीच्या मनांत **दंडाराजपुरी घेण्याचें** फार असून त्यावर त्यानें अपार खजिना आणि जवळ जवळ १५००० माणसांचे प्राण खर्ची घातले. तथापि डचांवर त्याचा विश्वास न बसल्यामुळें त्यानें त्यांची **मागणी नाकबूल केली** असावी. आणि म्हणूनच डचांचें राहिलेलें आरमार आलें नसावें. परंतु तें **वेंगुर्ल्यासच** आहे कीं दुसरें कोठें गेलें हें समजलें नाहीं. [ऑर्म भा. ११६ वि. २ पृ. ४५ ते ४८]

फॅ. रे. सुरत भा. १०६ पृ. १४५–४६ (२ स.) इ. | (१५२४) कारवार–सुरत | श. १५९५ वैशाख शु. १० इ. १६७३ एप्रील १६

हुबळीची लूट:— ही **शिवाजीनें ईस्ट इंडिया कंपनीचा माल लुटला त्याची यादी** व किंमतींची विल्हेवारी आहे. यांत तांब्याचीं भांडीं, कापड, पोतीं, मिरीं, शिसें, काथ्या, कागदाचीं रिमें इत्यादि ७८९४ होनांचे किंमतीचीं सणगें व वस्तु आहेत. [ही यादी जून १८ चे पत्राबरोबर पाठविण्यांत आली. परंतु यावर लुटीची बरोबर तारीख नमूद असल्यामुळें ती येथें छापिली आहे. प्रो. सरकारनीं ह्या तारखेचा उपयोग न करितां हुबळीची लूट मे आरंभीं झाली, असा निष्कारण तर्क लढविला आहे !]

फॅ. रे. मुंबई भा. १ पृ. ४२ इ. | (१५२५) मुंबई कन्सल्टेशन | श. १५९५ वैशाख शु. १२ इ. १६७३ एप्रील १८

लगतच्या **शिवाजीच्या** मुलखात युरोपांतल्या कोणत्या मालाला मागणी आहे, युरोपांत पाठविण्याजोगा कोणता माल तेथें मिळूं शकेल, त्यांतील व्यापारी पेठांचीं नांवें व मुंबईपासून त्यांचीं अंतरें, वर दख्खनमधील शहरांशीं संबंध जोडण्याकरितां सोईचे मार्ग व दळवळणाचीं साधनें, इत्यादि **माहिती मिळविण्याकरितां** टॉमस निकल्स याला (हा स्वतंत्र खाजगी व्यापारी आहे म्हणून) निरनिराळ्या सुभेदारांना शिफारसपत्रें देऊन पाठवावा.

फॅ. रे. सुरत, भा. १०६ पृ. ९९ इ. | (१५२६) मुंबई–सुरत | श. १५९५ वैशाख व. ५ इ. १६७३ एप्रील २६

सिद्दीचीं गलबतें हें पत्र पोंचण्यापूर्वीं सुरतेहून निघालीं नसल्यास, तीं पावसाळ्यांत मुंबईला ठेवून घेण्यास येथील गव्हर्नर तयार नाहीं, असें त्याला कळवा. 'गेल्या खेपेला सिद्दीचीं गलबतें मुंबईला राहिलीं असतां त्यांनीं शेजारच्या बंदरांना पुष्कळ उपद्रव दिला आणि त्यामुळें व्यापारावर अनिष्ट परिणाम झाला. शिवाय इतकीं लढाऊ गलबतें बंदरांत

राहूं दिल्यास इंग्लंडचा राजा व कंपनी यांना त्या बाबतींत योग्य जबाब देणें गवर्नरला कठीण जाईल. यासाठीं सिद्दीच्या गलबतांनीं मुंबईस येऊं नये असा मुंबईच्या गव्हर्नराकडून निक्षून हुकूम आला' असें सांगा. [ऑर्मे भा. ११४ वि. २ पृ. ६१]

सा. ले. २६१ } (१५२७) { श. १५९५ वैशाख व. ६
सु. १०७३ मोहर १९ } कौलनामा { इ. १६७३ एप्रील २७

कार० पेठ आथणी—माहानाड का मज०मामले महमदपूर.

तुम्ही **सिवाजी भोसलेचे** फितरती करितां गाऊ सोडोन कोगटनुरासी आले. गलबला थांबलेवरी तुम्हासी समजाविसी करितां दोनी तीनी हजाराचे कतबे घेतले ते करितां कितीयेक रयत रंजीसी जाहले. तरी आतां पेठेस येऊन उदीम करून सुखे असणें.

ओ. कॉ. भा. ३४ } (१५२८) { श. १५९५ वैशाख व. १०
नं. ३७८४ इ. } टॉमस निकल्स याला सूचना. { इ. १६७३ मे १

मुंबई बेटावर कंपनीची स्थापना झाल्यापासून आजतागायत मोंगल, शिवाजी व आम्हीं यांमध्यें सलोखा नसल्यामुळें लगतच्या **शिवाजीच्या मुलखाची व्यापारी दृष्ट्या पहाणी** करण्यास सवड झाली नव्हती. त्या कामीं तुमची योग्यता पाहून तुमची नेमणूक केली आहे. तरी प्रथम समोरच्या किनाऱ्यावर **नागोठण्यास** उतरून तेथील भौगोलिक परिस्थिति, नदीच्या पात्राची रुंदी व खोली, जाणाऱ्या होड्यांचा आकार, भरती ओहटीची कमाल व किमान मर्यादा, धक्क्याची सोय, यांची पहाणी करून शेजारींच **पेण व भट्टी** (Batty) आहेत. तेथील माहिती मिळवून सर्वांचे नकाशे शक्य तर तयार करावे. लोकांना समजूं न देतां नदीची पहाणी झाल्यावर नागोठण्याला उतरून तेथून तीन चार दिवसांच्या अंतरावर असलेल्या जुन्नर (Junea) शहरीं जा. तेथें रचना, स्वाभाविक मजबूती आणि रक्षणाची व्यवस्था, मोंगलांची तेथें असणारी फौज, अधिकारी व कारभार यांचा दर्जा, शहराची बांधणी व लोकसंख्या, शहरचा व्यापार, आसपासच्या मुलखाशीं शहराचें असलेलें व्यापारी दळणवळण, **इंग्रजांच्या मालाला** तेथें असलेली **मागणी** या सर्व बाबतींत व विशेषतः व्यापाराचे विषयीं फार कसोशीनें आणि जबाबदारी समजून तुम्हीं चौकशी करावी. अरबस्तान, मक्का, बसरा, इराण इकडीलहि कोणता माल खपेल आणि जुन्नरमध्यें आसपासच्या मुलखांत कोणता विकाऊ माल पैदा करतां येईल याची बारकाईनें चौकशी करावी. बरोबर तज्ञ बनिया दिला आहे त्याच्या मदतीनें मालाच्या किंमती, वर्णन वगैरे काळजीपूर्वक टिपून घ्यावें. व युरोपांत जो माल खपेल असें वाटेल त्या मालाचे नमुने आणावे; आणि तेथील व आसपासच्या मुलखातील नाणीं, बाजार पेठा, अंतरें व दळणवळणाचीं साधनें यांची माहिती मिळवावी.

नित्यक्रम व झालेली पहाणी यांची रोजनिशी ठेवावी. वाटेंतील सुभेदार व अधिकारी यांची भेट घेऊन योग्यतेप्रमाणें नजराणे देऊन त्यांच्याशीं बोलतांना इंग्लंडचा राजा व राज्य यांचें महत्त्व, कंपनीचें सामर्थ्य, व त्यांचा शेजार व संबंध यांच्यापासून होणारा फायदा यांचें रसभरित वर्णन करावें. लोकांशीं बोलतांना आमच्या कौन्सिलनें किंवा मीं तुम्हांला पाठविल्याचें सांगूं नका. परंतु जुन्नरच्या सुभेदाराजवळ बोलतांना इंग्रजांनीं जुन्नरला वखार घालण्याच्या दृष्टीनें तुम्हांला कांहीं गोष्टी विचारण्यास हरकत नाहीं. जर तेथील सुभेदार किंवा मोठे अंमलदार यांनीं मुंबईच्या गव्हर्नराला 'इंग्रजांनीं व्यापाराकरतां जुन्नरला यावें' असें पत्र लिहिलें तर फार बरें होईल. आपल्या खर्चाचा योग्य हिशेब ठेवून वाटेंत मोंगल व **शिवाजी** यांच्या युद्धाबद्दल कळेल ती माहिती सांपडेल त्या मार्गानें अवश्य कळवावी. एकंदरींत सर्व प्रकारें **व्यापारी दृष्टि** ठेवून तपास करावा.

फॅ. रे. मुंबई भा. १ पृ. ४६ इ.	**(१५२९)** मुंबई कन्सल्टेशन.	श. १५९५ ज्येष्ठ शु. ४ इ. १६७३ मे १०

शिवाजीच्या मुलखांत संचारार्थ गेलेल्या निकलसचें पत्र आलें. **उभय सैन्यें अगदीं जवळ आल्यामुळें** प्रत्यहीं होणारा उपद्रव, निरनिराळ्या सुभेदारांच्या छपवाछपवीच्या कारवायांमुळें शहरोशहरीं प्रवासाचे वेळीं होणारी दगदग आणि **निकलस** हा **सिद्दीचा गुप्त हेर** असावा अशा समजुतीमुळें त्याच्यावर केला जाणारा जुलूम, यांचें त्यानें त्यांत वर्णन केलें आहे. कौन्सिलपुढें पत्र ठेवल्यावर त्याला परत घेऊन येण्याकरितां होडी पाठविण्याचें सर्वानुमतें ठरलें.

शिवाजीशीं तहाचें बोलणें सुरू करणें आतां सोईचें असून कोणा इंग्रजाला पाठविण्याचें म्हटलें तर नजराणा आदिकरून जबर खर्च येईल; यासाठीं सुरतेहून नुकताच आलेल्या **वाघजी** नांवाच्या बनियाला चालू असलेल्या तहाच्या वाटाघाटींच्या बाबतींत पुनः बोलणें करण्याकरितां पाठवावा.

ओ. कॉ. भा. ३४ नं. ३७७९ इ.	**(१५३०)** मुंबईची हकीकत	श. १५९५ ज्येष्ठ शु. ४ इ. १६७३ मे १०

शिवाजीवर चाल करून जाणारें ३० गलबतांचें आरमार, **सिद्दी संबूळ** सुरतेहून या बंदरांत (मुंबई) घेऊन आला [ले.१५१५]. बादशहाकडून सिद्दी संबूळनें प्रेसिडेंटकरितां **शिरपाव** (सन्मानाचीं वस्त्रें) आणला तो प्रेसिडेंटनें समारंभानें स्वीकारला. बादशाही आरमार पावसाळ्यांत मुंबईला ठेवावें अशी सुरतेच्या सुभेदाराचीं शिफारसपत्रें सिद्दी संबूळ घेऊन आला होता. परंतु तशी परवानगी न देतां फक्त ५ गलबतें माजगांवला ठेवण्याची परवानगी दिली. यामुळें सिद्दी संबूळ आपले सर्व लोक घेऊन मुख्य सिद्दीचा किल्ला जो **दंडाराजपूर** तिकडे निघून गेला.

[से. फॅ. रे. सुरत भा. १०६ पृ. १११ मे २६–मुंबई–सुरत.] सिद्दी संबूळ दंडाराजपूरला जातांना कांहींसा नाखुषीनें गेला. येथें राहिलेल्या मोंगलांच्या [५] गलबतांबरोबर मिर्झा महमद हुसेन आनंदानें राहिला. [ऑर्म ११४–२ पृ. ७८]

फॅ. रे. मुंबई, भा. १ पृ. ४७ इ. | (१५३१) मुंबई कन्सल्टेशन | श. १५९५ ज्येष्ठ शु. ९ इ. १६७३ मे १४

कारवारहून आलेल्या पत्रांत, त्या बाजूला किनाऱ्याच्या बाजूनें जाणाऱ्या **शिवाजी**च्या सैन्याकडून झालेल्या उपद्रवाबद्दल आणि **शिवाजीनें हुबळी लुटल्यामुळें** तेथें असलेल्या कंपनीच्या बऱ्याच मालमत्तेला संपर्क लागून बहुधा ती लुटली गेली असेल अशाबद्दल, लिहून आलें. याच दिवशीं, **राजापूर** नांवाच्या बंदरांतील एक गलबत **मस्कतहून** भरून येत असतां वादळी हवेमुळें मुंबई बंदरांत शिरलें. तेव्हां शिवाजीकडे आपण मागणी केली आहे त्याच्या हिशेबांत म्हणून हें गलबत धरून ठेवावें किंवा कसें असा प्रश्न विचारास निघून, मालाची कांहींच अफरातफर होऊं न देतां शिवाजीकडून समाधानकारक भरपाई होईपर्यंत गलबत धरून ठेवावें असें ठरलें. याच दिवसाच्या मुंबईच्या हकीकतींत [ओ. कॉ. भा. ३४ नं. ३७७९] राजापूरच्या लुटीच्या हिशेबांत म्हणून राजापूरचें वर उल्लेखिलेलें गलबत धरून ठेविलें असा उल्लेख आहे.

(से.) फॅ. रे. सुरत, भा. १०६ पृ. १०९–१० इ. | (१५३२) मुंबई–सुरत. | श. १५९५ ज्येष्ठ शु. ९ इ. १६७३ मे १४

कारवारची परिस्थिति काळजी उत्पन्न करण्यासारखी आहे. परंतु येथील सैन्याचे तुटवड्यामुळें मागणीप्रमाणें तुकडी पाठवितां येत नाहीं. परंतु संरक्षणाची कांहीं तरतूद व्हावी म्हणून आमचा **दलाल वाघजी** याच्याबरोबर शिवाजीला पत्र देऊन पाठविण्याचें ठरविलें आहे. त्या पत्रांत हुबळीला त्यानें केलेल्या नुकसानीची भरपाई करून मागितली आहे. हें तो ताबडतोब न ऐकेल आणि यापुढें उपद्रव होणार नाहीं अशी खात्री देणार नाहीं तर, निष्कारण निकाल भिजत ठेवण्याऐवजीं आपल्याला त्यानें दिलेल्या त्रासाचा सूड उगविण्याचा त्वरेचा मार्ग शोधून काढला पाहिजे....सिद्दी संबूळच्या लोकांनीं मुंबई बंदरांत असतांना त्रास दिला.

ऑर्म ११४ वि. २ पृ. ६४—सिद्दी संबूळ मुंबई बंदरांत गेल्या गुरुवारीं **(८ मे) आला** आणि निःसंकोच वृत्तीनें आरमार व सैन्य पावसाळ्यांत तेथेंच ठेवण्याचें बोलूं लागला! त्यानें आणिलेला **शिरपाव बादशहाकडून आला** आहे असें त्यानें लबाडीनेंच सांगितलें.

फॅ. रे. मुंबई भा. १ पृ. ४८ इ. | (१५३३) मुंबई कन्सल्टेशन | श. १५९५ ज्येष्ठ शु. ११ इ. १६७३ मे १६

शिवाजीनें **हुबळी लुटली ही बातमी** कारवारच्या **अनेक पत्रांवरून**

कायम झाली. या कारणानें गेल्या सभेंत शिवाजीशीं बोलणें करण्याकरितां एका बनियाला पाठविण्याचें ठरलें असलें तथापि एकाद्या इंग्रजाप्रमाणें आमच्या मनांतील गोष्ट एकादा हिंदू धिटाईनें सांगूं शकणार नाहीं किंवा सांगण्यास धजणार नाहीं; असा विचार येऊन शिवाजीशीं चालू बोलणें पुनः काढण्याकरितां, शिवाजीनें हुबळी लुटली असेल तर त्याबद्दल आणि पूर्वींच्या नुकसानीबद्दल भरपाई मागण्याकरितां, आणि राजापूरचें गलबत येथें धरून ठेविलें आहे त्याबद्दल त्याला कळवून 'यापुढें त्याच्याकडून फसविलें जाण्याची आमची तयारी नसून स्वतःची भरपाई जमेल त्या मार्गानें करून घेण्यास आम्हीं समर्थ आहोंत' असें त्याच्या प्रत्ययास आणण्याकरितां, **निकलस** याला शिवाजीकडे पाठवावें असें ठरलें.

(से.) फॅ. रे. सुरत, भा. १०६ पृ. १०७–८ इ.	(१५३४) मुंबई-सुरत	श. १५९५ ज्येष्ठ शु. १२ इ. १६७३ मे १७

हवा वादळी असल्यामुळें **सिद्दी** येथेंच राहिला. परंतु लवकरच वादळ ओसरून तो निघून जाईल अशी आशा आहे. त्याचे सान्निध्यामुळें व्यापारीवर्ग अडचणींत सांपडला आहे. विशेषतः सुरतेचे व्यापारी त्याला फार दबकतात. [पृ. १०८]–काल वादळामुळें मुंबईंत शिरलेलें राजापूरचें गलबत धरून ठेवलें. यामुळें शिवाजीशीं तह थोडा जलदीनें होईल ! **राजापूरच्या** लुटीबद्दल आणि नुकत्याच झालेल्या **हुबळीच्या** लुटीबद्दल बोलणें करून त्वरेनें निकाल व्हावा म्हणून **निकलसला** आम्हीं शिवाजीकडे पाठविणार आहोंत (आर्म भा. ११४–२ पृ. ६७).

ओ. कॉ. भा. ३४ नं. ३७८६ इ.	(१५३५) **निकलसला** सूचना	श. १५९५ ज्येष्ठ शु. १२ इ. १६७३ मे १७

शिवाजीशीं करावयाच्या तहाचे बाबतींत **निकलस** याला दिलेल्या सूचना—

तुमच्या प्रवासाचा उद्देश शिवाजीशीं तह करून त्याच्याकडून कित्येक महत्वाच्या मुद्यांचीं उत्तरें मिळविणें हा आहे.

राजापूरच्या नुकसान भरपाईबद्दल बोलणें बहुतेक निकालांत आलें असून तें पुरें करण्याकरितां **पिलाजी** या नांवाचा त्याचा वकील आला होता. त्याच वेळीं **डचांचें आरमार** आल्यामुळें अधिक चांगली संधि येईपर्यंत तहाचें काम लांबणीवर पडून, ही गडबड बंद झाली म्हणजे आम्हीं सूचना द्यावी व पिलाजीनें येऊन राहिलेला तह पुरा करावा असें आमचें व त्याचें ठरलें. आतां आम्हीं पिलाजीला अनेक पत्रें पाठविलीं असतां तो आला नाहीं किंवा त्याचेकडून उत्तरहि आलें नाहीं. मात्र **शिवाजीकडून** स्नेहाचें पत्र आलें आहे त्यावरून तो तह करण्यास उत्सुक आहे आणि त्यानें **पिलाजीला हा तह पुरा करण्याबद्दल सर्व प्रकारचा अधिकार देऊन**

आज्ञा केली आहे असें दिसतें. मध्यंतरीं कारवारच्या पत्रांवरून शिवाजीनें हुबळीवर अचानक छापा घालून कंपनीच्या मालमत्तेची लूट केली, असें कळलें. यावरून त्याचे खरे हेतु आमच्याशीं वैरभावाचे असावेत असा संशय येतो. त्याबद्दल तपास काढण्याकरितां व पूर्वोक्त नुकसानीची भरपाई मागण्याकरितां तुमची नेमणूक केली आहे. 'हुबळीचा अत्याचार त्याच्या हुकमानें झाला असें आपल्याला वाटत नाहीं. कारण त्याच्याबद्दल आमचें मत चांगलें आहे.' असें त्याला सांगा. परंतु तशीच वस्तुस्थिति असेल तर आमच्याशीं सलोखा राखण्याकरितां त्यानें ताबडतोब भरपाई केली पाहिजे असें निक्षून सांगा. परंतु सलोख्याची त्याची इच्छा नसेल तर तसें आम्हांला स्पष्ट कळूं द्या; म्हणजे कंपनी व आमचें राष्ट्र यांना न्याय मिळण्याचे दुसरे मार्ग आम्ही पत्करूं! या गोष्टीचा पक्का निकाल केल्याशिवाय पूर्वीच्या गोष्टींबद्दल तुम्हीं बोलणें करतां कामा नये! हुबळीच्या बाबतींत (समाधानकारक) उत्तर मिळेपर्यंत मुंबईंत आम्हीं पकडलेलें राजापूरचें गलबत व माल ताब्यांत ठेवूं असेंहि त्याला कळवा. जरूर पडल्यास, त्याचा शत्रू सिद्दी आमचे येथें आला असतांना आम्हीं त्याला पावसाळ्यांत राहूं दिला नाहीं; त्याच्या व शिवाजीच्या भांडणांत आम्हीं पडूं इच्छित नाहीं; किंवा आमचा मोंगलांशीं असलेला संबंध निष्कारण धोक्यांत न यावा इतकें धोरण राखून आम्हीं सिद्दीला फारशी मदत देत नाहीं; या गोष्टी त्याच्या नजरेला आणून शिवाजीनेंच आम्हांला मुद्दाम खिजविल्याशिवाय आम्हीं सिद्दीला अधिक मदत देणार नाहीं हें त्याला समजाऊन सांगावें.

पूर्वीच्या बाबतींत चांगल्या तऱ्हेनें तह होईल अशा भरंवशावरच या बंदरच्या कित्येक व्यापाऱ्यांना शिवाजीच्या मुलखाला दुसऱ्या कोठून न मिळणारें मीठ आमच्या येथून नेण्याची परवानगी दिली ही मोठी सलोख्याची गोष्ट झाली; असें असतांना अर्धी रक्कम मुंबईमध्यें व राहिलेली रकम माल उतरतांच देण्याचा ठरलेला करार मोडून शिवाजीच्या बंदरांतील हवालदार व सुभेदार किंमत देण्याचें नाकारतात अशा तक्रारी आमच्याकडे आल्या आहेत! ही वागण्याची तऱ्हा कोणत्या प्रकारची समजावयाची? यानें सलोख्याचा भंग होतो असेंच आम्हांला वाटतें. तेव्हां आमच्याशीं स्नेह रहावा व पूर्वीप्रमाणें मिठाचा पुरवठा व्हावा अशी शिवाजीची इच्छा असल्यास शिवाजीनें आपले हवालदार व सुभेदार यांस किंमती त्वरेनें देण्याबद्दल हुकूम दिले पाहिजेत.

सरळपणें व धोरण राखून या गोष्टी त्याच्यापुढें ठेवून लवकर उत्तरें मागावीं आणि शिवाजीनें मित्रत्वाची इच्छा दर्शवून सर्व गोष्टींचीं सामोपचाराचीं उत्तरें दिलीं तर मग पिलाजीनें तह पुरा करण्याकरितां यावें असें पुढें बोलण्यास हरकत नाहीं. या बरोबरच शिवाजी, अण्णाजी पंडीत व पिलाजी यांना देण्याकरतां तुमचे बरोबर पत्रें दिलीं आहेत तीं जातीनें पोंचतीं करून जलदीनें उत्तरें मिळवा.

शिवाजीची तुमची भेट न झाल्यास **त्याचा मुलगा** किंवा जो कोणी मुख्य अधिकारी असेल त्याला भेटून येथें पावसापूर्वी परत येतां यावें अशा बेतानें आपली रवानगी होईल असें करा. वाटेंत तुम्हांला कळेल ती संपूर्ण हकीकत कळवा.

या बेटांत येणाऱ्या सर्पणावर **शिवाजीचे** जकातदार जकाती घेतात यामुळें निष्कारण त्रास होतो. सर्पण किंवा लांकूडनग याच्यावर **शिवाजीकडून** येथें आम्हीं जकाती घेत नाहीं. तेव्हां अशा मालावर जकात घेऊं नये असा त्यानें कौल अगर हुकूम द्यावा. त्यांनीं आमच्या लोकांकडून जकाती घेतल्यास आमच्याकडूनहि तशीच मागणी या च्या मालावर केली जाईल! त्याच्या देशातून मोंगलांच्या किंवा दख्खनच्या मुलखांत आम्हीं माल पाठविला तर जकाती काय पडतील याचीहि चौकशी करा. आणि कमींत-कमी जकाती घेण्याबद्दल त्याच्या हवालदारांना त्याचे हुकूम घेऊन ठेवा.

ओ. कॉ. भा. ३४ } (१५३६) { श. १५९५ज्येष्ठ शु.१४ते आ.शु.१३
नं. ३७८७ इ. } टॉमस निकल्सची रोजनिशी { इ. १६७३ मे १९ ते जून १७

मुंबईचा गव्हर्नर व हिंदुस्तानचा प्रेसिडेंट यांचा हुकूम मिळाल्यामुळें **१६७३ मे १९ सोमवार** रोजीं, **शामजी** या नांवाचा बनिया धरून सुमारें २७ लोकांसह मुंबईहून, शिवाजी सामान्यतः राहतो त्या **रायरी टेकडीकडे** (Rajery Hill) जाण्यासाठीं निघालों. मध्यरात्रीं **नागोठण्यास** उतरून तेथेंच रात्र घालविली. नागोठणें हें शिवाजीच्या मुलखांतील शहर एका सुंदर नदीच्या मुखाशीं वसलेलें आहे. [मे २०]– पुढें जातांना उजव्या हाताला **पाली** शहर व डाव्या हाताला पालीपासून जवळच **सरसगड** (Sier Gurr) सोडून २ वाजण्याच्या सुमारास नदीकिनाऱ्या-वरील एका खेड्यांत आम्हीं उतरलों. त्याचें नांव कुलूक (**कोलाड** ? ता. रोहें, Cooluck). तेथून ६ मैलांवर काल्लन [**कालवण** ? ता. माणगांव Callaone] येथें रात्रीं मुक्काम केला. (**सरसगड** हा शिवाजीच्या प्रांतांत मध्यें असूनहि सिद्दी संबूळ यानें त्याच्याविरुद्ध पुष्कळ दिवस लढविला. परंतु अखेरीस **दंडाराजपुरीच्या** सिद्दीकडून कुमक न पोंचल्यामुळें त्याला तो सोडावा लागला.) [मे २१]– पाऊस पडत होता. दोनप्रहरीं **पावणूसला** [**पाणास** ? ता. माणगांव] जेवण करून अस्तमान होतांना राजेरीच्या पायथ्याशीं असलेल्या त्याच नांवाच्या भिकार खेड्यांत पोंचलों. **शिवाजी** तेथून दोन दिवसांच्या मुकामावर असलेल्या क्षेत्रांत (?) स्नान करण्याकरितां गेला असून थोडे दिवसांत परत येईल असें समजलें. राजेरी नागोठण्यापासून तीस मैलांवर असावी असें वाटतें. [मे २२]–शिवाजी येथें नसल्यामुळें गडावर येऊन बोलण्याची संभाजीची परवानगी मागितली. ती त्यानें लगेच दिली. परंतु पाऊस फार असल्यामुळें आम्हीं गेलों नाहीं. [२३ मे]–सकाळीं त्या उंच टेकडीवर आम्हीं गेलों. वाटेंत पायऱ्या खोदल्या आहेत. दरवाज्यांतील पायऱ्या पक्क्या खडकांत खोदलेल्या आहेत. जेथें टेकडीला निसर्गतः

अभेद्यता नाहीं तेथें २४ फूट उंचीचा तट बांधला आहे. ४० फुटांवर लगेच दुसरी भिंत बांधून हा किल्ला इतका दुर्भेद्य बनविला आहे कीं, अन्नाचा भरपूर पुरवठा झाल्यास हा किल्ला अगदीं अल्प शिबंदीच्या साहाय्यानें **सर्व जगाविरुद्ध लढूं शकेल !** पाण्याकरितां मोठे तलाव असून ते पावसाळ्यांत भरल्यावर पाणी पुरून उरेल इतकें होतें. टेंकडीच्या माथ्यावर मोठें शहर वसलें आहे. घरें सामान्य प्रतीचींच खराब अशीं आहेत. अत्युच्च भागीं **शिवाजीचा चौसोपी वाडा** आहे. त्याच्या मध्यभागीं मोठी इमारत आहे. तींत बसून तो कारभार पाहतो. मला येऊन कांहीं वेळ झाल्यावर **पिलाजी** येऊन भेटला. 'संभाजी अद्यापि लहान व अननुभवी असल्यामुळें त्याच्यावर महत्त्वाच्या गोष्टी सोंपविलेल्या नाहींत' वगैरे त्यानें सांगितलें. त्याचें पत्र देऊन झाल्यावर तह पुरा करण्याकरितां तो मुंबईला कां आला नाहीं असें मीं त्याला विचारलें. 'शिवाजीचा आपल्याला हुकूम मिळाला होता परंतु मुंबईचें एकहि पत्र न आल्यामुळें मीं आलों नाहीं' असें त्यानें उत्तर दिलें. सायंकाळीं **जेराजी** (Geragee) **राजा** मजकडे कापडाच्या खरेदीकरितां आला. शिवाजीचें मोठेपण व नुकतेच मिळालेले जय यांच्याबद्दल तो पुष्कळ बोलला. त्यानें खरेदी केलेल्या कापडाची भर किंमत मला अखेरपर्यंत मिळाली नाहीं. [मे २४]–संभाजीनें मला भेटीकरितां एका ठिकाणीं बोलाविलें. तेथें **शिवाजीचा चिटणीस** बसला होता. त्यानें अनेक इकडचे तिकडचे प्रश्न विचारिले. इंग्लंडच्या राजाजवळच्या माणसांची, घोड्यांची, शिपायांची संख्याहि त्यानें विचारली. 'समोरच्या झाडाला पानें किती आहेत ?' असा उलट प्रश्न मीं त्याला विचारला. आणि त्याचप्रमाणें मलाहि त्या प्रश्नाचें उत्तर देतां येत नाहीं असें मीं म्हणालों ! इतक्यांत संभाजी आला. त्यानें माझें काम काय आहे तें समजून घेण्याची इच्छा दर्शविल्यामुळें मीं त्याला क्रमानें कामें सांगितलीं. तीं त्यानें ऐकून घेतल्यावर 'मला या बाबतींत कांहीं करतां येत नाहीं. मीं फक्त तुमच्या आगमनाबद्दल शिवाजीला कळवितों. म्हणजे ते लवकरच येतील. तुमच्या प्रकृतीला ही उंचावरची हवा मानवणार नाहीं तेव्हां तुम्ही खालीं जाऊन रहा.' असें त्यानें सांगितलें व मीं गडाखालीं गेलों. [मे ३०]–शिवाजीनें आणखी कांहीं कपडे मागविले आहेत (म्हणजे तो आहे तेथेंच आणखी जास्त दिवस राहूं इच्छितो) अशी बातमी. [मे ३१]–हिंदोळ्यांतून गडावर जाऊन, मीं रहावें कां जावें अशाबद्दल पिलाजीचा सल्ला घेतला. त्याच्या मतें राजाचें येणें अनिश्चित असल्यामुळें मीं परत जावें असें होतें. त्यांतून भयंकर पाऊस व पूर आल्यास येथील पावसाळा मला असह्य होईल असेंच त्याचें मत पडलें. [जून १]–शिवाजीनें **गोव्याजवळील एक टेकडी घेतली** अशी बातमी. [जून २]– मठ व लांकूड या बाबतींत संभाजीचा हुकूम घेण्याकरितां मीं रामजीला संभाजीकडे पाठविलें. परंतु संध्याकाळीं **शिवाजी राजा** एक मैलावरील आपल्या मातोश्रीचे किल्ल्यावर आल्याची पक्की बातमी आली. रात्रीं टेकडीवर चढतांना आम्हीं त्याला पाहिलें. [जून ३]–बोलणें करण्याकरितां मीं टेकडीवर गेलों. ११ वाजतां तो मीं जाऊन बसलों होतों त्या

खोलींत आला. सर्व शिपायांना त्यानें काढून लाविलें. **परंतु चांगली वेळ नसल्यामुळें तो माझ्याशीं बोलला नाहीं.** ४ वाजतां शामजीच्या हातीं मीं प्रेसिडेंटचें पत्र पाठविलें. पांच वाजतां मला बोलावणें आल्यामुळें मीं जाऊन बसलों. परंतु शिवाजीला येण्यास थोडा अवकाश होता. तो येतांच मीं उभा राहून दारापर्यंत गेलों आणि प्रथम आल्यावेळीं मीं त्याला ओळखलें नाहीं म्हणून क्षमा मागितली. त्यानें माझा हात धरून आपल्या डाव्या अंगाला लोडापासून जवळच बसविलें व काम काय आहे असें विचारलें. 'तहाचें बोलणें चालू असतांनाच व ध्यानीं मनीं नसतांना हुबळीची लूट होऊन फार नुकसान झाल्यामुळें शिवाजीच्या मुलखांत वखार घालावी कीं न घालावी अशी प्रेसिडेंटला शंका उत्पन्न झाली आहे! ही हुबळीची लूट तुमच्या संमतीनें झाली काय?' असें विचारतांच 'इंग्रजांना त्रास देण्याबद्दल मीं केव्हांच हुकूम दिला नव्हता, व त्यांचा आमचा स्नेह आहे' असें तो म्हणाला. हें ऐकून नुकसानीच्या भरपाईबद्दल सामोपचारानें विचारलें. तेव्हां तो म्हणाला 'माझे तिकडले लोक अद्यापि त्याच बाजूला आहेत. तिकडील विशेष बातमी किंवा पत्रें मजपुढें नाहींत. कोणाच्या सैन्यानें लूट केली, किती लूट झाली ही सविस्तर माहिती मला आधीं मिळविली पाहिजे'. 'हा सर्व तपशील पुरविला तर भरपाई करून द्याल काय?' असा प्रश्न नंतर मीं विचारला. तिकडे कानाडोळा करून त्यानें आमच्याकरितां पान मागविलें. व 'आणखी काय काम आहे?' असें विचारलें. 'पहिल्या मागणीचा कांहींच निकाल झाला नाहीं' असें मीं म्हटल्यावर, 'मला दुसरें कांहीं उत्तर आज देतां येणार नाहीं' असें त्यानें उत्तर दिलें. **मिठाच्या किंमतीबद्दल** आमच्या इच्छेप्रमाणें सर्व केलें जाईल असें आश्वासन दिलें. लांकूड व सर्पण या बाबतींत त्यानें आमच्याकडून जकात न घेण्याबद्दल हुकूम देण्याचें कबूल केलें. त्याच्या मुलखांतून पलीकडे माल नेण्याचा असल्यास किती जकात द्यावी लागेल? या प्रश्नाचा 'विचार करूं' असें तो म्हणाला. शेवटीं मला व शामजीला पानसुपारी व वस्त्रें देऊन त्यानें निरोप दिला. माझ्या ठिकाणीं मी जातों न जातों तोंच 'तुम्हीं खालीं गेलां तरी पत्रें घेऊन जाण्याकरितां शामजीला राहूं दे' असा त्याचा निरोप घेऊन पिलाजी आला. 'राजापूरबद्दल मला आणखीं बोलावयाचें आहे. आणि **पिलाजीला घेतल्याशिवाय** मला मुंबईला जातां येणार नाहीं' असा माझा उलट निरोप घेऊन तो गेला व शामजीला पत्रांकरितां ठेवून मी खालीं गेलों.

शिवाजी **सिद्दी प्रकरणीं** मजपाशीं बोलेल असें मला वाटत होतें; परंतु त्या बाबतींत किंवा पकडलेल्या गलबताच्या बाबतींत त्याला आज पत्रें येऊन पोंचलीं होतीं; आणि त्याबद्दल संभाषणाचे वेळीं बोलणें काढण्याबद्दल त्याला स्मरणहि दिलें गेलें; असें असतांना त्यानें ते विषय अजिबात टाळले! स्मरण देणाऱ्या माणसाला उलट तो असें म्हणाला कीं 'वाटेल तर इंग्रजांना माल सोडूं दे, पण मीं त्यांना तसें करण्यास भाग पाडूं

शकत नाहीं !' आम्हीं अशाच तऱ्हेनें भरपाई करून घेतली, तर त्याला स्वतः कांहीं द्यावें लागणार नाहीं या विचारानें, आनंदच होत असेल असें मला वाटतें. [जून ६]-शामजी दोन दिवस गडावर राहून फक्त मीठ व लांकूड सामानाच्या बाबतींत हुकूम घेऊन आला. प्रेसिडेंटच्या पत्राचें उत्तर घेऊन **भीमपंडित** या नांवाचा राजाचा दुसरा इसम जाईल असा त्यानें निरोप आणिला. **चौलला** मी जाऊन पोंचतों तों दोन दिवसांत तो येऊन मिळेल असें त्यानें कळविल्यामुळें भीमपंडिताबरोबर येण्याकरितां एक शिपाई ठेवून मीं चौलकडे निघालों. [जून ७]-**निजामपूरला** प्रेसिडेंटचें पत्र आलें. मेघांचा गडगडाट होऊन पाऊस कोसळल्यामुळें नदीला उतार नव्हता. रात्रभर राहिल्यावर [जून ८] पाणी ओसरलें. पलीकडे उतरून **अष्टमीला** २ वाजतां आलों. होडीनें रात्रीं **चौलला** पोंचलों. [जून ९]-चौलच्या सुभेदाराला भेटलों. मुसलमानाच्या घरांत मीं उतरल्याचें ऐकून त्यानें माझ्याकरितां एक घर शहरांत दिलें. **चौलचें शहर** किंवा गढी वर्तुळाकार असून त्याला अर्धचंद्राकृती ९ बुरुज आहेत. तोफा थोड्याच आहेत पण चांगल्या आहेत. शक्य त्या मर्यादेपर्यंत खंदक खणून समुद्रापासून बंदोबस्त केला आहे. इमारती चांगल्या आहेत. परंतु ३/४ भाग पडका असून बाकीच्या भागांत दर रस्त्याला सुमारें एक दोन कुटुंबें अशा तऱ्हेची पातळ वस्ती आहे. येथें शहरांत ६, बाहेर ४ व नदीकिनाऱ्याला १ अशीं ११ खिस्ती देवळें आहेत. [जून १४]-भट्टी (Batty) ला गेलों पण मला नेण्याला होडी आली नाहीं. [जून १५]-जुन्या चौलच्या हवालदाराकडून 'शिवाजीचा ब्राह्मण आला आहे त्याच्याकरितां एक दिवस थांबा' असा निरोप आल्यामुळें थांबलों. परंतु तो आला नाहीं. [जून १७]-होडींतून मुंबईला २ वाजतां पोंचलों.

फॅ. रे. सुरत भा. ३ }   (१५३७)   { श. १५९५ ज्येष्ठ व. ४
पृ. १६ (तृ. सं.) इ. }   सुरत कन्सल्टेशन.   { इ. १६७३ मे २४

मुंबईकरांनीं १४ व १७ तारखेच्या पत्रांत उपस्थित केलेले प्रश्न. **१३ वर्षांपूर्वी शिवाजीनें राजापूर लुटलें** त्या बाबतींत अनेक वेळां बोलणें करूनहि अनुकूल निकाल न लागतांच त्याचे अत्याचार पूर्ववत् चालू आहेत. तहाचें बोलणें चालू असतांच नुकतीच **हुबळीची वखार** त्यानें लुटली. आमच्या सुस्वभावाचा असा गैर फायदा घेतला जातो आणि त्यामुळें मलबारी व इतर लोकांनाहि आमचे व्यापारांत त्रास देण्यास धीर चढतो. म्हणून एकदां **थॉमस निकल्स** व एक हिंदू व्यापारी पाठवून **राजा**पूरच्या व नुकत्याच झालेल्या **हुबळीच्या** लुटीची नुकसानभरपाई निक्षून मागूनहि शिवाजी लक्ष न देईल तर बेलाशक दंडाचा प्रयोग करून आपल्या राष्ट्राचा लौकिक कां कमावूं नये ? असा मुंबईकरांचा प्रश्न. यावर विचार करतां, मुंबईचा किल्ला त्याच्या सैन्याला दाद न देण्याइतका मजबूत झाला आहे, बेटाच्या गरजा सर्वस्वी शिवाजीचे मुलखावर

अवलंबून न राहतां परभारें भागूं शकतात, आणि शिवाजीला मुंबईहून मीठ भरावें लागतें, तेव्हां त्या बाबतींत बंदी करतांच त्याला तह करणें भाग पडेल, इत्यादि गोष्टी लक्षांत घेऊन **शिवाजीचा सल्ला मोडणें अगदीं आवश्यक आहे**; असें आम्हीं ठरविलें. मात्र हल्लीं डचांशीं आपलें युद्ध चालू आहे तोंपर्यंत स्वस्थ राहून तें युद्ध संपतांच बिघाडाला सुरवात करावी. मध्यंतरीं त्यानें भरपाईदाखल समाधानकारक फेड केल्यास उत्तमच [ओ. कॉ. भा. २४ नं. ३७८८].

ऑर्म ११४-२ } (१५३८) { श. १५९५ ज्येष्ठ व. ४
पृ. ६८ इ. } मुंबई-कारवार { इ. १६७३ मे २४

शिवाजीनें **हुबळी लुटल्याची** हकीकत तुमच्या **२२ एप्रिलच्या पत्रांत** वाचून फार खेद झाला.

फॅ. रे. सुरत भा. १०६ } (१५३९) { श. १५९५ ज्येष्ठ व. ६
पृ. ११२ इ. } मुंबई-सुरत { इ. १६७३ मे २६

पोर्तुगीजांनीं ठाण्याचा मार्ग निर्दयपणानें **बंद केल्यामुळें** देशावर जाण्याचा अन्य मार्ग शोधून काढला पाहिजे. **नागोठण्यावरून** शिवाजीच्या मुलखांतून **औरंगाबादेचा** मार्ग तितकाच सोईचा होईल. **कल्याण-भिवंडीच्या** मार्गाप्रमाणेंच हा मार्गहि येथून ३१४ दिवसांपेक्षां अधिक लांबीच्या मुक्कामांचा नाहीं. **शिवाजीशीं** आमचा तह झाल्यावर हा तितकाच सुरक्षित मानतां येईल. आमची ही इच्छा पूर्ण व्हावी या दृष्टीनें खटपटीचा आरंभ करण्याकरितां, प्रेसिडेंटचीं पत्रें आणि **बहादूरखान व दिलेरखान** यांच्यासाठीं अल्प नजराणे घेऊन **सिद्दी लाहोरला** (?) औरंगाबादेस पाठवूं. [ऑर्म ११४-२ पृ. ७९]

फॅ. रे. मुंबई भाग १ } (१५४०) { श. १५९५ ज्येष्ठ व. १४
पृ. ५५ इ. } मुंबई कन्सल्टेशन { इ. १६७३ जून ३

समोरील किनाऱ्यावरच्या **शिवाजीच्या लोकांनीं** माजगांवला ओढून ठेविलेलीं बादशहाचीं गलबतें **जाळून** टाकण्याचा बेत केल्याविषयीं अनेक वेळां बातम्या आल्या. **मिर्झा महमद हसन** यानेंहि गव्हर्नरला याविषयीं कळविलें. म्हणून सभेंत असें ठरलें कीं, 'माजगांव बंदराच्या मुखाशीं रिव्हेंज गलबत व कित्येक लहान होड्या ठेवून कंपनीच्या व मोंगलांच्या गलबतांचें रक्षण करावें.'

फॅ. रे. सुरत भाग १०६ } (१५४१) { श. १५९५ आषाढ शु. २
पृ. १२१ इ. } मुंबई-सुरत { इ. १६७३ जून ६

हुबळीच्या लुटीच्याविषयीं बोलणें करण्याकरितां **निकल्स शिवाजीकडे गेला** आहे. परंतु शिवाजी ठिकाणीं नसल्यामुळें तो येईपर्यंत कांहीं करतां येणार नाहीं. तो आल्यावर समाधानकारक निकाल लागेल अशी आशा आहे. [ऑर्म ११४-२ पृ.८२]

श्री. सं. चा. ले. १२ } (१५४२) { श. १५९५ आषाढ शु. ७
सु. १०७४ रबल ५ } खुर्दखत फा. मु. व सी. { इ. १६७३ जून ११

अजर० मोहीबखान-कार० देस० देसकु० मोक० पा सिराळा:-रघुनाथ गोसावी सो नाणे घोल यांस पा मा ॥. चावर इनाम दिधला आहे तो चालविणें.

ओ. कॉ. भा. ३४ } (१५४३) { श. १५९५ आषाढ शु. ११
नं. ३८०० इ. } कारवार-सुरत. { इ. १६७३ जून १४

तुमचें १० एप्रिलचें पत्र पोंचून बरेच दिवस झाले. परंतु मध्यंतरीचा काळ धालमेलीचा गेल्यामुळें अद्यापपर्यंत कांहीं लिहितां आलें नाहीं. शिवाय संकट अगदीं घरापाशीं येऊन ठेपल्यामुळें संरक्षणाची तजवीज करण्यामध्यें इतका वेळ गेला. **हुबळीच्या लुटीबद्दल** पूर्वी कळविलेंच आहे. आतां तपशील देत आहों. ७८९४ होनांचें नुकसान हिशेबांत **शिवाजीच्या** नांवानें खर्चे लिहीत आहोंत. वसूल करून घ्यावें.... नाहींतर तो आणि त्याच्याप्रमाणेंच इतर लोक धीट होऊन आम्हांला मोजीनातसे होतील. आतांच कंपनीच्या सामर्थ्याबद्दल कोणी बोलूं लागल्यास '**शिवाजीला** त्यांनीं काय केलें आहे!' असें लोक उपहासानें विचारतात! ...**शिवाजीच्या** लोकांनीं **हुबळीच्या वखारींत पुरुषभर खोल खणून** सांपडली ती लूट नेली...जेथें दारू ठेविली होती त्या ठिकाणाला **शिवाजीच्या** लोकांच्या हातून आग लागल्यामुळें त्यांचेच २० लोक त्या अपघातांत मेले. [एप्रिल १६ चे यादींत ले. १५२४—मध्यें आलेल्या सामानाचें **वर्णन** येथें दिलें आहे.]...शिवाय आम्हीं वखारवाले व इतर व्यापारी यांच्या खासगीपैकीं सुमारें ५२०० रुपयांचें नुकसान झालें.

चार-पांच हजार फौजेची कुमक घेऊन **मुजफरखान** हुबळीस आला नसता तर **शिवाजीनें** हुबळींत कांहींच शिल्लक ठेविलें नसतें. मुजफरखानाची बातमी लागतांच बांधून तयार होते तेवढेच बोजे घेऊन **शिवाजी** पळाला. त्यामुळें कितीतरी माल तसाच रस्त्यावर पडून राहिला. **शिवाजी** व **मुजफरखान** यांच्यामध्यें एक दिवसाचें अंतर पडून **मुजफरखानाला** कांहींच करतां आलें नाहीं. यामुळें त्याच्या पदरचे सेनापती व शिपाई नाखूष झाले आणि त्याला सोडून गेले. त्याच्याकडून त्याची जहागीर काढून घेण्यांत आली. असा अपमान सहन न होऊन त्यानें बंड उभारलें. त्याचें सैन्य थोडें असलें तरी त्याचा किल्ला **बेळगांव** हा फारच मजबूत आहे. शिवाय गोवा आणि कानडा यांच्यामध्यें असलेला कारवारचा मुलूख चांगला मजबूत असून सुरवातीलाच आपला एक विश्वासाचा सुभेदार पाठवून त्यानें तो आपल्या हाताखालीं घातला. त्यानें आम्हांला पकडण्याचा बेत केला होता. परंतु अगोदर या प्रांताच्या देसायाला सहकुटुंब कैद करून अंकोला किल्ल्यावर कैदेंत ठेवण्याच्या गडबडींत ते आम्हांला विसरले, व तितक्यांत आम्हीं आमच्या संरक्षणाची तजवीज करून बसलों!

इतक्यांत विजापूराहून **बेळगांवावर** सैन्य चालून येत आहे. तें येतांच महिनाभर चाललेलें हें बंड मोडेल असा भरंवसा वाटतो.

विजापुरी सेनापती **बहलोलखान** याच्या सैन्यापुढें **शिवाजीचा** टिकाव न लागून त्याचें सैन्य सर्व ठिकाणीं **माघार घेत आहे**. बहलोलखानाचें सैन्य कोल्हापूरचे आसपास छावणी करून आहे. तें पावसाळा संपतांच राजापूरकडे येणार आहे. **शिवाजीनें** भिऊन जाऊन **तहाचें बोलणें** लाविलें आहे. परंतु बहलोलखान त्याच्याविरुद्ध पक्का निश्चय करून बसल्यासारखा दिसतो.

व्यापाराच्या दृष्टीनें या वर्षी कांहीं करितां येईल असें दिसत नाहीं. तथापि विजापूरचे सैन्यास यश येऊन शिवाजीचा एकदां **बंदोबस्त** झाल्यास लहानसान बंडखोर सहजच गप्प बसतील.

फॅ. रे. सुरत भाग १०६ } (१५४४) { श. १५९५ आषाढ शु. १४
पृ. १४२-४३ (द्वि. सं.) इ. } कारवार–सुरत. { इ. १६७३ जून १८

तुमच्या २४ तारखेच्या पत्रांत **शिवाजीला** वठणीला आणण्याचा आपला निश्चय वाचून आनंद झाला. त्याच्या लोकांकडून त्यांनीं लुटलेला माल परत मिळवणें तितकें सोपें नाहीं. कारण, त्यांची आतां पांगापांग झाली आहे आणि ते जवळपास असते तरी त्यांना आपल्या धन्याचें ब्रीद अवगत असल्यामुळें एकदां हातांत गेलेला माल ते केव्हांच परत न देते. त्यांनीं न कळत आमची वखार इतरांबरोबर लुटली असें म्हणावयास त्यांना तोंडच नाहीं. कारण, अगदीं प्रथम ते थेट वखारीवरच आले ! **सेनापती प्रतापराव** याच्यापुढें आमचें कापड भर बाजारांत नेलें आणि ते आमच्या दलालाला शोधीतहि होते.... राजापूरचें गलबत पकडलें. तें कळलें. असाच कांहीं उपाय केल्याशिवाय गत्यंतर नाहीं. **राजापूरचीं गलबतें** बहुतेक मक्केलाच जातात. तेव्हां तीं धरावयाचीं असतील तर आतां आमचीं गलबतें बाहेर पडलीं पाहिजेत. नाहींतर पुढें उशीर होईल... **शिवाजीचे** पांच सहा हजार लोक या प्रांतांत स्वारी करण्याच्या तयारीनें आले होते. **बहलोलखान** आला नसता तर ही स्वारी खास झाली असती. आतां तें सैन्य स्वतःच्या त्याच्या मुलखाच्या रक्षणाकरितांच गुंतून राहिलें आहे. [याचे पुढें पृ. १४५ वर मागें ले. १५२४ त उल्लेखिलेली लुटीबद्दलची तपशीलवार **यादी** आली आहे].

ऑर्म. ११४–२ } (१५४५) { श. १५९५ आषाढ व. २
पृ. ८७ इ. } मुंबई— (चेंबर्लेन) कारवार { इ. १६७३ जून २१

निकलस **शिवाजीकडून परत** आला. आपल्या माणसांनीं लूट केली हें अमान्य करून, त्याबद्दल कांहींच माहिती नसल्यामुळें, लुटीचा आंकडा, लूट करणाऱ्यांचें नांव इत्यादि तपशील त्यानें विचारला. आपण आपल्या **शत्रूच्या देशांत न्याय्य**

युद्ध केलें आणि जर शत्रूच्या मुलखाची लूट केली आणि त्यामध्यें न जाणतांना इंग्रजांचा माल लुटला गेला, तर त्या गोंधळामध्यें ती लूट आपल्या शिपायांकडून झाली असण्याचा जितका संभव आहे तितकाच स्थानिक लोकांकडून झाली असण्याचा संभव असल्यामुळें आपला त्याला इलाज नाहीं, असेंहि त्यानें सांगितलें. आणखी वर मित्रत्वाच्या नात्यानें म्हणून त्यानें असा सल्ला दिला कीं 'पावसाळा संपतांच **मोठी निकराची लढाई** करण्याचा माझा विचार आहे; या करितां दख्खनमध्यें तुमचा व्यापाराचा पसारा यापुढें शक्य तितका कमी करा' ! तथापि त्यानें नुकसानीची यादी पाहावयास मागितली. परंतु तुमच्याकडून ती आली नव्हती यामुळें दाखवितां आली नाहीं. तरी सविस्तर हकीकत जलद कळवावी.

फॅ. रे. मुंबई भा. १ पृ. ५७-५८ इ.	(१५४६) मुंबई कन्सल्टेशन	श. १५९५ आषाढ व. ४ इ. १६७३ जून २३

टॉमस निकल्स शिवाजीकडून आज परत आला. त्यानें आपली रोजनिशी सादर केली. **शिवाजीकडून** आलेल्या वकिलांची आज दोनप्रहरीं भेट घ्यावी.

शीव व **मोचिंबो** (Mochinbo) येथील नदीचे उतार पाहून येण्याकरितां **शिवाजीचे** बातमीदार आल्याची आणि तेथून उतारानें येऊन **बादशहाचें आरमार** शाकारून ठेविलें होतें त्यावर हल्ला करण्याचा शिवाजीचा बेत आहे अशाबद्दलची गव्हर्नरला बातमी लागली. यामुळें (१) याशिवाय दुसऱ्या ठिकाणाहून या बेटावर येण्याला मार्ग नसल्यामुळें, या दोन ठिकाणच्या नावा बंद ठेवून त्या दोन रस्त्यांनीं साष्टी बेटाकडे जाण्यायेण्याचा गुन्हा करणारास कडक शासन होईल असा जाहीरनामा काढावा. (२) ह्या बेटांवरून जाऊं येऊं इच्छिणारांनीं फक्त मुंबई व माहीम येथील तरींचा उपयोग करावा. (३) आणि या दोन तरींवर **जाणाऱ्या येणाऱ्यांची सविस्तर नोंद ठेवावी;** असें ठरलें.

फॅ. रे. मुंबई भा. १ पृ. ६१ इ.	(१५४७) मुंबई कन्सल्टेशन	श. १५९५ आषाढ व. ५ इ. १६७३ जून २४

'**शिवाजीचा तह**' हा विषय पुनः विचारांत घेऊन पूर्वीं **उस्टिकबरोबर शिवाजीकडे** गेलेल्या राम शेणव्याचा भाऊ **नारायण शेणवी** हा योग्य आहे म्हणून त्याला शिवाजीच्या वकिलाबरोबर रायरीला पाठवावें असें ठरलें. त्याच्याकरितां सूचना तयार कराव्या. अद्यापपर्यंत अनेक वकिलांना पाठविण्यांत कंपनीला पुष्कळ खर्च आला असल्यामुळें यापुढें निकाल लौकर करून घेऊन हा खर्च संपविला पाहिजे इत्यादि विचार झाला. शिवाजीकडे करावयाची मागणी निश्चित ठरविण्याकरितां मागील मागण्या काढून पहातां सुरतेच्या प्रेसिडेंटनें **उस्टिकला** पाठविलें त्यावेळीं ते १५०००

होनांना कबूल असून नंतर १२ ह. होन घेण्यासहि तयार झाले होते असें दिसलें. यावेळीं या मुद्यांवर पुनः वाद होऊन, रोकडीनें किंवा मालाच्या रूपानें **शिवाजीनें** ८००० होन दिले आणि राजापुरास ५ वर्षांची किंवा निदान ३ वर्षांची जकातीची माफी दिली तरी, नारायण शेणव्यानें तें पत्करून त्याच्याशीं तह करावा असें ठरलें.

फॅ. रे. मुंबई भा. १ } (१५४८) { श. १५९५ आषाढ व. ६
पृ. ५९-६० इ. } मुंबई कन्सल्टेशन. { इ. १६७३ जून २५

शिवाजीचा वकील गव्हर्नरला दोनदां भेटला. त्याच्या म्हणण्याचा इत्यर्थ असाः—**शिवाजीनें** राजापूरला केलेल्या **लुटीची कमाल किंमत १० ह. होनां** इतकी असून तो ती देण्यास तयार आहे. ती घेऊन राजापुरची मागील खटखट मिटवून इंग्रजांनीं राजापुरला वखार घालावी. ही रक्कम देण्यास शिवाजीपाशीं रोकड नसल्यामुळें इंग्रजांनीं व्यापार सुरू करतांच जकातींतून फेडून घ्यावी. **हुबळीच्याबद्दल शिवाजीला** कांहीं माहिती नसून ती लूट आदिलशाही सैन्यानें किंवा तेथील सुभेदारानेंच केली असावी. शत्रूच्या गलबतांना इंग्रजांनीं आश्रय दिला याबद्दल तक्रार करून शिवाजीकरितां वकिलानें २१३ मोठ्या तोफा मागितल्या आणि शेवटीं राजापूरचें गलबत पकडलें तें परत मागितलें.

प्रेसिडेंटनें सिद्दीच्या गलबतांच्या बाबतींत वकिलाचें समाधान सहज केलें 'इतर सगळ्या गोष्टी राजापूरच्या भरपाईवर अवलंबून आहेत. त्याचा निकाल झाल्यावर सर्व कांहीं सुरळीत होईल' असें त्यानें बाकीच्या गोष्टींबद्दल कळविलें. यापुढें १० हजार होनांबद्दल बोलणें झालें. नंतर 'तह करण्याकरितां प्रथम हिंदी इसम पाठवून नंतर इंग्रज पाठवावा. (कारण इंग्रजाला खर्च पुष्कळ येतो) आणि **शिवाजीच्या** वकिलाला व बरोबरच्या लोकांना वस्त्रें देऊन त्यांची रवानगी करावी' असें ठरलें.

ओ. कॉ. भा. ३४ } (१५४९) { श. १५९५ आषाढ व. ८
नं. ३८०७ इ. } नारायण सेणव्यास सूचना { इ. १६७३ जून २७ चें नंतर

कंपनी व **शिवाजीराजा** यांच्या तहाच्या बाबतींत नारा(यण) शेणवी यास प्रेसिडेंटच्या सूचना.

शिवाजी राजाचा वकील **भीमाजी पंडीत** राजापूरास झालेल्या नुकसानीच्या भरपाईबद्दल शिवाजीच्या वतीनें १२००० होन देण्यास तयार झाला. परंतु हिशेबानें कंपनीचें ९० हजार होन आणि इतर इंग्रजांचें २० ह. होन असें नुकसान झाल्यामुळें गव्हर्नर व कौन्सिल यांना ही रक्कम मान्य नाहीं. ह्या २० हजारांची तजवीज होण्याच्या पूर्वी शिवाजीशीं तह करूं नये असा इंग्लंडच्या राजाचा निक्षून हुकूम असतांहि प्रेसिडेंट शिवाजीच्या स्नेहाखातर त्या २०००० हजार बदल १२००० होन रोख

किंवा मालाच्या रूपानें घेण्यास तयार आहे. कंपनीच्या नुकसानीबद्दल शिवाजीनें रोख भरपाई न करितां राजापूर बंदरांत इंग्रजांना **जकातीशिवाय सात** किंवा निदान पांच **वर्षे** तरी **व्यापार** करूं द्यावा, याला प्रेसिडेंट व कौन्सिल यांची संमति आहे. असा व्यापार करूं देण्यानें शिवाजीराजाची संपत्ति आणि पत सहजच वाढेल, असें सांगावें.

भिमाजी पंडिताकरवीं शिवाजीनें दोन तोफा मागविल्या. त्यास, 'तह झाल्यावर दोनच काय परंतु लागतील तितक्या तोफा व वाटेल तें इतर सामान त्याला मिळेल' असें कळवावें.

सात वर्षे जकातीशिवाय व्यापाराची परवानगी देणें हें शिवाजीला फारच तोट्याचें वाटलें तर 'आम्हीं स्वतः जकात न दिली तरी आमच्या मालाच्या मोबदल्यांत माल आणून देणारे इतर व्यापारी जकाती देतीलच' हें समजाऊन सांगून ह्या योगानें शिवाजीला नफा होऊन बंदराची भरभराट होईल हें स्पष्ट करावें.

वादळामुळें मुंबई बंदरांत शिरलेल्या गलबताबद्दल **शिवाजीनें** विचारल्यास **पोर्तुगीज** किंवा खुद्द शिवाजीच्या मुलखांत वादळामुळें जाणाऱ्या गलबतांची काय अवस्था होतें याचें स्मरण द्यावें; म्हणजे शिवाजीला तें गलबत धरण्याचें कारण समजेल !

हुबळीच्या बद्दल जबाबदारी तो नाकारील तर 'आपल्या तेथील वखारवाल्या-कडून या बाबतींत आम्हांला मिळालेली नक्की बातमी आम्ही पुरवितों' असें सांगून ठेवावें. आंधेरीच्या हवालदारानें मलबारी लोकांकडून गतसालीं विकत घेतलेलें आमचें गलबत व कांहीं दारू आम्हांला परत द्यावी असा त्या हवालदाराला शिवाजीनें हुकूम द्यावा अशी खटपट करावी. मलबारी लोकांकडून विकत घेतलेलें फ्रेंचांचें गलबत जर परत देण्यांत आलें तर आमचेंहि परत आलें पाहिजे असें सांगावें. कारण त्यानें आमचा बोज राहील !

एकंदरींत १२००० होन व सात वर्षे राजापूर बंदरांत बिनजकातीनें व्यापार, या अटी मान्य करून घेण्यास कमालीचे प्रयत्न करावे; तें नच जमल्यास १० ह. होन व ५ वर्षे तरी पदरांत पाडून घ्यावीं; **हेंहि नच जमलें तर ९ ह. किंवा ८ ह. होन आणि ४ वर्षे बिन जकातीचा व्यापार येथपर्यंत**हि **उतरावें.** वारंवार पत्र पाठवून मात्र आमचा सल्ला विचारावा.

(से) फॅ. रे. सुरत भा. १०६ } (१५५०) { श. १५९५ आषाढ व. ९
पृ. १५३ इ. } मुंबई—सुरत { इ. १६७३ जून २८

७।८ दिवसांपूर्वी शिवाजीचा वकील आला. त्याचेशीं दोनदां बोलणें झालें तें ता. २५ व २७ च्या बैठकीच्या अहवालांत नमूद केलें आहे. ह्या महत्त्वाच्या बाबतींत आपण विचार करून योग्य मत द्यावें. [ऑर्म ११४–२ पृ. ८९]

फॅ. रे. सुरत भा. ३ } पृ. २१ (तृ. सं.) इ. } (१५५१) सुरत कन्सल्टेशन { श. १५९५ श्रावण शु. ७ { इ. १६७३ जुलै १०

मुंबईहून [ता. २५ व २७ जूनच्या कन्सल्टेशनच्या अनुरोधानें] पत्रें शिवाजीशीं तह करण्याच्या बाबतींत आलीं. त्यांचा विचार केला. त्याच्याशीं सलोखा राखण्याला कारणें दिसतात तीं:— (१) **डचांशीं** हल्लीं युद्ध चालू आहे. त्यांनीं शिवाजीशीं एकमत केलें तर दोघे मिळून आम्हांला हाकून लावितील. (२) मुंबईला बऱ्याच गोष्टींकरितां पण मुख्यतः सर्पणाकरितां **शिवाजीच्या मुलखावर अवलंबून रहावें लागतें**. (३) **पोर्तुगीझांनीं** ठाण्याचा मार्ग बंद केल्यामुळें औरंगाबाद व बऱ्हाणपूर येथून माल मुंबईला यावा अशा सोईचें बंदर त्याच्या मुलखांतीलच आपल्याला मिळविलें पाहिजे. या गोष्टींमुळें म्हणजे ज्यांच्यावर बेटाची सुरक्षितता आणि भरभराट अवलंबून आहे त्या गोष्टींमुळें, आम्हीं मुंबईकरांप्रमाणेंच ८ ते १० हजार होन घेण्यास मान्यता देतों. ही रकम ज्यांचें नुकसान झालें त्यांना रोख देतां यावी म्हणून शिवाजीनें रोख अगर मालाच्या रूपानें द्यावी. जकातीची रकम अगदीं अल्प असल्यामुळें जकातींचा हवाला आपल्याला मान्य नाहीं. ठरलेली रकम हातीं येईपर्यंत मस्कतचें (राजापूरचें) गलबत सोडूं नये. **शि**वाजीशिवाय राजापूरच्या कित्येक व्यापाऱ्यांकडून कंपनीचें येणें आहे. त्यांचा कांहीं संबंध या गलबतांत असेल तर बेलाशक भरपाई करून घ्यावी.

फॅ. रे. सुरत भा. ३ } पृ. २२ (तृ. सं.) इ. } (१५५२) सुरत कन्सल्टेशन { श. १५९५ श्रावण व. १ { इ. १६७३ जुलै १९

कारवारच्या वखारवाल्यांकडून **हुबळीच्या लुटीची** तपशीलवार हकीकत आली. त्याबद्दल **शिवाजीच्या लोकांची जबाबदारी** स्पष्ट दिसत असतां [ले. १५४४] शिवाजी कानावर हात ठेवितो ! राजापूरबद्दल बोलणें चालू आहे त्याच वेळीं हुबळी लुटण्याचा हुकूम देतो ! तेव्हां त्याच्या बंदरांतील **गलबतें मक्केहून** पुढच्या महिन्याच्या दुसऱ्या पंधरवड्यांत येतील तीं **पकडण्याचा** हुकूम कारवारकडे जाणाऱ्या आपल्या गलबतांच्या कप्तानांला प्रेसिडेंटनें द्यावा.

ऑर्म ११४-२ } पृ. ९६ इ. } (१५५३) मुंबई–सुरत { श. १५९५ श्रावण व. ४ { इ. १६७३ जुलै २३

शिवाजीशीं तह करण्याबाबत तुमच्या सूचना प्रसंगानुसार अमलांत आणिल्या जातील. शिवाजीच्या मुलखांत भयंकर **पाऊस पडला**. त्यामुळें **नारायण शेणव्याकडून** कांहींच उत्तर आलें नाहीं.

फॅ. रे. मुंबई, भा. १ } पृ. ७१ इ. } (१५५४) मुंबई कन्सल्टेशन. { श. १५९५ अ. भाद्र. शु. १३ { इ. १६७३ आगस्ट १५

शिवाजीचीं गलबतें वाटेंत आढळल्यास तीं पकडण्याबद्दल हुकूम द्यावा कीं नाहीं

असा प्रश्न विचारास निघाला. **नारायण शेणवी** तहाचें बोलणें करण्यास गेला आहे व लवकरच तह होईल हें लक्षांत घेऊन, राजापूरचीं गलबतें आढळल्यास तीं शत्रूचीं म्हणून न पकडतां त्यांच्याशीं **चांगल्या तऱ्हेनें वागावें** असाच हुकूम द्यावा असें ठरलें.

ओ. कॉ. भा. ३४ } (१५५५) { श. १५९५ अ. भाद्र. व. ३
नं. ३८३२ इ. } सुरत-मुंबई. { इ. १६७३ आगस्ट २०

पठाणाच्या (**बहलोलखान**) प्रगतीबद्दल कांहींच कळलें नाहीं. परंतु **बहलोलखानाचा** दाब शिवाजीवर जबर पडत आहे एवढें मात्र खास. त्यानें लांच खाऊन शिवाजीशीं (अल्पांतच) तह करण्यास तयार होऊं नये म्हणजे झालें !

फॅ. रे. मुंबई, भा. १ } (१५५६) { श. १५९५ अ. भाद्र. व. ४
पृ. ७४-७५ इ. } मुंबई कन्सल्टेशन { इ. १६७३ आगस्ट २१

कारवारच्या वखारीला बंडखोरांचा वेढा पडल्यामुळें तेथील व्यापार धोक्यांत आहे. तेव्हां शिवाजीचा व आमचा वाद अद्यापि पूर्णपणें मिटला नसला तथापि **राजापूर**हून विलायतचें गलबत भरून द्यावें. डचांशीं सलोख्याचे संबंध असते आणि कारवारच्या वखारीला स्वास्थ्य असतें तर शिवाजीवर **दंडाचा प्रयोग** यशस्वी झाला असता. परंतु दोन्ही गोष्टी विरुद्ध असल्यामुळें या वर्षी **आपले उद्देश झांकून ठेवून** राजापूरला वखार घालण्याचें बोलणें लावावें. मिरीं, लाख व धनगरी वगैरे साधें कापड निदान एका गलबताच्या भरतीचें येथील व्यापारी मिळवून देतील. आतां हा उद्देश सिद्धीस जाण्याकरितां राजापूरचें अडकवून ठेवलेलें गलबत सोडावें लागेल. परंतु त्यामध्यें ८।१० हजार रुपयांपेक्षां अधिक किंमतीचा माल नसून तो बहुतांशीं राजापूर प्रकरणांत निरपराधी असणाऱ्या अनेक लहान व्यापाऱ्यांच्या मालकीचा आहे. शिवाय, या प्रकरणांत रदबदली करण्याकरितां शिवाजी, संभाजी व मुख्य अमलदारांचीं जीं पत्रें घेऊन ते व्यापारी येथें आले आहेत, त्या पत्रांत राजापूरच्या बाबतींत आम्ही समाधानकारक निकाल करतों अशीं वचनें दिलेलीं आहेत. **इत्यादि गोष्टी प्रेसिडेंटनें सांगितल्या** त्यावर विचार झाला; व ह्या बाबतींत सुरतकरांची संमती मिळाल्यावर राजापूरचें **पकडलेलें गलबत मालकांच्या स्वाधीन करून** त्याबद्दल शिवाजीला कळवावें. तसेंच युरपकरितां माल खरेदी करण्यासाठीं **राजापूरला या वर्षी वखार घालण्याचा** आपला उद्देश कळवावा. [ह्या मजकुराचें पत्र सुरतेला २६ आगस्टला गेलें. पहा. ऑर्मे. ११४-२ पृ. ११९-२०]

(**से**) फॅ. रे. सुरत, भा. १०६ } (१५५७) { श. १५९५ अ. भाद्र. व. ४
पृ. १८४ इ. } मुंबई-सुरत. { इ. १६७३ आगस्ट २१

[वरील बाबतींत पत्र]..........इतक्या लोकांचीं शिफारस पत्रें आलीं आणि

शिवाजीनें आमच्या **नुकसानीच्या याद्या पुनः पहावयास मागितल्या.** तथापि आम्हीं अद्यापि कांहीं ठरविलें नाहीं. आम्हीं विचारलेल्या गोष्टींचा नीट विचार करा आणि जबाब लौकर पाठवा. हिंदुस्थानांतील राजे लोकांशीं सलोख्याचे संबंध राखण्याबद्दल **कंपनीची** आज्ञा स्मरा; आणि हें गलबत सोडून दिल्यानें इंग्रजांचें नांव व पत वाढेल हें लक्षांत घ्या. त्या योगानें मुंबईत व्यापारी वर्गाची वस्ती वाढून मुंबईचा व्यापार वाढेल याचाहि विचार करा.

ऑर्म. भा. ११४ } (१५५८) { श. १५९५ अ. भाद्र व. ११
वि. २ पृ. १२३ इ. } मुंबई–इंग्लंड { इ. १६७३ आगस्ट २८

डच आरमार सीलोनकडे परत गेल्यावर, मुंबईचे व्यापारी व्यापाराबद्दल विचार करूं लागलेले पाहून, त्यांच्या उत्तेजनाकरितां म्हणून, **शिवाजीच्या मुलखांत जाणाऱ्या सुमारें चाळीस मिठाच्या गलबतांबरोबर,** आमचीं कांहीं व्यापारी गलबतें व **संरक्षणार्थ** दोन हत्यारबंद गलबतें पाठविलीं. या व्यवहारांत नगदी नफा झाला नसला तथापि बेटाची प्रशंसा झाली आणि व्यापारी लोकांनाहि समाधान वाटलें......**सिद्दी संबूळचें** शिवाजीवर जाणारें आरमार मुंबईस १० मेच्या सुमारास पोचलें. राजापूरचे बंदरांत शिरलेलें गलबत प्रथम पकडून ठेवावें असें वाटलें होतें. परंतु नंतर सोडून देणें इष्ट वाटलें....रास्त मार्गानें न वागणाऱ्या शत्रूंना धाक दाखविण्याकरितां, अशा बंदरांचीं व राजांचीं गलबतें धरण्याबद्दलची परवानगी देऊन ठेवा.

खं. २० ले. १३१ } (१५५९) { श. १५९५ अधि. भाद्र. व.१२
सु. १०७४ जवल २५ } मिसेली फा. मु. व सी. { इ. १६७३ आगस्ट २८

अज दि० पर० वाई—ता मोकं० कसबे वाई

वाई येथील ५ होन चित्राव यास दिले आहेत. आदा करणें.

फॅ. रे. सुरत, भा. ३ } (१५६०) { श. १५९५ अ. भाद्र. व.१४
वि. ३ पृ. ३३ इ. } सुरत कन्सल्टेशन { इ. १६७३ आगस्ट ३०

राजापूर किंवा हुबळी या बाबतींत समाधानकारक भरपाई मिळण्याच्या पूर्वीच विलायतच्या गलबतांकरितां राजापूरचा माल मिळावा; याकरितां थोडा वेळ आपले हेतू लपवून तेथें वखार घालावी आणि राजापूरचें गलबत सोडून द्यावें अशी दुसरी सूचना होती. परंतु कौन्सिलला ती मान्य नाहीं. याचीं सविस्तर कारणें या तारखेच्या उत्तरांत दिलीं आहेत.

ऑर्म भा. ११४ } (१५६१) { श. १५९५ भाद्र. शु. ३
वि. २ पृ. १३२ इ. } मुंबई–मद्रास { इ. १६७३ सप्टें. ३

कारवारच्या लोकांनीं विजापूरच्या अदिलशहाविरुद्ध बंड करून तेथील वखारीला

पुष्कळच त्रास दिला.... **शिवाजीच्या** सैन्यानेंहि **हुबळी, कोल्हापूर** (Callapore) आणखी कित्येक शहरें लुटल्यामुळें त्या प्रांतांत कितपत स्वास्थ आहे; याबद्दल कल्पन होत नाहीं.

मोंगल बादशहानें विजापूर व गोवळकोंड्याचे राजांशीं तह केला. आणि नुकतेंच पठाणांचें बंड मोडलें. यामुळें शिवाजीशीं युद्ध चालविण्यास आतां तो मोकळा झाला आहे. या आपल्या उद्देशाच्या सिद्ध्यर्थ, जमीनीकडून शिवाजीच्या मुलखांत प्रवेश करून त्याच्या किल्ल्यांत त्याला कोंडून ठेविण्यासाठीं **बहादरखान व दिलेरखान हे** दोन सरदार व किनाऱ्यावरील बंदरावर छापे घालण्याकरितां लहान गलबतांचें आरमार घेऊन **सिद्दी संबूळ**, असे त्यानें शिवाजीवर पाठविले. सिद्दीच्या आरमाराचा कांहीं भाग पावसाळ्यांत ह्या बंदरांत शाकाराला गेल्यामुळें शिवाजीला प्रथम वैषम्य वाटलें. परंतु अलीकडे आम्हीं योग्य खुलासा केल्यामुळें त्याचें समाधान झालें.... **गोवेकर डचांशीं युद्ध** करण्याची तयारी करीत होते. परंतु लिस्बनहून पुरेशी मदत न आल्यामुळें तो बेत जागच्या जागीं जिरला.

फॅ. रे. मुंबई भा. १ पृ. ७९ इ.	(१५६२) मुंबई कन्सल्टेशन	श. १५९५ भाद्र. शु. ४ इ. १६७३ सेप्टें. ४

शिवाजीच्या ब्राह्मणानें **राजापूरच्या गलबताबद्दल** अर्ज सादर केला कीं, "गलबताच्या मालकाचा शिवाजीशीं संबंध नसून तो, लूट झाली तेव्हां, कंपनीचा साहाय्यक होता. त्याचीच त्या लुटींत नागवण फार झाली. आतां तो पुष्कळ गरीब झाला असल्यामुळें त्याचें गलबत व माल परत मिळावा." याचा विचार होऊन, 'सुरतेच्या डे० प्रेसिडेंटकडे विचारणा केली आहे, त्याचें मत कळल्याशिवाय कांहींच मुक्रर करूं नये' असें ठरलें.

फॅ. रे. मुंबई भा. १ पृ. ८३-८६ इ.	(१५६३) मुंबई कन्सल्टेशन	श. १५९५ भाद्र. शु. १५ इ. १६७३ सप्टें. १५

प्रेसिडेंटनें २१ ऑगस्टच्या जनरल लेटरमध्यें सुचविलेल्या मुद्यांवर सुरतेहून डेप्युटी प्रेसिडेंटचें ३० आगस्टचें प्रतिकूल पत्र आलें. त्याचा विचार करून येथील कौन्सिलचें मत बनलें तें असें: सुरतेच्या कौन्सिलचीं बरींच प्रमाणें चुकीचीं आहेत. कारितां राजापूरचें पकडलेलें गलबत खालील कारणांकरितां सोडून द्यावें असें आम्हांला वाटतें:-

एका बाजूनें बहलोलखान व दुसऱ्या बाजूनें मोंगलांचें सैन्य अशा **पेचांत शिवाजी** असल्यानें तो प्रतिकार करण्यास असमर्थ आहे आणि म्हणून त्याच्याशीं लपंडाव करून सौजन्यानें वागण्याचें कारण नाहीं असें सुरतवाले म्हणतात. वस्तुस्थिति अशी नसून शिवाजी दोघांनाहि तोंड देण्यास समर्थ आहे; एवढेंच नव्हे तर, नुकताच त्यानें

आदिलशाहींतील मध्यवर्ती आणि महत्त्वाचा किल्ला **सातारा** घेऊन तेथील अमर्याद लूट बैलांवरून **रायगडास** नेली. वर सांगितलेले दोघेहि सरदार त्याच्या मुलखांत यावर्षी शिरतील हें खरें असलें तथापि रसदेचा तुटवडा भासून ते दीर्घ काल राहूं शकणार नाहींत. शिवाजीच्या सैन्यापासूनहि त्यांना फार त्रास होईल. शिवाय शिवाजीचा पुरा नाश व्हावा हा त्यांचा उद्देश नाहीं. कारण, हे **उमराव स्वतःच्या फायद्याकरितां** ह्या **लढाया** धोरणानें **बादशाही खर्चानें** चालवीत असतात ! नेट धरून एकदां युद्धाचा निकाल लावावा असें त्यांना कधींच वाटत नाहीं. अशा परिस्थितींत, डचांसारख्या प्रबळ शत्रूशीं युद्ध चालू असतांना, शिवाजीला चिडविल्यास आमच्यावर महासंकट ओढवेल. गेल्याच वर्षी **डच लोकांनीं** शिवाजीकडे ३००० सैन्याची कुमक मुंबई बेट घेण्या-करितां मागितली. त्यानें ही गोष्ट जाहीर रीतीनें मान्य केली होती. आणि शिद्दीचें आरमार येथें पावसाळ्यांत राहिलें त्यावेळीं रागानें डच पुनः आल्यास आपण काय काय करूं याबद्दल त्यानें धमकी दिली ! शिवाजी लुच्चा आहे असें सुरतकरांचें म्हणणें आहे. परंतु त्यामुळें आम्हीं त्याच्याशीं वैर केलेंच पाहिजे असें ठरत नाहीं. आम्हीं प्रथम कुरापत न काढल्यास तो भांडण उकरून काढणार नाहीं. त्यांतून एका बाजूनें **दुष्काळाला** आणि दुसऱ्या बाजूनें **डच व शिवाजी** यांच्या संयुक्त सैन्याला तोंड देण्याची आपली तयारी असल्याशिवाय आपण त्याच्या वाटेस जाऊं नये असें आम्हांला वाटतें. प्रेसिडेंट राजापूरच्या व्यापाऱ्यांची कींव करितो; परंतु राजापूरला लुटलें गेलेल्या व्यापाऱ्यांची करीत नाहीं हा आरोप निराधार आहे. गेलीं तीन वर्षें सतत याच गोष्टीकरितां निकाल लांबणीवर पडला आहे. तथापि व्यक्तींच्या हितसंबंधाकरितां सार्वजनिक वैर काय म्हणून संपादावें ?

प्रजेवर झालेल्या जुलमाचा सूड घेणें ही सर्वमान्य नीती असली आणि इंग्लंडच्या राजानें सार्वभौम सत्ता हवालीं केल्यामुळें कंपनी जरी स्वतःला 'राजसत्ता' आहे असें मानीत असली तथापि **कंपनी हा एक फक्त व्यापारी संघ आहे.** प्रामाणिक व्यापार हाच मुख्य उद्देश ठेवून युद्धांतील लूट म्हणून शिवाजीचीं काय किंवा कोणाचीं काय गलबतें घेणें हें सावधगिरीनेंच केलें पाहिजे. जरी स्वतःच्या ढेळपटपणामुळें आमचें नांव बहुत बद्दू होत असलें तथापि कंपनीचा गलबतें पकडण्याचा आपल्याला थेट हुकूम नाहीं. गेल्या कित्येक वर्षें **शिवाजी** आणि **झामोरीन** यांशीं वाद चालू असतांहि त्यांच्या बाबतींत देखील तसा त्यांचा हुकूम नसून उलट त्यांच्याशीं जमवून घ्या असेंच कंपनीचें सांगणें आहे.

समजा, **बहलोलखानानें** विजापूरकरांच्या वतीनें **राजापूर** घेतलें; तथापि हें गलबत परत केल्याशिवाय **आम्हांला राजापुरांत व्यापार करतां** येईल काय ? राजापूर बंदरचें महत्त्व तितकें कमी लेखतां येणार नाहीं. कारण, कित्येक प्रकारचा माल सुरतेपेक्षां राजापुरास किमानपक्ष शेंकडा २० टक्के स्वस्ताईनें मिळेल.

कारवार इतकेंच हें बंदर महत्त्वाचें असून मुंबईच्या व्यापाराला पोषक आहे. शिवाजीला भिऊन गलबत परत दिलें असें जग म्हणेल; असा आणखी एक मुद्दा आहे. ह्याची पर्वा करावयाची का कंपनीच्या खऱ्या हिताची काळजी करावयाची ? एक तर **आपण सूड पक्का घेण्यास समर्थ नाहीं** आणि असलों तरी ही योग्य वेळहि नाहीं. आणि शिवाय कंपनीचा त्या गोष्टीला हुकूम नाहीं हें वेगळेंच.

हुकूम आधींच दिला गेला हें मोठें अडचणीचें प्रमाण नव्हे. तो सवडीप्रमाणें व सोईप्रमाणें बदलला पाहिजे. शिवाजीकडे करावयाची मागणी यामुळें आम्हीं सोडून देणार आहोंत असें नाहीं. वेळ प्रसंग पडेल त्याप्रमाणें व हात साधेल त्याप्रमाणें आपण तो प्रश्न पुढें चालवूंच.

या आणि इतर कारणांमुळें गलबत सोडून किनाऱ्यावरील व्यापाराचें पुढील बोलणें काढण्याकरितां गलबताच्या मालकाला शिवाजीकडे पाठविण्याचें ठरलें.

शिवाजीकडे गेलेल्या **नारायण शेणव्याचें** पत्र आलें. पुष्कळ खोटी होऊन तो परत यावयास निघाला होता इतक्यांत शिवाजीनें त्याला परत बोलावून सांगितलें कीं, 'वाद तोडण्यास मी तयार आहें. परंतु युद्धें चालू आहेत त्यामुळें रोकड हाताशीं नाहीं. परंतु कंपनीचा माल आपल्याला ७ ह. होनांचा मिळाला त्याची भरपाई राजापूरला वखार घातल्यावर जकातींतून करून घ्यावी. इतर इंग्रजांच्या देण्याचा विचार वखार घातल्यावर अवश्य करीन.' याबद्दलचा विचार नारायण शेणव्याच्या येण्यावर तहकूब ठेविला. [ऑर्म भा. ११४ वि. २ पृ. १४४ यांमध्यें ता. २० सप्टेंबरचें मुंबईचें सुरतेस पत्र बहुतेक याच मजकुराचें आहे.]

ओ. कॉ. भा. ३४ } (१५६४) { श. १५९५ भाद्र. शु. १५
नं. ३९५२ इ. } शिवाजी—ऑंजिअर { इ. १६७३ (आगस्ट १५ते) सप्टें. १५

भीमजी व नारायण शेणवी स्नेहाचें बोलणें करण्यासाठीं आले. राजापूरच्या तहाचेंहि काम होऊन आतां तुमच्याकडे परत पाठविले आहेत. परस्परांचा स्नेह अबाधित रहावा, यापेक्षां अधिक लिहीत नाहीं. पाठविलेल्या नजराण्याचा स्वीकार करावा. [ले. १५५४ व १५६२ वरून साधारणतः वरील तारखेची मर्यादा येईल.]

(से) फॅ. रे. सुरत, भा. १०६ } (१५६५) { श. १५९५ भाद्र. व. १४
पृ. २०४ इ. } मुंबई—सुरत { इ. १६७३ सप्टें. २९

शिवाजीचा पूर्वीचा **वकील** [भिमाजी] यास बरोबर घेऊन **नारायण शेणवी** आला आहे. राजापूरचा वाद मिटविण्याचा हुकूम घेऊन आल्याचें तो सांगतो. एकदां भेट झाली. **चाइल्ड, उस्टिक** व **डे** असे त्याच्याबरोबर बसून तो एकदां हिशेब तपासून बघणार. तो वकील त्यांच्यावर काय शेरे करितो तें पाहून कळवूं. नारायण शेणव्यानें

अशी पक्की बातमी आणली आहे कीं, **विजापूरकरांनीं शिवाजीशीं तह केला.** शिवाय **विजापूरकर व गोवळकोंडेकर** या उभयतांनीं मिळून मोंगलांशीं युद्ध चालू ठेवण्याकरितां **शिवाजीला पैशांच्या मोठ्या रकमा** दिल्या. **बहलोलखान मिरजेला** आजारी आहे. आतां मोंगल शिवाजीला कांहीं अपाय करितील हें भय अशक्य कोटींतील आहे. कारण मोंगलांची खोड मोडण्यासाठीं म्हणूनच त्यानें मोठें सैन्य उभारलें आहे. ही बातमी नारायण शेणव्याशिवाय इतरांनींहि आणिली आहे.

ओ. कॉ. भा. ३४ } नं. ३६७९ इ. }   (१५६६) मुंबईची हकीकत   { श. १५९५ भाद्र. आश्वीन { इ. १६७३ आगस्ट [आक्टो (?)]

कांहीं महिन्यांपूर्वी दक्षिणबाजूनें **काँडे डा सारजीडा** या नांवाचा एक पोर्तुगीज इसम मलबार किनाऱ्यावर आला. थोड्याच दिवसांत त्याची लबाडी उघडकीस आली. आपण फ्रेंच सरदार आहों असा बहाणा करून हा इसम **शिवाजी**बरोबर होता. इंग्रजांकडून एक घोडा थोड्या वेळापुरता घेऊन त्यानें तो **शिवाजीला** दिला. शिवाजीनें त्याला सन्मानानें वागवून आपल्या देशांतून बाहेर काढून लाविलें तेव्हां त्याच्याबरोबर एक सैन्याची तुकडी दिली !

फॅ. रे. मुंबई भा. १ } पृ. ९१-९२ इ. }   (१५६७) मुंबई कन्सलटेशन   { श. १५९५ आश्वीन शु. १ { इ. १६७३ आक्टो. १

शिवाजीच्या वकिलानें राजापूरच्या बाबतींत तडजोड ठरविण्यापूर्वी **इंग्रजांच्या हिशेबांतील चुका** दुरुस्त केल्या पाहिजेत असें सांगितल्यावरून चाइल्ड, उस्टिक व डे यांनीं आज दोनप्रहरीं त्याचें म्हणणें ऐकून घेऊन प्रेसि. व. कौ.कडे अहवाल द्यावा असें ठरलें.

फॅ. रे. मुंबई, भा. १ } पृ. ९२ इ. }   (१५६८) मुंबई कन्सलटेशन   { श. १५९५ आश्वीन शु. ३ { इ. १६७३ आक्टो. ३

सुरतेवर लुटीकरितां **हल्ला करण्याचा** शिवाजीचा बेत आहे अशी बातमी आली म्हणून सुरतेच्या रक्षणाकरितां शक्य तितकें लवकर एक गलबत पाठवावें.

(से) फॅ. रे. सुरत भा. ८८ } पृ. २५ इ. }   (१५६९) कोटकोना-सुरत   { श. १५९५ आश्वीन शु. ३ { इ. १६७३ आक्टो. ३

स्वालो या नांवाचें **इंग्रजांचें** गलबत **पोर्तुगीज** गलबतानें पकडलें. स्वालो हें बँटमहून मुंबईला येत असून त्यांत मुख्यत्वेंकरून मिरीं होतीं.

ओ. कॉ. भा. ३३ } (१५७०) { श. १५९५ आश्वीन शु. ६
नं. ३७५८ इ. } मुंबई कन्सल्टेशन { इ. १६७३ आक्टो. ६

इ. १६५९।६० मध्यें शिवाजीनें राजापूरची लूट केल्या वेळीं झालेल्या कंपनीच्या व कंपनीच्या नोकरांच्या नुकसानीबाबत शिवाजी राजाचे वकील व प्रेसिडेंट ऑंजिअर यांचेमध्यें तहप्रकरणीं झालेल्या बोलण्याचा वृत्तांत—

तहाबद्दल वाटाघाटीचा अहवाल.

शिवाजी राजानें राजापूर प्रकरणींचा वाद मिटविण्याबद्दल बोलणें केल्यामुळें प्रथम कॅप्टन **उस्टिकला** बोलण्याकरितां पाठविलें. परंतु शिवाजी कांहींहि फेड करण्याला तयार नसल्यानें त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं [पहा. ले. १४६९]. त्यानंतर शिवाजीकडून **सुंदरजी** नांवाचा वकील आला. त्यानें अगदीं थोडया फेडीचें बोलणें काढलें. तें प्रेसिडेंटला पसंत न पडून आपलें मागणें काय आहे तें कळवून त्याला परत पाठविण्यांत आलें. पुढें इ. १६७३ च्या फेब्रुवारींत शिवाजीकडून **पिलाजी** या नांवाचा वकील आला. परंतु त्या वेळीं इंग्रजांचें डचांशीं युद्ध चालू होतें; आणि अशा वेळीं केलेला तह कंपनीच्या हिताचा झाला नसता. म्हणून तहाचा प्रश्न तहकूब करण्याचीं मामुली कारणें दाखवून सामोपचाराचें पत्र देऊन पिलाजीला माघारा पाठविला [ले. १५१६]. त्यानंतर इ. १६७३ मे १९ रोजीं आमच्या मागण्या सांगण्याकरितां **टॉमस निकल्स शिवाजीकडे जाऊन** १६ जूनला परत आला. या वेळींहि तहाचें पाऊल पुढें पडलें नाहीं [कंपनीनें त्याचा वृत्तांत पहावा. ले. १५३६]. इतकें झाल्यावर जूनमध्यें शिवाजीकडून **भिमाजी** (Biminagee) पंडीत आला. त्याच्याशीं बरेच वेळां बोलणें होऊन कांहीं अंशीं तडजोड होऊं शकली. त्यानंतर शिवाजीशीं बोलणें करण्यापर्यंत पाळी आली. तेव्हां इकडून किमान मागणीची मर्यादा सांगून **नारायण शेणव्याला** भीमाजीबरोबर शिवाजीकडे पाठविला [ले. १५४९]. सप्टेंबर २४ रोजीं नारायण शेणव्याबरोबर भीमाजी परत आला. पहिल्या दिवशीं मामुली वहिवाटीप्रमाणें स्वागता पलीकडे कांहीं झालें नाहीं. तथापि 'शिवाजीकडून तहाचे संपूर्ण अधिकार घेऊन मी आलों आहें' असें त्यानें सांगितलें. मागणीच्या कांहीं कलमांबद्दल त्याच्या शंका दूर करण्यांत आल्यावर तहाबद्दल निश्चय व्हावयाचा होता. परंतु **शिवाजी मोठें सैन्य तयार करून दौरा काढण्याच्या विचारांत होता**; त्याप्रमाणें एकदां तो निघून गेल्यावर त्याची भेट मागाहून घेणें कठीण झालें असतें. म्हणून त्या वकिलाला तहाबद्दल थोडी घाईच होती. **ऑक्टोबर १ ला** हिशेबावरील शिवाजीचे आक्षेप समजून घेण्यासाठीं चर्चा झाली [ले. १५६७]. तेथें कंपनीच्या ३९९५७ होनांच्या मागणीचा तपशील सांगण्यांत आला. तो पाहून वकील थोडासा दचकून ' शिवाजीला इंग्रजांकडून प्रत्यक्ष मिळालेल्या मालमत्तेच्या किती तरी पट हा आंकडा मोठा आहे ! यांत तडजोड होणें कठीण दिसतें ! ' असें म्हणाला.

परंतु **शिवाजीनें केलेल्या यादीशीं** इंग्रजांचा तपशील कलमवार **ताडून पहा-ण्याचें अखेरीस ठरलें.** शिवाजीच्या वकिलाचें कलमवार म्हणणें खालीलप्रमाणें पडलें:-**कलम १**-गंधक, कुलपी गोळे, पितळेचीं भांडीं वगैरे वजनदार किंवा ज्वाला-ग्राही जिनसा शिवाजीनें घेतल्याच नाहींत. आणि त्या नेणें त्या वेळीं शक्यहि नव्हतें. केवळ इतके कुलपी गोळे न्यावयासच जवळ जवळ २००० मजूर लागले असते! परंतु **शिवाजीच्या पाठीवरच आदिलशाहाची फौज आल्यामुळें** लगेच राजापूर सोडून शिवाजीला आपल्या किल्ल्यांचा आश्रय करावा लागला. आणि त्यानंतर तीन महिनेपर्यंत राजापूर **आदिलशहाच्याच ताब्यांत होतें.** तीन महिन्यानंतर पुनः राजापूर शिवाजीला मिळालें तेव्हांहि त्याच्या हातास ह्या वस्तु लागल्या नाहींत.

कलम २—राजापूरच्या **व्यापाऱ्यांकडून कंपनीचें येणें होतें तें देण्याची जबबदारी शिवाजीवर मुळींच पडत नाहीं.** समजा, उद्यां हा वाद मिटल्यावर शिवाजीनें सुरत किंवा दुसरें एकादें शहर लुटलें. तर त्या शहरांत तुमचें देणे-करी असतील त्यांचें नुकसान होऊन तुमचें येणें बुडालें म्हणून ती सर्व जबाबदारी शिवाजीवर घालणार कीं काय? तुमची वखार आणि माल वांचविला जावा हें केव्हांहि मान्य आहेच. पण तुमचे देणेदार कोण आहेत याची प्रथम तुमच्याकडे यादी मागून त्यांना सांभाळीत बसणें हें अशा वेळीं कसें शक्य होईल?

कलम ३—**आदिलशहाकडून** किंवा **रुस्तुमजमाकडून** तुमचें येणें असेल तेंहि वरच्याच कारणांकरितां शिवाजीवर लादतां येणार नाहीं.

कलम ४-खाजगी इंग्रज व्यक्तींच्या नुकसानीचा आंकडा एवढा मोठा व्हावा याचें आश्चर्य वाटतें. (तुमचे दलाल हे देशी व्यापारी असून तुमच्या वखारींत रहात नसल्यामुळें त्यांच्या नुकसानीबद्दल शिवाजीवर जबाबदारी पडत नाहींच.) [वकिलानें शिवाजीची यादी सांगून] सर्वांची मिळून किंमत ४ ह. होनांच्यावर होत नाहीं असें दाखविलें. त्यावर 'हें सर्व खरें असलें आणि याबद्दलचा सर्व तपशील **एका जुन्या वहीवरून नारा-यण शेणव्यानें पाहिल्यामुळें** त्याचा शिवाजीला अनुकूल पुरावा ग्राह्य असला, तथापि शिवाजी राजानें पुरेपूर भरपाई केली पाहिजे. कारण, शिवाजीनें राजापूर लुटलें नसतें तर कंपनीचें नुकसान झालेंच नसतें.' **असें आम्हीं सांगितलें.** यावर **वकिलाचें म्हणणें** असें पडलें कीं, 'शिवाजीनें आजपर्यंत अनेक राजे, संस्थानिक व व्यापारी लोक लुटले. त्यांपैकीं कोणाचीहि त्यानें नुकसानभरपाई करून दिली नसून इंग्रजांशीं त्या तत्त्वाच्या उलट वागून भरपाई करण्याचें कारण केवळ सर्वच जण इंग्रजांना चहातात एवढेंच असून त्यांत कांहीं शिवाजीचा कोणता स्वार्थ साधणार आहे असें नाहीं. इंग्रजांच्या बेटाला लागणारे जिन्नस आपल्या मुलखांतून शिवाजी बिनहरकत देतो याचें तरी कारण हेंच आहे. इंग्रज शिवाजीला कदाचित् कांहीं मदत देऊं शकतील. परंतु **शिवाजीला त्या मद-**

तीची जरुरी नाहीं हें उघड आहे. कारण, इंग्रजांशीं हा जुनाच वाद चालू आहे. त्याच मुदतींत मोठ्या मोंगल सैन्याशीं त्याचा झगडा अव्याहत चालू असून त्यांत त्याची एकसारखी सरशीच होत आहे ! इंग्रज शिवाजीचें नुकसानच करण्यास टपून बसले तर काय मोठेंसें करतील ? तर त्याच्या मुलखांतून जाणारीं कांहीं गलबतें पकडतील ! त्याचीहि शिवाजीला पर्वा नाहीं. तथापि ५००० होनांवर तुटत असेल तर राजापूर प्रकरण मिटवून सलोखा राखण्याची शिवाजीची तयारी आहे.'

यावर युक्तिवाद करून त्याला आम्हीं उत्तर दिलें कीं, 'आमच्या आजपर्यंतच्या नरमपणाच्या वर्तनामुळें आमच्या हर्षामर्षाची पर्वा करावी असें शिवाजीला वाटत नाहीं हें शक्य आहे. तथापि त्याच्या मीठ नेणाऱ्या गलबतांची सुरक्षितता आमच्या मर्जीवर आहे हें लक्षांत ठेवावें. शिवाय त्याचीं किंवा त्याच्या राज्यांतील व्यापाऱ्यांचीं गलबतें आम्हीं धरण्याचें ठरविलेंच तर थोड्या वेळांत आमच्या नुकसानीची आम्ही भरपाई करून घेऊं हेंहि विसरूं नये. तुम्हीं दिलें हेंच शेवटचें उत्तर असेल तर शिवाजीनें ह्यापुढें ह्या बाबतींत तसदी घेण्याचें कारणच नाहीं. कारण, हें उत्तर आमच्या गव्हर्नरला सांगण्याच्या लायकीचें नाहीं. तुम्हांला व आम्हांला ज्याअर्थी ह्या प्रश्नाचा निकाल करण्याकरितां नेमिलेलें आहे त्याअर्थी **उभयतांना मान्य होईल अशी कांही योजना** काढण्यांत तुमच्या बुद्धीचा उपयोग करा.'

ऑक्टोबर ३ रोजीं दुसरी बैठक होऊन भीमाजी ७००० होनांवर आला. एवढ्यावर तडजोड होणार नाहीं असें आम्ही म्हणतांच गव्हर्नरला भेटण्याची त्यानें इच्छा प्रदर्शित केली. परंतु भरपाईची रक्कम चढविल्याशिवाय तें शक्य नाहीं असें म्हटल्यावर तो जें बोलला त्यावरून तो कांहीं चढवील अशी आमची समजूत झाली. आणि तद्दा-करितां उत्सुक असल्यामुळें आम्हींहि गव्हर्नरची भेट करविण्यासाठीं प्रयत्न करण्याचें वचन दिलें.

४ तारखेला मुंबई किल्ल्यांत गव्हर्नरनें त्याची भेट घेतली. बरेच तास पुनः पहिल्यापासून चर्चा झाल्यावर भीमाजी ९००० होनांवर आला. हे ९००० होन **७ वर्षांमध्यें जिनसांच्या रूपानें** आणि इंग्रजांनीं राजापुरास वखार घातल्यावर **जकातींतून** द्यावयाचे असें ठरलें. आणि एवढें कबूल करण्यांतच आपण हुकूमाचे पलीकडे गेल्याचें दर्शवून यापेक्षां अधिक रक्कम चढवितां येत नाहीं असें म्हणून तो थबकलाच.

शिवाजीचा हुकूम असा होता कीं, वकिलानें १००२५ होन (असमोला ?) कबूल करावें. पैकीं २५०० होन कंपनी राजापूरला आयात निर्यात व्यापार करील त्यावरील जकातींतून द्यावे. राहिलेले तीन भाग जरुरीप्रमाणें मालाच्या रूपानें भरावे-ह्यांतील एक हिस्सा राजापूरला वखार घालतांच द्यावा. दुसरा व तिसरा हिस्सा त्या दिवसा-

पासून एक एक वर्षाच्या अंतरानें द्यावा. आदिलशहा आणि रुस्तुमजमा यांच्या कर्जाची फेड व्हावी अशाकरितां शिवाजीनें शक्य ती खटपट करावी.

इतर राजापूरचे व्यापाऱ्यांनीं कंपनीचें देणें आहे त्याबद्दल, राजापूरला वखार घातल्यावर जे व्यापारी नादार झाले नसतील असे पाहून ते कंपनीचें देणें देण्यास अनुकूल होतील असें शिवाजीनें करावें. [हाच वृत्तांत फॅ. रे. मुंबई भाग १ पृ. ९५–१०० येथें सदर तारखेलाच मुंबई कन्सल्टेशन म्हणून नोंदला आहे. त्यांत शेवटचा परिच्छेद नसून त्याऐवजीं 'प्रेसिडेंटनें तहाबद्दल मतें विचारतांच सर्वांनीं सन्मान व हितसंबंध सांभाळणारा हा तह आहे अशी मान्यता देऊन **नारायण शेणव्यानें** शिवाजीकडे जाऊन तह पुरा करून आणावा; व त्यानें शिवाजीकरितां पांच सहाशें रुपयांचा नजराणा घेऊन जावा असें ठरविलें ' असा निराळा परिच्छेद आहे.]

ओ. कॉ. भा. ३४ } (१५७१) { श. १५९५ आश्वीन शु. ६
नं. ३९५१ इ. } प्रेसि० ऑंजिअर–शिवाजी { इ. १६७३ आक्टो. ६

(आपला वकील) **भीमाजी** पंडित आज [?] नारायण शेणव्याबरोबर तहाचा निकाल करण्याकरितां आला. जरी आमचें नुकसान पुष्कळ झालें असलें तरी मित्रत्वांत व्यत्यय येऊं नये म्हणूनच ७५०० होन रोख आणि २५०० होन राजापूर जकातींतून फेडावयाचे; अशी फक्त १० हजार होनांवरच तोड करण्याविरुद्ध आम्ही जात नाहीं. भीमाजीनें ठरविलेल्या इतर कलमांबद्दल आणि पुढें काम निघेल त्या बाबतींत उभयतांचा सलोखा राखण्यांत आमच्याकडून कसूर होणार नाहीं. नारायण शेणवी हें पत्र घेऊन जाईल. त्याचेबरोबर तुमच्याकरितां एक अरबी घोडा व इतर नोकरांकरितां वस्तु नजर पाठविल्या आहेत. [ले. १५७० वरून ही तारीख संभवनीय वाटते.]

फॅ. रे. सुरत भा. ३ } (१५७२) { श. १५९५ आश्वीन शु. ७
पृ. ३८ (तृ. सं.) इ. } **सुरत** आणि **शिवाजी** { इ. १६७३ आक्टो. ७

सुरत कन्सल्टेशन– **सुरतेस शिवाजीचें सैन्य** येण्याची हूल उठली. आणि सुभेदाराचे हुकमानें शहरचे दरवाजे बंद करण्यांत आले. प्रसंग पडल्यास आमच्या रक्षणाकरितां एक गलबत अन्नाची महिनाभराची तरतूद करून तयार ठेविलें.

ओ. कॉ. भा. ३४ नं. ३७७९ ता. २० **आक्टोबरच्या** मुंबईच्या हकीकतींत हीच बातमी आहे–सुभेदारानें फक्त एकच दरवाजा वगळून बाकीचे बंद करून ठेविले आणि शत्रूचे भक्ष्यस्थानीं पडण्याकरितांच जणुं सर्व व्यापाऱ्यांना शहरांत कोंडून ठेविलें.

फॅ. रे. मुंबई भा. १ पृ. १०२ तारीख सदर–मुंबई कन्सल्टेशन— 'चौल आणि इतर ठिकाणाहून **शिवाजी सुरतेलाच निघाल्याची बातमी आल्यामुळें** सुरतेच्या रक्षणाकरितां हंटर गलबत पाठवावें. व जरूर नसल्यास सुरतकरांनीं तें परत पाठवावें.'

फॅ. रे. मुंबई भा. ६ } (१५७३) { श. १५९५ आश्वीन शु. ७
पृ. १५६ इ. } मुंबई—मच्छलिपट्टण { इ. १६७३ आक्टो. ७

[या पत्रांत शिवाजीशीं तह; मोंगल, विजापूरकर आणि शिवाजी यांचे परस्पर संबंध यांचें ले. १५६५ प्रमाणें वर्णन आहे. व शिवाय पुढील माहिती आहे.] मोंगलांचें सैन्य **येत्या उन्हाळ्यांत** (Summer) शिवाजीच्या मुलखांत शिरेल असें लोक बोलतात. त्याला तोंड देण्याची तयारी शिवाजी करीत आहे. विजापूरकरांशीं युद्धाचा बहाणा चालू आहे.... **पोर्तुगीज लोक** शांतपणें आपला व्यापार किफायतीनें करीत आहेत [ऑर्म. हस्त. भा. ११४].

ओ. कॉ. भा. ३४ } (१५७४) { श. १५९५ आश्वीन शु. ८
नं. ३७७९ इ. } मुंबईकडील हकीकत { इ. १६७३ आक्टो. ८

राजापूरचे संबंधांतील **शिवाजीशीं** चाललेल्या **वादाचा निकाल** एका अर्थानें आमचा मान राहून, आम्हाला किफायतशीर आणि आमच्या लौकिकाला शोभेल असा लागला. आतां अल्प काळांत शिवाजीच्या मुलखापासून कंपनीच्या व्यापाराला बरकत येईल असें म्हणण्यास हरकत नाहीं. आदिलशहा व शिवाजी यांच्यांत **तहाची वाटा-घाट** चालू असल्याची बातमी चौल व इतर ठिकाणांहून आली. शिवाजीनें मोठें सैन्य उभारून **मोगल व बहलोलखान** या उभयतांना आतांपर्यंत चांगलेंच तोंड दिलें. विजापूर व गोवळकोंडा यांच्याकडून **शिवाजीला गुप्तपणें पैसा आणि सैन्य** यांचा पुरवठा होतो. मोंगलांचा सेनापती आणि पथके सरदार यांना **शिवाजीनें द्रव्य चारून** अनुकूल केल्यामुळें या वर्षी मोंगल देखील मोठी लढाई देतील असें वाटत नाहीं. तथापि शिवाजीची जंगी तयारी पाहून तो कोणाशीं तरी तोंड देण्याची अगर आपण होऊन बादशाही मुलखांत हल्ला चढविण्याची अपेक्षा करीत असावा असें वाटतें. बादशाही खर्चावर उमराव लोक हें **युद्ध मुत्सद्देगिरीनें** चालू ठेवतात ! शिवाजीचा पुरा नाश करण्याचा त्यांचा केव्हांच इरादा नाहीं. तसें करण्यांत कांहींच फायदा नाहीं ! कारण युद्धें संपल्यावर **शांततेच्या काळांत त्यांची तुंबडी कशी भरेल** ?

ऑर्म भा. ११४ } (१५७५) { श. १५९५ आश्वीन शु. १२
वि. २ पृ. १६२ इ. } मुंबई–सुरत. { इ. १६७३ आक्टो. १२

सिद्दीच्या आरमारानें आपल्या लीलांनीं आम्हांला चकित केलें ! पैगंबराच्या आणि कुराणाच्या घेतलेल्या सर्व शपथा बाजूला ठेवून, त्यानें जबरदस्तीनें कारंजा, नागोठणा, पेण ह्या बाजूच्या खाडींत प्रवेश करून **नाकेबंदी केल्यामुळें** मुंबई बेटाला फार हलाखीचे दिवस आले.... **शिवाजी** किंवा दुसऱ्या कोणाहि लबाड माणसापेक्षां **सिद्दी** अधिक नीच, कृतघ्न आणि दुष्ट शत्रू आहे. त्याला रसद मिळवून देण्याचें

बाबतींत या बेटाचे त्याच्यावर इतके उपकार झाले आहेत असें असूनहि ज्या अर्थी त्यानें बेटांतील आयात बंद केली त्या अर्थी **शिवाजीपेक्षां** आमच्याच राशीला अधिक बसावें असा त्याचा उद्देश दिसतो ! आम्हांला रसदीचा तोटा आल्यामुळें आम्हीं त्याच्या होड्यांना मुंबईत येण्याची बंदी केली. याबद्दल तक्रारी होऊन सुरतेचा सुभेदार तुम्हांला घालवून देण्याची धमकी देईल तर आपण एका पायावर तयार असल्याचें सांगा....

डाग रजिस्टर १६७३ पृ. ३०० इ. आक्टो. २३ न्यू. (१५७६) श. १५९५ आश्वीन शु. १३ इ. १६७३ आक्टो. १३

पोपट नाईक बनिया, वेंगुर्लो—ग० ज० हिंदुस्थान. (पोर्तुगीजावरून भाषांतर)

माझें सर्व वित्त, जीवित आणि कुटुंब धोक्यांत घालून आपली सेवा केली......
शिवाजीच्या त्रासामुळें मला वेंगुर्लो सोडावें लागलें. पोर्तु० व शिवाजी यांनीं माझीं २ गलबतें पकडलीं.

स. पृ. १२२ ले. १५ सु. १०७४ रजब १५ (१५७७) महजर श. १५९५ आश्वीन व. १ इ. १६७३ आक्टो. १६

शिवाजीचें लष्कर हावसबावीसी जातां वेळे कागनेलास आग लावून गेलें तेव्हां गुरुनाथभट जोसी याचे घर व कागद जळाले.

ऑर्म भा. ११४ वि. २ पृ. १६४ इ. (१५७८) मुंबई–सुरत (?) श. १५९५ आश्वीन व. १ इ. १६७३ आक्टो. १६

बादशाही मुलुखांतील एकादे भागाची लूट करण्याची तयारी शिवाजी करीत आहे. २० हजार पिशव्या त्यानें लूट आणण्याकरितां तयार करविल्या आहेत. आणि शीघ्रगामी सैन्याचीहि त्यानें उभारणी केली आहे. त्याच्या **नजरेसमोर सुरतच** असण्याचा बराच संभव आहे असें वाटतें.

ऑर्म भा. ११४ वि. २ पृ. १६६ इ. (१५७९) मुंबई–सुरत श. १५९५ आश्वीन व. २ इ. १६७३ आक्टो. १७

सिद्दी संबूळ कारंजाच्या खाडींत बंदी करून या वर्षभर तसाच राहणार असें दिसतें. खाडीच्या तोंडांतील लहान बेटावर त्यानें किल्ला बांधला तर मुंबईला मोठा धोका बसेल. याकरितां आम्हीं शांतपणें हा अपमान सहन करणें इष्ट नाहीं....तुम्ही (सुरत सोडून) येथें फक्त १० दिवस येऊन राहिलां असतां, तर या **नालायक सिद्याला** त्याच्या ठिकाणांतून काढून मुंबईतून पार हाकून लावलें असतें. आणि मग हल्लींपेक्षां अधिक मानानें आणि अधिक सुरक्षितपणें तुम्हांला सुरतेंत परत पोंचविलें असतें !...जरी सुभेदार संतप्त होऊन बेफाम झाला तथापि तेथील **व्यापाऱ्यांचा तुमच्यावर लोभ** असल्यामुळें ते तुम्हांला सुरत सोडूं देणार नाहींत.

(दि) ओ. कॉ. नं. ३८७० इ. (१५८०) मुंबई–सुरत. श. १५९५ आश्वीन व. ८ इ. १६७३ आक्टो. २३

दोन दिवसांपूर्वी शिवाजीचें सैन्य सुरतेला गेल्याची बातमी आली. तेव्हां हंटर गलबत सुरतेला पाठविण्याची तयारी केली. परंतु गुप्त हेरांकडून त्याचें सैन्य अद्यापि **महाड** जवळ असल्याची खबर कळल्यामुळें तूर्त हंटर येथेंच ठेवून पुनः तशी कांहीं खबर मिळतांच तें तत्काल रवाना करण्याच्या तयारीनें राहिलों आहोंत. **आणखी एक दोन महिने** शिवाजी इकडे गुंतून राहील असें दिसत असलें तथापि तुम्हीं आपला माल स्वालीकडे न्यावा हें चांगलें. सिद्यानें शिवाजीच्या मुलखांतील **गांवें जाळून** फारच दुष्टपणा केल्यामुळें चिडून जाऊन शिवाजी सुरतेवर किंवा अन्य कोणत्या तरी शहरावर त्याचा सूड उगवील हें खचित आहे. तुमच्या सूचनेप्रमाणें **शिवाजीवर गुप्त हेर** ठेविले आहेत. शिवाजीचे बेत अत्यंत गुप्त ठेविले जातात; आणि त्याच्या सैन्याचा तळ कोठेंच ठरत नसून कोणालाच कळल्याशिवाय केव्हांच दत्त म्हणून तो अचानक छापा घालतो; यामुळें हेरांनीं आणलेल्या बातमींवर कितपत विसंबून रहावें हें आम्हांला समजत नाहीं.

राजापूर व हुबळी या दोन्ही लुटींच्या बाबतींत शिवाजीकडून समाधानकारक निकाल लावून घेण्याची आमची आशा आहे. जर शिवाजी कोणत्या राष्ट्राबद्दल **स्नेह** बाळगीत असेल तर तो **इंग्रजांबद्दल** होय. आणि यामुळें सुरतेवर हल्ला झाला तथापि इंग्रजांच्या वखारीला तो तोशीस देणार नाहीं. परंतु इंग्रज वखारींत त्याला कांहीं मिळाल्यास त्याची भरपाई करण्याबद्दल मात्र आपल्याला बांधून घेण्यास तो तयार नाहीं! ओ. कॉ. ३८७१ ऱ्या याच तारखेच्या दुसऱ्या एका सुरतेस पाठविलेल्या पत्रांत **'सिद्दी** अलीकडे स्तब्ध आहे. परंतु नीचपणानें त्यानें आमच्या विरुद्ध तक्रारी केल्याचें कळतें. तरी तुम्हीं सुभेदाराची समजूत घालावी. वास्तविक सिद्दीनेंच येथें गुरें चारणें व अन्य तऱ्हेनें गरीब लोकांना सतावणें असे अत्याचार केले. आणि स्वतःचें त्यांच्या अत्याचारापासून रक्षण करणें किंवा दुष्काळ पडूं नये म्हणून खबरदारी घेणें याच्या पलीकडे आम्हीं कांहींच केलें नाहीं!' असा मजकूर आहे.

ओ. कॉ. भा. ३४ नं. ३८७२ इ. (१५८१) मुंबई–कंपनी श. १५९५ आश्वीन व. ८ इ. १६७३ आक्टो. २३

कारवारला बंड चालू असल्यामुळें तेथील परिस्थिती पूर्ववत् बिकट असून तेथील वखार व व्यापार बंद आहे. मुंबईला सर्व शांतता आहे. तथापि, [**सिद्दी**बद्दल तक्रार आहे]. सुरत किंवा बंगाल इकडील व्यापाराला आमच्या कृत्यानें धोका येईल असें वाटलें नसतें तर सिद्दीला आम्हीं पक्का पायबंद घातला असता. कारण मुंबईची वाढ

होऊं नये म्हणूनच सुरतेच्या सुमेदारानें त्याला चिथावलें असावें. तरी सर्व बंदरांवर तुमचा हक्क आहे हें लक्षांत घेऊन कायती आज्ञा द्या. लढाऊ गलबतांना त्यांत राहूं देऊन आपला व्यापार धोक्यांत येतो. **कारंजा व साष्टी** यांचें स्वामित्व **पोर्तुगीजांकडे** आहे. त्यामुळें या बंदरावर आपला कांहीं हक्क ते सांगत असले तथापि इंग्रजांच्या द्वेषानें नागोठण्याजवळ सिद्दी जो किल्ला बांधीत आहे त्याला ते विरोध करणार नाहींत. डचांशीं चालू असलेलें युद्ध आणि मोंगली मुलखांत आमची वखार असल्यामुळें आमचा अडकलेला हात लक्षांत घेऊन आम्हीं आतां कांहींच प्रतिकार करूं शकत नाहीं. तथापि आमची मुख्य अडचण तुमचा तसा हुकूम नाहीं ही आहे. आम्हांला हुकूम दिला तर आम्हीं त्याचा दुरुपयोग करणार नाहीं ही खात्री बाळगावी. जशीं निष्कारण भांडणें उकरून काढणें हें अनिष्ट असतें तसेंच अपमान मुकाट्यानें सहन करणें हें हि अनिष्ट असतें.

शिवाजी आमच्याशीं सलोख्यानें वागतो. आम्हींहि (उघडपणें नाहीं तथापि) त्याच्याशीं स्नेह ठेविला आहे. शिवाजीच्या तहाबद्दल नंतर कळवूं. हा तह चांगला झाला असून शिवाजीच्या मुलखापासून आम्हांला किफायत होईल अशी उमेद आहे.

[दि.]—आमच्या मनांत अशी उत्कट इच्छा आहे कीं, मुंबईतील आणि शेजारच्या बेटांतील सर्व क्रिस्ती लोकांनीं **इंग्लंडमध्येंच बनविलेल्या कापडाचीं वस्त्रें वापरावीं.** आमचा माल स्वस्त विकून लोकप्रिय करण्याची आम्हांला आशा आहे. युद्धाची धामधूम चालू नसती तर शेजारच्या राजांनीं आपल्या शिपायांना त्याच रंगाचे कपडे द्यावे अशी खटपट यशस्वी झाली असती.

फॅ. रे. सुरत, भा. ३ } (१५८२) { श. १५९५ आश्वीन व. ११
पृ. ४० (तृ. सं.)इ. } सुरत कन्सल्टेशन { इ. १६७३ आक्टो. २५

मुंबईचा प्रेसिडेंट व कौन्सिल यांचें पत्र १७ तारखेचें आलें. त्यावरून सिद्याबद्दल हकीकत कळली. सलोख्यानें नच जमेल तर मग दंडाचा अवलंब करावा. आम्ही काय होईल तें शांतपणें सहन करूं. मध्यंतरीं सिद्दीच्या ह्या अव्यापारेषु व्यापाराबद्दल बहादुरखान व दिलेरखान यांच्याकडे तक्रार करून हुकूम आणवावा. त्याच्या बाबतींत प्रेसिडेंटनें यथील कौन्सिलचा सल्ला विचारिला आहे. त्याबद्दल विचार करितां दोन मुद्दे दिसतात. (१) मुंबई बेटाचा व्यापार आणि लोक ह्यांची सुरक्षितता आणि भरभराट या दृष्टीनें ह्या गोष्टीचा विचार होईल किंवा (२) मोंगलांच्या मुलखांतील व्यापार राखण्याच्या दृष्टीनें विचार करावा लागेल....सिद्दी तेथें राहून व्यापारांत अडथळा करूं लागला तर लोकांची उपासमार होऊन लोक सोडून जातील; कंपनीचें उत्पन्न कमी होईल; आणि कंपनीला बेटाचें रक्षण करणें हा आंतबट्ट्याचा कारभार होऊन बसेल. म्हणून निर्वाणीचा विचार करावयाचा तर

हिंदुस्थानांतील इतर भागांमधील व्यापारापेक्षां बेटाचे सुरक्षिततेला अधिकच महत्व दिलें पाहिजे. तेव्हां प्रथम मन वळविणें, आर्जव इत्यादि उपाय करून पहावे.

ओ. कॉ. भा. ३४ } नं. ३८७४ इ. (१५८३) सुरत-मुंबई. { श. १५९५ आश्वीन व. ११ इ. १६७३ आक्टो. २५

विजापूरकर शिवाजीविरुद्ध पाठविलेलें आपलें सैन्य काढून घेतील असेंच आम्हांला वाटतें. [कारणांकरितां पहा. ले. १५६५ व १५७४] परंतु आमच्या व्यापाराच्या बचावाकरितां आणि ह्या देशांत आम्हांला शांततेनें रहावयास मिळावें म्हणून विजापूरकरांनीं तसें करूं नये आणि आम्हांला उपद्रव करण्याचीं साधनें शिवाजीच्या हातीं येऊं नयेत अशी आमची फार इच्छा आहे....शिवाजीबद्दल येथें भीती वाटत होती. परंतु त्याचें सैन्य विजापूरकरांच्या मुलखांत गेल्यामुळें (अशी आमची समजूत आहे) सर्व शांत आहे.

ओ. कॉ. भा. ३४ } नं. ३८७९ इ. (१५८४) मुंबई-सुरत { श. १५९५ कार्तिक शु. १ इ. १६७३ ऑक्टो. ३०

तुमच्या बेटावरील **सिद्दीच्या वाकनवीसानें** तुमच्या विरुद्ध तक्रार करण्याकरितां येथील सुभेदाराकडे अनेक वांके पाठविले आहेत. मुंबईंत त्यानें खरेदी करून ठेवलेले गहूं त्याला तुम्ही नेऊं न देतां त्याच्या होड्या रिकाम्या परत गेल्या; **शिवाजी हा मोंगलांचा शत्रू** असून शेणव्याकडून तुम्ही त्याला नजराणा पाठविला; इत्यादि तक्रारी ज्यांत आहेत त्या वाक्याच्या नकला तुमच्याकडे पाठविल्या आहेत. येथील सुभेदारानें तुम्हीं सिद्दीशीं सामोपचारानें वागावें असें तुम्हांला कळविण्यास सांगितलें आहे.

ओ. कॉ. भा. ३४ } नं. ३७७९ इ. (१५८५) मुंबईची हकीकत. { श. १५९५ कार्तीक शु. २ इ. १६७३ आक्टो. ३१

सिद्याचे कांहीं लोक शिवाजीच्या मुलखांतील **भातांचीं** उभीं **शेतें कापून नेत असतां** शिवाजीच्या शिपायांनीं त्यांच्यावर अचानक छापा घालून सुमारें शंभर जणांना यमसदनाला पाठविलें व त्यांतील कित्येक बड्या लोकांचीं **शिरें शिवाजीकडे नेलीं.**

(दि.) ओ. कॉ. } नं. ३८८१ इ. (१५८६) मुंबई-सुरत { श. १५९५ कार्तीक शु. ९ इ. १६७३ आक्टो. ३१

शिवाजीच्या सैन्याकडून तुमच्याकडील भागाला कांहीं वेळ तरी तोशीस पोंचणार नाहीं अशी आमची समजूत आहे. कारण, आम्हाला असें खात्रीलायक कळलें आहे

कीं, शिवाजी जातीनें १५००० सैन्य बरोबर घेऊन **गोव्यानजीकचा फोंडा** (Panda ऑर्म) या नांवाचा किल्ला विजापूरकरांपासून जिंकून घेण्याकरतां गेला आहे. **कर्नाटकामध्यें** यादवी उत्पन्न होऊन मरहूम राजाच्या **विधवेनें** मोठा खजीना देण्याचें वचन देऊन त्याची मदत मागितल्यामुळें, तो प्रांत (साधल्यास) जिंकण्याचा त्याचा विचार आहे.

दख्खनच्या किनाऱ्यावरील हल्ल्यांत आणि नागोठण्याच्या नाकेबंदीच्या बाबतींत, शिवाजीनें ३०० लोकांनिशी बंदोबस्त केल्यामुळें, **सिद्दीसंबूलची फजीती** होऊन आतां तो आमच्याशीं स्नेह जोडूं पाहात आहे. आमच्या विरुद्ध त्याच्या तक्रारींचें निराकरण करण्याकरितां आग्र्याचा **टॉमस रोच** याला प्रेसिडेंटनें पत्र लिहिलें. **बादशहालाहि** उत्तम कारकुनाकडून **एक अर्जदास्त** लिहवून सिद्दी आपल्या वर्तनानें बादशहाला कसें लांच्छन आणितो आणि स्वतःला कोणतेंहि यश मिळालें नसतां बादशहाला कसें फुगवून सांगतो हें बादशहाला कळविण्याचा इरादा आहे (पहा ले. १५९०). तुम्ही सिद्दीला बंदराबाहेर लावण्याकरितां नजराणा वगैरे द्यावा असें सुचविलें तें प्रेसिडेंटला पसंत नाहीं. तसें केल्यानें असा नजराणा ही वार्षिक खंडणीची बाब होऊन बसून बंदरावरील कंपनीच्या स्वामित्वाला बाध येईल. त्यापेक्षां सुरतेचा सुभेदार **घास्तीखान** यालाच नजराणा देऊन सिद्दीला कडक हुकूम देववावा हें अधिक चांगलें. (आर्म ११४-२ पृ. १८७).

•

ओ. कॉ. भा. ३४ नं. ३७९४ इ.	(१५८७) सुरत-इराण	श. १५९५ कार्तीक शु. ३ इ. १६७३ नोवें. १

हिंदुस्थानांतील हकीकत—शिवाजीनें विजापूरच्या मुलखांत शिरून (आदिलशहा या वर्षी वारला, १६७२ नों. २४; श. १५९४ मार्ग शु. १५) अनेक किल्ले व हुबळी इत्यादि अनेक ठिकाणें घेतलीं व लुटलीं. कारवारच्या वखारीचा सर्व माल व खरेदी-विक्री करण्याची **आमची बाजारपेठ** हुबळीला होती. तेथें कंपनीचे सुमारें ३५०० पौंडांचें नुकसान झालें. हा हल्ला केल्यामुळें विजापूरच्या राजानें शिवाजीवर मोठें सैन्य रवाना केलें. आणि ह्या बाजूला मोंगलांचें सैन्य आहेच. शिवाजीनें चांगलें सैन्य उभारून आपल्या राज्यांत शिरण्याच्या मार्गांची उत्तम नाकेबंदी केली असल्याकारणानें दोन्ही शत्रूंशीं युद्ध देण्याची त्याची चांगलीच तयारी आहे. **शिवाजी** आहे म्हणूनच मोंगलांची वक्रदृष्टी आपल्याकडे वळत नाहीं हें विजापूरकरांना पक्कें माहीत असल्यामुळें शिवाजीचा नाश करण्यांत त्यांचा फायदा नाहीं. तेव्हां त्यांचें सैन्य परत जाईल असें वाटतें. अशा रीतीनें शिवाजी अडचणींत सांपडला असतांनाहि, सुरतेपासून ६० मैलांवर त्याचें एखादें सैन्य आल्याची बातमी येतांच शहरांत भीती पसरून लोक पळण्यास तयार होतात! गेल्या महिन्यांत असे पळून जाणारे लोक थांबविण्याकरितां शहरचे दरवाजे बंद करावे लागले. पहा

ले.१५७२, ऑक्टो .७. [शब्दशः याच मजकुराचें पत्र फॅ. रे. सुरत भा. ८७ पृ. ५४ वर आहे. यांत इ. १६७३ मे ते नोवेंबरची हकीकत दिली आहे. ओ. कॉ.]

फॅ. रे. सुरत भा. ३ पृ. ४२ (तृ. सं.) इ. | (१५८८) मॅथ्यूमे (स्वाली)-सुरत | श. १५९५ कार्तीक शु. ८ इ. १६७३ नोवें. ६

(हंटर बोटीच्या कप्तानास पत्र)- सुरतेला स्वस्थता आहे. आतां **बादशहाचीं दोन** लढाऊ **गलबतें** आणि इतर लहान तरांडीं तुमच्या (मुंबई) बंदरांतील **सिद्दीच्या आरमाराला मिळण्याकरितां** जात आहेत. अशा वेळीं मुंबईला सैन्याची आवश्यकता जाणून आम्हीं फक्त २ पथकें येथें ठेवून बाकीचें सैन्य मुंबईकडे परत करीत आहोंत. तें घेऊन जावें. वाटेंत बादशाही आरमार भेटल्यास त्याच्याशीं गोडीनें वागावें. ६ गलबतें व ४० गुराब असें **शिवाजीचें आरमार** बाहेर येत आहे अशी बातमी आहे. तरी त्यांनीं प्रथम कुरापत काढल्याशिवाय त्यांच्याशींहि हातघाईस येऊं नये.

(स) फॅ. रे. सुरत भा. ८७ पृ. १३ इ. | (१५८९) स्वालीमरीन-मुंबई | श. १५९५ कार्तीक शु. ८ इ. १६७३ नोवें. ६

फ्रेंचांनीं एक गलबत राजापुराकडे पाठविलें आहे. त्यांत २००० मण शिसें व ८८ लोखंडाच्या तोफा आहेत. त्या सुमारें ३ ते १७ पौंड वजनाच्या (गोळ्यांच्या ?) आहेत. [(प) सदर पृ. ७४-७५; १६७४ जाने. १२ सुरत-कंपनी] — **२५ ऑगस्ट [१६७३] रोजीं** हें सुरतेला आलें व राजापूरकडे गुप्तपणें रवाना झालें.

फॅ. रे. मुंबई, भा. ६ पृ. २५१-२ इ. | (१५९०) मुंबई-टॉमस रोच, आग्रा. | श. १५९५ कार्तीक शु. ८ इ. १६७३ नोवें. ७

सिद्दी संबूळचें बादशाही आरमार गेल्या पावसाळ्यांत येथें होतें. त्याचें जमीन व पाणी या दोन्ही बाजूंनीं शिवाजीपासून मीं आपलेपणानें रक्षण केलें. कारण तें जाळण्याचा शिवाजीचा फार हेतु होता. गेल्या **ऑगस्ट अखेर** तीं गलबतें दंडाराजपुरीला जाऊन महिन्यानें परत आलीं. आणि पूर्वींचे दारूगोळा, माणसें व अन्न सामुग्री पुरविल्याचे उपकार न स्मरून किनाऱ्यावरून बेटावर येणाऱ्या मालाची त्यांनीं बंदी केली. त्यामुळें त्यांना बेटावरून सामान देण्याचें आम्हीं नाकारलें. शिवाय, त्या लोकांनीं गुरें चोरण्याचा आणि बेटावरील घरें लुटण्याचा अत्याचार केल्यामुळें त्यांना बेटावर येण्याचीहि बंदी केली. ह्यामुळें सिद्दी संबूळनें आमच्याविरुद्ध अनेक खोटयानाटया गोष्टी लिहून **बहादरखान** व **सुरतेचा सुभेदार** यांच्याकडे तक्रारी केल्या आहेत. बादशाही हितसंबंधाला विरोध करून त्याचा शत्रू शिवाजी याला मी मदत करतों असें खोटेंच भासविण्याचा त्यानें प्रयत्न केला. शिवाजी लुटारू आहे. त्यानें नुकतेंच दख्खनमधील

सधन शहर (हुबळी) लुटून कंपनीचें नुकसान केलें आहे. त्याचा पुरा मोड होऊन नायनाट व्हावा अशी माझी इच्छा आहे. म्हणूनच जरी फ्रेंच, डच, पोर्तुगीज इत्यादि ख्रिस्ती राष्ट्रांच्या बखारी शिवाजीच्या मुलखांत आहेत, व त्यांचा त्याच्याशीं व्यापार चालतो; तथापि आमचें व **शिवाजीचें बरें नसल्यामुळें** आमची त्याच्या मुलखांत बखार नाहीं ! यावरूनच आमचे दोस्त असें जें बादशाही सैन्य त्याच्याविरुद्ध शिवाजीला आम्हीं मदत करूं न करूं याचा विचार करावा. वास्तविक सिद्दी संबूळनें शिवाजीविरुद्ध कारवाई करण्याचें वचन देऊन इतका पैसा खाल्ला आहे आणि आजपर्यंत तो कांहीं करूं शकला नाहीं यामुळें त्याला असलीं कुभांडें रचण्याशिवाय गत्यंतर नाहीं. **बादशहा** आणि **बहादूरखान** यांच्यापाशीं आपली पत राखण्याकरितां 'शिवाजीचीं अनेक शहरें आपण जाळलीं व कित्येक लोक ठार मारले' असें सिद्दी संबूळनें खोटेंच कळविलें आहे असें मी ऐकतों. खरें पाहिलें तर, सिद्दीचाच पराजय होऊन त्याचे बरेच लोक मारले गेले. जास्तींत जास्त त्यानें शिवाजीविरुद्ध काय केलें असेल तर किनाऱ्यावर कोळी वगैरे हलक्या लोकांचीं कारवीचीं घरें (काजाणू cajahn) जाळून कांहीं कैदी धरून आणून गुलाम म्हणून विकले ! **शिवाजी** साधा इसम नसून तो मोठा चलाख आणि धोरणी योद्धा आहे. तो मोठ्या चिकाटीनें आणि सावधगिरीनें लढतो, तो सरळ तोंड क्वचित्च देतो. परंतु सर्व प्रकारच्या युक्त्या योजून असे छापे घालतो कीं त्यांत सिद्दीचीं बरींच माणसें जाया होतात. यामुळें **शिवाजीचें थोडेंसें सैन्य तरी जेथें असतें तेथें सिद्दीची डाळच शिजत नाहीं.**

सा. ले. १०८ सु. १०७४ साबान १०	(१५९१)	श. १५९५ कार्तिक शु. ११ इ. १६७३ नोव्हें. १०

अजर० रा. जिजाआऊ सो – कार. देशमू० देशकु० कर्याती मावळः- कोंढे वगैरे ४ गांवांचा कुलकर्णी रंगभट ठकार दुष्काळांत परागंदा जाला. त्याची आई व बायको यांचें पालन पुण्याचा बिनायक भट ठकार यानें केलें. त्याबद्दल त्यास रंगभटाची सर्व वृत्ती मिळाली आहे; ती त्याचे दुमाला करणें.

ऑर्म ११४ वि. २ पृ. २०६ इ..	(१५९२) मुंबई–सुरत	श. १५९५ कार्तिक शु.१४ इ. १६७३ नोव्हें. १३

सिद्यानें तक्रारी केल्या असतांना सुभेदाराचें आमच्याबद्दल इतकें चांगलें मन आहे हें वाचून आनंद झाला. आतां बंदरांत असलेल्या बादशहाच्या दोन गलबतांना आम्हीं चांगलें वागविलें हें पाहून **बादशहाविषयीं आमचे मनांत पूज्यबुद्धि** आहे हें त्याला दिसून येईल......फ्रेंचांनीं जर इतक्या तोफा आणि इतकें शिसें (गोळे) राजापूरला पाठविले असतील, तर शिवाजीला सिद्याविरुद्ध चांगलें आरमार

सज्ज करण्यास बरें पडेल. कारण त्याला फक्त तोफाच पाहिजे होत्या. त्याबद्दल त्यानें आमच्याकडे मागणी केली. परंतु आमच्याजवळ पुष्कळ तोफा असूनहि आम्हीं तुमच्या सुरतेंतील हितसंबंधांकडे लक्ष देऊन तोफा दिल्या नाहींत.

सा. ले. ३८९ फ. १०८३ } (१५९३) { श. १५९५ कार्तीक व. ४
सु. १०७४ साबान १७ } फर्मान { इ. १६७३ नोवें. १७

फर्मान हु०–बजा, आमिल० देसा० मामले गोवाः— दुलबा परताबराव सरदे० यांस कर्या०–देसकतीची मिरास दिली आहे ती त्याजकडे चालविणें.

फॅ. रे. संकीर्ण भा. २ } (१५९४) { श. १५९५ कार्तीक व. १४
पृ. १४९ इ. } मुंबई कन्सल्टेशन. { इ. १६७३ नोवें. २७

दूलम (Dulam?)ला फिनिक्स गलबत (ketch) घेऊन जाऊन तेथून लाकूड सामान आणणारे लहान पडाव मलबारी चांचे, **शिवाजी** आणि सिद्दी यांच्या हल्ल्या-पासून सुरक्षितपणें बचावून आणावे अशी मि. नॉरग्रेव्ह याला आज्ञा.

फॅ. रे. मुंबई भा. ६. } (१५९५) { श. १५९५ कार्तीक मार्ग. व. २
पृ. २२४–५ इ. } मुंबई–कंपनी { इ. १६७३ नोवेंबर-व डिसें. १५

तांबें आणि कथील ह्यांच्या व्यवहारांत मुंबईची टांकसाळ किफायतशीर होईल. चाचीनहून परत आलेलें थोडेंसें कथील शिल्लक होतें. त्याचे प्रेसिडेंटनें **बग्रूक (टिनी)** पाडून घेतले. त्यांतील बहुतेक या बेटांतच खपून लोकांची फार सोय झाली. राहिले ते **चौल** आणि **शिवाजीच्या मुलखांत** फारच किफायतीनें दिले. दरमणीं २५ रु. नफा झाला. १८ रु. च्यावर एक पै मिळेल अशी त्याची अपेक्षा नव्हती.

(से.) फॅ. रे. सुरत भा. ८७ } (१५९६) { श. १५९५ मार्ग. शु. ४
पृ. ४३ इ. } सुरत–फोर्ट सेंट जॉर्ज. { इ. १६७३ डिसें. २

ब्रूस्टर नांवाच्या तरुण इसमाचे मुंबईहून राजापुरास जाणाऱ्या एका गलबताला गोव्याहून येणारीं **शिवाजीचीं चार गलबतें** भेटलीं. त्यांनीं **इंग्रजांचीं** ७ गलबतें गोव्याच्या नस्ताशीं असल्याचें सांगितलें.

सं. २० ले. १३२ } (१५९७) { श. १५९५ मार्ग. शु. ९
सु. १०७४ रम ८ } मिसेली फा. मु. मज. सी. { इ. १६७३ डिसें. ७

अज दि. पर. वाई——ता मोक. मौ. पसरणी.

नरसीभट बिन रंगभट चित्राव यांस सिद्धनाथवाडीची नीम चावर जमीन इतर हक्कासह इनाम आहे ती त्याजकडे पूर्वीप्रमाणें चालविणें.

खं. २० ले. १३३ } (१५९८) { श. १५९५ मार्ग. शु. ९
सु. १०७४ रम ८ } मिसेली फा. मु. मज. सी. { इ. १६७३ डिसें. ७

अज दि. पर. वाई——ताा मोक. मौ. गोवे वगैरे.

नरसीभट बिन रंगभट चित्राव यांस गोवे वगैरे गांवी १० होन सादिलवार आहे. तरी पूर्वीप्रमाणें आदा करीत जाणें.

खं २० ले. १३४ } (१५९९) { श. १५९५ मार्ग. शु. ९
सु. १०७४ रम ८ } मिसेली फा. मु. मज. सी. { इ. १६७३ डिसें. ७

अज दि. पर. वाई—ताा मोक. कसबे वाई.

वाई येथील गिरमाजी त्रिंबक यास वाई येथें एक चावर जमीन इनाम आहे. तरी ती पूर्वीप्रमाणें चालू ठेवणें.

खं. २० ले. १३५ } (१६००) { श. १५९५ मार्ग. शु. ९
सु. १०७४ रम ८ } मिसेली फा. मु. मज. सी. { इ. १६७३ डिसें. ७

अज दि. पर. वाई—ताा मोक. मौ. बोरखल व किण्ही.

नरसीभट बिन रंगभट व एकनाथ रामेश्वरभट (चित्राव) यास वरील गावीं एकंदर १॥ चावर जमीन आहे. ती पूर्वीप्रमाणें चालविणें.

खं. २० ले. १३६ } (१६०१) { श. १५९५ मार्ग. शु. ९
सु. १०७४ रम ८ } मिसेली फा. मु. मज. व सी. { इ. १६७३ डिसें. ७

अज दि. पर. वाई—ताा मोक. मौ. पसर्णी.

नरसीभट बिन रंगनाथभट चित्राव यांस सिद्धनाथवाडीस नीम चावर जमीन इतर हक्कासुद्धा इनाम आहे ती पूर्वीप्रमाणें त्याजकडे चालविणें.

ओ. कॉ. भा. ३४ } (१६०२) { श. १५९५ मार्ग. शु. १०
नं. ३९०४ इ. } कारवार-सुरत { इ. १६७३ डिसें. ८

शिवाजीच्या चळवळ्या स्वभावामुळें त्याच्या शेजाऱ्यांना शांतता मिळत नाहीं. आदिलशहाचा मृत्यु, त्याच्या वारसाचें पोरवय आणि सरदारमंडळींतील दुही यांचा फायदा घेऊन शिवाजी मोठ्या सैन्यासह ह्या राज्यांत शिरला व त्यानें अनेक मजबूत किल्ले घेतले व व्यापारी पेठा लुटल्या. [त्यांत हुबळीचें महत्त्व व कंपनीचें नुकसान झालें इ०] ......परंतु हें प्रकरण इतक्यावरच न थांबतां येथील सुभेदारानें आदिलशहाविरुद्ध बंड करून त्याला द्रव्य सहाय्य मिळविण्याकरितां आमची वखार लुटण्याचा बेत केला. परंतु स्वतः सावध राहून आदिलशहानें पाठविलेल्या सुभेदाराला आम्हीं मदत केली. बंडखोराचें सैन्य अनेक वेळां मोठें नुकसान होऊन परत गेलें. या गडबडींत गलबतें भरण्याला पुरेसा माल जमा झाला नाहीं.

फॅ. रे. सुरत भा. ८८ पृ. ५२ – कारवार–सुरत, तारीख सदर—' शिवाजी स्वतः सैन्य घेऊन येथून दीड दिवसाच्या अंतरावर आला आहे.'

(द्वि.) ओ. कॉ. नं. ३९०७ इ. | (१६०३) मुंबई–ई. इं. कंपनी | श. १५९५ मार्ग. व. २ इ. १६७३ डिसें. १५

मुंबईच्या लोखंडी तोफा आम्ही **शिवाजीला** देऊं शकूं. परंतु तसें केल्यानें शत्रूला तोफा पुरविल्याबद्दल बादशहाचा आपल्यावर राग होईल....

दहा आज्ञा आणि ख्रिस्ती धर्माच्या तत्वांचें देशी भाषांत भाषांतर करून तें बेटांत फैलावून **ख्रिस्ती धर्म स्वीकारण्यास उत्तेजन द्यावें** ही आपली आज्ञा आम्हांला महत्त्वाची वाटते. आणि ती अमलांत आणण्याचा प्रसंग येईल त्याप्रमाणें आम्ही अमलांत आणूं. परंतु धर्माचे बाबतींत सर्वांना स्वातंत्र्य देण्याची आमची प्रतिज्ञा असल्यामुळेंच येथें लोकवस्ती वाढत आहे, हें ध्यानांत घेतां या बाबतींत आमचें ताटस्थ्य थोडें देखील ढळल्याचें लोकांच्या लक्षांत आल्यास अनिष्ट परिणाम होईल. यामुळें हें **आक्रमण गुप्तपणेंच करणें** जरूर आहे.

(द्वि.) ओ. कॉ. नं. ३९१० इ. | (१६०४) मुंबई–ई. इं. कंपनी. | श. १५९५ मार्ग. व. २ इ. १६७३ डिसें. १५

आमच्या २३ ऑक्टोबरच्या पत्रांत शिवाजीच्या तहाबद्दल लिहिलें. त्याच्या वकिलाचा व आमचा पक्का करार झाला. तथापि **शिवाजी गेल्या तीन महिनेपर्यंत** स्वदेशांतून (स्वारीवर) बाहेर गेल्यामुळें खुद्द त्याची संमति मिळावयाची राहिली आहे. २५००० सैन्य घेऊन विजापूरकरांच्या मुलुखांत व कानडा प्रांतांत तो आपल्या सैन्याच्या खर्चाकरितां वसूली (लूट) करण्यासाठीं गेला आहे....हुबळीच्या लुटीची काडीमात्र जबाबदारी घेण्यास तो तयार नसला तरी राजापूरप्रमाणेंच त्याही गोष्टीचा अनुकूल निकाल लागेल अशी अपेक्षा आहे. कारण, शिवाजी त्याच्या बंदरांत पुनः इंग्रजांनीं व्यापार करावा अशी इच्छा करितो. आणि खरें पाहिलें तर **राजापूर, दाभोळ, केळशी** वगैरे बंदरें मुंबईच्या व्यापाराला अत्यंत पोषक अशीं आहेत. तेथें वखारी घातल्यास युरोपांतील बाजार–पेठांना उपयोगी असा पुष्कळच माल सुरत किंवा इतर ठिकाणांपेक्षां शेंकडा २५ टक्के स्वस्त मिळूं शकेल. शिवाजीच्या मुलखांत युरोपांतील माल खपवितां येईल. शिवाय त्या मुलखांत लागणारीं नाणीं पुरविल्यानें (पैसे, टिनी किंवा बगूके) मुंबईच्या टांकसाळीला मोठा फायदा होईल. तसेंच स्वतःचा माल खपविण्याकरितां तो मुंबईला **स्वतःच्या व्यापाऱ्यांची वखार** घालणार आहे. त्यायोगानें या बेटाचा व्यापार वाढेल व जकातींचेंहि उत्पन्न वाढेल. असो; या भरपाईच्या तहाबद्दल इंग्रजांनीं आपलें अभिनंदन करून घेण्यासारखें आहे. मोंगल, विजापूरकर,

पोर्तुगीज इत्यादींच्या मुलखांत शिवाजी लूट करीत असून आजपर्यंत इंग्रजांशिवाय दुसऱ्या कोणत्याहि राष्ट्राला लुटीबद्दल त्यानें भरपाई करून दिली नाहीं !(ही समाधानाची व विशेष अभिमानाची गोष्ट आहे.) [ऑर्म ११४-३ पृ. ३८-४०]

ऑर्म. भा. ११४ } (१६०५) { श. १५९५ मार्ग. व. २
वि. ३ इ. } मुंबई-इंग्लंड. { इ. १६७३ डिसें. १५

[पृ. ३१]-जुन्नर, औरंगाबाद, रायबाग, हुबळी, विजापूर या ठिकाणीं कंपनीचा व्यापार (पुनः) थाटण्याचा विचार सिद्धीस जाईल अशी आशा आहे. [पृ. ३०]-**नागोठण्याच्या** खाडीच्या तोंडावर सिद्यानें त्याच वेळीं ठाणें दिल्यामुळें तेथून **मजूर** मिळण्याचें बंद पडलें. आणि पाण्याखालील जमीन दुरुस्त करावयाचें काम झालें नाहीं. [पृ. ३६]-मुसलमान अधिकारी, शिवाजी आणि पोर्तुगीज सत्ताधीश यांशीं प्रेसिडेंटला चांगले संबंध ठेवण्यासाठीं **निरनिराळ्या भाषांत पत्रव्यवहार** ठेवावा लागतो. परंतु या सर्वांत पोर्तुगीजांकडून फारच त्रास होतो. प्रत्येक ठाण्याचा **पोर्तुगीज अधिकारी** (Fidalgo) म्हणजे एक छोटा राजाच असून त्याला गोव्याच्या व्हाइसरॉयइतक्या मानानें व समारंभानें वागवावें लागतें !

फॅ. रे. सुरत भा. ८८ } (१६०६) { श. १५९५ मार्ग. व. ४
पृ. ३०-३१ इ. } कारवार-सुरत. { इ. १६७३ डिसें. १७

शिवाजी **कुदेरा** (Cuddera) ला आल्याची बातमी ८ तारखेच्या पत्रांत लिहिली ती खरीच ठरली. ४ इ. पायदळ व २ इ. घोडदळ घेऊन तो जातीनें आला; परंतु चार दिवसांपेक्षां अधिक राहिला नाहीं. त्याचें बहुतेक सैन्य **हुबळी** नजीकच्या टेकडीवर होतें. यामुळें तेथील व्यापारी शहर सोडून पळाले. [से]-आमचें कांहीं शिसें चोरीस गेल्याचें ऐकितों; परंतु कोणीं नेलें, किती नेलें वगैरेबद्दल कांहींच तपशील कळला नाहीं... शिवाय **बहलोलखानानें बंकापूरला** आणि **सर्जाखानानें चांदगडला** शिवाजीचा मोड केला असेंहि कळलें. याच पराजयामुळें तो इतक्या लवकर परत गेल असावा. अजूनहि येथें शांतता मिळत नाहीं !

फॅ. रे. सुरत भा. ८७ } (१६०७) { श. १५९५ पौष शु. १
पृ. ५१ (द्वि.सं.) इ. } स्वाली मरीन-मुंबई. { इ. १६७३ डिसें. २८

सर्व बोटी व गलबतें तुमच्याकडे परत करीत आहों. एक हॉय (गलबत) मात्र **शिवाजीनें** कांहीं **उपद्रव दिलाच** तर येथील रक्षणाकरितां ठेवून घेत आहों.

खं. २० ले. १३७ } (१६०८) { श. १५९५ पौष शु. ५
सु. १०७४ सवाल ४ } मिसेली { इ. १६७४ जाने. २

अज दि. पर. वाई——ता मोक. तळिये, किण्ही, पिंपरी, भाडले, खेड.

नारायणभट बिन एकनाथभट चित्राव यांस वरील गावीं, एकंदर १॥ चावर जमीन हक्कासह इनाम व सादिलवार होन ५ आहे. तरी वरील इनाम त्यांजकडे पूर्वी-प्रमाणें चालविणें.

(द्वि.) ओ. कॉ. न. ३९२९ इ. (१६०९) प्रेसि. ऑंजिअर-ईस्ट इं. कंपनी श. १५९५ पौष व. ४ इ. १६७४ जाने. १५

स्वतःच्या मनाशींच जेव्हां मी तुमचा व इतर ख्रिस्ती राष्ट्रांचा व्यवहार यांची तुलना करून पहातों, तेव्हां इंग्लंडांतून निर्यात केलेल्या मालाचें प्रमाण व किंमती, त्या मोबदला हिंदुस्थानांतून नेलेला माल, सामान्य खर्च, कारभाराचा नमुना, त्याचा मुख्य उद्देश आणि तत्सिद्धयर्थ अमलांत आणिलेले उपाय, इत्यादि अनेक दृष्टींनीं तुमचा व्यवहार इत-रांच्या पेक्षां अधिक पक्क्या व चिरस्थायी पायावर उभारलेला आहे असें दिसतें. हें अधिक स्पष्ट करण्याकरितां इतरांचें थोडक्यांत वस्तुस्थिति-निदर्शक वर्णन देतों.

डेन्स लोकांचे संबंध अत्यल्प असून त्यांना त्यांचे लोकांपलीकडे कोणी मोजीत नाहीं.

पोर्तुगीजांना आपलें हिंदुस्थानांतलें स्थान टिकविण्याला फारच आयास पड-तात. त्यांचा व्यापार अल्प परंतु खर्च मोठा आहे. आणि जरी सुव्यवस्थित कारभार केल्यास किफायतशीर होतील अशीं पुष्कळ ठाणीं त्यांच्या ताब्यांत आहेत, तथापि कार-भार अनास्थेचा असल्यामुळें व्यापार नष्ट होतो आणि पाद्री व फिडालगो लोक सर्वच वसूल खाऊन टाकतात. अलीकडे व्हाइसरॉयाच्या दूरदर्शी कारभारानें व्यापार व वसूल या दोन्ही गोष्टींत थोडी वाढ आहे.

फ्रेंच मोठा डौल घालीत असले तथापि त्यांना या मितीपर्यंत फारसा फायदा झाला असेल असें वाटत नाहीं. स्वतःचा फायदा करून घेण्याच्या ऐवजीं शेजाऱ्यांना त्रास देणें हाच त्यांचा मुख्य उद्देश आहे असें दिसतें. आणि हा त्यांचा उद्देश बराच सिद्धीस गेला असें म्हणण्यास हरकत नाहीं. हॉलंडच्या युद्धांत यश आल्यास कदाचित् त्यांची महत्त्वाकांक्षा वाढून ते अधिक प्रगति करूं शकतील. सेंट टोम येथील त्यांची वसाहत त्या किनाऱ्यावर तुम्हांला बराच अडथळा करील; परंतु फ्रेंचांना स्वतःला तिचा कितपत फायदा होईल हें चिंत्य आहे. सीलोनांत स्थान मिळविण्याची त्यांची इच्छा असल्यास न कळे. परंतु डचांच्या ही गोष्ट ध्यानांत आली असून त्यांनीं त्यांना तेथून या-पूर्वींच हुसकून लावलें असतें; परंतु तुमच्या आरमारानें दोनदां न कळत त्यांना मागें फिर-विलें (diverted) यामुळें ते राहिले.

डच पैसा व सामर्थ्य यांनीं युक्त असून हिंदुस्थानांतील बहुतेक नाक्याचीं ठिकाणें त्यांच्या ताब्यांत आहेत. परंतु तीं सर्व त्यानीं तरवार आणि अत्याचार यांच्या जोरावर मिळविलीं असल्यामुळें त्यांना तशींच राखणें भाग आहे ? सैन्याच्या उभारणीला अतो-

नात खर्च होऊन नेहेमीं प्राणहानी अगणित होते. हिंदुस्थान आणि युरोप येथील प्रबळ शेजाऱ्यांची स्पर्धा आणि कारवाई यांपासून त्यांना नेहमींच भय आहे; आणि जिंकतांना केलेला जुलूम, शेजाऱ्यांवरील जबरदस्ती आणि त्यांच्या प्रजेचे नेहमीं होणारे हाल हे इतके प्रसिद्ध आणि सर्वत्र अप्रिय होऊन बसले आहेत कीं, त्यांच्या शिरावर या पापाचा भार होऊन त्याच्याच दडपणाखालीं ते चिरडून नाश पावतील !

परंतु इंग्रजांचें तसें नाहीं. इंग्रजांचा व्यापार तुमच्या सुंदर व्यवस्थेमुळें दैवी जलानें जीवन मिळणाऱ्या, आपल्या वसाहतींच्या नजीकच्या सर्व लोकांच्या प्रेमांत खोल मुळें गेलेल्या, वृक्षाप्रमाणें असून सर्वांनाच त्यापासून लाभ होत असल्यामुळें राजे, राज्यें इत्यादींची तुमच्यावर एकप्रकारची भक्ति आहे. तुमचा कोणालाहि अनिष्ट अथवा जबरदस्तीचा त्रास नसून तुमचे उद्देश न्याय्य आणि स्तुत्य आहेत....सर्व ठिकाणीं व्यापार करण्यास योग्य असा माल स्वाधीन (आपला आपल्याच देशांत मिळणारा) आहे, व खर्च फार मोठा नाहीं; निदान मुंबई व सुरत येथील व्यापाराबद्दल मी खात्री देऊं शकेन. मात्र अलीकडे आपलें डचांशीं युद्ध चालू झाल्यापासून व हिंदुस्थानांत युद्धाची दंगल माजल्यापासून ही परिस्थिति जरा बदलली आहे. परंतु ही आपत्ती सर्वांवरच आली ती भोगली पाहिजे. अशीच ती चिरकाल टिकेल असेंहि नाहीं.

थोड्या हलक्या जातीच्या परंतु चांगल्या नीतीच्या इंग्रज बाया इकडे पाठवून द्याव्या. म्हणजे त्यांचीं येथील शिपायांशीं लग्नें लावून देतां येतील. ते देशी बायकांशीं संबंध ठेवूं लागले तर धर्माज्ञेप्रमाणें आम्हीं त्यांना त्यांच्याशीं लग्न करण्यास भाग पाडतों. त्यापेक्षां त्यांनीं इंग्रज बायांशीं लग्नें लाविलीं तर अधिकच चांगलें होईल.

सा. ले. १३४ } सु. १०७४ श. }	(१६१०)	{ श. १५९५ पौष व. ५ { इ. १६७४ जाने. १६

बहिरो बाबाजी सुरूरकर—गंगोपंत व महादाजीपंत बोकील:—तुमच्या वडिलापासून १२ होन कर्ज घेतलें; १॥ वर्षांत ८ होन व्याज होतें. मुदतींत न देऊं तरी ७॥ टके दरमहा व्याज देऊ. १॥ वर्षानंतर निमे कुलकर्ण व ज्योतिष किंवा म्हावसींची सबंध वृत्ती देऊ.

फॅ. रे. मुंबई भा. ६ } पृ. ३८–४० (द्वि. सं.) इ. }	(१६११) मुंबई–ई. इं. कंपनी	{ श. १५९५ पौष व. ८ { इ. १६७४ जाने. १९

[ओ. कॉ. ३९१० ले. १६०४ मधील, शिवाजीची तहाला मान्यता मिळावयाची राहिली आहे इत्यादि मजकूर].

(सं) फॅ. रे. सुरत भा. ८७ पृ. ९२–९३ तारीख सदर, सुरत–कंपनी:— अलीकडे **शिवाजीचें सैन्य विजापुरा**कडे गुंतलें आहे. यामुळें शिवाजीकडून आम्हांला कांहीं त्रास पोंचला नाहीं.

ऑर्म ११४-३ } (१६१२) { श. १५९५ पौष व.८
पृ. ४६ इ. } मुंबई-इंग्लंड { इ. १६७४ जाने. १९

शिवाजीला **फ्रेंचांनीं** ८८ तोफा आणि ३००० मण शिसें पुरविल्याचें ते आपल्या तोंडानें कबूल करितात; परंतु आपल्याला (शिवाजीनें) त्या देण्यास भाग पाडलें असेंच ते म्हणतात. आतां (शिवाजीच्या लोकांना) आमच्याकडून तोफा व शिसें लागणार नाहीं. हल्लींच्या [बिकट] परिस्थितींत आम्हांला याबद्दल कांहींच वाईट वाटत नाहीं.

डच रेकर्डस्, भा. ३१ } (१६१३) { श. १५९५ पौष व.१०
नं. ८०५ इ. जाने. ३१ न्यू. } डच ग.ज.-डच ई.इं.कंपनी { इ. १६७४ जाने. २१

मोंगलाच्या आणि **विजापूरकरांच्या** अशा जोड सैन्यानें **शिवाजीचा** अनेक वेळां पराजय केला. तथापि त्याची **जबरदस्ती** सर्व देशांत पूर्ववतच चालू आहे. युद्धांत झालेली हानी सुवर्णाच्या प्रयोगानें कशी भरून काढावी हें तो उत्तम जाणतो. थोडया दिवसांपूर्वी, एक **नांवाजलेला महत्त्वाचा किल्ला** [पन्हाळा ?] मुसलमानांकडून काडीचाहि प्रतिकार न होतां त्यानें असाच प्रयोग करून घेतला. त्याचा मान आणि महत्त्व यांची पुनः चढती कमान आहे.

(**से**) फॅ. रे. सुरत भा. ८८ } (१६१४) { श. १५९५ माघ शु. ७
पृ. ६४ इ. } सुरत-फोर्ट सेंटजॉर्ज { इ. १६७४ फेब्रु. ३

आमच्या फत्तेमान्यांना मुक्कामाला यावयास पूर्वी लागत असे त्याच्या दुप्पट वेळ लागला. या सर्वांच्या मुळाशीं **शिवाजीच** आहे.

फॅ. रे. सुरत भा. ८८ } (१६१५) { श. १५९५ माघ शु. १०
पृ. ५० इ. } सुरत-मुंबई { इ. १६७४ फेब्रु. ६

दिलेलखानाचा शिवाजीनें पक्का **मोड** केला. त्यांत दिलेलखानाचे १००० पठाण आणि शिवाजीचे सुमारें ४००।५०० लोक कामास आले.

स. ले. १४ पृ. १२१ } (१६१६) { श. १५९५ माघ व. २
सु.१०७४ जिल्काद १५ } सनद { इ. १६७४ फेब्रु. १२

म. ह. राजश्री **राघो बल्लाळ** सुभेदार व कारकून महालानिहाय तर्फ पुणें यांसी राजश्री **शिवाजी राजे**:-दंडवत सैद सादत हजरत पीर सैद हिसाम खताल व काजी कासिम पीरजादे व नायब काजी व खतिबा परगणे मजकूर महाराज साहेबांचे वेळेस भोगवटा चालिला असेल व **अफजल(खान) मारिला त्याचे आधीं साहेब पुण्यास असतां**, ते वेळेस भोगवटा चालिला असेल, तेणेंप्रमाणें तहकीक

करून मनास आणून, इनाम व रोजमुरा व बाजे हक्क जे असेल ते भोगवटा प्रमाणें दुमाला करणें; व मशीद गांवगन्ना तेल रोषनाई चालत आलें आहे तेणेंप्रमाणें देणें. व काजी इभराइमाचे लोक, काजी कासिमासी खुतबा पढावयाबद्दल इस्कील करितातो, तरी या हरदोजणांचा निवाडा महाराज साहेबांचे वेळेस जाहला आहे. निवाडपत्र काजी कासिमापाशीं आहे. तें मनास आणून हरदोघांस सदरहू निवाडियाप्रमाणें वर्तवणें व मौजे फुरसिंगीचे मशिदीचे खिजमतेबद्दल हसन तांबोळी व चांदजी मोकादम कसबे खेडबारें हे हरदोघेजण गैरमिरासी असोन दखल करितात. तरी सनदपत्र मनास आणून गैरमिरासी असेल तो दूर करणें. सालाबाद चालत आले असेल तेणेंप्रमाणें चालवणें. रवाना मोर्तबसूद

ऑर्मे ११४–३ पृ. ७१ इ.	(१६१७) मुंबई–इंग्लंड	श. १५९५ माघ व. ७ इ. १६७४ फेब्रु. १७

दंडाराजपुरीचा सिद्दी व शिवाजी उभयतां युद्धाला कंटाळले असून, युद्ध रेंगाळत चाललें आहे. सिद्दीनें विनंति केल्याप्रमाणें उभयतांचा तह करून देण्याची प्रेसिडेंटला आशा वाटते.

फॅ. रे. मुंबई भा. १ पृ. १७–१८ (द्वि. सं.) इ.	(१६१८) मुंबई कन्सल्टेशन	श. १५९५ फाल्गुन शु. ९ इ. १६७४ मार्च ६

शिवाजी **रायगडला** परत आला आणि पूर्वी झालेला तह मान्य करण्यास तो तयार आहे असें समजल्यावरून, तह पुरा करण्याकरितां नारायण शेणव्याला ताबडतोब रवाना करावें. **दंडाराजपुरीच्या** सिद्यानें आपला व शिवाजीचा तह करून द्यावा अशी प्रेसिडेंटला विनंति केली. सुरतेच्या कौन्सिलकडूनहि याबद्दल संमति आली. यामुळें, **नारायण शेणवी** तहाकरितां जाईल तेव्हां त्यानें शिवाजीची या बाबतींतील मर्जी पाहून इकडे कळवावें. शिवाजीची अनुकूलता दिसून आल्यास हें जुनें तहाचें प्रकरण मिटविण्याकरितां हेन्री ऑक्झिंडेन याला मुखत्यार वकील म्हणून पाठवावें. आणि त्यांनेंच शिवाजी व सिद्दी यांचा तह व स्नेह घडविण्याचा प्रयत्न करावा.

ऑर्मे ११४–३ पृ. १०० इ.	(१६१९) मुंबई–सुरत	श. १५९५ फाल्गुन व. ८ इ. १६७४ मार्च १९

मोंगलांचें सैन्य **शिवाजी**च्या सरहद्दीवर आलें असून गेल्यावर्षीप्रमाणें शिवाजीच्या मुलखांत घुसेल असा अंदाज आहे. हल्लींच अन्नसामग्रीचा तुटवडा आहे. आतां ह्यांनीं गरीब प्रजेची जाळपोळ व लूटमार केल्यावर त्यांना स्वतःला कांहींच फायदा न होतां दुष्काळ मात्र अधिक कडकेल.

ऑर्म. ११४-३ } (१६२०) { श. १५९५ फाल्गुन व. १२
पृ. ९६ इ. } मुंबई-सुरत { इ. १६७४ मार्च २४

गेल्या सालच्या गैरवर्तनामुळें **सिद्दी संबूळ**ला मुंबईला पावसाळ्यांत राहूं न देण्याचें आम्हीं ठरविलें.

खं. ८ ले. ३० } (१६२१) { श. १५९५
पृ. १०७४ } खुर्दखत 'प्रति.' मु. { इ. १६७३-७४

रा.**शिवाजी राजे**—— बकाजी फर्जंद

मौ. नांदेड तर्फ खडकवासले येथील निमी मोकदमी पोळापासून साहेबीं विकत घेतली ते तुम्हांस हाली १०० होनास विकत दिधली.

एपि. इंडो. मॉस्लेमिका १९०७-८ } (१६२२) { श. १५९५-९६
पृ. ९ हि. १०८४ } शिलालेख { इ. १६७३

गुलबर्गा येथील पील बुरुजावरचा शिलालेखः—

शिकंदर आदिलशहाच्या कारकीर्दीच्या सुरवातीस मुख्य प्रधान **खवासखान** यानें हि. १०८३ मध्यें दिलेल्या हुकुमावरून मलिकंबराचा मुलगा सुभेदार व हवालदार **शिद्दी संबूल** यानें हि. १०८४ मध्यें हा 'शिकंदर बुरुज' बांधविला. (यांत उल्लेखिलेला मलिकंबर निजामशाही राज्यांतला प्रसिद्ध मुत्सद्दी नव्हे.)

फ्रायर भा. १ } (१६२३) { श. १५९५-९६
पृ. १५१-५२ इ. } फ्रायरची टिपणी { इ. १६७३

कारवार हें या (पश्चिम) किनाऱ्यावरील विजापूरकरांचें मुख्य बंदर होय. परंतु हें बंदर व त्याला जोडून थेट गुजराथपर्यंतचा प्रदेश हीं हल्लीं आदिलशहाशीं राजद्रोह (traytor) करणारा राजा शिवाजी याच्या ताब्यांत आहेत. त्यानें तेथील आमची वखार बहुतेक फोडून आमचेवर नाना अत्याचार केले....हा शिवाजी कोण आहे आणि त्याच्या वाढत्या सत्तेच्या मुळाशीं काय आहे हें पहाण्यास या देशांत अधिक वेळ राहिलें पाहिजे. परंतु प्रत्येक ठिकाणीं त्याचें नांव उच्चारतांच सर्वजण भेदरून जातात. एकाद्या प्रचंड लोंढ्याप्रमाणें त्याच्यापुढें सर्व कांहीं स्थानभ्रष्ट होत जातें.... हें शिवाजीचें बंड होईपर्यंत, दख्खन (?) व विजापूरचें राज्य यांची एकजूट होती आणि विजापूरचें राज्य पूर्णपणें स्वतंत्र असून तें मोंगलांना खंडणी देत नसे.

(दि) लेटरबुक भा. ५ } (१६२४) { श. १५९६ चैत्र शु. ७
पृ. ११५ इ. } कंपनी-सुरत { इ. १६७४ एप्रील ३

भीमजीकरितां मुंबईबेटावर एक **मुद्रक, मुद्रणयंत्र, कागद** इत्यादि सामुग्री पाठविली आहे. मुद्रकाचा पगार दरसाल ५० पौंड इत्यादि सर्व खर्च भीमजीकडून घ्यावा.

फॅ. रे. सुरत भा. ८८ } (१६२५) { श. १५९६ चैत्र शु. ८
पृ.७८–८३ इ. } नारायण शेणवी–डे. गव्हर्नर, मुंबई. { इ. १६७४ एप्रील ४

मंगळवार ता. २४ मार्च रोजीं रायरीला पोंचलों व त्याच दिवशीं **निराजी पंडिताची** (Naragy Punditt) भेट घेण्याकरितां पायथ्याच्या **पाचाड** (Banchar) गांवीं गेलों. चौकशी केली. तेव्हां निराजी गडावर होता असें समजलें. म्हणून माझ्या आगमनाची वर्दी गडावर राजाकडे एका नोकराकरवीं पाठविली. त्याच दिवशीं निराजीचा हुकूम नोकरानें असा आणिला कीं, 'शिवाजीचें **पत्नीच्या मृत्यूचें** सुतक फिटेपर्यंत तुम्हीं आमच्याच घरीं रहावें' असें रिकामपणीं पांच दिवस घालविले. मध्यंतरीं निराजी पाडव्याकरितां [२८ मार्च] आपल्या घरीं आला. दुसऱ्या दिवशीं त्यानें मला आपल्याबरोबर नेऊन एका प्रशस्त घरांत माझी सरबराई केली. तेथें आणखी पांच दिवस राहिलों. काल **तीन तारखेला** दोन प्रहरीं **निराजी** मला दरबारांत शिवाजी समोर घेऊन गेला. स्वागत व कुशलप्रश्न झाल्यावर मीं राजापूरबद्दल प्रश्न काढला. निराजीनें अपेक्षेपलीकडे आमची तरफदारी केली आणि शिवाजीनें ताबडतोब कारकुनांना हुकूम लिहिण्यास सांगितलें. राजापूरची भरपाई तीन हप्त्यांनीं व्हावयाची; २५०० होन राजापूरच्या जकातींतून, २५०० होन येत्या १ सप्टेंबरला सुरू होणाऱ्या पहिल्या वर्षीं आणि ५००० होन त्यानंतर दोन वर्षांच्या अवधींत द्यावयाचे. अशा स्वरूपाचे कागद तीन चार दिवसांत तयार झाल्यावर ते आदिल मोदी (Adall Moody) याच्या हातीं सविस्तर हकीकत सांगून पाठवीन....नव्या वर्षारंभीं जूनमध्यें स्वतःला **राज्याभिषेक** करून घेण्याच्या इराद्यानें सोनें व हिरे यांचें एक भव्य सिंहासन शिवाजी बनवीत आहे. ह्या समारंभाकरितां असंख्य विद्वान् ब्राह्मणांना बोलावून तो मोठा दानधर्म करणार आहे. परंतु हा **राज्याभिषेक** तो **स्वतःला** करून घेणार आहे **किंवा दुसरा कोणी राजा** होणार आहे **हें माहीत नाहीं**. कारण **निजामशाही वंशांतील** एक राजा त्याच्या ताब्यांत आहे असें लोक म्हणतात !...**बहादूरखान** कोंकणांत उतरणार होता. परंतु शिवाजीनें ठिकठिकाणीं डोंगरांतील वाटा मोडून अवघड ठिकाणीं कडक पहारे ठेविल्यामुळें तो परत फिरला....**प्रतापराव बहलोलखानाशीं** एका खिंडींत फक्त ६ घोडेस्वारांनिशीं लढतांना बाकीचे सैन्याचे मदतीचे अभावीं, मारला गेला. त्याचे जागीं नवा सेनापती नेमून, सैन्याला नवे हुकूम देण्यासाठीं **शिवाजी कुडाळला** जाणार होता. परंतु प्रतापरायाचा दुय्यम आनंदराय यानें धीराचें पत्र लिहिल्यामुळें शिवाजीनें त्याला सेनापतीपद देऊन 'शत्रूचा मोड केल्याशिवाय तोंड दाखवूं नये' असा हुकूम केला. शूर **आनंदराव** बहलोलखानाचा पाठलाग करीत शत्रूच्या मुलखांत शिरला असतां, प्रतापरायाच्या मृत्यूची बातमी ऐकून बहलोलखानाच्या कुमकेला **दिलीलखान**हि त्वरेनें आला. दोघे एकत्र झाल्यानें आपली धडगत नाहीं असें पाहून आनंदराय रोजीं ४५ मैलाच्या मजला मारीत **कानड्या**कडे वळला. उभय

(विजापुरी) सरदारांनीं पुष्कळ दिवस पाठलाग करूनहि कांहीं साधत नाहीं असें पाहून ते परत गेले. दिलीलखान **पन्हाळ्याला** वेढा घालण्याकरितां म्हणून गेला तो तेथें फक्त पांच दिवस राहून परत गेला. आणि बहलोलखान **कोल्हापुरास** गेला. इकडे आनंदरायानें बरेंच आंत शिरून बहलोलखानाच्या जहागिरीपैकीं **बंकापूरपासून** २५ मैलांवरील **पेंच** नांवाचा गांव लुटून ३००० बैलांवर लादून ती लूट नेली. बहलोलखान आणि **खिदरखान** (Quider Ckaun) यांनीं प्रतिकार केला. बंकापूरजवळ घनघोर युद्ध झालें. त्यांत खिदरखानाचा भाऊ व बहलोलचा भाचा असे मारले गेले; आणि **आनंदरायाचा जय** होऊन त्याला ५०० घोडे व २ हत्ती वगैरे भरपूर लूट मिळाली. ती **शिवाजी**कडे पोंचवून तो आतां **बालाघाट**कडे आणखी लूट मिळविण्यास गेला आहे......[पहा कानड्याचें बातमीपत्र डिसें. ५ ले.-] **फत्तेखान सिद्दीशीं** तह करण्याची शिवाजीची मर्जी नाहीं असें **निराजीनें** सांगितलें. तोच स्वतः या बाबतींत अधिक लिहील....सातवळीचे [सावित्री ?] खाडींत **सिद्दी संबूळनें दौलतखानाशीं** लढाई दिली. त्यांत त्याचे १०० व दौलतखानाचे ४४ लोक पडून **दौलतखानाचा जय** झाला. उभयतांना जखमा लागल्या. अशा रीतीनें पराजय झाल्यामुळें तो वेसिंग[विसवी]-जवळ हरेश्वरला गेल्याची बातमी **शिवाजीनेंच** स्वतः मला सांगितली. यापुढें तुम्हीं सिद्दीला कोणत्याहि प्रकारें जवळ केल्यास शिवाजीशीं जमणार नाहीं असें त्यानें पहिल्या भेटींतच मला सांगितलें....आतां ऑक्झिडेनबरोबर चांगला नजराणा देऊन त्याला लगेच पाठवावा. निराजी पंडिताचे सांगण्यावरून, तुम्हीं, शिवाजीच्या नजराण्यांत अरबी घोडा न पाठवितां मूल्यवान् रत्नें राज्यारोहणाच्या वेळीं धारण करण्यासाठीं पाठवावीं, हें बरें दिसतें. नजराणा चांगला १०००।१२०० रुपयांचा पाठवा. निराजी-करितां २५ तोरमल्लीचे खडे (thurmas) कबूल केल्याप्रमाणें पाठविण्याचें गिरिधर-दासला स्मरण द्यावें. [हें पत्र मूळ **पोर्तुगीज** भाषेंत लिहिलेलें आहे त्याचें इंग्रजींत भाषांतर केलें, त्याचें हें मराठीकरण आहे.]

(खे.) फॅ. रे. सुरत भा. ८७ } पृ. १४३-४४ इ. (१६२६) सुरत-मुंबई. { श. १५९६ चैत्र शु. १२ इ. १६७४ एप्रील ७

आपण सिद्दीला परवानगी कां देत नाहीं याचीं सविस्तर कारणें लिहून प्रेसिडेंटनें सुभेदाराला एक सीलबंद पत्र पाठवावें. आमचे माहितीकरितां त्या पत्राचें इंग्रजी भाषांतर सोबत पाठवावें. म्हणजे संधी साधून आम्हीं तें पेश करूं. आम्हीं स्थानिक व जवळ-चेच असल्यामुळें आमच्या सांगण्यापेक्षां तुमच्या पत्राचा उपयोग अधिक होईल.

फॅ. रे. मुंबई भा.१ } पृ. २४ (द्वि.) इ. (१६२७) मुंबई कन्सल्टेशन { श. १५९६ चैत्र शु. १४ इ. १६७४ एप्रील ९

रानायण शेणव्याचे ४ एप्रीलचे पत्राचा विचार झाला. या वेळीं हा तह झाला

नसता तरी राज्याभिषेकाचे वेळीं नजराणा पाठवावा लागलाच असता; आणि तसा पाठविण्यानें कंपनीला पुष्कळ फायदा होणार आहे; वगैरे गोष्टींचा विचार करून, (१) मोठा नजराणा घेऊन शिवाजीकडे जाण्याची **ऑक्झेंडेननें** तयारी करावी. नजराण्याकरितां जरूर त्या वस्तू सुरतेहून त्वरेनें मागवाव्या; (२) **ऑक्झेंडेन व उस्टिक** यांनीं एकत्र विचार करून शिवाजीच्या तहनाम्यांत कांहीं नवीन कलमें घालणें जरूर असल्यास पुढील सभेच्या दिवशीं सुचवावें; (३) आणि शिवाजीच्या प्रधान मंडळांतील किंवा दरबारांतील कोणत्या मोठ्या मंडळींना आणि किती किंमतीची नजर द्यावी याबद्दल माहिती नारायण शेणव्याकडे एकदम मागवावी असें ठरलें.

आर्म ११४-३ पृ. ९८ इ.	(१६२८) मुंबई-सुरत	श. १५९६ चैत्र शु. १४ इ. १६७४ एप्रील ९

नारायण शेणव्यानें रायगडाहून पाठविलेलें पत्र काल रात्रीं पोंचलें. त्याच्या पत्रावरून **शिवाजीशीं** लवकरच समाधानकारक तह होणार हें दिसून येईल. त्याकरितां ऑक्झिडेनला पाठविणार आहोंत. ३।॰ हजार रुपयांपर्यंत नजराण्याकरितां यादीप्रमाणें रत्नांची खरेदी करून पाठवावी......**सिद्याला** पावसाळ्यांत मुंबईत राहूं दिलें तर मीं तह करण्यास तयार नाहीं असा **शिवाजीचा प्रेसि॰ला निरोप** आल्यामुळें आणि त्याचें बंदरांत रहाणें बंदराला त्रासदायक असल्यामुळें आम्हीं नकार देण्याचें ठरवून तुम्हांला त्याप्रमाणें कळविलेंच आहे. जरी नारायण शेणव्यानें शिवाजी-सिद्दी तहाबद्दल निराशा दाखाविली तरी प्रेसि॰ला अजून आशा वाटते.

फॅ. रे. सुरत भा. ३ पृ. २१ (३)	(१६२९) सुरत कन्सल्टेशन	श. १५९६ चैत्र वद्य ६ इ. १६७४ एप्रील १६

मुंबईच्या पत्रांत **लेखक नारायण शेणव्याची** शिवाजीकडील हकीकत कळवून, त्या कामांत **अपेक्षेबाहेर यश** आल्यामुळें, नारायण शेणव्याच्या पत्राप्रमाणें मुंबईकरांकडून रत्नांकरितां मागणी आली, त्यांपैकीं शक्य तितकीं पाठवावीं असा ठराव झाला. त्याप्रमाणें मुंबईला ६ मोत्यें, ३ आंगठ्या, १ शिरपेंच व २ सलकडीं अशा ३३१४। रु. किंमतीच्या वस्तु पाठविण्यांत आल्या. (पहा त्रै. ८ पृ. ३०-३१)

ऑर्म ११४-३ पृ. १०२ इ.	(१६३०) मुंबई-सुरत	श. १५९६ चैत्र व. ८ इ. १६७४ एप्रील १८

सिद्दीचें आरमार पावसांत राहून घेण्याला साफ नकार न देतां मोंगल सरकारावरच जबाबदारी टाकण्याचा प्रेसि॰चा हेतू आहे....

दुसरें कारण असें आहे कीं, गेल्या वर्षीं बेटावर सर्व प्रकारच्या जिनसांचा भरपूर पुरवठा होता. परंतु सिद्दीनें किनाऱ्यावर लूटमार केल्यापासून **शिवाजीनें** सर्व प्रकारचे

जिन्नस व सर्पण यांची बंदी केल्यामुळें दुष्काळ पडून आम्हांला पुरेल इतकाहि सांठा नाहींसा झाला आहे. मग सिद्दीच्या आरमाराला कोठून सामुग्री पुरविणार ?

तिसरें असें कीं; **शिवाजीनें** असा खडखडीत निरोप पाठविला आहे कीं, 'सिद्याला बंदरांत जागा दिल्यास मीं तुमच्याशीं युद्ध करून बादशाही आरमार जाळण्याचा शक्य तितका प्रयत्न करीन.... आणि हें बेट घेण्याकरितां **डच्चांना** १०००० सैन्याची कुमक करीन.' या करितां आपण सिद्दीला प्रवेश मुळींच देतां कामा नये.

फॅ. रे. सुरत भा. ८७ } (१६३१) { श. १५९६ चैत्र व. ८
पृ. १५३-५४ } सुरत-मुंबई { इ. १६७४ एप्रील १८

आपल्या ९ तारखेच्या पत्राला हें उत्तर पाठवीत आहों.... ऑक्झिंडेन जात आहे तेव्हां शिवाजीच्या देशांत व्यापाऱ्याच्या अधिक सवलती मिळतील अशी आशा आहे. (यादींतील) नजराण्याच्या वस्तु सराफांच्या ताब्यांत केल्याप्रमाणें ते तुमच्याकडे पोंचवितील. .... सिद्याला मेहेरनजरेनें शाकारण्यास परवानगी दिल्यामुळें **शिवाजी** नारायण शेणव्याजवळ **नाखुषीच्या** गोष्टी बोलला असेल हें खरें वाटतें. तथापि जेव्हां **शिवाजीशीं** चाललेल्या स्नेहाच्या तहाची बातमी इकडे सुभेदारास किंवा तुमच्या आसपास वावरणाऱ्या मोगली सरदारांस कळेल आणि त्याबरोबरच **सिद्दीचे** आरमाराला तुम्ही दिलेला **नकार** ते विचारांत घेतील, तेव्हां **त्यामचें अमित्रत्व** त्यांचे प्रत्ययास येऊन, आम्हांला किंबहुना कंपनीच्या व्यापारालाहि ठोकर बसेल, हीहि गोष्ट लक्षांत घेतली पाहिजे. परंतु बेटाचें स्वास्थ्य, रसद आणि व्यापार या गोष्टी शिवाजीशीं **सलोखा राखण्यावर अवलंबून आहेत** असें तुम्हीं वारंवार आमच्या मनावर बिंबविलें आहेच. म्हणून त्यासाठीं भोगाव्या लागतील त्या आपत्ति आम्ही शांतपणें भोगूं.... **सिद्दीशीं तह** करण्याची **शिवाजीची इच्छा नाहीं** त्याअर्थी दीर्घकाल धुमसणारें त्यांचें वैर एकदम बंद होणें अशक्य दिसतें....

फॅ. रे. सुरत भा. ८८ } (१६३२) { श. १५९६ चैत्र व. १२
पृ. १२९-१३१ इ. } कारवार-सुरत { इ. १६७४ एप्रील २२

अबूखान रुस्तुमजमा हा ह्या प्रांताचा अधिकारी होऊन इकडे आल्यापासून इकडील बंड शांत झालें. कोदेरा, कारवार, अंकोला, शिवेश्वर इत्यादि क्रमानें त्यानें ताब्यांत घेतांच **मियासाहेब** नरम आला. पण रक्षणाचा बंदोबस्त अजीबात न करून भागणार नाहीं. प्रांताचे **सुभेदारच** कदाचित् **उलट फिरतील**. **शिवाजीहि** येथून एक दिवसाचे अंतरावर आल्याची बातमी आहे. एका उंच **डोंगरावर** तो **किल्ला** बांधणार आहे, व तेथून ह्या प्रांताला त्याच्यापासून पुष्कळ उपद्रव पोंचेल.

फॅ. रे. सुरत मा. ८७ पृ. १५२, कालिकत-सुरत, ता. २५ एप्रीलः-**शिवाजी** एक **मूल्यवान सिंहासन बनवीत** असून येत्या जूनमध्यें तो स्वतःला राज्याभिषेक करून घेणार आहे.

ऑर्म ११४- ३ पृ. १०४-५ इ.	(१६३३) मुंबई-सुरत	श. १५९६ चैत्र व. ३० इ. १६७४ एप्रील २५

सिद्दीचें आरमार येथें राहिल्यापासून **शिवाजीनें** आपल्या मुलखांतून धान्य व सर्पणाच्या निर्यातीला बंदी केली आहे. आणि त्यामुळें पोर्तु० मुलख आणि भटकल व इतर शहरें इकडून आम्हांला अन्नसामुग्री आणावी लागते....सोबत **नारायण** शेणव्याचें पत्र पाठविलें आहे; तें (सुभेदाराला) दाखवावें. म्हणजे **शिवाजीच्या** हल्ल्यांपासून व त्यानें आमच्यावर युद्ध जाहीर केल्यापासून आम्हांला काय संकट येईल तें त्याला समजेल. कल्याण-भिवंडी व नागोठणा या भागाचा शिवाजीचा **सुभेदार** दादाजी याला शिवाजीकडून युद्धाचे हुकूम आल्याचें तो सांगतो.

फॅ. रे. मुंबई. मा. १ पृ. २६-२७ (द्वि. सं.) इ.	(१६३४) मुंबई कन्सल्टेशन.	श. १५९६ वैशाख शु. २ इ. १६७४ एप्रील २७

गेल्या शनिवारीं २५ तारखेला समुद्रांत वादळ झाल्यामुळें बंदराच्या मुखाशीं असलेलें सिद्दीचें आरमार आंत आलें. त्याला रसद वगैरे देण्याचा शिष्टाचार प्रेसिडेंटनें पाळला. त्यामुळें बादशहाचीं पांच गलबतें पावसाळ्यांत येथेंच शाकारण्याचे बाबतींत बोलणें करण्यासाठीं त्यानें एका नाखव्याला पाठविलें. त्याबद्दल कौन्सिल भरवून **शिवाजीकडून** प्रत्यक्ष किंवा त्यानें मथविलेल्या लोकांकडून व इतर तऱ्हांनीं त्या गलबतांना **त्रास** होईल ही गोष्ट उघडपणें त्या नाखव्यासमोर मांडून, पूर्वीचा नकार बदलूं नये असें ठरलें... शिवाय सिद्दीचें मुंबई बंदरांतील वास्तव्य आणि यामुळें **शिवाजीचें मन बिघडण्याचा** संभव ह्या गोष्टी लक्षांत घेतां ऑस्टिंडेननें शिवाजीकडे जाण्याची तयारी ठेवावी; परंतु वादळ कमी होऊन थोड्या दिवसांनीं शिद्दीचें **आरमार** येथून **बाहेर पडेपर्यंत**, जाण्याचें तहकूब ठेवावें असें ठरलें.

ओ. कॉ. मा. ३४ नं. ३९१८ इ.	(१६३५) मुंबईकडील हकीकत.	श. १५९६ वैशाख शु. ३ इ. १६७४ एप्रील २८

सुरत आणि मोंगलाचा इतर मुलख यांतील व्यापारावर कंपनी अवलंबून आहे; आणि वादळामुळें आरमाराला मुंबई बंदरांत शिरावें लागलें; ह्या दोन गोष्टींचा फायदा घेऊन या वर्षी पावसाळ्यांत आपलें आरमार येथेंच ठेवण्यास **सिद्दी संबूळनें प्रेसिडेंटला भाग पाडलें.** परंतु त्या बाबतींत ठरलेल्या अटी आणि त्याच्या मुक्कामामुळें

त्यांच्या हातून बेटांत खर्च होणारा पैसा यांकडे लक्ष देतां ही गोष्ट अनिष्ट झाली असें म्हणतां येत नाहीं. **शिवाजी** प्रथम याबद्दल फार नाखूष झाला. तथापि योग्य कारणें दाखविल्यावर त्याचेंहि **समाधान** झालें.

फॅ. रे. सुरत भा. ८७ } (१६३६) { श. १५९६ वैशाख शु. ४
पृ. १५५–५६ इ. } सुरत–मुंबई. { इ. १६७४ एप्रील २९

तुमचें १८ चें पत्र २६ ला पोंचलें. त्याबरोबर **सिद्दीला नकार** देण्याचीं कारणें लिहिलेलीं सुभेदार व सैद महमद यांच्या नांवचीं पत्रें मिळालीं. त्यांत आम्हीं थोडा फरक केला तो तुम्हांला समजावा म्हणून नक्कल पाठविली आहे:-(१) सिद्दीला काय हुकूम द्यावा हें संदिग्ध न ठेवतां, दंडाराजपुरी किंवा सुरत इकडे त्याच्या आरमाराला जाण्यास हुकूम द्यावा; असें आम्हीं स्पष्ट केलें आहे. (२) **शिवाजी डचांशीं संगनमत** करून हल्ला करील हें कलम गाळलें आहे. आणि (३) तुमचे कारकुनाची भाषा फाजील नम्रतेची आणि तुमच्या दर्जाला हीनत्व आणणारी होती तीहि दुरुस्त केली आहे.

फॅ. रे. मुंबई भा. १ } (१६३७) { श. १५९६ वैशाख शु. ५
पृ. २७–२८ (द्वि. सं.) इ. } मुंबई कन्सल्टेशन. { इ. १६७४ एप्रील ३०

डेप्युटी गव्हर्नर शॅक्स्टन, चाइल्ड, ऑक्सिडेन व उस्टिक अशा चार जणांनीं सिद्दीचे गलबतावर जाऊन, (१) **शिवाजी**कडून गलबतें जाळलीं जाण्याचा धोका आहे; (२) बेटावर अन्नसामुग्रीचा तुटवडा असून दुष्काळ पडण्याचा संभव आहे; व (३) आम्हीं सिद्दीला **आश्रय दिला तर शिवाजी आमच्याशीं युद्ध करील**; इत्यादि कारणें सांगून त्यानें बंदर सोडून निघून जावें; असें सामोपचारानें सांगावें. तो आग्रहानें तसें करण्याचें नाकारील तर बादशहाची त्याच्यावर द्वाही (Duay ?) घालून असें जाहीर करावें कीं, अन्नसामुग्री व पाणी घेण्याकरितां त्याला तीन दिवसांची सवड आहे. त्यापुढें बंदर त्याला बंद केलें जाईल. आणि नंतर बादशाही आरमाराला कांहीं धोका झाला किंवा त्यामुळें इंग्रज व मोगल यांच्यांत वैमनस्य उत्पन्न झालें तर त्याची जबाबदारी सर्वस्वी सिद्दीच्या शिरावर राहील.

फॅ. रे. मुंबई भा. १ } (१६३८) { श. १५९६ वैशाख शु. ९
पृ. २९ (द्वि. सं.)इ. } मुंबई कन्सल्टेशन. { इ. १६७४ मे ४

शिवाजीचा राज्याभिषेक जवळ आला. तरी त्याचे आधीं ऑक्सेंडेननें यावें; असें नारायण शेणव्याचें पत्र आल्यामुळें आणि तहाच्या दृष्टीनें सिद्दीचें आरमार या बंदरांत राहिलें त्याचा योग्य खुलासा लवकर करण्याकरितां, (१) ऑक्सेंडेननें लवकर निघावें; चाइल्ड, उस्टिक व ऑक्सेंडेन यांनीं नजराण्याची व्यवस्था ठरवावी; आणि जॉर्ज रॉबिन्सन व टॉमस मिचेल यांनीं ऑक्सेंडेनबरोबर मदतनीस म्हणून जावें असें ठरलें.

(से) फॅ. रे. सुरत भा. ८७ } (१६३९) { श. १५९६ वैशाख शु. १२
पृ. १६२ इ. } सुरत–मुंबई { इ. १६७४ मे ७

सिद्दीप्रकरण लक्षांत आलें. तेथील त्रास कसाहि बंद करावा. आमची फिकीर करूं नये. सिद्दीचें आरमार काढून लावण्यांत कसूर करूं नये. सुभेदाराचें पत्र, 'आरमार सुरतेला पाठवावें व लहान गलबतें बाहेर ठेवावयाचीं असल्यास त्यांचें भाडें द्यावें' असें सिद्दीला गेल्यामुळें बहुधा तो गलबतें उठवून सुरतेला आणील. तुमच्या पत्रांवर सुभेदाराचा हुकूम सिद्दीला अनुकूल होतो असें दिसून आल्यास तुमच्या सहीचें, सिद्दीच्या अत्याचारांचा पाढा वाचणारें असें **बनावट पत्र** आम्हीं तयार ठेविलें आहे तें देऊन टाकूं.

फॅ. रे. मुंबई भा. १ } (१६४०) { श. १५९६ वैशाख शु.१४
पृ. ३०–३१ इ. } सुरत कन्सल्टेशन { इ. १६७४ मे ८

नारायण शेणव्याकडून तहाबद्दलचे **शिवाजीच्या सहीचे** (signed by Sevagy) कागद आले. त्यांचें भाषांतर करून पहातां, पूर्वी ठरल्यापेक्षां कित्येक गोष्टी अधिक घातलेल्या दिसून आल्यामुळें, कांहीं अवश्य दुरुस्त्या पुढें मांडल्या. [पुढें ले. १६४२ ता. ११ मे १६७४ पहा.]

शिवाजी राजाचा कौलनामा किंवा ९ मोहरम (६ एप्रील) रोजीं कंपनीच्या वतीनें नारायण शेणव्यानें ठरविलेला तह (**शिवाजी**च्या वतीनें सुचविलेलीं कलमें)— आदिलशहाच्या कारकीर्दींत सुरतेची लूट होऊन कांहीं हिसा राजाच्या वांट्याला आला व इतर सैन्याला मिळाला. त्यावरून इंग्रज व शिवाजी यांमध्यें उत्पन्न झालेला वाद मिटविण्याकरितां, इंग्रजांना १०००० होन मिळावे. इंग्रजांनीं दरसाल ५००० होनांचा माल विकत घेऊन फक्त २५०० होन द्यावे. अशा तऱ्हेनें तीन वर्षांत ७५०० होनांची भरपाई करून घ्यावी. व राहिलेले २५०० होनांबद्दल राजापूरला त्यांनीं वखार घातल्यावर तेथील जकातींतून इतकी रकम भरेपर्यंत मुळींच जकात न देऊन, स्वतःची भरपाई करून घ्यावी.

राजापूर, चौल, दाभोळ, कल्याण इत्यादि शिवाजीच्या मुलखांतील कोणत्याहि ठिकाणीं **वखार घालण्यास इंग्रजांना स्वातंत्र्य** असावें. या बंदरांत इंग्रजांनीं आयात किंवा निर्यात केलेल्या मालाची किंमत चार व्यापाऱ्यांकडून ठरवून घेऊन त्यावर त्यांनीं फक्त शेंकडा २½ टक्के जकात द्यावी.

इंग्रजांनीं आपल्या वखारींत आपला माल वाटेल त्या व्यापाऱ्याला स्वतःच्या किंमतीला विकल्यावर त्या व्यापाऱ्यांनीं तो माल देशांतील जकाती भरून वाटेल तिकडे न्यावा; परंतु इंग्रजांनीं **खरेदी विक्री** करणें ती **बंदरांतच करावी**. अंतर्देशांत वहातूक करूं नये. एकादा माल विकला जात नाहीं म्हणून बंदरांतून दुसरीकडे पाठविणें झाल्यास तसा नेतांना, प्रथम भरलेल्या जकाती शिवाय अन्य जकात इंग्रजांपासून घेऊं नये.

[सदर पृ. ३६-३७] पुढील ले. १६४१ मधील कलमें उतरल्यावर पुढील मजकूर- शिवाजीनें गल्ह्याबद्दल जकात देऊं नये; आणि कंपनीनें जकातींचा मक्ता दिला असल्यामुळें, त्यामळें मक्तेदाराचें होणारें नुकसान कंपनीनें भरून द्यावें.

त्रिवर्गांनीं ठरविलेली नजराण्याची व्यवस्था पसंत आहे. ती येणेंप्रमाणें-

शिवाजी राजाला- १ हिरेजडीत शिरपेंच किंमत रु. ६९०
२ हिरेजडीत सलकडीं ,, रु. ४५०
२ मोतीं (रती १०१/१०),, रु. ५१०
रु. १६५०

शिवाजीचा पुत्र **संभाजी राजा** याला -
दोन लालखचित सलकडीं - रु. १२५
एक कंठी ८ हिऱ्यांची - रु. २५०
रु. ३७५

शिवाजीच्या फार मेहेरबानींतलि **मोरोपंडीत** यास, -
दोन मोठीं मोत्यें किंमत रु. ४००

शिवाजीच्या कृपेंतील **अण्णाजी पंडीत** यास, -
दोन सोन्याचे गोफ, वजन तोळे ७ किंमत रु. १२५

शिवाजीच्या कृपेंतील **निराजी पंडीत** यास, -
दोन पामऱ्या, किंमत रु. ७०

शिवाजीचा कारभारी (Secretary) **रावजी सोमनाथ**
यास - दोन पामऱ्या किंमत रु. ७०
रु. २६९०

इतर लहानसान अमलदारांना ऑक्झिंडेननें योग्यतेनुरूप व प्रसंग पाहून नजराणे द्यावे.

फॅ. रे. मुंबई, भा. ६ पृ. १२४-२८ (द्वि.सं.)इ.	(१६४२) शिवाजी तहाचीं कलमें	श. १५९६ वैशाख व. १ इ. १६७४ मे (१०)?

श्रीछत्रपती शिवाजी [The Noble Prince] राजे व ऑन. इं. ई. इं. कंपनी यांमधील शांतता, सहकार्य आणि सलोखा राखण्याविषयीं [**इंग्रजांनीं सुच-विलेलीं**] तहाचीं कलमें:-

१ उभयतांमध्यें आजपासून पक्क्या व अभंग सलोख्याचा तह असावा.

२ सर्व शत्रुत्व नष्ट व्हावें आणि उभयपक्षीं कोठल्याहि भागांत लूट करणें, छापे घालणें इत्यादि प्रकारें नुकसान करूं नये.

३ शिवाजीचे राज्यांत संचार, रहिवास व व्यापार या बाबतींत इंग्रजांना पूर्ण स्वातंत्र्य असावें. इंग्रजांनीं नित्याच्या जकाती देऊन सरकाराशीं आज्ञाधारकपणें वागावें. शिवाजी राजांच्या प्रजेला मुंबई बेटावर याच प्रकारच्या सवलती मिळाव्या.

४ परस्परांच्या बंदरांत आलेलीं परस्परांचीं जहाजें व्यापाराकरितां आलीं नसतां अडचणीमुळें आश्रयाला आलीं असतील तीं जकात घेतल्याशिवाय जाऊं द्यावीं. दुर्दैवानें फुटून किनाऱ्याला लागलेल्या गलबतांची जप्ती न करितां तीं मालकाचे हवालीं करावीं.

५ उभयपक्षांच्या जकातदारांनीं वगैरे शिरस्त्यापेक्षां बक्षिसें इत्यादि व्यापाऱ्यांकडून लुबाडून घेऊं नयेत.

६ कोणा इंग्रजावर शिवाजीच्या मुलखांत अन्याय झाला तर त्याला त्वरेनें न्याय मिळावा. इंग्रजांच्या मुलखांतहि शिवाजीच्या प्रजेला तसाच न्याय मिळावा.

७ कोणाहि खाजगी व्यक्तीच्या आगळिकीमुळें या सलोख्यांत व्यत्यय येऊं नये. गुन्हेगारालाच फक्त शिक्षा व्हावी. न्यायाला विरोध किंवा निष्कारण दिरंगाई झाल्याशिवाय जप्ती आदिकरून प्रकार होऊं नयेत.

८ मोंगलांच्या किंवा अन्य मुलखांतील इंग्रजांच्या वखारी स्वारीच्या वेळीं शिवाजीच्या लोकांनीं वांचवाव्या. लूट झाल्यास शिवाजीनें भरपाई करावी.

९ परस्परांनीं परस्परांचा समुद्रावर पकडलेला माल मालकीबद्दल पुरावा झाल्यास सोडून द्यावा.

१० इंग्रजांनीं राजापुरास वाटेल तेव्हां रहावें. राजानें आपल्या खर्चानें घर द्यावें. आयातनिर्यातीच्या वेळीं फक्त एकदांच जकात दिल्यावर मालाची वाहतूक करण्यास, मालाला देशांत कोठेंहि हरकत करूं नये.

११ आयात निर्यात मालावर शेंकडा २½ टक्के जकात इंग्रजांनीं द्यावी. माल बिक्री न होतां परत गेला तर त्यावर व कोणत्याहि प्रकारचे लांकूड सामानावर जकात मुळींच भरूं नये.

१२ इंग्रजांना खरेदीविक्रीचें पूर्ण स्वातंत्र्य असावें. सुभेदार, जकात घराचे दरोगे यांनीं आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करूं नये.

१३ देशी व्यापाऱ्यांनीं खरेदीविक्रीच्या बाबतींत इंग्रजांशीं केलेले करार पाळण्यास त्यांना शिवाजीच्या अधिकाऱ्यांनीं भाग पाडावें. तशी व्यवस्था न झाल्यास कर्जफेड किंवा कराराची पूर्ती होईपर्यंत इंग्रजांना अशा गुन्हेगारास आपल्या घरांत अडकवून ठेवण्याची कायद्यानें परवानगी असावी.

१४ राजापूरची वखार मोडकळीस आल्यामुळें तिची दुरुस्ती इंग्रजांनीं करून दुरुस्तीचा खर्च जकातींतून घ्यावा.

१५ इंग्रजांची डच, फ्रेंच, पोर्तुगीज व इतर कोणाशीं लढाई जुंपल्यास शत्रूंना शिवाजीनें मदत करूं नये आणि त्यांच्यापासून इंग्रजांच्या मालमत्तेचें व लोकांचें संरक्षण करावें. त्याच्या मुलखांतील कंपनीची इस्टेट कोणीं जप्त केल्यास शिवाजीनें भरपाई करावी.

१६ कोणत्याहि दर्जाच्या माणसानें इंग्रजांच्या वखारींत जबरदस्तीनें प्रवेश करूं नये. इंग्रजांचें देशांतील कोणाशीं वितुष्ट आल्यास तें सामोपचारानें संपवावें. रक्तपातापर्यंत गोष्टी विकोपास गेल्यास देशी माणसाचा गुन्हा असल्यास शिवाजीतर्फे शिक्षा देण्यांत यावी; इंग्रजाचा गुन्हा असल्यास त्याला बेड्या घालून मुंबईच्या गव्हर्नराचा हुकूम येईल त्याप्रमाणें (इंग्रजांनीं) शिक्षा द्यावी. देशी व्यापाऱ्यांचा इंग्रज नोकरांशीं हिशेबाच्या बाबतींत मतभेद झाल्यास वखारीच्या मुख्याकडे नेऊन त्याचा निकाल व्हावा.

१७ इंग्रजांचा नोकर शिवाजीच्या मुलखांत गेल्यास तो इंग्रजांचे हवालीं परत द्यावा.

१८ मुंबई जवळच्या मुलखांतून जकात भरल्याशिवाय बेटावर सर्पण आणण्याची परवानगी असावी.

१९ परस्परांचीं नाणीं परस्परांच्या मुलखांत अप्रतिहत चालावीं.

२० शिवाजी इंग्रजांच्या मुंबईच्या प्रजेला ज्या सवलती देईल त्याच सवलती इंग्रजांनीं शिवाजीच्या सर्व प्रजेला द्याव्या [प. ६९३].

ओ. कॉ. भा. ३५ नं. ३९६३ इ.	(१६४२)	श. १५९६ वैशाख व. २ इ. १६७४ मे ११

हेन्री ऑक्झिंडेनला (तहाचे बाबतींत) सूचना—

तुम्हांला कौन्सिलांतील वादविवादांवरून सर्व माहिती झालीच आहे. राजापूरचा पूर्वींचा मतभेद आतां मिटला असल्यानें, यापुढें हें बेट आणि शिवाजीचा मुलूख यांमध्यें सुरक्षित आणि किफायतशीर व्यापार चालू होण्याकरितां आपण झटलें पाहिजे. या कामीं आपल्याला यश मिळावें म्हणून इकडील पद्धतीप्रमाणें (या वेळीं थोड्या सढळ हातानें) मुक्रर केलेले नजराणे शिवाजी, **त्याची मातोश्री**, राजपुत्र इत्यादिकांना योग्य वेळीं द्यावे. नारायण शेणव्याच्या सूचनेप्रमाणें राज्याभिषेकाच्या प्रसंगाला अनुरूप अशी रत्नांची निवड केली असल्यामुळें हे नजराणे प्रिय होतील अशी आशा आहे.

राजापूरच्या भरपाईबद्दल १० ह. होन देण्याचा करार शिवाजीच्या सहीचा आला. त्यांत त्याच्या वकिलाशीं पूर्वी ठरविलेल्यापेक्षां **अधिक गोष्टी घातलेल्या** दिसतात. (१) पहिल्या व पुढील दोन वर्षांत दरसाल ५००० होनांचा माल खरेदी करून त्यापैकीं निमी किंमत देण्याचा करार पूर्वी झाला नसून, ही रकम आम्हांला रोखीनें मिळावी

असें ठरलें होतें. तरी त्याबद्दल आग्रह धरावा. परंतु त्यानें तसें ऐकिलें नाहीं तर विकत घ्यावयाचा माल जुना, अविक्रेय किंवा किंमती चढविलेला नाहीं असाच पाहून युरोपांत खपण्यासारखा असेल तोच, आपल्याजवळील किंमतीची यादी पाहून मग घ्यावा.

(२) शिवाजीच्या मुलखांत इंग्रजांनीं वखारी घालण्याचें जें कलम आहे त्यामध्यें **नागोठणें, पेण** इत्यादि मुंबईच्या लगत्याचा मुलूख स्पष्टपणें समाविष्ट केलेला नाहीं. तरी हा मुद्दा एका स्वतंत्र कलमांत नमूद करून घ्यावा. अशी परवानगी दिल्यानें व्यापार त्या भागाकडे आकर्षिला जाऊन प्रांताची भरभराट होईल हें त्याचे निदर्शनास आणावें.

(३) शेवटच्या कलमानें इंग्रजांनीं बंदराचे बाहेर व्यवहार करूं नये असें बंधन त्यानें घातलें आहे. ह्यामुळें अत्यंत गैरसोय होईल हेंहि त्याचे निदर्शनास आणावें. एकदां बंदरांत जकात दिल्यावर प्रांतांत वाटेल तेथें व्यापार करण्याची सवलत हिंदुस्तान, दख्खन, इराण, अरबस्तान वगैरे सर्व देशांत आम्हांला असून तशी येथें न मिळाल्यास व्यापाराला उत्तेजन मिळणार नाहीं; वगैरे सांगून त्या कलमांत योग्य बदल करून घ्यावा.

सिद्दीचें आरमार पावसांत मुंबईला राहिल्यामुळें **शिवाजीला** वैषम्य वाटणें साहजिक आहे. परंतु त्याला काढून लावण्याचे आम्हीं काय उपाय केले आणि त्याला कसें कठोरपणानें वागविलें हें तुम्हीं स्वतः पाहिलें आहे त्यावरून सांगितल्यास आणि व्यापाराचे दृष्टीनें आम्ही मोंगलांवर किती अवलंबून आहों हें त्याचे निदर्शनास आणून दिल्यास त्याचें समाधान होईल यांत शंका नाहीं. शिवाय, **शिवाजीचीं स्वतःचींच गलबतें** मुंबई बंदरांत शाकारलेलीं असल्यामुळें, तीच सवलत **सिद्दीला** देण्याचें, आमचे कितीहि मनाविरुद्ध असलें तथापि, आम्हीं नाकारणें मुत्सद्देगिरीचें होणार नाहीं असें त्याला सांगावें.

शिवाजीच्या मुख्य प्रधानांपैकीं **निराजी पंडीत** हा कंपनीला विशेष अनुकूल असल्यामुळें, **शिवाजीला** काय सांगावयाचें असेल तें त्याला कळवून व त्याचा सल्ला घेऊन सांगावें. शिवाजीचा पेशवा (or Second Minister of State) याचा सन्मान ठेवावा. **अण्णाजी** पंडितांशीं आपला वारंवार संबंध येणार असल्यामुळें त्याच्याशीं दाट परिचय होईल तेवढें चांगलें.

शिवाजी व सिद्दी यांच्या युद्धामुळें व्यापाराला अडथळा होतो आणि शिवाजीविरुद्ध सिद्दीला कुमक करणारें बादशाही आरमार किनाऱ्यावर उपद्रव देतें ही आपत्ति टाळण्याकरितां **उभयतांचा तह होण्याची खटपट** केली पाहिजे. या बाबतींत युद्धामुळें होणारी हानी व शांततेपासून होणारा लाभ याबद्दल **निराजी**शीं चर्चा करून त्याचें मन वळवावें. तुम्हांला **खासगी रीतीनें सांगितलेल्या गोष्टी** त्याला सांगाव्या. आणि याउपर त्याचें मन नच वळल्यास खुद्द राजापाशीं याबद्दल गोष्ट काढूं नये. उभयतांशीं चांगला शेजारी व मित्र या नात्याचे संबंध ठेवण्याची प्रेसिडेंटची इच्छा आहे. यामुळें उभयतांनींहि परस्परांत सलोख्यानें रहावें एवढेंच बोलून ठेवावें.

भीमजी पंडिताशीं राजापूरच्या बाबतींत ठरलेला करार इतका योग्य तऱ्हेनें पुरा करण्यामध्यें **निराजीचीच मध्यस्थी** उपयोगी पडली. तेव्हां त्याच्या उत्तेजनार्थ म्हणून आम्हांला मिळावयाच्या रकमेपैकीं **५०० होन** देण्याचें वचन आम्हीं त्याला दिलें. **भीमजी पंडितालाहि १०० होन** देण्याचें ठरविलें. त्यांनीं त्याबद्दल इच्छा दर्शविलीच तर वचन पक्कें करून रकमफेडीच्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या हप्त्यापर्यंत हें पारितोषिक देण्याचें लांबणीवर टाकतां येतें काय पहा. नाहींच जमलें तर त्यांचें मित्रत्व कायम राखण्यासाठीं पहिल्याच हप्त्यांतून देण्याचें नाकबूल करूं नका.

बालाघाट, अंतर्देशांतील पेठा आणि नागोठणें व आसपासचा मुंबईसमोरचा किनारा यांना जोडणारा मार्ग व्यापारी मालाची ने आण करण्यासाठीं खुला करण्याविषयीं **निराजी** पंडिताशीं चर्चा करावी. या योगानें व्यापार वाढून तो मुलूख सधन होईल, शिवाय तेथें आमचा व्यापार वाढतांच त्या मुलखाच्या रक्षणार्थ शत्रूविरुद्ध आम्ही मदत देऊं; इत्यादि सांगावें.

न्यायाची वागणूक व नाना तऱ्हेच्या सवलती देऊन शेजारच्या दख्खनमधून व्यापारोपयोगी माल स्वतःच्या मुलखांत आणविण्याची निराजीनें शिवाजीला सल्ला द्यावी. सर्व अमलदारांना सामोपचारानें वागण्याची ताकीद दिली असतां, आणि जुलूम व दमदाटीचे प्रकार थांबविले म्हणजे व्यापार वाढून साऱ्यांचेंहि उत्पन्न वाढेल.

हें काम करण्यास तुम्हांला बहुधा फार वेळ लागणार नाहीं. ३० ते ४० दिवसांत संपावें.

ओ. कॉ. भा. ३५ } (१६४३) { श. १५९६ वैशाख व. ४ ते ज्येष्ठ व. ५
नं. ३९६५ इ. } { इ. १६७४ मे १३ ते जून १३

ऑक्झिंडेनची **रायगडच्या** शिष्टाईची **रोजनिशीः**—

मे १३— किनाऱ्यावर पोर्तु०च्या चौल शहरांत आलों. **१४ तारखेला,** चौलांत असतांनाच दोन प्रहरचे तीन वाजतां, शिवाजी **चिपळुणाहून** रायरीला आल्याची खबर मिळाली. तेथून दोन मैलांवर असलेल्या **वरचें चौल** या शिवाजीच्या शहरांत गेलों. मोंगलांच्या युद्धांनीं उध्वस्त होण्यापूर्वी हें दख्खनच्या व्यापाराचें महत्त्वाचें केंद्र होतें. नागोठणा, पेण आदिकरून समोरच्या मुलखाचा ब्राह्मण सुभेदार येथें रहातो. तो थोडासा **इंग्रजांना प्रतिकूल** असल्याचें नारायण शेणव्याकडून कळल्यामुळें त्याला भेटून, पामरीजोडीच्या नजराण्यानें खूष केलें. १६ तारखेला होडीनें निघून अष्टमी, निजामपूर, गंगावली (Gongouly) या मार्गानें १९ तारखेला सकाळीं ९ वाजतां **पाचाडला** आलों...देवीला अर्पण करण्यासाठीं त्यानें नेलेलें छत्र (Sombrero[१]) शुद्ध सोन्याचें **सवा मण वजनाचें होतें**...... २० तारखेला निराजीशीं बोलणें झालें.

---

१ Hobson Jobson, 1903, p.851 a.

...**शिवाजी** बाळपणापासूनच **शिपाईपेशाचा** मनुष्य असल्यामुळें व्यापाराच्या बाबी त्याला चांगल्या समजून सांगण्याबद्दल मीं निराजीला सांगितलें; तेव्हां, ज्याच्या मुलखांतून बहुतेक माल येतो तो **आदिलशहा** तहाला उत्सुक असल्याचें......वगैरे त्यानें सांगितलें....शेवटीं त्याला एक आंगठी आणि त्याच्या **ज्येष्ठ मुलाला** [प्रल्हाद निराजी] पामरी जोड देऊन रजा घेतली. २१ तारखेला शिवाजी आल्याची खबर आली. व २२ तारखेला आम्हीं वर गडावर आलों. गड फितुरीखेरीज अभेद्य असून वर राज-महाल, दरबार, प्रधानांचीं घरें मिळून सुमारें तीनशें इमारती आहेत. **२६ तारखेला** राजदर्शन व संभाषण झालें. याच वेळीं राजा व राजपुत्र यांस नजराणा दिला. ...पुढें **मोरोपंताकडे तहाचें काम सोंपवून** उभयतांहि महालांत परत गेले. २८ मे रोजीं निराजीचा नजराणे देण्याबद्दल सल्ला घेतला. मोरोपंताकडे स्वतः जावें; इतर प्रधानांकडे नारायण शेणव्यामार्फत पोंचवावा; व काम जलद व्हावें अशी इच्छा असल्यास यादींत नाहींत अशा कांहीं अमलदारांना पामऱ्या वगैरे द्याव्या लागतील; इत्यादि निराजीनें सांगितलें. **मोरोपंताला** दोन पामऱ्या योग्य नसून ४ दिल्या पाहिजेत; **दत्ताजीपंत** वाकनवीस (publique intelligener) यास १२५ रु. ची एक आंगठी; **डबीर** किंवा फारशी लेखकाला ४ पामऱ्या; **शामजी नाईक** मुद्राधिकारी (Samgee Naigee, keeper of the seale) यास व **आबाजी पंडीत** यांस प्रत्येकीं ४ पामऱ्या दिल्या म्हणजे मग काम त्वरेनें होण्याबद्दल शंका राहणार नाहीं असें निराजीचें मत पडलें. **प्रल्हाद निराजी**ला बरोबर घेऊन मीं मोरोपंताकडे जाऊन नजराणा दिला...**२९ मे रोजीं** राजाची **तुला** केली. **वजन १६००० होन** झालें. यांत १ लक्ष होनांची भर घालून राज्याभिषेकानिमित्त गोळा होणाऱ्या ब्राह्मणांना त्याची खैरात वाटावयाची आहे. **३० मेला** काम कसें होत आहे याबद्दल निराजीकडे चौकशी केली. ...त्यानें दरबारचें धोरण व दोन कलमांबद्दलची अशक्यता कळविली. मोंगली व आदिल-शाही मुलखांत नौकाफूट इंग्रजांना दिली जात असल्यामुळें ह्याहि ठिकाणीं देण्याबद्दल शिवाजीचें मन कधींतरी वळवितां येईल. परंतु नाण्यांच्या बाबतींत शिवाजी प्रत्यक्ष विरोध करीत नाहीं एवढ्यावरच समाधान मानलें पाहिजे असा निराजीचा सल्ला होता. **जून ५** रोजीं, दुसऱ्या दिवशीं ७/८ वाजतां सिंहासनारूढ राजाला मुजरा व नजर करण्यासाठीं यावें म्हणून निराजी पंडिताचा निरोप आला. **ता. ६ जून** रोजीं, त्या वेळीं राजा भव्य **सिंहासनावर आरूढ झालेला** व मूल्यवान पोशाख केलेल्या प्रधानांनीं वेष्टिलेला दिसला. **संभाजी राजे**, पेशवा **मोरोपंत** आणि एक **श्रेष्ठ ब्राह्मण** हे सिंहासना-खालीं पायरीवर अगर ओट्यावर (on an ascent under the throne) बसले होते. राहिलेले सेनाध्यक्ष व इतर अमलदार बाजूला आदरानें उभे होते. मीं मुजरा केला व नारायण शेणव्यानें नजरेची आंगठी वर धरली. शिवाजीचें आमच्याकडे लक्ष जातांच त्यानें अगदीं सिंहासनाच्या पायरीजवळ येण्याचा आम्हांला हुकूम केला व पोशाख देऊन

आम्हांला तत्काल रजा दिली. थोडाच वेळ आम्हीं सिंहासनासमोर होतों. तेवढ्या वेळांत सिंहासनाच्या दोन्ही बाजूला सुवर्णांकित भाल्याच्या टोंकावर (मुसलमानी पद्धतीचीं) अनेक **अधिकारदर्शक व राजसत्तेचीं चिन्हें** असल्याचें आम्हीं पाहिलें. उजव्या हाताला २ मोठीं मोठ्या दांतांच्या मत्स्यांचीं सुवर्णाचीं शिरें होतीं. डाव्या हाताला अनेक अश्वपुच्छें व एका मूल्यवान भाल्याच्या टोंकावर समपातळींत लोंबणारीं सोन्याच्या तराजूचीं पारडीं, न्यायचिन्ह म्हणून तळपत होतीं. राजवाड्याच्या दाराशीं आम्हीं परत आलों तों दोन लहान हत्ती दरवाज्याच्या दोन्ही बाजूला उभे केले असून दोन सुंदर [पांढरे] घोडे शृंगारून आणिलेले दिसले. गडाचा मार्ग इतका बिकट होता हें लक्षांत घेतां हे पशु कोठून वर आले असावे याचा आम्हांला तर्कच करवेना!

जून ८ रोजीं, राजानें समारंभाशिवायच **चौथ्या बायकोशीं लग्न** केलें. ब्राह्मणांना दक्षणा देण्याचा क्रम चालू आहे. ता. **९ व १०**-निराजी पंडिताच्या पाठीस तहावर लवकर सही करण्याबद्दल टुमणें लाविलें. परंतु कलमें एकसारखीं जवळ बाळगूनहि **राजाच्या दानधर्मापुढें** त्याला सही करून घेण्यास अवसरच सांपडला नाहीं.

जून ११-नाण्यांशिवाय इतर सर्व कलमें मान्य करून **राजानें सही केल्याची** वार्ता निराजीनें सांगितली. [the Rajah had granted all our demands... and *had signed them*]. दुसऱ्या दिवशीं प्रधानांच्या सह्या होऊन आम्हांला निघण्यास हरकत रहाणार नाहीं.

जून १२-सर्व प्रधानांच्या सह्या झाल्या. निराजी पंडिताच्या घरीं जाऊन मीं कागद घेतले. निराजी फारच स्नेहानें बोलला. कलमांचे उतारे करणें इत्यादि कामगिरीबद्दल त्याच्या पुतण्याला एक पासरी देऊन आम्हीं १३ तारखेला रायरीहून निघालों. व १६ तारखेला मुंबईला आलों. [ऑक्झिंडेननें लिहिलेल्या पत्रांतील मजकुराची यांत पुनरावृत्ति केली नाहीं].

फ्रायर भा. १ पृ. १९५-२०९.; ऑक्झिंडेनच्या शिष्टाईचा फ्रायरनें दिलेला वृत्तांतः- [हा बहुतांशीं मागील लेखांकाप्रमाणें परंतु तृतीयपुरुषीं वाक्यरचना करून व स्थलविशेषीं बारीक शाब्दिक फेरफारांसह लिहिलेला असल्यामुळें, केवळ नवीन मजकूर आहे तेवढाच दिला आहे]-......शिवाजीनें भवानीला अर्पण केलेल्या (Lumbrico) चें वजन १। मण किंवा ४२ पौंड होतें...**निराजी.**-[ऑक्झिं० (Naragee) लिहितो तेथें फ्रायर (NarunGi) असें लिहितो].

फॅ. रे. सुरत, भा. ८८ पृ. १३८ इ.	(१६४४) ऑक्झिंडेन-सुरत	श. १५९६ वैशाख व. ६ इ. १६७४ मे १५

पोर्तु० **चौलला** गेल्या बुधवारीं रात्रीं आलों. **शिवाजीच्या भीतीमुळें** आठ वाजण्याच्या आंतच शहरचे दरवाजे बंद केले होते. पोर्तु० व्हाईसरायनें गोव्यांत

शिवाजीविरुद्ध युद्ध पुकारल्याची बातमी एकानें सांगितली. परंतु त्याचेशीं लढण्याचें सामर्थ्य पोर्तु० त नसल्यानें ही गोष्ट खरी वाटत नाहीं. शिवाजी आपल्या दौऱ्याहून रायरीला परत आला असल्यामुळें, येथील ब्राह्मण सुभेदाराची भेट घेण्यापुरताच थांबून, तांतडीनें शिवाजीच्या भेटीस जात आहें. शक्य तर तह पुरा होऊन पावसाळ्याच्या आंत परत येंतां आल्यास येईन.

फॅ. रे. सुरत भा. ८८ पृ. १३८–४१ इ. (१६४५) ऑक्झिंडेन, (रायगड पायथा)– सुरत. श. १५९६ वैशाख व. ११ इ. १६७४ मे २१

१९ तारखेला येथें पोंचलों. पण शिवाजी राज्याभिषेकाप्रीत्यर्थ दर्शनादि समारंभानिमित्त प्रतापगडच्या भवानीला (St. Bowany) सोन्याचें छत्र (Sombrero) अर्पण करण्यासाठीं गेल्याचें समजलें. तो दोन तीन दिवसांत परत येतांच काम झटपट उरकून घेतों. निराजीला पत्र व नजराणे दाखविले. हिऱ्यांच्या किंमती फुगवून लाविल्याचें तो म्हणाला. खरेदी घाईनें करावी लागल्याचें कारण सांगिल्यावर त्याचें कांहींसें समाधान झालें. सिद्दीच्या तहाविषयीं निराजीवर कांहींच परिणाम झाला नाहीं. राज्याभिषेक होतांच जोराचा हल्ला करून येत्या किंवा पुढच्या पावसांत दंडा घेण्याच्या इराद्यानें उत्तम सैन्याची तयारी चालू असून, तोफखान्यामध्यें १५ तोफांची भर शिवाजीनें नुकतीच घातली आहे. सिद्दीनें किल्ला ताब्यांत द्यावा आणि वाटेल तेवढी मनसब मागावी असें शिवाजीनें कळविलें; त्याला सिद्दीनें नकार दिल्यामुळें, आतां त्यानें शिवाजीसारख्या कट्ट्या शत्रूशीं दोन हात करण्यास तयार रहावें; असें निराजी बोलला. मोंगलांची सिद्दीला होणारी मदत किंवा सिद्दी किनाऱ्याला देईल तो उपद्रव, शिवाजीच्या खिजगणतींत नाहीं. गेल्या वर्षी सिद्दीनें खेळ केले तेव्हां शिवाजी दूर बालाघाटांत गुंतला होता; परंतु आतां त्यानें सर्व प्रकारचा पक्का बंदोबस्त केला आहे. त्यांतून, प्रथम आरमाराची कामगिरी सिद्दीवर सोंपवली तेव्हां किनाऱ्यावरील मुलूख व किल्ले जिंकण्याबद्दल त्यानें दिलेलीं वचनें त्याला अजूनपर्यंत पुरीं करितां आलीं नाहींत. यामुळें, बहादुरखानानें रागानें त्याच्याकडे कामगिरीचा जाब आणि खर्चाचा हिशेब मागून, अधिक पैसा यापुढें मिळणार नाहीं असें त्याला निक्षून कळविलें आहे.

बालाघाट ते समुद्रकिनाऱ्याचा मार्ग व्यापाराकरितां खुला करण्याबद्दल व व्यापाराला उत्तेजन देण्याबद्दल बोलणें काढतांच, निराजी असें म्हणाला कीं, दोन्ही गोष्टी लवकरच अमलांत येतील. शिवाजीशीं युद्ध करण्यापेक्षां शांतता असण्यांत अधिक फायदा आहे असें विजापूरच्या आदिलशहाच्या लक्षांत आल्याचें चिन्ह म्हणजे त्याच्याकडून तहाचें बोलणें करण्याकरितां कित्येक वकील येऊं लागले

असून, या पावसांत **सलोख्याचा तह** होईल यांत शंका नाहीं. आतां राज्याभिषेक झाला म्हणजे शिवाजी **राजपदाला शोभेल असें वागून,** आपल्या **प्रजेचें पालन** व व्यापार इत्यादि गोष्टींमध्यें अधिक चित्त घालूं लागेल. कारण, याच गोष्टी महत्वाच्या असून त्यांवरच आपल्या राज्याची भरभराट अवलंबून आहे हें त्याचे लक्षांत आलें आहे.

मोंगली सरदार दिलेरखान दरबारकडे गेला. आणि आतां फक्त **बहादरखान** राहिला आहे त्याला ते मोजीत नाहींत. पावसाळा संपतांच त्याच्या छावणीवर ते हल्ला करतील. निराजी पंडिताच्या मतें **मोंगलांशीं तह होण्याचा मुळींच संभव नाहीं.** कारण, मोंगल धनवान् असून आपल्या (अवाढव्य) सैन्याला काय उद्योग द्यावा ह्या विवंचनेंत असल्यानें, नेहमीं शिवाजीच्या पाठीस त्यांच्या **सैन्याचा ससेमिरा** असणारच ! परंतु, आदिलशहाशीं एकदां तह झाल्यावर, मोंगलांना थोपवून धरणें कठीण नसून, स्वराज्यांत भरभराट होण्याला मुळींच वेळ लागणार नाहीं.

सिद्दीच्या बंदरांत रहाण्याबद्दल सर्व हकीकत सांगितली. ती ऐकून **निराजीला** समाधान वाटलें. मोंगलांशीं असलेल्या संबंधांमुळें सिद्दीला शाकाराला जागा नाकारतां येत नाहीं हें खरेंच आहे. तेव्हां प्रत्यक्ष शिवाजीला विरोध करण्यास इंग्रजांकडून मदत होऊं नये एवढीच **राजाची अपेक्षा** असणार असें तो म्हणाला.

फ्रायर भा. १ } (१६४६) { श. १५९६ वैशाख
पृ. १९५ इ. } उल्लेख, शिवाजी { इ. १६७४ एप्रील-मे(!)

सिद्दीच्या आरमाराला या हंगामी एलिफंटा (घारापुरी) बंदरांत आश्रय घ्यावा लागला. सिद्दी हा मूळचा दख्खनमधील एक सरदार होता; तो आतां मोंगली आरामाराच्या सेनापतीपदावर चढला. किंवा शिवाजीपुढें टेकीस येऊन, किनाऱ्यावरील आपला प्रांत परत मिळविण्याच्या आशेनें त्यानें ही कामगिरी पत्करिली असें म्हटलें तरी चालेल. भूभागांत शिवाजीच्या हालचालींना पायबंद घालण्याचें काम दुसरे मोंगल सेनापती करितात. परंतु शिवाजीनें सिद्दीचा मुलूख ताब्यांत घेऊन, आतां **दंडाराजपुरीचा** मजबूत किल्ला घेण्याचें ठरविलें आहे. त्याचेंच रक्षण करणें सिद्दीला जड जातें. या उन्हाळ्यांत सिद्दी **दंडाराजपुरीचें** संरक्षण करण्यांत गुंतला होता. शिवाजी त्याचा उपहास करून, रायगडावर स्वतःला **महाराजा पद** घेण्याच्या तयारींत आहे. आपले हक्क राखण्याकरितां आपण त्याच्याकडे वकील पाठविला पाहिजे.

फ्रायर भा. १ } (१६४७) { श. १५९६ वैशाख
पृ. २४९ इ. } उल्लेख, सुरत { इ. १६७४ (मे!)

शिवाजीच्या **लुटीचीं स्मृतिचिन्हें सुरतेस** सर्वत्र दिसतात. आणि तो

पुनः येईल अशी सर्वांना प्रत्येक तासाला भीती वाटते. शहराची तटबंदी संपूर्ण होईपर्यंत (तो आल्यास) त्याचा राग शांत करतां यावा याकरितां ते एक लाख रुपये जमवीत आहेत. पुढें तटबंदी पुरी झाल्यावर रक्षणाकरितां ७०० माणसांची नेमणूक झाली; सर्व दरवाजांवर मिळून ६ युरोपिअन गोलंदाज ठेविले; व प्रत्येकीं ६ मोठ्या तोफा असलेले सुमारें ३६ बुरूज सजविले. शिवाय तटावर चढून येणें दुष्कर व्हावें म्हणून तटाच्या माथ्यावर भाल्याचे फाळ बसवून लांकडें टाकिलीं. [ऑर्म ११४-३ पृ. १७४ व १८८ येथील उल्लेख जमेला धरून पहातां डॉ. फ्रायर हा ऑगस्ट-सेप्टेंबरमध्यें सुरतेला गेल्याचें दिसतें !]

खं. १५ ले. १३३ सु. १०७५ रवल १	(१६४८) मु. सी.	श. १५९६ ज्येष्ठ शु. २ इ. १६७४ मे २७

अज दिवाण ठाणा ता। सातारे - मोकदमानी मौजे वरये-

जोगींद्रगीर मानभाऊ अजहती कमलनयन, सेकीन सा। निंब, यास इनाम जमीन ०१५ बिघे आहे. गुदस्ता जमीन पड होती. यंदां कीर्दीस लावितील, तरी लावूं देणें. पेस्तर सनद सादर होईल.

फॅ. रे. सुरत भा. ८८ पृ. १४१-४३ इ.	(१६४९) ऑक्झिंडेन, (रायरी)-सुरत.	श. १५९६ जेष्ठ शु. २ इ. १६७४ मे २७

२१ तारखेला राजा प्रतापगडाहून आला. दुसऱ्या दिवशीं आज्ञेप्रमाणें किल्ला चढून गेल्यावर एक चांगलें घर आमच्या दिमतीस मिळाल्यानें बरें वाटलें. दुसऱ्या दिवशीं आमची राजाशीं [भेट] करून देण्याबद्दल निराजीला सांगितलें. त्यानेंहि पुष्कळ प्रयत्न केला. परंतु आगामी राज्याभिषेकाची पूर्व तयारी, दोन दुसऱ्या बायकांशीं लग्नें (with two other [blank] women) इत्यादि गोष्टींत राजा गुंतून गेल्यामुळें, शेवटीं काल त्याची भेट झाली. नजराण्याचा त्यानें कृपेनें स्वीकार केला. व 'आतां तह झाला आहे तेव्हां तुम्हीं खुशाल बिनधोक व्यापार करा' असें तो म्हणाला. त्याच कामाकरितां आपण आल्याचें सांगून इतर सर्व देशांत मिळतात तशाच सवलती आम्हांला तुमच्या देशांत मिळाव्या; असें बोलणें काढतांच मोरोपंताकडे हवाला देऊन तो आपल्या महालांत गेला. महालांत तो आणि त्याचे ब्राह्मण दिवसांचे दिवस धार्मिक विधि करीत असतात. हल्लीं राजकारणाचें किंवा दुसरें कांहींच काम तो पहात नाहीं. आजउद्यां इतक्यांत पेशवा आदिकरून प्रधानांना नजराणे देऊन होतील. पुढें तहाच्या कलमांवर वाटाघाट होईल. **मराठींत भाषांतर** करून त्यांच्याकडे तीं दिलेलीं आहेत. त्यांपैकीं कित्येकांवर आणि विशेषतः **मुंबईचीं नाणीं स्वराज्यांत चालू करण्याबद्दलच्या** कलमावर आक्षेप घेतला जाईल. राज्याभिषेकानंतर

शिवाजी स्वतःचीच टांकसाळ काढून त्यांतील फायदा मिळविण्याचें ठरवीत असल्यामुळें ह्या कलमाला संमति मिळणार नाहीं; असें **निराजी** म्हणतो. वादळामुळें वगैरे किनाऱ्याला लागलेलीं गलबतें व माल आम्हांला परत मिळावीं ही आमची मागणी कोंकणच्या कायद्याप्रमाणें आक्षेपार्ह ठरेल.......

निराजीची आपल्याबद्दलची अनुकूलता लक्षांत घेऊन, शिवाजीच्या नजराण्यापैकीं एका अंगठीवर त्याचें मन बसल्यामुळें, ती त्याला आम्हीं दिली. राजावर त्याचें वजन असल्यामुळें ह्या मुलखांत आपण वखारी घातल्यावर त्याच्या मध्यस्थीचा आपल्याला पुष्कळच उपयोग होईल.

नजर करावयाची **दरबारी खुर्ची** आम्हीं भेटीला जाण्याच्या वेळापूर्वीं सुमारें अर्धा तास, म्हणजे अगदीं वेळेवर पोंचली.

फॅ. रे. सुरत भा. ८८ } पृ. १४४–४६ इ. }   (१६५०)   ऑक्झिंडेन, (रायगड)–सुरत   { श. १५९६ ज्येष्ठ शु. ५ { इ. १६७४ मे ३०

आपलें २३ चें पत्र पावलें. त्यावरून डचांच्या युद्धांत इंग्लंडच्या आरमाराला यश मिळाल्याचें कळलें. **परदेशांतील राजकारणाकडे लक्ष देणारे** किंवा परद्वीपस्थ राजांच्या उदयास्तांचा विचार करणारे कोणी या प्रांतांत असते तर ही आनंदाची बातमी मीं प्रसिद्ध केली असती. परंतु परदेशांतील यशापयशाची त्यांना फिकीर नसल्यामुळें स्वतःच आनंद मानून राहिलें पाहिजे.

तहावर व्हावयाच्या सह्यांबद्दल, व आमच्या भडोचच्या दलालाचें गलबत **दर्यासारंगानें** पकडून खारेपाटणास नेऊन ठेविलें तें परत देण्याबद्दल काय ठरलें, याविषयीं चौकशी करण्यासाठीं आज सकाळीं नारायण शेणव्याला **निराजीकडे** पाठविलें असतां, राज्याभिषेक होईपर्यंत सुमारें पंधरा दिवस व त्यापुढें तितकेच दिवस म्हणजे जवळ जवळ **एक महिनाभर कांहीं काम होणार नाहीं** असें कळवून त्यानें आमच्या भ्रमाचा निरास केला.

नाण्याचें व किनाऱ्यावर फुटलेल्या गलबताचें अशीं दोन कलमें वगळून बाकीच्या मागण्या त्यानें मान्य केल्या. नाणीं मोंगली नाण्याइतकींच चांगलीं झालीं तर लोक तीं आपखुशीनें घेतील; परंतु आपण तीं घेण्यास कोणाला भाग पाडणार नाहीं, किंवा प्रतिबंधहि करणार नाहीं, असें शिवाजीचें म्हणणें आहे. आणि तें खरें दिसतें. कारण येथें कांहीं मोड आणविली त्यांत **मुंबईचे पैसे** पुष्कळ होते. बग्रूक (ढबू ?) मात्र नव्हते. नावफुटीबद्दल त्याचें असें म्हणणें आहे कीं, एकदां इंग्रजांना तशी सवलत दिली म्हणजे फ्रेंच, डच इत्यादि सर्वांनाच तशी सवलत द्यावी लागेल; तशी आपण देण्यास तयार नाहीं. कारण, आपल्या देशाचा किंवा **पुरातन निजामशाहीचा कायदा** तसें करण्याच्या विरुद्धच आहे. बंदराशिवाय इतरत्र बिनजकातीनें व्यापाराची आम्हीं सवलत

मागतों ती त्यांना पसंत नाहीं. तथापि आदिलशाही कारकीर्दींत राजापुरास मिळालेल्या सवलती ते देतील असें वाटतें. त्या सवलती तसें पाहिलें तर थोड्या होत्या असें नाहीं. नारायण शेणव्याला येथें ठेवून मीं निघून जावें; कारण येथें राहून कांहीं अधिक उपयोग होण्यासारखा नाहीं असें निराजीनें सांगितलें. परंतु तुमच्या हुकुमाची वाट पहात आहें.

दिलेरखान दरबारला गेला व **बहादूरखानावरहि** बादशहाची इतराजी होऊन त्यालाहि परत बोलावून **रामसिंगाला** शिवाजीशीं तह करण्यासाठीं पाठविला; ही बातमी तुमच्या पत्रांत आहे त्याप्रमाणेंच येथेंहि कळली. मोंगल व आदिलशहा या उभयतांशींहि तहाचा असा योग आल्यामुळें **राजाच्या मुलखांत वखारी** घालणें आतां सुलभ आणि फायद्याचें होईल असें वाटतें.

राजापूरबद्दल ठरलेल्या करारांत बदल करून घेण्याचा प्रयत्न यशस्वी न होतां उलट **शिवाजी** नाखूष होईल असें निराजीचें म्हणणें आहे. दरसाल ठरल्याप्रमाणें माल राजापुरांत दिला जाईल. शिवाजीजवळ कापड मुळींच नसून मिरीं, सुपारी आणि नारळ यांचा पुरवठा तेथून होईल.

फॅ. रे. सुरत भा. ८७ } (१६५१) { श. १५९६ ज्येष्ठ शु. ५
पृ. १७१-७२ इ. } सुरत-मुंबई. { इ. १६७४ मे ३०

सिद्दीला राहूं द्यावयास नको होतें. शिवाजीशीं युद्ध चालू होतांच त्याचे लोक दंगा करूं लागतील. परंतु निदान कलमें लिहून घेतलीं हें चांगलें झालें. **सिद्दीचीं** गलबतें मुंबईत आहेत म्हणून **शिवाजी** नाखूष होऊन तह लांबणीवर पडेल तर तें बरें होणार नाहीं [**से**].

फॅ. रे. सुरत भा. ८७ } (१६५२) { श. १५९६ ज्येष्ठ शु. ९
पृ. १७६ इ. } सुरत-धनगांव (Dungum ?) { इ. १६७४ जून २

पठाणांनीं बंड करून बादशहाचें कांहीं सैन्य कापून काढलें आणि मदतीकरितां बादशहानें आपल्या सर्व उमरावांना बोलाविलें वगैरे बातमी आम्हांला आधींच कळली होती. **दिलेलखान** आणि **बहादूरखान** यांच्या जागीं राजा **जयसिंगाचा** (Jessin) **मुलगा** [illegible] असून, ह्या बाजूला **शिवाजीला प्रवेश** करूं देणार नाहीं अशी आशा वाटते. [illegible] पावसाळ्यांत तरी त्याची भीति बाळगण्याचें कारण दिसत नाहीं.

फॅ. रे. मुंबई. भा. ६ } (१६५३) { श. १५९६ ज्येष्ठ शु. १२
पृ. १३९-४१ (द्वि. सं.) इ. } [illegible] ऑर्किंझडेन. { इ. १६७४ जून ५

तुमचीं २७ व ३० [illegible] मिळालीं. **शिवाजीच्या** पहिल्याच भेटीवरून

पुढील तहाबद्दल बरीच आशा वाटते. ज्या कलमांबद्दल मतभेद आहे तीं सोडून देऊन निष्कारण **आग्रह धरूं नये**. परस्परांचा अधिक परिचय होईल त्याप्रमाणें अधिक हक्क मिळत जातील...**निराजीला** आंगठी दिली त्याला मान्यता आहे...**चांदीच्या नाण्यांना** राजानें विरोध केला नाहीं म्हणजे झालें. मग राजाकडून अधिक कांहींच आम्हांला नको. परंतु आमचे **बगरूकहि** चालावे अशी आज्ञा यापुढें मिळविली पाहिजे. **आमच्या देशांतील मालापासून** बनणारें हें नाणें असल्यामुळें त्याच्या चलनानें आमचा पुष्कळ फायदा व्हावा अशी आमची अपेक्षा आहे. परंतु याहि बाबतींत विशेष ताणूं नये. **नावफुटीबद्दल** ते जो कायदा आम्हांला लावतील तोच आम्हीं त्यांना लावूं!...फक्त बंदरांतच जकाती द्याव्या (पुढें द्याव्या लागूं नयेत); असें नच जमल्यास मग आदिलशाही कारकीर्दींतील आमचे पूर्वापारचे हक्क मिळतील तरी मान्य करून घेऊं. नारायण शेणव्याला पुढें राहावें न लागतां आतांच तहावर सह्या होतील तितकें चांगलें.... **राजापूरच्या करारांत बदल होणें शक्यच दिसत नाहीं**; तर त्या बाबतींत **कांहींच** यापुढें **बोलूं नये**.

का. प्र. सा. पृ. १३ ले. १ रा. श. १	(१६५४)	श. १५९६ ज्येष्ठ व. १ इ. १६७४ जून ९

श्रीशिवाजी राजे—बाळाजी आवजी प्रभु चिटणीस.

तुम्ही स्वामिसेवा निष्ठेनें करून श्रमसाहास पुरे केले. राज्यवृद्धीचे कामीं आला, यावरून तुम्हावर कृपाळू होऊन अष्टप्रधानांतील पद द्यावें मनीं धरलें असतां, तुम्ही विनंती [केली] कीं, आपणाकडे चिटणीसीचा दरक चालत आहे. हा अक्षय वतनी वंशपरंपरेनें संनिध व सर्व राज्यांतील चालवावा. कारखानिसी व जमानिसी दोन धंदे राज्यांतील आपल्याकडे दिले ते अक्षय्य असावे. यावरून तसें तुम्हाकडे दिले असे. स्वामी व वंशींचा कोणीहि अन्यथा करणार नाहीं. लिहिलेप्रमाणें सदरहू प्रयोजनाचे व्यापाराची सेवा करून पुत्रपौत्रीं अनुभविणें.

सं. २० ले. २६८ सु. १०७५ रबल १९	(१६५५) खुर्द खत फा. मु. सी.	श. १५९६ ज्येष्ठ व. ६. इ. १६७४ जून १४

अजर सेख अजम लस्किरी मियासेख– देसमुखानी पा मंगळवेढा

तुम्हांकरतां नागणियानें दावा करून विलायती खराब केले. त्यासी किती मदत करावे तितुके केले. त्याकरता भले भले लस्किरी ठार जाले. दोही सेहे घोडे व हसम पा मार मधे ठेविले आहे. रयेतीस दिलासा देऊन लावणी संचणी करावी. तुम्ही दिवाणचे दौलतखाह अहा. तुमचे मुजरा होईल.

राम. अं. ६५-६६ ले. १६ संवत्सर आनंद व मिती } (१६५६) फा. मु. व सी. { श. १५९६ ज्येष्ठ व. ९ इ. १६७४ जून १७

आनंदराऊ—दामोदर व सिउभट सेडगे सो येहुलः—आम्ही त्या प्रांती देवदर्शनास आलों तर तुमच्या गृही राहूं.

स. पृ. १२२ ले. १६ रा. श. १ } (१६५७) { श. १५९६ ज्येष्ठ व. १३ इ. १६७४ जून २१

छत्रपती शिवाजी यांचा अष्टप्रधानादि अमलदारांचा कानुजाबता.

ओ. कॉ. भा. ३४ नं. ३९१८ इ. } (१६५८) मुंबई हकीकत. { श. १५९६ ज्येष्ठ इ. १६७४ जून

ऑक्झिंडेननें मोठ्या धोरणानें शिवाजीशीं **किफायतशीर, कायमचा** व **चिरस्थायी तह** घडवून आणिला. **शिवाजीनें** राज्याभिषेक करून घेऊन २ लाख होन ब्राह्मणांना व इतरांना वाटले. त्यानें **मोठें सैन्य** उभारलें असून त्याला कोणा शत्रूची भीती वाटत नाहीं. उलट शेजारच्या सर्व सत्ताधीशांना त्याची **दहशत** वाटते. विशेषतः **पोर्तु०** पासून **चौथाईची** मागणी करून त्यानें त्यांना त्रस्त केलें आहे.

चिट. घ. पृ. १७ रा. १ संव. } (१६५९) राजपत्र. { श. १५९६ आषाढ शु. १ इ. १६७४ जून २४

श्री **राजा छत्रपती—आणाजीपंत सचीवः**—बाळाजी आवजी चिटणीस याजकडे दाभोळ वगैरे गांवांचा खोतीसुद्धां मोकासा दिला आहे. कामावर हुसेन याकुब दळवी ठेविला आहे. त्याचेकडून काम घेणें.

खं. २० ले. २११ सु. १०७५ रखर १७ } (१६६०) खुर्दखत मु. २ व सी. { श. १५९६ आषा. व. ४ इ. १६७४ जुलै १२

अजर. म. सर्क म. रेहान— कारकून व देशमूख ता करकंब.

नरसिंहभट बिन नारायणभट सा पंढरपूर यानें सांगितलें कीं, आपणास इनाम जमीन चावर १। मौजे गुलसरे ता मा येथें आहे. तिचा भोगवटा काशीस गेल्यामुळें तुटला. तरी गांवीचे मोख्तसर कुणबी व बुढे पाटील यांस पुसोन गहदम चालिले असेल तसे व कदीम इनामती तजकरा रुजू पाहोन मलिक अंबर याचे वेळीं चालिलेप्रमाणें चालवावे.

फॅ. रे. सुरत भा. ८७ पृ. १८३ इ. } (१६६१) सुरत—रॉबर्ट स्मिथ, दिल्ली. { श. १५९६ आषाढ व. ८ इ. १६७४ जुलै १६

शिवाजीच्या जूनमधील **राज्याभिषेक** प्रसंगीं निदान वीस हजार ब्राह्मण व त्याचे सर्व अमलदार हजर होते.

खं. २० ले. २५८ }
श. }

(१६६२)
कर्जरोखा

{ श. १५९६ श्रावण शु. १
{ इ. १६७४ जुलै २३

धनको—विठोजी बिन सोकरावा कुलकर्णी मो गोडगौ पा संगमनेर.

ऋणको—तानाजी पा मोक. व बापूजी जुपेढा मो मा.

घेतले ८८५ रुपये. २५० वर कुलकर्ण दिधले. व ५३५ रु. हे कुलकर्णाचे सिरी घेतले. आधी रुपये घेतले मग खत लेहोनु दिधले.

फॅ. रे. मुंबई भा. १ }
पृ. ७२ (द्वि.सं.) इ. }

(१६६३)
मुंबई कन्सल्टेशन

{ श. १५९६ श्रावण शु. ९
{ इ. १६७४ जुलै ३१

ज्याअर्थी शिवाजीच्या कराराप्रमाणें रकमेची फेड होण्याकरितां त्याच्या देशांतील माल खरेदी करणें जरूर आहे, आणि मिरीं, नारळ व सुपारी यांखेरीज अन्य माल तेथें होत नाहीं, आणि ज्याअर्थी मिरीं महागाईनें खरेदी करावीं लागतात त्याअर्थी नारळ व सुपारीच खरेदी करण्यासारखीं राहातात. आणि हाच त्यांचा हंगाम असल्या-मुळें, दिरंगाई केली तर आणखी एक वर्षपर्यंत हा व्यवहार लांबणीवर पडणार; हें लक्षांत घेऊन, कंपनीतर्फे माल-नारळ किंवा सुपारी किंवा दोन्ही वस्तु-घेण्याकरितां **मुखत्यार** नेमून त्याबद्दल **राजापूरच्या** सुभेदाराकडे, पत्र पाठवून त्याचें उत्तर मागवावें.

फॅ. रे. सुरत भा. ८७ }
पृ. १८७ इ. }

(१६६४)
सुरत-मुंबई.

{ श. १५९६ श्रावण शु. १०
{ इ. १६७४ आगस्ट १

औरंगाबादेहून अशी बातमी आली आहे कीं, शिवाजीनें **बहादुरखानाच्या** छावणीवर हल्ला करून लूटमार केली. बादशहाकरितां जमविलेले जातिवंत दोनशें घोडे व सुमारें एक कोटीचा खजीना लुटून, त्याचे सर्व तंबू त्यानें जाळून टाकले. शिवाजीच्या २००० घोडेस्वारांनीं बहादुरखान व त्याचें सैन्य यांस **हूल दाखवून** २०।३० कोस दूर नेल्यावर इकडे मागें ७००० घोडेस्वारांनीं हा पराक्रम केला अशी बोलवा आहे. परंतु खात्री नाहीं.

नुकत्याच झालेल्या तहामुळें **शिवाजीवर** कितपत विश्वास ठेवावा हें कळ-वावें. त्याचा कौल मिळेल तर घेऊन पाठवावा. परंतु त्याचें सैन्य या बाजूला आलें तर त्याचा उपयोग होईल काय ?

[से]—गलबताची येथें जरूर नसेल तर पाठवून देऊं. परंतु शिवाजीनें येथल्या त्याच्या ब्राह्मणा (वकिला) च्या मार्फत गेल्या **३ वर्षांच्या चौथाईचे ९ लाख रुपये** सुभेदाराकडे मागितले आहेत. हे दिले नाहींत तर 'पावसानंतर पाहून घेईन' अशी त्यानें धमकी दिली आहे. **शिवाजीनें** जेद्दा व मक्का इकडून परत येणारीं गलबतें पकडावीं असा आपल्या आरमाराला हुकूम दिला, अशीहि दुसरी एक बातमी आहे. सुभेदारानें आमचेकडे चौकशी केली आहे. तुम्हांला माहिती असेल तर कळवा.

फॅ. रे. सुरत भा. ८७ } (१६६५) { श. १५९६ श्रावण शु. १५
पृ. १८८ इ. } सुरत–मुंबई { इ. १६७४ आगस्ट ६

ऑक्सिंडेननें केलेल्या तहाचीं कलमें वगैरे पाहून ठीक वाटलें. हा तह होईपर्यंतच्या कालांतील राजापूरला झालेल्या आमच्या नुकसानीची भरपाई करण्याबद्दलच्या अटी ज्या कांहीं असतील त्या आम्हांला पाहिजे आहेत! त्यांच्यावर पुढें वखार घालणें अवलंबून आहे. नाहींतर अजूनहि कांहीं खुसपट निघेल. आतां **विजापूरचें सैन्य** जवळच टेकडीवर राहून व्यापाराला अडथळा करितें. डचांशीं आमचें युद्ध चालूच आहे आणि आमचेजवळ पुरेसा मालहि नाहीं. हीं आमच्या मतें, आणखीं विरुद्ध जाणारीं कारणें दिसतात. यावरून आम्ही अगदींच उलट आहों असें समजूं नये. **निराजीच्या** म्हणण्याप्रमाणें **शिवाजीचा आदिलशहाशीं** एकदम तह झालाच तर विलायतेचीं जहाजें आल्यानंतर वखार घालण्याचा विचार करण्यास हरकत नाहीं.

फॅ. रे. सुरत भा. ३ } (१६६६) { श. १५९६ श्रावण शु. १५
पृ. २८–२९ (तृ. सं.) इ. } सुरत कन्सल्टेशन { इ. १६७४ आगस्ट ६

मुंबईच्या प्रेसि० च्या २० तारखेच्या पत्रांतील मुद्यांबद्दल खालील ठराव करण्यांत येत आहेः—

राजापुरास पावसाळा संपतांच वखार घालावी का थोडी लांबणीवर टाकावी याबद्दल विचार करून, आमचीं युरोपांतील गलबतें येऊन तिकडून राजापुरास ठेवण्याजोगा माल कोणता येतो व युरोपांत पाठविण्याच्या माल खरेदीविषयीं (तेथील खरेदी ठरविण्याकरितां) काय हुकूम येतो तें पाहून नंतर वखार घालावी, असें कौन्सिलला वाटतें. जितक्या लवकर वखार घालावी तितक्या लवकर जकातींच्या सवलतीच्या रूपानें व्हावयाची भरपाई होऊं लागेल हें खरें असलें, तथापि **विजापूरकरांचें शिवाजीशीं युद्ध** चालू आहे, आणि त्या शहरावर व बंदरावर एकदम स्वारी करितां येण्याच्या तयारीनेंच आदिलशाही सेनापति राहिला आहे हें लक्षांत घेतां, तेथें आजच व्यवहारांत पडणें तितकें सुरक्षित नाहीं असें आमचें मत आहे.

राम. अं. ६२ ले. ४ } (१६६७) { श. १५९६ श्राव. व. १
सु. १०७५ जवल १४ } खुर्देखत फा. मु. व सी. { इ. १६७४ आगष्ट ७

अजर. **नाइकजी राजे खराडे**–कारकून व देशमूख मसूर.

कासीभट बिन अंतभट सो पाटण यास २० बिघे इनाम जमीन चालत आहे. **हाली माहाराजास मोकासा अर्जानी जाहाला आहे.** माहाराज धर्मपरायण देउब्राह्मणाचे भगत आहा. ऐसियास आपण जनोब्रदार. यास्तव १० बिघे आणखी दिल्हेया कृष्णातीरी स्नानसंध्या करून आसीर्वाद देऊनु असो. तरी भट गोसावी यास पावचावर दुबाला कीजे.

(से) फॅ. रे. सुरत भा. ३ वि. ४ पृ. ३३ इ. | (१६६८) सुरत कन्सल्टेशन. | श. १५९६ श्रावण व. २ इ. १६७४ आगस्ट ८

शिवाजीचें सैन्य सुरतेला येण्याचा संभव आहे. करितां आमच्या बंदोबस्तासाठीं सैन्य पाठवणें जरूर आहे.

फॅ. रे. सुरत भा. ८७ पृ. १९०-९१ इ. | (१६६९) सुरत-मुंबई. | श. १५९६ श्रावण व. ६ इ. १६७४ आगस्ट १२

मुंबईकरांनीं चार्लसच्या मुखवट्याचीं व 'इंग्रज किंग चार्लस' असें फारशींत लिहिलेलीं नाणीं काढलीं त्याबद्दल मतभेद. हें नाणें अधिक कां चालावें ? सामान्य लोक फसले तथापि सराफ हे त्याच्या **धातूची किंमत** पारखूनच घेतील. **दख्खनमध्यें** सर्वत्र तसाच प्रघात असल्यामुळें विजापूर किंवा कारवार कोठेंहि त्याच्या मुळांतील धातूच्या किंमतीवरच त्याचें चलन होईल.

फॅ. रे. सुरत भा. ८७ पृ. १८९ इ. | (१६७०) सुरत-मुंबई | श. १५९६ श्रावण व. ७ इ. १६७४ आगस्ट १३

पुढच्या महिन्यांत **शिवाजीचें** सैन्य इकडे येण्याची भीती नाहीं असें तुम्हीं कळवीत असाल तरच इराणचा माल भरलेलें गलबत आम्हीं खालीं पाठवून देऊं.

ऑर्म भा. ११४-३ पृ. १५९ इ. | (१६७१) मुंबई-सुरत | श. १५९६ श्रावण व. ९ इ. १६७४ आगस्ट १५

मोरोपंत, (शिवाजीचा पेशवा आणि ह्या भागांतील मुख्य सेनापती) ८।१० हजार सैन्यानिशीं **कल्याणभिवंडीजवळ** आहे. ह्यामुळें पोर्तुगीज भयत्रस्त झाले. त्यानें त्यांचेकडून चौथाईची मागणी केल्यामुळें त्यांनीं **वसई** येथें पक्का बंदोबस्त केला व युद्धाची तयारी केली. परंतु त्यांतील सैन्य कोंकणांत पांगून गेल्यामुळें त्यांची भीति निमाली. आतां **शिवाजी स्वतंत्र राजा** (a sovereign Prince) झाल्यामुळें, आपल्या मोठ्या नांवाकरितां म्हणून कांहीं अचाट कृत्य करील असा संभव आहे. आणि तसें कांहीं तरी त्यानें मनांत योजिलें आहे हें खास. कारण, तो उत्कटतेनें युद्धाची तयारी करीत आहे. मात्र तो **बहादुरखानाच्या** छावणीवरच हल्ला करील अशी आम्हांला पक्की बातमी नाहीं. आम्हांलाहि तें खरें वाटत नाहीं. कारण, ते **परस्परांचे चांगलेच स्नेही** असल्यानें इतके असे आपआपसांत भांडणार नाहींत. शिवाय ते दोघेहि इतके मोठे युक्तिबाज आणि धोरणी शत्रु आहेत कीं परस्परांवर निष्कारण विश्वास ठेवणार नाहींत किंवा परस्परांकडून चकवले जाणार नाहींत ! **मक्केहून** येणाऱ्या गलबतांवर छापा घालण्याचा हुकूम **शिवाजीच्या** आरमाराला

दिल्याचें आह्मीं ऐकिलें नाहीं. परंतु **उमाजीचा** माईबंद आणि इतर पळून गेलेले लोक यांना शिवाजीनें नोकरींत घेतलें हें खरें आहे. आणि त्यांनीं त्याच्या डोक्यांत ही गोष्ट भरविली असण्याचा संभव आहे. तथापि शिवाजीच्या **आरमारांत** लहान गुराबा आणि हलक्या क्षुद्र नावा यांचाच भरणा असल्यामुळें आणि त्याचे खलाशी दर्याचे अननुभवी असल्यामुळें, मला त्यांची मुळींच भीति वाटत नाहीं. पण **कल्याणचा** सुभेदार एक मोठें गलबत—कोणत्या नमुन्याचें तें कोण जाणे ?—बांधवीत आहे असें समजतें. **राजापूरला** त्याचीं मस्कतला व्यापारी सफरी करणारीं ४।५ तिरकटी तारवें आहेत असेंहि मीं ऐकिलें आहे ! परंतु समुद्रावर हालचाल करण्याची त्याची कांहीं तयारी असल्याचें ऐकिवांत नाहीं. त्यांतून **सिद्दीचें** आरमार आतां समुद्रसंचारार्थ बाहेर पडणार असल्यामुळें त्याच्या भीतीस्तव त्याचें कोणतेंहि गलबत बाहेर फिरकेल असें वाटत नाहीं. शिवाय, जरी यदाकदाचित् शिवाजीनें अशी तयारी केली असती तरी आमचे **वकील** राजापूर, दाभोळ इत्यादि **सर्व बंदरांतआहेत** त्यांचेकडून मला बातमी यावयास पाहिजे होती. तथापि चौकशी करून काय तें कळवितों.

शिवाजीनें तहांत मोंगली अगर दख्खनी मुलखांतील कोणत्याहि वखारीला त्रास न देण्याचें, व त्याप्रमाणें सर्व सेनापतींना हुकूम देण्याचें वचन दिलें आहे. म्हणून **सुरते-बद्दल काळजी नको**...तथापि सावध रहावें हें बरें !

मोंगलांशीं अधीक चांगल्या रीतीनें तोंड देतां यावें याकरितां आदिलशहा व शिवाजी यांचा तह होणें उभयतांच्या हिताचें आहे. कारण आपसांत भांडून कोणा-च्याच हातास कांहीं लागणार नाहीं. पण फायदा झालाच तर तो लुटालूट करणाऱ्या शिवाजीचा होईल. कारण आदिलशहा किती कठोर झाला तरी शिवाजीचें सैन्य नाश पावावें किंवा असमर्थ व्हावें यांत त्याचें हित नाहीं.

ऑर्म भा. ११४-३ पृ. १७३ इ.	(१६७२) मुंबई-सुरत	श. १५९६ भाद्र. शु. १ इ. १६७४ आगस्ट २२

किनाऱ्यावरील सरकारकून (Chief Minister on the main) **मोरोपंडीत** यानें प्रेसि० ला अनेक पत्रें व निरोप पाठवून, इंग्रजांच्या गलबतांतून त्याच्या देशांत मीठ पोंचविण्याबद्दल विनंति केली. कारण त्याच्या बंदरचा व्यापार अडविण्याचा चंग बांधून बसलेल्या **सिद्दीच्या भीतीस्तव** मराठ्यांचीं गलबतें बाहेर पडूं शकत नाहींत. प्रेसि० नें नकार दिला तरी त्याचें मागणें थांबलें नाहीं.

फॅ. रे. मुंबई, भा. १ पृ. ७८ (द्वि. सं.) इ.	(१६७३) मुंबई कन्सल्टेशन.	श. १५९६ भाद्रपद शु. ६ इ. १६७४ आगस्ट २६

आम्ही शिवाजीपेक्षां **सिद्दीला** अधिक सवलतीनें वागवितों अशा सबबीवर,

शिवाजीनें प्रेसिडेंटला असें कळविलें आहे कीं, ' सिद्दीला यापुढें मुंबई बंदरांत राहूं दिलें तर आमचा तह झाला असला तथापि, मी सिद्दीवर बंदरांतच हल्ला करून तुमच्याशीं युद्ध पुकारण्यास चुकणार नाहीं. ' ही बातमी सिद्दीला एकदम कळवावी आणि आतां पावसाळा संपला असल्यामुळें व पावसाळ्यांतील त्याची अडचण आपण उत्तम भागविली असल्यानें, त्यानें आपलें आरमार घेऊन बंदर सोडावें असें त्यास सांगावें.

फॅ. रे. सुरत भा. ८७ पृ. १९६-९७ इ. } (१६७४) सुरत-मुंबई { श. १५९६ भाद्र. शु. १२ इ. १६७४ सप्टेंबर १

कालच्या सभेंत शिवाजीनें राजापूरच्या सुभेदाराला तहाच्या बाबतींत दिलेले हुकूम वाचले. सामान्यतः दख्खनकडे मिळतात त्यापेक्षां ह्या सवलती कमी आहेत....व्यापाराकरितां बंदराचे बाहेर माल नेऊं न देणें अन्यायाचें आहे. आधीं जकाती भरून झाल्यावर तो माल वाटेल तर परत नेऊं देणें ह्याला सवलत असें म्हणतां येणार नाहीं. इतरत्र अशा मालावर आम्हांला जकात भरावी लागत नाहीं. शिवाजीच्या मुलखांत मिठाचा व्यापार करण्याकरितां कंपनीचीं गलबतें वापरण्याला आमची संमति नाहीं. नंतर न्यावयाच्या मालावर खारलेल्या गलबतांचा अनिष्ट परिणाम होतो. दोन गलबतें पाहिजे तर जाऊं देत.

फॅ. रे. सुरत भा. ८८ पृ. २०३-२०४ इ. } (१६७५) कारवार-सुरत. { श. १५९६ भाद्र. शु. १३ इ. १६७४ सप्टेंबर २

फोंड्यापासून १६ मैलांवरील, त्याच्या हद्दींतील नरसा [(Narsa) मसुरा?] या ठिकाणच्या एका श्रीमंत व्यापाऱ्याला धरल्यामुळें शिवाजी फोंड्याच्या खान सुभेदारावर संतापला आहे. सुभेदार त्याला भिऊन जलमार्गानें तोफखाना वगैरे कुमक फोंड्याकडे पाठवूं लागला आहे. आमच्याकडेहि त्यानें कांहीं तोफा व गलबत मागितलें. राजापूरला आपली वखार घातल्याची खबर त्याला सांगून, इतरांचे भानगडींत आम्हांला पडतां येत नाहीं असें कळवून आम्हीं नकार दिला. नाहीं तर मागच्याप्रमाणेंच राजापूरची वखार पुनः लुटली जाईल अशी भीति प्रदर्शित केली.

फॅ. रे. मुंबई भा. १ पृ. ८३ (द्वि) इ. } (१६७६) मुंबई कन्सल्टेशन. { श. १५९६ भाद्र. शु. १४ इ. १६७४ सप्टेंबर ४

सिद्दीनें शिवाजीशीं युद्ध करण्याकरितां गुप्त रीतीनें आमच्या बेटावरील पोर्तुगीज व टोपशांची भरती आम्हांला कळविल्याशिवाय केली. यामुळें शिवाजीला वैषम्य वाटणें साहजिक आहे. करितां अशा भरतीविरुद्ध आणि गव्हर्नरच्या परवानगीशिवाय बेट

सोडून जाऊं नये असा जाहीरनामा काढावा. सिद्दीची नोकरी पत्करणाऱ्यास कडक शिक्षा होऊन त्याची मालमत्ता जप्त होईल असें जमातीच्या मुख्याला (?) (Chiefe of the poue) बोलावून आणून सांगावें.

फॅ. रे. सुरत भा. ८८ } (१६७७) { श. १५९६ भाद्र. व. २
पृ. २२७ इ. } फोर्टसेंट जॉर्ज-सुरत. { इ. १६७४ सप्टेंबर ७

शिवाजीबरोबरचा तह, राजापूरच्या नुकसानीबद्दल व फॅक्टरीबद्दल चांगलीं कलमें ठरविण्याबद्दल धन्यवाद. त्याचें राज्य वाढत जाईल तसतसें पूर्वी लुटीकडे असलेलें **त्याचें लक्ष आतां व्यापाराकडे लागेल.** तुमच्या मुलखांत तरी **मोंगली** आरमार त्याचे विरुद्ध मोकळेपणानें कारवाई करूं शकणार नाहीं हें त्याला उपकारक वाटेल. बेटाची भरभराट झाली याबद्दल अभिनंदन केलें पाहिजे.

फॅ. रे. मुंबई भा. १ } (१६७८) { श. १५९६ भाद्र. व. ३
पृ. ८७ (द्वि. सं.) इ. } मुंबई कन्सल्टेशन. { इ. १६७४ सप्टेंबर ८

शिवाजीचें सैन्य सुरतेला येण्याचा संभव असल्यामुळें सुरतेला राहण्याकरितां सैन्य पाठवावें.

फॅ. रे. मुंबई भा. १ } (१६७९) { श. १५९६ भाद्रपद व. ११
पृ. ९३-९४ इ. } सुरत कन्सल्टेशन. { इ. १६७४ सप्टेंबर १६

रायबागजवळ इंग्रजांच्याकरितां खरेदी केलेला माल दोन सैन्यांच्या मधून बंदराकडे आणण्याची अडचण आहे. तरी इंग्रजांच्या जबाबदारीवर **राजापुराकडे** माल आणावा. परंतु आदिलशाही सुलतानाचा व बहलोलखानाचा कौल मिळविण्याची खटपट करावी.

फॅ. रे. सुरत भा. ८७ } (१६८०) { श. १५९६ भाद्र. व. ११
पृ. २०४ इ. } सुरत-मुंबई. { इ. १६७४ सप्टेंबर १६

सुरतेला पुनः भय उत्पन्न होऊन दरवाजे बंद केले. नगररक्षणाकरितां सुभेदारानें सधन व्यापाऱ्यांकडे १ लक्षाची मागणी केली. त्यांनीं सभा करून सुभेदाराकडे रोखा पाठविला. त्याचें त्यांना अजून उत्तर मिळालें नाहीं.

फॅ. रे. मुंबई भा. १ } (१६८१) { श. १५९६ भाद्र. व. ११
पृ. ९२ (२) इ. } मुंबई कन्सल्टेशन. { इ. १६७४ सप्टेंबर १६

जुन्नर (Ganeer ?) च्या सुभेदाराकडून मोंगलांच्या सैन्यांतून माल जाण्याकरितां **नारायण शेणव्यासमवेत** एका इंग्रजानें जाऊन कौल मिळवावा. **जुन्नरपासून कल्याण-भिवंडीपर्यंत शिवाजीच्या मुलखांतील**हि कौल घ्यावा. हे दोन्ही कौल त्वरेनें पाठवावे.

ऑर्मे भा. ११४-३ } (१६८२) { श. १५९६ आश्वीन शु. ३
पृ. १९७ इ. } मुंबई-मि. वॉर्ड. { इ. १६७४ सप्टेंबर २२

जॉन चाइल्ड याला **राजापूरच्या वखारीचा मुख्य** नेमिलें. त्याला येथें काम असल्यामुळें तुम्हीं पूर्व तयारीकरितां पुढें जावें.

ऑर्मे भा. ११४-३ } (१६८३) { श. १५९६ आश्वीन शु. ६
पृ. २०३ इ. } मुंबई-सुरत. { इ. १६७४ सप्टेंबर २५

आम्हांला असें वाटतें कीं, **शिवाजीचा सुरतेला** कांहीं उपद्रव होणार नाहीं. त्याचें सैन्य दख्खनकडे **फोंडा किल्ल्याचे** बाजूला, **रुस्तुम**जमाच्या मुलाचें व त्याचें **भांडण** झाल्यामुळें वळलें आहे असें समजतें.

डच रेकॉर्डस, भा. ३४ } (१६८४) { श. १५९६ आश्वीन शु. १४
नं. ८४१ इ. ऑक्टो. १३ न्यू. } वेंगुर्ला-बटेव्हिया { इ. १६७४ ऑक्टोबर ३

पुष्कळ दिवस पूर्वतयारी होऊन जूनमध्यें **शिवाजीच्या राज्याभिषेकाची** संपूर्ण तयारी झाली. आणि ब्राह्मण व विद्वान् भट्ट व सहकुटुंब असे सुमारें ११ हजार लोक रायगडावर जमा झाले. शिवाजीनें मुख्य व विद्वान् गृहस्थांना आपला हेतु सांगितला. हल्लींची भोसले जाती सोडून **क्षत्रिय जातींत प्रवेश** केल्याशिवाय आपल्याला मुकुट धारण करतां येणार नाहीं; करितां आपल्याला त्या जातींत घ्यावें अशी त्यानें विनंती केली. तुमचे पूर्वज पिढ्यान्‌पिढ्या भोसलेच असल्यानें तसें करणें अशक्य आहे; असें विद्वज्जनांनीं सांगितलें. भोसले क्षत्रियांचेच वंशज आहेत, आणि असें जातिपरिवर्तन होऊं शकेल असें शिवाजीचें म्हणणें पडलें. तेव्हां प्रथम क्षत्रिय बनल्याशिवाय शिवाजी मुकुटधारणाला योग्य होणार नाहीं, असा विचार करून आणि पूर्वींसारखें **जुलमानें राज्य न करण्याचें त्यानें वचन दिल्याचें** लक्षांत घेऊन, गेल्या २९ मे रोजीं दुसऱ्या पक्षाच्या मंडळीनें त्याला मोठ्या समारंभानें क्षत्रिय करून घेतलें. **क्षात्रधर्मा**ची दीक्षा ते देणार होते; परंतु **ब्राह्मण्याचा आचार** आपल्याला शिकवावा अशी त्यानें इच्छा दर्शविली. ही गोष्ट त्यांना मान्य होईना. परंतु त्यांपैकीं एका मुख्यानें आपली संमति दिली आणि शिवाजीनें त्याला ७००० होन बक्षीस दिले. एक सर्व दिवस त्याबद्दल संस्कार करून १७००० होन धर्मार्थ वाटून दिले. पापक्षालनार्थ म्हणून ४ जून रोजीं शिवाजीनें **मोठा दानधर्म केला.** १७००० होन किंवा १६० पौंड वजनाची स्वतःची सुवर्णाची तुळा करून व त्याचप्रमाणें चांदी, तांबें, जस्त, कथील, शिसें, लोखंड, ताग, कापूर, मीठ, खिळे, जायफळें, जायपत्री, मसाले, लोणी, साखर, सर्व प्रकारचीं फळें, खाद्य, सुपारी, ताडीसुद्धां नानाविध वस्तूंच्या तुला करून त्या सर्वांचा धर्म करून टाकला. शिवाजीनें जाळपोळ केली त्यांमध्यें स्त्रिया, मुलें, पशु व ब्राह्मण यांची **हत्या** झाली असण्याचा संभव होता. त्या पापाच्या क्षालनार्थ दोघां ब्राह्मणांच्या सूचनेवरून आणखी १६०० होनांचें दान करण्यांत आलें.

सर्व आवश्यक धार्मिक विधि यथास्थित झाल्यानंतर **५ जून रोजीं** मुद्दाम आणविलेल्या गंगाजलानें स्नान करून शिवाजीनें प्रत्येक ब्राह्मणाला १०० होन दक्षिणा दिली. मुख्याला ५००० होन व २००० होनांचें वर्षासन दिलें. **६ जून रोजीं** पहाटेस ५ वाजतां त्यानें मुद्दाम बनविलेल्या **सिंहासनावर आरोहण केलें,** आणि जमलेल्या सर्व लोकांनीं त्याला **शिवराज** असें अभिधान दिलें.

त्यानंतर मुख्य प्रधान **मोरोपंडित** यांनीं मुजरा करून ८००० होन आणवून, शिवाजीच्या शिरावर ओतले. मुख्य हिशेबनीस **निळो पंडीत** यानें ७००० होन आणले; दोघां कौन्सिलरांनीं (?) प्रत्येकीं ५००० होन आणून त्याप्रमाणेंच शिवाजीला सुवर्णस्नान करविलें. राहिलेल्या प्रधानांनींहि मुजरे केले आणि ते सिंहासनाच्या उभय बाजूंना रांगा करून उभे राहिले. संभाजी राजा सिंहासनाच्या पायरीवर बसला. ७ जूनला, जमलेल्या सर्व वकील (envoys) व ब्राह्मण मंडळींना सार्वत्रिक देकार सुरू झाला. योग्यतेप्रमाणें प्रत्येक ब्राह्मणाला ३, ४ किंवा ५ रुपये आणि बायका-मुलांनाहि सरसकट १ किंवा २ रुपये दिले. ...हा दानधर्म १२ दिवस चालला होता व तितके दिवस भोजनें चालू होतीं. ह्या समारंभाचा व दानधर्माचा एकंदर खर्च **दीड लाख** होन इतका झाला असें म्हणतात.

शिवाजीची आई ८० वर्षांची वयातीत म्हातारी होती. तरी राज्याभिषेकाला हजर राहून नंतर १२ च दिवसांनीं मरण पावली. तिनें २५ लाख होन-कांहींच्या मतें अधिकच-आपल्या पाठीमागें मुलाला ठेविले, (न्यू-सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यांत =) ऑगस्टच्या शेवटच्या आठवड्यांत, **फोंड्यावर** अचानक छापा घालण्याकरितां शिवाजीचा **अण्णाजी** (आमाजी ?) या नांवाचा सेनापती **कुडाळास** आला. परंतु महमदखानाला आधीं कळून तो सावध राहिल्यामुळें अण्णाजीला अपयश आलें.

फॅ. रे. सुरत, भाग ८८ } (१६८५) { श. १५९६ आश्वीन शु. १५
पृ. २१७ इ. } मुंबई-सुरत { इ. १६७४ आक्टोबर ४

शिवाजीला फायदा मिळतो म्हणून सुरत व भडोच येथून कोणत्याहि प्रकारची सामुग्री पाठवूं नये, असा बहादुरखानानें हुकूम काढला आहे.

ऑर्म भा. ११४-३ } (१६८६) { श. १५९६ आश्वीन व.२
पृ. २०४ इ. } मुंबई-सुरत. { इ. १६७४ आक्टोबर ६

शिवाजी मोठें सैन्य घेऊन कल्याणला आला आहे. सुरतेवर किंवा बहादुरखानावर तो जाणार असें बोलतात. चपल जासुदाबरोबर पत्र दिलें आहे. अशा हुलींना किती महत्त्व द्यावें हें तुम्ही जाणतांच.

ऑर्म ११४-३ } (१६८७) { श. १५९६ आश्वीन व. ६
पृ. २०७ इ. } मुंबई-सुरत { इ. १६७४ आक्टोबर १०

शिवाजी कल्याण-भिवडीला थोडें सैन्य ठेवून तेथून निघून गेला. तो एकदम परत येईल अशी अपेक्षा आहे. त्याचा बेत कांहींच समजत नाहीं.

सा. ले. १०९ } (१६८८) { श. १५९६ आश्वीन व. ८
सु. १०७५ रजब २४ } म. मु. { इ. १६७४ आक्टोबर १२

महादाजी सामराज सुभेदार व कारकून सुभा माहालानिहाये.

माहादाजी नरस परभू (प्रभु) हवालदार व कारकून ता कर्याती मावळ.

राजश्री साहेबा (छत्रपती शिवाजी)चा हात रोखा आला कीं, 'मो अहिरें कर्यात मावळ येथील कुलकर्ण जानकी कोम रंगभट बिन बाळंभट ठकार इची मिरासी आहे. शंकराजी भोवर मुतालिकीस ठेविला होता तो काढून वेगळा ब्राह्मण ठेविला. यैसें असतां यादव नामदेऊ याणी **चिरंजीव** राजश्री **संभाजी राजयांचा** कागद शंकरजी भोवर यांचें कुलकर्ण म्हणऊन नेला. व उगाच कथला करितात. तरी कथला करूं नये. शंकराजी हा मुतालीक आहे. जानकीचें कुलकर्ण मिरास. तरी ह्याप्रमाणें करावे.

फॅ. रे. सुरत भा. ८८ } (१६८९) { श. १५९६ आश्वीन व. १०
पृ. २१८ इ. } निकल्स व सिंचिन, दाभोळ-सुरत { इ. १६७४ आक्टो. १४

(से)-२४ सप्टेंबरला दाभोळास येऊन मिठाची विक्री केली. चिपळूणच्या हवालदारानें गलबतावर माप घेण्याला फार आढेवेढे घेतले. [प]-पुढें मीठ विक्रीचे पैसे मागितले असतां सुभेदारानें प्रथम वायदेच केले. आणि शेवटीं काल रात्रीं त्यानें असें कळविलें कीं **शिवाजी मोठ्या स्वारीवर निघाला असून.** सैन्याचा तनखा देण्यांत पुष्कळ पैसा खर्च झाला...[से]-म्हणून आम्ही नांगर उचलून आज सकाळीं निघालों.

ऑर्म भा. ११४-३ } (१६९०) { श. १५९६ आश्वीन व. १०
पृ. २०९ इ. } मुंबई-सुरत { इ. १६७४ आक्टो. १४

शिवाजीचें सैन्य कल्याणभिवंडीला आलें तें **बहादूरखानाच्या** सैन्याच्या समोरील टेकडीवर (जुन्नरगड Jenneah Gur) गेलें. शिवाजी खुद्द **पालीला** (Polly) असून अविलंबानें सैन्यासमवेत तेथें जाईल असें म्हणतात. टिकाव, कुदळी, तोमरें इत्यादि **लुटीच्या उपयोगाचीं हत्यारें** त्यानें बरोबर घेतलीं आहेत. परंतु त्याचें उद्दिष्ट ठिकाण कांहीं समजत नाहीं.

आक्टोबर २३ चे पत्रांतहि [पृ. २१४] बेत अजून अज्ञातच आहे असें आहे.

फॅ. रे. सुरत भा. ८७ } (१६९१) { श. १५९६ कार्तीक शु. ४
पृ. २४४ इ. } सुरत-मुंबई { इ. १६७४ आक्टोबर २२

शिवाजीचें सैन्य **रामनगरचे** आसपास आल्यामुळें शहरचे लोक फार भ्याले आहेत. बलसाड, चिखली व गणदेवीचे लोक पळाले. येथील व्यापारी बांधाबांध करूं लागले आहेत. आमच्या कानावर असें आलें आहे कीं रामनगरच्या राजाच्या तीन

चार हजार **भिल्लांनीं** रामनगरच्या खिंडींत शिवाजीच्या सैन्याला **अडवून धरलें.** आपल्याला त्यांनीं जाऊं द्यावें म्हणून शिवाजीनें त्यांना १ लक्ष रुपयांचें आमिष दाखविलें.

(से)फॅ. रे. सुरत भा. ८८-२ } (१६९२) { श. १५९६ कार्तीक शु. ४
पृ. ३ इ. } राजापूर-सुरत { इ. १६७४ आक्टो. २२

शिवाजीचें सैन्य **कोल्हापूर**जवळ आल्याची हूल उठल्यामुळें वर्गीकरण केल्या-शिवाय कापड (सूत ?) मिसळलेलेंच पाठविलें.

फॅ. रे. सुरत भा. ८८ } (१६९३) { श. १५९६ कार्तीक शु. ६
पृ. २२१ इ. } राजापूर-सुरत. { इ. १६७४ आक्टो. २४

१७ तारखेला **शिवजी पंडीत** [? **से**मध्यें Jenajee जनाजी असें आहे.] दिवाळीसाठीं येथें आला आणि १८ तारखेला आमच्या झोपडीवर आला. आमच्या जुन्या इमारतींत तो राहतो. ती मिळविण्याची आम्हीं खटपट केली. 'शिवाजीच्या तहाच्या कलमांत तसें असल्यास मी एक क्षणहि रहाणार नाहीं' असें तो म्हणतो. परंतु ती हवालीं करण्याची त्याची इच्छा नाहीं. **अण्णाजी पंडीत** लवकरच येईल. कलमें ठरवितांना तो हजर असल्यामुळें तो आल्यावर त्याची मदत काय मिळते तें पाहूं. रण-छोडदास **रायबागला** माल घेऊन जात आहे.

[से] अण्णाजी राजापूरला येईतों वाट पहावी लागेल. **खवासखान, बह-लोलखान** व आदिलशाही नगरसुभेदार याचे पास त्याचेजवळ असल्यामुळें, चौकी-दारांनीं आमचा माल अडकवूं नये असे त्याचे हुकूम घेतले पाहिजेत.

फॅ. रे. सुरत भा. १०७ } (१६९४) { श. १५९६ कार्तीक शु. ७
पृ. १ इ. } प्रेसि. ऑंजिअर-सुरत कौन्सिल { इ. १६७४ आक्टोबर २५

अगदीं गुप्त राखलेल्या कोणत्या तरी कामगिरीवर **शिवाजी** मोठें सैन्य घेऊन गेला हें खचित. गेल्याच वर्षी जिंकलेल्या **सातारा** किल्ल्याकडे तो गेला असें कित्येक म्हणतात. परंतु कांहीं सांगतां येत नाहीं.

फॅ. रे. सुरत भा. ८८ } (१६९५) { श. १५९६ कार्तीक शु. ८
पृ. २४० इ. } कारवार-सुरत { इ. १६७४ आक्टो. २७

खवासखानानें बोलावल्यावरून **अबूखान रुस्तुमजमा विजापुरास** गेला. हा प्रांत दुसऱ्याला देतील असा सर्वांचा संशय आहे. कारण येथून जाण्यापूर्वी सर्व सावकारांना पिळून त्यानें पैसा काढला. ... विजापुरांत **बड्या खानांत लाथाळी** चालली आहे असें समजतें.

फॅ. रे. सुरत भा. ८८ } (१६९६) { श. १५९६ कार्तीक शु. ८
पृ. २३९ इ. } कारवार-सुरत. { इ. १६७४ आक्टो. २७

शिवाजीचें सैन्य **बेळगांव**पर्यंत आल्याचें कळल्यापासून **हुबळी**चे व्यापारी पळून गेले ते आजपर्यंत परत आले नाहींत.

ओ. कॉ. भा. ३५ } (१६९७) { श. १५९६ कार्तीक शु. ९
नं. ४०२५ इ. } सुरत-मुंबई. { इ. १६७४ आक्टो. २८

शिवाजीचे सैन्यानें **गणदेवी**पर्यंत येऊन तें शहर जाळलें अशी खोटी हूल उठल्यामुळें या शहरांतील लोक पळून जाण्याच्या तयारीला लागले. परंतु शिवाजीचें सैन्य **रामनगरच्या** पलीकडे चार कोसांच्या आंत आलेंच नाहीं. किल्ल्यावर **शिबंदी व रसद पोंचविणें** एवढाच त्यांचा इरादा होता असें वाटतें. आतां लोक परत गेले असून येथें शांतता आहे.

फॅ.रे. मुंबई भा. १ } (१६९८) { श. १५९६ कार्तीक व. ३
पृ. ११३-१४(२)इ. } मुंबई कन्सल्टेशन. { इ. १६७४ नोवेंबर ६

शिवाजीकडून छोटासा नजराणा (सामान्य कापडाचे पांच तागे !) व अत्यंत स्नेहाचें पत्र घेऊन त्याचा वकील आला. ४० ते ६० इं. वे. वजनाच्या ५० मोठ्या तोफा शिवाजीनें मागितल्या आहेत असा खाजगी निरोप त्यानें तोंडीं सांगितला. अशा तोफा कंपनीजवळ विक्रीकरितां शिल्लक नसल्यामुळें **किल्ल्याच्या तटावर चढविलेल्या** आहेत त्याच काढून **दिल्या पाहिजेत**. शिवाजीच्या विनंतीचा विचार केला. त्याच्याशीं पक्का तह झाला आणि त्यानें हल्लींचें मित्रत्वाचें धोरण ठेविलें हें लक्षांत घेऊन—

शिवाजीची विनंती पूर्णपणें अमान्य करणें कंपनीला हितकर नसल्यामुळें, त्याचे म्हणण्याला अंशतः मान देऊन, त्याला गुप्तपणें **१० मोठ्या तोफा द्याव्या**; आणि दुष्काळ लक्षांत घेतां त्यांचे मोबदला धान्याचा **भाताची** मागणी करावी. भडोचहून मुंबईला सामुग्री येण्यास बंदी झाली. पोर्तुगीजांनींहि साष्टी वगैरे आपल्या प्रांतांतून मुंबईंत भात पाठविण्यास बंदी केली. या दोन कारणांनीं भातच मागणें इष्ट आहे. परंतु शिवाजीची आणखी तोफांची मागणी येण्याचा संभव आहे. आणि विक्री केल्याचें मोंगलांना कळल्यावर सुरतकरांना त्याचा त्रास होईल.

म्हणून या बाबतींत सोय गैरसोय यांचा विचार करण्याकरितां हें प्रकरण त्यांच्याकडे सोंपवावें.

(से.) फॅ. रे. सुरत } (१६९९) { श. १५९६ कार्तीक व. ५
भा. १०७ पृ. ५१६ इ. } मुंबई-सुरत. { इ. १६७४ नोव्हेंबर ८

शिवाजी स्वतः मोठें सैन्य घेऊन घांटाच्या (Goth) बाजूला **बहादुरखा-**

नाच्या लष्करावर छापा घालण्यास गेला. यामुळें सुरतेला भय प्राप्त झालें हें ऐकून खेद वाटला. बहादुरखानाच्या छावणीवर तो हल्ला करणार आहे, किंवा केवळ हूल दाखवून सुरतेस किंवा अन्यत्र लूट करण्याचा त्याचा बेत आहे हें सांगतां येत नाहीं.

[यापुढें नोवें. ६ च्या ले. १६९८ मधील मुद्याबद्दल हकीकत कळवून सल्ला विचारला आहे.]......तोफा तटावरून काढून दिल्या पाहिजेत. त्याशिवाय आपल्याजवळील दोन मोठया पितळी तोफा घेण्याबद्दल त्यानें विचारलें आहे. त्या योग्य फायदा घेऊन आम्हांला विकतां येतील. परंतु हा व्यवहार गुप्त ठेवणें शक्य नाहीं. मोंगलांना कळल्यास ताप होईल. तेव्हां तुमचे मताकरितां आम्हीं दोन गोष्टी तहकूब ठेविल्या आहेत. येथें पडून राहिलेल्या जंगम मालापैकीं कांहीं तोफा व विशेषतः त्या पितळी तोफा (आपल्याला भारभूत झालेल्या) विकून थोडासा भार कमी करितां आला तर तें चांगलेंच होईल. परंतु तुमच्या वखारीला यामुळें धोका येणार असेल तर तुमचें मत कळवावें. त्याप्रमाणें आम्हीं पुढें वागूं. [ऑर्म ११४-४ पृ. १]

खं. २० ले. १३८ }
सु. १०७५ साबान १७ } (१७००) मिसेली फा. मु. मुज. व सां. { श. १५९६ कार्तीक व. ६
{ इ. १६७४ नोव्हें. ९

अज दिवाण पा वांई—मोकदमानी को वांई.

गिरमाजी त्रिंबक इनामदार सो का वांई यास इनाम १ चावर देखील हक पूर्वीप्रमाणें चालविणें.

फॅ. रे. सुरत भा. ३ }
पृ. ४७ (३) इ. } (१७०१) सुरत कन्सल्टेशन { श. १५९६ कार्तीक व. ९
{ इ. १६७४ नोवें. १२

मुंबईहून २ तारखेचें [८ ?] पत्रांत शिवाजीच्या तोफांच्या मागणीबद्दल कळविण्यांत आलें. त्यावर आमचें मत असें आहे कीं, अशा कृत्यानें बादशहाला घुस्सा येईल. फ्रेंचांनीं नुकताच त्याला दारुगोळा पुरविल्याबद्दल दरबाराकडे तक्रारी गेल्या आहेत. शिवाजीला बेटावरून अन्नसामुग्री मिळते याचाच त्यांना संताप येतो. मग त्याला युद्धसामुग्री पुरविली तर त्यांना वैषम्य वाटणारच. बरें, मुंबईच्या रक्षणाच्या दृष्टीनें मोठ्या तोफा फक्त १३च आहेत त्या व पितळी तोफाहि तेथें आवश्यकच आहेत.

फॅ. रे. सुरत भा. ८८ }
पृ. २४४ इ. } (१७०२) सुरत-मुंबई { श. १५९६ कार्तीक व. ११
{ इ. १६७४ नोवें. १३

शिवाजीपासून भीती नसल्यामुळें अधिक शिपाई लागणार नाहींत. [ले. १७०१ प्रमाणेंच तोफा विकण्याविरुद्ध असलेलीं कारणें पत्ररूपानें पुढें लिहिलीं आहेत]—...... शिवाजीला आपण धान्य वगैरे पुरवितों अशी बहादुरखानानें व इतर अधिकाऱ्यांनीं

तक्रार केली आहे.......पितळी तोफांचा समुद्रावर चांगला मारा होतो. त्यांना खर्च मोठा लागत असला तथापि **शिवाजी** किंवा दुसरा कोणीं त्यांचा मालक होणें आम्हांला लाज आणणारें आहे.

ऑर्म भा. ११४-३ } (१७०३) { श. १५९६ कार्तीक व. १२
पृ. २१९ इ. } मुंबई—मद्रास { इ. १६७४ नोवेंबर १४

सुरतेच्या सुभेदाराच्या वर्तनानें डच व फ्रेंच चिडून सुरत सोडून जाण्याच्या विचारांत आहेत......पण एकंदरींत **ह्या सुभेदारानें सुरतेचा** नांवाजलेला **व्यापार** पार **रसातळाला नेला.** कांहीं उपाय ताबडतोब न केल्यास थोड्याच वर्षांत सुरतेचें नांव आणि प्रख्याती पुनः ऐकूं देखील यावयाचीं नाहींत.

खं. २० ले. १४० व १४१ } (१७०४) { श. १५९६ मार्ग. शु. २
सु. १०७५ साबान ३० } मु. सी. { इ. १६७४ नोवेंबर १९

आज दिवाण पाा वाई.

मोकदमानी देहाय पाा बोरखल व साां निंब व किण्ही साा कोरेगांव.

निरसीभट बिन रंगभट व एकनाथभट बिन रामेश्वर चित्राऊ वाई. यांस धर्मादाव इनाम सालिना होन १० मौ माहागाऊ, शिवथर वगैरे गांवी आहे व चावर १॥ दुदेह आहे तरी पूर्वीप्रमाणें चालविणें.

खं. २० ले. १३९ } (१७०५) { श. १५९६ मार्ग शु. २
सु. १०७५ साबान ३० } मिसेली फा. मु. व सी. { इ. १६७४ नोवें. १९

अजदिवाण प. वांई

मोकदमानी दुदेह-मो॥ खेड व तडवले बु॥ साा कोरेगांव

आपदेभट विष्णुभट चित्राऊ जुनारदार वांई, यास वरील दोन खेड्यांत जमीन हकासह इनाम आहे. ती चालविणें.

(से) फॅ. रे. सुरत भा. १०७ } (१७०६) { श. १५९६ मार्ग. शु. ६
पृ. १५ इ. } मुंबई-सुरत { इ. १६७४ नोवें. २३

शिवाजी आग्रहानें मागणी करितो त्या तोफांबद्दलचें तुमचें मत कळलें. परंतु त्या विषयावर **पुनः** या कौन्सिलांत **वाद व विचार** झाल्याशिवाय आमचें मत कांहींच लिहितां येत नाहीं.

खं. २० ले. १४२ } (१७०७) { श. १५९६ मार्ग. शु. १०
शु. १०७५ रम २३ } मिसेली फा. मु. मज. सी. { इ. १६७४ नोवें. २७

अजदिवाण प॥ वांई

मोकदमानी मौ. पसर्णी व बोझर्डे सा हवेली वांई व मो एकसर सा मुन्हे

नारायणभट बिन गोपिनाथभट चित्राऊ जुनारदार यास इनाम जमीन अनुक्रमें -॥-, -॥॰, व ।- आहे ती चालविणें.

फॅ. रे. सुरत भा. ८८ } (१७०८) { श. १५९६ मार्ग. शु. १२
पृ. २५३ इ. } राजापूर-सुरत { इ. १६७४ नोवें. ३०

अण्णाजी थोड्या दिवसापूर्वी येथें आला होता. परंतु अगदीं अल्पकाळ राहून पुनः १२ कोसांवरील किलनार [खेळणा] गांवीं गेला. लवकरच परत येईल. तो येथें होता तेव्हांच इमारतीचा प्रश्न काढला. तर **१० हजार होनांतच इमारतीचा समावेश झाला असें** तो म्हणाला. दुसरी इमारत बांधावयास सोईची जागाहि देत नाहीं. हल्लींच्या जागीं पाणी उथळ असल्यानें होड्या जवळ येत नाहींत व हमाली फार वाढते. येथें दरमाणसीं मजुरीहि फार पडते. आम्हीं आतां किनाऱ्यावर लहानसें घर बांधलें आहे.

डच रेकॉर्ड्स भा. ३१ } (१७०९) { श. १५९६ मार्ग व. २
नं. ८२४ इ. डिसें. १५ न्यू. } कोचीन-डच कंपनी { इ. १६७४ डिसें. ५

कानड्यांतून १ एप्रीलचें (न्यू एप्रील ११) पत्र आलें त्यांत दरोडेखोर **शिवाजीचा नवाच उपक्रम** वर्णिला आहे. त्यानें आदिलशाही मुलखाच्या हद्दीवर बंकापूर नजीक **हॉसपेठ** नांवाच्या बाजारांतून दोन लाख होनांची लूट नेली. परंतु एक विजापुरी सेनापती २००० घोड्यांसह त्याच्यावर तुटून पडला. त्यांत त्याचे २ हत्ती शिवाजीच्या हातीं लागल्यामुळें चिडून जाऊन, कुमक आल्यावर, त्यानें पुनः **शिवाजीवर** हल्ला करून त्याला लांबवर पळवून लाविलें. शिवाजीचे १००० घोडे शत्रूच्या हातीं लागले. [पहा मागें ले. १६२५ ता. एप्री. ४]

फॅ. रे. सुरत भा. १०७ } (१७१०) { श. १५९६ मार्ग. व. ८
पृ. ३० इ. } धनगांव सुरत { इ. १६७४ डिसें. १०

ह्या भागाच्या सरहद्दीवर **शिवाजी** आहे अशा बातम्या अजूनहि येतात. त्याला विरोध करणाऱ्या एका राजाचे त्यानें ३।४ [illegible] लोक कापून काढले व बाकीचे आश्रयार्थ **औरंगाबादेस** पळाले.

(दि) ओ. कॉ. } (१७११) { श. १५९६ मार्ग. व. १४
नं. ४०५१ इ. } मुंबई-ई[illegible] कंपनी { इ. १६७४ डिसें. १६

गोव्याच्या व्हाईसरायाशीं [illegible]च बाबतींतील तुमचा सल्ला तंतोतंत पाळूं.

कारंजा व ठाणा या मार्गांपैकीं कारंजाचा मार्ग आज आम्हांला कांहींसा मोकळा आहे. तथापि उभय मार्गांवरहि कंपनीचा हक्क आहे असें आम्हांला वाटतें. पोर्तु०नीं चिडून जाऊन डचांना मदत करूं नये म्हणून डचांशीं युद्ध चालू असतांना ठाण्याचा मार्ग आम्हीं मुद्दाम टाळला. शिवाय, मोंगल व शिवाजी यांचें युद्ध चालू असेतोंपर्यंत त्या मार्गावरील **कल्याण-भिवंडी** इत्यादि किनाऱ्यावरील बंदरें उभय युध्यमानांच्या सैन्यांनीं व्यापिलेलीं असल्यामुळें त्या मार्गाचा या बेटाला उपयोगच होण्यासारखा नाहीं. [ऑर्मे भा. ११४ वि. ४ पृ. ६].

स. पृ. १६४ } (१७१२) { श. १५९६ मार्ग-पौष.
स. सा. पत्रें ले. ५२ वरून } { इ. १६७४ नोवें-डिसें.

श्री **समर्थ रामदास** स्वामी-रघुनाथ भट गोसावीः—हेळवाकीहून चाफळास पावलो. संकल्पाची समारादना जाली. शरीराचा उपचारहि हलुहलू होतो. आपणे ते कर्कष सीतळाईमध्ये बहुतची श्रम पावलो. वगैरे मजकूर.

(से) फॅ. रे. सुरत } (१७१३) { श. १५९६ पौष शु. ६
भा. १०७ पृ. ४३ इ. } मुंबई-सुरत { इ. १६७४ डिसें. २३

मुंबईचा पैसा शिवाजीच्या मुलखांत चालतो. विलायतेंतून १५०० तांब्याच्या पेट्या आल्या आहेत. त्या येथें **टांकसाळीकरितां** आम्ही उतरून घेतों. कारण आमचा पैसा **शिवाजीच्याच** मुलखांत चालतो असें नसून पोर्तु० मुलखांतहि चालतो.

(से) फॅ. रे. सुरत } (१७१४) { श. १५९६ पौष शु. १३
भा. १०७ पृ. ४७ इ. } मुंबई-सुरत { इ. १६७४ डिसें. ३०

राजापुरच्या वखारीचें पुनरुद्घाटन करण्याकरितां मि. चाइल्ड यास पाठवावें. कारण चाइल्ड जाऊन पोंचेपर्यंत तहाचीं कलमें पुरीं होणार नाहींत.

ओ. कॉ. भा. ३५ } (१७१५) { श. १५९६ पौष व. ३
नं. ४०५६ इ. } रिचर्ड ॲडॅम्सला सूचना { इ. १६७५ जाने. ४

मागें ता. १ मे १६७३ रोजीं टॉमस निकल्सला सांगितलेलें काम व दिलेल्या सूचना या ले. त रिचर्ड ॲडॅम्सला दिल्या आहेत. या वेळचा मार्ग मुंबई-कल्याण-जुन्नर असा आहे. **कल्याण-भिवंडी** शिवाजीच्या मुलखांत आहे. तेथून २ दिवसांच्या अंतरावर **जुन्नर** आहे. [पहा ले. १५२८]

ओ. कॉ. भा. ३५ } (१७१६) { श. १५९६ पौष व. ८
नं. ४०६२ इ. } सुरत (स्वाली)—कंपनी. { इ. १६७५ जाने. ९

१२ आक्टोबरपासून पुष्कळ दिवसपर्यंत **शिवाजीचें** भय वाटत होतें. परंतु

रामनगरच्या अरण्यांतील **भिल्लांनीं** त्याला **अडविल्यामुळें** त्याचें सैन्य **औरंगाबादेकडे** वळलें व तेथें आसपास त्यानें लूट केली. तिकडे मोंगलांचा सेनापती **कुतुबखान याशीं** त्यांची गांठ पडली. कुतुबखानाचा त्यांनीं पार धुव्वा उडवून ३०० च्या वर शिपाई कापून काढले. आदिलशाही मुलखांत त्याच्या स्वाऱ्या चालूच असल्यामुळें कारवार व हुबळी या शहरांना फार उपद्रव झाला.

डाग रजि. १६७५ इ. पृ. २८ जाने. २४ न्यू. } (१७१७) { श. १५९६ पौष व. १४ इ. १६७५ जाने. १४

वेंगुर्ल्याहून पाठविलेल्या पत्रांत, कानडांतील लोकांविरुद्ध पोर्तुगीजांचे पूर्ववत् चालू असलेले हल्ले; प्रसिद्ध चोर (बंडखोर) शिवाजी याचा थाटाचा आणि दरबारी राज्याभिषेक; व त्याला विजापूरकरांनीं कांहीं अडथळा न करतां तसें करूं देणें; इत्यादि बातम्या आहेत.

खं. ८ ले. ३१ सु. १०७५ जिल्काद २ } (१७१८) श्रीशंकर प्रसन्न { श. १५९६ माघ शु. ३ इ. १६७५ जानेवारी १८

म. ह. रा. जिवाजी विनायक सुभेदार व कारकून सुबे मामले प्रभावळी प्रती राजश्री **शिवाजी राजे दंडवत.** दौलतखान व दरियासारंग यांसी ऐवज व गल्ला राजश्री मोरोपंत पेशवे यांणीं वराता सुबे मजकुरावरीं दिधल्या. त्यांस तुम्हीं कांहीं पावलें नाहीं, म्हणोन कळों आलें. त्यावरून अजब वाटलें कीं, ऐसे नादान थोडे असतील. तुम्हांस समजलें असेल कीं, याला ऐवज कोठें तरी ऐवज खजाना रसद पाठविलीया मजरा होईल म्हणत असाल. तरी पद्मदुर्ग वसवून राजपुरीच्या उरावरी दुसरी राजपुरी केली आहे. त्याचा मदत व्हावी, पाणी, फाटीं आदिकरून सामान पावावें, या कामास आरमार बेगीनें पावावें, तें नाहीं. पद्मदुर्ग हबशी फौजा चौफेर जेर करीत असतील. आणि तुम्हीं ऐवज न पाववून, आरमार खोळंबून पाडाल! एवढी हरामखोरी तुम्ही कराल. आणि रसद पाठवून मजरा करूं म्हणाल, त्यावरी साहेब रिझतील कीं काय? हे गोष्ट घडायाची तऱ्ही होय; न कळे कीं, हबशियांनीं कांहीं देऊन आपले चाकर तुम्हांला केले असतील? त्याकरितां ऐसी बुद्धी केली असेल! तरी ऐशा चाकरांस ठीकेठीक केले पाहिजेत! ब्राह्मण म्हणून कोण मुलाहिजा करूं पाहतो? याउपरि तऱ्ही त्यांला ऐवज व गल्ला राजश्री मोरोपंतीं देविला असे तो देवितील. तो खजाना रसद पावलियाहून अधिक जाणून तेणेंप्रमाणें आदा करणें. कीं ते तुमची फिर्याद न करीत व त्यांचे पोटास पावोन आरमार घेऊन पद्मदुर्गाचे मदतीस राहात तें करणें. याउपरि बोभाट आलियाउपरि तुमचा मुलाहिजा करणार नाहीं. गनिमाचे चाकर, गनीम जालेस, ऐसे जाणून बरा नतीजा तुम्हास पावेल. ताकीद असे. रवाना.

फॅ. रे. सुरत भा. ८८ } (१७१९) { श. १५९६ माघ शु. ४
पृ. १३ इ. } सुरत-मुंबई { इ. १६७५ जाने. २०

१ जानेवारीला **शिवाजीनें डुमगांव** [नंद्राबादजवळ, ऑर्म ११४-४ पृ. ७४; बऱ्हाणपूरचे जवळ, सदर पृ. १३५] ची वखार लुटली. शिवाजीशीं तह झाल्याबद्दल सेनापतीला जवळच्या माणसांनीं सुचवूनहि कांहीं उपयोग झाला नाहीं ! ...आपले लोक व दलाल यांनीं जेथें जेथें खरेदीकरितां रकमा लावल्या असतील त्या सर्व ठिकाणांकरितां **शिवाजीचे** कौल घेणें फारच जरूर आहे.

ऑर्म ११४ वि. ४ पृ. १०४ ता. मार्च २४, मुंबई-इंग्लंडः-मोगली सेनापतींनीं दुर्लक्ष केल्यामुळें शिवाजीच्या सैन्यानें थेट **बऱ्हाणपूरच्या** तटापर्यंत जाऊन सर्व मुलूख लुटला. याच वेळीं त्यानें आपल्या **डुमगांवच्या** वखारीवर हल्ला केला.

सं. २ पृ. ७३ ले. ५ } (१७२०) { श. १५९६ माघ शु. ६
सु. १०७५ जिल्काद ५ } { इ. १६७५ जाने. २२

मोरेश्वर पंडितराऊ—जिवाजी विनायक सुभे० व कार०

श्रीधर बिश्वनाथ जोशी का पावस यास भले ब्राह्मण म्हणून दहा मण तांदूळ व सवत्स चार गाईंची वण माफी दिली आहे.

फॅ. रे. मुंबई. भा. ७ } (१७२१) { श. १५९६ माघ शु. १०
पृ. ६६-६७ इ. } मुंबई-चाईल्ड. { इ. १६७५ जाने. २६

(तुम्ही राजापुरास जातांना) **शिवाजीच्या तहाची** अमलबजावणी करून घेण्याकरितां मूळ कळमांची प्रत तुमच्याजवळ दिली आहे. पहिला हप्ता यापूर्वींच यावयास पाहिजे होता. **राजापुरास** गेल्याबरोबर त्याची व्यवस्था करावी. तेथील जुनी वखार तुम्हांस मिळावी अशाबद्दल हुकूम मिळविण्याचा प्रयत्न केला. परंतु **राजा इकडच्या बाजूस नसणें** वगैरे अडचणींमुळें तें राहिलें. तुम्हींहि प्रयत्न करावा. परंतु तोंपर्यंत दुसरें दगडी किंवा विटांचें घर मिळवावें.

डच रेकर्डस भा. ३१ } (१७२२) { श. १५९६ माघ शु. १५
नं. ८३६ इ. फेब्रु. १० न्यू. } ग. बटेव्हिया-डच ई० इं. कं. { इ. १६७५ जाने. ३१

शिवाजी **रायगडला** होता अशी तोंडी बातमी आहे. शिवाजीचे **वेंगुर्ल्यांचे** अधिकारी आमच्याशीं मित्रत्वानें वागतात. आम्हीं तेथें पुनः वखार घालावी अशी त्यांची इच्छा असली तथापि आम्हांला त्याबद्दल अनुकूल सल्ला देतां येत नाहीं. गोव्यापासून ८ मैलांवर, शिवाजीच्या हद्दीच्या बाहेर, **कोंडेवार** [?] हें ठिकाण आज आमच्या मंडळीला बरें वाटतें.

ओ. कॉ. भा. ३४ } (१७२३) { श. १५९६ माघ व. ६
नं. ३९०६ इ. } मुंबई हकीकत { इ. १६७५ फेब्रु. ५

मोंगलांचा **बडा सेनापती दिलेरखान** याचा शिवाजीनें मोड करून त्याचे १००० पठाण मारिले. शिवाजीचे फक्त पांच सहाशें मेले. आदिलशाही सैन्याबरोबरचें त्याचें युद्ध उमरावांच्या मुत्सद्देगिरीच्या धोरणानें रेंगाळत आहे.

फॅ. रे. सुरत भा. ८८ } (१७२४) { श. १५९६ माघ व. ७
पृ. १५–२० इ. } राजापूर-मुंबई { इ. १६७५ फेब्रु. ६

४८ तासांच्या समुद्र-प्रवासानंतर २० तारखेला चाइल्ड राजापुरास पोंचला. **अण्णाजी** पंडीत व सुभेदार यांचीं पत्रें घेऊन गेलेला दलाल ३१ ला परत आला. किनाऱ्याला उतरून पहावें व घर देतील तें पसंत नसल्यास ३ महिन्यांत दुसरें बांधून मिळेल असें अण्णाजीनें कळविलें. वॉर्डनें जुन्या वखारीबद्दलच आग्रह धरला होता; तेव्हां 'तें मिळणार नाहीं. आणि तुम्हीं निघून गेलां तरी आम्हांला पर्वा नाहीं' असें अण्णाजी रागानें बोलला. **अण्णाजी** हा त्या सर्व **भागाचा सरसुभेदार** असून शिवाजीवर ह्याचें वजन असल्यानें त्याची मर्जी राखणें जरूर असल्यामुळें आम्हीं किनाऱ्यावर जाण्याचें ठरविलें. शिवाजी १५।२० दिवसांत ह्या बाजूला येणार आहे असेंहि कळलें.

रेव्हिंग्टननें बांधलेली वखार भोंवतालीं जागा न मिळाल्यामुळें अगदीं लहान बांधली होती. परंतु तिच्या शेजारचें एक घर १०० लारी भाड्यानें त्यावेळीं घेतलें होतें. आतां त्या घरांत सुभेदार रहातो व मूळ वखारींत न्याय कचेरी व दप्तरखाना ठेविला आहे. कचेरीची जागा आम्हीं पाहिजेच म्हटलें तर अण्णाजी देत आहे. परंतु ती अपुरी पडेल. तेथें आम्ही रहावयास गेलों तर सभोंवतीं उच्च हिंदू लोकांचीं घरें व मुसलमानांची मशीद आहे त्यांचा उठावा होऊन त्यांचीं मनें बिघडतील. तेव्हां अण्णाजीच्या म्हणण्या-प्रमाणें दुसरी सोईस्कर जागा घेऊन नवेंच घर बांधावें हें बरें दिसतें. जुन्या घराची किंमत अर्थात् मिळाली तर घेऊंच.

२ तारखेला **राजापुरास उतरलों**. सुभेदार **जिवाजी पंडित**, आरमारी सेनापती **दौलतखान**, इतर अमलदार, सैन्यांतील लोक यांनीं स्वागत केलें. अण्णाजीनें कबूल केल्याप्रमाणें स्वागत न केल्यामुळें आम्हीं त्या दिवशीं त्याची भेट घेतली नाहीं. तीन तारखेला अण्णाजी राजापुराहून लगेच जाणार असें कळलें. म्हणून कागद-पत्रें नीट पाहून काल संध्याकाळीं त्याच्याकडे जाऊन पांच तास बोलणें केलें. वखारीच्या कलमांतील भाषा असंदिग्ध होती. परंतु त्यानंतर नारायण शेणव्यानीं तोंडीं करार होऊन वखारीची किंमतहि १०००० त धरली असें अण्णाजी म्हणूं लागला. नारायण शेणव्याला असा स्वतंत्र करार करण्याला अधिकार नव्हता असें आम्हीं सांगितलें. परंतु 'तें कांहीं नाहीं; ह्या ४ जागा दाखवितों; ह्यांतून कोणती ती निवडा' असें अण्णाजी म्हणूं लागल्यामुळें

आम्हीं एक निवडली. तेथें २ महिन्यांत तो वखार बांधून देईल. वखारीचा बांधण्याचा खर्च कोणीं करावा हा प्रश्न वांध्यांतच पडला. परंतु 'पसंत केलेल्या जाग्यावर २ महिन्यांत वखार बांधून त्याचा खर्च जकातींतून वजा करावा' असें लिहून देण्याचें अण्णाजीनें कबूल केलें. त्याची प्रत सोबत आहे. पुढें २५०० होन मिळण्याचा प्रश्न आला. त्यावर त्यानें शिवाजीचा हुकूम मागितला तो दाखविला. त्यांच्याजवळ माल भरपूर आहे. परंतु ५००० चा माल घेऊन २५०० होन द्यावयास पाहिजेत तेहि आमच्याजवळ नाहींत.

शिवाजीचें ३००० घोडदळ **दत्ताजी पंडीताबरोबर कोल्हापूरला** गेलें. तेथील लोकांनीं १५०० होन देऊन त्याला लावून दिलें. **सोनगांवला** ५०० होन घेऊन तें तसेंच पुढें भटकलें. **अण्णाजी** पंडीत **फोंडा** किल्ला घेण्याकरिता आज रात्रीं किंवा उद्यां निघणार आहे.

[से] मध्यें पुढील मजकूर आहे. अगदीं पालखींत बसेपर्यंत टोलवाटोलवी करून शेवटीं अण्णाजीनें कारकुनाकडून देवविलेला कागद पाहिला म्हणजे या लोकांना तहाची किंवा आपल्या शब्दाची किंमत नाहीं असें दिसतें.

ओ. कॉ. भा. ३५ नं. ४०७७ इ.	(१७२५) सुरत-कंपनी	श. १५९६ माघ व. १४ इ. १६७५ फेब्रुवारी १३

शिवाजीनें कांहीं किल्ले द्यावे; मुलाला ५।६ हजारांची मनसब घेऊन बादशाही नोकरींत पाठवावें आणि **शिवाजीला** औरंगाबादेपासून भीमेपर्यंतचा सर्व मुलूख मिळावा अशा अटींवर मोगल व शिवाजी यांचा तह व्हावयाचा होता. परंतु पक्का विश्वास नसल्यामुळें **शिवाजी** आपल्या मुलाला मोगली सेनापतीकडे पाठवीत नाहीं. हा तह होईल तर बरें.

फॅ. रे. सुरत भा. ८८ पृ. २१-२२ इ.	(१७२६) राजापूर-मुंबई.	श. १५९६ फा शु. २ इ. १६७५ फेब्रु. १७

सुभेदार गोड वचनें देऊन आम्हीं वखार बांधावी म्हणून पाठीस लागला आहे. मात्र **शिवाजी** त्याचा खर्च देईल अशी खात्री वाटत नाहीं....**अण्णाजीनें** आम्हांला दिलेलें घर सुभेदाराच्या सांगण्यावरून कोणीं एकानें फोडलें. त्याबद्दल भांडण झालें. अंगाशीं लावतांच, गुन्हा नाकारून त्यानें घरफोड्या गुन्हेगाराला कैद केलें. 'रिव्हेंज' गलबत बंदरांत आलें त्याची दहशत घालण्यास बरा उपयोग झाला.

फॅ. रे. मुंबई भा. २ पृ. ३३-३४	(१७२७) मुंबई कन्सल्टेशन.	श. १५९६ फा शु. ५ इ. १६७५ फेब्रु. १९

सुरतेहून डुमगांवची हकीकत कळली. **शिवाजी**कडे कळवून भरपाई मागावी

व यापुढें मोंगलांच्या मुलखांतील वखारींना **शिवाजीच्या** सैन्यानें त्रास देऊं नये म्हणून त्याचा **कौल** मागावा.

फॅ. रे. मुंबई भा. २ } पृ. ३४ इ. (१७२८) मुंबई कन्सल्टेशन. { श. १५९६ फा शु. ७ इ. १६७५ फेब्रु. २२

१० हजार होनांची चौथाई भरण्याबद्दल, व इंग्रजांना राजापुरास सोईस्कर घर देण्याबद्दल सुभेदाराच्या नांवचे आणि तत्रस्थ इंग्रजांना चांगल्या तऱ्हेनें वागविण्याबद्दल सुभेदार **अण्णाजी** याच्या नांवचे **शिवाजीचे** हुकूम, प्रेसि० कडे आले. ते पुढील व्यवस्थेकरितां राजापुरास पाठवावे.

(से.) फॅ. रे. सुरत भा. १०७ पृ. ६८ इ. } (१७२९) मुंबई–सुरत. { श. १५९६ फा शु. १२ इ. १६७५ फेब्रु. २७

औरंग० व **शिवाजी** यांच्या तहाच्या बातमींत तथ्य दिसत नाहीं. कारण, नुकतेंच मोंगलांचें सैन्य **कल्याण-भिवंडीवर** येऊन जाळपोळ करून परत गेलें व शिवाजीचें सैन्य फिरून कल्याणला आलें. मोंगलांच्या मुलखावर स्वारी करण्याकरितां त्यानें मोठें सैन्य तयार केलें आहेच. **सुरतेचा** सुभेदार व शिवाजी यांचें बरें आहे अशी आमची खात्री नसती तर सुरतेबद्दल आम्हांला काळजी वाटली असती. कारण, इतर नामांकित शहरें आधींच लुटून झालीं असल्यामुळें, सैन्याचा खर्च भागविण्यासाठीं मोंगलांच्या मुलखांतील लुटण्यासारखें असें सुरत हेंच शहर शिवाजीला आतां राहिलें आहे!

[पृ. ६९] **शिवाजी दंडाराजपुरीच्या** वेढयाचें काम झटून करीत असून पावसापूर्वी तो किल्ला त्याच्या हस्तगत होईल असें वाटतें.

लेटर बुक भा. ५ } पृ. १६७ इ. (१७३०) कंपनी–सुरत. { श. १५९६ फा व. ४ इ. १६७५ मार्च ५

शिवाजीशीं तह केला हें बरें झालें. परंतु एकाशी तह करतांना इतर कोणाशीं बिघाड होतां कामां नये याकरितां जपावें. आमचे ग्रेनेड बॉंब गोळे मिळाल्याचें शिवाजी साफ नाकारतो. तेव्हां त्यांचें खरोखर काय झालें याचा तपास करावा.

(से) फॅ. रे. सुरत भा. ८८–२ } पृ. ३० (१७३१) सुरत–मुंबई. { श. १५९६ फा व. ८ इ, १६७५ मार्च ९

सिद्दीला मदत करण्यासाठीं येथून दोन मोठीं गलबतें सज्ज होत आहेत. समुद्रावर पोर्तु० च्या शत्रुत्वामुळें त्रास होतो.

(से.) फॅ. रे. सुरत भा. १०७ पृ. ७५ इ. } (१७३२) मुंबई–सुरत { श. १५९६ फा. व. १२ इ. १६७५ मार्च १३

डुमगांवचे प्रसंगाबद्दल बोलणें करण्याकरितां शिवाजीकडे मि. ऑस्टिन यानें स्वतः जावें असें ठरविलें. तो येथून दोन दिवसांनीं रायरीला जाईल. [मुंबई कन्सल्टेशन, ता. १० मार्च, फॅ. रे. मुंबई भा. २ पृ. ४४–४५]

खं. १८ ले. ५७ पृ. ८४ सु. १०७५ जिल्हेज २५ } (१७३३) { श. १५९६ फा. व. १२ इ. १६७४ मार्च १३

मोरो त्रिमल व नारो नीळकंठ

बाजी घोलप, गौरोजी गायकवाड इमारती पुरंधर हवालदार व कारकून किले पुरंधर.

गोपाळसेट बिन नामसेट सेटिया व जावसेटी महाजन यांत पुरंदर पेठच्या सेटेपणाबद्दल बंटा होता. शिवाजी पुरंदरी आले तेव्हां जाबसेटी यानें आपलें सेटेपण म्हणून सांगितलें. पुढें गोत मेळवून सेटेपण गोपाळ सेट्याचें खरें ठरलें.

खं. १८ ले. ५७ पृ. ८० सु. १०७५ जिल्हेज २५ } (१७३४) उल्लेख– { श. १५९६ फा. व. १२ इ. १६७५ मार्च १३

मोरो त्रिमळ व नारो नीळकंठ—गोपाळ सेट सेट्या

तुझा सेटेपणाचा निवाडा होऊन सेटेपण तुझें असे. याबद्दल भेट संभाजी राजे यास होन ५ व सरकार शेरणी होन १५० तुज खंड केला.

खं. ८ ले ३९ ? } (१७३५) { श. इ.

राज्याभिषेकानंतरची पान विडे देण्याची पद्धत

सा. ले. ५५ सु. १०७५ } (१७३६) { श. १५९६ इ. १६७४–७५

जाबिता सिस्त मिरासी पटी, परगणे शिरवल मधील

खं. ८ ले. २९ } (१७३७) शिवाजी व इंग्रज तह { श. १५९६ इ. १६७४

१ इराणचा पातशाहा व हिंदुस्थानांतील मोगल पातशहा यांचा व इंग्रेजांचा तह झाला. त्यांचे देशांत इंग्रेजाचा व्यापार चालत आहे. २ व्यापारी माल येईल त्याजवरी जकात घेऊं नये. महाराजांचे राज्यांत व्यापार चालावया अडथळा होऊं नये. ३ इंग्रजाचे शिक्याचे रुपये व मोहरा व पैसे महाराजाचे राज्यांत चालावें. ४ महाराजांचे मुलकात दर्याचे काठीं इंग्रजाचीं जहाजें मोडून फुटून किनारियास लागली तर त्यांतील माल आमचा आम्हास द्यावा. एकुण चार कलमांपैकीं महाराजांनीं ठराव केला तीं कलमें.

१ महाराजांचे राज्यांत तुम्ही व्यापार करावा. २ माल येईल जाईल त्याची जकात माफ असे. ३ बाकीचीं कलमें गैरमंजुरा होत.

ऑर्म भा. ११४ वि. ४ } (१७३८) { श. १५९७ चैत्र शु. ८
पृ. १०४ इ. } मुंबई-इंग्लंड { इ. १६७५ मार्च २४

शिवाजी ऑस्टिनच्या मागणीप्रमाणें बहुधा सर्व वखारींकरितां कौल देईल. परंतु या शत्रुमित्र न पहाणाऱ्या लुटारूंच्या सैन्यावर विश्वास ठेवण्यांत अर्थ नाहीं. शिवाजी आपल्या स्वतःच्या मुलखांत मात्र आपल्याला नांव ठेवण्यास जागा नाहीं अशा तऱ्हेनें (as we can reasonably desire) व्यापाराला यथोचित **उत्तेजन देतो**. परंतु मोंगलांचा व त्याचा तह मोडल्यामुळें त्यांच्या मुलखांतील व्यापाराच्या बाबतींत आमच्या इच्छेप्रमाणें सुधारणा होत नाहींत. कालांतरानें कांहीं करतां येईल असें वाटतें.

ओ. कॉ. भा. ३५ } (१७३९) { श. १५९७ चैत्र शु. ९
नं. ४०७७ इ. } सुरत-कंपनी. { इ. १६७५ मार्च २५

मोंगलांशीं शिवाजीचा तह होण्याबद्दलची बातमी शिवाजीनें लबाडीनें उठविली होती. इकडे **बहादुरखानाशीं** तहाचें बोलणें लावून त्यानें आपल्या किल्ल्यांत धान्यसामग्री भरली, आणि विजापुरकरांकडून युद्ध चालविण्याकरितां पैसा मिळविला. तो तसें न करता तर विजापुरकरांनीं मोंगलांशीं तह करून शिवाजीवर स्वारी करण्याची धमकी दिली होती असें म्हणतात [?].

फॅ. रे. सुरत भा. ८८ } (१७४०) { श. १५९७ चैत्र व. २
पृ. ३४ इ. } राजापूर-मुंबई. { इ. १६७५ एप्रील १

राजा येथें येऊन गेला. सहानुभूतीनें बोलला. आतां तो फोंड्याजवळील त्याच्याच ताब्यांतील **कुडाळला** गेला आहे. येथून जाण्यापूर्वी ४० लहान गलबतें त्यानें **वेंगुर्ल्या**कडे रवाना केलीं. त्यांचेबरोबर १५००० घोडदळ १४००० पदाती व १०००० मजूर आहेत. फोंडा, गोवा, सुरूपनायकाचा (surup [N ?] agues) देश, किंवा विजापूर असे त्याच्या उद्दिष्टाबद्दल नानाविध तर्क आहेत. त्यानें **कोलापूर** घेतलें. **रायबागहि** इतक्यांत घेईल. शिवाजी राजापुरास असतांना त्याला आम्हीं नजराणा दिला. व घराबद्दल वगैरे आमच्या सर्व मागण्या त्यानें मान्य केल्या.

फॅ. रे. सुरत भा. ८८ } (१७४१) { श. १५९७ चैत्र व. ३०
पृ. ३७ इ. } कारवार-मुंबई. { इ. १६७५ एप्रील १४

शिवाजीचें २००० घोडदळ व ७००० पायदळ इतकें सैन्य गेले सहा दिवस

फोंड्याला वेढा चालून बसलें आहे. पावसांत देखील वेढा चालू ठेवून फोंड घेण्याचा शिवाजीचा निश्चय झाला आहे. **महमदखाना**जवळ ४ महिन्यांपेक्षां रसदेचा अधिक पुरवठा नाहीं. विजापुराहूनहि कांहीं कुमकेची आशा नाहीं. **पोर्तु० नीं** शिवाजीला प्रथम थोडी चुणूक दाखविली. परंतु आतां ते स्वस्थ असून महमदखानाला मदत करितील असें वाटत नाहीं.

कानड्यांतील यादवी चालू आहे. फोंडा घेऊन शिवाजी तिकडे गेल्याशिवाय ती बंद पडणार नाहीं.

फॅ. रे. सुरत भा. ८८ पृ. ४१–४९ इ.	(१७४२) राजापूर–मुंबई	श. १५९७ वैशाख शु. ५ इ. १६७५ एप्रील २०

आमच्याकरितां बांधावयाचें घर बिनखर्चानें व आम्हीं बांधूं शकूं त्यापेक्षां त्वरित बांधून मिळण्याची आम्हांला आशा आहे. आम्हांला ५००० होनांचा माल अण्णाजी पंडित देणार तो नारळ व सुपारी हा असून त्याचे दर, नारळाला ५ लारी खंडी व सुपारी १०० लारी खंडी, म्हणजे फारच महाग लाविले आहेत. वास्तविक दर अनुक्रमें २½ लारी व ८० लारी असे आहेत ! यांत कंपनीला काय मिळणार ?

अण्णाजीनें आम्हांस फसविण्यास सुरवात केली आहे. परंतु लोकांत आम्हांला चांगला मान आहे.

सुभेदारानें आम्हांला वखार बांधण्याबद्दलचा लकडा लाविला. आम्हींहि **अण्णाजीवर** अविश्वास न दाखवितां 'होय' म्हणत राहिलों. कारण शिवाजी थोडक्याच दिवसांत भेटण्याची आम्हांला आशा होती. मार्च २० ला शिवाजी दुसऱ्या दिवशीं ४ कोसांवर वेलवड्याला (Vellvorah) येणार असें कळलें. पुढें २२ तारखेला दोनप्रहरीं त्याची आमची गांठ रस्त्यांत पडली व सायंकाळीं आम्हांला बोलावण्याचें त्यानें कबूल केलें. त्यानंतर **अण्णाजीला** व प्रल्हाद निराजीलाहि आम्ही भेटलों. पुढें मार्च २४ ला **शिवाजीचा** मुक्काम राजापूरला आला व २५ तारखेला त्याची भेट झाली. त्या वेळीं आम्हीं त्याला २०० होनांचा नजराणा दिला व आमच्या मागण्या त्याला वाचून दाखविल्यावर त्यांबद्दल फर्मान देण्याचें त्यानें कबूल केलें. पुढें राजा सायंकाळीं निघून गेला. मोहनदासाला फर्मान आणण्याकरितां त्याच्याबरोबर पाठविलें आहे. परंतु पुढें राजाच्या मुक्कामापासून उत्तरेकडचें दळणवळण राजानें बंद केल्यामुळें हीं पत्रें त्वरेनें पाठविलीं आहेत. फर्मान येतांच नक्कल पाठवूं. घराचा पाया खोदून दगड व चुना आणिला आहे. राजानें बांधणीचें काम त्वरेनें करण्याकरितां मुद्दाम एक मनुष्य नेमिला आहे. पैसा सुभेदाराकडून मिळावयाचा आहे. हिशेबाच्या मोबदल्याचा माल आम्हीं अद्याप घेतला नाहीं. फर्मान मिळाल्यावर पाहूं.

शिवाजी सर्व सैन्य घेऊन **फोंड्याशीं** (चंग बांधून) बसला आहे. पुष्कळ प्राणहानी झाली. त्यानें चारदां सुरुंग लावले. परंतु तितक्याहि वेळां शत्रूनें उलट सुरुंग लावले. तटापासून १२ फुटांवर सैन्याचे रक्षणाकरितां त्यानें भिंत बांधली असून तेथून तो किल्ला घेतल्याशिवाय उठणार नाहीं असें म्हणतात. गोव्यांतील **पोर्तु०** त्याला भितात. कारण, **फोंडा** घेतल्यावर तो गोवा घेईल. **विजापूरचें राज्य** तर सर्वच त्याच्या ताब्यांत येईल. **रायबागला** त्याचें सैन्य आलें आहे. परंतु तें घेतल्याची अधाप बातमी नाहीं. गोव्याच्या व्हाईसरायबरोबर शिवाजीचा वकील आहे. तथापि पोर्तु० शक्य ती **मदत फोंड्याला करतात.**, एकदां अन्नसामुग्रीनें भरलेलीं फोंड्याकडे जाणारीं पोर्तुगीजांचीं १० शिबाडें **शिवाजीला** सांपडलीं. उघडपणें विचारल्यावर मात्र व्हाइसराय नाकबूल झाला.

फॅ. रे. सुरत भा. ८८ पृ. ३७, ३८ इ. } (१७४३) कारवार–मुंबई { श. १५९७ वैशाख शु. ७ इ. १६७५ एप्रील २२

या प्रांताचा अधिकारी **रुस्तुमजमा** १५०० घोडदळ व पायदळ घेऊन **फोंड्याला** कुमक करावयास आला. **शिवाजी** एकाच वेळीं अनेक ठिकाणीं उद्योग करीत आहे. फोंड्याचा वेढा इकडे चालू आहे तोंच तिकडे **आदिलशाहीचे हद्दींतील** एटगेरी, व गोंवळकोंड्याचे हद्दींतील **भागानगरजवळील** दोन अशीं **तीन मोठीं शहरें** त्याच्या लोकांनीं लुटलीं व तेथून पुष्कळ संपत्ति व सावकार पकडून फोंड्यास शिवाजीपाशीं आणिले. **पोर्तु० हद्दीं**तील कुकुली आणि वरूडें हीं दुसरीं **गांवें** त्याच्या सैन्यानें लुटलीं. पावसांत तो येथेंच छावणीकरितां राहणार असल्याकारणानें फोंडा त्याचे हातांत नक्की जाणार असें सर्वांनाच वाटतें. त्याचें सैन्य २० हजार आहे असें लोक बोलतात. त्यांपैकीं कांहीं सैन्य कदाचित् (लुटीकरितां) या बाजूलाहि येईल !

खं. १५ ले. १३४ सु. १०७५ सफर ७ } (१७४४) न. म. मु. सी. { श. १५९७ वैशाख शु. ८ इ. १६७५ एप्रील २३

कृष्णाजी भास्कर सुभेदार व कारकून सुभा महालानिहाये पाां वांई व सातारा

कुकाजी बयाजी हवालदार व कारकून ताा सातारा

रा. जोगेंद्रगीर मानभाऊ अजहत कमळनयन सेकीन निंब यास इनाम बिघे ८१५ आहे. ती गुदस्ता पड होती. तर आतां कीर्दीस लाऊं देणें. सनद पेस्तर येईल.

सा. ले. ५६ सु. १०७५ सफर १४ } (१७४५) { श. १५९७ वैशाख शु. १५ इ. १६७५ एप्रील ३०

राघो बलाल–विसाजी गंगाधर

मौजे सुपे खुर्द पाा सुपे येथील मोकदमी तिसरी तकसीम रा. शंकराजी नीळकंठ-

राळ याची आहे. हल्लीं त्यावर मिरासपटी होन ३० प्रमाणें १० होन आली. पैकीं होन ५ तहकूब केले असते. तरी ते देणें.

फॅ. रे. सुरत भा. ८८ पृ. ५४ इ. (१७४६) राजापूर–मुंबई { श. १५९७ वैशाख व. ४ इ. १६७५ मे ३

फोंड्याचा वेढा नेटानें चालविला आहे. राजानें दोन मान्याच्या जागा ताब्यांत घेऊन खंदक भरून टाकला, आणि ५०० शिड्या करून त्यांच्यावर चढून जाण्याचें धाडस करणाऱ्यांना **बक्षीस देण्याकरितां** त्यानें प्रत्येकीं अर्धा शेर वजनाचे **सोन्याचे ५०० तोडे** करविले. शिवाजीनें पुष्कळ सैन्य तेथें इरेस घातल्यामुळें त्याच्या ताब्यांत किल्ला जाणार अशीच आमची अपेक्षा होती. इतक्यांत वेढा उठवून [परंतु ले. १७४७ पहा] **शिवाजी** निघून गेल्याची बातमी आज सकाळीं आली. **बहलोलखान** स्वतःचें ८००० घोडदळ व ७००० पायदळ आणि शिवाय इतर मोठें सैन्य बरोबर घेऊन त्याच्यावर चालून येत आहे; म्हणून शिवाजी गेला असावा.

फॅ. रे. सुरत भा. ८८ पृ. ४६ इ. (१७४७) कारवार–मुंबई { श. १५९७ वैशाख व. ९ इ. १६७५ मे ८

शिवाजीनें फोंडा जिंकून महमदखानाला बेड्या घातल्या; व किल्ले शिवाजीचे स्वाधीन करावे, असें शेजारचे किल्लेदारांना पत्र त्याचे हातून जबरदस्तीनें लिहून घेतलें. पण त्याचें कोणी ऐकणार नाहीं. गेले १५ दिवस ३००० घोडदळ व शिवाय कांहीं पायदळ **शिवेश्वरच्या** (Smimeseer) किल्ल्याला वेढा देऊन आहे. १२ दिवसांपूर्वी शिवाजीच्या एका सेनापतीनें येऊन **कारवार** जाळलें.

ऑर्म भा. ११४—४ पृ. ११० इ. (१७४८) मुंबई—राजापूर. { श. १५९७ वैशाख व. १४ इ. १६७५ मे १३

अशा महाग दरांनीं नारळ व सुपारी देण्यानें **अण्णाजी** अन्याय करीत आहे हें खरें आहे. परंतु आपल्या सर्वच सावकारांना हाच माल व अशाच किंमतीस देण्याचा शिवाजीचा प्रघात असला तर, आपल्याला तितकी **तक्रारीला जागा रहात नाहीं.**

[पृ. १११] — **अण्णाजी** हा तिकडील व्हाइसरॉयाच्या अधिकारावरचा अमलदार असल्यामुळें व चतुर असल्यामुळें आपल्या दर्जाप्रमाणें आपला मान ठेवला जावा असें त्याला वाटणें साहजिक आहे. तरी त्याचा योग्य मान ठेवा. आपल्या दर्जाला शोभेल असेंच तुह्मीं स्वतः वागा. परंतु उद्दामपणा व कृतघ्नपणा करूं नका. ज्यांच्याशीं तुम्हांला वागावयाचें आहे ते लोक (मराठे लोकांचा स्वभाव) **चतुर** आणि **चौकस**

(searching) आहेत. त्यांच्याशीं व्यवहार करतांना मर्यादेनें आणि विचारानें करावा. भावनाप्रधान किंवा फाजील घमेंडखोर लोकांची केवळ कुचेष्टा करूनच न थांबतां ते त्यांच्यापासून शक्य तितका आपला फायदा करून घेतात.

(पृ. ११३) शिवाजीचा सेनापती कारवारला आला तेव्हां तुम्ही त्याला भेटायला गेला नाहीं हें बरें केलें नाहीं. त्याच्या सर्व सेनापतींना व प्रधानांना **चांगल्या रीतीनें वागविलें पाहिजे.**

खं. १८ ले. २० }
सु. १०७५ सफर २९ } (१७४९) { श. १५९७ ज्येष्ठ शु. १
{ इ. १६७५ मे १५

मोरो त्रिमल—राघो बलाल सुभे. महालानिहाये ता। जुनर.

पा। पुणेचे देसकुलकर्णी यांनीं सांगितलें कीं, देसमुखास व आपणास पूर्वी सुभेदार दादाजी कोंडदेऊ ह्यांनीं ३०५ व ९५ अशी खंडणी दरसालची आकारली होती. त्याप्रमाणें खंडणी कांहीं वर्षे दिलीं. पण हालीं ५।७ वर्षे माहाल खराब पडला. वसाहत जुजबी. तरी स्वामीनें महालास कागद द्यावा कीं, पूर्वी महालाची मामुरी असतां जो इनामतीचा वसूल होत असे व त्यांपैकीं जी खंडणी सरकारांत देत असे त्याप्रमाणें हालींच्या वसुलांत घेणें. तरी असा कागद पाठविला असे.

सा. ले. ५७ }
सु. १०७५ सफर ३० } (१७५०) { श. १५९७ ज्येष्ठ शु. २
{ इ. १६७५ मे १६

राघो बलाल—मोरो निबाजी मुजुमदार पा। पुणा.

निलोजी नीलकंठराऊ पुरंधरकर याचा इनाम मौ। चांबिली ता। करेपठार येथें कास टका १ आहे. त्यावरील मिरास पटी २५ होन घातली आहे, ती दूर करणें.

फॅ. रे. सुरत भा. ८८ }
पृ. ६१ इ. } (१७५१) राजापूर–मुंबई { श. १५९७ ज्येष्ठ शु. ७
{ इ. १६७५ मे २१

कांहीं दिवसांपूर्वी, **फोंडा** घेतांच शिवाजीनें सररहा सर्वांची कत्तल केली [!]. आसपासचा सर्व आदिलशाही मुलूख **शिवाजीच्या** अमलाखालीं आणून देण्याचें वचन दिल्यामुळें फक्त महमदखान आणि आणखी ४।५ लोक यांचे प्राण बचावले. **अंकोला** आणि **शिवेश्वर** हे दोन्ही किल्ले पडले. **कुदारा** [कोद्रा] थोडासा **टिकाव** धरून आहे; पण लवकरच पडेल. शिवाजी आतां **कारवार** प्रांताचा स्वामी झाला असून त्याची **पुढची स्वारी गोव्यावर** होईल, असें म्हणतात.

फॅ. रे. सुरत भा. ८८ } (१७५२) { श. १५९७ ज्येष्ठ शु. ११
पृ. ५८ इ. } कारवार-मुंबई. { इ. १६७५ मे २५

ह्या भागांत शिवाजीला महद्यश आलें असून थेट **अंकोल्यापर्यंतचा** मुलूख त्याचे ताब्यांत आला. **फोंडा** हें त्याच्या **पराक्रमाचें फळ** असून इतरत्र द्रव्य-प्रयोगच यशस्वी झाला.......**कारवार** शिवाजीच्या अमलांत गेल्यामुळें त्याला आम्हीं व्यापाराच्या अटी विचारल्या. तेव्हां **राजापुरच्याप्रमाणेंच** येथेंहि चालेल असें तो म्हणाला. तिकडील **शिरस्ता** कळवा.

फॅ. रे. सुरत भा.८८ } (१७५३) { श. १५९७ ज्येष्ठ व. ३
पृ. ६२ इ. } राजापूर-मुंबई { इ. १६७५ मे ३१

शिवाजी राजानें आतां सर्व **विजापुरी कोंकण** जिंकलें आहे. कारवारच्या इंग्रजांशीं तो बरा वागला. **बहलोलखान** अजून **मिरजेंतच** आहे. त्यानें फोंड्याची कुमक करण्याचा प्रयत्न केला; परंतु राजानें झाडें तोडून तीं आडवीं घालून मार्ग बंद केले आणि सर्वत्र पहारे ठेवले यामुळें त्याचें कांहीं चाललें नाहीं अशी आमची माहिती आहे. परंतु बहलोलखानाला मोठा **लांच** दिल्यामुळें तो थबकला असें कारवारचे लोक लिहितात.

फॅ. रे. सुरत } (१७५४) { श. १५९७ ज्येष्ठ व. ३
भा. ८८ पृ. १०५-६ इ. } फोर्ट सें. जॉर्ज-मुंबई { इ. १६७५ मे ३१

शिवाजीच्या अमलाची किनाऱ्यावर वाढ झाल्यानें पोर्तु०नां ताळ्यावर आणण्यास तें एक बरें साधन होईल. कारवारच्या कंपनीचेंहि त्यामुळें नुकसान होईल असें नाहीं. [**से** मध्यें याच पत्राची तारीख जुलै १७ दिली आहे.]

से. फॅ. रे. सुरत भा. १०७ पृ. ११५-तेथूनच व त्याच तारखेचें सुरतेस पत्रः- तुमचे **शेजारी पोर्तु०** जलीं-स्थलीं तुमचेशीं दुष्टाव्यानें वागतात हें ऐकून खेद झाला. परंतु तुमचा **नवा स्नेही शिवाजी** त्यांना त्यापेक्षांहि अधिक त्रास देत असल्यामुळें जशास तसेंच होत आहे.

खं. ८ ले. ३२ } (१७५५) { श. १५९७ ज्येष्ठ व. ४
सु. १०७६ रवल १६ } { इ. १६७५ जून १

! — शामजी आवजी हवालदार व कारकून तर्फ जाळगाऊ.

तर्फ मजकूरपैकीं मौजे पालघर येथील हसम पाव लोकाचा जुमलेदार सूर्याजी ढुंदुसकर याच्या चाकराची बाईल किले रायगडास इमारतकामावर मजुरी करीत असतां

तिनें बद अमल केला. आबद्दल तर्फदार नरहरी बाबाजी यानें सूर्याजीपासून ५७ घ्यावे याकरतां दुंदुसकराचे घरीं मोकळदार बसवून तसवीस लाविलीयाचे हुजूर कळलें. तरी ज्याचा चाकर तोच येथें चाकराचा धनी आहे. सारी हकीकत लेहून पाठवणें व तोशीस न लावणें.

फॅ. रे. सुरत भा. ८८ } (१७५६) { श. १५९७ ज्येष्ठ व. ६
पृ. ६३ इ. } राजापूर-मुंबई. { इ. १६७५ जून ३

बहलोलखान आपलें सैन्य मिरजेला ठेवून पावसाळ्याकरितां विजापूरला गेला. शिवाजी **अंकोल्या**जवळ होता. तो सुंदा राजाचे देशाजवळ किल्ल्यांत छावणीस जाणार आहे. **फोंड्याची डागडुजी** व बंदोबस्त पहाण्याकरितां तो **अण्णाजी** तेथेंच राहिला.

फॅ. रे. सुरत भा. ८८ } (१७५७) { श. १५९७ ज्येष्ठ व. ११
पृ. ७१ इ. } कारवार-मुंबई { इ. १६७५ जून ९

शिवाजीनें फोंडा घेण्यापूर्वी ५ दिवस त्याचा एक सेनापती कारवारला आला. त्यावेळीं **बहलोलखान** फोंड्यापासून दोन दिवसांचे अंतरावर असल्याची आणि त्याच्या मागोमाग, या प्रांताचा भावी अधिकारी सिद्दी मुसर्दिचा पुत्र, मोठ्या सैन्यानिशीं आल्याची नक्की खबर आली होती. यावरून शिवाजी वेढा टाकून जाणें आम्हांला संभवनीय वाटलें. परंतु **बहलोलखानानें** ५० ह. होनांचा लांच व आपल्या प्रांताला तसवीस न लावण्याचें वचन घेऊन शिवाजीला विरोध केला नाहीं. शिवाजी बहुधा थोडा वेळ त्याला आपल्या बाजूला राखील आणि शेवटीं त्याचाहि नाश करण्यास [शेवटचा गोड घांस घेण्यास] सोडणार नाहीं !

फॅ. रे. सुरत } (१७५८) { श. १५९७ आषाढ शु. १
भा. ८८ पृ. ६५ इ. } राजापूर-मुंबई { इ. १६७५ जून १४

तीन दिवसांपूर्वी राजा **रायगड**कडे या शहरावरून गेला. **बहलोलखानाला लांच** दिला याबद्दल संशय राहिला नाहीं. आतां शिवाजी विजापूरचे **बाल सुलतानाशीं तह** करून पुढच्या उन्हाळ्यांत **कर्नाटकांत** सुरूप नाईकाच्या देशावर स्वारी करील. तसें झाल्यास इकडे शांतता राहून येथील व्यापार वाढेल.

फॅ. रे. सुरत } (१७५९) { श. १५९७ आषाढ शु. २
भा. ८८ पृ. ६७ इ. } सुरत-मुंबई. { इ. १६७५ जून १५

शिवाजीच्या वकिलानें शिवाजीच्या **तहावर मोंगलाची सही** घेतली असें बोलतात. तथ्य कळवावें.

(से) फॅ. रे. सुरत
भा. १०७ पृ. १०५ इ.
(१७६०)
मुंबई-सुरत
श. १५९७ आषाढ शु. ७
इ. १६७५ जून १९

डूमगांव प्रकरणीं वखार पुनः सुरू करण्यास हरकत नाहीं. कारण **शिवाजी**-कडून पक्के कौल मिळविण्यांत आपल्याला यश येईल असें वाटतें.

(से.) फॅ. रे. सुरत
भा. ८८ पृ. ७३-७४ इ.
(१७६१)
कारवार-मुंबई
श. १५९७ आषाढ व. ४
इ. १६७५ जुलै १

कारवारचे **नवे राज्यकर्ते त्रासदायक** आहेत. मुसलमानी अमलांत नव्हते असे प्रकार करून त्रास देतात. त्यांनीं नारळाचीं झाडें व फळें मोजलीं, शिपायांकडे तांदुळाची चौकशी केली आणि नाना तऱ्हा केल्या ! **शिवाजीचे मुलखांत** आपली **वखार भरभराटीस येणार नाहीं**. ते बियाणें देखील चोरून नेतात. सर्व लोक मुसलमान पुनः यावेत अशी प्रार्थना करितात. पावसानंतर तसें होईलहि. आम्हीं आपल्या तक्रारी शिवाजीकडे लिहून कळवीत आहोंत. तुम्हींहि या बाबतींत त्याच्याकडे लिहावें.

(से) फॅ. रे. सुरत भा. १०७
पृ. १०९ इ.
(१७६२)
मुंबई-सुरत
श. १५९७ आषाढ व. ४
इ. १६७५ जुलै १

शिवाजी व मोंगल यांचा तह झाल्याची बातमी बरीच विश्वसनीय मानली जाते. शिवाजीनें मोंगलापासून घेतलेला मुलूख व किल्ले मोंगलांना द्यावे; फक्त **सातारा** (ऑर्म ११४-४ पृ. १३३) आणि मावळें आपल्याकडे ठेवावीं; **दख्खनमधील सर्व मुलखाचा देसाईपणाचा** अधिकार शिवाजीला मिळावा; आणि जुन्नरचा मोंगलांचा सुभेदार कल्याण-भिवंडीला यावा; अशीं कलमें आहेत. परंतु याबद्दल पक्केपणा नाहीं. **१७ जुलैचे** सुरत-मुंबई पत्रांत (फॅ. रे. सुरत भा. ८८ पृ. ७८) तहाची बातमी [वरील तपशील वगळून] दिली आहे.

फॅ. रे. मुंबई,भा. २
पृ. ९४-९६ इ.
(१७६३)
मुंबई कन्सल्टेशन
श. १५९७ आषाढ व. १०
इ. १६७५ जुलै ७

अनेक गोष्टींचें आग्रहाचें मागणें केलेलें पत्र घेऊन **शिवाजीचा** वकील प्रेसिडेंटकडे आला. परंतु शिवाजीला आधींच कंपनीनें विकलेल्या मालाबद्दल त्याच्याकडून बरेंच येणें आहे; तो रोकड न देतां भात, नारळ किंवा सुपारी मोबदल्यांत देतो. यामुळें कंपनीचा फायदा कांहींच होत नाहीं; आणि आतां त्यानें केलेली लोखंड, गोळे, दोन पितळी तोफा आणि तांबें यांची मागणी बरीच मोठी आहे; इत्यादि गोष्टींचा विचार करणें जरूर आहे. त्याबरोबरच आतां **शिवाजी प्रबळ झाला असून** कंपनीचा पुष्कळसा **व्यापार त्याच्या अमलाखालीं चालतो** आणि त्याच्या सगळ्याच मागण्या झिडकारल्यास कंपनीचें नुकसान होईल; ह्याहि गोष्टी विचारांत घेतल्या पाहिजेत. तेव्हां भात बदली

घेण्याचें ठरवून, आमचें काम भागून राहील तेवढा **दारुगोळा** शिवाजीला द्यावा, परंतु तांबें फक्त रोखीनें विकावें. पितळी तोफांबद्दल पुढील सभेंत निर्णय करावा. [**ता. ९ रोजीं** तांबें रोखीनें घेतल्यासच द्यावें व तोफा देऊं नयेत असें ठरलें.]

आलेल्या वकिलाजवळ प्रेसिडेंट डुमगांवसंबंधीं बोलला. त्यावरून हा महिना अनारोग्यकर असल्यामुळें पुढील महिन्यांत ऑस्टेननें रायगडला शिवाजीशीं बोलणें करण्याकरितां जावें; असें ठरलें.

(से.) फॅ. रे. सुरत भा. १०७ } (१७६४) { श. १५९७ श्रावण शु. ३
पृ. ११३ इ. } मुंबई–सुरत. { इ. १६७५ जुलै १५

राजापूरच्या वखारीपासून फायदा खास आहे. सर्व प्रकारचें कापड स्वस्त मिळावें म्हणून **जुन्नरला** वखार घालावी. मोंगल व शिवाजी यांचा **तह आहे तोंपर्यंत** मुंबईचा मार्ग सुरक्षित राहील. तह नच झाला तरी **उभयतां आपले स्नेहीच** आहेत. दोघांचेहि पास मिळतील.

फॅ. रे. सुरत भा. ८८ } (१७६५) { श. १५९७ श्रावण शु. ११
पृ. ७७ इ. } सुरत–मुंबई { इ. १६७५ जुलै २२

मोंगल–शिवाजी तह झाला नाहीं असें सुभेदारानें जाहीर केलें आहे. जरी कलमांवर सह्या झाल्या आणि तह घडवून आणण्याची कामगिरी केल्याबद्दल बादशहानें **बहादरखानाला** एक हत्ती पाठवून त्याची मनसब वाढविली, तरी शिवाजीनें त्याला फसविलें असेंच अखेरीस ठरलें. आदिलशाही मुलखांत बिनहरकत स्वारी करितां यावी एवढ्याकरितांच त्यानें **हें कपटनाटक** उभें केलें होतें !

फॅ. रे. सुरत भा. ८८ } (१७६६) { श. १५९७ श्रावण व. २
पृ. ८९–९० इ. } कारवार–मुंबई { इ. १६७५ जुलै २८

पावसानंतर काय होईल न कळे. परंतु मुसलमान फिरून हा भाग जिंकण्याकरितां आले, आणि **शिवाजीहि** सप्टेंबरांत इकडे उतरला, तर दोन्ही सैन्यांच्या उपद्रवांमुळें घांटाखालीं माल आणणें कठीण होईल.

सा. ले १३५ } (१७६७) { श. १५९७ श्रावण व. ३
सु. १०७६ जवल १५ } { इ. १६७५ जुलै २९

त्रिंबक वासुदेव हवाल॰ व कार. ता कन्हेपठार

रा. **पंताजी गोपीनाथ** सब. व चिट. का सासवड:–का सासवडची सब. व चिट. तुमची. तुमचा गुमास्ता कृष्णाजी गोविंद खळदकर यास अवदा मोगलाचें धामधुमे करितां कांहीं पावलें नाहीं. म्हणून रुजून तुम्हांकडे आला आहे. तरी माघारा पाठविणें झाडा करून देऊं.

खं. २१ ले. ४ }
सु. १०७६ जवल १९ }
(१७६८)
ता. म. मु. कौलनामा
{ श. १५९७ श्रावण व. ७
{ इ. १६७५ आगस्ट २

अज दिवाण ठाणे तपे संगमेश्वर मामले प्रभावली
वेद. नीलकंठभट सोमनाथभट कात्रे सेकीन मा।

तुम्हीं सांगितलें कीं आपले वडील गोमांतकांत वैद्यकी करीत होते. सोमनाईक सरदेसाई मामले प्रभावलीकर यानीं त्यांस संगमेश्वरीं आणून घर देऊन ठेविलें. पुढें आपले सासरे वारल्यामुळें त्यांचीं मुलें आणून घरीं ठेविलीं. मी काशीस गेलों. येऊन उदरनिमित्त श्रृंगारपुरीं राहिलों. त्यावर राज्य राजश्री [शिवाजी] स प्राप्त जाहालें. तेंव्ह आपण धुणकेश्वरींहून घरीं आलों. तों सप्रे म्हणूं लागले, तुमचे वडिलांनीं घर आम्हांस दिलें. यानंतर सभा होऊन निवाडा झाला. घर रामभट सप्रे याचें व घरभूमी आमची. तरी सुखें घर बांधोन राहणें.

फॅ. रे. सुरत भा. ८८ }
पृ. ९५-९७ इ. }
(१७६९)
रायबाग-मुंबई.
{ श. १५९७ श्रावण व. ११
{ इ. १६७५ आगस्ट ७

३० जुलैला सकाळींच **कोल्हापूरच्या** मुसलमान सुभेदाराला शिवाजीच्या लोकांनीं कैद करून **पन्हाळयावर** नेल्याची बातमी आली. ती ऐकतांच आम्हीं रायबागला येण्यासाठीं निघालों. **शिवाजीच्या भीतीनें** व आदिलशाही सुभेदाराच्या जुलमामुळें मार्गांत सर्व उजाड झालें होतें. ... प्रथम **१७ किल्ले देण्याचें** कबूल करून, तहाच्या कलमांवर बाद० च्या सह्या झाल्या असतांना देखील, मागाहून किल्ले देण्याचें नाकारून **शिवाजीनें तह मोडल्यामुळें** बादशहा फारच क्रुद्ध झाला. **आदिलशाहा** आणि **बहलोलखान** यांनीं कमालीचा प्रयत्न करून **शिवाजीचा नाश** करण्यास आपल्याला मदत करावी असें लिहून, विजापुरकरांनीं मोंगलांना द्यावयाच्या खंडणीची देखील त्यानें ह्या कामगिरीकरितां सूट दिली. **बहलोलखान**हि ह्या विनंतीप्रमाणें पन्हाळयावर स्वारी करण्याच्या तयारींत आहे. चंद्र बदलतांच तो निघणार असें जाहीर झालें असलें, तथापि पावसाचा त्याला अडथळा होईल हें उघड आहे. बहुधा दिवाळीच्या आधीं त्याचें येणें होणार नाहीं.

(से.) फॅ. रे. सुरत भा. ८८ }
पृ. ९० इ. }
(१७७०)
जैतापूर-मुंबई
{ श. १५९७ श्रावण व. ११
{ इ. १६७५ आगस्ट ७

शिवाजीकरितां मोठें आरमार बांधण्याचें काम चालू असल्यामुळें सुतार, अरकसदार, लोहार इत्यादि सर्व कामदार तिकडे गुंतले आहेत.

सा. ले. १२६ }
सु. १०७६ जवल २५ }
(१७७१)
{ श. १५९७ श्रावण व. १२
{ इ. १६७५ आगष्ट ८

अज दिवाण ठाणे को सासवड मोकदम देहाये का मार

कोढीत इ. नऊ गांवाहून २०५ होन सत्वर पाठविणें. चिटणीस, सबनीस व नायकवाडी यांचे तर्फेचे कृष्णाजी गोविंद यास या कार्याकरतां पाठविले आहेत. दर गांवीं ·॥· प्रताप मसाला म्हणून त्यांस आदा करणें.

फॅ. रे. मुंबई भा. २ पृ. १२० इ. | (१७७२) मुंबई कन्सल्टेशन. | श. १५९७ श्रावण व. १३ इ. १६७५ आगस्ट ९

डुमगांवचें बोलणें करून, मोंगली व आदिलशाही इत्यादि सर्वच मुलखांत उपयोगीं पडावे. म्हणून इंग्रजांकरितां **शिवाजीचे कौल** आणण्यासाठीं ऑस्टिन जाईल, त्याचे बरोबर शिवाजीकरितां ५०० रु. चा **नजराणा** पाठवावा.

फॅ. रे. सुरत भा. ८८ पृ. ९९–१०० इ. | (१७७३) राजापूर–मुंबई. | श. १५९७ भाद्र. शु. ७ इ. १६७५ आगस्ट १७

दंडाराजपुरीवर हल्ल्याची तयारी म्हणून अनेक नवीन गुराबा त्वरेनें बांधण्याबद्दल शिवाजीचा जरूरीचा हुकूम आल्यामुळें येथें काम चालू आहे. ......येथील सुभेदाराकडे कंपनीकरितां मालाची मागणी करीत आहों. तो बदलून त्याच्याबदली तुका पंडीत येणार आहे असें कळतें.......दिवाळीपूर्वी **राजाचा आदिलशहाशीं तह होईल** असें बोलतात.

फॅ. रे. सुरत भा. ८८ पृ. १०४ इ. | (१७७४) कारवार – मुंबई. | श. १५९७ भाद्र. शु. ८ इ. १६७५ आगस्ट १८

अंकोल्यापर्यंत देश घेतल्यावर **शिवाजीनें** सुंदा राजाच्या देशांत सैन्य पाठविलें. आणि कोणताहि अडथळा न होतां सुपें व वरव्हें हीं दोन ठाणीं घेऊन बार्बुल येथें जकातीचें नाकें स्थापिलें. यामुळें आमचे मालाला अडथळा होतो. परंतु किदरखानपन्नी व स्थानिक देसाई यांनीं एकजुटीनें हीं ठाणीं पुनः घेतलीं. शिवाजीचे २०० लोक मेले आणि बार्बुलचें नाकें त्याला उठवावें लागलें. मोंगलांचें सैन्य **शिवाजी**जवळच तळ देऊन राहिल्यामुळें तो **दख्खनकडे मदत देऊं शकत नाहीं.** यामुळें इकडील मराठ्यांची त्रेधाच आहे....तिमण्णा व राणी [Rana] यांचा तह झाला. **राणी शून्यवत्** असून तिमण्णा कर्तबगार असल्यामुळें यथेच्छ कारभार करतो. यामुळें तिला तह करणें भाग पडलें. कांहीं व्यापाऱ्यांनीं त्याच्याविरुद्ध कट केला. परंतु **शिवाजी** जवळ आल्याचें समजल्याबरोबर लोकांत एकी राखण्याच्या उद्देशानें त्यानें त्यांना कैद केलें.

या पत्राची सुरतेहून पोंच **आक्टो. १६ ची**, ओ. कॉ. नं. ४१२२–' सुंदा राजावरील शिवाजीची स्वारी, तिमण्णा व राणी यांचा दूरदर्शीपणाचा तह आणि शिवाजीविरुद्ध झालेला त्यांचा निश्चय वगैरे गोष्टी कळल्या.

के. रे. मुंबई भा. २ } पृ. १२१ इ. } (१७७५) मुंबई कन्सल्टेशन. { श. १५९७ भाद्र. शु.१० { इ. १६७५ आगस्ट २०

ऑस्टेननें न्यावयाचा नजराणाः—

	किंमत रु.
लहान पितळी तोफ गाड्यासह **शिवाजीकरितां**	३००: ००
१२ यार्ड कापड **मोरोपंडिताकरितां**	१५०: ००
७ ,, ,,**अण्णाजीपंडित** ,,	८७: १६
१ आरसा व १ तोळा कस्तुरी	२५:
३ यार्ड कापड सेनापती [चिटणीस ? Senatary]	२७: १६
इतर किरकोळ वस्तु	१४०:
रुपये	७४०: ००

ओ. कॉ. भा. ३६ } नंबर ४१०६ इ. } (१७७६) ऑस्टेनचा वृत्तांत { श. १५९७ भाद्र. शु. १४ आश्वीन शु. ७ { इ. १६७५ आगस्ट २४–सप्टें. १५

२४ आगस्टला निघून मट्टी-चौल-निजामपूर [२ सप्टें.] या मार्गानें **रायरीला** गेलों. निजामपूरला आमचे मोठे दोस्त **मोरोपंडित पेशवा** व **अण्णाजी पंडित** होते, त्यांना भेटलों व नजराणे दिले. ८००० सैन्य घेऊन त्यांना तावडतोब **जुन्नरला** जावयाचें असल्यामुळें राजाला पत्र देण्यापेक्षां अधिक ते कांहींच करूं शकले नाहींत. मीं ६ सप्टेंबरला रायगडला पोंचलों व ७ तारखेला मला राजदर्शन झालें. मीं हकीकत सांगतांना राजा ओशाळून गेल्यामुळें त्यानें झोंप आल्याची बतावणी करून, आपल्याला त्यांतील कांहींच माहिती नाहीं असें उत्तर दिलें व विचार करण्यासाठीं मुदत मागून घेतली.

प्रल्हादपंडितानें बरीच खटपट केल्यावर १५ तारखेला तेथेंच पुनः मला राजानें बोलाविलें. 'आपल्याकडे अजून कांहींच कळलें नाहीं. फक्त कांहीं चांदीचीं भांडीं मिळाल्याचा दाखला आहे. अगदीं हलक्या सैन्यानें सहज लुटावें अशी बिनतटबंदीची वखार कोणींहि बाजारी लोकांनीं लुटली असल्यास तो गुन्हा अमच्या सेनापतीच्या अंगीं चिकटविणें अन्यायाचें असल्यामुळें आपण भरपाई करून देण्यास बांधलों नाहीं.' इत्यादि त्यानें सांगितलें. पण 'मला धरून कैदी म्हणून सेनापतीनें नेलें; तेंव्हां त्याच्या माहितीशिवाय ही गोष्ट झाली नाहीं. समोरासमोर त्याला आणा. तो नाहीं म्हणूं दे' इत्यादि मी बोललों तिकडे मात्र त्यानें लक्षच दिलें नाहीं. मीं सर्व वखारींकरितां कौलांची मागणी केली. त्याबद्दलहि विशेष आस्था न दाखवितां सुरत आदिकरून समुद्रकिनाऱ्यावरील बंदरांपुरती व्यवस्था तो करूं लागला! परंतु मीं चिकाटीनें आग्रह धरल्यामुळें **सर्व वखारींबद्दल कौल** देण्याचें कबूल करून, ते पाठविण्याचा चिटणीसाला त्यानें सर्वांच्यां देखतच हुकूम दिला.

श्री. सं. ले. १३ } (१७७७) { श. १५९७ भाद्रपद व. ८
स. १०७६ जखर २१ } कौल'प्रतिपत्' मु. २ व सी. { इ. १६७५ सप्टें. २

अजर. रा. शिवाजीराजे—मोकदम, उदमी व इतर लोक

ता सिवतर मौजे पारमाची कोंड नलवडा येथें पेठ रामनगर वसविण्याबद्दल **समर्थांनीं** आज्ञा केली आणि १२ वर्षेपावेतों दिवाणहसील माफ म्हणून सांगितलें. त्याप्रमाणें करणें.

सा. ले. १४४ सु. १०७६ } (१७७८) { श. १५९७ भाद्र. व. ११
जखर २४ फ. १०८५ } खुर्दखत { इ. १६७५ सप्टें. ५

बजाजी नाईक—कारकून, देशमूख व देशपांडे प्रा पुणें

ता सांडसपैकीं तुळापूर हे तेथील ब्राह्मणास अभार आहे. हाली पा मार आम्हास अर्जानी झाल्यामुळें सदर गांव त्या इनामदार ब्राह्मणास कुलबाब चालवावें यबा पत्र देत आहे. तरी चालविणें.

फॅ. रे. सुरत भा. १०७ } (१७७९) { श. १५९७ भाद्र. व. १३
पृ. १२४ इ. } मुंबई–सुरत { इ. १६७५ सप्टें. ७

दंडाराजपुरीवर हल्ला करण्याकरितां स्थलसैन्याचे जोडीलाच **आरमाराची तयारी शिवाजी** करीत आहे. **दंडाराजपुरीवर** अंशतः सैन्य गुंतवून कदाचित् आणखी उत्तरेकडेहि **बादशाही मुलखांत** ही स्वारी जाईल; असेंहि कित्येक बोलतात. परंतु त्याचे बेत सुव्यवस्थित आणि गुप्तपणें होतात यामुळें कांहींच तर्क करितां येत नाहीं.

फॅ. रे. मुंबई भा. २ } (१७८०) { श. १५९७ भाद्र. व. ३०
पृ. १२६ इ. } मुंबई कन्सल्टेशन { इ. १६७५ सप्टें. ९

समोरच्या **शिवाजीच्या** मुलखांतून आपल्या बेटाला बऱ्याच जरुरीच्या वस्तु मिळतात. तेथील लोकांनीं तेथें वखार घालण्याबद्दल वारंवार आग्रह केला; यामुळें प्रेसिडेंट व कांहीं कौन्सिलर अशांनीं तेथें प्रत्यक्ष जाऊन आपल्याला सोईस्कर अशा जागा पहाव्या.

सा. ले.२७५ } (१७८१) { श. १५९७ आश्वीन शु. ४
सु. १०७६ रजब ३ } 'शिव.' मु. मर्या. सी. { इ. १६७५ सप्टें. १३

रा. **शिवाजी राजे– माहादाजी सामराज** सुबे व कार. ता मावळ.

बकाजी फर्जंद साहेब कामावरी कस्टमशागती करितो. याबदल साहेबी मौ. खामगाव येथील स्वतःचें पाटिलकी वतन बकाजीस दिलें असे. तें चालविणें.

फॅ. रे. सुरत भा. १०७ } (१७८२) { श. १५९७ आश्वीन शु. ७
पृ. १३६ इ. } रायबाग–मुंबई. { इ. १६७५ सप्टें. १५

नबाब **बहलोलखानाला**, विजापूरच्या बालराजानें म्हणजे **खवासखानानें**, मोंगल

सेनापती **बहादरखान** याशीं संगनमत करून **शिवाजीचा नाश** करण्याचे बाबतींत सल्ला विचारण्याकरितां बोलाविल्यामुळें बहलोलखान आपली पावसाळी छावणी (मिरज) सोडून १० दिवसांत विजापुरास जाणार आहे.

सा. ले. ५८ } (१७८३) { श. १५९७ आश्वीन शु. ९
सु. १०७६ रजब ७ } { इ. १६७५ सप्टं. १७

मल्हारजी यशवंतराऊ व महादजीराम प्रा सिरवळ—पंताजीपंत बोकील

छत्रपती स्वामींच्या आज्ञेप्रो; शिरवळ येथें आपणास घर बांधावयास जागा मिरास करून दिल्ही आहे.

सा. ले. २७६ व २७७ } (१७८४) { श. १५९७ आश्वीन शु. १०
सु १०७६ रजब ८ } 'शिव.' मु. व मर्या. सी. { इ. १६७५ सप्टें. १८

रा. **शिवाजी राजे**—महादाजी सामराज सुबे व कार. का मावल.

बकाजीच्या बापानें साहेबाचेथे कस्ट मशागत केली. तेव्हां कैलासवासी साहेबानी विकत घेतलेली खामगावची पाटिलकी बकाजीस दिली आहे. ती चालविणें.

सा. ले. २७८ } (१७८५) { श. १५९७ आश्वीन व. २
सु १०७६ रजब १५ } { इ. १६७५ सप्टें. २५

अजर० रा. **शिवाजी राजे**—बकाजी फर्जंद

कस्ट मशागत केलीस व पाटिलकी वतन जाहालिया गोतांत इज्जत आहे. सबब (ले. १७८४ प्रमाणें) ती दिली आहे.

सा. ले. २७९ } (१७८६) { श. १५९७ आश्वीन व. २
सु. १०७६ रजब १५ } { इ. १६७५ सप्टें. २५

अजर० रा. **शिवाजी राजे**-कार. व देशमूख का मावल:-(मज.सा.ले. २७६ प्रमाणें.)

सा. ले. २८० } (१७८७) { श. १५९७ आश्वीन व. २
सु. १०७६ रजब १५ } { इ. १६७५ सप्टें. २५

महादाजी सामराज—माहादाजी नरस प्रभू हवा. कार. का मावल.

साहेबाच्या हातरोख्याप्रमाणें (ले. १७८४) वागणें.

(दि.) ओ. कॉ. भा. ३६ } (१७८८) { श. १५९७ आश्वीन व. ४
नं. ४११५ इ. } प्रेसिडेंट, सुरत-गिफर्ड, मुंबई { इ. १६७५ सप्टें. २८

पोर्तु०, मोंगल सुभेदार, फ्रेंच व डच हे सर्व आपल्यापरीनें येथें आम्हांला सतावण्यास झटत असतां, शिवाजी मात्र,-त्याच्या स्वतःच्या हिताकरितांच कां होईना-**आमचा**

उत्तम मित्र आणि उदार शत्रू ठरला आहे. (Savajee onely hath proved,...,our fairest friend, and noblest enemy.)[प]-**शिवाजीच्या मुलखांतील व्यापारापासून** कंपनीला बराच फायदा होईल अशी माझी अपेक्षा आहे आणि कौन्सिलमध्येंहि याची बरीच चर्चा झाली आहे. तरी शिवाजीशीं असलेल्या स्नेहाला अधिक उत्तेजन द्यावें.

(से) फॅ. रे. सुरत भा. १०७ } (१७८९) { श. १५९७ आश्वीन व.१०
पृ. १३१-३२ इ. } राजापूर [?]-मुंबई { इ. १६७५ आक्टो. ४

शिवाजीकडून सोबतचे **कौल** व पत्र आले. त्यांपैकीं इकडले इकडे ठेवून बाकीचें कौल व एकंदर कौलांची नांवनिशी प्रेसि०कडे पाठविली आहे.

ओ. कॉ. नं. ४१२७; सुरत-कारवार; **ता. ९ नोवें.**—शिवाजीचा **कौल** किंवा **पास** पाठविला आहे. त्याचे सुभेदार किंवा सेनापती यांचा त्रास झाल्यास उपयोग करावा.

सा. ले. ११० } (१७९०) { श. १५९७ आश्वीन व.१४
सु. १०७६ रजब २७ } फा. मु. व सी. { इ. १६७५ आक्टो. ७

माहादाजी सामराज सुबे.—माहादाजी नरसप्रभू सुबे. मावले

सिदंभट ठकार यानें पत्र आणलें (महाराजांचें) कीं, " चंद्रभटास निसबत्ती नसतां सिदंभटाच्या का॥ मावळच्या ९॥ गांवांच्या कुळकर्णाबदल खलेल करतो. तरी चौकशी करून इनाम स्वाधीन करणें." चौकशी करितां चंद्रभट खोटा झाला. तरी उक्त गांवांचें कुलकर्ण सिदंभट करवी घेणें.

फॅ. रे. सुरत भा. ८८ } (१७९१) { श. १५९७ आश्वीन व.३०
पृ. ११३ इ. } सुरत-मुंबई. { इ. १६७५ आक्टो. ८

सुरतेचें आरमार **सिद्दीसंबूळचा** भाऊ **सिद्दीकासम** याचे सैनापत्याखालीं **दंडाराजपुरीस** जात आहे. त्याचेशीं चांगली वागणूक ठेवावी. ह्यायोगें येथील सुभेदारास बरें वाटून बादशहाकडे त्याप्रमाणें शिफारस केली जाईल.

खं. १८ ले. २१ व सा. ले. २८१ } (१७९२) { श. १५९७ कार्तीक शु. २
श. सु. १०७६ रजब ३० } महजर. { इ. १६७५ आक्टो. १०

मौजे खामगांवची पाटिलकी कदीम लोहकराची. त्यांनीं पायगुडे यांस व पायगुड्यांनीं रा. साहेबास विकत दिधली. व साहेबानी बकाजीस दिल्ही. यास हिलाहरकती करील तो गोताचा खोटा.

फॅ. रे. सुरत भा. ८८ पृ. ११६ इ. | (१७९३) सुरत–मुंबई. | श. १५९७ कार्तीक शु. ६ इ. १६७५ आक्टो. १४

शिवाजीचे कौल मिळाले....या वर्षी शिवाजीची भीती वाटूं लागली आहे.

ओ. कॉ. नं. ४१२३ ता. २६ आक्टो., सुरत–कंपनीः–शिवाजीची भीती वाटूं लागली आहे.

फॅ. रे. सुरत भा. ८८ पृ. १२८, सुरत–मुंबई, ता. ६ डिसें. चे पत्रांत, सुरतेची शिवाजीची भीति कांहींशी कमी झाली आहे, असें लिहिलें आहे.

खं. १५ ले. १३५ सु. १०७६ साबान ५ | (१७९४) मिसेली फा. मु. मज. | श. १५९७ कार्तीक शु. ७ इ. १६७५ आक्टो. १५

जगदेऊराऊ नाईकसाहेब

हुदेदारानि व मोकदमानी मो पापरडे ता मोरगीर मरली.

मो निंब येथील सदानंद मठपती कमलनयनगिरी यास निम चावर देखील हक दिधले आहे. चालवीजे.

सा. ले. ११२ (सा. ले. ११०) साबान ६ | (१७९५) | श. १५९७ कार्तीक शु. ८ स. १६७५ आक्टो. १६

माहादाजी नरसी हवाल० का मावल.—सिदंभट ठकार

८ गांवांचें कुळ० तुम्हाकडे. मधेच चंद्राभटानें खलेल केली. वाजींपुसीकरितां चंद्रभट खोटा ठरला. तेव्हां काम सिदंभटाकरवी घेणें.

राम. अं. ६५–६६ ले. १७ श. | (१७९६) पुरोहितपण. | श. १५९७ मार्गशीर्ष शु. १ इ. १६७५ नोवें. ८

?— कृष्णाजी त्रिमलः — शंकरभट पुराणीक वेरूळचे आमचे पुरोहित.

रत्नाकर. १९२७ पृ. ६२३ सु. १०७६ रम १० | (१७९७) | श. १५९७ मार्ग. शु. ११ इ. १६७५ नोवें. १८

दाा बाा धनको नाम जयचंदी भाई व जमामाव बाबानभाई मुकाम मलवडी यांस रिणको नाम बजाजी नाईक निंबाळकर व सावित्रीबाई महादाजी नाईक निंबाळकर देशमुख प्रां फलटण सुाा ..... कारणें लिहून दिल्हा कर्जकतबा ऐसा जे, बदल खान अजम आबदलाखान यासी पातशहांनीं साहेबी सिवाजी राजेवरी मसलत केली. ते वख्ती आबदलाखान कुचावर कूच करून मलवडीवर उतरले. ते वख्ती अम्हाबदल सिवाजी राजे यांणीं नाईकजी राजेस बहुत प्रकारे कागद लिहिला होता. तो आम्हास दस्त करून गल्यांत तोफ घालून सुनता करून हातीच्या पायाखाले घालून मारावे. तो नाईकजी राजे

यांनीं बहुत कांहीं आडमूड (जुड) होऊन आबदलाखानास अर्ज केल्यावरी साठी हाजाराबरी करार करून होन ६०००० साठी हाजाराबर दरम्यान नाईकजी राजे पांढरे जमान होऊन सोडविले. त्यास पंचोत्राप्रमाणें व्याज करून मुदत दोन वर्षांत तुमचे व्याजमुदल देऊ. जर न देऊ तर आपले फलटणची देसमुखी तुमची आसे. कांहींएक हरकत करूं तरी श्रीमाहादेवाची व श्री विठोबाची आण आसे. हा कतबा सही

गोही–१रतनजी माने देशमूख कसबे म्हसवड १ मलजी राजे पांढरे १ रवीराव ढोणे १ जाधवराव देशमूख दवलताबाद १ धुलाजी राजे सडगे १ देवजीराजे धायगुडे १ तानाजी राजे काकरे १ दत्ताजी माने देशमूख कर्यात मलवडी १ नाईकजी राजे बिा विठ्ठल भालेरावजी दिवाण निा नाईकजी राजे पांढरे हे नकल.

ओ. कॉ. भा. ३६ नं. ४१३९ इ.	(१७९८) मुंबई-कंपनी	श. १५९७ मार्ग. व. ४ इ. १६७५ नोवें. २६

शिवाजीचा आमचा स्नेह आहे. परंतु स्वार्थाकरितां शपथ किंवा वचन मोडण्यास तो नेहमीं तयार असल्यामुळें त्याच्यावर विश्वास ठेवण्याची सोय नाहीं. आज अनेक कामें त्याच्या पुढें असल्याकारणानें मात्र, इतक्यांतच त्याच्यापासून भय दिसत नाहीं.

मोंगलांनीं त्याची पाठ घेतली असून त्यांचें सैन्य **कल्याण-भिवंडीपर्यंत** आलें आहे. मोंगलांचा सेनापती **बहादूरखान** याची बादशहानें खरड काढल्यामुळें या उन्हाळ्यांत शिवाजीची खोड मोडण्याचा निश्चय करून, त्यानें दख्खनचा राज्यरक्षक (Protector) **खवासखान** याच्या घराण्यांत शरीरसंबंध केला. आणि आदिलशाहा व शिवाजी यांचा तह अगदीं होण्याच्या बेतांत होता तो मोडण्यास लाविलें. अर्थात् आत. **विजापुरकरांचें दुसरें मोठें सैन्य** शिवाजीवर येणार. दंडाराजपूरचा **सिद्दी**देखील सुरतेहून मोठीं दोन लढाऊ जहाजें, धान्यें व युद्धसामुग्री व २००० नवे लोक अशी भरती करून किनाऱ्यानें शिवाजीचीं गलबतें जाळण्यास पहात आहे. परंतु कोणत्याहि बंदरांत त्याला आरमाराची जाळपोळ करण्यास न मिळाल्यामुळें त्यानें **वेंगुर्ला** आदिकरून नगरें जाळलीं. मग शिवाजीचीं ५७ छोटीं गलबतेंहि बाहेर आलीं....दोघांचीहि खाशी जुंपून आम्हांला **दोघांचाहि त्रास होतो** तो एकदांचा मिटेल तर बरें होईल.

एकंदरींत शिवाजीला पुरेशा अडचणी आहेत. त्यांतून तो कसा बाहेर पडतो तें पहाणें आहे.

ऑर्म ११४–४ पृ. १६४:-शिवाजी आणि **पोर्तु०यांचें** प्रत्यहीं भांडण होतें. ते त्याच्या जातीच्या अनाथ मुलांना, **रोमन कॅथोलिक धर्माची दीक्षा** देतात म्हणून तो त्यांचा **फार द्वेष करितो.** याच कारणानें पोर्तु० लोकांत आपसांतहि वाद होतात. **वसईच्या** कॅप्टन जनरलनें कांहीं पोरक्या मुलांचा पक्ष घेऊन तेथील जेस्विट लोकांना त्यांची मालमत्ता परत देण्यास लाविलें.

ऑर्म भा. ११४ वि. ४ पृ. १७१ इ. | (१७९९) मुंबई-सुरत | श. १५९७ मार्ग. व. १३ इ. १६७५ डिसें. ४

मोंगल सैन्य कल्याणजवळ आलें होतें. परंतु **पेशव्यानें** त्यांना **१० हजार होन रोख** पोंचविल्यामुळें तें कांहींहि न करितां परत फिरलें.

सा. ले. १११ १ सवाल ३ | (१८००) 'शिव.' मु. व सी. | श. १५९७ पौ. शु. ४ इ. १६७५ डिसें. १०

मोरो त्रिमळ व **निळो सोनदेऊ**—दादाजी बायाजी परभू हवा. व कार० ता। खडकवासले व माण

विनायक भट ठकार यांचेकडून २५ रु. उचापती नेली आहे.

डाग. रजि. १७७५ पृ. ३४५ इ. डिसें. २४ न्यू. | (१८०१) | श. १५९७ पौष शु. ८ इ. १६७५ डिसें. १४

वेंगुर्ल्याकडील (सिलोनमध्यें प्रचलित असलेल्या) बातमीवरून निर्भयपणें सगळीकडे हिंडणाऱ्या **शिवाजीचें** विजापूरकर व कानडांतील राजे यांच्याशीं युद्ध सुरू आहे असें कळतें. त्यामध्यें त्याला कधीं हारहि खावी लागली आहे. पण ह्यावेळीं **गोव्याच्या** इतक्या नजीक तो येऊन पोहोंचला होता कीं, **पोर्तुगीज** लोक भयग्रस्त होऊन गेले होते.

ऑर्म भा. ११४ वि. ५ पृ. ३ इ. | (१८०२) मुंबई-सुरत | श. १५९७ पौष व. १० इ. १६७५ डिसें. ३१

पोर्तु०च्या **सिबॉन** ? (Sibon) नांवाच्या किल्ल्यासमोरच दोन गढ्या शिवाजी बांधूं लागल्यामुळें त्यांचें युद्ध जुंपलें. पोर्तु०च्या विरोधाला न जुमानतां शिवाजीचें काम चाललें आहे. त्याला यश आल्यास त्याचा पोर्तु०वर मोठाच दाब पडेल.

ऑर्म भा. ११४-५ पृ. ५ इ. | (१८०३) मुंबई-इंग्लंड | श. १५९७ माघ शु. २ इ. १६७६ जाने. ८

बर्क्ले कॅसल जहाजावरून २४ पौंडी १२ लोखंडी तोफा आल्या. त्यांपैकीं कांहीं **शिवाजीला** दिल्यामुळें, आम्हाला स्वतःकरितां तोफा पाहिजेच आहेत.

ओ. कॉ. भा. २६ नं. ४१६३ पृ. १०-११ इ. | (१८०४) सुरत-कंपनी | श. १५९७ माघ शु. ६ इ. १६७६ जाने. ११

राजापुरास वखार घातल्यानंतर युरोपला पाठविण्याकरितां माल मिळावा म्हणून पुष्कळ पैसा लाविला होता. परंतु **देशांतील युद्धाच्या गडबडीमुळें** मालाची

जमवाजमव झाली नाहीं. पाऊसहि अवेळीं कोसळून काफिले नेहमींपेक्षां पक्का एक महिना उशीरां आले. चाइल्ड सर्व वेळ मालाच्या शोधांत इतस्ततः संचार करीत असल्यामुळें शिवाजीच्या करारांची (राजापूर लुटीबद्दल) अमलबजावणी अद्याप झाली नाहीं. वर्ष दोन वर्षांत ह्या वखारीचा फायदा दिसूं लागेल.

फॅ. रे. सुरत
भा. ८९ पृ. १० इ.
(१८०५)
राजापूर-सुरत
श. १५९७ माघ शु. ६
इ. १६७६ जाने. ११

नाना तऱ्हेच्या बातम्या येतात. **शिवाजी** मेला असें कित्येक बोलतात; फार आजारी आहे असें दुसरे बोलतात; **बहलोलखानानें** विजापुरास बोलाविल्यामुळें तिकडे जाण्याकरितां म्हणून **पन्हाळयाला** तो सर्व सैन्य एकत्र जमवीत आहे; अशीहि एक बातमी आहे. नबाब बहलोलखानानें **खवासखानाला** कैद करून, तरुण सुलतान आपल्या ताब्यांत घेऊन, विजापूरचा मुख्य कारभार आटोपला आहे; अशी दाट वदंता आहे. **खवासखानाला बहलोलनें मारलें** अशीहि एक विश्वसनीय बातमी वरच्या लोकांत पसरली आहे.

फॅ. रे. मुंबई भा. २
पृ. ६ (२) इ.
(१८०६)
मुंबई कन्सल्टेशन
श. १५९७ माघ शु. ८
इ. १६७६ जाने. १३

आपलीं **पेणला** असलेलीं पांच गलबतें सिद्दीनें जाळूं नयेत म्हणून सुरक्षितपणासाठीं मुंबई बंदरांत ठेवण्याबद्दल **शिवाजीनें** बरींच पत्रें पाठविल्यावरून त्याला तशी मोकळीक द्यावी. मात्र **सिद्दीनें** त्यांना तोशीस दिल्यास इंग्रजांवर कोठल्याहि तऱ्हेची जबाबदारी नाहीं असें त्याच्यापासून [under his hand and seale] लिहून घ्यावें. सिद्दीला अशाच तऱ्हेची सवलत अनेक वेळां दिली गेल्यामुळें त्याला यांत तक्रार करण्याला जागा नाहींच.

खं. २० ले. १४३ व १४६
मु. १०७६ जिल्काद १०
(१८०७)
मिसेली फा. मु. मज. सी.
श. १५९७ माघ शु. ११
इ. १६७६ जाने. १६

अज दि. पा वाई-- मोकं. मौ. खेड व तडवळे

अपदे विष्णु चित्राव याचा वरील गावी असलेला इनाम पूर्वीप्रमाणें चालविणें.

खं. २० ले. १४४ व १५०
मु. १०७६ जिल्काद १०
(१८०८)
मिसेली-फा. मु. मज. सी.
श. १५९७ माघ शु. ११
इ. १६७६ जाने. १६

अज दि० पा वाई--मोक० पा मज०

नरसी रंगो चित्राव याचा गावगन्नाचा सादिलवार चालविणें (होन १०).

सा. ले. १४५ व १४८ } (१८०९) { श. १५९७ माघ शु. ११
सु. १०७६ जिल्काद १० } मिसेली फा.मु. मज. सी. { इ. १६७६ जाने. १६

अज दि. पा। वाई—मोक० मौ. पसरणी.

नरसी रंगो चित्राव याचा सिद्धनाथवाडीचा इनाम चालविणें.

खं. २० ले. १४७ व १४९ } (१८१०) { श. १५९७ माघ शु. ११
सु. १०७६ जिल्काद १० } मिसेली फा. मु. मज. सी. { इ. १६७६ जाने. १६

अज दि. पा। वाई—मोक० देहाय बोरखल वगैरे.

नरसी रंगो व एकनाथ रामेस्वर चित्राव यांचा वरील गांवांचा इनाम चालविणें.

ऑर्म. ११४–५ } (१८११) { श. १५९७माघ शु. १२
पृ. १२ इ. ,, } मुंबई—सुरत. { इ. १६७६ जाने. १७

शिवाजीचें मृत्युस्थान, त्याचा रोग, आणि पुरण्याची तऱ्हा आणि जागा अशा संपूर्ण तपशिलासह शिवाजीचा मृत्यु, व और्ध्वदेहिक विधी ह्याबद्दल गेले कित्येक दिवस बातमी ऐकूं येते. शिवाजीच्या एका मुख्य ब्राह्मणाच्या मुलीशीं **संभाजीनें** व्यभिचार केला. तिला भेटण्यासाठीं रात्रीं गडाखालीं जाण्याचें त्यानें न सोडल्यास त्याचा कडे-लोट करण्याचा हुकूम शिवाजीनें दिल्याचें ऐकून संभाजीनें त्याला **विषप्रयोग** केला असें कित्येक बोलतात. तो आजारी होता आणि त्याचा आजार मुख्यतः त्याच्या डोक्यांतील भयंकर कळांमुळे होता (कारण त्याचा मेंदू बहुतेक कुजला होता !); इतकें आम्हांला खात्रीलायक माहीत आहे. डे० प्रेसि० च्या एका नोकराला सिद्दीसंबूळ–कडून शिवाजी मेला असें कळलें. दाभोळ, कल्याण, चौल वगैरे ठिकाणचे व्यापारी तसेंच बोलतात. परंतु त्यावर फारसा विश्वास ठेवतां येत नाहीं. कारण **मोरोपंडित** माहुलीखालीं ससैन्य आहे. तो अद्याप तेथून हालला नाहीं.

सदरः—**जाने. २७** (पृ. १५) पर्यंत निश्चित बातमी नव्हती. ' मृत्यु, मोठा आजार आणि पूर्ण आरोग्य असे त्रिविध प्रकार बातमीचे आहेत.'

(दि.) ओ. कॉ. } (१८१२) { श. १५९७ माघ शु. १२
नं. ४१६३ इ. } सुरत–कंपनी. { इ. १६७६ जाने. १७

राजापुरास गमाविलेल्या गोळ्यांबद्दल **शिवाजीनें** कानावर हात ठेविल्यामुळें तपास केला असतां असें कळतें कीं, त्यांपैकीं कांहीं विजापुरी सेनापती **सिद्दी जौहार** याला विकले; आणि बाकीचे वखारीची लूट झाली त्यावेळीं तेथेंच होते; ते नंतर शहरां-तील लोकांनीं लुबाडले. [पहा मागें ले.८७४ व १५७० कलम १]

फॅ. रे. सुरत भा. ८९ } (१८१३) { श. १५९७ माघ व. ४
पृ. १३ इ. } सुरत-मुंबई. { इ. १६७६ जाने. २४

शिवाजीनें स्वतःकरितां आणि आपले सुभेदार व शिपाई यांच्याकरितां कंपनीकडून आणि मुंबईच्या व्यापाऱ्यांकडून खरेदी केलेल्या जिनसांच्या द्यावयाच्या रकमेबद्दल गोवळकोंड्याच्या एका इसमावर **हुंडी दिली** होती. ती परत आल्यामुळें तिची भरपाई करून घेण्याकरितां दलाल गिरिधरदास, नारायण शेणवी आणि एक दोन इंग्रज पाठवून द्यावे. त्यांचेबरोबर सोबतचीं शिवाजी व मोरोपंत यांच्या नांवचीं पत्रें पाठवावीं. आणि या देण्याचा उलगडा न केल्यास स्नेहामध्यें बिघाड केल्याची जबाबदारी आमच्यावर नाहीं असें खडखडीत बोलून, या लोकांना परतच यावें लागलें तर त्यांचे जबाब घेऊन आमच्याकडे पाठवावे.

शिवाजी मेल्याची बातमी आहे. तेव्हां या बाबतींत निश्चित कांहीं कळेपर्यंत हातची हुंडी घालवून बसावें किंवा कसें याचा विचार करावा.

खं. १५ ले. १३६ } (१८१४) { श. १५९७ माघ व. ५
सु. १०७६ जिल्काद १९ } मिसेली म. मु. व सी. { इ. १६७६ जाने. २५

अज दि. सुभा वाई—मो. गोवें:—गोसाव्याच्या इनामाबद्दल कथळा न करणें.

स. पृ. १३२ ले. १७ } (१८१५) { श. १५९७ माघ व. ७
सु. १०७६ हि. १०८५ जिल्काद २१ } { इ. १६७६ जाने. २७

रा. **शरीफजी राजे** भोसले—निळकंठ गंगाधर त्रिंबककर

प्रत्यहीं १५० शिवलिंगें करणें. २५ रु. देऊं. त्यावर मनमुफ झाली ह्मणोन आपणास १०८ रु. वर्षासन केलें.

राम. अं. ६३-६४ ले. १ } (१८१६) { श. १५९७ माघ व. १३
रा. सु. १०७६ जिल्काद २६ } महजर स्थल-पाली. { इ. १६७६ फेब्रु. १

खराडे व काळभोर यांजमध्यें पालीच्या मोकदमीचा तंटा लागला असतां दिव्य होऊन खराडे खोटे निघाले. या दिव्याचे वेळीं, **शिवछत्रपती**, हरजी राजे महाडीक, रघुनाथ नारायण, मोरो त्रिमल, दत्ताजी त्रिमल, निराजी रावजी, नारो निळकंठ, प्रतापराव, वगैरे गृहस्थ हजर होते.

ओ. कॉ. भा. ३६ } (१८१७) { श. १५९७ माघ व. १४
नं. ४१७५ इ. } सुरत-कंपनी. { इ. १६७६ फेब्रु. २

डुमगांवच्या बाबतींत शिवाजीकडे स्वतः ऑस्टिननें जाऊन केलेल्या बोलण्याला यश आलें नाहीं. ' आपण शत्रूच्या मुलखांत **न्याय्य युद्ध करीत** असतां

कोणाचें नुकसान झालेलें भरून देण्यास बांधलों नाहीं.' असें तो म्हणाला. त्या वेळच्या सेनापतीनें केलेल्या अत्याचाराबद्दल त्याला दोष देऊन, यापुढें असें होऊं नये म्हणून त्यानें तेथील व इतर वखारीकरितां कौल देऊन ठेविले आहेत. त्यांची शाश्वती कितपत मानावी हें संशयीतच असल्यामुळें आम्ही कोठेंहि किमान जरूरीपेक्षां अधिक पैसा गुंतविणार नाहीं.

खं. २० ले. १५१ } (१८१८) { श. १५९७ फाल्गुन शु.३
सु. १०७६ जिल्हेज १ } { इ. १६७६ फेब्रु. ६

अज दि. ठाणें वाई—मोक० मौ. पसरणी

नरसीभट चित्राव याच्या पसरणीच्या इनामाच्या बाबी त्यास पावत्या करणें.

फॅ. रे. सुरत भा. ८९ } (१८१९) { श. १५९७ फा। शु. ५
पृ. १७ इ. } सुरत—मुंबई { इ. १६७६ फेब्रु. ८

ऑस्टिनच्या नुकसानीचें स्मरण ठेवून त्वरेनें भरपाई मिळवा. शिवाजी मेलाच तर बिचाऱ्याला एक पैहि मिळणार नाहीं!

[से]–जॉन चाइल्डनें लिहिल्यावरून असें समजतें कीं, राजापूरच्या सुभेदाराजवळ करारान्वयें विकण्याकरितां नारळ आहेत. ते आणण्यासाठीं गलबतें त्वरेनें पाठवावीं.

फॅ. रे. मुंबई भा. २ } (१८२०) { श. १५९७ फा। शु. १५
पृ. ९ (२) इ. } मुंबई कन्सल्टेशन { इ. १६७६ फेब्रु. १९

हुंडीबद्दल **मोरोपंडिताचें** सामोपचाराचें पत्र आलें कीं, 'गोवळकोंड्याचा इसम पैसा घेऊन शिवाजीकडे परत आल्यामुळें **हुंडीचा घोटाळा** झाला. आतां शिवाजीकडे हस्तक पाठवून पैसे आणावे.' त्याप्रमाणें दोन एतद्देशीय इसम पाठवून काय होतें तें पहावें.

सा. ले. १२३ } (१८२१) { श. १५९७
सु. १०७६ } { इ. १६७५-७६

राघो बलाळ—?:—महाराज साहेबांचे खुर्द० माहाद मुद्गल पुरंदरे यानीं दाखविलें. त्याप्रो परबती, पिंपळे, पिंपरीं गावांचें इनाम चालविणें.

सा. ले. ५८ } (१८२२) { श. १५९७
सु. १०७६ } { इ. १६७५-७६

मल्हारजी येशवंत देशमूख निगडे व महादजी राम देशकुलकर्णी प्रगणे शिरवल पंताजीपंत बोकील

रा. छ. स्वामीनीं आज्ञापत्रीं लिहिलें कीं 'आपणास उत्तम स्थळ पाहून वाडा मिरास करून देणें' तरी शिरवळ येथें दिवाण-वाडियाचे पश्चिमेस ८०-६० हात जागा दिली असे. वाडा बांधोन राहणें.

फ्रायर भा. १ } (१८२३) { श. १५९७
पृ. ३०७-३०९ इ. } उल्लेख. { इ. १६७५

वसईच्या खाडींतून वर जातांना मुखाजवळील पोर्तु० मुलूख संपल्यावर **कल्याण पासून एक दोन मैलांवर शिवाजीचा मुलूख लागतो**....कल्याणची दुर्दशा झाली आहे. तथापि बेकार लोक श्रीमंतांच्या कबरस्थानांचा धर्मस्थलें म्हणून आश्रय करून राहिले आहेत. ते तसें न करतील तर गांवांतील ठिकाणीं असलेल्या इमारतींत धान्याचीं कोठारें ठेवण्याचा **शिवाजीनें** हुकूम दिला आहे. [पृ. ३४१-४३]- लूट नाहीं तर सैन्याला पगार नाहीं असा शिवाजीचा दंडक आहे....देशस्वातंत्र्यापेक्षां प्रत्ये-काला खाल्ल्या मिठाची चाड अधिक असल्यामुळें हिंदू किंवा मुसलमान हे भिन्न धर्मीयांच्याहि सैन्यांत आढळतात. घोडेस्वारांत बहुतेक मुसलमान व पायदळांत (तोड्याच्या बंदुकावाले) हिंदू असतात.

आठल्येसंग्रह } (१८२४) { श. १५९७-१५९८ ज्येष्ठ.
सु. १०७६ } उल्लेख. (महजर श.१६१४ भाद्र.शु.८) { इ. १६७५-१६७६ मे २४

सन सीत सबैनामध्यें, राजश्री कैलासवासी, छत्रपती स्वामी व राजश्री प्रधानपंत व राजश्री अमात्यपंत व राजश्री अनाजीपंत व राजश्री दत्ताजीपंत **ऐसे किले पनालि-यास आले.** ते समयीं ता। मजकूरचे देशक व गावगना मिरासदार हुजूर गेले. (आठ-ल्येहि गेले. त्यांनीं 'राजश्री छत्रपती स्वामींस' व 'राजश्री सरकारकुनास' सांगितलें. कागद दाखविले. देसक आले होते त्यांस शिवाजी महाराजांनीं विचारलें व खात्री झाल्यावर) **पत्र राजश्री रामाजी अनंत सुभेदार यास दिधले.** (पहा ले. १८२९)

आठल्येसंग्रह } (१८२५) { श. १५९७-९८
सु. १०७६ } उल्लेख-(आठल्येवादांतील मितीहीन कागद.) { इ. १६७५-७६

श्रीमंत कैलासवासी छत्रपती महाराज **यांसंनिध पनाळे याचे मुकामीं** आपले वडील जाऊन वर्तमान विदित केलें.......मनास आणून आमचें वतन आम्हांस बहाल केलें आणि ताकीदपत्रें दिलीं. त्याउपरी मागती... रेमणे **वाईच्या** मुकामास हुजूर छत्रपती महाराजे यांसंनिध जाऊन **शामजी नाईक पुंडे** यांचे विद्यमानें दक्षिणा-वर्ति शंख नजर करून विनंति केली....अमानत पत्रें आणिलीं....त्याउपरी हुजूर जावें तों **महाराज थोरले कैलासवास थोडकेयाच दिवसांमध्यें** जाहला.

आठल्येसंग्रह }　(१८२६)　{ श. १५९७-९८
सुमारें सु. १०७६ }　उल्लेख (आठल्ये करीणा श. १६७९)　{ इ. १६७५-७६

उपरांतिक कैलासवासी थोरले छत्रपती यांच्या राज्यांत मौजे कोंडगाव येथें...मराठ्याचे घरीं लग्न झालें.........उपरांतिक कै० थोरले छत्रपती सरकारकुनांसमवेत किले पनाळियास आले तेव्हां महालाचे देसक अवघे श्री स्वामीसंनिध गेले......त्यावरून छत्रपती यांणीं आज्ञापत्र सुर्भा सादर केलें जे...

आठल्येसंग्रह }　(१८२७)　{ श. १५९७-९८
सु. १०७६ }　उल्लेख-(वृत्तांत पत्र १६४७ वैशाख शु. ८)　{ इ. १६७५-७६

श्रीमंत राजश्री पंतप्रतिनिधि स्वामीचे सेवेसी विनंति सेवक केसाबा नाईक सरदेसाई किले विशाळगड (वृत्तांत कथन).

सन सीत सबैनामध्यें राजश्री कैलासवासी थोरले छत्रपती सरकारकुनां समवेत पनालियासी आले. त्यांचे दर्शनास आम्ही अवघे देसक व गांवगनाचे खोत व नायकवाडी ता मार गेले. ते समयीं आठलियेहि गेले (तेथें आठलियांनीं खटला पुढें मांडला व पूर्व पत्रें दाखविलीं]. त्यावरी राजश्री छत्रपती स्वामी व राजश्री सरकारकून स्वामी यांणीं पूर्व पत्रार्थ मनास आणून आम्हां समस्तांस पुसिलें [आम्हीं आठल्ये खरे असें सांगितलें] त्यावरून राजश्री छत्रपती स्वामीनें आपलें पत्र करून दिल्हें.........त्यावरी रेमणे राजश्री संनिध वाईचे मुकामास जाऊन विनंति केली...व अमानतपत्रें आणिलीं.

सा. ले. १०० रा. श. २ }　(१८२८)　{ श. १५९८ चैत्र शु. १
सु. १०७६ जिल्हेज २९ }　न.　{ इ. १६७६ मार्च ५

?—पदाजी बाटे मोक० मौ० केजळ ता निरथडी

भानजी पा यानें तुम्हांस दत्तक घेतले. पुढें मानजीस मुलगे झाले. तुम्ही रुसला. तरी तुम्हास वडिलपणा व इतर उत्पन्नाची यथान्याय तक्सीम दिली आहे.

आठल्ये संग्रह }　(१८२९)　{ श. १५९८ चैत्र शु. १
सु. १०७६ जिल्हेज २९ }　तालीक　{ इ. १६७६ मार्च ५

मशरूल हजरती राजश्री रामाजी अनंत सुभेदार व कारकून सुभा तर्फ प्रभावली प्रति राजश्री शिवाजी राजे दंडवत त्रिमलभट बिन बापदेभट व जनार्दनभट बिन पुर्शोत्तमभट व हरीभट बिन गोविंदभट व रुद्रभट बिन विश्वनाथभट आठोल्ये उपाध्ये ता देवले कसबा देहाय. हुजूर येऊन माल्लम केले कीं उपाध्यपण मिरास आपले वडिला वडिलापासोन खात आलो आसो. दरिवख्त मौजे साखरपे व त्याभोवते गाव ऐसे आठ ८ आठा गावास गोविंदभट रेमणा दखल होतो कीं उपाध्यपण आपले म्हणौन नवाच कथला करितो कांहींहि निसबत, घरीन नाहीं म्हणौन. तरी साहेबीं त्यास

ताकीद करून (इ) लखुद ठेविले पाहिजे म्हणौन. त्यावरून ता माचे देसक हुजूर आले होते त्यासहि पुसता बोलिले जे, उपाध्यपण मिरास आटोलियाचीच आहे आठ गावहि यासच भोगवटा चालतो. गोविंदभट नसती करकर करितो म्हणौन तरी नसती करकर गोविंदभटास करावया काये गरज आहे, हली त्यास ताकीद करणें कीं आठा गावी उपाध्यपणास दखल न होय. आटोलियाचे वृत्त आटोलियास भोगवटा सालाबाद चालत आला असे तेणे प्रमाणे बिला कुसूर चाले ते करणें. मागती फिर्याद येऊ न देणे तालीक लेहोन घेऊन असल परतून देणे.

सा.ले. ५९ सु. १०७६ मोहर १	(१८३०) ता	श. १५९८ चैत्र शु. २ इ. १६७६ मार्च ६

रा. शिवाजी राजे—रामोजी व खंडोजी जगथाप मौ. सुपे सुा येथील पाटिलकी निलकंठराऊ, काटककर, धणगर यांची असतां तुम्ही कथळा करितां. ताकीद केली तरी धनगराची माणसें धरऊन बंदीं घातले आहेत. तरी साहेब कैसे राजी राहतील. खराडे खोटे जाले तैसे तुम्ही आहां. बाद हुजूर सांगणें. काटकराचा व तुमचा निवाडा होईल. धनगराचे वाटे नव जाणे.

सा. ले. ६० सु. १०७६ मोहर १	(१८३१)	श. १५९८ चैत्र शु. २ इ. १६७६ मार्च ६

रा. **शिवाजी राजे** — राघो बल्लाळ सुभे. सा जुनर

(इतर मज. ले. १८३१ प्रमाणें असून जास्त मज.) जगथापानी तुम्हास सांगोन धनगराची माणसे धरून ठेविली. खराडे खोटे जाले तैसेच हे जगथाप. एकाची मिरास एकास तो देवत नाहीं. तुम्ही जगथापाच्या बोले धनगराची माणसे बंदी घातली हा कोन इनसाफ. तरी धनगराची माणसे सोडून देणे. जगतापाचा निवाडा हुजूर होईल.

लेटरबुक भा. ५ पृ. २६४-६५ इ.	(१८३२) कंपनी-सुरत	श. १५९८ चैत्र शु. ४ इ. १६७६ मार्च ८

डुमगांवची भरपाई शिवाजीकडून मागण्याच्या व्यवहारांत प्राप्तीइतकाच खर्च झाला, तथापि भावी अनर्थ त्यामुळें टळतील. एवढ्याकरितां करीत अहांत तेंच ठीक आहे.

(ले) फॅ. रे. सुरत भा. ८९ पृ. २३ इ.	(१८३३) राजापूर-सुरत.	श. १५९८ चैत्र शु. ९ इ. १६७६ मार्च १३

इकडे बातम्यांबद्दल खात्री नसली तथापि **शिवाजी राजा पन्हाळ्याला** सुरक्षित आहे हें अगदीं खरें आहे. त्यानें **अथणी** लुटल्यामुळें व्यापाऱ्यांचें ३ लाख होन इतकें नुकसान झालें. आपली सर्व फौज घेऊन तो **विजापूर** किंवा **गोवा** ह्यांवर जाईल असें म्हणतात.

सा. ले. ३६२ } (१८३४) { श. १५९८ चैत्र शु. १०
सु. १०७६ मोहर ९ } कौल म. मु. व सी. { इ. १६७६ मार्च १४

अज दि. दत्ताजीपंत वाकेनिवीस—माहानाड व बाजे पेठ अथणीः— लस्कर अथणीस जाऊन तुम्हास दस्त करून पनालेयास ठेविले. तुम्ही खंड ७००० होन कबूल केले. तरी २ महिने मुदतींत देणें व सुखे उदीम करून असणें.

सा. ले. ३६३ } (१८३५) { श. १५९८ चैत्र शु. १३
श. } { इ. १६७६ मार्च १७

सिवाप्पा वगैरे १४ माहानाड—मुदसे, मोगलपा, बापूजीराम सेटिये वगैरे.

बकाजी फर्जंद यांची स्वारी अथनीसी आली. त्यावेळी आम्हासी धरून नेले व ७००० होन खंडणी केली. आम्ही तुम्हासी धनी केले. तुमचे पैसे तुम्ही मागा ते जागा देऊं.

श्री सं. ले. १४ } (१८३६) { श. १५९८ चैत्र व. १३
रा. श. २ नल } न. राजपत्र. { इ. १६७६ मार्च ३१

छ. **शिवाजी**—आबाजी मोरदेव दोारी व दोाक प्रा जाउली.

का चाफल प्रा कऱ्हाड येथील नित्य पूजा व सेवकांस वेतनें व शिष्यसमुदाय व अतीत अभ्यागतासह श्रीरामदास स्वामी यांसाठीं १२१ खंडी गला, हें स्वामींच्याच सांगण्याप्रमाणें चालत असतां स्वामींनीं 'दिल्हे ते सर्व पावले. याउपरी येक रुका-परियेत द्रव्य व दाणा गला न पाठवणे. आपणास काही न पाहिजे.' असें रायगडास सांगोन पाठविलें. त्यामुळें राजे यांनीं, ज्याचे कर्तव्य स्वामीस मानलें आले त्या मुख्यास म्ह. दिवाकर गोसाव्यास पनाल्यास बोलावून स्वामींच्या त्या नकाराबद्दल विचारिलें. त्यास त्यांनीं सांगितलें कीं, 'श्रीची निस्पृह स्थीत आहे. महाराजांचे भक्तीस्तव वैभव घेतात. तरी आमान सामग्रीची मोईन चालवावी.' नंतर बाकीसह मोईन देऊन ऐवज निवल पोताहून देत जाणें, वराता न देणे. काडीइतकें अंतर न पडणें. जाणीजे

ओ. कॉ. भा. ३७ } (१८३७) { श. १५९८ वैशाख शु. ४
नं. ४२०२ इ. } सुरत (स्वाली)-कंपनी. { इ. १६७६ एप्रील ७

शिवाजीच्या मरणाची बातमी अजूनहि संशयित असली तथापि प्रचलित आहे. त्याच्या न्हाव्यानें त्याला विषप्रयोग केल्यामुळें बरेच दिवसांत तो बाहेर पडला नाहीं. त्याच्या सैन्यानें मात्र नुकतेंच रायबागजवळ **अथणी** नांवाचें व्यापारी शहर लुटलें. मुंबईशीं त्याचे संबंध अजून सलोख्याचे आहेत.

फॅ. रे. सुरत भा. ८९ } (१८३८) { श. १५९८ वैशाख शु. १५
पृ. ३१ इ. } सुरत-मुंबई. { इ. १६७६ एप्रील १८

सुरतेवर शिवाजीचें सैन्य येणार किंवा कसें याचा तपास करून त्वरेनें कळवावें.

ऑर्म भा. ११४-५ } पृ. ४० इ. | (१८३९) मुंबई-सुरत. | { श. १५९८ वैशाख व. ९ इ. १६७६ एप्रील २६

शिवाजीचें १० हजार घोडदळ **कल्याणला** आलें. दमणजवळ, म्हणजे सुरतेपासून ३६ तासांचे अंतरावर **पारनेर** नांवाची टेकडी (येथें पूर्वी किल्ला होता तो आतां ओसाड आहे) घेऊन, तिची तटबंदी करून, सुरतेजवळ ठाण मांडून बसण्याचा त्याचा विचार आहे. सुरतेच्या व्यापारावर अर्थातच याचा अनिष्ट परिणाम होईल. नारायण शेणवी व मोदी या उभयतांनीं **पन्हाळगडावर शिवाजी**ला पाहिलें. या वर्षी स्वाऱ्या करण्याचा त्याचा कांहीं बेत दिसत नाहीं.

ऑर्म ११४-५ } पृ. ४१ इ. | (१८४०) मुंबई-सुरत | { श. १५९८ वैशाख व. ११ इ. १६७६ एप्रील २८

शिवाजीचा सुरतेचा **वकील** केसो राम [का केशव रमण, kisso Rawn?] याच्या कर्तव्यच्युतीबद्दल त्याला कामावरून दूर करून, **मोरो पंडितानें** हें पत्र घेऊन जाणारा **सुंदरजी** परभू याला पाठविलें आहे.

फॅ. रे. सुरत भा. ८९ } पृ. ३३ इ. | (१८४१) सुरत-मुंबई | { श. १५९८ वैशाख व. १२ इ. १६७६ एप्रील २९

हुंडीच्या बाबतींत तुह्मीं करावी तितकी काळजी करीत नाहीं असें दिसतें. या व्यवहारांत त्याला आपल्याला फसविण्याची एकदां संधी दिली तर त्यापुढच्या व्यवहारांत आमचें अवसान जोखून तो नेहमीं वचनभंग इत्यादि अप्रामाणिकपणा करूं लागेल. तरी कंपनीच्या व्यवहारांतहि, तें कर्ज फिटेपर्यंत **त्याच्यावर विश्वास ठेवूं नये.**

फॅ. रे. फोर्ट सें. जॉर्ज, भा. २८ } पृ. ३४-३५ इ. | (१८४२) सुरत-फोर्ट सें. जॉर्ज. | } श. १५९८ वैशाख व. १४ इ. १६७६ मे १

मागें लिहिलेली शिवाजीच्या मृत्यूची बातमी खोटी ठरली आहे. **अथणीहून** त्याच्या सैन्यानें ३ लक्ष होनांची लूट नेली. त्यांत इंग्र० चें १६ होनांचें कापड गेलें. विजापूरचें राज्य गोंधळांत पडलें आहे. सुलतान अल्पवयी असून उमरावांत पक्ष आहेत. तें सर्वच राज्य जिंकण्याच्या उद्देशानें **बहादरखान** गेला आहे. **बहादरखान** देशाच्या हद्दीवर असतांना शिवाजीचा कोंडमारा झाला होता. परंतु आतां या संधीचा फायदा घेऊन तो **बहलोलखानाला** मिळाला आहे. **राजापूर व कारवार** येथील वखारींना या दंगलीमध्यें बराच उपद्रव होत आहे.

फॅ. रे. मुंबई भा. २ पृ. १२ (२) इ. (१८४३) मुंबई कन्सल्टेशन. श. १५९८ ज्येष्ठ शु. २ इ. १६७६ मे ४

शिवाजीच्या अमलाखालील काहीं **नृत्यांगना** या ठिकाणीं पळून आल्या आहेत. त्या **मोरो पंडिता**च्या मागणीवरून करारांप्रमाणें त्याच्या हवालीं कराव्या.

फॅ. रे. सुरत भा. ८९ पृ. ३७ इ. (१८४४) राजापूर-सुरत. श. १५९८ ज्येष्ठ शु. ६ इ. १६७६ मे ९

नबाबाची व दक्षिण्यांची निकराची लढाई होऊन त्याचे सुमारें १००० घोडे मारले गेले, त्याचे मुख्य साथीदार दगावले, आणि त्यालाहि पुष्कळ जखमा झाल्या. दक्षिण्यांचा मुख्य **शेख मीनस** (Menass) याचे सिद्दी **मसाउद** (Mazoure) व **सर्जाखान** हे साथीदार असून पठाणांशिवाय नबाबा (बहलोल-खाना) कडे कोणीच नाहीं. त्यानें तहाचें लाविलेलें बोलणें दक्षिण्यांनीं झिडकारलें. यामुळें त्याची स्थिति हलाखीची झाली आहे. शिवाजीचें ४००० घोडदळ खुशाल लूट करीत हिंडत आहे. या स्थितीमध्यें देशावरचा कांहीं माल मिळेल असें वाटत नाहीं.

फॅ. रे. फोर्ट सें. जॉर्ज, भा. १८ पृ. १३ इ. (१८४५) फोर्ट जॉर्ज-मुंबई श. १५९८ ज्येष्ठ शु. ११ इ. १६७६ मे १३

शिवाजीची कांहीं बातमी नाहीं. परंतु विजापूरच्या दक्षिण हद्दीकडील त्यांचा सरदार **एकोजी** (शिवाजीचा भाऊ) यानें अपूर्वजित असा एक डोंगर (किल्ला) आणि रानवट प्रांत जिंकून, **स्वतःची संस्थापना केली** आहे; अशी खबर आहे. त्या देशाला Zowady condaly [?] असें म्हणतात. **बहलोलखानाचा** शिद्दीमसीद जेकेरी व मसाउद आदिकरून लोकांनीं पराभव केला. तेव्हां **शिवाजी** हयात असेल तर त्याला खूप संधी आली आहे ! **जिंजी** या सुलतानाशीं तह करीत आहे. परंतु तो प्रजेला लुटण्याच्या उद्योगांत गुंतला असल्यामुळें तिकडे लक्ष देण्यास त्याला सवड नाहीं !

डाग रजिस्टर १६७६ पृ. ११० इ. मे ३१ न्यू. (१८४६) श. १५९८ ज्येष्ठ व. ४ इ. १६७६ मे २१

वेंगुर्ल्याची हकीकतः— गोव्याचे पोर्तु. लोक मोठ्या उत्साहानें यशस्वी चांचा **शिवाजी** याच्या विरुद्ध तयारी करीत आहेत. परंतु व्हाइसराय त्याच्याशीं गुप्तपणें बराच पत्रव्यवहार करतो असें दिसतें.... **विजापूरचे उमराव** आपसांत भांडत असून **शिवाजी**विरुद्ध कांहींच न करितां उलट (कित्येक) त्याच्याशीं स्नेह ठेवितात; यामुळें **बादशाहा** विजापुरावरच स्वारी करील असें वाटतें. सहा लहान होड्या आणि ११

छोटीं गलबतें एवढें मोंगलांचें [सिद्दीचें] आरमार येऊन त्यानें १० नोवें. (२० नोवें. न्यू.) रोजीं **वेंगुर्ल्यास** लूट केली, आणि **शिवाजीचा** सुभेदार व सैन्य ह्यांना हांकवून लाविलें. पुढें मोगली आरमारानें **शिवाजीच्या** आरमाराशीं युद्ध करून त्यालाहि पळवून लाविलें. आतां शिवाजीजवळ पैसा अगदीं राहिला नाहीं. आणि त्यांतच मोंगलांचा आणि आदिलशाहाचा आपसांत तह झाल्यास शिवाजीचे सर्व मोठेमोठे बेत जाग्यावर बसतील !

फॅ. रे. फोर्ट सें. जार्ज भा. २८ पृ. ३७-३८ इ.	(१८४७) सुरत-फोर्ट जॉर्ज	श. १५९८ ज्येष्ठ व. ९ इ. १६७६ मे २५

सुरतेवर शिवाजी येणार अशी दोनदां हूल उठली. आतां त्यानें रामनगरच्या राजाचा मोड करून कोळी देशांत प्रवेश केला; तेथें एक सैन्य ठेविलें आणि सुरतेपासून आठ दिवसांच्या मुक्कामावर असलेल्या **पिंडवोल टेकडीवर** मजबूत किल्ला बांधला. अशा तऱ्हेनें **रामनगर**च्या आसपास त्याचें सैन्य असल्यामुळें अजून भीती गेली नाहीं; कारण शिवाजी इतक्या जवळ असूनहि जर आतांच सुरतेवर न येईल तर येत्या पावसांत तरी येण्यास चुकणार नाहींच. मधला मार्ग मोकळा मिळून हल्ला त्वरेनें करतां यावा म्हणून **पोर्तु**०ना त्यानें इतके नरम केले आहेत कीं त्याला त्यांच्या मुलखांतून जाऊं न देण्याची त्यांची छातीच नाहीं. शिवाजीसारखा **त्रासदायक शेजारी** मिळाल्यावर मग या शहराचा व्यापार थांबल्यास नवल नाहीं.

फॅ. रे. सुरत भा. ८९ पृ. ३८-३९ इ.	(१८४८) सुरत-मुंबई	श. १५९८ ज्येष्ठ व. १० इ. १६७६ मे २७

या महिन्याच्या आरंभापासूनच रामनगरच्या राजाला त्याच्या देशांतून हांकवून लावणाऱ्या **मोरोपंताच्या** सैन्यामुळें सुरतेला भीती वाटूं लागली. **पिंडोल** व **पैनेका** (Painecah) घेऊन **मोरोपंत** ३ दिवसांच्या अंतरावर येऊन शहराचा नाश करण्याची दहशत घालून मोठी खंडणी मागत आहे. सुभेदाराशीं त्याचें या बाबतींत बोलणें चालू आहे. पोर्तु० मुलखांतून येण्याजाण्याचें स्वातंत्र्य मिळवून **शिवाजीनें** भिमपूर (बिंब [?] सारी Vinbassaree) आणि **दमण** येथें वसाहत करण्याची परवानगी मिळविली. अशा रीतीनें सुरतेवर जाण्याचा मार्ग पूर्णपणें ताब्यांत आल्यामुळें आतां शहराचा नाश करण्याचा किंवा मोठी खंडणी वसूल करण्याचा त्याचा पक्का बेत झाला असावा.

[से]-सुंदरजी परभू आला आहे. परंतु सुभेदार त्याच्याशीं कसा वागतो हें समजेपर्यंत आम्हीं त्याला उघड सहानुभूती दाखविणें किंवा भेट घेणें हें करणार नाहीं.

ऑर्म ११४-५ पृ. ४२ इ.	(१८४९) मुंबई-सुरत	श. १५९८ ज्येष्ठ व. १३ इ. १६७६ मे ३०

शिवाजीनें कांहीं हिशेब फेडला असून राहिलेला वसूल करण्याकरितां नारायण

शेणवी मागें राहिला अशी आमची समजूत आहे. शिवाजीकडून सर्व पैसा एकदम मिळणें कठीण असलें तरी तो निवळ फसवील असें म्हणवत नाहीं. आम्हीं राजापूरला नारळ व सुपारी आणण्याकरितां गलबतें ताबडतोब रवाना केलीं. परंतु शिवाजीचे अमलदारांनीं चाइल्डला इतकें फसविलें कीं, गलबतें तेथें दोन महिने पडून राहिलीं एवढेंच नव्हे तर शेवटीं रिकामींच परत आलीं !

फॅ. रे. सुरत　भा. ८९ पृ. ४० इ. }　(१८५०) सुरत–मुंबई　{ श. १५९८ ज्येष्ठ व. ३० इ. १६७६ जून १

शिवाजीचा वकील **सुंदरजी परभू** याच्याबरोबर आलेल्या शिपायाच्या हातीं हें पत्र दिलें आहे. पांच दिवसांपूर्वी **शिवाजीच्या सैन्याची** भीती होती. आतां तें पिंडोलहून परत स्वदेशांत पावसाकरितां गेलें आहे. परंतु पावसाळा संपतांच तें पुन: येईल अशी भीती वाटते.

फॅ. रे. सुरत भाग ८९ पृ. ४५-४६ इ. }　(१८५१) सुरत–मुंबई.　{ श. १५९८ आषाढ शु. ८ इ. १६७६ जून ९

सिद्दी संबूळला कामावरून दूर करून **सिद्दी कासम** यास दंडाराजपुरीचा सुभेदार व मोंगलांचा आरमारी सेनापती नेमिलें. त्याची शिफारस मागच्या पत्रांत केलीच होती. येथील सुभेदार फारच आग्रह करीत आहे. तरी त्याला पावसांत मुंबईस राहूं द्यावें. आणि जरूर तर व्यापारी या नात्यानें सर्वांशीं समबुद्धीनें रहावें लागतें इत्यादि सांगून **शिवाजीची समजूत काढावी. सुंदरजी परभू** भेटला. त्याच्या बोलण्याकडे लक्ष न द्यावें हें बरें वाटतें. [सिद्दी कासम २६ जूनला मुंबईस गेला. ऑर्म ११४-५ पृ. ४६ ता. ३ **जुलैचें पत्र**] परंतु,

(से)फॅ. रे. सुरत भा. ८९ पृ. ३०, स्वाली-मुंबई, ता. **१४ एप्रिल १६७६** ' सिद्दीला **मुंबईस पावसांत राहूं देऊं नये.** त्यानें फारच आग्रह धरल्यास त्याच्या लोकांच्या हालचालींवर बंधनें घालावीं. परंतु हें सामोपचारानें करून त्याला तक्रार करण्यास जागा ठेवूं नये. 'असा पूर्वीचा बेत होता.

खं. १५ ले. १३९ सु. १०७७ रखर १५ }　(१८५२) मिसली फा. मु. व सी.　{ श. १५९८ आषाढ व. २ इ. १६७६ जून १७

अज दि. किले सातारा—मोक० मौजे निगडी

निगडी येथील आनंदगिरीच्या इनामास कोणी तोसीस देत आहे: तरी तसें करूं न देणें.

डाग रजिस्टर १६७६ } (१८५३) { श. १५९८ आषाढ व. ५
पृ. १४५-४६ इ. जून ३० न्यू } { इ. १६७६ जून २०

विजापूरकरांच्या स्वारींत शिवाजीनें (त्याची प्रकृति आतां पक्की सुधारली आहे.) **अथणी**हून ५ लक्ष होनांची लूट नेली. त्यांत इंग्रजांचेंहि पुष्कळ नुकसान झालें. पण **अंनुखान** नांवाच्या विजापुरी सरदारानें त्याला **बेळ**गांवच्या किल्यावर चांगलेंच चकविलें. ४० ह. होन घेऊन किल्ला ताब्यांत देण्याचें त्यानें वचन दिलें. परंतु आपली जबाबदारी टाळण्यासाठीं थोडा युद्धाचा देखावा करण्याचें त्यानें ठरविलें. त्याला अर्धी रकम पोंचल्यावर, विश्वासानें शिवाजीचें सैन्य किल्ल्यांत शिरूं लागतांच मात्र त्यानें असा विरोध केला कीं, तेथें शिवाजीचे ५०० लोक पडले आणि बाकीचे गोंधळून पळाले.

ऑर्म. ११४-५ } (१८५४) { श. १५९८ आषाढ व. ६
पृ. ४५ इ. } मुंबई-सुरत. { इ. १६७६ जून २१

शिवाजी रायगडला आहे, त्याचें सैन्य पावसाळ्यासाठीं स्वस्थानीं गेलें आहे.

स. पृ. १२३ ले. १९ } (१८५५) { श. १५९८ आषाढ व. ७
सु. १०७७ रखर २० } { इ. १६७६ जून २२

रा. **सिवाजी राजे**—गंगाधर मुद्गल सरहवा. महालाहाय.

चिंचवड येथील श्रीचे (गोसावीं) पैके झाडा करून पाववीत नाहीं म्हणोन कळो आलें. तरी हे गोष्टी बरी करीत नाहीं. बहुत अन्याय करितां. साहेब तुम्हावरि ये गोष्टीकारणें खिजतील. तरी बोभाट येऊं न देणें.

खं. १५ ले. १४१ } (१८५६) { श. १५९८ आषा. व. १३
सु. १०७७ रखर २६ } { इ. १६७६ जून २८

माहादाजी अनंत सुभे. व कार. ता। सातारा—तुकाजी प्रभू हवा. व कार. ता। मजे निगडी वगैरे गांवीं सदानंद गोसाव्याचा इनाम आहे तो पंतानीं दुमाला करविला आहे. तरी दुमाला करविणें.

खं. १५ ले. १३७ } (१८५७) { श. १५९८ आषाढ व. १४
सु. १०७७ रखर २७ } फा. सी. { इ. १६७६ जून २९

दताजी त्रिमल—माहादाजी अनंत सुभे. व कार० ता। सातारा
सदानंदाचा ये तर्फेचा इनाम पूर्वीप्रमाणें चालविणें.

ऑर्म ११४-५ } (१८५८) { श. १५९८ अ. श्रावण शु. २
पृ. ४६ इ. } मुंबई-सुरत { इ. १६७६ जुलै ३

शिवाजीच्या दरबारांत एक **इंग्रज कायमचा** ठेवण्याबद्दल तुमच्याकडून विचार होईल त्याप्रमाणें कळविल्यावर आम्हीं निवड करून पाठवून देऊं.

फॅ. रे. सुरत भा. ८९ पृ. ४६ इ. } (१८५९) सुरत–मुंबई {श. १५९८ अ. श्रावण शु. ३ इ. १६७६ जुलै ४

मोरोपंत पिंडोलच्या रक्षणाकरितां ४००० लोक ठेवून **रायरी**ला परत गेला. **सुंदरजी परभू**कडे येथें कोणींच लक्ष देत नाहीं. म्हणून तो शहरचा नाश करण्याच्या गोष्टी सांगत असतो. तुम्ही **शिवाजी**च्या सैन्याच्या हालचालींवर लक्ष ठेवून तो या बाजूला वळण्याचा थोडासाहि संशय आल्याबरोबर कळवा.

खं. १५ ले. १३८ सु. १०७७ जवल १२ } (१८६०) मिसेली. फा. मु. सी. {श. १५९८ अ. श्रावण शु. १४ इ. १६७६ जुलै १४

अज दि० ता। सातारा—मोक० मौ. निगडी वगैरे

सदानंद गोसावी याचा गावगंनाचा इनाम (ले. १८५६) रखरच्या सनदेप्रमाणें दुमाला केला आहे. तरी तुम्हींहि दुमाला करणें.

फॅ. रे. सुरत भा. ८९ पृ. ५२ इ. } (१८६१) सुरत–मुंबई {श. १५९८ अ. श्रावण व. ४ इ. १६७६ जुलै १९

नारायण शेणवी (**हुंडीच्या बाबतींत**) दिरंगाई लावतो असें दिसतें. तर कोणी एकादा इंग्रज व गिरिधरदास यांना पाठवून ताबडतोब निकाल करून ध्या.

डाग रजिस्टर १६७६ पृ. १८५ इ. आगस्ट १ न्यू. } (१८६२) {श. १५९८ अ. श्रावण व. ७ इ. १६७६ जुलै २२

विजापुरी सेनापती **एकोजी राजा** हा कारोमांडेल किनाऱ्यावरील **तंजावरचा** पुरता स्वामी झाला. तो नागापट्टणला आला होता. परंतु त्याला तेथें विरोध झाला. याच वेळीं मदुरेच्या नायकाला ताब्यांत आणण्याचा त्याचा उद्योग चालू होता.

फॅ. रे. सुरत भा. ८९ पृ. ६०-६१ इ. } (१८६३) राजापूर–सुरत. {श. १५९८अ. श्रावण व.९ इ. १६७६ जुलै २४

गोवळकोंडेकरांच्या मदतीनें शिवाजीचा आदिलशाहाशीं तह झाला. शिवाजीकडे कोल्हापूरपलीकडील ५ कोसांवर कृष्णातीरापर्यंतचा मुलूख रहावा आणि त्यानें ३ लक्ष रु. पेशकस व दरसाल १ लक्ष होनांची खंडणी द्यावी; अशीं कलमें ठरलीं.

१० वर्षें मोंगलांकडे राहून मुसलमान बनलेल्या **नेताजी** नांवाच्या खोल मुत्सद्दी मनुष्याला पुनः हिंदू करून घेऊन शिवाजीनें आपल्याकडे मिळविला आहे. त्याअर्थी शिवाजीचा कांहींतरी मोठा बेत चालला आहे असें पुष्कळांना वाटतें.

स. सं. ले. १५ } (१८६४) { श. १५९८ श्रावण शु. १०
सु. १०७७ जखर ८ } { इ. १६७६ आगष्ट ८

रा. **शिवाजी** राजे

दसमाजी नरसाला सर हवालदार महाऊ इमारती किल्ले महिपतगड.

श्रीरामदास शिवतरी राहताती. सांप्रत ते गडावर रहाण्यास येतील. तरी त्यांचे लोकांस गडावर घेणें व हरएक खबर घेणें.

स. सं. ले. १६ } (१८६५) { श. १५९८ श्रावण शु. १०
सु. १०७७ जखर ८ } { इ. १६७६ आगष्ट ८

रा. **शिवाजी** राजे--जिजोजी काटकर हवाल. व कार० किले सज्जनगड.

(मजकूर ले. १८६४ प्रमाणें.)

ऑर्म ११४-५ } (१८६६) { श. १५९८ श्रावण शु. ११
पृ. ५३ इ. } मुंबई-सुरत. { इ. १६७६ आगस्ट ९

मोरोपंत १० ह. फौज घेऊन, **दंडाराजपूर** जिंकल्याशिवाय **शिवाजीला** तोंड न दाखविण्याची प्रतिज्ञा करून आला आहे. त्यानें सभोंवारची झाडी तोडून हल्ल्याची मोठी तयारी चालविली आहे. होड्यांत मोठ्या आच्छादक भिंती उभारून त्यांच्या आडून किल्ला उडविण्याचा तो बेत करीत आहे. ४।५शें लोक घेऊन सिद्दी कासम त्वरेनें किल्ल्याच्या रक्षणार्थ जात आहे.

डाग रजिस्टर १६७६ } (१८६७) { श. १५९८ श्रावण व. ३
पृ. २०७ इ. आगस्ट २६ न्यू. } { इ. १६७६ आगस्ट १६

शिवाजीचा उपद्रव आदिकरून कारणांचा विचार करतां वेंगुर्ला, कोंडेवार, आणि कानड्यांतीलहि कचेऱ्या (वखारी) मलबारी अमलांत आणाव्या असा सभेंत ठराव झाला.

फॅ. रे. सुरत भा. ८९ } (१८६८) { श. १५९८ श्रावण व. ८
पृ. ५६ इ. } सुरत-मुंबई. { इ. १६७६ आगष्ट २१

नारायण शेणव्याला अपयश आल्यामुळें **शिवाजी**कडे **ले० ॲडॅम्सला** पाठविलें. त्यापेक्षां **कॅ. अडर्टनला** पाठविलें असतें तर बरें झालें असतें.

फॅ. रे. सुरत भा. ८९ } (१८६९) { श. १५९८ श्रावण व. ११
पृ. ६२ इ. } राजापूर-सुरत. { इ. १६७६ आगस्ट २४

शिवाजीच्या घाटावरील घमेंडखोर प्रधानांच्या अज्ञानामुळें आम्हांला पुष्कळच त्रास होऊन व्यापाराला अडथळा होतो.

डाग रजिस्टर १६७६ पृ. २३५ इ. सप्टें. २८ न्यू. (१८७०) श. १५९८ भाद्र. व. ६ इ. १६७६ सप्टें. १८

एकोजी राजानें (अल्प)यशानें फुगून जाऊन नागापट्टणच्या कंपनीच्या एकदोन खेड्यांची जाळपोळ व लूट केली. त्यावरून त्याच्यावर गलबतें रवाना केलीं. हल्ला करतांच त्याचें सैन्य उधळून गेलें आणि त्याचे ६० शिपाई व १६ घोडे पडले.

प. रे. ऑफिस सी. ओ. ७७ भा. १२ पृ. ८३ (ए.) इ. (१८७१) सुरत- श. १५९८ भाद्र. व. १० इ. १६७६ सप्टें. २२

मे महिन्यांत रामनगरजवळ आल्यावेळीं शिवाजी (**मोरोपंत**)कडून शहर सुरक्षित ठेवण्याबद्दल ९ लक्ष रु. खंडणी व प्रांताच्या वसुलाच्या चौथाई यांची मागणी आली. सर्वत्र भीती व पळापळी चालू झाली. परंतु सुभेदारानें दरवाजे बंद करून संरक्षण करण्याचा आव आणिला. **या वेळीं काळजी करण्यासारखी परिस्थिती दीर्घकाल राहिली.** पुढें पावसामुळें शिवाजी परत गेला असला तरी पुनः परत येईल असें वाटतें.

ओ. कॉ. भा. ३७ नं. ४२२५ इ. (१८७२) कॅ. रॉबर्ट फिशरची नेमणूक. श. १५९८ आश्वीन शु. २ इ. १६७६ सप्टें. २९

राजापूर, कारवार, आणि **कालिकत** येथील वखारींशीं तत्प्रांतीय लोकांची उद्दाम व अपमानकारक वर्तणूक थांबविण्याकरितां तुम्हीं जरूर ते उपाय करावे.

ऑर्म ११४-५ पृ. ६१ इ. (१८७३) मुंबई-सुरत श. १५९८ आश्वीन शु. ६ इ. १६७६ आक्टो. २

मि. मौलवेरर रायरीहून परत हात हालवीत आला. **शिवाजी कल्याणवर** वराती देणार होता; परंतु तो बेत रद्द झाला. आणि आतां त्यानें लुटींत मिळविलेलें, कांहीं घडीव चांदीसोन्याचें सामान, देण्यास तो तयार झाला आहे. परंतु तो वजनावर शेंकडा ५० टक्के घडणावळच मागतो. त्या दरानें घेतल्यास त्याचें सर्वच कर्ज फिटेल. पण यावेळीं हें न घेतल्यास पुढें कांहींच हातास न लागण्याचा संभव आहे. शिवाजी मेला, युद्धामुळें कफल्लक बनला, किंवा **प्रत्यक्ष बादशहानेंच त्याच्यावर स्वारी केली** तर शिवाजीची धडगत न राहून, मग वसूल तरी कसा होणार ? मौलेवेरेर तेथून निघाला त्याचवेळीं, शिवाजी मोठें सैन्य घेऊन कानड्याकडे स्वारीवर निघाला होता. **बार्सिलोर, होनावर** इत्यादि किनाऱ्याच्या लगतचा प्रांत घेण्याचा त्याचा बेत जाहीर झाला आहे. जातांना आमच्या मर्जीप्रमाणें आम्हांला चांदीसामान किंवा कल्याणवरील वराता द्याव्या असें तो सांगून गेला. मात्र कल्याणवरील वराता वसूल करण्याचे श्रम आम्हीं घेतले पाहिजेत. नारायण शेणवी मागें राहिला आहे.

ऑर्म. ११४-५ } (१८७४) { श. १५९८ आश्वीन शु. १०
पृ. ६३ इ. } मुंबई-सुरत { इ. १६७६ आक्टो. ६

आज नारायण शेणवी परत आला. चांदीसामान ३० रु. शेरांनीं (२३ सुरती-तोळे = १ शेर) देणार; परंतु २८ पर्यंत भाव उतरेल. वरातांपेक्षां हें बरें वाटतें. **शिवाजी** किनाऱ्याकडे खालीं न जातां घाटापलीकडे बालाघाटांत गेला. बंकापुरानजीक **बेळगांव** आणि तेथून पांच दिवसांच्या अंतराव अलीकडे असलेला **वायेम रायिम ?** (Vayem Rayim) अशा दोन किल्यांना त्यानें वेढे घातले. विजापुर प्रांतांत त्यानें खूप उपद्रव केल्यामुळें राजापूरच्या व्यापाराला अर्थात् उपसर्ग पोंचेल.

भाटे सज्जनगड } (१८७५ = १४६२ अ) { श. १५९४ चैत्र व. १
पृ. ११२ श. } { इ. १६७६ एप्रील ४

के(श)व गोसावी— गु. म. प. रा. रा. दिवाकर गोसावी

आपण पत्र पाठविलें तें पावलें. मजकूर समजला. रा. **शिवराजे भोसले हे समर्थांचे भेटीस** येणार म्हणोन लिहिलें तें समजलें. मी येणार होतो, परंतु माझी प्रकृति फार बिघडली. येणें होत नाहीं. मी इकडून अकास येणेसाठीं लिहिलें. परंतु अकाचेंहि येणें व्हावयाचें नाहीं. गांवीं भानजी गोसावी असतील. **राजे यांची पहिलीच भेट आहे.** वाडीचे लोकांस खटपटेस आणावे. उपयोग होईल. झाडी बहुत आहे. इकडून उदईक त्रिंबक गो व विठ्ठल गो व दत्तात्रय गो उदइक पाठऊन देतो. श्रींचे उत्सवास भिक्षेचें धान्य जें मिळालें तें अश्वत्थभट मसूरकर यासमागमे पाठविलें. दत्ताजीपंताकडू(न) दोनशें होनु उत्सवास पाठविले ते अले असतील. लोभ करावा, हे विज्ञप्ति.

फॅ. रे. सुरत भा. ८९ } (१८७६) { श. १५९८ आश्वीन शु. १५
पृ. ६७-६८ इ. } सुरत-मुंबई { इ. १६७६ आक्टो. ११

प्रेसिडेंटकडे नारायण शेणव्याचें पत्र आलें आहे. वराता किंवा भाताचे रूपानें **शिवाजी** कंपनीचें आणि इतरांचें देणें देण्यास तयार आहे. यापेक्षां अधिक सोईच्या अटी मिळणें शक्य नसल्यास जिन्नस घेतांना दराबद्दल योग्य खबरदारी घ्यावी. मोंगली सैन्याचा उपद्रव असलेल्या देशांत त्याची भरपाई व्हावयाची असल्यास सुरक्षितपणें माल हातीं येईल असें जपावें.

सां. इ. सा. ले. १९ } (१८७७) { श. १५९८ आश्वीन व. १
श. } दानपत्र फा. सी. { इ. १६७६ आक्टो. १२

खेमसावंत भोसले सरदे. पर. कुडाळ—पुरोहित

आमचे वडील लखम सावंत वारले. त्यांचे १० वे दिवसीं तुम्हास का कुडाळपैकी सेत दान दिलें.

फॅ. रे. सुरत भा. ८९ } (१८७८) { श. १५९८ आश्वीन व. ६
पृ. ६९-७० इ. } सुरत-मुंबई { इ. १६७६ आक्टो. १७

नारायण शेणव्याची शिवाजीकडील हकीकत कळली.

शिवाजीच्या देशांतील व्यापार सुरळीत चालेल आणि आमच्याशीं सरळ आणि न्यायाचा व्यवहार करण्याइतकें स्वतःचें हित समजण्याचें शहाणपण त्याला असेल असें वाटलें होतें. परंतु या चांच्या दरोडेखोराला शत्रू-मित्र, देव-मनुष्य यांपैकीं कोणाबद्दलच विशेष भावना नसल्यामुळें त्याच्या देशांत व्यापाराला उत्तेजन मिळणें अशक्य समजून आम्हीं **राजापूरची वखार मोडण्याचें ठरविलें** आहे. कराराप्रमाणें राहिलेलें कर्ज वसूल होईपर्यंत तेथें दोघांनीं राहून इतरांनीं कंपनीची सर्व मालमत्ता घेऊन मुंबईस परत यावें. कारवार देखील त्याच्याच अमलांत रहाणार असेल तर तेथील व्यवस्था तशीच करावी लागेल. तुम्हींहि त्याच्या मुलखाशीं काडीचा संबंध न ठेवितां, तसा तुम्हांला स्पष्ट हुकूम मिळाल्याचें सांगा. तो स्वतः व त्याचे प्रधान अविश्वसनीय असल्याचें आमच्या प्रत्यंतरास आलें असें सांगा. राजापूरला वगैरे आमची वखार असल्यामुळें आमचा हात सांपडला नसता तर त्याचीं गलबतें पकडण्याचा सद्यःफलदायी मार्ग पत्करण्यास आम्हीं मागेंपुढें पाहिलें नसतें. अजूनहि फसवाफसवीचाच त्यांचा प्रयत्न चालू राहिला तर नारायण शेणव्यानें तडकाफडकीं निघून यावें असा त्याला निक्षून हुकूम पाठवा.

डाग रजिस्टर १६७६ } (१८७९) { श. १५९८ आश्वीन व. ६
पृ. २७७-७८इ. आक्टो. २७ न्यू. } { इ १६७६ आक्टो. १७

पोर्तु० कडून असें कळतें कीं, **शिवाजी** मेला व संभाजी गादीवर आला. आसपासच्या कांहीं मुलखाच्या ताब्यासंबंधीं वाद निघून त्याची व **गोवेकर पोर्तु०ची** लढाई झाली आणि त्यांत संभाजीला परत फिरावें लागलें. परंतु ह्यावर विश्वास ठेवणें कठीण वाटतें. [कारण,] याच वेळीं **शिवाजी**चें सैन्य सुरतेपासून एक दिवसाच्या मुक्कामावर ठाणीं धरून बसल्याचें समजलें आहे. सुरतकर मुसलमानांना त्यामुळें भीती उत्पन्न होऊन व्यापार बसेल.

फॅ. रे. सुरत भा. ८९ } (१८८०) { श. १५९८ आश्वीन व. १३
पृ. ७२ इ. } सुरत-मुंबई { इ. १६७६ आक्टो. २५

नारायण शेणवी परत आल्याचें कळलें. दर शेराला २८ रु. दरानें चांदी-सोन्याचें सामान (Plate) घेण्यांत आमचा शेंकडा २०ते२५ तोटा असला तथापि पळत्याच्या पाठीस लागण्यापेक्षां हातचें सोडूं नये हें चांगलें वाटतें. म्हणून वरातीबद्दलचे पूर्वीचे हुकूम रद्द समजून शक्य तो किफायतशीर दर लावून **शिवाजी** देत आहे तें सामान घ्यावें व पहिला झालेला ठराव मोडावा. पुढील मागणी पुढें करूं.

डाग रजिस्टर १६७६ } (१८८१) { श. १५९८ कार्तिक शु. ११
पृ. २९९-३०० इ. नोवें. १६ न्यू. } { इ. १६७६ नोवें. ६

शिवाजीच्या हस्तकांकडून **वेंगुर्ल्याची स्थिरस्थावर** करण्याच्या बाबतींत (डच) कंपनीशीं बोलणें चालू झालें आहे. आलेला माल स्वतःच खरेदी करण्याचा त्यांचा कांहीं विचार चालू आहे.

विजापूरच्या हद्दीवर मोंगली सैन्याचा मोठा पराजय झाला. परंतु त्यांना कांहीं हजार सैन्य आणखी येऊन मिळाल्यामुळें, विजापूरकरांशीं एकमत करून **शिवाजीवर** स्वारी करण्याचा त्यांचा विचार अजून कायम होऊं शकला नाहीं. यामुळें **शिवाजी** अप्रतिहत सुरतेच्या बाजूला आपल्या राज्याचा विस्तार करीत आहे. त्यानें गोव्याकडे पोर्तु०नाहि फार त्रास दिला.

डच रे. भा. ३४ } (१८८२) { श. १५९८ कार्तिक व. ८
नं. ८४४ इ. नोवें. २८ न्यू. } बटेव्हिया-डच कंपनी. { इ. १६७६ नोवें. १८

मोंगलांचा सेनापती **बहादरखान** विजापुरापासून अर्ध्या दिवसाच्या मुक्कामावर आला. परंतु तेथें युद्धांत ४००० शिपाई, पुष्कळ सामान, व चार प्रसिद्ध सेनापती एवढ्यांचें नुकसान भोगून तो **सोलापुरावर** मार्गे हटला. तेथें **बहलोलखानानें** वकील व नजराणे पाठवून मुख्यतः **शिवाजीविरुद्ध बोलणें केलें**. इतक्यांत १० ह. घोडदळ घेऊन **दिलेरखान** छावणीस आला. आणि इतकें नुकसान सहन करून तह करणें अशक्य[अपमानानें] वाटल्यावरून त्याकरितां बादशहाकडे पत्रें पाठवून उत्तराची वाट पहावी असें ठरलें. मध्यंतरीं शिवाजी सुरतेंत धुमाकूळ घालून आपला प्रांत वाढवीत आहेच. गोवळकोंड्याचें सैन्य विजापूरच्या बाल-सुलतानाच्या कुमकेस येत आहे. शिवाजी गोव्याकडे कांहीं जबरदस्ती चालवीत असे. परंतु त्याचे पूर्वीचे बेत आतां त्याचा ज्येष्ठ पुत्र **संभाजी** अमलांत आणितो. गतसालीं शिवाजीनें जिंकलेल्या **फोंडा किल्याचे** खालीं ते येतात अशा सबबीवर **६० गांव** सोडून देण्याबद्दल त्यानें **गोंवेकर पोर्तु**०ना कळविलें आहे. विजापूरचें राज्य शिवाजीनें जिंकून घेतलें नाहीं तोंपर्यंत प्रथम विजापुराहून याबद्दल संमती आणविली पाहिजे असा पोर्तु०नीं जबाब दिला. यावरून मराठ्यांनीं गोव्यावर जोराचा हल्ला केला परंतु पोर्तु०नीं तो हटविला. तेव्हां येथून परत फिरून ते सुरतेजवळ **दमणकडे** गेले. तेथील मुसलमान सुभेदारानें सावधगिरी करून सर्व दरवाजे बंद करून फक्त एकच खुला ठेविला.

ऑर्म ११४-५ } (१८८३) { श. १५९८ मार्ग. शु. ७
पृ. ७४ इ. } मुंबई-सुरत { इ. १६७६ डिसें. १

शिवाजीशिवाय पितळी तोफांना दुसरें गिऱ्हाईक नाहीं.

चाइल्डला राजापूरच्या सुभेदारानें जबरीनें ठेवून घेतल्यामुळें फक्त इतर दोघेजण आले. राजापूरच्या वखारीची गैरव्यवस्था झाली आहे. कारण **सिद्दीचें** आरमार तेथें असून त्यानें **जैतापुराची जाळपोळ** केली.

फॅ. रे. सुरत भा. ८९ पृ. ९०-९१ इ. | (१८८४) सुरत-मुंबई. | श. १५९८ मार्ग. शु. ११ इ. १६७६ डिसें. ५

शिवाजी रोख पैसा देण्यास तयार झाला तरी आमच्या हुकमाशिवाय पितळी तोफा त्याला देऊं नका. ही बाब महत्त्वाची आहे आणि शिवाजीवर विश्वास ठेवण्याची सोय नाहीं. **मोंगलांचा व शिवाजीचा तह झाल्याची** चौलच्या सुभेदाराकडून तुम्हांला कळलेली बातमी आम्हांला विश्वसनीय वाटत नाहीं. अशा बातम्यांनीं अद्यापपर्यंत आपल्याला अनेक वेळां फसविलें आहे. शिवाय याच सुमारास नेहमीं शिवाजी अशा अफवा उठवीत असतो; हें आपल्या परिचयाचें झालें आहे. मोंगलांनीं आपल्या देशावर स्वारी करूं नये एवढाच त्याचा ह्यामध्यें उद्देश असतो. आणि यदाकदाचित् तह झाला तथापि तो दीर्घकाल टिकेल असें आम्हांला वाटत नसल्यामुळें त्या भागांत जुन्नर किंवा दुसऱ्या कोठें या गोंधळाचे वेळीं वखार घालण्यास आमचें मन घेत नाहीं. मात्र त्या देशांत आह्मीं स्वतः रहाणें धोक्याचें असलें तथापि तेथील व्यापाऱ्यांनीं आपल्या बेटांत व्यापाराकरितां यावें अशाकरितां तुह्मीं सर्व प्रकारें उत्तेजन द्यावें.

ऑर्म ११४-५ पृ. ७४ इ. | (१८८५) मुंबई—सुरत. | श. १५९८ मार्ग. शु. ११ इ. १६७६ डिसें. ५

मोंगल व शिवाजी यांच्या तहाच्या केवळ बाजार बातम्या आल्या असें नसून चौलच्या सुभेदारानेंच पत्र पाठवून तसें आम्हांला कळविलें. यापुढें मोंगलांची **सिद्दीला** मदत व्हावयाची नाहीं. मग आपण जुन्नर, औरंगाबाद किंवा अन्य कोठेंतरी वखार घालण्याचा विचार केल्यास किफायत होईल. राजापूरला अधिक कापड घेऊन ठेवावें काय ?

नारायण शेणवी हिशेबाचा उलगडा करून घेण्याकरितां **मोरोपंडिता**बरोबर चौलला गेला आहे. दरसाल ४ लाक्ष होन खंडणी आणि ५००० घोडदळ मोंगलांकडे पाठवावयाचें ठरल्याप्रमाणें मोरोपंडितानें 'पहिल्या वर्षाची खंडणी पाठवा,' असें **रायगडला** कळविल्याचें नारायण शेणव्यानें लिहिलें आहे. **निराजी पंडीत** ५००० घोडदळहि घेऊन गेला.

सां. इ. सा. ले. ३० रा. श. ३ | (१८८६) | श. १५९८ मार्गशीर्ष शु. १२ इ. १६७६ डिसेंबर. ६

श्रीराजा शिवछत्रपति यांणीं राजश्री बाळाजी सुाा देशाधिकारी ताा कुडाळ

यास आज्ञा केली ऐसी जे, पितांबर शेणवी यास दस्त केले ते वेळेस याचे कागद-पत्र वृत्तिसमयीं पहिले व हल्लीं व वरकड खासगत कागद आणून तुह्मीं ठेविले आहेती ते जे असतील ते याचे यास देणें. अनमान न करणें. फर्मान व पटे असतील ते तमाम देणें.

खं. २० ले. १५२ } (१८८७) { श. १५९८ मार्ग. शु. १४
सु. १०७७ सवाल १३ } म. मु. व. सी. { इ. १६७६ डिसें. ९

राघो बल्लाळ सरसु०—एसाजी मल्हार सुभे. पा वाई, (ले. १८०७ प्रमाणें,)

खं. २० ले. १५३ व १५४ } (१८८८) { श. १५९८ मार्ग. शु. १२
सु, १०७७ सवाल १४ } म. मु. व. सी. { इ. १६७६ डिसें. १०

एसाजी मल्हार सुभे. व कार. पा वाई—आमाजी कान्हो हवा. सा वाई.

सुभे. च्या पत्राप्रो नरसी रंगो याचा पसर्णी येथील इनाम चालविणें.

खं. २० ले १५४ } (१८८९) { श. १५९८ मार्ग. शु. १५
सु, १०७७ सवाल १४ } { इ. १६७६ डिसें. १०

एसाजी मल्हारी सुभे. कार. पा वाई—अमाजी कान्हो सा वाई,

सरसुभेचे पत्राप्रो, नरसी रंगो व एकनाथ रामेस्वर यांचा पसर्णीन्त इनाम चालविणें.

खं. २० ले. १५५ } (१८९०) { श. १५९८ मार्ग. व. १
सु. १०७७ सवाल १५ } म. मु. व. सी. { इ. १६७६ डिसें. ११

एसाजी मल्हारी सुभे. कार.—एसाजी राम हवा. कार. सा नींब.

सरसुभे (राघो बल्लाल)चे पत्राप्रो नरसी रंगो व एकनाथ रामेस्वर यांचा बोरखल येथील इनाम चालविणें.

खं. २० ले. १५६ } (१८९१) { श. १५९८ मार्ग. व. १
सु. १०७७ सवाल १५ } म. मु. व सी. { इ. १६७६ डिसें. ११

एसाजी मल्हार—भिमाजी मल्हारी हवा. व कार. सा कोरेगांव.

सरसुभेचे सवाल (ले. १८८७) पत्राप्रो नरसी रंगो व एकनाथ रामेस्वर यांचा किण्ही येथील इनाम चालविणें.

खं. २० ले. १५७ } (१८९२) { श. १५९८ मार्ग. व. ७
सु. १०७७ सवाल २१ } म. मु. व सी. { इ. १६७६ डिसें. १७

अज दि. हवा. व कार. अमाजी कान्हो पा वाई--मोक. मौ. पसर्णी.

सुभे० पा मा याचें (ले. १८८९) सनदेप्रो नरसी रंगो याचा पसर्णी येथील इनाम पूर्वीप्रो चालविणें.

ऑर्म ११४-५ } (१८९३) { श. १५९८ मार्ग. व. १०
पृ. ७८ इ. } मुंबई-सुरत { इ. १६७६ डिसें. २०

मोंगलांचा तह मोडला. शिवाजीनें संभाजीराजाला ओलीस पाठविण्याचें नाकारलें म्हणून तह मोडला असें म्हणतात. कित्येक असें म्हणतात कीं, हा तह फक्त बहादरखानानें घडवून आणला. पण त्याला बादशहाची संमति मिळाली नाहीं.

ऑर्म ११४-५ } (१८९४) { श. १५९८ पौष शु. ७
पृ. ७९ इ. } मुंबई-सुरत. { इ. १६७६ डिसें. ३१

मि. चाइल्ड (राजापूर वखारीचा मुख्य) आज सुरतेस जात आहे.

खं. १५ ले. १४० } (१८९५) { श. १५९८ पौष व. १२
सु. १०७७ जिल्काद २५ } { इ. १६७७ जाने. २०

सिउजी बिन तुकोजी पवार-आनंदागिरी गोसावी वस्ती डोणजे.

तुमचे टके आम्हाकडील उगवणी करून देऊं.

राम. अ.६५, ६६ ले. १८ } (१८९६) { श. १५९८ माघ व. १२
फ. १०८६ जिल्हेज २५ } फा. मु. { इ. १६७७ फेब्रु. १८

जयसिंगजी राजे (भोसले)

रघुनाथ विठल व विश्वनाथ तिमाजी भट सेडगे तीर्थ उपाध्ये. मु. वेरूळ

तुम्हांस वर्षासन रु. १२ प्रतिवर्षी देत जाऊं.

गो. इ. सा. ले. ३० } (१८९७) { श. १५९८ माघ व. १३
रा. ३ } { इ. १६७७ फेब्रु. १९

मोरेश्वर पंडितराऊ — गिरमाजी तुकदेऊ देशा. व देशेल० देश मिरज.

लांबगांव येथील रामकृष्ण जोशी यास दहा मण धान्य देविले अंम. लिखित माघ वदि १२ लेखन शुध फाल्गुण वहुल अमावाशा शुक्रवार. (असेंच एक पत्र नरबा पील जोशी याच्या नावचें आहे.)

गो. इ. सा. ले ३१ } (१८९८) { श. १५९८ माघ व. १३
रा. ३ } { इ. १६७७ फेब्रु. १९

मोरेश्वर पंडितराय—गिरमाजी तुकदेव देशा. व देश० देश भिवगड

रामनारायण जोसी राहे. मूळगाव यांस डिचोली भागांत जोतिष सांगण्याकरितां १० मण तांदूळ देविले असेत. [असेंच एक पत्र केशव जोशी याच्या नांवचें आहे.]

गो. इ. सा. ले. ३२ } (१८९९) { श. १५९८ माघ व. १३
रा. ३ } { इ. १६७७ फेब्रु. १९

मोरेश्वर पंडितराऊ—धर्माजी नागनाथ व गिरमाजी तुकदेव देशा० व देशले० व देशमू० प्रां फोंडा व डिचोली प्रां मर्दनगड व भिवगड

उभय देशी, देशस्त, कराडे, चितपावन, जोतिसी व पद्येब्राह्मण आहेत, या सकळांची परीक्षा घेऊन वृत्ती चालविणें.

डॅन्, २ पृ, ३६० } (१९००) { श. १५९८ फाल्गुन शु.७
न्यू, } पोर्तुगीज गव्हर्नर–इंग्लंडचा राजा { इ. १६७७ फेब्रु. २८

आपल्या पत्रांत **कारंजा** व **ठाणा** येथील मांडवी (Mandovis) संबंधीं मजकूर आहे तो समजला. आपण ज्याला **जकात नाकें** म्हणतों त्याला मुसलमान लोक **मांडवी** म्हणतात. मुसलमानी अमदानींत **कारंजा** येथें अशा प्रकारचें जकात-नाकें होतें. व कल्याण–भिंवडी प्रांताचें जकात नाकें ठाण्यास होतें.

सरस्वतीमंदीर } (१९०१) { श. १५९८ फाल्गुन ?
इति. मं. पृ. ९७ } 'प्रतिपच्चंद्र' मुद्रा { इ. १६७७ मार्च

मालोजी राजे घोरपडे प्रति राजश्री **शिवाजी** राजे जोहार, उपरि.

पूर्वी निजामशाहींतून आमचे बाप कैलासवासी महाराज इभराइम आदिलशहा पादशहाचे कारकीर्दीस इकडे आले. त्यास इभराइम आदिलशहानें पादशाही कारभाराचा मदार महाराजाचे सिरीं टाकिला. तेव्हां महाराजानें हा विचार केला कीं, पादशाही मदार आपले हातास आला असतां आधीं तो आपले जातीचे लोक मराठे याला हातीं धरून सरदारकी करून पोटें भरतात ते पादशाही वजीर करावे. पादशाही कामें याजकडून करून नामोश होय, इज्जती थोर पावेत, तें करावें. म्हणून तुमचे बाप बाजी घोरपडे सरदारकी करून होते ते आणून पादशहास भेटून पादशाही वजीर केले. त्या दिवसापासोन तुमच्या बापाच्या हातें व तुमच्या हातें पादशाहीचीं कामें होत आलीं. पादशहानें तुमचें चालविलें. ऐशा तीन पिढया पादशहाच्या दोनी पिढया तुमच्या जाल्या. ऐसियास महाराजानें तुमच्या बापास इतकें बरें केलें हें स्मरण न धरून जेव्हां कांहीं मुस्तफा खानानें महाराजास दस्त करविलें तेव्हां तुमचे बाप

बाजी घोरपडे हमी होऊन महाराजास दस्त करून मुस्तफाखाचे हातीं दिल्हे. त्या दिवसापासून तुमच्या घराणियाचा व आमच्या घराणियाचा दावा वाढत चालिला. तो कित्येक झगडियांत तुह्मीं आमचे लोक मारिले व आह्मीं तुमचे लोक मारिले. आदिकरून तुमचे बाप बाजी घोरपडे त्यांला आमचे लोकीं झगडियांत मारिलें. ऐसा परस्पर दावा चालिला होता. ऐशियास सांप्रति राजकारण वर्तमान तरी दक्षिणचे पातशाहा तीन, निजामशहा, आदिलशाहा, कुतुबशहा, त्यांमध्यें निजामशाही पादशाही बुडाली ते समई निजामशाही उमदे वजीर होते त्यांणीं आदिलशाही दरगाहासी रुजुवाती करून आपणास रोजगारास जागा केला. हालीं **आदिलशाही बहलोलखान पठाणीं घेतली**. पादशाहा लहान लेकरूं. नांव मात्र. ते आपले कैदेंत ठेविले आहेत. आणि तख्त व छत्र विजापूरचा कोट पठाणानें कबज केला आहे. कांहीं गुबारून मिळाला नाहीं. ऐशियास **दक्षिणचे पादशाहीस पठाण जाला हे गोष्टी बरी नव्हे**! पठाण बळावला म्हणजे एका उपरी एक कुली दक्षिणियांचीं घरें बुडवील. कोणास तगों देणार नाहीं. ऐसें आम्हीं समजोन **हजरत कुतुबशाहा पादशाहा** यांसी पहिलेपासून रुजुवात राखिली होती. त्यावरून सांप्रत हजरत कुतुबशाहांनीं मेहेरबानी करून 'हुजूर भेटीस येणें' म्हणून दस्तखत मुबारक व दस्त–पंजियानसी फर्मान सादर केला. त्यावरून आम्ही येऊन हजरत कुतुबशाहाची भेटी घेतली. भेटीचे समई पादशाही आदब आहे कीं शिरभोई धरावी, तसलीम करावी. परंतु **आम्ही आपणावरी छत्र धरिलें असे, ही गोष्ट कुतुबशाहास मान्य होऊन** शिरभोई धरणें व तसलीम करणें हें माफ केलें. पादशाहा तिकडून आले; आम्ही इकडून गेलों. पादशाहांनीं बहुतच इज्जती होऊन, गळ्यास गळा लावून भेटलें. आम्हांस हाती धरून नेऊन जवळी बैसविलें. कितीएक मेहेरबानी जाहीर केली. आम्हींहि जैसी रुजुवात करून ये तैसी केली. आणि कुतुबशाहाचा व आपला घटीं बरेपणा करून घेतला. याउपरी राजकारण विषयीं हजरत कुतुबशाहांनीं महादण्णापंतांस व आम्हास एकचित्त करून ऐसा तह केला कीं जो काय उभयवर्गी तह द्यावा तो आपण कबूल करावाच. ऐसा कुल मनसबा व मदार आम्हांवरी टाकिला आहे, कीं 'आपली पादशाही जितकी वाढवूं ये तितकी वाढविणें. पठाणाची नस्तनाबूद करणें. **दक्षणची; पादशाही आम्हां दक्षणियांच्या हातीं राहे** तें करावें' म्हणून. त्यास हा मनसुबा ये प्रसंगीं आमचे हातास आलिया उपरि आम्हीं हाच विचार केला कीं **जे कांहीं आपले जातीचे मराठे लोक आहेती** ते आपल्या कटांत घेऊन कुतुबशाहासी त्यांची रुजुवात करावी. दौलत देवावी, त्यांचे हातें पादशाही काम घेऊन पादशाहाची दराज करावी. आणि तुम्हां लोकांच्या दौलताहि चालेत, घरें राहेत, तें करावें. आपल्या जातीच्या **मराठिया लोकांचें बरें करावें** हें आपणास उचित आहे ऐसें मनावरी आणून, तुमचा आमचा वडिलापासून दावा वाढत आला तो आम्हीं मनांतून टाकून, निःकपट होऊन, तुम्हीं

मराठे लोक, कामाचे, तुमचें बरें करावें ऐसें मनीं धरून, हजरत कुतुबशाहासी बहुत रीती बोलोन, तुम्हांस हजरत कुतुबशाहाचा कौलाचा फर्मान घेऊन पाठविला आहे. तरी तुह्मी कुलीन, आमचा भरोसा मानून, देखत पत्र, हरएक उपाये, पठाणापासून निघोन, मजलदरमजल भागानगरास आम्हापासी येणे, त्यास, तुह्मी तरी स्वार होऊन मजलदरमजल यालच. परंतु आपला कुली खुलासा, नेमस्त मुदा व इतबारी हेजीब बहुत सत्वर पुढें पाठवून देणें. कीं, तुम्हांहून पुढें चार दिवस आह्मांपासी यावे ऐसा पाठवून देणें. म्हणजे हजरत कुतुबशाहास आह्मी अर्ज करून दौलतेचे नेमस्त करून कौलाचा फर्मान दस्तपंजे मुबारक घेऊन फर्मान व लुगडीं मोहताप तुम्हांस पाठवून देऊन. ते घेऊन, येऊन, आमचे हातें हजरत कुतुबशहास भेटणें. ए प्रसंगीं ऐसें तुमचें दौलतीचें काम मजबूत करून देतों कीं, पुढें बहुत बरें केलें ऐसें तुम्हीं आठवावें; तुमचे पुत्रपौत्र आठवीत व दौलत थोर होए व हजरत कुतुबशाहाचे काम तुमचे हाते होऊन ये ऐसा समय असे. ऐशियास तुम्ही कदाचित् ऐसा विचार कराल कीं आदिलशाहीचे आपण दो पिढीचे वजीर आणि आतां विजापुराकडून कुतुबशाहींत राजे यांचे बोलें कैसें जावें ? तरी जे समई खवासखान धरिला, विजापुरचा कोट पठाणें घेतला, विजापुरचा पादशाहा धाकटा आहे त्याला कैदेंत ठेविलें, तेच समई पादशाही बुडाली ! विजापूर पठाणाचे हातास गेलें ! **आतां आदिलशाही कैची ?** आणि उगीच तुह्मी तेथें आपली आदिलशाही आहे म्हणोन गुंतून राहिले आहां ! जरी पठाणाचीच चाकरी करून राहों ह्मणाल, तरी पठाण कांहीं तुम्हास थोर दौलत देणार नाहीं. आणि पठाणास तरी हजरती कुतुबशाहा व आम्ही व तमाम दखणी मिळोन चालोन घेऊन बुडवीतच आहों ! **तुम्ही मराठे लोक आपले आहा. तुमचें गोमटें व्हावें** म्हणून पष्टच तुम्हांस लिहिलें असे. जें काय तुम्हांस पठाण देतो त्याची दुगुणी आम्ही कुतुबशाहापासून तुम्हास देवीतच असो; किंवा ह्याहून अधिकही होऊन येईल तरी करून देऊनच. सर्व प्रकारें तुमचें गोमटें करून, एविसी आम्हांपासून अंतर पडे तरी व मागील दावियाचा किंतु आम्ही मनांतून टाकिला एविसी आम्हास श्री – देवाची आण असे. तुम्ही निःसंदेह होऊन येणें. हेजीब आपला पुढें पाठविणें; त्या हातीं, आम्हांसी घरोबियानें बरें वर्तावें, मागील दावियाचा किंतु मनांतून टाकिला, ऐसें आपला आराध्य व कुलस्वामी असेल त्याची शपथ लिहून पत्र हेजीबा हातीं पुढें पाठवून देणें. आम्ही सर्व प्रकारें तुमचें गोमटें करावयासी अंतर पडो नेदऊन. बहुत काय लिहिणें.'मर्या देयं विरा जते.'

फ्रायर २ } (१९०२) { श. १५९८-९९
पृ. २-५ इ. } वृत्तांतांतील उल्लेख. { इ. १६७६

दंडाराजपुरीच्या किल्ल्यानें संरक्षित असलेल्या खोल फांट्यांत शिवाजीच्या आरमारापैकीं सुमारें ३० लहान गलबतें होतीं. नौसेनापतीचा [Admiral] **ध्वज**

पांढरा शुभ्र होता.... कारवार प्रांतावर शिवाजीचा अंमल व लोकांची दुःस्थिती... शिवाजीनें मुसलमानांच्या पद्धतीप्रमाणेंच कारवार प्रांतांत शहरें व किल्ला यांवर निराळे सुभेदार नेमिले. या सर्वांवर घोडदळाचा एक सेनापति मुख्याधिकारी म्हणून रहातो. फौजदार, सुभेदार, हवालदार, मुलकी सुभेदार (Civil Governors), सेनापती किंवा लढाऊ धर्माधिकारी (!) अशा विश्वासाच्या आणि अधिकाराच्या जागा तो सर्व **ब्राह्मणांना** किंवा तत्सदृश अशा **पंडीत** (वैद्य?)नांवाच्या थोड्या हलक्या जातीच्या लोकांना मिळतात [?]. हे सर्वचजण सार्वजनिक हित किंवा सर्वमान्य प्रामाणिकपणा याबद्दल बेफिकीर राहून फक्त स्वतःचेंच हित पहातात. या वर्गाच्या स्वार्थी दृष्टीमुळें, शिवाजीच्या अमलाखालीं एवढा मोठा किनारा असला तथापि तेथें व्यापाराची भरभराट होण्याची आशा नको.

सामान्यतः शिवाजीची सर्व प्रजा एक प्रकारें गुलामगिरीचा अनुभव घेत आहे. देसाई लोकांकडे जमिनी दुप्पट धान्यानें जबरदस्तीनें देऊन त्याची वसुली करण्यासाठीं त्यांचा छळ केला जातो. आज कित्येक ब्राह्मण शिवाजीच्या कैदेंत असून, ब्राह्मण हे धर्मांप्रमाणें छळापासून मुक्त असावेत असें असतांहि, तापलेल्या सांडसांनीं त्यांचा छळ होतो. अशा रीतीनें उकळलेला हा पैसा त्यांचाहि असाच छळ होऊन, सुभेदारांना पुढें राजालाच द्यावा लागतो. नंतर पुनः त्यांची नेमणूक होऊं शकते !! देसाई लोक याच तऱ्हेनें आपल्या कुणब्यांना छळतात. अशा रीतीनें **मात्स्य-न्यायानें प्रजेची नागवण** चालू असल्यामुळें फक्त कर्ते पुरुषच नव्हे तर कुटुंबेंच्या कुटुंबें बंधनांत खितपत रहतात !

आदिलशाही अमलांत कर फार हलके होते व लोकहि आबादानींत होते. परंतु बालराजा गादीवर आल्यापासून तेथेंहि अंदाधुंदी माजली आहे. नुकताच बहलोलखानानें **खवासखानाचा खून** करविला. **शिवाजी** व **मोंगल** हे दोघेहि विजापूरच्या राज्यावर टपून बसल्यामुळें आणखीहि कित्येक भयंकर प्रसंग होतील.

फायर २ }
पृ. ३२ इ. }

(१९०३)
उल्लेख

{ श. १५९८-९९
{ इ. १६७६

अंकोला किल्ल्याचा मारा थेट **शिवाजीच्या** मुलखाची [कारवार, फोंडा इत्यादि जिंकल्यानंतर] **दक्षिणेकडील सरहद्द** जी **गंगावली नदी** (Gongole River) तेथपर्यंत होतो.

फायर २ }
पृ. ४३-४५ इ. }

(१९०४)
उल्लेख

{ श. १५९८-९९
{ इ. १६७६

विजापूरचे राज्यांत शिवाजीनें सर्वत्र उलाढाली केल्यामुळें, कोणीं कोणत्या पक्षाचा आश्रय करावा हेंच पुष्कळांना समजत नाहीं. आपल्या जोडीदार **दक्षिण्यांना** 'मी तुमचा

पुढारी, कैवारी आहे. तुमच्या देशाकरितां माझ्याशिवाय कोणी झटणारा नाहीं.' असें तो सांगतो. आणि यदाकदाचित् एकादे वेळीं त्यांना तो लुबाडीत असला तरी, अन्य प्रकारच्या अस्वाभाविक गुलामगिरींतून त्यांना वाचविण्याकरितां त्याला आणि त्याच्या सैन्याला पडणाऱ्या श्रमाचा तो मोबदलाच समजावा असेंहि तो म्हणतो. शिवाजीची ही बेइमानी आणि परदेशी बहलोलखानाचा उद्दामपणा हीं दोन्ही सहन न होऊन ते आतां मोंगलाला मदतीला बोलावितील असें दिसतें.

इकडे शिवाजी त्यांच्या ह्या अनिश्चितपणाचा फायदा घेऊन आदिलशाहींत, इकडे विजापुरांत आणि पलीकडे भागानगरपर्यंत मोकाट संचार करितो. मुख्य सैन्य गोव्यासमोर फोंड्याला ठेवून, आपल्या सैन्याची फक्त एक तुकडी घेऊन तो थेट सुरतेच्या तटापर्यंत जाऊन आला. दुसरी तुकडी संभाजीबरोबर जाऊन भागानगर जाळून लुटून परत आली. तों बहलोलखान आडवा आल्यामुळें विजापूर सोडून आणि तो विजापुरास परत जातांच त्याला चुकवून संभाजी हुबळी, रायबाग, **गदग** इत्यादि बाजारपेठा लुटून गेला. इकडे **शिवाजीची सुरतेकडील दौड** अगदींच फुकट गेली नाहीं. सुरत म्हणजे आपला 'खजीना' आहे आहे असें शिवाजी म्हणतो. तेथें नगराचे दरवाजे बंद केले. परंतु त्याचा नेहमींचा पेशकस त्यांनीं त्याला दिला. मोंगलांचें सैन्य नेहमीं आसपास मैदानावर असल्यामुळें सुरतेपासून तीस मैलांचे आंतील डोंगरी मार्गानें त्याला जावें लागे. त्याकरितां **रामनगरच्या** राजाकडून वारंवार परवानगी लागे व ती तो देई. येतां जातां त्या मार्गाची बारीक माहिती मिळाल्यावर शेवटीं एकदां त्यानें खुद्द रामनगरच घेतलें. ह्याचें एकच कारण तो सांगतो कीं 'माझ्या **तिजोरीचें दार**' रामनगरच्या हातीं देणें मला सोईचें नाहीं !'

ऑर्मे भा. २६८ } (१९०५) { श. १५९८-९९
पृ. १-११ इ. } कोणा डचाचा वृत्तांत { इ. १६७६

(फ्रेंचमधून भाषांतर) १६७६ मध्यें शिवाजीनें १२००० पायदळ व २४००० घोडदळ यांसह गोवळकोंड्यापासून नऊ मैलांवर तळ दिला आणि मोठी रकम न दिल्यास शहर जाळण्याची धमकी दिली. त्यामुळें भिऊन जाऊन, आम्हीं आमच्या मालाचें रक्षण व्हावें म्हणून १००० फ्लोरीन किंमतीचा बदाम, खारीक, द्राक्षें, पिस्ते अशा वस्तूंचा त्याला नजराणा केला. त्याबद्दल योग्य मान करून त्यानें आम्हांला कौल दिला.

गुप्तपणें ठेवलेली अपार संपत्ति हातीं लागावी म्हणून तो सुलतानाच्या व उमरावांच्या वाड्यांवर हल्ला करणार होता. परंतु सुभेदार **मादण्णा** यानें प्रसंग जाणून त्याला हजार दोन हजार डयूकट (होन) चा दररोज जणुंकाय रतीब लावला. नंतर **शिवाजी** सुवर्णानें स्वतःला मढवून घेऊन निघून गेला. शिवाजी १६७६ च्या आगस्टांत परत गेला.

सुलतानाची त्याची भेट झाली तेव्हां राजे लोकांच्या वहिवाटीप्रमाणें त्यानें स्वतंत्र दरवाजानें प्रवेश केला. भेटीच्या प्रसंगीं त्याच्याकरितां विशेष आसन तयार केलें होतें... संभाषण चालू असतांनाच राजवाड्याला त्याच्या ६००० घोडेस्वारांनीं बोल-बोल म्हणतांना वेढा घातला. ते फारच हलके पावलांनीं कोणाला न कळत गोळा झाले ! त्याची प्रजा त्याला जितकी मानते तितकेंच त्याच्यावर प्रेम करते असें ह्यावरून दिसून आलें.

हिस्टॉ-मिसलनी,-जेस्विट लेटर्स. पृ. ८-१० इ.	(१९०६) तंजावर आणि व्यंकोजी.	श. १५९८-९९ इ. १६७६

इ. १६७४ ते ७६ चा **जेस्विटांनीं लिहिलेला वृत्तांतः** [मदुरानायक व तंजावरचा नायक यांचें युद्ध होऊन तंजावर नायकाचा पराजय झाला. त्या वेळच्या वध-सत्रांतून तंजावरच्या वंशापैकीं फक्त एक अंकुर वांचला. पुढें तो मुलगा मोठा झाल्यावर **शिकंदर आदिलशहाकडे** आपलें गाऱ्हाणें घेऊन गेला. आणि दक्षिणच्या राजकारणांत हात शिरकविण्यास ही संधि बरी आहे असें पाहून त्याची तंजावरीं स्थापना करण्याच्या कामावर त्यानें **एकोजी**ची योजना केली.]

मदुरा व तंजावर हीं दोन्हीं संस्थानें आदिलशहाचीं मांडलिक असल्यामुळें, तंजावरच्या सुभेदाराला काढून माजी नायकाच्या मुलाला तें संस्थान देण्याचा हुकूम आदिलशहानें दिला. प्रथम तंजावरच्या रक्षकांनीं एकोजीचा पराजय केला. आणि मागें सरून एकोजी योग्य संधीची वाट पहात राहिला. अशीं दोन वर्षें गेल्यावर मदुरानायक व त्याचा भाऊ तंजावरचा अधिकारी यांमध्यें वैमनस्य आल्याचें त्याला कळलें. तेव्हां त्यानें तंजावरावर अचानक हल्ला केला. पहिल्याच हल्ल्यांत तें त्याच्या स्वाधीन झालें.मदुरा नायकाचीं इतरहि ठाणीं त्यानें घेतलीं. आणि इकडे आदिलशहाच्या आज्ञेनें ज्याची तंजावरीं स्थापना करण्याकरितां तो आला होता त्या वारसाच्या सैन्यापासूनहि तो आपला बचाव करीत राहिला ! एकोजीच्या या यशामुळें मदुरा नायक इतका घाबरून केला कीं, त्रिचनापल्लीच्या किल्ल्यासमोर एकोजी आला असतां त्यानें ल्याला विरोध केला नाहीं. एकोजीनें त्याच्यावर हल्ला केला असता तर तंजावरप्रमाणेंच येथेंहि त्याला यश येऊन मदुरेचें सर्व राज्य त्याला जिकतां आलें असतें. पुढें तंजावरचें सिंहासन तंजावरच्या वारसाला न देतां उलट त्याच्यावर एकोजीनें सैन्य पाठविलें, आणि तंजावर जिंकल्यापासूनच एकोजी सिंहासनाधीश होऊन बसला.

आदिलशहाचा प्रजाजन असलेला एकोजी एकदम राजपदावर अधिष्ठित झाला हें अनेकांना सहन झालें नाहीं; आणि नबाबानें [बहलोलखान] त्याच्यावर मोठें सैन्य रवाना केलें अशी बातमी पसरली. (परंतु ही बातमी खरी असल्याचें प्रत्यंतर पुढील पत्रांत सांपडत नाहीं.)

[पृ. १८]—तंजावरच्या नव्या राज्यकर्त्यांच्या अमलाखालीं ओसाड पडलेल्या जमिनी लागवडीस आणण्याची सुधारणा अमलांत आली. पूर्वी कधींहि आलें नव्हतें असें विपुल पीक या सालांत आलें.

ओ. कॉ. भा. ३७ नं. ४२५३ इ.	(१९०७) सुरत–मुंबई	श. १५९८ पौष व. २ इ. १६७७ जाने. १०

राजापुराविषयीं आपलें मत तितकें वाईट नसतांनाहि तेथील असुरक्षितपणा, तेथील अधिकाऱ्यांचें वर्तन आणि तेथें झालेला अत्यल्प खरेदी-विक्रीचा व्यवहार ह्यांमुळेंच आपण तेथून हालण्याचा विचार केला आहे असें दिसतें. हल्लींची वखार दगडी असून तिला आगीचा धोका नाहीं. नवें घर बांधून तरी (आतांपर्यंत १७००० लारी खर्च होऊन नवें घर उभें होत आहेच.) आहे यापेक्षां अधिक काय सोय होणार ? बरें, निर्यात करण्याकरितां देशांतून आलेला माल लगेच बांधून रवाना होत असल्यामुळेंच **राजापुरांत** तो वीस दिवसांपेक्षां अधिक पडून रहात नाहीं. आणि घांटावर युद्धाची गडबड असल्यामुळें इकडे विक्री मंद होते. आणि आयात माल ठेवण्याची जरूरच पडत नाहीं. तेव्हां तेथें फार माल शिल्लक ठेवूं नये असाच हुकूम देण्यास हरकत नाहीं. जरूरच लागल्यास मुंबई जवळच आहे; तेथून १५ दिवसांत बिनखर्चानें पुरवठा होईल. राजापुरास देशांतून माल आणण्याच्या वेळीं व देशांत माल पोंचविण्याच्या वेळीं आणखी सुरक्षितता ती काय असावयाची ? आपणामार्फत मिळालेलें **राजाचें फर्मान** राजापुरास ठेविलें आहे. शिवाय मी विजापूरच्या **सुलतानाचें व नबाबाचेंहि** फर्मान आणविलें आहे. विजापूरच्या लोकांनीं ह्या मितीपर्यंत आम्हांला काडीचाहि त्रास दिला नसून सर्व प्रकारें सवलतीनेंच वागविलें आहे. शिवाजीच्या फर्मानाची मात्र तितकी खात्री वाटत नाहीं हें आमच्या ध्यानांत आहे. परंतु त्याची भरभराट होऊन त्याचें राज्य वाढत आहे; यामुळें आपल्याच राज्यांत तो आमची लूट करील अशी शंका घेत्रवत नाहीं. त्याच्या मरणानंतर हि काळजी करण्याचें कारण दिसत नाहीं. कारण, त्याच्या मुलास मुकुट (अधिकार?) प्राप्त झालाच असून (His son is allready crowned) तो बराच समंजस दिसतो. तथापि शिवाजीनें राजरोस केलेला तहहि पाळला नाहीं, आणि **अथणीस** आमची लूट केली; त्याच्या प्रधानांनीं आम्हांला त्रास दिला; राजाकडे बक्षीसा (!) ची अनेक वेळां मागणी करूनहि त्यानें तें न दिल्यामुळें कंपनीचें नुकसान झालें; ह्या गोष्टी विसरण्यासारख्या नाहींत. या सर्वांचा पाढा वाचून, यांबद्दल समाधान केलें नाहीं तर आपण बंदर कायमचें सोडून जाणार असें मीं जेव्हां कळविलें, तेव्हां 'पुढें नीट वागूं' असें त्याच्याकडून आश्वासन आलें, आमचें बक्षीस, अथणीला केलेल्या लुटीची भरपाई वगैरे देण्याचें कबूल करून राजाच्या कोणाहि हस्तकानें आम्हांला यापुढें त्रास देऊं नये, अशी खबरदारी घेण्याचें त्यांनीं वचन दिलें. राजानें व अण्णाजी पंडितानें हें आश्वासन दिलें. आणि ह्याचा

ताबडतोब अमलहि झालेला दिसला. स्वतः राजा, पेशवा आणि अण्णाजी ह्यांच्या सहीचे [signed by himself, pisheca (peshwa) and Annajee] सर्व सुभेदार व हवालदार वगैरे अधिकाऱ्यांच्या नांवचे हुकूम सुटले. राजापूरच्या इंग्रजांना काडीचाहि त्रास देतील ते हलालखोरांचे नोकर (निमकहराम ? servants to Haulollcores) होत आणि त्यांच्याकडून कोणतीहि सबब न ऐकतां त्यांच्या अपराधाबद्दल भरपाई करून घेण्यांत येईल; अशा तऱ्हेचे ते हुकूम होते. माझ्याकडे आलेली हुकुमाची नक्कल एका नोकराबरोबर मीं घांटांत पाठवून दिली. त्याबरोबर आमच्या रहदारीचा (योग्य) निकाल झाला. **पन्हाळ्याच्या सरसुभेदारा** (seere subedar) नें तर हुकूमाची योग्य अंमलबजावणी करून, शिवाय माझ्या सांगण्याप्रमाणें बैलाचें भर ओझें न मोजतां ९ मणांप्रमाणेंच हिशेब केला. **बेळगांवाकडे** जाणाऱ्या शिवाजीच्या सैन्याला वाटेंत आमचे १०० बैल दिसले. चौकशी करतांना ते आमचे असल्याचें आढळतांच ह्यांना त्यांनीं कोणताहि त्रास दिला नाहीं; एवढेंच नव्हे तर कोल्हापुरावरून जाईपर्यंत रक्षण करण्याकरितां आपले कांहीं लोक बरोबर दिले. हल्लीं सुभेदार राजापुरांत नसला तरी, आमचा माल परवान्याशिवाय चढविणें उतरणें हीं कामें केवळ आमच्या शब्दानें होतात. पूर्वी सारखी मध्यरात्रीच्या परवलीची दगदग राहिली नाहीं [Without chopping (?) at midnight]. तात्पर्य, ते लोक मोठे धोरणी असल्यामुळें आपला फायदा कशांत आहे हें समजून आतां पूर्वीपेक्षां विचारानें वागतील असा अनुभव आला. चालू व्यवहार अगदीं अल्प आहे. हें अर्थात् खरें आहे. परंतु सभोंवारची युद्धाची गडबड त्याच्या मुळाशीं आहे. आतां **शिवाजी** आणि **नबाब** या उभयतांनीं आपल्या परीनें लुटून हा प्रांत निःसत्त्व करून टाकल्यामुळें यापुढें सैन्याच्या खर्चाला त्यांना येथून पैसा मिळणार नाहीं. आणि त्यांना युद्ध थांबवावें लागेल. तह इतक्यांतच होणार अशा बातम्या येऊं लागल्या आहेतच. कोल्हापुरापासून ७ कोसांवरील संगम नदी (River of sanggaum) पासून समुद्र किनाऱ्यावरील सर्व मुलूख **सुलतानाकडून मोकासा** म्हणून शिवाजीच्या ताब्यांत राहील असें म्हणतात.

हा तह झालाच तर राजापूरची भरभराट होईल. परंतु तह होणें अनिश्चित आहे. पण युद्धहि दीर्घकाल चालण्याचा संभव नाहीं. तथापि **राजापुरची वखार चालू ठेवून** कारवार व राजापूर या दोन्ही वखारी एकाच मुख्याच्या ताब्यांत दिल्यास फायदा होईल. **राजाचें** राजापुराइतकें दुसऱ्या कोणत्याहि बंदरावर प्रेम नाहीं. तेव्हां राजापूरची रचना, मुंबई व सुरत यांचें सान्निध्य, शांतता झाल्यावर माल मिळविण्याची व विकण्याची शक्यता, या सगळ्या गोष्टी लक्षांत घेऊन राजापूर भरभराटीस येईल असें वाटतें.

ऑर्मे ११४-६ } (१९०८) { श. १५९८ पौष व. ८
पृ. २ इ. } मुंबई--सुरत. { इ. १६७७ जाने. १६

देशांत येण्याजाण्याचे मार्ग पोर्तुगीज आणि **शिवाजी** या दोघांमुळें बंद झाले आहेत.

अनेक व्यापाऱ्यांनीं धान्यानें भरलेल्या गुराबा बंदरांत उतरण्याकरितां आणिल्या. परंतु ते फक्त अर्धी जकात देण्यास राजी होते. भरजकात देण्याबद्दल आग्रह धरल्यामुळें ते पुढें चौलकडे निघून गेले.

ओ. कॉ. भा. ३७ } (१९०९) { श. १५९८ पौष व. १४
नं. ४२५८ इ. } सुरत (स्वाली)--कंपनी. { इ. १६७७ जाने. २२

जॉन चाइल्ड आदिकरून **राजापुरास** प्रथम जाऊन राहिले तेव्हां त्यांनीं तेथील व्यापाराबद्दल पुष्कळच आशाजनक चित्र रेखाटलें होतें. परंतु कापड, वेलदोडे वगैरे माल सुरतेपेक्षां स्वस्त पडेल, युरोपीय माल खपेल आणि राजपूरच्या लुटीबद्दल भरपाई मिळेल इत्यादि त्यांचीं सुखस्वप्नें फोल ठरलीं. रायबाग, अथणी, कोल्हापूर इत्यादि पेठा शिवाजीनें लुटून ओसाड पाडल्या. कापसाचे दरहि कडकले. यामुळें खरेदी व विक्री न होतां राजापुरास माल पडूनच राहिला. राजापूरच्या सुभेदाराच्या लबाडीमुळें कराराप्रमाणें करावयाच्या नारळाच्या खरेदींतहि १२००० रु. चा तोटा झाला. ह्या आणि इतर गोष्टींमुळें-शिवाजीनें करार मोडून अथणी वगैरे ठिकाणीं इंग्रजांचा माल लुटणें, त्याच्या अधिकाऱ्यांचें त्रासदायक वर्तन, देशांतील अशांतता वगैरे — राजापूरची वखार मोडून आम्हीं तेथील नोकर परत बोलाविले. इतक्या थराला गोष्टी आल्यावर तरी शिवाजी न्यायानें वागतो किंवा कसें हें आम्हांला पहावयाचें होतें. त्याप्रमाणें ह्याचा चांगला परिणाम होऊन, शिवाजीनें आमच्या तक्रारी मिटविण्याकरितां व राजापूर न सोडण्याबद्दल मन वळविण्याकरितां आपला पुत्र **संभाजी** याला पाठविलें; आणि यापुढें सर्व कांहीं न्यायानें आणि नियमितपणें देण्याचें व करण्याचें वचन दिलें. तेथील सुभेदारानें **चाइल्डला** गलबतावर जाऊं दिलें नाहीं; आणि यापुढें सर्व गोष्टींत योग्य समाधान करण्याची आणि नियमितपणा संभाळण्याची खात्री देणारीं पत्रें इकडे पाठविलीं आहेत. आपलीं गलबतें भरून झालीं म्हणजे ह्या प्रकरणीं तपशीलवार विचार कौन्सिलमध्यें करूं. मध्यंतरीं, वखार चालू ठेवण्याच्या बाजूला जरी याप्रमाणें कांहीं प्रबळ प्रमाणें असलीं, तथापि येथील प्रांतांत अधिक शांतता प्रस्थापित होईपर्यंत तुमची मालमत्ता आम्हीं विशेष धोक्यांत घालणार नाहीं.

[दि] मुंबईला दगडचुन्याचें मोठें कोठार बांधविण्याबद्दलचा आपला दूरदर्शीपणाचा हुकूम पोंचला. जुनें कोठार वाढवून त्यांत सांठा करून ठेवणें अगदीं जरूर आहे. कारण, साष्टी वगैरे पोर्तु० मुलखांतून धान्यसामग्री आणण्याची त्यांनीं बंदी केली आहे.

मोंगल व **शिवाजी** यांच्या युद्धामुळें मोंगलांच्या मुलखांतून पूर्वीसारखा माल मिळत नाहीं. आणि **शिवाजी** आपल्या मुलखांतील **सर्व धान्य किल्ल्यांवर भरून ठेवितो**. तेव्हां मंगळूर व भटकल येथील स्वस्त मिळणारा तांदूळ आम्हांला भरला पाहिजे. **पोर्तु०** व **डच** लोकहि तेथूनच आपली भरती करितात.

भीमजी पारखाच्या इच्छेप्रमाणें आलेला मुद्रक नवे त्याच्या भाषेचे टाईप पाडूं शकत नाहीं. तरी दुसरा तज्ञ इसम पाठवावा. एकंदरींत पहातां देशी भाषेंतील छपाई करणें अशक्य वाटत नाहीं.

ओ. कॉ. भा. ३७ नं. ४२६३ इ.	(१९१०) मुंबई-सुरत	श. १५९८ माघ शु. १ इ. १६७७ जाने. २४

येथें धान्य विपुल असतें; आणि येथून राजापूर, गोवा इत्यादि ठिकाणांना पुरवठा होतो; यामुळें बेटावर सामग्रीचा तुटवडा कधींच पडूं नये अशी खबरदारी घेण्यांत येईल. परंतु मोंगल आणि **शिवाजी** यांच्यांत शांतता नांदत असती किंवा एकट्या मोंगलांच्या ताब्यांत हा मुलूख असता तर थोड्या श्रमांत आम्हीं वरच्या देशांतहि प्रवेश केला असता [!]. तथापि **मोंगल** व **शिवाजी** यांच्या सरहद्दीवर, डोंगरांत, येथून दोन दिवसांच्या मुक्कामावर, **अविरत युद्धाचें क्षेत्रच** आहे. यामुळें व्यापारी लोकांना तेथून जातांना लूट होण्याचें नेहमीं भय रहातें. अर्थात् यांना आपल्या मालाची विल्हेवाट निश्चयानें करण्याचीं साधनें उपलब्ध नसल्यामुळें त्यांनीं मुंबईला माल आणण्याची अपेक्षा आम्हांला करितां येत नाहीं.

[ऑर्म ११४-६ पृ. ७]--प्रत्यहीं अनेक ब्राह्मण कुटुंबें पोर्तुगीजांचा मुलूख सोडून येथें येऊन रहातात. कारण, त्यांना पाद्री लोकांचें भय वाटतें. एकादा इसम मृत्यु पावल्यास हे पाद्री लोक त्याच्या सर्व मुलांना ख्रिश्चन होण्यास भाग पाडतात. प्रमुख ब्राह्मणांपैकीं जे कोणी अद्यापि वसईसारख्या ठिकाणीं राहिले आहेत त्यांनींहि आपलीं घरें मुंबईंतच बांधलीं असून [अशा आपत्तीपासून त्यांचा बचाव होण्याकरितां] तेथेंच आपलीं बायका-मुलें ठेवण्याचा त्यांनीं प्रघात पाडला आहे.

[पृ. ९] **शिवाजीचें** व आपलें न बिनसल्यास याच्याहि तिप्पट माल आपल्याला मिळेल. असें म्हणण्याचें कारण असें आहे कीं, आमचा बराचसा माल आम्हांला या आखाताच्या पलीकडल्या बाजूला तयार करून घ्यावा लागतो. साष्टी नदीच्या मुखापासून सुमारें २० मैलांवर विणकऱ्यांचा मोठा जमाव आहे. त्यांच्याकडून ह्या मालाचा पुरवठा होणार आहे. त्यांनीं **मुंबईंत येऊन रहावें** अशाबद्दल अद्यापपर्यंत आम्ही **त्यांचें मन वळवूं शकलों नाहीं**. कालांतरानें कदाचित् हीहि गोष्ट शक्य होईल.

फॅ. रे. सुरत भा. ८९ } (१९११) { श. १५९८ माघ शु. ३
पृ. ९ (२) इ. } सुरत (खाली)-मुंबई { इ. १६७७ जाने. २६

शिवाजीकडून कांहीं द्रव्य मिळालें कीं नाहीं किंवा त्याची काय व्यवस्था होत आहे हें कळलें नाहीं. अजूनहि तो फसवीत आहे असें दिसलें तर दाभोळ, चौल, कल्याण वगैरे त्याच्या बंदरांतील गलबतें पकडून माल ताब्यांत ठेवावा. लोकांना मात्र सोडून द्यावें. त्याला एकदां अशा प्रकारची समज दिली पाहिजे, म्हणजे भरपाईबद्दल तो कांहीं त्वरा करील !

(खे) फॅ. रे. सुरत भा. ४ } (१९१२) { श. १५९८ माघ शु. ४
पृ. १४ इ. } स्वाली कन्सल्टेशन { इ. १६७७ जाने. २७

जॉन चाइल्डनें राजापूर-प्रकरणीं कांहीं सूचना केल्या; त्यांवरून त्यानें तेथें पुनः जावें असा हुकूम देण्याइतकी आम्हांला आशा वाटली. बक्षिसाच्या संबंधांत त्यानें राजा व सुभेदार यांच्याकडे पुनः मागणी करून काय यश येतें तें कळवावें. म्हणजे त्यानें तेथेंच रहावें कीं निघून यावें याबद्दल पुढील हुकूम देण्यांत येईल.

(खे) फॅ. रे. सुरत भा. ८९ } (१९१३) { श. १५९८ माघ शु. ९
भा. २ पृ. ९, १० इ. } सुरत-मुंबई. { इ. १६७७ फेब्रु. १

चाइल्ड राजापुरास परत गेल्यास **शिवाजी** व त्याचे सुभेदार अधिक सामोपचारानें वागतील अशी आशा वाटल्यावरून त्याला जाण्यास आम्हीं परवानगी दिली.

फॅ. रे. सुरत भा. ८९ } (१९१४) { श. १५९८ माघ शु. ११
पृ. १२ (२) इ. } सुरत-मुंबई { इ. १६७७ फेब्रु. ३

जॉन चाइल्डकडून आम्हांला असें कळलें आहे कीं, **नारायण शेणवी** शिवाजीकडील काम चांगल्या रीतीनें बजावीत नाहीं; त्यांच्या मोठ्या शब्दांनीं घाबरून जातो; आणि आमच्या आज्ञांची अमलबजावणी करण्याच्या ऐवजीं त्याचा कल मराठ्यांकडेच आहे. याबद्दल चाइल्डशीं चर्चा करून नारायण शेणव्याची लबाडी स्पष्ट दिसून आल्यास तुम्हीं त्याला कामावरून दूर करावें. आणि **शिवाजी**कडील सर्व काम चाइल्डकडे किंवा आम्ही सुचवूं त्या इंग्रजाकडे सोंपवावें.

ऑर्म ११४-६ } (१९१५) { श. १५९८ माघ ब. १०
पृ. १६ इ. } मुंबई-सुरत { इ. १६७७ फेब्रु. १७

आमच्या हातांत आहे त्या मार्गांनीं **शिवाजी**कडून उगवणी करून घेत आहोंत. नारायण शेणव्यानें १०० मण सुपारी आणि २०० मुडे भात मिळविलें असून बरेच नारळांचें वचनहि घेतलें आहे. त्याच्या हातून उत्तम व्यवस्था होत नाहीं याची जाणीव आम्हांला

आहे. परंतु त्यानें कांहीं थोडा वसूल केला आहे हें ध्यानांत घेऊन त्याच्याच हातून काय कमाल वसूल होतो तें प्रथम पाहूं. राहिलेला वसूल मग चाइल्डकडून करवून घेऊं. त्यालाहि तें न जमेल तर शिवाजीच्या मुलखांतील सांपडेल तें गलबत धरण्याचा शेवटचा मार्ग आहेच.

लेटर बुक भा. ५ पृ. ४०८ इ.	(१९१६) कंपनी-सुरत	श.१५९८ फा शु. १३ इ. १६७७ मार्च ७

राजापूरची वखार किफायतशीर होण्याचा संभव आहे हें ऐकून आनंद झाला. **शिवाजी**कडून यावयाच्या द्रव्याबद्दल खटपट सोडूं नका. कर्ज जुनें होईल तशी त्याची वसूली कठीण होईल.

[दि. पृ. ४०३] मुंबईच्या टांकसाळीबद्दल इंग्लंडच्या राजाकडून परवानगी मिळाली. ठसे पुढच्या गलबतानें पाठवितों. तोंपर्यंत तुमचें नाणें पाडण्याचें काम पूर्ववत् जोरानें चालू ठेवा.

इकडून पाठविलेल्या दोन मोठ्या पितळी तोफा बेटावर न ठेवितां विकून टाका. बेटावर ठेवण्याकरितां भरपूर लोखंडी तोफा पाठविल्या आहेत. त्यांची किंमत पितळी तोफांच्या एकषष्ठांश म्हणजे फारच कमी आहे. तरी ह्या पितळी तोफा जरूर विकाव्या.

(से) फॅ. रे. सुरत भा. ८९ पृ. १५ इ.	(१९१७) स्वाली-मुंबई	श. १५९८ फा व. ३ इ. १६७७ मार्च १२

ठरल्याप्रमाणें जॉन चाइल्ड राजापुरास जाण्याकरितां निघूं शकला नाहीं. आतां लवकरच निघेल.

ओ. कॉ. भा. ३७ नं. ४२७२ इ.	(१९१८) मुंबई-कंपनी.	श. १५९८ फा व. ११ इ. १६७७ मार्च १९

शिवाजी आणि **मोंगल** यांच्यामध्यें तह झाल्याची विश्वसनीय बातमी आली. घांटाकडून आलेल्या आमच्या कांहीं नोकरांनीं असें सांगितलें कीं **शिवाजी**च्या मुलखांतून मोंगलांच्या मुलखांत जाण्यायेण्यास पूर्ण मोकळीक झाली आहे. असें असेल तर देशाशीं व्यापार वाढविण्याची आम्हांला आशा वाटते. [ऑर्मे ११४-६ पृ. २३]

फॅ. रे. सुरत भा. ८९ पृ. २३ (२) इ.	(१९१९) सुरत-मुंबई.	श. १५९८ फा व. १४ इ. १६७७ मार्च २२

शिवाजीनें ऑस्टिनला कल्याण-भिवंडीवर १००० रु. ची बरात दिली आहे. कंपनीचा पैसा वसूल करितांना स्मरण ठेवून याचाहि पैसा वसूल करावा.

हिस्टॉ. मिसेलनी-जेस्विट लेटर्स } (१९२०) { श. १५९८-९९
पृ. १०-११ इ. } जेस्विटांचा वृत्तांत. { इ. १६७७

इ. स. १६७६ च्या आरंभीं, (पूर्वीचा) आदिलशहाचा सेनापती व हल्लीं तंजावरचा राजा झालेला **एकोजी,** आणि त्रिचनापल्लीस आपल्या दरबारासह रहाणारा **मदुरेचा नायक** ह्यांच्यामध्यें मोठें युद्ध होईल अशी अपेक्षा होती. (पण ती फोल ठरली !)

[पृ. ११]-इ. १६७७ च्या आरंभीं, एकोजीचा वडील भाऊ शिवाजी (Sibaji) उत्तरेकडून मोठें प्रबळ सैन्य घेऊन **जिंजीचें** (Ginja) राज्य जिंकण्याकरितां येत आहे अशी खबर आली. शिवाजी हा मोंगलांचा सरदार असून बेइमानानें त्यानें मोंगलांचा बराच मुलूख आपल्या हाताखालीं घातला होता. शिवाजीच्या मुलखापासून हा प्रांत दोन महिन्यांच्या मार्गावर म्हणजे फारच दूर असल्यामुळें आणि मध्यें **विजापूर** व **गोवळ-कोंडें** या समर्थ मुसलमानी शाह्यांचे अमल असल्यामुळें, शिवाजी इकडे येणें ही गोष्ट सामान्यतः अशक्यच समजली गेली. परंतु लवकरच **जिंजीचा** मोठा किल्ला त्यानें जिंकला आणि अशक्य वाटणारी गोष्ट शक्य झाली ! यावेळीं मुसलमानांमध्यें आपसांत **दुही** होती आणि इतर कित्येक **हबशी लोक** (Abyssinians) त्याला मिळाले; ह्या गोष्टींचा त्याला फायदा झाला. [पृ. १२]-शिवाजीनें जिंजीचें राज्य इतक्या सहज जिंकलें कीं पुढें त्याला कोणीं विरोध केला नाहीं. त्या किल्यावरील हबशी अधिकारी शस्त्रास्त्रांपेक्षा सुवर्णामुळेंच पराजित झाला ! आदिलशहानें नबाबाला दिलेल्या प्रांताचा सुभेदार २ हजार घोडदळ उभारून शिवाजीला अडविण्यासाठीं सज्ज झाला होता. परंतु शिवाजी समोर येतांच त्यानें पळ काढला. पुढें तो व त्याचा मुलगा असे शिवाजीनें कैद केले. पण तो स्वतः पळून गेला. आणि जबर दंड भरून त्यानें मुलाची सुटका करून घेतली.

[पृ. १३]-जुलमी (tyrant) शिवाजीनें जिंजीचें राज्य (मागील पत्रांत लिहिल्याप्रमाणें) घेतल्यावर आणि एक वर्ष वेढा घालून वेलोरचा किल्ला जिंकल्यावर हिंदुस्थानांतील मुसलमानांचें बळ लक्षांत घेऊन, भविष्यत्कालीं त्यांच्या सर्व एकवटलेल्या सामर्थ्याचाहि प्रतिकार करतां यावा म्हणून त्यानें बंदोबस्त करण्यास सुरवात केली. मुसलमानांना ह्या राज्यांतून शिवाजीनें घालवून लावतांना त्यांच्या मशिदींचा अपमान आणि भ्रष्टाकार केला होता ! यामुळें, तूर्त जरी ह्याला कोणतीहि भीति नव्हती [तरी पुढची तर्तूद करणें अवश्य होतें]. आपला उद्देश सिद्धीस नेण्याकरितां निसर्गतःच दुर्गम असलेल्या **जिंजी** किल्ल्याची पुनः त्यानें डागडुजी केली. पहिले तट पाडून नवे तट व बुरुज असे कौशल्यानें बांधले कीं, तें काम हिंदी लोकांचें नसून युरोपीयांचेंच असावें असें वाटतें. कांहीं जुने निरुपयोगी किल्ले पाडून त्यानें कित्येक नवे भुईकोट व डोंगरी किल्ले बांधले. पाश्चात्यांच्या पद्धतीचें अवलंबन करून त्यानें मोठे खडक फोडले, तलाव बांधले आणि युद्धोपयोगी इतर इमारती वगैरे रचना बनविल्या. या कारखान्यांवर त्यानें आपल्या प्रजेकडून जुलूम करून जमविलेली अपार संपत्ति खर्च केली.

[पृ. १४]- शिवाजीच्या जबर करांच्या ओझ्याला कंटाळून पुष्कळ लोक देशत्याग करून गेले. ज्यांना असें जातां आलें नाहीं ते त्याला शाप देऊन मुसलमानांचें राज्य फिरून व्हावें म्हणून इच्छितात ! जिंजी आणि वेलूरचीं राज्यें बेचिराख झालीं आहेत. सर्वांना ठार करून एकट्यानेंच ह्या डोंगर पठारावर त्याला राज्य करावयाचें आहे असें दिसतें !

एकोजीच्या राज्याशिवाय इतरत्र अशा रीतीनें सर्वत्र निर्वैर केल्यावर, शिवाजी एकोजीला भेटण्याचें ठरवून, मदुरानायकाच्या मुलखांतून शांततेनें कूच करून, तंजावरापासून ९ मैलांवर (३ लीग) कावेरीच्या तीरीं येऊन राहिला. बंधुभावानें स्वागत होईल अशा आशेनें एकोजी त्याला तेथें जाऊन भेटला; परंतु बापाच्या खजीन्याचा हिस्सा मिळण्याकरितां लोभाविष्ट होऊन शिवाजीनें त्याला कैद केलें. एकोजीनें मोठ्या धाडसानें पुरांतून पोहून आपली सुटका करून घेतली. आणि हें कळतांच शिवाजीनें त्याचा जिंजीकडील मुलूख काबीज केला......नंतर शिवाजीचा मुलगा [संभाजी] मोठें सैन्य घेऊन उत्तरेकडे होता त्याला मुसलमानांनीं अडचणींत आणल्याचें कळल्यामुळें तो इकडील सैन्य सोडून देऊन उत्तरेकडे गेला. ह्या वेळीं एकोजीनें जिंजींतील मुलूख परत मिळविण्याची खटपट केली. त्याच्या पदरचे मुसलमान हबशांचे शत्रू आणि नबाबाचे पक्षपाती असल्यामुळें त्यांच्या चिथावणीनेंच तो ह्या उद्योगास लागला. भावाच्या सैन्याचा त्यानें पराजय केला. शिवाजीच्या ह्या सैन्याचीं अधिकारसूत्रें एक ब्राह्मण आणि शिवाजीचा सावत्र भाऊ संतोजी अशा दोघांच्या हातांत होतीं. संतोजी हा मोठा शूर व कसलेला सेनापती होता.

एकोजी फारसा विरोध न होतां जिंजी प्रांतांत शिरला. त्याचे सैन्यांत ५।६ हजार घोडदळ होतें. शिवाजीच्या सैन्यांत ९ हजार होतें असें म्हणतात. परंतु शिवाजीच्या जुलमानें चिडलेले एकोजीकडील मुसलमान जीवावर उदार होऊन आल्यामुळें शिवाजीचे लोक त्यांना वचकत होते. उभयपक्षीं मोठे शौर्यानें युद्ध झालें. एकोजीचें पायदळ पळूं लागलें. त्याच्या घोडदळानें शिवाजीच्या लोकांचा पराजय केला. परंतु एकोजी अडचणींत सांपडला आणि त्याचा पक्का मोड झाला. एकोजीचा एक सेनापती आणि लहान भाऊ कैद झाले. दोन्ही सैन्याची मिळून पांच सहा हजार मृत्युसंख्या झाली. एकोजीपेक्षां त्याच्या शत्रूंचेंच नुकसान अधिक झालें. एकोजीचें मुसलमान सैन्य पळत जाऊन कावेरीपार झालें आणि त्यांनीं मदुरानायकाचा आश्रय केला. त्यामुळें संतोजी बरोबरच मदुराच्या सैन्यानेंहि तंजावरला वेढा दिला. मोठी रकम घेऊन तंजावरचा किल्ला व राज्य मदुरानायकाच्या हवालीं करण्याचें संतोजीनें ठरविलें. परंतु पुढें वचनभंग करून एकोजीचा ताबा कायम ठेवून संतोजी परत जिंजीकडे फिरला.

डाग रजिस्टर १६७७ पृ. ९८–९९ इ. एप्रील ११ न्यू. | (१९२१) कॉरोमांडेल– | श. १५९९ चैत्र शु. ९ इ. १६७७ एप्रील १

विजापूरच्या राज्यांतील यादवीचा फायदा घेतां यावा म्हणून, गोवळकोंड्याच्या सुलतानानें, २ लक्ष पायदळ व २० ह. घोडदळ इतकें सैन्य **दिवाण मादण्णा** आणि **सरलष्कर इब्राहीमखान** ह्यांच्या हाताखालीं देऊन, त्यांना विजापुराकडे पाठविलें. विजापुराकडे याच वेळीं **मोंगलांचीहि** स्वार्थी दृष्टि वळली त्यामुळें, त्यांच्या भीतीस्तव हें सैन्य गोवळकोंड्याच्या राज्याच्या हद्दीवरच राहिलें......**एकोजी** राजानें आमच्यावर **नागापट्टण**कडे शस्त्र धरलें होतें. परंतु इ. १६७६ डिसेंबर १ (११ न्यू.) रोजीं त्याचा आमचा तह झाला......एकोजीवर **मदुरेचा** नायक व इतर राजे स्वारी करण्याचें योजीत आहेत, त्याची फिकीर न करितां तो आपल्या प्रजेची सहानुभूती मिळविण्याकरितां आपल्या देशांतच उत्साहानें सुधारणा करीत आहे......

ऑर्म ११४–६ पृ. २९ इ. | (१९२२) मुंबई–सुरत. | श. १५९९ चैत्र शु. ११ इ. १६७७ एप्रील ३

आम्हीं पूर्वी **भिवंडीच्या** विणकऱ्यांबद्दल लिहिलेंच होतें. जरी आम्हीं **त्यांनीं येथें येऊन रहावें अशासाठीं त्यांचें मन वळवूं शकत नाहीं**; तथापि बराच माल पुरविण्याचें त्यांनीं आम्हांला अभिवचन दिलें आहे.

ऑस्टिनच्या हिशेबापैकीं शिवाजीकडून अद्यापि कांहींच भरपाई झाली नाहीं. आणि लवकर कांहीं प्राप्त होईल असेंहि आम्हांला वाटत नाहीं.

मि. चाइल्ड राजापूरला गेला आहे.

[सदर पृ. ३५]– मे २ चे आधीचें पत्र–**सिद्दी**संबूळनें उद्यां निघावें म्हणून आम्हीं लकडा लाविला. परंतु आपली येथें रहाण्याची परवानगी येईल या आशेनें तो आणखी ३।४ दिवस रेंगाळत आहे.

याच बाबतींत मे १८ चें पत्र आहे. आतां उशीर झाला, जातां येत नाहीं, असें म्हणण्याच्या इराद्यानें तो दिवस पुढें ढकलीत आहे !

फॅ. रे. सुरत भा. ४ पृ. ४२ इ. | (१९२३) सुरत कन्सल्टेशन | श. १५९९ चैत्र व. ३ इ. १६७७ एप्रील १०

शिवाजीनें [धरणगांव] लुटलें त्यावेळीं गाड्या फार महाग मिळाल्या, त्यामुळें गाडीभाडें फारच पडलें.

फॅ. रे. सुरत भा. ४ पृ. ४५ इ. | (१९२४) सुरत कन्सल्टेशन | श. १५९९ चैत्र व. ५ इ. १६७७ एप्रील १२

या वर्षी शिवाजी **सुरतेवर येण्याची** लोकांना भिती वाटत असल्यामुळें एक महिनाभर येथें ठेविलेले शिपाई इतक्यांत परत पाठवूं नये असें ठरलें.

डाग रजिस्टर १६७७ पृ. १०५ इ. एप्रील २२ न्यू. | (१९२५) | श. १५९९ चैत्र व. ५ इ. १६७७ एप्रील १२

मदुरेच्या नायकाची स्थिति दिवसेंदिवस वाईटच होत आहे. नुकतेच त्याचे दोन नातेवाईक त्याचा पक्ष सोडून देऊन बऱ्याचशा सैन्यासह विजापूरचा सेनापती **एकोजी राजा** याला जाऊन मिळाले. यामुळें त्याची इतकी भयंकर निराशा झाली कीं तो आत्मघाताला प्रवृत्त झाला. एकोजी राजा दक्षिणेस कॉरोमांडलकडे आपली सत्ता क्रमानें वाढवीत आहे.

(से) फॅ. रे. सुरत मा. ४ पृ. ५३-५४ इ. | (१९२६) सुरत, सुभेदार-सिद्दी संबूळ | श. १५९९ चैत्र व. ८ इ. १६७७ एप्रील १५(!)

मुंबई बेटावर कोणाही परकी लोकांना येऊं देऊं नये असा इंग्रज प्रेसिडेंटला हुकुम आला आहे. परंतु मेहेरबानीखातर तुम्हांला तेथें राहूं देण्याबद्दल त्यानें डेप्यु० प्रेसि०ला कळविलें आहे. तरी तुम्हीं आपले शिपाई कह्यांत वागवून बेटावरील रहिवाशांना त्रास न होण्याबद्दल जपा. तेथेंच रहावयाचें ठरल्यास बेटावर ५० पेक्षां अधिक माणसें न ठेवितां, बाकीचीं तुम्हीं गलबतावरच राहूं द्यावीं.

शि. च. ६६ श. | (१९२७) | श. १५९९ वैशाख शु. ३ इ. १६७७ एप्रील २४

मल्हारि गोसावी याच्या भोवले येथील अर्ध चावरांतून १५ बिघे कराड येथील विश्वनाथभट गिजरे यांस दिले आहेत.

सा. ले. ६२ सु. १०७७ रवल १ | (१९२८) रोखा सी. | श. १५९९ वैशाख शु. ३ इ. १६७७ एप्रील २४

अनाजी दत्तो-तहसीलदार नि॥ शंकराजी निळकंठ राऊ (चांबळी) तुवा शंकराजीस आजार न देतां उठोन येणें.

(से) फॅ. रे. सुरत मा. ८९ पृ. ३३ इ. | (१९२९) सुरत-मुंबई | श. १५९९ वैशाख शु. ८ इ. १६७७ एप्रील ३०

'सिद्दी संबूळला पावसांत राहूं द्यावें' अशी आम्ही तुमच्याकडे शिफारस करावी असें संबूळचें आम्हांला पत्र आलें. परंतु तसें आम्हीं करीत नाहीं. त्याचें उद्दिष्ट **दंडाराजपूर** असतें तर त्याचें सैन्य मुंबईसच घोटाळत राहिलें नसतें. अशा परिस्थितींत तुम्हीं त्याला इतका दीर्घ कालपर्यंत आम्हांला कळविल्याशिवाय राहूं दिलें हें चांगलें केलें नाहीं. बरें, आतां तरी त्याला प्रथम सामोपचारानें असें सांगा कीं, बेटावर त्याला राहूं देणें

म्हणजे इंग्लंडचा राजा, कंपनी व प्रेसि० ह्यांचा हुकूम मोडणें आहे. याकरितां त्यानें एकदम बेट सोडून चालतें व्हावें. हट्टानें तो तसाच राहील तर सिद्दीच्या लोकांनीं बेट सोडून निघावें असा जाहीरनामा काढा. तीन दिवसांपुढें त्याला बेटांतून कोणत्याहि प्रकारची सामग्री विकूं नये, आपल्या घराजवळ येऊं देऊं नये किंवा त्याच्याशीं कांहींच संबंध ठेऊं नये अशी बेटावरील लोकांना ताकीद करा. आम्हीं त्याला बेटावर रहाण्याची परवानगी देणार नाहीं. आणि जर तो याउप्पर राहील तर त्यानें स्वतःच्या जबाबदारीवर रहावें.

डाग रजिस्टर १६७७ } (१९३०) { श. १५९९ वैशाख शु.१०
पृ. १३२ इ. मे १२ न्यू. } सुरत— { इ. १६७७ मे २

बंगालचा **लोभी नबाब शाहिस्तेखान** यानें **नीचपणानें** आमच्याविरुद्ध असत्य तक्रारी दरबाराकडे केल्यामुळें त्यांच्या निराकरणार्थ जानेवारी ८ (१८ न्यू.) रोजीं दिल्लीकडे एक व्यापारी पाठविला.

(से.) फॅ. रे. सुरत भा. ८९ } (१९३१) { श. १५९९ वैशाख शु.१५
पृ. ३५–३६ इ. } सुरत–मुंबई. { इ. १६७७ मे ७

मोगल सुभेदारानें विनंति केल्यावरून वरील [ले.१९३०] हुकूम बदलून सिद्दीला मुंबईला रहावयास परवानगी दिली. परंतु त्याच्या लोकांवर बरींच बंधनें घातलीं.

फॅ. रे. फोर्ट सेंट जॉर्ज } (१९३२) { श. १५९९ वैशाख व. ३
भा. १ पृ. ७ (४) इ. } फो.सें.जॉर्ज कन्सल्टेशन { इ. १६७७ मे ९

शिवाजी (किंवा त्याचा मुलगाहि असेल) **गोवळकोंड्याच्या** नोकरींत सामील झाला. तो २० ह. घोड० व ४० ह. पाय० घेऊन जिंजीवर चालून जात आहे. त्याच्या सैन्याच्या अघाडीचे सुमारें ५ ह. घोडेस्वार येथून ९ व ८ कोसांवर (legues Gentu) असलेल्या **त्रिपती** व कलस्त्रीवरून गेले (Trippaty and calastry). येथून ४ कोसांवर असलेल्या **कांजीवरम्**ला ते आज रात्रीं येतील. एवढी मजल एका रात्रींत जाण्याचें त्याच्या स्वारांच्या अंगवळणीं पडलें आहे.

त्याच्या स्वाऱ्यांचा सर्वत्र कटु अनुभव आला असल्यामुळें आम्ही बंदोबस्ताकरितां ५० ख्रिस्ती व १०० हिंदी शिपायांची भरती करीत आहोंत. हिंदी शिपाई, त्याच्या सैन्यांत संचार करून त्याच्या हालचालींची बातमी मिळविण्याकरितां आणि आमच्या ब्राह्मणाबरोबर राहून वेळींच खबर काढण्याकरितां, वाढवावयाचे आहेत. **शिवाजी**चे बेत वरवर दिसतात त्यापेक्षां दूरवर पोंचणारे आहेत अशी शंका येते. तेव्हां त्याच्या हालचाली पाहून धोरण ठरवावें.

टिपण—येथून अडीच कोसांवर **पेडा पोलम्** येथें **शिवाजीचें** सैन्य येऊन थोडा वेळ राहिलें आहे. [फोर्ट सें. जॉर्ज डायरी १, १६७२--७८ पृ. ११२--१३].

ओ. कॉ. भा. ३८ } (१९३३) { श. १५९९ वैशाख व. ४
नं. ४२८३ इ. } सुरत व मलबार किनारा { इ. १६७७ मे १०

शिवाजी सुरतेजवळ आल्याची दाट वदंता आहे. बलसाड व चिखलीच्या आसपास फिरणाऱ्या त्याच्या लहानशा सैन्यामुळें सर्व देशांत गोंधळ झाला असून गणदेवीचे लोक त्याच्या भीतीमुळें सुरतेंत आश्रयार्थ आले. सुभेदारानें ५०० शिपायांची नवी भरती करून किल्ल्यांत जावयाच्या पुलावर कडेकोट बंदोबस्त केला. कोणाचाहि पुरा तपास केल्याशिवाय त्याला आंत सोडीत नाहींत; कारण शिवाजीचे पुष्कळच साथीदार सुरतेंत असावे असा त्याचा वहीम आहे.

फॅ. रे. फो. सें. जॉर्ज } (१९३४) { श. १५९९ वैशाख व. ८
भा. १ पृ. ७ (४) इ. } फो. सें. जॉर्ज कन्सल्टेशन { इ. १६७७ मे १४

शिवाजी राजाकडून निरोप आणि पत्रें घेऊन एक ब्राह्मण आणि दोन इसम आले. त्यांत त्यानें कांहीं पुष्टिकारक रत्नें (cordiall stones) व विषावर उतारे (counterpoisons) मागितले होते. आम्हीं शहरांतून खालील वस्तु विकत घेऊन त्या, एक मित्रत्वाचें पत्र, लहानसा नजराणा आणि कांहीं आमच्या बागेंतील फळफळावळ अशीं आमच्या दूताबरोबर देऊन त्याच्याकडे पाठविलीं. त्याचा दूत महादोजी पंतलू यास ४ वार कापड व चंदनाचीं ४ पात्रें (Veece ?) दिलीं. शिवाजीनें पत्रांत जिनसांच्या किंमतीबद्दल आकार करण्यास लिहिलें होतें. तथापि इतक्या क्षुद्र गोष्टींची किंमत घेणें आम्हांला बरें वाटलें नाहीं. कारण, तो एवढा मोठा इसम असून त्याचे मित्रत्वाचें आज कंपनीला महत्त्व असून पुढेंहि त्याचें सामर्थ्य वाढेल त्याप्रमाणें तें वाढणार आहे. विशेषतः त्याचें सैन्य येथून २ ते ५ कोसांच्या अंतरावर असून त्याच्या मनांत आल्यास तो केवळ एका दिवसांत येथें येऊन पोंहोचूं शकेल.

शिवाजीला पाठविलेल्या औषधांच्या किंमती पुढें दिल्या आहेत. एकंदर किंमत ६० होन व २० फनाम झाली [डायरी भा. १ पृ. ११३].

स. १३३ ले. २० } (१९३५) { श. १५९९ वैशाख व. १२
श. } { इ. १६७७ मे १८

रा. शिवाजी राजे— पुरुषोत्तम सोमयाग भट (बुरडी).

आम्ही श्रीस ४२० होन नेम केला. पैकीं श्रीस ३० व तुम्हास ३० अन्नछत्रास ३६० होन. तुम्ही कांहीं वचनार्थ न करणें.

फो. सें. जॉर्ज डायरी भा. १ } (१९३६) { श. १५९९ वैशाख व. १३
१६७२ ते ७८ पृ. ११४ इ. } { इ. १६७७ मे १९

गेलीं कित्येक वर्षें आपण अडचणींत आहोंत. आतां ढग अधिकच वाढत आहेत. गोवळकोंड्याच्या राजाशीं झालेलें शिवाजीचें खलबत आम्हांला फार भीतीदायक वाटतें.

फॅ. रे. फो. सें. जॉर्ज, भा. २७ } (१९३७) { श. १५९९ ज्येष्ठ शु. ४
पृ. १२ इ. } शिवाजीराजा-ग. लँग्हॉर्न { इ. १६७७ मे २५

आपलें पत्र सुवेळीं पोंचलें. मालदीव नारळ, जहरी मोहरा (bezoar or beazar) इतर पुष्टयौषधें वगैरे पोंचलीं. आनंद झाला. **महादोजी**कडून आपलें चातुर्य वगैरेबद्दल कळून सर्व लोकांशीं आपण सलोखा ठेवितां हें ऐकून समाधान झालें. तरी आणखी नारळ वगैरे पाठवून किंमती कळविण्यास संकोच धरूं नका. या पत्राबरोबर आपल्याकरितां मानपान पाठविले आहेत त्यांचा स्वीकार करावा. [हें पत्र **शिवाजी** राजा वेलूरला वेढा घालीत होता त्या वेळीं त्यानें लिहिलें. (Letter from his Leaguer at Raja Vealour), फो. सें. जॉर्ज डायरी भा. १ पृ. ११५]

फॅ. रे. सुरत भा. ८९ } (१९३८) { श. १५९९ ज्येष्ठ शु. ५
पृ. ४०-४१ इ. } सुरत-मुंबई { इ. १६७७ मे २६

गेलीं ४ वर्षें सुरतेला शिवाजीचें सारखें भय वाटत आहे. कारण, त्याचें सैन्य **नवसारी** व **गण**देवी येथें सुरक्षितपणें राहिलें असून, मुख्य अधिकाऱ्यांनीं तेथील देसायांच्या घरांत वस्ती केली आहे. तेथील देसाई, आपलीं कुटुंबें घेऊन सुरतेला पळून आले. काजी व इतर अमलदारहि तसेच पळाले. **शिवाजी**चे लोक बाहेरच्या प्रांतांत खंडणी वसूल करितात एवढेंच नव्हे तर त्याचे ४०।५० घोडेस्वार येऊन ते सुरतेचे सुभेदार व बादशाही अमलदार यांच्याकडेहि राजरोसपणें रसद आणि खंडणीची मागणी करितात. **शिवाजी**चें सैन्य दररोज थोडें थोडें वाढत असून खुद्द सुरत शहरांत त्याचे कांहीं सैनिक गुप्तपणें राहिलेले आहेत असें खात्रीलायक समजतें. यामुळें किल्लेदारानें पहाऱ्यावर ५०० सैनिक वाढवून रात्रंदिवस कडक पहारा ठेविला आहे. फ्रेंच, डच व आम्ही कंपनीची मालमत्ता व स्वतःचें स्वातंत्र्य कसें राखतां येईल या फिकिरींत आहोंत. **शिवाजी** शहरावर अकस्मात् चालून आला तर त्याला **आमच्याकडून विरोध होणें अशक्य** आहे. यामुळें त्याच्याशीं जितकें सामोपचारानें रहातां येईल तेवढें रहाण्याशिवाय गत्यंतर नाहीं. मुंबई व राजापूर येथें त्याचे आपले संबंध मित्रत्वाचे असल्यामुळें येथेंहि आम्हांला तो बरें वागवील अशी आशा आहे. परंतु तितका विश्वास न येऊन आमच्याविषयीं त्याचें मन कसें आहे हें पहाण्याकरितां आम्ही सेनापती **मोरोपंडिताला** सलोख्याचें पत्र लिहिलें आहे. 'तुम्हीं शहरावर वाटेल त्या तऱ्हेचा हल्ला केला तथापि तुमच्या लोकांनीं आमची वखार, लोक, दलाल किंवा नोकर यांना त्रास देऊं नये; असे हुकूम **त्रिंबकजी** वगैरे अधिकाऱ्यांस द्यावे; आणि प्रसंगीं दाखविण्यासाठीं उपयोगी पडावे म्हणून असे हुकूम (प्रत) तुम्हीं आमच्याकडेहि पाठवावे.' असें त्यांत सुचविलें आहे. त्या पत्राच्या नकला पाठवीत आहों. त्या नारायण शेणव्याकडे पाठवूं नयेत. त्याचा कारभार दीर्घसूत्री आहे. कॅप्टन् केग्विन् आणि खवास (Kaus) मोदी यांच्याबरोबर पत्रें पाठवून त्वरेनें उत्तर आणवावें.

......**शिवाजीला** देखील त्याच मजकुराचें पत्र पाठविण्याचें आमच्या मनांत आलें आहे. पूर्वी केग्विनला पाठविण्याबद्दल लिहिलें. परंतु थोड्या धोरणी अशा एखाद्या सार्जेंटलाहि पाठवून हें काम थोडक्यांत भागेल असें वाटतें. खवास मोदीनें मात्र शक्य ती माहिती मिळवून खुद्द **शिवाजी** पावसांत कोठें रहाणार, **मोरोपंत** छावणीला कोठें जाणार इत्यादि बातमी मिळवून कळविण्याची खबरदारी घ्यावी.

ओ. कॉ. भा. ३८ } (१९३९) { श. १५९९ ज्येष्ठ शु. १०
नं. ४२८३ इ. } सुरतेची हकीकत { इ. १६७७ मे ३१

शिवाजीचें सैन्य आपल्या देशांत जाऊन राहिल्यामुळें हल्लीं शिवाजीबद्दलची भीती कमी झाली आहे.

डाग रजिस्टर १६७७ } (१९४०) { श. १५९९ ज्येष्ठ व. ६
पृ. १८१ इ. जून २० न्यू. } कॉरोमांडेल— { इ. १६७७ जून १०

विजापूरकर व शिवाजी यांच्या युद्धामुळें गोवळकोंडा-दरबारांत थोडी चलबिचल झाली. **महमद इब्राहीम** सैन्यासह अजून बाहेर लढाईच्या तयारीनें आहे.

फॅ. रे. मुंबई. भा. २ } (१९४१) { श. १५९९ ज्येष्ठ व. ९
पृ. ६–७ (३) इ. } मुंबई कन्सल्टेशन { इ. १६७७ जून १३

सुरतकरांचें २६ मेचें पत्र आल्याप्रमाणें मोरोपंडिताच्या नांवचें पत्र घेऊन **रायगडला** त्वरेनें जाण्यासाठीं खवास मोदीला पाठवावें. त्यानें लगेच जाऊन सुरते-जवळील सैन्याच्या सेनापतीकरितां मोरोपंताचे हुकूम घेऊन प्रेसि०ला देण्याकरितां जलद परत यावें.

फॅ. रे. फो. सें. जॉर्ज } (१९४२) { श. १५९९ ज्येष्ठ व. १२
भा. २७ पृ. १४–१५ (३) इ. } { इ. १६७७ जून १६

वीर राघवय्या, गोवळकोंडा—ग० विल्यम लँग्हॉर्न.

शिवाजी राजा, **शेख मिनाजू** (Minaju), **सिद्दी मसाऊद**, शेख **मखटूम** (Mocktoom) **गसाल कोटी तिमय्या** वगैरे मोठे असामी अनेक देशांहून येथें जमा झाले आहेत. त्यांची सरबराई करणें, त्यांना भेटी देणें व त्यांची रवानगी करणें इत्यादि कामांत **मादण्णा** ब्राह्मण गुंतून गेल्यामुळें ह्यां [things] ची रवानगी होण्यास इतका उशीर झाला. आतां पूर्वीप्रमाणें **कारभार** कोणा एकाचे **हातांत नसून ह्या सर्व मातबर असाम्यांच्यावर आम्हांला अवलंबून राहिलें पाहिजे** हें आपल्या लक्षांत आलेंच असेल.

कॅ. रे. फो. सें. जॉर्ज भा. १ पृ. १० (४) — (१९४३) फो. सें. जॉर्ज कन्सल्टेशन — श. १५९९ ज्येष्ठ व. १४ इ. १६७७ जून १८

शिवाजीमहाराजाचें वेलूरच्या वेढ्यांतून २५ मेचें पत्र आलें. त्यांत त्यानें आणखी जिनसा मागितल्या; त्या खटपटीनें मिळवून, आपला वकील रामण्णा याच्याबरोबर शिष्टाचाराचें पत्र देऊन पाठविल्या. जिनसांच्या किंमती न मागतां त्याला ह्या वस्तु नजर केल्या. कारण, त्याचें सामर्थ्य एकसारखें वाढत आहे. गोवळकोंड्याच्या मुलखांत त्याचा इतका अमल चालतो कीं, राजाला मिळावयाचा कर तो सर्व आपल्या लोकांकडून वसूल करवितो. आणि राजाचे 'अवलदार' व इतर मोठे अधिकारी आहेत त्यांना आपल्या मनाप्रमाणें शासन करितो. पाठविलेल्या जिनसांची यादी पुढें दिली आहे. किंमत ५२ होन २१ फनाम. [डायरी भा. १ पृ. ११५]

डाग रजिस्टर १६७७ पृ. १९४ इ. जून २८ न्यू. — (१९४४) सुरतेची बातमी — श. १५९९ ज्येष्ठ व. १४ इ. १६७७ जून १८

एक वर्षापूर्वी शिवाजीनें जिंकलेल्या **रामनगरच्या** किल्ल्यांत (सुरतेपासून २५ मैल) त्याचें १० ह. सैन्य आल्यामुळें सुरतेला लुटीची भीती वाटली. त्या सैन्यानें शहरावर हल्ला करण्याची भीती दाखवून १० ह. रुपये उकळले असें म्हणतात. **डच कौन्सिलर अबेमा** यानेंहि आपल्या मालाचा बंदोबस्त केला.

ओ. कॉ. भा. ३७ नं. ४२६६ इ. — (१९४५) फो. सें. जॉर्ज-कंपनी. — श. १५९९ ज्येष्ठ व. ३० इ. १६७७ जून १९

मोंगलांच्या व विजारपूरकरांच्या हद्दींत मुलूख जिंकून व लूट करून प्रबळ आणि प्रसिद्ध झालेला **शिवाजी**, आतां १६ ते २० हजार घोडदळ व कित्येक ह. पायदळ घेऊन, गोवळकोंड्याच्या सुलतानाच्या म्हणजे **मादण्णाच्या** बोलावण्यावरून इकडे आला आहे. जिंजी, वेलूर, पमनगोंडा आणि पोर्टोनोवोपर्यंतचा कर्नाटकाचा भाग विजापूरकरांच्या ताब्यांतून घेण्यासाठीं त्यांनीं शिवाजीला **सेनापतिपद** दिल्यामुळें एका अर्थानें त्याला ह्या प्रांताचें स्वामित्वच दिल्यासारखें झालें आहे. कारण, त्याला विरोध करण्यास समर्थ असें गोवळकोंडेकरापाशीं सैन्यच नाहीं. आतांपर्यंत दोनदां त्याला जरूर असलेल्या 'जहरी मोहरे' वगैरे ११२ हिंदी होनांच्या मालाचा आम्हीं नजराणा केला. राजापूर व कारवार येथें त्याच्या मुलखांत आपल्या दोन वखारी असल्यामुळें सलोख्याची अगदीं पहिली संधि घ्यावी म्हणून आम्हीं इतकें केलें. पहिला नजराणा त्यानें मोठ्या गौरवानें स्वीकारिला. आमचा ब्राह्मण वकील त्याच्या सैन्याबरोबर किंवा विशेषतः गोवळकोंड्याचा सरलष्कर **मिर्झा महमद अमीन** याच्याबरोबर आहे. त्याच्याकडून, दुसऱ्या नजराण्याबद्दल अद्याप कांहीं कळलें नाहीं. सरलष्कर अमीन

हा आमचा दोस्त आहे. १ ह. घोडदळ व ४ ह. पायदळ घेऊन तो शिवाजीच्या बरोबर स्वारींत असतो.

मध्यंतरीं आपला भाऊ **एकोजी** याच्या मुलखांतील इंग्रजांची **टिमेरी** (Timmery) येथील वखार लुटून त्यानें २००० होन किंमतीचा माल नेला अशी अनिष्ट खबर आली. (बहुधा भरपाई करतांना तो अनेक सबबी सांगेल.) आणखी अशी बातमी आली आहे कीं, ह्या प्रांतांत सगळीकडून आणि विशेषतः किनाऱ्यावरील शहरांकडून २लक्ष होन कर्ज काढण्याबद्दल त्यानें पत्रें लिहविलीं आहेत. पुलिकत आणि हें शहर यांच्या वांट्यास प्रत्येकीं ५ ह. रुपये आले आहेत. ही रकम उभी होण्याचा संभव नसल्यामुळें ह्या सबबीवर त्याला आपला जुना खेळ (लूटमार इ०) करण्यास चांगलें फावणार आहे. त्यांतून अलीकडे, जिंजी आदिकरून जिंकिलेला सर्व मुलूख तो आपल्या हाताखालीं दाबून बसल्यामुळें, त्याचें व **गोवळकोंडेकरांचें** वैमनस्य येऊन गोवळकोंडेकरांनीं त्याचा दररोजचा **३००० होनांचा तनखा** देण्याचें बंद केलें आहे; [यामुळें त्याला अशा मार्गांनीं पैसा उभा केलाच पाहिजे!] पण अजून चालू असलेल्या वेलूरच्या वेढ्यामुळें, किंवा **शीरखानाच्या** विरोधामुळें त्याला अडकून पडावें लागलें अथवा दक्षिणेकडील नायक लोकांच्या बाजूला कांहीं उद्देशानें तो सटकला [तर मात्र तसें (लुट इ०) कांहीं होणार नाहीं]. याप्रसंगीं सावकार लोक शक्य तितक्या त्वरेनें देशत्याग करीत आहेत. कारण, येथून दोन अडीच कोसांच्या टापूंतील व तो जेथून गेला त्या सर्व प्रांतांतील सावकारांची त्यानें खडानखडा माहिती मिळविली आहे. बंदोबस्ताची शक्य ती खबरदारी घेऊन आम्हीं (कांहीं) ब्राह्मण बातमी देण्याकरितां फिरते ठेविले आहेत. एकंदर पुढचा काळ थोडा संकटाचा दिसतो.

फॅ. रे. फो. सें. जॉर्ज भा. २७ पृ. २८ (३) इ. } (१९५६) फो. सें. जॉर्ज-शिवाजी. { श. १५९९ ज्येष्ठ व. ३० इ. १६७७ जून १९

राजे साहेबांचें पत्र व तश्रीफा पोंचल्या. आपण कृपाळू होऊन 'जहरी मोहरे' इ० स्वीकारले. ह्या गौरवाला पाठविलेल्या वस्तु पात्र नव्हत्या. त्या वस्तूंबद्दल आपल्याला इतकी आवड आहे असें पाहून, थोडा उशीर लागला तथापि आम्हीं आपल्याकरितां त्या वस्तु मिळवूं शकलों ही सुदैवाची गोष्ट आहे. वस्तु आणि त्यांच्या उपयोगाबद्दलची माहिती ब्राह्मणाच्या हातीं पाठविली आहे. राजेसाहेबांना हें अल्पोपायन देत आहोंत त्याचा स्वीकार करावा. आपल्या मुलखांत कंपनीच्या वखारी असल्यामुळें आपली भरभराट होवो अशी आम्हीं इच्छा करितों. आमच्या हातून होईल त्या प्रकारें आपल्या उपयोगी पडण्याची संधि मिळण्यांत आम्हांला आनंद वाटतो.

महाराज, राजेसाहेबांचा अत्यंत नम्र, व आज्ञाधारक सेवक,

विल्यम लँघॉर्न.

ऑर्म ११४-६ } (१९४७) { श. १५९९ आषाढ शु. ७
पृ. ३७ इ. } मुंबई-सुरत { इ. १६७७ जून २७

पाऊस फारच पडल्यामुळें शिवाजी व मोरोपंडित यांकडे पाठवावयाचीं पत्रें गेलीं नाहींत. चाइल्डच्या पत्रावरून असें समजतें कीं, **शिवाजी** गोवळकोंड्याच्या सुलतानाच्या एका किल्ल्यांत असून तेथेंच पावसांत छावणी करणार आहे. पावसाळा संपताच कर्नाटकावर त्याची स्वारी होईल असें म्हणतात. बरेच दक्षिणी उमराव त्याला सामील असून, कदाचित् **बहलोलखान** आणि **शिवाजी** यांचाहि सर्व कांहीं उभयतांनीं वांटून घेण्याचा **करार** झाला असावा, अशी लोकांची समजूत आहे.... **मोरोपंडित** नुकताच उत्तरेकडे **साल्हेरीस** शिबंदी पाहण्यास गेला होता. आतां ह्या बाजूनें तो रायरीस गेला आहे. तेथेंच तो खात्रीनें सांपडेल.... दुसरा कोणी सार्जंट न मिळाल्यामुळें केग्विन व कृष्ण शेणवी यांनाच पत्रें वेऊन पाठवीत आहोंत. शिवाजीच्या देशाची परिस्थिति आणि त्याचीं सैन्यें कोठें कोठें छावणी करून राहिलीं आहेत, ह्याची पक्की चौकशी करण्याबद्दल आम्ही त्यांना हुकूम देऊं.

[पृ. ४०] **भट्टी**च्या दोनतीन ब्राह्मणांनीं कुलवंत कैदी मिळवून देण्याचें **सिद्दी**ला वचन दिल्यावरून सिद्दीनें मान्यता दिली. परंतु आपण नामानिराळे राहून त्यांना आपल्या होडया किंवा माणसें न देतां सिद्दीनें त्याच्याकडून ४ ब्राह्मण, मुंबईतील होडी व शिपाई यांच्या सहाय्यानें, कैद करून आणविले. हे चार ब्राह्मण तेथील प्रमुख नागरिक होते. त्यांना सिद्दीच्या गलबतावर ठेवण्यांत आलें. थोडक्याच दिवसांत **चौल**च्या सुभेदाराकडून या शेजारधर्माविरुद्ध वर्तनाबद्दल तक्रार येऊन, हे कैदी परत न दिल्यास किनाऱ्यावरून मुंबईंत कांहीं माल न पुरविण्याची व मित्रत्व मोडण्याची त्यानें दहशत घातली. आम्हीं सिद्दीकडून ते कैदी सोडवून परत पाठविले; आणि बेटावरील ज्या लोकांनीं तें काम करण्यांत मदत केली होती त्यांना पकडून शिक्षा दिल्या.

फॅ. रे. फो. सें. जॉर्ज, } (१९४८) { श. १५९९ आ. शु. ७
भा. २७ पृ. १६ इ. } शिवाजीच्या छावणीचें वृत्त { इ. १६७७ जून २७

ब्राह्मण वर्धापाचें पत्रः—२६ तारखेला रात्रीं **शीरखान** त्रिवादीला होता. तेथून तेवनापट्टणकडे पळून जाण्याच्या त्याच्या बेताची खबर कळून, शिवाजीकडे कांहीं घोडेस्वार त्याच्या पाठलागावर निघाले. वाटेंत अकलनायकाचें अरण्य होतें त्यांत शीरखान व त्याच्या पाठोपाठ मराठेहि शिरले. शीरखानाचे ५०० स्वारांनीं खडे राहून शिवाजीच्या लोकांना तोंड दिलें. रात्रीं दोन तास चांगलें युद्ध झालें. पुढें चंद्र बहुतेक खालीं गेला होता तोंच **शीरखान** कांहीं घोडे, हत्ती वगैरे घेऊन त्या अरण्यांतून दक्षिणेकडे गेला. शिवाजीच्या लोकांनीं आणखी पाठलाग केला. शिवाजी स्वतः तेवनापट्टणच्या दक्षिणेस एक कोसावर छावणी करून आहे. त्याच्या लोकांनीं वरील अरण्यांत शीर-

खानाचे २७० घोडे, २० उंटें, कित्येक बैल, तंबू, नगारे वगैरे पकडले. शीरखानाचा पाठलाग करीत गेलेले स्वार अजून परत आले नाहींत. शीरखानाचा सासरा अजून त्रिवाडीला टिकाव धरून आहे. त्यानें अद्याप किल्ला हवालीं केला नाहीं. शिवाजीनें बाबासाहेब, कांहीं घोडदळ, सवारुमवार [?] आणि नासीरमहृदमखानाचे कांहीं स्वार असे तेथें ठेविले आहेत. इतर हकीकत आपल्याकडे येंगाणा ब्राह्मण पाठवील....शीरखानाच्या पाठलागावर गेलेले स्वार परत आले असून त्यांनीं शीरखानाचे २०० घोडे व २ हत्ती पकडून आणले. एकूण शीरखानाचे सुमारें ५०० घोडे त्यांनीं धरले. शीरखान फक्त १०० स्वार घेऊन बोनगिरीवर पळाला. तिकडेहि शिवाजीचे स्वार त्याचा पाठलाग करीत आहेत.

फॅ. रे. फोर्ट सें. जॉर्ज भा. २७ } (१९४९) { श. १५९९ आषा. शु. १४
पृ. १६ इ. } वीरराघवय्या–ग० लॅंग्हॉर्न { इ. १६७७ जुलै ३

गोवळकोंडयाच्या ब्राह्मणाचें पत्रः—

दिलीलखान, बहादरखान आणि बहलोलखान हे आतां गुलबर्ग्याच्या (calubariga) किल्ल्याजवळ एकत्र जमले आहेत. येथील लोकांनींहि आपले सेनापती तिकडे पाठविले. सरलष्कर (Sharlaskareen) महमद इब्राहीम हा तेथेंच होता. त्याला अधिक खबरदारी घ्यावी असा हुकूम दिला आहे. सिद्दी मसाउद, क [ग] सलाकोटी, तिमिनाजा आणि सैद मोकतुम हे सर्वजण सुलतानाला मदत करण्याकरितां तिकडे गेले आहेत.

फॅ. रे. सुरत भा. ८९ } (१९५०) { श. १५९९ आषाढ व. २
पृ. ४६–४७ (२) इ. } सुरत–मुंबई { इ. १६७७ जुलै ६

रायरीपर्यंत पत्रें घेऊन जावयाचीं तर केग्विनपेक्षां कृष्ण सेणवी (Coxsunay) किंवा अन्य कोणाला पाठवून कमी खर्चात काम भागतें काय पहा. पूर्वी आम्हीं लिहिलें तेव्हां **मोरोपंडीत कल्याण-भिवंडी** किंवा मुंबईच्या जवळपास कोठें तरी होता असें आम्हांला वाटलें होतें.

(से) फॅ. रे. सुरत भा. ८९ } (१९५१) { श. १५९९ आषाढ व. २
पृ. ४९ इ. } सुरत–मुंबई. { इ. १६७७ जुलै ६

सिद्दीसंबूळला काढून बादशाही आरमाराच्या अधिकारावर आतां **सिद्दी कासमला** नेमिला आहे. कासम दंडाराजपुरीला आहे. **साबंद कोळी** याचेबरोबर १५० लोक देऊन त्याला मुंबईच्या आरमाराचा ताबा घेण्याकरितां पाठविण्याबद्दल त्यानें आपला वकील महमद हसन याला कळविलें. साबंद व त्याचे लोक यांना चांगलें वागविण्याबद्दल हसननें आम्हांला विनंति केली आहे. तरी त्यांना योग्य प्रकारें वागवावें. मात्र बेटावर दंगा करूं देऊं नये.

ऑर्म ११४-६ } (१९५२) { श. १५९९ आषाढ व. ७
पृ. ४३ इ. } मुंबई-सुरत { इ. १६७७ जुलै ११

प्रेसि० ऑंजिअर [३० जूनला] मेल्याबद्दल खेद. व **प्रेसि० रोल्ट** अधिकारावर आल्याबद्दल समाधान.

फारच पाऊस पडल्यामुळें केग्विनला **रायरी**कडे पाठविणें शक्य झालें नाहीं. आतां मरहूम प्रेसिडेंटच्या नांवचीं पत्रें पाठविण्यांत अर्थ नाहीं असें वाटतें. आपण नवीन पत्रें लिहिणार किंवा कसें तें कळवावें.

फॅ. रे. फो. सें. जॉर्ज भा. २७ } (१९५३) { श. १५९९ आषाढ व. ११
पृ. १७-१८ इ. } नेलोर रमण्णा-ग० लँग्‍हॉर्नें { इ. १६७७ जुलै १६

शिवाजीच्या छावणींतून पत्रः--मी प्रथम **वलीगंडपूरम्**कडे जात असतांना वाटेंतच शीरखानाचा पाठलाग करीत शिवाजी **पुनामली** मार्गानें गेल्याचें कळल्यामुळें तिकडे वळलों. पुढें शिवाजी थेट बोनागिरीपट्टमला असल्याचें समजल्यावर तेथें जाऊन आपलें पत्र व वस्तु दिल्या. पहिल्या नारळाशीं ताडून पाहून सर्व वस्तु चांगल्या आहेत असें आढळून त्याला फार समाधान झालें. ही व इतर हकीकत पट्टमार (?) ब्राह्मण कृष्ण याच्या मुखानें कळविली आहे. शिवाजी राजाचें सैन्य आतां कावेरीच्या कांठीं **तिरुमडवाड्यास** आहे. ३ यार्ड शेंदरी कापड मीं शिवाजी नायका [?] ला दिलें. येथें मदुरा नायकाकडून एक हेजीब आला. त्याला शिवाजी राजा म्हणाला कीं, ' तुझ्या धन्याच्या द्रव्याचा अंदाज आम्हीं ९ कोटी इतका नांवावर मांडला आहे. तरी तूर्त खर्चाकरितां आम्हांला १ कोटी रु० त्यानें पाठवावे; त्यावर हेजिबानें उत्तर केलें कीं ' आमच्या धन्याचा कांहीं मुलूख मैसूरच्या नायकानें आणि कांहीं एकोजीनें घेतला. यामुळें आतां त्याला कांहींच देतां येत नाहीं. पण हा मुलूख तुम्हीं परत मिळवून दिला तर मग आम्हीं ७ लक्ष देऊं. ' मदुरानायकानें त्रिचनापल्लीहून (Chertanapelle) आपलें कुटुंब मदुरेला पाठविलें आहे. कावेरी नदी तूर्त भरून वहात असल्यामुळें तें सुरक्षित आहेत, परंतु पुढचें भवितव्य कोण सांगणार ?

मिर्झा महमद अमीनच्या नांवानें पत्र आलें आहे. त्यांतील खबर अशी आहे कीं, बहादरखान आणि **आदिलशहाचे मुलगे** [?] अलमखान, शेख मिनाजू आणि सारुनखान असे कृष्णापार होऊन, सात हजार स्वार घेऊन, शिवाजीच्या कुमकेकरितां येत आहेत ! दुसरी अशी खबर आहे कीं गोवळकोंड्याच्या राजानें कसालकोटी तिम्मनायकाला ६ लाखांचा मुलूख देऊन १ लक्ष पायदळ उभारण्यास सांगून त्याला **शिर्पी**च्या मार्गानें पाठविलें. गोवळकोंडा आणि विजापूर यांची एकी ह्या गोष्टीनें ध्वनित होते. विजापुराहून २० हजार घोडदळ आलें आहे असेंहि म्हणतात !

डाग रजिस्टर १६७७ } (१९५४) { श. १५९९ आषाढ व. ११
पृ. २३४ इ. जुलै २६ न्यू. } सुरत { इ. १६७७ जुलै १६

नागापट्टणच्या बाजूनें सीलोनकडे बातमी अशी आली कीं, सुप्रसिद्ध दरोडेखोर **शिवाजी** (गोवळकोंड्याच्या सुलतानाच्या सहाय्यानें) १५ ह. पायदळ व १६ ह. घोडेस्वार घेऊन **जिंजीवर** चालून गेला. विजापुरी किल्लेदार **नासीर महमदखान** यानें ७।८ ह. सैन्यानिशीं तो किल्ला लढविला. तथापि शिवाजीची ही स्वारी यशस्वी झालेली दिसते. लवकरच तो **जिंजी**खालील सर्व मुलूख ताब्यांत घेऊं शकेल. सरसुभेदार **शीरखान लोदी** शिवाजीपुढें सर्वस्वीं असमर्थ झाला आहे. कारण, विजापूरचा नबाब बहलोलखान हा, एका बाजूनें मोगली सैन्य आणि दुसऱ्या बाजूनें शिवाजीचें सैन्य यांच्यामध्यें सांपडल्यामुळें, त्याच्या सैन्याला कांहीं उपकारक कामगिरी करतां येत नाहीं. मदुरेच्या नायकालाहि या संकटमय परिस्थितीचा धक्का बसणार असें दिसतें. सर्वच देशांत भीती पसरली आहे. राजा एकोजीचा दिवाण राजा वेंगण्णा याचीहि स्थिति समाधानकारक नाहीं. **तंजावरास एकोजी**ची स्थिरता राहिली नाहीं तर, **तेगनापट्टणला** कंपनीच्या अडचणी सर्व बाजूनें वाढतील.

सा. ले. ६३ } (१९५५) { श. १५९९ श्रावण शु. ४
रा. ४ सु. १०७८ जखर २ } म. सी. { इ. १६७७ जुलै २३

मोरो त्रिमल व नारो निळकंठ—त्रिंबक गोपाळ देशा. व ले० प्रा। पुणें.

निळकंठराऊ याचा चांबळी येथें इनाम आहे. छत्रपति स्वारीहून आल्यावरी विले करतील, तोवरी तकूब असो देणें.

खं. ८ ले ३४ } (१९५६) { श. १५९९ श्रावण शु. ७
रा. ४ } म. मु. व सी. 'श्रीशिव मर्या.' { इ. १६७७ जुलै २६

श्री राजा शिव छत्रपति—यशवंतराव शाहाजी कदम नामजाद कोट वालगुडानूर.

कोट मजे. हशमें नामजाद आहेत व जिन्नसहि आहे. ऐसियास तिमाजी नारायण यास लिहिण्यास मदतनीस पाठविलें आहे. तैनात होन ३.

फॅ. रे. फोर्ट सें. जॉर्ज, भा. २७ } (१९५७) { श. १५९९ श्रावण शु. ८
पृ. १८-१९ इ. } नेलोररामण्णा-ग. लँघॉर्न { इ. १६७७ जुलै २७

नुकताच शिवाजी राजाच्या देशांतून **रघुनाथपंत** ४०० घोडेस्वार घेऊन आला. त्यावेळीं **शिवाजी** राजानें सामोरें जाऊन त्याचा सन्मान केला आणि आपल्या जवळ दोन दिवस ठेवून घेऊन नंतर त्याला **मदुरानायका**च्या हेजिबाबरोबर तिकडील निकाल ठरविण्याकरितां पाठविला. गोवळकोंड्याचा मादण्णा पंतलु या नांवाचा ब्राह्मण

आहे. त्यानें मला बोलावून ' तुह्मी गोवळकोंडयाच्या राज्यांतील व्यापारी आहांत. आतां शिवाजीनें तुमच्याकडे तश्रीफा पाठविल्या. आतां तुमचें येथें काय काम आहे ? गोवळकोंड्याहून इतके हेजीब सैन्याबरोबर ठेवूं नये असा हुकुम आला आहे,' असें सांगितलें. येथून निघण्याबद्दल आपला हुकूम नसल्यामुळें मीं कांहीं तरी सांगून वेळ मारून नेली. तरी काय करावें तें कळवावें.

रघुनाथपंतानें मदुरेच्या नायकाशीं ६ लक्ष होनांचा करार करून शिवाजीनें आपलें सैन्य परत न्यावें असें ठरविलें. पैकीं दीड लाखांचा भरणा त्या हेजिबाचे मार्फत ताबडतोब झाला. शिवाजीचा भाऊ एकोजी २००० स्वार घेऊन त्रिमलवाड्याला शिवाजीला भेटण्याकरितां आला. शिवाजी तेरुपतोरा गांवापर्यंत त्याला सामोरा गेला. मुक्कामावर आल्यावर ' वडिलांच्या हयातींत मिळविलेली संपत्ति, घोडे, जवाहीर, व प्रांत यांचा एकचतुर्थांश फक्त तुम्हांला ठेवून राहिलेले तीन चतुर्थांश तुह्मीं आम्हांला द्यावे' असा शिवाजीनें निरोप पाठविला. एकोजी या गोष्टीला कबूल न झाल्यामुळें शिवाजी फार रागावला आणि त्यानें त्याला 'चालता हो' म्हणून सांगितलें. एकोजी पांच घोडेस्वार घेऊन तत्काल निघाला. शिवाजीनें लगेच जगन्नाथ पंतलू, शिवाजी पंतलू, कोनेरी पंतलू आणि निळोजी नायक नांवाचा एक व्यापारी एवढ्यांना कैद केलें. शिवाजी जनार्दनपंताला एकोजीचा प्रांत ताब्यांत घेण्याकरितां पाठविणार आहे.

खं. ८ ले. ३३ रा. ४	(१९५८) मु. 'शिव' व मर्या. सी.	श. १५९९ श्रावण शु. ११ इ. १६७७ जुलै ३०

शिव **छत्रपति**—नागोजी भोसले मुद्राधा० कोट उटळूर

स्वामींनीं तुम्हास उक्त कोटाचा हवाला देऊन एक नाइकवाडीहि दिला. (पुढें तैनातीचा तपशील आहे.)

खं. ८ ले. ३५ रा. ४ पिंगल	(१९५९) मर्या.	श. १५९९ श्रावण शु. ११ इ. १६७७ जुलै ३०

शिव **छत्रपति**—नागोजी भोसले कोट उटळूर.

कोट मज० स सरनोबत व बारगीर तैनाता ठरवून पाठविले आहेत.

खं. ८ ले. ३६ रा. ४	(१९६०) 'शिव.' व मर्या.	श. १५९९ श्रावण शु. ११ इ. १६७७ जुलै ३०

राजा शिव **छत्रपति**—केदारजी फिरंगोजी जाधव हवाल. उटळूर.

तुम्हास कोटाचा हवाला दिला आहे. नेमिल्याप्रमाणें तैनात घेणें.

सा. ले. १६४ } (१९६१) { श. १५९९ श्रावण शु. १४
शु. १०७८ जखर ९ } म. मु. व सी. { इ. १६७७ जुलै ३०

त्रिंबक गोपाळ सुभे० व कार० पा पुणें–विसाजी गंगाधर हवाल. व कार. माहादाजी गोसावी यांचा सुपे येथील इनाम पूर्वीप्रमाणें चालविणें.

फॅ. रे. सुरत भा. ८९–२ } (१९६२) { श. १५९९ श्रावण शु. १२
पृ. ५० इ. } सुरत–मुंबई { इ. १६७७ जुलै ३१

शिवाजी व मोरोपंडित यांना लिहिलेलीं पत्रें अद्याप गेलीं नसल्यास आतां तीं पाठविणें जरूर नाहीं असें वाटतें. कारण तीं लिहिणाऱ्या प्रेसि०च्या मृत्यूची बातमी तीं पत्रें पोंचण्याच्या पूर्वीच त्यांना पोंचेल. परंतु पावसाळा संपतांच **शिवाजीचें सैन्य** सुरतेवर येणार अशी येथें भीती वाटत असल्यामुळें, इकडे येणाऱ्या सेनापतींना आम्हीं त्या पत्रांत मागणी केली होती त्या स्वरूपाचे हुकूम त्याच्या आधीं मिळविण्याची कांहीं खटपट करतां येण्यासारखी असल्यास करावी.

ऑर्मे ११४–६ } (१९६३) { श. १५९९ श्रावण शु. १४
पृ. ४५ इ. } मुंबई–सुरत { इ. १६७७ आगस्ट २

साबान कुली ४ दिवसांपूर्वी येथें येऊन पोंचला. त्याला आम्हीं सर्व प्रकारची मदत दिली. **सिद्दी संबूळनें** आरमाराचा ताबा अद्याप दिला नाहीं. मागील सर्व बाकीची पूर्तता होऊन हिशेब पुरे होईपर्यंत तो ताबा देण्याचें लांबणीवर टाकीत आहे. **बहादुरखानानें** तसाच हुकूम दिला असल्यामुळें, सुरतेहून पैसा येईपर्यंत तो ताबा देणार नाहीं.

शिवाजी हल्लीं लांबच्या कर्नाटक प्रांतांत छावणी करून राहिला आहे. **त्याच्या गैरहजेरींत** मोरो पंडित, अण्णाजी पंडित आणि एक ब्राह्मण असे **तिघेजण कारभार** करण्याकरितां ठेविले आहेत. सुरतेकडे येणाऱ्या त्यांच्या सेनापतींनीं इंग्रजांना कोठेंहि त्रास देऊं नये असे कौल मागण्याकरितां त्यांच्याकडे मनुष्य पाठविला आहे.

फॅ. रे. फो. सें. जॉर्ज भा. २७ } (१९६४) { श. १५९९ श्रावण शु. १४
पृ. २० इ. } नेलोर रामण्णा–ग. लँग्हॉर्न { इ. १६७७ आगस्ट २

तुंदुमगुर्ती ठिकाणाहून पत्रः— शिवाजी वलीगंडपुरम् सोडून **तुंदुमगुर्तीला** ससैन्य आला. तेथून **येलवनरासोर**ला आपलें सैन्य पाठवून तो स्वतः सिमोजी नायकाला [शिवाजी का, संभाजी नायक ? Seinogee Nague] व इतर मोठे लोक बरोबर घेऊन **हिरुदाचलम्**ला देवदर्शनाला गेला. तें सैन्य येलवनरासोरलाच असून शिवाजी अजून देवदर्शनाहून परत आला नाहीं.

सि. डीगॉर आणि तेवेनापट्टणचा अधिकारी शिवाजीला भेटावयास आले. त्यांनीं रेशमी कापड, चंदन, गुलाबपाणी, मालदिवी नारळ, लवंगा व तरवारीचीं पातीं अशा वस्तूंचा नजराणा केला. तो त्यानें खुषीनें स्वीकारला व त्यांना तश्रीफा दिल्या. कित्येकांच्या मतें शिवाजीनें डचांना आमंत्रण केलें; असें आहे. परंतु तेवेनापट्टणच्या बाजूला त्यांचा कांहीं माल लुटला गेला त्याबद्दल भरपाई मागण्याकरितां ते आले होते; असेंहि दुसरे लोक बोलतात. शिवाजीनें आपल्या भावाचा मुलूख काबीज करण्याचा हुकूम दिला आहे. आज येलावनसोर किल्ला त्याच्या हातीं पडला. जगन्नाथ पंडितानें करार ठरवून किल्ल्यांतील लोकांना किल्ला सोडून जाण्यास भाग पाडलें. जगन्नाथ पंतलू, शिवाजी पंतलू आणि निळोजी नायक ह्यांना शिवाजीनें आपल्या बरोबर घेतलें आहे.

ओ. कॉ. भा. ३८ नं. ४२८३ इ.	(१९६५) सुरतेकडील वृत्तांत	श. १५९९ श्रावण शु. १५ इ. १६७७ आगस्ट ३

राजापुराहून आलेल्या पत्रांवरून **मोंगल** व **नबाब** यांचा **तह** झाल्याची बातमी पक्की आहे; असें कळतें. मोंगलांनीं ८ वर्षेपर्यंत विजापूरकरांकडून नालबंदी [खंडणी ?] घेऊं नये; दोघांनीं मिळून कुतुबशहावर चालून जावें; त्याचा मोड केल्यावर नंतर सर्वांनीं मिळून **शिवाजीवर** चाल करून जावें; तो पुरा नम्र होईपर्यंत थांबूं नये; अशीं कलमें ठरलीं. **शिवाजीनें** सुद्धां कर्नाटकी आणि दख्खनी राजांसमवेत, व कुतुबशहाशीं एकमत करून **युद्ध करण्याचा निश्चय** केला आहे.

स. पृ. ६४ रा. ४ सु. १०७८ जखर २४	(१९६६) पोटपत्र	श. १५९९ श्रावण व. १२ इ. १६७७ आगस्ट १४

अजदि. ठाणें सा। कोरेगांव— मोक. शेटे महा. व रया मौ. चिमणगांव

पंताजीपंत वाकेनिवीस, व येसाजी मल्हार सुभे. यांचे कागदाप्रमाणें चिमणगांवचें जोतिश व कुळकर्ण विसाजी चिंतामण याचे दुमाला करणें. धानतरावे लायणी हरकत केली होती.

ऑर्म ११४-६ पृ. ४७ इ.	(१९६७) मुंबई-सुरत	श. १५९९ भाद्र. शु. ६ इ. १६७७ आगस्ट २४

शिवाजी उत्तर कर्नाटकांत असून त्यानें जिंजी, तंजावर, पिलकुंडा आदिकरून मजबूत किल्ले घेऊन मुसलमानांचा मोठा पराजय केला. **श्रीरंगपट्टणाहून** त्यानें मोठी लूट नेली असें म्हणतात. परत येत असतांना वाटेत बिद्रूर (बेदनूर) घेऊन कानडाहि आपल्या नवीन जिंकलेल्या मुलखाला जोडण्याचा त्याचा विचार आहे. शिवाजी परत येत असतांना त्याचा आम्ही कौल घेऊंच. परंतु मध्यंतरीं आमच्या गैरहजेरींतील कारभारी मंडळाचे कौल मागण्यासाठीं इसम पाठविला आहे.

फॅ. रे. फो. सें. जॉर्ज } (१९६८) { श. १५९९ भाद्रपद शु. ६
भा. १८ पृ. ४२ इ. } फोर्ट सें. जॉर्ज-मुंबई { इ. १६७७ आगस्ट २४

शीरखानाला स्थानभ्रष्ट केल्यावर आणि कावेरीच्या अलीकडील **एकोजीचा** सर्व उघडा प्रांत हिरावून घेतल्यानंतर शिवाजी अधिक कांहीं करूं शकला नाहीं. **वेलूर** आणि **अर्णी** अजून टिकाव धरून आहेत. आणि दीर्घकाल गेल्याशिवाय ते इतक्यांत पडण्याचा संभव नाहीं. मध्यंतरीं **एकोजी** हा मदुरानायक, मैसूरनायक आणि रानांतील लोक यांची मदत मिळविण्याच्या खटपटींत असल्यामुळें **शिवाजीला** तो उद्योग बराच पुरवेल. **गोवळकोंडेकरांनीं** मनांत आणल्यास शिवाजी असा अडचणींत असतांना त्याला ते त्याच्या या नवीन जिंकलेल्या मुलखांतून सहज काढून लावूं शकतील. परंतु ते स्वस्थ आहेत. कारण, तसें करावें तर प्रांत हस्तगत होत नाहीं म्हणून मुलूख लुटण्याच्या संधीची शिवाजी वाटच पहात आहे तीच त्याला दिल्यासारखी होईल; आणि मग आपल्याच घरांत आपल्या हातानें अग्नि आणून भरल्याची तऱ्हा होईल. अशी त्याच्या (गोवळ० च्या) ब्राह्मण सल्लागारांना भीती वाटते.

फॅ. रे. फो. सें. जॉर्ज } (१९६९) { श. १५९९ भाद्र. शु. ८
भा. २७ पृ. २०-२१ इ. } गोवळकोंडा-ग० लँग्वॅनें { इ. १६७७ आगस्ट २६

गोवळकोंड्याचा वकील वीर राघवय्याचें पत्रः-दिलीलखान आणि बहादरखान यांनीं **गुलबर्गा** किल्ला घेतला. **बहलोलखान** त्यांच्या सैन्याला मिळून आतां त्यांचें सैन्य **गोवळ०**शीं लढण्याकरितां त्या किल्ल्याजवळ सज्ज होऊन राहिलें आहे. मोगल आणि अदिलशहा या उभयतांचा शत्रू **शिवाजी राजा** याला गोवळ०नीं बोलावून आपल्या मुलखांतून त्याला कर्नाटकांत जाऊं दिलें. तरी आतां त्याला धरून मोगलांच्या हवालीं करावें. तसेंच हल्लीं गोवळ०च्या नोकरींत असलेला **शेख मिनाजू** ह्यानें मोंगलांची नोकरी करण्याच्या अटीवर मोंगलांकडून पुष्कळ रकमा घेतल्या आहेत, त्यालाहि मोगलांच्या हवालीं करावें. नाहींतर युद्धाला तयार व्हावें, असें गोवळ०स त्यांनीं कळविलें आहे. विजापूरच्या हद्दीवरील आपल्या लष्करानें सावध रहावें असा अलमपन्हानें [कुतुबशहानें] त्याला हुकूम दिला आहे; म्हणून तो तेथेंच राहिला आहे. त्यानें आपल्या सरलष्कर व सरदार यांना असें लिहिलें आहे कीं, जरी मोंगलांनीं त्यांना कितीहि मोठ्या रकमा देण्याचें वचन दिलें तरी [फितूर न होतां] मोंगलाशीं कोणत्याना कोणत्या मार्गानें तह घडवून आणावा.

ओ. कॉ. भा. ३७ } (१९७०) { श. १५९९ भाद्र. शु. १४
नं. ४२७० इ. } सुरत-कंपनी { इ. १६७७ ऑगस्ट ३१

शिवाजीचें बहुतेक सैन्य दख्खन व कर्नाटक देशाकडे गेलें असल्यामुळें या

बाजूला शांतता अनुभविण्याचें सुख आम्हांला लाभलें आहे. त्याचे सेनापती **मोरो** आणि **अण्णाजी** पंडित हे येथून ४० कोसांच्या आंतच **रायरी, साल्हेर** इत्यादि प्रबळ किल्यांत शिबंदीचा उत्तम बंदोबस्त करून राहिले आहेत. आणखी कांहीं [सेनापती] येथून जवळच २० कोसांवर **गणदेवीला** असून तेथून ते सर्व प्रांतावर ताबा चालवितात आणि वाटेल ती सामुग्री मिळवितात.

श्री. सं. ले. १७, १८) (१९७१) { श. १५९९ भाद्र. व. २
सु. १०७८ रजब १५) { इ. १६७७ सप्टें. ३

दत्ताजी त्रिमल — महादाजी सामराज, वेंकाजीरुद्र, सुभेदार व कारकून माहालनिहाये अनुक्रमें तरफ सातारा व तपे कोले.

शिवाजी राजे श्रीरामदासांना भेटण्याकरतां शिवतरी गेले. व श्री रघुनाथ देवास ११ गांवें इनामें दिलीं. ते गाऊ देवाचे नावें लिहोन त्या गावींचे उत्पन्न देवाचा प्रसाद म्हणौन राजगृहीं जमा करणें असें समर्थांनीं सांगितलें. पण ह्या गांवच्या ११।११ बिध्यांचें इनाम समर्थांकडे अखेर चालू केलें; बाकीचे दिवाणांत घेतले. त्याच्या सनदा दिवाकर गोसावी यांजपाशीं दिल्या. याखेरीज इदिलशाही इनाम चालत आला असेल तोहि चालविणें.

श्री. सं. ले. १९) (१९७२) { श. १५९९ भाद्र. व २
सु. १०७८ रजब १५) { इ. १६७७ सप्टें. ३

दत्ताजीत्रिमल — वेंकाजीरुद्र, सुभेदार. व कारकून महाला निहाये ता. कोले.

चाफल येथे श्रीरघुनाथ देवाल्य आहे. रा. छ. **स्वामी (शिवाजी राजे)** देवाचे भेटीस आले होते, ते वेळीं स्वामी समर्थांनीं रा. राजियास आज्ञा केली त्यावरून जाऊलीचे सुभेवरी मोईन करून रामनवमी उत्साहास दिली ११ होन १५० टके खुर्दा इत्यादि. समयानसार जटाधारी जोगी येऊन पीडा करतील तरी करूं न देणें. जागाजागाची सिंहासने येऊन यात्रा समारंभ चाले ऐसे करणें. खासा (वेंकाजी) जाऊन संरक्षण करणें व १२१ ब्राह्मणास टकसाली ४ रुके दक्षणा देणें.

फॅ. रे. फो. सें. जॉर्ज) (१९७३) { श. १५९९ आश्वीन शु. ३
भा. २७ पृ. २२-२३ इ.) गोवळकोंडा-फो. जॉर्ज. { इ. १६७७ सप्टें. १९

वीर राघवय्याचें पत्र:-दिलीलखान आणि बहादरखान यांनीं **गुलबर्गा** किल्ला घेतल्याचें मोंगल बादशहाला कळविलें. त्यावर बादशहाचें असें उत्तर आलें कीं, ' हा किल्ला फकिरांचा असून विजापूरकरांच्या हद्दींतील आहे. विजापूरकर आमचे साहाय्यक असतांना त्यांनीं हा किल्ला गोवळ०ना कसा घेऊं दिला ? एवढ्यानें माझें समाधान होणार नाहीं. तर, गोवळ०नीं विजापूरचा शत्रू **शिवाजी राजा** याला आपल्या देशांतून जाऊं

देण्यांत मोठा गुन्हा केला आहे. त्याबद्दल १ कोटी रुपये आणि १० हजार घोडे देण्यास त्यांना भाग पाडावें.' दिलीलखान व बहादरखान यानीं गोवळ०शीं या बाबतींत बोलणें काढून २ कोटी रु. व २० ह. घोड्यांची मागणी केली. ती नाकारतांच १ कोटी रु. व १० ह. घोडे त्यांनीं मागितले. परंतु कुतुबशहा फक्त ५ लाख द्यावयास तयार झाला. हें पाहून बहलोलखान व हे दोघे एकत्र होऊन आपलीं सैन्यें **त्रिविनिको** जवळ घेऊन आले.

गोवळकोंडेकरांना ही बातमी लागून त्यांनींहि सिद्दी मसाउद, सैद मखतुम, दूलशास, स[र]जाखान वगैरे सरलष्कर, सरखेल आणि कर्नाटकांतील कांहीं फौज एकत्र जमविली. **मोंगलांचे** ४।५ ह. स्वार आणि **बहलोलखानाचें** सैन्य कुतुबशहावर हल्ला करणार असें कळतांच कुतुबशाहीचे वीस तीस ह. स्वार त्यांच्यावर चालून गेले. थोडा वेळ युद्ध होऊन **बहलोलखानाचे** स्वार माघार खाऊं लागल्या वेळीं **दिलेलखान** कुमकेला आल्यामुळें वेळ सांवरली. आणि उभय सैन्यें स्वस्थानीं परतलीं. गोवळकोंड्याचे थोडे लोक जखमी झाले व त्यांचा जय झाला. मोंगलांचे ५०० घोडे मेले आणि त्यांचा पराजय झाला. मोंगल बहलोलाचे ५।६ मोठे सेनापती मरण पावले. **अलमपन्हाला** [कुतुबशहाला] ही बातमी कळल्यावर त्यानें इकडे येण्याकरितां पुष्कळ स्वार पाठविले आहेत. **मादण्णाला** तिकडे जाण्याबद्दल सांगितलें असतां त्यानें सोडवणूक करून घेऊन पलपेल **येंगाणाला** पाठविलें. शिवाय त्यानें मिर्झा संगीर, गुडचारुलो, शेख मिनाजू वगैरे मोठे सरदार तिकडे पाठविले आहेत. आतां कुतुबशहाचें मोंगल-विजापुरकरांशीं मोठें युद्ध होईल आणि पूर्वींप्रमाणेंच त्याला पुनः जय मिळेल असें लोक बोलतात. गोवळकोंड्याच्या वतीनें तहाचेंहि बोलणें चालू आहे. **बहादरखानानें** गोवळकोंड्याकडून **लांच घेतला असून** सुलतानानें प्रथम थोडें लढावें असा त्यानें सल्ला दिला आहे. नंतर तो तह घडवून आणील. गोवळकोंड्याच्या किल्यावर सर्व प्रकारची सामुग्री त्वरेनें भरून ठेवीत आहेत. गेल्या युद्धांत काय झालें तें सुलतानाला समजावें म्हणून रक्तानें भरलेले कपड्यांचे [Clousts ? clouts] तीन उंट लादून सेनापतीनें त्याच्याकडे पाठविले आहेत.

श्री. सं. ले. २० } (१९७४) { श. १५९९ आश्वीन शु. ५
सु. १०७८ साबान ३ } { इ. १६७७ सप्टें. २१

मोरो त्रिमल प्रधान—गोपाल रायाजी दोरी व दोक प्रांत जावली.

श्रीसमर्थ शिष्य वे. दिवाकर गोसावी याचा मठ मगगाऊ पा। कारवी येथें आहे. तेथें वे.च्या गुराची वणी न घेणें, बागास आजार न देणें.

फॅ. रे. फो. सें. जॉर्ज } (१९७५) { श. १५९९ आश्विन शु. ६
भा. २७ पृ. २३ इ. } शिवाजी–ग. लँघॉर्न { इ. १६७७ सप्टें. २२

मीं कर्नाटकांत आल्यापासून अनेक किल्ले जिंकले. कित्येक किल्ल्यांत मला नवीन बांधकामें करावयाचीं आहेत. मोठ्या तोफांचे गाडे कसे करावे आणि सुरुंग कसे लावावे हें जाणणारीं माणसें तुमच्याकडे असतील तर आम्हांला अशा लोकांची आणि विशेषतः सुरुंग लावून दगडी भिंती उडविणाऱ्या कसबी लोकांची जरूरी आहे. गोव्याहून व वेंगुर्ल्याहून आलेले सर्व लोक कामामध्यें खपून जाऊन जेव्हां त्यांच्याकडे आणखी माणसांबद्दल मीं विचारणा केलीं तेव्हां ते सर्व **चिनापट्टण व पुलीकत**कडे गेल्याचें त्यांनीं सांगितलें. तेव्हां आपल्या तिकडे चौकशी करून सुमारें २०।२५ किंवा निदान १०।५ सुरंगे लोक मिळतील तेवढे पाठवावे. त्यांना चांगला तनखा देऊन माझ्या अनेक किल्ल्यांवर त्यांना काम देईन व आपले उपकार स्मरीन.

फॅ. रे. फो. सें. जॉर्ज, भा. २७ } (१९७६) { श. १५९९ आश्वीन शु. ६
पृ. २८–९ (३) इ. } फो. जॉर्ज–गोवळकोंडा { इ. १६७७ सप्टें. २२

ग. लँघॉर्न—राजे अलमपन्हा व मादण्णा:—आपलें फर्मान आणि तश्रीफ पावलीं. सत्कारानें घेतलीं. **शिवाजी**च्या मुलखांत पश्चिम किनाऱ्यावर आमच्या वखारी आहेत. तेथील अनुभवावरून **शिवाजी जिंजी**च्या प्रांतांत आल्यापासून आम्हांला भीती वाटते. म्हणून त्याच्या हालचालींवर नजर राखण्याकरितां आमचे ब्राह्मण आम्हीं पाठविले. त्यांना आपला सेवक मादण्णा ॲटिया पांडे यानें वाईट तऱ्हेनें वागवून कैद करण्याची धमकी दिल्यामुळें, उगाच वाद वाढवूं नये म्हणून ते परत आले. त्यामुळें नजर ठेवणें अशक्य होऊन आमची मालमत्ता धोक्यांत पडली आहे. तरी आपल्या सेवकांना जरूर ते हुकूम द्यावे. आमचे करार व आमची शांत वृत्ति लक्षांत घेऊन आम्हांला न्यायानें वागवावें अशी विनंति आहे.

डाग रजिस्टर १६७७ } (१९७७) { श. १५९९ आश्वीन शु. ६
पृ. ३१९३ इ. ऑक्टो. २ न्यू. } कॉरोमांडेलकडील खबर { इ. १६७७ सप्टें. २२

प्रसिद्ध भटक्या लुटारू **शिवाजी**, १२ हजार स्वार घेऊन **वेंगुर्ल्याकडील** घाटाच्या बाजूकडून, गेल्या मार्चांत, गोवळकोंड्याच्या राज्यांत येऊन दाखल झाला. तो ४ मार्च (१४ न्यू.) रोजीं सुलतानाच्या भेटीस गेला. त्यावेळीं त्याचा चांगला सत्कार झाला. आणि पुष्कळसें द्रव्य आणि कांहीं सैन्य बरोबर देऊन **कर्नाटक** आणि **जिंजी**चा मुलूख सुलतानाकरितां जिंकून घेण्यासाठीं त्याची रवानगी झाली. त्यानें हा मुलूख फार त्वरेनें जिंकून घेतला व **शेरखान** लोदीचें सर्वस्व हरण करून त्याला पार वाळवून लाविलें. आतां तो खान **आरियालौर** नांवाच्या किल्ल्यांत आहे. तेथें तो लष्कर व शिवाजीच्या

हातीं लागेल. शिवाजी म्हैसूरच्या प्रदेशांत, **तंजावर, मदूरा** इत्यादि मोठ्या शहरांपासून जवळच आहे. आणि विजापुरांत अंतस्थ यादवी माजून राहिल्यामुळें या सर्व मुलखाचें स्वामित्व त्याला लवकरच मिळेल त्याला यांत शंका नाहीं. नंतर तो गोवळकोंड्याच्या सुलतानाच्या इच्छेप्रमाणें कांहींच करणार नाहीं. त्याला गोड भाषा बोलून तो हल्लीं फसवीत आहे. **तंजावर**चा हल्लींच्या अधिकारी **एकोजी** याच्याशीं आपला बाप **शहाजी** याच्या वारशाच्या बाबतींत हल्लीं त्याचा तंटा चालू आहे. गोवळकोंडें व इतरत्र आमच्या कंपनीच्या लोकांशीं **शिवाजी** चांगल्या तऱ्हेनें वागतो. त्यानें आपली सदिच्छा प्रकट करण्याकरितां आमच्याकडून कांहीं खरेदीहि केली.

फॅ. रे. फो. सें. जॉर्ज, भा. २७ पृ. २९ (३) इ. } (१९७८) फो. जॉर्ज—वीर राघवय्या { श. १५९९ आश्वीन शु. ११ इ. १६७७ सप्टें. २७

१६ जूनचें पत्र फर्मान व तश्रीफ पोंचलीं. दिवाणाचा [मादण्णाचा] **शिवाजी**-बरोबरचा हस्तक मदनांत पंतलु यानें [आमच्या वकिलाला] वाईट रीतीनें वागविल्याबद्दल आणि दुसरा ब्राम्हण पोदेला लिंगाप्पा याच्याबद्दलहि तक्रारपत्र सुलतान व मादण्णा या उभयतांना लिहिलें आहे. पत्राच्या नकला सोबत आहेत. योग्य खटपट करावी.

फॅ. रे. सुरत भा. ४ पृ. ८५-८६ इ. } (१९७९) स्वाली कन्सल्टेशन. { श. १५९९ आश्वीन व. १ इ. १६७७ आक्टो. १

धरणगांवच्या ऑस्टेनचें १९ सेप्टेंबरचें पत्र आलें. त्यांतील बातमीः—' या भागांतील मुख्य अंमलदार **बहादुरखान** याला बादशहाकडून तांतडीचें बोलावणें आल्यामुळें, तो तिकडे गेल्यावर इकडे कारभारांत पुष्कळच फरक होईल असें लोक बोलतात. अलीकडे राजे व कोळी लोकांनीं लुटीची सुरवात केल्यामुळें रस्ते सुरक्षित नाहींत म्हणून आम्हीं बांधाबांधी करावयास लागलों आहों.' बहादुरखानाला इकडची व्यवस्था करून जाईपर्यंत थोडासा वेळ लागेल तेवढ्यांत धरणगांवचा काफिला सुरतेजवळ येऊन पोंचेल अशी खात्री वाटते. करितां विमा उतरूं नये असें ठरलें.

सा. ले. ३९५ सु. १०७८ साबान १५ } (१९८०) { श. १५९९ आश्वीन व. ३ इ. १६७७ आक्टो. ३

हणमंतराव खराडे—तिमाजी खंडेराव देसाई सा। कुंदगोळ.

या सालीं सा। मज. आमचे मोकासा जाला. सालगुदस्त सिवाजीचे फितरतीकरितां रयतलोक बहुत खराब जाले त्यावर सैद सुलतान यानें धुंद मांडून विलायती नागवून धुळीस मिळविलें.

फॅ. रे. फो. सें. जॉर्ज } (१९८१) { श. १५९९ आश्वीन व. ३
भा. १ पृ. १७ (४) इ. } फो. सें. जॉर्ज कन्सल्टेशन { इ. १६७७ ऑक्टो. ३

शिवाजीचे दोन जासूद त्याचें तारीख २२ [सप्टें.] चें पत्र घेऊन आले. त्यांत त्यानें एंजिनिअर्स मागितले. परंतु त्याला शिष्टाचार संभाळून नकार दिला. कारण, एंजीनिअर्स पुरविल्यास **शिवाजी** प्रबळ होऊन शिवाय गोवळकर व मोगल, यांचें शत्रुत्व पत्करावें लागेल. शिवाजीचे गुप्त हेर सर्वत्र पसरले आहेत व तो स्वतः सैन्य घेऊन येथून दोन दिवसांच्या मुक्कामावर आला आहे. तेव्हां रक्षणाकरितां शिबंदी वाढवून तटबंदीचें काम जोरांत पुरें केलें पाहिजे. म्हणजे मग शिवाजीसारख्या अनिष्ट शेजाऱ्याचें किंवा विरोधी दिवाणाचें भय बाळगावें लागणार नाहीं [डायरी भा. १ पृ. १२३].

श्री. सं. ले. २१, २२ } (१९८२) { श. १५९९ आश्वीन व. ११
सु. १०७८ साबान २४ } { इ. १६७७ आक्टो. १२

अनाजी दत्तो

वेकाजी रुद्र सुभेदार व कार. ता कोले व माहादजी सामराज सुभा सातारा

श्री (समर्थ) स्वामींनीं दिवाकर गोसावी बरोबर सांगोन पाठविल्यावरून सुभे मारी चाफळच्या श्रीरघुनाथ देवाचे इनाम ११ गावीं ।॥। चावर ९॥९ बिघे आहे. **सालमारी कुल देशाची मसाती करून धारा देण्याचा तह केला आहे.** तरी तुम्ही श्रीचे इनामाची मोजणी अगर पाहणी न करणें. इनाम चालवणें.

श्री. सं. ले. ३३ } (१९८३) { श. १५९९ आश्वीन व. ११
सु. १०७८ साबान २४ } उल्लेख { इ. १६७७ आक्टो. १२

५० टके जमीन मौ नाटोली व कुणतूर ता शिराले येथील, चाफळच्या समर्थ-स्थापित मारुतीच्या उत्सवार्थ देणगी.

श्री. सं. ले. २४ } (१९८४) { श. १५९९ आश्वीन व. १३
सु. १०७८ साबान २६ } { इ. १६७७ आक्टो. १४

दत्ताजी त्रिमल—देशा० व लेख० प्रां राजमंडळ.

छत्रपतींची सन सीत (श. १५९७) ची आज्ञा कीं, चाफळच्या माहानवमीसाठीं उत्सवाचे सामान पाठवीत जाणें. तरी माहालोमाहालाहून मोइनप्रमाणें सामान येत जाईल. उत्सव करवणें.

श्री. सं. ले. २३ } (१९८५) { श. १५९९ आश्वीन व. १३
सु. १०७८ साबान २६ } { इ. १६७७ आक्टो. १४

दत्ताजी त्रिमल — बहिरो सिवदेव सुभे. व कार० ता मलकापूर.

श्री रामदासस्वामी गोसावी यानीं मौ कुणतूर येथें हनुमंताची स्थापना केली आहे. तरी देवाचा २५ बिघे इनाम देवाकडे चालविणें.

फॅ. रे. सुरत भा. ८९ } (१९८६) { श. १५९९ कार्तीक शु. २
पृ. ६६-६७ इ. } सुरत-मुंबई { इ. १६७७ आक्टो. १८

माजगांवला सिद्दी **संबूळ** व सिद्दी **कासम** यांच्यांत भांडण होऊन, बेटावर उभयतांचे ८।१० घोडे व ८।१० शिपाई मृत्युमुखीं पडले. केग्विन मध्यें पडून त्यानें भांडण सोडविलें. त्यांत त्याचे ३ घोडे मेले. अशा रीतीनें बेटावरील शांततेचा भंग झाला याबद्दल तुम्हीं कासमकडून खुलासा मागवावा. कासमच्या शिपायांना निःशस्त्र करून त्यांना बेट सोडून जाण्यास सांगावें; आणि न ऐकतील तर त्यांना कैद करून रवाना करावें. **सिद्दी संबूळनें गलबतें** ताब्यांत न दिल्यामुळें हा गोंधळ मांजला असावा. परंतु ह्या प्रसंगानें, त्यांच्यापासून धोका आहे हें लक्षांत घेऊन, त्यांचें तेथील पावसाळ्यांत रहाणें बंद केल्याशिवाय आम्हीं रहाणार नाहीं.

[ऑर्म. ११४-६ पृ. ५६ मुंबईहून आक्टो. ९ रोजीं सुरतेला गेलेल्या पत्रांत या दंग्याची सविस्तर हकीकत लिहिली आहे.]

फॅ. रे. मसुलीपट्टम } (१९८७) { श. १५९९ कार्तीक शु. ८
भा. १० पृ. ? इ. } फो. सें. जॉर्ज-मच्छलीपट्टण { इ. १६७७ आक्टो. २३

मोंगल व विजापूरकर यांच्या विरुद्ध **गोवळकोंडेकर** कांहीं प्रगति करूं शकले ही इष्ट बातमी आहे. त्यांना यश यावें अशीच आमची इच्छा आहे. **शिवाजी** अद्याप नवीन जिंकलेल्या मुलखांत आहे. तो, (गोव० कडून मिळावयाच्या) एक लक्ष होनांचा वांधा पडल्यामुळें, गोवळकोंड्याकडे पुनः जाणार आहे अशी बातमी आहे. तसें होईल तर या गरीब देशाला कांहीं दिवस सुखाचे लाभतील !

श्री. सं. चा. २५ } (१९८८) { श. १५९९ कार्तीक शु. १२
सु. १०७८ रम १० } { इ. १६७७ आक्टो. २७

मोरो त्रिमल प्रधान— वेंकाजी रुद्र सुबे. व कार. ता। कोल:—चाफळ येथील रामनमीचा उत्सव नीट करण्याबद्दल तुम्हास श्रीछत्रपति व दत्ताजी त्रिमल यांची आज्ञा आहे. तुम्ही स्वत: ८।१० रोज जाऊन उत्सव करीत जाणें.

फॅ. रे. फो. सें. जॉर्ज } (१९८९) { श. १५९९ का. शु. १३
भा. २७ पृ. २४-२५ इ. } गोवळकोंडा-फो. जॉर्ज { इ. १६७७ आक्टो. २८

वीर राघवय्याचें पत्रः—सरलष्कर **महमद इब्राहीम**, ३० ह. घोडदळ व इतर

कांहीं सेनापती मिळून गोवळकोंड्यापासून १२ कोसांवर **गिविनी** या नांवाच्या विजापूरच्या हद्दीवरील गांवीं होते. **दिलीलखान व बहलोलखान** हे गुलबर्गा किल्याच्या अलीकडे दीड कोसावर होते. इतक्यांत अलमपन्हानें मोंगलांशीं लढाई देण्याचा हुकूम दिल्यामुळें त्याचें सैन्य मोंगलांपासून १ कोसांवर **मंगलीग** येथें युद्धाच्या तयारीनें जमा झालें. हिडोलशा व आणखी कांहीं सरदार यांनीं पुढें होऊन मोंगल–विजापुरी फौजेशीं कुरापत काढून त्यांना अंगावर घेत घेत गोवळकोंड्याच्या मुख्य फौजेशीं आणिलें. मोंगलांकडील एक सरदार प्रोही [?] इसनखान हा २० ह. स्वारांनिशीं फारच शौर्यानें लढला. पुढें उभय सैन्यें स्वस्थानीं परत गेलीं.

तीन दिवसांनंतर सिदेलोर येंगाणा वगैरे सरदार मोंगलांवर चालून गेले असतां, त्यांनीं थोडा वेळ युद्ध करून, पळण्याचा आविर्भाव दाखवून गोवळकोंडेकरांना अडचणींत गांठलें; आणि त्या वेळींच आणखी मदत आल्यामुळें गोवळ०चे लोक त्यांनीं कापून काढले आणि गांगरून गेलेल्या लोकांचीं नौबत व निशाणें काबीज केलीं. आतां ते सेनापतींना कैद करणार तोंच गोवळ०चा सरलष्कर व त्याचें सैन्य मदतीला धावून आलें. त्यामुळें युद्धाचा रंग पालटला, आणि मोगली सैन्य मागें हटलें. यानंतर झालेल्या चकमकींत कोणालाच विशेष यश मिळालें नाहीं. गोवळकोंड्याचे लोकांनीं मोंगलांच्या व बहलोलखानाच्या मुलखांतून त्यांची सर्व रसद मारून आणिली. तेव्हां अडचणींत सांपडलेल्या शत्रूनें **२० तारखेला** गोवळकोंड्याच्या गोटावर हल्ला करून **मुलांमाणसांची कत्तल** करून दाणागोटा नेला. गोवळकोंड्याच्या सरलष्करचा मोड होऊन त्यालाहि हटावें लागलें. विशेषतः सर्व मोठमोठे ब्राह्मण नापत्ता झाले आहेत! आतां पुनः मोगल व बहलोलखान यांशीं हे तोंड देतील किंवा कसें हा प्रश्नच आहे.

खानानें [?] मोंगलांकडे लिहिलेलीं कित्येक पत्रें कुतुबशहाच्या लोकांनीं पकडलीं. यामुळें त्याला कैद करून गोवळकोंड्याच्या किल्यावर बंदोबस्तानें ठेविला आहे. दिवाणाकडून त्याला रोज खर्चाकरितां ५ रु. मिळतात. सरजा अलमखान, इसनखान, हाजीखान, मसाऊदखान वगैरे पठाण सरदार यांच्याजवळ प्रत्येकीं सुमारें २००० स्वार होते. परंतु ते पठाण असल्यामुळें आपल्या **सजातीय मोंगलांशीं आणि बहलोलखानाशीं** लढत ना. यामुळें दिवाणानें त्यांच्या घरावर पहारे ठेविले आहेत.

(से.)फॅ. रे. सुरत भा. १०७ पृ. २७ इ.	(१९९०) मुंबई–सुरत	श. १५९९ कार्तिक शु. १४ इ. १६७७ आक्टो. २९

हेन्री ऑक्झिंडेनचें पत्रः—उतावीळपणानेंच कारवारचा खलिता मीं उघडून पाहिला. तों त्यांत अपेक्षेप्रमाणें दक्षिणचा व्यापार बुडाल्याची बातमी वाचली. **शिवाजीच्या सैन्यानें बंकापूरला** वेढा घातला असून **गदग व लक्ष्मेश्वर** लुटलें. या ठिकाणां-

हूनच आपला बराचसा माल येत असतो. एकूण **राजापुरा**सारखीच कारवारची स्थिति होणार असें दिसतें !

डाग रजिस्टर १६७७ पृ. ३८६–७ इ. नोवें. ९ न्यू. (१९९१) श. १५९९ कार्तीक शु.१५ इ. १६७७आक्टो. ३०

शिवाजीनें विजापूरकरांचा बहुतेक मुलूख आणि तंजावरचा उत्तरेकडील मुलूख काबीज केला असून आपला भाऊ एकोजी राजा याच्याशीं युद्ध करण्याची तयारी चालविली आहे. तेव्हां **नागापट्टणच्या** सुभेदाराचें स्थान स्थिर आहे असें वाटत नाहीं. शिवाजीच्या गोंधळामुळें **तेगना**पट्टणच्या आसपास व्यापार बसला; परंतु सदरस्–पट्टणच्या बाजूला कर्नाटकांत ठीक चालला आहे. **नवा राजा शिवाजी** याच्याकडून **तेगनापट्टण** येथें कंपनीच्या व्यापाराच्या बाबतींत अधिक सवलती मिळण्याची आशा व्यर्थ ठरली. त्यानें पूर्वापार पद्धतीच पुढें चालू ठेविली, याबद्दल समाधान मानून घेण्याचीच अखेरीस पाळी आली आहे.

ओ. कॉ. भा. ३८ नं. ४२८७ इ. (१९९२) सुरत–कंपनी श. १५९९ कार्तीक ब. १ इ. १६७७ आक्टो. ३१

या वर्षी **शिवाजीनें** वरच्या कर्नाटकांतील **जिंजी** व **तंजावर** हीं विजापूरच्या प्रतिनिधींचीं त्या प्रांतांतील मोठीं ठाणीं, काबीज करून मोठें यश संपादन केलें आहे. त्यानें सुप्रसिद्ध **श्रीरंगपट्टण** हें शहर लुटून अपार संपत्ति नेली. अद्यापि तो त्याच भागांत राहिला असून, शरण आलेल्या राजांकडून खंडणी घेऊन, जे नकार देतात त्यांना शासन करितो. तो येत आहे अशी खबर लागतांच मुसलमान लोक बिनबोभाट किल्ला सोडून जातात ! त्याच्या सैन्याची अशी बेसुमार चलती आहे कीं, अगदीं अल्प काळांत विनाविरोध तो **सुरतेपासून कन्याकुमारीपर्यंतच्या** मुलखाचा स्वामी होण्यास वेळ लागणार नाहीं, असेंच सर्वांस वाटतें. त्याचें कांहीं सैन्य फोर्ट सेंट जॉर्जच्या आसपास आलें होतें असें तेथील एजंटकडून कळलें आहे. लवकरच कांहीं अनिष्ट खबर येईल असें वाटतें.

स. पृ. २८ ले. २६ सु. १०७८ हि. १०८८ रम १५ (१९९३) श. १५९९ कार्तीक व. २ इ. १६७७ नोवें. १

अज सरकार सो———देशक पा पादशापूर

गोकाक येथील अंतो नरसींह यांस हवाल. पा गोकाक यानें विचारलें कीं, गनीम दफे होऊन पा आपणास काबिजाति किती रोजांत होईल ? त्याने बोलिलें कीं, जमादिलाखरीं. ते बात सचोटी जाली. तेव्हां भट मजकुरास ४ गावांत मिळून ६ होनांची जमीन इनाम दिली आहे.

डाग रजिस्टर १६७७ पृ. ३९५-९६ इ. नोवें. १८ न्यू. (१९९४) श. १५९९ कार्तीक व. ८ इ. १६७७ नोवें. ८

कॉरोमंडिलकडील परिस्थिति स्थिरतेची नाहीं. गोवळकोंड्याच्या सुलतानाचें मोंगल बादशहा औरंगजेब व आदिलशहा यांच्याशीं युद्ध जुंपलें आहे. उभयपक्षांतर्फे मोठीं सैन्यें खडीं आहेत. मोंगलांचा वकील गोवळ० कडे गेला असून त्यानें येथें राहिलेली खंडणी व युद्धखर्च मिळून १ कोटी रु.ची मागणी केली ! परंतु गोवळ०नीं ती मान्य केली नाहीं. मच्छलीपट्टणचें २५ सप्टें. चें पत्र आलें. त्यावरून १५ सप्टेंबर रोजीं उभयपक्षांचें युद्ध होऊन त्यांत मोंगल व विजापूरकर यांच्या संयुक्त सैन्यावर गोवळ० च्या सैन्यानें जय मिळविला असें कळतें. परंतु तें खरें वाटत नाहीं. पराजय झाला असल्यास **मोंगलांच्यातर्फे** आणखी सैन्य रणक्षेत्रांत उतरेल. आणि सर्व देश ओसाड होऊन व्यापाराचें भयंकर नुकसान होईल.

इकडे दक्षिण देशांत शिवाजीची एकसारखी प्रगतिच होत असून सर्व ठिकाणीं तो किल्ले व तट बांधीत आहे. एवढा मोठा गाजावाजा होऊनहि शेवटीं त्याचा भाऊ **एकोजी, मदुरेचा** नायक वगैरे राजे लोक आणि खुद्द **विजापूरकर** यांची त्याच्यापुढें मात्रा न चालल्यामुळें आतां त्याला विरोध करण्याची गोष्टच कोणीं बोलत नाहीं.

फॅ. रे. सुरत भा. १०७ पृ. २३-२४ इ. (१९९५) फोर्ट जॉर्ज-सुरत. श.१५९९मार्ग.शु. ६ व शु.१५ इ. १६७७ नोवें. २० व २९

४००० घोडेस्वार घेऊन **शिवाजी विजापूरच्या** किंवा कदाचित् स्वतः-च्या राज्याच्या रोखानें गेला आहे असें ऐकितों. त्याचें बाकीचें सैन्य त्यानें नवजित प्रांतांतच ठेविलें आहे. लवकरच परत येतों, असें सांगून तो गेला आहे. आपलें गेलेलें राज्य परत मिळवावें म्हणून, तसा तो न आल्यास, **एकोजी** आणि त्याचे साथीदार तयारी करीत आहेत. गोवळकोंड्याच्या सैन्याची मोंगल-बहलोलशीं लढाई झाली. तींत गोवळ०चा पराजय झाला. यामुळें थोडें भय वाटतें.

जिंजीकडील मुलखांत ठेविलेला शिवाजीचा भाऊ आणि दुय्यम संतोजी ह्याचें ६००० स्वार व ६००० पदाती एवढें सैन्य, गेले कांहीं दिवस तंजावरच्या **एको-जीशीं** (४ ह. स्वार व १० ह. पायदळ) लढण्यांत गुंतलें होतें. सकाळपासून संध्याकाळपर्यंत युद्ध झालें. त्यांत संतोजीचा पराजय झाला व पाव कोसपर्यंत त्याचा शत्रूनें पाठलाग केल्यामुळें पाऊण कोसपर्यंत तो मागें हटला. छावणींत पोंचल्यावर ह्या पराजयाचे दूरवरचे परिणाम आणि आपली होणारी बदनामी याचा आपल्या बरोबरच्या सरदारांशीं विचार करून त्यांनीं लगेच पोशाख व खोगिरें चढविलीं. निराळ्या वाटांनीं जाऊन, शत्रूचे लोक त्या दिवसाच्या परिश्रमामुळें विश्रांति घेत बेसावधपणें पडले असतां भर

मध्यरात्रीं जाऊन त्यांनीं त्यांची भयंकर कत्तल केली. त्या छाप्यांत त्यांनीं १००० घोडे, ३ मुख्य सेनापती व सर्व तंबू वगैरे सामान मिळविलें. पेंढाऱ्यांनीं त्याशिवाय आणखी १०० घोडे व किरकोळ लूट नेली. बाकीचे एकोजीचे लोक कावेरी पलीकडे **तंजावरास** पळाले. या जयामुळें शिवाजीचा ताबा यापुढें शांततेनें होईल असें वाटतें. मदुरेचा नायक तटस्थ राहिला आहे.

सेन गोवा पृ. १४ }　　(१९९६)　　{ श. १५९९ मार्ग. शु. ७
इ. डिसें. १ न्यू. }　　　　{ इ. १६७७ नोवें. २१

गोव्याच्या गव्हर्नरानें शिवाजीचा वकील **पितांबर** शेणवी याला गोव्यांत येण्यास परवाना पाठविला.

फॅ. रे. सुरत भा. १०७ }　　(१९९७)　　{ श. १५९९ मार्ग. शु. १५
पृ. ९ इ. }　　राजापूर-मुंबई.　　{ इ. १६७७ नोवें. २९

अण्णाजी पंडिताची आमची नुकतीच भेट झाली होती. त्या वेळीं बक्षीस व भरपाईबद्दल बोलण्यास आम्हीं चुकलों नाहीं. दोन्ही बाबतींत त्याची तयारी दिसली. परंतु, आम्हीं सुपारी दिवाण-किंमतीनें खरेदी करून, फर्मानाप्रमाणें त्याची अर्धी किंमत रोखीनें द्यावी व राहिलेली बक्षीस घ्यावी, असें तो म्हणाला. बाजार भावानें माल घेऊं असें आम्हीं म्हणून रोख पैशाऐवजीं आमच्या मालापैकीं वाटेल तें घ्या, म्हणून सांगतांच त्यानें **डचांनीं** त्याला वेंगुर्ल्याला दिलेल्या भावानें तांबें मागितलें. नंतर तो एकदम पन्हाळ्याला गेल्यामुळें आम्हीं त्याच्याशीं पुरता ठराव केला नाहीं. तो परत आल्यावर त्याच्याकडून सुपारी घेतां येईल तितकी घेऊं.

फॅ. रे. सुरत }　　(१९९८)　　{ श. १५९९ मार्ग. व. ९
भा. १०७ पृ. ४३ इ. }　　राजापूर-सुरत　　{ इ. १६७७ डिसें. ८

ह्या प्रांतांत बातमी आजपर्यंत अशीच आहे कीं, **नबाब** मरण पावला व त्याचें सर्व सैन्य नाश पावलें; **दिलेलखानाचीहि** तशीच बिकट परिस्थिति आहे. त्यांच्या सैन्यांतून एकालाहि जिवानिशीं जाऊं न देण्याचा दख्खन्यांचा निश्चय आहे. शिवाजी मेला असावा किंवा त्याचीहि तशीच कष्टप्रद स्थिति असावी. ४००० घोडे स्वार घेऊन त्यानें हुबळी लुटली आणि तो ह्या बाजूला येणार होता, वगैरे सगळी बातमी खोटी होती. कारण, सर्व देशभर दत्ताजी पंडीतच शिवाजीच्या नांवानें धुमाकूळ घालीत फिरत असतो; असें आतां कळलें आहे.

फॅ. रे. मसुली० }　　(१९९९)　　{ श. १५९९ मार्ग. व. १२
भा. १० पृ.? इ. }　फो. सें. जॉर्ज-मच्छलीपट्टण　{ इ. १६७७ डिसें. १०

गोवळकोंडेकरांचा पराजय झाला या बातमीनें तुम्हांला भय उत्पन्न होणें साहजिक आहे. परंतु आमच्या बाजूला त्याच युद्धाची हकीकत उलट सांगण्यांत आली आहे.

फॅ. रे. सुरत
भा. १०७ पृ. ३६ इ.

(२०००)
कारवार-सुरत.

श. १५९९ मार्ग. व. १४
इ. १६७७ डिसें. १३

बहलोलखान व दख्खनी लोकांचा तह घाटत असून, **बहलोलखानाच्या** वतीनें हकीम शमशा या नांवाचा वकील कलमें ठरविण्याकरितां गेला आहे असें कळतें. लवकरच तह होऊन ते सर्व मिळून **शिवाजीचा बंदोबस्त** न करतील तर आमचा व्यापार भरभराटीस येण्याची मुळींच आशा नको.

[से] हुबळीचा सुभेदार ' कंपनीचा माल व लोक आपल्या किल्यांत आणून ठेवा. त्यांचें शिवाजीपासून रक्षण करीन ' असें म्हणतो. शिवाजीचें सैन्य आसपास घिरट्या घालीत असून वसुलाची चौथाई मागण्याकरितां त्याचा एक वकील सुभेदाराकडे आला होता. परंतु त्याला त्यानें नकार दिला. आतां किल्याचें रक्षण करण्याकरितां त्याच्याजवळ द्रव्य नसल्यामुळें कंपनीच्या मालावर त्याचा डोळा असेल असा संशय येऊन त्याच्यावर विश्वास टाकतां येत नाहीं. परंतु अडचणींतून अन्य मार्ग काढतां येईना म्हणून आमच्यापैकीं दोघांना किल्ल्यांत पाठविले आहेत.

सा. ले. ३०३
श.

(२००१)

श. १५९९ पौष शु. १०
इ. १६७७ डिसें. २३

श्रीपतिरावराजे जवार—सोनभट धर्माधिकारी नासिकः—आपलें तीर्थ पौरोहित्य तुम्हांस दिधलें असे. श. १५९३मध्यें पट करून दिला होता तो गनीम मोरोपंत नासकास आला त्या धामधुमेंत हारपला.

सेनगोवा, पृ. १४
इ. जाने. १० न्यू.

(२००२)
चौथची मागणी (पोर्तु.)

श. १५९९ पौष व. २
इ. १६७७ डिसें. ३१

गोव्याचा व्हाइसरॉय पेद्रद आलमेद—**शिवाजी**.

आपला वकील **पीतांबर शेणवी** यानें मला एक खलिता दिला. त्यावरून असें दिसतें कीं, माजी व्हाइसरायांच्या नांवें आपण पत्रें पाठविलीं होतीं; पण कामामुळें त्यांच्याकडून उत्तर गेलें नाहीं. याकरितां हा पत्रव्यवहार शोधून काढण्यास मीं सांगितलें असून त्यांतील प्रश्नांचीं उत्तरें मी देणार आहें. त्यानंतर आपल्या वकिलानें आणून दिलेल्या आपल्या पत्रावरून माझ्या आगमनाबद्दल आपण व्यक्त केलेलें समाधान, आपणास मिळत असलेल्या यशाचें आनंददायक वर्तमान व या दोन राज्यांतील दोस्तीचे संबंध कायम राहण्याविषयींची इच्छा हीं समजून आलीं. " वसई व दमणकडील मुलूख आतां आमच्या ताब्यांत आल्यामुळें तेथील चोथिया राजास पोर्तुगीज अंमलदाराकडून जो चौथ पूर्वी देण्यांत येत होता तो चौथ आतां आम्हांस (= शिवाजीस) देण्याविषयीं वसई व दमण येथील किल्ल्यांच्या कप्तानांना लिहिण्यांत

यानें, असें आपल्या पत्रांत म्हटलें आहे. परंतु मी नुकताच येथें आलों असून यासंबंधींची माहिती सदर कप्तानांकडून मागवीत आहे. तूर्त उत्तरादाखल मी असें सुचवितों कीं, मी नेमून देईन त्या आमच्या वकिलाशीं बोलण्यासाठीं आपण एक अधिकृत वकील पाठवावा. म्हणजे हा चौथ ज्या कराराप्रमाणें देण्यांत येत होता, त्या करारांचीं कलमें तपासून प्रकरण निकालांत काढतां येईल. एकंदरींत पोर्तुगीजांच्या शत्रुत्वापेक्षां त्यांची मैत्री आपणास अधिक फायदेशीर होईल असें मी सुचवितों.

[पृ. १५] पोर्तुगीज व्हाइसराय, कोंदद असुमार यानें (१) **अनाजी दत्तो** सुरनिवीस सुभेदार प्रांत कोकण यांच्या नांवें व (२) **मोरोपंत पेशवे** व प्रधान यांच्या नांवें अशीं दोन पत्रें चौथच्या मागणीबाबत व डिचोलीचा सुभेदार गिरमाजी पंडित याच्या नांवें आणखी कांहीं किरकोळ प्रकरणीं पत्रें पाठविलीं.

सेन-गोवा पृ. १६।१७　　(२००३)　　श. १५९९ पौष व. ७
इ. १५ जाने. न्यू.　　**चौथची मागणी.** (पोतु.)　　इ. १६७८ जाने. ५

गोव्याचा व्हाइसराय—**शिवाजीः**—आपल्या पत्रांचीं उत्तरें मी **पीतांबर शेणवी** याच्या हातीं दिलींच आहेत; **पण मी पोर्तुगालमध्यें होतो तेथेंच आपला लौकिक ऐकला** होता आणि आमच्या बादशहांनींहि मोठ्या उत्सुकतेनें मला बजाविलें होतें, यामुळें आपले आभार मानण्यासाठीं मी हें पत्र मुद्दाम लिहीत आहें. चौथ प्रकरणीं चौल व वसई येथील सुभेदारांनीं ताबडतोब माहिती पाठवावी असें लिहिलें आहे वगैरे मजकूर आपले वकील आपणांस सांगतीलच. त्या पत्रांतून मी आमच्या सुभेदारांना असें लिहिलें आहे कीं "महाराजांच्या सुभेदाराशीं स्नेहाचे संबंध ठेवा व त्यांच्या मुलखांत दंगा व दरवडे घालणाऱ्या कोळ्यांना व चोथ्याच्या लोकांना आपल्या मुलखांत आश्रय देऊं नका." तरी आपणहि आपल्या सुभेदारांना पत्र लिहून आमच्या कप्तानांशीं त्यांनीं सलोख्याचे संबंध ठेवावे असें कळवावें; म्हणजे वितुष्टाचें कारण राहणार नाहीं.

सा. ले. १३१　　(२००४)　　श. १५९९ पौष व. १०
सु. १०७८ जिल्काद २४　　सी.　　इ. १६७८ जाने. ८

त्रिंबक गोपाळ सुभे. व कार. पा पुणें—बजाजी नागनाथ हवालदार
गणो गबाजी तबीब याचा मौ वेहरवडे येथील इनाम पूर्वींप्रो चालविणें.

सा. ले. १२४　　(२००५)　　श. १५९९ माघ शु. २
सु. १०७८ जिल्काद ३०　　इ. १६७८ जाने. १४

माहादाजी अनंत सरसुबेदार—त्रिंबक गोपाळ सुभे. व कार. पर. पुणें
महादेव मुद्गल पुरंदरे याचा इनाम वगैरे पूर्वींप्रो चालविणें.

फॅ. रे. संकीर्ण भा. ४ } (२००६) { श. १५९९ माघ शु. ३
पृ. २७ इ. } मुंबई–कंपनी { इ. १६७८ जाने. १५

शिवाजीला त्याच्या स्वाऱ्यांत एकसारखे जय मिळत आहेत.

ऑर्मे ११४–७ पृ. ३–राजा **शिवाजी**सारख्या व्यापाराच्या महाशत्रूच्या ताब्यांत समोरचा किनारा आहे तोंपर्यंत **मुंबई** बेटाचा व्यापार असाच खालावलेला रहाणार. आणि आम्हांला **अत्यंत वाईट वाटतें** तें अशाकरितां कीं त्याचे अधिकाराला कोठेंच खो बसेल असें चिन्ह दिसत नाहीं [!]. कारण, हिंदुस्तानच्या व दख्खनच्या अशा दोन्ही राजांशीं युद्धें करून एकसारखा तो यशस्वी होतो हा मोठा चमत्कार आहे. हा चमत्कार पुढें तसाच चालू रहाणार अशी फार भीती वाटत आहे.... (दि) तथापि तंबाकूवरील जकातीचें मोठें उत्पन्न पाहून येथें पुष्कळ लोक येतात असा समज होण्याचा संभव आहे. परंतु खेदाची गोष्ट अशी कीं, हे सर्व लोक म्हणजे **मुसलमान व पोर्तुगीज ह्यांच्या जुलमामुळें** बेटावर आलेले हलक्या दर्जाचे लोक आहेत.

ओ. कॉ. भा. ३८ } (२००७) { श. १५९९ माघ शु. ४
नं. ४३१४ इ. } मुंबई–कंपनी { इ. १६७८ जाने. १६

आपली **जगज्जेता म्हणून प्रसिद्धी** व्हावी अशा महत्त्वाकांक्षेनें प्रेरित होऊन, **शिवाजी** कोंकणांतील अत्यंत दुर्गम किल्ला जो **रायरी** तेथून निघून गेल्या पावसाळ्यानंतर, २० ह. स्वार व ४० ह. पदाती घेऊन **कर्नाटकावर** गेला. त्या बाजूला, तेलंगणांतील **जिंजी व तंजावर** हे दोन मोठे किल्ले आहेत. तेथील व्यापारी बहुत सधन आहेत. **स्पेनमध्यें सीझर** ज्याप्रमाणें आला, त्यानें पाहिलें आणि जिंकलें, तद्वत् तेथें **शिवाजीचा** पराक्रम होऊन तेथून त्याला अमर्याद संपत्ति मिळाली; आणि त्यामुळें पुढील युद्धाचा यशस्वी कार्यक्रम पुरा करण्यास त्याला साधनें प्राप्त झालीं. तो ह्लीं **बंका व पूर** [?] या दुसऱ्या दोन दुर्गम किल्ल्यांवर हल्ले करीत आहे. (**अलेक्झांडर धि ग्रेट** इतकाच त्याचा या बाबतींत हातखंडा आहे.) कारण, पूर्वी **जयसिंगाला** दिलेले **२३ दुर्गम किल्ले** त्यानें आपल्या पक्ष्यांप्रमाणें चपल स्वारांच्या साहाय्यानें (त्यांना तो आपले पक्षी, पांखरें असेंच म्हणतो), **मोंगलांपासून** आठ महिन्याच्या आंत परत घेतले. बंका व पूर घेतल्यावर त्यांच्या नजीकच असलेली दख्खनच्या राजाची राजधानी **विजापूर** ह्या किल्ल्यावर तो स्वारी करणार आहे. तो घेतल्यावर मग थेट **दिल्लीवर** चाल करून जाऊन औरंगजेबाला तेथें कोंडून टाकीपर्यंत तलवार म्यानांत न घालण्याची त्यानें देवीजवळ प्रतिज्ञा केली आहे असें म्हणतात. मोरोपंतानें नुकतींच त्रिंबक, नाशीक व मोंगलाईंतील इतर शहरें लुटलीं. त्यामुळें त्याच्या खजिन्यांत पुष्कळच भर पडली...[दि] बादशहाचा मानलेला भाऊ (Fostel Brother) **बहादरखान** शिवाजीशीं लढत होता. त्यानें लांच खाऊन शिवाजीवर मुळींच शस्त्र न धरल्यामुळें ४ महिन्यांपूर्वी

औरंगजेबानें त्याला बोलावून नेलें. आणि त्याच्या पदव्या व खजिना इत्यादि काढून घेऊन त्याला मक्केला लावून दिलें. त्याच्या बदला **दिलेरखान** नांवाच्या पठाण उमरावाला पाठविण्यांत आलें आहे. त्यानें आपला जातवाला विजापूरचा संरक्षक **बहलोलखान** याच्याशीं ऐक्य केलें; तथापि **दक्षिणी हे अधिक चांगले शिपाई व स्वार** असल्यामुळें त्यांनीं त्याचा पराजय केला.

फॅ. रे. सुरत
भा. १०७ पृ. ४७ इ.

(२००८)
कारवार– सुरत

श. १५९९ माघ शु. ४
इ. १६७८ जाने. १६

सर्जेखान व **बहलोलखान** यांची कलबुर्ग्याला लढाई झाली त्यावेळीं झालेल्या जखमांमुळें बहलोलखान मेला अशी बातमी आहे. दक्षिणी पक्षाचे लोक **विजापुरास** आल्याचीहि बातमी आहे. परंतु निश्चित कांहीं सांगतां येत नाहीं. [स्व.] एक महिन्यापूर्वी **अण्णाजी पंडितानें** पाठविलेला **विसाजी कोंडदेव** या नांवाचा वाईट इसम सुभेदार होऊन आला आहे. त्यानें आम्हाला भेट देऊन न्यायानें वागण्याचें वचन दिलें. परंतु आम्हांला त्याबद्दल शंका वाटते.

फॅ. रे. सुरत
भा. ८९ पृ. २६ इ.

(२००९)
सुरत–कंपनी

श. १५९९ माघ शु. ९
इ. १६७८ जाने. २१

रामनगर आणि **पिंडोल** येथील [सुरतेपासून २ दिवसांच्या मुकामावर] शिवाजीचें सैन्य केव्हां **सुरतेवर** चालून येईल याचा नियम नाहीं. सुरतेचा नवा सुभेदार जुन्या सुभेदाराप्रमाणें **गुप्त रीतीनें कांहीं देऊन** अविरोध राखण्याचें साफ नाकारतो. यामुळें लोक भीत आहेत....**राजापूरची वखार** देशांतील युद्धाच्या गोंधळामुळें किफायतशीर झाली नाहीं. दक्षिण्यांशीं झालेल्या युद्धांत बहलोलखान मेला व त्याच्या सैन्याची धुळधाण झाली. दिलेरखानाची अवस्था कष्टप्रद आहे. शिवाजी सर्वत्र निर्धास्तपणें वावरतो. त्याचा एक सेनापती **दत्ताजी पंडीत** हुबळीच्या आसपास लुटालूट करीत फिरत आहे. शिवाजीच्या कर्जेफेडींत मिळणारी सुपारी व नारळ फार कुजके असतात. प्रेसि. रोल्ट येईल तेव्हां ती वखार बंद करण्याचा विचार केला पाहिजे. [स्व. पृ. २९-३० तारीख सदर]-शिवाजी मोठ्या पितळेच्या तोफा मागत आहे. परंतु कर्जफेडीचे पैसे देण्याचे बाबतींत त्याची दिरंगाई पाहतां मागणीचा विचार करावा असें नाहीं. दुसरें कोणी गिऱ्हाईक मिळाल्यास पाहूं.

डाग राजि. इ. १६७८
पृ. ५४ फेब्रु. १ न्यू.

(२०१०)

श. १५९९ माघ शु. १०
इ. १६७८ जाने. २२

अखेर विजयी दरोडेखोर (robber) **शिवाजी** यानें आपला भाऊ एकोजी राजे (जो नागापट्टणजवळील मुलखाचा कांहीं दिवस स्वामी होता) त्यास रणांगणांतून

पूर्णपणें हाकलून देऊन तंजावर शहरांत कोंडलें. सीरखान लोदी यासहि तो थोड्याच दिवसांत जिंकून घेईल असें वाटतें; आणि येथील राजांची आपसांतील भांडणें व दुसरे अंतर्गत घोटाळे यामुळें मदुरेचा प्रदेशहि त्याला जिंकावयास अवघड जाणार नाहीं.

[पृ. ५३] म्हातारा नबाब शाइस्तेखान यास अलमगीरानें दक्षिणेस जाऊन बंडखोर (दरोडेखोर) शिवाजी याविरुद्ध युद्ध सुरु करण्याविषयीं हुकूम केला आहे असें येथील लोक बोलतात.

फॅ. रे. सुरत भा. १०७ } पृ. ६९ इ. — (२०११) कारवार-सुरत. — { श. १५९९ माघ शु. ११ इ. १६७८ जाने. २३

दक्षिणी [पक्षाच्या] लोकांनीं **विजापूर** आपल्या ताब्यांत घेतल्यामुळें व्यापार खुला होईल व भरभराटीस येईल अशी आशा वाटते.

राम. अं. ६५-६६ } हि. १०८६ जिल्हेज २५ — (२०१२) — { श. १५९९ माघ व. १२ इ. १६७८ फेब्रु. ८

रा. जयेसिंगजी राजे—रघुनाथ विठल व विश्वनाथ तिमण सेडगे

तुम्हास वर्षासन रु. १२ केले असेती. तरी श्रींस अभिषेक करणें. आणि वरशासन हुजूर येऊन घेऊन जाणें.

ओ. कॉ. भा. ३८ } नं. ४३१४ इ. — (२०१३) मुंबई-कंपनी. — { श. १५९९ फाल्गुन शु. ३ इ. १६७८ फेब्रु. १४

दक्षिणी [पक्षाच्या] लोकांचा एका किल्याला वेढा पडला असतां त्यांत **बहलोलखान** मृत्यु पावला अशी बातमी राजापूरच्या पत्रांत आहे. डोळे मिटण्यापूर्वी अगदीं थोडा वेळ त्यानें आपले दोन पुत्र **सर्जेखानाच्या** हातांत दिले. आणि त्यानेंहि पूर्वीचें वैर विसरून त्यांचा स्वीकार केला. **बहलोलच्या** दफनाची बातमी विजापुरास येऊन पोंचली नाहीं तोंच जमशेदखानानें शहर व किल्ला **सिद्दी मसाऊदच्या** हवालीं केला. सिद्दी मसाऊद व सर्जेखान असे मोंगल सेनापती **दिलेलखान** याला मिळून ८० ह. घोडदळानिशीं शिवाजीवर त्याचा निःपात करण्याच्या उद्देशानें चालून जाणार आहेत. परंतु **शिवाजी** दुसरा **सेर्टोरिअस** किंवा युद्धकौशल्यामुळें **प्रति-हॅनिबॉलच** आहे हें प्रसिद्ध आहे; आणि आतांच बातमी अशी आली आहे कीं, **गोवळकोंडेकर,** [विजापुरांतील] **दक्षिणीपक्ष** आणि **शिवाजी** या **त्रिवर्गांनीं** मिळून **मोंगलांविरुद्ध एकजूट करून** दिलेलखानाला दख्खनमधून हांकून

काढण्याचें ठरविलें आहे. **शिवाजी** पिछाडीकडून १० ह. स्वार त्याच्यावर पाठविणार आहे; आणि त्यानेंच म्हणून आपल्या राजकारणाच्या जोरावर दक्षिणीपक्ष आणि गोवळकोंडेकर यांना आपल्या स्वतःच्या विरुद्ध **दिलेलखानाशीं** एकी करण्यापासून परावृत्त केलें. [इतर कोणालाहि ही गोष्ट साध्य झाली नसती.] असें म्हटलें पाहिजे.

फॅ. रे. सुरत
भा. ८९ पृ. ५७ इ.

(२०१४)
सुरत-राजापूर

श. १५९९ फाल्गून शु. ५
इ. १६७८ फेब्रु. १५

राजाबरोबर झालेला करार मोडून आणि अथणी वगैरे लुटून शिवाजीच्या लोकांनीं आम्हांला फार वाईट रीतीनें वागविल्यामुळें त्यांच्या सरळ वागण्याबद्दल आम्हीं निराश झालों आहों. तुम्हीं अण्णाजीशीं स्पष्टपणें बोलाच. तो सर्व व्यवस्थित देत असेल तर ठीक आहे, नाहींतर आम्ही वखार काढून घेणार. तुम्ही निघून येण्याची तयारी ठेवा... तुमच्याकडील परिस्थितीमुळें तुमच्याकडे कांहींच माल मागविण्याची सोय राहिली नाहीं. तरी काटकसरीनें रहा.

फॅ. रे. मुंबई
भा. २ पृ. २४ इ.

(२०१५)
मुंबई कन्सल्टेशन

श. १५९९ फाल्गून शु. ९
इ. १६७८ फेब्रु. १९

रिव्हेंज गलबत दक्षिणेकडे जाणार आहे असें कळलें तेव्हां, त्याच्या कप्तानानें दाभोळकडे जाणारीं **शिवाजी**करितां मीठ भरलेलीं सहा गलबतें, सिद्दी कासमच्या हल्ल्यापासून सांभाळून न्यावीं, अशी विनंती नारायण शेणव्यानें डेप्यु० प्रेसि०ला केली. यामुळें मोंगलांना दुखविण्यासारखें होणार असल्यामुळें डे० प्रेसिडेंट ही विनंती मान्य करण्यास तयार होईना. परंतु इंग्रजांची मदत करण्याची तयारी शिवाजीच्या अधिकाऱ्यांना दिसून यावी एवढ्याचकरितां कॅप्टन मिंचिनला असा हुकूम देण्यांत आला कीं, त्यानें शिवाजीचीं गलबतें बरोबर न्यावीं. मार्गांत कोणीं त्यांना धरण्याचा प्रयत्न केल्यास तीं आपल्या बेटावरील आहेत असें सांगून पहावें. याउप्पर कोणी जबरदस्तीनें पकडूं लागले तर तोंडी प्रतिकार करावा. परंतु तोफा डागणें अगर अन्य तऱ्हेनें शत्रुत्वानें वागणें हे प्रकार **सिद्दी कासम** किंवा त्याचें आरमार यांच्याविरुद्ध करूं नयेत.

फॅ. रे. मुंबई
भा. ८ पृ. १५ इ.

(२०१६)
मुंबई-- कॅप्टन् मिंचिन

श. १५९९ फाल्गून शु. ९
इ. १६७८ फेब्रु. २०

ह्या बेटाचा रहिवासी व व्यापारी **नारायण** शेणवी यानें शिवाजीपासून ६ गलबतें खरेदी करून तीं मिठानें भरून पाठविण्याचें योजिलें आहे.... पूर्वीं तीं **शिवाजीचीं** होतीं म्हणून कोणीं त्यांस पकडील तर तुम्हीं त्यांना बरोबर घेऊन रक्षण करावें. प्रथम हीं गलबतें आपल्या बेटावरील आहेत वगैरे सांगून कांहीं उपयोग न होईल तर मग

बादशहाच्या नांवानें प्रतिकार करून 'यापुढें तुमच्या पकडण्यामुळें आमच्या व्यापारी गलबतांचें होणारें नुकसान तुम्हांला भरून द्यावें लागेल अशी तोंडी ताकीद द्यावी. परंतु कोणत्याहि प्रकारचा सशस्त्र प्रतिकार करूं नये.

फॅ. रे. सुरत } (२०१७) { श. १५९९ फाल्गुन शु. १०
भा. १०७ पृ. ४९ इ. } मुंबई-सुरत (?) { इ. १६७८ फेब्रु. २१

दक्षिण्यांविरुद्धच्या लढाईंत मोंगलांचा सेनापती असलेला **दिलेरखान,** शिवाजीनें थोड्याच दिवसांपूर्वी लुटलेल्या **नासिकत्रिंबकपर्यंत** आला. परंतु दक्षिणी वजिरांशीं झालेल्या युद्धांत त्याच्या सैन्याचा इतका मोड झाला कीं, शिवाजी त्यास कःपदार्थ समजून, **विजापूर व भागानगर येथील राजांना मिळून,** पूर्वी विजापूरच्या राज्यांतले कांहीं किल्ले आतां मोगलांच्या ताब्यांत आहेत ते सोडविण्याचा विचार करीत आहे. याबद्दल खरें कांहींच सांगतां येत नाहीं.

फॅ. रे. सुरत } (२०१८) { श. १५९९ फाल्गुन व. १
भा. १०७ पृ. ७१ इ. } कारवार-सुरत { इ. १६७८ फेब्रु. २७

हुबळीहून नुकतीच बातमी अशी आली कीं, दक्षिणी पक्षाच्या वतीनें **विजापूरचा** ताबा **सिद्दीमुर्शीदच्या** [मसाऊद?] हातीं आहे. परंतु निश्चित कांहीं सांगत येत नाहीं.

फॅ. रे. सुरत } (२०१९) { श. १५९९ फाल्गुन व. २
भा. १०७ पृ. ६० इ. } राजापूर-सुरत { इ. १६७८ फेब्रु. २८

शिवाजीचें देण्यापैकीं बरेंच यावयाचें असून, त्याच्या मोबदला **सुपारी** घेण्याची परवानगी तुम्हीं दिल्यास, तें वसूल होईल असें वाटतें. कारण, ह्या हिंदू लोकांच्या हातांतून रोख पैसा काढणें अत्यंत कठीण असून, सुपारीशिवाय इतर माल बहुतेक मिळण्यासारखा नाहींच.

इकडील राजकीय परिस्थितीविषयीं पक्की बातमी म्हटली म्हणजे **नबाब मरण पावला** ही होय. **दिलेरखान** परत गेला. ५०००० घोडेस्वारांचें दक्षिणी सैन्य **सर्जेखान व सिद्दी मसाऊद** यांच्या नेतृत्वाखालीं विजापुरावर चालून आलें. नबाबाचा गुलाम **जेमसीरखान** याजपाशीं त्यांनीं शहराचा ताबा मागितला. त्यानें गेल्या नवचंद्र रोजीं ताबा देण्याचें कबूल केलें. त्यांनीं या प्रवेशाच्या गंभीर प्रसंगीं, आपला नेता ह्मणून हजर रहाण्यासाठीं **शिवाजीला** बोलाविलें आहे. नाहींतर खर्चासाठीं त्यानें ८० लक्ष होन पाठवून द्यावे अशी त्यांची मागणी आहे. हल्लीं शिवाजी एका किल्ल्याला वेढा घालण्यांत गुंतला आहे. त्याच्याच लोकांच्या सांगण्यावरून, असें दिसतें कीं, मोंगल

किंवा दक्षिणी यांच्या हातून कधींहि झाला नाहीं असा **मानहानीकारक पराजय** त्याचा त्या ठिकाणीं झाला. ज्यानें आजपर्यंत इतकीं अनेक राज्यें जिंकून घेतलीं तो एका **देसाई स्त्रीचें** पारिपत्य करूं शकला नाहीं ! अशा रीतीनें नबाबाचा मृत्यु, दक्षिणीलोकांच्या एकजुटीचें सामर्थ्य, आणि शिवाजीच्या भाग्याला लागलेली ओहोटी या गोष्टी एक समयावच्छेदेंकरून घडून आल्या आहेत. त्या अर्थी व्यापाराला चांगले दिवस येतील असें वाटतें. कारण, या चालू अंदाधुंदीच्या मुळाशीं खरोखर कोणी असतील तर ते **शिवाजी** आणि **नबाब** हेच दोघे होते.

[से] **अण्णाजी पन्हाळ्याला** आहे.

सेन गोवा पृ. १८ } (२०२०) { श. १५९९ फाल्गु. व. ४
इ. मार्च १२ न्यू. } { इ. १६७८ मार्च २

पोर्तुगीज अधिकारी—वेंगुर्ल्याचा **हवालदार तानाजी राम**:—आमच्या खलाशांनीं आपला मचवा अडवून ठेवला आहे तो सोडण्याविषयीं आपण पत्र लिहिलें; त्याबाबत उत्तरीं कळविण्यांत येतें कीं, सदर मचवेवाल्यानें आमचा परवाना काढला नव्हता; यामुळें तो मचवा पकडण्यांत आला. परंतु पोर्तुगीज राज्याचा **शिवाजी**राजाशीं सलोख्याचा संबंध असल्यामुळें तो मचवा सोडण्याचा हुकूम दिला आहे. आमच्या राज्यांत शिवाजी राजांच्या प्रजाजनांना स्नेहानें वागविण्यांत येईल.

सा. ले. ३६४ } (२०२१) { श. १५९९
मु. १०७८ } कौल { इ. १६७७

अज दि. खडो बायेदेऊ हवा व कार. सा। अथणी—ता। महानाड व रया का। अथणी महाराजसाहेब रा। व पंत यांचा उल्लेख व का। अथणीची पेठ मामुरी करण्याचें काम.

श्री सां. चा. २६ } (२०२२) { श. १५९९
श. ? } { इ. १६७७

दत्ताजी त्रिमल—दिवाकर गोसावी

छत्रपती स्वामी कर्नाटकांतून स्वारी करून सज्जन गडी दर्शनास गेलें तेथें विनंती केली " श्रीनीं पूर्वी बीरवाडीचे मुकामी सिवथर प्रांति असतां मध्यें महानदी महापूर आणि अकस्मात् रात्री पलंगापासी येऊन चमत्काररूपें दर्शन दिले. दुसरें दिवशीं सुंदरमठी भेटी झाली. आशीर्वाद व देशप्राप्तीचे चीन सुचविले. चाफळ येथील देवस्थानास गाउ मुकासे द्यावे म्हणून दूरदूर देशी गांवाची नांवें सांगितली. चाफळचे देवालय उकलून कर्नाटक रीतीची इमारत करावयाची आज्ञा मागितली तें राहविली." मग सज्जनगडी मठ बांधण्याची आज्ञा मागितली. ते कार्य चाली लाविले. श्रीचे पूजेस चाफला सानिध अकरा गांव इनाम दिलें. ते पावलें म्हणोन प्रसादार्थ परत दिलें. ऐसियास आणिक ११ गांव

१२१ खंडी धान्य व ११०० होन ऐसे चालवावे ऐसा निश्चय केला. श्री रामदास स्वामी तो उदाशीन स्थिती. परंतु त्यांची आज्ञा पूर्वीच आहे कीं देवाचा उत्सव उत्तरोत्तर वृद्धींते पावेल. पूर्वी संकल्प केल्याप्रमाणें राज्याभिषेक प्रसंगीचे अलंकार व अकरा मणाची स्वयंपाक-पात्रें पाठविली ती श्रीस समर्पणें .... व उत्सव चालविण्याबद्दल श्री छत्रपति स्वामींची पूर्वींची आज्ञा आहे. तरी तेणेंप्रमाणें करणें.

श्री. वि. ले. १९ } ? (२०२३) फा. सी. { श. १५९९ इ. १६७७

जयसिंगजी राजे-राजो पंडित.

रघुनाथ व विश्वनाथभट हे आपले वेरूळचे तीर्थपुरोहित आहेत.

हि. रे. भा. ११ } पृ. ९० फसली ? } (२०२४) दारवा परणा, देशमुखांचें वेतन. { श. १५९९—१६०० इ. १६७७

परगण्यांतील ११३ गांवें ब्राह्मण, रजपूत, मराठे व मुसलमान जातींच्या ८ देश-मुखांत विभागून दिलीं होतीं. सर्वांत मिळून १,५८,२९७ टक्के वांटून दिले.

हिस्टॉ. मिसलेनी } जेस्विट लेटर्स, पृ. १७ इ. } (२०२५) जेस्विटांचा वृत्तांत. { श. १५९९-१६०० इ. १६७८

तंजावरांत अनेक क्रांत्या झाल्यामुळें प्रजेला अनिष्ट परिणाम भोगावे लागले आहेत. मदुरेचा मांडलीक व रामनदाचा सेतुपती मारव यानें अरण्याच्या बाजूनें तंजावरावर अनेक हल्ले चढविले. एकोजीचें मुख्य सामर्थ्य घोडदळांत असे. आणि असल्या अरण्यांत घोडदळ निकामी असल्यामुळें मारवानें वारंवार हल्ले करून [इ. १६८३ चें पत्र] एकोजीच्या राज्याचा कांहीं भाग जिंकला.

[पृ. १९]-ह्या अधिकाऱ्याचा [एकोजीचा] अमल त्याच्या भावापेक्षां पुष्कळ बरा वाटतो. कारण जुलूम करतांना प्रजा जगावी अशी तरी तो काळजी घेतो.

लेटरबुक भा. ५ } पृ. ५२९, ५३४ इ. } (२०२६) कंपनी-सुरत { श. १६०० चैत्र शु. ३ इ. १६७८ मार्च १५

शिवाजीनें, दहा हजार होन द्यावयाचे ते केवळ कंपनीच्या नुकसान भरपाईबद्दल द्यावयाचे, कीं सर्व इंग्रजांच्या नुकसान भरपाईबद्दल द्यावयाचे आहेत हें कळवा. जर ते सर्वांच्या नुकसानीबद्दल असतील तर प्रत्येक व्यक्तीचें व आमचें नुकसान किती तें तपशीलवार कळवून त्या बाबतींत झालेला वसूल, लागलेला

खर्च, व झालेली नक्की जमा वगैरे कळवावें. म्हणजे निरनिराळ्या लोकांचें देणें प्रमाणांत देऊन टाकूं.........

२० मार्च (१६७७) च्या पत्रांत **शिवाजीचें** सैन्य जवळ आल्यामुळें भीती वाटल्याचें तुह्मीं लिहिलें. परंतु ७ एप्रीलच्या पत्रांत त्याबद्दल कांहींच लिहिलें नाहीं हें कसें ?

फॅ. रे. सुरत भा. ८९ } पृ. ७० इ. (२०२७) सुरत (स्वाली)-कंपनी. { श. १६०० चैत्र शु. ६ इ. १६७८ मार्च १८

राजापूर, कारवार आणि कालिकत येथील वखारींची परिस्थिति बरीच अस्थिरतेची आहे. पहिल्या दोहोंवर दख्खनमधील यादवीचा आणि शिवाजीच्या त्रासाचा परिणाम झाला. आणि झामोरीनच्या हाताखालील राजे व सुभेदार यांच्या दुर्वर्तनामुळें कालिकतला पुष्कळच जाच झाला. योग्य वेळीं ही स्थिति दुरुस्त करण्याची काळजी घेतां येणें शक्य नसेल तर तेथून आपल्या नोकरांना काढून घ्यावे हेंच उत्तम.

(से) फॅ. रे. सुरत भा. १०७ पृ. ७३ इ. } (२०२८) मुंबई-सुरत { श. १६०० चैत्र शु. १५ इ. १६७८ मार्च २८

सिद्दी आरमारासह दंडाराजपूरपर्यंत आला असून येथेंच पावसांत राहून त्रास देण्याची त्याची इच्छा दिसते. आमचा विरोध असतांनाहि तो येथें रहाण्याचा हुकूम मिळवितो असाच अनुभव येतो. तेव्हां आपल्याकडून उलट हुकूम आला नाहीं तर आम्हीं त्याला नकार देणार नाहीं. परंतु आमच्या सुरक्षिततेच्या दृष्टीनें त्यानें बरेंच सैन्य कमी करावें असा आग्रह धरूं.

[ऑर्म ११४--७ पृ. १७]—सिद्दी संबूळच्या दोन नोकरांचीं मुलेंमाणसें दंडाराजपुरीच्या सिद्दीच्या हातून सोडविण्याच्या खटपटींत आम्ही आहों. सदर इसम संबूळचे नोकर नसून किल्ल्याचे नायकवाडी आहेत व त्यांच्या सेवेची किल्ल्याला जरूरी आहे; असें दंडाचा सिद्दी माजी गवर्नराला सांगत असे [पृ. १९]. वल्लभ गंगादास नांवाचा व्यापारी **शिवाजी** राजाचा बातमीदार आहे अशा संशयावरून सुरतेच्या सुभेदारानें पकडला आहे. त्याच्याकडून आमचें येणें आहे, करितां त्याचीं सुपारीचीं २ गलबतें पकडावीं. येथून तीं त्याच्या ज्या भावानें पाठविलीं. त्याला आम्हीं कैद केलें आहे.

फॅ. रे. सुरत भा. ८९ } पृ. ७२ इ. (२०२९) सुरत-मुंबई. { श. १६०० चैत्र व. ३ इ. १६७८ मार्च ३१

सुरतेचा सुभेदार महमद बेग यानें **सिद्दी कासम**ला मुंबईंत राहूं देण्याबद्दल विनंति केली आहे. ह्या भागांतील कंपनीचे हितसंबंध लक्षांत घेतां प्रयत्न करूनहि त्याला नकार देणें आम्हांला अशक्य झालें.

फॅ. रे. सुरत भा. १०७ } (२०३०) { श. १६०० चैत्र व. ७
पृ. ८० इ. } राजापूर–सुरत { इ. १६७८ एप्रील ३

विजापूरचा किल्ला दक्षिण्यांच्या ताब्यांत आहे. **सिद्दी मसाऊदनें** एक विलक्षण युक्ति करून तो घेतला. नबाबाच्या मृत्यूनंतर किल्ला हातांत राखणें थोडें जड जाऊं लागल्यामुळें जेमशीरखानानें ६ लाख होन घेऊन तो **शिवाजीला** देण्याचें कबूल केल्याची बातमी ऐकून, सिद्दी मसाऊदखानानें आजाराची बतावणी करून नंतर आपण मेल्याचेंहि जाहीर करविलें. पुढें आपल्या प्रेताच्या पेटीबरोबर कांहीं सैन्य अदोनीकडे पाठवून दिल्यावर राहिलेल्या ४००० सैन्याकडून जमशीरखानाकडे नोकरीबद्दल विनंति करविली. 'आपला धनी मेल्यामुळें निराश्रित झालों' असें सांगणाऱ्या या लोकांवर विश्वास ठेवून जमशीरखानानें त्यांना किल्ल्यावर घेतलें. पुढें दोनच दिवसांत ह्या लोकांनीं खानाला गिरफदार करून दरवाजे उघडले आणि सिद्दी जीवंत शहरांत शिरला. **शिवाजीला** [तिकडे जातांना] रस्त्यांतच ही खबर लागल्यामुळें तो परतला. थोडेच दिवसांत तो **पन्हाळ्यावर** येईल अशी अपेक्षा आहे.

सर्जेखान मध्यंतरीं पुढें काय करावें याबद्दल **कुतुबशहाचा** सल्ला घेण्याकरितां गेला होता. इतक्यांत अशा रीतीनें किल्ला घेतल्याची बातमी कुतुबशहाच्या कानीं जाऊन त्यानें युद्धखर्चाकरितां कर्जाऊ दिलेल्या १ कोटी होनांची दक्षिण्यांना सूट दिली! आतां **शिवाजीला** कोंकणांतच येनकेनप्रकारेण डांबून ठेवण्याच्या इरादानें तो स्वतः शिवाजीवर जाऊं इच्छितो.

पिसु. शिवा. पृ. ५० टीप २ } (२०३१) { श. १६०० चैत्र व. ७
इ. एप्रील १३ न्यू. } { इ. १६७८ एप्रील ३

गोव्याचा गव्हर्नर——दों मनवेल लोब द सिल्व्हेर.

गावखंडीबद्दल जुझेफ दे मेल यानें सांगितलें आहे कीं, दोन वर्षांची खंडणी दिली असून चालू सालची खंडणी तेवढी द्यावयाची आहे. तरी पैसे जमविल्यावर **मोरो त्रिमळ प्रधान** किंवा शिवाजीचे सुभेदार यांना कळवावें कीं, **सायबानच्या** [?] किल्यांत येऊन त्यांनीं पैसे न्यावे. शिवाजीच्या लोकांनीं परस्पर खंडणी घेण्यापेक्षां आपण जर आपल्या लोकांकडून खंडणी वसूल करून शिवाजीस दिली तर तें चांगलें.

(से.) फॅ. रे. सुरत } (२०३२) { श. १६०० चैत्र व. ९
भा. ८९ पृ. ७९ इ. } सुरत–राजापूर { इ. १६७८ एप्रील ५

रोख पैसा मिळत नसेल तर त्यांतल्या त्यांत कसोशीनें भाव ठरवून शिवाजीकडून सुपारी घ्यावी.

ताजाकलम— या सोबत **राजाच्या वहींतून**, सोनगांव व अथणी येथून

कंपनी व तिचे नोकर लोक यांच्यापासून **शिवाजीनें लुटलेल्या मालाच्या यादीची नक्कल** पाठविली आहे. तीवरून व तुमच्या पुस्तकांवरून तुम्हीं नुकसान-भरपाईबद्दल मागणी करा.

खं. २१ ले. ६७ } (२०३३) { श. १६०० चैत्र व. ११
श. } { इ. १६७८ एप्रील ७

मल्लारी गोस्वामी सदाव्रती इनामदार मौ. नाडोली यीही वे. विश्वनाथभट्ट गिजरे वास्तव्य कऱ्हाड यांस नाडोली येथील ३ रुके जमीन इनाम दिली आहे.

डाग रजिस्टर १६७८ } (२०३४) { श. १६०० वैशाख शु. १
पृ. १४९ इ. एप्रील २२ न्यू. } नागापट्ट.–बटे. [१३फेबु.] { इ. १६७८ एप्रील १२

तंजावरकडे तांदुळाचें उत्पन्न साधारण आलें, परंतु शिवाजीच्या व मदुरेच्या सैन्यांनीं तंजावरकडील मुलखांत शिरून फार नासाडी केली. संकटांत सांपड-लेल्या व हताश झालेल्या एकोजी राजाशीं तह करण्याकरितां जात असतां वाटेंत मदुरेच्या लोकांकडून बरीच मोठी रकम वसूल करण्याकरतां तो लुच्चा शिवाजी येथें थांबला होता.

डाग रजि. १६७८ } (२०३५) { श. १६०० वैशाख शु. २
पृ. १५० इ. एप्रील २३ न्यू. } { इ. १६७८ एप्रील १३

पालियाकटच्या गव्हर्नराचें २१ जानेवारीचें पत्र:–दक्षिणेकडील बाजूस शिवाजीनें मदुरेच्या नायकाशीं तह केला असें दिसतें. परंतु आमच्या वाटाघाटींत मात्र, फायद्याचें व हिताचें असें फारसें निष्पन्न झालें नाहीं.

(से.) फॅ. रे. सुरत } (२०३६) { श. १६०० वैशाख शु. ९
भा. १०७ पृ. ८१ इ. } मुंबई-सुरत { इ. १६७८ एप्रील २०

मुंबईहून मोंगलांनीं ४ पितळी तोफा घेतल्या.

फॅ. रे. सुरत } (२०३७) { श. १६०० वैशाख शु. १३
भा. ८९ पृ. ९२ इ. } सुरत–राजापूर { इ. १६७८ एप्रील २४

आम्हांला आतां शिवाजीच्या अंमलदारांचा क्षुद्रपणा कळला असून यापुढें त्यांच्या गोड थापांना भुलण्याची आमची इच्छा नाहीं. योग्य अपेक्षा पुऱ्या होत नसतील तर आम्ही तुमची वखारच तेथून उठवूं. गेल्या पत्रांत सुपारी घेण्याची तुम्हांला मोकळीक दिली होती. त्या बाबतींत तुम्हीं कांहीं केलेंच असेल. बक्षिसाच्या रकमेबद्दलहि सुपारी घेण्यास आमची हरकत नाहीं. शक्य तोंपर्यंत गोडी व पांढरी सुपारी मिळवा. चिकणी घेऊं नये. कारण चिकणी तेथल्यापेक्षां इकडेच अधिक स्वस्त मिळते.

(से) फॅ. रे. सुरत भा. १०७ } (२०३८) { श. १६०० वैशाख व. १०
पृ. ९१-९२ इ. } कारवार-सुरत { इ. १६७८ मे ५

उद्दाम आणि जुलमी वर्तनामुळें राजापूरच्या व्यापारी लोकांनीं तेथील सुभ्यावरून घालवून लावलेला **विसाजी कोंडदेव** सुभेदार होऊन इकडे आला आहे. तो आमचे पूर्वापार हक्कांवर जुलमानें गदा आणावयास पहातो. परंतु आम्ही त्याचें कांहीं चालूं देणार नाहीं. **हुबळीचा** सुभेदार **अंतू पंडित** आणि मुख्य व्यापारी किंवा महाजन (Manhar ?) असे उभयतां फारच त्रास देतात. **शिवाजीशीं** हुबळी विलायतेबद्दल **चौथ देण्याचा** त्यानें **तह** केला आहे तो देण्याकरितां आणि नगररक्षणार्थ त्याला सैन्य ठेवावें लागतें त्याच्या खर्चाकरितां म्हणून त्यानें **श्रीमंतांवर** बसविलेल्या **करा**पैकीं आम्हीं ५०० होन दिले नाहींत; म्हणून त्यानें आमची वखार फोडून पाव हिसा कापड नेऊन त्याचा लिलांव मांडला. अशा जुलमाबद्दल विजापुरास आम्ही तक्रार एका बनियामार्फत करीत आहोंत.

अशी उडती बातमी आली आहे कीं, शिवाजी **पन्हाळ्यावर** असल्यामुळें त्याच्यावर स्वारी करण्याकरितां विजापुराहून एक दक्षिणी पक्षाचें सैन्य निघालें आहे. सेनापती कोण आहे तें कळलें नाहीं.

सेन गोवा पृ. १९ } (२०३९) { श. १६०० ज्येष्ठ शु. ३
इ. मे २३ न्यू. } पोर्तु. अधिकारी-**पितांबर शेणवी** { इ. १६७८ मे १३

आपल्या जहाजाची सुटका होण्याविषयीं आपण लिहिलें. त्या बाबतींत आपणास हें माहीत असलें पाहिजे कीं, हिंदी महासागरांत पोर्तुगीजांचा परवाना घेतल्यावांचून कोणत्याहि जहाजास संचार करतां येणार नाहीं.

फॅ. रे. सुरत भा. १०७ } (२०४०) { श. १६०० ज्येष्ठ व. १
पृ. १०४ इ. } फो. सें. जॉर्ज-सुरत { इ. १६७८ मे २७

शिवाजी स्वदेशांत गेल्याला बरेच दिवस झाले. तिकडे परत गेल्यावर मोंगल सेनापती **दिलेरखान** याच्याशीं त्याला बऱ्याच लढाया द्याव्या लागल्या. या भागांत त्यानें जिंकलेला मुलूख त्याच्या लोकांच्या अमलाखालीं शांततेंत आहे. त्याचा भाऊ **एकोजी** यानें ३ लक्ष होन रोख हातांत दिल्यामुळें **शिवाजीनें** त्याला कांहीं मुलूख परत देऊन त्याच्याशीं पक्का तह केला.

फॅ. रे. सुरत भा. ८९ } (२०४१) { श. १६०० ज्येष्ठ व. ६
पृ. १०४ इ. } सुरत-कारवार { इ. १६७८ मे ३१

कारवारला शिवाजीच्या अंमलदारांचा त्रास होतो व हुबळीला **विजापुरी**

अमलदारांचा त्रास होतो. विशेषतः हुबळीचा वखार फोडण्याचा प्रकार अकल्पित असाच वाटतो. तरी वखार मोडून हुकूम जाईल तेव्हां निघण्याची तयारी ठेवा.

खं. १५ ले. ४४४ } (२०४२) { श. १६०० ज्येष्ठ व. ९
सु. १०७९ हि. १०८८ } कतबा फा. मु. { इ. १६७८ जून ३

मोक. व रया मौ. सावरदरी पर. चाकण— साहेबाचे बंदगीस

साहेबांचे हुकुमाप्रमाणें सावरदरीची मामुरी करणेकरितां जमाबंदी मुशकश केली. याप्रमाणें उगवणी करूं.

शि. प्र. पृ. ८५ } (२०४३) { श. १६०१ ज्येष्ठ व. १४
सु. १०७९ रखर २७ } खुर्दखत. फा. मु. व सी. { इ. १६७८ जून ८

अजर. शर्जाखान—बजा. हुदे. व मोक. मौ. नंदस्वर सर. कोकटनूर

यादव गौडा फर्जंद जखगौडा देसाई पर. तेरदल याचा वडील भाई कृष्ण गौडा देसाई देसगत करीत असता **शिवाजी** राजे याचे सुबेदार गंगाजी महादेऊ यानें तमदडी गावास अजार दिधले. यावरी देसाई गनिमावरि पडला व फौत जाला. तेव्हां यादवगौडा यास नंदेस्वर येथें १ चावर जमीन इनाम दिली आहे. ती चालविणें.

फॅ. रे. सुरत भा. १०७ } (२०४४) { श, १६०० आषाढ शु. ५
पृ. १०९ इ. } कारवार-सुरत { इ. १६७८ जून १४

पावसाळा संपतांच **शिवाजीवर** स्वारी करण्याच्या तयारीनें २५, ३० ह. स्वार घेऊन **सर्जेखान** विजापुरास सज्ज होऊन राहिला आहे. नुकताच राजापूरच्या आमच्या दोस्तांना भेट देऊन तेथून **शिवाजी पन्हाळ्याला** गेला अशी बातमी आहे.

(से) फॅ. रे. सुरत भा. १०७ } (२०४५) { श. १६०० आषाढ शु. १०
पृ. ९८-९९ इ. } मुंबई-सुरत { इ. १६७८ जून १९

सिद्दीला मुंबईत ठेवल्यामुळें **शिवाजी** बराच नाखूष झाला आहे. त्याच्यापासून बचाव करण्याकरितां माजगांव येथें व बेटांत येण्याच्या सर्व रस्त्यांवर आम्हांला मजबूत पहारे ठेवावे लागतात (ऑर्म ११४-७ पृ. २४).

फॅ. रे. सुरत भा. १०७ } (२०४६) { श. १६०० आषाढ शु. ११
पृ. १११ इ. } राजापूर-सुरत { इ. १६७८ जून २०

सर्जेखानानें अथणी व रायबाग येथून शिवाजीचे लोकांना हाकून लावून उभय ठिकाणीं आपलें सैन्य ठेविलें.

फॅ. रे. सुरत
भा. १०७ पृ. ११८ इ. } (२०४७) कारवार-सुरत { श. १६०० आषाढ व. ६
इ. १६७८ जून २९

सर्व प्रकारच्या व्यापारांत पुढारलेल्या दख्खनची सुस्थिति उध्वस्त करणारा महा-बंडखोर **शिवाजी** एकदां आपल्या किल्ल्यांत जाऊन बसावा किंवा **विजापूर**ला सज्ज होणाऱ्या दक्षिणी सैन्याकडून पुरता मोडला जावा असें आम्हांला मनापासून वाटतें ! (परंतु तें कसें होणार ?) आपलें नाजूक कातडें भिजूं नये म्हणून हे घरांत बसून राहिले आहेत ! तर **आमचे महाराज** मजेंत त्यांच्या राज्यांतील बऱ्याच आणि उत्तम भागांत संचार करून सर्वत्र नाश, दरोडा, लूट करून, सगळीकडे मुलूख ओसाड आणि बेचिराख करून टाकीत आहेत ! !

[से]—शिवाजीच्या जाळपोळीमुळें व लुटीमुळें खरेदीकरितां पैसा वगैरे देतां येत नाहीं. त्यानें मुलगुंद, लक्ष्मीश्वर, गदग इत्यादि महत्त्वाच्या पेठाच उध्वस्त केल्या.

सेन गोवा पृ. १९
? } (२०४८) { श. १६०० आषा. कार्ती.
इ. १६७८ जून–आक्टो.

पोर्तुगीज कमिशनर सांद—**शिवाजी** राजे.

आपलें पत्र पोंचून आपली प्रकृती चांगली असल्याचें वृत्त समजून आनंद झाला. दोनहि संस्थानांतील स्नेहसंबंध कायम रहावा अशी आपल्याप्रमाणें माझीहि इच्छा आहे. आमच्या (पोर्तुगीजांच्या) राज्यांतील कांहीं दंगेखोर आपल्या राज्यांत जाऊन चोऱ्या वगैरे करतात असें आपल्या पत्रांत लिहिण्यांत आलें. तरी हा अनिष्ट प्रकार बंद पडावा ह्मणून मी किती कसोशीनें खटपट करतों हें डिचोलीच्या सुभेदारांना माहीत आहे; आणि असे दंग्याचे प्रकार मला मंजूर असून माझ्या परवानगीनें होतात असें म्हणणें योग्य नाहीं. कप्तानांच्या हलगर्जीपणामुळें असे प्रकार क्वचित् घडतात हें खरें. अशा दंगेखोरांना पकडून त्यांच्या साथीदारांचीं नांवें समजून घ्यावीं व त्यांनाहि पकडावें; असें मीं त्यांना कित्येकवेळां लिहिलें आहे. पितांबर शेणवी मरण पावल्यानंतर वकिलाच्या जागीं आपण कोणाची नेमणूक केली नसल्यामुळें अडचण पडते. तरी ही नेमणूक करावी.

डाग रजि. १६७८
पृ. ३६७ इ. १२ जुलै न्यू. } (२०४९) { श. १६०० आषाढ व. ९
इ. १६७८ जुलै २

मच्छलिपट्टणकडील एका पत्रांतील मजकूर—त्या भयंकर बंडखोर शिवाजीचें सैन्य औरंगाबादेपासून सुरतेजवळच एके ठिकाणीं येऊन पोंहोचलें व ज्या ज्या मुलखांतून तें सैन्य गेलें त्या त्या मुलखांतून त्यानें चौथाई वसूल केली. मोंगल बादशहा व विजापूरचा राजा यांनीं, त्याच्या विरुद्ध युद्ध करण्यास व जितका शक्य आहे तितका त्याचा नाश करण्यास, एकत्र व्हावयाचें ठरविलें होतें.

सेन गोवा पृ. १७ इ. १२ जुलै न्यू.   (२०५०)   श. १६०० आषाढ व. ९ इ. १६७८ जुलै २

पोर्तुगीजांचा कमिशनर–मराठ्यांचा वकील **पितांबर शेणवी.**

चौथ प्रकरणीं चौलकडून माहिती मागविली आहे असें माजी गव्हर्नरांनीं आपणास कळविलें होतें; पण सदर गव्हर्नर निघून गेल्यामुळें कप्तानाकडून वेळेवर माहिती आली नाहीं; आणि हें राज्य कोणत्याहि शेजारच्या राज्याचें मांडलीक नाहीं हें कळवितां आलें नाहीं. पण शिवाजीराजे यांच्याशीं स्नेहसंबंध राखण्याची इच्छा असल्यामुळें कप्तानाकडून आलेल्या माहितीकडे मी लक्ष देत नाहीं. पण त्या माहितविरून असें दिसतें कीं, चोथिया राजाचे प्रजाजन दमण परगण्यांतील कांहीं गांवच्या लोकांना दंगा व चोऱ्या करून त्रास देत असत; तो त्रास चुकविण्यासाठीं या गांवकऱ्यांनीं पोर्तुगीज गव्हर्नरास न कळवितां आपल्याच जबाबदारीवर चोथिया राजाशीं कांहीं खंडणीची बोली केली होती. त्या बोलीवरून पुढें कांहीं अटी वगैरे ठरून करार झाला. आणि आतां तें राज्य शिवाजीराजे यांच्या ताब्यांत गेलें आहे असें समजल्यामुळें चोथिया राजाला जी चौथाई देण्यांत येत होती ती आतां शिवाजीराजे यांना देण्यांत येईल. तरी शिवाजीराजे यांजकडून बोलणें करण्यास माणसें यावीं.

(से) फॅ. रे. सुरत भा. १०७ पृ. ११९ इ.   (२०५१) कारवार–सुरत   श. १६०० आषाढ व. १० इ. १६७८ जुलै ३

शिवाजीच्या भीतीनें इकडे कोणीं पैचाहि माल घेण्यास तयार नाहीं.

(से) फॅ. रे. सुरत भा. १०७ पृ. १२४ इ.   (२०५२) फो. सें. जॉर्ज–सुरत,   श. १६०० आषाढ व. ३० इ. १६७८ जुलै ८

मादण्णाच्या मतें कुतुबशहानें **गोवळकोंडा** सोडणें धोक्याचें असल्यामुळें मच्छलीपट्टणचा त्याचा दौरा रद्द झाला.

फॅ. रे. सुरत भा. ८९ पृ. ११२ इ.   (२०५३) सुरत–राजापूर.   श. १६०० श्रावण शु. ४ इ. १६७८ जुलै १२

तुमचे २३ मेचे पत्रांत लिहिल्यावरून **शिवाजी** राजापूरला आल्यावेळीं तुम्हीं त्याला अर्ज केला हें कळलें. तुमच्या मागण्यांवर त्यानें केलेलें उत्तर अगदीं असमाधानकारक आहे. **अण्णाजीचा** त्यानें हवाला दिला याचा अर्थ हा प्रश्न दिरंगाईवर टाकण्याचा त्याचा उद्देश दिसतो असाच आहे. तेव्हां तो खेळण्यावर परत आल्यानंतर त्याच्याकडून अधिक अनुकूल जबाब न मिळेल तर राजापुरास आपल्याला रहावयाचें नाहीं असें बेलाशक सांगा. तरी शक्य तितकी अधिक कर्जाची वसुली करून तयार रहा.

फॅ. रे. मुंबई भा. २ } (२०५४) { श. १६०० श्रावण शु. १०
पृ. २५-२६ } मुंबई कन्सल्टेशन. { इ. १६७८ जुलै १९

शिवाजी राजा **दौलतखाना**बरोबर मोठें सैन्य पाठवून माजगांवला ओढून ठेविलेलीं शिद्दीचीं गलबतें जाळून नाश करण्याचें ठरवीत आहे असें अनेकांकडून कळलें. शिवाजीच्या हालचाली कळविण्याकरितां नारायण शेणवी चौलला जाऊन राहिला होता त्यानें, आणि सिद्दी कासमनें पाठविलेल्या हेरानेंहि तसेंच सांगितल्यामुळें सर्वत्र बंदोबस्त करावा.

फॅ. रे. मुंबई भा. ८ पृ. २६-२७; ता. १६७८ जुलै २० चीं गलबतांच्या कप्तानांना सावधगिरीनें पहारा करण्याबद्दलचीं पत्रें--कॅ. अडर्टन, रिचर्ड केग्विन, एन्. डानिअल ह्यूजेस, व ले. फ्रॅन्सिस थोर्प. [ऑर्म ११४-७ पृ. २६.]

फॅ. रे. सुरत भा. १०७ } (२०५५) { श. १६०० श्रावण शु. १५
पृ. ११२-१३ इ. } मुंबई-कंपनी { इ. १६७८ जुलै २३

दंडाराजपुरी घेण्याच्या मार्गांत मुंबईला (माजगांवास) राहिलेल्या सिद्दीच्याच आरमाराची काय ती **शिवाजीला** अडचण वाटत असल्यामुळें, तो तें आरमार जाळण्याचा प्रयत्न करणार आहे अशा एकसारख्या धोक्याच्या बातम्या कित्येक दिवस येत होत्या. कांहीं महिन्यांपूर्वी आपल्या आरमाराचे कर्णधार **दौलतखान** आणि **दर्यासारंग** यांना बोलावून त्यानें त्यांच्या कर्तृत्वाबद्दल त्यांची स्तुती केली, त्यांचा पुष्कळ मान व गौरव केला आणि त्यांच्यापुढें आपला उद्देश उघड करून सांगितला. इतक्या उदार धन्याची इच्छा मोडणें त्यांना चांगलें न वाटून त्यांनीं आनंदानें ही कामगिरी पत्करली. वल्हवण्याकरितां वगैरे बरेच लोक घेऊन ४००० सैन्यासह ते पलीकडे **पनवेलला** येऊन, हे आतां इकडे येण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यांच्याजवळ पाण्याच्या बाजूनें येण्यासाठीं पुरेशा होड्या नसल्यामुळें बहुधा ते साष्टीकडून प्रवेश करितील असें वाटतें. ही बातमी आम्हांला चौलहून नारायण शेणव्याकडून व सिद्दीच्या हेरांकडून कळली.

इतका **चलाख शत्रू** दारांत असतांना स्तब्ध बसणें बरें नव्हे असें पाहून आम्हीं सर्व गलबतांवर तोफा चढविल्या. सर्व मार्ग रोखण्याकरितां सैन्य बसविलें. माहीमला कॅ. केग्वीनची स्थापना केली व शीवच्या बाजूला नहमीं त्यानें टेहळ्ये पाठवावे असें ठरविलें. माहीम व माजगांव यांच्यामध्यें हत्यारबंद गलबतें फिरतीं राखिलीं. किल्यावरहि शिबंदीचा बंदोबस्त केला. आतां परमेश्वरकृपेनें सर्व सुरक्षित राहील अशी कल्पना आहे.

कोणत्याहि प्रकारें **शिवाजी** आमच्यावर रुष्ट झाला म्हणून हें संकट आलें नसून, सिद्दीनें या वर्षी त्याच्या मुलखांत छापे घालून, त्याच्या राज्यांतील ब्राह्मण आदिकरून अनेक लोकांना गुलाम म्हणून पकडून आणिल्यामुळें त्याचा सूड उगविण्याकरितां **शिवाजीनें** हा हल्ला करण्याचें मनांत आणिलें आहे. किनाऱ्यापेक्षां भर आखातांत रहाणें

आरमाराला अधिक सुरक्षितपणाचें असल्यामुळें आम्हीं सिद्दीला गलबतें काढून नेण्याची शिफारस केली. परंतु मागील बाकी थकल्यामुळें खलाशी कामाला तयार होतना. तेव्हां आम्हीं त्याला २००० रु. चालू देण्याच्या फेडीकरितां दिले व त्याचें आरमार हालविण्यास मदत केली. शिवाजीला आतां पाण्यांत **हल्ला करितां येणार नाहीं** व बेटावरील शांततेचा भंग होणार नाहीं हा ह्यामुळें फायदा होईल.

यावरून आम्हीं पूर्वींच तर्क केल्याप्रमाणें सर्व घडून आलें असून, बादशहाला मान किंवा इतर कांहीं फळ (चाकरी करून) न मिळवून देणारें हें आरमार बंदरांत ठेवून घेतल्यामुळें आतां व पूर्वीं किती तरी त्रास व खर्च करावा लागला आहे.

या गोष्टी निर्भयपणें सुरतेचा सुभेदार व तेथील बडे लोक यांच्या कानावर घातल्यास दरसाल हें आरमार सुरतेला बोलावण्याची व्यवस्था होईल आणि ही चोरांची टोळी—हा सिद्दी त्यांतलाच आहे!—सुरक्षित रहावी म्हणून करावी लागणारी लढाईची दगदग मिटेल. (मात्र हें सांगण्याचें) काम कोणा बनियाच्या हातून खास होणार नाहीं. ते आमच्या इंग्लंडच्या राजाला राजा म्हणायला तयार नाहींत ! त्याच्या बद्दल बोलतांना ते **जमीनदार** म्हणजे एक **देसाई** असा त्याचा उल्लेख करितात. (हेन्री ऑक्झिंडेननें हें अनेक वेळीं ऐकिलें आहे.)

ऑर्म ११४-७ पृ. २९, मस्कतच्या **इमामानें पोर्तु०** विरुद्ध एकादें आरमार पाठविल्यास त्याला मुंबईंत ठावठिकाण मिळेल किंवा कसें याबद्दल त्यानें विचारलें आहे.

पृ. ३०—वरील मजकूर लिहिल्यानंतर बातमी आली कीं **दौलतखान** सैन्य घेऊन कल्याण–भिवंडीला आला. तेथून त्यानें **पोर्तु०**च्या मुलखांतून मुंबईकडे जाण्यास रस्ता मागितला. परंतु त्यांनीं **नकार दिला** एवढेंच नव्हे तर ठाण्याकडील **रस्ते** सैन्य ठेवून **बंद केले.**

(सं.) फॅ. रे. सुरत मा. ९० पृ. २४ इ.	(२०५६) माजगांव–सुरत	श. १६०० श्रावण ब. १ इ. १६७८ जुलै २४

मुंबईच्या सैन्याचा कॅप्टन ॲडर्टन याचें पत्रः—पोर्तु०नीं **दौलतखानाचा** समाचार घेतला हें बरें झालें. ही बातमी खरी असेल तर दौलतखानाचा उद्देश सिद्धीस खास जाणार नाहीं.

ऑर्म ११४-७ पृ. ३१ इ.	(२०५७) मुंबई-वॉर्ड व कॅ. केग्विन	श. १६०० श्रावण व. १ इ. १६७८ जुलै २४

ठाण्याहून आज सकाळीं आलेल्या एका बनियाकडून असें समजलें कीं, **शिवाजीचें** सैन्य कल्याण व उळवें (Culwah) यांचे नजीक कित्येक ठिकाणीं येऊन राहिल्यामुळें **पोर्तु०ना** दहशत वाटून त्यांचा वसईचा मुख्य अधिकारी मोठें सैन्य

घेऊन ठाण्याकडे आला आहे. तरी तुम्हीं गैरसावध राहूं नये. **शिवाजी** पुढें येऊन सिद्दीचे आरमाराचा नाश करण्याचा प्रयत्न करील असें दिसतें. **पोर्तु०नीं** आपल्या प्रांतांतून जाण्यास बंदी केल्यामुळेंच त्याची संपादणी करण्याकरितां वसईचा अधिकारी एवढी तयारी करून आला आहे. परंतु त्यामुळें शत्रूनें चिडून जाऊन पोर्तु०च्या २।३ वाड्या जाळल्या.

(से) फॅ. रे. सुरत भा. ९० पृ. २९ इ. } (२०५८) माजगांव-सुरत { श. १६०० श्रावण व. २ इ. १६७८ जुलै २५

हुकुमाप्रमाणें सिद्दीला २००० रुपये दिले. तथापि त्यांतून नोकरांची थकलेली बाकी न देतांना तो नाचरंगच करवितो.

ऑर्म ११४-७ पृ. ३१ इ. } (२०५९) मुंबई-हंटर फ्रिगेटचा कॅप्टन { श. १६०० श्रावण व.४ इ. १६७८ जुलै २७

तुम्हांला सशस्त्र माणसांनीं भरलेल्या होड्या दिसल्या, किंवा नदींत कोठेंहि पोहून येणारे इसम दिसले तर त्यांच्याशीं लढाई करा आणि त्यांना बेटावर कोठेंहि उतरूं देऊं नका.

(से) फॅ. रे. सुरत भा. १०७ पृ. ११६ इ. } (२०६०) सुरत-मुंबई { श. १६०० श्रावण व. ६ इ. १६७८ जुलै २९

सिद्दीनें आपलें सगळें आरमार पाण्यांत लोटून किल्ल्याखालीं आणून ठेविलें आहे. **दौलतखान** अद्यापि आसपास सैन्य घेऊन घिरट्या घालीत असतो. परंतु आतां त्याला पुढें येण्याला कांहींच सबब न राहिल्यामुळें बहुधा तो येणार नाहीं. मात्र आम्हीं शिवाजीचा शत्रू जो सिद्दी त्याला आश्रय दिल्यामुळें **शिवाजीनें आमच्याशींच युद्ध** देण्याचें ठरविलें तर गोष्ट निराळी. लवकरच त्याला तसा निश्चय करावा लागेल असें आम्हांला वाटतें.

ता. क.—[स्थानिक सुभेदाराशीं कंपनीच्या नोकरांनीं व्यवहार केल्यामुळें झालेला घोटाळा]—चौलच्या सुभेदारापासून पेटीट व बल्लभ मेहता अशा दोघांनीं सुपारी व नारळ खरेदी केले. खरेदीच्या किंमतीपैकीं १२००० रु. अजून द्यावयाचे आहेत. ह्या व्यवहारांतील पेटीटच्या हातचीं दोन पत्रें सुभेदाराचे हातांत आहेत. तेव्हां कंपनी व खाजगी व्यक्ति यांत भेद न करितां त्यानें डे०गव्हर्नरकडे बाकीची मागणी केली आहे. एकदोनदां पत्रें पाठविलीं. परंतु आतां त्याला धीर न निघून तो कंपनीचीं गलबतें धरण्याचा प्रयत्न करील. परवां कल्याण-भिवंडीला गिरिधरदासाला पकडण्याकरितां त्यानें ५० लोक पाठविले. तेव्हां **चौलचा व्यापार बंद न होईल** अशी कांहीं तजवीज केली पाहिजे. कारण चौलचें महत्त्व आम्हांला फार आहे.

फॅ. रे. सुरत भा. ८९ } (२०६१) { श. १६०० श्रावण व. १३
पृ. ११४ इ. } सुरत-मुंबई. { इ. १६७८ आगस्ट ५

शिवाजीच्या हल्ल्याच्या धोक्याची सूचना मिळून तुह्मीं केलेला बंदोबस्त यशस्वी होईल यांत शंका नाहीं. तथापि या धाडसी राजाच्या हालचाली फारच गुप्तपणें आणि अचानक होत असल्यामुळें विशेष काळजी घेणें जरूर आहे अशी आमची शिफारस आहे.

फॅ. रे. सुरत भा. ८९ } (२०६२) { श. १६०० भाद्रपद शु. ६
पृ. ११६-७ इ. } सुरत-कारवार. { इ. १६७८ आगस्ट १३

कारवारची परिस्थिति दुरुस्त होण्याची आशा नाहीं. म्हणून पूर्वीच कळविल्याप्रमाणें शक्य तितकी बाकी वसूल करणें व असलेला माल खपवून व्यवहार मोकळा करणें या मार्गाला लागा; आणि हें होत नसेल तर खजिना व मालहि कारवारकडे पाठवा. हुबळीच्या लोभी सुभेदारावर विश्वास ठेवण्याची आतां सोय नाहीं.

फॅ. रे. सुरत भा. ८९ } (२०६३) { श. १६०० भाद्रपद शु. ६
पृ. ११८ इ. } सुरत-राजापूर. { इ. १६७८ आगस्ट १३

घांटावरील रॉबिन्सनचा (व्यापारी दृष्टीचा) प्रवास यशस्वी झालेला ऐकून आम्हांला आनंदच वाटेल. परंतु त्याच सरकारच्या अमलाखालीं असलेल्या कारवारच्या आमच्या मित्रांकडून, हुबळीच्या आसपास शिवाजीच्या अमलदारांचा जुलूम होत असल्यामुळें कापडाचा एक तुकडाहि मिळण्याची आशा नाहीं. हें पाहिलें म्हणजे रॉबिन्सला यश कितपत येईल याची शंकाच वाटते. तरी मोठ्या प्रमाणावर पैसा मालांत घालणें खात्रीनें यशस्वी न वाटल्यास आमच्यावर आणखी हुंड्या देऊं नका.

ऑर्म ११४-७ } (२०६४) { श. १६०० भाद्रपद शु. ९
पृ. ३४ इ. } मुंबई-सुरत { इ. १६७८ आगस्ट १६

ह्या बेटावर स्वारी करण्याकरितां शिवाजीनें बाहेर काढलेलें सैन्य आतां **सुरतेवर** गेलें आहे असें ऐकितों.

डाग रजिस्टर १६७८ } (२०६५) { श. १६०० भाद्रपद शु. ११
पृ. ४५८ इ. आगस्ट २८ न्यू. } सीलोनकडील पत्र { इ. १६७८ आगस्ट १८

भटक्या दरोडेखोर **शिवाजी** ह्यानें आपला भाऊ **एकोजी** आणि **मदुरेचे** लोक ह्यांच्याशीं तह केला आहे. एकोजीकडे तंजावरचा मुलूख कायम राहिला. व शिवाजीनें ३ लाख पार्डो घेऊन आपला त्या प्रांतावरील हक्क सोडून दिला. नंतर शिवाजी आपलें सर्व सैन्य जिकडे होतें त्या **वेलूरकडे** परत गेला. कित्येकांच्या मतें तंजावरकडील लहान

मोठे सर्व लोक, **व्यंकोजी व्यसनी व जुलमी असल्यामुळें** त्याचा द्वेष करीत होते. म्हणून तंजावरच्या गादीवरून **व्यंकोजीला** दूर करण्याचाच त्याचा विचार होता. शिवाय त्यानें प्रथम आपली दृष्टी किनाऱ्यालगतच्या बंदरांकडेच वळविली असेंहि दिसून आलें.

फॅ. रे. सुरत भा. १०७ } (२०६६) { श. १६०० भाद्रपद शु. १२
पृ. १३८ इ. } हुबळी-सुरत. { इ. १६७८ आगस्ट १९

जमशीरखान ३००० स्वारांनिशीं **बंकापूरच्या** रोखें येत आहे. दररोज आणखीं सैन्याची भरती करीतच आहे. कारण **शिवाजीशीं युद्ध** देण्याचा त्याचा विचार आहे. हुबळीचा अधिकारी सलीमखान २०० (० ?) स्वारांसह १० दिवसांत हुबळीला येईल. दक्षिणी लोकांचें विजापूरला पक्कें ठाणें बसलें आहे. तथापि कोणाला यश येईल हें सांगतां येत नाहीं. शिवाजीचे १५०० स्वार या भागांत आहेत. आणखी तितकेच अधिक तो जमवीत आहे. दिवाळी झाल्यावर युद्ध होईल.

फॅ. रे. सुरत } (२०६७) { श. १६०० भाद्र. व. ३
भा. १०७ पृ. १३५-३७ इ. } कारवार-सुरत { इ. १६७८ आगष्ट २४

येथील सुभेदाराशीं मित्रत्व जोडल्यापासून शिवाजीच्या अमलदारांनीं पैशांकरितां गिधाडांसारखीं आमचीं आंतडीं फाडण्याचे वगैरे उद्योग केले नाहींत......घांटावर मात्र (हुबळीच्या) सुभेदाराचा जुलूम कमी झाला नाहीं. शिवाजीनें **शहर लुटूं नये** म्हणून त्याच्या **सुभेदाराला देण्याच्या हेतूनें** पूर्वी कापड नेलें होतें तें परत करून आमचा सराफ आणि दलाल यांच्याकडून त्यानें एकंदर ७७५ होन उकळले. विजापूरकडे शिष्टाई करण्याकरितां **शामदासाला** पाठविलें होतें. त्याचीं दोन पत्रें आलीं त्यांवरून तेथील यादवीमुळें, आणि राजाच्या बालवयामुळें **कारभाराला कोणीच धनी राहिला नाहीं**. यामुळें, सर्वच विनाशाच्या मार्गाला लागल्यासारखें दिसत आहे. तेव्हां तिकडूनहि कांहीं आशा नाहीं म्हणून आम्हीं म्हणतों त्याप्रमाणें बार्सिलोर मधील मरहूम बहलोलखानाचीं दोन गलबतें पकडावीं व हुबळींत थोडासा माल राहिला आहे तो विकून धारवाडच्या नाईकवाडींच्या (Nuckphery) बोलावण्याप्रमाणें तेथें आश्रयार्थ जाऊन रहावें. अथवा वरदेश सर्वच सोडून त्यांनीं कारवारला येऊन रहावें. असें केल्यास विजापूरला ही बातमी कळून पाहिजे तशीं फर्मानें मिळतील व भरपाईची भाषा चालू होईल असें वाटतें. शामदासाच्या दोन्ही पत्रांत राजापूरचे आमचे दोस्त ब्रॉडक्लॉथ आम्हीं हुबळीला विकतों त्यापेक्षां खुद्द विजापुरांत स्वस्ताईनें विकतात, ही **नामुष्कीची कहाणी** लिहून आली आहे ती पहावी. तरी बारकाईनें तपास करून आम्हांपैकीं कोणाला तरी बंदी करावी. ही तक्रार आज प्रथमच येत नसून मागचीं

पत्रें काढून पाहिल्यास पूर्वीच केलेली दिसून येईल. एकाच भागाकडे अशा दोन वखारी सुखानें नांदावयाच्या नाहींत.

(से) फॅ. रे. सुरत भा. १०७ पृ. १२८ इ. } (२०६८) मुंबई-सुरत { श. १६०० भाद्रपद व.६ इ. १६७८ आगष्ट २७

सिद्दीच्या आरमारावर हल्ला करण्याकरितां **दौलतखान** आला. तें पाहून **पोर्तु० लोकांनीं** ठाण्याच्या (Ranna ?) खाडींत ४० सशस्त्र मचवे ठेवून बंदोबस्त केला. आम्हींहि जमीन किंवा पाणी या दोन्ही बाजूंनीं येणाऱ्या हल्ल्याच्या प्रतिकाराची तयारी केली. यामुळें नामोहरम होऊन दौलतखान स्वस्थानीं परत गेला. ह्या अपयशामुळें **राजानें** त्याला नोकरीवरून दूर केलें. आणि भिवंडीच्या सुभेदारानें या स्वारीला भर दिल्यामुळें त्याला कडक शासन केलें असें ऐकण्यांत आलें आहे. आतां आपला तोफखाना घेऊन तो स्वतः खुद्द **मुंबईवर हल्ला करणार.** त्यानें एक मान्याची टेकडी पाहून किल्यावर नेमका गोळा येईल असा तोफखाना लाविला आहे. परिणाम काय होतो इकडे आमचें लक्ष आहेच. परंतु मुंबई घेण्याकरितां त्यानें योग्य मार्गाचें अवलंबन केलें आहे हें खास.

फॅ. रे. सुरत भा. १०७ पृ. १४४ इ. } (२०६९) अथणी-सुरत { श. १६०० भाद्र. व. १० इ. १६७८ आगष्ट ३१

इकडील नाना तऱ्हांच्या बातम्यांमधून एक निश्चित ध्वनि असा निघतो कीं, एक-दोन महिन्यांत **दक्षिणी** लोक **शिवाजी**वर स्वारी करितील. **सर्जाखान** व सिद्दी **मसाऊदचा पुत्र** असे दोघेहि त्याच बाजूला प्रस्थान काढून राहिले आहेत. दोघांपैकीं कोणीं सरसुभा व्हावें अशाबद्दल वाद निघाल्यामुळें त्यांचें काम थबकलें. एकदां यावर एकवाक्यता झाली म्हणजे यांचें १५००० घोडदळ व कर्नाटकच्या बाजूला असलेलें **जमसीरखानाचें** १०।१२ ह. घोडदळ व त्याशिवाय दोघांच्या बरोबरचें पायदळ असें एक होऊन शिवाजीवर येईल. **मोंगलांचें**हि बरेंच सैन्य त्यांच्या कुमकेला येणार आहे. [से]—दिवाळीला काय तो बार उडेल.

फॅ. रे. सुरत भा. ८९ पृ. १२५ इ. } (२०७०) सुरत-मुंबई { श. १६०० आश्वीन शु. १ इ. १६७८ सप्टें. ७

शिवाजीच्या हल्ल्यापासून तुमचा इतका चांगला बचाव झाला याबद्दल आम्हांला आनंद वाटतो. यापुढें तुम्हांला असा त्रास पुनः होऊं नये म्हणून सिद्दीचे आरमारानें मुंबईला राहूं नये अशी खटपट करूं.

ओ. कॉ. भा. ३९ नं. ४४९७; सप्टेंबर २४ सुरत-कंपनी-या खटपटींत यश येऊन यापुढें सुभेदार आम्हांला आरमार ठेवून घेण्याबद्दल गळ घालणार नाहीं असें वाटतें.

[सि]—पृ. १२६--चौलच्या सुभेदाराच्या देण्याच्या प्रकरणीं चांगला निकाल झाला नाहीं तर शिवाजीच्या मुलखांत आपली नाचक्की होईल.

(से) फॅ. रे. सुरत भा. १०७ } पृ. १४५ इ. (२०७१) राजापूर-सुरत. { श. १६०० आश्वीन शु. ६ इ. १६७८ सप्टें. १२

शिवाजीनें आपल्या सर्व फौजा **पन्हाळ्यावर** एकत्र होण्याबद्दल हुकूम दिले असून तो तेथें त्यांना भेटण्याकरितां येणार आहे.

सा. ले. ६४ } सु. १०७९ साबान १० (२०७२) { श. १६०० आश्वीन शु.१२ इ. १६७८ सप्टें. १७

त्रिंबक गोपाळ सुभे. पा पुणें-तहसीलदार मौ. चांबिली.

तुजला शंकराजी निळकंठराऊ याचे इनामतीपैकीं तहसील करावया पाठविले. यैसियास रा. छत्रपती स्वामीचें पत्र ये तोपावेतो रा. पंतसचीव स्वामींनी पैके तोकूब करविले आहेती. तरी तहसील न करणें.

फॅ. रे. सुरत भा. ८९ } पृ. १३३ इ. (२०७३) सुरत-कंपनी. { श. १६०० आश्वीन व. ४ इ. १६७८ सप्टें. २४

शिवाजीचे कांहीं लोक मुसलमानांच्या हातीं सांपडले असतां त्यांना फार अपमानानें वागविल्यामुळें शिवाजी चिडून गेला. व त्याबद्दल सूड घेण्याकरितां सुरतेचा समूळ नाश करण्याचें त्यानें ठरविलें आहे. ह्यामुळें त्याची सुरतेला एकसारखी भीती वाटते.......

श्री. सं. चा. २७ } श. सु. १०७९ रम १ (२०७४) { श. १६०० कार्तीक शु. ३ इ. १६७८ आक्टो. ८

जनार्दन नारायण--रामचंद्रभट वास्तव्य श्री माभलेस्वर.

श्री शंकराच्या पूजेस प्रतिवर्षीं १२ होन मोईन केली आहे. देत जाऊं. आमचे तीर्थपुरोहितपण वंशपरंपरा तुम्हास दिधलें आहे.

फॅ. रे. सुरत भा. ८९ } पृ. १४१ इ. (२०७५) सुरत-मुंबई. { श. १६०० कार्तीक शु. १४ इ. १६७८ आक्टो. १८

विजापुराकडे कारवारच्या वतीनें शामदासानें केलेल्या शिष्टाईचा कांहींच फायदा झाला नाहीं. आतां यापुढें कोणालाच पाठवूं नका. नबाबाचीं २ गलबतें निघतील

त्यांची आम्हांला माहिती कळवा. आणि त्यांना पास देऊं नका. आम्हीं तीं पकडून कांहीं हातास लागतें काय पाहूं.

फॅ. रे. सुरत भा. ८९ पृ. १४२-३ इ. } (२०७६) सुरत-राजापूर. { श. १६०० कार्तीक शु. १४ इ. १६७८ आक्टो. १८

पहिल्या फर्मानांतील अटींप्रमाणेंच बक्षीस देण्यास अण्णाजी तयार आहे हें समजलें. परंतु मि. चाइल्ड प्रथम राजापुरास गेला त्यावेळीं राजाकडून मिळालेल्या दुसऱ्या फर्मानानें पहिल्या फर्मानांतील हें कलम रद्द झालें आहे. त्याअन्वयें आम्हांला सुपारी बाजारभावानें मिळावयाची असून आम्हीं पैसा मुळींच द्यावयाचा नाहीं असें ठरलें होतें. तेव्हां तशी मागणी करून तीवर तुम्हीं जोर द्यावा. तसें त्यांना कबूल नसेल तर आपल्याला वाईट रीतीनें वागविल्यामुळें राजापुराहून आपल्याला निघून येण्याबद्दल हुकूम मिळाल्याचें बेलाशक सांगा.

(से) फॅ. रे. सुरत भा. १०७ पृ. १५६–७ इ. } (२०७७) मुंबई–सुरत { श. १६०० कार्तिक व. ५ इ. १६७८ ऑक्टो. २५

इतके दिवस आम्हीं ज्या गोष्टीला भीत होतों तीच शेवटीं घडून आली. चौलचा सुभेदार रायरीहून परत येतांना त्याच्या अधिकारांत अधिक सुभ्यांची वाढ झाली. व त्यानें लांकूड, सर्पण, भात इत्यादि आवश्यक माल आणण्याकरितां निरनिराळया बंदरांत गेलेलीं मुंबईचीं सुमारें १५।२० गलबतें पकडल्यामुळें बरेचसे व्यापारी ' याला कांहीं उपाय न सांपडल्यास आपलें सर्वस्वीं नुकसान होतें ' अशी तक्रार करीत आले. या धानगडींत १५।२० हजारांचा माल जप्त झाला आहे. माजी डे. गव्हर्नर व वल्लभ मेहता यांच्याकडून येणें आहे तें वसूल करण्याकरितां हा प्रकार केला व ' यापुढें कोणताच माल मुंबई बेटाला आमच्याकडून पुरविला जाणार नाहीं' असें तो म्हणतो. याविषयीं त्याच्याकडे डे० गव्हर्नरनें पत्र पाठविलें आहे. त्याचें २।३ दिवसांत नीट उत्तर आलें तर ठीक आहे. नाहींतर आपण प्रतिकार केला पाहिजे. शिवाजीच्या लोकांचा स्वभाव ' मऊ सांपडलें कीं कोंपरांनीं खणावें ' असा आहे. म्हणून सामोपचारानें न जमल्यास, पुढच्या उन्हाळ्यांत नागोठण्याच्या खाडींत होड्यांवरून पुष्कळसें सैन्य पाठवून आपलीं गलबतें जबरदस्तीनें आणावीं असें आम्हीं ठरविलें आहे. तीं गलबतें उघड्या खाडींत आणि विशेष बंदोबस्ताशिवाय ठेविलीं असल्यामुळें ही गोष्ट सहज करतां येईल. आमच्या हत्यारांची त्यांना भीती वाटत असल्यामुळें तेथें कांहीं रक्षक असलेच तर ते आमचें सैन्य जवळ जातांच पळूनहि जातील. ही गोष्ट साध्य झाल्यानंतर पुनः ते पूर्वीप्रमाणें मित्रत्व ठेवितील यांत आम्हांला संशय नाहीं. कारण आम्हीं थोडा सिद्दीकडे कानाडोळा केला तर आजपर्यंत आम्हीं आमच्या सोईकरितां त्याच्यापासून ज्या समोरच्या किनाऱ्याचें रक्षण केलें तो किनारा लगेच तो उध्वस्त करून टाकील याची

त्यांना जाणीव आहे. आणि तीमुळेंच त्या भागांतील मुकादम आणि जमातीचे मेहेतर लोक यांनीं वरील प्रकारानंतर आपलीं घरेंदारें सोडून देऊन सुभेदाराकडे अशी तक्रार केली आहे कीं, 'तुमचा असाच क्रम चालू रहाणार असेल तर आमच्या देशाचा पार नाश होऊन राजाच्या जकातीचें उत्पन्न साफ बुडेल.' यामुळें सुभेदार ताळ्यावर येईल असें वाटतें. जरी तो फारच हेकेखोर असला तथापि वल्लभ मेहेताच्या देण्याबद्दल योग्य न्याय होण्याची खटपट केली जाईल असें आम्हीं वचन दिल्यास आमचें ऐकेल असें वाटतें. [ऑर्म ११४--७ पृ. ४७.]

डाग रजिस्टर १६७८ पृ. ६४२ इ. नोवें. १० न्यू. } (२०७८) { श. १६०० कार्तीक व. ११ इ. १६७८ ऑक्टो. ३१

नागापट्टणहून ऑक्टोबर (११ न्यू.) पत्र आलें. त्यांत **एकोजी राजाला** तंजावरचा ताबा संथपणें उपभोगावयास मिळाला असें लिहिलें आहे. त्याचें स्वतःचें सामर्थ्य व त्याच्या भावाचें (प्रसिद्ध) नांव यामुळें मदुरा नायक त्याच्यावर शस्त्र धरीत नाहीं. परंतु जर या व्यवस्थेंत बदल करण्याकरितां शिवाजी परतून पुनः येईल तर विजापूरचे लोक व मैसूरचे नायक **शिवाजी**वर हल्ला करण्यास टपून बसले आहेत. गोवळकोंडेकरांचेहि विचार तसेच आहेत.

(से) फॅ. रे. सुरत भा. ८९ पृ. १५६--७ इ. } (२०७९) सुरत-मुंबई { श. १६०० कार्तीक व. १२ इ. १६७८ नोवें. १

मुंबईची सर्व आयात **शिवाजीच्या** मुलखांवर अवलंबून असल्यामुळें चौलचा सुभेदार किंवा शिवाजीचे लोक यांच्याशीं बिघाड करूं नये.

खं. १५ ले. १४२ सु. १०७९ रम २७ } (२०८०) { श. १६०० कार्तिक व. १४ इ. १६७८ नोवें. ३

रा. संभाजी राजे——अनाजीपंत सचीव

सदानंद गोसावी याचा नींबमधील इनाम सांप्रत मना केला आहे. चालता केला पाहिजे म्हणतो. हा मामला आम्हास दखल नाहीं. तुम्हांस कळेल ते पारिपत्य केलें पाहिजे.

(से.) फॅ. रे. सुरत भा. १०७ पृ. १६९--७० इ. } (२०८१) राजापूर-सुरत. { श. १६०० मार्गशीर्ष शु. २ इ. १६७८ नोवें. ६

दर्यासारंग व त्याचा मुलगा यांना राजाच्या हुकमानें अटक होऊन त्यांची सर्व मालमत्ता जप्त झाली. त्यांच्या नांवावर कंपनीचें कांहीं येणें आहे तें बुडालेंच म्हणावयाचें. येथील सुभेदार व अण्णाजी या उभयतांकडे त्याबद्दल लिहिलें आहे. **अण्णाजीकडे** बक्षिसाबद्दलहि पत्र पाठविलें होतें त्याच्याहि उत्तराची वाट पहात आहों.

दहा दिवसांपूर्वी **शिवाजीचें** जमसीरखानाशीं मोठें युद्ध झालें. त्यांत शिवाजीचे २ ह. घोडे व ४१५ ह. पायदळ मारलें जाऊन त्याचें फार नुकसान झालें. आतां इकडे बरे दिवस येतील अशी आशा आहे.

पिसुर्लें. शिवाजी. } (२०८२) { श. १६०० मार्ग. शु. ३
इ. नोवें. १७ न्यू. } { इ. १६७८ नोवें. ७

गोवा कमिशनर सॅांदे—**शिवाजी**

पोर्तुगीज आरमारानें पकडलेलीं मराठ्यांचीं जहाजें: कानडा व पोर्तु. लोक यांचें शत्रुत्व असतां हीं गलबतें कानड्यांतील बंदराशीं व्यापार करीत होतीं. तीं पकडल्यामुळें दिसून येणारे अमित्रत्वाबद्दल आपण तक्रार केली आहे. त्यास आपल्या सुभेदारांनीं या बाबतींत जाणून बुजून आपला गैरसमज करून दिला आहे. कारण, त्यांच्या मनांतून आपला व आमचा सलोखा आहे तो बिघडावा असें वाटतें. [री. व्हि. १ पृ. १८]

(से) फॅ. रे. सुरत भा. १०७ } (२०८३) { श. १६०० मार्ग. शु. ४
पृ, १७१-४ इ. } मुंबई--सुरत. { इ. १६७८ नोवें. ८

निश्चय केल्याप्रमाणें **नागोठाण्याहून** फक्त ४ वगळून बाकीचीं **गलबतें** कॅ० निकल्सनें पळवून आणिलीं. एकाहि प्राणाची हानी झाल्याशिवाय ही गोष्ट साधतां आली. सुभेदाराकडून पत्र आलें होतें त्याचें भाषांतर सोबत पाठविलें आहे. आतां त्याचा वकील येईल त्याला वल्लभदासाबद्दल खुलाशाचें उत्तर दिलें पाहिजे. नाहींतर सर्पणाशिवाय आमचें फारच अडेल. आतां वैर अधिक वाढूं नये ह्मणून वल्लभदासाला लवकरच पाठवून द्यावें. तो येऊन पोंचतांच (देण्याबद्दल) उलगडा करण्याचें वचन आम्हीं दिलें आहे. त्यामुळें त्याचें समाधान होईल असें वाटतें. **दंडाराजापूर** ४ महिन्यांत **घेऊन देण्याचें** या सुभेदारानें **राजाला** वचन दिलें असल्यामुळें, सिद्दीला मुंबई बंदरांत आम्हीं राहूं देतों याच्याविरुद्ध त्याचा बराच कटाक्ष आहे. हें त्याच्या पत्रावरून दिसून येईल. त्याला राहूं देणें, किनाऱ्यावर ओढून घेणें, सामानभरती करून वाटेल तेव्हां जाऊं देणें हें सर्व **आंतरराष्ट्रीय कायद्याच्या विरुद्ध** आहे असें आम्हांला देखील वाटतें. आणि लवकरच ह्या गोष्टी बंद झाल्या नाहींत तर (शिवाजीशीं) वैर उत्पन्न होणें अपरिहार्य आहे. तसें झालें आणि कोणा एकाद्या पाश्चात्य राष्ट्रानें शिवाजीशीं संगनमत केलें तर मुंबईचा नाश होण्यास वेळ लागणार नाहीं.

इतकें पत्र लिहून झाल्यावर आम्हीं गलबतें जबरदस्तीनें पळवून आणूं नयेत वगैरे मजकुराचें तुमचें पत्र [ले.२०७९] पोंचलें. आम्हीं गलबतें न आणिलीं तरीहि तो सुभेदार तसेंच वागणार. कारण त्याला कोणत्याहि प्रकारानें वागण्याचे शिवाजीचे हुकूम

नसून तो आपल्याच अधिकारांत तसा वागत आहे. राजापुरापर्यंत त्याची हुकमत चालत असून इकडे गलबतें पकडलीं त्याच वेळीं राजापुरास असलेला इंग्रजांचा सर्व माल पकडण्याचा त्यानें हुकूम दिला होता. परंतु त्याला न जुमानतां आम्हीं आमच्या राष्ट्राच्या गौरवाकरितां हें धाडस केलें. वल्लभ मेहताकडून आपण हिशेबाचा निकाल करूं शकलों तर सर्व कांहीं सुरळीत होईल. आमचीं गलबतें आम्हीं सोडवून आणिलीं याबद्दल त्यांनाच कौतुक वाटतें. कल्याण-भिवंडीच्या सुभेदारानें आमचें अभिनंदन करून आपला मुलख आम्हांला मोकळा ठेवण्याचें वचन दिलें आहे. आम्हांला त्यांच्याकडून सर्पण व भात यांची फारच जरूर असते. पण उलट त्यांना आमच्या पैशाचीहि जरुरी आहेच. चौलच्या सुभेदाराच्या देण्याचा कांहीं निकाल होऊं शकल्यास एक महिन्याचे आंत सर्व संबंध सुरळीत होतील असें वाटतें. [ऑर्मे ११४-७ पृ. ५१ वर हेंच पत्र १९ नोवें.चें म्हणून अवतरिलें आहे.]

पृ. १७५--१७६ चौल ते राजापुरपर्यंतच्या मुलखाचा सरसुभेदार बहिरोपंत याचें डेप्युटी ग०च्या पत्रास मराठींत उत्तर आलें. त्याचें भाषांतर: —

तुमच्या बेटावरील मुसलमान व्यापाऱ्यांच्या गलबतांबद्दल तुम्हीं विचारलें. त्यास नेहमीं येथून सर्पण नेण्याकरितां तुमचीं गलबतें येतात तशीं नागोठण्यालाहि हीं गलबतें आल्यावेळीं तेथील अधिकाऱ्यांनीं तीं पकडलीं व त्याबद्दल मला कळविलें. त्याबद्दल मला असें कळवावयाचें आहे कीं, इंग्रज व शिवाजी यांचा सलोखा चालतो या सबबीखालीं आमच्याकडून जाणारें सर्पण, धान्य इत्यादि सर्व मालाचा फायदा **आमचा शत्रु सिद्दी** यास राजरोसपणें मिळावा हें चमत्कारिक वाटतें. सदर सिद्दी आमच्या देशांत लुटालूट करून लोकांना पकडून नेऊन आम्हांला फार त्रास देतो. त्याच्याशीं युद्ध करण्याकरितां **शिवाजी**-राजानें मला या भागाचा सुभेदार नेमिलें आहे. दौलतखानाच्या आरमाराशीं सहकार्य करण्याकरितां ५००० लोक तुमच्या बेटावर पाठविण्याचा माझा विचार होता; आणि सिद्दीला ज्याप्रमाणें तुम्हीं आश्रय देतां त्याप्रमाणेंच दौलतखानालाहि तुमच्या किल्ल्याखालीं आश्रय मिळावयास कांहीं हरकत नव्हती. **पोर्तु०नीं** देखील **इंग्रजांसारखी** सिद्दीला सामुग्री पुरवून किंवा त्याचें रक्षण करून **मदत केली नाहीं** हें मला तुमच्या नजरेस आणणें भाग आहे. सिद्दीला तुमच्या तेथें आश्रय मिळाल्यानें आमच्या मुलखाला त्रास देणें त्याला सुलभ जातें. तरी तुम्हीं त्याला यापुढें आश्रय देतां कामा नये. या मुद्यावर तुमचें उत्तर येईल तें **राजे यांज**कडे व **अण्णाजी**पंताकडे पाठवून देईन. त्याप्रमाणें ते सिद्दीला तुमच्या बेटांतून काढून लावण्याबद्दल काय तो विचार करतील.

वल्लभ मेहताला आम्हीं ओळखीत नसून मि. पेटीट आमच्या देण्याला जबाबदार आहे. कारण आमचा असा शिरस्ता आहे कीं, एखाद्या सुभेदारानें किंवा हवालदारानें खरेदीविक्रीबद्दल एकादा करार केल्यास त्याच्यामागून येणारा अधिकारी त्याला जबाबदार असतो. तुम्हीं

पेटीटचे मागून नेमले गेल्यामुळें तुम्हीं भरपाई कराल यांत मला संशय नाहीं. प्रताप-जीला पैशांबद्दल बोलणें करण्याकरितां पाठविलें तेव्हां सदर गृहस्थ ऑर्मझला असल्यामुळें तिकडे पत्र लिहिलें आहे असें तुम्हीं सांगितलें. ऑर्मझ व सुरत हें कांहीं मला समजत नाहीं; व मला त्यांच्याशीं कांहीं करावयाचें नाहीं; मला एक मुंबई माहित आहे. आणि तुम्हीं पेटीटचे मागून अधिकारावर आल्यामुळें माझा पैसा मुंबईंत आहे. आणि तो तुम्हीं दिला पाहिजे. लवकर पाठवावा. कारण **शिवाजी**राजांकडे तो त्वरेनें पाठविणें आहे. [३ नोव्हेंबर १६७८].

फॅ. रे. सुरत भा. १०७ } (२०८४) { श. १६०० मार्ग. शु. ९
पृ. १७९ इ. } कारवार–सुरत. { इ. १६७८ नोवें. १२

८००० स्वार व २० तोफा घेऊन जमशीरखान **बंकापूरच्या** किल्ल्याजवळ आहे. परंतु **पन्हाळ्यावर शिवाजी** १५००० स्वार व २०००० पायदळ घेऊन तयार आहे; त्याच्याशीं युद्ध देण्याची त्याला छाती होत नाहीं. विजापुराहून ३० ह. स्वार घेऊन सर्जाखान येण्याची तो वाट पहात आहे. या उन्हाळ्यांत इकडील सर्व युद्धांचा शेवट होईल अशी आशा आहे.

ऑर्म ११४–७ } (२०८५) { श. १६०० मार्ग. शु. १४
पृ. ५४ इ. } मुंबई–सुरत { इ. १६७८ नोवें. १७

चौलच्या सुभेदाराकडून कृतकर्माबद्दल पश्चात्ताप प्रदर्शित करणारें पत्र आलें. त्यांतच या बेटावरील लोकांना पूर्वीप्रमाणेंच त्याच्या अमलाखालील प्रदेशांत येण्याजाण्याची त्यानें मोकळीक दिली आहे असा मजकूर आहे.

ऑर्म ११४–७ } (२०८६) { श. १६०० पौष शु. १
पृ. ६० इ. } मुंबई—सुरत. { इ. १६७८ डिसें. ४

आम्ही त्यांचे शत्रु अरब लोक यांस धान्यसामग्री पुरवितों अशा सबबीवर पोर्तु० लोक आपल्या मुलखांतून कोणताच माल इकडे येऊं देत नाहींत.

चौलच्या सुभेदारानें आमच्या व्यापाऱ्यांनीं त्याच्या बंदरांत पूर्ववत् व्यापार करावा अशी विनंती केली आहे. आणि त्यांचे परवाने [? seguroes] स्वतःच्या सही-शिक्यानिशीं पाठवून दिले आहेत. यावरून वल्लभ मेहतानें आपलें काम नीट केलें तर आमच्यांतील मतभेद लगेच नाहींसा होईल असें वाटतें.

ऑर्म ११४-७ } (२०८७) { श. १६०० पौष व. १
पृ. ६४ इ. } मुंबई–सुरत { इ. १६७८ डिसें. १८

सिद्दी कासमला सुरतेहून आलेला हुकूम असा आहे कीं, दुसरे गलबतावरून पैसा येण्याची वाट पाहून तो आल्यावर सर्व कर्ज फेडून मग तुम्हीं जावें.

शिवाजीच्या सैन्यानें जमीन व पाणी या दोन्ही बाजूंनीं दंडाराजपूरला वेढा घातला असून सिद्दीजवळ पैसा नसल्यामुळें तेथील लोकांना कुमक करण्याकरितां त्याला येथून हालतांच येत नाहीं.

पृ. ६५तारीख ?—समोरचा किनारा शिवाजीच्या ताब्यांत असल्यामुळें येथून जाण्यायेण्याचे मार्ग सुरक्षित नाहींत. करितां हिरेवाले व्यापारी येथें रहावयास तयार होत नाहींत.

प्रदीप सेन १९ इ. १६७९ जाने. ११ न्यू.	(२०८८) गोवा — शिवाजी.	श. १६०० पौष व. १४ इ. १६७९ जाने. १

शिवाजीचे प्रधान व अधिकारी पोर्तुगीजांचे शत्रूंना गुप्तपणें साहाय्य करितात असा संशय व्यक्त केला आहे. [री. व्हि. १ पृ. २४]

ओ. कॉ. भा. ३९ नं. ४५६३ इ.	(२०८९) सुरत—कंपनी.	श. १६०० माघ व. ५ इ. १६७९ जाने. २१

शिवाजीच्या भीतीमुळें माल स्वालीलाच ठेवून मागणी येईल त्याप्रमाणें सुरतेला आणवून दिला जातो......शिवाजीच्या अंमलदारांची राजापूरच्या बाबतींतील आमच्याशीं वागणूक समाधानकारक नाहीं......शिवाजीच्या मुलखांतील राजापूरची वखार बंद करून टाकीत आहोंत. व पुढें **शिवाजी**च्या ताब्यांतील मुलूख तरुण आदिलशहाच्या ताब्यांत गेल्यास व्यापार पुनः भरभराटीस येईल अशा आशेवर वखार चालू ठेवीत आहों. पुढें मागें परिस्थिती निवळल्यावर कारवारची दुय्यम वखार म्हणून **राजापूरचीहि** वखार चालू करतां येईल.

फॅ. रे. सुरत भा. ४ पृ. ७-८ इ.	(२०९०) स्वाली कन्सल्टेशन.	श. १६०० माघ व. ७ इ. १६७९ जाने. २४

'**शिवाजी**कडून किल्ले जिंकून घेण्याच्या कामीं इंग्रजांची मदत मागण्याकरितां आदिलशहाकडून फर्मान आल्यास आपण कसें वागावें ?' अशी कारवारहून विचारणा आली. 'त्यांनीं कोणाचाहि पक्ष न घेतां उभयतांशीं आणि विशेषतः विद्यमान सत्ताधाऱ्यांशीं सामोपचारानें वागावें ' असें त्यांना लिहिण्याचें ठरलें.

[से] — येत्या मार्चमध्यें हुकूम होईल त्या गलबतानें येण्याबद्दल राजापूरच्या लोकांना कळवावें.

खं. १७ ले. १७ रा. ५	(२०९१)	श. १६०० फाल्गुन शु. ११ इ. १६७९ फेब्रु. ११

राजा **शिव छत्रपति** —कोनेर रुद्र देशा० प्रां मावळ.

विठोजी सिलमकर यास गुंजण मावळांत इसाफत व हकपैकीं जे चालिले आहे ते व शिवपट्टणाखाले गोमाजी नाइकास जे आहे ते पूर्वीप्रो चालविणें. लेखनालंकार.

ओ. कॉ. भा. ३९ नं. ४५७७ इ.　　　　(२०९२) सुरत--कंपनी.　　　　श. १६०० फाल्गुन व. २ इ. १६७९ फेब्रु. १७

बादशहाचा ज्येष्ठ पुत्र मोठें सैन्य घेऊन बऱ्हाणपूरच्या व औरंगाबादच्या बाजूनें **शिवाजीला** आळा घालण्याकरितां आला आहे. यामुळें शिवाजीच्या हुलीपासून आमची कांहीं काल मुक्तता झाली आहे. दख्खनमध्येंहि आदिलशाही सेनापतींनीं त्याच्यावर मोठा विजय मिळविला आहे. पण सर्वांत त्याची मनःशांति अधिक ढळविणारी जी गोष्ट घडली, ती त्याचा ज्येष्ठ पुत्र [संभाजी] त्याच्यावर नाखूष होऊन बादशाही सरदार **दिलेरखान याच्याकडे पळून गेला** असून, तो मुसलमान होऊं इच्छितो, ही होय.

[दि]--जसवतसिंग मेला. त्याची संपत्ति लुबाडण्याकरितां बादशहानें मोठें सैन्य उभारल्यामुळें व्यापाराचे मार्ग बंद झाले आहेत.

खं. १८ ले, २२ सु. १०७९　　　　(२०९३)　　　　श, १६०० इ. १६७८-७९

अजर० रा. **शिवाजीराजे**--- देसमु० व मोक० व कुळ० व रया का मावळ.

मोरो विठल होनप देसकु. का मावळ यानीं सांगितलें, का मावळ आपली मिरास चालत आली आहे. माहाराजसाहेबासी निजामशाहा यानीं प्रा मा मोकासा दिधला ते वख्ती आपलेया वडिली पुण्याहून गुपचुप गुमास्ते पाठविले. रयतीस बदसलूख केला म्हणून त्यास दूर करून नामाजी लांडा पाठविला. पुढें निजामशाही गुदरोन गेली. एदिलशाही मुरारी जगदेव एऊन पुणा जाळून भुलेस्वर येथें शहर वसविलें. एदिलशाहींतून माहाराज साहेबास मावळ व संबाजीराजे यांस सांडस असे मोकासे दिधले. त्यास नामाजीनें बेइमानी केली. आपण साहेबासी हकीकत जाहीर केली तो निळो सोनदेऊ मजमूदार त्यांनीं आपाजी बिन नामाजीची पाठी राखिली. रुजू होऊ देत नाहींत. तरी साहेबी ताकीद दिली पाहिजे. तरी मोरो विठलास त्याचा हकलाजिमा देत जाणें.

खं. १५ ले. ३४० सु. १०७९　　　　(२०९४) कौलनामा म. सु. व सी.　　　　श. १६०० इ. १६७८--७९

रा० अनाजी दत्तो.

ता देशमू० देशकु० व मोक० पाटल व रया० ता रोहिडखोरे

तुह्मी कौल मागितला व हकीकत सांगितली. तरी गावाचे गाव फिरून जमीनीची प्रत ठरवून पिकाचा अंदाज करावा. व त्याप्रमाणें धारा बांधून द्यावा. एकंदर देश लावणीस येईल असें करावें.

आठल्ये संग्रह } (२०९५) { श. १६००
? } शिवाजी राजे-एकोजी राजे { इ. १६७८-९

श्रियासह चिरंजीव अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री माहाराज **एकोजी राजे** प्रती राजश्री **शिवाजी राजे** आशीर्वाद एथील क्षेम जाणोन तुम्ही स्वकीय कुशल लेखन केलें पाहिजे विशेष. तुम्ही पत्र पाठविले तें उत्तम समयी पावले. मजमूचा व्यापार दीक्षिताचा त्याचा द्यावा. राजश्री गंगाधरपंतास सेवेसी देतील. त्याचे हाते कार्यभाग घ्यावा म्हणून पूर्वी लिहिले होते. त्याचे उत्तर लिहिले कीं, बहुत बरें राजश्री गंगाधरपंतास अवश्य एथें पाठवून दिधले पाहिजे म्हणून. तरी हे तुमचे पत्र बहुता दिवसा आले. राजश्री रघुनाथ पंडित कर्नाटकांत ठेविले आहेती. त्याचे कार्यावरी फडी आम्हापाशीं मनुष्य पाहिजे. राजश्री जनार्दनपंतासहि स्वतंत्र दर्बारीचे कार्य सांगितलें आहे. त्याकरितां राजश्री गंगाधरपंतहि आम्हाच पाशीं पाहिजेत ऐसे जाले. त्यास आम्हीं आपणापाशीं ठेविले आहे. याउपरी राजश्री जनार्दनपंताचे दुसरे पुत्र राजश्री श्रीनिवासपंत आहेती तेहि शाहाणे आहेती. त्याला तुमचे सेवेसी द्यावे. धाकटे आहेती तोवरी कार्यभागास एक मुतालीक शाहाणा ठेवून कार्यभाग चालवावा ऐसा निश्चये आम्ही यासी केला आहे. तरी मजमूचे कार्य श्रीनिवासपंताचे नांवें करून आम्हास प्रश्नोत्तर व त्यासहि एक पत्र ऐसें पाठवून देणें. म्हणजे त्याला मुतालीक सहवर्तमान तुम्हापाशीं पाठवून देऊन. सेवा करितील. कार्यभाग तुमचा नीटनेटका करून संतोष उपजवितील. कैलासवासी स्वामी व दीक्षिताचा ऋणानुबंध विशेष. तैसेच तुह्मींहि त्याचे संततीचे चालवितां ऐसे कीर्तीस्कर व श्रेयस्कर आणि आमचाहि संतोष आहे. बहुत लिहिणें तरी तुह्मी सर्वज्ञ असा 'मर्यादेयं राजते.' [हें पत्र सुवर्णरेखांकित आहे.]

फॅ. रे. मुंबई भा. ८ } (२०९६) { श. १६०१ चैत्र शु. ७
पृ. १३ इ. } मुंबई-सुरत { इ. १६७९ मार्च ८

नारायण शेणव्याचा हिशेब सोबत पाठविला आहे. **शिवाजीनें** दिलें काय आणि त्याच्याकडून काय येणें राहिलें आहे हें त्यावरून समजेल. त्याच्याकडून अधिक मिळेल तेवढें वसूल करण्याचा हुकूम आम्हीं त्याला देऊंच.

सेन गोवा पृ. २१ } (२०९७) { श. १६०१ चैत्र शु. ९
इ. मार्च २० न्यू. } { इ. १६७९ मार्च १०

पोर्तुगीज कमिशनर--**शिवाजी राजे**

[या पत्रांत प्रारंभीं मराठ्यांच्या आरमारानें पोर्तुगीजांचीं कांहीं जहाजें धरल्याचा मजकूर आहे.] गणू चटी (गणेश शेटी ?) याच्या हस्तें आपण पाठविलेलें पत्र पोंचलें.

दमण प्रांतांतील कांहीं गावकरी चोथिया राजास जो चौथ देत असत तो आपणास देण्यांत यावा, अशी आपण पत्रांत मागणी केली आहे. आपला वकील पीतांबर शेणवीं यानें माजी व्हाइसरायाबरोबर या बाबतींत बोलणें केलें होते व तो गेल्यानंतर माझ्या अमदानींत या प्रकरणाचा निकाल लावण्यासाठीं आपल्या तर्फेचा मनुष्य यावा असें सुचविलें होतें. कारण, ही रकम दमण प्रांतांतील कांहीं गांवकऱ्यांनीं विशिष्ट अटींवर देण्याचें कबूल केलें होतें व या अटी दोनहि पक्षांकडून पाळल्या जावयाच्या आहेत; मात्र या बाबतींत या गांवकऱ्यांना बोलणें करण्यास परवानगी देण्यापलीकडे पोर्तुगीज सरकारास अधिक भाग घेतां येत नाहीं. ही सर्व हकीकत मीं मागल्या पत्रांत कळविलीच होती व आतां पुनः त्याची नकल पाठविली आहे त्यावरूनहि कळून येईल. अशी वस्तुस्थिती असतां दोन्ही राज्यांत सलोखा असून आमचें निशाण घेऊन जाणारीं जहाजें त्यांवरील मालासह संखेश्वर नदीवर गेलीं असतां आपल्या लोकांनीं पकडलीं ही त्यांनीं चूक केली आहे. मीं या बाबतींत आपणास पत्र लिहिलें पण आपणास चुकीची माहिती मिळून आपण (भलतें) उत्तर पाठविलें. आमचीं जहाजें तुमच्या बंदरांत शिरलीं हें म्हणणें खोटें आहे; कारण, समुद्रांत अरबांचीं जहाजें वावरत होतीं त्या ठिकाणीं तुमची सत्ता नव्हती किंवा पोर्तुगीज व अरब या लोकांवरहि तुमची सत्ता नाहीं.

श्री. सं. चा. २८ रा. ५ सु. १०७९ सफर १५	(२०९८)	श. १६०१ चैत्र व. १ इ. १६७९ मार्च १८

मोरेश्वर पंडितराय--भानजीपंत देशा॰री व ले॰ प्रां करहाड

चाफळ येथील रघुनाथ गणेश अग्निहोत्री यांस परम योग्य व अग्निहोत्री म्हणून १ खंडी जोधळे व ४ गाईपर्यंतचा कर माफ दिला आहे. आदा करीत जाणें.

फॅ. रे. मुंबई भा. ८ पृ. १५ इ.	(२०९९) मुंबई-सुरत	श. १६०१ चैत्र व. ९ इ. १६७९ मार्च १०

शहाजादा दक्षिणेंत येऊन २ महिने झाले. आणि शिवाजीचा मुलगा **संभाजी** त्याच्याकडे पळून गेला. परंतु **शिवाजी पन्हाळ्यामध्यें** ठाणें धरून बसला असून मोंगल व आदिलशहा या दोघांनाहि तो मोजीत नाहीं किंवा यांपैकीं कोणींहि त्याच्यावर चालून जात नाहीं.

खं. २० ले. १५८ रा. श. ५ सु. १०७९ सफर २५	(२१००)	श. १६०१ चैत्र व. ११ इ. १६७९ मार्च २८

मोरेश्वर पंडितराय--येसाजी मल्हार देशाधिकारी व लेखक पर॰ वाई

नरसींभटाचे (चित्राव) नातलग यांस जमीनीऐवजीं ३ खंडी गला व दर एकास ४ व्यालेल्या गाईपर्यंतचा करभार माफ असे.

फॅ. रे. मुंबई भा. ८ पृ. १८ इ. | (२१०१) मुंबई--सुरत | श. १६०१ वैशाख शु. ४ इ. १६७९ एप्रील ४

शिवाजीचें सैन्य जवळ आल्यामुळें **दमणच्या** पोर्तु० लोकांना भय वाटलें. कारण त्या सैन्यानें ब्रासल (Brasall बलसाड ?) इत्यादि अनेक जागीं जाळपोळ केली... **विजापूरचे** जवळील **शहापूर शिवाजीनें** स्वतः जाऊन लुटलें. विजापूर शहर मोंगलांच्या हातीं गेल्यास आपला टिकाव लागणार नाहीं हें जाणून तें जिंकण्याचा त्याचा मोठा इरादा असल्यामुळें, तो त्या शहरांत प्रवेशच करणार होता.

ओ. कॉ. भा. ४० नं. ४५९५ इ. | (२१०२) सुरत--कंपनी | श. १६०१ वैशाख शु.५ इ. १६७९ एप्रिल ५

नुकतीच **शिवाजीची** फार भीती वाटली. परंतु त्याचें फक्त छोटेंच सैन्य आल्याचें मागाहून कळून आलें. जवळचीं एक दोनच खेडीं जाळून व लुटून तें परत फिरलें.

डाग रजिस्टर १६७९ पृ. १३४ इ. एप्रील १५ न्यू. | (२१०३) | श. १६०१ वैशाख शु. ५ इ. १६७९ एप्रील ५

कोचीनच्या पत्रांत अशी हकीकत आली आहे कीं, गोवा शहराकडील प्रांतांतून **शिवाजीला** विजापूरकरांनीं जबरदस्तीनें काढून लाविल्यावर त्यानें 'आपण स्वतः व आपले अनुयायी यांना ख्रिस्तीधर्म स्वीकारण्याकरितां गोव्यामध्यें येऊं द्यावें' अशी तेथील पोर्तु० व्हाइसरॉयला विनंती केली. परंतु ती त्यानें अमान्य केल्यामुळें 'तुम्ही खुशीनें आम्हांला धर्माची दीक्षा देत नसाल तर आम्हीं जबरदस्तीनें गोव्यांत प्रवेश करूं' अशी शिवाजीनें त्याला धमकी दिली. परंतु तिचाहि कांहीं उपयोग झाला नाहीं.

फॅ. रे. मुंबई भा १९ पृ. २०-२१ इ. | (२१०४) राजापूर-मुंबई | श. १६०१ वैशाख व. ३ इ. १६७९ एप्रील १९

१४ एप्रीलला कॅपटन आणि मीं स्वतः सुभेदाराला भेटून मराठ्यांच्या अन्यायाच्या वर्तनामुळें आम्हीं राजापूर सोडून जात आहों असें सांगितलें. 'राजानें तुमच्या सर्व मागण्या कबूल केल्या आहेत. व पावसाळा संपण्याच्या पूर्वींच आपण त्या सर्व पुऱ्या करूं' असें तो सांगूं लागला. परंतु त्यामुळें फसून न जातां आमचा निश्चय झाल्याचें आम्हीं सांगतांच त्यानें राजापूर सोडून जाण्यास **आम्हांस बंदी** केली. आम्हीं सामान वगैरे हालविण्याचें चालूंच ठेविलें. इतक्यांत हवालदार व शहरांतील सर्व व्यापारी बंदरावर येऊन त्यांनीं आम्हांला किनारा सोडून जाण्याच्या कामीं कोणींहि मदत करूं नये अशी शिवाजीच्या नांवें द्वाही (Dury) दिली.

राम. अं ७४ ले. २
रा. श. ५

(२१०५)
नकल, आज्ञापत्र

श. १६०१ वैशाख व. ७
इ. १६७९ एप्रील २२

छत्रपती — **शिवाजी** त्रिंबक गोपाल देशी व देशक प्रा पुणें.

रा. वासुदेव गोसावी वा मठ मौजे कन्हेरी ता निरथडी हे पनाळियास येऊन स्वामीचा भाग्योदय सांगितला. तरी मांढरदेवी मठ येथें बिघे ४, कन्हेरीस बिघे ७ असे पाटस्थळ बिघे ११ दिले. ते गोसावी सुखरूप असेत तोंवरी चालविणें.

गो. इ. सा. ले. ३३
सु. १०७९ रखर ३

(२१०६)

श. १६०१ अ. ज्येष्ठ शु. ५
इ. १६७९ मे ४

मोरेश्वर पंडितराऊ— धर्माजी नागनाथ देशाधि. व ले. प्रांत फोंडा.

मौ० कुकडिये तपे अंत्रूज येथें सातषा व रामजोसी यास वृत्ती होती ते अमानत जाली. त्याबद्दल त्यास तांदूळ ५ मण व ४ व्यालेल्या गाईंचा करभार माफ केला असे.

गो. इ. सा. ले. ५ रा. ५
सु. १०७९ रखर ३

(२१०७)

श. १६०१ अ. ज्येष्ठ शु. ५
इ. १६७९ मे ४

मोरेश्वर पंडितराऊ—धर्माजी नागनाथ देशाधि. व लेखक प्रांत फोंडा

अनंतभट बिन फट जोसी याची सरजोतिषी राजगृही जमा जाली त्याबद्दल त्यांस तांदुळ १ खंडी ५ मण व व्यालेल्या गाई १-८ चा करभार माफ या गोष्टी दिल्या आहेत.

डाग रजिस्टर १६७९
पृ. २०५ इ. मे २१ न्यू.

(२१०८)

श. १६०१ अ. ज्येष्ठ शु. ११
इ. १६७९ मे ११

मच्छलीपट्टणचें पत्रः-औरंगजेबाचा पुत्र शहाजादा **सुलतान मुअझ्झम** ससैन्य **औरंगाबादच्या** नजीक आला. गोवळकोंड्याच्या राजानें, त्याचें अभिनंदन करण्याकरितां व विजापूरचा [?] सेनापती दिलीलखान त्याच्यावर चालून येत होता त्याच्यापासून स्वतःचें संरक्षण करण्याची विनंति करण्याकरितां, एक वकील मोठा नजराणा घेऊन त्याच्याकडे पाठविला. दिलीरखान जबरीनें मोठी खंडणी वसूल करणार होता, त्यापैकीं ७ लाख गिल्डर अजून वसूल व्हावयाचे होते. आणि जरी तो (बाहेर) धिटाईनें वागत असे तरी त्याच्या गैरहजेरींत विजापुरांत सर्वच बाबतींत उलटापालट झाली आहे. **सिद्दी मसाऊद** व **सैद मखटो(दू)म** हे दरबारांतील प्रमुख मुत्सद्दी असून, त्यांपैकीं प्रत्येक जण विजापूरचें सर्व राज्य दुसऱ्याच्या हातीं देण्यास तयार होता. सिद्दीच्या मनांत सर्व राज्य मोंगलांच्या हवालीं करण्याचें होतें; परंतु मखदूम तें दरोडेखोर **शिवाजीला** देऊं पहात होता. खुद्द विजापूरच्या विस्तीर्ण राज्यांत जिकडे तिकडे खून, दरोडे, लूट व खंडण्या यांच्याशिवाय कांहींहि ऐकूं येत नव्हतें.

फॅ. रे. मुंबई } (२१०९) { श. १६०१ अ. ज्येष्ठ व. १
भा. ८ पृ. २० इ. } मुंबई-सुरत { इ. १६७९ मे १६

राजापूरच्या वखारवाल्यांना न घेतांच रिव्हेंज गलबत परत आलें. कारण, **शिवाजी**-च्या अधिकाऱ्यांचे मनांत आपल्या कह्यांतच आम्हांला ठेवून घ्यावयाचें असल्यामुळें [आमचे वखारवाल्यांना त्यांनीं सोडिलें नाहीं].

फॅ. रे. मुंबई } (२११०) { श. १६०१ अ. ज्येष्ठ व. ६
भा. ८ पृ. २१ इ. } मुंबई-सुरत { इ. १६७९ मे २१

संभाजी राजा आणि दख्खनचें सैन्य यांनीं मिळून **पन्हाळा** किल्याला वेढा घातला असून पावसाळ्यांत ते त्याच किल्ल्याखालीं छावणी करणार आहेत; दीर्घकालपर्यंत वेढा चालू ठेवून किल्ला हस्तगत करण्याचा त्यांचा विचार आहे.

फॅ. रे. सुरत } (२१११) { श. १६०१ अ. ज्येष्ठ व. ८
भा. ४ पृ. ४०-४१ इ. } सुरत कन्सल्टेशन { इ. १६७९ मे २३

१९ एप्रीलच्या टॉमस मिचेल व रॉबर्ट रीड यांच्या पत्रावरून राजापूरचा सुभेदार त्यांना तेथून निघूं देत नाहीं वगैरे कळलें. यामध्यें स्वतः या दोन वखारवाल्यांचाहि हात असावा असें वाटतें. परंतु आतां पुढील पावसाळ्यापर्यंत त्यांना तेथें राहूं देणें भागच आहे. त्यानंतर आपलीं युरोपांतील गलबतें आल्यावर जरूर तर अधिक कडक व परिणामकारक उपाय अमलांत आणिल्याशिवाय राहूं नये.

स. पृ. ८४(५८) } (२११२) { श. १६०१ अ. ज्येष्ठ व. ११
जु. २२ रुमाल २४ } फर्मान, औरंगजेब बादशहाचें { इ. १६७९ मे २५

मुसमात राजीजी व हालीमजी यांची एरंडोल येथील त्यांच्या आज्यानें खरेदी केलेली ९ औत जमीन त्यांजकडे चालवावी. पैकीं शंभर बिघे बादशहानीं मीर अहमदखान यास दिली आहे. ती यांजकडे चालविणें.

खं. २० ले. २४७ } (२११३) { श. १६०१।१६०२ ज्येष्ठ शु.४।५
सु. १०८० जवल ३ } { इ. १६७९ जून २।१६८० मे २२

अनाजी दत्तो

त्र्यंबक गोपाळ सुभे० व कार० सुभा पुणें मौ० मोरगांव येथें, माहादाजी गोसावी यांचा इनाम आहे. तो त्यांच्या मुलगा सिवाजी याजकडे पूर्वीप्रमाणें चालूं ठेवणें.

डाग रजिस्टर १६७९ } (२११४) { श. १६०१ ज्येष्ठ शु. ८
पृ. २६० इ. जून १६ न्यू. } { इ. १६७९ जून ६

...शिवाय गेले पुष्कळ दिवस दरोडेखोरे शिवाजीराजाच्या सैन्यामुळें **सुरतेच्या** आस-पास सर्वत्र सुरक्षितपणा नाहींसा झाला होता. परंतु इ. १६७४ मध्यें शिवाजीनें जिंकून

घेतलेल्या **रामनगर** किल्ल्याची मजबुती करून व तेथें रसद इत्यादि पोंचवून तें (शिवाजीचें सैन्य) आतां निघून गेलें आहे.

सा. ले. १६७ } (२११५) { श. १६०१ ज्येष्ठ व. १४
सु. १०८० जवल २७ } { इ. १६७९ जून २६

अज. दि. ठाणे तर्फ कऱ्हेपठार पर. पुणें.

ता। मोक. मौ. मोरगाव तर्फ मज.

मौ. मज.रीं सिवाजी गोसावी यांचे पिते माहादाजी गोसावी याचा इनाम आहे. त्रिंबकपंत सुभेदार यांची सनदहि आहे. तरी तो इनाम सिवाजी गोसावी याजकडे चालविणें.

फॅ. रे. मुंबई भा. ८ } (२११६) { श. १६०१ श्रावण शु. २
पृ. २५ इ. } मुंबई-सुरत { इ. १६७९ जुलै २९

दिलेरखान व **संभाजी** यांनीं, पावसाळा संपतांच **विजापूरच्या** वजिरांना शिवाजीवर चालून जाण्यासाठीं आपल्याला मिळण्यास भाग पाडून, **पन्हाळ्याखालीं** युद्ध देण्याची जोराची तयारी चालविली आहे. **शिवाजी राजानें** आपल्या सरहद्दीवर १२००० घोडेस्वार आणून ठेविले आहेत. पावसाळा संपतांच उभयपक्षीं हालचालींना सुरवात होईल. **सुंदा** व **बिद्नोरच्या** राजांमध्यें जोराच्या लढाया होऊन जमशेत[शीर]-खानाच्या मदतीनें सुंदाराजाला जय मिळाला. त्यामुळें झालेल्या **तहानें** बेदनूरच्या राणीला शिरसी व शिर्रे हे दोन किल्ले व कारवारच्या दक्षिणेकडील मिरजनचें बंदर सुंदा राजाला द्यावें लागलें.

सा. ले. ३६५ } (२११७) { श. १६०१ श्रावण व. १४
श. सं. रजब २७ } कर्जकतबा { इ. १६७९ आगस्ट २४

होनपा बिन गगपा———सिवपा मुचेडी

आम्ही स्वामियापासी घेतले होनु ।- मुदतीसी पावते करूं.

फॅ. रे. मुंबई भा. ८ } (२११८) { श. १६०१ भाद्रपद शु. १
पृ. २८ इ. } मुंबई-सुरत { इ. १६७९ आगस्ट २७

पोर्तु० व हिंदू लोकांच्या पत्रांवरून, ह्या (मुंबई) बंदराच्या तोंडाशीं असलेल्या आमच्या मालकीच्या **हेन्ड्रीकेन्ड्री [उंदेरी खांदेरी]** बेटावर, **शिवाजी** राजा किल्ला बांधण्याचा बेत करीत आहे असें कळलें. अशा समर्थ आणि लोभी राजाला इतकें महत्त्वाचें स्थल विरोधाशिवाय हस्तगत करूं देणें हें राजकारणाचे दृष्टीनें हीनपणाचें होणार आहे. त्या ठिकाणीं नेहमीं वरखालीं फेऱ्या घालण्याकरितां एक छोटें आरमार ठेवून मुंबई बेटाचें व नजीकच्या मुलखाचें दळणवळण बंद करणें एवढाच या हालचालीचा उद्देश असला

पाहिजे. आणि ह्या उद्देशाच्या सिद्ध्यर्थ त्यानें चौलजवळ माणसें व मालमसाला यांची सिद्धता केली आहे. एकदां त्याला हा किल्ला बांधूं दिला म्हणजे मग त्याच्या हातून तो घेणें मुष्किलीचें होऊन बसेल. परंतु आतांच तें बेट आमच्याच मालकीचें असल्याबद्दल जोरानें प्रतिपादन केल्यास व त्याला विरोध करण्याचा निश्चय दाखविल्यास तो आपल्या बेतापासून परावृत्त होईल.

फॅ. रे. मुंबई भा. २ पृ. ५ (४) इ. } (२११९) मुंबई कन्सल्टेशन { श. १६०१ भाद्रपद शु. ७ इ. १६७९ सप्टें. २

थळ (Tull) हून **खांदेरीउंदेरी**ला माणसें व मालमसाला पाठविण्याच्या कामीं शिवाजीच्या अधिकाऱ्यांनीं फक्त एकदोन होड्याच लाविलेल्या असल्यामुळें, त्यांना अडथळा करण्यास थोडीं माणसें पुरेशीं आहेत. तेव्हां एन्साईन ह्यूजेस ह्यानें तीन शिबाडें घेऊन हें काम करावें.

फॅ. रे. मुंबई, भा. ८ पृ. ३१, **सप्टेंबर** ३, वरील ह्यूजेस यास हुकूमः— शिवाजीनें **खांदेरीउंदेरी**ला पुष्कळ लोक उतरवून त्या बेटाचा ताबा घेतला आहे. तेथून त्याला कोणीं काढून लावूं नये म्हणून तेथें तटबंदी करण्याच्या इराद्यानें आपल्या किनाऱ्यावरून प्रत्यहीं तो माणसें व माल आणवितो.... ...हें बेट आपल्या राजाचें आहे. असें सांगून येतील त्या होड्या परत फिरवाव्या. पहिल्यानें शत्रूनें शस्त्र उचलल्याशिवाय तुह्मीं जबरदस्ती करूं नये. वारंवार त्यांचे बेत, गलबतांची संख्या वगैरे तपशील लिहावा. हवा वादळी पडल्यास वाऱ्याच्या दिशेचा विचार करून चौल बंदरांत किंवा मुंबईत शिरावें.

फॅ. रे. सुरत भा. ४ पृ. ६३-६४ इ. } (२१२०) सुरत कन्सल्टेशन. { श. १६०१ भाद्रपद शु. ९ इ. १६७९ सप्टें. ४

काल मुंबईचें पत्र आलें. मुंबईकरांनीं **खांदेरीउंदेरी**विषयीं हुकुम मागविला आहे. ही गोष्ट अत्यंत महत्त्वाची असून **शिवाजी**चा हा बेत मोठा धोका उत्पन्न करणारा आहे. करितां **खां०उं०**च्या अत्युच्च भागावर इंग्रजांचें निशाण लावून शक्य झाल्यास तेथें संरक्षणाकरितां शिपाई ठेवावे. हंटर बोट बेटाच्या आसपास फिरती ठेवावी. शिवाजीच्या लोकांना ' हें बेट इंग्लंडच्या राजाचें आहे. तेव्हां येथें किल्ला बांधून शत्रुत्व करण्याची जबाबदारी तुमच्यावर आहे,' असें सामोपचारानें सांगावें. चौलच्या व इतर अधिकाऱ्यांना असेंच कळवावें. त्याशिवाय स्थानिक डे० प्रेसि०ला वगैरे सुचतील ते उपाय करावे व आमच्याकडे कळवावें.

फॅ. रे. मुंबई भा. १९ पृ. ३३ ता. ५ सप्टेंबर; मुंबईच्या २९ आगस्टच्या पत्रास सुरतेहून वरील मजकुराचें उत्तर.

फॅ. रे. मुंबई भा. ८ } (२१२१) { श. १६०१ भाद्रपद शु. ११
पृ. ३४ इ. } मुंबई-सुरत. { इ. १६७९ सप्टेंबर ६

डे० प्रेसि० आजारी आहे. खांदेरींउंदेरी अगदीं बंदराच्या तोंडाशीं असल्या-मुळें **शिवाजीचें** तेथें ठाणें बसल्यास येणारें जाणारें प्रत्येक गलबत त्याच्याकडून लुटलें जाण्याचा धोका आहे. गेल्या महिन्याच्या अखेरीस **मिया नाईक (माय नाक]** नांवाचा भंडारी १५० लोक व ४ तोफा घेऊन त्या बेटावर आला असतां त्याला बेट सोडून जाण्याबद्दल आम्हीं सांगितलें. त्यानें संथपणें, शिवाजीच्या हुकमा-शिवाय आपल्याला जातां येत नाहीं असें उलट कळविलें. याबद्दल थोडा विचार करून प्रत्यक्ष त्याला कांहीं दमदाटी न देतां किनाऱ्याशीं त्याचें दळणवळण तोडण्याकरितां ३ शिबाडें पाठविलीं. आम्हीं कोणत्याहि प्रकारें आपला हक्क सांगण्यांत कसूर केली असें शिवाजीला म्हणण्यास जागा राहूं नये एवढ्याचकरितां आम्हीं ही खबरदारी घेतली आहे. आमच्या या वर्तनाच्या बाबतींत शेजाऱ्यांचें समाधान करण्याकरितां आमच्या दुभाष्याला चौलच्या सुभेदाराकडे पाठविलें आहे.

फॅ. रे. मुंबई भा. १९ } (२१२२) { श. १६०१ भाद्रपद शु. ११
पृ. २९-३० इ. } ह्यूजेस, खांदेरी-मुंबई. { इ. १६७९ सप्टें. ६

४ तारखेला सकाळीं ८ वाजतां आम्ही येऊन पोंचलों. दोन तासांनीं किनाऱ्या-कडून दोन होड्या आल्या. त्यांना उतरण्याची आम्हीं बंदी केली. त्यांत माणसें होतीं. माल काय होता तें कळलें नाहीं. पोर्तु० किंवा सिद्दी यांपैकीं इकडे कोणींच आले नसून बेटावरची अशी एकहि होडी नाहीं. तेथें फक्त सुमारें ४०० लोक आहेत. त्यांपैकीं बहुतेक काबुकरी (cabucares कामकरी ?) आहेत. बेटावर चढण्यासारख्या जागा आहेत त्या सर्व दगड मातीची १ यार्ड उंचीची भिंत बांधून त्यांनीं बंद केल्या आहेत. अशाच भिंती बांधून दरीच्या तेथें त्यांनीं ४।६ तोफा ठेविल्या आहेत. काल नारायण शेणवी यानें [कोंकण-] किनाऱ्यावर येऊन असें सांगितलें कीं, 'काल रात्रीं येथील हवालदारानें शिवाजीकडे तुमच्या शिबाडांची बातमी कळविली आहे.'

फॅ. रे. मुंबई भा. १९ } (२१२३) { श. १६०१ भाद्रपद शु. १४
पृ. ३१ इ. } ह्यूजेस-मुंबई { इ. १६७९ सप्टें. ९

ह्या तीन दिवसांत किनाऱ्याकडून एकहि होडी आली नाहीं. आमच्या शिबा-डांतील तोफाएवढ्याच त्यांच्या तोफा दिसतात. आतां बेटावर तोफांचे गाडे तयार झाले आहेत. आम्हीं वारंवार त्यांना बिचकवितों. यामुळें त्यांच्या कामांत पुष्कळच अड-थळा होतो.

फॅ. रे. मुंबई भा. ८ } (२१२४) { श. १६०१ भाद्रपद शु. १५
पृ. ३५ इ. } मुंबई-ह्यूजेस. { इ. १६७९ सप्टें. १०

तुमचीं दोन पत्रें पावलीं......**सिद्दीचीं** कांहीं **गलबतें** आल्यास तीं इकडे येऊन येथून परवानगी घेऊन जात तोंपर्यंत, त्यांना शिवाजीच्या लोकांच्या भानगडींत पडूं देऊं नये.

फॅ. रे. मुंबई भा. ८ } (२१२५) { श.१६०१ भाद्रपद शु. १५
पृ. ३६ इ. } मुंबई-कॅ० मिंचिन्. { इ. १६७९ सप्टें. १० ?

तुह्मी तेथें आहांत तेवढ्या मुदतींत शिवाजीचें आरमार त्या बाजूला आलें तर **खांदेरीच्या** लोकांना मदत करण्यास किंवा रसद पोंचविण्याला त्याला सवड देऊं नका.

फॅ. रे. मुंबई भा. ८ } (२१२६) { श. १६०१ भाद्रपद व. २
पृ. ३२ इ. } मुंबई-ह्यूजेस { इ. १६७९ सप्टें. ११

शिवाजीचा आरमारी-सेनापती **दौलतखान** कांहीं गुराबा व ८।१०। शिडाचीं तारवें घेऊन तुमच्या रोखें येत आहे असें कळतें. तरी त्याचें आरमार येतांना दिसतांच शिडें उभारून एकदम बंदरांत परत यावें.

सदर भा. २ पृ. ६, मुंबई कन्सल्टेशन ता. १२ सप्टें:—रिव्हेंज गलबत शिबाडांच्या मदतीला पाठवावें.

सदर भा. ९ पृ. ३३, मुंबई-सुरत. ता. १२ सप्टें:—परस्परांचे वकील नेहमीं प्रमाणेंच (खांदेरीप्रकरणीं) बढाईची भाषा बोलतात.

सा. ले. १४५ } (२१२७) { श. १६०१ भाद्रपद व.५
रा. ६ } आज्ञापत्र म. मु. व सी. { इ. १६७९ सप्टें. १४

क्ष. कु. श्री. राजा **शिव छत्रपति**

त्र्यंबक गोपाल देशाधि० तर्फ पुणा.

तुलापुरकर ब्राह्मणास पुरातन इनाम वृत्ती आहेत. स्वामीच्याहि सनदा आहेत. तरी त्यांचें इनाम पूर्वीप्रमाणें त्यांजकडे चालविणें. खलेल न करणें.

फॅ. रे. सुरत भा. ४ } (२१२८) { श. १६०१ भाद्रपद वद्य ६
पृ. ६९-७० इ. } स्वाली कन्सल्टेशन { इ. १६७९ सप्टें. १५

खांदेरी प्रकरणीं मुंबईचें [६ तारखेचें] पत्र ३ [१३ ?] तारखेला पोचलें. सामोपचाराचे उपाय संपले आणि दौलतखान आरमार घेऊन आला तर मग रिव्हेंज व हंटर हीं गलबतें सज्ज करून उघड शत्रुत्व पत्करून त्यांचा **सशस्त्र प्रतिकार करावा.** [या मजकुराचें मुंबईस पत्र २० तारखेला गेलें. फॅ. रे. मुंबई भा. १९ पृ. ४१]

[से]–याच वेळीं **कारवारची फॅक्टरी** बंद करावी असा ठराव केला. ...गेल्या ऑगस्ट १८चें टॉमस मिचेलचें **राजापुराहून** पत्र आलें. त्यावरून त्यांना सुभेदाराकडून २९२ खंडी सुपारी व ५०० खंडी नारळ यांच्या वराता मिळाल्या असून माल या महिना-अखेर हातांत येईल असें दिसतें. माल आणण्याकरितां मुंबईकर व चाइल्ड यांनीं आपसांत गलबताची व्यवस्था ठरवावी. **राजापूरची वखार** शक्य तितकी लवकर बंद करावी.

फॅ. रे. मुंबई भा. १९ पृ. ३३–३४ इ. } (२१२९) मिंचिन, रिव्हेंज–मुंबई { श. १६०१ भाद्रपद वद्य ७ इ. १६७९ सप्टें. १६

शनिवारीं (ता. १३) रात्रीं ६ वाजतां आम्हीं निघालों व खांदेरीपासून दीड मैलांवर थबकलों. लगेच वादळ होऊन तीस तासपर्यंत पाऊस लागला व दोनप्रहरचे सुमारास हवा थोडी निवळली. त्या वेळीं शिबाडें निघालेलीं दिसलीं तीं बहुधा मुंबईला येऊन पोंचलीं असतील. सोमवारीं वादळ व पाऊस तसाच राहिल्यामुळें आम्हीं येथून हाललों नाहीं. संध्याकाळीं बेटाकडून किनाऱ्याकडे २ होड्या गेल्या. मंगळवारीं किनाऱ्यावरून २ होड्या बेटावर येऊन परत गेल्या. वादळ असून आकाश अभ्राच्छादित आहे. आज दोन प्रहरीं किनाऱ्याकडून चार होड्या आल्या. आज संध्याकाळीं पांच वाजण्याच्या सुमारास आम्हीं बेटाजवळ जाणार आहों. आमचें सैन्य थोडें व आजारानें असमर्थ झालेलें असें आहे. तरी शिवाजीचें मोठें आरमार किंवा एकादें गलबत येऊन बेटावरील लोकांना मदत देऊं लागलें तर हुकमाची वाट न पहातां मीं एकदम लढावें काय ?

फॅ. रे. मुंबई भा. ८ पृ. ३६–३७ इ. } (२१३०) मुंबई–फ्रॅन्सिस थोर्प { श. १६०१ भाद्रपद व. ८ इ. १६७९ सेप्टें. १७

१४ तारखेला वादळामुळें परत आलेल्या शिबाडांवर आतां धान्य सामुग्री व दारुगोळा भरपूर भरून पाठविला आहे. त्यांपैकीं एकावरून खांदेरीजवळ जाऊन तेथील लोकांचें किनाऱ्याशीं दळणवळण तोडावें. त्यांनीं गोळ्या झाडल्यास तुम्हींहि त्याच प्रकारानें तोंड देऊन त्यांचा प्रतिकार करावा.

फॅ. रे. मुंबई भा. १९ पृ. ३६–३७ इ. } (२१३१) कॅ. मिंचिन–मुंबई. { श. १६०१ भाद्रपद वद्य १० इ. १६७९ सेप्टें. १९

थॉर्पची भेट घेऊन पाहतां तो एकसारखा दारू घेऊन विश्रांति घेत नसल्याचें कळून आलें. 'काल गुरुवारीं रात्रीं आपण बेटावर चढाई करणार होतों.' असें त्यानेंच स्वतः मला सांगितलें. परंतु सावधगिरीची इशारत देऊन मी परत फिरतों न फिरतों तोंच आमच्या शिबाडांनीं **बेटावर** लहान मोठ्या गोळ्यांचा **मारा** केल्याचें मला दिसून

आलें. लगेच मीं माझ्या होड्या सज्ज करून त्यांच्या मदतीला पाठविल्या; परंतु त्या जाऊन पोंचण्यापूर्वीच दोन शिबाडें परत फिरलेलीं दिसलीं. व थोड्याच वेळांत सार्जंट नॅशकडून थॉर्पचें शिबाड व स्वतः तो आणि दोन तीन इंग्रज नाश पावल्याचें कळलें...बेटाजवळ होड्या ठेवून आम्हीं पूर्ववत् नजर ठेवीत आहोंत. आमचें त्यांच्या स्वाधीन झालेलें शिबाड त्यांनीं नेऊं नये असीहि खटपट केली आहे. बेटावर जॉर्ज कोल वगैरे आमच्या लोकांना कैद करून ठेविलें आहे.

फॅ. रे. मुंबई मा. १९ पृ. ३६--३७ इ. (२१३२) कॅ. मिंचिन-मुंबई श. १६०१ भाद्रपद व. ११ इ. १६७९ सप्टें. २०

मीं स्वतः अगदीं बेटाजवळ राहिलों आहें. दुसरें राहिलेलें शिबाड खांदेरीच्या आखाताच्या बाजूला रवाना केलें. परंतु तोफांचा मारा करून बेटावरचे लोक त्याला जवळ येऊं देत नाहींत. मी एकदां बेटावर मारा केला तेव्हां त्यांच्या तोफा बंद पडल्या आणि आमचें शिबाड घेऊन जाण्यास शक्य तो अडथळा करण्याकरितां व किनाऱ्याच्या होड्या थांबविण्याकरितां मीं सार्जंट जाईल्सला नेमिलें आहे. परंतु त्याच्या गफलतीमुळें आज सकाळीं त्यांच्या किनाऱ्याहून दोन होड्या येऊन परत गेल्या. मीं वेळीं खूण करू-नहि त्यानें त्याचा कांहींच उपयोग केला नाहीं....आमचें शिबाडहि आतां त्यांनीं किना-ऱ्यावर ओढून त्याची डोलकाठी वगैरे सर्व कांहीं काढून घेतलें आहे. हवा थोडी खराब असल्यामळें मीं थोडा दूर सरकलों आहे. आमची बातमीदार होडी माजगांवची असल्या-मळें बहुधा ती तिकडेच गेली असावी.

फॅ. रे. मुंबई भा. १९ पृ. ३७-३८ इ. (२१३३) कॅ० मिंचिन-मुंबई श. १६०१ भाद्रपद व. १३ इ. १६७९ सप्टें. २२

आतांपर्यंत त्यांच्यापैकीं कोणींहि हातीं न सांपडल्यामुळें आमच्या कैद्यांची हाल-हवाल कांहींच कळली नाहीं. आज एक होडी अगदीं हातांत आलेली गेली. **खांदेरी बेटावरील लोकांना आमच्या हातून कांहीं इजा होण्याचा संभव दिसत नाहीं.** कारण, आम्हीं जवळ येतांच ते खडकांत लपून दिसेनासे होतात ! केवळ त्यांच्या भिंती पाडून खुनास खून घेतां येत नाहींत. यामुळें उलट **आमचेंच नुकसान** ज्यास्त होणार. रात्रंदिवस झटून ते आपलें काम करीत आहेत. आपला हुकूम आल्यास कृष्णपक्ष संपल्यावर मीं पूर्वीप्रमाणेंच त्यांच्या मुख्य तटासमोर ठाणें धरून रहातों.

फॅ. रे. मुंबई भा. १९ पृ. ३९-४० इ. (२१३४) कॅ. मिंचिन-मुंबई. श. १६०१ आश्विन शु. २ इ. १६७९ सप्टें. २६

आपलें २५ चें पत्र मिळालें. शत्रूची एकहि होडी आली नसतांना अनेक होड्या आल्याची गैरखबर आपल्याला कोणीं दिल्याबद्दल मला खेद होतो. गेल्या मंगळवारीं

त्यांच्या दोन होड्यांचा आमच्या शिबाडानें पाठलाग केला. परंतु त्या हलक्या असल्यामुळें त्यांच्या तावडींतून निसटल्या. लगेच एक लहान बोट आम्हीं पाठलागास पाठविली. तिनें त्या दोन्ही होड्यांचा किनाऱ्यापर्यंत पाठलाग करून त्यांच्यावरील एका माणसाला ठार केलें व दोघांना खालीं पाडलें. इतक्यांत रानांतून भराभर माणसें बाहेर येऊन त्यांनीं आमच्या लोकांना काढून लाविलें. आमचे कांहीं लोक आजारी झाले आहेत. आम्हीं बेटापासून इतके जवळ आहों कीं, त्यांच्या गस्तीचा आवाज आम्हांला सहज ऐकूं येतो. **शिवाजीचें आरमार** आज येईल, उद्यां येईल अशी अपेक्षा धरून आहोंत. ह्यांच्या तोफा मारून काढण्याकरितां जर कदाचित् मीं आखातांत शिरलोंच तर शिवाजीच्या आरमाराकडून आंत कोंडला जाऊन मला बाहेर पडण्यास मार्गच रहाणार नाहीं ! म्हणून आतां शिबाडांचें रक्षण करतां यावें, अशा सोईनें मीं खुला राहिलों आहे.

फॅ. रे. मुंबई भा. २ पृ. ७–८ इ.	(२१३५) मुंबई कन्सल्टेशन	श. १६०१ आश्वीन शु. ५ इ. १६७९ सप्टें. २९

शिवाजीचें आरमार येण्याची नक्की बातमी आली; पण सुरतेहून कांहींच हुकूम आला नाहीं. तेव्हां भरपूर सैन्याच्या अभावीं शिवाजीच्या समोरून आपल्या लोकांना पळून जावें लागणें नामुष्कीचें होईल हें लक्षांत घेऊन आपल्या लोकांनीं आधींच १ आक्टोबरला बंदरांत परत यावें.......

इतक्यांत प्रेसिडेंटचें सुरतेहून युद्ध करण्याबद्दल स्पष्टपणें हुकूम आल्यामुळें गलबतें व शिबाडें चांगल्या तऱ्हेनें सज्ज करण्यासाठीं बोलवावीं; इतरहि शक्य तितकी सज्ज करून शिवाजीच्या आरमाराशीं तोंड देण्यास पाठवावीं. आणि या मध्यंतरींच्या काळांत खांदेरीच्या कामावर एक मचवा पाठवावा.

सदर पृ. ८,९ **आक्टोबर,** मुंबई कन्सल्टेशनः—सुरतेच्या पत्राप्रमाणें दोन गुराबा भाड्यानें घेऊन तयार कराव्या. व **रिचर्ड केग्विन** याला रिव्हेंज व सर्व गलबतें यांचा मुख्य अधिकारी नेमावा. कारण तो संथ वृत्तीचा व धोरणी असून इंग्लंडांत त्यानें समुद्रावरील लढाया प्रत्यक्ष पाहिलेल्या आहेत.

फॅ. रे. मुंबई भा. ८ पृ. ४१ इ.	(२१३६) मुंबई–सुरत	श. १६०१ आश्वीन शु. १२ इ. १६७९ आक्टो. ६

उद्यां केग्विनच्या नेतृत्वाखालीं सुमारें २०० शिपाई खांदेरीला वेढा देण्याकरितां निघतील. आमचीं कित्येक गलबतें व्यापाराकरितां बाहेर गेल्यामुळें दोन गुराबा भाड्यानें घेतल्या. १० दिवसांनीं हंटर येऊन पोंचल्यावर त्यांना सोडून देऊं. बेटाला पक्का वेढा पडल्यास **पाण्याचा तुटवडा** पडून तेथील लोक शरण येतील. युद्धावर इतकें सैन्य पाठविल्यामुळे मुंबईंत फक्त ५० शिपाईच राहिले आहेत. करितां आणखी ५० शिपाई ठेवणें जरूर आहे.

फॅ. रे. मुंबई भा. ८ } (२१३७) { श. १६०१ आश्वीन शु. १३
पृ. ४१-४२ इ. } मुंबई-कॅ० केग्विन. { इ. १६७९ आक्टोबर ७

तुमच्या ताब्यांत रिव्हेंज फ्रिगेट, २ गुराबा, ३ शिबाडें, व २ मचवे अशीं ८ गलबतें व अंमलदार वगळून १८८ शिपाई दिले आहेत. तुम्हीं खांदेरीला वेढा घालून किनाऱ्याशीं त्या बेटाचें दळणवळण तोडावें. तुम्हांला पाठविण्याचें मुख्य कारण असें आहे कीं, दौलतखानाचें २० गुराबांचें आरमार त्या बेटाच्या मदतीकरितां येत असल्याची बातमी आहे. तें तुम्हांला दिसल्यावर एक लहान बोट पाठवून **दौलतखानाला** आपल्या हक्कांची जाणीव करून द्यावी. आणि तसें कांहीं नच जमल्यास धैर्यानें युद्ध करावें. तो तुमच्याशीं युद्ध न देतांच मध्यें आखातांत आडवा येऊन राहील तर तुम्हींहि नांगर उचलून त्याच्याबरोबर राहून त्याला मुंबई बेटावर उतरूं देऊं नये.

फॅ. रे. मुंबई भा. २ } (२१३८) { श. १६०१ आश्वीन व. ४
पृ. ९-१० इ. } मुंबई कन्सल्टेशन. { इ. १६७९ आक्टोबर १३

नवीन डे० गव्हर्नरनें चार्ज घेतला व पूर्वीचा डे० ग० हेन्री ऑक्सिंडेन इत्यादि लोकांचें मंडळ भरवून मुंबई बेटाच्या सुरक्षिततेबद्दल विचार झाला. **पोर्तु० नीं** आपल्या मुलखांतून मराठ्यांना येऊं देण्याचें नाकारल्यामुळें या बेटाला विशेष धोका नाहीं. परंतु खाडीमधील पुष्कळ लहान लहान बोटींचा शत्रूला कांहीं उपयोग होऊं शकेल म्हणून दोन शिबाडें भाड्यानें घेऊन बंदोबस्त करावा.

सदर भा. ८ पृ. ४४, मुंबई-सुरत, ता. १३ आक्टोः—समोरच्या किनाऱ्यावर शिवाजीचें सैन्य आल्याची बातमी असल्यामळें येथें भेदरून गेलेल्या लोकांच्या आश्वासनार्थ दोन शिबाडें भाड्यानें घेऊन बंदोबस्त केला आहे.

मास्टर डायरी भा. २ } (२१३९) { श. १६०१ आश्वीन व. ४
पृ. २६३ इ. } हुगळी कन्सल्टेशन. { इ. १६७९ आक्टोबर १३

सुलतान **मुअझ्झम** व शिवाजीचा मुलगा **संभाजी कटक**कडे येणार असल्याची बातमी खरी ठरल्यास एकदम बेसावधपणें त्यांच्या हातीं सांपडूं नये म्हणून **बालासोर**च्या वखारवाल्यांनीं इंग्लंडच्या गलबतावर माल भरून सुरक्षित ठेवावा.

फॅ. रे. मुंबई, भा. २ } (२१४०) { श. १६०१ आश्वीन व. ८
पृ. १०-११ इ. } मुंबई कन्सल्टेशन. { इ. १६७९ आक्टोबर १६

गेल्या ११ तारखेला, इतके दिवस शिवाजी राजाचा वकील म्हणून आमच्या चांगला परिचयाचा झालेला **सुंदरजी परभू** इतक्या कमी लवाजम्यानिशीं आला कीं, त्याला हेर म्हणूनच आम्हीं कैद करून ठेविला आहे. त्याला विचारलें असतां तो समाधानकारक उत्तरें देऊं शकत नाहीं. म्हणून त्याच्यावर कडक नजर ठेवावी. राजाकडील

बातमी आपल्याला मिळावी म्हणून तीन चार गरीब ब्राह्मणांना हलक्या पगारावर गुप्त हेर म्हणून नेमावें. त्यांनीं दर ३।४ दिवसांनीं बेटावर येऊन मिळालेली बातमी आणून पुरवावी.

फॅ. रे. मुंबई भा. ८ } (२१४१) { श. १६०१ आश्वीन व. ८
पृ. ४७ इ. } मुंबई-कॅ० केग्विन. { इ. १६७९ आक्टोबर १६

तुमचें कालच्या तारखेचें **दौलतखानाचें** आरमार आल्याबद्दलचें पत्र आलें...

सदर पृ. ४८; ता. १७ आक्टोबरः – **दौलतखानाचीं गलबतें खांदेरीला मदत देऊं शकलीं** यामुळें मन अस्वस्थ होतें. तीं फार लहान आहेत तेव्हां तीं करणार ती मदतहि अल्पच असेल, हें खरें आहे. परंतु बंदोबस्त हा केलाच पाहिजे. शत्रूचीं गलबतें पुष्कळ असलीं तरी तुमचें सामर्थ्य अधिक आहे आणि त्यांचीं गलबतें कमसंख्य व पर्यटणसामर्थ्यांत बरींच हीन दर्जाचीं आहेत. यामुळें आम्हांला त्यांची क्षिती वाटत नाहीं. तथापि लक्ष ठेवून तुह्मीं एकाददुसरें त्यांचें गलबत पकडलें तर ते कसे क्षुद्र आहेत हें तुमच्या लोकांच्या नजरेस येऊन त्यांचें समाधान वाढेल. तुम्हांला पाण्याचा पुरवठा केला जाईल. काय लागेल तें मागत चला.

(स्रे.) फॅ. रे. सुरत भा. १०८ } (२१४२) { श. १६०१ आश्वीन व. ८
पृ. ३७ इ. } राजापूर--सुरत. { इ. १६७९ आक्टो. १६

शिवाजीनें दक्षिणी लोकांशीं तह केला असून तो आपलें सगळें सैन्य घेऊन कोठेंसा निघून गेला आहे. कांहीं दिवसांपूर्वी दिलेरखान, सर्जेखान व **संभाजी राजा** यांनीं **अथणी** लुटली. पुढें त्यांनीं तें शहर जाळून कांहीं लोक कैदहि केले. या शेवटच्या बाबतींत सर्जेखान व संभाजी यांचें मत अनुकूल नव्हतें. कैदी सोडावे असा त्यांचा विचार पडला आणि दिलेरखानाशीं मतभेद होऊन त्या दोघांना विजापुराकडे पळून जावें लागलें. त्यानंतर संभाजीराजा **कोल्हापूरकडे** २०० घोडे व १००० पायदळ घेऊन आला आहे. इकडे येण्यांत त्याचा हेतु काय आहे तें कळलें नाहीं. परंतु आपल्या बापानें [**शिवाजीनें**] बोलाविल्यामुळें तो आला आहे अशी लोकांची समजूत आहे.

फॅ. रे. मुंबई भा. २ } (२१४३) { श. १६०१ आश्वीन व. ९
पृ. ११-१२ इ. } मुंबई कन्सल्टेशन. { इ. १६७९ आक्टोबर १८

आज सकाळीं ४०।५० गुराबा व गलबतें मिळून बनलेलें **शिवाजीचें आरमार नागांवच्या खाडींतून** बाहेर पडलें. व एकसारख्या फैरी झाडीतच सामोपचाराचें बोलणें करण्यास वेळ न देतांच आमच्या गलबतांजवळ येऊन ठेपलें. यामुळें

युद्धास तोंड लागून आमचें नुकसान काय झालें याबद्दल कांहीं वर्दी आली नाहीं. तथापि, कॅ० केग्विनला कुमक करण्याची तयारी करावी; व मुंबईंतील कांहीं सैन्य पाठवावें लागेल त्याचीहि जागा भरून काढण्याकरितां नवी भरती करावी.

ओ. कॉ. भा. ४० नं. ४६६५ इ. — (२१४४) कॅ० केग्विन–मुंबई — श. १६०१ आश्विन व. ९ इ. १६७९ आक्टोबर १८

नागांवच्या खाडींतून बाहेर पडून आमच्या समोर थळपर्यंत शिवाजीचें आरमार वल्हवीत आलें. सकाळीं सुमारें ७ वाजतां युद्धाला सुरवात झाली. आमचें आरमार एकत्र राहूं शकलें नाहीं. आणि थोडी पांगापांग व पळापळी झाली. शेवटीं रिव्हेंजवरच त्यांच्या २४ गुराबा व पुष्कळच गलबतें जमून आलीं. तीं अगदीं जवळ येऊन होड्यांत बसून चढाई करण्यास येईपर्यंत आपला दारुगोळा राखून ठेवून आम्हीं त्यांच्यावर एकदम मारा केल्यामुळें, अर्ध्या तासांत त्यांचा मोड झाला. पुढें त्यांचा पाठलाग करून आम्हीं त्यांना नागांवांत कोंडून टाकलें. आमच्यापैकीं कांहीं लोकांनीं चौलकडे व दुसरीकडे पळ काढण्यास सुरवात केली होती ! पण आतां त्यांना बोलल्यावर त्यांनीं यापुढें धिटाईनें तोंड देण्याचें कबूल केलें आहे. आमच्या पांच होड्या त्यांच्या हातीं सांपडल्या. एकादी आगीची होडी तयार केल्यास रात्रीं त्यांचीं गलबतें जाळतां येतील ! उद्यां त्यांचें आरमार पुनः आल्यास त्यांच्याशीं मी निश्चयानें लढेन. तुम्हींहि कुमक पाठवीत अहातच. खांदेरी बेटावर त्यांना आजपर्यंत फार थोडी सामग्री मिळाली आहे. युद्धामध्यें आमच्या कांहीं बंदुका फुटल्या. त्याबद्दल दुसऱ्या पाहिजे आहेत. व पाण्याच्या बरोबरीनें आमच्याकरितां सर्पणाचीहि तजवीज झाली पाहिजे.

ओ. कॉ. भा. ४० नं. ४६६६ इ. — (२१४५) मुंबई–सुरत — श. १६०१ आश्वीन व. १० इ. १६७९ आक्टोबर १९

कालच्या युद्धाची हकीकत...कुमक देण्याकरितां १ गलबत व २ शिबाडें तयार करून कॅ० अडर्टनच्या अधिकाराखालीं पाठविलीं आहेत. अडर्टनला नव्यानें नोकरींत घेणें भाग आहे. हंटर तुमच्याकडे वर गेल्यास शक्य तितक्या लवकर खालीं पाठवून द्या. तुमचें हॉयहि पाठवा.

फॅ. रे. मुंबई भा. २ पृ. १२–१३ इ. — (२१४६) मुंबई कन्सल्टेशन — श. १६०१ आश्वीन व. ११ इ. १६७९ आक्टोबर २०

शिवाजीच्या मुलखांतून एक भाताची होडी आणि थळचें एक गलबत अशीं बंदरांत आलेलीं शत्रूचीं म्हणून पकडून ठेवावीं. सैन्यांत वाढ करावी. समोरच्या किनाऱ्या-वर मोठें सैन्य उभारून मुंबई बेटांत शिरकाव करण्याचा शिवाजीच्या अमलदारांचा बेत आहे. तरी कारंजा, ट्रॉम्बे इत्यादि ठिकाणीं लहान होड्या ठेवून पहारा करावा.

[हीं दोन्ही शिवाजीच्या मुलखांतील नाहींत. असें सिद्ध झाल्यामुळें सोडून देण्यांत आलीं. सदर पृ. १३-१४ ता. २५ आक्टोबर १६७९]

फॅ. रे. मुंबई भा. ८ पृ. ५१ इ. }　　(२१४७) केग्विन-मुंबई　　{ श. १६०१ आश्वीन व. ११ इ. १६७९ आक्टो. २०

शिवाजीचें आरमार रात्रीं थळपर्यंत किनाऱ्यानें वल्हवीत आलें. आणि पहांटे भरतीच्या वेळीं आमच्याकडे चाल करून आलें. आम्हीं किनाऱ्यासून गोळीच्या टप्यावर होतों. तेव्हां त्यांनीं आमच्यावर चाल केली. आमचा नांगर तुटला किंवा शत्रूनें तोडला तर आम्हीं किनाऱ्यावर भरतीबरोबर जाऊन आदळू; असा विचार करून मचव्यांच्या साहाय्यानें आम्हीं बाजूला येऊन राहिलों. आमच्यापासून गोळीच्या टप्यांत येतांच आरमारानें आमचा रोख सोडला व तें **बेटांत कुमक देण्यासाठीं गेलें.** नव्या तोफा चढवून बेटांतून आमच्यावर भडीमार होतच होता. आतां आम्हीं युद्धाचीच वाट पहात आहों.

फॅ. रे. मुंबई भा ८ पृ. ५१-२ इ. }　　(२१४८) मुंबई-केग्विन　　{ श. १६०१ आश्वीन व. ११ इ. १६७९ आक्टो. २०

V ॲडर्टन बरोबर कुमक पाठविली आहे. त्यांच्या साहाय्यानें तुम्हीं बेटावर पाण्याचा तुटवडा पाडून रक्तपाताशिवाय बेट हस्तगत कराल अशी आशा आहे.

फॅ. रे. मुंबई भा. ८ पृ. ५५-५६ इ. }　　(२१४९) मुंबई-सुरत　　{ श. १६०१ आश्वीन व. १३ इ. १६७९ आक्टो. २२

१९ तारखेला पत्र पाठविलें होतें. त्यानंतर शिवाजीच्या ३ गुराबा आमच्या लोकांनीं बुडविल्या. त्यांच्या आणखी बऱ्याच गुराबा नादुरुस्त होऊन नागांवला दुरुस्तीकरितां गेल्या. त्याचे ३०० लोक मारले व आणखी १०० जखमी केले ते चौलकडे गेले. काल एक गलबत व २ शिबाडें केग्विनच्या कुमकेकरितां पाठविलीं. अजूनपर्यंत बेटावर **रसद पोंचविण्याचें** त्यांना **बंद करतां आलें नव्हतें,** तें आतां जमेल असें वाटतें. मुंबईवर चालून येण्याकरितां कल्याण-भिवंडीला शिवाजीनें ४००० लोक तयार ठेवून वसईच्या पोर्तु० कॅप्टन जनरलकडे त्यांच्या मुलखांतून जाण्याची परवानगी मागितली. परंतु ती त्यानें दिली नाहीं. त्यामुळें जबरदस्तीनें जाण्याची त्यांनीं त्याला धमकी देऊन पाहिलें. परंतु शेवटीं ट्रॉम्बेच्या समोर पनवेल म्हणून स्वतःच्याच मुलखांतील ठिकाणीं तें सैन्य आलें आहे असें म्हणतात. तेथें आम्हीं बंदोबस्त करीत आहों....असो. हें युद्ध केवळ बेटापुरतेंच चालविण्याच्या ऐवजीं त्याच्या मुलखावर कोठेंहि हल्ला करून त्याला वठणीला आणण्याची आम्हांला परवानगी द्यावी. नाहीतर आश्रय घेण्यास त्याला वाटेल तेवढा अवसर राहून आमचेंच नुकसान व खर्च वाढत आहे. एकादें विलायतेंतील मोठें गलबत १।२ किंवा ३ दिवस खांदेरीउंदेरीवर मारा करील तर सहज सर्व प्रश्न एकदम सुटेल!

फॅ. रे. मुंबई भा. ८ पृ. ५४–५५ इ. | (२१५०) मुंबई–कॅ. केग्विन | श. १६०१ आश्वी. व. १३ इ. १६७९ आक्टो. २२

मुंबईवर चढाई करून येण्याकरितां बरेचसें शिवाजीचें सैन्य शहाबाद (sobago ?)-ला येऊन राहिलें आहे असें ऐकिलें. येथील (मुंबई) बेटाचा बंदोबस्त करावयाचा तर (बहुतेक सर्व सैन्य तुमच्याकडेच दिल्यामुळें) तुम्हीं २ शिबाडें पाठवितां काय तें विचार करून पहा. परंतु, तें शक्य नसल्यास प्रसंग पडतांच आम्हीं बेटावर तोफा डागण्यास हुकूम देऊं. त्यावेळीं मात्र त्या पाहतांच किंवा ऐकतांच तुम्ही मदतीची आवश्यकता जाणून सर्व गलबतें घेऊन बेटाकडे यावें.

फॅ. रे. मुंबई भा. १९ पृ. ५७–५८ इ. | (२१५१) रिव्हेंज–मुंबई. | श. १६०१ आश्वीन व. १४ इ. १६७९ आक्टो. २३

आपल्या पत्राप्रमाणें आम्हीं शिबाडें देऊं शकत नाहीं. परंतु उलट आम्हांलाच कांहीं लहान होड्या मिळाल्या तर पाहिजे आहेत. आम्हीं इतकी काळजी घेऊनहि गेल्या रात्रीं १२ गलब्हेतें त्यांनीं बेटांत नेलीं ! एक होडी परत जातांना दिसली तिचा लगेच एका मचव्यानें पाठलाग करून किनाऱ्यापर्यंत जाऊन तेथें चकमक करून शत्रूचे कित्येक लोक मारले. काल दक्षिणेकडून ३७ गलबतें किंवा होड्या येऊन नागांवच्या नदींत शिरल्या. आपल्या तोफांच्या खुणेकडे आम्हीं काळजीपूर्वक लक्ष ठेवूं.

फॅ. रे. मुंबई भा. १९ पृ. ६४ इ. | (२१५२) सुरत–मुंबई | श. १६०१ आश्वीन व. ३० इ. १६७९ आक्टो. २४

सैन्याची यादी पाहून या खांदेरी प्रकरणांत मर्यादेबाहेर खर्च होणार असें दिसतें. तरी किती दिवसांत हें युद्ध संपेल याबद्दलचा आपला अंदाज काय आहे व यशाची आशा कितपत आहे वगैरे तपशीलवार कळवावें.

फॅ. रे. मुंबई भा. १९ पृ. ५८ इ. | (२१५३) रिव्हेंज–मुंबई | श. १६०१ आश्वीन व. ३० इ. १६७९ आक्टोबर २४

खांदेरी बेटावर गेलेल्या होड्या आम्हीं तेथेंच जबरदस्तीनें ठेवविल्या आहेत. काल रात्रीं त्यांनीं बाहेर पडण्याचा प्रयत्न केला. परंतु आम्हीं त्यांना जाऊं दिलें नाहीं.

फॅ. रे. सुरत भा. ४ पृ. ८२–८४ इ. | (२१५४) सुरत कन्सल्टेशन | श. १६०१ कार्तीक शु. १ इ. १६७९ आक्टो. २५

मुंबईच्या १९ तारखेच्या पत्रांतील युद्धाची हकीकत, यश व नुकसान...आमचे थोडेच लोक जाया होत असले तथापि आमचें अल्प मनुष्यबळ लक्षांत घेतां आम्हीं **शिवाजीशीं फार वेळ टक्कर देऊं शकूं असें आम्हांला वाटत नाहीं.**

शिवाय चिडून जाऊन खुद्द मुंबई बेटावरच तो सैन्य घेऊन उतरला तर आम्हांला संरक्षण करितां येईल किंवा कसें याची शंकाच आहे. पाऊस चालू होतांच आम्हांला आमचीं गलबतें परत न्यावीं लागतील. त्या वेळीं त्यानें काम पुढें चालू केल्यास कंपनीला कळवून त्यांच्या आज्ञेनेंच पुढील बंदोबस्त करावा लागेल. करितां (१) मुंबईकरांनीं शहाजोगपणें **अंग काढून घेण्याकरितां** सामोपचाराचें बोलणें लावण्याचा विचार करावा. परंतु यांत कांहीं अडचण वाटत असेल तर (२) वसईच्या **पोतु०** कॅ. जनरल-**कडे मदतीकरितां विनंति करावी.** तेंहि न जमेल तर (३) लवकरच येथून निघालेल्या **सिद्दीच्या आरमाराचा** होईल तो **उपयोग करून पहावा.** हळू-हळू त्याला पुढें घालून आपण माघार घ्यावी व कंपनीचा खर्च वांचवावा. २।३ दिवसांत इंटर गलबत पाठवितों. [याच मजकुराचें सुरत-मुंबई पत्र फॅ. रे. मुंबई भा. १९ पृ. ६५, ता. २८ ऑक्टोबर].

फॅ. रे. मुंबई भा. ८ पृ. ५७–५८ इ.　　(२१५५) मुंबई–कॅ. केग्विन　　श. १६०१ कार्तीक शु. १ इ. १६७९ ऑक्टो. २५

तुम्हीं खांदेरीकडून शत्रूच्या होड्या जाऊं दिल्या नाहींत हें फार चांगलें काम केलें. परंतु तुमच्यावर अचानक हल्ला होऊं नये याबद्दल जपा. आमच्या हेरांकडून आम्हांला कळलें आहे त्यावरून शत्रूचें आरमार असलें धाडस करील असें वाटत नाहीं. कारण, त्यांना परवां चांगलाच धक्का बसला. चकमकींत त्यांचे सुमारें ६०० लोक मेले असून आतां ते आपले लोक सुरक्षिततेकरितां **राजापुरास पळविण्याच्या विचारांत** आहेत ! त्यांनीं नागांवची खाडी सोडावी हें आमच्या सोईचें नाहीं. स्वतःला धोक्यांत घातल्या-शिवाय त्यांच्यावर कारवाई करण्यास ती जागा फारच सोईची आहे. पण तुम्हीं नागांववर लक्ष ठेवून ते बाहेर जाऊं लागलेच तर तोफांची सलामी दिल्याशिवाय त्यांना सोडूं नका.

ताज्या बातमीप्रमाणें तांदुळानें भरलेल्या ९ गुराबा नागांव नदीच्या मुखाशीं पडल्या आहेत. त्याशिवाय थोडे लोक असलेल्या अशा १२ इतर गुराबा आहेत. मग आणखी ७।८ होड्यांशिवाय तेथें कांहींच नाहीं.

डाग रजिस्टर १६७९ पृ. ४९९ इ. नोवें. ४ न्यू.　　(२१५६)　　श. १६०१ कार्तीक शु. १ इ. १६७९ आक्टोबर २५

मच्छलीपट्टणचें पत्र:—हिंदुस्तान, विजापूर व आसपासचा मुलूख यांतील गोंधळ पूर्ववत् चालूच आहे. **मोगलांनीं** विजापूरचें राज्य हस्तगत करून, **गोंवळकोंड्या-**कडून बाकी राहिलेल्या खंडणीबद्दल सोन्याचीं ४० मोठीं पिंपें, मुअज्झमकरितां गोवळ-कोंड्याची राजकन्या आणि शिवाय हिरेजडीत सलकडीं जोड इत्यादिकांची मागणी कर-ण्याकरितां गोवळकोंड्याकडे वकिलाची रवानगी केली आहे. त्यावर ‘सुलतानाजवळ

(इतकें) द्रव्य नाहीं, राजकन्येचा अन्याशीं आधींच वाङ्निश्चय झाला आहे; आणि सल-कड्यांवर हिऱ्यांचेऐवजीं स्फटिकांचीच योजना होऊं शकेल ' असा (रोकडा) जबाब परत दिला गेला. आणखीहि २४ पिपांची मागणी दिलीलखानानें आपल्या सैन्याच्या तन-ख्याकरितां म्हणून केली आहे. आणि ती न पुरविल्यास तो गोवळकोंड्यावर स्वारी करणार अशीहि बातमी आहे. शिवाजीनें त्याला विरोध केला नाहीं तर ही गोष्ट करण्यास तो चुकणार नाहीं असेंच लोक समजतात.

फॅ. रे. मुंबई
भा. १९ पृ. ६०-१ इ.
(२१५७)
कॅ० केग्विन-मुंबई
श. १६०१ कार्तीक शु. २
इ. १६७९ आक्टो. २६

काल रात्रीं अंधारांतून बेटावर ७ लहान होड्या गेल्या. त्या सकाळपर्यंत आम्हांला उमगल्या नाहींत. आतां त्यांच्याकरितां सांपळा तयार करून आम्हीं त्या पकडूं. अन्य मार्गांनीं पकडावें तर वल्ह्यांच्या बाबतींत ते फारच चलाख आहेत. नागांवांतून बाहेर पडतांना तीं गलबतें आमच्या तावडींत सांपडलीं तर काय बहार होईल? परंतु ते रात्रींच चोरून निघून जातील व आमच्याशीं युद्धाला उभे रहाणार नाहींत. ते लोक असे आहेत कीं एकदां कोठें त्यांना अपयश मिळाल्यास ते पुनः त्याच संकटाला तोंड देणार नाहींत.

श्री. सां. ले. ३३
सु. १०८० रम ३०
(२१५८)
उल्लेख
श. १६०१ कार्तीक शु. २
इ. १६७९ आक्टो. २६

मो बिलासी ता वारुण येथें वे. रघुनाथभट वसिष्ठ गोवी यांजकडे देवतार्चनाकरतां इनाम आहे तो आणि ता शिरालेपैकी मो वाकुरडे येथील इनाम शिराळ्याच्या हनुमाना-प्रीत्यर्थ आहे तें चालविणें.

श्री. सं. चा. २९
सु. १०८० रम ३०
(२१५९)
श. १६०१ कार्तीक शु. २
इ. १६७९ आक्टो. २६

अनाजी दत्तो—बाबाजी विठल सुभे० व कार० ता मलकापूर

श्री देवाचा मौ. बिळासी येथील इनाम पूर्वीप्रमाणें रघुनाथ भट अग्निहोत्री यांकडे चालविणें. देवतार्चन त्यांचे स्वाधीन आहे.

श्री. सं. चा. ३०
सु. १०८० रम ३०
(२१६०)
म. सी.
श. १६०१ कार्तीक शु. २
इ. १६७९ आक्टो. २६

अनाजी दत्तो—भानजी गोपाळ सुभे० व कार० प्रां कऱ्हाड:— चाफळचे उत्सवास पूर्वींच्या मोईनप्रमाणें माणसें, सामग्री व द्रव्य देत जाणें.

फॅ. रे. मुंबई
भा. ८ पृ. ५९-६० इ.
(२१६१)
मुंबई-सुरत.
श. १६०१ कार्तीक शु. ३
इ. १६७९ आक्टो. २७

हें खांदेरी-उंदेरी बेट बंदराच्या अगदीं तोंडांत [in the chopps of the bay]

सुमारें १ मैल घेराचें असून मुंबई बेटापासून २ लीग व किनाऱ्यापासून १½ लीग अंतरावर आहे. पोर्तु०नीं पूर्वी तेथें तटबंदी करण्याचा प्रयत्न करून तेथें पाणी लागेना म्हणून तो सोडून दिला. तेथें कोणालाहि ठाणें करूं देणें मुंबईच्या व्यापाराला विघातक आहे असें समजून आम्हीं शिवाजीला विरोध केला. परंतु त्यांत आम्हांला **यावें तसें यश आलें नाहीं**. रात्रीं अंधारांतून किनाऱ्यावरून तेथें गलबतें येऊन आंतील लोकांस मदत देतात. अशी मदत त्यांना पुरेशी देतां येणार नाहीं हें खरें आहे. तथापि एक मोठी आपत्ती अशी आहे कीं, उन्हाळ्यांत आम्हीं यांचा बंदोबस्त करूं शकलों नाहीं तर, पावसांत आम्हीं आमचीं गलबतें परत बोलाविल्यावर ते उघडीप पाहून चुना वगैरे मसाला नेऊन सप्टेंबरला किल्ला व पाण्याच्या टांक्या तयार करतील; आणि आतां चाललेली सगळी खटपट फुकट जाईल. करितां एकादें युरोपीय गलबत ३।४ दिवसांकरितां पाठविल्यास या प्रकरणाचा तत्काल व आपल्याला अनुकूल असा निकाल लागेल.

फॅ. रे. मुंबई भा. १९ पृ. ६१ इ. | (२१६२) कॅ. केग्विन–मुंबई | श. १६०१ कार्तीक शु. ३ इ. १६७९ ऑक्टोबर २७

काल रात्रीं नागांवच्या मुखाशीं दबा धरून आमचीं गलबतें ठेविलीं. परंतु कांहींच हातास लागलें नाहीं. आज दक्षिणेकडून आलेल्या १९ लहान होड्या नागांव नदींत शिरल्या.

फॅ. रे. मुंबई भा. ८ पृ. ५८ इ. | (२१६३) मुंबई--कॅ. केग्विन | श. १६०१ कार्तीक शु. ३ इ. १६७९ आक्टो. २७

दररोज शत्रु बेटाला मदत पोंचवितो हें वाचून आम्हांला खेद होतो. आम्हीं तुमच्याकडे अधिक सैन्य पाठविलें त्याचा उपयोग होऊन ही मदत बंद होईल असें आम्हांला वाटलें होतें.

फॅ. रे. मुंबई भा. १९ पृ. ६२ इ. | (२१६४) केग्विन–मुंबई. | श. १६०१ कार्तीक शु. ४ इ. १६७९ आक्टो. २८

कितीहि काळजी घेतली तरी आज रात्रीं १६।१७ होडया बेटांत गेल्या! ह्या लहान होडया आमची नजर चुकवून बेटांवरील दिव्यांच्या खालून चटकन जातात.

सदर [पृ. ६२-६३] तारीख ३० आक्टोबरः—हवा वाईट होती. यामुळें आमचें थोडें नुकसान झालें. त्यांचेंहि बरेंच नुकसान झालें असावें. त्या रात्रीं आम्हीं शिबाडें व मचवे नागांव खाडीच्या मुखाशीं शत्रूच्या गलबतांना अडविण्याकरितां पाठविणार होतों. परंतु ते अद्याप आलेच नाहींत.

सदर पृ. ६३ ता. ३१ आक्टोः—त्या होडया अद्यापि बेटावरच आहेत. आज

रात्रीं त्यांच्याकरितां दबा धरून राहून त्या आम्हीं पकडूं. गुराबा अद्यापि नागांवच्या खाडींतच आहेत.

सदर पृ. ६४; ता. वरील:—तुमच्या आज्ञेप्रमाणें हेक्टर गुराब परत पाठविली आहे. पाणी पाठवा नाहीं तर आम्हांला तुटवडा पडेल. तुमचीं गलबतें आलीं तर बेटाची चकडबंदी अधिक चांगली करितां येईल.

फॅ. रे. सुरत भा. ४ पृ. ८६-८८ इ. } (२१६५) सुरत कन्सल्टेशन. { श. १०६१ कार्तिक शु. ७ इ. १६७९ आक्टो. ३१

मुंबईच्या भानगडींनीं आम्हांला काळजी उत्पन्न केली आहे. नुकतेंच डे० प्रेसि०चें [२२ तारखेचें] जनरल लेटर आलें. त्यांत खांदेरीच्या आमच्या हालचालीमुळें चिडून शिवाजीनें ४००० लोक मुंबईवर हल्ला करण्याकरितां सज्ज केले इत्यादि बातमी लिहून आली....मुंबईचे लोक घाबरून गेले आहेत. त्यांना आधार देण्यासाठीं सैन्य ठेविलें पाहिजे. म्हणजे खर्चहि वाढणार. यामुळेंच इतक्या जवळच्या व समर्थ शत्रूचा प्रतिकार करण्याच्या बाबतींतील **आमचा असमर्थपणा उघडपणें दिसून आला.** म्हणून **शिवाजीकडून** नुकतेंच राजापूरच्या मुकामाहून सामोपचाराचें पत्र आलें आहे त्याचा फायदा घेऊन त्याला सामोपचारानेंच उत्तर लिहावें. 'खांदेरीसारख्या क्षुद्र व राजाच्या दर्जाला न शोभणाऱ्या बेटावर तटबंदी करण्याचा व्यर्थ आग्रह धरून आम्हांला तुमच्या अधिकाऱ्यांनीं त्रास दिला, अशी त्याच्याकडे तक्रार करावी. आमचा त्या जागेवर हक्क असला तरी गतगोष्टी विसरून जाऊन मुंबईकरांकडे वकील पाठवून हें प्रकरण मिटतें घ्यावें, ह्याबद्दल आम्हीं मुंबईकरांस लिहिलें आहे.' इत्यादि लिहावें. या बाबतींत मुद्दाम इसम पाठविणें बरें, कीं चौलच्या सुभेदारामार्फत बोलणें करावें हें बरें, याचा विचार करण्याबद्दल डे० गवर्नरनें आपल्या कौन्सिलशीं विचारविनिमय करावा. शिवाजीला पत्र लिहितांना डे० गवर्नरनें आपल्या कारकीर्दीच्या आरंभींच मतभेद झाला याबद्दल खेद दाखवून कायमच्या मित्रत्वाची इच्छा प्रदर्शित करावी; आणि यापुढें मग त्याच्याकडून येणें असलेला पैसा, त्याच्या मुलखांतून दळणवळणाचें स्वातंत्र्य, कैद्यांची सुटका वगैरे अवश्य तो विषय आणावा. शेवटीं खांदेरीचाहि उल्लेख करावा. डे० गवर्नरनें किल्ल्याचा बुरूज मजबूत करण्याची शिफारस केली. परंतु येणाऱ्या खर्चाचा तपशील कळेपर्यंत त्याचा विचार लांबणीवर ठेवण्यांत आला. मुंबईकरांच्या मागणीप्रमाणें न्यू इंग्लंड गलबत खांदेरीजवळ ठेवावें, म्हणजे निकाल त्वरेनें होईल असें आहे. परंतु तें गलबत लवकर सज्ज होत नाहीं व ह्या बाजूला शिवाजीचें भय नाहींसें झालें नाहीं, याकरितां कॅ० कुक व गोल्डसबरो यांनींच तिकडे दिसें. पर्यंत राहून मुंबईकरांना योग्य ती मदत द्यावी असे त्यांना हुकूम पाठवावे.

फॅ. रे. मुंबई भा. १९ पृ. ६६-६७ इ. | (२१६६) केग्विन–मुंबई. | श. १६०१ कार्तीक शु. ८ इ. १६७९ नोवेंबर १

चंद्र खालींजाईपर्यंत आमच्या नागांवच्या तोंडाशीं ठेवावयाच्या होडया किनाऱ्यावरून पाहिल्या जाण्याच्या भीतीनें निघूं शकल्या नाहींत. शत्रूच्या होडयाहि त्याच वेळीं किनाऱ्याकडे निघाल्या. परंतु त्यांचीं वल्हीं आमच्यापेक्षां अधिक त्वरेचीं असल्यामुळें त्या सहज निसटून नागांव खाडींत शिरल्या. तेथील कित्येक गुराबांनीं आमच्या होडयांवर तोफा डागल्या. परंतु आमचें कांहीं नुकसान झालें नाहीं. अशा रीतीनें आमचा बेत फसला. आतां आज रात्रीं आम्हीं बेटावर मदत येऊं न देण्याची शिकस्त करणार आहों. परंतु त्यांच्या छोटया **सरपट्या होड्या आम्हांला आश्चर्यकारक रीतीनें चकवितात.** तशाच चलाख होडया आमच्याजवळ असल्या पाहिजेत.

सदर भा. ८ पृ. ६१, **ता. १ नोवें**, मुंबई-केग्विनः—आज सकाळीं तोफांचे आवाज ऐकले ते कशाचे होते ?

सदर भा. १९ पृ. ६७, **ता. २ नोवें.** केग्विन-मुंबईः—आज रात्रीं बेटावरच्या होडयांना आम्हीं हालूं दिलें नाहीं. रात्रीं नागांवच्या मुखाशीं पूर्वरात्रींप्रमाणें आम्हीं येऊं अशा अपेक्षेनें १२ गुराबा त्यांनीं ठेविल्या होत्या. त्या सकाळीं फिरून आंत गेल्या.

सदर, पृ. ६७–६८ **ता. ३ नोवें**, केग्विन–मुंबईः—सकाळीं गलव्हेतांवर व बेटावर त्यांच्या व आमच्यांत गोळागोळी झाली. लढाई होते असें पाहून गुराबा बाहेर आल्या. परंतु आमचे मचवे व शिबाडें आमच्याकडे आलीं व आम्हीं शत्रूजवळ जाऊं शकलों नाहीं, व युद्धास तोंड लागलें नाहीं. **त्यांचीं गलबतें फार चलाख** व आमच्या होडया खराब आहेत. ३ माणसांची एक होडी पकडली. ते, आपण मुंबईचे आहोंत असें म्हणतात. कैदी म्हणून पाठविले आहेत. तपास करावा.

फॅ. रे. मुंबई भा. १९ पृ. ७२–४ इ. | (२१६७) मुरत–मुंबई | श. १६०१ कार्तीक शु. १० इ. १६७९ नोवेंबर ३

तुमच्या २२ तारखेच्या पत्रांत दौलतखानाच्या झालेल्या नुकसानीबद्दल वाचलें. त्यामुळें बेट हस्तगत होण्याचें दूर राहून शिवाजी मात्र चिडून जाऊन तटबंदी त्वरित करून खुद्द मुंबईवर हल्ला करण्याचा विचार करील. तेव्हां, असल्या समर्थ शत्रूशीं युद्ध करण्यास आपलें असमर्थत्व आणि वादांतील **बेटावरील आपला हक्क तितका जोराचा आहे किंवा कसें याबद्दलची शंका** [for a place *not unquestionable*, whither we have a real right to it or noe] आणि देशांतील लोकांशीं भांडण करण्याबद्दल व खर्च वाढविण्याबद्दल कंपनीची अनिच्छा व सूचना यांचा चांगला विचार करून पहातां शिवाजीशीं चालू झालेलें भांडण शक्य तितक्या

लवकर मिटवावें असा आम्हीं निश्चय केला आहे; व शिवाजीचें पत्र आणि त्याला यावयाच्या उत्तराच्या नकला तुमच्याकडे पाठविल्या आहेत; आणि त्द्वाचें बोलणें करण्याकरितां डे० गवर्नरलाच नेमिलें आहे. चौलच्या सुभेदारामार्फत बोलणें करावें किंवा कसें याचा मुंबई-च्या कौन्सिलनें विचार करावा. डे० ग०च्या पत्रांत यावयाचे विषयांत [मागीलप्रमाणेंच] चालू युद्धांतील घेतलेलें शिबाड, गुराब व कैदी यांबद्दल उल्लेख असावा. परंतु ज्या विधानांच्या योगानें बेटावरील त्याचा हक्क, तटबंदीचा किंवा ताबा राखण्याचा अधिकार मान्य केल्यासारखें होईल असें कांहीं लिहूं नये.

शिवाजीच्या मुलखांत नाश किंवा त्याच्या आरमाराची जाळपोळ करण्यास आमची संमति नाहीं. कोणीं आधीं आमच्यावर हल्ला केलाच तर आम्हीं फक्त प्रतिकार करतों ही आपली न्याय्य बाजू राजा व जग यांच्यापुढें राहिली पाहिजे.

लंडन गलबत पाठवितां येत नाहीं. पोर्तु०प्रमाणेंच सिद्दीच्याहि मनांत आम्हांला एकट्यालाच लढावयास लावून आपला फायदा करून घ्यावा असें आहे. तेव्हां **शिवाजीशींच सलोखा**करून या दोघांना फायदा न घेऊं देण्यांत आपलें हित आहे.

फॅ. रे. सुरत, भा. ४ पृ. ८८–८९, ता. ३ नोवें. सुरतहून कॅ० गोल्डसबरो व कुक यांनीं आपलीं जहाजें घेऊन, मुंबईचे लोक शिवाजीला भेदरून गेले आहेत, त्यांच्या आश्वासनाकरितां ७ डिसें. पर्यंत तेथें रहावें असे हुकूम.

फॅ. रे. मुंबई भा. ८ पृ. ६१ इ.	(२१६८) मुंबई-केग्विन	श. १६०१ कार्तीक शु. ११ इ. १६७९ नोवेंबर ४

तुमच्याकडील वर्तमान समाधानकारक नसून खर्च मात्र वाढत आहे. प्रत्यहीं **आशेची निराशाच होत आहे.** आतां नॉग्रेव व ह्युजेस ह्यांच्याबरोबर हंटर फ्रिगेट पाठवीत आहों. त्यांनीं लहान जहाजांचें नेतृत्व घ्यावें व अधिक यश मिळवून दाखवावें, पृ. ६२—कॅ. नॉग्रेव्हला नेमणुकीचा हुकूम.

फॅ. रे. मुंबई भा. १९ इ.	(२१६९) केग्विन–मुंबई	श. १६०१ कार्तीक शु. १२ इ. १६७९ नोवेंबर ५

पृ. ६८– ठाण्याला ३ जखमी लोक घेऊन जाणारी बोट अचानक आढळली. आमच्या नावा व त्यांच्या गुराबा यांची चकमक झाली. आतां ते जवळ आले असून वारा पडला आहे. वारा चालू झालाच तर आम्हीं लढूं. कांहीं केलें तरी ते आमच्यापासून गोळीच्या टप्यांत येत नाहींत.

पृ. ६८–६९. ४ तारखेला त्यांच्या गुराबा व गलबतें रात्रीं किनाऱ्याच्या बाजूनें बाहेर आलीं. गलबतें बेटाच्या उत्तरेकडे व गुराबा दक्षिणेकडे वळलीं. आमच्या होड्यांनीं

बेटाच्या गोळीच्या टप्यापर्यंत गलबतांचा पाठलाग केला. पण आम्हांला एकहि पकडतां आलें नाहीं. वारा पडल्यामुळें रिव्हेंज व फॉर्चून दोघांच्याहि पाठलागांतून गुराबा वांचल्या.

५ तारखेस गलबतांना घेऊन जाण्याकरितां गुराबा उत्तरेकडे किनाऱ्यानेंच आल्या. आमचीं शिबाडें व मचवे त्यांच्याशीं झुंजले. परंतु थोडयाच वेळांत ते विनाप्रतिकार नागांव-मध्यें शिरले. अशा रीतीनें दोन्हीं वेळीं दुर्दैवानें हात दाखविला ! आतां हंटर आल्यामुळें खाडीच्या तोंडाचे ठाव घेऊन तेथें शत्रूच्या आरमाराला कोंडून धरण्याचा बेत करीत आहोंत. ते आमच्याशीं लढाई कधींच देणार नाहींत.

पृ. ७०-७१ ता. **७ नोवें.** नागांवच्या नदीच्या तोंडाशीं ६ तारखेला ५ वाजतां आम्हीं येऊन पोंचलों. आम्हीं बाहेरून व होडया आंतल्या बाजूला आहेत. ओहोटी त्वरेनें येते तेव्हां होडया बाहेर याव्या व जमिनीवर कोरडया पडूं नयेत म्हणून आम्हांला एकदम सटकावें लागतें. आतां खाडींतून होडया किंवा गुराबा बाहेर येऊन बेटाला मदत पोंचवूं शकणार नाहींत. मात्र **थळ**चा बंदोबस्त करण्यास आम्हांस गलबतें लागतील. आम्हीं चौलजवळ असल्यामुळें पाणी स्वतःच मिळवूं.... त्यांचीं गलबतें भरतीच्या वेळीं तोंडाशीं येऊन परत गेलीं.

पृ. ७५, ता. **१२ नोवें. खांदेरी**ला परत आल्यापासून शत्रूची कांहींच खबर लागली नाहीं.

फॅ. रे. मुंबई भा. १९ पृ. ७४ इ.	(२१७०) सुरत-मुंबई	श. १६०१ कार्तीक शु. १५ इ. १६७९ नोवेंबर ७

हंटर बरोबर सविस्तर पत्र पाठविलें आहेच. शिवाजीचे लोक बेटाला कुमक पाठवितात. आणि तटबंदीहि करितात व त्यांना तुम्हीं अडथळा करूं शकत नाहीं हें पाहिलें म्हणजे **शिवाजीशीं तडजोड करावी** असेंच आम्हांला पुनः लिहावयाचें आहे. बेटावर भडिमार करण्याची तुमची इच्छा आहे त्यास दोन युरोपीय गलबतें तुम्हांला दिलीं आहेत. त्यांच्याकडून शक्य तें करून घ्यावें. आपलें पराकाष्ठेचें सामर्थ्य खर्च करून अपयश आलेंच तर शिवाजी आपलें बोलणें धुडकावून व वर चिडून जाऊन खुद्द मुंबई-वरहि प्रयत्न करील. अशा वेळीं मुंबईचें चांगलें रक्षण तुमच्या हातून होईल किंवा कसें याचा विचार करावा.

श्री. सं. चा. ३१ सु. १०८० सवाल १४	(२१७१)	श. १६०१ कार्तीक व. २ इ. १६७९ नोवेंबर ९

अनाजी दत्तो— भानजी गोपाळ सुभे. व कार. प्रांा कऱ्हाड.

पूर्वीप्रमाणें स्वतः जाऊन चाफळचा नेहेमीं प्रो महोत्सव होये ते करणें.

फॅ. रे. मुंबई } (२१७२) { श. १६०१ कार्तीक व. ३
भा. १९ पृ. ७१ इ. } केग्विन, नागांव-मुंबई. { इ. १६७९ नोवेंबर १०

नागांव सोडून खांदेरीला परत जाण्याचा हुकूम पोंचला. मोठ्या कष्टानें आम्हीं परत फिरलों. सिद्दी आल्यावर त्याचें शक्य त्याप्रकारें स्वागत केलें जाईल. आतांच्या इतकी सुंदर चकडबंदी कधींच झाली नव्हती. त्यांनीं आम्ही तेथें असेपर्यंत बाहेर येण्याची आशाच सोडून देऊन किनाऱ्यावर आम्हीं घुसूं नये म्हणून गुराबांतील तोफा काढून त्या किनाऱ्यावर चढविल्या होत्या. ८ तारखेला त्यांनीं आमच्यावर निष्फळ गोळीबार केला. शत्रूनें संशयानें पकडलेल्या दोन होड्या सोडून देण्याबद्दल चौलच्या सुभेदारांची विनंति आम्हीं मान्य केली. त्या होड्यांकडून असें समजलें कीं, आमचीं गलबतें तोंडाशीं आहेत तोंपर्यंत शत्रूचें आरमार बाहेर पडणारच नाहीं.

सदर भा. ८ पृ. ६२, ता. सदर, मुंबई-केग्विन:--' नागांवहून हालून खांदेरी-जवळ येण्याबद्दल हुकूम. सिद्दी येत आहे त्याला नीट वागवावें.' या पत्राला हें वरील उत्तर आहे.

फॅ. रे. मुंबई } (२१७३) { श. १६०१ कार्तीक व. ९
भा. १९ इ. } केग्विन, हे. के.—मुंबई { इ. १६७९ नोवेंबर १६

पृ. ७५-६ सिद्दी सुमारें ३ वाजतां बेटासभोंवतीं फिरून आला. ' बेटाची मजबुती विशेष नसून वर फक्त ३०० शिपाई व २०० बेगारी आहेत तेव्हां आपण बेटावर एकदम हल्ला करणार ' असें तो म्हणाला. उभयतांच्या गलबतांची रचना परस्परांना अपायकारक न होण्याच्या दृष्टीनें कशी करावी हें ठरविण्याकरितां त्यानें मला बोलाविलें. परंतु तुमच्याकडून उत्तर मिळावें म्हणून सोमवारची मुदत मीं दिली आहे.

डाग रजिस्टर १६७९ } (२१७४) { श. १६०१ कार्तीक व. ९
पृ. ५४० इ. नोवें. २६ न्यू. } { इ. १६७९ नोवेंबर १६

कॉरोमांडेलचीं पत्रें:--खंडणीबद्दल जबरदस्त धमकी मोंगलांनीं गोवळकोंड्याला दिली आहे. शहाजादा मुअज्जमचें एक आणि दिलीलखानाचें दुसरें अशीं **दोन प्रबळ सैन्यें** गोवळकोंड्याच्या विरुद्ध उतरलीं आहेत असें कळतें. परंतु मोठें सैन्य घेऊन खेळ खेळणारा **शिवाजी** एकदां झाला तर दुसऱ्यानें दुसऱ्यालाच सपाटा लगावण्याचा उद्योग पुनः सुरू करीत असल्यामुळें त्याला भिऊन ह्या सर्व धमक्या वितळून जातील असें वाटतें !

फॅ. रे. मुंबई } (२१७५) { श. १६०१ कार्तीक व. १०
भा. ८ पृ. ६३-६६ इ. } मुंबई-सुरत { इ. १६७९ नोवेंबर १७

आमची डोव्ह नांवाची गुराब शत्रूच्या हातीं सांपडली. तीवर ६ रांगा शिपाई,

अंमलदार, वगैरे होते. त्यांत २० जण युरोपीय होते. त्यांची भरती होणें अशक्य आहे. शिवाय तीवरील तोफा आतां खांदेरीवरून आमच्यावरच रोखल्या जात आहेत ! याचा विचार करून दुसऱ्या गुराबा अशाच हातीं लागूं नयेत म्हणून मदतीकरितां दुसरीं शिबाडें व एक तिरकटी तारूं पाठविलें.

ह्या प्रकरणाचा निकाल करण्याबद्दल तुमचे विचार कळले. आम्हींच बोलणें लावण्याकरितां इसम पाठविला, तर खांदेरी न सोडतां मध्यंतरींच्या काळांत तो तटबंदी पुरी करून तेथेंच तो जबरदस्त होऊन बसेल; मुंबईच्या व्यापाराला व वसतीला त्रासदायक होईल; आणि मुंबई बेट या त्रासामुळें ओसाड पडेल.

पोर्तु०नीं सर्व तऱ्हेनें आपल्याशीं मित्रत्व दाखवून शिवाजीला त्यांच्या मुलखांतून जाण्यास बंदी करून, स्वतः बंदोबस्त करून शिवाय आमचीं शिबाडें, मचवा बंदोबस्ताकरितां आपल्या हद्दींत राखून व लागेल ती सामुग्री विपुल व स्वस्ताईनें देऊन आम्हांला मदत केली आहे. गोव्याहून खांदेरी प्रकरणीं आम्हांला साहाय्य देण्याकरितां मोठें सैन्य येत आहे असेंहि ते म्हणतात. परंतु तें विश्वसनीय वाटत नाहीं. सिद्दीचा शक्य तो उपयोग करून घेऊं. परंतु त्याच्यावर तितका विश्वास ठेवितां येईल असें वाटत नाहीं. थोडा पत्रव्यवहार व बोलणें झालें त्यावरून बंदराच्या किनाऱ्याला असलेल्या शिवाजीच्या मुलखाची लूट अद्यापपर्यंत त्याला करावयास मिळाली नाहीं; ती मिळावी असा त्याचा इरादा दिसतो. त्यापासून आपण त्याला परावृत्त केलें पाहिजे. खांदेरीवरील लोकांना गेले ८ दिवसांत कांहींच सामुग्री मिळूं शकली नाहीं. १० दिवसांत ते पक्के टेकीस येतील. याचा फायदा घेऊन सर्व निकाल आपल्या हातून व्हावा अशीच सिद्दीची इच्छा आहे. अशा रीतीनें हें प्रकरण बादशहाच्या हवालीं केल्यानें आतांच आमची खर्चांतून सुटका होईल हें खरें. परंतु झालेला खर्च व घेतलेले कैदी या बाबतींत कांहींच भरपाई मिळणार नाहीं. बरें, आतां तो आमच्यावर चिडला आहे त्यापेक्षां अधिक चिडणें शक्यच नाहीं. तेव्हां हें काम असेंच पुढें चालवून एकदां सोक्षमोक्ष करण्याची परवानगी मिळेल, व त्याच्या किनाऱ्यावर नाहीं तरी खांदेरीवरच जोराचा प्रयत्न आम्हांला करतां येईल तर सर्व प्रकरण सन्मानानें मिटेल. नाहींतर अनिष्ट परिणाम होऊन मुंबई बेटाचे रक्षणांत अमर्याद खर्च करावा लागून रहिवासी भेदरून बेट सोडून जातील. तरी आमचीं २२ व २७ चीं पत्रें पाहून आम्हां सर्वांना अभिमानास्पद असा हुकूम द्यावा.... ५ तारखेला युद्ध झालें. त्यांत आमच्याकडील फक्त ५ लोक जखमी झाले. एकाचा फक्त हात तुटला. चौलहून असें कळलें कीं, त्यांचे १०० लोक मेले व १०० जखमी झाले. आमच्या लहान होडग्यांनींहि त्यांना चांगलाच हात दाखविल्यामुळें ते आतां आमच्या वाटेस पुनः जाणार नाहींत.

आमचीं गलबतें बाहेर आहेत तोंपर्यंत त्यांना तटबंदीच्या कामीं अडथळा कर-

ण्याची आम्हांला आशा वाटत आहे असेंच या पत्रांत आम्हीं लिहिलें आहे. पूर्ण सामर्थ्य वापरावयाचें नसेल तर शिवाजीकडून कांहींच हातास लागणार नाहीं. समुद्रावर तो प्रबळ नाहीं. आमच्या मुंबई बेटाचा आम्हीं पक्का बंदोबस्त केला आहे व किल्ल्यावरून खूण करतांच, प्रसंग पडलाच तर आमचीं गलबतें आम्हीं बोलावूं शकूं; अशा रीतीनें आम्ही पक्के सुरक्षित आहोंच.

फॅ. रे. मुंबई भा. ८ पृ. ६७ इ. (२१७६) मुंबई-केग्विन श. १६०१ कार्तीक व.१० इ. १६७९ नोवेंबर १७

आज तोफांचे आवाज ऐकले. बहुधा ते बेटावरील असावे. सिद्दीचीं गलबतें किनाऱ्याजवळ जातील तेव्हां त्यांचें काय चालतें इकडे लक्ष न देतां, प्रसंगीं सावध रहावें अशा बेतानें आपलीं गलबतें जुटीनें ठेवा. कालांतरानें सामग्रीच्या तुटवड्यामुळें त्यांचे हाल चालू झाले म्हणजे सिद्दीच्या ताब्यांत जाण्यापेक्षां ते तुमच्याच स्वाधीन होतील. अशी खूण त्यांच्याकडून होतांच मुख्य सुभेदाराच्या नांवचें पत्र आम्हीं दिलें आहे तें घेऊन कोणाला तरी पाठवून, '५०।६० मुख्य इसमांना ओलीस देत असाल तर गलबतावर पाठवावें. नंतर आम्हीं बेटावर जाऊन ताबा घेऊं' असें कळवावें. १२ रांगा घेऊन बेटावर जावें; व लगेच आमचें निशाण बेटावर चढवावें; आणि तेथील लोकांना निःशस्त्र करून आपल्या गलबतांवर पाठवावें. सिद्दीनें गलबतावर बोलाविल्यास कसें वागावें हें आधीं लिहिलेंच आहे [?].

ओ. कॉ. भा. ४० नं. ४६७५ इ. (२१७७) सुरत-कंपनी श. १६०१ कार्तीक व. ११ इ. १६७९ नोवेंबर १८

गेल्या मार्चांत राजापूरच्या वखारवाल्यांना घेऊन येण्याकरितां रिव्हेंज गलबत पाठविलें असतां तेथील सुभेदारानें त्यांना येऊं दिलें नाहीं. त्यांना किंवा कारवारच्या वखारवाल्यांना (शिवाजीनें कैद न केल्यास) त्यांस आणण्याची दुसरी कांहीं युक्ति केली पाहिजे. परंतु शिवाजीचा व आमचा नुकताच बिघाड झाल्यामुळें काय होईल याची चिंता लागली आहे. [पुढें हेन्ड्रीकिन्ड्री प्रकरण दिलें आहे.] तुमच्या हुकमाच्या अभावीं विलायतच्या गलबतांकरवीं हल्ला करणें वगैरे कांहींच शक्य झालें नाहीं. मात्र विरोध करण्यामध्यें व शिवाजीपासून-मुंबई बेटाचें रक्षण करण्यामध्यें तुमच्या आज्ञेबाहेर पुष्कळ खर्च होत आहे. तरी नक्की हुकूम त्वरेनें पाठवा. नाहींतर सर्वच कांहीं नाश पावेल.

फॅ. रे. मुंबई भा. १९ इ. (२१७८) केग्विन-मुंबई श. १६०१ कार्तीक व.११ इ. १६७९ नोवेंबर १८

पृ. ७६-७७-१७ तारखेला तुम्हीं ऐकलेल्या तोफा म्हणजे बेटाजवळ वरवा करून

राहिलेल्या सिद्दीनें बेटावर मारलेले निष्फळ वायबार होत ! बेटावरील शरण-चिठ्ठीची आम्ही मार्गप्रतीक्षा करीत आहों. तसाच सिद्दीहि वाट पहात असून जबरदस्तीनें तो आमच्या यशांत वांटेकरी होणार असें दिसतें. तरी सिद्दीशीं लढून त्याला बेटावर उतरूं देऊं नये कीं काय तें कळवावें. त्याचा नाखुदा येऊन बेटावर तोफा कशा लावाव्या याबद्दल सांगत असतां 'मी दोन धन्यांचा नोकर असल्यामुळें मजला तुम्हीं तसें सांगूं शकणार नाहीं' असें मीं त्याला सांगितलें. सिद्दीच्या सेनापतीनें व खुद्द सिद्दीनेंहि त्यांच्या गलबतावर मला बोलाविलें. पण तुम्हांला वाईट वाटेल म्हणून मी अजून त्यांच्याकडे गेलों नाहीं.

पृ. ७७-ता. १९ नोवें:—आज सकाळीं शिवाजींचें आरमार आलें व त्यानें इंग्रजांचें निशाण फडकविणाऱ्या एका शिबाडाचा पाठलाग केला. सिद्दीचीं गलब्हेटें त्या बाजूला गेलीं. परंतु त्या पूर्वींच तें नागांव नदींत शिरलें. सिद्दी व बेटावरील लोक आपसांत निष्कारणच गोळागोळी करितात. वास्तविक आम्हीं बेटाला अधिक जवळ राहिलों आहोंत. तरी आमचा कांहींच युद्धप्रसंग होत नाहीं !

पृ. ७७-७८. ता. २० नोवें:—आज विशेष कांहींच झालें नाहीं. प्रसंग पडतांच त्यांच्या शरणचिठ्ठीचा स्वीकार करण्याच्या तयारीनें आम्हीं पहारा करीत आहों.

फॅ. रे. मुंबई भा. ८ पृ. ६८ इ.	(२१७९) मुंबई-केग्विन.	श. १६०१ कार्तीक व. १३ इ. १६७९ नोवें. २१

सिद्दीबद्दल पत्र पोंचलें. **तो आला नसता तर बरें झालें असतें** असें वाटतें. परंतु त्याच्याशीं आपण सलोखा ठेविला पाहिजे. आम्हांला कांहीं त्रास न देण्याची बहुधा तो सावधगिरी घेईलच. परंतु आमच्या गलबतांवर, किंवा तें बेट आमच्या ताब्यांत आल्यावर त्यावर तोफा मारून किंवा अन्य मार्गानें तो शत्रुत्व दाखवील तर सामोपचाराचे मार्ग थकल्यावर तुह्मी बेलाशक आत्मसंरक्षण करावें; असें तुम्हांला कळवून ठेवणें भाग आहे. सोबत हे० के०च्या सुभेदाराकरितां पत्र दिलें आहे. हें प्रसंगीं त्याला पोंचवावें. बेट ताब्यांत दिलें तर ते आपल्यासच देतील. करितां गुप्तपणें रात्रींच ताबा घ्यावा. आमचें निशाण दाखविणाऱ्या शिबाडाचा शत्रूनें पाठलाग केला त्याचें काय झालें ? तुह्मीं त्याच्या बचावाकरितां कांहींच कसें केलें नाहीं ? आज दोनप्रहरीं इतक्या बऱ्याच तोफा कसल्या झाल्या ?

फॅ. रे. मुंबई भा. १९ पृ. ७८-७९ इ.	(२१८०) केग्विन-मुंबई.	श. १६०१ कार्तीक व. १३ इ. १६७९ नोवेंबर २१

आज सकाळीं ६ वाजतां शिवाजीच्या लोकांनीं पांढरा बावटा उभारला. आम्हीं एक मचवा जवळ पाठविला पण त्याला उत्तर मिळालें नाहीं. पाठवावयाचें पत्र आपल्याकडून आलें नसल्यामुळें आम्हीं आपसांत मनुष्य पाठवावा किंवा कसें याचा विचार केला.

इतक्यांत तुमच्याकडून पत्र हातीं आलें. परंतु बेटावरून पक्कें चिन्ह कांहींच नसल्यामुळें आम्ही थांबलों. पुनः मचवा पाठविला तरी तेंच ताटस्थ्य दिसून आलें. कांहीं झालें तरी आमची होडी किंवा माणसें आम्हीं धोक्यांत घालणार नाहीं. त्यांच्या मनांत आलेंच तर आमच्याकडे पाठविण्याजोगी त्यांच्याकडे होडी आहे असें दिसतें. काल ती कशी आंत शिरली हें समजत नाहीं, पण पूर्वी ती तेथें नव्हती. सिद्दीनें काल मला बोलावणें करून बेटावरून गुराबा किंवा शिबाड तयार करून ते जातील असें कळविलें; परंतु आमच्या तावडींतून कोणीं निसटणें शक्य नाहीं अशी माझी खात्री आहे. शिवाजीच्या आरमारानें पाठलाग केला तें शिबाड स्पष्टपणें त्याच्या हातून निसटलेलें आम्हीं पाहिलें; म्हणून हाललों नाहीं. नाहींतर खासच मदतीकरितां धावून गेलों असतों. तें पुढें कोठें गेलें हें आम्हांला माहीत नाहीं. तोफांचा गोळीबार बेट व सिद्दी यांच्यामध्यें होतो. तो एक करमणुकीचा प्रकार आहे असें त्यांचा नाखवा मला सांगत होता.... सिद्दीनें तह करण्याकरितां माणसें पाठविल्याचें कळलें. आम्हींहि आमचेकडून प्रयत्न करण्याचें ठरवून एक गलबत, एक डच मन व एक पोर्तु० असे पाठविले. 'किनाऱ्यावर येऊन हातांत पाणी घेऊन शपथ घेतल्यास आपण तुम्हांला इजा करणार नाहीं' असें शत्रुपक्षाकडून सांगण्यांत आलें. 'शरण आल्यास आम्हीं तुम्हांला चांगलें वागवून इतरांपासून तुमचें रक्षण करूं' असें आमच्याकडून सांगण्यांत आलें. 'असें बसून बारा महिने झाले तरी आम्ही बेट ताब्यांत देणार नाहीं. परंतु पत्र किंवा दुसरी कांहीं गोष्ट बोलावयाची असेल तर उत्तर-प्रत्युत्तराकरितां परवल देऊं' असें त्यांनीं सांगितलें. अर्थात् आम्हीं पत्र न देतां तुमच्या हुकमाची वाट पहात आहों.

डाग रजि. १६७९ } (२१८१) { श. १६०१ कार्तीक व. १३
पृ. ५५४ इ. डिसें. १ न्यू. } { इ. १६७९ नोव्हें. २१

मध्यंतरीं दक्षिण कॉरोमांडेल किनाऱ्यावरील ओअरपलम [?] नांवाचा महत्त्वाचा किल्ला **शिवाजीनें** घेतल्यामुळें तंजावरचा सर्व प्रांत त्याच्या ताब्यांत आला आहे. **एकोजी राजा** शिवाजीचा सावत्र भाऊ असून स्वतः सुस्थित होता; असें असतांनाहि अरिआलूर प्रांत हा अत्यंत उघडा असल्यामुळें तो **शिवाजीला** काडीचाहि विरोध करूं शकला नाहीं. नुकतेंच ट्रिमेलवास येथील कंपनीची वखार व घरें यांच्यावर हल्ला करून तीं लुटण्याचा त्याच्या एका सेनापतीचा विचार होता. परंतु आमचे लोक अंशतः आधींच सावध झाले होते. त्यांनीं आपल्या ठिकाणीं बंदोबस्तानें राहून गोळीबार केल्यामुळें त्याचे कित्येक लोक मेले व जखमी झाले. यामुळें शेवटीं कंपनीच्या लोकांना आपल्या मालासह नागापट्टणला जाऊं देण्यास तो तयार झाला.

आणखी अशी बातमी आली कीं, मोंगल सेनापती दिलीरखान आपलें सैन्य घेऊन भिवरा ओलांडून विजापुरावर चाल करून तेथून ८।९ मैलांवरील एका ठिकाणीं आला.

शिवाजीहि विजापूरच्या जवळच पश्चिमेस निम्या अंतरावर होता. त्याच्याबरोबर १०।१२ ह. स्वार होते. तो मदत देण्याकरितां विजापुरास (लगेच) गेला व त्याबद्दल त्याला तेथील दरबारनें दरसाल २००० गिल्डरांचें उत्पन्न मंजूर केलें. कोर्वर वेंकट्टी नांवाचा एक प्रधान विजापूरची सलतनत मोंगलांच्या हस्तगत व्हावी याकरितां खटपट करतांना आढळून आल्यामुळें, त्याचा शिरच्छेद करण्यांत आला; व त्याची सर्व संपत्ति शिपाई लोकांत वाटून दिली. त्यामुळें सैन्याचा उत्साह वाढून मोंगलांची त्यांना क्षिती वाटेनाशी झाली. शिवाजीकडून मदत मिळण्याच्या आशेनें गोवळकोंड्याच्या सुलतानालाहि उत्तेजन येऊन, अगोदर तो मोंगलांना फार भीत होता त्याच्या ऐवजीं, आतां बाकी राहिलेली खंडणी देण्याचा आपला विचार नाहीं व कांहीं झालें तरी यापुढें आपण ती देणार नाहीं; असा त्यानें मुअझ्झमला जबाब दिला आहे.

फॅ. रे. मुंबई भा. १९ } (२१८२) { श. १६०१ कार्तिक व. १४
पृ. ७९ इ. } केग्विन-मुंबई. { इ. १६७९ नोव्हें. २२

काल रात्रीं बेटावर एक होडी आली. तिनें आम्हां सर्वांनाच चकविलें. व आमच्या मचव्यानें केलेला पाठलाग निरुपयोगी ठरला. सिद्दी वारंवार आम्हांला बोलावतो. तो गोळीबार करतो तसा आम्ही करीत नाहीं व आमच्यावरहि मराठे गोळ्या झाडीत नाहींत याचें त्याला आश्चर्य वाटतें. त्यांनीं किती लोक मारले असें विचारतां, ‘ मुळींच नाहीं ’ असेंच ते उत्तर देतात !

पृ. ८० ता. २६ नोव्हें:—आम्हीं आपल्या हुकमाप्रमाणें एकेकजण सिद्दीच्या गलबतावर जात राहूं.

पृ. ८०-८१ ता. सदर:—सिद्दीनें पकडलेल्या एका इसमाकडून, सामुग्रीनें भरलेल्या नागांवच्या ८ होड्या बेटावर नेण्याकरितां दौलतखान नागांवच्या बाहेर येऊन आमच्याशीं युद्ध करणार आहे, असें कळलें. सिद्दी ‘या होड्यांचा पाठलाग करून बेटावर चढाई करून बेट घेईन’ असें म्हणतो. बेटांतील चारी विहिरी कोरड्या झाल्या आहेत; असें त्याच्या सांगण्यावरून समजतें. त्यांच्याजवळ ६ खंडी दारू व १००० गोळे, १२ मोठ्या तोफा, ५६० शिपाई, २०० बंदूकवाले व ३०० तरवारवाले आहेत. किनाऱ्यावरील सुभेदार त्यांना मजूर पुरविण्यास तयार नाहीं. तेथील शिपाई शरण येण्यास तयार आहेत; परंतु शिवाजी त्यांचीं व त्यांच्या बायकामाणसांचीं डोकीं कापील असा त्याचा निरोप आल्यामुळें ते लोक भितात. बेट घेण्यास आम्हीं मदत करावी असें सिद्दीचें म्हणणें आहे. जर या माणसाचें म्हणणें खरें असेल तर लवकरच रसदेच्या तुटवड्यामुळें तेथें बंड होईल. तेथें तांदूळ व मीठ यांशिवाय खाण्यास कांहींच राहिलें नाहीं. सिद्दीनें अचाडी मारल्यास सर्व कांहीं त्यालाच मिळेल. सुरतेहून माणसें येण्याची तो वाट पहात आहे. काल त्याला

एक गलबत येऊन मिळालें. परंतु आम्हींच अघाडी मारून एकदांचा सोक्षमोक्ष करून टाकूं या. आतांची वेळ गमावल्यास फिरून ती संधी परत येणार नाहीं.

पृ. ८१, ता. २७ नोवें:—सिद्दीनें बेट व किनारा यांच्या मध्यभागीं स्वतंत्र हालचाली चालू केल्या. गेल्या २ दिवस त्यांनीं आम्हांला भेट दिली नाहीं. बेटावर तटबंदी अद्याप चालू आहे. पाण्याची होडी गमावली याबद्दल खेद वाटतो.

फॅ. रे. सुरत भा. १०८ } (२१८३) { श. १६०१ मार्ग. शु. १
पृ. ७६ इ. } कारवार–सुरत. { इ. १६७९ नोवें. २४

शिवाजीशीं वैर सुरू झालें याचा आम्हांला खेद होतो. अद्यापपर्यंत त्यामुळें त्रास झालेला नाहीं. परंतु वैर अधिक तीव्र झाल्यास आमच्या रक्षणाकरितां उपयोगी पडावी म्हणून मुंबईहून टोपशांची १ रांग पाठवावी. शिवाजीनें या प्रांतांत अण्णाजीचा भाऊ सोमाजी पंडित हा अंकोला, कारवार, सिवेश्वर, फोंडा इत्यादि किल्ल्यांवरून ३० एक तोफा काढून पन्हाळ्यावर नेण्याकरितां पाठविला आहे. मजूर, रेडे वगैरे लावून त्या पन्हाळ्याकडे ओढीत नेल्या जातील. **शिवाजी** सर्व कोंकण दक्षिण्यांच्या हवालीं करीत आहे; अशी सर्वांची समजूत झाली आहे.

फॅ. रे. मुंबई भा. ८ } (२१८४) { श. १६०१ मार्ग. शु. ३
पृ. ६९ इ. } मुंबई-केग्विन. { इ. १६७९ नोवें. २६

सिद्दीशीं कुरापत काढूं नये. शिवाजीच्या लोकांकडूनच ह्या भांडणाचा शेवट करणारीं पत्रें येतील अशी प्रत्येक तासाला आम्हीं अपेक्षा करीत आहों. म्हणून खांदेरीला अधिक प्रयत्न करण्याचें कारण नाहीं.

फॅ. रे. मुंबई भा. ८ } (२१८५) { श. १६०१ मार्ग. शु. ६
पृ. ७०–१ इ. } मुंबई–सुरत { इ. १६७९ नोवें. २९

गेल्या १५ तारखेला तुम्हांला पत्र पाठविलें त्याच वेळीं पेशव्यानें आम्हांला पत्र पाठविलें. ता. १७ रोजीं सकाळीं आम्हांला पोंचलें. लगेच संध्याकाळीं प्रत्युत्तर सिद्दीच्या बेटावरील कारवाईबद्दल सविस्तर लिहून त्वरेनें पाठविलें. 'सिद्दी एकसारखा तोफांचा भडिमार करीत आहे; ही त्याच्या (मराठ्यांच्या) राज्यावर मोठी आपत्ती आहे हें समजून व सर्वांचें होणारें नुकसान वांचविण्याकरितां जर कोणाला पाठवून ह्०० के०च्या लोकांनीं बेट आमच्या (इंग्र०) हवालीं करावें असें [पेशव्यानें] त्यांना कळविलें तर 'आम्हीं तें सिद्दीपासून बचावून त्याच्या तेथील लोकांची काळजी घेऊं. आणि राजाला ती गोष्ट पसंत नच पडली तर सिद्दी परत फिरल्यावर आम्ही आमचे लोक काढून घेऊन पूर्ववत् तें निर्जन रहावें म्हणून सोडूनहि देऊं.' इत्यादि त्याला लिहिलें. पुढें २३ तारखेला 'बंगाला मर्चंट' हें गलबत आलें. पेशव्याचें अनुकूल उत्तर आल्यास तें उपयोगीं पडेल

म्हणून त्याला ठेवून घेतलें. परंतु २७ तारखेला अगदींच अनपेक्षित असें त्याचें उत्तर आलें. कारण, आम्हीं शांततेचे चहाते आहोंत म्हणून सामोपचारानें बोलतों हें त्यांना खरें न वाटतां आमची लंगडी बाजूच त्यांच्यादृष्टीसमोर उभी रहाते. आतां कालच पेशवा व राजा या दोघांनाहि पत्रें लिहिलीं आहेत. त्यांत यश आलें तर आमचा युद्धाचा एवढा खर्च तरी वांचेल ! दरमहा या युद्धामुळें सुमारें ५००० झेराफिन्स इतका जादा खर्च होईल असा अंदाज आहे. तरी आळसांत दिवस काढून शत्रूकडून हसें करुन घेण्यापेक्षां आम्हीं आमचें आरमार परत बोलवावें काय हें कळवावें. सिद्दीला आम्ही बेटावर तोफा डागीत नाहीं आणि त्याला शिवाजीचा मुलूख लुटूं देत नाहीं म्हणून वैषम्य वाटत आहे. ह्यांपैकीं दुसरी बाब तर स्पष्टपणें अन्यायाची असून त्यामुळें शिवाजी आमच्यावर अधिकच चिडेल. सिद्दी आमच्याशीं भरपूर स्नेहाचा आव आणितो व खांदेरीवर हल्ला करण्याचा फारच आग्रह करितो. आपण आपल्याकरितां कांहीं करीत नसून यापुढें (आम्हांला त्रासदायक होणाऱ्या) कोणालाच तेथें सुखानें रहातां येऊं नये असें करण्याबद्दल तो बोलतो.

२२ तारखेला मराठ्यांनीं पांढरा बावटा चढविला. तेव्हां सिद्दीनें त्यांच्याकडे एक होडी पाठविली. परंतु तिच्यावरील लोकांशीं सरळ न बोलतां बेटावरील लोकांनीं त्यांना शिव्याच दिल्या. एवढें झाल्यावर आम्हीं त्या चिन्हाचा अर्थ काय म्हणून विचारण्याकरितां होडी पाठविली. तेव्हां ते सामोपचारानें बोलले. 'पांढरा बावटा हा किनाऱ्यावरील लोकांकरितां खूण असून बेट ताब्यांत देण्याचा आपला विचार नाहीं. परंतु डे० ग०चें मायनाकच्या नांवाचें पत्र घेऊन येणाऱ्यांस आपण सुखानें येण्याजाण्यास परवानगी देऊं' वगैरे त्यांच्याकडून कळलें. मायनाक स्वतः डे० गव०ला पत्र लिहिणार होता, इत्यादिहि ते बोलले. पुढें कांहींच समजलें नाहीं. बेट शरण आलें तर सिद्दी त्रास देईल असें वाटतें. आमच्यावर त्यानें हल्ला केलाच तर आम्हांला स्वतःचें संरक्षण केलेंच पाहिजे. परंतु शक्य तोंपर्यंत आम्ही बिघाड घडवून आणणार नाहीं. तरी आम्हांला अनेक गोष्टींबद्दल हुकूम पाहिजेत, ते सविस्तर द्यावे. कारण पुनः उत्तर मागवावयाचें म्हणजे निदान २० दिवस जातात.

शिवाजी येथून ५ दिवसांच्या मुक्कामावर **पट्टागड** नांवाच्या जागीं आहे. विजापुरास दिलेरखानानें त्याचा पुरता मोड करून त्याचे २००० घोडे व कित्येक कैदी पकडल्यामुळें आपलें बहुतेक सैन्य त्याच बाजूला सोडून देऊन फक्त ५०० स्वार घेऊन स्वसंरक्षणार्थ तो इकडे पळून आला आहे. तो इतका जवळ आल्यामुळें आपल्या व आमच्या पत्रांचीं उत्तरें आतां लवकरच येतील. पेशवा तिकडेच गेला आहे. अण्णाजी पंडितहि तिकडेच जाईल असें वाटतें. पेशवा **सुरतेकडे** येणार होता. परंतु **रणमस्तखान** नांवाच्या पठाणानें त्याचे २००० लोक मारले व ४०० घोडे पकडले; यामुळें त्यानें तो रोख सोडून दिला.

फॅ. रे. सुरत भा. ४ } (२१८६) { श. १६०१ मार्ग. शु. ११
पृ. ९९–१०० इ. } सुरत कन्सल्टेशन { इ. १६७९ डिसें. ३

मुंबईच्या १५ तारखेच्या जनरल पत्रावरून आमच्या मागच्या पत्राबद्दल डे० ग० नाखूष झाला आहे असें दिसतें. मराठ्यांवर हल्ले करण्याची परवानगी दिल्यास कंपनीला अनुकूल असा कांहीं निकाल लागेल असें ते म्हणतात. त्यावर पुनः विचार करून पहातां तसें केल्यानें आमचें भरून न येणारें नुकसान होईल व त्या बाबतींत कंपनीची संमती मिळण्याची शाश्वती नाहीं. म्हणूनच शिवाजीचा खांदेरीवरील प्रयत्न थांबविण्याचा (१) शिवाजीशीं तह करणें किंवा (२) सिद्दीच्या आरमाराची मदत घेणें, याशिवाय अन्य मार्ग आम्हांला सुचवितां येत नाहीं.

डोन्ह गुराबांतील पकडलेल्या कैद्यांच्या भित्रेपणाच्या वर्तनाबद्दल त्यांचीं नांवें काढून टाकावीं. परंतु त्यांच्या विनंतीला मान देऊन योग्य दिसेल त्या मार्गानें डे. ग.नें त्यांना सामुग्री पाठवावी.

फॅ. रे. मुंबई भा. १९ पृ. ८७–८८ ता. ४ डिसें., सुरत–मुंबईः–याच बाबतींत पत्र. तुमच्या पुढच्या डाकेनें खांदेरी प्रकरणाचा उत्तम निकाल झालेला वाचावयास मिळेल अशी आशा आहे. पेशवा, दौलतखान व सिद्दी यांचीं पत्रें वाचलीं. पूर्वी प्रेसि०नें पाठविलेलें राजाच्या नांवाचें पत्र तुम्हीं थांबवून धरलें हें चांगलें केलें.

फॅ. रे. मुंबई } (२१८७) { श. १६०१ मार्ग. शु. ११
भा. १९ इ. } केग्विन–मुंबई. { इ. १६७९ डिसें. ३

पृ. ८२–८३ः–सिद्दीच्या गलबतावर जाऊन थोडया गप्पा मारल्यावर त्यांनीं पकडलेले कांहीं गुलाम नागांवचे होते असें चौकशीअंतीं कळलें. पाण्याशिवाय तडफडत ठेविला तरीहि शत्रू प्रत्यहीं प्रबळ होत आहे. तरी बेटावर केव्हां जावयाचें असा त्यानें प्रश्न केला. सर्व कांहीं मित्रत्वानें व उभयतांच्या फायद्याचेंच करूं असें मीं म्हणालों. त्याचे ७०० लोक तयार असून तो हल्ल्याला थोडा उतावीळ दिसला. मुंबईला शिवाजीचा ब्राह्मण आल्याची बातमी त्यानें सांगितली. परंतु मला कांहींच माहिती नव्हती. शिवाजीच्या दोन होडया सिद्दीच्या गलबतांना चकवून निसटल्या. त्यांनीं (आमच्याकडील) एका जहाजाचे कप्तानाचें वगैरे नांव बिनचूक सांगून आपली सुटका करून घेतली.

पृ. ८५ ता. ६ डिसें.—प्रत्येक दिवशीं सिद्दी व बेटावरील लोक एकमेकांवर गोळे मारीत असतात.

फॅ. रे. मुंबई } (२१८८) { श. १६०१ मार्ग. शु. १२
भा. ८ पृ. ७२ इ. } मुंबई–सुरत { इ. १६७९ डिसें. ४

सिद्दीचीं गलबतें किनाऱ्यावर शिवाजीच्या मुलखांत जाऊन त्यांनीं शिवाजीचीं ४

खेडीं लुटून पुष्कळ कैदी आणिले. आम्हीं काल त्याला लिहिलें परंतु त्याचें अजून उत्तर आलें नाहीं.

काल दौलतखानाच्या दोन नोकरांच्या हातीं शिवाजीचें एक व दौलखानाचें एक अशीं पत्रें आलीं. राजाचें पत्र शिष्टाचारपूर्ण आहे. परंतु **खांदेरी उंदेरी** सोडण्याचा आपला विचार नसून तटबंदीचें काम तसेंच पुढें चालेल असें त्यांत निक्षून लिहिलें आहे. दौलतखान सिद्दीच्या जाळपोळीबद्दल तक्रार करून आम्हीं त्याला संमति दिली असावी, असा आमच्यावर आरोप करितो. आम्हींहि शक्य तितक्या लवकर हा वाद मिटविण्याच्या इराद्यानें उभयतांना आजच पत्रें लिहीत आहों.

फॅ. रे. सुरत
भा. १०८ पृ. ? इ.

(२१८९)
राजापूर–सुरत

श. १६०१ मार्ग. शु. १४
इ. १६७९ डिसें. ६

नोवें. २८ रोजीं **अण्णाजी** येथून १ मैलावर धोपेश्वर[Duplejah ?]च्या दर्शनाला आला असतां त्यानें २० इ. ब्राह्मणांना अन्नसंतर्पण केलें. त्यानंतर आम्हीं तेथील आमचा व्यापार थांबविण्याचीं कारणें आम्हांस त्यानें विचारलीं. सुभेदारानें बंदी केली असें आम्हीं सांगतांच, 'पूर्वी आपण एकदा तसा हुकूम दिला होता. परंतु पुनः विचार करतां बक्षिसाशिवाय इतर बाबतींत तुम्हांला त्रास देऊं नये, असें सुभेदाराला मीं कळविलें आहे. बक्षिसाच्या बाबतींत राजाचाच बंदीहुकूम असल्यामुळें आपण कांहीं करूं शकत नसलों तरी तुमच्या वतीनें मी खटपट करून पाहीन व बहुधा मला यश येईल' असें तो म्हणाला. डे०ग०ला मित्रत्वाचें पत्र त्यानें लिहून नारायण शेणव्याला बोलणें करण्याकरितां बोलाविलें असतां तो आला नाहीं. तेव्हां आपणच एक मुखत्यार पाठविण्याचा आपला बेत कळवून आमच्यापैकीं एकानें त्याच्याबरोबर जाऊन शिवाजी इंग्रजांशीं मित्रत्व राखण्यास किती उत्सुक आहे हें सांगावें, अशी त्यानें विनंति केली. आम्ही नोकर आहोंत इत्यादि नानाप्रकार सांगून तो ऐकेना, तेव्हां शेख महमदाला आम्हीं त्याच्याबरोबर दिलें. परंतु तेथून त्याच्या वतीनें कोण जाणार आहे हें अद्याप मला कळलें नाहीं.

फॅ. रे. सुरत
भा. ४ पृ. १०५–६ इ.

(२१९०)
सुरत कन्सल्टेशन

श. १६०१ मार्ग. व. १
इ. १६७९ डिसें. ८

शिवाजीनें धरणगांव, चोपडा व आसपासचीं महत्त्वाचीं गांवें लुटल्याची बातमी काल रात्रीं आली. शिवाजीचा **सुरतेवर डोळा** आहे, या गोष्टीवर सर्वच जण तत्काल विश्वास ठेवण्यास तयार असल्यामुळें भेदरून गेले आहेत. शिवाय हल्लीं शहरांत पुष्कळ रोकड पडून असल्यामुळें त्याला तें आमंत्रणच होय. आमच्या रक्षणाचीहि पुरेशी तरतूद नाहीं. त्यांतून खांदेरी प्रकरणापासून शिवाजीनें आमच्यावर चिडून जाण्यास पुरेसें कारण झालें आहे. वगैरे गोष्टी लक्षांत घेतां बंदोबस्ताची तजवीज करावी. व सर्वत्र पहारे व हेर ठेवून प्रसंग येतांच स्वालीकडे पलायन करण्याची व्यवस्था ठेवावी.

फॅ. रे. मुंबई भा. ८ } (२१९१) { श. १६०१ मार्ग. व. १
पृ. ८३ इ. } मुंबई-सुरत { इ. १६७९ डिसें. ८

आपलें व डे० ग०चें पत्र घेऊन शिवाजीकडे गेलेल्या दोन नोकरांची आम्हीं वाट पहात आहों.

शिद्दीकडून पत्राचें उत्तर आलें आहे. 'अद्याप पर्यंत इंग्रजांच्या विरोधामुळें आम्हीं असा त्रास देऊं शकलों नाहीं, हें शिवाजीच्या लक्षांत येण्यानें इंग्रजांचेंच हित साधणार आहे' अशी त्यानें मखलाशी केली आहे. पत्र घेऊन मिर्झा महमद इवास आला त्यानेंहि आमची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. खांदेरी-उंदेरी स्वतःकरितां सिद्दी घेत नसून फक्त शिवाजीला तें मिळूं नये एवढीच त्याची खटपट आहे. उभयतांनीं मिळून हल्ला करून तें एकदां घेतल्यावर तें वाटेल तर इंग्रजांच्या हवालीं करण्यास सिद्दी तयार आहे; हा सर्व त्याच्या बोलण्याचा मतलब होता. आम्हींहि चांगली भाषा बोललों. तुमच्या राजाला पाठविलेल्या पत्रांचीं काय उत्तरें येतात इकडे आमचें लक्ष आहे.

फॅ. रे. मुंबई भा. ८ } (२१९२) { श. १६०१ मार्ग. व. ३
पृ. ८५ इ. } मुंबई-केग्विन { इ. १६७९ डिसें. १०

दौलतखान आरमाराची तयारी करीत आहे अशी आम्हांला नक्की बातमी लागली आहे. परंतु त्याचें उद्दिष्ट कळलें नाहीं. दोन तीन दिवस बाहेर राहून कृष्णपक्ष लागतांच माहीम किंवा दुसऱ्या एकाद्या ठिकाणीं मुंबईत येण्याचा त्याचा बेत आहे, असें कळतें. पण ही गोष्ट खरी वाटत नाहीं. तथापि तुम्हीं नागांवच्या तोंडाशीं पहारा ठेवा. दौलतखान बाहेर आलाच तर त्याचा नाश करण्यास चुकूं नका. आमचे कैदी घेतले आहेत त्याचा मोबदला करण्याकरितां आम्हांला कैदी मिळावयास पाहिजे होते. जर कदाचित् दौलतखान निसटून गेलाच तर मग माहीमला गस्त घालावी. व तिकडे दौलतखान आल्याबद्दल आम्हीं खूण दिल्याबरोबर सर्वांनींच येऊन त्याचें आरमार बुडवावें. तुमचे इतके कडक पहारे आहेत परंतु त्यांना न जुमानतां बेटावरून दर दोन तीन दिवसांनीं थळकडे दोघांनीं वल्हविलेली होडी जात येत असते तिच्याबद्दल व दौलतखानाचें आरमार बाहेर पडणार आहे ह्याबद्दल शिद्दीला कळवा.

फॅ. रे. सुरत भा. ४ } (२१९३) { श. १६०१ मार्ग. व. ५
पृ. १०६-७ इ. } सुरत कन्सल्टेशन { इ. १६७९ डिसें. १२

फिरून मुंबईकरांचें हल्ला करण्याबद्दल आग्रहाचें पत्र आल्यामुळें पुनः आम्हीं विचार केला; आणि कॅ० गोल्डसबरो व डॅनिएल यांना बोलावून त्यांचाहि सल्ला घेतला. कंपनीनें आमच्यावर घातलेलीं बंधनें, सैन्याची कमाई वगैरे गोष्टी सविस्तर त्यांच्यापुढें मांडल्यावर त्यांनींहि हल्ला करणें अदूरदर्शीपणाचें होईल असा सल्ला दिला. आरमार काढून

घेण्याबद्दलचे हुकूम देण्यापूर्वी, शिवाजीशीं तहाचें बोलणें करण्यांत येणारें यश व खांदेरीला मदत करणाऱ्यांना अडथळा करण्याचे बाबतींतील यशापयश याबद्दल त्यांनीं सविस्तर कळविणें जरूर आहे.

फॅ. रे. सुरत भा. १०८ पृ. ? इ. (२१९४) धरणगांव (चुपडा)—सुरत श. १६०१ मार्ग. व. ५ इ. १६७९ डिसें. १२

२५ तारखेच्या पत्रांत शिवाजीच्या सैन्याच्या आगमनाची बातमी कळविली होती. त्याचवेळीं कळविल्याप्रमाणें काफिल्याबद्दल व्यवस्था होऊन तो मोठ्या चमत्कारानें सुरक्षितपणें निघून गेला. दुसऱ्याच दिवशीं काफिला निघाला व तिसऱ्याच दिवशीं शिवाजीचें सैन्य आलें. परंतु कंपनीचा माल व लोक बचावले. सर्व शहर जळालें, तथापि बखार तेवढी बचावली. शिवाजीचें सैन्यांत १२००० स्वार होते. येथें दोन दिवस राहून पुढें ते बऱ्हाणपूरच्या रोखानें गेले. परंतु तेथपर्यंत न जातांच पूर्वेकडे मलकापूरला २० ह. स्वारांसह शिवाजी होता त्याला मिळावयास गेले. शहाजादा शिवाजीच्या मदतीनें सिंहासन मिळविण्याची खटपट करीत आहे अशा अनेक बातम्या आहेत. या देशाची व आमचीहि परिस्थिती अत्यंत कष्टप्रद आहे. येथील सर्व फौजदार दूर देशीं गेले आहेत. आणि आम्हांला डोंगरांचा आश्रय केल्याशिवाय गत्यंतर राहिलें नाहीं. शहाजाद्याला मिळण्याकरितां दुसरी एक १२००० फौज या बाजूनें येत आहे अशी हूल उठली आहे. औरंगाबाद जाळल्यालुटल्याची ताजी बातमी आली आहे. शहाजादा दिल्लीवर जाण्याचें बोलतो. बऱ्हाणपूर शहर व तेथील व्यापारी ताब्यांत देण्याबद्दल त्यानें तेथील मुख्य खानखानान याला लिहिलें आहे.

फॅ. रे. मुंबई भा. १९ पृ. २-३ (२) इ. (२१९५) सुरत-मुंबई. श. १६०१ मार्ग. व. ६ इ. १६७९ डिसें. १३

शिवाजीशीं तह करण्याच्या बाबतींत किंवा बेटाला मदत मिळण्याला विरोध करण्यामध्यें तुम्हांला यश न आल्यास मग गलबतें परत बोलावण्याचा विचार करूं. मध्यंतरीं सिद्दीशीं सलोखाच ठेवा. नाहींतर येथें आम्हांला त्रास होईल. कारवारच्या व इतर सर्वच बाबींबद्दल शिवाजीकडून समाधानकारक कलमें नच मिळतील तर मग बेट शिवाजीच्या हातीं रहाण्यापेक्षां तें बादशहाच्याच हातीं जावें असा आमचा निश्चय झाला आहे. जोराच्या हल्ल्या बद्दल आणखी दोन तज्ञांचा विचार आमच्या सारखाच पडला. तरी शिवाजीपासून कांहीं चांगलें निष्पन्न होत नाहीं अशी तुमची खात्री होतांच मागें पाय काढण्याचें चांगलें कारण शोधून काढून सिद्दीला त्याच्याशीं भांडण्यास सोडून द्या. सिद्दी बंदराच्या किनाऱ्यावरील मुलखांत जाळपोळ करतो व तें योग्य नाहीं, हें पुरेसें योग्य कारण आहेच. शिवाजीचा आणि पेशव्याचा पराजय झाला या तुमच्या

बातमीला विरोधक अशी बातमी इकडील आहे; तीच अधिक विश्वसनीय वाटते. कारण, या बाजूला चुपडाधरणगांव लुटणें, बऱ्हाणपूरच्या रोखें दौड करणें वगैरे जबरदस्तीचीं कृत्यें, सुरतेवर तो अचानक येणार, वगैरे बातमी हे उलट बाजूचेच पुरावे आहेत. आमच्याकडेहि बिकट परिस्थिति होत आहे.

फॅ. रे. मुंबई भा. १९ पृ. ८९ इ. } (२१९६) केग्विन–मुंबई. { श. १६०१ मार्ग. व. ६ इ. १६७९ डिसें. १३

सिद्दीला नागांवच्या तेथें त्याच्या गुराबा ठेवणें आवडत नाहीं. कालच्या आमच्या बातमीवरून ते बाहेर न येतांना उत्तरेकडे जाण्याचा विचार करीत आहेत. (मुंबईकडे जाण्याचा) त्यांचा उद्देश आहे असें आम्हांला वाटत नाहीं. परंतु तुम्हांला संशय असलाच तर सिद्दीसमवेत आम्हीं नागांवांत त्यांना कोंडून ठेवूं. मग बेटालाहि त्यांना मदत देतां येणार नाहीं. याबद्दल आम्हीं तुमचें पत्र आल्याशिवाय सिद्दीजवळ बोलणार नाहीं. नुकताच एक (शत्रूचा) पगार आम्हीं पकडला.

फॅ. रे. सुरत भा. १०८ पृ. रहित इ. } (२१९७) राजापूर–सुरत. { श. १६०१ मार्ग. व. ९ इ. १६७९ डिसें. १६

शिवाजी विजापूरकरांशीं तह करून सर्व सैन्यासह कोठें तरी गेला आहे. पुढें आक्टो. १६ व ३० चे लेखांतील बातमीः—

ही मागच्या पत्राची नक्कल आहे. त्यानंतर शिवाजीराजा, हमीदभाऊच्या [?] हाताखालील ४००० घोड्यांचा नाश झाल्यामुळें परत आला असें कळलें. राजा आतां पन्हाळ्याकडे निघाला आहे. मोंगल बादशहाकडून २००० घोडदळाची कुमक मिळाल्यामुळें दिलेरखानहि तिकडच्याच रोखानें येत आहे. राजानें पन्हाळ्याला विशेष मजबुती चालविली आहे. कोंकणांतील कित्येक किल्ल्यांच्या तोफा काढून घेऊन त्यांची मजबूती कमी करूनहि त्या पन्हाळ्यावर ठेवीत आहे. शिवाय फ्रेंचांकडून ४० तोफा नवीन घेतल्या असून, येथून त्या नेहमीं घेऊन जात असतात. थोड्याच दिवसांत या त्रासदायक युद्धाचा शेवट लागेल अशी आशा आहे.

फॅ. रे. मुंबई भा. १९ पृ. ९०–९१ इ. } (२१९८) ॲंडर्टन–मुंबई. { श. १६०१ मार्ग. व. १० इ. १६७९ डिसें. १७

काल दोन वाजतां, नागांवमधून शिवाजीचीं १६ गलबतें बाहेर जाऊं लागलीं. तेव्हां सिद्दीच्या गलबतांबरोबर तिकडे जावें असा हुकूम आल्यामुळें आम्हीं आमचे मचवे पाठविले, परंतु सिद्दी व आम्ही अर्ध्या वाटेवर जातों तोंच तीं गलबतें नागांवांत पुनः शिरलीं व आम्हीं परत आलों. सिद्दी व हेन्द्री–के॰ यांमध्यें निष्फळ गोळीबार होतो. आखाताच्या बा जूनें ते भिंत बांधीत आहेत तीवर २०० लोक काम करितात.

सदर पृ. २ (२)— ता. १९ डिसें:—शत्रूच्या बेटावरील भिंती बऱ्याच उंच झाल्या असून ते त्या कामीं फारच परिश्रम करितात.

सदर पृ. ४ (२)—ता. २१ डिसें:—आज सिद्दींचीं तिरकटी तारवें व गलिबेटें नागांवाकडून परत येऊन आपल्या ठिकाणीं उभीं राहिलीं.

सदर पृ. ५ (२)-ता. २२ डिसें:— } सिद्दी व बेट यांचा परस्पर वायफळ गोळीबार.
,, ,, ता. २३ डिसें:—
,, ,, ,, २४ डिसें:—

सदर पृ. ६-७ (२)-,, २७,२८,२९ डिसें. ,, ,,

,, ,, ,, ३० डिसें:—बेटावरून पुष्कळ गोळे आले. एकानें एक कुली (कोळी का मजूर ?) मरून पडला व शिबाडाची डोलकाठी मोडली.

फॅ. रे. सुरत भा. ४ पृ. १०७ इ. | (२१९९) सुरत कन्सल्टेशन. | श. १६०१ मार्ग. व. १३ इ. १६७९ डिसें. २०

शिवाजीच्या स्वारीबद्दल अफवा येतच आहेत. तथापि सराफांनीं ५० ह. होनांची मागणी केली आहे. ती पुरवावी व कंपनीच्या मालाचा बंदोबस्त करावा.

इ. वृ. १८३४ पृ. २७१ श. | (२२००) | श. १६०१ मार्ग. व. १३ इ. १६७९ डिसें. २०

विठल विस्वनाथ भट (पेशव्यांचे पूर्वज)—वे. चिंतामणभट हिंगणे.

आपले नासीक क्षेत्रीचे तीर्थपुरोहितपण वंशपरंपरा तुम्हास दिधलें असे.

फॅ. रे. सुरत भा. १०८ पृ. १ इ. | (२२०१) मुंबई-सुरत. | श. १६०१ मार्ग. व. ३० इ. १६७९ डिसें. २२

आम्हीं इतक्या वेळां लिहिलें तेंच पुनः न लिहितां तुमचे तहाबद्दल हुकूम पाळूं. खांदेरीउंदेरी मोठ्या चमत्कारानें टिकाव धरून आहे. लवकरच उत्तरेकडील वारा चालू होऊन आमचीं छोटीं गलबतें समुद्रावर टिकणार नाहींत आणि आमचा सर्व खर्च वांया जाईल. शिवाजी व त्याचे अमलदार यांच्याशीं तहाचें बोलणें आम्हीं चालू ठेविलें आहे. दोन दिवसांपूर्वी शिवाजीचें पत्र आलें. चौलचा सुभेदार तहाचें बोलणें करण्यास नेमिला आहे त्याचेंहि दुसरें पत्र आलें. काल सुभेदाराकडे एक पत्र व त्वरेनें निकाल करून खर्चाचा बोजा कमी व्हावा म्हणून एक इसमहि पाठविला. त्याच्याकडून आम्हीं मनुष्य बोलाविला आहे. या बाबतींत आम्हीं शक्य तितकें करूंच. परंतु या भानगडींत खांदेरीउंदेरी शिवाजीच्याच हातीं रहाणार अशी भीती वाटते. मुंबई बेटाचे प्रत्येक रस्त्यावर कडक पहारे ठेविले आहेत. शिवाजीच्या मुलखांतील कैद्यांबद्दल आपले हुकूम पाळूं.

फॅ. रे. मुंबई भा. १९ } (२२०२) { श. १६०१ पौष शु. २
पृ. ८ (२) इ. } सुरत-मुंबई { इ. १६७९ डिसें. २४

आमची आशा होती त्याप्रमाणें **खांदेरी हस्तगत होण्याचा अल्पहि संभव दिसत नाहीं** ह्याबद्दल आम्हांला खेद होतो. आणि या वादाचा कांहीं चांगल्या प्रकारें निकाल लागेल तर बरें असें वाटतें. कारण एकदांचा हा जादा खर्च संपावा आणि तुम्हांला कंपनीच्या मर्जीप्रमाणें सर्व करितां यावें अशी आमची इच्छा आहे.

फॅ. रे. संकीर्ण भा. ४ } (२२०३) { श. १६०१ पौष शु. ९
पृ. ३६ इ. } मुंबई-कंपनी. { इ. १६७९ डिसें. ३१

परिच्छेद ८-हेन्द्रीकेन्द्री प्रकरणीं कंपनीला पुष्कळच खर्च आला. आम्हीं तें संपविण्याचा प्रयत्न करीत आहोंत. परंतु अद्याप आम्हांला यश आलें नाहीं.

फ्रायर भा. ३ } (२२०४) { श. १६०१
पृ. १६१-६२ इ. } शिवाजीवर टिपणी. { इ. १६७९

औरंगजेबाला सिंहासनावरून काढण्याच्या कटांत भडोचचा सुभेदार सामिल झाला आहे....मोंगल बादशहा एकंदरींत युद्धामध्यें कानापर्यंत किंवा डोक्यापर्यंतहि बुडून गेल्यामुळें बऱ्हाणपूरच्या खानाला त्यानें मदतीला बोलाविलें आहे. अशा संधींत **शिवाजी** सुरतेवर व दुसरा एक राजा बऱ्हाणपूरवर चालून येत आहेत. यामुळें भेदरून जाऊन सर्व व्यापारी लोक आपली संपत्ती व कुटुंबें घेऊन पळून जात आहेत. सुरतेचा तट आतां पुरा झाला असतांहि पूर्वींचा शिवाजीचा क्रूरपणा लोकांच्या स्मरणांत असल्यामुळें त्यांना त्याचा भरंवसा येत नाहीं. हल्लींचा सुभेदार लढवय्या नसून केवळ राजकारणी वृत्तीचा असल्यामुळें त्यानें लांडग्यापुढें टाकण्याकरितां तुकडा म्हणून बनिया वर्गाकडून खंडणी वसूल केली आहे! शिवाजीहि या वस्तुस्थितीची माहिती असल्यामुळें आसपासच्या मुलखांत जाळपोळ व लुटालूट करीत खालीं किनाऱ्याकडे उतरला आहे. सुरतेहून शांततेची किंमत म्हणून कांहीं दंड भरला जाईपर्यंत याचा हा क्रम असाच चालेल.

फॅ. रे. सुरत } (२२०५) { श. १६०१ पौष शु. १०
भा. १०८ पृ. ? इ. } मुंबई-सुरत. { इ. १६८० जाने. १

तुमचें १३ तारखेचें पत्र पोंचलें. आज मितीपर्यंत कांहीं आशाजनक मजकूर लिहितां येण्यासारखा नाहीं. शिवाजीशीं तह करण्याची खटपट एकसारखी चालविली आहे. तीन दिवसांपूर्वी त्याचें एक पूर्वीसारखेंच पत्र चौलच्या सुभेदारामार्फत आलें. सदर सुभेदार तहाची इच्छा प्रदर्शित करून त्याकरितां खटपट करण्याचें वचन देत आहे. बोलणें करण्याकरितां त्याच्याकडून आमच्याकडे येण्यास एक इसम तयार होऊन बसला आहे.

परंतु सिद्दीच्या भीतीमुळें येण्यास धजत नाहीं. तो भट्टीला असून त्याच्याकरितां आम्हीं होडी पाठवावी असें तो म्हणतो. तें आम्हीं मान्य करून बलून (होडी) व शिपाई पाठविले. यामुळें सिद्दी आमच्यावर पुष्कळ नाखूष होईल. परंतु आम्हीं त्याच्याशीं बिघाड करणार नाहीं. खांदेरी मात्र शिवाजीच्याच हातांत रहाणार अशीं चिन्हें दिसत आहेत. [पुढें ऑक्टो. १६ च्या ले.तील बातमी.]

फॅ. रे. मुंबई भा. १९ } पृ. ८-१० (२) इ.   (२२०६) कॅ० मिंचिन-मुंबई   { श. १६०१ पौष ११,१५ व. २ इ. १६८० जाने. २, ५, ७

२ जाने:—उत्तरेकडील वारा सुरू झाल्यामुळें आमच्या छोटया होडया गडबडूं लागल्या व त्यांना हेन्री बेटाच्या आश्रयाला ठेवावें लागलें. शिवाजीच्या लोकांनीं थळला पुष्कळ मोठ्या तोफा आणल्या असून आज त्यांनीं आमच्या होडयांवर गोळे मारले.

५ जाने:—काल सिद्दी व बेटवाले यांच्यांत गोळीबार झाला. आज सकाळीं बेटावरून सिद्दीवर तोफा मारल्या गेल्या.

७ जाने:—सिद्दी व बेटवाले यांमध्यें तोफांचा मारा.

फॅ. रे. मुंबई भा. २ पृ. १०२ इ. }   (२२०७) मुंबई कन्सल्टेशन   { श. १६०१ पौष शु. ३ इ. १६८० जाने. ८

प्रेसि०च्या आज्ञेप्रमाणें डे० गवर्नर शिवाजीशीं तह करण्याची बरेच दिवस खटपट करीत आहे. आतां आम्हीं आमचीं कलमें कळविण्याकरितां मनुष्य पाठवावा अशी त्यांच्याकडून सूचना आल्यामुळें, आपलीं कलमें ठरवून तीं रामशेणव्याबरोबर सुभेदाराकडे पाठवावीं असें ठरलें.

यापुढें, 'डेप्युटी गव० चाईल्ड व त्याचें कौन्सिल यांनीं शिवाजीराजाच्या अधिकाऱ्यांकडे, शिवाजीकडून मान्यता मिळविण्याकरितां, पाठविलेलीं इंग्रजराष्ट्र व शिवाजी यांच्यामधील तहाचीं कलमें,' दिलीं आहेत. [ले. २२०८ पहा].

ह्या कलमांचें शब्दशः मराठी भाषांतर करून तें राम शेणव्याच्या हातीं **अणाजी-पंडीत** व चौलचा सुभेदार यांच्याकडे पाठविलें.

फॅ. रे. सुरत भा. १०८ पृ. ४८ इ. }   (२२०८) इंग्रज-शिवाजी तह   { श. १६०१ पौष शु. ३ इ. १६८० जानेवारी ८

[इंग्रजांनीं सुचविलेलीं कलमें]—

१. कंपनीचें व इतर रहिवाशांचें तुमच्या मुलखांतून येणें आहे तें ताबडतोब द्यावें.

२. कांहीं कारण नसतां तुमच्या लोकांनीं आमच्याशीं भांडण करून आमची एक गुराब, एक शिबाड, एक गुराबाची होडी, त्यांवरील इंग्रज व इतर माणसें आणि हत्यारें तोफा, दारुगोळा, बंदुका, नांगर, शिडें, तरवारी इत्यादि सामान घेतलें. तें सर्व परत करावें.

३. कोठूनहि मुंबईस येणारीं अगर तेथून अन्यत्र जाणारीं गलबतें आपण मुंबईचीं असल्याबद्दल तुम्हांला कळविलें, तर त्यांस थांबवून किंवा दुसऱ्या प्रकारानें त्यांना अडथळा करूं नये. अशा गलबताचें वादळांत सुकाणूं किंवा डोलकाठी मोडली तर तें गलबत किंवा वरील माल न घेतां तुम्हीं तें गलबत व माल ह्या बंदरांत पाठविला पाहिजे.

४. आम्हांला कळविल्याशिवाय आमच्या बंदरांतील टेकडीवर तुम्हीं माणसें उतरवून तुमचें आरमार तेथें आणिलें. त्याची चौकशी करण्याकरितां आमचीं गलबतें गेलीं असतां त्यांची विचारपूस न करितां त्यांच्याशीं तुमचीं गलबतें अन्यायानें लढलीं. म्हणून आजमितीपर्यंत आमचीं मोठीं जहाजें आम्हांला तेथेंच ठेवणें भाग पडलें. त्याकरितां आम्हांला आलेला खर्च तुम्हीं आम्हांला द्यावा.

५. आमचे वखारवाले आमची मर्जी असे तोंपर्यंत वखारीच्या ठिकाणीं व्यापाराकरितां रहातील. त्यांच्या स्वातंत्र्यावर येण्याजाण्याबद्दल (तुम्हीं) कोणतींहि बंधनें घालूं नयेत. आम्हीं बोलावूं तितक्यांना व तेव्हां त्या ठिकाणाहून किनारा सोडून जाण्यास किंवा तद्देशीय लोकांना वखारीची व्यवस्था करण्याकरितां नेमण्यास प्रत्यवाय असूं नये. तसेंच वखारवाले परत आल्यावर त्यांना अप्रतिबंध पूर्ववत् व्यापार करण्याची परवानगी असावी. त्यांच्यावर कोणत्याहि प्रकारचा नोकर लादला जाऊं नये.

६. पूर्वी आपल्यामध्यें लेखी तह झाले तद्वतच हा तह मानला जाईल आणि तुम्हीं महादेवाची शपथ घेतल्यास बदलला जाणार नाहीं. करितां तुम्हीं शिवाजी राजाच्या सहीशिक्यानिशीं नवीन लेख त्याच्यावर व त्याच्या वारसांवर बंधनकारक असा तयार करावा. म्हणजे आम्हीं व आमचे मागून येणारे उत्तराधिकारीहि तो मानतील.

फॅ. रे. मुंबई भा. १९ पृ. ११-१२ इ.	(२२०९) कॅ० ॲडर्टन-मुंबई.	श. १६०१ पौष व. ५,७ इ. १६८० जाने. ११व१३

११ जानेः—शत्रूनें हेन्द्री केन्द्री टेकडीच्या शिखरावर ६ ते ८ फुटाची भिंत चुन्यांत बांधून काढली आहे [?]

सिद्दी उंदेरी बेटावर गेला तेव्हां तेथें त्यानें तोफ चढवून थळवर अनेक वेळां मारा केला. परंतु त्याचा कांहींच परिणाम झाला नाहीं. तेथील बेट व सिद्दी यांच्यामध्येंहि पूर्ववत गोळीबार चालू आहे ! ... हवा वाईट पडली आहे. त्यामुळें छोटया होड्या उघड्यावर राहूं शकत नाहींत.

१३ जानेः—एक वाजतां उंदेरीवरील सिद्दीवर हल्ला करण्याच्या इराद्यानें **शिवाजीचीं** गलबतें नागांवकडून बाहेर आलीं. उभयपक्षांकडून पुष्कळ तोफा सोडल्या गेल्या. त्यांत सिद्दीचें कांहींच नुकसान झालें नाहीं. शत्रूकडील नुकसानीबद्दल कांहींच वर्तमान कळलें नाहीं. आम्हीं तयारी करून युद्धांत सामील होण्याकरितां जातों तोंच मराठ्यांचीं गलबतें परत गेल्याची बातमी समजली व इतक्यांत नागांवांत तीं शिरतांना आम्हांला दिसलीं.

फॅ. रे. सुरत भा. १०८ पृ. ? इ. | (२२१०) इंग्रज-शिवाजी तह. | श. १६०१ पौष व. ६ इ. १६८० जाने. १२[?]

[अण्णाजी पंडिताचें उत्तर]:—

१ शिवाजीनें कंपनीचें व या राज्यांतील रहिवाशांनीं व्यापाऱ्यांचें देणें असेल तें तत्काल देण्याचा हुकूम दिला जाईल.

२......तुम्हीं शिवाजीराजाशीं मित्रत्व ठेवून आपसांत विग्रह करूं नये. तुमच्या मागणीप्रमाणें सर्व तुमच्या स्वाधीन केलें जाईल.

३ [तुमचें कलम ५] मान्य केलें.

४ [तुमचें कलम ३] पूर्वीप्रमाणेंच त्यांना मोकळीक ठेविली जाईल.

५–[तुमचें कलम ६] आमच्याकडून योग्यप्रकारें करार पाळला जाईल;तुम्हींहि पाळावा.

६–वर लिहिल्याप्रमाणें यापुढें आम्हीं सर्व कलमें पाळूं. तरी तुम्हीं खांदेरीहून आपलीं गलबतें काढून न्यावीं.

सिद्दी कासम तुमच्या जोरावर उंदेरीला येऊन उतरला आहे. तरी त्याच्याशीं सामोपचारानें बोलून तें सोडण्यास सांगावें. तुमचे वखारवाले आमच्या मुलखांत आहेत; त्यांच्या बाबतींत वरील कलमें तंतोतंत पाळूं. परंतु तुम्हीं आमच्या शत्रूंना मुळींच मदत देतां कामा नये. आमच्याशीं मित्रत्व ठेवावें. आणि जर तुमच्याकडून आगळीक झाली तर मग आमच्यावर दोष ठेवूं नये.

अशाच तऱ्हेचें चौलच्या सुभेदाराचेंहि कलमवार मान्यतापत्र आलें आहे. त्यांत शेवटीं 'वर लिहिलेलीं पांच कलमें मीं मान्य करतों व शिवाजीराजाकडून तीं शपथेवर मान्य करून घेईन.' असा मजकूर आहे.

फॅ. रे. सुरत भा. १०८ पृ. ? इ. | (२२११) इंग्रज-शिवाजी तह | श. १६०१ पौष व. ६ इ. १६८० जाने. १२[?]

अण्णाजी पंडीत व चौलचा सुभेदार यांकडून [डे० गव्हर्नरकडे आलेल्या सूचना].:—

१ तुमच्या मदतीनें आलेलें सिद्दीचें आरमार व तुमचेंहि आरमार तुम्हीं काढून नेलें पाहिजे.

२ आपण मोगलांचे नोकर आहोंत अशा सबबीवर तें निघून जात नसेल तर तुम्हीं त्यांना कोणत्याहि प्रकारची मदत, दारुगोळा, होडया इत्यादि पुरवूं नये. खांदेरीहून त्यांचें आरमार हालणार नाहीं तोंपर्यंत तुम्हीं हें कलम कसें पाळतां हें पहाण्याकरितां आम्हीं मुंबईंत १ बातमीदार व १० माणसें ठेवूं.

३ कर्जदार असे कोणीहि लोक आमच्या मुलखांतून पळून तुमच्याकडे येऊन रहा-तील त्यांना आमच्या स्वाधीन करावें. परंतु तसा प्रघात नाहीं असें तुमचें म्हणणें अस-ल्यास, अशा लोकांकडून येणें असलेलें कर्ज किंवा इतर त्यांच्यावरील बोजा यांचा व्यवहार तुमच्या न्यायकोर्टांनीं उलगडावा.

४ पहिल्याच तहांत ठरल्याप्रमाणें नागोठणें किंवा पेण खाडींत आमच्या कोणाहि शत्रूला प्रवेश करूं देऊं नये. आणि आतां आपलें वैर चालू असतांना सिद्दीनें येऊन पुष्कळ कैदी धरून नेलें. ते परत करण्यास त्याला सुचवावें. यापुढें कोणत्याहि कारणास्तव त्याला या खाडींत प्रवेश करूं देऊं नये.

५ शिवाजीच्या मुलखांतील रहिवासी खरेदी विक्री व व्यापार करण्याकरितां तुमच्या बेटांत येतील त्यांना चांगल्याप्रकारें वागवावें.

६ सिद्दीच्या नोकरींत असलेल्या दाऊदखानानें आमच्या मुलखांत येऊन आमचें पुष्कळ नुकसान केलें आहे. म्हणून तुम्हीं त्याला बेटावरून काढून लाविलें पाहिजे.

हीं वरील कलमें लिहून [व मान्य करून] पाठवावीं.

फॅ. रे. फो. सें. जॉर्ज भा. २८ पृ. ३४ इ.	(२२१२) गोवळकोंडा-मद्रास	श. १६०१ पौष व. ८ इ. १६८० जाने. १४

(ब्राह्मण वीररावय्याचें डे० ग०स पत्र)— मोंगलांचा सेनापती दिलीरखान यानें विजापूरला वेढा घातल्यामुळें त्यांचा कोंडमारा होऊन **शिवाजी राजा** व सिद्दी **मसाऊद** यांनीं कांहीं घोडे व सैन्य इतक्यांची मदत गोवळकोंड्याकडे मागितली. तेथून हि मदत पाठविण्याकरितां सरलष्कर व इतर सेनापती तयार झाले. इतक्यांत मोंगलांचा हेजीब येऊन त्यानें 'तुम्हीं विजापुरास मदत केल्यास मोंगलांचें सैन्य विजापुरांत आहे तेंच पुढें येऊन गोवळकोंड्यावर स्वारी करील,' अशी धमकी दिल्यामुळें गोवळकोंड्याकडील मदत येण्याचें थांबलें. परंतु, त्याच वेळीं गोवळ०नें शिवाजीकडे **गुप्तपणें पैसा** पाठविला व सैन्य उभें करण्यास सांगितलें. शिवाजीनें त्याप्रमाणें विजापूरच्या लोकांना कुमक केल्यामुळें तेथील स्थिति कांहींशीं बरी झाली आहे.

फॅ. रे. मुंबई भा. १९ पृ. १२ इ.	(२२१३) कॅ० ॲडॅम्स-मुंबई	श. १६०१ पौष व. ८ इ १६८० जाने. १४

रात्रीं सिद्दीकडून मनुष्य आला. रात्रीं सिद्दीवर मराठ्यांच्या आरमारानें स्वारी केल्यास आमच्या छोट्या होड्या आम्हीं उंदेरीकडे पाठवाव्या असें त्यानें सांगितलें. "आपण केव्हांहि तयार आहोंत' असें आम्हीं कळविलें. सिद्दीचा उद्योग पूर्ववत् चालू आहे.

फॅ. रे. मुंबई भा. १९ } (२२१४) { श. १६०१ पौष व. ९-माघ शु. ६
पृ. १३-१६ इ. } कॅ० अडर्टन-मुंबई { इ. १६८० जाने. १५ ते २७

जाने. १५-सिद्दीकडून परस्परांवर गोळीबार. सिद्दीच्या होड्या खांदेरीपुढें सरकतात.

जाने. १९-काल सकाळीं ७ वाजतां शिवाजीचें आरमार बाहेर दिसलें. आम्हीं होड्या पाठविल्या. त्या पाव मार्ग गेल्या नाहींत तोंच शत्रूचें आरमार आंत शिरलें.

रात्रीं १२ वाजतां २ गलिवेतें दिसलीं. त्यांवर गोळे मारले परंतु तीं निसटलीं. हेन्द्रीकेन्द्रीवर जाण्याकरितां तीं आलीं असावीं. परंतु उघडकीस आल्यामुळें परत पळालीं.

जाने. २१- काल चार वाजतां सिद्दीचें एक केच उंदेरी व थळ यांच्या मधोमध राहून पहारा करण्याकरितां गेलें. सिद्दी उंदेरीला तटबंदी करीत आहे.

जाने २४- हेन्द्रीकेन्द्रीचा दारूबार बंद होऊन आतां उंदेरी व थळ इकडे चालू झाला आहे. थळच्या लोकांनीं देखील मोर्चेबंदी केली आहे. परंतु पुढें कांहींच समजलें नाहीं.

जाने. २७- काल पहाटे शिवाजीच्या आरमारानें उंदेरी काबीज करण्याचा प्रयत्न केला. सिद्दीनें फारच चांगलें तोंड दिलें. शिवाजीचीं सुमारें ३० तरांडीं आलीं होतीं. पुष्कळ गोळागोळी झाली. दौलतखानाचें बरेंच नुकसान झालें असावें. कारण पुढच्या भरतीच्या वेळीं फुटक्या होड्यांचे तुकडे व ८ प्रेतें आम्हीं तरंगतांना पाहिलीं. सिद्दीचे ३ शिपाई मेले व ७ जखमी झाले आमचीं गलबतें ओहोटीमुळें व वाऱ्यामुळें मदत करूं शकलीं नाहींत. पहांटेसच दौलतखानाचीं गलबतें नागांवांत शिरलीं. शत्रूशीं भिडावें म्हणून आम्हीं दोघांनीहि उचल केली. परंतु वारा नव्हता व होता तो प्रतिकूल होता म्हणून जमलें नाहीं.

फॅ. रे. मुंबई भा. २ } (२२१५) { श.१६०१ पौष व. १०
पृ. ३-८ इ. } मुंबई कन्सल्टेशन. { इ. १६८० जाने. १६

राम सेणवी परत येतांना त्याच्याबरोबर, अण्णाजी पंडीत व चौलचा सुभेदार यांनीं सहीशिक्का केलेलीं कलमें व राजाकडून तीं मान्य करण्याबद्दलची त्यांनीं दिलेली हमी व त्यांनीं करारांत नमूद करण्याकरितां पाठविलेल्या आणखी सूचना इत्यादि घेऊन राजाचा हेजीब आला. त्या कलमांचा विचार केला व त्यांचा समावेश करावा असें ठरलें. त्यांच्या सूचना व डे०ग०चीं उत्तरें खालीं नमूद केलीं आहेत.

अण्णाजी पंडीताचें उत्तर व राजाच्या मान्यतेबद्दलची हमी.

शिक्का.

[येथें ले० २२१० जाने. १२ चें उत्तर.]

[नंतर]

चौलच्या सुभेदाराचें उत्तर व हमी.

[येथें ले० २२१० जाने.१२ चें उत्तर.]

अण्णाजी पंडीत व चौलचा सुभेदार यांच्या सूचना व अटी.

[येथें ले० २२११ जाने.१२ चें उत्तर.]

डे० ग० व कौन्सिलचें अण्णाजी पंडीत व चौलचा सुभेदार

(यांस उत्तर १८ जानेवारी १६८० चें.)

१--[तुमचें कलम २]--युद्धसामुग्री म्हणजे तोफा, गोळे, दारू इत्यादि त्यांना आमच्याकडून मिळणार नाहीं. परंतु त्यांना अन्न व पाणी यांची बंदी आम्ही करणार नाहीं. तुम्हांला जशी या बाबतींत बंदी नाहीं तशी त्यांनाहि नसावी. जसा तुमचा आमचा स्नेह आहे व तुमच्या मुलखांत आमच्या वखारी आहेत तसा मोंगलांचा आमचाहि स्नेह असून त्यांच्याहि मुलखांत आमच्या वखारी आहेत.

२--[तुमचें कलम ३]--जेव्हां तुमच्याकडील एकादा रहिवासी या बेटावर पळून येईल तेव्हां तुम्हीं आम्हांला कळवावें; आणि नंतर त्याचा विचार आमच्या न्यायकचेरींत होऊन योग्य तो न्याय दिला जाईल. कोणीं कर्जफेड करण्यास अगदीं असमर्थ असेल त्याला कर्जफेड करीपर्यंत कैद केली जाईल.

३—[तुमचें कलम४]—याबद्दल आम्ही अवश्य खटपट करूं.

४—[,, कलम५]—पूर्ववत् सर्व प्रकारें कोशीस केली जाईल.

५—[,, कलम६]—जो कोणीं या बंदरांत राहून तुमच्या मुलखाला अपाय करील त्याला कडक शिक्षा देऊन घालवून दिलें जाईल.

याप्रमाणें शेरे करून कलमें तुमच्याकडे पाठविलीं आहेत.

चर्चा होऊन वरीलप्रमाणें कलमें ठरलीं त्यांचा मराठींत तर्जुमा करून नेहमींप्रमाणें तीं मंजूर करण्यांत आलीं. आलेल्या हेजिबाबरोबर डे० गवर्नरनें पुष्कळ वेळ बोलून त्याची समजूत घातली; व हीं कलमें घेऊन आपला हेजीब त्याच्याबरोबर देऊन त्याला अण्णाजी पंडिताकडे पाठविलें. आणि त्याबरोबरच हेन्द्रीकेन्द्रीसमोरील युद्धांत पकडलेलीं गलबतें व कैदी यांचीहि मागणी केली. शक्य तितक्या लवकर उत्तरें आणण्याबद्दलहि सांगितलें. अशाकरितां कीं, अनुकूल उत्तरें येतांच गलबतें परत बोलावून चालू खर्च एकदम थांबवितां यावा.

ओ. कॉ. भा. ४०	(२२१६)	श. १६०१ माघ शु. ३
नं. ४६९१ इ.	सुरत–कंपनी.	इ. १६८० जाने. २४

गेल्या पावसांत राजापूरचे वखारवाले काढून घेण्याबद्दलचा प्रयत्न फसला. त्यानंतर हेन्द्रीके० प्रकरण उद्‌भवलें. आतां शिवाजीशीं तह झाल्याशिवाय त्यांना तेथून हालवितां येणार नाहीं.......त्याच कारणाकरितां मुंबईत असलेला दारूगोळा विकून सुरतेला पैसा पाठविण्याच्या व इतर कांहीं बाबतींत आपल्या आज्ञेप्रमाणें

नागतां येत नाहीं. कारण, शिवाजीच्या सैन्याच्या हल्ल्यापासून मुंबई बेटाचें रक्षण प्रथम केलें पाहिजे......शिवाजीनें बऱ्हाणपूरच्या बाजूला धांदल उडवून दिल्यामुळें मालाची विक्री त्वरेनें न होऊन गलबतेंहि भरतां आलीं नाहींत......हेन्द्रीकेन्द्रीच्या बाबतींत आपलें असमर्थत्व जाणून आम्हीं शिवाजीशीं तह करण्याचें ठरविलें आहे. परंतु, शिवाजीसारखा त्रासदायक शेजारी दूर करणें आवश्यक वाटण्याइतकें मुंबई बेटाचें जर आपल्याला महत्त्व असेल तर बेटावरील व्यापार किंबहुना त्यावरील आपली मालकी धोक्यांत येऊं नये म्हणून, तुम्हीं जहाजें, सैन्य व वाकबगार सेनापती पाठवून द्यावा. नाहींतर आजपर्यंत सर्व केलेलें फुकट जाऊन हातास कांहींच लागणार नाहीं.

[दि]—१४—सुरतेच्या शिपायांची संख्या बरीच कमी केली. कित्येक वेळां १० पेक्षां जास्त ठेविले नाहींत. हेन्द्रीकेन्द्री प्रकरणामुळें शेवटीं त्यांनाहि पाठवावें लागलें. तुमच्या म्हणण्याप्रमाणें फक्त संकटाच्या वेळीं किंवा शिवाजीचें सैन्य अवळ येतांच लोक ठेवावे हें शक्य नाहीं. शिवाजीपासून इतक्या वारंवार भय उत्पन्न होतें कीं, बहुतेक सततच आत्मरक्षणाची तयारी ठेवावी लागते. कारण, ज्या ठिकाणावर तो हल्ला करितो त्या ठिकाणाला आगमनाची बातमी मिळणें आणि त्याची प्रत्यक्ष झडप येणें यांत तो अंतरच ठेवीत नाहीं. मुंबईहून शिपाई आणवावयास निदान २० दिवस लागतात. परंतु त्याच्या अर्ध्या वेळांतच शिवाजीचें काम पार उलगडून फन्ना होतो.

२९-ठाणा-कारंजा मार्गावरून मोकळीक मिळावी म्हणून पोर्तु०शीं बोलणें करण्यापेक्षां दुसरे परिणामकारक मार्ग स्वीकारले पाहिजेत. कारण हे लोक उद्दाम व घमेंडखोर असून त्यांच्यावर केवळ बोलण्याचा कांहींच परिणाम होणार नाहीं.

फॅ. रे. मुंबई भा. २ }　　(२२१७)　　{ श. १६०१ माघ शु. ६
पृ. ९-१० इ. }　　मुंबई कन्सल्टेशन.　　{ इ. १६८० जाने. २७

अण्णाजी व सुभेदार यांचीं उत्तरें घेऊन राम सेणवी आला. झालेल्या बोलण्यावरून व पत्रव्यवहारावरून त्यांचें समाधान झालें. आणि शक्य तितक्या लवकर कैदी सोडण्याचें त्यांनीं वचन दिलें. तसेंच गुराबा वगैरेबद्दल आमच्या मागणीच्या मोबदल्यांत चौलला १०८ खंडी सुपारी देण्याचा त्यांनीं हुकूम दिला. मात्र हेन्द्रीकेन्द्रीहून आम्हीं आमचीं गलबतें काढून न्यावीं अशी अट त्यांनीं घातली आहे. सुरतेचे हुकूम, युद्धाची परिस्थिति आणि वाढता खर्च सोसूनहि आपल्या समोर आहेत त्यांपेक्षां अधिक चांगलीं कलमें शिवाजीकडून मिळवितां येत नाहींत ही गोष्ट लक्षांत घेऊन, कॅ० ॲडर्टन आदिकरून लोकांना गलबतें घेऊन किल्ल्याकडे थेट येण्याचा उद्यां हुकूम द्यावा असें ठरलें.

(से) फॅ. रे. सुरत भा. १०८ पृ. ५१ इ. (२२१८) राजापूर-सुरत. श. १६०१ माघ शु. ८ इ. १६८० जाने. २८

गेल्या १५ तारखेला एत्रराजीनें [इंग्रेज?] खारेपाटणला कांहीं काम आहे अशा सबबीवर रजा मागितली. तेथें २ दिवस राहून तिसऱ्या दिवशीं तो घोड्यावरून वेंगुर्ल्यास गेला. तेथून पुढें तो गोव्याला गेला. आणि तिकडून मुंबईला जाण्याकरितां त्यानें एक लहान गलबत भाड्यानें ठरविलें. त्याचे काय हेतू असतील ते असोत ! तो गेल्यावर येथील सुभेदारानें आमच्या वखारीची किल्ली आणि बक्षिसाची पोंचलेली सुपारी अशीं मागितलीं. 'सुपारी भरण्याकरितां आम्हांला पुष्कळच खर्च आला आहे. आणि या उप्पर ती घेऊन जावयाची असेल तर वखारींत आहे तिचें वाटेल तें करा' असें आम्हीं कळविलें. त्यावर त्यानें फक्त माप घेण्याची त्यानें इच्छा दर्शविली; व आम्हीं माप घेऊं दिलें. माप घेणें झाल्यावर दाराला त्यांनीं राजाचें सील केलें. हें सर्व एत्राजी गेला त्याचें फळ आहे. आणखी आमच्यावर काय कोसळणार आहे हें देव जाणे. एका अर्थी तो गेला हें चांगलेंच झालें. नाहींतर बनियांनीं रस्त्यांत त्याला **दगडांनीं ठार** मारला असता. सर्व व्यापारी त्याच्या नांवानें खडे फोडीत आहेत. तो आमचे प्राण घेण्याच्या विचारांत होता यावरून त्याची लुच्चेगिरी तुमच्या ध्यानांत येईल. आम्हीं तेथून यापूर्वीच निघून आलों असतों. परंतु आदल्याच दिवशीं त्याविषयीं त्यानें हवालदाराला खबर दिल्यामुळें हवालदारानें नदीवर आमची पाळत राखण्याकरितां शिपाई पाठविले. एका फ्रेंच नोकरानें हें आम्हांला सांगितल्यामुळें आम्हीं वांचलों. ठरल्याप्रमाणें गेलों असतों तर आम्हीं आज जिवंत राहिलों असतों कीं नाहीं याची शंका आहे. यावरून त्याचा प्रामाणिकपणा किती आहे हें पहावें.

फॅ. रे. सुरत भा. १०८ पृ. ? इ. (२२१९) मुंबई-सुरत श. १६०१ माघ शु. ११ इ. १६८० जाने. ३१

कित्येक दिवस शिवाजीच्या तहाच्या खटपटींत होतों. आतां त्यामध्यें यश आलें आहे. तेव्हां सर्व हकीकत लिहीत आहोंत. उंदेरीवर ३००० सैन्य व १० मोठ्या तोफा यांसह सिद्दीनें ठाणें दिल्यामुळें शिवाजीचे लोक अस्वस्थ झाले. दोनदां दौलतखानानें रात्रीं त्यांच्यावर हल्ला केला. परंतु सिद्दीची सावधगिरी व त्याला मिळालेली चौलची दरोबस्त बातमी यांमुळें त्याचा बेत फसला. २६ तारखेला पहाटेस त्यांच्यामध्यें मोठी लढाई होऊन दौलतखानानें ३ ह. लोक घेऊन ३ ठिकाणाहून हल्ला चढविला. परंतु त्यामध्यें चौलच्या बातमीवरून दौलतखानाचे २०० मृत्यु, १०० जखमी व अनेक गलबतांचा नाश असें बरेंच नुकसान झाल्याचें कळलें. त्यांच्यामध्यें वारंवार तोफांचा मारा होतो. शिवाजीनें थळवरून उंदेरीवर तोफा लाविल्या. परंतु त्यांचा मारा लागू झाला नाहीं. उलट सिद्दीच्या तोफांमुळें मात्र किनाऱ्यावर फारच नुकसान होतें. कांहींहि झालें तरी शिवाजी किंवा सिद्दी यांपैकीं

कोणाच्याहि तहावर विश्वसून रहातां येत नसल्यामुळें मुंबईला वाईट दिवस आहेत एवढें खास. शिवाजीचें सामर्थ्य तुम्हीं जाणतांच. सिद्दीजवळ २ मोठीं जहाजें, ५३ तिरकटी तारवें, १गलबत व २६ गलिवेटें आहेत. त्याच्याजवळ ७०० शिपाई असून बेटावरील बहुसंख्याक मुसलमान हे त्याच्याशीं भांडण निघाल्यास आपल्याला निरुपयोगींच आहेत. तरी काय करावें तें सुचवावें. दोघेहि आपापल्यापरी आमच्यावर नाखूषच आहेत. शिवाजीचे इतके लोक मरण्यास व ह्यु० के०चा त्याचा बेत सिद्धीस न जाण्यास आम्हींच कारणीभूत झालों. आम्हीं आपलीं गलबतें काढून घेतलीं व सिद्दीच्या मनाप्रमाणें त्याला शिवाजीच्या मुलखावर अत्याचार करूं दिले नाहींत म्हणून सिद्दीहि रंजीसच आहे. दारुगोळा, तोफा, गोलंदाज, ५०।६० बरकंदाज व २० इ० रु० अशा जबरदस्त मागण्या आमच्याकडे सिद्दीच्या आल्या आहेत! २६ ता.पर्यंत त्याला कसा तरी टोलवीत ठेवून शेवटीं त्याला४००० झेरा. दिले. त्यानें दिलेली ५००० रु. ची सुरतेवरील हुंडी सोबत पाठविली आहे. आतां शिवाजीच्या तहाची हकीकत थोडक्यांत देतों. बोलणें करण्यालाच पुष्कळ वेळ लागून शेवटीं २८ तारखेला गलबतें परत बोलावण्याचा हुकूम दिला. व काल सगळीं येऊन पोंचलीं. कोळी व कामकऱ्यांना सोमवारींच कामावरून दूर करून खर्च कमी करण्याचा आम्हीं विचार करीत होतों. परंतु तुमचें पत्र येईपर्यंत म्हणजे २६ तारखेपर्यंत थांबण्याचें आम्हीं ठरविलें आहे. तहाबद्दलचे कागदपत्र सर्व पाठविले आहेत. नाश झालेलें शिबाड व गुराब यांचे हिशेबहि पाठविले आहेत. ते त्यांच्याकडून पुरे मिळणार आहेत.

फॅ. रे. सुरत भा. १०८ पृ. ४९-५० इ.	(२२२०) मुंबई-सुरत	श. १६०१ माघ शु. १३ इ. १६८० फेब्रु. २

मागचें पत्र पाठविलें त्याच दिवशीं [३१ जाने.] शिवाजी व सिद्दी यांची मोठी लढाई झाली. युद्ध सुमारें ४ तास चाललें. तेवढ्यांत सिद्दीनें शिवाजीच्या ४ गुराबा, २ गलबेतें घेतलीं, ५०० लोक मारले व १६० कैदी केले. सिद्दीचे फक्त ८ मेले; व २० जखमी झाले. काल सिद्दीनें शिवाजीच्या पकडलेल्या ३ गुराबा बंदरांत ओढविल्या. त्यांबद्दल त्यांच्या नाखवाला बोलावून आम्हीं त्याला बोललों. प्रथम रागारागानें बोलून, तीं सिद्दीकडे परत पाठविण्यास तो तयार झाला. परंतु त्याप्रमाणें त्यानें कांहींच केलें नाहीं. या गोष्टीचा शिवाजीच्या तहावर काय परिणाम होईल हें समजत नाहीं. सिद्दीला सर्व सामुग्री आम्ही पुरवितों एवढेंच नव्हे तर त्याच्या सोईकरितां त्याचें सामानहि बंदरांत ठेवितों; याबद्दल शिवाजीला राग येणें साहजिक आहे. हें बंदर मित्रत्वानें सिद्दीशीं वागतें त्यामुळेंच हा सर्व बखेडा होत आहे. हें बंदर नसतें तर या भागांत सिद्दीची रहाण्याची ताकदच नव्हती. येथून त्याला सर्व सामान मिळतें. पोर्तु० त्याला मधून मधून थोड्या पाण्याशिवाय कांहींच देत नाहींत. परवां सिद्दीनें चौलजवळील शिवाजीचें एक गांव लुटलें. तेव्हां पोर्तु०नीं त्याचें एक गुराब व २ गलिवेटें पकडून ठेविलीं व त्यांतील लोकांना

कैद केले. परंतु पूर्वी नेलेले कांहीं कैदी त्यानें दंडाराजपुरीहून परत आणून देतांच त्यांनी हे कैदी वगैरे सोडून दिले. आम्हीं अशी कांहीं खबरदारी घेतलीच पाहिजे. सिद्दी थोडा चढेलपणानें वागतो. तरी आम्हीं काय करावें तें कळवावें. तो आमच्याकडे युद्ध-सामुग्रीची मागणी करितो. पावसाळ्यांतहि तो येथेंच रहाणार असें समजतें. तो आम्हांला त्रास देईल ह्या गोष्टीबरोबरच त्याच्या बंदोबस्ताकरितां आम्हांला अधिक लोक ठेवावे लागून आमचा खर्च वाढेल याची आम्हांला फिकीर पडली आहे. सिद्दीपासून बेटाचें रक्षण करण्याची व पुनः त्याच्या आरमाराचें शिवाजीच्या इच्छापासून रक्षण करण्याची अशी आम्हांला दुबार जबाबदारी घेतली पाहिजे. तेव्हां आम्हीं कसें वागावें ? तो आपल्या होड्या वगैरे घेऊन किनाऱ्यावर येतो आणि सामोपचारानें सांगितलेलें कांहींच ऐकत नाहीं. एका वेळीं ५।६ गलेबेटें, सशस्त्र लोक आणि २०० इसमांच्या तुकड्या असे ते आले म्हणजे किती त्रास होत असेल याची कल्पनाच करावी. परंतु कसें करावें ? तुमचा हात सांपडला आहे हें आम्ही जाणतों. म्हणूनच शांतपणानें सर्व सहन करीत आहोंत. तुम्हीं सुरतेला कांहीं खटपट करावी म्हणूनच इतकें कळविलें आहे.

डाग रजिस्टर १६८० पृ. ८०-८१ फेब्रु. १९ न्यू. — (२२२१) — श. १६०१ माघ व. ५ / इ. १६८० फेब्रु. ९

नागापट्टणचें पत्र; १२ जाने:—**एकोजी राजाशीं** उद्भवलेला मतभेद चालूच आहे. सलोखा करण्याची त्याची इच्छा दिसली तरी अद्यापि ऐकमत्य होत नाहीं हें खरें आहे. कारकल नदीच्या मुखाशीं कलकडिचरी नांवाच्या खेड्यांत किल्ला बांधण्याविषयीं फ्रेंचांचा व एकोजीचा करार झाल्याचें पक्केपणीं कांहीं कळलें नाहीं. परंतु ट्रांकेबारचा दोन्ही बाजूंनीं उभयतांनीं ताबा घेऊन डेनिश लोकांना तेथून हांकवून लावण्याचा त्यांच्यांत गुप्त तह झाल्याचें कानावर आलें आहे.

गेल्या वर्षी ट्रिंक्वेबारची लूट झाल्यामुळें लोक इतके नाखूष आहेत कीं एकोजी राजाशीं कंपनीचा कायमचा तह झाल्याशिवाय ते परत येऊं इच्छित नाहींत.

फॅ. रे. सुरत भा. १०८ पृ. ५४ इ. — (२२२२) मुंबई–सुरत. — श. १६०१ माघ व. ५ / इ. १६८० फेब्रु. ९

सिद्दी आम्हांला फार त्रास देतो. त्यानें आणलेल्या गुराबा येथेंच आहेत. त्यानें त्या बाहेर नेऊन राजाचीं पकडलेलीं गलबतें म्हणून न आणतां **स्वतःचीं म्हणून घेऊन यावीं** हें सांगणें त्याला कांहीं केल्या पटत नाहीं. तो शक्य तें आमचें नुकसान करीत आहे. आमच्या लोकांना अधिक पगाराची लालूच दाखवून तो त्यांना फोडण्याचा प्रयत्न करितो. त्याच्या लोकांकडून जकातदार व तंबाकूच्या कंत्राटदारालाहि त्रास होतो. त्याचे लोक हरकत केली असतांहि किनाऱ्यावर येतात. गेल्या आठ दिवसांत आमचें

बदलून किंवा कैदी यांची बातमी नाहीं. अण्णाजी पंडिताच्या हुकमानें ते किनाऱ्यापर्यंत आले होते. परंतु सिद्दीच्या युद्धामुळें येऊं शकले नाहींत अशी बातमी आहे.

फॅ. रे. मुंबई भा. १९ पृ. १९ इ. (२२२३) सुरत-मुंबई. श. १६०१ फाल्गुन शु. १ इ. १६८० फेब्रु. २०

तहाविषयीं समाधान. रिव्हेंज किंवा हंटर पाठवून **राजापूरच्या वखारवाल्यांना आणविण्याची** व्यवस्था करावी. त्यांनीं कर्ज वगैरे केलें असल्यास अडचण पडूं नये म्हणून ३००० रु. पाठवून द्यावे.

फॅ. रे. सुरत भा. १०८ पृ. ५३ इ. (२२२४) चोपडा-सुरत. श. १६०१ फाल्गुन शु. ५ इ. १६८० फेब्रु. २४

इकडील बातमी परस्पर विरोधी आणि शहांजाद्यासंबंधीं अनेक चमत्कारिक गोष्टींनीं भरलेली असल्यामुळें लिहिण्यासारखी नाहीं. शिवाजीचें सैन्य, त्याला चौथाई देतील अशा गांवांना मात्र त्रास देत नाहीं. बाकी ह्या भागांत सररहा त्यानें जाळपोळ केली. **मोरोपंडिताच्या** हाताखालचें सैन्य अद्यापि ह्याच सरहद्दीवर हाताला लागतील ते किल्ले घेण्यांत गुंतलें आहे. **मुल्हेर** घेण्याची त्यांना मोठी खाज (itching) असून त्याच्यावर ते दोनतीनदां प्रयत्न करून गेले. परंतु तो फार मजबूत आहे. आणि फितुरीशिवाय त्याच्या स्वाधीन होणार नाहीं. त्यांनीं **हनमंतगड** (Hurmunt Ghurr) आधींच घेतला आहे. त्यांचे पुढील बेत कांहींच समजत नाहींत. शहाजाद्याला ते मिळाल्याच्या बातम्या खोट्या आहेत. लवकरच ते कोणीकडे जातात हें समजेल. कांहींच्या मतें सुरतेकडे व कांहींच्या मताप्रमाणें बऱ्हाणपुराकडे ते जातील. शिवाजीच्या सैन्यानें कंपनीचें जें नुकसान केलें त्याचे हिशेब पाठविले आहेत.

फॅ. रे. मुंबई भा. २ पृ. १३-१४ इ. (२२२५) मुंबई कन्सलटेशन. श. १६०१ फाल्गुन शु. ६ इ. १६८० फेब्रु. २५

गुराबा व शिबाड यांच्या मोबदल्यांत मिळावयाची १०० खंडी सुपारी आणविण्याकरितां चौलला शिबाड पाठवून तें आल्यावर विक्रीची तजवीज करावी.

राजापूरचे वखारवाले आणविण्याकरितां हंटर गलबत पाठवावें.

राजापूरकडे जावयाचीं कित्येक गलबतें मधील युद्धामुळें अडकून पडलीं होतीं तीं हंटरनें सुरक्षितपणें नेऊन राजापूरला पोंचवावीं.

फॅ. रे. सुरत भा. १०९ पृ. ६९ इ. (२२२६) मुंबई-जॉन गेप. श. १६०१ फाल्गुन शु. ८ इ. १६८० फेब्रु. २७

राजापूरच्या वखारवाल्यांना प्रेसि०नें पूर्वी बोलाविलें असतां त्यांनीं तो हुकूम न

मानल्यामुळें पुनः त्यांना तशी संधी मिळूं नये म्हणून इकडून दोन इसम राजापुरास पाठविण्याचा त्यांचा हुकूम झाला. त्याप्रमाणें तुम्ही व चार्लस ॲली यांची आम्हीं निवड केली आहे. आमच्या व शिवाजीच्या तहाची तेथील लोकांना अद्याप बातमी कळली नसली तर त्यांना दाखविण्याकरितां **राजाच्या सहीचा तांबडा कागद** व अण्णाजीपंडिताचें डे०ग०ला पत्र आलें त्याचा पांढरा कागद, असे तुमच्याबरोबर दिले आहेत; ते जपून ठेवावे व आमच्याकडे परत पाठवावे. तेथें गेल्यावर नारळ व सुपारीकरितां तगादा लावून तीं मिळतांच हंटरमध्यें भरा व अथणीची भरपाई व कराराप्रमाणें मिळावयाचें बक्षीस याचा एकसारखा सुभेदाराला तगादा लावा.

सा. ले. ३६७ सु. १०८० सफर(?)	(२२२७) ता।	श. १६०१ फाल्गुन शु. ९ इ. १६८० फेब्रु. २८

समस्त माहानाड पेठ अथणी खान साहेब ?

आमचा हेतू कीं, दिलीरखानाच्या तहवेलीकरतां मत्ता सर्व टाकून पागडी समेत जीव घेऊन बाहीर पडलो. अशांत शिवाजी सुभेदार यांनीं घर दुकान देऊन दिलासा केला साच साहेबास मुकासा अर्जानी जाला. साहेबाच्या फत्तेबाजीचेंहि वर्तमान ऐकून खुशीहाल जालो. तरी आतां आमची व्यवस्था लावणें.

(से.) फॅ. रे. सुरत भा. १०८ पृ. ७०-७१ इ.	(२२२८) सुरत-राजापूर.	श. १६०१ फा. व.-०२ चैत्र शु. इ. १६८० मार्च (?)

अथणीच्या भरपाईबद्दल मिळणारी सुपारी निराळी खूण करून बक्षिसाच्या सुपारीपासून वेगळी ठेवण्याची खबरदारी घ्या.

फॅ. रे. सुरत भा. १०८ पृ. ६६-६८ इ.	(२२२९) डोव्ह गुराब कशी घेतली ?	श. १६०१ फा.व.-०२ चै.शु इ. १६८० मार्च

हेन्द्रीकेन्द्रीच्या लढाईंत दौलतखानानें ती कशी घेतली तीबद्दल जबाबः—

फ्रान्सिस मौलिवरर, सार्जंट, गुराब डोव्हचा मुख्यः—१८ तारखेला ९ वाजतां दौलतखानाच्या गलबतांनीं आम्हीं सर्वांत मागें असतांना अर्धचंद्राकार रचना करून आमच्यावर जोर केला. गोंधळून सर्व कामकरी वर आले. व जवळ मदत नसल्यामुळें आम्हीं शत्रूंच्या हातीं सांपडलों.

ऐझाक क्लार्क व रिटर्न रोपर वगैरे खलाश्यांचे जबाब.

नंतर कॅ. विल्यम मिंचिनचा जबाब.

फॅ. रे. सुरत भा. १०८ } (२२३०) { श. १६०१ फाल्गून व. ३
पृ. ५५ इ. } मुंबई व्यापाऱ्यांचा अर्ज. { इ. १६८० मार्च ८ [!]

मुंबईचा डे० गवर्नर चाईल्ड यासः—

पूर्ववत् शिवाजीच्या मुलखांत येथील व्यापाऱ्यांनीं जाऊन सर्व प्रकारची खरेदी करावी, असा आपला जाहीरनामा लागल्यानंतर कर्ज काढून आम्हीं होडया पाठविल्या. तें कळतांच सिद्दीचा नाखुदा जकातघराशीं आला आणि सर्वांच्या देखत असें म्हणाला कीं 'माझ्या परवानगीशिवाय एकादी होडी किंवा गलबत त्या देशांत व्यापारासाठीं जातां कामा नये. कोणीं ही आज्ञा मोडण्याचें धाडस केलें तर त्याची होडी जप्त होऊन उन्दीकुन्द्रीला पाठविली जाईल.' घारपाच्या नदींत आम्हीं पाठविलेलें एक बलून, मुंबईचें आहे असें कळविलें असतांहि त्यांनीं पकडून लुटलें, एका मुसलमानाला जखमी केलें आणि दुसऱ्याला कैद केलें. यामुळें त्या भागांत व्यापार करणें आतां अशक्य होऊन बसलें आहे. तरी याबद्दल काय ती तजवीज करावी.

फॅ. रे. मुंबई भा. १९ } (२२३१) { श. १६०१ फाल्गून व. ४
पृ. २२ इ. } राजापूर–मुंबई. { इ. १६८० मार्च ९

आम्हीं मार्च १ ला पोंचलों. पत्र जातांच मिचेल येऊन भेटला आणि त्यानें शिवाजीच्या प्रधानांची स्थिति आणि त्यांच्या चांगल्या वर्तनाविषयीं सांगितलें.

दुसऱ्या दिवशीं राजापुरांत जाऊन आमच्या व शिवाजीच्या तहामुळें आम्हीं त्याचें अभिनंदन केलें. त्याला आनंद झाला. परंतु राजाकडून किंवा अण्णाजीपंडिताकडून त्याला त्यासंबंधांत कांहींच कळलें नव्हतें. पत्रें पाहून त्याला व सर्व व्यापाऱ्यांना समाधान झालें.

फॅ. रे. सुरत भा. १०८ } (२२३२) { श. १६०१ फाल्गून व. ४
पृ. ५८–५९ इ. } मुंबई–सुरत. { इ. १६८० मार्च ९

१०० खंडी सुपारी घेऊन शिबाड तुमच्याकडे आतां जाईल. त्याच्याबरोबर पत्र पाठवावयाचें. परंतु मध्यंतरींच जरूर पडली म्हणून हें त्वरित यान पाठविलें आहे.

काल सिद्दी १३ गलिवेतें घेऊन पेणच्या खाडींत गेला. तेथें आमच्या बेटावरील एक होडी त्याला दिसली. तिच्यावर तुटून पडून, लुटून एका माणसाला जखमी करून दुसऱ्या एकाला तो घेऊन गेला. सिद्दी आतां बेफाम झाला आहे हें त्याच्या पत्राच्या भाषांतरावरून दिसेलच. पेण खाडींत शिवाजीच्या मुलखाला त्यानें उपद्रव दिल्यामुळें शिवाजीनें आमच्या होडया पकडल्या आहेत. पेण मधल्या अत्याचाराची व्याप्ती शिवाजीच्या अधिकाऱ्यांकडून अद्याप कळली नाहीं. परंतु ते त्याबद्दल आम्हांला विचारल्याशिवाय रहाणार नाहींत. अशा प्रकारें सिद्दीचें दुर्वर्तन पुढें चालू राहिल्यास आम्हांला सामग्रीचा तुटवडा येऊन सिद्दीलाहि पुरवठा करतां येणार नाहीं. सुरतेच्या सुभेदाराकडे कांहीं सांगवा व आम्हांला काय तो हुकूम द्या.

फॅ. रे. सुरत भा. १०८ } (२२३३) { श. १६०१ फाल्गून व. ४
पृ. ५९-६० इ. } सिद्दी कासम-डे० गवर्नर. { इ. १६८० मार्च ९ चे पूर्वी

आपलें पत्र योग्य वेळीं पोंचून समाधान झालें. बरेच दिवसांत माझ्याकडून पत्र आलें नाहीं हें स्नेहाला धरून नाहीं असें तुम्ही लिहिलें. परंतु मजकडून आपल्याकडे अनेक पत्रें गेलीं असतांना आपल्याकडूनच उत्तरें आलीं नाहींत् ! आमचीं गलबतें किनाऱ्यावर जाऊन हल्ले करितात आणि त्यामुळें अन्नसामुग्रीची आयात बंद होते असें तुम्हीं लिहितां. माझ्यामुळें आपल्या प्रजेला फार त्रास होतो हें बरें नव्हे इत्यादि लांबलचक तुम्हीं लिहिलें. याला माझें उत्तर असें आहे कीं, आमचें आरमार आमच्या शत्रूचा मुलूख उध्वस्त करण्याकरितां आलें असून आम्हांला तसाच हुकूम आहे. खांदेरीकडे मला पाठविलें तें केवळ तुमच्याकरितांच होतें. ज्या वेळीं शत्रूनें तें बेट घेऊन तेथें वसाहत केली तेव्हां प्रेसिडेंट, भिमजी पारख, सुरतेचा सुभेदार व मी स्वतः यांच्यामध्यें बरीच चर्चा होऊन, जर का शत्रूची सत्ता त्या बेटावर प्रस्थापित झाली तर भविष्यत्कालीं त्याचे दुष्परिणाम अनेक भोगावे लागतील, असें दिसून आलें. याकरितां आमच्या आरमारानें येऊन तुम्हांला मदत करावी असें ठरलें; आणि त्या कामाकरितां आमचें आरमार आलें. आमचें आरमार आल्यावरहि तुमच्या आमच्यामध्यें चर्चा होऊन तुमचें आमचें काय ठरलें हें तुमच्या लक्षांत असेलच. म्हणून मी तें लिहीत नाहीं. परंतु तें सगळें सोडून देऊन तुम्हीं शत्रूशीं तह केला ! असो; तुम्हीं केलें तें चांगलें केलें.' आणि तुम्हीं हे शब्द आम्हांला लिहितां त्याचीहि आम्हांला फिकीर नाहीं. धळ आणि इतर कसब्यांवर (मारा करण्यासाठीं) आमचें गलबत राहिलें आहे असें तुम्हीं म्हणतां तें खरें नाहीं. आम्हांला ज्या ज्या ठिकाणीं बिनधोकपणें जातां येईल तेथें तेथें जाऊन आम्हीं मुलखाची नासाडी करूं. कारण आमचा हेतूच तसा आहे. करितां जर तुम्हांला यामुळें त्रास होतो असें वाटत असेल तर तुम्हीं त्याविषयीं सुरतेच्या सुभेदाराला लिहून येथून आरमार घेऊन मीं जावें, असा त्याच्याकडून मला हुकूम आणून लावा. तसा हुकूम मिळतांच मी एकदम नांगर उचलून चालावयास लागेन. नाहींतर मींहि हुकमाचा ताबेदार असल्यामुळें हुकमाशिवाय मला या ठिकाणाहून हालतां येणार नाहीं. म्हणून आमचें आरमार येथें असेतोंपर्यंत, आमच्या शत्रूंचे रहिवासी किंवा अन्य कांहीं तेथें असावें हें आम्हांस सहन होणार नाहीं. म्हणून तुम्हीं तसा लेखी हुकूम पाठविल्यावर मला येथें रहाण्याचें कारणच नाहीं. तथापि आमच्या शत्रूंशीं तुमचा स्नेह असल्यामुळें त्यांच्या मुलखावर तुम्ही पहारा करणारच. तर केन्री बेट आमच्या शत्रूंना सोडून जाण्यास सांगा म्हणजे मग इकडे आम्हांला आरमार ठेवावयास कारणच रहाणार नाहीं. कारण आम्ही फक्त त्या केन्रीकरितां आमचीं गलबतें येथें ठेवितों. तरी तुम्हीं त्यांना तें सोडून जाण्यास सांगाल तर बहुत बरें होऊन तुम्हांला अधिक तोशीस लागणार नाहीं; आणि किनाऱ्यावरील प्रदेश जसाचा तसा राहील.

सिद्दीसंबूळच्या कारकीर्दीत सरळ भट्टीपासून पेण, नागोठणें, व इवट(?) पर्यंत कांहीं घालमेल करूं नये असा करार ठरला होता. व मींहि तो अजूनपर्यंत मोडला नाहीं! परंतु तुम्हीं हें लक्षांत घ्यावें कीं त्या वेळीं शत्रूनें खांदेरी बेट घेतलें नव्हतें किंवा तेथें वसाहतहि केली नव्हती. यामुळें त्याला वेढा घालण्याकरितां या बाजूला आरमारहि आजपर्यंत आलें नव्हतें. तर तो करार आतां अमलांत यावा अशी तुम्ही कशी अपेक्षा करतां हें मला समजत नाहीं. जर शत्रू केन्द्री सोडील तर पहिल्या करारामप्रमाणें किनारा जशाचा तसा राखण्याचें आम्हीं पाळूं. पण शत्रू केन्द्री मात्र सोडीत नाहीं आणि आम्हीं पहिला करार पाळावा अशी तुमची इच्छा आहे. हा न्याय कोठला ?

तुम्हीं एका गोलंदाजाबद्दल आम्हांला विचारलें आहे. त्यानें काय करावें असें तुम्हांला वाटतें तें प्रथम कळवा. परंतु जर तुम्हांला त्याची जरूरी असेल आणि पुरेसा त्याच्या लायकीइतका पगार देऊन त्याचें समाधान करितां येत असेल तर त्याला बोलावणें पाठवा. मीं शत्रूकडून अनेक गोलंदाज मिळविले आहेत आणि शिवाय मजपाशीं पुष्कळच आहेतहि. तेव्हां असल्या तुमच्या कारवाईनें माझा सूड घेतां येणार नाहीं. शिवाय माझाच एक तोफवाला तुमच्या नोकरींत आहे. त्याची मजकडे येण्याची इच्छा असल्यास त्याला रजा देऊन मजकडे पाठवावें.

फॅ. रे. सुरत भा. १०८ पृ. ६३ इ.	(२२३४) मुंबई-सुरत.	श. १६०१ फाल्गुन व. १३ इ. १६८० मार्च १८

शिवाजी-तहाचीं कलमें तुम्हांला आवडलीं हें वाचून आनंद झाला. १०० खंडी सुपारी तुमच्याकडे पाठविली आहे......सिद्दीला वास्तविक आमच्या वर्तनाबद्दल तक्रार करण्यास जागा नाहीं. आमचीं गलबतें आम्हीं काढून घेऊन शिवाजीशीं तह केला यामुळें मात्र तो फार नाखूष झाला आहे.

फॅ. रे. सुरत भा. १०८ पृ. ८० इ.	(२२३५) कारवार-सुरत.	श. १६०१ फाल्गुन व. १३ इ. १६८० मार्च १८

इकडील खबर अशी आहे कीं, विजापुरी सैन्याचा **सर्जाखानाला** मुख्य सेनापती केलें असून, मोंगलांचे १५००० घोडेस्वार मदतीला घेऊन, **शिवाजीपासून अनेक स्थळें परत घेण्याकरितां** तो येत आहे. **मेस्करकोटा**मध्यें त्याचे १२००० स्वार आहेत. ते या बंदरांकडे [जिंकण्यासाठीं] येतील अशी आम्हांला आशा आहे. **कोपळला** व इतर किल्ल्यांना पक्का वेढा घातला आहे.

इ. सं.	(२२३६) नक्कल	श. १६०१ (?) इ. १६८० जाने.

श्रियासह चिरंजीव अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य राजश्री माहाराज **व्यंकोजी**

राजे यासी प्रती **सिवाजी राजे** आशीर्वाद येथील कुशल जाणून स्वकुशल लेखन करणे उपरी तुम्ही पत्र पाठविले ते पावले. तुमचे कुशल कळोन संतोष वाटला. असेच क्षणक्षण आपले कुशल लेखन करून पाठवीत जाणे. विशेष ए प्रांतीचे वर्तमान; दिलेलखान विजापूरची पातशाही कमकुवत देखोन जोरावरी धरून विजापूर घ्यावे या मतलबें विजापुरावरा चाल केली. भीमा नदी उतरून शहरानजीक एऊन भिडला. हे वर्तमान खान अलीशान मसऊदखान यानी आम्हास लिहिले की, गनीमे जोरावरी बहुत धरली आहे. एऊन मदत केली पाहिजे. त्यावरून आम्ही तेच क्षणी स्वार होऊन मजली दर मजली पनाळियास आलो. सारी कूळ जमेती जमा करून खासा लष्करानिशी विजापुरा सन्निध गेलो. विचारे पाहतां गनीम कट्टा; त्याहीमध्ये पठाण जाती, हट्टी, याशीं हुन्नरेच करून खजील होऊन नामोहरम होय तो हुन्नर करावा. म्हणून ऐशी तजवीज केली की, त्याचे मुलकात फौजाचा पैसावा करून ओढा लावावा. त्यावरून दिलेलखानास ती गावाचे अंतरें सोडून भीमा नदी उतरून तहद जालनापूर पावेतो मुलूख ताख्तताराज करीत चाललो. जालनापुरास जाऊन चार दिवस मुकाम करून पेठ मारिली. बहूत मालमत्ता (हातीं) लागली. जालनापुरास म्हणजे औरंगाबादेहून चार गांवें ते जागा शहाजादा असता त्याचा हिसाब न धरिता पेठ लुटली. सोनें रुपे हत्ती घोडे याखेरीज मत्ता बहुत सांपडली. तो घेऊन पठा-गड तरफांस स्वार होऊन कूच करून एता, मध्ये रणमस्तखान व आसफखान व जाबीतखान असेच आणीक पांचसात उमराऊ आठ दहा हजार स्वारानशी आले. त्यास शाहाबाजीच्या हुन्नरे जैशी तंबी करूंन ये तैशी तंबी करून घोडे व हत्ती पाडाव करून पटियास आलो. मागती लष्कर मुलकांत धुंदी करावयास पाठविलें; व राजश्री मोरोपंत प्रधान यास बागलाण व खानदेश प्रांती सत्तावीस किल्ले मोगलांचे आहेत ते व मुलूख कबज करावयास पाठविले. आणि आम्हीं पटियास मुक्काम केला. तो खान अलीशानाची किताबती आली की, तुम्ही कितेक गनिमाचे मुलकांत स्वारी करून खराब केला ओढा लाविला. परंतु या जागाहून गनीम उखळत नाहीं. बहुतच बळ धरून कोटानजीक भिडला आहे. ए समयीं एऊन मदत करून पातशाही राखिली पाहिजे. त्यावरून मागती स्वार होऊन मजली दर मजली पनाळियास आलो कितेक द्रव्याने व सेनेने पहिले साहाय केले व मागतीहि द्रव्य मबलग पाविले व सेना गनीमाचे मुलकांत पैसली होती ते बोलावून आणून दिलेलखानावरी पाठविली. त्यानी जाऊन कहीकाबाड मारून कूल सामान वाब धरून आरोखून धरिला. त्याचे मदतीस औरंगाबादेहून रणमस्तखान व बाजे उमराऊ अलीखान घेऊन सात आठ हजार स्वारानिसी येत होते त्यासहि मारीत गर्देस मेळवीत पिटीत औरंगाबाद पावेतो नेले. कितेक शहरें लुटीत देश खराब करीत परतोन येऊन गनिमास घेरोन बैसले. हे वर्तमान व राजश्री मोरोपंत त्या प्रांती पाठविले होते त्याणी अहिवंत किल्ला घेतला. अहिवंत म्हणजे जैसा काही पनाळा; त्याचेबरोबरी समतुल्य आहे. दुसरा नाहवा गड, बागलाणच्या दरम्यान मुलकात आहे; तो कठीण तोहि घेतला. हे दोनी किले नामोशाचे पुरातन जागे,

कबज केले. त्या किल्यावरहि बहुत मालमता सापडला व त्याजबरोबर जमेत होती ते मुलकात पाठऊन धामधूम केली. कितेक मुलूक कबज केला. हे वर्तमान व पहिले आम्ही स्वारी केली. जालनापूर मारिले रणमस्तखान नामोहरम केला हे वर्तमान वरचेवर पादशहास बाकीबाहाल जाला. पातशाहि बहुत खजिल होऊन आहादीवर आहादी दिलेलखानास आले. ये जातीने मुलूख खराब करून गड कोट व देश कबज करून वोढा लाविला; आणि लवाजमा धरून वरघ्यावरी कहीकबाड मारून गनीम जेर केला. दिलेलखानासहि ऐसे कळोन आले की, येथें राहिल्याने आपली शाही कुल बुडवितील हे पुर्ते जाणून विजापूर सोडून दिवसास कोस दोन कोस मजली करून चालिला. ऐसा गनीम जेरजेर करून खट्टा करून उखळिला व खान अलीशानेहि बहुतच शर्त केली. जैसा कोटा राखावयासी शर्थ करून ये तैसी करून कोट राखिला. आम्ही या प्रकारे विजापुरीचे साह्राय द्रव्याने व सेनेने करून ज्या उपाये गनीम उखळू ये त्या उपाये उखळून विजापुरीचे आरिष्ट दूर करून विजापूर रक्षिले. ते प्रसंगी खान अलीशानाचा सलुखा जाला. त्या करारबाबेमधे होसकट व बगळूर व अरणी व चंदाऊर आदकिरून तुमीचे निसबती आम्ही आपणासीच लाऊन घेतली पेशकसी तोफा तुम्ही निराळा घ्यावा (?) सतत निसबती तुम्हासी लागावी ऐसे केले नाही आवघे आम्हीच मान्य केले. तोफा आम्हीच तुम्हादेखील घ्यावा ऐसा तह ते प्रसंगी करून कराराबाब करून सला केला. या उपरी दिलेलखान आदवानी कारबळ (कोपळ ?) प्रांताकडे गेला होता. आमचीहि सेना पाठीवरी गेली व आम्ही विजापुरास जातो. कारवळ प्रांताकडे राजश्री जनार्दनपंत ठेविले. त्याणी तिकडे कितेक पुंड पाळेगारानी फिसाहती केली होती त्यास मारून काढिले व हुसेनखानाचा भाऊ कासीमखान दोन तीन हजार स्वारानिसी आला होता त्यास व त्याचे काबिला व हुसेनखानाचे दोघे लेक असे दस्त केले व हती पाच व घोडे पाचसे पाडाव केले याखेरिज पुंड पाळेगारांचा मुलूक व गड व कोट कबज करून ठाणी बैसविली फते केली. याउपर दिलेलखान सर्जाखान व हुसेनखान येतो हे कळोन हेहि पाच साहा हजार स्वारानिसी गनिमावर गेले. मधे गनीम घालून जिकडे गनीम जाय तिकडे जाऊन जागा जागा गनिमास गोषमाली देऊन तिकडूनहि मारून काढिला. सांप्रत भीमानदी उतरून पेडगावास आपले मुलकात गेला. गनिमास ऐसे केले जे मागती विजापूरची वाट न धरावी ऐसा खट्टा केला; व चिरजीव राजश्री संभाजीराजे मोगलाईत गेले होते त्यास आणावयाचा उपाय बहूत प्रकारे केला; त्यासहि कळो आले की ये पातशाहीत अगर विजापूरचे अगर भागानगरचे पातशाहीत आपले मनोगतानरूप चालणार नाही. ऐसे जाणोन त्याणी आमचे लिहिण्यावरून स्वार होउन आले. त्याची आमची भेट जाली. घरोब्याचे रीतीनें जैसे समाधान करून ये तैसे केले. हे सविस्तर वर्तमान तुम्हास कळावे म्हणोन लिहिले असे. कळले असावे. 'मोर्तबसुद'

भाटे सज्जनगड पृ. ९९ } (२२३७) { श. १६०१
श. ? } { इ. १६७९-८०

शिवाजी-रामदास

चरणरज शिवाजीराजे यानी चरणावरी मस्तक ठेवून विज्ञापना जे, मजवर कृपा करुनु सनाथ केलें. आज्ञा केली कीं, तुमचा मुख्य धर्म राज्यसाधन करुनु, धर्मस्थापना; देव ब्राह्मणांची सेवा, प्रजेची पीडा दूर करून पाळण रक्षण करावें. हें व्रत संपादून त्यांत परमार्थ करावा. तुम्हीं जें मनीं धराल तें श्री सिद्धीस पाववील त्याजवरून जो जो उद्योग केला व दुष्ट तुरुक लोकांचा नाश करावा; विपुल द्रव्य करुनु राज्यपरंपरा अक्षई चालेल ऐशीं स्थळें दुर्घट करावी; ऐसें जें जें मनीं धरलें तें तें स्वामीनीं आशीर्वादप्रतापें मनोरथ पूर्ण केलें. या उपरी राज्य संपादिलें. तें चरणीं अर्पण करुनु सर्वकाळ सेवा घडावी ऐसा विचार मनीं आणिला तेव्हां आज्ञा झाली कीं, तुम्हास पूर्वी धर्म सांगितलें तेच करावे. तीच सेवा होय. ऐसे आज्ञापिलें. यावरून निकट वास घडुनु वारंवार दर्शन घडावें श्रीची स्थापना कोठे तरी होउनू सांप्रदाय, शिष्य व भक्ति दिगंत विस्तीर्ण घडावी ऐशी प्रार्थना केली. तेही आसमंतात गिरीगव्हरीं वास करुनु चाफळी श्रीची स्थापना करुनु सांप्रदाय शिष्य दिगंतविस्तीर्णता घडली.

खं. २० ले. १७६ पृ. २४० } (२२३८) { श. १६०१
सु. १०८० } { इ. १६७९

कोन्हेर रंगनाथ सरसु० प्रा कऱ्हाड-पिलावा देसमुखीण प्रा वाई

शंकर जोसी व आडकर यामधें धोमचे वृत्तीसमंधे कज्जा आहे. तुम्ही सांगाल त्यास राजी म्हणोन तुम्हाकडे पाठविले आहे.

स. पृ. २८(२७) } (२२३९) { श. १६०१
सु. १०८० } फर्मान { इ. १६७९-८०

?—अमलदार व देसाई पर० माण

ब्रह्माजी बिन नागना मोक० मौ. उपरी कर्या. भाळवणी हे पादशाही मसलतींत शत्रूचे युद्ध प्रसंगांत मरण पावले. म्हणून ब्रह्माजीचा मुलगा खेत्रोजी यास मौ. उपरी येथें १ चावर जमीन दिली आहे. वंशपरंपरा चालविणें.

स. पृ. ३० (३०) } (२२४०) { श. १६०१
सु. १०८० हि. १०९१ } फर्मान { इ. १६७९-८०

औरंगजेब बादशहा

मखदुमखान मिरानखान हवाल० व कार० मामले मिरज:-खंडोजी घोरपडे यास चांद महमदकडील तांदुळवाडी वगैरे गांव इनाम दिले आहेत. तरी ते त्यांजकडे चालविणें.

सां. वि. ले. २० | (२२४१) | श. १६०१
सन हजार१०८० | धर्मपत्र-तीर्थपुरोहित मु. व सी. | इ. १६७९

मताजी बिन नागोजी घाटगे देसमुख का। कैलगुण-यादो बिन महादेवभट बेलूर.

सा. ले. १६६ | (२२४२) | श. १६०१
सु. १०८० | | इ. १६७९-८०

शंकराजी राम सुबेदार पर० पुणें—मोरो ताविरे मोक० मौ. मोरगौ.

तुम्ही व देवाजी गोसावी निलजेस सेत करीत होता. त्या बाबतीत राहिलेली बाकी देवाजीस न मागतां नेळूजच्या गावकामगारांकडे मागावी.

खं. २० ले. २८० | (२२४३) | श. १६०२ चैत्र शु.४
सु. १०८० रवल ३ | सी. | इ. १६८० मार्च २४

गणेशराम सुबेदार व कार० सुभा पर० कुडाळ.

जावजी कृष्ण प्रभू हवाल. व कार० पेठ पाटगाव.

पेठ मजकुरी सातपांच वर्षें गलबलियाकारितां नव्हते. हाली श्री बावा येऊन राहिले. यासाठीं पेठ मामूर जाली. बावास तंबाकूचे गादीचें दुकान इनाम दिलें आहे.

फॅ. रे. मुंबई भा.१९ | (२२४४) | श. १६०२ चैत्र शु. ४
पृ. २२-२३ इ. | सुरत-मुंबई | इ. १६८० मार्च २४

गेल्या महिन्याच्या ९ तारखेचें व चालू महिन्याच्या ९ तारखेचें अशीं तुमचीं दोन्ही पत्रें पोंचलीं. परंतु शिवाजीच्या सैन्याच्या भीतीमुळें खालीकडे मालमत्ता हालविण्याच्या गर्दीत उत्तरें लिहिण्यास सुचलें नाहीं. येथील सुभेदार **शिवाजीशीं** आम्हीं तह केल्यामुळें अगदीं नाखूष झाला आहे. त्याच्याकडे जाऊन सिद्दी व त्याचे लोक यांच्या वर्तनाबद्दल तक्रार करण्यासहि अर्थात् फावलें नाहीं. करितां **सिद्दीला अशी** उघड व सार्वजनिक **सूचना द्या कीं**, 'तो असाच त्रास देण्याचें सोडून देणार नाहीं तर अधिक पैसा किंवा नित्याची सामुग्रीहि न देण्याचा आपल्याला हुकूम आला आहे.' यापुढें त्याचें असेंच वर्तन चालू राहील तर शिवाजीपेक्षांहि त्याच्याशीं अधिक कट्टू वर्तन ठेवावें लागून त्याला त्याचा पश्चात्ताप करावा लागेल.

(खे) फॅ. रे. सुरत | (२२४५) | श. १६०२ चैत्र शु. ६
भा. १०८ पृ. ७४ इ. | मुंबई-सुरत | इ. १६८० मार्च २५

मुंबईच्या इंग्रजांचा एक मचवा आपलें राष्ट्रीय निशाण फडकवीत चौलला गेला. त्याच्यावर गोळ्या झाडून व त्याला पकडून सिद्दीनें तो उंदेरीला नेला. खुलासा विचारल्यावर कांहीं झालें तरी बंदरांतून बाहेर पडणाऱ्या प्रत्येक गलबताची आपण अशीच वाट

लावणार असें सिद्दी म्हणाला. आमच्याकडून शत्रूला दारूगोळा पुरविला जाऊं नये म्हणून ही खबरदारी तो घेणार आहे ! आमची नोकरी सोडून जाणारा एक डच इसम त्याच्याकडे पळाला आहे. एक इंग्रजहि पळाला तो त्यानेंच नोकरींत ठेविला असावा असें वाटतें.

डाग रजिस्टर १६८० } (२२४६) { श. १६०२ चैत्र शु. ११
पृ. १५२ इ. एप्रील ९ न्यू. } { इ. १६८० मार्च ३०

[नागापट्टणचें पत्र ता. ११ फेब्रु.]- **एकोजी राजाशीं** आमचे संबंध पूर्वीप्रमाणें आहेत. जमिनीवर सर्वत्र आम्हांला व्यापाराची मोकळीक आहे. मदुरा नायकाशीं वैर उपस्थित झाल्यामुळें ट्रांकेबारचा वेढा उठवून त्याला उत्तरेकडे जावें लागलें. राजा आणि मदुरा नायक यांच्यांतील भांडण अद्याप मिटलें नसून ह्या दोघांमध्यें **शिवाजी राजा** तोल सांवरून स्वतःचा सहजच फायदा करून घेत असतो. टुवरहीर [?] या भांडणांत लक्ष घालून एकोजी विरुद्ध मदुरा नायकाला मदत करण्याचा आव आणितो. यामुळें उभयतांहि तरवारी म्यान करून आहेत [परस्परांत शांततेनें रहातात.].

ओ. कॉ. भा. ४० } (२२४७) { श. १६०२ चैत्र व. ४
नं. ४६९९ इ. } सुरत-कंपनी { इ. १६८० एप्रील ८

डे. ग. चाइल्डच्या खटपटीनें शिवाजीशीं तह पुरा होऊन त्यांतील भरपाईचीं व कैदी परत देण्याचीं कलमें अमलांत आलीं. **खांदेरी-उंदेरी** हें आपल्या बंदराच्या तोंडाजवळील बेट **मात्र त्याच्याच स्वाधीन** ठेवावें लागलें. **राजापुराहून** वखारवाले आणविण्याची व्यवस्था झालीच आहे. **कारवारच्या** बाबतींत, मात्र शिवाजीशीं नुकत्याच झालेल्या तहानंतर, इतक्या लवकर ती वखार हालवून त्याला वैषम्य वाटण्यासारखें कृत्य करणें बरें नव्हे असें ठरवून, युरोपांतून गलबतें येत तोंपर्यंत वखार हालविणें रद्द केलें आहे.... शिवाजीच्या सैन्याचा धुमाकूळ, शहाजाद्याचें बंड वगैरे कारणांनीं देशाची राजकीय परिस्थिती, अत्यंत गोंधळाची झाली असल्यामुळें व्यापार, खरेदी किंवा विक्री यांपैकीं कोणतीच गोष्ट समाधानकारक होत नाहीं. पुढच्या हंगामीं येथून जावयाचीं गलबतें कशीं भरावयाचीं याच विवंचनेंत आम्ही आहों.... खांदेरीजवळील उंदेरी बेटावर सिद्दीनें दुसरा किल्ला बांधला. तेथून त्याला हुसकून लावण्याचा मराठ्यांचा प्रयत्न फसल्यामुळें चढून जाऊन सिद्दी त्या भागांत व बंदरांत आपलाच अमल चालवूं लागला आहे. येथील सुभेदाराकडे तक्रार करावी; तर तोहि शिवाजीशीं आम्हीं तह केल्यामुळें आमच्यावर गरम झाला आहे. तरी हें वाढणारें संकट दूर करण्याचा कांहीं उपाय करण्याकरितां त्वरेनें हुकूम द्या. नाहींतर आम्हांला आमचें बेट व सर्व उत्तरेकडील व्यापार गमावून बसावें लागेल.

[दि.]-पत्र लिहितांनाच सुरतेला जकात पूर्वीप्रमाणेंच शेंकडा ३½ टक्के झाल्याची

खबर आली आहे. आपण आम्हांला योग्य अधिकार दिला असता तर आम्हीं कांहीं तरी करून ही गोष्ट घडूं दिली नसती. आतां तिन्ही राष्ट्रांना ह्या पावसाळ्यांत खालीला जाऊन बसण्याशिवाय दुसरा उपाय दिसत नाहीं. त्यानें कदाचित् जागे होऊन येथील अधिकारी आम्हांला परत बोलावतील !

फॅ. रे. मुंबई भा. १९ } (२२४८) { श. १६०२ चैत्र व. ६
पृ. २६ इ. } राजापूर-मुंबई { इ. १६८० एप्रील १०

वखारींत असलेली सुपारी गलबतांतून पाठविण्यास सुभेदाराची परवानगी मिळाली आहे. परंतु अद्याप राजा किंवा अण्णाजी पंडित यांच्याकडून माल आमच्या हवालीं करण्याचे हुकूम आले नाहींत. तरी आपल्याकडून ते येण्याची आम्हांला वाट पहाणें भाग आहे. नाहींतर त्या मालाबद्दल सुभेदार आमच्याकडे खुलासा किंवा भरपाई मागेल.

फॅ. रे. सुरत भा. १०८ } (२२४९) { श. १६०२ वैशाख शु. १
पृ. ८६ इ. } राजापूर-सुरत { इ. १६८० एप्रील १९

शिवाजी मरण पावला. त्याच्या मरणामुळें या भागांत पुष्कळच घोटाळा माजेल असें दिसतें. कारण बहुतेक व्यापारी पळून जाण्याच्या तयारींत आहेत. कोणी एकादा लष्करी (फौजबंद इसम) नजीक आला तर ते तत्काल होड्यांवरून पसार होतील ! **संभाजी राजानें** पन्हाळ्याला आपलें ठाणें केलें असून, त्याच्याकडे असंख्य सैन्य जाऊन मिळत आहे. त्यानें राजापुरास माणसें पाठवून तेथें असलेलें सर्व धान्य अटकवून किल्यावर पाठविण्याबद्दल हुकूम दिले आहेत. इतक्यांतच संभाजी राजाच्या पक्षाकडून हें शहर ताब्यांत घेतलें जाईल असा रंग दिसत आहे. अशा परिस्थितींत आम्हीं काय करावें तें तुम्हींच ठरवावें.

फॅ. रे. सुरत भा. १८८ } (२२५०) { श. १६०२ वैशाख शु. ८
पृ. ९२ इ. } कारवार-सुरत { इ. १६८० एप्रील २६

शिवाजी मेला असून हा प्रांत संभाजीला दिला गेला आहे. संभाजीनें रावजी पंडिताला पाठवून इकडील सर्व सुभेदारांना आपले हिशेब देण्याकरितां बोलाविलें आहे. ह्या भागावर **माझोटो** [?] सुभेदार होऊन येईल असें वाटतें. लवकरच व्यापाराला उत्तेजन येईल अशी आशा आहे.

फॅ. रे. मुंबई भा. १९ } (२२५१) { श. १६०२ वैशाख शु. ९
पृ. २६ इ. } राजापूर-मुंबई { इ. १६८० एप्रील २७

शिवाजी राजाच्या मृत्यूबद्दल तुम्हांला कळलेंच असेल. **संभाजी राजानें** कारभार आपल्या हातीं घेऊन राजपदवीहि घेतली आहे. सुभेदार, हवालदार इत्यादि सर्व अधिकारी लोकांना त्यानें आपल्याकडे बोलाविलें आहे. कित्येकांना त्यानें कैद केलें व

कित्येकांना कामावरून दूर केलें. त्याचा नवा सुभेदार येथें आला. त्याला आम्हीं जाऊन भेटलों तेव्हां त्यानें मोठ्या प्रेमानें व स्नेहानें आमची भेट घेतली.

सेन गोवा पृ. २२ इ. मे ८ न्यू. (२२५२) श. १६०२ वैशाख शु. १० इ. १६८० एप्रील २८

पोर्तुगीज अधिकारी———संभाजी राजे यांचा सुभेदार रायाजी पंडित.

[मराठे व पोर्तुगीज यांच्यांत युद्धाची तयारी चालू होती. इतक्यांत शिवाजी महाराज वारल्याची बातमी आल्यामुळें,]

शिवाजी राजे यांच्या मृत्यूबद्दलचा दुखवटा व दोनहि राज्यांतील स्नेहसंबंध कायम राहण्याची इच्छा या पत्रांत आहे.

फॅ. रे. सुरत भा. १०८ पृ. ८४ इ. (२२५३) मुंबई–सुरत श. १६०२ वैशाख शु. १० इ. १६८० एप्रील २८

शिवाजी राजा मेला अशी खात्रीलायक माहिती आम्हांला मिळाली आहे. १२ दिवस आजारी पडून **रक्तातिसारानें** तो मेला असें म्हणतात. त्याला मरून आज **तेवीस दिवस झाले**. यापुढें राजकारणाचा बनाव होईल तो कळवूं. तूर्त सर्वत्र शांतता असून **संभाजी राजा** पन्हाळ्यावर आहे.

डाग रजिस्टर १६८० पृ. २३१–२ इ. मे १२ न्यू. (२२५४) श. १६०२ वैशाख शु. १४ इ. १६८० मे २

सुरतेची बातमी:—आग्रा आणि अहमदाबाद यांचेमध्यें राजपुतांनीं बंड उभारिल्यामुळें स्वतः बादशहा रणक्षेत्रावर आला. जसवंतसिंगाच्या मृत्यूनंतर त्याच्या मुलाला वारस करण्याऐवजीं त्याच्या पुतण्याला बादशहानें राज्य दिल्यामुळें रजपूत खवळून गेले. परंतु बादशहाशीं प्रत्यक्ष लढाई करण्यास असमर्थ असल्यामुळें तो परत गेल्यावर ते दऱ्याखोऱ्यांतून खालीं उतरले. यामुळें आग्रा–अहमदाबाद दरम्यानचे रस्ते धोक्याचे झाले. त्यांतच **शिवाजी राजाच्या** लुटालुटीची भर पडली. त्यानें बऱ्हाणपूरच्या मार्गावरील अनेक खेडीं लुटून आणि जाळपोळ करून मोठी धांदल उडवून दिली. त्यानंतर मोठी शिकार साधण्याकरितां तो सुरतेकडे येईल अशीहि कित्येकांना धास्ती वाटली.

प्रसिद्ध शिवाजीनें चौल आणि मुंबई यांच्या दरम्यान एका बेटाचा ताबा घेऊन तेथें एक मजबूत किल्ला बांधला व ८०० लोक ठेवून त्याच्यावर वसाहत केली. इंग्रजांना यांत आपलें नुकसान आहे असें वाटून त्यांनीं त्याला विरोध केला. परंतु त्यांत **त्यांना यश आलें नाहीं**. चकमकींत २ गलबतें, ६ श्वेतवर्णी व ७ हिंदी लोक गमवावे लागले; व त्यांना माघार घ्यावी लागली. या विरोधामुळें शिवाजीला इतका राग आला कीं, त्यानें राजापुरांतील सर्व इंग्रजांना कैद करून त्यांच्या मालाला **मुद्रा करविल्या**.

शिवाजीचा (नवा,खांदेरीचा) किल्ला अशा ठिकाणीं बांधला आहे कीं, मुंबईतून जाणारें-येणारें कोणतेंहि गलबत त्याच्या तोफांच्या पल्ल्यांतून सुटून जाणार नाहीं. मोंगलांनीं या किल्ल्यावर हल्ला करण्याकरितां आपला आरमारी सेनापती सिद्दी कासम याला पाठविला आहे.

डाग रजिस्टर १६८० } (२२५५) { श. १६०२ वैशाख शु. १४
पृ. २३४–५ इ. मे १२ न्यू. } { इ. १६८० मे २

सुरतेची बातमीः—नागापट्टणचा सुभेदार **एकोजी राजा** यानें टूमलेवास व कारिकल लुटलें. त्याबद्दल कंपनीला अजून भरपाई करून दिली नाहीं. परंतु तो मदुरेच्या नायकाशीं लढण्याची तयारी करीत आहे. द्रव्याची लूट व नाना तऱ्हेचे जबरदस्त कर घेण्याचे प्रकार चालूच आहेत. या सर्वांमुळें तंजावर प्रांत असा पिळून निघाला आहे कीं, असेंच पुढें चाललें तर तो कधींच भरभराटीस येणार नाहीं.

फॅ. रे. सुरत } (२२५६) { श. १६०२ वैशाख १५
भा. १०८ पृ. ८८ इ. } मुंबई-सुरत { इ. १६८० मे ३

सिद्दी युद्धांत पकडून आणलेल्या गलबतांचा आमच्या बंदरांत उघड लिलांव करितो. सशस्त्र लोक उतरवून आमच्या पहारेकऱ्यांना अडथळा करितो व सर्व प्रकारें त्रास देतो. शिवाजीच्या लोकांना यांमध्यें आमचा वांटा आहे असें वाटणें साहजिक आहे. शिवाजी व सिद्दी या उभयतांशींहि सलोखा राखणें कठीण आहे. येथील गरीब बिचारे रहिवासी या हालांना कंटाळले आहेत...सिद्दी येथेंच राहील तर काय होईल हें समजत नाहीं. **संभाजी राजा** त्याच्या गलबतांवर हल्ला केल्याशिवाय रहाणार नाहीं. आपल्या नांवाची ग्वाही फिरवून तो बापाच्या गादीवर बसला आहे असें कळतें. मोरोपंडीत, अण्णाजीपंडीत वगैरे त्याचे हुकूम घेण्याकरितां पन्हाळ्यास गेले आहेत. रामराजा रायरीला आहे. तो तेथेंच रहाणार असून तो किल्ला त्याच्याच ताब्यांत आहे. सर्व सुभेदार व हवालदार संभाजीनें तसेच ठेविले. कांहीं बदल केला नाहीं [!].

डाग रजिस्टर १६८० } (२२५७) { श. १६०२ वैशाख व. ३
पृ. २४४ इ. मे १६ न्यू. } { इ. १६८० मे ६

कॉरोमांडेलकडील हकीकत, ७ व २१ फेब्रु:—

मोंगल बादशहा आणि विजापूरकर यांच्यामध्यें तह होण्याचीं बरींच चिन्हें दिसूं लागलीं. म्हणून औरंगाबादचा व्हाइसरॉय सुलतान मुअज्झम याला त्याचा बाप औरंगजेब याच्याकडून असा हुकूम आला कीं, नबाब कलीलखान [Chalicluchan] यानें उभयतांमध्यें मध्यस्थी करावी अशी गोंवळकोंड्याच्या राजाला विनंती करावी. शिवाजीजवळ अन्नसामुग्री व युद्धसामुग्री दोन्हीहि संपुष्टांत आल्याची माहिती लागल्यामुळें सर्वांनीं मिळून **शिवाजीवर हल्ला करावा** अशा बेताला बरेच सरदार अनुकूल होते.

परंतु हें करण्यापेक्षां खेळणेंच अधिक सोपें होते ! पृ. २४६—मोंगली सैन्य अद्यापिहि विजापूरच्या किल्ल्यासमोर होतें, अशी गोवळकोंड्याहून बातमी आली. मधून मधून चकमकी होतात त्यांत मोगलांचेंच विशेष नुकसान होतें. कारण त्याला रसदीचाच तुटवडा पडतो. **शिवाजी** ६००० घोडेस्वारांचें धावतें सैन्य घेऊन आसपासचीं खेडीं व शहरें लुटीत असतो. मध्यंतरीं मोगलानें आपलें सैन्य विजापुराहून परत बोलावून, या युद्धांत झालेल्या खर्चाची भरपाई करण्याकरितां आपल्या प्रजेवर मोठा बोजा घातला आहे. त्याचा सेनापती **दिलेरखान** याला आपण कर्नाटकांतून ३ लाख रुपये मिळवूं असें वाटलें होतें. परंतु त्या भागाच्या सुभेदारानें त्याला 'आपण इतक्या बंदुकीच्या गोळ्या पाठविण्यास तयार आहों' असें कळवून ५०० कापलेल्या नासिकांचा हार नजर म्हणून पाठविला. यावरून त्यानें असें दर्शविलें कीं, 'तुम्हीं पुढें आल्यास तुमच्या लोकांची याप्रमाणेंच गत केली जाईल !'

फॅ. रे. मुंबई } (२२५८) { श. १६०२ वैशाख व. ४
भा. १९ पृ. २९ इ. } सुरत-मुंबई { इ. १६८० मे ७

शिवाजीच्या मृत्यूबद्दल सर्व बाजूंनीं बातमी येत आहे. तथापि **कित्येकांना अजून संशय** आहेच. एकादा मोठा प्रयत्न करण्याचे पूर्वी अशीच बातमी त्याच्याबद्दल पसरविली जाते. तेव्हां अधीक खात्री होईपर्यंत विश्वास येत नाहीं.

डाग रजिस्टर १६८० } (२२५९) { श. १६०२ वैशाख व. १०
पृ. २८०-१ इ. मे २३ न्यू. } { इ. १६८० मे १३

पालेकतची बातमी, मार्च १५—विजापूरच्या राजधानीला ३० इ. मोंगली फौजेचा वेढा पडून तेथील लोकांची दुर्दशा झाल्यामुळें, गोवळकोंड्याच्या राजानें, त्यांना त्वरेनें मदत व्हावी म्हणून **शिवाजीकडे** मोठी रकम पाठवून त्यानें त्यांना साहाय्य करावें अशी विनंति केली. आणि त्या वेळीं गोवळकोंड्याचें प्रत्यक्ष अस्तित्व आणि शिवाजीची भरभराट हीं ह्या एका गोष्टीवर अवलंबून आहे अशी समजूत असल्यामुळें यश येण्याच्या आशेनें सर्व प्रकारचे प्रयत्न (कुमकेकरितां) करण्यांत आले. याच वेळीं मैसूरचा राजा बेल्लापूरच्या आसपास विजापूरच्या सैन्याशीं युद्ध करण्याच्या इरादानें सरहद्दीवर तयार होता. तो विजापूरच्या वेढ्याच्या परिणामाकडे लक्ष लावून होता. **रघुनाथ पंडीत** तेगनापट्टणावर चाल करून जात होता. परंतु मदुरेच्या संस्थानावर म्हैसूरच्या दुसऱ्या सैन्यानें हल्ला केल्यामुळें तो थांबला. मदुरानायक अडचणींत सांपडून त्यानें त्या सेनापतीला पुष्कळ खंडणी देण्याचें कबूल करून उत्तरेकडे त्याच्या मदतीकरितां सैन्य घेऊन जाण्याचें वचन दिलें आहे.

फॅ. रे. फो. सें. जॉर्ज भा. २८ पृ. १००-१०१ इ. | (२२६०) सुरत-फो. सें. जॉर्ज | श. १६०२ ज्येष्ठ शु. ३ इ. १६८० मे २०

शिवाजी मेल्याची विश्वसनीय बातमी आली होती. परंतु आतां ती खोटी आहे असें म्हणत आहेत. **संभाजी राजा**, त्याचा ज्येष्ठ पुत्र, ह्याच्यावर तो फारच रागावला होता. त्याला **पकडण्यासाठीं ही युक्ती** त्यानें केली आहे असें लोकांना वाटतें.

फॅ. रे. सुरत भा. १०८ पृ. ९७ इ. | (२२६१) मुंबई-सुरत. | श. १६०२ ज्येष्ठ व. १ इ. १६८० जून ३

शिवाजी मेला हें अगदीं खरें असून **संभाजीला बापाच्या सर्वस्वाचा ताबा** मिळाला. तो अद्यापि पन्हाळ्याला आहे. त्यानें १००० स्वार सज्ज ठेविले असून त्यांना दोन महिन्यांचा पगार आगाऊ दिला. त्याचे बेत अजून समजले नाहींत. सर्वत्र त्यानें आपले (**नवे**) **सुभेदार व अमलदार** नेमिले आहेत. त्याचा धाकटा भाऊ रायरीला सुरक्षित असून त्याला तो दयेनें वागवील असें म्हणतात. अण्णाजीपंडीताचा शिरच्छेद झाला. मोरोपंडितावर मर्जी खप्पा झाली नाहीं. तथापि त्याला अजून विश्वासांत घेतलें नाहीं. देशांत थोडथोडी स्थीरस्थावर होत आहे.

स. पृ. १३५ (२२) रा. श. ७ मु. १०८१ जवल १५ | (२२६२) | श. १६०२ ज्येष्ठ व. २ इ. १६८० जून ३

श्री राजा **शंभू छत्रपती**

रा. भानजी गोपाळ देशाधिकारी व देशलेखक प्रांत कराड.

मल्हार गोसावी सदाव्रती यांस मौ० नाडोली तर्फ मारूल प्रा. कऱ्हाड हा गांव पूर्वीपासून इनाम असतां राजश्री कैलासवासी स्वामींनी अमानत केला. यावरी स्वामी पन्हाळीहून रायगडावर जाताना कोरटीस गोसावीयासी भेटले.

प्रामाणिक ईश्वरभक्त देखिले. व गांव पूर्ववत् गोसावीयासी दिल्हा. तो चालविणें.

फॅ. रे. सुरत भा. १०८ पृ. १०४ इ. | (२२६३) राजापूर-सुरत. | श. १६०२ ज्येष्ठ व. ८ इ. १६८० जून १०

आम्हांला आचऱ्याहून नारळ मिळण्याबद्दल हुकूम झाल्याचें तुम्हांला मागच्या पत्रांत कळविलें होतें. परंतु कारभारांत आलटापालट झाल्यामुळें आलेला नवीन सुभेदार संभाजीच्या हुकमाशिवाय आम्हांला बक्षीस मिळणार नाहीं असें सांगूं लागला. त्यावर संभाजीकडे अर्ज केला. त्याचें उत्तर ' तूर्त मला सवड नाहीं. सवड होतांच हिशेब पाहून निकाल करूं. ' असें, म्हणजे बहुतेक नकार-दर्शकच आलें ! ...पूर्वींच्यापेक्षां कांहीं अधिक नोकर केवळ आत्म-संरक्षणाकरितां म्हणून आम्हांला ठेवावे लागतील. कारण, येथें स्वार व शिपाई यांनीं नेहमीं शहर गजबजलेलें असतें. ते **सर्व संभाजीकडे**

जात आहेत म्हणतात ! ह्या दाणगट लोकांपासून बचाव व्हावा म्हणून एकसारखा आम्हांला पहाराच ठेवावा लागतो.

[प फॅ. रे. मुंबई भा. १९ पृ. ३३ ता. २२ जून–याच मजकुराचें मुंबईस पत्र.]

डाग रजिस्टर १६८० पृ. ४२३ जुलै ५ न्यू. (२२६४) श. १६०२ आषाढ शु. ९ इ. १६८० जून २५

सुरतेची बातमी, एप्रील ५–पुनः **शिवाजी** २००० स्वार व ३००० शिपाई घेऊन सुरतेपासून ४० कोस किंवा ३० मैल अंतरावर जवळ आला आहे. त्याच्या भीतीनें सुरतेंत लहान मोठ्या सर्व लोकांत पळापळी सुरू झाली. इंग्रजहि बायकामाणसें घेऊन स्वालीकडे पळाले. परंतु ही भीती फार वेळ टिकली नाहीं. कारण शिवाजीचें सैन्य दूर निघून गेलें. त्याची एकसारखी चलती असल्यामुळें पुढें कांहीं बरे दिवस येण्याचा संभव नाहींच. पूर्वोक्त कर हिंदू व युरोपिअन या सर्वांवर बसवावयाचा होता. या बाबतींत असदखानानें बादशहाच्या नांवानें असा कायदा काढला आहे कीं, जर युरोपिअनांना सर्वांबरोबर तो एकदम द्यावयास नको असेल तर त्यांनीं पूर्वीच्या दराप्रमाणें म्हणजे ३½ टक्केप्रमाणें ६ नोव्हेंबर १६७९ पासून जकात द्यावी. कंपनीच्या व्यापाऱ्यांना ह्याप्रमाणें कर द्यावाहि लागला आहे.

फॅ. रे. सुरत भा. १०८ पृ. १०५ इ. (२२६५) राजापूर–सुरत श. १६०२ आषाढ शु. १० इ. १६८० जून २६

संभाजी आतां **रायरीला** गेला आहे. बक्षिसाच्या करितां त्याच्याकडे पुनः अर्ज करीत आहों. आतां राज्यांत व्यवस्था होऊन त्याला थोडा स्वस्थपणा असल्यामुळें बहुधा आमच्या अडचणी समजून घेण्यास त्याला वेळ होऊन अधिक अनुकूल उत्तर येण्याची आशा आहे.

सदर पृ. १०८, ता. १२ जुलै– **संभाजी रायरीला आहे.** धाकट्या भावाला त्यानें दयेनें वागविलें. **अण्णाजीचें डोकें कापलें नसून** त्याचे फक्त सांखळ्या (बेड्या) घालून हाल चालविले आहेत; अशी चौलच्या सुभेदाराकडील एका लायख माणसाकडून माहिती कळली. देशांत स्थिरता येऊन संभाजी राजा झाल्याचें जाहीर झालें आहे. त्याच्याजवळ आतां २० ह. सैन्य तयार आहे. तो फार मेहनती आणि सावध आहे असें लोक बोलतात.

डाग रजिस्टर १६८० पृ. ५१६ इ. जुलै २६ न्यू. (२२६६) श. १६०२ श्रावण शु. १ इ. १६८० जुलै १६

इराण, सुरत इकडील बातमी, **मार्च ते मे:**— वेंगुर्ला व कानडा या बाजूच्या

डोंगराळ मुलखांतील युद्धें अद्याप चालू आहेत. शिवाजीचा मुलगा **संभाजी**, आपल्या बापाला सोडून कांहीं वेळपर्यंत मोंगल सैन्याकडे गेला होता, तो आतां आश्वासनावर विश्वसून शिवाजीकडे परत आला आहे. विजापूरचा तरुण राजा [अल्लीआदिलशहा मृत्यु इ. १६७२] मृत्यु पावल्यामुळें मोंगल आतां विजापूरच्या राजपुत्राला शिवाजीच्या विरुद्ध मदत करणार आहे असें म्हणतात. परंतु त्या नाठाळ गिधाडानें (Prey bird) मोंगलांच्या मुलखांत दूरवर प्रवेश करून, एका प्रसिद्ध शहरांतून अपार संपत्ती लुटून नेली.

डाग रजिस्टर १६८० पृ. ५३८-९ इ. आगस्ट ७ न्यू. } (२२६७) { श. १६०२ श्रावण शु. १२ इ. १६८० जुलै २८

इराण, सीलोन इकडील बातमी, **एप्रील-जून**— विजापूरचा राजा व मोंगल या उभयतांनीं एकदम **शिवाजीवर** हल्ला करण्याबद्दल आपसांत तह केला आहे. आणि ह्या उद्देशानें एक मोठें सैन्य चालूंहि लागलें आहे. शिवाजीच्या लोकांनींहि **जिंजीच्या** मुलखांत जंगी संरक्षक लढाई देण्याची तयारी चालविली आहे. प्रसंग एकंदरींत बिकट दिसतो. कारण, **शिवाजीच्या** मुख्य सेनापतीनें आपलीं बायकामाणसें सुरक्षित रहावीं म्हणून **तंजावरास** पाठविलीं आहेत.

फॅ. रे. सुरत भा. १०८ पृ. ११३ इ. } (२२६८) चोपडा-मुंबई { श. १६०२ श्रावण व. ८ इ. १६८० आगस्ट ७

शिवाजीनें गेल्या वर्षीं घेतलेल्या सरहद्दीवरील **हनमंत गडाला** बहादूरखानानें वेढा घातला आहे. किल्लेकरी जोरानें प्रतिकार करीत आहेत.

फॅ. रे. सुरत भा. १०८ पृ. ११६ इ. } (२२६९) मुंबई-सुरत { श. १६०२ भाद्रपद शु. ४ इ. १६८० आगस्ट १८

उंदेरीला मोठी चकमक झडली. एका रात्रीं अंधारांतून **संभाजी राजाचे** २०० लोक गुप्तपणें उंद्रींत प्रवेश करून शिरले. परंतु उजेड नव्हता आणि बेटावरील खुणाखांचा त्यांच्या परिचयाच्या नव्हत्या व शिवाय सिद्दीला त्यांची फार लवकर चाहूल लागल्यामुळें त्यांचा पराजय झाला. सुमारें ८० शिरें बेटावर आणिल्यामुळें संभाजीच्या वकिलाला खेद वाटला. डे. ग. नें तीं शिरें किंवा कैदी बेटावर उतरूं दिले नाहींत. सर्व डोकीं भाल्यावर टोंचून किनाऱ्यावर प्रदर्शन करण्याचा सिद्दीचा विचित्र उद्देश आम्हीं सिद्धीस जाऊं दिला नाहीं.

फॅ. रे. सुरत भा. १०८ पृ. १३५ इ. } (२२७०) चोपडा-सुरत { श. १६०२ भाद्रपद शु. ६ इ. १६८० आगस्ट २०

संभाजी राजा पावसाळा संपतांच बहादूरखानाशीं लढाई देणार असून तसें त्यानें बहादूरखानाला कळविलें आहे.

डाग रजिस्टर १६८० पृ. ५७९ इ. सप्टें. ३ न्यू. (२२७१) श. १६०२ भाद्रपद शु. १० इ. १६८० आगस्ट २४

कोलंबोकडील बातमी, **जून-जुलैः**— शिवाजी राजा मरून **संभाजीला** त्याचें सिंहासन मिळालें असावें असें सर्वत्र बोलतात. आपल्या बापाच्या तत्त्वांप्रमाणेंच संभाजी वागणारा आहे असें लोक म्हणतात. परंतु त्याचा स्वभाव अधिक नरम असून [आपल्या] कंपनीबद्दल त्याच्या मनांत तितका तिटकारा नाहीं.

फॅ. रे. मुंबई भा. १९ पृ. ४६-४७ इ. (२२७२) कारवार-सुरत श. १६०२ भाद्रपद व. २ इ. १६८० आगस्ट ३१

जगजीवन बजाजी पंडित नांवाचा येथील सुभेदार आम्हांला त्रास देऊं लागला आहे. विशेषतः कर्जाऊ रकमा तो फार मागतो. त्याच्याकडून आधींच पुष्कळ येणें असल्यामुळें व आम्हांला लवकर वखार सोडून जावयाचें असल्यामुळें आम्हीं कर्ज देण्याचें नाकारिलें. त्यामुळें गेल्या २६ तारखेला वखारींत सामुग्री येण्याची बंद करून त्यानें आम्हांला पकडून नेण्याकरितां शिपाई पाठविले. अर्थात् आम्हीं प्रतिकार केला तेव्हां ते लोक पळाले. त्यामुळें रागावून त्यानें आमच्या नोकरांच्या गाई म्हशी धरून विकावयास काढल्या. कोदेरा त्याच्याच हद्दींत आहे तेथील व सर्व बाजूंनीं व्यवहाराला तो अडथळा करितो. तरी संभाजी रायगडला आहे त्याच्याकडे सोबतचीं पत्रें त्वरेनें पाठवावीं.

फॅ. रे. मुंबई भा. १९ पृ. ४३ इ. (२२७३) सुरत-मुंबई श. १६०२ भाद्रपद व. ५ इ. १६८० सप्टें. ३

संभाजीराजाकडे मनुष्य पाठविण्याबद्दलचें तुमचें म्हणणें कळलें. आणखी ३।४ महिन्यांत सिद्दी खांदेरी उंदेरी इत्यादि सर्व प्रकरणीं कंपनीकडून खुष्कीच्या मार्गानें कांहीं हुकूम येतील. तरी तोंपर्यंत थोडा धीर धरून असेंच कौशल्यानें व धोरणानें ह्या गोष्टी लांबणीवर टाकूं या.

फॅ. रे. सुरत भा. १०८ पृ. १२७, मुंबई-सुरत, **सप्टें. १७.** सदर बाबतींत संमती व मान्यता.

खं. २० ले. २८१ रा. ७ (२२७४) मु. व सी. श. १६०२ आश्वीन शु. १ इ. १६८० सप्टें. १३

राजा शंभु छत्रपती—गणोराम देशाधिकारी व देशलेखक प्रांत कुडाळ

मौनी गोसावी पाटगावीं राहतात. त्यांच्या पालखीचे भोई व वाजंत्री यांसाठीं १२५ होन मोईन करून दिले आहेती. २५ होन वाजंत्र्यास व १०० भोयांस.

डाग रजिस्टर १६८० पृ. ६४६-४७ इ. आक्टो. ९ न्यू. } (२२७५) { श. १६०२ आश्वीन व. १ इ. १६८० सप्टेंबर २९

मागापट्टमची बातमी, १४ जुलै—सुप्रसिद्ध दरोडेखोर **शिवाजी** राजा मेल्याबद्दल खात्रीलायक बातमी आली आहे. त्याचा पुत्र संभाजी यानें आपल्या धाकट्या भावाशीं भांडण करून शेवटीं गादी मिळविली. व तो धाकटा भाऊ थोड्याशा जामिनीचा कारभार मिळाला तेवढ्यावर संतुष्ट होऊन राहिला. सेनापती **रघुनाथपंडीत** आपल्या धन्याच्या मृत्यूनंतर लगेच मदुरा प्रांतांतून आपलें सर्व सैन्य काढून घेऊन, पोर्टोनोव्हो व तेगनापट्टण या मार्गानें **जिंजी**कडे गेला. तेथें सरहद्दीवर त्यानें छावणी दिली असून, शिवाजीच्या मृत्यूबद्दल एक अक्षराक्षरहि न बोलतां **एकोजीराजाशीं** तोंडी बोलणें करून त्याच्याकडून खंडणीचा मोठा भाग वसूल करून घेतला. ही लबाडी कळल्यावर मागाहून एकोजी राजा अतिशय क्रुद्ध झाला असें म्हणतात.......

तंजावरांतील परिस्थिति वाईट झाली आहे. तेथील प्रजेची कुचंबणा होत असून, तंजावरचा त्याग करून. बरेचसे शेतकरी उत्तरेकडे किंवा दक्षिणेकडे जात आहेत.

सं. पृ. २९ (२९) सु. १०८१ रम. २८ } (२२७६) { श. १६०२ आश्वीन व. ३० इ. १६८० आक्टो. १२

अजर० मालोजीराय घोरपडे—वजा० कार० व देसाई पर० केळूर ममदाबाद.

श्रीनिवासभट बिन वेंकटभट सो मुद्गल यांचें इनाम होनगुंद वगैरे गावीं आहे तें त्याजकडे चालविणें.

श्री. सं. ले. ३२ रा. श. ७ } (२२७७) 'अमात्य' आज्ञापत्र मु. व सी. { श. १६०२ कार्तीक शु. ६ इ. १६८० आक्टो. १८

छ. **राजा संभाजी**—भानजी गोपाळ देशकारी व देशक प्रां. कऱ्हाड.

क० चाफळ येथें **श्रीसमर्थ रामदास** करीत असलेल्या श्रीरामनवमीच्या उत्साहास वार्षिक मोईन बा। सनद रा. दत्ताजी त्रिमल वाकेनवीस माजी (ले. १९७२ प्रमाणें) आहे. १४ सनगे किं. होनु ११॥ आहे असें रा. दिवाकर गोसावी जबानी सांगितलें. तेणेंप्रमाणें चालवीत जाणें.

श्री. सं. ले. ३३ रा. श. ७ } (२२७८) आज्ञापत्र अमात्य मु. व सी. { श. १६०२ कार्तीक शु. ६ इ. १६८० आक्टो. १८

श्री संभुछत्रपती—जगनाथ बैजाजी देशकारी व देशक प्रांत मलकापूर.

रा. रामदास गोसावी याचे इनाम प्रा मारी आहे. देवार्चन वे. रघुनाथभट वसिष्ट गोत्री याकडे आहे. तरी (ले. १९८२ व २१५८-२१५९ च्या सनदप्रो) चालविणें.

श्री. सं. ले. ३४ } (२२७९) { श. १६०२ कार्तीक शु. ६
रा. श. ७ } { इ. १६८० आक्टो. १८.

छत्रपती--काशी रंगनाथ देशी व देशक प्रांत जाउली.

रामदास गोसावी यांस अतीतअभ्यागतादिकांकरतां तीर्थ. कै. (शिवाजी) नीं छ २९ जिल्हेज सु. १०७५ (श. १५९७ चैत्र शु. १) स तांदूळ तेल वगैरे सामग्री एक मण ३९॥ शेर व ४॥ टाक दिली. दुभती म्हैस, हरकारा, तेल, फटी इ. नंदादीपादि खेरीज स्वतंत्र देणें. तरी तसें देऊन धर्मादाऊ लिहीत जाणें.

श्री. सं. ले. ३५ } (२२८०) { श. १६०२ कार्तीक शु. ६
रा. श. ७ } { इ. १६८० आक्टो. १८

छत्रपती **संभाजी**— कासी रंगनाथ देशी व देशक प्रांत जाऊली

रामदास व चाफळचे देव यांस मोईन बा। सनद ती. कै० दरमाहे २५ होन पा। इ. सालाबाद प्रो चालविणें.

ओ. कॉ. भा. ४० } (२२८१) { श. १६०२ कार्तीक शु. ६
नं. ४७०५ इ. } सुरत-कंपनी { इ. १६८० आक्टो. १८

शिवाजीचा मृत्यु व **संभाजीला** राज्याधिकार. संभाजीच्या हल्लींच्या कारभारावरून बापापेक्षां हा निराळया स्वभावाचा म्हणजे **अधिक नेमस्त आणि सदय** असा दिसतो. तेव्हां आतां कारवारची वखार चालू ठेवण्याबद्दल तुमचा हुकूम असता तर बरें झालें असतें.

शिवाजीशीं दीर्घकाल व मोठ्या खर्चाचीं युद्धें करून **बादशहाचा खजीना रिकामा** झाल्यामुळें त्याच्या पठाणांनीं व इतर यांनीं तद्धर्मीय मुसलमानांव्यतिरिक्त **इतरांवर असह्य कर** लादले. तिन्ही युरोपीय राष्ट्रांवर ते घातले. त्याला सर्वांनीच एकमतानें विरोध केल्यामुळें, बादशहाकडून पूर्ववत् जकातीचा दर **३½ टक्के** करण्याचा **हुकूम** आला असून त्याची कडक अमलबजावणी होत असते. आम्ही त्रिवर्ग त्याबद्दल विचार करीत आहों.

श्री. सं. ले. ३६ } (२२८२) { श. १६०२ कार्तीक शु. ७
रा. श. ७ } { इ. १६८० आक्टो. १९

छत्रपती संभाजी

कोनेर रंगनाथ देशी व देशक सुभा माहालानिहाये तर्फ सातारा.

चाफल कर्यात नाणेघोळ येथील श्रीरघुनाथास माजी वाकेनवीस दत्ताजी त्रिमल यांचे सनदेप्रमाणें (ले. १९७१) दर गांवीं ११ बिघे जमीन दिली ती चालविणें.

श्री सं. ले. ३७ }　　(२२८३)　　{ श. १६०२ कार्तीक शु. ७
रा. श. ७ }　　　　　　{ इ. १६८० आक्टो. १९

छत्र. **संभाजी**--वासुदेव बाळकृष्ण.

चाफळास कटकीचे शिपाई व इतर लोक यांस ताकीद करून देव व गोसावी यांस हरकोण्हाचा उपद्रव न लागे व यात्रा सुखरूप भरे; तें करणें.

श्री. सं. ले. ३८ }　　(२२८४)　　{ श. १६०२ कार्तीक शु. ७
रा. श. ७ }　　　　　　{ इ. १६८० आक्टो. १९

छत्र. **संभाजी**-भानजी गोपाल देशारी व देशक प्रांत कऱ्हाड.

चाफळ येथील देवास (ले. १४ प्रमाणें) उत्पन्न आहे तें चालवणें. व शिंगण-वाडीच्या रयेतास मठास शाकार करावी लागते म्हणून वेटबेगार माफ असून इनामाकरतां लिहिणारहि वेतनासह दिला आहे. तेणेंप्रमाणें चालवणें.

श्री. सं. ले. ५५९-५६० }　　(२२८५)　　{ श. १६०२ कार्तीक शु. ७
रा. श. ७ }　　म. मु. व मु.　　{ इ. १६८० आक्टो. १९

श्री शंभु छत्रपती—

विनायक उमाजी व येसाजी मल्हारी देशारी व देशक, प्रांत पुणें व वाई.

रा. वासुदेव गोसावी यास कऱ्हेरीमठ ता नीरथडी येथें कै. **शिवाजी राजे** यांचे सनदेप्रमाणें (श. १५९३ अ. वै. व १२ व ले. २१०५) जमीन कास रुके ९ आणि परगणे वाई पैकीं माडिरदेव व पनाला येथें जमीन कुलबाबदेखील दिली असे. ती दुमाले करणें. (मुद्रा -एषा श्रीशिव राजेंद्र मुख्या मात्यस्य सत्यधृक॥ मुद्रा मोरेश्वर स्यास्तां भद्रा सद्रागदायिनी)

डाग रजिस्टर १६८० }　　(२२८६)　　{ श. १६०२ कार्तीक शु. ११
पृ. ७२४,२९ इ. नोवें. २ न्यू. }　　　　{ इ. १६८० आक्टो. २३

पलीकटाकडील बातमी एप्रीळ-मे, जुलै-आगस्ट, सप्टेंबर — सुरतेहून हुगळीकडे असें लिहिण्यांत आलें कीं, बंडखोर रजपुतांचें युद्ध क्षुद्र स्वरूपाचें असून रजपूत डोंगरांत पळून गेले. आणि **औरंगजेब** बादशहाचें सैन्य दुष्काळानें पीडित झाल्यामुळें दिल्लीस परतलें ! तेथें सुलतान अज्जम बापाकडे आला. त्याचें प्रेमानें स्वागत होऊन बंगालच्या नबाब शाहिस्तेखानाच्या जागीं त्याची नेमणूक होईल असें म्हणतात.

गोवळकोंड्याहून असें लिहून आलें आहे कीं, **शिवाजीराजाला** त्याच्या दुसऱ्या बायकोकडून **विषप्रयोग झाला** असावा (?). त्याचा कनिष्ठ पुत्र गादी-वर बसावयाचें घाटत होतें त्याला तुरुंगवास प्राप्त झाला आहे. आतां **शिवाजीचा** ज्येष्ठ पुत्र राज्य करीत आहे. त्याला थोड्या अडचणी आल्या असें नाहीं. यामुळें त्यानें

सेनापती **रघुनाथ पंडीत** यास १२५ ह. पार्डो आणि पोर्टोनोव्हो, नागापट्टण इत्यादि मुलखाचा संपूर्ण करभार दिला आहे. लहानसहान अमलदारांच्या त्यानें बदल्याहि केल्या. शत्रूपासून आपल्या राज्याचें रक्षण करण्याच्या इराद्यानें संभाजीनें ८००० स्वार जादा नोकरीस ठेविले आहेत. कारण मोंगलांचें व विजापूरचें सैन्य घांटांतून स्वारी करणार असल्याबद्दल वदंता होती. [शिवाजीनें ज्या अनेक राजांचा मुलूख जिंकून घेतला होता त्या] अनेक राजांनीं आपला मुलूख त्याच्या वारसापासून परत मिळविण्याची जबरदस्त खटपट केली. [फार तर] शिवाजीच्या पुत्रांना वार्षिक नेमणूक देण्याचा त्यांनीं विचार केला. **अहिवंत** आणि **साल्हेर** हे दोन किल्ले घेऊन शिवाजीच्या सरहद्दीकडे कायमची पाठ फिरविण्याचा **बहादुरखानानेंहि** बेत केला होता ! औरंगजेबाच्या सैन्याचा पठाणांनीं मोठा पराजय केला......

[पूर्वी झालेल्या] तहानुसारें जिंजी व त्याखालील मुलखावर गोवळकोंड्याच्या सुलतानानें आपला हक्क सांगितला आहे. जरी सेनापती रघुनाथ पंडीत यानें मोठमोठे नजराणे देऊन कुशल वकील गोवळकोंड्याकडे पाठविले आहेत तथापि हा किल्ला आपल्या राज्यांत सामील केल्याशिवाय तो रहाणार नाहीं.

म्हैसूर व मदुरा येथील नायक एकत्र होऊन तंजावरच्या एकोजी राजावर चाल करून जात आहेत. गोवळकोंड्याच्या सुलतानानेंहि आपल्याला साहाय्य करावें म्हणून त्यांनीं खटपट केली; परंतु तितक्यांत **एकोजीनें** मदुरेच्या नायकाचा पराजय केला व त्याला त्याच्या राजधानीच्या किल्ल्यांत (त्रिचनापल्ली) कोंडून टाकलें व तेथें हल्ल्यावर हल्ले चढविले.

शेवटीं एकोजी राजा व मदुरानायक यांचा तह झाला. कोणाचीहि तशी अपेक्षा नसतां, एकोजीनें गेल्या वर्षी ताब्यांत घेतलेला घांटाचा मुलूख मदुरानायकास परत दिला. अशा रीतीनें वैर मिटून शेजारच्या सर्व राजांशीं एकोजीचे शांततेचे संबंध आहेत. आणि तंजावर प्रांतांतील परागंदा झालेले रहिवाशी आतां परत येऊं लागले आहेत,

[मे २८ ची बातमी (७ जून न्यु.)]:—रिजेंटचे [मोंगलांशीं] संबंध बऱ्यांतले आहेत. आणि **जकातीच्या नोंदी सप्टेंबरमध्यें पुन्हा** व्हावयाच्या असल्यानें [मोंगलांनीं] वाढविलेल्या जकातीमुळें [अद्याप] आम्हांला कांहींच तोशीस लागली नाहीं. मुसलमान जकातदार युरोपीय व्यापाऱ्यांना अनुकूल असल्याचे दिसतात. यामुळें १॥ टक्क्यांची (पूर्ववत् आम्हांला) सवलत देण्याबद्दल दरबाराकडे ते लिहून कळवितील. ह्या मार्गाचा अवलंब करावयाचा तर (फ्रेंच, इंग्लिश व डच अशा) तिघांनीं मिळून सुमारें ५०,००० रुपये खर्च येईल. याकरितां आपसांत वाटाघाट होऊनहि अद्यापि कांहींच ठरलें नाहीं. प्रत्येकजण आपल्याकडे मोठेपणा घेऊं इच्छितो [?]. साधारणपणें इंग्रज हे सर्वांत जुने असल्यामुळें त्यांना [हा मोठेपणा]

द्यावा असें साहाजिकच वाटतें. परंतु फ्रेंच लोक अभिमानी असल्यामुळें इंग्रजांना मान देण्याची त्यांची तयारी नाहीं.

फॅ. रे. सुरत भा. १०८ पृ. १४६ इ. (२२८७) राजापूर-सुरत श. १६०२ कार्तीक शु. १३ इ. १६८० आक्टो. २५

आमच्या २६ जूनच्या पत्रांत **संभाजीराजाकडे** बक्षिसाबद्दल पुनः अर्ज पाठविल्याचें कळविलें होतें. २५ तारखेला त्याचें पत्र घेऊन नोकर आले. त्यांत मूळ कराराप्रमाणें सिद्दीच्या बाबतींत इंग्रजांचें वर्तन होत नसल्यामुळें त्यांच्याबद्दल आपल्या मनांत आदर नाहीं. असें तो म्हणतो तेव्हां सिद्दीला घालवून लावीपर्यंत तो आपलें कांहींच काम करणार नाहीं. उलट पूर्वी मिळालेल्याहि बक्षिसाच्या रकमेची तो परत मागणी करील. परंतु सिद्दी बेट सोडून जाईल तर अथणीची लूट वगैरे सर्व बाबतींत पूर्वी शिवाजीच्या वेळेपासून चाललें होतें तसेंच स्नेहानें तो चालवील असें दिसतें.

श्री. सं. ले. ३९ रा. श. ७ (२२८८) श. १६०२ कार्तीक शु. १५ इ. १६८० आक्टो. २७

छत्रपती **संभाजी** — कोमेर रंगनाथ देशरी व देशक प्रांत सातारा.

सज्जनगडीं रा. रामदास गोसावी व श्रीदेव यांस नेवेद्य इ. करतां फाटे वगैरे देऊन पावती घेणें.

श्री. सं. ले. ४० रा. श. ७ (२२८९) श. १६०२ कार्तीक शु. १५ इ. १६८० आक्टो. २७

छत्रपती **संभाजी** — कासी रंगनाथ देशरी व देशक प्रांत जाउली.

महाबळेश्वरचें देवालय पंचगंगे संन्निध दिवाकर गोसावी यांनीं बांधून मोहोत्साह बरा चालला आहे. माजी प्रधान मोरोपंत यांणीं मोईन श्रीदेवाच्या मोकाशाचे गांवावर दिली होती. म्हणून ती मिळत नसे. हाली सुभेमारापैकीं देविले आहे. तरी चालविणें.

श्री. सं. ले. ४१ रा. श. ७ (२२९०) श. १६०२ कार्तीक व. १ इ. १६८० आक्टो. २८

छत्रपती **संभाजी**—कृष्णाजी भास्करः— (ले. २२८३ प्रमाणें.)

डाग रजिस्टर १६८० पृ. ७३९ इ. नोवें. ९ न्यू. (२२९१) श. १६०२ कार्तीक व. ३ इ. १६८० आक्टो. ३०

पुलीकताकडील बातमी, सप्टेंबरः — **एकोजी राजानें** मदुरा व तेनवर वगैरे राजांशीं तह केल्यामुळें त्याला त्रिनेलेवास, कारकल इत्यादि ठिकाणच्या स्वामी-

त्याबद्दलची वादांत पडलेली रकम आमच्या कमांडरनें देऊन त्याला सदंत असे दोन हत्ती नजर केले.

फॅ. रे. मुंबई भा. १९ } (२२९२) { श. १६०२ कार्तिक व. ५
पृ. ४८-४९ इ. } राजापूर-सुरत. { इ. १६८० नोवें. १

रायरीला ३ महिने राहून आमचे नोकर संभाजीचें पत्र घेऊन २५ आक्टोबरला आले. त्यांत बक्षिसाबद्दल अनुकूल मजकूर आहे. परंतु राजाचा (सनदशीर) हुकूम नाहीं. डेप्युटी गवर्नर, सिद्दीला मुंबई बंदरांतून काढून लावण्याचें, त्याला पावसांत राहूं न देण्याचें व सामुग्री न पुरविण्याचें कबूल करील तर बक्षीस सुटेल. नाहींतर संभाजी ह्या तक्रारी मिटविण्याचा अन्य मार्ग पत्करील.

तुमच्या २१ तारखेच्या पत्राप्रमाणें हंटरमधून आम्हांला निघून येतां येत नाहीं. कारण संभाजीचें सैन्य येथें जवळ असून ह्या बेटावर (वखारींवर) तें हल्ला करील अशी भीती वाटते.

फॅ. रे. सुरत भा. १०८ } (२२९३) { श. १६०२ कार्तिक व. ९
पृ. १४६ इ. } मुंबई-सुरत. { इ. १६८० नोवें. ४

राजापुरास राजाचीं सुमारें ५० गलबतें ७५ हजार सैन्यासह तयार झालीं असून दौलतखान तीं लवकरच उत्तरेकडे घेऊन येईल अशी बातमी आली आहे. सिद्दीला आम्हीं आश्रय दिल्यामुळें राजा संतापून आमच्यावरच हें आरमार पाठवीत असावा असा संभव आहे. आम्हीं सावधपणें रहात आहोंत.

डाग रजिस्टर १६८० } (२२९४) { श. १६०२ कार्तिक व. १०
पृ. ७५३-५४ इ. नोवें. १५ न्यू. } { इ. १६८० नोवें. ५

पुलीकताकडील बातमी, आक्टोबर:—पोर्टोनोव्होचा व्यापार चांगला चालला असून अजूनहि त्यांत सुधारणा होण्याची आशा वाटते. सेनापती रघुनाथ पंडित याचें एक लहान गलबत पोर्टोनोव्होहून मलाक्काकडे व्यापाराकरितां जावयाचें आहे. त्याच्यावरील जकात माफ करण्याबद्दल त्यानें आम्हांला विचारिलें आहे.

फॅ. रे. सुरत भा. १०८ } (२२९५) { श. १६०२ कार्तिक व. १४
पृ. १४७ इ. } चोपडा-सुरत. { इ. १६८० नोवें. १०

या भागांत शिवाजीचें [?] सैन्य बाहेर पडल्यामुळें फारच भीती वाटते. एक स्वार व सैन्याची तुकडी सुरतेकडे, दुसरी बऱ्हाणपुराकडे व तिसरी बहादूरखान ह्या सरहद्दीवरून सरकत सरकत दक्षिणेकडे गेला आहे त्याच्यावर जात आहे.

सदर भा. १० पृ. १ (२), ता. ४ डिसें. सुरत-धरणगांवः—तुमचें २५ नोवें. चें पत्र १ तारखेला पोंचलें. बहादरखान सैन्य घेऊन नजीक असल्यामुळें तुमच्या भागांत बंदोबस्त बरा आहे हें वाचून बरें वाटलें.

डाग रजिस्टर १६८० पृ. ७६४ इ. नोवें. २१ न्यू. (२२९६) श. १६०२ कार्तीक व. ३० इ. १६८० नोवें. ११

हुगळीची बातमी २३ आगस्टः— मोंगल बादशहा औरंगजेब ह्यानें आपल्या साम्राज्यांतील परधर्मीयांवर बसविलेला कर नेहमींच चालू आहे. परंतु आमच्या लोकांना अद्यापि या बाबतींत त्रास झाला नाहीं. मात्र सुरतेप्रमाणेंच इकडेहि जकातींमध्यें वाढ होईल असें वाटत होतें. आग्र्याकडील बातमी अशी आहे कीं, सुलतान अकबर बादशाही किल्ला चितोडगड येथून निघून गेला असून त्याचा भाऊ सुलतान अक्षेम [?] तेथें जाण्याकरितां मोठें सैन्य घेऊन रजपुताशीं युद्ध करण्याकरितां अजमिराहून निघाला आहे. ज्येष्ठ शहाजादा सुलतान मुअज्झम हा बरेच दिवसांपासून औरंगाबाद सोडून उज्जनीस रहात असतो. अशा रीतीनें सर्व शहाजाद्यांना नजरेखालीं ठेवून त्यांना कह्यांत राखण्याचा बादशहाचा हेतू आहे. आपण शरण आल्यानेंहि बादशहाचा राग शांत होत नसून आपला संपूर्ण नाश व्हावा अशीच त्याची इच्छा असल्याचें रजपुतांचे निदर्शनास आल्यामुळें, त्यांनीं धैर्यानें नवीन सैन्य उभारून अनेक वेळां शहराबाहेर पडून मोठे जय मिळविले. राण्याला जिंकण्यांत दिलीरखानाचें कांहींच हित साधावयाचें नसल्यामुळें तो दिरंगाईनेंच युद्ध चालवितो. ह्या कारणानेंहि त्यांचें बरेंच फावतें. आतां बादशहा आपण स्वतः येऊन राण्यावर हल्ला करणाऱ्या सैन्याचें नेतृत्व स्वीकारणार आहे.

डाग रजिस्टर १६८० पृ. ८२३-४ इ. नोवें. २३ न्यू. (२२९७) श. १६०२ मार्ग. शु. २ इ. १६८० नोवें. १३

सुरतेची बातमी, सेप्टेंबर — महमद अमीनखानाला साम्राज्याचा दिवाण करून अहमदाबादच्या त्याच्या जागीं शहाजादा अकबर याची नेमणूक झाली. परंतु महमद अमीनखानाला त्यामुळें बरें वाटलें नाहीं.

अखेरीस फ्रेंच, डच व इंग्रज यांच्यावर वाढलेली जकात बसविली गेली. तिन्ही राष्ट्रांनीं दरबाराकडे विनंति अर्ज केला आहे. सुरतेच्या सुभेदारानेंहि त्यांच्या अर्जाची शिफारस करून तो मंजूर केल्यास दरबारांतील लोकांना ह्या त्रिवर्गांकडून ३० हजार रु. दरबारखर्चाबद्दल मिळतील असें अभिवचन दिलें आहे. फक्त सुभेदारालाच १० ह रु. द्यावयाचे आहेत. वाढत्या दरानें जकाती देण्यापेक्षां हें आम्हांला फार सुलभ पडणार आहे.

मोंगल साम्राज्यांतील युद्धें आणि दंगे एकसारखे चालूच आहेत. रजपुतांचा समूळ नाश करण्याचा बादशहाचा पक्का बेतच झालेला आहे. आजपर्यंत तो नेहमीं अज-

मीरला रहात असल्यामुळें, अहमदाबाद-आग्रा रस्ता कायमचा बंद होऊन व्यापारांचें अतोनात नुकसान झालें. मोंगल बादशहा औरंगजेब यानें, मुसलमानी धर्मतत्वांबद्दल [Party ?] कांहीं अवास्तव कल्पना धरून, कलेचीं चित्रें व चमत्कारिक वस्तु इत्यादि राजवाड्यांतील पुरातन संग्रह आणि मूर्ति किंवा खोदकाम अशाशीं यत्किंचित्हि साम्य असणारे सर्व पदार्थ एकत्र करून आग्रा येथें कांहीं महिन्यापूर्वी जाहीर रीत्या जाळून टाकले. अशा रीतीनें नाश पावलेल्या वस्तूंची एकंदर किंमत अंदाजें ३ लक्ष रुपये होती असें सर्व म्हणतात.

शिवाजी राजाच्या मृत्यूमुळें मोंगल लोकांना कांहींच फिकीर वाटेनाशी झाली आहे. त्याच्यामागून अधिकारावर येणाऱ्या कोणाहि माणसामध्यें मोंगल साम्राज्याला त्रास देण्याइतकें पुरेसें धैर्य अगर शहाणपण नाहीं; अशी त्यांची पक्की समजूत आहे. व्यापाराच्या दृष्टीनें अशी वस्तुस्थिति कितीहि स्पृहणीय असली तथापि त्याबद्दल निश्चित असें कांहींच आज सांगतां येत नाहीं.

सा. ले. ३९० } (२२९८) { श. १६०२ मार्ग. शु. ५
रा. ७ } न. { इ. १६८० डिसें. १६

रा. **शिव छत्रपति**?—धर्माजी नागनाथ मुद्राधा. प्रा कुडाळ मामले फोंडा.

नागोजी नाइक सरदेसाई यांचेकडे मामलेफोंडेची सरदेशमुखी आहे. हकवतन बिलाकुसूर चालत होते. हली मख्ता खंड ५०० होन देतात. तेणेकरून अवकात चालत नाहीं. येविशीं मल्हार नरजू हरी व नागोजी इंगले याहीं विनंति लिहिली आहे. हली उक्त देसाई गनीमास (तांब्र) (अपूर्ण)

सा. ले. ३९१ } (२२९९) { श. १६०२ मार्ग शु. ५
रा. ७ } न. { इ. १६८० डिसें. १६

शिवछत्रपति?—केसो सुभे. प्रां भीमगड मामले फोंडा (प्रथम सा. ले. ३९० चा मजकूर व पुढें) नागोजीस त्याची सरदेशमुखीची परंपरा वृत्ती दुमाला केली असे. वंसज विभक्त होतील तर इतरास १२५ होन व वडिलाकडे वृत्ती चालविणें.

फॅ. रे. मुंबई } (२३००) { श. १६०२ मार्ग. व. १३
भा. १९ पृ. १ (३) } सुरत-मुंबई { इ. १६८० डिसें. ८

राजाच्या हितसंबंधांना विरोध येईल अशा रीतीनें सिद्दीला आमच्याकडून मिळणारा आश्रय व मदत हीं **राष्ट्रांच्या कायद्याप्रमाणें समर्थनीय ठरणार नाहींत**; हें उघड आहे. परंतु हल्लींच्या परिस्थितींत आम्हांला तो नियम मोडावा लागणार हेंहि तितकेंच स्पष्ट आहे. कांहींहि केलें तरी दोघांपैकीं कोणाचा तरी असनेह पत्करल्या-

ाशिवाय गत्यंतर नाहीं. आणि दोघांशीं कोणाला राखावयाचें व कोणाला दुखवावयाचें हें ठरविणें फार दुर्घट आहे. परंतु आतां आपलीं गलबतें भरून पाठवावयाची वेळ आल्यामुळें त्यांना कोणाचाहि अडथळा होऊं नये म्हणून तुम्हांला खालील हुकूम देणें भाग पडत आहे.

संभाजीकडून आलेल्या मनुष्याला त्याचे कामाचें महत्व व त्याचा दर्जा यांना शोभेल असें वागवावें. मात्र त्यानें बातमीदाराचें काम करूं नये अशाकरितां त्याच्यावर नजर ठेवावी. परंतु त्याला गैरविश्वास न वाटेल याची खबरदारी घ्यावी. जरा त्याला लवकरच घालवितां आला तर बरें होईल असें आम्हांला वाटतें. तथापि त्याला दिरंगाईवर टालवीत ठेविल्यानें सिद्दीशीं अगदींच भांडण होण्याचा प्रसंग येत नसेल तर तसाहि त्याला राखून ठेविल्यास चालेल. तात्पर्य, गलबतें भरून जात तोंपर्यंत कोणाहि एकाकडून बांधा उत्पन्न होऊं नये असें वागा. एकदां गलबतें निघून गेल्यावर मग याचा कांहीं निकाल करण्याचा विचार पुढें करतां येईल. मध्यंतरीं सिद्दीला त्याच्या गैरवर्तनाचे दुष्परिणाम समजावून सांगून [संभाजी] राजाला समाधान वाटेल अशा कांहीं अटी त्याच्याकडून लेखी मिळतील तर मिळवाव्या. उदाहरणार्थ, बंदराच्या लगत्याच्या मुलखाला सिद्दीनें तोशीस देऊं नये वगैरे. जर हें तो अमान्य करील किंवा एकदां कबूल करून मोडूं पाहील तर, येथील कंपनीच्या व्यवहाराला धोका न येईल अशा रीतीनें त्याला सुचवावें. परंतु आज येथलि सुभेदार आमचा खुलासा (सहानुभूतीनें) ऐकण्यास तयार नाहीं. तो तयार झाल्यावर मग वाटेल तर त्यानें (सिद्दीनें) आपल्या तक्रारी सुभेदाराकडे पाठवाव्या अशा रीतीनें त्याला समज देण्यास हरकत नाहीं! [म्हणजे आतांच सिद्दीला फार दुखवूं नका!] हेंच पत्र फॅ. रे. सुरत भा. ९० पृ. ५–६ वर डिसें. २८ चें म्हणून दिलें आहे.

डाग रजिस्टर १६८० पृ. ८२०-१ इ. डिसें. २१ न्यू. (२३०१) श. १६०२ मार्ग व. ३० इ. १६८० डिसें. ११

मलाकाची बातमीः—शिवाजीचा सेनापती रघुनाथ पंडीत याचें लहान जहाज गालिचाचे २१९ गठ्ठे घेऊन, पोर्टोनोव्होहून येथें १७ ऑक्टोबरला येऊन पोंचलें.

फॅ. रे. मुंबई भा. १९ पृ. ६ (२) इ. (२३०२) हुगळी–मुंबई श. १६०२ पौष शु. २ इ. १६८० डिसें. १३

शिवाजी आजपर्यंत इतक्या वेळां मेला आहे कीं कित्येकांना तो अमर आहे असें वाटूं लागलें आहे. त्यानें आपल्या हयातींत नेहमीं ज्या प्रकारानें व ज्या यशानें आपलें (राज्य) चालविलें तितक्या तऱ्हेनें चालविणारा त्याच्यापाठीमागें त्याचा कोणींच लायख वारस नाहीं असें समजतात. तेव्हां आजपर्यंत भरभराटींत असलेल्या त्याच्या कारभाराला उतरती कळा लागली आहे असें अनुभवानें ठरेपर्यंत त्याच्या मृत्यूच्या खबरीवर कोणींच विश्वास ठेवील असें वाटत नाहीं.

खं. २१ ले. ६८ } (२३०३) { श. १६०२ पौष शु.१०
श. } खंडपत्र { इ. १६८० डिसें. २०

अपदेभट गिजरे कऱ्हाड— रुद्रभट गिजरे कऱ्हाड

तुम्ही वारणशीहून आलेशि आणि विभाग मागितला. तेव्हां चीजवस्त पैसा अडका याचा तृतीय भाग तुम्हांस दिला असे. कोणाचा कोणास संबंध नाहीं.

फॅ. रे. मुंबई } (२३०४) { श. १६०२ पौष व. २
भा. १९ पृ. ४ इ. } सुरत–मुंबई { इ. १६८० डिसें. २७

सिद्दीनें येथील सुभेदार व मुख्य मोकासदार यांस, पत्रें लिहून, तुम्हीं त्याला मित्रत्वानें व दयेनें वागवावें अशा तऱ्हेचीं, आमच्याकडून शिफारसपत्रें मागविलीं. त्यांनीं पुष्कळच गळ घातल्यामुळें त्यांना बरें वाटावें म्हणून हें लिहिलें आहे. सिद्दी आणि त्याचा शत्रु व आपला **त्रासदायक शेजारी संभाजी** यांच्याशीं कसें वागावें याबद्दल आधीं सूचना केल्याच आहेत. त्याप्रमाणें वागावें.

(से) फॅ. रे. सुरत } (२३०५) { श. १६०२ फाल्गुन शु. ९
भा. ९०–२ पृ. १४ इ. } सुरत–मुंबई { इ. १६८१ फेब्रु. १६

सिद्दीच्या दुर्वर्तनाची गय न करितां त्याच्याशीं जशास तसें वर्तन ठेवा. म्हणजे तो सुरतेच्या सुभेदाराकडे तुमच्याबद्दल तक्रार करील. आणि नंतर मग प्रेसिडेंट कांहीं सांगेल त्याचा उपयोग होईल. एरवीं केवळ प्रेसिडेंटनें केलेल्या तक्रारी निरुपयोगी ठरतील.

सा. ले. २४१ } (२३०६) { श. १६०२ फाल्गुन शु. १०
सु. १०८१ रा. ७ } { इ. १६८१ फेब्रु. १७

मोरेश्वर पंडितराय

भानजी गोपाळ देशाधि. व देशले. पर. कऱ्हाड

सिवभट निळकंठभट अग्निहोत्री वास्तव्य कराड यांस त्यांचें इनाम अमानत केल्याबद्दल २ खंडी जोंधळे प्रतिवर्षी देत जाणें.

फ्रायर भा. ३ } (२३०७) { श. १६०१–०२
पृ. १६६–६९ इ. } शिवाजी व संभाजी { इ. १६८०

युद्धें व युद्धवार्ता यांचा गोंधळ अजून चालू असतां आम्हीं संथपणें शस्त्र खालीं ठेवून, शिवाजी आणि सिद्दी यांना खांदेरीउंदेरीचें भांडण पुढें चालवाव्यास सोडून देत आहोंत. प्रत्यहीं आम्हांला जी भाषा ऐकावी लागते, तीवरून यांत आपल्याला भूषण किंवा दूषण काय मिळतें तें पहा. "तुमच्या राष्ट्रानें बढाई मारण्यासारखे कोणते पराक्रम केले आहेत, कोठें तरवार गाजविली आहे, किंवा कोणीं तुमच्या सामर्थ्यापुढें मान वाक-

विली आहे ? तुमचा मुलूख तो केवढासा ? डच व पोर्तु०नीं मर्दपणानें वागून केव्हांच अघाडी मारली आहे. मुंबई बेट कांहीं तुम्हीं पराक्रमानें मिळविलें नाहीं. (दान म्हणून) करारानें मिळालें; तें तरी तुम्हांला कोठें राखतां येतें ? तुम्हीं मोठे लढाऊ लोक म्हणवून घेऊन आमच्या राजांशीं दोन हात करण्याचा दिमाख कशाला दाखवितां ? तुम्हीं मुकाट्यानें व्यापार करावा आणि आम्हांला भिऊन रहावें, एवढीच तुमची योग्यता !" पण ही बढाई मारणारे लोक आजहि शिवाजीचें नांव ऐकतांच थरकांप होतात ! दोनदां, त्या भयंकर लुटारूच्या तावडींतून हें शहर (सुरत) आम्हीं होतों म्हणूनच वांचलें हें त्यांच्या लक्षांत रहात नाहीं !

इकडे मोंगल हिंदूंवर दुप्पट डोईपट्टी वसूल करून त्यांचीं देवळें सांपडेल तेथें फोडून टाकीत आहे. पूजास्वातंत्र्य नष्ट झाल्यामुळें हिंदु लोक दऱ्याखोऱ्यांतून आणि निर्जन ठिकाणीं जाऊन आपलें भक्तिसुख (चोरून) अनुभवितात.

याच सुमारास १ जून १६८० रोजीं [?] **शिवाजी** निसर्गाचें देणें देता झाला (मृत्यु पावला). त्याचेंच व्रत **संभाजी** पुढें चालवीत असतो. शिवाजीबरोबर अनेक लोकांनीं आपल्याला जाळून घेतलें !

शिवाजीच्या प्रधानांमध्यें कोणाला राजा करावें याबद्दल मतभेद होता. अण्णाजी पंडीत मुख्य प्रधान धाकट्याच्या बाजूचा होता; तर मोरो पंडीत ज्येष्ठ पुत्र संभाजी याचा हक्क पुरस्कृत करीत होता. पुढें संभाजीच महाराजा झाला.

श्री. सं. ले. ४२ }
श. }
(२३०८)
{ श. १६०२
{ इ १६८०-८१

श्रीसमर्थांनीं सज्जनगडीं असतां चाफळ व परळी येथील श्रीरामचंद्र महोत्सवाची व्यवस्था सांगितलीं तीं कलमें ३५.

हि. रे. भा. ११ }
पृ. ९० ? }
(२३०९)
एकहरफी
{ श. १६०२
{ इ. १६८०

पापळ परगण्याचा तपशील—यांत गांवांतील जिराईत व बागाईत जमिनीचा वसूल, गांवचराई, इनाम, वगैरेचा तपशील असून औरंगाबाद, बऱ्हाणपूर, एलिचपूर व अकोट येथून परगण्याच्या ठाण्यांचीं अंतरें दिलीं आहेत.

सा. ले. ३६८ }
(२३१०)
{ श. १६०२
{ इ. १६८०-८१

जिवाजी कृष्ण निा तिमाजीकृष्ण—सिवापा मुचेडी व जिवाजी सोमाजी

तुम्ही नाइकापासोन ९०० होन कर्ज घेतले ते नाइकास पावले.

हिस्टॉ. मिसलनी
जेस्विट् लेटर्स, पृ.१९-२० इ. } (२३११) जेस्विट वृत्तांत १६७९-८१ { श. १६०२-३ इ. १६८१

एकोजीच्या जुलमामुळें तंजावरची हलाखीची स्थिति आहे. त्यानें देवळांचीं देखील पूर्वापार चालत आलेलीं उत्पन्नें जप्त केलीं. 'देवाला भात खाण्याचा नसतो. त्याला सुवासिक फुलें मिळालीं म्हणजे पुष्कळ झालें' असें बोलणारा अधिपती इतरांना कसा नागवीत असेल. ती कल्पनाच करावी !

......१६७० [१६८०] च्या अखेरीस **शिवाजीच्या** मृत्यूची बातमी आली. ह्या वेळीं ती खरी ठरली ! ह्या पूर्वी, आपल्या मृत्यूच्या बातमीमुळें बेसावध झालेल्या मुलखांत चोरी व लुटालूट अनायासानें करतां यावी म्हणून, त्यानें लोकांना फसविण्या-करितां अनेक वेळां असल्या बातम्या पसरविल्या होत्या. सर्व राष्ट्रांमध्यें राज्यकर्ता म्हणून परमेश्वरानें आपल्याला अढळपद दिलें अशी बढाई मारणारा [?] हा जुलमी राजा शेवटीं मृत्यूच्या तावडींत सांपडला.

खं. १८ ले. ६३ } (२३१२) { श. १६०२ इ. १६८०

......नागोजी बिन हिरोजी बद अमल वर्तला. त्यावरून त्यास गुंजवणी अलिकडे पकडून त्याचें डोसकें मारलें. ते वेळेस हारजी शाहाजी माहाराजाकडे चाकरीस होता. पुढें दादो कोंडदेव या प्रांते येऊन मुलकास कौल दिल्हा. त्यांचा चाकर नावडकर मौ धागवडीस कमाविसीस ठेविला होता. त्यानें आपली सीव रेटली. नंतर दादो कोंडदेव सावरदरियास आले. तेथें गोजाबा कोम नागोजी हिनें तक्रार नेली. तीस त्यांनीं १२ रुके जमीन देऊन समजावीस केली. त्यावर शिवाजीमहाराज या प्रांतास आले. आपले आजे त्रिंबकजी महाराजांजवळ व मलकोजी पुरंधरास सरनोबतीवर होता. मलकोजी एकदां गांवावर येऊन वाडेसेते वगैरेंची व्यवस्था करीत होता. तो महाराजांचे बोलावण्या-वरून रायगडास गेला. पुढें पातशाही गर्दी जाली. मुलूक उज्याड जाला.

खं. १८ ले. २३ } (२३१३) { श. १६०२ इ. १६८०

राघो बलाळ — मोरो त्रिमल

मौजे चिखली येथील पाटील, कुणबी व कुलकर्णी ह्यांमध्यें हिसेबाबद्दल भांडण आहे. रा. पंतीं सन सलासांत निवाडा केला असून ते कागद हारपले असें कुणबी म्हण-तात. तरी हा निश्चय तुमचे पत्रावरी आला आहे. तरी पत्रीं निवाडा झाला असल्यास तैसें लिहावें म्हणजे त्याप्रमाणें त्यांस वर्तवूं. सिवाजी कुलकर्णी व कुणबी आणून हिसेब पाहतां पैके निघतात. पण कुलकर्णी पळोन गेला व तो खोटा आहे. कळावें.

ऐ. ७ पृ. ६ (२३१४ = अ) महजर {श. १५०५ इ. १५८३}

ऐनापूर पा। रायबाग व तांगडी मामले विजापूर ह्यां गांवच्या हद्दीबद्दल तंटा. तांगडीकरांना धैर्य न झाल्यामुळें दिव्य होतांच ऐनापूरकर खरे आले.

श. १५४२ ज्येष्ठ शु. १२] (१३७ = ११४ अ) [इ. १६२० जून १

खं. २० ले. २२९ सु.१०२४ (२३१५ = २०५ अ) {श. १५४५ इ. १६२३}

शमशखान— हुदे. व मो. मौजे मोरगाऊ पा। पुणा.

मल्हारभट बिन कृष्णभट भगत मोरया (अपूर्ण)

श. १५४६] (४९१ अ) [इ. १६२४

पिसुर्लेकर सं. पोर्तु. इ. (२३१६ = ३०२ अ) {श. १५५१ पौष इ. १६२९ डिसेंबर}

सध्यां **सुलतान खुर्रम** निजामशहाला साह्य करतो, व त्याच्याविरुद्ध लढाई करीत नाहीं. परंतु मलिक अंबराचा मुलगा **फत्तेखान**-जो तूर्त कैदेंत आहे-त्यास सोडून देण्याविषयीं निजामशहाला आज्ञा करतो. झुररखानाला [?] सोडून देण्याविषयींहि सुलतान खुर्रम निजामशहाला सांगतो.

श. १५६४] (५४२ = ४८० अ) [इ. १६४२

श्री सं. ले. ४२१ श. सु. १०३७ रखर २२ (२३१७ = ४११ अ) न. {श. १५५८ भाद्र. व. १० इ. १६३६ सप्टें. १३}

खंडो तुलारस, महादोबा माध्यंजन कुल. मौजे बाहे ता। वाळवे.

नारो महादेऊ ऋग्वेदी मौ. उरण

मौ. मज.चे कुलकर्णावर कोनेरी गोळक हक्क सांगूं लागला. मुनसफी होऊन आम्हीच मिरासदार ठरलो. आम्ही ५० होन सेरणी कबूल केली. ती देण्यास सामर्थ्य नाहीं. म्हणून तुम्हास १३५ होनांस निमे कुलकर्ण देऊन वृत्तिभाऊ केलें असे.

श्री सं. ले. ४२२ सु. १०३७ जवल १ (२३१८ = ४१२ अ) न. {श. १५५८ आश्वीन शु. २ इ. १६३६ सप्टेंबर २१}

ले. ४२१ मध्यें दिलेल्या कुळकर्णविक्रीचा महजर.

सा. इ. सा. ले. १३ ? रवल ५ (२३१९ = ५२७ अ) {श. १५६८ इ. १६४६}

विजापूर बादशहा——सिद्दी अमर, दंडाराजपुरी

खेमसावंत सरदेसाई परगणे कुडाळ व महालानिहाये, हे एकनिष्ठ चाकरीचे व तरवार-

बहादूर आहेत. त्यानें मोंगलाकडेस ममता न राखावी म्हणजे आपणावर कृपा होईल हें त्यास कळवून वकील रवाना करणे. त्यास आज्ञा देऊं तसें काम करणें.

श. १५७६ मार्ग. व. ५] (१०३९=६८१ अ) [इ. १६५४ डिसें. ८

सां. इ. सा. ले. १४ } (२३२० = ७२० अ) { श. १५७८ इ. १६५६

महमद बादशहा——खेमसावंत सरदेसाई प. कुडाळ व महालानिहाये.

तुम्ही वडिलार्जित चाकरीवर आलां, ठीक केलें. कोणते तऱ्हेनें राजा संभाजीशीं ममता राखून मोगल याजबरोबर मैत्री न ठेवावी. बादशाही मुलखाची आबादानी करून कुमकेकरितां हुजूर फौजेंत येणें. एक हुषार मनुष्य पाठविणें.

श. १५७९ श्रावण] (७२८=७१० अ) [इ. १६५७ जुलै

श. १५८० फाल्गुन शु. २] (१०४० = ७६३ अ) [इ. १६५८ फेब्रु. ३

सां. इ. सा. ले. १५ ? जिल्काद २१ } (२३२१ = ७७१ अ) { श. १५८० इ. १६५८–५९

अलि अदिलशहा बिन महमदशहा, विजापूर—खेमसावंत स. दे.

घाटाचे पायाखालील तमाम परगणे इनाम दिले. जमाबंदी करणें. वाजवी वसूल घेणें. आदलखान अमलांत हिंदवींत लिहिल्याप्रमाणें मसुरा वगैरे १३ गावें हक्कासह इनाम दिलीं. घाटावरून फौजा येतील तेव्हां हजर राहाणें. रहदारीस हरकत न होईसा बंदोबस्त करणें.

इ. वृ. १८३७ पृ. ३२८ ? } (२३२२ = ८६० अ) { श. १५८३ इ. १६६१

नेताजी राजे व नरहरसिंगजी राजे पालकर—गोपाल शंकर

मौ. तांदली प्रा करडें हा गांव आपला वतनी असून पिढी दरपिढी चालत आला आहे. पूर्वी अहमदनगरीं पातशाहा होते त्या समयांतला कलसकर मुसलमान होऊन आमच्या वतनाकरतां भांडूं लागला. तेव्हां निवाडा होऊन वतन आमचें हें साबूत झालें. त्याउपरी रा. साहेबाजवळहि भांडण होऊन कलसकर खोटे ठरले. हल्लींहि ते भांडत आहेत. तरी भोगवटा वतनाचा चालत आला आहे हेच आपली सनद, हे गोष्टी आपण ध्यानांत आणून विचार करावा.

श. १५८५ चैत्र शु. ४] (९२९ = ९२३ अ) [इ. १६६३ एप्रील १

श. १५८५ आश्वीन व. २] (९८४ = ९५७ अ) [इ. १६६३ आक्टो. ८

रु. ३ ले. १८ ? } (२३२३ = १०३७ अ) { श. १५८६ इ. १६६४–६५

आपला बाप सदूजी बकाजी मयत जाला. भि (शि) व भट बिन तिमणभट अत्रे

आगंतुक हे व मी जोसपण चालवितो. आपण त्रिवेजण भाऊ पण एकाचेहि लग्न नाहीं. यास्तव जोसपण होनु १४ स तुम्हालाच विकतो; कारण कुलकर्णहि तुम्ही घेतले आहे.... आपणास त्रिंबकजी राजे भोसले यांचे कारकीर्दीत होन ५ कर्ज होतें; कलांतरानें ते १० देणे झाले. ते देऊन जोतीस खाणें.... महाजन तीन बंधू ह्यांनीं सामराज निलकंठ रोजेकर यास विकत दिधले. तेणेंप्रो हल्ली सामराज नीलकंठ याजकडे मौजे म.चे कुलकर्ण व जोतिसीपण दुमाला केले असे.

हि. रे. क. भा. २ पृ. ९ } (२३२४=१०४१ अ) { श. १५८६
फरा. सलातीन पृ. } { इ. १६६४

इराण बादशहा—औरंगजेब

आम्हीं असें ऐकलें कीं, बादशहा असमर्थ व असहाय आहे असें समजून हिंदुस्थानांत बऱ्याच ठिकाणीं बंडखोरांनीं बंडाळी माजविली असून त्यांनीं बरींच ठिकाणें ताब्यांत घेतलीं आहेत व त्या राज्यांतील लोकांना ते त्रास देत आहेत. त्यांपैकीं मुख्य शिवा नांवाचा काफीर असून तो आजपर्यंत कोणाला माहीतहि नव्हता. बादशहाच्या कमकुवतपणामुळें त्याला संधी मिळून त्यानें पुष्कळ किल्ले ताब्यांत घेतले. कित्येक शिपायांना मारले व मुलूख उजाड केला व आतां तो बादशहाशीं बरोबरीचें नातें सांगूं लागला आहे. बादशहा मात्र बापाला कैदेंत टाकणें म्हणजे जग जिंकणें असें मानतो. व आपल्या भावांना-गादीचे जे न्याय्य वारस-मारून जादूटोण्यांत गढून राहिला आहे. आजपर्यंत त्यानें विश्वासघात व कपट यांचे खेळ खेळले. पण बंडखोरांना शासन करण्याची वेळ येतांच तो इतका गोंधळला आहे कीं, बंडखोरांना त्याच्या हातून शासन होणें अशक्य आहे. आमच्या कुलव्रतानुसार आम्हीं ज्याप्रमाणें आमच्या पूर्वजांनीं हुमायुनास गादी मिळवून देण्याच्या कामीं मदत केली त्याप्रमाणें-हुमायुनाचा वंशज अडचणींत आहे असें पाहून जातीनें सैन्य घेऊन मदत करण्याचें ठरविलें आहे व गरिबांना जुलमी लोकांच्या तावडींतून सोडवून त्यांचा दुवा घ्यावा अशी आमची इच्छा आहे.

हि. रे. क. भा. २ पृ. १२ } (२३२५=१०४१ आ) { श. १५८६
फरा. सला. पृ. } औरंगजेब—इराणचा शहा. { इ. १६६४

मुसलमानांना सवलती व काफिरावर जुलूम याशिवाय आमच्या मनांत दुसरें कांहींहि नाहीं. आम्ही जकात, रहदारी, निगहबानी वगैरे कर व्यापारी, प्रवासी व कलावंत यांना त्रास होत असल्यामुळें खजिन्यास चाट बसत असतांना सुद्धां रहित केले. यामुळें हे लोक आतां दुवा देत आहेत. या त्यांच्या सदिच्छेमुळेंच आमच्या सर्व इच्छा फलद्रूप होऊन द्वेष्टे लोक काळाच्या पोटांत गडप झाले आहेत. उ.-आपले वडिलांनीं आमच्या देशावर स्वारी केली. पण त्यांत निराश होऊन ते अवेळीं मरण पावले. आपलें उद्धट पत्र येतांच असें वाटलें कीं, शूर शिपायांच्या रक्तपाती तलवारींनीं व तीरांनीं त्यास

उत्तर द्यावें. परंतु बालवय व अननुभवित्व यामुळें लिहिलेल्या शब्दांकरितां येवढें घोरकर्म करूं नये. म्हणून आमच्या कृत्यांची हकीकत खालीं देत आहों. दारा शिको नास्तिक होता; शुजाला भावांना मारून बापादेखत गादी बळकाविण्याची इच्छा होती; मुरादबक्ष दारुडा व जुलमी होता; आम्हीं त्या सर्वांना यथायोग्य शासन केलें. वडिलांनीं प्रथम मुलांच्या दुर्गुणाकडे दुर्लक्ष केलें व नंतर मला गादी देऊन आपण बाजूला झाले. **शिवाच्या** बंडाविषयीं आपणांस असल्या बातम्या मिळाव्या याचें आश्चर्य वाटतें. आपल्या ठिकाणीं बालवयामुळें कदाचित् शहाणपणा नसेल. पण **सर्व दरबारांत शहाणपणाचा अभाव** व्हावा हें चांगलें नाहीं. आमच्या सैन्यास इराणतुराणचीं सैन्येंहि तोंड देऊं शकत नाहींत तर शिवाची कथा काय? वाटमारे लोक लपून छपून आपला धंदा करीत असल्यास त्यांत विशेष नाहीं. आपण कार्याच्या आदिअंतीं जास्त दूरदर्शीपणा दाखवावा हें अधिक चांगलें. इराणच्या प्रवाशांना त्रास देणाऱ्या फँस ह्याचा नाश करून आपली भेट घ्यावी ही इच्छा आहे.

मॉ. रि. भा. ४७ } पृ. ३५ ?	(२३२६ = ११५५ अ) जयसिंग–कुमार रामसिंग (दिल्ली)	{ श. १५८८ { इ. १६६६

['मीं सर्व प्राथमिक आणि कष्टाचें काम करून ठेविलें आहे. आतां मला दख्खनच्या अधिकारावरून काढून घेतल्यानें माझें नांव नालायकीबद्दल विनाकारण बद्दू होऊन, मीं केलेल्या कष्टांचा फायदा मजमागून येणाऱ्या अधिकाऱ्याला फुकटांत मिळेल व त्याचें मात्र नांव होईल! तेव्हां अजूनपर्यंतच्या विख्यात कामगिरीकडे लक्ष देऊन, मजवर गहजब होईल अशा तऱ्हेनें मजला दख्खनच्या अधिकारावरून काढूं नये अशी बादशहाला भेटून विनंती कर ' इत्यादि मजकूर लिहिल्यावर–]

माझ्या आयुष्याची आतां 'हत्ती गेला आणि शेंपूट राहिलें' अशी वस्तुस्थिति आहे. माझ्या वृद्धापकाळीं माझी नाचक्की न व्हावी म्हणून मीं माझे पीर व मुर्शीद (बादशहा) यांना शरण आलों आहें. माझ्या आयुष्याचे शेवटचे दिवस मला मानहानींत काढावे लागत आहेत! [हाफ्त अंजु० पृ. १९५]

(२) जयसिंग–कुमार रामसिंग

[सांकेतिक लिपींतील पत्र]–मीं लहानमोठी कोणतीहि गोष्ट तुझ्या हिताकडे लक्ष ठेवून करितों. असें असतांना तूं मात्र बादशाही कामगिरीबद्दल महत्त्वाच्या गोष्टी मी लिहितों तेव्हां बेफिकीरीनें स्वाऱ्याशिकारी करीत राहातोस! तुझ्याकडून पत्रांचीं उत्तरें कधीं वेळेवर येत नाहींत. आणि जेव्हां येतात तेव्हां त्यांत कित्येक मुद्दे तसेच सोडून दिलेले असतात. माझें बापपणाचें नातें जरी यदाकदाचित् तूं विसरलास तरी माझा दरबारांतला मुखत्यार म्हणून तरी तुला माझें काम काळजीपूर्वक केलें पाहिजे. माझ्याकडून एकादें पत्र केव्हां गेलें आणि तें तूं बादशहाला केव्हां सांगितलेंस असा बाद-

शहानें प्रश्न केला तर तुला जबाब द्यावा लागणार नाहीं काय ? परंतु कशाचीच तुला पर्वा नसेल तर तुला वाटेल तसें वागत जा ! श्री रामजी आमच्या देखील शिरावर जागा आहे.

(३) जयसिंग — गिरिधरलाल (वकील)

माझ्या नशिबीं खडतर काळ आला आहे. प्रत्येक इसम इतके कष्ट केवळ आपल्या पुत्रांच्या कल्याणाकरितां करितो. पण रामसिंग तर 'मला कांहीं माहीत नाहीं' या पलीकडे एक ओळ लिहीत नाहीं !

आतां मजवर चतुर्विध आपत्ती कोसळल्या आहेत. (१) मीं माझा मुजरा [प्रतिष्ठा] गमावून बसलों; (२) माझ्या वतनाच्या परगण्यांना मीं मुकलों; (३) दक्षिणेच्या युद्धाप्रीत्यर्थ मला स्वतःच्या द्रव्याला खार लावून घ्यावा लागला. तें आतां परत मिळण्याची आशा नाहींच. आणि (४) सर्वांत अत्यंत खेदजनक गोष्ट म्हटली म्हणजे माझ्या मुलाचा सर्वस्वी नाश झाला. माझ्या लिहिण्यानें ह्या गोष्टी जरी त्याच्या डोक्यांत शिरत नसल्या तथापि त्या माझ्या नजेरसमोर दिसल्याशिवाय रहात नाहींत. रामसिंग दरबारांतील कांहींच हकीगत इकडे कळवीत नाहीं. मजबद्दल कोठें काय बोलतात हें तुम्हीं तरी सर्व कळवावें. मीं ह्या सुभ्यांची व्यवस्था करण्याकरितां जे ह्या कठीण काळामध्यें परिश्रम केले त्यांबद्दल कोणीं बादशहाजवळ बोललें काय ? बादशहा माझ्याबद्दल काय बोलला ? वगैरे सर्व मला सविस्तर कळवा. [पृ. १९९]

त्रै. ४ पृ. ३७ } (२३२७ = ११९९ अ) { श. १५८९ { इ. १६६७

उल्लेख

......हस्तनापूरच्या पातशहानें देशमुखी शिवाजीमहाराज देतो म्हणऊन शिवाजी दिलीस गेले......तेथें महाराजास अटकेंत ठेविले.......पुढें डाल्याच्या मोइनी पाठविण्याचा राबता पाडिला. डाल्याचा झाडा कशास, म्हणून तोहि राबता मोडला...... पुढें हिरोजी फरजंद यास माहाराजांनीं आपला पोशाख देऊन आपले पलंगावर निजविलें व मदारी मेहेतर फरास यास सांगितलें कीं, हा मनसुभा तींसिवाये फूट पडूं न देण. शिवाजीराजे काशीहून आपले देशास आले. हिरोजी व मदारी रायेगडास सुटून आले. हिरोजीस अवघे किल्ल्याचा हवाला दिला व मदारी यास पोशाख सोन्याच्या कड्यांसुद्धां इनाम दिल्हा. तख्ताच्या पूजेचा कानू करून चादर, मोहरा ५, ताडाची पासोडी, इ. मेहरवान होऊन दिला. (पुढें, पुढल्या छत्रपतींच्या कारकीर्दीतील ह्याचे वंशज कोण ते सांगितलें आहे.)

खं. १८ ले. ६० } (२३२८ = ११९९ अ) { श. १५८९ { इ. १६६७

मोरो तानदेऊ होनप देशपांडे यांचे पुत्र तान्हाजीराम व त्यांचा गुमास्ता नामाजी

लांडा. हे वारल्यानंतर नामाजीच्या पांच मुलापैकीं यादव संभाजीकडे व निळो सोनदेव यांचे नातलग आपाजी व अंताजी, हेहि नामाजीचे पुत्र, शिवाजीराजांकडे नौकरीस राहिले. पुढें शाहिस्तेखान पुण्यावर आला. त्यांकडे तक्रार नेली. पण इतक्यांत खान दिल्लीस परत गेला. त्यावर जयसिंग आला. त्यांजकडे कर्यात मावळ इतर मावळें इत्यादींचे दोडे, दोाख इत्यादि-मंडळी आली. त्यांनीं तीन लाख होन करार करून वतने दुमाले करून घेतली.

खं. १७ ले. १ } (२३२९ = १२५० अ) { श. १५९०
महजर न. { इ. १६६८

जानाई कोम रत्नोजी वाा शाहाजी बिन गोविंदराव काळे कासार देशमूख ताा वेळवंडखोर इने कान्होजी वाा शहाजी निंबाळकर माहाले पाा कराड यासी होन ५०१ स दोाखी विकली देह १०.

श. १५९४ चैत्र व. १] (१८७५ = १४६२ अ) [इ. १६७६ एप्रील ४

खं. १८ ले. ६२ } (२३३० = १६२१ अ) { श. १५९५ { इ. १६७३

परगणे पुण्याचे देह बदेह २९० दर होनास रु. ३॥ प्रो तनखा दिवाण मोगलाई रु.३,२९,८७६॥.॥ पायपोसी व खर्चपटी वजा. ती धरून पाा होन १०,६३२॥≈। इत्यादि (अपूर्ण).

श. १५९६ वैशाख शु. १५] (१३९२ = १६४० अ) [इ. १६७४ मे ९

खं. १८ ले. ५९ } (२३३१ = १८२४ अ) { श. १५९७ { इ. १६७५

मौजे वडिगांव ताा निरथडी प्राा पुणें येथील कदीम मोकदम चोथे. त्यास मारून मचाले मो. झाले. त्यांना मारून वणंगपाळ निंबाळकर मोकदमीवर आले. त्यावर राजाळेकर निंबाळकर येऊन त्याचा वंश आहे. पैकीं त्याचे लेक मानाजी व सुभानजी बिन सिदोजी हे हैबतरायाबराबर असेती. इ.

इ. सं. ऐ. ले. } (२३३२ = १९२० अ) { श. १५९८
भा. ४ पृ. ३ } { इ. १६७६-७७

रा. शिवाजी राजे—रा. येकोजी राजे

आशीर्वाद उपरी, कैलासवासी साहेबीं कैलासवास केला त्यास आजी तेरा वर्षे जालीं. महाराजाचे पैके व जडाव व हाती व घोडे व मुलूख आवघेहि रा. रघुनाथपंती तुम्हाला राज्यावरी बैसवून संपूर्ण राज्य तुमचे हातीं दिल्हें. येसियास आमचा अर्ध वाटा तेरा वर्षे

तुम्हीच खादला. आम्ही जरी तुम्हाजवली मागावें तरी बहुत दूर होतों. बऱ्या बोलें तुम्ही देणार नव्हां. म्हणून तेरा वर्षे सबूरी केली. मनामधे येसा विचार केला कीं, बरें, महाराजांचे पुत्र तेहि आहेत. खाती तोंवरी खात. मालाचे धनीच आहेत. जे समई आम्हाला फावेल ते समई आम्ही वेव्हार सांगोन घेऊन. येसें मनी धरून होतों. येसीयास राजकारणप्रसंगें आम्ही कुतुबशहाचे भेटीस भागानगरास गेलों. तेथून कर्नाटकांत गेलों. चंजी घेतली. व येलूरतर्फेचा मुलूख घेतला. व सेरखानास झगडियांत मोडून गर्दैस मेलविलें. सेरखानाचे हातीं मुलूक होता तेवडाहि घेतला. त्यावरी मजल दरमजल कावेरीतीरास गेलों. तेथून तुम्हाला पत्रें लिहिलीं कीं, रा. गोविंदभट गो व रा० काकाजीपंत व रा. निलोबा नाईक व रा. रंगोबा नाईक व तिमाजी यक्षीयार राऊ येसे भले लोक आम्हापासी पाठवणे म्हणून तुम्हाला बहुतां रीतीं लिहून पाठविलें त्यावरून तुम्हीं सदरहू भले लोक आम्हापासी पाठवून दिल्हे. त्या भले लोकासी बहुता रीतीं घरोबियाचा वेव्हार सांगोन आमचा अर्धा वांटा आम्हाला बऱ्या बोलें द्या म्हणोन सांगोन पाठविलें. त्याबराबरी रा. बालंभट गोसावी व रा. कृरण ज्योतिसी व कृस्णाजी सेखजी येसे आपले तर्फेनें भले लोक दिल्हे. हे भले लोक तुम्हाजवलीं जाऊन बहुतां रीतीं बोलिले कीं, गृहकलह करूं नये; आपला अर्धा वांटा मागतात तो द्यावा येसे बोलिले. परंतु कपटबुद्धी तुम्ही येसी मनी धरिली कीं, या समयांत आम्ही बहुत थोर राजे जालों आहों. आम्हांसी आपण खासा भेटीस येऊनु हलभल नरमी बहुत दाखवावी आणि आमचा वाटा बुडवावा. तेरा वर्षे सारें राज्य आपणच खादलें; पुढेंहि सारे राज्य आपणच खावें; येसी बुद्धि मनी धरून वाटियाचा निवाडियाची तह न करितां आपण खासाच आमचे भेटीस आलेस. आमची व तुमची भेट जाली. त्याउपरी आम्हीं बहुता रीतीं तुम्हासी बोलिलो कीं, आमचा वाटा अरधा द्या. परंतु, तुम्ही वाटा द्यावा हा विचार मनी धराचना. मग जरूर जाले कीं तुम्ही धाकटे भाऊ आपण होऊन आमचे भेटीस आलेस आणि तुम्हाला धरावे आणि वाटा मागावा हे गोष्टी थोरपणाचे इज्जतीमध्यें ल्याख नव्हे. या निमित्य तुम्हाला चंजाउरास जावयाचा निरोप दिधला. तुम्ही चंजाउरास गेलेसी याउपेरी गृहकलह वाढऊं नये. वाढलियानें पहिले युगीं पांडव कौरव बहुतबहुत कस्टी जाले ते सारां भारताची कथा मनात आणून गृहकलह वाढविलियांत उभयपक्षी कस्टी होयेजेत. येसें जाणून रा. शामजी नाईक व कोनेरीपंत व शिवाजी शंकर या हातीं मागते बहुता रीतीं सांगोन पाठविलें कीं, तुम्ही व आम्ही वाटे करून घेऊन परस्परें समाधाने राहोन. परंतु, तुम्ही दुर्योधनासारिखी दुस्ट बुधी करून संधी न कराच. युध्य करावें येसेंच मनी धरिले. येसियास आम्हाला रायेगड प्रांतें बहुत कांहीं कार्य होतें यानिमित्य चि. संताजी राजे व रा. रघुनाथपंत व रा. हंबिरराऊ येसे ते प्रांते ठेउनु आम्ही स्वार होऊन तोरगल प्रांतास आलों. तेथें येसी खबर आइकिली, कीं, तुम्ही तुरुक लोकाच्या बुधीस लागोन आमच्या लोकांसी झगडा करावा येसें मनीं धरून आपली

सारे जमेत येकवट करून आमच्या लोकांवरी पाठवून दिल्हेत. ते वालगोंडपुरास आले. तुमचे लोक चालोन आल्यावरी तुमच्या आमच्या लोकांत थोर झगडा जाला. तुमचे लोक पराजय पावले. प्रतापजी राजे व भिवर्जी राजे व शिवाजी दबीर येैसे तिघे धरिले व कितियेक लोक मारिले; कितीयेक लोक पलोन दाणादाण होऊन गेले. येैसा समाचार आइकिला. हें ऐकोन बहुत नवल येैसें वाटलें कीं, कै० महाराज त्यांचे तुम्ही पुत्र, बहुत थोर लोक, येैसे असोन कांहीं विचार करीत नाहीं. व धर्माधर्म विचारीत नाहीं. येैसे असतां कस्टी व्हाल याचे नवल काये? तुम्ही म्हणाल कीं, काये विचार करावा? तरी येैसा विचार करावा होता कीं, अधर्मेंकडून तेरा वर्षें आपण सारें राज्य खादलें तें खादलें. आतां, अरधा वांटा मागतात तो त्यांचा त्याला द्यावा; आणि आपण सुखें रहावें. येैसा विचार करावा होता. दुसरा विचार करावा होता कीं, श्रीदेवाची व श्रीची कृपा त्यावरी पूर्ण जाली आहे. दुस्ट तुर्काला ते मारितात. आपल्या सैन्यांतहि तुरुक लोकच असतां जयें कैसा होतों; आणि तुरुक लोक कैसे वाचो पाहातात, हा विचार करावा होता. आणि युध्याचा प्रसंग पाडावा नव्हता. परंतु, दुर्योधनासारखी बुधी धरून युध्य केलें आणि लोक मारविले. जे जाले ते जाले. पुढें तरी हट न करणें. तेरा वर्षें तुम्हीं सारे राज्य खादलें तें खादलें. याउपरी कितेक आमचे आम्ही घेतले असे. अरणी, बेंगलूर, कोल्हार, होसकोट, सिरलकटे व किरकोल जागे व चंजाऊर येैसे जे जागे तुमचे हातीं उरले आहेती ते आमचे लोकांचे हातीं देणें. आणि नकद पैके व जवाहिर व हाती व घोडे यांचा अरधा वाटा देणें. येैसा विचार करून आम्हासी संधी करणें. तुम्ही येैसा संधी निर्मलपणें केलिया आम्ही आपणापासोन तुम्हाला तुंगभद्रे आलाड पनालेप्रांते तिन्ही लक्ष होनांची दौलत देऊन; अथवा आम्हाजवळील दौलत तुम्हाला मानेना तरी कुतुबशाहास अर्ज करून त्यापासून तुम्हाला ३ तीन लक्षांची दौलत देवऊनु. येैसे दोन्ही विचार तुम्हाला लिहिले आहेत. या दोन्हीमधील येक मनीं धरून मान्य करणें. हटाचे हातीं ने देणें. आपल्यांत आपण गृहकलह करावा आणि कस्टी व्हावें याचें कांहीं प्रयोजन नाहीं. याउपरी तऱ्ही आमचा आपला संधी व्हावा येैसी बुधी मनीं धरून वांटियाचा वेव्हार निर्गमून टाकणें. आणि सुखें असणें. गृहकलह बरा नव्हे. आम्ही तरी वडीलपणें आजीवरी तुम्हाला सांगितलें; आतांहि सांगतो ऐकाल तरी बरें. तुम्हीच सुख पावाल. नाइकाल तरी तुम्हीच कस्टी व्हाल. आमचे काये चालतें? बहुत काय लिहिणे 'मर्यादेयं विराजते'

से. रे. कॅट्. पृ. १०३ इ.१६७७-८७	(२३३३ = २०२३ अ) मि. चाइल्ड—मुंबई [?]	श. १५९९ इ. १६७७-७८

शिवाजीनें चेंजी चॅंजावर, पिलमदल (Pillamdall) आणि इतर कित्येक किल्ले घेतले.

सा. ले. ३६६ (२३३४=२२२० अ) श. १६०१ माघ व. १
सु. १०८० साबान १५ नेमपत्र इ. १६७९ फेब्रु. ६

को अथणींच्यां पेठेबद्दल नियम, देवालयीं समस्त दैव बसोन, झाला कीं, एक मूठ मिरें, सुपारी लाभ व उगट घेत देत जाणें. नवी जिकीर न करणें. हे नेमउत्तर सोडील तो सिवाचारकुलाचारावेगळा व छपन्न देशाचे दैवावेगळा.

खं. ८ ले. ३७ (२३३५)
हकीकत

बेदरीं निळोपंत कयाळनिशी करीत होते. त्यांस तपे सोनवळची ठाणेदारी व मजमू दिल्ही. तेव्हां, महाद परभू हा तेथील अदकारी त्यानें, कसाला पडला म्हणून वतन श. १४४५ मध्यें १३ ह. टक्के घेऊन निळोपंत यास दिलें. पुढें कळोपंत बिन नागोजपंत यास कारकुनीवर ठेवून आपण हुजूर मोसबियास आले. तिकडे ८।१० वर्षे राहणें पडलें. नंतर परत येतांना सरखोती मिळाली. इकडे येतांच कळोपंत व निळोपंत यांचा कलह लागून कळोपंताचा नातू मुरार सोमाजी यानें मारेकरी घालून निळोपंताचा पुत्र नारोपंत यास बायकामुलें यांसह मारिले. नारोपंताची स्त्री आपलें मूल सोनाजी घेऊन पुण्यास आली. सोनाजी व त्यांचे पुत्र निळोजी हे वतनावर गेले नाहींत. छत्रपतींच्या पदरीं राहिले. पुढें भानजी मुरारीचा व आपला (रामचंद्र निळकंठ याचा) वतनाबद्दल तंटा लागून कल्याणीचा सुभेदार जूनदअल्ली याजपुढें गोतासमक्ष निकाल होऊन वतन आमचें खरें असें ठरलें. भादाणे, कुकसें इत्यादि गांवें व तेथील मानपान.

(से) फॅ. रे. सुरत (२३३६) श. १६०३ चैत्र व. २
भा. ९०–२ पृ. २८ इ. सुरत-फो. सें. ऑर्ज इ. १६८१ मार्च २६

बादशहानें आमच्यावर चढविलेली १½ टक्का जकात अजून कमी झाली नाहीं आणि होईल अशी आशाहि वाटत नाहीं. कारण गेलीं कित्येक वर्षें मुसलमानांपासून जकाती घेण्याचें बंद होतें; त्याऐवजीं आतां त्यांपासून शेंकडा २½ टक्के घेण्यास सुरवात झाल्याचें कळलें. बादशहाला पैशांची मोठी टंचाई भासूं लागल्यामुळें हा उपक्रम त्यानें केला आहे. **शिवाजी** आणि रजपूत या उभयतांशीं दीर्घकाळ युद्धें करावीं लागल्यामुळें त्याचा खजीना रिकामा झाला. त्यांतून त्याचा तिसरा पुत्र अकबर बंड करून रजपुतांना मिळाल्यामुळें अनेक तऱ्हेचे गोंधळ माजतील अशी भीती वाटते.

डाग रजिस्टर ११६८ (२३३७) श. १६०३ आषाढ शु. ६
पृ. ३८२ इ. जून २१ न्यू. इ. १६८१ जून ११

सद्रंगपट्टणच्या १९ मार्चच्या पत्रांत सर्वत्र शांतता असल्याची वातमी आहे. तथापि **शिवाजीचें** सैन्य विजापूर व गोवळकोंडें याच्या रोखानें येत आहे त्यापासून

जबरदस्ती किंवा लूट अशा सारखा कांहीं त्रास होण्याचा संभव आहे. याशिवाय लिंगोजी सांगरसोच्या अमलाखालीं सर्व कांहीं ठीक आहे.

(से) फॅ. रे. सुरत भा. ९०-२ पृ. ४६ इ. | (२३३८) सुरत-मुंबई | श. १६०३ आषाढ व. ४ इ. १६८१ जून २५

तुमच्या इच्छेप्रमाणें मायकेलच्या पुस्तकांतून उतारा व **शिवाजीच्या** हिशेबाची नक्कल राजापूरच्या वह्यांतून जशीच्या तशी करून पाठविली आहे. त्याच्या मुलाकडून ह्या सर्व हिशेबाचा उलगडा करण्यांत तुम्हांला यश येवो अशी आमची इच्छा आहे.

(से) फॅ. रे. सुरत भा. ९०-३ इ. | (२३३९) सुरत-कंपनी. | श. १६०३ माघ व. १० इ. १६८२ जाने. २३

[पृ. १३] अनेक अडचणींनंतर सरतेशेवटीं आम्हीं राजापूरची वखार संपूर्णपणें काढून घेतली आहे.

[पृ. १७] तुमच्या इतर कोणत्याहि कारभारापेक्षां तुमच्या मुंबई बेटाचा आम्हांला फार भार वाटतो. शिवाजी, मोंगल बादशहा आणि उर्मट पोर्तुगीज हे सर्व दुष्ट लोक शेजारीं असल्यामुळें त्यांच्याशीं शांतता राखणें हें मोठें कठीण काम होऊन बसलें आहे. **शिवाजी-** (किंवा आतां संभाजी म्हणणें अधिक उचित होईल) शीं खांदेरीउंदेरीच्या बाबतींत उद्भवलेला तंटा हें एक ह्याचें चांगलें उदाहरण आहे. ह्या चकमकींत ले. थॉर्पच्या अविचारी साहसामुळें तो आणि दुसरे बरेच लोक प्राणास मुकले. खांदेरी आणि उंदेरी हीं खडकाळ बेटें त्या वेळेपर्यंत ओसाड असून त्यांचेकडे कोणींहि लक्ष दिलें नव्हतें. त्यांच्या बाबतींत **शिवाजी-**चा आमचा तंटा कशामुळें आणि कोणत्या मुद्यांवर होता हें तुम्हांला न कळविल्याबद्दल प्रेसिडेंट व कौन्सिल यांवर (आम्हांवर) ठपका ठेवण्यांत आला आहे. परंतु ह्यावेळीं किंवा आतांहि, त्याच्या या कृत्याला महत्वाकांक्षा किंवा कांहीं राजकारणी धोरण याव्यतिरिक्त [हक्क आदिकरून] दुसरें कांहीं कारण होतें, याची आम्हांला जाणीव नव्हती किंवा नाहींहि. आणि यामुळें थॉर्पचा मृत्यु आदिकरून झालेल्या नाशाबद्दल आम्हीं दोषाला पात्र होत नाहीं. वास्तविक, ह्या थॉर्प प्रकरणाबाबत मुंबईहून पत्र येईपर्यंत शिवाजीनें ती जागा आपल्या ताब्यांत घेतल्याचेंहि आम्हांला कळलें नव्हतें. त्या वेळचा डेप्युटी गव्हर्नर हेन्री ऑक्झिंडेन, हल्लीं विलायतेंत आहे, तो याबद्दल आपली खात्री करून देईल. यद्यपि आपलीं जहाजें इंग्लंडहून यावयाच्या वेळेलाच हा तंटा उपस्थित झाला आणि त्यांचा या कामीं उपयोग करण्याला, जरी, तीच वेळ फार योग्य अशी होती, तथापि आम्हीं तसा हुकूम देऊं शकलों नाहीं; किंवा 'न्यू लंडन' जहाजावरून जॉन चाइल्ड डे० ग० होऊन जाईपर्यंत तशा तऱ्हेची सूचना मुंबईकडूनहि आम्हांला करण्यांत आली नव्हती. [आणि जेव्हां तशी सूचना देण्यांत आली] तेव्हां 'ॲन' व 'बेंगाला' हीं दोन्ही जहाजें

हिंदुस्तानच्या किनाऱ्यानें खालीं रवाना झालीं होतीं. बरें, 'जहाजांनीं त्या बेटावर मारा केल्यास तें हस्तगत होण्याचा संभव आहे' एवढाच त्यांच्या सूचनेचा इत्यर्थ होता. परंतु असें करणें तितकें सोपें नव्हतें. या (मोंगल) बादशहाचें एवढें मोठें आरमार, कीं ज्यामध्यें अनेक मोठीं जहाजें व पुष्कळ सैन्य असलेलीं अनेक लहान गलबतें सज्ज होतीं; तें **शिवाजी**चें कांहींच नुकसान करूं शकलें नाहीं. किंवा तुमच्या तोफांमुळें त्याचें किनाऱ्यावरील दळणवळण न थांबतां, सैन्य आणि सामुग्री पुरविण्याचा त्याचा क्रम अप्रतिहत चालूच होता. कारण, तें ठिकाणच अशा जागीं आहे कीं, मोठ्या जहाजांना तेथें जाणें शक्य नव्हतें. आणि लहान होड्यांकडून कार्यभाग करून घ्यावयाचा तर त्यांच्या सोईची उतरण्याची एकच सुरक्षित जागा असून तेथें प्रयत्न करणें [शत्रूच्या बंदोबस्तामुळें] धोक्याचें झालें असतें. आणि शिवाय आमच्या सनदेमध्यें अशा प्रसंगांची अंशतः तजवीज केलेली असली तथापि तसें [युद्ध] करण्यास आम्हांला भरपूर अधिकार होते असें आम्हांला वाटलें नाहीं. डेप्युटी-कौन्सिल आणि प्रेसिडेंट-कौन्सिल यांच्यामध्यें झालेला २७ ऑगस्ट १६७९ पासून ३१ जानेवारी १६८० रोजीं शिवाजीशीं तह झाल्याची हकीकत आम्हांला कळवीपर्यंतचा, पत्रव्यवहार मागवून आपण वाचला तर, त्या प्रसंगाला योग्य अशा पायऱ्यांनींच आम्हीं उपक्रम केला आणि निष्कारण आपलीं गलबतें तेथें पाठवून तीं भरण्यांत व विलायतेला पाठविण्यांत होणारी निराशा व नुकसान टाळलें; व त्यामुळें इतकें यश मिळालें असेंच आपल्यास वाटेल. यापुढें आपल्याला मुंबई बेटाचा ताबा राखावयाचा असेल आणि त्याचें उत्पन्न व खर्च यांचा मेळ रहावा अशी इच्छा असेल तर शिवाजीचें **खांदेरीहून** आणि मोंगलांचें **उंदेरीहून** उच्चाटण केलें पाहिजे. एवढेंच नव्हे, तर पोर्तुगीजहि अधिक चांगले व मित्रत्वानें वागतील असें कांहीं केलें पाहिजे. नाहींतर ती दुर्दैवी आणि अतुलनीय जागा (मुंबई बेट) संकट व धोका यांचें कायमचें स्थान होऊन बसेल.

(से) फॅ. रे. सुरत भा. ४–३ पृ. ३५ इ.	(२३४०) सुरत कन्सल्टेशन.	श. १६०४ चैत्र व. ५ इ. १६८२ एप्रील १७

ल्यूसिया डी सूझा (दारूचा मक्तेवाला) यानें **शिवाजी**च्या युद्धांत (खांदेरी उंदेरी प्रकरणीं) आपले उत्पन्नावर अनिष्ट परिणाम झाला अशी तक्रार केली. त्याच्या अर्जाचा विचार झाला.

मर्या
देयं विरा
जते

सार-संग्रह

सूची

[नांवापुढील आंकडे लेखांकांचे आहेत.]

य

र

शिवाजी व राष्ट्रें

शिवाजी व व्यक्ति

ह

भारत-इतिहास-संशोधक-मंडळ, पुणें.

[पुणें-सदाशिव पेठ ३१४, खुन्या मुरलीधराचे पलीकडे, शिवाजीमंदिरामागें]

[स्थापना शके १८३२]

सन १८६० च्या २१ व्या म्ह० सोसायटीज् रेजिस्ट्रेशन ॲक्टान्वयें नोंदलेलें.

स्थापना--सुमारें चाळीस वर्षे महाराष्ट्रांत स्वेतिहाससंशोधनाची खटपट पुष्कळ एतद्देशीय विद्वानांनीं आपापल्यापरी केलेली आहे. त्यांची कामगिरी बिनमोल झाली याविषयीं वाद नाहीं. परंतु बारीक विचार केला तर झालेलें काम राईएवढें तर व्हावयाचें काम डोंगराएवढें, असें म्हणण्यांत खचित अतिशयोक्ती नाहीं. अर्थात् एकेकटा सुटा संशोधक म्हणजे समुद्र आटवूं पाहणाऱ्या टिटवीप्रमाणें भासूं लागतो. यास्तव 'संघे शक्तिः कलौ युगे' हा न्याय अनुसरून सर्व इतिहासप्रेमी व इतिहाससंशोधक मंडळींची एक संस्थाच स्थापावी असा विचार होऊन शके **१८३२ सालीं आषाढ शु. १ स 'भारत-इतिहास-संशोधक-मंडळ'** या नांवाची संस्था स्थापन झाली. प्रसिद्ध पंडित **कै. रा. ब. गणेश व्यंकटेश जोशी**, बी. ए. व **कै. रा. ब. काशिनाथ नारायण साने**, बी. ए. हे या मंडळाचे अनुक्रमें पहिले व दुसरे अध्यक्ष होते. त्यानंतर **श्री. चिंतामण विनायक वैद्य**, एम्. ए., एल्एल्. बी., यांची शके १८५१ सालीं अध्यक्षस्थानीं योजना झाली.

उद्देशः--कांहीं वर्षे काम केल्यावर संस्था शके १८३८ सालीं (ता. ९।१०।१६) सो. रे. आक्टाप्रमाणें नोंदण्यांत आली. त्यावेळीं संस्थेचे उद्देश येणेंप्रमाणें ठरविलेः—

(श्री) भारतवर्षासंबंधीं ऐतिहासिक साधनें म्हणजे कागदपत्र, दस्तैवज, बखरी, कैफियती, शिलालेख, जुने हस्तलेख, सर्व प्रकारचे सारस्वत ग्रंथ, कलाकुसरीचीं कामें, नाणीं, ताम्रपत्रें, मूर्ती, शिल्पकार्यें, चित्रें आणि इतर हरतऱ्हेच्या ऐतिहासिक महत्वाच्या वस्तू जमा करणें व संरक्षिणें.

(ग) असलीं सर्व साधनें संरक्षिण्याकरितां व प्रदर्शिण्याकरितां योग्य इमारती उभारणें.

(णे) अशीं साधनें प्रसिद्ध करणें, त्याचप्रमाणें ऐतिहासिक संशोधनाचें कार्य जोरावण्याजोगे इतर ग्रंथ प्रसिद्ध करणें व भारतवर्षासंबंधीं ऐतिहासिक ग्रंथ व लेख प्रसिद्ध करणें.

(श) हिंदुस्थानच्या इतिहासासंबंधीं संशोधन व त्याचा चिकित्सापूर्वक अभ्यास जेणेंकरून बळावेल व उत्तेजित होईल असे मंडळाला जरूर अगर योग्य वाटतील ते अन्य उपाय योजणें.

(१) प्रतिवर्षी २०० रु. अगर अधिक वर्गणी मंडळास देणारा आश्रयदाता सभासद होय. (२) सालीना १२५ रु. अगर अधिक वर्गणी मंडळास देणारा हितकर्ता सभासद होय. (३) सालीना २५ रु. देणारास सभासद वर्ग १ म्हणावें. (४) सालीना १२ रु. देणारास सभासद वर्ग २ म्हणावें. (५) सालीना ६ रु. देणारास सभासद वर्ग ३ म्हणावें. (६) सालीना ३ रु. देणारास सभासद वर्ग ४ म्हणावें.

कोणत्याहि दराच्या **दसपट** वर्गणी एका व चालू वर्षांत देणारांस त्या वर्गाचे **हयातीचे** सभासद समजण्यांत येईल.

भारत–इतिहास–संशोधक–मंडळ–स्वीय–ग्रंथमाला.

* अशी खूण केलेले ग्रंथ मुंबई सरकारनें प्राथमिक व दुय्यम शाळांच्या पुस्तकालयासाठीं मंजूर केले आहेत.

मालांक	किंमत रु.
१ अहवाल (शके १८३२)	३
२ ,, (शके १८३३)	५
+३ सुबंतविचार (रा. वि. का. राजवाडे)	१०
४ वार्षिक इतिवृत्त (शके १८३४)	५
५ मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड १२ (रा. राजवाडे)	१॰८
*६ प्रथमसंमेलनवृत्त (शके १८३५)	॰१२
*७ वार्षिक इतिवृत्त (शके १८३५)	६
*८ द्वितीय संमेलनवृत्त (शके १८३६)	३
*९ वार्षिक इतिवृत्त (शके १८३६)	३
*१० मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खं. २० (शिवकालीन घराणीं)	३
*११ वार्षिक इतिवृत्त (शके १८३७)	६
*१२ तृतीयसंमेलनवृत्त (शके १८३७)	३
*१३ मुकुंद-महाभाष्य (संस्कृत)	॰८
*१४ ग्रंथराज (दासोपंत) ,,	॰८
*१५ स्फुट प्रकरणें भाग १ ला	॰१२
*१६ स्फुट प्रकरणें भाग २ रा	॰१२
भा. इ. सं. मं. त्रैमासिकः-१८४२ १८४३।४४।४५।४६।४७।४८।४९ ५०।५१	प्रत्येकीं रु. ३

मालांक	किंमत रु.
*१७ वार्षिक इतिवृत्त (शके १८३८)	३
१८ चतुर्थसंमेलनवृत्त (शके १८३८)	४
*१९ राजवाडे-खंड-स्थलसूची (१८३९)	४
*२० पंचमसंमेलनवृत्त (शके १८३९)	३
२१ संशोधनसंग्रह (१८३९)	छा. आहे.
२२ चंद्रचूड-दफ्तर-कलम १	३
२३ महाराष्ट्रसारस्वत	(संपलें)
२४ षष्ठसंमेलनवृत्त (१८४०)	४
२५ सप्तमसंमेलनवृत्त (१८४१)	३
२६ संशोधकाची छोटी जंत्री (रा. द. वि. आपटे)	॰४
२७ प्रदर्शनपरिचय	॰४
*२८ फारशी पत्रव्यवहार मूळ व भाषांतर (कंपनी व पेशवे)	५
२९ फार्शी-मराठी-कोश	४
३० शिवचरित्रसाहित्य खंड १ ला	१॰८
३१ Historical Miscellany.	१
३२ पुरंदरे-दप्तर-भाग १ कृ. वा. पुरंदरे (छत्रपती राजाराम ते पानिपत अखेर.)	४
३३ शिवचरित्रसाहित्य खं. २ रा	छा. आहे.

इतर पुस्तकें:–वासुदेवशास्त्री खरे–कृत:–(१) अधिकारयोग किं. ॰१०; ऐति. ले. संग्रह खंड ५ ते ११ किं. ३ ते ४ **राजवाडेकृत:–**'मराठयांच्या इतिहासाचीं साधनें' खंड १, ५, ७, ११, १३ व १४, १५ किं. अनुक्रमें रु. +१०, + १०, ३, ३॥, + १, २, ५ **काव्येतिहाससंग्रह**–मुक्तेश्वर-वनपर्व ४, वामनपंडित–स्फुट प्र. ३, अनेककविकृत स्फु. प्र. भाग १ व २ किं. रु. ३, समर्थकृत रामायणें व इतर प्रकरणें रु. २ व **भारतवर्ष:**–वर्ष १, अंक १ व ४–१२ किं. प्र. ॰१२. **चित्रें:**–थोरले बाजीराव नऊरंगी किं. ॰८; पिलाजी जाधवराव व श्री. शिवाजी महाराजांचा होन. ॰८. मंडळ पुरस्कृतग्रंथमालेंतील सर्व पुस्तकें सभासदांस सवलतीनें मिळतील.

टीप:–ट. हं. व बंगी व्ही. पी. वगैरे खर्च निराळा पडेल. घाउक घेणारांस चांगलें कमिशन देऊं माहितीपत्रक मागवा. +दुर्मिळ सबब वाढविलेल्या किंमती.